मुण्डकोपनिषत्.

शाङ्करभाष्यसमेता ।

ॐ तत्सद्ब्रह्मणे नमः ।

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः ।
भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ॥
स्थिरैरङ्गैस्तुष्टुवाꣳसस्तनूभिः ।
व्यशेम देवहितं यदायुः ॥

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।

या शांतिमंत्राचा अर्थ प्रश्नोपनिषदांत दिलाच आहे, म्हणून त्याची पुनरुक्ति येथें करण्याचें आवश्यकत्व दिसत नाहीं.

ॐ ब्रह्मा देवानामित्याद्यार्थर्वणोपनिषत् । अस्याश्च विद्यासंप्रदायकर्तृपारम्पर्यलक्षणसंबन्धमादावेवाऽऽह स्वयमेव स्तुत्यर्थम् । एवं हि महद्भिः परमपुरुषार्थसाधनत्वेन गुरुणाऽऽयासेन लब्धा विद्येति श्रोतृबुद्धिप्ररोचनाय विद्यां महीकरोति । स्तुत्या प्ररोचितायां हि विद्यायां सादराः प्रवर्तेरन्निति । प्रयोजनेन तु विद्यायाः साध्यसाधनलक्षणसंबन्धमुत्तरत्र वक्ष्यति—" भिद्यते हृदयग्रन्थिः " इत्यादिना । अत्र चापरशब्दवाच्यायामृग्वेदादिलक्षणायां विधिप्रतिषेधमात्रपरायां विद्यायां संसारकारणाविद्यादिदोषनिवर्तकत्वं नास्तीति स्वयमेवोक्त्वा परापरविद्याभेदकरणपूर्वं "कर्मविद्यायामन्तरे वर्तमाना" इत्यादिना । तथा परप्राप्तिसाधनं सर्वसाधनसाध्यविषयवैराग्यपूर्वकं गुरुप्रसादलभ्यां ब्रह्मविद्यामाह—"परीक्ष्य लोकानि"त्यादिना । प्रयोजनं चासकृद्ब्रवीति "ब्रह्म वेद ब्रह्मैव भवती"ति । "परामृताः परिमुच्यन्ति सर्वे" इति च । ज्ञानमात्रे यद्यपि सर्वाश्रमिणामधिकारस्तथाऽपि संन्यासनिष्ठैव ब्रह्मविद्या मोक्षसाधनं न कर्मसहितेति "भैक्ष्यचर्यां चरन्तः" "संन्यासयोगादि"ति च ब्रुवन्दर्शयति । विद्या-

कर्मविरोधाच्च । न हि ब्रह्मात्मैकत्वदर्शनेन सह कर्म स्वप्नेऽपि संपादयितुं शक्यम् । विद्यायाः कालविशेषाभावादनियतनिमित्तत्वात्कालसंकोचानुपपत्तिः । यत्तु गृहस्थेषु ब्रह्मविद्यासंप्रदायकर्तृत्वादि लिङ्गं न तत्स्थितन्यायं बाधितुमुत्सहते । न हि विधिशतेनापि तमःप्रकाशयोरेकत्वसद्भावः शक्यते कर्तुं किमुत लिङ्गैः केवलैरिति । एवमुक्तसंबन्धप्रयोजनाया उपनिषदोऽल्पाक्षरं ग्रन्थविवरणमारभ्यते । य इमां ब्रह्मविद्यामुपयन्त्यात्मभावेन श्रद्धाभक्तिपुरःसराः सन्तस्तेषां गर्भजन्मजरारोगाद्यनर्थपूगं निशातयति परं वा ब्रह्म गमयत्यविद्यादिसंसारकारणं चात्यन्तमवसादयति विनाशयतीत्युपनिषत् । उपनिपूर्वस्य सदेरेवमर्थस्मरणात् ।

हरिः ॐ

सिद्धान्ती—हें उपनिषद् आथर्वण वेदांतर्गत आहे. येथें प्रथमतः श्रुतीनें ब्रह्मविद्येचा संप्रदाय प्रवृत्त करणाऱ्या महापुरुषांच्या परंपरेचा अवतार केला आहे, विद्येचें लक्षण सांगितलें आहे व संबंधही आपणच सांगितला आहे. किंवा असाही अर्थ होईल कीं, संप्रदाय कर्त्यांच्या परंपरेनें अंकित जो संबंध सांगितला आहे, त्याचा हेतु हा आहे कीं, विद्येची स्तुति व्हावी. असें केलें असतां परमपुरुषाची प्राप्ति करून देणारीं साधनें महा आयासानें मोठमोठ्या पुरुषांनीं केलीं तेव्हां त्यांस ब्रह्मविद्या प्राप्त झाली, असें समजतें आणि श्रोत्यांची बुद्धि व इच्छा तरतरित होतात. असें आहे म्हणून येथें श्रुतीनें विद्येचें महत्त्व सांगितलें आहे. उघडच आहे कीं, फलस्तुति सांगून बुद्धीला प्रवृत्त केलें म्हणजे मुमुक्षुलोकांना ब्रह्मविद्येची आवड उत्पन्न होऊन ते तिच्या प्राप्तीसाठीं आदरपूर्वक प्रयत्न करितात. ब्रह्मपदार्थ साधून देणें हें जें विद्येचें प्रयोजन आहे, तें या उपनिषदाचेंही आहे, असें दाखविण्यासाठीं पुढें (दुसऱ्या मुण्डकाच्या दुसऱ्या खंडांतील आठव्या मंत्रांत–भिद्यते हृदयग्रंथिः–या मंत्रांत) साध्य, साधन, आणि लक्षण संबंध सांगितले आहेत. असो, या उपनिषदांत अपरविद्या म्हणून सांगितली आहे ती ऋग्वेदादिलक्षणपर असून 'करावें काय,' असें सांगणारे विधि आणि 'करूं नये काय' असें सांगणारे प्रतिषेध मात्र जिच्यामध्यें आहेत अशा लक्षणाची आहे. या अपरविद्येला संसार उत्पन्न करणाऱ्या अज्ञानादिदोषांचे निरसन करण्याचें सामर्थ्य नाहीं, असें श्रुति स्वतःच सांगत आहे. तसेंच, परविद्या (ब्रह्मविद्या) आणि अपरविद्या (विधि निषेध सांगणाऱ्या विद्या) यांच्यामध्यें विलक्षण भेद आहे, हें पहिल्या मुण्डकांतील दुसऱ्या खंडांत आठव्या मंत्रापासून तों दहाव्यापर्यंत जे संसारपर, संसारविषयक, मंत्र आहेत त्यांवरून व परब्रह्म प्राप्तीचें साधन असणारीं व सर्व साधन–विषय व साध्य विषय यांच्या

ठिकाणीं तीव्र वैराग्य उत्पन्न झाल्यानंतर गुरूच्या प्रसादानें मात्र साध्य होणारी, ब्रह्मविद्या आहे, असें त्याच मुंडकाच्या बाराव्या व तेराव्या मंत्रांत सांगितलें आहे, त्यांवरून सिद्ध होतें.

(सारांश, ऋग्वेदादि सर्व आधिभौतिक व आधिदैविक शास्त्रांचा अंतर्भाव अपरावर्गेत होतो, आणि ऐहिक व स्वर्गस्थ संसार (सांसारिक उपभोग) कसे असतात व ते उत्तम-रीतीनें कसे प्राप्त होतील तें हीं शास्त्रें सिद्धांतांनीं व विधिप्रतिषेधांनीं सांगत असतात व्यवहार म्हणजे काय? आणि व्यवहारांत कसें वागलें असतां उत्तम विषयसुख मिळेल, हें सांगण्यासाठीं ऋग्वेदादि अपरविद्या प्रवृत्त झाल्या आहेत. पण ब्रह्मविद्या प्रापंचिक दुःखांचा लय करून परमपुरुषार्थाचें स्वरूप सांगते. ही विद्या संपादन करण्याला विषय-वैराग्य हवें. वैराग्याला विवेकाचें पाठबळ उत्तम असावें लागतें. वैराग्य प्राप्त झालें म्हणजे चित्ताचा उपशम होतो व पुढें मोक्षाची तीव्र इच्छा प्राप्त झाल्यावर गुरु-प्रसादानें ब्रह्मविद्येची प्राप्ती होते. सारांश, परविद्या ही मोक्षस्वरूप सांगून त्याची प्राप्ति करून देणारी विद्या आहे.)

ब्रह्मविद्येचें प्रयोजन उघडच आहे आणि तें या उपनिषदामध्यें अनेक वेळ सांगि-तलें आहे. 'ज्याला ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान होईल तो ब्रह्मरूप होतो.' 'जे लोक ब्रह्म-विद्यामृताचें ज्ञानपूर्वक आपान करितात, ते सर्वथा मुक्त होतात.' इत्यादि मंत्र ब्रह्मविद्येचें प्रयोजन सांगतात.

आतां, यद्यपि चारी आश्रमांतील लोकांना ज्ञान-संपादनाचा अधिकार आहे, तथापि संन्यासनिष्ठ ब्रह्मविद्या हीच एक मोक्षाचें साधन आहे, असें या उपनिषदांत 'भिक्षावृत्तीचें अवलंबन करून' व 'संन्यासयोगानें' या मंत्रानीं स्पष्ट सांगितलें आहे. ब्रह्मविद्येंत कर्माचा कोणत्याही प्रकारानें संबंध येत नाहीं. कारण, विद्या आणि कर्म या उभयतांमध्यें तीव्र विरोध आहे. ब्रह्म आणि आत्मा (परमात्मा आणि प्रत्यगात्मा) हे दोन्ही एकात्मक आहेत, एक आहेत, असें ज्ञान झालेल्या पुरुषानें कर्म करावें असें स्वप्नामध्यें सुद्धां म्हणतां येण्याचा संभव नाहीं; किंवा 'तूं कर्म कर' असा विधि ब्रह्मज्ञ पुरुषाला विहित करणें शक्य नाहीं. उघड आहे कीं, ब्रह्मविद्येमध्यें भूत-भविष्य-वर्तमान इत्यादि कालविभागांचा अभाव असतो. तसेंच कार्य-कारणांचाही, व नित्यविधींचा संबंध नसतो. जेथें एकच अनाद्यनंत व सर्वव्यापी वस्तु आहे, तेथें कार्यकारणसंबंध कोठून असणार? पण कर्मामध्यें पूर्वकाल व उत्तरकाल पाहण्याचा व कार्यकारणांचे अस्तित्वाचा प्रसंग असतो, तसा काल-संकोच करण्याचें कारण येथें असत नाहीं, म्हणून कालशून्य-विद्या आणि कालांत करावें लागणारें कर्म या उभयतांमध्यें अत्यंत विरोध आहे. आतां, ब्रह्मविद्येच्या संप्रदायाचीं कर्तृत्वादि लिंगें गृहस्थांमध्यें केव्हां केव्हां सांपडतात, (केव्हां केव्हां कांहीं गृहस्थ ब्रह्मविद्येच्या संप्रदायाचे कर्ते आहेत असें कळतें.) हें खरें, तथापि हें लिंगस्थापन न्यायशुद्ध नाहीं. त्याचा बाध होणें ही गोष्ट अत्यंत सहज आहे. पहा कीं, तम आणि प्रकाश हे उभयतांही एकाठिकाणीं एक वेळीं

आहेत, असें हजारो विधींनीं जरी ठरविलें तथापि त सिद्ध होणें शक्य नाहीं. मग जेथें केवळ एक 'संप्रदायकर्तृत्व' चिह्न मात्र असेल त्याची काय कथा ? याप्रमाणें या विद्येचा संबंध आणि प्रयोजन या दोन गोष्टी सांगून, आम्ही आतां या मुण्डकोपनिषदाचें लहानसें विवरण करण्यास आरंभ करितों. जो कोणी आत्मभाव ठेवून (श्रद्धा आणि भक्तीसह) या ब्रह्मविद्येचे आराधन करितो; त्याच्या गर्भवास, जन्म, वृद्धपणा, रोग इत्यादि अनर्थ-समूहाला ही ब्रह्मविद्या शिथिल करिते, ही विद्या अनर्थ 'निषद्' म्हणजे नाहींसे करितें, किंवा परब्रह्मापर्यंत घेऊन जातें किंवा अविद्यादि संसारकारणांचा अत्यंत विनाश करितें म्हणून त्या विद्येला उपनिषद् (अनर्थ नाहींसे करणारा, ब्रह्माजवळ घेऊन जाणारा, व संसाराचा उच्छेद करून स्वरूपदर्शन घेत घेत ब्रह्मापर्यंत पोचविणारा ग्रंथ) असें म्हणतात. कारण, उपनिषद् या (उप+निपूर्वक 'सद्') शब्दाचा अर्थ आम्ही आतां सांगितल्याप्रमाणें आहे, असें स्मृतींचें म्हणणें आहे.

मंत्र पहिला.

ॐ ब्रह्मा देवानां प्रथमः संबभूव विश्वस्य कर्ता भुवनस्य गोप्ता । स ब्रह्मविद्यां सर्वविद्याप्रतिष्ठामथर्वाय ज्येष्ठपुत्राय प्राह ॥ १ ॥

अन्वय व अर्थ—ब्रह्मा देवानां प्रथमः संबभूव । सः विश्वस्य भुवनस्य कर्ता च गोप्ता । सर्व-विद्या-प्रतिष्ठां ब्रह्मविद्यां सः ज्येष्ठ-पुत्राय अथर्वाय प्राह (सर्वश्रेष्ठ ब्रह्मा—हिरण्यगर्भ—हा इतर सर्व देवांच्या आधीं उत्पन्न झाला. हा विश्वांतील सर्व भुवनांचा कर्ता असून त्यांचें रक्षण करणाराही आहे त्यानें सर्व विद्यांस आश्रय देणारी ब्रह्मविद्या अथर्वनामक ज्येष्ठ पुत्रास यथासांग सांगितली.) ॥ १ ॥

ब्रह्मा परिवृढो महान्धर्मज्ञानवैराग्यैश्वर्यैः सर्वानन्यानतिशेत इति । देवानां द्योतनवतामिन्द्रादीनां प्रथमो गुणैः प्रधानः सन्प्रथमोऽग्रे वा संबभूवाभिव्यक्तः सम्यक्स्वातन्त्र्येणेत्यभिप्रायः । न तथा यथा धर्माधर्मवशात्संसारिणोऽन्ये जायन्ते । "योऽसावतीन्द्रियोऽग्राह्यः" इत्यादिस्मृतेः । विश्वस्य सर्वस्य जगतः कर्तोत्पादयिता । भुवनस्योत्पन्नस्य गोप्ता पालयितेति विशेषणं ब्रह्मणो विद्यास्तुतये । स एवं प्रख्यातमहत्त्वो ब्रह्मा ब्रह्मविद्यां ब्रह्मणः परमात्मनो विद्यां ब्रह्मविद्याम् । 'येनाक्षरं पुरुषं वेद सत्यम्' इति विशेषणात्परस्यात्मविषया हि सा । ब्रह्मणा वाऽप्रजेनोक्तेति ब्रह्मविद्यां । तां सर्वविद्या-

प्रतिष्ठां सर्वविद्याभिव्यक्तिहेतुत्वात्सर्वविद्याश्रयामित्यर्थः । सर्वविद्यावेद्यं वा वस्त्वनयैव विज्ञायत इति । "येनाश्रुतं श्रुतं भवति अमतं मतमविज्ञातं विज्ञातम्" इति श्रुतेः । सर्वविद्याप्रतिष्ठामिति च स्तौति । विद्यामथर्वाय ज्येष्ठपुत्राय प्राह । ज्येष्ठश्चासौ पुत्रश्चानेकेषु ब्रह्मणः सृष्टिप्रकारेष्वन्यतमस्य सृष्टिप्रकारस्य प्रमुखे पूर्वमथर्वा सृष्ट इति ज्येष्ठस्तस्मै ज्येष्ठपुत्राय प्राहोक्तवान् ॥ १ ॥

सि० ब्रह्मदेव हा इतर सर्वांपेक्षां अत्यंत श्रेष्ठ आहे. धर्म, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य, इत्यादि सर्व गुण ब्रह्मदेवांमध्यें सर्वांपेक्षां जास्तपणानें सांपडतात म्हणून तो सर्वदेवांहून श्रेष्ठ आहे. असें आहे म्हणूनच त्याला सर्वांचा स्वामी असें म्हणतात. हा आतांच सांगितल्याप्रमाणें दिव्य व प्रकाशवंत इंद्रादिदेवांच्या समूहांत सद्गुणानें 'प्रथमता' व प्रमुखता पावला आहे, अथवा त्याचा जन्म सर्वांच्या अगोदर झाला आहे. येथें श्रुतीचा अभिप्राय हा आहे कीं, त्याचा आविर्भाव-त्याचा अवतार-'सम्यक्' म्हणजे स्वतंत्रतेनें 'बभूव' म्हणजे झाला. संसारी लोकांप्रमाणें पापपुण्याला वश झाल्यामुळें ब्रह्मदेवाला जन्मप्राप्ति झाली नाहीं. धर्माधर्माच्या संचिताप्रमाणें संसारी लोकांचें जन्मद् प्रारब्ध उत्पन्न होतें, पण ब्रह्मदेवाला प्रारब्ध-परतंत्र होऊन जन्म प्राप्ति होत नाहीं. 'तो हा अतींद्रिय असल्यामुळें अगोचर आहे' असें स्मृति ब्रह्मा-संबंधें म्हणते. असो. हा सर्व विश्वाला उत्पन्न करणारा आणि उत्पन्न केलेल्या जगाचें पालन करणारा आहे. जगत्कर्तृत्व व जगत्पालकत्व हीं विशेषणें ब्रह्मदेवाला उपयोजिलीं आहेत, तीं केवळ ब्रह्मविद्येचें माहात्म्य कळावें म्हणून होत. असो. अशा प्रकारचे ज्याचें महत्त्व सुप्रसिद्ध आहे, त्या ब्रह्मदेवानें परमात्म्याचें स्वरूप सांगणारी, 'जिच्या साह्यानें अविनाशी पुरुषोत्तमाचें सत्यस्वरूप सांगतां येतें' ती परमात्मविद्या आपल्या श्रेष्ठ पुत्राला म्हणजे अथर्वाला सांगितली. ब्रह्मदेवानें सृष्टि उत्पन्न केली तेव्हां सर्वांच्या अगोदर अथर्वाची उत्पत्ति केली; असें पूर्वेतिहासवेत्ते सांगतात. सर्वांच्या आधीं ज्याची उत्पत्ति झाली त्या ब्रह्मदेवानें ही विद्या सांगितली म्हणूनही या विद्येला ब्रह्मविद्या असें म्हणावें. इतर सर्वविद्यांच्या म्हणजे शास्त्रांच्या अस्तित्वाला व प्रकटीकरणाला कारण होणारी, सर्व विद्यांस आश्रय देणारी ही ब्रह्मविद्या आहे, सर्व वेदशास्त्रांस जें कार्य सांगावयाचें आहे तें ब्रह्म ब्रह्मविद्येनें समजतें, म्हणून तिला 'सर्वविद्यांचा आश्रय' अशा अर्थाचें पद श्रुतीनें उपयोजिलें आहे. 'ज्याच्यायोगानें न ऐकलेलें-किंवा न ऐकतां येण्यासारखें ऐकावयास सांपडतें. न समजलेलें किंवा न समजणारें समजतें, व उमजणारें किंवा न उमजलेलें उमजतें' अशी श्रुतीनें ज्ञानसर्वस्वाला आधार असणाऱ्या ब्रह्मविद्येची स्तुति केली आहे. असो, सर्व विद्यांस आश्रय देणारी ब्रह्मविद्या ब्रह्मदेवानें प्रथमतः आपल्या प्रथम पुत्रास निवेदन केली. ब्रह्मदेवानें अनेक वेळ सृष्टि उत्पन्न केली आहे, त्यांतील एका सृष्टीच्या उत्पत्तिसमयीं प्रथम अथर्व्याची उत्पत्ति केली, म्हणून त्याला जेष्ठ म्हटलें.

श्रीमन्मद्वाचार्य यांनीं या उपनिषदावर भाष्य लिहिलें आहे त्याच्या आरंभी जें नमन केलें आहे, त्यांतच उपनिषदाचा भावार्थ आणिला आहे आणि विषयाचा प्रवेश करितांना वैवस्वतनामक मन्वंतरांत ब्रह्मदेवाचा अथर्वा नामक अथर्वण–वेदवेत्ता जेष्ठ पुत्र अत्यंत प्रिय होता म्हणून त्याला ब्रह्मविद्येचा उपदेश केला इत्यादि मनोरंजक माहिती सांगितली आहे. विद्या शब्दाची 'विंदति' मिळते जिच्याद्वारा ती विद्या, प्राप्त होते ती विद्या, अशी व्युत्पत्ति दिली आहे व ब्रह्म मिळवून देणारी विद्या ती ब्रह्मविद्या असें ठरविलें आहे.

मंत्र दुसरा.

अथर्वणे यां प्रवदेत ब्रह्माऽथर्वा तां पुरोवाचाङ्गिरे ब्रह्मविद्याम् । स भारद्वाजाय सत्यवहाय प्राह भारद्वाजोऽङ्गिरसे परावराम् ॥ २ ॥

अन्वय व अर्थः—ब्रह्मा अथर्वणे यां प्रवदेत तां ब्रह्मविद्यां अथर्वा पुरा अंगिरे उवाच (ब्रह्मदेवानें जी विद्या अथर्वाला सांगितली ती अथर्वानें प्रथमतः अंगिरा नामक ऋषीला सांगितली.) **सत्यवहाय भारद्वाजाय सः प्राह, भारद्वाजः परावरां अंगिरसे प्राह** (भरद्वाज कुलोत्पन्न सत्यवहाला अंगिरानें ही ब्रह्मविद्या प्रथम सांगितली आणि भारद्वाजानें ही सर्व विद्यांस आश्रय देणारी 'परावरा' विद्या अंगिरसाला सांगितली.)

यामेतामथर्वणे प्रवदेतावदद्ब्रह्मविद्यां ब्रह्मा तामेव ब्रह्मणः प्राप्तामथर्वा पुरा पूर्वमुवाचोक्तवानङ्गिरेऽङ्गिर्नाम्ने ब्रह्मविद्याम् । स चाङ्गिर्भारद्वाजाय भरद्वाजगोत्राय सत्यवहाय सत्यवहनाम्ने प्राह प्रोक्तवान् । भारद्वाजोऽङ्गिरसे स्वशिष्याय पुत्राय वा परावरां परस्मात्परस्मादवरेण प्राप्तेति परावरा परावरसर्वविद्याविषयव्याप्तेर्वा । तां परावरामङ्गिरसे प्राहेत्यनुषङ्गः ॥ २ ॥

सिद्धान्तीः—ब्रह्मदेवानें जी ब्रह्मविद्या अथर्वणाला सांगितली, तीच ब्रह्मदेवापासून प्राप्त झालेली विद्या अंगिरा नामक ऋषीला अथर्वा प्रथम सांगता झाला. त्यानें भारद्वाज गोत्रांतील सत्यवहाला या ब्रह्मविद्येचें दान केलें. त्यानेंही आपला शिष्य किंवा पुत्र जो अंगिरस् त्याला, ही गुरूपासून शिष्यास, अशा परंपरेनें प्राप्त झालेली किंवा सर्वश्रेष्ठ व कनिष्ठ विद्या–विषयांस अंतर्भूत करणारी ब्रह्मविद्या सांगितली ॥ २ ॥

ज्ञात्वैव पप्रच्छ । सन्ति लोके सुवर्णादिशकलभेदाः सुवर्णत्वाद्यैकत्व-विज्ञानेन विज्ञायमाना लौकिकैः । तथा किं न्वस्ति सर्वस्य जगद्धेदस्यैकं कारणम् । यदेकस्मिन्विज्ञाते सर्वं विज्ञातं भवतीति । नन्वविदिते हि कस्मिन्निति प्रश्नोऽनुपपन्नः । किमस्ति तदिति तदा प्रश्नो युक्तः । सिद्धे ह्यस्तित्वे कस्मिन्निति स्यात् । यथा कस्मिन्निधेयमिति । न । अक्षरबाहुल्यादायासभीरुत्वात्प्रश्नः संभवन्येव किं त्वेकस्मिन्विज्ञाते सर्ववित्स्यादिति ॥ ३ ॥

सिद्धान्ती—शुनकाचा मुलगा व महागृहस्थाश्रमी जो शौनक तो भारद्वाज-शिष्याकडे (अंगिरसाकडे) शास्त्रानें सांगितलेल्या मार्गानें गेला —आचार्याकडे ज्या विधीनें जावें असें सांगितलें आहे, त्या शास्त्रपूर्वकविधीनें अंगिरस आचार्याकडे गेला--आणि--मोठ्या विनयानें-त्यांस पुढील प्रश्न विचारता झाला. येथे मात्र शौनक आणि अंगिरस यांचा जो संबंध सांगितला आहे, शिष्य आचार्याकडे विधिपूर्वक गेला असें स्पष्ट म्हटलें आहे, त्यावरून हें उघड होतें कीं, आचार्यास शरण जाण्याचा नित्य विधि पूर्वी नव्हता; किंवा असेंही म्हणतां येईल कीं, गुरुशिष्यांमधील मर्यादा स्पष्ट करण्यासाठीं 'विधिवत्' या पदाचा येथें उपयोग केला आहे. मध्यें दिवा ठेविला असतां दोन्हीकडे उजेड पडतो, या न्यायानें श्रुतीनें मध्येंच उपयोजिलेलें हें विशेषण पूर्वीच्या व आधुनिक शिष्याचार्याचा संबंध प्रकाशित करितें आणि श्रीगुरूस शरण जाण्याची निराबाधता प्रकट करितें. कांहींही असलें तरी आचार्याकडे शिष्यानें विनीतवृत्तीनें जाण हा विधि आधुनिक काळीं आम्हांस इष्ट आहे, म्हणून तो सर्वांनी अवश्य पाळिला पाहिजे. असो. शौनकानें विचारलें कीं, 'हे भगवन्! अशी कोणती बरें एक वस्तु आहे, कीं जी समजली असतां या सर्व दिसणाऱ्या व भासणाऱ्या वस्तूंचे विशेष ज्ञान होऊन मनुष्यास सर्वज्ञ होतां येतें.' शौनकानें असा एक शिष्ट-प्रवाद ऐकला होता कीं, एक वस्तूचें ज्ञान झालें असता सर्वज्ञ होतां येतें. तेव्हां तो वस्तु किंविशिष्ट आहे, हें समजण्यासाठीं त्यानें आपला प्रश्न केला आहे. 'कोणती बरें ती वस्तु?' असा शौनकाचा प्रश्न आहे. किंवा असेंही म्हणतां येईल कीं, व्यवहारांत सामान्य दृष्टि असते, म्हणजे सामान्यज्ञान असतें, त्या सामान्यांत अंतर्भूत होणाऱ्या सर्व विशेष वस्तूंचें ज्ञान सामान्य दृष्टीनें होतें. पहा कीं, व्यवहारांत सुवर्णादिकांचे अनेक आकाराचे तुकडे असतात. येथें सामान्य सुवर्णाचें ज्ञान झाल्याबरोबर कुंडलादिकांत असणाऱ्या सोन्याच्या तुकड्यांचेही सुवर्णत्व-ज्ञान व्यवहार--चतुर लोकांस होतें. याचप्रमाणें विश्वांत जे अनेक भेद दृग्गोचर होतात, त्यांचें असें कोणतें एक सामान्य कारण असावें कीं जे समजलें असतां जगाचे व त्यांतील सर्व भेदांचे ज्ञान होईल; अशाही व्यावहारिक दृष्टीनें शौनकाचा प्रश्न योग्य होतो. आतां कोणी असें म्हणेल कीं, जी वस्तु मुळींच ठाऊक नाहीं, त्या 'विशिष्ट गोष्टीचें ज्ञान द्या' असा प्रश्न शौनकानें करणें योग्य नाहीं. 'ती कोणती

वस्तु' असा त्यानें प्रश्न केला पाहिजे होता. प्रथम अस्तित्व सिद्ध झाल्यावर मग शौनकानें प्रश्न केला आहे, तो येथें योग्य होईल. कोणी तरी पुरुष विद्यमान आहेत, असें कळल्यावर मग आपण 'कोणाजवळ ही वस्तु ठेऊं?' असें विचारतों, आधीं विचारीत नाहीं. पण ही शंका बरोबर नाहीं. असें विचारणें म्हणजे ग्रंथाचा विनाकारण विस्तार करून आयास मात्र वाढविणें होय. हें मनांत आणून शौनकानें वर सांगितलेला प्रश्न विचारला आहे. त्याचें तात्पर्य मात्र हें आहे कीं, अशी कोणती वस्तु आहे कीं, जी समजली असतां सर्वज्ञत्व प्राप्त होतें. ॥ ३ ॥

या मंत्राचें उद्घाटन करितांना **श्रीरंगरामानुजाचार्यांनीं** पुष्कळच विस्तृत व्याख्यान लिहून 'सर्वं इदं' या शब्दद्वयाच्या जोरावर चिदचिद्विशिष्टब्रह्माची सत्यता स्थापन करण्याचा दीर्घ प्रयत्न केला आहे. त्याचें तात्पर्य हें आहे. 'हें सर्व-इदं सर्वं-' हें विशेषण असून त्याचें विशेष्य सगुणब्रह्म आहे व या विस्तीर्ण प्रपंचाचें, ह्या परिणामाचें, उपादान कारण चिदचिद्विशिष्टब्रह्म आहे. या मूळ ब्रह्मापासूनच सर्व दृश्यमान चराचर विश्वाची उत्क्रांति ब्रह्माच्या नियंत्रणसामर्थ्यानें होते. अर्थातच चराचरांत अवस्थांतर दृष्टीस पडतें, त्याप्रमाणें ब्रह्मांतही अवस्थांतर होत असतें. ह्यावरून हें उघड होतें कीं, एका ब्रह्माचें व त्याच्या अवस्थांतरांचें ज्ञान झालें म्हणजे सर्व चराचर-विश्वाचें ज्ञान होणें सुकर होतें आणि ब्रह्माच्या एकत्वाचा निश्चय होतो. तसेंच हा वरील अर्थ घेतला म्हणजे लक्षणेचें कारण उरत नाहीं, मुख्यार्थानें कार्य भागतें आणि विवर्तवादाचा पक्ष लंगडा पडतो. शिवाय, जीवब्रह्म एक नाहींत, असें ठरून या ठरावारु ब्र० सू० (४।३।२१) व (१।१।९) यांचा पाठपुरावा मिळतो. पण उत्क्रांतपक्षीं, सुषुप्ति व उत्क्रांति जीवांस आहेत, असें सांगणाऱ्या ब्र० सू० (१।३।४२) शीं विरोध मात्र प्राप्त होतो. सारांश, सत्यब्रह्म हें सत्य-जगताचें उपादान व निमित्तकारण असून ब्रह्माच्या शरीराचा परिणाम म्हणजे हें चराचर विश्व आहे, म्हणून कारणरूपी ब्रह्माचें ज्ञान विश्वज्ञानाला कारण होतें. याप्रमाणें विवर्तवादाचा पक्ष खोडून या आचार्यांनीं नैय्यायिकांचा व भेदाभेदवादांचाही पक्षोच्छेद करण्याचा अति दीर्घप्रयत्न केला आहे व इत्यर्थ असा काढला आहे कीं, 'इदं सर्वं' हें मुख्यतः विशेषणपर आहे तथापि तें विशेष्यमात्रही घ्यावें व सूक्ष्म चिदचिद्ब्रह्म हें स्थूलचिदचिद्ब्रह्माचें उपादानकारण आहे, असें समजावें. सर्व व्याख्यान कडीदार असून चिंतनीय आहे.

मंत्र चवथा.

तस्मै स होवाच । द्वे विद्ये वेदितव्ये इति ह स्म यद्ब्रह्मविदो वदन्ति परा चैवापरा च ॥ ४ ॥

अन्वय व अर्थ—तस्मै सः ह उवाच (आचार्य शौनकाला उत्तर देते झाले.) द्वे विद्ये वेदितव्ये इति (दोन विद्या समजून घेतल्या पाहिजेत.) यत् ब्रह्मविदः वदन्ति स्म ह (असें ब्रह्मविद्या जाणणारे वेदार्थज्ञाते म्हणतात.) परा च एव अपरा च (परा आणि अपरा अशा त्या दोन विद्या आहेत) ॥ ४ ॥

तस्मै शौनकायाङ्गिरा आह-किलोवाच । किमित्युच्यते । द्वे विद्ये वेदितव्ये इति । एवं ह स्म किल यद्ब्रह्मविदो वेदार्थाभिज्ञाः परमार्थदर्शिनो वदन्ति । के ते इत्याह । परा च परमात्मविद्या । अपरा च धर्माधर्मसाधनतत्फलविषया । ननु कस्मिन्विदिते सर्वविद्भवतीति शौनकेन पृष्टं तस्मिन्वक्तव्येऽपृष्टमाहाङ्गिरा द्वे विद्ये इत्यादि । नैष दोषः । क्रमापेक्षत्वात्प्रतिवचनस्य । अपरा हि विद्याऽविद्या सा निराकर्तव्या । तद्विषये हि विदिते न किंचित्तत्त्वतो विदितं स्यादिति निराकृत्य हि पूर्वपक्षं, पश्चात्सिद्धान्तो वक्तव्यो भवतीति न्यायात् ॥ ४ ॥

सिद्धान्ती—शौनकाला अंगिरसांनीं स्पष्ट उत्तर दिलें तें असें कीं, तुझा इष्ट अर्थ सिद्ध होण्यास दोन प्रकारच्या विद्या जाणून घेतल्या पाहिजेत, असे वेदार्थज्ञाते म्हणजे परमार्थाचे साक्षात्कारी म्हणतात. त्या दोन विद्या कोणत्या म्हणशील तर ऐक; एक परा म्हणजे परमात्मसंबंधी विद्या व दुसरी अपरा म्हणजे धर्माधर्म हीं साधनें सांगून त्यांचें फल सांगणारी विद्या होय.

आतां कोणी अशी शंका घेईल; अहो, शौनकाचा प्रश्न तर असा आहे कीं, काय समजले असतां सर्वज्ञत्व मिळतें. तो एक वस्तु सांगावयाची सोडून आचार्य उत्तर देतात कीं, दोन विद्या समजून घेण्याच्या आहेत ! हें काय भलतेंच उत्तर ? या शंकेचे उत्तर हें आहे कीं, अंगिरसांनीं योग्य क्रम मनांत ठेऊनच आपलें उत्तर दिलें आहे. खरोखर पाहिलें असतां अपराविद्या ही अविद्या आहे, हिचें निराकरण प्रथम केलें पाहिजे. अपराविद्या प्राप्त झाली असतां कोणत्याही प्रकारचें पारमार्थिक तत्त्वज्ञान होत नाहीं, म्हणून तिचें निराकरण आधीं केलें पाहिजे. सारांश अपारविद्येचा पूर्वपक्ष करून मागाहून सिद्धांत सांगितला पाहिजे, असा श्रुतिमान्य तर्कशास्त्राचा सिद्धांत आहे. हें मनांत आणून अंगिरसांनीं क्रम-प्रदर्शक उत्तर दिलें आहे तें योग्यच आहे ॥ ४ ॥

रंग०—या मंत्राचा अर्थ करितांना 'ब्रह्मप्राप्तीसाठीं' असा अध्याहार करावा लागतो. परीपरविद्यांचें ज्ञानविज्ञान ब्रह्मप्राप्तीला साधन आहे, असें ठरवून परविद्या ही अपरोक्षज्ञानसाधक व अपरविद्या परोक्ष ज्ञानसाधक आहे असें हे टीकाकार म्हणतात.

मंत्र पांचवा.

तत्रापरा ऋग्वेदो यजुर्वेदः सामवेदोऽथर्ववेदः शिक्षा कल्पो व्याकरणं निरुक्तं छन्दो ज्योतिषमिति। अथ परा यया तदक्षरमधिगम्यते ॥ ५ ॥

अन्वय व अर्थ—तत्र अपरा; ऋग्वेदः, यजुर्वेदः, सामवेदः, अथर्ववेदः, शिक्षा, कल्पः, व्याकरणं, निरुक्तं, छंदः, ज्योतिषं इति (ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद, शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद व ज्योतिष मिळून अपराविद्या होते.) अथ यया तत् अक्षरम् अधिगम्यते सा परा (आणि ज्या विद्येच्या द्वारानें त्या अविनाशी परब्रह्माची प्राप्ति होते, तिला परा विद्या असें म्हणतात.) ॥ ५ ॥

तत्र काऽपरेत्युच्यते। ऋग्वेदो यजुर्वेदः सामवेदोऽथर्ववेद इत्येते चत्वारो वेदाः शिक्षा कल्पो व्याकरणं निरुक्तं छन्दो ज्योतिषमित्यङ्गानि षडेषाऽपरा विद्या। अथेदानीमियं परा विद्योच्यते यया तदक्ष्यमाणविशेषणमक्षरमधिगम्यते प्राप्यते। अधिपूर्वस्य गमेः प्रायशः प्राप्त्यर्थत्वात्। न च परप्राप्तेरवगमार्थस्य भेदोऽस्ति। अविद्याया अपाय एव हि परप्राप्तिर्नार्थान्तरम्। ननु ऋग्वेदादिबाह्या तर्हि सा कथं परा विद्या स्यान्मोक्षसाधनं च। या वेदबाह्याः स्मृतय इति हि स्मरन्ति। कुदृष्टित्वान्निष्फलत्वादनादेया स्यात्। उपनिषदां च ऋग्वेदादिबाह्यत्वं स्यात्। ऋग्वेदादित्वे तु पृथक्करणमनर्थकम्। अथ कथं परेति। न। वेद्यविषयविज्ञानस्य विवक्षितत्वात्। उपनिषद्वेद्याक्षरावेषयं हि विज्ञानमिह परा विद्येति प्राधान्येन विवक्षितं नोपनिषच्छब्दराशिः। वेदशब्देन तु सर्वत्र शब्दराशिर्विवक्षितः। शब्दराश्यधिगमेऽपि यत्नान्तरमन्तरेण गुर्वभिगमनादिलक्षणं वैराग्यं च नाक्षराधिगमः संभवतीति पृथक्करणं ब्रह्मविद्यायाः परा विद्येति कथनं चेति ॥ ५ ॥

सिद्धान्ती—त्यांमध्यें अपराविद्या कोणती, तें प्रथम सांगतात. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद असे चार वेद, व शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद, ज्योतिष हीं सहा उपांगें, मिळून अपराविद्या होते. आतां पराविद्या तिला म्हणतात कीं, जिच्या साहाय्यानें पुढें ज्याचें स्वरूपवर्णन यावयाचें आहे, त्या अक्षराचें ज्ञान होतें म्हणजे प्राप्ति होते. 'गम्' या क्रियापदाला 'अधि' हा उपसर्ग लाविला म्हणजे त्याचा अर्थ प्रायः 'प्राप्त होणें' असा होतो. शिवाय परब्रह्माची प्राप्ति व परब्रह्माचें ज्ञान यांत कांहीं भेद नसून दोन्हीं एकच आहेत. कारण, अविद्येचा नाश होणें हीच परब्रह्माची प्राप्ति आहे. परब्रह्म म्हणजे दुसरी कांहीं एक सिद्ध होणारी वस्तु आहे असें नाहीं. अज्ञानानें मी निराळा व परमेश्वर निराळा अशी भेदबुद्धि प्राप्त झाली असते, ती नाहींशी झाली म्हणजे परब्रह्माची प्राप्ति झाली असें म्हणावें. आतां, "ऋग्वेदादिकांहून ही विद्या जर बाह्य आहे, तर इला 'पराविद्या' असें कसें म्हणावयाचें व ती मोक्षाचें साधन तरी कसें होणार? 'ज्या वेदवाह्य स्मृति आहेत त्या सर्व निष्फल असून अधोगतीला नेणाऱ्या आहेत' असें स्मृतीमध्यें सांगितलें आहे. उघडच आहे कीं, वेदबाह्य-ज्ञानाची दृष्टि अज्ञानजन्य असते. ती इष्ट फल केव्हांही उत्पन्न करीत नाहीं. म्हणून तिचा केव्हांही स्वीकार करितां कामा नये. सारांश, ही पराविद्या वेदबाह्य, अवैदिक, आहे म्हणून त्याज्य आहे. तसेंच उपनिषदांलाही ऋग्वेदादि-वेदबाह्यत्व वरील लक्षणांनीं येतें. म्हणून पराविद्या वेदबाह्य झाली व तिचा अर्थ स्पष्ट करणारीं उपनिषदें वेदबाह्य होण्याचा प्रसंग येईल. आणि हें तर अनर्थकारक आहे. शिवाय ऋग्वेदादिकांपासून उपनिषदांचें प्रथक्करण करणें हें शक्य नाहीं व योग्य नाहीं. सारांश, ऋग्वेदादि वेदराशीहून प्रथक् काढलेली कोणतीही विद्या श्रेष्ठ असणें किंवा मोक्षसाधन होणें शक्य नाहीं. म्हणून ह्या विद्येला पराविद्या असें म्हणतां येत नाहीं," अशी शंका येईल.

पण ही शंका व्यर्थ आहे. येथें वेदांतील अक्षरराशींचा प्रश्न नाहीं तर जो विषय आपल्यास समजून घ्यावयाचा आहे, त्याच्या विज्ञानाविषयींचा प्रश्न आहे. उपनिषदांच्या द्वारानें जी अविनाशी वस्तु समजून घ्यावयाची आहे, तिचें ज्ञान करून देणें हें परा विद्येचें कार्य आहे. आणि तेंच आम्हांस प्रमुखत्वानें सांगावयाचें आहे. उपनिषद्शब्द-राशीच्या संबंधानें येथें विवक्षा नाहीं, ज्ञानाची विवक्षा आहे. आतां ज्या ज्या वेळीं आपण वेद असा शब्द उच्चारितो त्या त्या वेळीं त्या शब्दानें शब्दराशीचा मात्र बोध करावयाचा असतो. शब्दराशीचा उच्चार करण्याची इच्छा असते. तेव्हां ही शब्दराशी आपल्यास अधिगत झाली, वेद पाठ झाले, तरी सद्गुरूला शरण जाणें, वैराग्यसंपन्न होणें, इत्यादि गोष्टी प्रयत्नानें साध्य करून घेतल्याशिवाय केव्हांही अविनाशी जें परब्रह्म त्याचें ज्ञान व त्याची प्राप्ति होत नाहीं. म्हणून वेदापासून ब्रह्मविद्या पृथक् केली आहे आणि तिला पराविद्या असें म्हटलें आहे. ॥ ५ ॥

रंगरा०—'अधिगम्यते' 'प्राप्त होतें' अथवा अपरोक्षज्ञान होतें. ऋग्वेदादि अपराविद्येच्या शास्त्रांनीं परोक्षज्ञान होतें व उपनिषदादिपराविद्यात्मक शास्त्रांनीं अपरोक्ष होतें. असा अर्थ केला म्हणजे 'सर्व वेद ब्रह्माचें उद्घाटन करितात' या स्मृतीला यथार्थत्व प्राप्त होतें.

मंत्र सहावा.

यत्तदद्रेश्यमग्राह्यमगोत्रमवर्णमचक्षुःश्रोत्रं तदपाणिपादम्। नित्यं विभुं सर्वगतं सुसूक्ष्मं तदव्ययं यद्भूतयोनिं परिपश्यन्ति धीराः ॥ ६ ॥

अन्वय व अर्थः—यत् तत् अद्रेश्यं, अग्राह्यं, अगोत्रं, अवर्णं, अचक्षुः-श्रोत्रं, अपाणिपादं, नित्यं, विभुं, सर्वगतं, सुसूक्ष्मं; तत् अव्ययं, यत् धीराः, भूतयोनिं परिपश्यंति (जें कांहीं अगोचर आहे, अग्राह्य आहे, ज्याला श्रोत्र नाहीं, वर्ण नाहीं, नेत्रकर्ण नाहीं, ज्याला हस्तपाद नाहींत, जें नित्य, विभु, सर्वगामी, अत्यंत सूक्ष्म आणि अव्यय आहे, जें सर्वकारण आहे, तें परब्रह्म विद्वान् पुरुषांस मात्र साक्षात्कृत होतें) ज्या विद्येनें हें अक्षर समजतें तिला पराविद्या असें म्हणतात. ॥ ६ ॥

यथा विधिविषये कर्त्राद्यनेककारकोपसंहारद्वारेण वाक्यार्थज्ञानकालादन्यत्रानुष्ठेयोऽर्थोऽस्त्यग्निहोत्रादिलक्षणो न तथेह परविद्याविषये। वाक्यार्थज्ञानसमकाल एव तु पर्यवसितो भवति। केवलशब्दप्रकाशितार्थज्ञानमात्रनिष्ठाव्यतिरिक्ताभावात्। तस्मादिह परां विद्यां सविशेषणेनाक्षरेण विशिनष्टि—यत्तदद्रेश्यमित्यादिना। वक्ष्यमाणं बुद्धौ संहृत्य सिद्धवत्परामृश्यते—यत्तदिति। अद्रेश्यमदृश्यं सर्वेषां बुद्धीन्द्रियाणामगम्यमित्येतत्। दृशेर्वाहिष्प्रवृत्तस्य पञ्चेन्द्रियद्वारकत्वात्। अग्राह्यं कर्मेन्द्रियाविषयमित्येतत्। अगोत्रं गोत्रमन्वयो मूलमित्यन(?)र्थान्तरम्। अगोत्रमनन्वयमित्यर्थः। न हि तस्य मूलमस्ति येनान्वितं स्यात्। वर्ण्यन्त इति वर्णा द्रव्यधर्माः स्थूलत्वादयः शुक्लत्वादयो वा। अविद्यमाना वर्णा यस्य तदवर्णमक्षरम्। अचक्षुःश्रोत्रं चक्षुश्च श्रोत्रं च नामरूपविषये करणे सर्वजन्तूनां ते अविद्यमाने यस्य तदचक्षुःश्रोत्रम्। यः सर्वज्ञः सर्वविदित्यादिचेत-

नावत्त्वविशेषणत्वात्प्राप्तं संसारिणामिव चक्षुःश्रोत्रादिभिः करणैरर्थसाधकत्वं तदिहाचक्षुःश्रोत्रमिति वार्यते । "पश्यत्यचक्षुः स शृणोत्यकर्णः" इत्यादिदर्शनात् । किंच तदपाणिपादं कर्मेन्द्रियरहितमित्येतत् । यत एवमग्राह्यमग्राहकं चातो नित्यमविनाशि । विभुं विविधं ब्रह्मादिस्थावरान्तप्राणिभेदैर्भवतीति विभुम् । सर्वगतं व्यापकमाकाशवत्सुसूक्ष्मं शब्दादिस्थूलत्वकारणरहितत्वात् । शब्दादयो ह्याकाशवाय्वादीनामुत्तरोत्तरं स्थूलत्वकारणानि तदभावात्सुसूक्ष्मम् । किंच तदव्ययमुक्तधर्मत्वादेव न व्येतीत्यव्ययम् । न ह्यनङ्गस्य स्वाङ्गापचयलक्षणो व्ययः संभवति शरीरस्येव । नापि कोशापचयलक्षणो व्ययः संभवति राज्ञ इव । नापि गुणद्वारको व्ययः संभवत्यगुणत्वात्सर्वात्मकत्वाच्च । यदेवं लक्षणं भूतयोनिं भूतानां कारणं पृथिवीव स्थावरजङ्गमानां परिपश्यन्ति सर्वत आत्मभूतं सर्वस्याक्षरं पश्यन्ति धीरा धीमन्तो विवेकिनः । ईदृशमक्षरं यया विद्ययाऽधिगम्यते सा परा विद्येति समुदायार्थः ॥ ६ ॥

सिद्धान्ती—जेथें जेथें अमूक एक विधि करावा असें सांगितलें असतें आणि कर्ता, कर्म, करण इत्यादि अनेक वस्तूंचा संग्रह होऊन त्यांच्या द्वारानें कर्म करावें असें सांगितलें असतें, तेथें तेथें विधि सांगणाऱ्या वाक्यांचा अर्थ ज्या वेळीं समजतों, त्या वेळांहून अन्य वेळीं श्रुतीनें सांगितलेलें कर्म करून तो विधि संपादावयाचा असतो. 'अग्निहोत्र करावें' असा वेदानें विधि सांगितला म्हणजे तो विधि कसा व केव्हां करावयाचा ? कोणीं करावयाचा ? इत्यादि ज्ञान आपण प्रथम करून घेतों आणि नंतर तो विधि यथासांग पार पाडून एक असें विशेष (अपूर्व) निर्माण करितों कीं, ज्याचें फल आपल्यास कालान्तरानें मिळावयाचें असतें. याप्रमाणें विधीचें ज्ञान (वाक्याचा अर्थ) समजून घेणें, नंतर विधिचें यथासांग संपादन करणें आणि फलप्राप्ति करून घेणें इत्यादि अनेक विषयांचा कर्मकांडामध्यें अंतर्भाव होतो. विधि-वाक्याचें अर्थज्ञान होतांक्षणीं आपल्या इष्टकर्माचा व फलाचा अधिगम होत नाहीं. पण परविद्येची गोष्ट अगदीं निराळी आहे. वाक्याच्या अर्थाचें ज्ञान बरोबर झालें कीं, तत्क्षणीं आपला पुरुषार्थ सिद्ध होतो. वाक्यार्थज्ञान आणि पुरुषार्थप्राप्ति यांमध्यें कालावकाश बिलकूल असत नाहीं. अपरविद्येची तशी गोष्ट नाहीं; वाक्यार्थज्ञान झाल्यावर कांहीं वेळानें कर्त्याचें कर्म अनेक साधनांच्या द्वारें इष्ट वस्तु उत्पन्न करितें. असा परविद्या आणि अपरविद्या यांत विशेष आहे. सारांश, केवळ शब्दांच्या योगानें प्रकाशित झालेल्या अर्थाच्या ठिकाणीं ज्ञाननिष्ठेची योजना केली, म्हणजे पुरुषार्थाची सिद्धि होते. शब्दज्ञान होतांक्षणीं पुरुषार्थसिद्धि करून देणारी परविद्या आहे. तेथें

अपरविद्येसारखें कर्म करावें लागत नाहीं. ज्ञान होतांक्षणीं फल मिळतें; शब्द–प्रकाशित अर्थांचें पूर्ण–ज्ञानविज्ञान–म्हणजेच परमार्थांची प्राप्ति होय.पण अपरा विद्येचें कर्म–ज्ञान झाल्यावर यथासांग कर्म करावें लागतें आणि मग फल मिळतें. हा उभयतांमध्यें मुख्य विशेष आहे. हा नीट समजावा. यासाठींच परब्रह्माचीं (अक्षरांचीं) जीं एकच अर्थ-प्रतिपादन करणारीं अद्रेश्यत्वादि विशेषणें आहेत तीं या मंत्रांत सांगितलीं आहेत.

पुढें जें काय सांगावयाचें आहे, तें ध्यानांत घेऊन व तें सिद्ध झालें आहे असें समजून पुढील विशेषणांचा या मंत्रांत संग्रह केला आहे. परब्रह्मरूपी अविनाशी वस्तु सर्वज्ञात्यांच्या व अज्ञात्यांच्या बुद्धीस व इंद्रियांस **अद्रेश्य** म्हणजे अगम्य आहे. नेहमीं बाहेर असणाऱ्या विषयांचें ज्ञान बहिर्मुख पुरुषांस बाह्यगामी नेत्रकर्णादिपंचज्ञानेंद्रियानें होत असतें. हीं बाह्यगामी ज्ञानेंद्रियें बाह्यविषयांस मात्र विषय करितात. म्हणून अंतर्यामी असणाऱ्या परमात्म्याचें ज्ञान करून देण्याचें सामर्थ्य या इंद्रियांस नाहीं. तसेंच कर्मेंद्रियांनाही या **अग्राह्य** परमात्मविषयाचें ग्रहण करितां येत नाहीं. कारण त्यांचा हा विषय नव्हे. याप्रमाणें ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें परमात्म्याचें कोणत्याही प्रकारें ग्रहण करूं शकत नाहींत. हा परमात्मा **अगोत्र** आहे. म्हणजे याला दुसरें कोणतेंही मूलकारण नाहीं. सारांश, तो कार्य नाहीं. कार्याबरोबर कारण असतें. हा कार्य नाहीं. म्हणून याला कोणतेंही सहचारी वा पूर्वकारण असत नाहीं. त्याला कोणतेंही उपादान कारण नाहीं कीं जें त्याच्याबरोबर नित्य राहूं शकेल. या अक्षराला (परमात्म्याला) स्थूलत्वादि किंवा शुक्ल–पीतत्वादि कोणतेंही द्रव्यधर्म नाहींत, कीं ज्यांचें आपल्यांस वर्णन करितां येईल. हा असें **अक्षर** आहे कीं ज्यांत कोणताही वर्ण नाहीं म्हणून तो **अवर्ण** आहे. तसेंच, नामरूप समजण्याचीं जीं इंद्रियें जीवांस असतात, तीं याला नाहींत. म्हणजे नेत्रश्रोत्रादि इंद्रियें परमात्म्याला नसतात, म्हणून तो **इंद्रियशून्य** आहे. आतां 'सर्वज्ञ व सर्ववेत्ता' इत्यादि विशेषणांनीं परमात्मा सचेतन आहे, असें म्हणण्याचा प्रसंग येतो. तेव्हां, संसारी लोकाला नेत्रश्रोत्रादि-इंद्रियांनीं नामरूपादिकांची ज्ञानप्राप्ति होते, तसें ज्ञान होण्यासाठीं परब्रह्माला नेत्र-श्रोत्रादि इंद्रियें असलीं पाहिजेत, अशी शंका येईल, तिचें निवारण त्याला नेत्रश्रोत्रादि इंद्रियें नाहींत हें सांगून केलें आहे. 'तो डोळे नसतांना पाहतो व कान नसतानां ऐकतो' अशा अनेक श्रुति आम्ही म्हणतों याला प्रमाण आहेत. याचप्रमाणें त्याला हस्तपादादि कर्मेंद्रियेंही नाहींत. म्हणून हा परमात्मा जसा ज्ञानकर्मेंद्रियांस अगोचर आहे, तसा ज्ञानकर्मेंद्रियांच्या द्वारानें तो विषय ग्रहणही करीत नाहीं. असें आहे म्हणून, तो इंद्रियांस अगोचर व इंद्रियावयवशून्य आहे म्हणून, तो नित्य म्हणजे अविनाशी आहे. तो **विभु** आहे म्हणजे ब्रह्मदेवापासून अत्यंत जडवस्तूपर्यंत सर्व विविध वस्तु होतोसा दिसतो. चराचरांचा अंतर्भाव तो करितो. तो आकाशाप्रमाणें **सर्वगत** व सर्वव्यापी आहे. तसेंच, तो अत्यंत **सूक्ष्म** आहे. कारण शब्दादि स्थूलत्व देणारीं कारणें

त्याच्या ठिकाणीं असत नाहींत. हें सर्व विदित आहे कीं, शब्दस्पर्शादि गुण, आकाश-वायुआदि उत्तरोत्तर स्थूल पदार्थ उत्पन्न करणारे असतात. ही स्थूलकारणें त्याच्या ठिकाणीं नाहींत म्हणून तो अत्यंत सूक्ष्म आहे. परमात्मा **अव्यय** आहे. म्हणजे वरील सर्व अद्रेश्यत्वादि गुण त्याच्या ठिकाणीं असल्यामुळें त्याच्या स्वरूपाचा कोण-त्याही प्रकारें क्षय होत नाहीं. खरेंच आहे; शरीर असेल तर पुष्ट होणें किंवा कृश होणें इत्यादि स्वरूपांतर प्राप्त होईल. पण जो अशरीरी आहे, त्याचा क्षय कसा होणार ! किंवा त्याला वृद्धि तरी कशी प्राप्त होणार ! राजाच्या घरीं धनसंचय असतो आणि त्याचा व्यय होतो. तसा व्यय होणेंही येथें संभवनीय नाहीं. आणि शेवटीं गुणांच्या योगानेंही व्यय होण्याचा संभव नाहीं. कारण तो निर्गुण आहे आणि सर्वांचा आत्मा आहे. व्ययाचा ही आत्मा तोच ! म्हणून तो अव्यय आहे.

याप्रमाणें अगम्य, अग्राह्य, अकारण, नामरूपशून्य, धर्मशून्य, ज्ञान-कर्मेंद्रिय-शून्य अविनाशी, सर्वसंग्राहक, सर्वव्यापी, सर्वसूक्ष्म, अव्यय, इत्यादि लक्षणें ज्याच्या ठिकाणीं आहेत, तो अक्षर परमात्मा होय. पृथ्वी माता ज्याप्रमाणें सर्व स्थावरजंगमांचें अधि-ष्ठान-कारण आहे, त्याप्रमाणें हा सर्वभूतांचें अधिष्ठान कारण आहे. याच्या सत्तेनें सर्व चराचर भूतें प्रकट होतात म्हणून हा भूतयोनि आहे. असो; याप्रमाणें सर्वात्मक असणारें हें सर्वव्यापी अक्षर (परमात्मतत्त्व) ज्ञानी आणि विवेकी पुरुष मात्र साक्षात्कृत करून घेतात. सारांश, ज्या विद्येनें एवंगुणान्वित अक्षराचा साक्षात्कार होतो त्या विद्येला परविद्या असें म्हणतात. हा या मंत्राचा तात्पर्यार्थ आहे. ॥ ६ ॥

रंगरामानुज—' भूतयोनिं ' = सर्व भूतांचें उपादानकारण.

माध्व—या मंत्रांतील ' यत् ' याचा अर्थ ज्याअर्थीं असा आहे. पहिला ' तत् ' म्हणजे ब्रह्म; ' म्हणून ' असाही या ' तत् ' चा अर्थ आहे. तिसरा ' तत् ' म्हणजे ब्रह्म. ज्याअर्थीं ब्रह्म हें अदृश्यादिगुणांनीं युक्त आहे त्याअर्थीं त्याला कोणतेही विकार उत्पन्न होत नाहींत आणि ज्याअर्थीं विद्वान् पुरुषांनीं वेदाध्ययन कलें म्हणजे त्यांस ब्रह्म समजतें, त्याअर्थीं वेदही परविद्या आहे, असें ठरतें.

मंत्र सातवा.

यथोर्णनाभिः सृजते गृह्णते च यथा पृथिव्या-मोषधयः संभवन्ति । यथा सतः पुरुषात्केश-लोमानि तथाऽक्षरात्संभवतीह विश्वम् ॥ ७ ॥

अन्वय व अर्थः—**ऊर्णनाभिः यथा सृजते,** गृह्णते (कोळी ज्या-प्रमाणें तंतु उत्पन्न करितो आणि गृहण करितो) **पृथिव्यां यथा च**

औषधयः संभवन्ति (पृथ्वी जशी अनेकवृक्षांना व औषधींना उत्पन्न करिते.) **यथा सतः पुरुषात् केशलोमानि** (विद्यमान जिवंत पुरुषापासून केश आणि लोम–लव–उत्पन्न होतात.) **तथा इह विश्वं अक्षरात् संभवति** (त्याप्रमाणें येथें, या संसारांत, विश्व हें अक्षर जो परमात्मा त्यापासून उत्पन्न होतें.) ॥ ७ ॥

भूतयोन्यक्षरमित्युक्तं तत्कथं भूतयोनित्वमित्युच्यते प्रसिद्धदृष्टान्तैः । यथा लोके प्रसिद्धम् । ऊर्णनाभिर्लूताकीटः किंचित्कारणान्तरमनपेक्ष्य स्वयमेव सृजते स्वशरीराव्यतिरिक्तानेव तन्तून्बहिः प्रसारयति पुनस्तानेव गृह्णते च गृह्णाति स्वात्मभावमेवाऽऽपादयति । यथा च पृथिव्यामोषधयो व्रीह्यादिस्थावरान्ता इत्यर्थः । स्वात्माव्यतिरिक्ता एव प्रभवन्ति । यथा च सतो विद्यमानाज्जीवतः पुरुषात्केशलोमानि केशाश्च लोमानि च संभवन्ति विलक्षणानि । यथैते दृष्टान्तास्तथा विलक्षणं सलक्षणं च निमित्तान्तरानपेक्षाद्यथोक्तलक्षणादक्षरात्संभवति समुत्पद्यत इह संसारमण्डले विश्वं समस्तं जगत् । अनेकदृष्टान्तोपादानं तु सुखार्थप्रबोधनार्थम् । यद्ब्रह्मण उत्पद्यमानं विश्वं तदनेन क्रमेणोत्पद्यते न युगपद्बदरमुष्टिप्रक्षेपवदिति ॥ ७ ॥

शिष्य—भगवन् अविनाशि परब्रह्म हें सर्व चराचरांचें उत्पत्तिस्थान आहे, असें आपण सांगितलें तें कसें बरें ? स्वतः अविकारी परब्रह्म हें विश्व कोठून व कसें उत्पन्न करितें ?

सिद्धान्ती—ही तुझ्यासारख्यांची शंका निवारण करण्यासाठीं श्रुतीनें लोकप्रसिद्ध दृष्टांत घेतले आहेत. जाळीं उत्पन्न करून, त्यांत कीडे धरणारा कोळी तुला माहीतच आहे. कोणत्याही दुसऱ्या कारणाची अपेक्षा न करितां आपण स्वतः आपल्या स्वतःच्या शरीरांतून हा कोळी जाळ्याचे तंतू उत्पन्न करितो, आपल्या शरीराबाहेर जाळें सिद्ध करितो आणि शेवटीं त्या सर्व जाळ्याचा स्वीकार आपल्या शरीरांत घेऊन करितो; म्हणजे त्या जाळ्याला आपलें स्वतःचें स्वरूप देतो. याप्रमाणें आपण स्वतः आपल्या शरीरांतून जाळें उत्पन्न करून, पुनः त्या जाळ्याला स्वात्मस्वरूप देण्याचें सामर्थ्य कोळ्याला असतें. पृथ्वीलाही व्रीहिआदि वृक्ष पाषाणापर्यंतचे सर्व स्थावर–जंगम पदार्थ स्वयमेव उत्पन्न करितां येतात. त्यांचें स्वरूप लोकप्रसिद्ध असून हे पदार्थ पृथ्वीपासून मात्र उत्पन्न होतात आणि तेथेंच लयाला जातात. असेंच, जिवंत

पुरुषापासून केश, लोम, नखें इत्यादि निर्जीव पदार्थ उत्पन्न होतात, हेंही तुला ठाऊक आहे. ह्या तीन दृष्टांतांवरून असें स्पष्ट दिसतें कीं, दुसरे कोणत्याही कारणाची अपेक्षा न ठेवतां ब्रह्माहून विलक्षण स्वरूप असणारें जड व त्याच्या सारखेंच स्वरूप असणारे जीव मिळून हें समस्त विश्व या संसारमंडलरूपी व्यवहारांत पूर्वी सांगितलेल्या ब्रह्मापासून (मागील मंत्रांत वर्णिलेल्या अक्षरापासून) उत्पन्न होतें.

शिष्य—येथें अनेक दृष्टांत दिले आहेत. ते अशासाठीं असावेत कीं, मूळ सिद्धांताचे तात्पर्याची खुबीनें समजूत पडावी.

सि०—होय. आणि आत्मसदृश आणि आत्मविलक्षण पदार्थ स्वयंभु ब्रह्माला सहज उत्पन्न करितां येतात, त्याला दुसऱ्या कोणत्याही कारणाची अपेक्षा नसते, हें स्पष्ट समजावें. असो; ब्रह्मापासून उत्पन्न होणारें हें विश्व कांहीं एक ठरलेल्या क्रमानें उत्पन्न होतें, एकदम होत नाहीं. मुठींत धरलेलीं बोरें आपल्यास एकदम बाहेर फेंकून देतां येतात, तसें ब्रह्मापासून हें विश्व एकदम बाहेर टाकलें जातें, असा भाग नाहीं. हें सांगण्यासाठीं पुढील मंत्रांचा अवतार आहे. कोळ्याच्या दृष्टांतानें उपादानकारण व निमित्त कारण केव्हां केव्हां एकच असतात असें सुचाविलें, पृथ्वीच्या दृष्टांतानें एक उपादानकारण अनेकरुपी कार्यें घडावितें असें ठरावितें आणि पुरुषकेशाच्या दृष्टांतानें कारणांत कोणतीही विकृति न होतां कार्य उत्पन्न होतें, असें सिद्ध केलें. ॥ ७ ॥

माध्व—' उर्णनाधि '=कोळी हा अन्न खाऊन जें शरीर बनावितो त्याचे धातु तंतूच्या आकाराचे होतात. त्याप्रमाणें परमेश्वरानें प्रलयकालीं गिळून टाकलेले महत्तत्त्वादि, त्याचें शरीर होऊन प्रधान स्थितीस येतात, आणि पुनः महत्तत्त्वांच्या रूपानें परिणत होतात. यांस परमेश्वराचा मात्र आश्रय असतो. आणि ईश्वराच्या सत्तेनें सर्व सृष्टि उत्पन्न होते. याप्रमाणें उपादानकारण परमेश्वर–शरीर आणि निमित्त कारण स्वतंत्र परमेश्वर असतात, ही तीन दृष्टांतांची उपपत्ति आहे.

मंत्र आठवा.

तपसा चीयते ब्रह्म ततोऽन्नमभिजायते । अन्नात्प्राणो मनः सत्यं लोकाः कर्मसु चामृतम् ॥ ८ ॥

अन्वय व अर्थ—**ब्रह्म तपसा चीयते** (ब्रह्म हें ज्ञानतपानें युक्त होतें.) **ततः अन्नं अभिजायते** (नंतर ह्या ब्रह्मापासून अन्न म्हणजे जीवांस भोग देणारीं सृष्टीचीं मूलद्रव्यें उत्पन्न होतात.) **अन्नात् प्राणः मनः, सत्यं, लोकाः, कर्मसु च अमृतं** (मूलद्रव्यांपासून प्राण–हिरण्य-

गर्भ–नंतर मन, पुढें सत्य–पंचमहाभूतें–त्यानंतर स्वर्ग पाताळादि लोक, पुढें कर्मापासून उत्पन्न होणारें अविनाशी फल उत्पन्न होतें. उत्पत्तीचा हा क्रम आहे. ॥ ८ ॥

क्रमनियमविवक्षार्थोऽयं मन्त्र आरभ्यते । तपसा ज्ञानेनोत्पत्तिविधिज्ञतया भूतयोन्यक्षरं ब्रह्म चीयत उपचीयत उत्पिपादयिषदिदं जगदङ्कुरमिव बीजमुच्छ्रूनतां गच्छति पुत्रमिव पिता हर्षेण । एवं सर्वज्ञतया सृष्टिस्थितिसंहारशक्तिविज्ञानवत्तयोपचितात्ततो ब्रह्मणोऽन्नमद्यते भुज्यत इत्यन्नमव्याकृतं साधारणं संसारिणां व्याचिकीर्षितावस्थारूपेणाभिजायत उत्पद्यते । ततश्चाव्याकृताद्व्याचिकीर्षितावस्थातोऽन्नात्प्राणो हिरण्यगर्भो ब्रह्मणो ज्ञानक्रियाशक्त्यधिष्ठितजगत्साधारणोऽविद्याकामकर्मभूतसमुदायबीजाङ्कुरो जगदात्माऽभिजायत इत्यनुषङ्गः । तस्माच्च प्राणान्मनो मनआख्यं संकल्पविकल्पसंशयनिर्णयाद्यात्मकमभिजायते । ततोऽपि संकल्पाद्यात्मकान्मनसः सत्यं सत्याख्यमाकाशादिभूतपञ्चकमभिजायते । तस्मात्सत्याख्याद्भूतपञ्चकादण्डक्रमेण सप्त लोका भूरादयः । तेषु मनुष्यादिप्राणिवर्णाश्रमक्रमेण कर्माणि । कर्मसु च निमित्तभूतेष्वमृतं कर्मजं फलम् । यावत्कर्माणि कल्पकोटिशतैरपि न विनश्यन्ति तावत्फलं न विनश्यतीत्यमृतम् ॥ ८ ॥

सिद्धान्ती—कमाचा नियम सांगण्यासाठीं, कोणत्या कमनियमानें ही सृष्टि उत्पन्न होते हें सांगण्यासाठीं, या मंत्राला आरंभ केला आहे. तपानें म्हणजे ज्ञानानें अथवा उत्पत्तीचे नियमांच्या ज्ञानानें अविनाशी व सृष्टीचें कारण असणारें ब्रह्म पुष्ट होतें.

शिष्य—हें कसें ?

सिद्धान्ती—ज्याप्रमाणें अंकुरांस उत्पन्न करण्याच्या वेळीं बीज पुष्ट होत असतें, त्याप्रमाणें हें जगत् उत्पन्न करण्याची ब्रह्माला इच्छा झाली, म्हणजे तें विस्तार पावतें. कसें ? ज्याप्रमाणें पुत्राचें लालन करणारा पिता, त्यानें पुत्र पाहिला, म्हणजे तो हर्षानें मोठा होतो, त्याप्रमाणें हें ब्रह्म ज्ञानानें मोठें होतें. असो; सर्वज्ञतेनें म्हणजे विश्वाची उत्पत्ति, स्थिति आणि लय हीं कार्यें करण्याचें सामर्थ्य व सामर्थ्य-ज्ञान असणाऱ्या विज्ञानानें पुष्ट झालेलें ब्रह्मापासून अन्न उत्पन्न होतें.

शि०—अन्न म्हणजे ज्याचा आपण उपभोग घेतों ते व्रीहिआदि पदार्थ कीं काय ?

सि०—नव्हे ! नव्हे ! हें अन्न म्हणजे अव्याकृत, या सृष्टीचे मूल घटकावयव होत. हे अव्याकृत–स्वरूपांत असतात. हीं मूलद्रव्यें सर्वसाधारण म्हणजे निर्विशेष असतात.

शिष्य—म्हणजे काय ?

सिद्धान्ती—सृष्टीची मूल द्रव्यें म्हणजे ईश्वराची 'उपाधि' या दृष्टीनें असणारी माया होय. ही माया पृथ्वीआपतेजादि पंच महाभूतांच्या व मनःसृष्टीच्या अव्याकृतस्वरुपाची असते. ही प्रथम अव्याकृतरूपानें उत्पन्न होऊन नंतर व्याकृत म्हणजे विशिष्ट स्वरूपांनीं उत्पन्न झालेली सर्वांस उपलब्ध होते.

शिष्य—माया तर अनादि आहे. मग ती उत्पन्न होते असें कसें म्हणतां येईल ?

सिद्धान्ती—जीवदृष्टीनें माया अनादिच आहे; पण येथें अव्याकृत इत्यादि शब्दांनीं वाच्य असलेलें मायातत्त्व म्हणजे तीन गुणांची समस्थिति असणारें आणि पंचमहाभूतादि स्वरूपें ज्यास प्राप्त होतील, असें मूल मायातत्त्व उत्पन्न म्हणजे प्रकट होतें. सारांश, स्वर्गाच्या आदिकालीं सत्त्वादि त्रिगुण समस्थितींत असतात तेव्हां, त्याला व पुढें उत्पत्तिस्थितिआदि संस्कार संसारी जीवांच्या वासनाकर्मांपासून जेथें होतात, त्याला मायातत्त्व असें म्हणतात व हें मायातत्त्व परब्रह्म आपल्या स्वतःपासून आपण स्वतः उत्पन्न अथवा प्रकट करितें. नंतर या अव्याकृतापासून अथवा पुढें ज्याला निरनिराळ्या अवस्था जीवांच्या वासना कर्मानुसार ब्रह्मसामर्थ्यानें प्राप्त व्हावयाच्या आहेत, अशा अन्नापासून–मूळ घटकद्रव्यापासून–हिरण्यगर्भ (प्राण) उत्पन्न होतो. याचीही उत्पत्ति ज्ञानशक्ति आणि क्रियाशक्ति यांनीं अधिष्ठित असून, सर्व जगताचें साधारण कारण असणारा हा हिरण्यगर्भ आहे. याची उत्पत्ति ब्रम्हापासूनच आहे.

शिष्य—म्हणजे कसें ?

सिद्धान्ती—ज्ञान शक्तींनीं व क्रियाशक्तींनीं अधिष्ठित असलेलें विशिष्ट जगत् आपल्यास दिसतें. या जगाचें समष्टिकरण हा हिरण्यगर्भ आहे. जीवाला विशेष ज्ञान आणि विशेष कर्म करण्याचीं साधनें असतात. या विशेष सामर्थ्यांस एकवट करणारा किंवा हीं विशेष सामर्थ्यें एकत्र झालीं आहेत ज्याच्या ठिकाणीं, असा हिरण्यगर्भ असतो. अज्ञान व अज्ञानानें उत्पन्न होणाऱ्या वासना आणि वासनाजन्य कर्में, यांचें एकीकरण बीजरूपानें जेथें होते, त्या अव्यक्त बीजाचा अंकुर हिरण्यगर्भ असतो. सारांश, हा जगाचा आत्मा अथवा सूत्रात्मा अव्यक्तानंतर व अव्यक्ताच्या द्वारा उत्पन्न होतो. म्हणजे प्रथम अव्यक्त आणि नंतर हिरण्यगर्भ या क्रमानें उत्पत्ति होते. हिरण्यगर्भापासून मन नांवाचें द्रव्य उत्पन्न होते. हें संकल्प, विकल्प, संशय आणि निश्चयादि रूपी असते. या संकल्पविकल्पात्मक मनापासून व मनानंतर सत्य नांवाचें आकाश–वायु–आदि भूतपंचक निर्माण होतें. त्यापासून अण्ड (ब्रह्मांड), आणि नंतर पृथ्वी आदि सप्त भुवनें उत्पन्न होतात. या लोकांतच मनुष्यप्रमुख प्राण्यांचें वर्णाश्रमानुसार कर्म होत असतें, आणि कर्मांच्या निमित्तानें कर्मापासून ईश्वराज्ञेनें उत्पन्न झालेलें फल अमृतरूपानें निर्माण होतें. या फलाला अमृत असें म्हणतात.

शिष्य—कर्म–फल तर अनित्य असतें, असें आपलें सांगणें आहे.

सिद्धान्ती—तें तर खरेंच आहे. पण जोंपर्यंत कर्मांचा नाश होत नाहीं, कोटिशः कल्पांमध्यें सुद्धां कर्म करण्याच्या वासनांचा नाश होत नाहीं, तोंपर्यंत कर्मफलाचाही नाश होत नाहीं. सारांश, ज्ञानाशिवाय कर्मांचा नाश नाहीं. अज्ञानाची अनंत कोटि वर्षे गेलीं तरी कर्म-नाश होत नाहीं. अर्थातच तज्जन्य कर्मफलाचाही नाश होत नाहीं म्हणून कर्मफलाला अमृत असें श्रुतीनें विशेषण दिलें. याप्रमाणें सृष्टीचा क्रम आहे. अव्यक्त, हिरण्यगर्भ, मन (महत्), पंचमहाभूतें, ब्रह्मांड, सप्तभुवनें, जीवांचें कर्म आणि अमृत कर्मफल असा हा जीवदृष्टीनें अनादि सृष्टिक्रम आहे. ॥ ८ ॥

रंग०—'अन्न' = चेतनाचेतनसमष्टि. ही अव्याकृत असते. सत्य=भोक्तृवर्ग.

'कर्मसु अमृतं' = अमृतसाधक कर्म अथवा कर्मांमध्यें जें मोक्षार्थी मात्र कर्म होतें, तें कर्म.

माध्व—'तप' = आलोचन, संकल्पानें संकल्पकामध्यें विकार होत नाहीं. नंतर अन्न म्हणजे देव आणि जड वस्तु उत्पन्न होतात. १।१।८॥

मंत्र नववा.

यः सर्वज्ञः सर्ववित्तस्य ज्ञानमयं तपः । तस्मादेतद्ब्रह्म नाम रूपमन्नं च जायते ॥ ९ ॥

इत्यथर्ववेदीयमुण्डकोपनिषदि प्रथममुण्डके प्रथमः खण्डः ॥ १ ॥

अन्वय व अर्थः—**यः सर्वज्ञः, सर्ववित्, यस्य ज्ञानमयं तपः, तस्मात् एतत् ब्रह्म, नाम, रूपं, अन्नं च जायते** (जो सर्व-ज्ञाता आहे, जो सर्ववेत्ता आहे, ज्याचें ज्ञान हेंच तप आहे, त्यापासून हें ब्रह्म, हीं नामरूपें आणि हें अन्न उत्पन्न होतें) ॥ ९ ॥

उक्तमेवार्थमुपसंजिहीर्षुर्मन्त्रो वक्ष्यमाणार्थमाह—य उक्तलक्षणोऽक्षराख्यः सर्वज्ञः सामान्येन सर्वं जानातीति सर्वज्ञः । विशेषेण सर्वं वेत्तीति सर्ववित् । यस्य ज्ञानमयं ज्ञानविकारमेव सार्वज्ञ्यलक्षणं तपो नाऽऽयासलक्षणं तस्माद्यथोक्तात्सर्वज्ञादेतदुक्तं कार्यलक्षणं ब्रह्म हिरण्यगर्भाख्यं जायते । किंच नामासौ देवदत्तो यज्ञदत्त इत्यादिलक्षणम् । रूपमिदं शुक्लं नीलमित्यादि । अन्नं च व्रीहियवादिलक्षणं जायते । पूर्वमन्त्रोक्तक्रमेणेत्यविरोधो द्रष्टव्यः ॥ ९ ॥

इति मुण्डकोपनिषद्भाष्ये प्रथममुण्डके प्रथमः खण्डः ॥ १ ॥

सिद्धान्ती—मागें सांगितलेल्या अर्थाचा उपसंहार करण्यासाठीं श्रुति पुढील अर्थ सांगत आहे व पुढें जें अपरविद्येचें प्रकरण येणार आहे, त्याचा आरंभ या मंत्रांत करीत आहे. ऐकः मागें ज्याचें लक्षण सांगितलें आहे तो अक्षर नांवाचा परमात्मा सर्वज्ञ आहे. म्हणजे त्याला सामान्यरूपानें सर्वांचें ज्ञान असतें. माया नामक उपाधि घेऊन तो समष्टिरूपानें (हिरण्यगर्भ होऊन) सर्वज्ञ होतो व अविद्या नामक उपाधि घेऊन व्यष्टिरूपानें जीव होतो आणि सर्व विशेषांचें ज्ञान त्याला होतें. म्हणून त्याला सर्व–वेत्ता असें म्हणतात. त्याला स्वतःच्या उपाधीचें व उपाधिजन्य वस्तूंचें सामान्य आणि विशेष ज्ञान असतें. असो, या सर्वज्ञ आणि सर्व–वेत्त्या परमात्म्याचें तप म्हणजे उत्पन्न होणाऱ्या सर्व पदार्थांचें सत्त्वप्रधानमायेच्या (ज्ञानगुणाच्या) साहाय्यानें स्मरणपूर्वक चिंतन होय. अर्थातच या परमेश्वरीय तपांत कोणत्याही प्रकारचें कर्म, आयास, असत नाहींत. अशा ज्ञानात्मक तपश्चर्या करणाऱ्या सर्वज्ञ परमात्म्यापासून कार्यरूपी हिरण्यगर्भाची उत्पत्ति होते. तसेंच नामही उत्पन्न होतें. हा देवदत्त, हा यज्ञदत्त हीं नामें होत. हें पांढरें, हें निळें इत्यादि रूपें होत, असो; समष्टि ब्रह्म (हिरण्यगर्भ) आणि अन्न (व्रीहि यवादि सर्व विशेष पदार्थ) ब्रह्मापासून उत्पन्न होतात. पण ते पूर्वीच्या मंत्रांत सांगितल्या क्रमानें उत्पन्न होतात व याप्रमाणें दोन्ही मंत्रांत विरोध राहत नाहीं. ॥ १ ॥

रंग०—' सर्वज्ञः '=सर्व विषयज्ञाता ' सर्ववित् '=प्रत्येक वस्तूचे सर्व प्रकार जाणणारा परमेश्वर हा संकल्प मात्र करितो.

प्रथम अव्याकृत उत्पन्न होतें व त्याद्वारें व त्यानंतर नामरूपात्मक व्याकृत सृष्टि उत्पन्न होते.

माध्व०–या उपनिषदाचें तात्पर्य भगवत्पर मात्र आहे. श्रीभगवान् बादरायणानीं ही हें उपनिषद् भगवत्पर आहे, असें समन्वयाध्यायामध्यें सांगितलें आहे. ब्रह्मसूत्र (१।२।२१) या सूत्रावर व्याख्यान करतांना ' अद्रेश्यमग्राह्यं ' या मुण्डकोपनिषदांतील मंत्राचा उल्लेख करून दृश्यत्व, ग्राह्यत्व इत्यादिकांचा म्हणजे अचेतनाचा अथवा भिन्न अवस्था वेणाऱ्या वस्तूंचा परमेश्वरीस्वरूपासंबंधानें विषेध केला. त्याचप्रमाणें ' अबालः अतरुणः ' इत्यादि विशेषणांनीं मनुष्यादिकांचा निषेध होतो. हे गुण पाषाणादिकांमध्यें दिसत नाहींत म्हणून अद्रेश्यत्वादि विशिष्टअक्षरानें प्रधान स्वरूपाचा उल्लेख श्रुतीला इष्ट आहे, परम पुरुषाचा उल्लेख इष्ट नाहीं; आणि सामान्यतः या उपनिषदांत प्रकृति आणि जीव यांच्या संबंधानें मात्र विवेचन झालेलें आहे, परमात्मर नाहीं. " हा पूर्व पक्ष उत्पन्न करून त्याचा निरास केला आहे; आणि असा सिद्धांत केला आहे कीं, ' जो सर्वज्ञ आणि सर्ववेत्ता आहे. ' (मु० २।२।७) इत्यादि वाक्यें या उपनिषदांत आहेत त्यावरून चेतन आणि अचेतन सृष्टीचें उपादान कारण असणारा परमेश्वर मात्र येथें इष्ट आहे, तसेंच ' सर्वज्ञ आणि भूतयोनि ' ही विशेषणें एका परमात्म्यालाच योग्य होतात, इतरांस होत नाहींत असा सिद्धांत केला आहे. हें आपलें म्हणण

समर्थन करण्यासाठीं मुण्डकांतील अनेक मंत्रांचा ही या आचार्यांनीं अवतार केला आहे. हें सर्व प्रकरण जिज्ञासुमुमुक्षूंनीं वाचण्यासारणें आहे. याच प्रमाणें 'हें उपनिषद् जीवपर आहे' या शंकेचा ब्रह्मसूत्राच्या सिद्धांतांनीं व मुण्डकोपनिषदांतील मंत्रांनीं परिहार केला आहे. जीव व ब्रह्म हें दोन पदार्थ निरनिराळे असून सेव्य सेवक आहेत असें ठरवून हें सर्व उपनिषद् भगवंताचें मात्र यथार्थ स्वरूप सांगणारें आहे, जीवाचें किंवा प्रकृतीचे नव्हे, असा सिद्धांत आपल्या समजुतीनें स्थापित केला आहे.

*यस्मात्परं नापरमस्ति किंचित्।
यस्मान्नाणीयो न ज्यायोऽस्ति कश्चित्॥
वृक्ष इव स्तब्धो दिवि तिष्ठत्येकः।
तेनेदं पूर्णं पुरुषेण सर्वम्॥ ७॥

मंत्रार्थ—ज्याहून पर किंवा अपर (श्रेष्ठतर किंवा कनिष्ठतर) असें कांहीं नाहीं, ज्याहून लहान पदार्थ (जड किंवा जीव) नाहीं किंवा मोठा नाहीं, जो एकाकी असून वृक्षाप्रमाणें परमपदाचे ठिकाणीं स्तब्ध राहतो, त्या पुरुषानें हें सर्व विश्व पूर्ण केलें आहे.

'यस्मात्परं नापरमस्ति'=ज्याच्याहून दुसरें कांहीं श्रेष्ठ नाहीं. 'वृक्ष इव'=चाला वंदनीय असा दुसरा कोणी नसल्यामुळें हा वृक्षासारखा ताठ असतो. हा मंत्र प्रक्षिप्त नाहीं असा श्रीरंगरामानुजांचा अभिप्राय आहे. हा मंत्र इतर भाष्यकारांनीं घेतला नाहीं.

मुण्डकोपनिषत् प्रथमखण्ड समाप्त.



* हा मंत्र प्रक्षिप्त आहेसें वाटतें, म्हणून प्रथम खंडाच्या शेवटीं घेतला आहे.

मंत्र पहिला.

तदेतत्सत्यं मन्त्रेषु कर्माणि कवयो यान्यपश्यंस्तानि त्रेतायां बहुधा संततानि । तान्याचरथ नियतं सत्यकामा एष वः पन्थाः सुकृतस्य लोके ॥ १ ॥

अन्वय व अर्थः—तत् एतत् सत्यं (तें हें सत्य होय) यानि कर्माणि कवयः मंत्रेषु अपश्यन्, तानि त्रेतायां बहुधा संततानि, तानि नियतं आचरथ, सत्यकामाः लोके सुकृस्तय षएः वः पंथाः (त्रेतायुगामध्यें पुष्कळ प्रकारांनीं विस्तार पावलेलीं जी कर्में मंत्रांमध्यें ऋषींनीं पूर्वी स्वरूपानें पाहिलीं होतीं, तीं कर्में तुम्हीं नियमानें आचरीत जा. कर्मफलाचा अभिलाष करणारे हे लोक हो ! इहलोकी सत्कर्माचा हाच मार्ग तुम्हांस योग्य आहे.) ॥ १ ॥

साङ्गा वेदा अपरा विद्योक्ता—ऋग्वेदो यजुर्वेद इत्यादिना । यत्तदद्रेश्यमित्यादिना नामरूपमन्नं च जायत इत्यन्तेन ग्रन्थेनोक्तलक्षणमक्षरं यया विद्ययाऽधिगम्यत इति परा विद्या सविशेषणोक्ता । अतः परमनयोर्विद्ययोर्विषयौ विवेक्तव्यौ संसारमोक्षावित्युत्तरो ग्रन्थ आरभ्यते । तत्रापरविद्याविषयः कर्त्रादिसाधनक्रियाफलभेदरूपः संसारोऽनादिरनन्तो दुःखस्वरूपत्वाद्धातव्यः प्रत्येकं शरीरिभिः । सामस्त्येन नदीस्रोतोवदव्यवच्छेदरूपसंबन्धस्तदुपशमलक्षणो मोक्षः परविद्याविषयोऽनाद्यनन्तोऽजरोऽमरोऽमृतोऽभयः शुद्धः प्रसन्नः स्वात्मप्रतिष्ठालक्षणः परमानन्दोऽद्वय इति । पूर्वं तावदपरविद्याया विषयप्रदर्शनार्थमारम्भः । तद्दर्शने हि तन्निर्वेदोपपत्तेः । तथाच वक्ष्यति—"परीक्ष्य लोकान्कर्मचितान्" इत्यादिना । न ह्यप्रदर्शिते परीक्षोपपद्यत इति तत्प्रदर्शयन्नाह तदेतत्सत्यमवितथम् । किं तन्मन्त्रेष्वृग्वेदाद्याख्येषु कर्माण्यग्निहोत्रादीनि मन्त्रैरेव प्रकाशितानि कवयो मेधाविनो वसिष्ठादयो यान्यपश्यन्दृष्टवन्तः । यत्तदेतत्सत्यमेकान्तपुरुषार्थसाधनत्वात्तानि च वेदविहितान्यृषिदृष्टानि कर्माणि त्रेतायां त्रयीसंयोगलक्षणायां हौत्राध्वर्यवौ-

द्वात्रप्रकारायामधिकरणभूतायां बहुधा बहुप्रकारं संततानि प्रवृत्तानि कर्मभिः क्रियमाणानि त्रेतायां वा युगे प्रायशः प्रवृत्तान्यतो यूयं तान्याचरथ निर्वर्तयथ नियतं नित्यं सत्यकामा यथाभूतकर्मफलकामाः सन्तः । एष वो युष्माकं पन्था मार्गः सुकृतस्य स्वयं निर्वर्तितस्य कर्मणो लोके फलनिमित्तं लोक्यते दृश्यते भुज्यत इति कर्मफलं लोक उच्यते । तदर्थं तत्प्राप्तय एष मार्ग इत्यर्थः । यान्येतान्यग्निहोत्रादीनि त्रय्यां विहितानि कर्माणि तान्येष पन्था अवश्यफलप्राप्तिसाधनमित्यर्थः ॥ १ ॥

सिद्धान्ती—ऋग्वेद, यजुर्वेद इत्यादि वेद आणि त्यांची सहा अंगें मिळून अपराविद्या होते; हें पहिल्या खंडांतील पांचव्या मंत्रांत सांगितलें. नंतर सहाव्या मंत्रापासून पहिल्या खंडाच्या शेवटच्या मंत्रापर्यंत 'अगोचर, अग्राह्य' असून स्वसत्तेनें सृष्टि उत्पन्न करणारा ज्ञानमय जो अविनाशी परमात्मा त्याचें यथार्थज्ञान ज्या विद्येनें प्राप्त होते, ती पराविद्याही स्वलक्षणांसह व स्वविशेषणासह सांगितली. आतां, ह्यापुढें ह्या दोन विद्यांचे जें निरनिराळे विषय आहेत त्यांचे विशेष सांगून अपराविद्येचा विषय संसार आहे आणि पराविद्येचा विषय मोक्ष आहे, असें पुढील ग्रंथांत सांगावयाचें आहे. प्रथमतः अपराविद्येचा विषय संसार हा आहे, हें श्रुति सांगेल. हा संसार अनादि आहे, अनंत आहे, दुःखस्वरूप आहे. कर्तृभेद, साधनभेद, कर्मभेद, फलभेद इत्यादि अनेक स्वपरभेदांनीं हा दुःखपूर्ण संसार विलक्षण झालेला आहे. याचा त्याग प्रत्येक शरीरी-पुरुषानें (जीवानें) करावयाचा आहे अथवा संसार टाकून द्यावयाचा आहे. कारण तो दुःखस्वरूप आहे व त्याचप्रमाणें नदीचा प्रवाह जसा अखंड असतो, तसा या समष्टिरूप संसाराचा प्रवाह जीवदृष्टीनें अखंड आहे. याचा निरास उपशमानें (संसारापासून निवृत्त होण्यानें) मात्र व्हावयाचा आहे; ज्ञानपूर्वक संसारनिवृत्ति म्हणजेच मोक्ष होय. हा मोक्षविषय पराविद्येचा आहे; हा मोक्ष अनादि, अनंत, अजर, अमर, अमृत, अभय, शुद्ध, प्रसन्न, स्वतःमध्यें प्रतिष्ठित झालेला (स्वतंत्र व स्वयंभु), परम आनंदाचें स्थान आणि अद्वितीय असा आहे. हें ज्ञान झालें म्हणजे मुक्त पुरुषाचा संसार नष्ट होतो. समष्टि संसार अखंड असतोच.

शिष्य—भगवन्! कर्ता, कर्म इत्यादि भेद निद्रेमध्येंही नाहींसे होतात. यावरून निद्रेमध्यें आपण मोक्षसुख अनुभवितों, अशी कोणी शंका काढतील त्याचें समाधान कसें!

सिद्धान्ती—निद्रेमध्यें अज्ञानाचें वास्तव्य असतें. अज्ञान म्हणजे मोक्ष नव्हें. संसारनिवृत्तीचगेचर स्वरूपाचें ज्ञान असेल, तर अज्ञानकृतभेद विशेषरूपानें आणि सामान्यरूपानें नाहींसे होऊन पूर्वसंचितकर्माचा नाश होतो व भेदरूपी कर्म, त्याचा अभिमान आणि त्याच्या फलाची वासना हीं रहात नाहींत, म्हणून ज्ञानीजीवाचा व

सिद्धान्ती—सर्व कर्मांच्या आधीं अग्निहोत्र कर्म असतें म्हणून श्रुतीनें प्रदर्शनासाठीं (उदाहरणासाठीं) या प्रथम कर्माचा अवतार केला आहे. अग्निहोत्राचा विधि असाः–जेव्हां उत्तम प्रकारच्या ज्वालायाही इंधनांनीं अग्निकुंडांत प्रज्वलित झालेला हव्यवाहन आपल्या ज्वालांनीं भिरवूं लागतो व निरनिराळ्या ज्वालांचें स्पंदन करितो, तेव्हां (आहवनीय अग्नीमध्यें ' अग्नयेस्वाहा ' ' सोमायस्वाहा ' अशा दोन घृताहुती दर्शपूर्णमासाच्या वेळीं दक्षिणोत्तर भागीं द्याव्या लागतात. या दोन आहुतींमध्यें स्थलांतर असतें, प्रधानस्थानाला आवापस्थान असें म्हणतात. अग्निहोत्रांतही सूर्य आणि प्रजापति यांस सकाळीं व अग्नि आणि प्रजापति यांस संध्याकाळीं आहुती देत असतात. असो;) आज्याहुतींच्या स्थानामध्यें जें आवापस्थान असतें, त्यांत देवतांच्या उद्देशानें आहुती देत जाव्या. अनेक दिवस हा प्रयोग चालावयाचा असतो; म्हणून आहुती हें पद अनेकवचनान्त आहे. हा यथार्थ आहुतिप्रक्षेपणात्मक विधि हा कर्ममार्ग होय. हा स्वर्गप्राप्तीचें उत्तम साधन आहे. हें खरें; पण, कर्मांचें यथायोग्य आणि यथासांग अनुष्ठान घडणें अत्यंत कठीण आहे. संकटेंही अनेक प्रकारचीं उत्पन्न होतात. म्हणून हा कर्ममार्ग अत्यंत कठीण आहे. हें काठिण्य पुढील मंत्रांत सांगितलें आहे ॥२॥

मंत्र तिसरा.

यस्याग्निहोत्रमदर्शमपौर्णमासमचातुर्मास्यमनाग्रयणमतिथिवर्जितं च अहुतमवैश्वदेवमविधिना हुतमासप्तमांस्तस्य लोकान्हिनस्ति ॥ ३ ॥

अन्वय व अर्थ—**यस्य अग्निहोत्रं अदर्शं, अपौर्णमासं, अचातुर्मास्यं, अनाग्रयणं, अतिथिवर्जितं, अहुतं, अवैश्वदेवं, अविधिनाहुतं, तस्य आसप्तमान् लोकान् हिनस्ति** (ज्याचें अग्निहोत्र दर्शपौर्णमासवर्जित आहे, जो ' चातुर्मास्य ' कर्म करीत नाहीं, जो ' अग्रहायण '–कर्मविन्मुख असतो, जो अतिथींचा समाचार घेत नाहीं, जो यथाकालीं आहुति देत नाहीं, वैश्वदेव करीत नाहीं, आहुती दिल्याच तर शास्त्रनिषिद्ध पद्धतीनें देतो, त्याचे सात लोक नष्ट होतात.) ॥ ३ ॥

सारांश, अग्निहोत्राचें कर्म यथासांग होण्यास अनेक प्रत्यवाय आहेत आणि यथासांग कर्म झालें नाहीं तर कर्म–कर्ता अधोगतीस जातो. ॥ ३ ॥

कथं यस्याग्निहोत्रिणोऽग्निहोत्रमदर्शं दर्शाख्येन कर्मणा वर्जितम् । अग्निहोत्रिणोऽवश्यकर्तव्यत्वाद्दर्शस्य । अग्निहोत्रसंबन्ध्यग्निहोत्रविशे-

षणमिव भवति । तदक्रियमाणमित्येतत् । तथाऽपौर्णमासमित्यादिष्वप्यग्निहोत्रविशेषणत्वं द्रष्टव्यम् । अग्निहोत्राङ्गत्वस्याविशिष्टत्वादपौर्णमासं पौर्णमासकर्मवर्जितम् । अचातुर्मास्यं चातुर्मास्यकर्मवर्जितम् । अनाग्रयणमाग्रयणं शरदादिकर्तव्यं तच्च न क्रियते यस्य । तथाऽतिथिवर्जितं चातिथिपूजनं चाहन्यहन्यक्रियमाणं यस्य स्वयं सम्यगग्निहोत्रकालेऽहुतम् । अदर्शादिवदवैश्वदेवं वैश्वदेवकर्मवर्जितं हूयमानमप्यविधिना हुतं न यथाहुतमित्येतत् । एवं दुःसंपादितमसंपादितमग्निहोत्रापद्युलक्षितं कर्म किं करोतीत्युच्यत आसप्तमान्सप्तमसहितांस्तस्य कर्तुर्लोकान्हिनस्ति हिनस्तीवाऽऽयासमात्रफलत्वात्। सम्यक्क्रियमाणेषु हि कर्मसु कर्मपरिणामानुरूपेण भूरादयः सत्यान्ताः सप्त लोकाः फलं प्राप्यन्ते । ते लोका एवं भूतेनाग्निहोत्रादिकर्मणा त्वप्राप्यत्वाद्धिंस्यन्त इवाऽऽयासमात्रं त्वव्यभिचारीत्यतो हिनस्तीत्युच्यते । पिण्डदानाद्यनुग्रहेण वा संबध्यमानाः पितृपितामहप्रपितामहाः पुत्रपौत्रप्रपौत्राः स्वात्मोपकाराः सप्त लोका उक्तप्रकारेणाग्निहोत्रादिना न भवन्तीति हिंस्यन्त इत्युच्यते ॥ ३ ॥

सिद्धान्ती—ज्या अग्निहोत्र्याचे अग्निहोत्रांत दर्श नांवाचें कर्म (इष्टि) होत नाहीं–

शिष्य—अग्निहोत्र्यांनीं दर्श नामक इष्टि तर अवश्य केली पाहिजे. ही केली नाहीं तर अग्निहोत्र यथासांग होणार नाहीं. याचा अग्निहोत्राशी नित्य संबंध आहे. हें अग्निहोत्राचें एक विशिष्ट अंग आहे, म्हणून दर्शादि सर्व अग्निहोत्राचीं जणों विशेषणेंच आहेत.

सिद्धान्ती—हें खरें; पण असेंही दर्शकर्म जो अग्निहोत्री करीत नाहीं, याचप्रमाणें अग्निहोत्राचें अंग 'पौर्णमास कर्म' हें जो करीत नाहीं, 'चातुर्मास्य' कर्म करीत नाहीं, शरद्ऋतुमध्यें 'अग्रयण इष्टि' करावी लागते ती जो करीत नाहीं, रोजच्या रोज जें अतिथिपूजन अवश्य आहे, तें जो करीत नाहीं, यथाकालीं अग्नीला स्वतः आहुती देत नाहीं; दर्शादिकाप्रमाणेंच अग्निहोत्राचें अंग नसलें तरी अवश्य असणारें वैश्वदेवकर्म जो करीत नाहीं; आहुती दिल्या तरी जो निषिद्धमार्गानें व अश्रद्धेनें आहुती देतो, सारांश यांतील ज्याचीं एक किंवा सर्व कर्में चुकतात, त्याला संकटें प्राप्त होतात. तसेंच निषिद्ध मार्गानें संपादिलेलें कर्म न संपादल्यासारखें होतें. येथें अग्निहोत्र हें एक उपलक्षण मात्र आहे. तात्पर्य, सर्व वेदविहित कर्मासंबंधानें लागणाऱ्या अंगोपांगाचें जो यथाशास्त्र संपादन करीत नाहीं किंवा विहितकर्म मुळींच करित नाहीं त्याचे सात लोक नष्ट झाल्यासारखे होतात आणि निवळ श्रम मात्र त्याच्या पदरीं खास पडतात. आतां जर यथासांग कर्म झालें तर सप्त लोक (म्हणजे भूः, भुवः, स्वः, महाः, जनः, तपः आणि

सत्यं हे लोक) कर्मानुरूप प्राप्त होतात. पण वर सांगितल्याप्रमाणें अग्निहोत्र कर्म जर यथासांग झालें नाहीं तर त्याला वरील सप्त लोक मिळावयाचें नाहींत, असें होतें. सारांश, त्यांचा नाशच जणू कांहीं होतो आणि त्यांचें आयास हेंच काय तें फल त्याला मिळतें. अशुद्धकर्मांचें फल आयास, हें निश्चित ठरलेलें आहे.

शिष्य—तो कर्मकर्ता विपरीत आचार करितो. म्हणून सप्तलोकांचा नाश त्याच्या हातून होतो. ते लोक त्याला मिळत नाहींत असें म्हणावयाचें. हें ठीक झालें. आतां सप्तलोक म्हणजे पिंड देण्याघेण्यासंबंधानें ज्यांचा आपला उपकार-कर्तृत्वाचा संबंध येतो, ते पिता, पितामह आणि प्रपितामह अशी पूर्व पिढींची त्रयी घेतली आणि पुत्र, पौत्र आणि प्रपौत्र अशी पुढची त्रयी घेतली तर जुळेल कीं नाहीं ! आपल्यासह या सात पिढ्या होतातच.

सिद्धान्ती—हो हो ! पिंडोदकदानानें यजमान पित्रादि त्रयीवर उपकार करितो आणि अन्नदानानें पुत्रादि त्रयीवर उपकार करितो किंवा पिंडदान करून व अन्नदान करून स्वकल्याण करून घेतो, आणि असा त्याचा उभय-त्रयींवर आपण मध्यें राहून संबंध घडतो. म्हणून सात पिढ्यांचा व सात पितरादि लोकांचा नाश वर सांगितलेला अविचारी व निषिद्ध मार्गी अग्निहोत्रादि कर्में करणारा पुरुष करितो, असाही अर्थ करण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. ॥ ३ ॥

मंत्र चवथा.

काली कराली च मनोजवा च सुलोहिता या च सुधूम्रवर्णा । स्फुलिङ्गिनी विश्वरुची च देवी लेलायमाना इति सप्त जिह्वाः ॥ ४ ॥

अन्वय व अर्थ—**काली, कराली च, मनोजवा च, सुलोहिता या च सुधम्रवर्णा, स्फुलिङ्गिनी विश्वरुची च, लेलायमानादेवी इति सप्त जिह्वाः** (कराली, काली, मनोजवा, सुलोहिता, सुधूम्रवर्णा, स्फुलिङ्गिनी, विश्वरुची (लेलायमानादेवी) या सात जिव्हा आहेत.) ॥ ४ ॥

काली कराली च मनोजवा च सुलोहिता या च सुधूम्रवर्णा ।
स्फुलिङ्गिनी विश्वरुची च देवी लेलायमाना इति सप्त जिह्वाः ।
काल्याद्या विश्वरुच्यन्ता लेलायमाना अग्नेर्हविराहुतिग्रसनार्था एताः सप्त जिह्वाः ॥ ४ ॥

कालीपासून विश्वरुचीपर्यंत चंचल असणाऱ्या वरील सप्त जिह्वा अग्नीच्या आहेत. या सर्वांचा उपयोग आहुति-ग्रहण करण्यामध्यें असतो. ॥ ४ ॥

मंत्र पांचवा.

एतेषु यश्चरते भ्राजमानेषु यथाकालं चाऽऽहुतयो ह्याददायन्। तं नयन्त्येताः सूर्यस्य रश्मयो यत्र देवानां पतिरेकोऽधिवासः॥ ५॥

अन्वय व अर्थ—**एतेषु भ्राजमानेषु यः चरते, यथा काले च आहुतयः आददायन्** (या देदिप्यमान अग्निजिह्वांच्या भेदांमध्यें जो अग्निहोत्री शास्त्रोक्त कर्म करितो; त्याचप्रमाणें जो यथाकाली आहुतींचें समर्पण करितो) **एताः सूर्यस्य रश्मयः यत्र देवानां एकः पतिः अधिवासः तं नयंति** (या आहुति सूर्याचे किरण होऊन त्यांच्या द्वारानें, जेथें देवांचा स्वामी वास्तव्य करितो, तेथें या सूर्यरश्मि यथोक्तकारी अग्निहोत्र्याला घेऊन जातात.)॥ ५॥

एतेष्वग्निजिह्वाभेदेषु योऽग्निहोत्री चरते कर्माऽऽचरत्यग्निहोत्रादि भ्राजमानेषु दीप्यमानेषु। यथाकालं च यस्य कर्मणो यः कालस्तत्काले यथाकालं यजमानमाददायन्नाददाना आहुतयो यजमानेन निर्वर्तितास्तं नयन्ति प्रापयन्त्येता आहुतयो या इमा अनेन निर्वर्तिताः सूर्यस्य रश्मयो भूत्वा रश्मिद्वारैरित्यर्थः। यत्र यस्मिन्स्वर्गे देवानां पतिरिन्द्र एकः सर्वानुपर्यधिवसतीत्यधिवासः॥ ५॥

सिद्धान्ती—जो अग्निहोत्री या सात देदिप्यमान अग्निजिह्वांच्या भेदामध्यें (एका ज्वालेच्या व दुसऱ्या ज्वालेच्या मध्यें अंतर असतें त्यांत) आहुती देतो, अग्निहोत्रादि कर्मांचें आचरण करितो, आणि ज्या कालीं जें कर्म करावयाचें तें कर्म त्या कालीं म्हणजे यथाकालीं करितो म्हणजे यजमानानें दिलेल्या आहुती यथासांग समर्पित होतात. त्या अग्निहोत्र्याला, यजमानाला, धन्य करणाऱ्या या आहुती सूर्यकिरणरूपी होतात; आणि त्यांच्या साहाय्यानें त्या आहुती अशा स्वर्गलोकामध्यें यजमानाला घेऊन जातात कीं, जेथें देवांचा राजा इंद्र वास्तव्य करित असतो. हा इंद्र देवांचा स्वामी असून, त्यांच्याहून सर्वथा श्रेष्ठ आहे व तो श्रेष्ठलोकांत वास्तव्य करितो. सारांश, यथासांग कर्म करणारा अग्निहोत्री इंद्रलोकीं जातो.॥ ५॥

मंत्र सहावा.

एह्येहीति तमाहुतयः सुवर्चसः सूर्यस्य रश्मिभिर्यजमानं वहन्ति । प्रियां वाचमभिवदन्त्योऽर्चयन्त्य एष वः पुण्यः सुकृतो ब्रह्मलोकः ॥ ६ ॥

अन्वय व अर्थ—'वः एषः पुण्यः सुकृतः ब्रह्मलोकः' 'एहिएहि इति' प्रिया सुवर्चसः वाचं अभिवदन्त्यः अर्चयन्त्यः आहुतयः तं यजमानं सूर्यस्य रश्मिभिः वहंति, ('यावें, यावें' असें म्हणून या तेजस्वी आहुती सूर्याच्या किरणसाह्याने यजमानाला वाहून घेऊन जातात व 'हा तुमचा पुण्य-सुकृत ब्रह्मलोक आहे.' अशा मधुरवाणीनें यजमानाची स्तुति करितात आणि त्याची पूजा करितात.) ॥ ६ ॥

कथं सूर्यस्य रश्मिभिर्यजमानं वहन्तीत्युच्यत एह्येहीत्याह्वयन्त्यः । सुवर्चसो दीप्तिमत्यः । किंच प्रियामिष्टां वाचं स्तुत्यादिलक्षणामभिवदन्त्य उच्चारयन्त्योऽर्चयन्त्यः पूजयन्त्यश्चैष वो युष्माकं पुण्यः सुकृतः पन्था ब्रह्मलोकः फलरूपः । एवं प्रियां वाचमभिवदन्त्यो वहन्तीत्यर्थः । ब्रह्मलोकः स्वर्गः प्रकरणात् ॥ ६ ॥

सिद्धान्ती—या तेजस्वी आहुती 'यावें, यावें' असें आमंत्रण करून आणि 'हा आपल्यास आपल्या पुण्याईनें सुकर आणि सुखकर ब्रह्म लोक (स्वर्गलोक) फल रूपानें प्राप्त झाला आहे' अशा तऱ्हेचे प्रिय, इष्ट, मिष्ट, मधुर, स्तुति-परिपूर्ण शब्द उच्चारून आणि यजमानाची आराधना करून या आहुती यजमानाला स्वागतपूर्वक ब्रह्मलोकीं वाहून नेतात. हा ब्रह्मलोक म्हणजे स्वर्ग लोक होय. कारण हें स्वर्गाचें प्रकरण आहे. स्वर्ग-विचार येथें चालला आहे. ॥ ६ ॥

मंत्र सातवा.

प्लवा ह्येते अदृढा यज्ञरूपा अष्टादशोक्तमवरं येषु कर्म । एतच्छ्रेयो येऽभिनन्दन्ति मूढा जरामृत्युं ते पुनरेवापि यन्ति ॥ ७ ॥

अन्वय व अर्थ—एते यज्ञरूपाः अदृढाः प्लवाः (या यज्ञरूप नौका अदृढ-विनाशी-असतात.) एषु अष्टादशोक्तं अवरं कर्म (यामध्यें

अष्टादशोक्त अल्पमोली कर्म आहे.) ये मूढाः एतत् श्रेयः अभिनंदंति ते पुनः जरामृत्युं एव यंति (जे मूर्ख लोक, 'कर्म हाच श्रेष्ठ मार्ग आहे' असें समजून आनंद मानून घेतात, ते पुनः पुनः जरा-म्हातारपण-आणि मृत्यु पावतात.) ॥ ७ ॥

एतच्च ज्ञानरहितं कर्मैतावत्फलमविद्याकामकर्मकार्यमतोऽसारं दुःखमूलमिति निन्द्यते। प्लवा विनाशिन इत्यर्थः। हि यस्मादेतेऽदृढा अस्थिरा यज्ञरूपा यज्ञस्य रूपाणि यज्ञरूपा यज्ञनिर्वर्तका अष्टादशाष्टादशसंख्याकाः षोडशर्त्विजः पत्नी यजमानश्चेत्यष्टादश । एतदाश्रयं कर्मोक्तं कथितं शास्त्रेण । येष्वष्टादशस्ववरं केवलं ज्ञानवर्जितं कर्म । अतस्तेषामवरकर्माश्रयाणामष्टादशानामदृढतया प्लवत्वात्प्लवते सह फलेन तत्साध्यं कर्म । कुण्डविनाशादिवत्क्षीरदध्यादीनां तत्स्थानां नाशः । यत एवमेतत्कर्म श्रेयः श्रेयःकरणमिति येऽभिनन्दन्त्यभिहृष्यन्त्यविवेकिनो मूढा अतस्ते जरां च मृत्युं च जरामृत्युं किंचित्कालं स्वर्गे स्थित्वा पुनरेवापि यन्ति भूयोऽपि गच्छन्ति ॥७॥

सिद्धान्ती—याप्रमाणें वर सांगितलेलें कर्म ज्ञानशून्य आहे. त्याच्या ह्या अल्प योग्यतेचे फलाची मर्यादा इतकीच आहे. हें फल म्हणजे अविद्येपासून उत्पन्न होणाऱ्या वासनेच्या प्रेरणेनें झालेलें जें कर्म त्याचा विपाक होय. वासना अविद्याजन्य असते, म्हणून वासनाप्रेरित कर्मही निःसार आणि दुःख-मूलक होऊन सर्व संसार सुख-शून्य होतो. अशा प्रकारें कर्मांची निंदा श्रुतीनें या मंत्रांत केली आहे. श्रुति म्हणते कीं, कामजन्य यज्ञरूपी या ज्या नौका आहेत, त्या अस्थिर व दुर्बल असल्यामुळें विनाशी असतात. या यज्ञादिकर्मांच्या कारभारांत अठरा लोकांनीं अठरा प्रकारचें करावें लागणारें कर्म ज्ञानशून्य असतें.

शिष्य—प्रत्येक वेदाचे चार चार याप्रमाणें सोळा ऋत्विज्, यजमान आणि यजमान-पत्नी हे यज्ञकर्मांत प्रमुखत्वानें असणारे लोक होत.

सिद्धान्ती—होय. प्रत्येकास कांहीं तरी कर्म शास्त्रानें विहित केलें आहे, पण या कर्मामध्यें स्वरूपाच्या ज्ञानाचा बिलकुल संबंध नाहीं. तेव्हां या असल्या ज्ञानशून्य व क्षुद्र कर्म करणाऱ्या अठरा लोकांची स्थिति आज्ञानमय असल्यामुळें त्यांच्या अस्थिर कर्माश्रयानें उत्पन्न होणारी नौका ही अत्यंत विनाशी असते म्हणजे या अठरा लोकांनीं केलेलें कर्म व कर्मफल हीं उभयतांही विनाशी असतात. अर्थात् या असल्या अस्थिर नौकेवर बसलेल्या लोकांचा घात होतो. दह्यादुधाचीं भांडी फुटलीं असतां त्यांतील दहीं-दूध व्यर्थ जातें हें तुलाही ठाऊक आहे. मग घातक अठरा फळ्या एकत्र जुळवून चंचल झालेल्या

नौकेमध्यें बसणारे लोक नष्ट होतात; यांत काय आश्चर्य आहे ? पण असे कांहीं लोक असतात कीं, ज्यांना हें अज्ञानजन्य यज्ञकर्म हेंच काय तें मोक्षसाधन आहे असें वाटतें. जे लोक या कर्मानें आपलें अभिनंदन करून घेतात; ते लोक मात्र खरोखर अविवेकी होत. अर्थातच त्यांना जरा आणि मृत्यु यांस वश व्हावें लागतें. सत्कर्मानें कांहीं कालपर्यंत त्यांस स्वर्गसुख मिळतें हें खरें; पण त्यांचें कर्म ज्ञानशून्य असल्यामुळें होणारें कर्मफलही अस्थिर असतें व तें फल संपल्यावर कर्मकर्त्याच्या मागें जन्म-मृत्यूची साडेसाती लागलेली असतेच असते. ॥ ७ ॥

रंगरामानुज—'अष्टादश=सोळा ऋत्विज्, यजमान व तत्पत्नी; किंवा १८ स्मृति.

माध्व०—या मंत्रांत विकलांग (अविधिपूर्वक) व सकाम कर्मे अनिष्ट कां आहेत हें सांगितलें आहे. 'अष्टादशोक्तं'=पुराण, न्याय, मीमांसा, धर्मशास्त्र, आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्व, अर्थशास्त्र, चार वेद आणि सहा शास्त्रें मिळून अठरा ग्रंथ होतात. या १८ ग्रंथांनीं सांगितलें तें अष्टादशोक्त कर्म होय. 'अवरः' म्हणजे अपकृष्ट=न्यून=कमी योग्यतेचें= अंगभूत=यज्ञेतर कर्म. हें कर्मच श्रेष्ठ आहे, असें भगवंतास विसरून मूर्ख लोक म्हणतात.

मंत्र आठवा.

अविद्यायामन्तरे वर्तमानाः स्वयं धीराः पण्डितंमन्यमानाः । जङ्घन्यमाना परियन्ति मूढा अन्धेनैव नीयमाना यथाऽन्धाः ॥ ८ ॥

अन्वय व अर्थ—**अविद्यायां अन्तरे वर्तमानाः** (नित्य अविद्येमध्यें राहणारे) **स्वयं धीराः** (आपण मोठें विद्वान् आहों असें म्हणणारे) **पंडितं मन्यमानाः** (समजावयाचें तें आपल्यास समजलें आहे असें म्हणणारे) **जंघन्यमानाः मूढाः परियंति** (शेवटीं नाश पावणारे मूर्ख लोक परिभ्रमण करीत असतात.) **अंधेन नीयमानाः अन्धाः इव** (अंधळ्यानीं अंधळ्याला न्यावें त्याप्रमाणें वरील अविद्याप्रेरित पुरुषांची स्थिति होते.) ॥ ८ ॥

किंचाविद्यायामन्तरे मध्ये वर्तमाना अविवेकप्रायाः स्वयं वयमेव धीरा धीमन्तः पण्डिता विदितवेदितव्याश्चेति मन्यमाना आत्मानं संभावयन्तस्ते च जङ्घन्यमाना जरारोगाद्यनेकानर्थव्रातैर्हन्यमाना भृशं पीड्यमानाः परियन्ति विभ्रमन्ति मूढाः । दर्श-

नवर्जितत्वादन्धेनैवाचक्षुष्केणैव नीयमानाः प्रदर्श्यमानमार्गा यथा लोकेऽन्धा अक्षिरहिता गर्तकण्टकादौ पतन्ति तद्वत् ॥ ८ ॥

सिद्धान्ती—अविद्येच्या साम्राज्यांत वावरणारे अल्पज्ञ व अल्प विवेकी लोक 'आपण फार मोठे विद्वान् आहों.' 'समजून घ्यावयाचें तें आपल्यास सर्व समजलें आहे.' असें समजून आपल्यासच आपण शाबासकी देत असतात व धन्य मानून घेतात. पण या अज्ञानी लोकांस त्यांच्याच मूर्खत्वामुळें जरा, रोग इत्यादि अनेक संकटपरंपरा जोराचे धक्के मात्र देत असतात आणि यामुळें हे सारखे परिभ्रमण करीत राहतात. डोळे नाहींसे झालेल्या अंधानें हातीं धरलेले व त्याच्या पाठीमागून जाणारे आंधळे लोक व्यवहारांत ज्याप्रमाणें कांट्या-कुट्यांत व खांच-खळग्यांत जाऊन पडतात, त्याप्रमाणें ज्ञानशून्य अविद्येच्या आधारानें चालणारे अज्ञानी लोक जन्म-मृत्यूच्या अथांग गर्तेमध्यें जाऊन पडतात आणि तळमळत राहतात. ॥ ८ ॥

माध्व०—'अविद्या'=ईश्वरेच्छा आणि भावरूप अज्ञान. यांनीं 'पंडितं' हें पद निराळें करून अर्थ केला आहे. 'पंडितंमन्यमानाः'=पांडित्याचे अभिमानी. जंघन्यमान=हिंसात्मक यज्ञ करणारे. अग्निहोत्राचाही यांतच समावेश होतो.

मंत्र नववा.

अविद्यायां बहुधा वर्तामना वयं कृतार्था इत्यभिमन्यन्ति बालाः । यत्कर्मिणो न प्रवेदयन्ति रागात्तेनाऽऽतुराः क्षीणलोकाश्च्यवन्ते ॥ ९ ॥

अन्वय व अर्थ—**अविद्यायां बहुधा वर्तमानाः बालाः 'वयं कृतार्थाः' इति अभिमन्यन्ति** (अविद्येमध्यें अनेक प्रकारांनीं संचारणारे बालिश लोक 'आपण कृतार्थ आहों' असें मानून अभिमानानें आपली धन्यता गात असतात.) **यत् रागात् कर्मिणः न प्रवेदयन्ति तेन आतुराः क्षीणलोकाः च्यवन्ते** (ज्या अर्थीं अभिमान-वासनादि अविद्येस वश झालेले लोक तत्त्वज्ञानास पारखे होतात, त्याअर्थीं त्या लोकांस दुःखें प्राप्त होऊन स्वर्ग-लोकांतूनही भ्रष्ट व्हावें लागतें.) ॥९॥

किंचाविद्यायां बहुधा बहुप्रकारं वर्तमाना वयमेव कृतार्थाः कृतप्रयोजना इत्येवमभिमन्यन्त्यभिमानं कुर्वन्ति बाला अज्ञानिनः । यद्यस्मादेवं कर्मिणो न प्रवेदयन्ति तत्त्वं न जानन्ति रागात्कर्मफल-

रागाभिभवनिमित्तं तेन कारणेनाऽऽतुरा दुःखार्ताः सन्तः क्षीणलोकाः क्षीणकर्मफलाः स्वर्गलोकाच्च्यवन्ते ॥ ९ ॥

सिद्धान्ती—अविद्येमध्यें राहून अनेक ज्ञानशून्य कर्म करणारे लोक असें समजतात कीं, शास्त्रानें सांगितलेलें विहित कर्म आपल्या हातून झालें म्हणजे आपण धन्य झालों, आपली इतिकर्तव्यता संपली, आपल्यास ज्ञानाची कांहीं गरज नाहीं. पण ज्ञानाचें माहात्म्य काय आहे, हें या विवेकशून्य लोकांस समजलें नसल्यामुळें कर्म हाच जीवाचा तरणोपाय आहे असें हे लोक समजतात; आणि आपण मोठे कर्म–कर्ते असा अभिमान बाळगीत असतात. या लोकांस स्वरूपज्ञान झालें नसल्यामुळें कर्माचा अभिमान आणि कर्मफलाची वासना व अज्ञान हीं त्यांच्या पराभवाचें निमित्त होतात. या कारणानें ते दुःखवश होतात; आणि कर्मफलानें जरी त्यांस स्वर्ग प्राप्त झाला, तरी पुण्यनाश झाल्याबरोबर ते स्वर्गभ्रष्ट होतात आणि दुःखांत येऊन पडतात. उत्पन्न झालेल्या वस्तूचा केव्हां तरी नाश होतो, म्हणून त्या कर्माच्या फलाचाही नाश होतो. हें तत्त्व या विचाऱ्या अज्ञानी लोकांस समजत नाहीं, आणि म्हणून ते फसतात. ॥ ९ ॥

माध्व०—बहुधा वर्तमानाः=नाना देवतांची पूजा करून नाना प्रकारांनीं वागणारे. विष्णु हा सर्व देवांपेक्षां अमळसा मोठा आहे असें म्हणणाऱ्या लोकांस मनुष्यलोकीं जन्म येतो आणि तो इतर देवांच्या बरोबरीचा आहे, किंवा त्यापेक्षां कमी योग्यतेचा आहे, असें म्हणणारे लोकांस हीनेतर-लोकीं जन्म घ्यावा लागतो.

मंत्र दहावा.

इष्टापूर्तं मन्यमाना वरिष्ठं नान्यच्छ्रेयो वेदयन्ते प्रमूढाः । नाकस्य पृष्ठे ते सुकृतेऽनुभूत्वेमं लोकं हीनतरं वा विशन्ति ॥ १० ॥

अन्वय व अर्थ—इष्टापूर्तं वरिष्ठं मन्यमानाः प्रमूढाः अन्यत् श्रेयः न वेदयन्ते (इष्टापूर्त हेंच सर्वश्रेष्ठ कर्म आहे असें मानणारे मूर्ख लोकांस दुसरा खरा कल्याणकारक मार्ग ठाऊक असत नाहीं.) ते नाकस्य पृष्ठे सुकृते अनुभूत्वा इमं लोकं हीनतरं वा विशंति (हे लोक स्वर्गलोकीं जाऊन तेथें पुण्योपभोगासाठीं सुंदर शरीरें धारण करितात आणि कांहीं वेळ सुख भोगून पृथ्वीवर मनुष्य जन्म प्राप्त

करून घेतात किंवा या जन्मापेक्षांहीं हीनतर योनींत या मूर्ख लोकांस जन्म घ्यावा लागतो.) ॥ १० ॥

इष्टापूर्तम् । इष्टं यागादि श्रौतं कर्म । पूर्तं वापीकूपतडागादि स्मार्तं । मन्यमाना एतदेवातिशयेन पुरुषार्थसाधनं वरिष्ठं प्रधानमिति चिन्तयन्तोऽन्यदात्मज्ञानाख्यं श्रेयःसाधनं न वेदयन्ते न जानन्ति प्रमूढाः पुत्रपशुबन्ध्वादिषु प्रमत्ततया मूढास्ते च नाकस्य स्वर्गस्य पृष्ठ उपरिस्थाने सुकृते भोगायतनेऽनुभूत्वाऽनुभूय कर्मफलं पुनरिमं लोकं मानुषमस्माद्धीनतरं वा तिर्यङ्नरकादिलक्षणं यथाकर्मशेषं विशन्ति ॥ १० ॥

सिद्धा०—यागादि श्रौतकर्मे व वापी, कूप इत्यादि स्मार्त हीं इष्टापूर्तादिकर्मेंच पुरुषार्थाचें अत्यंत श्रेष्ठ साधन आहेत, असें मानणाऱ्या लोकांस आत्मज्ञान या नांवाचें एक सर्वमान्य आणि सर्वश्रेष्ठ पुरुषार्थसाधन आहे, मोक्षाचें साधन आहे, हें ठाऊक नसतें. ते लोक पुत्र-दारा-धन, इष्ट-मित्र इत्यादिकांच्या मोहानें उन्मत्त होऊन मूर्ख झालेले असतात. यांच्या हातून कांहीं थोडें शास्त्रविहित सकाम कर्म झालें असल्यामुळें या लोकांस स्वर्गाच्या पृष्ठभागावर कांहीं दिवस पुण्यशरीराचा लाभ होतो. पण हा लाभ किंवा हें सुख कर्मांनें आणिलेलें; स्वस्वरूपसुख नव्हे. अर्थातच या उसनें आणलेल्या सुखाचा अनुभव कांहीं वेळ घेऊन त्यांस दुःखकर मनुष्यजन्म किंवा मनुष्यापेक्षांही हीन असा पशु-पक्ष्यादिकांचा जन्म त्यांच्या त्यांच्या शेष राहिलेल्या कर्मानुसार प्राप्त होतो. तात्पर्य वासनेनें प्रेरिलेलें कर्म नित्य-सुख देण्याला केव्हांही समर्थ असत नाहीं. ॥ १० ॥

मंत्र अकरावा.

तपःश्रद्धे ये ह्युपवसन्त्यरण्ये शान्ता विद्वांसो भैक्ष्यचर्यां चरन्तः । सूर्यद्वारेण ते विरजाः प्रयान्ति यत्रामृतः स पुरुषो ह्यव्ययात्मा ॥ ११ ॥

अन्वय व अर्थ—ये भैक्ष्यचर्यां चरंतः शांताः विद्वांसः अरण्ये हि तपश्रद्धे उपवसंति (पण भिक्षावृत्तीनें राहून जे शांत आणि ज्ञानी लोक अरण्यामध्यें श्रद्धापूर्वक तपश्चर्या करितात.) ते विरजाः; यत्र सः अमृतः पुरुषः हि अव्ययात्मा, सूर्यद्वारेण प्रयान्ति (ते निर्मळ लोक जेथें तो अमृत आणि अव्ययात्मा पुरुष राहतो त्या लोकाला सूर्यद्वारानें जातात.) ॥ ११ ॥

ये पुनस्तद्विपरीता ज्ञानयुक्ता वानप्रस्थाः संन्यासिनश्च तपःश्रद्धे हि तपः स्वाश्रमविहितं कर्म । श्रद्धा हिरण्यगर्भादिविषया विद्या ते तपःश्रद्धे उपवसन्ति सेवन्तेऽरण्ये वर्तमानाः सन्तः । शान्ता उपरतकरणग्रामाः । विद्वांसो गृहस्थाश्च ज्ञानप्रधाना इत्यर्थः । भैक्ष्यचर्यां चरन्तः परिग्रहाभावादुपवसन्त्यरण्य इति संबन्धः । सूर्यद्वारेण सूर्योपलक्षितेनोत्तरायणेन पथा ते विरजा विरजसः क्षीणपुण्यपापकर्माणः सन्त इत्यर्थः । प्रयान्ति प्रकर्षेण यान्ति यत्र यस्मिन्सत्यलोकादावमृतः स पुरुषः प्रथमजो हिरण्यगर्भो ह्यव्ययात्माऽव्ययस्वभावो यावत्संसारस्थायी । एतदन्तास्तु संसारगतयोऽपरविद्यागम्याः । ननु—एतं मोक्षमिच्छन्ति केचिन्नेहैव सर्वे प्रविलीयन्ति कामास्ते सर्वगं सर्वतः प्राप्य धीरा युक्तात्मानः सर्वमेवाऽऽविशन्तीत्यादिश्रुतिभ्योऽप्रकरणाच्च । अपरविद्याप्रकरणे हि प्रवृत्ते न ह्यकस्मान्मोक्षप्रसङ्गोऽस्ति विरजस्त्वं त्वापेक्षिकं समस्तमपरविद्याकार्यं साध्यसाधनलक्षणं क्रियाकारकफलभेदभिन्नं द्वैतम् । एतावदेव यद्धिरण्यगर्भप्राप्त्यवसानम् । तथा च मनुनोक्तं स्थावराद्यां संसारगतिमनुक्रामता—

" ब्रह्मा विश्वसृजो धर्मो महानव्यक्तमेव च ।
उत्तमां सात्त्विकीमेतां गतिमाहुर्मनीषिणः " इति ॥ ११ ॥

सिद्धान्ती—वरील मंत्रांतील अज्ञ कर्मठ लोकांहून विलक्षण असणाऱ्या ज्ञानयुक्त कर्मठ लोकांचा विचार या मंत्रांत केला आहे. हे लोक वानप्रस्थ असतात किंवा संन्यासीही असतात. हे स्वधर्माचें आचरण यथास्थित करून त्यानेंच तपाची सांगता करतात. हिरण्यगर्भादि अपरब्रह्माचें स्वरूपज्ञान यांस झाल्यामुळें यांची तत्संबंधी आस्तिक्य बुद्धि श्रेष्ठ प्रकारची असते. याप्रमाणें हे तप आणि श्रद्धा या उभयतांनीं अलंकृत झालेले वानप्रस्थ व संन्यासी अरण्यामध्यें वास्तव्य करितात. यांचीं सर्व इंद्रियें विषय–निवृत्त झालेलीं असतात. तसेंच, हे विद्वान् गृहस्थ ज्ञानीही असतात. हे आपला उदरनिर्वाह भिक्षावृत्तीनें चालवितात. कारण पुत्र, मित्र, कलत्रादि सर्व प्रकारचा परिग्रह यांनीं ठाकून दिलेला असतो आणि म्हणून ते अरण्यांत राहतात. असो, हे लोक निर्मळ झालें असल्यामुळें म्हणजे यांचीं पुण्य–पापात्मक कर्में क्षीण झालीं असल्यामुळें ते उत्तरायण मार्गानें (देवयानानें) सत्यलोकाला जातात. सूर्यद्वार हें उपलक्षण मात्र आहे. हा लोक असा असतो कीं, येथें प्रथम उत्पन्न झालेला जो हिरण्यगर्भ त्याचें वास्तव्य असतें. हिरण्यगर्भ अमर आहे आणि अव्ययात्मा म्हणजे अविकारी आहे. जावत्काल-

पर्यंत हा संसार म्हणजे हें दृश्य विश्व आहे, तावत्कालपर्यंत त्याचें नियमन करणारा हिरण्यगर्भ अमर आणि अविनाशी असतो. सारांश सत्य-लोकादि अमृत-भुवनांत या ज्ञानी कर्मठांस कल्पपर्यंत अमरत्वानें वास्तव्य करावयास सांपडतें. अपरविद्येनें सर्व कल्पपर्यंत मात्र असणारी ही अमरस्थिति ज्ञानी कर्मठांस उपभोगावयास सांपडते. एवंच अज्ञानी लोकांच्या अपरविद्येची ही उत्तरमर्यादा होय. सामान्य लोकांस पुनः जन्म यावयाचा असतो व दुःखमूलक संसार भोगावा लागतो. ज्ञानी कर्मठांस कल्पपर्यंत मात्र सुखाची प्राप्ति होते. ही अपरविद्येच्या फलाची अंतिमगति आहे. या विद्येला याच्यापुढें स्वभक्तांस नेतां येत नाहीं.

पूर्वपक्षी—हिरण्यलोकांत वास्तव्य होणें हा मोक्ष नव्हे काय?

सिद्धान्ती—नाहीं. कारण, हिरण्यगर्भलोकप्राप्ति ही देशपरिच्छिन्न आहे म्हणजे देशविशेषांत (एकामात्र प्रदेशांत) आणि कालविशेषांत (एकामात्र कालांत) ज्ञानी कर्मठास अपरविद्येनें अमरत्व प्राप्त होतें. ही स्थिति म्हणजे मोक्ष नव्हे. मोक्षस्थिती-मध्यें "सर्व प्रकारच्या सर्व इच्छा सर्वथा नष्ट होत असतात." "मोक्ष मिळाला असतां ज्ञानैकनिष्ठ पुरुषांना सर्वव्यापित्व व सर्वसाक्षित्व सर्वप्रकारानें प्राप्त होऊन ते मुक्त लोक सर्वात्मक होतात." इत्यादि स्थिति मात्र मोक्षात्मक आहे, असें या मुंडकांतील श्रुतीचें सांगणें आहे. शिवाय मंत्रांतील प्रकरण अपरविद्येचें आहे, मोक्षविद्येचें नाहीं, अपरविद्येचें प्रकरण चालू असतां एकाएकीं (कारण न दाखवितां) मोक्ष-प्रसंगाचा विचार सर्वज्ञ श्रुति करील असें व्हावयाचें नाहीं.

पूर्वपक्षी—पण याच मंत्रांत विरज (निर्मळ) असें पद आहे, तें तुमच्या अर्थानें अप्रस्तुत व अप्रयोजक होतें.

सिद्धान्ती—नाहीं. येथें हें पद सापेक्ष आहे. अज्ञानी संसान्यापेक्षां योग्यमार्गानें चालणारा ज्ञानी कर्मठ जास्त निर्मळ असतो. इतकाच काय तो भाग येथें सांगावयाचा आहे. ध्यानांत ठेवा कीं अपरविद्येनें सिद्ध झालेलें कोणतेंही कार्य विशेष साधनांनीं भविष्यत्कालीं साधावयाचें असतें. सिद्ध-स्वरूपाचें नसतें. अपरविद्येच्या कर्मांत क्रिया, कर्ता, फल इत्यादि अनेक भेद स्पष्ट असतात म्हणजे द्वैत मूर्तिमंत असतें. अद्वैत नसतें. आणि जोंपर्यंत द्वैतभाव आहे तोंपर्यंत निरपेक्ष निर्मलता (स्वयंभु शुद्धि) प्राप्त होत नाहीं. असो; हिरण्यगर्भाच्या प्राप्तीनें फार तर कल्पपर्यंत अमरत्व आणि अविकारित्व प्राप्त होईल. याच्यापुढें जाण्याचें सामर्थ्य अपरविद्येला नाहीं. स्थावरादि संसारगति सांगतांना मनूनें म्हटलें आहे. "चतुर्मुख ब्रह्मा, मरीचिप्रभृतिप्रजापति, यमधर्म, सूत्रात्मा, त्रिगुणात्मिका प्रकृति (अव्यक्त) हा सर्व सात्विक वस्तूंचा उत्तम संग्रह आहे." असो; ज्ञान आणि कर्म यांचा समुच्चय करून जे लोक शास्त्रयुक्त कर्म करितात, त्यांना ही गति प्राप्त होते; असें सर्वज्ञ विद्वान् लोक सांगत असतात. ॥ ११ ॥

रंगरामानुज—'तप'= ब्रह्म. या मंत्रांतील ज्ञानी भिक्षु सूर्यमंडलाचा भेद करून सर्वदा एकरूपी असणाऱ्या (नित्य शरीरी असणाऱ्या) देवाधिदेवाच्या लोकाप्रत जातात.

माध्व०—आतांपर्यंत गृहस्थधर्म सांगितले. यापुढें या मंत्रांत शमदमादि यतिधर्म सांगितले आहेत. पुरुष हा पूर्ण षड्गुण आहे. तेथें जाऊन व त्याला नमस्कार करून वैकुंठामध्यें अमृतरूपी पुरुषोत्तम असतो, त्या लोकाप्रत निर्मळ मनाचे ज्ञानी लोक जातात.

मंत्र बारावा.

परीक्ष्य लोकान्कर्मचितान्ब्राह्मणो निर्वेदमाया-न्नास्त्यकृतः कृतेन । तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभि-गच्छेत्समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम् ॥ १२ ॥

अन्वय व अर्थ—**कर्मचितान् लोकान् परीक्ष्य ब्राह्मणः निर्वेदं आयात्** (कर्मानें उत्पन्न होणारे सर्व लोकांची—संसारमूलक स्थितींची—यथास्थित परीक्षा करून ब्राह्मणाला वैराग्य प्राप्त होतें.) **कृतेन अकृतः न अस्ति** (केलेल्या कर्मानें केव्हांही कर्मशून्य—नित्यसिद्ध—ब्रह्म सिद्ध होत नाहीं.)—म्हणून—**तद्विज्ञानार्थं सः समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठं गुरुं एव अभिगच्छेत्** (ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान—विज्ञान मिळविण्यासाठीं या ब्राह्मणानें हातांत समिधा घेऊन वेदवेत्त्या ब्रह्मनिष्ठ गुरूला शरण जावें.) ॥ १२ ॥

अथेदानीमस्मात्साध्यसाधनरूपात्सर्वस्मात्संसाराद्विरक्तस्य परस्यां विद्यायामधिकारप्रदर्शनार्थमिदमुच्यते—परीक्ष्य यदेतद्वेदाद्यपर-विद्याविषयं स्वाभाविक्यविद्याकामकर्मदोषवत्पुरुषानुष्ठेयमविद्यादि-दोषवन्तमेव पुरुषं प्रति विहितत्वात्तदनुष्ठानकार्यभूताश्च लोका ये दक्षिणोत्तरमार्गलक्षणाः फलभूता ये च विहिताकरणप्रतिषेधाति-क्रमदोषसाध्या नरकतिर्यक्प्रेतलक्षणास्तानेतान्परीक्ष्य प्रत्यक्षानुमा-नोपमानागमैः सर्वतो याथात्म्येनावधार्य लोकान्संसारगतिभूतान-व्यक्तादिस्थावरान्तान्व्याकृताव्याकृतलक्षणान्बीजाङ्कुरवदितरेतरोत्प-त्तिनिमित्तानानेकानर्थशतसहस्रसंकुलान्कदलीगर्भवदसारान्मायामरी-च्युदकगन्धर्वनगराकारस्वप्नजलबुद्बुदफेनसमान्प्रतिक्षणप्रध्वंसान्पृष्ठतः

कृत्वाऽविद्याकामदोषप्रवर्तितकर्मचितान्धर्माधर्मनिर्वर्तितानित्येतद्ब्राह्मणस्यैव विशेषतोऽधिकारः सर्वत्यागेन ब्रह्मविद्यायामिति ब्राह्मणग्रहणम्। परीक्ष्य लोकान्किं कुर्यादित्युच्यते—निर्वेदं निःपूर्वो विदिरत्र वैराग्यार्थे वैराग्यमायात्कुर्यादित्येतत्। स वैराग्यप्रकारः प्रदर्श्यते। इह संसारे नास्ति कश्चिदप्यकृतः पदार्थः। सर्व एव हि लोकाः कर्मचिताः कर्मकृतत्वाच्चानित्याः। न नित्यं किंचिदस्तीत्यभिप्रायः। सर्वं तु कर्मानित्यस्यैव साधनम्। यस्माच्चतुर्विधमेव हि सर्वं कर्म कार्यमुत्पाद्यमाप्यं संस्कार्यं विकार्यं वा नातःपरं कर्मणो विशेषोऽस्ति अहं च नित्येनामृतेनाभयेन कूटस्थेनाचलेन ध्रुवेणार्थेनार्थी न तद्विपरीतेन। अतः किं कृतेन कर्मणाऽऽयासबहुलेनानर्थसाधनेनेत्येवं निर्विण्णोऽभयं शिवमकृतं नित्यं पदं यत्तद्विज्ञानार्थं विशेषेणाभिगमार्थं स निर्विण्णो ब्राह्मणो गुरुमेवाऽऽचार्यं शमदमदयादिसंपन्नमभिगच्छेत्। शास्त्रज्ञोऽपि स्वातन्त्र्येण ब्रह्मज्ञानान्वेषणं न कुर्यादित्येतद्गुरुमेवेत्यवधारणफलम्। समित्पाणिः समिद्भारगृहीतहस्तः श्रोत्रियमध्ययनश्रुतार्थसंपन्नं ब्रह्मनिष्ठं हित्वा सर्वकर्माणि केवलेऽद्वये ब्रह्मणि निष्ठा यस्य सोऽयं ब्रह्मनिष्ठो जपनिष्ठस्तपोनिष्ठ इति यद्वत्। न हि कर्मिणो ब्रह्मनिष्ठता संभवति कर्मात्मज्ञानयोर्विरोधात्। स तं गुरुं विधिवदुपसदन्नः प्रसाद्य पृच्छेदक्षरं पुरुषं सत्यम्॥ १२॥

सिद्धान्ती—ह्या वर सांगितलेल्या म्हणजे अनेक साधनांनीं साध्य होणाऱ्या सर्व संसारापासून वैराग्यानें सर्वथा निवृत्त झालेल्या पुरुषाला मात्र परविद्येचा अधिगम करण्याचा अधिकार प्राप्त होतो. हें दाखविण्यासाठीं, या व पुढील मंत्रांचा श्रुतीनें अवतार केला आहे. मंत्राचा अर्थ असा आहे;—ऋग्वेदादि अपरविद्येचे जे जे विषय आहेत, ते सर्व या अखिल व्यवहारांत स्वतःसिद्ध किंवा स्वयंभु असणारी जी अविद्या तिनें प्रेरित केलेले कर्मानें कलुषित झालेल्या पुरुषानें मात्र साधावयाचे आहेत. अपरविद्येचे सर्व विषय अविद्याग्रस्त जीवाला मात्र विहित केलेले असतात. या विद्येनें सांगितलेलीं कर्में केलीं असतां, पितृयाण किंवा देवयानमार्गानें (दक्षिणोत्तरमार्गानीं) साध्य होणारे कालभंगुर लोक प्राप्त होतात. अविद्यावन्तकर्मांचें अविद्यावंत पुरुषास प्राप्त होणारें हें फल आहे.

शिष्य—तसेंच विहितकर्मांचें अनुष्ठान केलें नाहीं, निषिद्ध कर्मांचरण केलें, तर पापाची उत्पत्ति होऊन नरकलोक, पशुपक्ष्यांचा जन्म, भूतप्रेतादि योनींची प्राप्ति, इत्यादि फलें प्राप्त होतात. होय नाहीं?

सिद्धान्ती—होय. सारांश, अज्ञानानें विहितकर्म केलें तर पितृलोक, ज्ञानपूर्वक (श्रद्धेनें) विहितकर्म केलें तर सत्यलोकापर्यंतचे सर्व स्वर्गलोक मिळतात, तथापि येथील वास्तव्य देशनियमित व कालनियमित असतें. तसेंच कर्तव्य केलें नाहीं, अकर्तव्य केलें, तर नरकलोकाची प्राप्ति होते, असा कर्म-परिपाकाचा वृत्तांत आहे. असो; प्रत्यक्ष, अनुमान, उपमान आणि शाब्द (श्रुति) या प्रमाणांनीं पूर्वोक्त कर्मांचें व कर्मफलाचें स्वरूप त्यानें सर्व दृष्टीनीं यथार्थ समजून घेतलेलें असतें. तसेंच जन्ममरणात्मक संसारगति उत्पन्न करणारे अव्यक्तापासून तों स्थावरापर्यंतचे सर्व लोक (हिरण्यगर्भापासून तों जडपदार्थापर्यंतची व्यवहारसंतति) व्याकृत आणि अव्याकृत लक्षणांनीं युक्त असतात.

शिष्य—म्हणजे? अव्याकृत जें बीज (मूलप्रकृति) त्यापासून व्याकृतास्थिति म्हणजे अंकुराची, नामरूपाची, स्थिति प्राप्त होते. तें हें व्याकृत म्हणजे सर्व व्यावहारिक पदार्थ आहेत. असेंच ना?

सिद्धान्ती—इतकेंच नव्हे, तर बीजापासून अंकुर आणि अंकुरापासून सिद्ध झालेल्या वृक्षाचें बीज या न्यायानें अव्याकृतापासून व्याकृत होणें आणि व्याकृतापासून अव्याकृतांत परत जाणें अशा लक्षणाचें हें संसारचक्र आहे. एकाच जीवाची गोष्ट घ्या. स्वकर्माच्या योगानें अदृष्ट म्हणजे अव्याकृत अपूर्व उत्पन्न होतें. या अदृष्टापासून पुनः कर्म होतें आणि असें हें रहाटगाडगें अज्ञानस्थितींत अनाद्यनंतकालपर्यंत चालू राहतें. असो; हें संसारचक्र हजारों, लाखों, संकटांनीं युक्त झालेलें आहे. केळीचा गाभा जसा पोकळ (निःसत्त्व) असतो, त्याप्रमाणें हा व्यवहार आणि व्यवहारांतील सर्व भुवनें परमार्थतः असार, तात्पर्यशून्य, पोकळ, असतात. यांचें वास्तव्य मृगजलवत् आहे. जल नसून जल भासणें, गंधर्वनगरी नसून ती आहे असें दिसणें, स्वप्न दिसून तें खोटें असणें, पाण्यावरील बुडबुडे किंवा फेंस क्षणभंगुर असणें, याप्रमाणें प्रतिक्षणीं उत्पन्न होऊन नाहींशी होणारी व परमार्थतः मुळींच नसणारी ही मायारूपी संसारस्थिति आहे. असो; असा या संसारस्थितीचा अनुभव चारी प्रमाणांनीं येऊन ती सर्वथा दुःखद आहे, असा दृढविवेकानें निश्चय झाल्यावर वैराग्य प्राप्त होतें. अविद्याजन्यवासनेच्या दोषानें प्रेरित झाल्यामुळें पापपुण्यात्मक कर्मानें उत्पन्न झालेलीं सर्व भुवनें, सर्व व्यवहारस्थिति, पाठीमागें टाकण्याचा—तात्पर्य व्यवहार—त्याग करून व इंद्रियदमन करून मोक्षेच्छा धारण करण्याचा—विशेष अधिकार ब्राह्मणाला मात्र आहे. सर्वत्याग केल्याशिवाय ब्रह्मविद्या प्राप्त होत नाहीं व ब्रह्म समजत नाहीं. ब्रह्मविद्या समजून घेतो तोच ब्राह्मण होय. असो; एक ज्ञानी ब्राह्मण मात्र सर्व व्यवहाराचा त्याग करण्यास समर्थ असतो. असो; याप्रमाणें दुःखदायक व्यवहारस्थितीची दुःखमूलक आणि दुःखपर्यवसायी स्थिति प्रमाणतः पाहून ब्रह्मजिज्ञासु ब्राह्मण तिचा त्याग करितो. तो वैराग्यसंपन्न होतो. या संसारामध्यें कोणताही पदार्थ अकृत नाहीं, नित्यसिद्ध नाहीं, सर्व पदार्थ आणि सर्व व्यावहारिक स्थितिही कर्मानें उत्पन्न होऊन कर्मानें पुष्ट झाली आहेत आणि

म्हणून तीं अनित्य आहेत, नित्य असें येथें व्यवहारांत कांहीं नाहीं, सर्व प्रकारचें कर्म हें अनित्य वस्तूंच्या उत्पत्तीचें साधन आहे; असें ज्ञान झाल्यामुळें सर्व अनित्य वस्तूंविषयीं त्याला वैराग्य प्राप्त होतें.

शिष्य—भगवन् ! कर्म हें चार प्रकारचें आहे नव्हे ? कोणतीही कृतवस्तु उत्पन्न होते; प्राप्त होते, तिच्यावर आपण संस्कार करितों, किंवा विकार तरी उत्पन्न करितो. बसण्याचा पाट सुतार नवीन तयार करितो, बाजारांत जाऊन भाजी आणावी लागते, घरीं आणून तिच्यांतील दोष पाण्यानें किंवा निवडण्यानें काढून टाकावे लागतात आणि मीठ, मिरची, मसाला वगैरे घालून तयार केलेली भाजी आपण पानावर वाढतों. याप्रमाणें उत्पन्न करणें, प्राप्त करून घेणें, संस्कार करणें, विकार काढून टाकणें, असे कर्माचें चार प्रकार आहेत. कोणतेंही व्यावहारिक किंवा धार्मिक कर्म असो, स्वयंपाकाचें असो, किंवा यज्ञात्मक असो, या चार प्रकारांपैकीं कोणत्यातरी प्रकारचें तें कर्म असावयाचें. याशिवाय कर्माचें दुसरें स्वरूप नाहीं. असें ज्ञान होऊन हा ज्ञानी ब्राह्मण नित्य स्वरूपास अनुपयोगी असणाऱ्या व अनित्य फल देणाऱ्या कर्मापासून निवृत्त होतो. होयना ?

सिद्धान्ती—बरोबर. त्याचवेळीं या ज्ञानी पुरुषाला 'मी नित्य आहें, म्हणून मला नित्य, अमृत, अभय, अविकारी, निश्चल, स्थिर, मात्र वस्तु समजून घ्यावयाची आहें, 'मला नित्य आणि अविकारी वस्तु हवी आहे, अनित्य व विकारी वस्तु नको,' असा विवेक होतो. म्हणून 'आयासात्मक' किंवा अनर्थपूर्ण कर्मसाधनें मला काय करावयाचीं आहेत, हीं साधनें मला नित्य वस्तु देणार नाहींत, असें समजल्यावर त्याला कर्माचा वीट येतो. नंतर अभय, मंगल, स्वयंभु जें स्वतंत्र नित्य ब्रह्मपद आहे, त्याचें स्वरूपज्ञान स्पष्ट व विस्तरतः करून घेण्यासाठीं हा विरक्त ब्राह्मण शम-दम-दयादि सात्त्विक गुण असणाऱ्या आचार्याकडे जाण्यास सिद्ध होतो. सद्गुरूला शरण जाणें हें मुमुक्षूचें अवश्य कर्तव्य आहे. केवढाही शास्त्रज्ञ असो, त्यानें स्वतः केव्हांही ब्रह्मज्ञानाचें अन्वेषण (शोध) करूं नये. कारण वाट चुकण्याचा अतिशय संभव असतो. यासाठीं सद्गुरूला शरण गेलेंच पाहिजे. असें 'एव' पद घालून श्रुति आग्रहानें सांगत आहे. गुरु, श्रोत्रिय असावा. म्हणजे अधीत जो वेद त्याचा अर्थ ज्याला पूर्ण समजलेला आहे, असा गुरु असावा. तसेंच तो ब्रह्मनिष्ठही असावा. सर्व कर्मांचा त्याग करून केवल आणि अद्वय असें जें ब्रह्म त्याच्या ठिकाणीं ज्याची पूर्ण निष्ठा आहे, ब्रह्मव्यतिरिक्त कांहीं नाहीं, असा ज्याचा निश्चय आहे, तो ब्रह्मनिष्ठ होय.—

शिष्य—जपनिष्ठ, तपोनिष्ठ, कर्मनिष्ठ याचा जसा अर्थ तसाच 'ब्रह्मनिष्ठ' या पदाचा अर्थ आहे.—

सिद्धान्ती—पण हें ध्यानांत ठेव कीं, हेतुपूर्वक कर्म करणाऱ्या लोकांस केव्हांही ब्रह्मनिष्ठा साधन नाहीं व साधावयाचीही नाहीं. क. [illegible] णि आत्मज्ञान, उत्पन्न

होणारी वस्तु व तिचें साधन अनित्य कर्म, आणि नित्य असणारा आत्मा व त्याचें नित्य स्वरूपज्ञान यांमध्यें अत्यंत विरोध आहे. असो, तेव्हां ब्रह्मैकनिष्ठ, शमादिसंपन्न व श्रोत्रिय गुरूला वरील मुमुक्षुब्राह्मणानें विधिपूर्वक शरण जावें. जातांना हातांत समिधा असाव्या.

शिष्य—म्हणजे विनयपूर्वक शरण जावें असा अर्थ ?

सिद्धान्ती—होय. शमादिकांचें साधन झालें आहे असें समिधाग्रहणानें समजतें. शरण जाऊन गुरूला प्रसन्न करावें आणि श्रद्धापूर्ण विनयपूर्वक अक्षर जो परमात्मा त्याविषयीं प्रश्न करावा. ॥ १२ ॥

रंगरामानुज—' ब्राह्मण '= वेदवेदांगज्ञाता. ' कृतेन '=कर्मद्वारा. गुरु श्रुतिसंपन्न असून ब्रह्मसाक्षात्कारी असणें अवश्य आहे. शिष्य श्रवणाला अधिकारी असला पाहिजे. नुसत्या उपासनेला उपयोगी पडणाऱ्या इंद्रियजयाचा येथें उपयोग नाहीं. (मंत्र १३) ' अक्षरं '=स्वरूपतः अविकारी, ' सत्यं '=गुणतः अविकारी. ' अक्षर ' हें विशेषण जडाची व ' सत्य ' हें विशेषण जीवांची व्यावृत्ति करून तीं ब्रह्मवस्तूचा निर्देश सिद्ध करितात. हा मंत्र लक्ष्यांत घेऊन ब्रह्मसूत्राच्या पहिल्या सूत्राचा विचार करावा. सारांश, वेदविहितकर्माच्या आवृत्तीनेंही नित्यफलप्राप्ति होत नाहीं, हें श्रौतस्मार्त-कर्मीच्या अनुभवानें पाहून मग वेदवेत्या मुमुक्षूनें ब्रह्मविचाराला आरंभ करावा.

माध्व०—' लोकान्=विष्णुलोकेतरलोक. परीक्ष्य '=इतर लोकांचें असारत्व व अनित्यत्व मनांत आणून. ' अकृत '=नित्यपुरुषार्थ. मोक्ष हा कर्मानें मिळत नाहीं, ज्ञानानें मिळतो. ' ब्रह्मनिष्ठ '=विष्णुभक्त्यादिगुणसंपन्न.

मंत्र तेरावा.

तस्मै स विद्वानुपसन्नाय सम्यक्प्रशान्तचित्ताय शमान्विताय । येनाक्षरं पुरुषं वेद सत्यं प्रोवाच तां तत्त्वतो ब्रह्मविद्याम् ॥ १३ ॥

इत्यथर्ववेदीयमुण्डकोपनिषदि प्रथममुण्डके द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

॥ इत्यथर्ववेदीय मुण्डकोपनिषदि प्रथममुण्डकं समाप्तम् ॥ १ ॥

अन्वय व अर्थ—**सम्यक्प्रशान्तचित्ताय, शमान्विताय, उपसन्नाय तस्मै** (उत्तम प्रकारानें उपशम केला आहे आपल्या चित्ताचा ज्यानें, शमाच्या योगें त्याला दास केलें आहे ज्यानें, अशा अंतर्बाह्य इंद्रियांचें नियमन करून शरण आलेल्या त्या शिष्याला) **येन अक्षरं पुरुषं सत्यं वेद तां ब्रह्मविद्यां तत्त्वतः सः विद्वान् प्रोवाच** (जिच्या

योगानें सत्यस्वरूपी व अविनाशी अशा पुरुषाचें ज्ञान निश्चयानें होतें, ती ब्रह्मविद्या तत्त्वपूर्वक विस्तृतः सांगावी.) ॥ १३ ॥

तस्मै स विद्वान्गुरुर्ब्रह्मविद्युपसन्नायोपसत्तवे । सम्यग्यथाशास्त्रमित्येतत् । प्रशान्तचित्तायोपरतदर्पादिदोषाय । शमान्विताय बाह्येन्द्रियोपरमेण च युक्ताय सर्वतो विरक्तायेत्येतत् । येन विज्ञानेन यया विद्यया परयाऽक्षरमद्रेश्यादिविशेषणं तदेवाक्षरं पुरुषशब्दवाच्यं पूर्णत्वात्पुरि शयनाच्च सत्यं तदेव परमार्थस्वाभाव्यादक्षरं चाक्षरणादक्षतत्वादक्षय्यत्वाच्च ब्रह्म वेद विजानाति तां ब्रह्मविद्यां तत्त्वतो यथावत्प्रोवाच प्रब्रूयादित्यर्थः । आचार्यस्याप्ययं नियमो यन्न्यायप्राप्तसच्छिष्यनिस्तारणमाविद्यामहोदधेः ॥ १३ ॥

इत्यथर्ववेदीयमुण्डकोपनिषद्भाष्ये प्रथममुण्डके द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

इति मुण्डकोपनिषद्भाष्ये प्रथममुण्डकं समाप्तम् ॥ १ ॥

सिद्धान्ती—शरण आलेल्या शिष्याला गुरूजीनें ब्रह्मविद्येचा उपदेश करावा. ज्यानें अंतःकरणाचें यथाशास्त्र प्रशमन करून अभिमानादि दोषांचा नाश केला आहे व बाह्येन्द्रियांचा उपरम करून जो सर्वथा वैराग्यसंपन्न झाला आहे, तो उपदेशाला खरा अधिकारी आहे. असा अधिकारी शिष्य शरण आल्यानंतर त्याला गुरूनें ब्रह्मविद्येचा उपदेश करावा.

शिष्य—भगवन्! ज्या श्रेष्ठविद्येच्या द्वारानें सहाव्या मंत्रांत सांगितलेल्या निर्गुणसंपन्न, अविनाशी, पुरुषनामक सत्यस्वरूपी परमात्म्याचें ज्ञान होतें, ती विद्या ब्रह्मविद्या होय. सर्व विश्वाला पूर्णत्व देणारें, परमसत्य, अविनाशी, अविकारी आणि अनंत असें अक्षरगर्भ, परमात्म्याचें, स्वरूप आहे. तें ज्या विद्येनें समजतें, ती खरी परविद्या होय. 'पुरुष'=पूर्ण स्वरूपी किंवा शरीरांत अंतर्यामी स्वरूपानें राहणारा. ब्रह्म हें परमार्थतः सत्य आहे. या ब्रह्मज्ञानाचें स्वरूपज्ञान शिष्यास करून द्यावें. होय ना?

सिद्धान्ती—ठीक आहे. या विद्येचा यथार्थ उपदेश आचार्यानें शरण आलेल्या शिष्यास करावा. नेहमीं शास्त्राचा असा नियम आहे कीं, आचार्याकडे कोणीही अधिकारी शिष्य विधिपूर्वक शरण आला, तर त्याच्या अज्ञानसागराचें निस्तरण होईल, तो अज्ञानसागर तरून जाईल, अशी विद्या आचार्यानें शिकवावी. योग्य शिष्याला 'नाहीं' असें उत्तर केव्हांही देतां उपयोगी नाहीं. ॥ १३ ॥

माधव०—'येन'=ज्या विद्येनें, 'अक्षर'=नाशरहित. 'पुरुष'=पूर्ण षड्गुण. 'सत्य'=भगवान् विष्णु. 'तत्त्वतः'=वेदविद्येनें. बारा व तेरा या दोन मंत्रांनां विवेकजन्यवैराग्य, शम-दमादि संपत्ति आणि मुमुक्षा हीं श्रवणरूप-विचाराचीं अंगें आहेत, असें सुचविलें.

द्वितीय खंड समाप्त.

प्रथम मुण्डक समाप्त.

द्वितीय–मुंडक ।

खंड पहिला.

मंत्र पहिला.

तदेतत्सत्यं यथा सुदीप्तात्पावकाद्विस्फुलिङ्गाः सहस्रशः प्रभवन्ते सरूपाः । तथाऽक्षराद्विविधाः सोम्य भावाः प्रजायन्ते तत्र चैवापि यन्ति ॥ १ ॥

अन्वय व अर्थ—**तत् एतत् सत्य** (तेंच हें विद्याविषयक सत्य आहे. ही विद्या वस्तूचा व सृष्टीच्या क्रमाचा यथार्थ उपदेश करणारी आहे.) **सुदीप्तात्, पावकात् यथा सहस्रशः सरूपाः विस्फुलिंगाः प्रभवन्ते** (उत्तम रीतीनें प्रज्वलित झालेल्या वह्नीपासून ज्याप्रमाणें हजारो सरूप–प्रज्वलित–विस्फुलिंग–ठिणग्या–उत्पन्न होतात.) **तथा सोम्य, विविधाः भावाः अक्षरात् प्रजायन्ते, तत्र एव अपि च यन्ति** (त्या प्रमाणें अनेक प्रकारचे भाव, परिच्छिन्नजीव, हे सौम्या ! अविनाशीब्रह्मापासून उत्पन्न होतात आणि शेवटीं तेथें मात्र लयाला जातात.) ॥ १ ॥

अपरविद्यायाः सर्वं कार्यमुक्तम् । स च संसारो यत्सारो यस्मान्मूलादक्षरात्संभवति यस्मिंश्च प्रलीयते तदक्षरं पुरुषाख्यं सत्यम् । यस्मिन्विज्ञाते सर्वमिदं विज्ञातं भवति तत्परस्या ब्रह्मविद्याया विषयः स वक्तव्य इत्युत्तरो ग्रन्थ आरभ्यते । यदपरविद्याविषयं कर्मफललक्षणं सत्यं तदापेक्षिकम् । इदं तु परविद्याविषयं परमार्थसल्लक्षणत्वात् । तदेतत्सत्यं यथाभूतं विद्याविषयम् । अविद्याविषयत्वाच्चानृतमितरत् । अत्यन्तपरोक्षत्वात्कथं नाम प्रत्यक्षवत्सत्यमक्षरं प्रतिपद्येरन्निति दृष्टान्तमाह–यथा सुदीप्तात्सुष्ठु दीप्तादिद्धात्पावकादग्नेर्विस्फुलिङ्गा अग्न्यवयवाः सहस्रशोऽनेकशः प्रभवन्ते निर्गच्छन्ति सरूपा अग्निसलक्षणा एव तथोक्तलक्षणादक्षराद्विविधा नानादेहोपाधिभेदमनुविधीयमानत्वाद्विविधा हे सोम्य भावा जीवा आकाशादिवद्घटादिपरिच्छिन्नाः सुषिरभेदा घटाद्युपाधिप्रभेदमनुभवन्ति । एवं

नानानामरूपकृतदेहोपाधिप्रभवमनुप्रजायन्ते तत्र चैव तास्मिन्नेवाक्षरेऽपि यन्ति देहोपाधिविलयमनुलीयन्ते घटादिविलयमन्विव सुषिरभेदाः । यथाऽऽकाशस्य सुषिरभेदोत्पत्तिप्रलयनिमित्तत्वं घटाद्युपाधिकृतमेव तद्वदक्षरस्यापि नामरूपकृतदेहोपाधिनिमित्तमेव जीवोत्पत्तिप्रलयनिमित्तत्वम् ॥ १ ॥

सिद्धान्ती–मागील मंत्रांत अपरविद्येचें सर्व कार्य सांगितलें. आतां, ज्यामुळें संसाराला सारत्व प्राप्त होतें, ज्या अविनाशी मूल परब्रह्मपासून संसार उत्पन्न होतो आणि जेथें लयाला जातो तो अविनाशी पुरुषनामक आत्मा सत्य आहे हें सांगावयाचें आहे. दोन विद्या जाणून घ्यावयाच्या आहेत, असें पहिल्या मुण्डकाच्या पहिल्या खंडांतील चौथ्या मंत्रांत सांगितलें, त्यापैकीं अपरविद्येचें विस्तृत वर्णन केलें. आतां यापुढें अक्षर नामक जें परमतत्त्व त्याचा या दुसऱ्या मुण्डकांत विचार करावयाचा आहे. ही परविद्या अशी आहे कीं, इचा विषय ब्रह्म हा आहे. ज्या ब्रह्माचें ज्ञान झालें असतां सर्व ज्ञेय विषयाचें ज्ञान होसें असें हें सत्यस्वरूपी ब्रह्म पराविद्येचा विषय आहे. त्याचें प्रवचन यापुढें करावयाचें आहे.

शिष्य—भगवन्! आतांपर्यंत आपण अपराविद्येचें वर्णन केलें, ही विद्या कर्मप्रकार सांगून कर्मांचें फलही सांगणारी आहे. कर्म आणि त्यांचें फल हीं श्रुतीनेंच सांगितलीं, म्हणून तीं सत्यस्वरूपच असलीं पाहिजेत.

सिद्धान्ती—हें सत्य आपेक्षिक आहे, परतंत्र आहे; परमार्थ सत्य हे नव्हे; पण परविद्येचा विषय जो परमात्मा तो परमार्थतः सत्यस्वरूपी आहे. त्याचें लक्षण सत्यस्वरूप आहे. जशी वस्तु असेल तसें तिचें वर्णन करणें हें परविद्येचें कार्य आहे. अपरविद्येचें कार्य तसें नसतें. कारण तिचा विषय अज्ञानात्मक असतो, म्हणून तो परमार्थतः असत्य असतो.

पूर्वपक्षी—तुमचा भावाथ असा कीं, संसारांतील सर्व सत्यें आपेक्षिक, परावलंबी आणि सोपाधिक असतात; पण परविद्येचे सिद्धांत निरपेक्ष सत्य असतात. त्यांचें सत्य स्वयंभु असतें. होयना ? पण आम्हांस असें सांगा कीं, परविद्येचें स्वयंभु सत्य शास्त्रैकगम्य असल्यामुळें केव्हांही प्रत्यक्ष व्हावयाचें नाहीं. यज्ञ केला असतां कांहीं एक अपूर्व उत्पन्न होतें, असें शास्त्राचें सांगणें आहे. हें अपूर्व नेहमीं अप्रत्यक्ष असावयाचें. त्याचप्रमाणें शास्त्रानें मात्र समजला जाणारा परमात्मा अप्रत्यक्ष असावयाचा आणि तुम्ही तर येथें प्रत्यक्षास उपयोगी पडणारी "हें, तें" सर्वनामें उपयोजित आहांत. पण अगोचर असणारें सत्य प्रत्यक्ष होणें शक्य नाहीं व त्याचा साक्षात्कार शिष्यांस होणें शक्यहीं नाहीं. सारांश अप्रत्यक्ष ब्रह्म समजावयाचें नाहीं व सांगतां यावयाचें नाहीं.

सिद्धान्ती—तुमची ही शंका नाहींशी व्हावी म्हणून श्रुतीनें पूर्वीच एक दृष्टांत दिला आहे. ऐका–अत्यंत प्रज्वलित झालेल्या अग्नीपासून हजारों विस्फुलिंग (अग्नीचे अवयव, ठिणग्या) अग्निस्वरूप घेऊन सर्वत्र दृष्टीस पडतात; त्याप्रमाणें पूर्वी सांगितलेल्या लक्षणानें युक्त असणाऱ्या अक्षरब्रह्मापासून हजारों प्रकारचे जीव उत्पन्न होतात. हे जीव अनंत प्रकारच्या देहादि उपाधींनीं युक्त असल्यामुळें प्रत्येक जीवाचें शरीर भिन्न भिन्न असतें व म्हणून ते अनंत होतात. परंतु त्यांचें मूलस्वरूप मात्र एक अविनाशी असतें. हे सौम्या ! आकाशवंत घट, मठ, इत्यादिकांनीं मर्यादित झालेले आकाशाचे भेद घट-मठादि उपाधि अनुसार स्वरूप धारण करितातसे दिसतात. त्याप्रमाणें—

शिष्य—भगवन् ! हें आकाशाचें उदाहरण मला नीट समजलें नाहीं ?

सिद्धान्ती—आकाश नामक द्रव्य घट–मठादि सर्व पदार्थांस अंतर्बाह्य व्यापून असतें, हें तुला ठाऊक आहे. आतां घटांत असणारें आकाश मठांत असणाऱ्या आकाशाहून निराळ्या आकाराचें असतें, हेंही तूं पाहिलें आहेस. मूळचें अवयवशून्य आकाश घट–मठादि उपाधींनीं निरानिराळे सुषिरभेद म्हणजे परिच्छिन्न आकार धारण करितें आणि आपण त्या आकारांस घटाकाश, मठाकाश इत्यादि नांवें उपाधींच्या अनुसारानें देतों. तात्पर्य अमर्याद आकाश उपाधींनीं परिच्छिन्न होतें व निरानिराळे आकार धारण करितें. याप्रमाणें अनंत नामरूपांनीं उत्पन्न केलेल्या देहोपाधींसह अनंत जीव परब्रह्मापासून उत्पन्न होतात व देहोपाधींचा नाश झाला म्हणजे त्याच परब्रह्मामध्यें लय पावतात असें दिसतें. घट–मठादि उपाधि फोडून तोडून नाहींशा झाल्या म्हणजे मर्यादित भिन्न भिन्न आकाशभेद नाहींसें होऊन सर्व आकाशें एकरूपी आकाशांत लीन होतात. तसेंच, नामरूपशून्य परब्रह्माला नामरूपादि उपाधींनीं अनंत आकार प्राप्त होतात, उपाधि आहेत तोंपर्यंत ते आकार कायम असतात आणि उपाधींचा नाश झाला म्हणजे सर्व भेद–प्रभेद विनष्ट होऊन एकस्वरूपी ब्रह्म कायम राहतें. समजलें ? घट–मठादि उपाधींच्या उत्पत्ति–विनाशांवर आकाशाचे भेद उत्पन्न होणें व नष्ट होणें अवलंबून असतें, त्याप्रमाणें नामरूपांनीं उत्पन्न केलेल्या देहोपाधींच्या उत्पत्तीनें अक्षरपरब्रह्मापासून जीव उत्पन्न होतात आणि उपाधी नष्ट झाल्या म्हणजे हे भिन्न जीव परब्रह्मांत लीन होऊन एकरूप होतात. सारांश, अक्षरपरब्रह्म, एक आणि एकरूप आहे. त्यावर अनेकत्वाचा आभास होतो, तो उपाधींनीं उत्पन्न होतो आणि उपाधी नष्ट झाल्या म्हणजे हे आरोप विनाश पावतात. सारांश, उपाधिसत्य सापेक्ष आहे आणि परब्रह्मसत्य निरपेक्ष आहे. ॥ १ ॥

रंगरामानुज—' अक्षर ' = सूक्ष्म असें चिद्‌चिदात्मक शरीर आहे ज्याचें तें ब्रह्म. यापासून स्थूल चित् व स्थूल अचित् उत्पन्न होतात.

माध्व०—' सरूप ' = समानरूपी. पूर्वकल्पीं जसे पदार्थ होते, तसेच पदार्थ उत्तरकल्पांतही होतात. ही येथें सृष्टीची उत्पत्ति पुनः सांगितली ती अंगिरसानें शौनकाला सांगितली असें नव्हे, तर विधिपूर्वक शरण आलेल्या कोणाही शिष्यास श्रीगुरु ब्रह्म हें जगताचें कारण आहे, असें सांगत असतात, असें समजावें.

मंत्र दुसरा.

दिव्यो ह्यमूर्तः पुरुषः सबाह्याभ्यन्तरो ह्यजः।
अप्राणो ह्यमनाः शुभ्रो ह्यक्षरात्परतः परः ॥ २ ॥

अन्वय व अर्थ—दिव्यः, अमूर्तः, पुरुषः, सबाह्याभ्यंतरः, हि अजः, अप्राणः, हि अमनाः, शुभ्रः, हि अक्षरात् परतः परः (हा पुरुष—परमात्मास्वयंप्रकाश, निराकार, अंतर्बाह्यव्यापी, अजन्मा, प्राणशून्य, मनःशून्य, आणि शुभ्र म्हणजे उपाधिशून्य असून अक्षराच्या फार पलीकडे असणारा आहे.) ॥ २ ॥

नामरूपबीजभूतादव्याकृताख्यात्स्वविकारापेक्षया परादक्षरात्परं यत्सर्वोपाधिभेदवर्जितमक्षरस्यैव स्वरूपमाकाशस्येव सर्वमूर्तिवर्जितं नेति नेतीत्यादिविशेषणं विवक्षन्नाह । दिव्यो द्योतनवान्स्वयंज्योतिष्ट्वात् । दिवि वा स्वात्मनि भवोऽलौकिको वा । हि यस्मादमूर्तः सर्वमूर्तिवर्जितः पुरुषः पूर्णः पुरि शयो वा । दिव्यो ह्यमूर्तः पुरुषः सबाह्याभ्यन्तरः सह बाह्याभ्यन्तरेण वर्तत इति । अजो न जायते कुतश्चित्स्वतोऽन्यस्य जन्मनिमित्तस्य चाभावात् । यथा जलबुद्बुदादेर्वाय्वादि । यथा नभःसुषिरभेदानां घटादिसर्वभावविकाराणां जनिमूलत्वात्तत्प्रतिषेधेन सर्वे प्रतिषिद्धा भवन्ति । सबाह्याभ्यन्तरो ह्यजोऽतोऽजरोऽमृतोऽक्षरो ध्रुवोऽभय इत्यर्थः । यद्यपि देहाद्युपाधिभेददृष्टीनामविद्यावशाद्देहभेदेषु सप्राणः समनाः सेन्द्रियः सविषय इव प्रत्यवभासते तलमलादिमदिवाऽऽकाशं तथाऽपि तु स्वतः परमार्थदृष्टीनामप्राणोऽविद्यमानः क्रियाशक्तिभेदवांश्चलनात्मको वायुर्यस्मिन्नसावप्राणः । तथाऽमना अनेकज्ञानशक्तिभेदवत्संकल्पाद्यात्मकं मनोऽप्यविद्यमानं यस्मिन्सोऽयममना अप्राणो ह्यमनाश्चेति । प्राणादिवायुभेदाः कर्मेन्द्रियाणि तद्विषयाश्च तथा च बुद्धिमनसी बुद्धीन्द्रियाणि तद्विषयाश्च प्रतिषिद्धा वेदितव्याः । तथा श्रुत्यन्तरे—ध्यायतीव लेलायतीवेति । यस्माच्चैवं प्रतिषिद्धोपाधिद्वयस्तस्माच्छुभ्रः शुद्धः । अतोऽक्षरान्नामरूपबीजोपाधिलक्षितस्वरूपात्सर्वकार्यकारणबीजत्वेनोपलक्ष्यमाणत्वात्परं तदुपाधिलक्षणमव्याकृताख्यमक्षरं सर्वविकारेभ्यस्तस्मात्परतोऽक्षरात्परो निरुपाधिकः पुरुष इत्यर्थः ।

यस्मिंस्तदाकाशाख्यमक्षरं सव्यवहारविषयमोतं प्रोतं च। कथं पुनरप्राणादिमत्त्वं तस्येत्युच्यते। यदि हि प्राणादयः प्रागुत्पत्तेः पुरुष इव स्वेनाऽऽत्मना सन्ति तदा पुरुषस्य प्राणादिना विद्यमानेन प्राणादिमत्त्वं भवेन्न तु ते प्राणादयः प्रागुत्पत्तेः पुरुष इव स्वेनाऽऽत्मना सन्ति तदा। अतोऽप्राणादिमान्परः पुरुषः। यथाऽनुत्पन्ने पुत्रेऽपुत्रो देवदत्तः ॥ २ ॥

सिद्धान्ती—जीवाची उत्पत्ति आणि त्याचा लय हीं सर्व उपाधिनिमित्त आहेत आणि ही कारणोपाधि अक्षर जो अविनाशी त्याला आहे असें केवळ एकत्व समजण्या साठीं पूर्वमंत्रांत सांगितलें. वास्तविक पाहतां परब्रह्माच्या ठिकाणीं उत्पत्तिप्रलयांचें अस्तित्वच नाहीं, असें सांगण्यासाठीं या मंत्राची योजना आहे. मागच्या मंत्रांत नामरूपादिकांचें मूलकारण असणारें जें अव्याकृत (अक्षर, अव्यक्त, प्रधान) तें नामरूपांच्या तारतम्यानें नामरूपाच्या पलीकडे आहे. हें अव्याकृतही अविकारी नाहीं. कारण, यापासूनच नामरूपें उत्पन्न होतात व लय पावतात. त्या व्याकृत होणाऱ्या अव्याकृताच्याही अत्यंत पलीकडे असल्यामुळें सर्व भिन्न उपाधी व तज्जन्य अनंत भेद हीं ज्याच्या ठिकाणीं केव्हांही असत नाहींत, त्या अविनाशी परब्रह्माचें स्वरूप आकाशाप्रमाणें अमूर्त, निराकार, आहे.

शिष्य—मग याचें वर्णन तरी कसें करणार ?

सिद्धान्ती—"तें असें नाहीं" 'तें तसें नाहीं,' 'तें हें नाहीं' तें तें नाही,' या रीतीनें परब्रह्माचें वर्णन करावयाचें, असा भाव लक्षांत आणून श्रुति म्हणतेः—हा परमात्मा दिव्य म्हणजे स्वयंप्रभ अथवा स्वयंप्रकाश आहे.

शिष्य—स्वर्गांत अथवा स्वरूपाचे ठिकाणीं उत्पन्न झालेला जो प्रकाश तो दिव्य होय.

सिद्धान्ती—तो ब्रह्मप्रकाश आहे. पण अलौकिक प्रकाशाला मात्र दिव्य प्रकाश म्हणतात. सारांश परमात्मा हा स्वरूपतः प्रकाशमय आहे. तसेंच तो सर्वाकारशून्य आहे. तो पूर्ण असून सर्व शरीरांच्या ठिकाणीं वास्तव्य करितो. हा स्वयंप्रकाश व आकारशून्य पुरुष सर्वांचें अंतर्बाह्य स्वरूप व्यापून असतो. हा अजन्मा आहे. म्हणजे हा स्वतःपासून किंवा दुसऱ्या कोणापासून उत्पन्न आलेला नाहीं.

शिष्य—खरेंच आहे. सर्वांस जन्म देणाऱ्या व सर्वांचें जन्मनिमित्त असणाऱ्या परमात्म्याला जन्म देणें कोणालाही संभवनीय नाहीं, कारण दुसरी वस्तुच नाहीं.

सिद्धान्ती—याला जन्म असणें हेंही संभवनीय नाहीं. पाण्यावरील बुडबुड्यांचा जन्म वायूपासून होतो. वायु बुडबुड्यांपूर्वी असतो. येथें अशी कोणतीही वस्तु नाहीं की, जी परब्रह्माच्या पूर्वी असेल व त्याला जन्म देऊं शकेल. आकाशाला घटाकाश,

मठाकाश इत्यादि भेद घट–मठादि उपाधींच्या योगानें उत्पन्न होतात. तशा उपाधिपर-ब्रह्माचे ठिकाणीं असणें शक्य नाहीं. त्याला जन्मच नाहीं म्हणून उत्पन्न होणें, असणें, वाढणें, विकार प्राप्त होणें, क्षय पावणें, नष्ट होणें, इत्यादि कोणताही विकार पर-ब्रह्माला होऊं शकत नाहीं. जन्माचा निषेध केला कीं, बाकीच्या सर्व जन्म–विकारांचा निषेध केला असेंच होतें. सारांश, तें विकारशून्य आहे. याप्रमाणें "अंतर्बाह्यव्यापी असणारा म्हणून अजन्मा आणि अजन्मा म्हणून जरामरणशून्य असणारा परमात्मा अमृत (अनंत), अव्यय (अक्षर), नित्य–कूटस्थ आणि भयशून्य आहे." असा तात्पर्यार्थ झाला.

पूर्वपक्षी—तथापि हा परमात्मा जीवांचा आत्मा असतो आणि जीव प्राणवंत असतात. म्हणून परमात्म्यालाही प्राणापानादिकांच्या उपाधी असणें योग्य आहे.

सिद्धान्ती—नाहीं. यद्यपि देहादि उपाधींमुळें तुम्हाआम्हासारख्या भेददृष्टींना परमात्मा हा देहवासी आहे म्हणून प्राणयुक्त, मनोयुक्त, इंद्रिययुक्त आणि विषयी आहे असा अज्ञानानें भास होतो, तथापि ज्यांना परमार्थदृष्टि प्राप्त झाली आहे, ज्यांना आत्मसाक्षात्कार झाला आहे, त्यांना हा परमात्मा प्रणादिशून्य आहे, असेंच ज्ञान होत असतें. अज्ञानानें आपण आकाशाला तल (बूड) आहे असें म्हणतों, व तें मलीन आहे असेंही म्हणतों. तथापि वास्तविक आकाशाला तल–मलादि कांहीं-एक नसतें. असो; तात्पर्य हें आहे कीं, परमात्म्याला प्राण नाहीं. तो प्राणशून्य आहे.—

शिष्य—भिन्नक्रियाशक्ति असणारा (पंचप्राणांच्या क्रिया भिन्न भिन्न आहेत.) व चलनात्मक असणारा (गति असणारा, चळवळ करणारा) जो वायु, त्याला प्राण असें आपण म्हणतों. या प्राणाचें वास्तव्य परब्रह्मामध्यें नाहीं. कारण आत्मा अक्रिय आहे आणि स्थिर आहे. याचप्रमाणें तेथें मनही राहत नाहीं.–

सिद्धान्ती—स्मरण, कल्पना, निश्चय, इच्छा इत्यादि अनेक प्रकारच्या संकल्प-विकल्पादि भिन्न ज्ञानशक्ति असणारें अंतःकरणही त्याच्या ठिकाणीं वास्तव्य करीत नाहीं. तात्पर्य तो प्राणशून्य आणि मनःशून्य आहे.

शिष्य—सारांश पंचप्राण, कर्मेंद्रियें, या इंद्रियांचे विषय, तसेंच बुद्धि व मन, ज्ञानेंद्रियें व त्यांचे विषय, हीं सर्व परब्रह्माचे ठिकाणीं वियमान असत नाहींत, असें झालें.

सिद्धान्ती—इतर श्रुतीही असेंच म्हणतात. 'तो ध्यान करितोसा दिसतो, क्रीडा करितोसा दिसतो.' यावरूनच वस्तुतः तो ध्यान–लीलादि कांहीं एक करीत नसूनही त्याच्यावर ध्यान–लीलांचा आरोप आलेला आहे, असें या श्रुतीस सांगावयाचें आहे. परब्रह्माचे ठिकाणीं ध्यानादि अंतःक्रिया नाहीं व चलनवलनादि बाह्य क्रियाही नाहीं. यामुळें दोन्ही प्रकारच्या उपाधी नाहींत असें ठरतें आणि म्हणून तो शुद्ध निर्विकार आहे असें होतें. अर्थातच नामरूपें उत्पन्न करणारें

व सर्व कार्यकारणांचें बीज असणारें जें नामादि उपाधिलक्षित अव्यक्त किंवा अव्याकृत, ह्याच्याही पलीकडचा हा परमात्मा आहे. तें नामरूपात्मक व कार्यकारणात्मक व्याकृतविश्वाच्या पलीकडचें आहे. विश्वाचें कारण असणारें अव्याकृतनामक जें अविनाशी अव्यक्त त्याच्याही पलीकडचा परमात्मा आहे. सारांश, तो विकारकारण असणाऱ्या अक्षरअव्यक्ताहून अत्यंत विलक्षण आहे. तो निरुपाधिक आहे आणि सर्वांचा नियामक असून त्यांस पूर्णत्व देणारा आहे. त्याला 'पुरुष' असें म्हणतात. त्याच्या ठिकाणीं आकाश नामक अव्याकृत द्रव्य आपल्या सर्व कार्यकारणात्मक पदार्थांसह व व्यापारांसह ओतप्रोत भरलेलें असतें. सारांश, सर्व (क्षराक्षरांस) अंतर्बाह्य व्यापून त्यांचें नियमन करणारा पण त्यांच्याहून विलक्षण असणारा हा आत्मा आहे.

पूर्वपक्षी—असें परमात्मतत्त्व असूनही तुम्ही त्याला प्राणशून्य, मनःशून्य इत्यादि विशेषणें देतां, हें कसें ?

सिद्धान्ती—अहो, जर प्राणादि सर्व हे उत्पत्तीच्या पूर्वीच पुरुषाप्रमाणें (परमात्म्याप्रमाणें) स्वस्वरूपानें राहत असतील, तर मात्र परमात्म्याला प्राणादिकांच्या अस्तित्वानें प्राणादिकत्व प्राप्त होईल; पण उत्पत्तीच्या पूर्वी प्राणादि नसतात, पुरुष मात्र स्वरूपानें असतो. तो एकाकी सिद्ध असतो, प्राणादि उत्पन्न होणारे असतात. म्हणून त्यांच्या उत्पत्तीच्या पूर्वीही विद्यमान असणारा परमात्मा मनःशून्य व प्राणशून्य असतो, यांत काय आश्चर्य आहे ? पुत्र उत्पन्न होण्यापूर्वी देवदत्त जसा अपुत्रवंत असतो, त्याप्रमाणें प्राणादिकांच्या उत्पत्ति पूर्वी परमात्माही प्राणादि-उपाधिशून्यच असतो. ॥ २ ॥

रंगरामानुज—'अक्षर'=अव्याकृत. या अव्याकृतापेक्षां समष्टि पुरुष श्रेष्ठ (पर) आहे व यापेक्षां त्याचें कारण जें ब्रह्म तें श्रेष्ठ आहे. ब्रह्म हे पुरुषप्रकृति या द्वयाचें कारण होय. अव्यक्ताहून श्रेष्ठ असणारा जो हिरण्यगर्भ त्याहून परब्रह्म श्रेष्ठ आहे.

माध्व०—'पुरुष'=भगवान्. हा ज्ञानानंदात्मक शरीरी आहे, म्हणून तो अमूर्त किंवा जड-देहशून्य आहे. त्याला जड ज्ञान-कर्मेंद्रियें नाहींत, जड मन नाहीं; तथापि तो ज्ञानानंदात्मक शरीरी आहे. असा ज्ञानानंदात्मक शरीरी भगवान् जड सृष्टीचा कर्ता होतो. सृष्टि करतांना त्याला श्रम होत नाहींत किंवा चिंता असत नाहीं. कारण, त्याचा देह जड नसतो. तो 'सबाह्यान्तर' म्हणजे अपरिच्छिन्न आहे आणि त्याला बाह्य सृष्टि व अन्तःसृष्टि उत्पन्न करतां येते. अक्षर=जडप्रकृति. 'परमअक्षर'= लक्ष्मी. अक्षरात्परतःपर=वासुदेव. हा परमानंदरूपी आहे.

मंत्र तिसरा.

एतस्माज्जायते प्राणो मनः सर्वेन्द्रियाणि च।
खं वायुर्ज्योतिरापः पृथिवी विश्वस्य धारिणी ॥ ३ ॥

अन्वय व अर्थ—**एतस्मात् प्राणः, मनः, सर्वेन्द्रियाणि च, खं, वायुः, ज्योतिः, आपः, विश्वस्य धारिणी पृथिवी, जायते** (यापरमात्म्यापासून प्राण, मन, सर्व इंद्रियें, आकाश, वायु, तेज, जल, आणि विश्वाचें धारण करणारी पृथिवी हीं प्रत्येकीं उत्पन्न होतात.) ॥ ३ ॥

कथं ते न सन्ति प्राणादय इत्युच्यते । यस्मादेतस्मादेव पुरुषान्नामरूपबीजोपाधिलक्षिताज्जायत उत्पद्यतेऽविद्याविषयविकारभूतो नामधेयोऽनृतात्मकः प्राणः "वाचारम्भणं विकारो नामधेयमनृतम्" इति श्रुत्यन्तरात् । न हि तेनाविद्याविषयेणानृतेन प्राणेन सप्राणत्वं परस्य स्यादपुत्रस्य स्वप्नदृष्टेनेव पुत्रेण सपुत्रत्वम् । एवं मनः सर्वाणि चेन्द्रियाणि विषयाश्चैतस्मादेव जायन्ते । तस्मात्सिद्धमस्य निरुपचरितमप्राणादिमत्त्वमित्यर्थः । यथा च प्रागुत्पत्तेः परमार्थतोऽसन्तस्तथा प्रलीनाश्चेति द्रष्टव्याः । यथा करणानि मनश्चेन्द्रियाणि तथा शरीरविषयकारणानि भूतानि खमाकाशं वायुरन्तर्बाह्य आवहादिभेदः । ज्योतिरग्निः । आप उदकम् । पृथिवी धरित्री-विश्वस्य सर्वस्य धारिणी । एतानि च शब्दस्पर्शरूपरसगन्धोत्तरोत्तरगुणानि पूर्वपूर्वगुणसहितान्येतस्मादेव जायन्ते । संक्षेपतः परविद्याविषयमक्षरं निर्विशेषं पुरुषं सत्यं दिव्यो ह्यमूर्त इत्यादिना मन्त्रेणोक्त्वा पुनस्तदेव सविशेषं विस्तरेण वक्तव्यमिति प्रवृत्तेः संक्षेपविस्तरोक्तो हि पदार्थः सुखाधिगम्यो भवति सूत्रभाष्योक्तिवदिति ॥ ३ ॥

सिद्धान्ती—प्राणादि प्रथमतः नसतात, याचें कारण या मंत्रांत सांगितलें आहे. श्रुति म्हणते:—ह्या पुरुषोत्तमापासून मात्र (नामरूपांच्या बीजोपाधीनें लक्षित झालेल्या पुरुषोत्तमापासून) प्राण उत्पन्न होतो. हा प्राण अज्ञानाचा विषय असूनं विकारी आहे. हा नाममात्र आहे म्हणून असत्य आहे. ' विकार हा केवळ वाणीचा विलास असून नाममात्र आहे आणि म्हणून असत्य आहे. ' असें अन्य श्रुति म्हणते.

शिष्य—हाच सिद्धांत पुनः एकदां सांगावा.

सिद्धान्ती—परमात्मा स्वरूपतः निरुपाधिक आहे, असें श्रुति सांगते. आपणासारख्या सोपाधिक जीवांस सर्वत्र भेदपूर्ण आणि विकारपूर्ण सृष्टि दिसते व भासते. या सर्व सृष्टीचें आदिकारण अविद्येनें उत्पन्न केलेलें अव्यक्त आहे. हें अव्यक्त सर्व कार्यकारणात्मक व्यवहारांचें आदिकारण आहे, असें आपल्यास अपराविद्येनें समजतें. या अव्यक्तज्ञानावरून प्रथम पुरुषोत्तमाचें व नंतर निरुपाधिक परमात्म्याचें अस्तित्व लक्षित होतें. श्रुति वाच्यार्थानें परब्रह्मलक्षण न सांगतां शाखाचंद्रन्यायानें, लक्षणेनें, सांगते. तेव्हां सिद्धांत असा निघतो कीं जेवढे जेवढे म्हणून नामरूपात्मक व्यवहार आहेत ते वस्तुतः सत्यस्वरूप नाहींत. प्राण हा नामरूपात्मक विकार आहे म्हणून तो सत्य नाहीं. असा जन्मलेला, अविद्येचा विषय असणारा व परमार्थतः असत्य असणारा जो प्राण, तो परमार्थसत्य जो नित्य परमात्मा त्याला सप्राण कसें करील ? स्वप्नामध्यें पाहिलेल्या पुत्रामुळें जसें जागृतीमध्यें निपुत्रिकाला सपुत्रकत्व येत नाहीं, त्याप्रमाणें असत्यप्राणानें सत्यपरमात्म्याला सप्राणत्व प्राप्त होत नाहीं; तथापि अविद्येमुळें आपण परब्रह्मावर आरोप करून म्हणतो कीं, परमात्म्यापासून प्राण उत्पन्न झाला. याच प्रमाणें मन, सर्व इंद्रियें व त्यांचे विषय हेही परब्रह्मापासून उत्पन्न झाले, असें आपण म्हणतों. वस्तुतः परब्रह्माला विकार होत नाहीं. तथापि प्राणादिकांच्या उत्पत्तीचा आरोप त्याच्यावर अविद्येनें होतो. असो. आरोप करितां येतो, यावरून मुद्दां परब्रह्म हें स्वरूपतः अप्राणमनादि आहे, असें सिद्ध होतें. पुनः, उत्पत्तीच्या पूर्वी प्राणादि वस्तुतः नसतात, व मागाहून परमात्म्याच्या सत्तेनें उत्पन्न होतात आणि नष्ट झाल्यावर त्याच्याच सत्तेनें परमात्म्यांत लीन होतात, असें म्हटलें पाहिजे. दोरीवर सर्पाचा आरोप झाला असतां व दिव्याच्या प्रकाशानें सर्पभ्रांति नष्ट झाली असतां, आपल्यास असेंच म्हणावयास पाहिजे कीं दोरीपासून सर्प उत्पन्न झाला होता, व दोरीचें ज्ञान झाल्यावर तो दोरीमध्येंच लीन झाला. असो, सर्वांची उत्पत्ति व लय तेथेंच आहे. मन आणि इंद्रियें, यांप्रमाणेंच शरीराची उत्पत्ति करून त्यांस उपभोगविषय देणारीं आकाशादि पंचमहाभूतें पुरुषोत्तमापासून उत्पन्न होतात आणि तेथेंच लय पावतात.

शिष्य—वायु म्हणजे अंतर्बाह्य वायु होय. याचे आवहप्रवहादि भेद आहेत. सर्वांचें धारण करणारी पृथ्वी इचाही पंचमहाभूतांतच अंतर्भाव होतो.

सिद्धान्ती—तथापि हें ध्यानांत ठेव कीं, शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, हे ज्यांचे असाधारण गुण आहेत, अशीं आकाश वायु, तेज, जल आणि पृथ्वी हीं पंचमहाभूतें उत्पन्न होण्याचा क्रम असा आहेः आकाशापासून वायु, वायूपासून तेज, असा पृथ्वीपर्यंत क्रम असून आकाशाचा गुण जो शब्द तो वायूच्या स्पर्शगुणासह वायूंत असतो. तात्पर्य, पृथ्वींत पांच गुण, जलांत चार, तेजांत तीन, वायूंत दोन आणि आकाशांत एक असा हा क्रम आहे. याप्रमाणें परविद्येचा विषय जो एकरस, अविनाशी,

सत्यरूप, स्वयंप्रकाश आणि निराकार पुरुष आहे, त्याचें स्वरूप पहिल्या दोन मंत्रांत संक्षेपानें सांगितलें व पुढें तोच विषय विस्तारानें सांगण्यास श्रुति प्रवृत्त झाली आहे. खरेंच आहे, संक्षेपानें आणि विस्तारानें सांगितलेला कोणताही विषय समजणें सवघड आणि सुखकारक होतें. सूत्रें संक्षेपानें सांगतात आणि भाष्य या संक्षेपाचा विस्तार करितें. त्याप्रमाणेंच श्रुति जनबोधार्थ कृपालुपणानें हा अवघड विषय सवंघड व्हावा म्हणून विस्तारानें हा बोधप्रपंच करीत आहे. ॥ ३ ॥

रंगरामानुज—या मंत्राच्या व्याख्यानांत असें सांगितलें आहे कीं, प्राण, मन, इंद्रियें, पंचमहाभूतें, हीं सर्व साक्षात् परमेश्वरानें निर्माण केलीं आहेत. हें सिद्ध करण्यासाठीं यांनीं अनेक श्रुतींचा अवतार केला आहे. आणि आपल्या मतानें असें सिद्ध केलें आहे कीं, प्रत्येक मंत्रोक्त वस्तूची उत्पत्ति साक्षात् परमेश्वरापासून आहे. 'अद्भ्यः पृथिवी' याचा अर्थ असा करावयाचा कीं, परमेश्वराच्या जलरूपशरीरापासून पृथ्वीची उत्पत्ति परमेश्वरानें केली. तात्पर्य, परमेश्वर सर्वत्र भरला आहे, याचा अर्थ सर्व वस्तु परमेश्वराचें शरीर होतात, आणि त्या वस्तु सत्य व नित्य आहेत.

माध्व०—येथून सत्यसृष्टीची उत्पत्ति सांगितली आहे, ती जशी उत्पन्न झाली तशीच सांगितली आहे. येथें प्राणादिपदें 'महदादि तत्त्वें आणि त्यांच्या अभिमानी देवता' या अर्थीं आहेत. पृथिवीनंतर ब्रह्मांड आणि विश्व अशा क्रमानें उत्पत्ति झाली आहे.

मंत्र चवथा.

अग्निर्मूर्धा चक्षुषी चन्द्रसूर्यौ दिशःश्रोत्रे वाग्विवृताश्च वेदाः। वायुः प्राणो हृदयं विश्वमस्य पद्भ्यां पृथिवी ह्येष सर्वभूतान्तरात्मा ॥ ४ ॥

अन्वय व अर्थ—**अग्निः मूर्धा, चक्षुषी चंद्रसूर्यौ, दिशः श्रोत्रे, वेदाः वाग्विवृत्ताः, वायुः प्राणः, विश्वम् अस्य हृदयं, पद्भ्यां पृथिवी, हि एषः सर्वभूतान्तरात्मा** (अग्नि हा त्याचें मस्तक, चंद्र-सूर्य हे डोळे, दिशा कर्ण, प्रकट झालेले वेद ही वाणी, वायु हा प्राण, विश्व हें हृदय, दोन पायांपासून पृथ्वी उत्पन्न झाली. कारण हा सर्व भूतांचा अंतरात्मा आहे.) ॥ ४ ॥

योऽपि प्रथमजात्प्राणाद्धिरण्यगर्भाज्जायतेऽण्डस्यान्तर्विराट् स तत्त्वान्तरितत्वेन लक्ष्यमाणोऽप्येतस्मादेव पुरुषाज्जायत एतन्मयश्चेत्येतदर्थमाह। तं च विशिनष्टि। अग्निर्द्युलोकः "असौ वाव लोको

गौतमाग्निः" इति श्रुतेः। मूर्धा यस्योत्तमाङ्गं शिरः। चक्षुषी चन्द्रश्च सूर्यश्चेति चन्द्रसूर्यौ। यस्येति सर्वत्रानुषङ्गः कर्तव्यः। अस्येत्यस्य पदस्य वक्ष्यमाणस्य यस्येति विपरिणामं कृत्वा दिशः श्रोत्रे यस्य। वाग्विवृता उद्घाटिताः प्रसिद्धा वेदा यस्य। वायुः प्राणो यस्य। हृदयमन्तःकरणं विश्वं समस्तं जगदस्य यस्येत्येतत्। सर्वं ह्यन्तः-करणविकारमेव जगन्मनस्येव सुषुप्ते प्रलयदर्शनात्। जागरितेऽपि तत एवाग्निविस्फुलिङ्गवद्विप्रतिष्ठानात्। यस्य च पद्भ्यां जाता पृथिवी। एष देवो विष्णुरनन्तः प्रथमशरीरी त्रैलोक्यदेहोपाधिः सर्वेषां भूतानामन्तरात्मा ॥ ४ ॥

सिद्धान्ती—पहिल्या प्रथम उत्पन्न झालेल्या हिरण्यगर्भापासून जो उत्पन्न झाला, जो ब्रह्मांडाच्या आंतील विराट् पुरुष आहे, तो जरी हिरण्यगर्भजनित असा लक्षित होतो (जरी त्याचें स्वरूप–लक्षण निराळें सांगतां येईल) तरी तो मागें सांगितलेल्या पुरुषा-पासूनच उत्पन्न होतो आणि विराट् पुरुष ही ब्रह्ममय आहे हें सांगण्यासाठीं या मंत्राची योजना आहे. या विराट्पुरुषाचें विशेष स्वरूप सांगतात. अग्नि म्हणजे द्युलोक होय. 'हे गौतम, हा लोक (द्युलोक) म्हणजे अग्निच होय.' अशी श्रुति आहे. असो, द्युलोक असणारा अग्नि या विराट्–स्वरूपाचा सर्वश्रेष्ठ अवयव म्हणजे शिर होय. द्युलोक हें मस्तक, चंद्रसूर्य ज्याचें नेत्रद्वय,—

शिष्य—ज्याचे हें पद आहे कोठें ?

सिद्धान्ती—पुढें अस्य (ह्याचें) असें जें पद आहे, त्याचाच येथें 'ज्याचें' असा अर्थ करून त्याचा संबंध सर्वत्र लावावयाचा आहे.—दिशा हे ज्याचे कर्ण, उद्घाटित झालेले प्रसिद्ध वेद ही ज्याची वाणी, वायु हा ज्याचा प्राण, हें सर्व विश्व हें ज्याचें अंतःकरण—

शिष्य—विश्व हें अंतःकरण कसें ?

सिद्धान्ती—जगत् (विश्व) हा एक अंतःकरणाचा विकार मात्र आहे. अंतःकरणांत विकृति होऊन जगदुत्पत्ति होते. कारण, मनाला झोंप लागल्यावर विश्वाचा त्या मनांत लय होतो, असा अनुभव सर्वत्र आहे. जागृत स्थितींतही मनापासूनच जगताची स्थापना होते. अग्नीपासून ठिणग्या पसरतात व अग्नींत लय पावतात, त्याप्रमाणें जग हें मनापासून प्रतिष्ठित होऊन तेथें लय पावतें. त्याला स्वयंप्रतिष्ठा नाहीं. यावरून जगत् हा एक मनाचा विकार आहे असें ठरतें. असो, —ज्याच्या पायापासून पृथ्वी उत्पन्न झाली, तो हा विष्णुनामक देव अनंत असून शरीर–धारण करणारांमध्यें कालानें व योग्यतेनें प्रथम आहे. सर्व त्रैलोक्य ही याला देहोपाधि आहे आणि हा विष्णु सर्व भूतांचा अंतरात्मा आहे. ॥ ४ ॥

रंगरामानुज—' अग्निः ' = द्युलोक.

माध्व०—अग्नि इत्यादि परमेश्वराच्या अंगांची नामें आहेत. हीं सर्व क्रीडारूप आहेत ' अग्नि '= स्वतः गमन करण्यास असमर्थ असणाऱ्या जगताला नेणारा.

मंत्र पांचवा.

तस्मादग्निः समिधो यस्य सूर्यः सोमात्पर्जन्य ओषधयः पृथिव्याम् । पुमान्रेतः सिञ्चति योषितायां बह्वीः प्रजाः पुरुषात्संप्रसूताः ॥ ५ ॥

अन्वय व अर्थ—**तस्मात् अग्निः, यस्य सूर्यः समिधः,** (ज्याची समिधा सूर्य आहे असा अग्नि त्या परमपुरुषापासून निर्माण झाला आहे. **सोमात्पर्जन्यः, पृथिव्यां औषधयः; पुमान् योषितायां रेतः सिंचति; बह्वीः प्रजाः पुरुषात् संप्रसूताः** (सोमापासून पर्जन्य, त्यापासून पृथ्वींतील ओषधी, ओषधीपासून उत्पन्न झालेलें वीर्य पुरुष हा स्त्रीचेठायीं सिंचित करितो आणि या प्रमाणें महापुरुषापासून अनेक प्रकारच्या प्रजा निर्माण होतात.) ॥ ५ ॥

स हि सर्वभूतेषु द्रष्टा श्रोता मन्ता विज्ञाता सर्वकारणात्मा पञ्चाग्निद्वारेण च याः संसरन्ति प्रजास्ता अपि तस्मादेव पुरुषात्प्रजायन्त इत्युच्यते । तस्मात्परस्मात्पुरुषात्प्रजावस्थानविशेषरूपोऽग्निः स विशिष्यते । समिधो यस्य सूर्यः समिध इव समिधः । सूर्येण हि द्युलोकः समिध्यते । ततो हि द्युलोकान्निष्पन्नात्सोमात्पर्जन्यो द्वितीयोऽग्निः संभवति । तस्माच्च पर्जन्यादोषधयः पृथिव्यां संभवन्ति । ओषधिभ्यः पुरुषाग्नौ हुताभ्य उपादानभूताभ्यः पुमानग्नी रेतः सिञ्चति योषितायां योषिति योषाग्नौ स्त्रियामिति । एवं क्रमेण बह्वीर्बह्वयः प्रजा ब्राह्मणाद्याः पुरुषात्परस्मात्संप्रसूताः समुत्पन्नाः ॥ ५ ॥

सिद्धान्ती—सर्व भूतांमध्यें तोच पुरुष कायतो द्रष्टा, श्रोता, विचार कर्ता, जाणता, सर्वकारणस्वरूप आत्मा, असा आहे. पुढें ज्यांचें वर्णन केलें आहे त्या पंचाग्निद्वारांनीं ज्या प्रजा उत्पत्तिस्थितींचा अनुभव घेतात, त्या प्रजासुद्धां ह्याच पुरुषापासून उत्पन्न होतात. असें या मंत्रांत सांगावयाचें आहे.

शिष्य—पांच अग्नि कोणते ?

सिद्धान्ती—सांगतों ऐक,–द्युलोकामध्यें असणारा जो सूर्य तो ज्याची समिधा आहे, असा प्रजोत्पत्तीची मूल अवस्था असणारा विशेषरूपी अग्नि, या पुरुषापासूनच उत्पन्न झाला.

शिष्य—सूर्याला समिध म्हटलें, कारण तो द्युलोकाला प्रकाशित करितो. होय ना?

सिद्धान्ती—होय. या द्युलोकीं अग्नीपासून सोम उत्पन्न होतो. सोमापासून पर्जन्यरूपी दुसरा अग्नि उत्पन्न होतो. पर्जन्यापासून पृथ्वीमध्यें ओषधी म्हणजे वनस्पती उत्पन्न होतात. हा तिसरा अग्नि. पुरुषरूपी अग्नीमध्यें वनस्पतींच्या आहुती दिल्या म्हणजे त्यांच्यापासून पुरुषवीर्यरूपी अग्नि उत्पन्न होतो. हा चवथा अग्नि व तो अग्नि स्त्रियांच्या रक्तरूपी अग्नीमध्यें प्रवेश करितो. या क्रमानें ब्राह्मणादि नानाविध प्रजा परमश्रेष्ठ पुरुषापासून पंचाग्निद्वारानें उत्पन्न होतात. 'द्यु (आकाश), पर्जन्य, पृथ्वी, पुरुष आणि स्त्री' हे पांच अग्नि होत. अथवा या पांचांच्या ठिकाणीं अग्निदृष्टीनें पहावें, अशी श्रुति आहे. उत्पत्तीचा क्रमही आम्ही दिला तसाच आहे. म्हणजे आकाशापासून पर्जन्य, पर्जनापासून पृथ्वीवरील ओषधी इत्यादि क्रम होय. ॥ ५ ॥

रंगरामानुज—अग्नि, पर्जन्य, पृथ्वी, पुरुष, स्त्रिया, हे पांच अग्नि सृष्टीचा उत्पत्तिक्रम दाखवितात. हे सर्व परमेश्वरापासून साक्षात् उत्पन्न झाले आहेत. या पांच अग्नींचा इतर उपनिषदांतही उल्लेख झाला आहे.

माध्व०—यज्ञादि सृष्टि ही परमेश्वरापासूनच झाली आहे. 'तस्मात् अग्निः समिधोऽ यश्च सूर्यः' असा यांचा पाठ आहे. अय म्हणजे शुभजनक देवयज्ञादि धर्म. पुमान्= पूर्णस्वरूपी वासुदेव. योषिता=लक्ष्मी. संप्रसूत=सत्त्वादि सूक्ष्म देहांची झालेली उत्पत्ति.

मंत्र सहावा.

तस्मादृचः साम यजूंषि दीक्षा यज्ञाश्च सर्वे क्रतवो दक्षिणाश्च । संवत्सरश्च यजमानश्च लोकाः सोमो यत्र पवते यत्र सूर्यः ॥ ६ ॥

अन्वय व अर्थ—तस्मात् ऋचः, साम, यजूंषि, दीक्षा, यज्ञाः च सर्वे क्रतवः, दक्षिणाः च, संवत्सरः च, यजमानः च, लोकाः, यत्र सोमः पवते यत्र सूर्यः पवते (त्या परमश्रेष्ठ पुरुषापासून ऋग्वेद ऋचा, सामें, यजू, संस्कार, सर्व अग्निहोत्रादि यज्ञ, दक्षिणा द्यावयास लागणारे क्रतु, संवत्सर, कर्मकर्ता आणि जेथें सोम पवित्र करितो आणि सूर्य प्रकाश देतो, तीं सर्व भुवनें–त्याच्यापासून–उत्पन्न झालीं आहेत.) ॥ ६ ॥

किंच कर्मसाधनानि फलानि च तस्मादेवेत्याह । कथं तस्मात्पुरुषादृचो नियताक्षरपादावसाना गायत्र्यादिच्छन्दोविशिष्टा मन्त्राः । साम पाञ्चभक्तिकं साप्तभक्तिकं च स्तोभादिगीतविशिष्टम् । यजूंष्यनियताक्षरपादावसानानि वाक्यरूपाण्येवं त्रिविधा मन्त्राः । दीक्षा मौञ्ज्यादिलक्षणा कर्तृनियमविशेषा । यज्ञाश्च सर्वेऽग्निहोत्रादयः । क्रतवः सयूपाः । दक्षिणाश्चैकगवाद्यपरिमितसर्वस्वान्ताः । संवत्सरश्च कालः कर्माङ्गः । यजमानश्च कर्ता । लोकास्तस्य कर्मफलभूतास्ते विशेष्यन्ते, सोमो यत्र येषु लोकेषु पवते पुनाति लोकान्यत्र येषु सूर्यस्तपति च ते च दक्षिणायनोत्तरायणमार्गद्वयगम्या विद्वदविद्वत्कर्तृफलभूताः ॥ ६ ॥

सिद्धान्ती—फार काय सांगावें ? सर्व कर्मसाधनें आणि कर्मफलें त्या परमपुरुषापासूनच उत्पन्न होतात, असें हा मंत्र सांगत आहे. कसें तें पहाः—ह्या परमपुरुषापासून गायत्री, त्रिष्टुप्, जगति, इत्यादि छंदांनीं विशिष्ट झालेल्या व नियमित अक्षरें, चरण आणि स्वर ज्यांत असतात, अशा ऋचा उत्पन्न झाल्या आहेत. त्याचप्रमाणें पंचावयवी व सप्तावयवी सामें त्याच्यापासूनच उत्पन्न झालीं आहेत. या सामांत अर्थशून्य 'हिंकारादि' वर्णांनीं अर्थपूर्ण गीतें विशिष्ट केलेलीं असतात. यजंमध्यें अक्षरांचा, चरणांचा किंवा स्वरांचा नियम नाहीं. यजु हे वाक्यरूप असतात, पद्यरूप नसतात. याप्रमाणें ऋक्, साम आणि यजु असे तीन प्रकारचे मंत्र आहेत. हे सर्व मंत्र परम पुरुषापासून उत्पन्न झाले.

शिष्य—दीक्षा म्हणजे उपनयनादि संस्कार जीमध्यें असतात ती होय. यज्ञांमध्यें कर्त्यानें कांहीं नियमित गोष्टी कराव्या लागतात, म्हणून यजमान दीक्षित होतो.

सिद्धान्ती—होय. अग्निहोत्रादि सर्व यज्ञ—एक धेनु दान देण्यापासून तों सर्वस्व दान करण्यापर्यंतचे सर्व दक्षिणात्मक यज्ञ—पशूंचे बली मागणारे यज्ञ, कर्मांचा अवयव असणारा काल, यजमान म्हणजे कर्ता, आणि जेथें सोमाचा (चंद्राचा, सोमाचा) पावक प्रकाश असतो, ते पितृयानमार्गानें प्राप्त होणारे लोक व जेथें सूर्याचा तेजस्वी प्रकाश असतो, ते देवयानमार्गानें प्राप्त होणारे लोक, हे त्या परमपुरुषापासून उत्पन्न होतात.

शिष्य—देवयानमार्गानें विद्वान् (ज्ञानी) कर्मकर्ते जातात आणि अज्ञानी लोक पितृयानमार्गानें दक्षिणायनांत जातात. होय नव्हे ?

सिद्धान्ती—होय. याप्रमाणें त्या पुरुषापासून तिन्ही प्रकारचे मंत्र म्हणजे तिन्ही वेद, यज्ञ, क्रतु, यज्ञकर्ते, यज्ञकाल हा कर्मसाधनें आणि कर्मफलाचा उपभोग देणारीं भुवनें उत्पन्न होतात. ॥ ६ ॥

मंत्र सातवा.

तस्माच्च देवा बहुधा संप्रसूताः साध्या मनुष्याः पशवो वयांसि । प्राणापानौ व्रीहियवौ तपश्च श्रद्धा सत्यं ब्रह्मचर्यं विधिश्च ॥ ७ ॥

अन्वय व अर्थ—तस्मात्, देवाः, साध्याः, मनुष्याः पशवः, वयांसि, प्राणापानौ, व्रीहियवौ च, तपः, श्रद्धा, सत्यं, ब्रह्मचर्यं च, विधिः, बहुधा संप्रसूताः, (त्या परमपुरुषापासून अनेक प्रकारचे देव, साध्य, मनुष्य, पशु, पक्षी, प्राणापान, व्रीहियव, तप, श्रद्धा, सत्य, ब्रह्मचर्य आणि विहित कर्तव्यें निर्माण झालीं.) ॥ ७ ॥

तस्माच्च पुरुषात्कर्माङ्गभूता देवा बहुधा वस्वादिगणभेदेन संप्रसूताः सम्यक्प्रसूताः । साध्या देवविशेषाः । मनुष्याः कर्माधिकृताः । पशवो ग्राम्यारण्याः । वयांसि पक्षिणः । जीवनं च मनुष्यादीनाम् । प्राणापानौ व्रीहियवौ हविरर्थौ । तपश्च कर्माङ्गं पुरुषसंस्कारलक्षणं स्वतन्त्रं च फलसाधनम् । श्रद्धा यत्पूर्वकः सर्वपुरुषार्थसाधनप्रयोगश्चित्तप्रसाद आस्तिक्यबुद्धिस्तथा सत्यमनृतवर्जनं यथाभूतार्थवचनं चापीडाकरम् । ब्रह्मचर्यं मैथुनासमाचारः । विधिश्चेतिकर्तव्यता ॥७॥

सिद्धान्ती—या परम पुरुषापासूनच रुद्र, आदित्य, वसु इत्यादि अनेक प्रकारचे कर्मशेष देव योग्य प्रकारें उत्पन्न झाले. त्याचप्रमाणें साध्य नामक देव, कर्माधिकारी मनुष्य, ग्राम्य (गांवठी) आणि आरण्य (रानटी) पशु, पक्षी, मनुष्यादिकांचे भोग्य पदार्थ, व्रीहि, यव इत्यादि, आणि जीवाला शरीरांत कायम ठेवणारे प्राणापान—

शिष्य—भगवन्, व्रीहि (तांदूळ) यव (सातु) हीं हविष्यान्नें आहेत, नव्हे ?

सिद्धान्ती—होय. तसेंच कर्मांग असणारें व पुरुषांस संस्कृत करून स्वतंत्र फलसाधन होणारें तप, श्रद्धा,—

शिष्य—श्रद्धा म्हणजे आस्तिक्यबुद्धि. ही आस्तिक्यबुद्धि चित्ताला प्रसन्न करिते. आणि ही बुद्धि असली तर मात्र सर्व पुरुषार्थांच्या साधनाचा प्रयोग सिद्ध होतो. होय ना ? तसेंच सत्य म्हणजे जसा अर्थ असेल किंवा झाला असेल तसें बोलणें. होय ना ?

सिद्धान्ती—होय. पण हें सत्य अनृतशून्य असून कोणासही पीडा करणारें नसावें. तसेंच ब्रह्मचर्य (मैथुननिवृत्ति) आणि विधि म्हणजे इतिकर्तव्यता हीं सर्व त्या पुरुषापासूनच उत्पन्न झालीं आहेत. ॥ ७ ॥

मंत्र आठवा.

सप्त प्राणाः प्रभवन्ति तस्मात्सप्तार्चिषः समिधः सप्त होमाः । सप्त इमे लोका येषु चरन्ति प्राणा गुहाशया निहिताः सप्त सप्त ॥ ८ ॥

अन्वय व अर्थ—तस्मात् सप्त प्राणाः प्रभवन्ति, सप्त अर्चिषः, सप्त समिधः, सप्त होमाः, येषु प्राणाः चरन्ति इमे सप्त लोकाः, गुहाशयाः सप्त सप्त निहिताः (ज्या पासून सात प्राण, सात ज्वाला, सात समिधा, सात होम, जेथें प्राणसंचार असतो ते सात लोक आणि जेथें प्रत्येक प्राणिशरीरांत गुप्तस्थलीं सात ठिकाणीं सात वस्तु स्थापन केल्या आहेत, त्या वस्तु, हीं सर्व त्यापुरुषापासून उत्पन्न झालीं आहेत.) ॥ ८ ॥

किंच सप्त शीर्षण्याः प्राणास्तस्मादेव पुरुषात्प्रभवन्ति । तेषां च सप्तार्चिषो दीप्तयः स्वविषयावद्योतनानि । तथा सप्त समिधः सप्त विषयाः । विषयैर्हि समिध्यन्ते प्राणाः । सप्त होमास्तद्विषयविज्ञानानि " यदस्य विज्ञानं तज्जुहोति " इति श्रुत्यन्तरात् । किंच सप्तेमे लोका इन्द्रियस्थानानि येषु चरन्ति संचरन्ति प्राणाः । प्राणा येषु चरन्तीति प्राणानां विशेषणमिदं प्राणापानादिनिवृत्त्यर्थम् । गुहायां शरीरे हृदये वा स्वापकाले शेरत इति गुहाशयाः । निहिताः स्थापिता धात्रा सप्त सप्त प्रतिप्राणिभेदम् । यानि चाऽऽत्मयाजिनां विदुषां कर्माणि कर्मफलानि चाविदुषां च कर्माणि तत्साधनानि कर्मफलानि च सर्वं चैतत्परस्मादेव पुरुषात्सर्वज्ञात्प्रसूतमिति प्रकरणार्थः ॥ ८ ॥

सिद्धान्ती—फार काय सांगावें ? मस्तकसंबंधी सात चक्षुःकर्णादि प्राण, तसेंच आपापले रूपशब्दादि विषय प्रकाशित करणाऱ्या सात ज्वाला, सात प्रकारच्या विज्ञानशक्ति, सात प्रकारचे विषय—

शिष्य—समिधा याचा अर्थ विषय केला. कारण, विषयांच्या योगरूपी होमानें प्राण (इंद्रियें) प्रज्वलित होतात. म्हणून ना ?

सिद्धान्ती—होय. सात होम म्हणजे त्या त्या विषयांचीं सात विज्ञानें होत. 'याचें जें विज्ञान आहे त्याची आहुति देतों.' अशी अन्य श्रुति प्रमाण आहे. तसेंच जेथें प्राणांचा संचार नित्य असतो, तीं सात भुवनें म्हणजे सात इंद्रियांचीं गोलकस्थानें होत.

शिष्य—'ज्यामध्यें प्राणांचा संचार होतो.' असे श्रुतीचे शब्द आहेत, त्यांवरून अर्थातच प्राणापानादि वायूंचा येथें निरास होतो. आणि इंद्रियांचीं स्थानें असा अर्थ स्पष्ट होतो.

सिद्धान्ती—शेवटीं शरीरांत किंवा हृदयाचे ठिकाणीं निद्राकालीं जे विश्रांति घेतात व ज्यांची स्थापना प्रत्येक प्राण्यांमध्यें विधात्यानें केली आहे, त्या गोष्टी (इंद्रियें) होत. सारांश, जे आत्मयज्ञ करणारे आत्मैकत्वज्ञानी आहत, त्यांचीं सर्व कर्में, कर्मसाधनें व कर्मफलें आणि अविद्वानांचीं कर्में, कर्मसाधनें आणि कर्मफलें या सर्वज्ञ परमपुरुषापासूनच निर्माण होतात, असा तात्पर्यार्थ आहे. हा कर्मप्रपंच प्रत्येक प्राण्याच्या हृदयस्थानीं गुप्त रीतीनें परमेश्वर स्थापन करितो. म्हणून या प्रपंचाला 'गुहाशय' हें नांव दिलें. हा कर्मप्रपंचही परमेश्वरजन्य आहे. ॥ ८ ॥

माध्व०—सप्तार्चिषः–इंद्रियजन्य ज्ञानें; होम=विषयेंद्रियांचे संबंध; लोक=सात इंद्रियगोलक. (गुहाशयायां असा यांचा पाठ आहे. प्रचलित पाठ गुहाशयाः असा आहे.) बुद्धीमध्यें प्रत्येक पुरुषाला निरनिराळे सप्त सप्त प्राण आहेत. प्रत्येक शरीरांत सात प्राण असतात.

मंत्र नववा.

अतः समुद्रा गिरयश्च सर्वेऽस्मात्स्यन्दन्ते सिन्धवः सर्वरूपाः। अतश्च सर्वा ओषधयो रसश्च येनैष भूतैस्तिष्ठते ह्यन्तरात्मा ॥ ९ ॥

अन्वय व अर्थ—**अतः सर्वे समुद्राः, गिरयः च; अस्मात् सर्वरूपाः, सिंधवः स्यंदंते; अतः च सर्वाः ओषधयः रसः च; येन हि एषः अन्तरात्मा भूतैः तिष्ठते** (ह्या पुरुषापासून सर्व सागर व सर्व पर्वत उत्पन्न झाले; यापासूनच अनेक स्वरूपी नद्या उत्पन्न होऊन प्रवाह रूपानें चालतात; सर्व वनस्पति आणि सर्व रस येथूनच उत्पन्न झाले. आणि या रसानें व पंचमहाभूतांनीं वेष्टित असा हा अन्तरात्मा लिंग शरीररूपानें वास्तव्य करितो.) ॥ ९ ॥

अतः पुरुषात्समुद्राः सर्वे क्षाराद्याः। गिरयश्च हिमवदाद्योऽस्मादेव पुरुषात्सर्वे। स्यन्दन्ते स्रवन्ति गङ्गाद्याः सिन्धवो नद्यः सर्वरूपा बहुरूपाः अस्मादेव पुरुषात्सर्वा ओषधयो व्रीहियवाद्याः। रसश्च मधुरादिः षड्विधो येन रसेन भूतैः पञ्चभिः स्थूलैः परिवेष्टितस्ति-

ष्ठते तिष्ठति ह्यन्तरात्मा लिङ्गं सूक्ष्मं शरीरम्। तद्ग्रथन्तराले शरीरस्याऽऽत्मनश्चाऽऽत्मवद्वर्तत इत्यन्तरात्मा ॥ ९ ॥

सिद्धान्ती—क्षारादि सर्व सप्त महासमुद्र आणि हिमालयादि सप्त महापर्वत या पुरुषापासून उत्पन्न झाले. अनेक स्वरूपें धारण करणाऱ्या गंगादि महानद्या येथूनच उगम पावून रत्नाकराकडे धांवत जातात. व्रीहि-यवादि सर्व ओषधी (वनस्पती व त्यांचीं फलें) येथून उत्पन्न झालीं. सहा प्रकारचे मधुर, आम्ल, तिक्त, इत्यादि रस हेही महापुरुषापासून उत्पन्न झाले. आणि या षड्रसांनीं व स्थूल अशा पंचमहाभूतांनीं वेष्टिलेला आत्मा म्हणजे लिंगशरीर अथवा सूक्ष्म शरीर असतें. तें हें सूक्ष्म शरीर स्थूल शरीराच्या व आत्म्याच्या मध्यें असतें आणि स्थूल शरीरास नियमित करितें. म्हणून त्याला अन्तरात्मा असें म्हणतात. ॥ ९ ॥

माध्व०—'येन इत्यादि'—ज्या कारणानें अंतर्यामी भगवान् ब्रह्मदेवादि सर्व भूतांमध्यें राहतो, त्या कारणानें सर्व उत्पन्न केलेल्या सृष्टींचें अंतर्याम भगवंतानेंच निर्माण केलें आहे, असें सिद्ध होतें.

मंत्र दहावा.

पुरुष एवेदं विश्वं कर्म तपो ब्रह्म परामृतम्।
एतद्यो वेद निहितं गुहायां सोऽविद्याग्रन्थिं
विकिरतीह सोम्य ॥ १० ॥

इत्यथर्ववेदीयमुण्डकोपनिषदि द्वितीयमुण्डके
प्रथमः खण्डः ॥ १ ॥

अन्वय व अर्थ—**पुरुषः एव इदं विश्वं, कर्म, तपः, परामृतं ब्रह्म,** (हा पुरुषच हें सर्व विश्व, सर्वकर्म, सर्वतप आणि अति श्रेष्ठ व अमर असें ब्रह्म आहे.) **सोम्य! एतत् गुहायां निहितं यः वेद सः इह अविद्याग्रंथिं विकिरति** (हे सौम्य! गुहेमध्यें स्थापित झालेलें हें ज्ञान ज्याला झालें तो अविद्येची ग्रंथी येथल्या येथेंच सोडवून टाकतो, नाहींशी करितो.) ॥ १० ॥

एवं पुरुषात्सर्वमिदं संप्रसूतम्। अतो वाचारम्भणं विकारो नामधेयमनृतं पुरुष इत्येव सत्यम्। अतः पुरुष एवेदं विश्वं सर्वम्। न विश्वं नाम पुरुषादन्यत्किंचिदस्ति। अतो यदुक्तं तदेतदभिहितं

कस्मिन्नु भगवो विज्ञाते सर्वमिदं विज्ञातं भवतीति। एतस्मिन्हि परस्मिन्नात्मनि सर्वकारणे पुरुषे विज्ञाते पुरुष एवेदं विश्वं नान्यदस्तीति विज्ञातं भवतीति। किं पुनरिदं विश्वमित्युच्यते । कर्माग्निहोत्रादिलक्षणम् । तपो ज्ञानं तत्कृतं फलमन्यदेतावद्धीदं सर्वम् । तच्चैतद्ब्रह्मणः कार्यं तस्मात्सर्वं ब्रह्म परामृतं परममृतमहमेवेति यो वेद निहितं स्थितं गुहायां हृदि सर्वप्राणिनां स एवं विज्ञानादविद्याग्रंथिं ग्रन्थिमिव दृढीभूतामविद्यावासनां विकिरति विक्षिपति नाशयतीह जीवन्नेव न मृतः सन्हे सोम्य प्रियदर्शन ॥ १० ॥

इति मुण्डकोपनिषद्भाष्ये द्वितीयमुण्डके प्रथमः खण्डः ॥ १ ॥

सिद्धान्ती—याप्रमाणें हें दिसणारें अंतर्बाह्य विश्व पुरुषोत्तमापासून उत्पन्न झालेलें आहे. जेवढा म्हणून विकार आहे, जें कांहीं नामरूप आहे, तें सर्व वाणीचा विलास मात्र आहे, असत्य आहे. पुरुष काय तो एक सत्य वस्तु आहे. म्हणून हें सर्व पुरुषन्यज विश्व पुरुषच असलें पाहिजे. पुरुषाहून विश्व ही अन्य वस्तु नाहीं. म्हणून जो प्रश्न विचारला होता कीं ' भगवन्, कोणती एक वस्तु विज्ञात झाली असतां हें सर्व विज्ञात होतें! ' त्या प्रश्नाला श्रुतीनें उत्तर दिलें आहे, तें असें आहे.

शिष्य—तें कसें ?

सिद्धान्ती—ह्या अत्यंत श्रेष्ठ, सर्व-कारण आणि सर्वनियामक पुरुषाचें ज्ञान झालें म्हणजे पुरुष हाच सर्व विश्व आहे, दुसरी कांहीं वस्तु नाहीं, असा निश्चय होतो. म्हणजे पुरुषज्ञानानें सर्व विश्वज्ञान होतें; असें तात्पर्य आहे.

शिष्य—भगवन् ! मग विश्व म्हणजे तरी काय ?

सिद्धान्ती—जें आपल्या सर्व इंद्रियांस प्रकट होतें किंवा कल्पितां येतें, ते सर्व म्हणजे विश्व होय. हें सर्व कर्मात्मक आहे, रुत आहे. अग्निहोत्रादि ज्याचें लक्षण आहे, तें कर्म, विश्व, होय. तप म्हणजे ज्ञान आणि तपानें उत्पन्न झालेलें फल तपाहून निराळें आहे. तपात्मक ज्ञानाहून त्याचें फल निराळें असतें. याप्रमाणें कर्म व तप मिळून हें सर्व होतें. पण हें सर्व ब्रह्माचें कार्य आहे. म्हणून ' हें सर्व ब्रह्म आहे, परम अमृतमय आहे, मीही ब्रह्म आहें, सारांश, मी आणि ब्रह्म एकच आहें.' असें गूढज्ञान ज्याला झालें, 'सर्व प्राण्यांच्या अंतःकरणांत वास्तव्य करणारा आत्माराम मीच आहें,' असा ज्याचा निश्चय झाला, तो अज्ञानाचें घट्ट आणि कठिण असें जें वासनात्मक गांठोडें असतें तें सोडून मोकळें करितो, जिवंत असतांना अज्ञान नाहींसें करितो, मेल्यावर नव्हे. सारांश, जिवंत असतांना अमर होतो, जीवन्मुक्त होतो हे प्रियदर्शना शिष्या! त्याचें सर्व अज्ञान नष्ट होऊन तो येथेंच मुक्त होतो. ॥ १० ॥

रंग०—ज्या अर्थी परमात्मा सर्व भूतांचा अंतरात्मा आहे, त्या अर्थी हें सर्व चराचर विश्व पुरुषापासून उत्पन्न झालें आहे, अथवा विश्वाचें उपादानकारण परमेश्वर आहे, असें ठरतें. अर्थात् परमेश्वराचें ज्ञान झालें असतां सर्व विश्वाचें ज्ञान होतें. येथील 'ब्रह्म' शब्दानें प्रकृतीहून श्रेष्ठ असणारे जे मुक्त आत्मे त्यांना अमृताप्रमाणें आनंद देणारा अक्षर पुरुष, असा अर्थ समजावयाचा आहे.

माध्व०—येथें सर्व कर्म आणि सर्व तप एकच आहे असें सांगून सर्व कर्मे एकरूपी आहेत आणि सर्व तपें एकस्वरूपी आहेत आणि पुरुष परामृत ब्रह्म आहे, असें म्हणण्याचा अभिप्राय आहे. सारांश भगवंताच्या सर्व चेष्टा आणि त्याचें सर्व ज्ञान हीं भगवत्स्वरूपी आहेत, असें ठरतें. असें ज्याला समजलें, म्हणजे सृष्टीच्या उत्पत्तीचें कर्म करून आणि ज्ञानादि गुण असून एकरस भगवान् सर्वकर्ता आहे, असें ज्यानें गुरुमुखापासून श्रवण केलें तो आपले भावरूपी अज्ञान शिथिल करितो. असें समजणें ही भगवंताची ज्ञानरूपी अंतरुपासना आहे. भगवद्गुण सांगावयाचे ते ज्ञानासाठीं व ध्यानासाठीं असतात.

द्वितीय मुण्डक प्रथमखंड समाप्त.

द्वितीय-मुंडक.

द्वितीय खंड.

मंत्र पहिला.

आविः संनिहितं गुहाचरं नाम महत्पदमत्रैतत्समर्पितम् । एजत्प्राणन्निमिषच्च यदेतज्जानथ सदसद्वरेण्यं परं विज्ञानाद्यद्वरिष्ठं प्रजानाम् ॥ १ ॥

अन्वय व अर्थ—**आविः संनिहितं** (स्वयंप्रकाश असून सर्व प्राण्यांच्या हृदयांत राहणारें व तेथें प्रकाशमान् होणारें) **गुहाचरं नाम** (ज्याचें स्वरूपज्ञान होणें दुर्घट आहे, असें प्रसिद्ध आहे) **महत्पदं** (जें सर्वांचें आश्रयस्थान आहे) **एजत्, प्राणत्, निमिषत् च यत्, एतत् अत्र एव समर्पितं** (जें जें म्हणून हलते, ज्याला प्राण आहे, ज्यांच्या उघडझांपीच्या क्रिया सर्वदा होतात, तें तें सर्व या परब्रह्माचे-ठिकाणीं समर्पित झालें आहे, असें हें परब्रह्म आहे) **यत् सदसत्, वरेण्यं, प्रजानां विज्ञानात् परं, वरिष्ठं, एतत् जानथ** (जें मूर्त व अमूर्ताचा आश्रय

आहे, जें सर्ववर्णनीय आहे, जें सर्व प्राण्यांच्या ज्ञानाहून श्रेष्ठ व विलक्षण अगोचर आहे, आणि जें सर्वश्रेष्ठ आहे, त्याचें ज्ञान करून घ्या.) ॥ १ ॥

अरूपं सदक्षरं केन प्रकारेण विज्ञेयमित्युच्यते । आविः प्रकाशं संनिहितं वागाद्युपाधिभिर्व्वलति भ्राजतीति श्रुत्यन्तराच्छब्दादीनुपलभमानवदवभासते । दर्शनश्रवणमननविज्ञानाद्युपाधिधर्मैराविर्भूतं सल्लक्ष्यते हृदि सर्वप्राणिनाम् । यदेतदाविर्ब्रह्म संनिहितं सम्यक्स्थितं हृदि तद्गुहाचरं नाम गुहायां चरतीति दर्शनश्रवणादिप्रकारैर्गुहाचरमिति प्रख्यातम् । महत्सर्वमहत्त्वात्पदं पद्यते सर्वेणेति सर्वपदार्थास्पदत्वात् । कथं तन्महत्पदमित्युच्यते । यतोऽत्रास्मिन्ब्रह्मण्येतत्सर्वं समर्पितं प्रवेशितं रथनाभाविवारा एजच्चलत्पक्ष्यादि । प्राणत्प्राणितीति प्राणापानादिमन्मनुष्यपश्वादि । निमिषच्च यन्निमेषादिक्रियावच्चानिमिषच्चशब्दात्समस्तमेतदत्रैव ब्रह्मणि समर्पितम् । एतद्यदास्पदं सर्वं जानथ हे शिष्या अवगच्छथ तदात्मभूतं भवतां सदसत्स्वरूपम् । सदसतोर्मूर्तामूर्तयोः स्थूलसूक्ष्मयोस्तद्व्यतिरेकेणाभावात् । वरेण्यं वरणीयं तदेव हि सर्वस्य नित्यत्वात्प्रार्थनीयं परं व्यतिरिक्तं विज्ञानात्प्रजानामिति व्यवहितेन संबन्धो यल्लौकिकविज्ञानागोचरमित्यर्थः । यद्वरिष्ठं वरतमं सर्वपदार्थेषु वरेषु तद्ब्रह्मैकं ब्रह्मातिशयेन वरं सर्वदोषरहितत्वात् ॥ १ ॥

शिष्य—ज्याला कोणत्याही प्रकारचें रूपरंगादि गुण नाहींत, त्या अविनाशी परब्रह्माचें ज्ञान कसें करून घ्यावें ?

सिद्धान्ती—ऐकः ' ज्वालामय आहे ' ' प्रकाशमय आहे ' इत्यादि श्रुतींवरून असें स्पष्ट सिद्ध होतें कीं वाणी, नेत्र, कर्ण इत्यादि उपाधींच्या द्वारानें ह्या ब्रह्मास शब्द, रूप, शद्ब, इत्यादि गुणांस प्रकाशितां येतें, असें सिद्ध होऊन हें ब्रह्म जीवस्वरूपद्वारां प्रकाशित होतें. ' आविः ' या शब्दाचा प्रस्तुतस्थलीं प्रकाश हा अर्थ आहे. तात्पर्य हें ब्रह्म विश्वांची उपलब्धी करितें म्हणून तें प्रकाशवंत आहे, असें ठरतें. रूपदर्शन, शब्दश्रवण, विषयचिंतन, विषयविज्ञान इत्यादि उपाधिधर्मांनीं (नेत्र, कर्ण, मन, बुद्धि इत्यादि ज्या उपाधि आहेत, त्यांच्या गुणधर्मांनीं) हें ब्रह्म प्रकट होऊन लक्षितां येतें आणि तें जीवांच्या हृदयांत वास्तव्य करितें, असें ठरतें. वत्सा ! हें दर्शन, श्रवण, इत्यादि स्वरूपांनीं प्रकट होणारें ब्रह्म जीवहृदयांत व्यवस्थितरीतीनें राहिलें असतें म्हणून त्याला ' गुहाचर ' असें म्हणतात, ही गोष्ट सर्वप्रसिद्ध आहे. ' गुहाचर ' असें नांव मिळण्याचें रहस्य हें आहे कीं हें ब्रह्म दर्शनश्रवणादिप्रकारांनीं गुहेमध्यें (हृदयामध्यें)

संचार करितें. गुहेमध्यें राहणारें ते 'गुहाचर' हें सर्वांहून अत्यंत मोठें असून पुनः याच्या आश्रयाला सर्व पदार्थ येतात म्हणून ब्रह्माला 'महत्पद'. अशी संज्ञा आहे.

शिष्य—ब्रह्म हें महत्पद आहे, हें कसें ?

सिद्धान्ती—कारण या ब्रह्मामध्यें अंतरिक्षांत संचार करणारे पक्ष्यादि, प्राणापानादि व्यवहार करणारे मनुष्यपश्वादि, तसेच निमेषादि-झांकणें, गुप्त होणें इत्यादि क्रिया करणारे आणि तद्विरुद्ध म्हणजे प्रकट होण्याची क्रिया करणारे (आविर्भाव व तिरोभाव करणारे) सर्व पदार्थ जे आहेत, त्या सर्वांचें समर्पण या एका ब्रह्मांत होतें. रथाच्या सर्व अरा रथनाभीमध्यें समर्पित होतात, तद्वत् सर्व पदार्थ ब्रह्माच्या आश्रयानें राहतात.

शिष्य—'अनिमेष' हा शब्द मुळमंत्रांत नाहीं.

सिद्धान्ती—पण वाक्याच्या अपेक्षेनें व 'आणि' या शब्दानें त्याचें अस्तित्व सिद्ध होते व श्रुति ही अन्यठिकाणीं निमेषाबरोबर अनिमेषाचा उच्चार करिते. असो; सर्वांचें आश्रयस्थान असणारें हें ब्रह्म 'हे शिष्यहो ! तुमचाही आत्मा आहे, (तुमचेंही आश्रयस्थान आहे) हें जाणून घ्या' असें श्रुतिमाता मोठ्या कळकळीनें सांगत आहे. तसेंच, हें सत् व असत् (मूर्त व अमूर्त, स्थूल व सूक्ष्म) यांचें मूळस्वरूप आहे. हें जर नसेल तर सर्व मूर्तामूर्तवस्तु शून्यरूप होतील. सारांश, याच्या आधारानें मूर्तामूर्तवस्तु राहतात. हें वरेण्य म्हणजे सर्वांनीं स्तुति करण्यास व सर्वांनीं प्रार्थना करण्यास योग्य आहे, कारण तें नित्य आहे.

शिष्य—तसेंच, हें सर्व लोकांच्या विज्ञानांहून पर म्हणजे अत्यंत निराळें आहे. सारांश व्यावहारिक ज्ञानविज्ञानाला हें चिद् ब्रह्मरूप अगोचर आहे. येथें 'प्रजानां' याचा संबंध विज्ञानाशीं आहे. होयना ?

सिद्धान्ती—होय. येथें अमळसा दूरान्वय आहे. अर्थातच हें सर्व वरिष्ठ (सर्व श्रेष्ठपदार्थांहून जास्त श्रेष्ठ) आहे. ब्रह्म हें सर्वथा दोषशून्य आहे, म्हणून तें सर्व पदार्थापेक्षां अत्यंत श्रेष्ठ असलें पाहिजे, हें उघडच झालें. हें एकच एक आहे. सारांश हें गूढ आहे तरी सर्वप्रकाशक, सर्वाधार, सर्वरूप, सर्वागोचर व सर्वश्रेष्ठ आहे. ॥ १ ॥

रंगरामा०—'आविः'=अव्यय; अविनाशी. हें अव्यय ब्रह्म योगिलोकांना मात्र प्रत्यक्ष असतें. 'सदसद्वरेण्यं'=स्थूल आणि सूक्ष्म वस्तूंस साधार आहे म्हणून त्यांनीं प्रार्थना करण्यास योग्य-'विज्ञान=जीव.

माधव०—मागील प्रकरणांत ब्रह्म हें जगज्जन्मादि कारण आहे आणि जगत्कर्त्या ब्रह्माचें ज्ञान झालें असतां अविद्येची गांठ सैल होते हें सिद्ध केलें. आतां हें ज्ञान झाल्यावर मुमुक्षूंनीं काय करावयास पाहिजे असा प्रश्न उद्भवेल, त्याला हें उत्तर कीं, मुमुक्षूंनें विशेष-गुणविशिष्ट ब्रह्माचें श्रवण करावें, असें सांगावयाचें आहे. 'आविः' नित्य प्रकटस्वरूपी. 'एजत्'=कर्मेंद्रियव्यापारवान्. 'प्राणत्'=श्वासादि व्यापारवान्. 'निमिषत्'=ज्ञानेंद्रियव्यापारवान्. हीं तिन्हीं विशेषणें अशासाठीं उपयोजिलीं आहेत कीं जीवांचे सर्व जागृतादिस्थितिव्यापार अंतर्यामी परमेश्वराच्या आधीन आहेत असें समजावें. सदसद्वरेण्यं= मूर्तामूर्तांहून किंवा कार्यकारणाहून श्रेष्ठ. 'विज्ञानात्परं'=ब्रह्मदेवापेक्षांही श्रेष्ठ.

मंत्र दुसरा.

यदर्चिमद्यदणुभ्योऽणु च यस्मिँल्लोका निहिता लोकिनश्च । तदेतदक्षरं ब्रह्म स प्राणस्तदु वाङ्मनः । तदेतत्सत्यं तदमृतं तद्वेद्धव्यं सोम्य विद्धि ॥ २ ॥

अन्वय व अर्थ—यत् अर्चिमत्, यत् अणुभ्यः अणु, च यस्मिन् लोकाः लोकिनश्च निहिताः (जें दीप्तिमंत आहे, जें सूक्ष्माहून अति-सूक्ष्म आहे व ज्यांत सर्व भुवनें आणि भुवनस्थ लोक स्थापित झाले आहेत) **तत् एतत् अक्षरं ब्रह्म** (तें हें अविनाशि ब्रह्म आहे) **सः प्राणः** (तो प्राण आहे) **तत् उ वाङ्मनः** (तें वाणी आणि मन ही आहे) **तत् एतत् सत्यं, तत् अमृतं, तत् वेद्धव्यं** हें सत्य व अमृत आहे. त्याचा वेधकरावा.) **सोम्य ! विद्धि** (हे सौम्य, हें सर्व जाणून समाधान करून घे). ॥ २ ॥

किंच यदर्चिमद्दीप्तिमद्दीप्त्याऽऽदित्यादि दीप्यत इति दीप्तिमद्ब्रह्म । किंच यदणुभ्यः श्यामाकादिभ्योऽप्यणु च सूक्ष्मम् । चशब्दात्स्थूलेभ्योऽप्यतिशयेन स्थूलं पृथिव्यादिभ्यः । यस्मिँल्लोका भूरादयो निहिताः स्थिताः । ये च लोकिनो लोकनिवासिनो मनुष्याद्यश्चैतन्याश्रया हि सर्वे प्रसिद्धास्तदेतत्सर्वाश्रयमक्षरं ब्रह्म स प्राणस्तदु वाङ्मनो वाक्च मनश्च सर्वाणि च करणानि तद्वन्तश्चैतन्यं चैतन्याश्रयो हि प्राणेन्द्रियादिसर्वसंघातः " प्राणस्य प्राणम् " इति श्रुत्यन्तरात् । यत्प्राणादीनामन्तश्चैतन्यमक्षरं तदेतत्सत्यमवितथमतोऽमृतमविनाशि तद्वेद्धव्यं मनसा ताडयितव्यम् । तस्मिन्मनःसमाधानं कर्तव्यमित्यर्थः । यस्मादेवं हे सोम्य विद्धयक्षरे चेतः समाधत्स्व ॥ २ ॥

सिद्धान्ती—आणखी, हें ब्रह्म प्रकाशवंत असून आपल्या प्रकाशानें मोठमोठ्या आदित्यादि जडांस ही प्रकाशित करून पुनः त्यांस प्रकाशवंत करितें. तसेंच श्यामाक-धान्याच्या कणापेक्षांही अति सूक्ष्म असून तें पृथिव्यादि स्थूलपदार्थांपेक्षां अत्यंत मोठें आहे.

शिष्य—मंत्रांत स्थूलाचा निर्देश नाहीं.

सिद्धान्ती—अरे ! ' च ' (आणि) हें पद आहेना ? त्यावरून स्थूलाचा निर्देश सहज होतो. पुनः; पृथ्वी आदि सर्व सप्त लोक त्याच्यामध्यें स्थित झालें आहेत; इतकेंच नव्हे, तर या सप्तभुवनांत राहणारे मनुष्यादि सर्व प्राणीही ब्रह्मचैतन्याच्या आश्रयानें सिद्ध होतात, हें सर्वप्रसिद्ध आहे. याप्रमाणें सर्व चराचराचा आश्रय असणारें तें हें अविनाशि ब्रह्म आहे. तें सर्व प्राणवंताचा प्राण आणि वाणी व मन असणाऱ्या—सर्व दशेन्द्रियें असणाऱ्या—प्राण्यांचें तें मनादिइंद्रियें आहे. 'ब्रह्म प्राणांचा प्राण आहे' ही श्रुति-स्पष्ट असें सांगते कीं प्राणेंद्रियादि सर्व शरीरसंघात हा ब्रह्मचैतन्याच्या मात्र आश्रयानें भासतो. असो; हें जें प्राणादिकांचें अंतर्यामी व अविनाशी चैतन्य आहे, तें सत्यरूप (सत्तारूप) आहे आणि म्हणूनच तें अमृत म्हणजे अविनाशि व अविकारि आहे. त्या ह्या ब्रह्माला मनानें वेध करावा; म्हणजे तें आपलेंसें करून घेऊन त्याचे ठिकाणीं मनाचें समाधान करावें, शुद्ध मनाची स्थापना करावी, हें अवश्य आहे. असें आहे म्हणून श्रुति म्हणते कीं ' हे सौम्य ! अक्षर (अविनाशि) जें ब्रह्म, त्याच्या ठिकाणीं अंतःकरणाचें समर्पण करून समाधान करून घे. सारांश, मागील व या मंत्रांत ब्रह्मस्वरूपाचें दिग्दर्शन लक्षणारूपानें करून जीवानें त्या स्वरूपाचें ध्यान करून समाधिवृत्तींत असावें, असा जीव-कल्याणकारी श्रुतीनें उतमोत्तम उपदेश केला आहे. हा उपदेशच पुढील मंत्रांत स्पष्ट केला आहे. ॥ २ ॥

रंगरामानुज—' अर्चिमत् ' = दीप्तिमान्. अर्थातच परमेश्वराला शरीर आहे आणि शरीरद्वारानें तो प्रकाशितो हें सिद्ध आहे. ' अमृतं '=असंसारीमुक्तांनीं भोगण्यास योग्य.

माध्व०—' प्राण '=मुख्य प्राणाचा अंतर्यामी. अदृश्यत्वादि गुण असणारा, सृष्टि उत्पन्न करणारा. अक्षरस्वरूपी सकलगुणपूर्ण भगवान् सकल प्राण्यांचा प्रेरक आहे. म्हणून त्याला प्राण असें म्हटलें. वाक् आणि मन यांचाही अर्थ अभिमानी देवतांचा अंतर्यामी असाच करावयाचा आहे. ' सत्य '=मुक्तामुक्तांचा नियामक. ' अमृत '= नित्यमुक्त. एवंगुणविशिष्ट ब्रह्माचें ज्ञानीभक्तानें **मनन** करावें.

मंत्र तिसरा.

धनुर्गृहीत्वौपनिषदं महास्त्रं शरं ह्युपासानिशितं संधयीत । आयम्य तद्भावगतेन चेतसा लक्ष्यं तदेवाक्षरं सोम्य विद्धि ॥ ३ ॥

अन्वय व अर्थ—**औपनिषदं महास्त्रं धनुः गृहीत्वा उपासानिशितं शरं हि संधयीत** (उपनिषत् संबंधीं व मोठे सामर्थ्यवान्—फार लांबीच्या फेंकी करण्यास समर्थ असणारें विस्तीर्ण—धनुष्य घेऊन उपासनेनें तीक्ष्ण

केलेल्या बाणाची योजना करा) **आयम्य तत्भावगतेन चेतसा लक्ष्यं** (आणि प्रत्यंचा–धनुष्याची दोरी–दीर्घ ओढून म्हणजे त्या ब्रह्माचे ठिकाणीं भावनायोगें सर्वव्यापी झालेल्या अंतःकरणानें ब्रह्माचें–लक्ष्याचें–जें आपल्यास मिळवावयाचें आहे, त्याचें–ध्यान करा.) **तत् एव अक्षरं सोम्य ! विद्धि** (हे सोम्य, तेंच हे अक्षर अविनाशि ब्रह्म आहे, असें जाण.) सारांश, वैदिकउपासनेनें एकाग्र झालेलें चित्त परब्रह्माचे ठिकाणीं लावावें. धनुष्याला बाण लावून जसा आपण आपल्या लक्ष्यावर नेम धरितों तसाच आपल्या संस्कृत अंतःकरणानें परब्रह्माचा वेध करावा. ॥ ३ ॥

कथं वेद्धव्यमित्युच्यते । धनुरिष्वासनं गृहीत्वाऽऽदायौपनिषद-मुपनिषत्सु भवं प्रसिद्धं महास्त्रं महच्च तदस्त्रं च महास्त्रं धनुस्तस्मि-न्शरम् । किंविशिष्टमित्याह । उपासानिशितं संतताभिध्यानेन तनूकृतं संस्कृतमित्येतत् । संधयीत संधानं कुर्यात् । संधाय चाऽऽयम्याऽऽकृष्य सेन्द्रियमन्तःकरणं स्वविषयाद्विनिवर्त्य लक्ष्य एवाऽऽवर्जितं कृत्वेत्यर्थः । न हि हस्तेनैव धनुष आयमनमिह संभवति । तद्भावगतेन तस्मिन्ब्रह्मण्यक्षरे लक्ष्ये भावना भावस्तद्भ-तेन चेतसा लक्ष्यं तदेव यथोक्तलक्षणमक्षरं सोम्य विद्धि ॥ ३ ॥

सिद्धा०–वेध कसा करावयाचा तें या मंत्रांत सांगितलें आहे. उपनिषदाच्या साहाय्यानें सिद्ध झालेलें आणि लांबलांबच्या टप्यावरील पदार्थांचा वेध करितां येईल, अशा शक्तीचें प्रणवरूपि विस्तीर्ण धनुष्य घेऊन त्याच्यावर अखंड एकाग्र ध्यानानें अति तीक्ष्ण आणि संस्कृत झालेल्या मनोपाधिक जीवरूपी बाणाची योजना करावी. हें बाण-संधान करून आणि धनुष्याची प्रत्यंचा ओढून म्हणजे इंद्रियांसहीत अंतः करणाला आपापल्या विषयांपासून निवृत्त करून ब्रह्मरूपी जो आपला वेध्य पदार्थ त्याला मात्र आपल्या बाणाचा म्हणजे अंतःकरणाचा नेम बिनचुक लागेल असें करा. अर्थातच आपले, धनुष्य आपल्या हातानें आपण लांब आखूड करितों, तसा प्रकार येथें नाहीं. तर अविनाशी ब्रह्माच्या ठिकाणीं दृढ भावना अंतःकरणाची झाली आहे, अशा स्वरूपानें ब्रह्माचें आकलन करावें. अविनाशिपणा इत्यादि पूर्वोक्त स्वरूप हेंच ज्याचें लक्षण आहे, तें ब्रह्म होय, हें सर्वांनीं योग्यरीतीनें समजून घेतलें पाहिजे. सारांश उपनिषदांत सांगितलेल्या प्रणवोपासनेनें व संस्कृत झालेल्या अंतःकरणानें एकाग्र चिंतन करूं लागावें हा तात्पर्यार्थ आहे. ॥ ३ ॥

रंगरामानुज—' धनुः '=प्रणवनामक धनुष्य. भगवंताच्या उपासनेनें स्थूल-सूक्ष्मशरीरांपासून निराळें केलेला; अक्षरादि आठ लक्षणांनीं युक्त, असा जो जीवात्मा तो धनुष्यास लावावयाचा बाण आहे असें समजावें. ' आयम्य '=जीव आणि परमात्मा हे शेषशेषी आहेत, जीव हा परमात्म्याचा एक शरीरप्रकार आहे, असें अनुसंधान ठेऊन. ' भागवतेन ' असाही एक पाठ या आचार्यास उपलब्ध झाला होता असें दिसतें. ' भावगत ' असा एक पाठ घेतला तर ' भावगतेन चेतसा आयम्य '= मनानें अन्य विषय वर्ज करून अक्षर जें परब्रह्म तिकडे आपलें चित्त एकाग्र करण्याची स्थिति, असा अर्थ करावा.

माध्व०—' महास्त्र '=मूलमंत्राचे व्यंजक जें ओंकार स्वरूप तें. ' उपासना '= श्रवणमननात्मक शास्त्राभ्यास. ' विद्धि '=ध्यानकर.

मंत्र चवथा.

प्रणवो धनुः शरो ह्यात्मा ब्रह्म तल्लक्ष्यमुच्यते ।
अप्रमत्तेन वेद्धव्यं शरवत्तन्मयो भवेत् ॥ ४ ॥

अन्वय व अर्थ—प्रणवः धनुः, हि आत्मा शरः, ब्रह्म तल्लक्ष्यं उच्यते (ओंकार हें आपलें धनुष्य, आत्मा हा बाण आणि त्या बाणाचें लक्ष्य म्हणजे ब्रह्म होय.) **अप्रमत्तेन वेद्धव्यं** (आणि प्रमत्त न होतां–पूर्ण काळजीनें–वेध घेऊन बाण सोडावा.) **शरवत् तन्मयः भवेत्** (बाण लक्ष्याकडे जाऊन त्यांत शिरतो व तेथें तन्मय होतो, त्याप्रमाणें आपला आत्मा ब्रह्मापर्यंत जाऊन तन्मय होईल.) ॥ ४ ॥

यदुक्तं धनुरादि तदुच्यते । प्रणव ओंकारो धनुः । यथेष्वासनं लक्ष्ये शरस्य प्रवेशकारणं तथाऽऽत्मशरस्याक्षरे लक्ष्ये प्रवेशकारणमोंकारः । प्रणवेन ह्यभ्यस्यमानेन संस्क्रियमाणस्तदालम्बनोऽप्रतिबन्धेनाक्षरेऽवतिष्ठते यथा धनुषाऽऽस्त इषुर्लक्ष्ये । अतः प्रणवो धनुरिव धनुः । शरो ह्यात्मोपाधिलक्षणः पर एव जले सूर्यादिवदिह प्रविष्टो देहे सर्वबौद्धप्रत्ययसाक्षितया स शर इव स्वात्मन्येवार्पितोऽक्षरे ब्रह्मण्यतो ब्रह्म तल्लक्ष्यमुच्यते लक्ष्य इव मनःसमाधित्सुभिरात्मभावेन लक्ष्यमाणत्वात् । तत्रैवं सत्यप्रमत्तेन बाह्यविषयोपलब्धितृष्णाप्रमादवर्जितेन सर्वतो विरक्तेन जितेन्द्रियेणैकाग्रचित्तेन वेद्धव्यं ब्रह्म लक्ष्यम् । ततस्तद्वेधनादूर्ध्वं शरवत्तन्मयो भवेत् । यथा शरस्य

लक्ष्यैकात्मत्वं फलं भवति । तथा देहाद्यात्मप्रत्ययतिरस्करणेनाक्षरै-
कात्मत्वं फलमाप्नोत्येवेत्यर्थः ॥ ४ ॥

सिद्धा०—या मंत्रांत धनुष्य इत्यादि कोणते पदार्थ हें सांगितलें आहे. ओंकाररूपी प्रणव हे मागील मंत्रांतील उपनिषत्पठित धनुष्य होय. ज्या प्रमाणें धनुष्य हें लक्ष्यामध्यें बाणाचा प्रवेश करण्यास साधनीभूत होतें, त्याप्रमाणें आत्मारूपी बाणाचा प्रवेश ब्रह्मामध्यें करण्याला ओंकार हें उत्कृष्ट साधन आहे. प्रणवाचा सतत अभ्यास केला असतां चित्त संस्कृत होतें आणि त्याच्या साहाय्यानें आपलें चित्त कांहीं एक विघ्न न येतां परब्रह्माचें ठिकाणीं जाऊन तेथेंच राहतें. जसा बाण धनुष्याच्या साहाय्यानें लक्ष्यापर्यंत जाऊन पोंहचतो, त्याप्रमाणें आपलें चित्त अथवा सोपाधिक आत्मा ब्रह्माचें ठिकाणीं स्थिर होतो. म्हणून प्रणवाला धनुष्याची उपमा दिली आहे. येथील बाण म्हणजे आत्मा होय. हा ही सोपाधिक परमात्माच आहे; पण सूर्य ज्याप्रमाणें प्रकाशरूपानें उदकामध्यें प्रवेश करून प्रतिबिंबतो,त्याप्रमाणें देहामध्यें शिरतो, तोही आत्माच आहे.कारण तो आपल्या सर्व बुद्धिप्रत्ययांचा साक्षी असतो. हा लक्ष्यामधील बाणाप्रमाणें आपल्या अक्षरस्वरूपीं ब्रह्मामध्यें, आपल्यास अर्पण करून घेतो, म्हणून ब्रह्माला लक्ष्य (वेध घेण्याचें स्थान) म्हटलें आहे. ज्यांना आपल्या मनाला समाधिसुखाची शांति मिळवून घ्यावयाची आहे. ते आत्मबुद्धीनें ब्रह्माकडे आपलें चित्त सर्वस्व एकाग्रतेनें अर्पण करितात. असा प्रकार आहे म्हणून ब्रह्माला लक्ष्य म्हटलें. साधकानें बाह्यविषयांपासून उत्पन्न होणारी तृष्णा व मोह हीं सर्व सर्वथा टाकून देऊन, सारांश, मनोनिग्रह करून व सर्वस्वी विरक्त होऊन एकाग्रचित्तानें ब्रह्मरूपी जें लक्ष्य तेथें आपल्या आत्म्याचा नेम धरावा. ह्या काळजीपूर्वक धरलेला सावधान नेम सिद्ध झाला म्हणजे बाण जसा लक्ष्यांत प्रवेश करितो, त्याप्रमाणें साधकालाही ब्रह्मामध्यें प्रवेश करितां येतो. बाण आणि लक्ष्य हीं एकात्मक होतात. त्याप्रमाणें जीवात्मा आणि ब्रह्म हीं एकात्मक होतात. सारांश, सामान्य जीवाला देहादिकांचे ठिकाणीं (अनात्मक वस्तूचे ठिकाणीं) जो आत्मप्रत्यय (देह हाच आत्मा आहे अशी प्रतीति) येत असतो , तिचा साधकाचे ठिकाणीं नाश होऊन तो अविनाशिब्रह्माशीं सायुज्यतारूपी फल प्राप्तकरून घेतो. ॥ ४ ॥

रंगरामानुज—'वेध'= एकाग्रध्यान. 'तन्मय'= भेद करणारा जो आकार त्याचें मुळींच स्मरण नसणें.

माध्व०—तन्मय=ब्रह्मप्रचुर, ब्रह्मलग्न. याप्रमाणें दोन, तीन, चार या तीन मंत्रांतील उपदेशानुसार श्रवणमननध्यानानें भगवंताची मात्र उपासना करावी असें श्रुतीनें ठरविलें.

मंत्र पांचवा.

यस्मिन्द्यौः पृथिवी चान्तरिक्षमोतं मनः सह प्राणैश्च सर्वैः । तमेवैकं जानथ आत्मानमन्या वाचो विमुञ्चथामृतस्यैष सेतुः ॥ ५ ॥

अन्वय व अर्थ—यस्मिन् द्यौः, पृथिवी च अंतरिक्षं, सर्वैः प्राणैः सह मनः च, ओतं; तं एव एकं आत्मानं जानथ (ज्याच्यामध्यें स्वर्ग, पृथिवी आणि अंतरीक्ष, तसेंच सर्व प्राणांसह मन समर्पित होतें, त्या मात्र अद्वितीय आत्म्याचें ज्ञान करून घ्या.) **अन्याः वाचः विमुञ्चथ** (दुसऱ्या सर्व वाणी–विद्या–टाकून द्या) **एषः अमृतस्य सेतुः** (हा आत्मा मोक्षाचा सेतु–भवसागर उतरून जाण्याचा पूल–आहे.) ॥ ५ ॥

अक्षरस्यैव दुर्लक्ष्यत्वात्पुनःपुनर्वचनं सुलक्षणार्थम् । यस्मिन्नक्षरे पुरुषे द्यौः पृथिवी चान्तरिक्षं चोतं समर्पितं मनश्च सह प्राणैः करणैरन्यैः सर्वैस्तमेव सर्वाश्रयमेकमद्वितीयं जानथ जानीथ हे शिष्याः । आत्मानं प्रत्यक्स्वरूपं युष्माकं सर्वप्राणिनां च ज्ञात्वा चान्या वाचोऽपरविद्यारूपा विमुञ्चथ विमुञ्चत परित्यजत । तत्प्राकाश्यं च सर्वं कर्म ससाधनम् । यतोऽमृतस्यैष सेतुरेतदात्मज्ञानममृतस्यामृतत्वस्य मोक्षस्य प्राप्तये सेतुरिव सेतुः संसारमहोदधेरुत्तरणहेतुत्वात्तथा च श्रुत्यन्तरम्—" तमेव विदित्वाऽतिमृत्युमेति नान्यः पन्था विद्यतेऽयनाय " इति ॥ ५ ॥

सिद्धान्ती—याही मंत्रांत अविनाशी आत्म्याचें स्वरूप पुनः सांगितलें आहे. कारण, ब्रह्माचें ज्ञान होणें, ज्ञानाच्या कक्षेंत ब्रह्म येणें, अत्यंत दुःसाध्य वस्तु आहे. विषय अवघड आहे म्हणून पुनःपुनः तोच विषय श्रुतिमाऊली निरनिराळ्या स्वरूपांनीं सांगत आहे. हेतू हाकीं, अनेक प्रकारांनीं एकच वस्तूचें वर्णन केलें असतां अवघड वस्तूही सवघड होते. असो. श्रुति म्हणतेः ज्या अविनाशी परमात्म्यामध्यें स्वर्ग, पृथ्वी, अंतरिक्ष हे तीन लोक आणि सर्व इंद्रियांसह व प्राणांसह मन समर्पित होतें, तो सर्वांस आश्रय देणारा अद्वितीय परमात्मा मात्र, हे साधक शिष्य हो, तुम्हीं सर्वांनीं समजून घ्यावा. हा तुम्हा सर्वांचा व सर्व प्राण्यांचा प्रत्यगात्मा पूर्णपणानें समजून घ्या आणि दुसऱ्या सर्व अपरविद्यारूपी विषयांचा व त्यांचे चर्चेचा परित्याग करा. कारण या विद्या जीं जीं कर्में व कर्मसाधनें प्रकाशित करितात, त्या सर्व अनित्यवस्तूंस आत्म-

प्रकाशानें मात्र अस्तित्व प्राप्त होतें. असो, मोक्ष मिळविण्याला जर कांहीं एक साधन असेल तर तें एक आत्मज्ञान मात्र होय. संसाररूपी महासागरांतून पार तरून नेण्यास एक आत्मज्ञान मात्र सर्वथा समर्थ आहे. "आत्मज्ञान झालें तर मात्र मरणाची भीति नाहींशी होऊन मोक्ष मिळतो. ब्रह्मप्राप्तीला (मोक्षप्राप्तीला) आत्मज्ञानाशिवाय दुसरें कोणतेंही साधन नाहीं." आम्ही म्हणतों त्याला ही श्रुति प्रमाण आहे. ॥ ५ ॥

रंगरामानुज—सर्व वस्तूंचा समवाय करणारा (उपादानकारण असणारा) परमेश्वर सर्व-वस्तु-नियंता असून सर्व-व्यापक आहे, असें जाणून अनात्मविषया-संबंधानें बोलणें टाकून द्यावें, असा या मंत्रांत उपदेश केला आहे.

माध्व०—परमेश्वर मुक्तांचा आश्रय आहे. 'प्राण' = ज्याच्यामध्यें सर्व प्राण आणि सर्व इंद्रियें आश्रय घेऊन राहिलीं आहेत, त्या परमेश्वराचें मात्र ज्ञान करून घ्या. हे सज्जन हो ! तुम्हांस मुक्ति हवी असेल तर दुसऱ्या सर्व देवतांचीं उपासना सोडून द्या. 'अमृत' = मुक्त. परमेश्वर हा मुक्तांचा सेतु किंवा आश्रयस्थान आहे.

मंत्र सहावा.

अरा इव रथनाभौ संहता यत्र नाड्यः स एषोऽन्तश्चरते बहुधा जायमानः । ओमित्येवं ध्यायथ आत्मानं स्वस्ति वः पराय तमसः परस्तात् ॥ ६ ॥

अन्वय व अर्थ—**रथनाभौ अराः इव यत्र नाड्यः संहताः** (ज्याप्रमाणें चाकाच्या सर्व अरा रथाच्या तुंब्यामध्यें एकत्र होतात, त्याप्रमाणें ज्या हृदयाच्या ठिकाणीं सर्व नाड्या एकत्र होतात) **सः एषः बहुधा जायमानः अंतः चरते** (त्या हृदयांत वास्तव्य करून 'अनेक स्वरूपें धारण करणारा' अद्वितीय आत्मा सुखानें संचार करितो.) **ॐ इति एवं आत्मानं ध्यायथ** (या आत्मारामाचें ओंकारस्वरूपानें ध्यान करा.) **वः स्वस्ति** (तुमचें कल्याण असो.) **तमसः परस्तात् पराय** (अज्ञान अंधःकाराच्या पलीकडे जाऊं इच्छिणारे जें तुम्हीं त्यांनीं 'ॐकार हें ब्रह्म आहे,' असें ध्यान करावें.) ॥ ६ ॥

किंच । अरा इव । यथा रथनाभौ समर्पिता अरा एवं संहताः संप्रविष्टा यत्र यस्मिन्हृदये सर्वतो देहव्यापिन्यो नाड्यस्तस्मिन्हृदये बुद्धिप्रत्ययसाक्षिभूतः स एष प्रकृत आत्माऽन्तर्मध्ये चरते

चरति वर्तते । पश्यञ्छृण्वन्मन्वानो विजानन्बहुधाऽनेकधा क्रोध-हर्षादिप्रत्ययैर्जायमान इव जायमानोऽन्तःकरणोपाध्यनुविधायित्वाद्वदन्ति लौकिका हृष्टो जातः क्रुद्धो जात इति । तमात्मानमोमित्येवमोंकारालम्बनाः सन्तो यथोक्तकल्पनया ध्यायथ चिन्तयत । उक्तं वक्तव्यं च शिष्येभ्य आचार्येण जानता । शिष्याश्च ब्रह्मविद्याविविदिषुत्वान्निवृत्तकर्माणो मोक्षपथे प्रवृत्ताः । तेषां निर्विघ्नतया ब्रह्मप्राप्तिमाशास्त्याचार्यः । स्वस्ति निर्विघ्नमस्तु वो युष्माकं पराय परकूलाय । परस्तात्कस्मादविद्यातमसः । अविद्यारहितब्रह्मात्मस्वरूपगमनायेत्यर्थः ॥ ६ ॥

सिद्धान्ती—आणखी म्हणतात. ज्याप्रमाणें रथनाभीमध्यें (तुंब्यामध्यें) चाकाच्या सर्व अरा एकत्र होतात, त्याप्रमाणें सर्व देहभर संचार करणाऱ्या नाड्या ज्या हृदयांत एकत्र होतात, त्या हृदयांत बुद्धिप्रत्ययांचा साक्षी असणारा हा प्रस्तुत विषयाचा नायक प्रत्यगात्मा, अंतर्यामीपणानें वास्तव्य करितो. आणि पाहतांना ऐकतांना, विचार करतांना, जाणतांना, अशा अनेकप्रकारांनीं उपलब्ध होतो. कधीं रागावलेला, कधीं हर्षभरित असलेला असा तो दिसतो. जणूं काय हा प्रत्येकवेळीं उत्पन्न होतोसाच दिसतो. कारण, अंतःकरणनामक उपाधीच्या द्वारानें हा प्रकट होतो. सामान्यलोक म्हणूं लागतात कीं, याला आनंद झाला आहे किंवा हा रागावला आहे. (सारांश, कधीं रागावलेला, कधीं आनंदित असलेला असा हा आत्मा सामान्य लोकांस नित्य उत्पन्न होतोसा दिसतो. एक असूनही तो अनेक असावा असा भास होतो.) असो, ह्या अद्वितीय आत्म्याचें ध्यान ओंकाराचा आश्रय घेऊन दोन ते सहा मंत्रांत सांगितल्याप्रमाणें एकाग्रचित्तानें करीत जावें, असा श्रुतीचा उपदेश आहे. हा विधि आचार्यानें योग्य शिष्यांस सांगून त्यांस ओंकार ध्यानपर करावें. सामान्यतः खरा शिष्य तो होय कीं जो ब्रह्मविद्येचें ज्ञान व प्राप्ति करून घेण्याची तीव्र इच्छा करितो; यासाठीं कर्मांपासून निवृत्त होतो; आणि मोक्षप्राप्तीसाठीं दृढ उद्योग करितो. याप्रमाणें ज्ञानी गुरु मुमुक्षुशिष्यांस वरील प्रकारचा उपदेश करून त्यांचा मार्ग निर्विघ्न व्हावा यासाठीं एकनिष्ठशिष्यांना आशिर्वाद देतात; तो असा. हे शिष्य हो ! अविद्यानामक अंधकाराच्या दुसऱ्या तीराला जाऊन मोक्षप्राप्तीची इच्छा करणारे शिष्य हो ! तुमच्या मार्गांत येणारी विघ्नें नाहींशी होवोत ! अविद्याशून्य जें ब्रह्मात्मैक्यज्ञान तिकडे जात असतां तुमचें सदा सर्वदा कल्याण असो. ॥ ६ ॥

रंगरामानुज—आपला स्वभाव सोडून न देतां देवादि सर्व चराचर भूतांचें स्वरूप, आकार, गुण, कर्म, यांनीं समन्वित असणारा परमेश्वर स्वतःच्या इच्छेनें अनेक स्वरूपें धारण करितो. ' पाराय ' =पलीकडच्या तीरावर प्राप्त होण्यासाठीं.

माध्व०—हृदयांत राहणारा विष्णु एकस्वरूपानें किंवा अनेकस्वरूपानें स्वेच्छेनें प्रकट होतो आणि सर्वभूतांचे नियमन करितो. परमेश्वराचें ध्यान करावयाचें ते ओंकारस्वरूपानें, गुणपूर्णत्वस्वरूपानें करावें, निर्गुणत्वप्रकारानें करूं नये. 'तमः' अव्यक्त. 'पराय'=प्राप्त करून घेण्यासाठीं. 'अंतः' = इंद्रियांच्या अंतर्यामी.

मंत्र सातवा.

यः सर्वज्ञः सर्वविद्यस्यैष महिमा भुवि दिव्ये ब्रह्मपुरे ह्येष व्योम्न्यात्मा प्रतिष्ठितः। मनोमयः प्राणशरीरनेता प्रतिष्ठितोऽन्ने हृदयं संनिधाय। तद्विज्ञानेन परिपश्यन्ति धीरा आनन्दरूपममृतं यद्विभाति ॥ ७ ॥

अन्वय व अर्थ—यः सर्वज्ञः, सर्वविद्, यस्य एषः महिमा भुवि, दिव्ये ब्रह्मपुरे, हि एषः आत्मा व्योम्नि प्रतिष्ठितः (जो सर्वज्ञ आहे, सर्वजाण आहे, ज्याचा महिमा ह्या लोकीं व दिव्य ब्रह्मलोकीं आहे आणि जो आत्मा अंतरिक्ष व्यापून राहिला आहे.) मनोमयः, प्राणशरीरनेता हृदयं संनिधाय अन्ने प्रतिष्ठितः (हा मनोमय असणारा, प्राणाचा व शरीराचा नायक हृदयामध्यें राहून अन्नामध्यें प्रतिष्ठित झाला आहे.) तद्विज्ञानेन यत् आनंदरूपं अमृतं विभाति—तत् धीराः परिपश्यंति (यांचें ज्ञान झालें असतां जें सर्वदा आनंदरूप आहे आणि अमृतरूप असें प्रकाशत आहे, त्याचें पूर्ण दर्शन विवेकी पुरुषास होतें.) ॥ ७ ॥

योऽसौ तमसः परस्तात्संसारमहोदधिं तीर्त्वा गन्तव्यः परविद्याविषय इति स कस्मिन्वर्तत इत्याह। यः सर्वज्ञः सर्वविद्याख्यातः। तं पुनर्विशिनष्टि। यस्यैष प्रसिद्धो महिमा विभूतिः। कोऽसौ महिमा। यस्येमे द्यावापृथिव्यौ शासने विधृते तिष्ठतः। सूर्याचन्द्रमसौ यस्य शासनेऽलातचक्रवदजस्रं भ्रमतः। यस्य शासने सरितः सागराश्च स्वगोचरं नातिक्रामन्ति। तथा स्थावरं जङ्गमं च यस्य शासने नियतम्। तथा चर्तवोऽयने अब्दाश्च यस्य शासनं नातिक्रामन्ति। तथा कर्तारः कर्माणि फलं च यच्छासनात्स्वं

कालं नातिवर्तन्ते स एष महिमा । भुवि लोके यस्य स एष सर्वज्ञ एवंमहिमा देवः । दिव्ये द्योतनवति सर्वबौद्धप्रत्ययकृतद्योतने ब्रह्मपुरे । ब्रह्मणोऽत्र चैतन्यस्वरूपेण नित्याभिव्यक्तत्वाद्ब्रह्मणः पुरं हृदयपुण्डरीकं तस्मिन्यद्व्योम तस्मिन्व्योम्न्याकाशे हृत्पुण्डरीकमध्यस्थे प्रतिष्ठित इवोपलभ्यते । न ह्याकाशवत्सर्वगतस्य गतिरागतिः प्रतिष्ठा वाऽन्यथा संभवति । स ह्यात्मा तत्रस्थो मनोवृत्तिभिरेव विभाव्यत इति मनोमयो मनउपाधित्वात्प्राणशरीरनेता प्राणश्च शरीरं च प्राणशरीरं तस्यायं नेता स्थूलाच्छरीराच्छरीरान्तरं प्रति । प्रतिष्ठितोऽवस्थितोऽन्ने भुज्यमानान्नविपरिणामे प्रतिदिनमुपचीयमानेऽपचीयमाने च पिण्डरूपान्ने हृदयं बुद्धिं पुण्डरीकच्छिद्रे संनिधाय समवस्थाप्य । हृदयावस्थानमेव ह्यात्मनः स्थितिर्न ह्यात्मनः स्थितिरन्ने । तदात्मतत्त्वं विज्ञानेन विशिष्टेन शास्त्राचार्योपदेशजनितेन ज्ञानेन शमदमध्यानसर्वत्यागवैराग्योद्भूतेन परिपश्यन्ति सर्वतः पूर्णं; पश्यन्त्युपलभन्ते धीरा विवेकिनः । आनन्दरूपं सर्वानर्थदुःखायासप्रहीणममृतं यद्विभाति विशेषेण स्वात्मन्येव भाति सर्वदा ॥ ७ ॥

सिद्धान्ती—अत्यंत अंधःकाराच्या पलीकडे असणारा व सर्व संसारसागर तरून जाऊन मग प्राप्ति करून घेण्यास योग्य असणारा असा जो परमात्मा ब्रह्मविद्येचा विषय आहे तो कोठें असतो ! असें विचाराल तर सांगतों ऐका:–जो सर्वज्ञ (सामान्य ज्ञानी) आणि सर्व-वेत्ता (विशेष ज्ञानी) आहे, असें मागें एका मंत्रांत सांगितलें आहे, त्याचेंच विशेष वर्णन येथें केलें आहे. श्रुति म्हणते: याचा महिमा सर्व-प्रसिद्ध आहे. तो कसा तो पहा; ज्याच्या आज्ञेनुसार मात्र स्वर्ग आणि पृथ्वी आपापल्या स्थानीं स्वव्यापार करीत राहतात; ज्याच्या आज्ञेनें सूर्यचंद्र हे वाटोळे फिरणाऱ्या अलातचक्राप्रमाणें दिङ्मंडलांत अखंड गरगर भ्रमण करीत असतात; ज्याच्या सत्तेमुळें नद्या आणि समुद्र आपआपल्यास दिलेल्या प्रांतमर्यादांचे अतिक्रमण न करितां स्वनियत व्यापार करितात; त्याचप्रमाणें स्थावर-जंगम सर्व पदार्थ ज्यानें घालून दिलेल्या नियमांप्रमाणें मात्र चालतात; तसेंच ऋतु, अयनें आणि वर्षे ज्याच्या सत्तेचें उल्लंघन केव्हांही करीत नाहींत; त्याचप्रमाणें कर्म करणारे कर्ते, कर्मे आणि कर्मफलें ज्याच्या शासनानुसार त्या त्या कालीं आपापला व्यापार बिनचुक रीतीनें करितात; त्या विश्वनियंत्या परमात्म्याच्या महिम्याचें वर्णन काय करावें ! भूलोकावर त्या सर्वज्ञ पुरुषाचें दिसणारें हें माहात्म्य केवळ अवर्णनीय आहे. तसेंच श्रुति तेजस्वी आणि प्रत्येक बुद्धिप्रत्ययाच्या द्वारानें उपलब्ध होणारें जें ब्रह्मपुर त्यांत हा प्रतिष्ठित शास्त्यासारखा

दिसतो. ब्रह्मपुर म्हणजे हृदय-कमल होय. ब्रह्म हें चैतन्यस्वरूपानें हृदयकमलांत नित्य प्रकट होत असतें म्हणून हृदयकमलाला ब्रह्मपुर असें म्हणतात. त्यामध्यें जें आकाश आहे, त्यांत, सारांश, हृदयकमलाच्या मध्यभागीं जें दहराकाश आहे, त्यांत ब्रह्म प्रतिष्ठित झालें आहे, असा भास होतो. भास होतो हें म्हणण्याचें कारण असें आहे कीं, आकाशाप्रमाणें सर्वगामी असणाऱ्या ब्रह्माला जाणें येणें आहे, किंवा राहण्याचें स्थान आहे असें म्हणणें केव्हांही मुख्यत्वानें म्हणतां येत नाहीं. म्हणून येथें लक्षणेचा आश्रय करावा लागतो आणि ब्रह्म प्रतिष्ठित होऊन उपलब्ध झाले असा भास होतो, असें म्हणावें लागतें.

असो, हा परमात्मा हृदयकमलांत राहून मनाच्या वृत्तीनीं मात्र प्रकाशित होतो म्हणून त्याला मनोमय असें म्हटलें आहे. या मनाच्या उपाधीनें तो मनोमय होतो. तो प्राणाचा आणि शरीराचा नियंता आहे व तो या उभयतांचा प्राण-शरीरांचा स्थूल शरीरापासून सूक्ष्मादि शरीरांत प्रवेश करवितो. त्याचप्रमाणें जीव ज्या अन्नाचा उपभोग घेतात त्या अन्नाच्या परिपाकामध्येंही अवस्थित असतो; म्हणजे रोजच्या रोज जीवांच्या पिंडस्वरूपांत भोगानें जी वृद्धि किंवा रोगानें जो क्षय होत असतो त्यांमध्यें राहतो; तो असा कीं, हृदयकमलाच्या अवकाशांत बुद्धीला ठेऊन मात्र तद्द्वारां आपण तेथें स्थित होतो. कारण, हृदयामध्यें प्रकटणें हीच आत्म्याची स्थिति आहे, अन्नामध्यें राहणें हें या आत्म्याला संभवत नाहीं. असो, वर सांगितल्याप्रमाणें ज्याचें माहात्म्य आहे; जो मनोमय प्राण शरीरांचा नायक आणि हृदयनिवासी परमात्मा अन्नाची व्यवस्था करितो, त्याचें स्वरूप ज्या साधकाला ज्ञातविज्ञात झालें म्हणजे शास्त्राध्ययनानें व आचार्यांच्या उपदेशानें परोक्षज्ञान उत्पन्न होऊन त्या साधकाला शम, दम, ध्यान, विषयवैराग्य यांच्या साहाय्यानें परमात्म्याचें विशेषज्ञान उत्पन्न होतें, हे धन्य साधक पूर्णस्वरूपाचा साक्षात्कार करून घेण्यास सर्वथा समर्थ होतात. हेच खरे विवेकी साधक होत. यांस झालेलें परमात्मदर्शन सर्वथा आनंदरूप आहे. मग सहजच येथें सर्व अनर्थ, सर्व दुःखें आणि सर्व आयास शून्यस्वरूप होतात. हेंच अमृतस्वरूप होय. हें आत्मरूप आपल्या स्वयंप्रकाशानें सर्वदा स्वस्वरूपीं प्रकाशित होत असतें. अशा स्वरूपाचें ज्ञान-विज्ञान विवेकी पुरुषास होतें. आत्मा व ब्रह्म एकरूप आणि एकच आहेत, असा साक्षात्कार विवेकी पुरुषांस होतो, म्हणून ते धन्य होतं. ॥ ७ ॥

रंगरामानुज—'ब्रह्मपुर'=वैकुंठलोक. 'दिव्य' यांचा संबंध 'व्योम्नि' या पदाकडे आहे. 'प्राणशरीरनेता'=जीवांस प्राण आणि शरीर प्राप्त करून देणारा, किंवा प्राण हेंच ज्याचें शरीर आहे, असा सर्व-स्वामी परमेश्वर. 'नेता'=स्वामी. 'अन्ने'=अन्नापासून उत्पन्न होणारें शरीरांत. 'विज्ञान'=परमेश्वराच्या यथार्थ स्वरूपाची ध्यानरूप उपासना.

माध्व०—'सर्वविद्'=सर्व मिळविणारा, आप्तकाम (पूर्णकाम). 'ब्रह्मपुर'=देह 'मनोमय'=मनःप्रेरक. 'अन्न'=मर्त्य. भगवान् हा हृदयाकाशांतील जीवस्वरूपांत

राहतो. (जीवांच्या अंतर्यामी राहतो). ' धीर '=श्रवणमननपूर्ण. ' अमृत ' स्वरूपानें व देहानें नाश न पावणारा. ' विभाति '=स्वयंप्रकाश असतो. सारांश, सर्वज्ञ आणि पूर्णकाम परमेश्वर देहांतील हृदयाकाशांत प्रतिष्ठित झाला आहे. हा मनःप्रेरक आणि प्राणशरीरनियंता असून हृदयाच्या आश्रयानें असणाऱ्या जीवाच्या अंतर्यामी राहतो. श्रवणमननपूर्ण उपासक या आनंदाकारविशिष्ट, सर्वथा अविनाशी, स्वयंप्रकाश आणि नित्य प्रकट असणाऱ्या परमेश्वराचें आनंदरूप दर्शन घेतात. यांना ध्यानामर्थ्यें ब्रह्मसाक्षात्कार होतो.

मंत्र आठवा.

भिद्यते हृदयग्रन्थिश्छिद्यन्ते सर्वसंशयाः ।
क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन्दृष्टे परावरे ॥ ८ ॥

अन्वय व अर्थ—तस्मिन् परावरे दृष्टे (त्या परावर—सगुण निर्गुण—ब्रह्माचा साक्षात्कार झाला असतां) **हृदयग्रंथिः भिद्यते, सर्वसंशयाः छिद्यंते च अस्य कर्माणि क्षीयंते** (हृदय—ग्रंथीचा विनाश होतो, सर्व संशयाचा उच्छेद होतो आणि साधकाच्या सर्वकर्मांचा क्षय होतो.) ॥८॥

अस्य परमात्मज्ञानस्य फलमिदमभिधीयते । भिद्यते हृदयग्रन्थिरविद्यावासनाप्रचयो बुद्ध्याश्रयः कामः "कामा येऽस्य हृदि श्रिताः" इति श्रुत्यन्तरात् । हृदयाश्रयोऽसौ नाऽऽत्माश्रयः । भिद्यते भेदं विनाशमायाति । छिद्यन्ते सर्वज्ञेयविषयाः संशया लौकिकानामामरणात्त गङ्गास्रोतोवत्प्रवृत्ता विच्छेदमायान्ति । अस्य विच्छिन्नसंशयस्य निवृत्ताविद्यस्य यानि विज्ञानोत्पत्तेः प्राक्तनानि जन्मान्तरे चाप्रवृत्तफलानि ज्ञानोत्पत्तिसहभावीनि च क्षीयन्ते कर्माणि । न त्वेतज्जन्मारम्भकाणि प्रवृत्तफलत्वात्तस्मिन्सर्वज्ञेऽसंसारिणि परावरे परं च कारणात्मनाऽवरं च कार्यात्मना तस्मिन्परावरे साक्षादहमस्मीति दृष्टे संसारकारणोच्छेदान्मुच्यत इत्यर्थः ॥ ८ ॥

सिद्धान्ती—या मंत्रांत परमात्मज्ञान झालें असतां कोणत्या फलांची प्राप्ति होते हें सांगितलें आहे. श्रुति म्हणते: परावर परब्रह्माचें ज्ञान झालें असतां हृदयग्रंथि म्हणजे अज्ञानानें उत्पन्न झालेल्या वासनांचा प्रचय (गड्डा) फुटून जातो. वासना म्हणजे काम. हा बुद्धीचा आश्रय करून राहतो. " साधकाच्या हृदयाचा आश्रय करून ज्या वासना तेथें राहतात " ही अन्यश्रुति स्पष्ट सांगते कीं वासना हृदयाच्या (बुद्धीच्या)

आश्रयानें राहतात, आत्म्याच्या आश्रयानें राहत नाहींत. असो, या वासनांचा नाश होतो. तसेंच जे जे म्हणून जाणण्यासारखे व्यावहारिक व पारमार्थिक ज्ञानविषय आहेत, त्यांच्या संबंधानें सर्व प्रकारचे संशय विच्छिन्न होतात. काय सांगावें! या ज्ञेय-विषयासंबंधाचे अनंत संशय गंगाप्रवाहाप्रमाणें अखंड विद्यमान असतात आणि ते मरणापर्यंत अज्ञानी जीवांस सोडीत नाहींत. पण या सर्व-संशयांचा परमात्म-ज्ञानानें मात्र नाश होतो. याप्रमाणें सर्व संशयांचे निरसन होऊन ज्याची अविद्या सर्वथा निवृत्त झाली, अथवा अविद्या नष्ट झाल्यामुळें सर्व संशय निरस्त झाले, त्या साधकाचा पूर्वजन्मार्जित कर्मसंचय सर्वथा नाहींसा होतो. हा कर्मसंचय म्हणजे ज्याच्या फलोत्पत्तीला अद्यापि प्रारंभ झाला नाहीं, अशीं ज्ञानोपत्तीच्या पूर्वीची कर्में होत. ज्ञान उत्पन्न होत असतांही उत्पन्न होणारीं कर्में वरील वर्गांत येतात, पण ज्ञान झाल्याबरोबर त्यांचाही क्षय होतो. सारांश पूर्वसंचिताचा नाश होतो. आतां, ज्या कर्माच्या फलांनीं साधकाला जन्म प्राप्त झाला, तीं फलपरिपक्व झालेलीं कर्में (प्रारब्धकर्में) क्षीण होत नाहींत, कारण त्यांचा नाश भोगानें मात्र व्हावयाचा असतो. तात्पर्य, प्रारब्धकर्माशिवाय बाकींच्या सर्व पूर्वसंचिताचा नाश होतो. केव्हां? जेव्हां सर्वज्ञ व सर्वसंसार-शून्य असें जें श्रेष्ठ कारण ब्रह्म (परब्रह्म) व अवर जें कार्यब्रह्म (सगुणब्रह्म) त्याचा साक्षात्कार झाला, मी ब्रह्म आहे असा निश्चय झाला म्हणजे सर्व संसारकारणांचा, अविद्यादिकांचा उच्छेद होऊन हा ज्ञानविज्ञानी साधक सर्वथा मुक्त होतो. ॥ ८ ॥

रंगरामानुज—'हृदय' याचा जीव असाही एक अर्थ आहे. कर्माचा नाश होणें, म्हणजे फल उत्पन्न करण्याची जी कर्माची शक्ति ती नाहींशी करणें. 'परावर'= दुसरे सर्व पदार्थ ज्या पर (श्रेष्ठ) ब्रह्मापेक्षां अवर, कनिष्ठ, आहेत. किंवा श्रेष्ठकनिष्ठ वस्तु ज्या परमेश्वराचें शरीर असून परमेश्वर ज्यांचा आत्मा म्हणजे नियंता आहे. दृष्ट होणें म्हणजे परमेश्वराच्या यथार्थ स्वरूपाचें ज्ञानानें परमेश्वराला ज्ञानविषय करणें. साक्षात्कार होत असतां (यथार्थ स्वरूपाची उपासना करण्यास आरंभ होत असतां) प्रसन्न झालेला परमेश्वर 'जीवाची पुण्यपापादि सर्व कर्में नाहींशी करीन' असा संकल्प करीत असतो.

माध्व०—'परावर'=पर म्हणजे श्रेष्ठ रमाब्रह्मदेवादि. तेही ज्याच्याहून अवर म्हणजे कनिष्ठ आहेत. 'हृदय'=जीव आणि विष्णु. 'ग्रंथि'=बंधक. अर्थातच हृदयग्रंथी म्हणजे विष्णुपासून जीवाला एकीकडे काढणारी अविद्या. (हीच सत्त्वादिगुणाविशिष्ट मूलप्रकृती होय) या अविद्येचा भेद होतो, म्हणजे स्वरूपनाश होतो. श्रवणानें अविद्या शिथिल होते आणि अपरोक्षज्ञानानें तिचा ध्वंस होतो. संशय म्हणजे बंध हे अनेक आहेत: जसें लिंगदेहबंध, कामक्रोधादि बंध, कर्मबंध, इत्यादि होत. परमेश्वरच या सर्वबंधांचा निरास करितो.

मंत्र नववा.

हिरण्मये परे कोशे विरजं ब्रह्म निष्कलम्।
तच्छुभ्रं ज्योतिषां ज्योतिस्तद्यदात्मविदो विदुः ॥९॥

अन्वय व अर्थ—यत् आत्मविदः विदुः (आत्मवेत्त्यांस ज्याचें ज्ञान असतें) तत् हिरण्मये परे कोशे विरजं निष्कलं ब्रह्म, तत् शुभ्रं, तत् ज्योतिषां ज्योतिः (तें हिरण्मय, श्रेष्ठ कोशांत राहणारें, निर्मल आणि निरुपाधिक वस्तु ब्रह्म होय; तें अत्यंत शुद्ध आहे आणि तें सर्वप्रकाशक वस्तूंचे प्रकाशक आहे.) ॥ ९ ॥

उक्तस्यैवार्थस्य संक्षेपाभिधायका उत्तरे मन्त्राश्चयोऽपि हिरण्मये ज्योतिर्मये बुद्धिविज्ञानप्रकाशे परे कोशे कोश इवासेः। आत्मस्वरूपोपलब्धिस्थानत्वात्परं तत्सर्वाभ्यन्तरत्वात्तस्मिन्विरजमविद्याद्यशेषदोषरजोमलवर्जितं ब्रह्म सर्वमहत्त्वात्सर्वात्मत्वाच्च निष्कलं निर्गताः कला यस्मात्तन्निष्कलं निरवयवमित्यर्थः। यस्माद्विरजं निष्कलं चातस्तच्छुभ्रं शुद्धं ज्योतिषां सर्वप्रकाशात्मनामग्न्यादीनामपि तज्ज्योतिरवभासकम्। अग्न्यादीनामपि ज्योतिष्ट्वमन्तर्गतब्रह्मात्मचैतन्यज्योतिर्निमित्तमित्यर्थः। तद्धि परं ज्योतिर्यदन्यानवभास्यमात्मज्योतिस्तद्यदात्मविद् आत्मानं स्वं शब्दादिविषयबुद्धिप्रत्ययसाक्षिणं ये विवेकिनो विदुर्विजानन्ति त आत्मविदस्तद्विदुरात्मप्रत्ययानुसारिणः। यस्मात्परं ज्योतिस्तस्मात्त एव तद्विदुर्नेतरे बाह्यार्थप्रत्ययानुसारिणः॥९॥

सिद्धान्त—मागील मंत्रांत जो अर्थ विस्तारानें सांगितला त्याचें संक्षेपानें वर्णन करणारे हे पुढील तिन्ही मंत्र आहेत. पहा : हिरण्मय म्हणजे तेजस्वी अथवा बुद्धीचे विज्ञानद्वारा प्रकाशित होणारा जो विज्ञानमय नामक सर्वश्रेष्ठ कोश त्या कोशांत ब्रह्माचें वास्तव्य असतें. तरवारीला जशी म्यान हें वसतिस्थान असतें, तसें ब्रह्माला हें स्थान असतें. विज्ञानमयनामक श्रेष्ठ कोश असतो. या विज्ञानमय कोशांतच आत्मस्वरूपाची उपलब्धि होते, म्हणून. विज्ञानमय कोश श्रेष्ठ आहे. शिवाय, तो सर्वकोशांच्या 'अंतर्यामी' असतो म्हणूनही श्रेष्ठ आहे. असो, या कोशांत हें विरजब्रह्म प्रकट होतें. अविद्यादि सर्व दोष, सर्व मल, ब्रह्माच्या स्वरूपांत केव्हांही वास्तव्य करीत नाहींत, म्हणून ब्रह्माला विरज (कामक्रोधादिविकारशून्य व वासनाशून्य आहे म्हणून निर्मळ) म्हटलें. हें ब्रह्म महतांहून मोठें व

सर्वात्मक (सर्व-नियामक) आहे, म्हणून ही हें आत्मतत्त्व निष्कल आहे. हें निष्कल म्हणजे निरवयव आहे. येथें कलांचा अथवा भागप्रभागांचा संभव असत नाहीं, म्हणून तें निष्कल अथवा अवयवशून्य असतें. येथें सर्व कला (अवयव) अस्तंगत होतात. ब्रह्म निर्मळ आणि निरवयव आहे म्हणून तें शुद्ध आहे. तें अग्नि, सूर्य, चंद्रादि सर्वप्रकाशक तेजस्वी गोलांचें प्रकाशक आहे. तें तेजांचें तेज आहे. कारण अग्नि सूर्यादिकांचें तेज सुद्धां अग्न्यादिकांत नियामकत्वानें अंतर्यामी असणाऱ्या ब्रह्मात्मचैतन्याच्या ज्योतिर्निमित्तानें निर्माण झालेलें असतें. ब्रम्हतेज (आत्मतेज) हें सर्व तेजांहून श्रेष्ठ आहे म्हणून ब्रम्हतेजाला प्रकाशित करणारें दुसरें कोणतेंही तेज नाहीं. असो, असें हें निर्मळ, निरवयव व अत्यंत तेजस्वी ब्रम्ह ज्या विवेकीपुरुषांना समजून उमजलें, शब्द-स्पर्श-रूपादि विषय ज्या बुद्धीला प्रतीत होतात, त्या जीवबुद्धीचा नित्य साक्षी असणारा जो प्रत्यगात्मा तो स्पष्ट समजला व अनुभवाला आला, ज्या विवेकी आत्मवेत्त्यांना ब्रह्मस्वरूपाचें असें ज्ञान झालें व आत्मप्रत्यय येऊन 'मी तें ब्रह्म आहें' असें ज्यांनीं ह्या सर्वश्रेष्ठ आत्म-ज्योतीचें साक्षात् दर्शन घेतलें, त्यांना मात्र ब्रह्मज्ञानविज्ञान होतें, इतरांना होत नाहीं. कारण, इतर लोक बाह्यविषयाच्या प्रत्ययाचे अनुसारी असतात व यांचें ज्ञान बाह्य-प्रत्ययात्मक असतें पण आत्मवेत्त्याचें ज्ञानविज्ञान आत्मप्रत्ययाचें असतें. म्हणून इतरांना आत्मज्ञान होत नाहीं. व आत्मवेत्त्यांस होतें. ॥ ९ ॥

रंगरामा०—' हिरण्मय '=स्वयंप्रकाश अथवा सर्वांगसुंदर, यांस (या आचार्यांस) या मंत्रांत ' पुरे कोशे ' असा ही एक पाठ उपलब्ध होता ' पर '=उत्कृष्ट. ' विरज '= सत्त्वरजतमाहून पलीकडे असणारें. ' ज्योतिः '=इंद्रियें. यावरून यांच्या मतें परमेश्वरांस शरीर आहे असें स्पष्ट होतें.

माध्व०—हिरण्मय=ब्रह्मांडाच्या मध्यें असून सूर्यमंडळांत तपश्चर्या करणारा. याचा कोशं हिरण्यमय कोश होय. या मंत्रांत सवितृमंडलमध्यवर्ती नारायणाचें ध्यान सांगितलें आहे. यालाच शिंशुमार म्हणतात. याला नमस्कार करून पुढें वैकुंठ लोकांत मुक्त लोक जातात.

मंत्र दहावा.

न तत्र सूर्यो भाति न चन्द्रतारकं नेमा विद्युतो भान्ति कुतोऽयमग्निः । तमेव भान्तमनुभाति सर्वं तस्य भासा सर्वमिदं विभाति ॥ १० ॥

अन्वय व अर्थ—तत्र सूर्यः न भाति, न चंद्रतारकं, न इमाः विद्युतः भांति, अयं अग्निः कुतः ? (तेथें-ब्रह्मस्वरूपांत-सूर्य प्रका-

शत नाहीं, चंद्र, तारे प्रकाशत नाहींत, विद्युत्प्रकाश तेथें असणें शक्य नाहीं, मग अग्नीची गोष्ट कशाला बोलावी ?) **तं एव भान्तं सर्वं अनुभाति, तस्य भासा इदं सर्वं विभाति** (तो परमात्मा प्रकाशित झाला म्हणजे मात्र हें सर्व त्याच्या मागून प्रकाशित होतें. त्याच्या मात्र तेजानें हें सर्व तेजस्वी होतें.) ॥ १० ॥

कथं तज्ज्योतिषां ज्योतिरित्युच्यते। न तत्र तस्मिन्स्वात्मभूते ब्रह्मणि सर्वावभासकोऽपि सूर्यो भाति। तद्ब्रह्म न प्रकाशयतीत्यर्थः। स हि तस्यैव भासा सर्वमन्यदनात्मजातं प्रकाशयतीत्यर्थः। न तु तस्य स्वतः प्रकाशनसामर्थ्यम्। तथा न चन्द्रतारकं नेमा विद्युतो भान्ति कुतोऽयमग्निरस्मद्गोचरः। किं बहुना। यदिदं जगद्भाति तत्तमेव परमेश्वरं स्वतो भारूपत्वाद्भान्तं दीप्यमानमनुभात्यनुदीप्यते। यथा जलोल्मुकाद्यग्निसंयोगादग्निं दहन्तमनुदहति न स्वतस्तद्वत्तस्यैव भासा दीप्त्या सर्वमिदं सूर्यादि जगद्विभाति। यत एवं तदेव ब्रह्म भाति च विभाति च कार्यगतेन विविधेन भासाऽतस्तस्य ब्रह्मणो भारूपत्वं स्वतोऽवगम्यते। न हि स्वतोऽविद्यमानं भासनमन्यस्य कर्तुं शक्नोति। घटादीनामन्यावभासकत्वादर्शनाद्भारूपाणां चाऽऽदित्यादीनां तद्दर्शनात्॥ १० ॥

सिद्धान्ती—हें ब्रह्म तेजस्वी गोलांचेंही प्रकाशक आहे. हें कशावरून ? अशी शंका घेणेंही योग्य नाहीं. कारण, त्या आत्मस्वरूपी व स्वयंप्रकाश ब्रह्माचे ठिकाणीं सर्व-प्रकाशक सूर्यालाही आपला प्रकाश पाडितां येत नाहीं. ब्रह्म प्रकाशित करण्याचें सामर्थ्य सूर्याला नाहीं. इतकेंच नव्हे, तर ब्रह्मप्रकाशानें मात्र सर्व इतर अनात्म वस्तु सूर्याला प्रकाशित करतां येतात; हें तात्पर्य आहे. सूर्याला किंवा कोणाही अनात्म वस्तूला प्रकाशनाचें स्वतःसामर्थ्य नाहीं. असो, याचप्रमाणें हा चंद्र, हे तारे, ह्या विजा, यांचेंही तेजानें ब्रह्म प्रकाशित होत नाहीं. मग जीवांना गोचर होणाऱ्या अग्नीची गोष्ट काय सांगावयाची आहे ? जेथें दिव्य व अंतरिक्षस्थ तेजें लटकीं पडतात, तेथें भूलोकावरील अग्नीचा कांहीं उपयोग होईल असें मानणें शक्यच नाहीं. किंबहुना, या जगांत जी जी म्हणून प्रकाशक वस्तु आहे ती ती वस्तु स्वयंप्रकाश परमेश्वर स्वतःच्या तेजोरूपानें प्रकाशित असतो म्हणून व त्यापासून प्रकाश घेतें म्हणून प्रकाशित होत असतें. प्रकाशक व सर्वदाहक अग्नीशीं संयोग झाल्यानंतर मात्र जल, उल्मुका (मशाली) इत्यादि प्रकाशित होऊन दाह करण्यास किंवा प्रकाशण्यास समर्थ होतात, त्या केवळ अग्नीच्या दहन-प्रकाशन-सामर्थ्यानें मात्र होतात; स्वतः

त्यांस प्रकाश नाहीं किंवा दहनसामर्थ्यही नाहीं. त्याप्रमाणें ब्रह्माच्या प्रकाशानें मात्र हें सर्व सूर्यादि विश्व प्रकाशित होतें आणि सूर्यादि तेजोगोल विषयप्रकाशक होतात. असें आहे म्हणून तें ब्रह्म (आत्मा) स्वयंप्रकाश आहे असें सिद्ध होतें. तेंच ब्रह्म स्वतः स्वकार्यांमध्यें प्रवेश करून अनेकरूपांनीं प्रकाशित होत असतें. म्हणून त्या ब्रह्माचें तेजस्वरूप स्वयंभु आहे, असें समजतें. खरेंच आहे. जेथें स्वतःलाच मुळांत प्रकाशन-सामर्थ्य नाहीं, तेथें दुसऱ्यास प्रकाशनसामर्थ्य देणें ही केवळ अशक्य गोष्ट आहे. येथेंच घटादि अप्रकाशक पदार्थ पटादिकांस प्रकाशित करूं शकत नाहींत आणि सूर्यादि तेजस्वी गोल इतरांस प्रकाशित करितात ह्याचा अनुभव आपल्यास नित्य आहेच. असो; यावरून इतर पदार्थ प्रकाशित करण्याचें व कांहीं पदार्थांस प्रकाशकत्व देण्याचें सामर्थ्य स्वयंप्रकाश ब्रह्माला (आत्म्याला) मात्र असतें हें स्पष्ट आहे. ॥ १० ॥

रंग०—या मंत्राचा अर्थ या आचार्यांनीं कठोपनिषदांत स्पष्ट केला आहे तो अवश्य पहावा.

मंत्र अकरावा.

ब्रह्मैवेदममृतं पुरस्ताद्ब्रह्म पश्माद्ब्रह्म दक्षिणतश्चोत्तरेण । अधश्चोर्ध्वं च प्रसृतं ब्रह्मैवेदं विश्वमिदं वरिष्ठम् ॥ ११ ॥

इत्यथर्ववेदीयमुण्डकोपनिषदि द्वितीयमुण्डके द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

इत्यथर्ववेदीयमुण्डकोपनिषदि द्वितीयमुण्डकं समाप्तम्॥२॥

अन्वय व अर्थ—इदं अमृतं ब्रह्म एव पुरस्तात्, ब्रह्म पश्चात्, ब्रह्म दक्षिणतः च उत्तरेण, अधः च ऊर्ध्वं च इदं प्रसृतं, ब्रह्म एव इदं विश्वं, इदं वरिष्ठं (हें अमृतब्रह्म आपल्या पुढें म्हणजे पूर्वेकडेस आहे; पाठीमागें म्हणजे पश्चिमेस आहे; उजव्या हातास म्हणजे दक्षिणेस आहे; तसेंच डाव्या हातास म्हणजे उत्तरेस आहे; खाली आहे, वर आहे, हें ब्रह्म सर्वत्र पसरलेलें आहे, हें विश्व ब्रह्मच आहे, हेंच सर्व श्रेष्ठ आहे.)॥११॥

यत्तज्ज्योतिषां ज्योतिर्ब्रह्म तदेव सत्यं सर्वं तद्विकारं वाचारम्भणं विकारो नामधेयमात्रमनृतमितरदित्येतमर्थं विस्तरेण हेतुतः प्रतिपादितं निगमनस्थानीयेन मन्त्रेण पुनरुपसंहरति । ब्रह्मैवोक्तलक्षणमिदं

यत्पुरस्तादग्रे ब्रह्मैवाविद्यादृष्टीनां प्रत्यवभासमानं तथा पश्चाद्ब्रह्म तथा दक्षिणतश्च तथोत्तरेण तथैवाधस्तादूर्ध्वं च सर्वतोऽन्यदिव कार्याकारेण प्रसृतं प्रगतं नामरूपवदवभासमानम्। किं बहुना ब्रह्मैवेदं विश्वं समस्तमिदं जगद्वरिष्ठं वरतमम्। अब्रह्मप्रत्ययः सर्वोऽविद्यामात्रो रज्ज्वामिव सर्पप्रत्ययः। ब्रह्मैवैकं परमार्थसत्यमिति वेदानुशासनम् ॥ ११ ॥

इत्यथर्ववेदीयमुण्डकोपनिषद्भाष्ये द्वितीयमुण्डके द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

इत्यथर्ववेदीयमुण्डकोपनिषद्भाष्ये द्वितीयं मुण्डकं समाप्तम् ॥ २ ॥

सिद्धान्ती—जें ब्रम्ह तेजोगोलांचें तेज आहे, तें मात्र सत्य वस्तु आहे. सर्व दृश्यमान विश्व त्याचेच विकार असून ते नामरूप मात्र आहेत. ब्रह्मोत्तर सर्व असत्य आहे, इत्यादि अर्थ मागें विस्तरतः सांगितला आहे व या अर्थाच्या सत्यतेचीं कारणें हीं तेथें दिलीं आहेत. येथें या मंत्रांत केवळ सिद्धांतस्वरूपानें मात्र (मागील विषयाचा) उपसंहार केला आहे. सारांश, या मंत्रांत सिद्धांतच सांगितला आहे. ज्याचें लक्षण पूर्वी सांगितलें तेंच ब्रह्म हें सर्व आहे. अज्ञानीदृष्टीला ज्या जगताचा आभास होतो, तें पुढें दिसणारें, पाठीमागें असणारें, दक्षिणेकडील व उत्तरेकडील जगत्, ऊर्ध्वदिशेस व अधोदिशेस असणारें जगत्, सर्व दाहीदिशांतील सर्व पदार्थ ब्रह्मच होत. हें दुसरेंसें दिसणारें जगत् कार्यरूपानें आविर्भूत झालें, पण वस्तुतः ब्रह्म होय. हें विस्तार पावलेलें कार्य ब्रह्म नामरूपात्मक मात्र असून दृश्य होतें खरें. पण अधिक न सांगतां आम्ही इतकेंच म्हणतों कीं हें सर्व स्वरूपतः ब्रह्मच आहे. ब्रह्म हें सत्य आहे म्हणून सर्वश्रेष्ठ आहे. आतां जेथें ब्रह्माचा प्रत्यय साक्षात् येत नाहीं, तो तो पदार्थ अज्ञानी अविद्येचा असतो आणि या अज्ञानामुळें रज्जूचे ठिकाणीं सर्प दिसतो, सर्प-प्रत्यय येतो. किंवा अविनाशिब्रह्माचें ठिकाणीं विनाशी नामरूपात्मक जगताचा आभास होतो, याचें कारण अविद्यात्मक नामरूपें आहेत, हें होय. सारांश, तात्पर्य हें आहे कीं ब्रह्म हीं परमार्थतः सत्य वस्तु आहे, इतरत्र अपरमार्थ सत्य म्हणजे अविद्या आहे. असो; एक अद्वितीय ब्रह्म मात्र सत्य वस्तु आहे, असें वेदाचें मुख्य सांगणें आहे. हाच निश्चित सिद्धांत या मुंडकांत संक्षेपेंविस्तारानें सांगितला आहे. ॥११॥

रंगरामानुज—' वरिष्ठ ' = वरण्यास, स्वीकृत करण्यास योग्य.

माध्व०—'हें विश्व ब्रह्म आहे' हा सत्याचा भाग नाहीं, असत्प्रलाप आहे. ब्रह्म हें विश्व आहे असें खरें तात्पर्य आहे, ब्रह्म हें सर्वोत्तम आहे. या मंत्रांतील ' इदं ' शब्द ब्रह्मपर आहे, विश्वपर नाहीं. या ब्रह्मानें सर्व कालप्रदेश, देशप्रदेश आणि गुणप्रदेश व्यापून टाकले आहेत. म्हणून विश्वहून अत्यंत श्रेष्ठ असणाऱ्या ब्रह्माला विश्व या एकदेशीनामानें संबोधितां यावयाचें नाहीं.

मुण्डकोपनिषद् द्वितीय खण्ड समाप्तः.

द्वितीयमुण्डक समाप्त झालें.

तृतीय–मुंडक।

खंड पहिलें.

मंत्र पहिला.

द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते। तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्त्यनश्नन्नन्यो अभिचाकशीति ॥ १ ॥

अन्वय व अर्थ––द्वा सुपर्णा सयुजा सखाया–द्वौ सुपर्णौ सयुजौ, सखायौ–समानं वृक्षं परिषस्वजाते (दोन सुंदर पक्ष असणारे सहोदर पक्षीरूपी स्नेही एकाच वृक्षावर आश्रय घेऊन राहिले आहेत, एकाच वृक्षाचा त्यांनीं आश्रय केला आहे.) तयोः अन्यः स्वादु पिप्पलं अत्ति (त्या पैकीं एकजण ' गोड गोड ' अशा फलाचा उपभोग घेतो.) अन्यः अनश्नन् अभिचाकशीति (आणि दुसरा कोणताही उपभोग न घेतां साक्षीरूपानें असतो.) ॥ १ ॥

परा विद्योक्ता यया तदक्षरं पुरुषाख्यं सत्यमधिगम्यते। यदधिगमे हृदयग्रन्थ्यादिसंसारकारणस्याऽऽत्यन्तिकविनाशः स्यात्। तद्दर्शनोपायश्च योगो धनुराद्युपादानकल्पनयोक्तः। अथेदानीं तत्सहकारीणि सत्यादिसाधनानि वक्तव्यानीति तदर्थमुत्तरारम्भः। प्राधान्येन तत्त्वनिर्धारणं च प्रकारान्तरेण क्रियते। अत्यन्तदुरवगाह्यत्वात्कृतमपि तत्र सूत्रभूतो मन्त्रः परमार्थवस्त्ववधारणार्थमुपन्यस्यते द्वा द्वौ सुपर्णा सुपर्णौ शोभनपतनौ सुपर्णौ पक्षिसामान्याद्वा सुपर्णौ सयुजा सयुजौ सहैव सर्वदा युक्तौ सखाया सखायौ समानाख्यानौ समानाभिव्यक्तिकारणावेवंभूतौ सन्तौ समानमविशेषमुपलब्ध्यधिष्ठानतयैकं वृक्षं वृक्षमिवोच्छेदनसामान्याच्छरीरं वृक्षं परिषस्वजाते परिष्वक्तवन्तौ। सुपर्णाविवैकं वृक्षं फलोपभोगार्थम्। अयं हि वृक्ष ऊर्ध्वमूलोऽवाक्शाखोऽश्वत्थोऽव्यक्तमूलप्रभवः क्षेत्रसंज्ञकः सर्वप्राणि-

कर्मफलाश्रयस्तं परिष्वक्तौ सुपर्णाविवाविद्याकामकर्मवासनाश्रयलिङ्गोपाध्यात्मेश्वरौ। तयोः परिष्वक्तयोरन्य एकः क्षेत्रज्ञो लिङ्गोपाधिवृक्षमाश्रितः पिप्पलं कर्मनिष्पन्नं सुखदुःखलक्षणं फलं स्वाद्वनेकविचित्रवेदनास्वादरूपं स्वाद्वत्ति भक्षयत्युपभुङ्क्तेऽविवेकतः। अनश्नन्नन्य इतर ईश्वरो नित्यशुद्धबुद्धमुक्तस्वभावः सर्वज्ञः सर्वसत्त्वोपाधिरीश्वरो नाश्नाति। प्रेरयिता ह्यसावुभयोर्भोज्यभोक्त्रोर्नित्यसाक्षित्वसत्तामात्रेण। स त्वनश्नन्योऽभिचाकशीति पश्यत्येव केवलम्। दर्शनमात्रं हि तस्य प्रेरयितृत्वं राजवत् ॥ १ ॥

सिद्धान्ती—येथपर्यंत परविद्येचें व्याख्यान झालें. परविद्येनें 'तो अविनाशी पुरुष' नामक सत्य वस्तु समजते. या वस्तूचें ज्ञान-विज्ञान झालें असतां हृदयग्रंथिप्रमुख संसारकारणांचा समूळ, सकारण आणि सफल, म्हणजे आत्यंतिक विनाश होतो. हें सत्यवस्तूचें व्याख्यान करून श्रुतीनें पुरुषनामक वस्तूचा साक्षात्कार करून देणारा जो जो योग त्याचेंही, धनुष्यादि उपायककल्पना स्वीकृत करून साधनांचेंही व्याख्यान केलें. आतां यापुढें योगाबरोबर सहचारित्वानें असणारीं सत्यप्रमुख साधनें सांगावयाचीं राहिलीं आहेत. म्हणून प्रधानत्वानें हीं साधनें सांगण्यासाठीं उत्तरग्रंथाला या खंडांत आरंभ केला आहे. शिवाय, तत्त्वाचा निश्चय व त्याची धारणा पुनः एकदां अन्यप्रकारानें (अन्य दृष्टांतादि देऊन) सांगितली आहे. सांगितलेलेंच पुनः सांगण्याचें कारण उघड आहे. विषय अत्यंत गहन असल्यामुळें ज्ञानकक्षेच्या आंत तो महाकष्टानें येतो. म्हणून मुख्य विषयाचें पुनः पुनः व्याख्यान करण्याचा श्रुतिपरिपाठच आहे. हा मंत्र सूत्रभूत आहे. (थोड्या पण ठळक शब्दांनीं जेथें सिद्धांताचा उच्चार केला असतो, त्याला सूत्र असें म्हणतात.) परमार्थवस्तूचा (ब्रह्मवस्तूचा) अधिगम व्हावा एतदर्थ सिद्धांताचा पुनः उपन्यास केला आहे. तो असाः-सुंदर आणि रमणीय पंख असणारे दोन सहचर जीव-शिवनामक पक्षी (या दोघांचा केव्हांही विरह होत नाहीं. दोघेही नित्य एकत्र असतात. म्हणून यांस 'सयुजौ' असें म्हटलें) समान वृत्त धारण करणारे स्नेही आहेत. या उभयतांचें प्रकटन एकाच कारणानें होत असतें. (कोणतेंही विषयज्ञान झालें असतां विज्ञानानें जीव प्रकट होतो व विज्ञानाचा आधार म्हणून शिव प्रकट होतो. असे हे दोन पक्षी एकाच वृक्षाचा आश्रय घेऊन राहतात. हा वृक्ष म्हणजे जीवांचें शरीर होय.) वृक्षाचा व शरीराचा उच्छेद होतो, म्हणून (उभयतांसही उच्छेद्यत्व हा गुण साधारण आहे म्हणून) शरीराला वृक्ष असें म्हटलें आहे. उभयतांच्या प्रकटनाचें अधिष्ठान एकच शरीर असतें म्हणून उभयताही एकाच वृक्षाचा (शरीराचा?) आश्रय करितात, अशी वाक्ययोजना केली आहे. पक्षी फलाच्या उपभोगासाठीं वृक्षावर बसतात त्याप्रमाणें जीव आणि शिव हे दोन पक्षी एकाच शरीरवृक्षाचा आश्रय करितात. उभयतांचें ज्ञानरूप हे त्यांचे पंख होत.

हा वृक्ष *ऊर्ध्वमूल, अधःशाख (शाखा खालीं आहेत असा), अश्वत्थ (क्षणभंगुर० आणि अव्यक्तापासून उत्पन्न झालेला, आहे. याला क्षेत्र अशी संज्ञा आहे. स्वकर्मांच्या फलाचा उपभोग सर्व प्राणी या वृक्षाचा आश्रय धरून घेतात. याप्रमाणें शरीरनामक वृक्षरूपी वस्तूचा आश्रय करणारे जीव-शिवनामक दोन पक्षी हे आविद्येला आलिंगून काम, कर्म आणि वासना या उपाधीनें ग्रस्त आहेत. ही लिंगदेहात्मक उपाधि जीव आणि शिव या उभयतांस लागलेली असते. या दोघांपैकीं एक क्षेत्रज्ञ (जीव) लिंगशरीररूपी वृक्षाचा आश्रय करून राहतो आणि तेथें कर्मांपासून उत्पन्न झालेले सुख-दुःखात्मक रुचिकर फलाचा उपभोग घेतो. सत्त्वादि गुणत्रयानें अधिष्ठित झालेल्या जीवाचा हा उपभोग अज्ञानात्मक आहे. या वृक्षावर अनेक व विचित्र अनुभवांच्या फलाचा आस्वाद जीवांस घ्यावा लागतो. कर्मे अनेक प्रकारचीं असतात म्हणून कर्मफलांचें स्वरूपही विविध आणि विलक्षण असतें. ही एका अज्ञानी पक्ष्याची (जीवाची) हकीकत झाली. दुसरा पक्षी कोणत्याही प्रकारचा उपभोग घेत नाहीं. कारण, तो स्वभावतः नित्य, शुद्ध, ज्ञानी आणि मुक्त असतो. तो सर्वज्ञ आहे, म्हणजे सत्त्वगुण हीच त्याची लिंगदेहात्मक उपाधि आहे. तो महासात्विक आहे. रजस्तमाचा येथें गंधही नाहीं. अर्थातच त्याला कोणत्याही प्रकारच्या फलाचा उपभोग घ्यावा लागत नाहीं. हाच ईश्वर होय. हा भोज्य आणि भोक्ते (चर आणि अचर विषय आणि जीव; चिद् आणि अचिद्) या उभयतांचाही साक्षी व प्रेरक आहे. ह्याच्याच प्रेरणेनें भोज्य आणि भोक्ते यांची व्यवस्था होत असते. नित्य ईश्वराच्या सात्त्विकसत्तेनें ही व्यवस्था होत असते. अर्थातच कोणत्याही विषयाचा उपभोग न घेतां केवळ साक्षी म्हणून मात्र हा ईश्वररूपी पक्षी शरीररूपी वृक्षावर राहत असतो. परमेश्वराची प्रेरणा म्हणजे त्याचें साक्षित्व होय. राजाचे अस्तित्व विद्यमान असलें म्हणजे जसे राज्यांतील प्रजांचे व्यवहार सुव्यवस्थित चालतात व प्रत्येकास आपापलें कर्तव्य करण्याची प्रेरणा होते, त्याप्रमाणें परमेश्वराच्या केवळ साक्षित्वानें भोज्यभोजकांस स्वकर्तव्याची प्रेरणा होते.

(सारांश, जीव आणि शिव या उभयतांचें वास्तव्य शरीरनामक वृक्षावर आहे. हे उभयतां नित्य सहचर असून अनुभवनामक एकाच कारणाच्या द्वारा अभिव्यक्त होतात. हे उभयतांही सुंदर आकाराचे आहेत, म्हणजे या उभयतांस चित्कलेचा आश्रय आहे. यांपैकीं एकजण कर्म करितो आणि कर्मफलाचा उपभोग घेतो; पण दुसरा साक्षीरूप असून चराचरविश्वाची व्यवस्था स्वतःच्या विद्यमानत्वानें लाविंतो, ॥१॥

रंगरामानुज—'सयुज'=समान गुण असणारे. 'सखायौ'=परस्परसदृश.

माध्व०—जीव हा नित्य स्वादु (गोड) पदार्थच खातो असें नाहीं. तो सर्व भोग्य पदार्थांचा उपभोग घेतो, स्वकर्मानें जें पुण्यपापरूपी फल उत्पन्न होतें त्याचा उपभोग घेतो. पण ईश्वर हा जीवानें भोग्य असणारें पुण्यफल किंवा सर्व पापफल खात नाहीं. हा 'अनश्नन्' या पदाचा अर्थ आहे. ईश्वर हा उत्तम जें पुण्यफल

* श्रीमद्भगवद्गीता अ० १५ श्लोक १ पहा. कठोपनिषदांतील. शाङ्करभाष्य पहा.

आहे त्याचा मात्र स्वीकार करितो. तो स्वतंत्र आहे. त्याला भोक्तृत्वाचा किंवा दुःखभोगाचा संबंध नाहीं. 'सखायौ' जीव उपकार्य आहे आणि परमेश्वर उपकारक आहे, म्हणून त्यांचा स्नेह असतो. अभिचाकशीति=अत्यंत प्रकाशरूपी असतो.

मंत्र दुसरा.

समाने वृक्षे पुरुषो निमग्नोऽनीशया शोचति मुह्यमानः। जुष्टं यदा पश्यत्यन्यमीशमस्य महिमानमिति वीतशोकः ॥ २ ॥

अन्वय व अर्थ—**समाने वृक्षे पुरुषः निमग्नः अनीशया मुह्यमानः शोचति** (या पूर्वोक्त वृक्षावर निमग्न झालेला मुग्ध जीव आपण स्वतंत्र नाहीं म्हणून शोक करीत राहतो.) **जुष्टं यदा अन्यं ईशं पश्यति, अस्य महिमानं इति वीतशोकः**—(पण योगमार्गप्रेरित आत्मज्ञानानें समाधान वृत्ति प्राप्त करून घेऊन जेव्हां अन्यपक्ष्याचें-ईश्वराचें-दर्शन घेतो, मीच ईश्वर आहें असें त्याला समजतें, व त्याच्या माहात्म्याचें स्वरूप त्यास समजतें, तेव्हां तो शोकशून्य होतो.) ॥ २ ॥

तत्रैवं सति समाने वृक्षे यथोक्ते शरीरे पुरुषो भोक्ता जीवोऽविद्याकामकर्मफलरागादिगुरुभाराक्रान्तोऽलाबुरिव सामुद्रे जले निमग्नो निश्चयेन देहात्मभावमापन्नोऽयमेवाहममुष्य पुत्रोऽस्य नप्ता कृशः स्थूलो गुणवान्निर्गुणः सुखी दुःखीत्येवंप्रत्ययो नास्त्यन्योऽस्मादिति जायते म्रियते संयुज्यते वियुज्यते च संबन्धिबान्धवैः। अतोऽनीशया न कस्यचित्समर्थोऽहं पुत्रो मम विनष्टो मृता मे भार्या किं मे जीवितेनेत्येवं दीनभावोऽनीशा तया शोचति संतप्यते मुह्यमानोऽनेकैरनर्थप्रकारैरविवेकतया चिन्तामापद्यमानः स एवं प्रेतातिर्यङ्मनुष्यादियोनिष्वाजवं जवीभावमापन्नः कदाचिदनेकजन्मसु शुद्धधर्मसंचितनिमित्ततः केनचित्परमकारुणिकेन दर्शितयोगमार्गोऽहिंसासत्यब्रह्मचर्यसर्वत्यागशमदमादिसंपन्नः समाहितात्मा सञ्जुष्टं सेवितमनेकैर्योगमार्गैः कर्मि(र्मं?)भिश्च यदा यस्मिन्काले पश्यति ध्यायमानोऽन्यं वृक्षोपाधिलक्षणाद्विलक्षणमशिमसंसारिणमशनायापिपासाशोकमोहज

रामृत्व्वतीतमीशं सर्वस्य जगतोऽथमहमस्म्यात्मा सर्वस्य समः सर्वभूतस्थो नेतरोऽविद्याजनितोपाधिपरिच्छिन्नो मायात्मेति विभूतिं महिमानं च जगद्रूपमस्यैव मम परमेश्वरस्येति यदैवं द्रष्टा तदा वीतशोको भवति सर्वस्माच्छोकसागराद्विप्रमुच्यते कृतकृत्यो भवतीत्यर्थः ॥ २ ॥

सिद्धान्ती—ऊर्ध्वमूलादिरूपी एकाच वृक्षावर दोघे पक्षी राहतात, असें मागच्या मंत्रांत श्रुतीनें सांगितलें. या मंत्रांत जीवाचें पारतंत्र्य व तज्जन्य शोक आणि या शोकाच्या निरसनाचें साधन इत्यादि गोष्टींचा उल्लेख केला आहे. मागें सांगितलेल्या जीव-शिवांपैकीं जीव हा भोक्ता असल्यामुळें त्याला अत्यंत दुःख होतें. तो अविद्येच्या, कामाच्या, कर्माच्या, फलाच्या, राग-द्वेषादिकांच्या अत्यंत जड भारानें व्याकुल होऊन भोपळ्याप्रमाणें भवसागराच्या जलांत वर, खालीं, इकडे, तिकडे, असे हेलकावे खात राहतो. अज्ञानामुळें त्या बिचाऱ्याचा असा भ्रांतिष्ट निश्चय झाला असतो कीं, देह हाच आत्मा आहे व देह म्हणजे मी, मी अमक्याचा मुलगा, तमक्याचा नातु, मी कृश, मी स्थूल, मी गुणवान्, मी गुणशून्य, मी सुखी, मी दुःखी, इत्यादि अनेकप्रकारचा विचित्र अनुभव त्याला नित्य येत असतो. देहाहून मी निराळा नाहीं असें विपरीत ज्ञान असल्यामुळें मी जन्म पावतों, मी मरतों, आप्त-इष्ट-मित्रांचा व बंधु-बांधवांचा मला समागम होतो व सापगम (विरह) होतो, इत्यादि प्रकारचीं आशात्मक व भीत्यात्मक दुःखें त्याच्या पाठीमागें हात धुवून लागलेलीं असतात. तसेंच मी परतंत्र आहें, मला कांहींएक करण्याचें स्वतंत्र सामर्थ्य नाहीं, माझा पुत्र विनष्ट झाला, भार्या मेली, आतां जगून मला काय करावयाचें आहे, इत्यादि प्रकारच्या दीनभावांनीं तो शोकपूर्ण होतो. त्याला संताप प्राप्त होतो व तो मूढ होऊन अनेक प्रकारचें वेड्यासारखें आचरण करितो. आपल्या सभोंवतालीं दिसणारे अनेक घातकारी अनर्थ पाहून अज्ञानानें तो चिंताकुल होतो. या अज्ञानामुळें एक देह सोडल्यावर लघुत्व प्राप्त होऊन प्रेत, पशुपक्षी, मनुष्यादियोनींमध्यें हा बिचारा जीव पुनःपुनः जन्ममरणाच्या अविश्रांत फेऱ्यांत सांपडतो. पुढें अनेक जन्म गेल्यानंतर केव्हांतरी सात्त्विकधर्माचा संचय दैवयोगानें झालाच, तर एखाद्या परम दयाळु ज्ञानीसाधूची व त्याची गांठ पडते आणि त्या साधूच्या उपदेशानें योगशुद्धमार्गाचें ज्ञान होऊन हा दीन जीव अहिंसा, सत्य, ब्रह्मचर्य, विषयत्याग, शम, दम, इत्यादि साधनांनीं संपन्न होतो. अर्थात् त्याचे चित्ताला स्थैर्याची शांति मिळते. या वेळीं अनेक योगमार्गांचा व अनेक कर्ममार्गांचा आश्रय घेऊन ज्याचें योगी पुरुष ध्यान करितात, त्या अंतर्यामी परमेश्वराचें हा शुद्धचित्त झालेला जीव ध्यान करूं लागतो.

ध्यान करण्यास योग्य असा परमेश्वर शरीरवृक्षावर असणाऱ्या उपाधींनीं जर्जर होत नाहीं. तो उपाधिग्रस्त जीवांहून निराळा व विलक्षणस्वरूपाचा आहे, तो असंसारी

म्हणजे जन्म-मरणशून्य आहे, त्याला क्षुधा, तृषा, शोक, मोह, जरा, मृत्यु इत्यादिकांची यत्किंचित् बाधा होत नाहीं, तो या आधिव्याधीच्या पलीकडे राहणारा आहे, तो जगत्स्वामी आहे व तो स्वतंत्र आहे असें या साधकयोग्यास समजतें. नंतर या लक्षणांनीं युक्त जो परमेश्वर तोच मी आहें; मी सर्वांचा आत्मा आहें, मी सर्वांस सम असून (सर्वत्र निर्विकार असून) सर्व भूतांमध्यें राहणारा आहें, मी परिच्छिन्न नव्हें म्हणजे अविद्येनें उत्पन्न केलेल्या उपाधींनीं संकुचित झालेला मायिक आत्मा (जीव) नव्हे, मी मायेचाही आत्मा आहें, माझा महिमा मोठा आहे, हें विश्व माझें म्हणजे परमेश्वराचें स्वरूप आहे, असें जेव्हां पूर्ण ज्ञान त्यास होतें, तेव्हां तो शोकशून्य होतो. अर्थातच सर्व शोकसागरापासून त्याची सुटका होते आणि तो कृतकृत्य होतो. हा तात्पर्यार्थ आहे. ॥ २ ॥

रंग०—' अनीशया ' = भोग्य होणाऱ्या प्रकृतीनें. आपण परमात्म्याचे शेषरूपी असूनही (प्रकार असून) आपलें स्वरूप ज्ञानात्मक व आनंदात्मक आहे हें विसरून जाणें व वृक्षाप्रमाणें नष्ट होणाऱ्या एकाच शरीरांत मी आहें, मी स्थूल आहें, कृश आहें, अशी शरीरतादात्म्यबुद्धि करणें, या अज्ञानामुळें जीवाला दुःखाचा अनुभव प्रकृतीच्या संसर्गानें येतो आणि तो शोक करीत राहतो. पण जेव्हां श्रीपरमेश्वर हा आपला आधार, आपला नियंता व आपला शेषी आहे, म्हणून जीवापेक्षां सर्वविलक्षण आहे, असें पाहतो व आपल्या कर्मानें आणि उपासनेनें प्रसन्न झालेल्या सर्व जगन्नियंत्या परमेश्वराचा महिमा आपल्या बुद्धीमध्यें प्रकट करितो, परमेश्वराचा महिमा त्यांस जेव्हां समजतो, तेव्हां तो शोकशून्य होतो. ' अनीश '=असमर्थ. हाही अर्थ या आचार्यांस मान्य आहे. सत्त्व म्हणजे अंतःकरण असा अर्थ करून हा मंत्र अंतःकरण-जीवपर आहे, जीव-परमेश्वरपर नाहीं, असा या आचार्यांनीं पूर्वपक्ष उत्पन्न करून त्याचें निराकारण केले आहे. आणि हा व इतर समानार्थक मंत्र जीव-ब्रह्मपर आहेत असें ठरविलें आहे. क्षेत्रज्ञ म्हणजे परमेश्वर आणि जीव म्हणजे भूतात्मा असे अर्थ देऊन जीव-परमेश्वरांमध्यें भेद आहे, हेंही यांनीं दाखविलें आहें. ही समग्र अर्थ-चर्चा चिंतनीय आहे, इतकें मात्र सुचविणें येथें शक्य आहे.

माध्व०—अनीशया=हरीशिवाय जिला दुसरा स्वामी नाहीं, ती हरीची शक्ति. ' जुष्ट '=सर्वसेव्य. ' ईश '=विष्णु. हा आपल्याहून निराळा आहे व त्याचे स्वरूप मागें सांगितल्याप्रमाणें असून त्या स्वरूपाचें मनन निदिध्यासन केलें, परमेश्वराची उपासना केली, असतां अपरोक्ष साक्षात्कार होऊन जीव शोकशून्य होतो. देहादिकाचें ठिकाणीं ममत्व उत्पन्न होणें हाच मोह होय. परमेश्वराचें स्वरूप समजलें म्हणजे हा मोह नाहींसा होतो.

मंत्र तिसरा.

यदा पश्यः पश्यते रुक्मवर्णं कर्तारमीशं पुरुषं ब्रह्मयोनिम् । तदा विद्वान्पुण्यपापे विधूय निरञ्जनः परमं साम्यमुपैति ॥ ३ ॥

अन्वय व अर्थः—**यदा पश्यः रुक्मवर्णं, कर्तारं, ईशं, पुरुषं, ब्रह्मयोनिं पश्यते** (जेव्हां ज्ञानीपुरुषाला तेजस्वी जगत्कर्त्या पुरुषाचें, जगत्स्वामीचें, जगदाधाराचें व जगत्कारणाचें स्वरूप समजतें) **तदा पुण्यपापे विधूय निरंजनः विद्वान् परमं साम्यं उपैति** (तेव्हां सर्वपुण्यपापांचा विनाश करून दोषशून्य झालेला विद्वान् हा अतिश्रेष्ठ जी निर्विकारी समता ती प्राप्त करून घेतो.) ॥ ३ ॥

अन्योऽपि मन्त्र इममेवार्थमाह सविस्तरम् । यदा यस्मिन्काले पश्यः पश्यतीति विद्वान्साधक इत्यर्थः । पश्यते पश्यति पूर्ववद्रुक्मवर्णं स्वयंज्योतिःस्वभावं रुक्मस्येव वा ज्योतिरस्याविनाशि कर्तारं सर्वस्य जगत ईशं पुरुषं ब्रह्मयोनिं ब्रह्म च तद्योनिश्चासौ ब्रह्मयोनिस्तं ब्रह्मयोनिं ब्रह्मणो वाऽपरस्य योनिं स यदा चैवं पश्यति तदा स विद्वान्पश्यः पुण्यपापे बन्धनभूते कर्मणी समूले विधूय निरस्य दग्ध्वा निरञ्जनो निर्लेपो विगतक्लेशः परमं प्रकृष्टं निरतिशयं साम्यं समतामद्वयलक्षणं द्वैतविषयाणि साम्यान्यतोऽर्वाञ्चेवातोऽद्वयलक्षणमेतत्परमं साम्यमुपैति प्रतिपद्यते ॥ ३ ॥

सिद्धान्ती—वरील अर्थच आणखी एकदां हा मंत्र विस्तारानें सांगत आहे. जेव्हां 'पश्यः' म्हणजे ज्ञानी साधक परमेश्वराचें स्वरूप तें माझेंच आहे, हें समजून घेतो, व परमेश्वराचें स्वयंभु तेज सुवर्ण-तेजाप्रमाणें अविनाशी आहे, तो सर्वजगताचा कर्ता आणि स्वामी आहे, तोच चराचरजगताला पूर्णत्व देणारा आहे, तो परमेश्वर ब्रह्मरूप असून तोच जगत्कारण आहे किंवा अपरब्रह्माचें (सगुण ब्रह्माचें) आदिकारण आहे, असें जेव्हां परमेश्वरी स्वरूपाचें अथवा स्वस्वरूपाचें त्याला ज्ञान होतें, तेव्हां तो विद्वान् साक्षात्कारी पुरुष आपल्यास बद्ध करूं पाहणाऱ्या पुण्य-पापरूपी कर्मांचे बंध समूळ नाहींसे करून टाकतो अथवा जाळून टाकतो, निर्लेप होतो आणि सुख-दुःखातीत होऊन अत्यंत उत्कृष्ट असें जें परमेश्वरी साम्य तें प्राप्त करून घेतो. सारांश तो परब्रह्माशीं तादात्म्य पावतो. त्याचें व परमेश्वराचें अभिन्नत्व होतें. तो

परब्रह्म होतो. सामान्यतः साम्यें द्वैताचा संबंध दाखविणारीं असतात, म्हणून अलीकडचीं, व्यवहारात्मक, सारांश, कनिष्ठ प्रतीचीं असतात. साम्य दोघांत अथवा अनेकांत असतें म्हणून साम्य म्हटलें कीं द्वैताचा उद्भव होतो. पण येथें तर परम हें साम्याचें विशेषण श्रुतिपठित आहे; म्हणून हें साम्य अद्वयलक्षणाचें, एकत्वदर्शक मात्र असलें पाहिजे. सारांश मुक्तास जें साम्य प्राप्त होतें तें अद्वयलक्षणात्मक असतें, असें श्रुतीला एककंठानें सांगावयाचें आहे. असो, हा जीव जीवन्मुक्त होतो. ॥ ३ ॥

रंगरामानुज—जेव्हां ब्रह्मदर्शी (ब्रह्म पाहणारा) जीव हा अतितेजस्वी, मंगलशरीरी, जगत्कर्ता, जगन्नियंता, ब्रह्मयेनि (ब्रह्म म्हणजे अव्याकृत, त्याचें उपादानकारण असणारा किंवा ब्रह्म हींच योनि असणारा स्वयंभु) परमेश्वराचें, वासुदेवाचें, दर्शन घेतो, त्यावेळीं सर्व पुण्य-पापांचें निरसन होतें. मग प्रकृतीचे बंध तोडून ज्ञानी मुमुक्षु अपहतपाप्मत्वादि श्रुत्युक्त अष्ट लक्षणांनीं ब्रह्म-स्वरूपी होतो. अथवा त्यास सरूपता-मुक्ति मिळते.

माध्व०—ज्ञान झालें म्हणजे अप्रारब्ध (फलोन्मुख न झालेलें कर्म) आणि काम्य कर्मांचें पुण्यफल या उभयतांचाही नाश होतो. ' रुक्मवर्ण ' प्रकाशरूपी शरीर. ब्रह्मयोनि=हिरण्यगर्भाचें कारण. सारांश जेव्हां जीव प्रकाशरूपी जगत्कर्त्या, पूर्ण षड्गुणी, ब्रह्मदेवपित्याचे (विष्णूचें) संपूर्ण ज्ञान करून घेतो, तेव्हां त्याला अपरोक्ष ज्ञान होऊन तो निरंजन होतो, त्याचें सर्व अनिष्टकर्मबंध सुटतात आणि त्याला विष्णुसाम्य प्राप्त होतें.

मंत्र चवथा.

प्राणो ह्येष यः सर्वभूतैर्विभाति विजानन्विद्वान्भवते नातिवादी। आत्मक्रीड आत्मरतिः क्रियावानेष ब्रह्मविदां वरिष्ठः ॥ ४ ॥

अन्वय व अर्थ—**हि एषः यः प्राणः सर्वभूतैः विभाति** (सुप्रसिद्ध आहे कीं, हा प्राण सर्वभूतांसह प्रकाशित होतो) **विजानन् विद्वान् अतिवादी न भवते** (हें जाणून विज्ञान असणारा ज्ञानी पुरुष अतिवादी असत नाहीं.) **एषः आत्मक्रीडः, आत्मरतिः, क्रियावान्, ब्रह्मविदां वरिष्ठः** (हा आत्मक्रीडा करणारा आत्मरत पुरुष कृतकृत्य होऊन सर्व ब्रह्मवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ होतो.) ॥ ४ ॥

किंच योऽयं प्राणस्य प्राणः पर ईश्वरो ह्येष प्रकृतः सर्वैर्भूतैर्ब्रह्मादिस्तम्बपर्यन्तैः। इत्थंभूतलक्षणे तृतीया। सर्वभूतस्थः सर्वात्मा

सन्नित्यर्थः । विभाति विविधं दीप्यते । एवं सर्वभूतस्थं यः साक्षादात्मभावेनायमहमस्मीति विजानन्विद्वान्वाक्यार्थज्ञानमात्रेण स भवते भवति न भवतीत्येतत्किमतिवाद्यतीत्य सर्वानन्यान्वदितुं शीलमस्येत्यतिवादी । यस्त्वेवं साक्षादात्मानं प्राणस्य प्राणं विद्वानतिवादी स न भवतीत्यर्थः । सर्वं यदात्मैव नान्यदस्तीति दृष्टं तदा किं ह्यसावतीत्य वदेत् । यस्य त्वपरमन्यद्दृष्टमस्ति स तदतीत्य वदति । अयं तु विद्वानात्मनोऽन्यन्न पश्यति नान्यच्छृणोति नान्यद्विजानाति । अतो नातिवदति । किंचाऽऽत्मक्रीड आत्मन्येव च क्रीडा क्रीडनं यस्य नान्यत्र पुत्रदारादिषु स आत्मक्रीडः । तथाऽऽत्मरतिरात्मन्येव च रती रमणं प्रीतिर्यस्य स आत्मरतिः । क्रीडा बाह्यसाधनसापेक्षा । रतिस्तु साधननिरपेक्षा बाह्यविषयप्रीतिमात्रमिति विशेषः । तथा क्रियावाञ्ज्ञानध्यानवैराग्यादिक्रिया यस्य सोऽयं क्रियावान् । समासपाठ आत्मरतिरेव क्रियाऽस्य विद्यत इति बहुव्रीहिमतुबर्थयोरन्यतरोऽतिरिच्यते । केचित्त्वाग्निहोत्रादिकर्मब्रह्मविद्ययोः समुच्चयार्थमिच्छन्ति । तच्चैष ब्रह्मविदां वरिष्ठ इत्यनेन मुख्यार्थवचनेन विरुध्यते । न हि बाह्यक्रीड आत्मरतिश्च भवितुं शक्तः । कश्चिद्बाह्यक्रियाविनिवृत्तो ह्यात्मक्रीडो भवति बाह्यक्रियात्मक्रीडयोर्विरोधात् । न हि तमःप्रकाशयोर्युगपदेकत्र स्थितिः संभवति । तस्मादसत्प्रलपितमेवैतदनेन ज्ञानकर्मसमुच्चयप्रतिपादनम् । " अन्या वाचो विमुञ्चथ " " संन्यासयोगात् " इत्यादिश्रुतिभ्यश्च । तस्मादयमेवेह क्रियावान्यो ज्ञानध्यानादिक्रियावान्सोऽभिन्नार्थमर्यादः संन्यासी । य एवंलक्षणो नातिवाद्यात्मक्रीड आत्मरतिः क्रियावान्ब्रह्मनिष्ठः स ब्रह्मविदां सर्वेषां वरिष्ठः प्रधानः ॥ ४ ॥

सिद्धान्ती—आणखी; जो हा परमेश्वर प्रस्तुतचा विषय आहे, तो प्राणांचा प्राण असून ब्रह्मदेवापासून तों गवताच्या काडीपर्यंतच्या सर्वभूतांच्या स्वरूपांनीं प्रकाशमान होत असतो, म्हणजे सर्वभूतांमध्यें राहून व सर्वांचा आत्मा होऊन सर्वप्रकाशक होतो. याप्रमाणें सर्वभूत-निवासी जो परमेश्वर तो प्रत्यक्ष मीच आहें, असें ज्या विद्वानाला ज्ञान-विज्ञान होतें, महावाक्यांचा उपदेश होतांक्षणी ज्या अधिकारी मुमुक्षूला ' मी ब्रह्म आहें. ' असें समजून उमजतें, तो केव्हांही अतिवादी होत नाहीं. अतिवादी म्हणजे इतर सर्वांस अतिक्रांत करून वाद करण्याचा ज्याचा स्वभाव असतो, ते अतिवादी होत. श्रुतिवाक्यांचा अर्थ मात्र करून त्याच्या जोरावर 'तो आहे,'

'तो नाहीं' असा वाक्पाटवानें वाद करून प्रतिपक्ष्यांचा पाडाव करितात, ते अतिवादी होत. पण प्राणांचा प्राण असणारा आत्मा मी प्रत्यक्ष आहें, असें ज्याला समजतें, तो अतिवादी होणें शक्य नाहीं. जेव्हां सर्व मी आहें, दुसरी वस्तु नाहीं, असें ज्ञान होतें, तेव्हां हा विद्वान् पुरुष बोलेल तरी काय? दुसरी कांहीं तरी वस्तु आहे, ती दिसत भासत आहे, असें ज्ञान असतें तेव्हां तिच्या पलीकडे उभें राहून बोलतां येतें; हें ठीक आहे. पण वरील आत्मज्ञानी विद्वानाला सर्वात्मकस्वरूपाशिवाय दुसरें कांहीं दिसत नाहीं, ऐकूं येत नाहीं किंवा समजत नाहीं, म्हणून अर्थातच तो आपल्या पलीकडे जाऊन बोलूं शकत नाहीं. आपणच सर्व झाल्यावर पलीकडे अलीकडे इत्यादि शब्द व शब्दसामर्थ्यें कुंठित होतात. म्हणून हा विद्वान् पुरुष अतिवादी होत नाहीं. तो केवळ आत्मस्वरूपाशीं क्रीडा करण्यांत दंग होऊन जातो. पुत्र, दारा, इत्यादिकांशीं (इतर जड विषयांशीं) क्रीडा करणें जीवन्मुक्ताला असंभवनीय होतें. तसेंच त्याची निरतिशय प्रीति आत्मस्वरूपावर मात्र असते. आत्मस्वरूपीं त्याचें प्रेमसर्वस्व समर्पित होतें. क्रीडा करण्याला बाह्य साधनांची अपेक्षा असते, पण रतीला साधनांची आवश्यकता नसते. रति म्हणजे साधननिरपेक्ष शुद्ध बाह्यविषयप्रीति होय. हिला साधन नको असतें. असा 'क्रीडा आणि रति' यांत विशेष आहे. ही प्रीति बाह्यविषयात्मक किंवा आत्मविषयात्मक असेल. आत्मज्ञानी विद्वानाची प्रीति आत्मस्वरूपी मात्र असते. याचप्रमाणें ज्ञान, ध्यान, वैराग्य इत्यादि क्रियांनीं जो संपन्न असतो त्याला क्रियावान् असें म्हणतात. 'आत्मरतिक्रियावान्' असा समस्तपाठ घेतला तर त्याचा अर्थ आत्मरति हीच ज्याची क्रीडा आहे असा बहुव्रीहि समासाच्या विग्रहानें होईल. दोन्ही पाठ एकच अर्थ उद्भावितात, पण दुसऱ्यापेक्षां पहिला बरा.* कारण त्याच्या योगें 'बाह्यक्रियानिवृत्तीचा' अर्थ सहज लक्ष्यांत येतो. आतां कांहीं लोक या मंत्रांत क्रियावान् या शब्दानें अग्निहोत्रादि कर्मे व 'आत्मक्रीडः' व 'आत्मरतिः' इत्यादि शब्दांनीं ब्रह्मविद्या असे अर्थ समजून ज्ञान आणि कर्म यांचा समुच्चय श्रुतीला अभिप्रेत आहे, असें म्हणतात; पण हें म्हणणें योग्य नाहीं. कारण, मंत्रांतील 'ब्रह्मवेत्त्यांमध्यें हा पुरुष वरिष्ठ असतो' या प्रधान अर्थाच्या विरुद्ध हा समुच्चयाचा अर्थ होतो. शिवाय बाह्य क्रिया करणारा पुरुष आत्मस्वरूपीं रममाण होणें शक्य नाहीं. बाह्यकर्मांपासून निवृत्ति झाली तर मात्र आत्मक्रीडा होण्याचा यथार्थ संभव प्राप्त होतो. बाह्यक्रीडा आणि आत्म-क्रीडा यांचा विरोध अत्यंत तीव्र आहे. तम आणि प्रकाश हीं केव्हांही एकत्र राहूं शकत नाहींत, त्याचप्रमाणें बाह्य-क्रीडा आणि आत्म-क्रीडा एकत्र असणें

---

* पहिला अर्थ बरा आहे, कारण व्याकरणपद्धतीनें 'आत्मरतिं क्रियः' असा समस्तशब्द हा दुसरा इष्ट-अर्थ प्राप्ति करून देतो. पण श्रुतीनें 'वान्' असा प्रत्यय लावून मुद्दाम 'क्रियावान्' असा शब्द उपयोजिला आहे. तेव्हां 'क्रियावान्' हा शब्द निराळा घेऊन अधिक अर्थ समजणें उत्तम पक्ष होय.

संभवनीय नाहीं. म्हणून या मंत्राचा अर्थ ज्ञान-कर्म-समुच्चय-पर करणें म्हणजे वेडेपणाची बडबड करण्यासारखी होय. 'दुसऱ्या वाणींचा अथवा विद्यांचा त्याग करा' 'कर्मसंन्यास करा' इत्यादि श्रुति समुच्चयवादाचा सर्वथा निषेध करितात. म्हणून येथें क्रियावान् या शब्दाचा अर्थ आम्ही केला आहे, असाच असला पाहिजे. म्हणजे ज्ञान, ध्यान, इत्यादि प्रकारचा मात्र ज्ञानपर अर्थ क्रियावान् या शब्दाचा केला पाहिजे. आत्मविद्येची मर्यादा आमचा अर्थ उल्लंघित नाहीं. इतकेच नव्हे तर आमचा अर्थ विद्यापर मात्र होतो. सारांश, येथें या मंत्रांत तोच क्रियावान् इष्ट आहे कीं ज्ञानात्मक मात्र क्रिया करून जो अद्वैतज्ञानवस्तूची मर्यादा उल्लंघित नाहीं. असो; जो या मंत्रांत सांगितल्याप्रमाणें संन्यासी आहे, जो अनतिवादी आहे. आत्मक्रीड आहे, आत्मरति असून ज्ञान-ध्यानादि मात्र क्रिया करणारा आहे, तो ब्रह्मनिष्ठ पुरुष सर्व ब्रह्मवेत्त्या पुरुषांमध्यें श्रेष्ठ म्हणजे प्रधान असतो. ॥ ४ ॥

रंगरामानुज—'प्राण'=परमात्मा. ह्याचा आश्रय सर्व भूतें करितात. 'विजानन्'= विद्वान् भव तेनातिवादी, असा पाठ स्वीकारून या आचार्यांनीं असा अर्थ केला आहे कीं, श्रवण-मननांच्या योगानें ज्ञानीपुरुषानें भगवंताची उपासना करीत होत्साता परमेश्वराचें साहाय्य घेऊन अतिवादी व्हावें (परमेश्वर सर्वांपेक्षां श्रेष्ठ आहे असें दृढ-चिंतनपूर्वक म्हणावें) असा उपदेश श्रुतीनें मुमुक्षूस केला आहे. 'क्रियावान्'=निष्काम-कर्माचें अनुष्ठान करणारा. वेदविहित कर्म केलें तर मात्र अंतःकरणपरिशुद्ध होऊन निष्कामकर्मानें ब्रह्मविद्येची उत्पत्ति होते आणि विहित कर्म करणारा ज्ञानी पुरुष सर्व ब्रह्मवेत्त्यांत श्रेष्ठ होतो.

माध्व०—क्रीयावान्=प्रारब्धकर्मकर्ता. एषः=हा हरि. सर्वभूतैः=इंद्रादि इंद्रियाभिमानी देवतांसह अतिवादी, मी कर्ता आहें असें म्हणणारा. जेव्हां मी कर्ता नाहीं; स्वतंत्र नाहीं, असें ज्ञान होऊन 'हा हरि सर्वेंद्रियांचा स्वामी आहे' असें अपरोक्ष ज्ञान करून घेतो तेव्हां प्रारब्धकर्मकर्ता सर्व भगवंताची क्रीडा आहे, सर्व प्रेमाचें स्थान भगवान् आहे, असें समजतो आणि त्याचें बाह्यविषयात्मक अनुसंधान संपतें. ही असंप्रज्ञात-समाधि होय. जेव्हां ही समाधि नसते तेव्हां तो सत्कर्म मात्र करीत असतो. त्याचें प्रारब्धच भगवत्पूजात्मक कर्मे करण्याचें असतें.

मंत्र पांचवा.

सत्येन लभ्यस्तपसा ह्येष आत्मा सम्यग्ज्ञानेन ब्रह्मचर्येण नित्यम् । अन्तःशरीरे ज्योतिर्मयो हि शुभ्रो यं पश्यन्ति यतयः क्षीणदोषाः ॥ ५ ॥

अन्वय व अर्थ—**हि एषः आत्मा नित्यं सत्येन, तपसा, सम्यग्ज्ञानेन ब्रह्मचर्येण लभ्यः** (हा आत्मा नित्य सत्याचरणानें, नित्य तपानें, नित्य परमार्थज्ञानानें म्हणजे नित्य ब्रह्मचर्यानें लक्षावयाचा असतो.) **हि अंतःशरीरे ज्योतिर्मयः शुभ्रः, क्षीणदोषाः यतयः यं पश्यंति** (हें प्रसिद्ध आहे कीं, हा शरीराच्या अंतर्यामी राहणारा प्रकाशरूप निर्मळ आत्मा ज्यांचे दोष नष्ट झाले आहेत त्या यतींना मात्र साक्षात् प्रकट होतो)॥५॥

सारांश चित्त शुद्ध झालेल्या भोगविरक्त विद्वानांस आत्मदर्शन होतें, तें सत्याचरण, तपश्चर्या, यथार्थ ज्ञान आणि ब्रह्मचर्य यांच्या नित्य अनुष्ठानानें होतें.

अधुना सत्यादीनि भिक्षोः सम्यग्ज्ञानसहकारीणि साधनानि विधीयन्ते निवृत्तिप्रधानानि । सत्येनानृतत्यागेन मृषावदनत्यागेन लभ्यः प्राप्तव्यः । किंच तपसा हीन्द्रियमनएकाग्रतया " मनसश्चेन्द्रियाणां च ह्यैकाग्र्यं परमं तपः " इति स्मरणात् । तद्धयनुकूलमात्मदर्शनाभिमुखीभावात्परमं साधनं तपो नेतरच्चान्द्रायणादि । एष आत्मा लभ्य इत्यनुषङ्गः सर्वत्र । सम्यग्ज्ञानेन यथाभूतात्मदर्शनेन ब्रह्मचर्येण मैथुनासमाचारेण । नित्यं सर्वदा नित्यं सत्येन नित्यं तपसा नित्यं सम्यग्ज्ञानेनेति सर्वत्र नित्यशब्दोऽन्तर्दीपिकान्यायेनानुषक्तव्यः । वक्ष्यति च—" न येषु जिह्ममनृतं न माया च " इति। कोऽसावात्मा य एतैः साधनैर्लभ्य इत्युच्यते । अन्तःशरीरेऽन्तर्मध्ये शरीरस्य पुण्डरीकाकाशे ज्योतिर्मयो हि रुक्मवर्णः शुभ्रः शुद्धोऽयमात्मानं पश्यन्त्युपलभन्ते यतयो यतनशीलाः संन्यासिनः क्षीणदोषाः क्षीणक्रोधादिचित्तमलाः स आत्मा नित्यं सत्यादिसाधनैः संन्यासिभिर्लभ्यत इत्यर्थः । न कादाचित्कैः सत्यादिभिर्लभ्यते । सत्यादिसाधनस्तुत्यर्थोऽयमर्थवादः ॥ ५ ॥

सिद्धान्ती—आतां येथून यथार्थज्ञानाच्या सहचारित्वानें असणारीं सत्यादि-आचरणाचीं साधनें भिक्षूला (कर्मसन्यस्त पुरुषाला) विहित केलीं आहेत. हीं सर्व साधनें निवृत्तिपर आहेत. असो; सत्य म्हणजे अनृतत्याग (मृषा, मिथ्या वचनाचा त्याग) होय. आत्मप्राप्ति करून घ्यावयाची असेल तर प्रथम असत्याचा नित्य त्याग केला पाहिजे (२) तपश्चर्या म्हणजे इंद्रियांसह मनाची अखंड एकाग्रता करणें हें होय 'मनाची आणि इंद्रियांची एकाग्रता करणें हें परम श्रेष्ठ तप आहे' असें स्मृतीचें म्हणणें आहे. आपल्या परमार्थास परम अनुकूल म्हणजे आत्मदर्शन

प्रत्यक्ष करण्यांत परम कुशल असें जें श्रेष्ठ साधन तें एकाग्रतारूप तप होय. इतर चांद्रायणादि करणें ही आत्मसाधक तपश्चर्या नव्हे. असो; आत्मसाधनाला एकनिष्ठ तपश्चर्या नित्य हवी. याचप्रमाणें (३) आत्मस्वरूपाचें यथार्थ दर्शन म्हणजे सम्यग्ज्ञान असें ब्रह्मचर्य म्हणजे अशिष्टमैथुनाचा–विषयभोगाचा नित्य त्याग होय. हीं सर्व साधनें आत्म–प्राप्तीच्या उपयोगी पडतात. याप्रमाणें नित्य सत्याचरण, नित्य तपश्चर्या, नित्य यथार्थज्ञान म्हणजे नित्य ब्रह्मश्रवर्य हीं सहकारी करणें साधनें आत्म–प्राप्ति करून देतात. मंत्रांतील नित्य शब्दाचा अंतस्थदीपिकान्यायानें सर्व साधनांशीं अन्वय करावयाचा आहे. ' ज्यांच्या ठिकाणीं कपट नाहीं, अनृत नाहीं व माया नाहीं ' अशी पुढें येणारी श्रुति आम्ही म्हणतों याला प्रमाण* आहे.

या साधनांनीं प्राप्त होणारा आत्मा कोणत्या स्वरूपाचा असतो, हें या मंत्राच्या उत्तरार्धांत पुनः सांगितलें आहे. हा आत्मा शरीराच्या अंतर्यामीं (हृदयाकाशांत) प्रकाशरूपानें व शुद्धस्वरूपानें वास्तव्य करितो. या आत्म्याचें दर्शन यतींस, मनःसंयमन करणाऱ्या विरक्त पुरुषांस मात्र होत असतें. हे विरक्त संन्यासी क्षीणदोष असतात. म्हणजे त्यांच्या चित्तांतील काम–क्रोधादि मल नाहींसे झालेले असतात. यांचें चित्त निर्मल असतें. असो; याप्रमाणें नित्य सत्याचरणादिसाधनांनीं हा आत्मा संन्याशांस मात्र प्राप्त होतो. उगीच एखादे सणासुदीचे वेळीं सत्यादिसाधनांचा अवलंब करणाऱ्या पुरुषांस हा आत्मा मिळावयाचा नाहीं. असो; पुढील मंत्र अर्थातच सत्यादिसाधनांच्या स्तुतीसाठीं आहे, अर्थवादपर आहे. येथें साधनांची स्तुति आहे, ब्रह्मस्वरूपाचा साक्षात् अवतार नाहीं. ॥ ५ ॥

रंगरामानुज—' सत्य ' = भूतांचे कल्याण करणारें भाषण. परमेश्वराची प्राप्ति उपासनाद्वारानें होते.

माध्व०—' सत्य '=सतांचे हित करणारें तें. ' ब्रह्मचर्य '=श्रवणादिरूप वेदाभ्यास. ज्ञानोत्तर केलेल्या निष्कामकर्मानें, श्रवणादिकांनीं व अपरोक्षज्ञानानें ज्या स्वरूपानंदाचा आविर्भाव होतो, तो केवळ विलक्षण आहे. ' यति ' = श्रवणादि अनुकूल प्रयत्न करणारे. सम्यग्ज्ञान = माहात्म्यज्ञान आणि स्नेहरूप भक्ति.

मंत्र सहावा.

सत्यमेव जयति नानृतं सत्येन पन्था विततो देवयानः । येनाऽऽक्रमन्त्यृषयो ह्याप्तकामा यत्र तत्सत्यस्य परमं निधानम् ॥ ६ ॥

* यावरून कठोपनिषद्भाष्यावरील भाष्य आचार्यांनीं मागाहून लिहिलें असा ध्वनि कदाचित् निघूं शकेल.

अन्वय व अर्थ—सत्यं एव जयति न अनृतं (सत्यानें मात्र जय-प्राप्ति होते, असत्यानें होत नाहीं.) **देवयानः पंथाः सत्येन विततः** (देवयान मार्ग सत्यानें मंडित झाला आहे.) **येन आप्तकामाः ऋषयः यत्र आक्रमन्ति** (या सत्यानें मात्र पूर्णकाम ऋषी ज्या देवयानमार्गाचें आक्रमण करितात.) **तत् सत्यस्य परमं निधानं** (तो देवयानमार्ग सत्याचें श्रेष्ठ वसतिस्थान आहे.) ॥ ६ ॥

सत्यमेव सत्यवानेव जयति नानृतं नानृतवादीत्यर्थः । न हि सत्यानृतयोः केवलयोः पुरुषानाश्रितयोर्जयः पराजयो वा संभवति । प्रसिद्धं लोके सत्यवादिनाऽनृतवाद्यभिभूयते न विपर्ययोऽतः सिद्धं सत्यस्य बलवत्साधनत्वम् । किंच शास्त्रतोऽप्यवगम्यते सत्यस्य साधनातिशयत्वम् । कथम् । सत्येन यथाभूतवादव्यवस्थया पन्था देवयानाख्यो विततो विस्तीर्णः सातत्येन प्रवृत्तः । येन पथा ह्याक्रमन्ति क्रमन्त ऋषयो दर्शनवन्तः कुहकमायाशाठ्याहंकारदम्भानृतवर्जिता ह्याप्तकामा विगततृष्णाः सर्वतो यत्र यस्मिंस्तत्परमार्थतत्त्वं सत्यस्योत्तमसाधनस्य संबन्धि साध्यं परमं प्रकृष्टं निधानं पुरुषार्थरूपेण निधीयत इति निधानं वर्तते । तत्र च येन पथाऽऽक्रमन्ति स सत्येन वितत इति पूर्वेण संबन्धः ॥ ६ ॥

सिद्धान्ती—सत्याचरण करणारा पुरुष मात्र जय पावतो. असत्यवादी पुरुष केव्हांही विजयी होत नाहीं. मंत्रांत सत्य आणि अनृत असे शब्द आहेत खरे, पण पुरुषाचा आश्रय घेतल्याशिवाय केवळ सत्यानें जय मिळतो किंवा अनृतानें पराजय होतो, असें संभवत नाहीं, म्हणून सत्य म्हणजे सत्याचरणी पुरुष व अनृत म्हणजे अनृतवादी पुरुष असा अर्थ केला आहे. असो; व्यवहारांत हें प्रसिद्धच आहे कीं, सामान्यतः सत्यवक्त्या पुरुषाला मिथ्या भाषण करणाराचा लीलेनें पराजय करतां येतो. चिरकाल टिकणारा उलट अनुभव केव्हांही येत नाहीं, म्हणून सत्य हें साधन बलवत् आहे, हें सिद्ध होतें. तसेंच, शास्त्रावरूनही असें समजतें कीं, सत्य हें अत्यंत उत्कृष्ट कार्यक्षम साधन आहे. कसें तें ऐकाः-देवयाननामक जो मार्ग आहे तो सत्यानें मात्र विस्तीर्ण होऊन अखंडत्वानें नित्य सिद्ध झाला आहे. वस्तुस्थिति असेल तशी ती प्रकट करणें याचें नांव सत्यवाद होय. याच मार्गानें ऋषी (त्रैकालिक ज्ञान असणारे महापुरुष) जातात. कपट, माया शठपणा, अहंकार, दंभ, अनृत इत्यादि गोष्टी सर्वथा वर्ज्य करणें हें सत्याचें लक्षण आहे. असो; ज्यांच्या सर्व इच्छा पूर्ण झाल्या, जे सर्वथा

तृष्णाशून्य झाले, ते सर्वज्ञ ऋषि या सत्याच्या मार्गानें जातात. उत्तम साधन जें सत्य त्यानें साध्य होणारें परमार्थतत्त्व, सर्वश्रेष्ठ पुरुषार्थरूपी निधान, म्हणजे परमात्मस्वरूप जेथें नित्य वास्तव्य करितें, तें देवयान होय. त्या स्थानाकडे (देवयानाकडे) ज्या मार्गानें ऋषी जातात, तो मार्ग सत्यानें मात्र पूर्ण खचिलेला आहे, हें ध्यानांत ठेवावयाचें आहे. सारांश, देवयानानें पुरुषार्थसिद्धि होते. आणि देवयानमार्ग सत्यानें साध्य होतो. ॥ ६ ॥

माध्व०—'सत्य'=वैकुंठस्थ भगवान् विष्णु. अनृत = असुर. सत्याचें निधान वैकुंठलोक आहे. 'आप्तकाम' = इष्ट असलेलें महाज्ञान ज्यांस प्राप्त झालें आहे ते. 'देवयानमार्ग' हा श्रीविष्णूनें भक्तास परमपद प्राप्ती व्हावी म्हणून निर्माण केला आहे.

मंत्र सातवा.

बृहच्च तद्दिव्यमचिन्त्यरूपं सूक्ष्माच्च तत्सूक्ष्मतरं विभाति । दूरात्सुदूरे तदिहान्तिके च पश्यत्स्विहैव निहितं गुहायाम् ॥ ७ ॥

अन्वय व अर्थ—**बृहत् च तत् दिव्यं, अचिंत्यरूपं, सूक्ष्मात् च तत् सूक्ष्मतरं विभाति** (तें अत्यंत मोठें असून अति तेजस्वी आहे. त्याचें स्वरूप मनोबुद्धींस अगोचर आहे. तें लहानाहूनही अत्यंत लहान आहे.) **दूरात तत् सुदूरे इह अंतिके च** (ते दूराहून दूर ठिकाणीं व जवळच्या वस्तूहून अत्यंत जवळ आहे.) **पश्यत्सु इह एव गुहायां निहितं** (ज्ञानी पुरुषांस हें ब्रह्मतत्त्व आपल्या हृदयाकाशांत आहे, असें येथें सुद्धां दिसतें.) ॥ ७ ॥

किं तत्किंधर्मकं च तदित्युच्यते—बृहन्महच्च तत्प्रकृतं ब्रह्म सत्यादिसाधनं सर्वतो व्याप्तत्वात् । दिव्यं स्वयंप्रभमनिन्द्रियगोचरमत एव न चिन्तयितुं शक्यतेऽस्य रूपमित्यचिन्त्यरूपम् । सूक्ष्मादाकाशादेरपि तत्सूक्ष्मतरं निरतिशयं हि सौक्ष्म्यमस्य सर्वकारणत्वाद्विभाति विविधमादित्यचन्द्राकारेण भाति दीप्यते । किंच दूराद्विप्रकृष्टदेशात्सुदूरे विप्रकृष्टतरे देशे वर्ततेऽविदुषामत्यन्तागम्यत्वात्तद्ब्रह्म । इह देहेऽन्तिके समीपे च विदुषामात्मत्वात् । सर्वान्तरत्वाच्चाऽऽकाशस्याप्यन्तरश्रुतेः । इह पश्यत्सु चेतनावस्त्वेतादिहितं स्थितं दर्शनादिक्रियावत्त्वेन योगिभिर्लक्ष्यमाणम् । क गुहायां बुद्धिलक्षणायाम् ।

तत्र हि निगूढं लक्ष्यते विद्वद्भिः । तथाऽप्यविद्यया संवृतं सन्न लक्ष्यते तत्रस्थमेवाविद्वद्भिः ॥ ७ ॥

सिद्धान्ती—तें काय आहे व त्याचे धर्म कसे आहेत ते ह्या मंत्रांत सांगतात. ऐका:—तें प्रकृत ब्रह्म सर्वांहून मोठें आहे. हेंच सत्यादिकांचेंही साधन आहे. ब्रह्म सर्वव्यापी आहे, म्हणून सत्यादि साधनांचें तें उपादान कारण होतें. हें सत्यादि साधनांनीं प्रकट होतें, तथापि सत्यादि साधनें याच्या अस्तित्वानें सिद्ध होतात. ब्रह्मतेज स्वयंभु आहे. तें ब्रह्म इंद्रियांस गोचर असत नाहीं, म्हणून त्याचें चिंतनही करितां येत नाहीं. सूक्ष्म आकाशापेक्षांही हें ब्रह्म अत्यंत सूक्ष्म आहे. याच्यापेक्षां जास्त सूक्ष्मतर-वस्तूचा अभाव आहे. सर्व सूक्ष्मवस्तूंचें कारण व आत्मा ब्रह्म आहे म्हणून तें सूक्ष्मा-हून सूक्ष्म आहे. तें ब्रह्म सूर्यचंद्रादि भिन्नभिन्न स्वरूपें घेऊन प्रकाशित मात्र होतें. शिवाय, अत्यंत दूर असणाऱ्या प्रदेशाहून तें जास्त दूर असतें. कोणाला ? अज्ञानी लोकांना. या पुरुषांस ब्रह्मस्वरूप मुळींच समजत नाहीं. म्हणून त्यांच्यापासून तें अत्यंत दूर दूर आहे. पण जे विद्वान् आहेत, ज्यांना आत्मज्ञान झालें आहे, त्यांच्या हे अत्यंत जवळ म्हणजे ब्रह्म हे त्यांचा आत्मा असतें. कारण तें सर्वांतर्यामी आहे. 'आका-शाचेंही तें अंतर्यामी आहे' असा श्रुतीचा उपदेश आहे. येथें ज्यांना ज्यांना म्हणून बुद्धि आहे त्यांच्या म्हणजे जीवमात्राच्या ठिकाणीं हें वास्तव्य करितें. आणि दर्शन, स्पर्शन, इत्यादि कियांच्या द्वारानें योगीलोकांचें हें लक्ष्य होतें. सारांश, योगीलोक दर्शनस्पर्शनवंदनादि किया पाहून असें निश्चित अनुमान करितात कीं, जीवाच्या ठिकाणीं ब्रह्माची वसति आहे. हें कोठें राहतें ? बुद्धिनामकगुहेमध्यें याचें वास्तव्य आहे. पण विद्वान् लोकांस मात्र बुद्धीमध्यें गुप्त असलेल्या ब्रह्माचें अनुमान करितां येतें. तथापि त्यावर अज्ञानाचें दडपण असल्यामुळें स्वहृदयांत असूनही अज्ञानीपुरुषांस तें दिसत नाहीं, म्हणून त्याला गुहास्थ, गूढ, असें म्हटलें.

सारांश, एकच ब्रह्मवस्तु निरनिराळ्या अधिकाराच्या जीवांस निरनिराळ्या स्वरूपानें प्रकट होत असतें. याप्रमाणें ब्रह्म हें सर्वव्यापी, सर्वांतर्यामी, स्वयंप्रकाश इत्यादि गुणांनीं युक्त आहे, असें स्वरूप समजण्यासाठीं श्रुति या मंत्रांत ब्रह्मवर्णन करित आहे. ॥ ७ ॥

रंगरामानुज—स्वरूपांनीं आणि गुणांनीं अत्यंत थोर असणारें, आकाशास आधार देणारें, वाणीला व मनाला अगोचर, मंगलशरीरी, सर्व चराचरांच्या अंतर्यामांत प्रवेश करण्यास समर्थ असणारें आणि म्हणून अति सूक्ष्म असणारे हें ब्रह्मतत्त्व आहे.

माध्व०—यांचा अभिप्राय असा दिसतो कीं, प्रत्येक अपरोक्ष ज्ञानी पुरुषास विचित्र स्वबिंबाचें दर्शन होतें आणि प्रत्येक ज्ञान्यास विचित्र मोक्ष मिळतो. यांच्या मोक्षांतही भिन्नता आहेच. विचित्र=असाधारण; प्रत्येकाला ब्रह्मस्वरूप निरनिराळें दिसतें, सारांश, मोक्षस्थितींत भेद आहे, मग व्यवहारांत आहे, याचें नवल काय ?

मंत्र आठवा.

न चक्षुषा गृह्यते नापि वाचा नान्यैर्देवैस्तपसा कर्मणा वा । ज्ञानप्रसादेन विशुद्धसत्त्वस्ततस्तु तं पश्यते निष्कलं ध्यायमानः ॥ ८ ॥

अन्वय व अर्थ—**चक्षुषा न गृह्यते, वाचा अपि न, अन्यैः देवैः न, तपसा वा कर्मणा न** (ब्रह्मस्वरूपाचें ग्रहण नेत्रानें करितां येत नाहीं, वाणीनें सुद्धां नाहीं, इतर इंद्रियांनीं किंवा तपानें किंवा कर्मानें करितां येत नाहीं.) **ज्ञानप्रसादेन विशुद्धसत्त्वः** (ज्ञानप्रसादानें चित्त शुद्ध झालें—) **ततः तु तं निष्कलं ध्यायमानः पश्यते** (म्हणजे मात्र ध्यान करणाऱ्या शुद्धचित्त पुरुषाला त्या निर्गुण ब्रह्मस्वरूपाचें दर्शन होतें.) ॥ ८ ॥

पुनरप्यसाधारणं तदुपलब्धिसाधनमुच्यते । यस्मान्न चक्षुषा गृह्यते केनचिदप्यरूपत्वान्नापि गृह्यते वाचाऽभिधेयत्वान्न चान्यैर्देवैरितरेन्द्रियैः । तपसः सर्वप्राप्तिसाधनत्वेऽपि न तपसा गृह्यते । तथा वैदिकेनाग्निहोत्रादिकर्मणा प्रसिद्धमहत्त्वेनापि न गृह्यते । किं पुनस्तस्य ग्रहणे साधनमित्याह—ज्ञानप्रसादेनाऽऽत्मावबोधनसमर्थमपि स्वभावेन सर्वप्राणिनां ज्ञानं बाह्यविषयरागादिदोषकलुषितमप्रसन्नमशुद्धं सन्नावबोधयति नित्यं संनिहितमप्यात्मतत्त्वं मलावनद्धमिवाऽऽदर्शम् । विलुलितमिव सलिलम् । तद्यदेन्द्रियविषयसंसर्गजनितरागादिमलकालुष्यापनयनादादर्शसलिलादिवत्प्रसादितं स्वच्छं शान्तमवतिष्ठते तदा ज्ञानस्य प्रसादः स्यात् । तेन ज्ञानप्रसादेन विशुद्धसत्त्वो विशुद्धान्तःकरणो योग्यो ब्रह्म द्रष्टुं यस्मात्ततस्तस्मात्तु तमात्मानं पश्यते पश्यत्युपलभते निष्कलं सर्वावयवभेदवर्जितं ध्यायमानः सत्यादिसाधनवानुपसंहृतकरण एकाग्रेण मनसा ध्यायमानश्चिन्तयन् ॥ ८ ॥

सिद्धान्ती—या मंत्रांत ब्रह्माच्या उपलब्धीचें (प्राप्तीचें) जें असाधारण (अद्वितीय) कारण आहे, तें सांगतात, ऐका:—ज्या पक्षीं ब्रह्म हें रूपशून्य आहे, त्या पक्षीं त्याचें ग्रहण कोणाच्याही नेत्रांनीं होत नाहीं. वाणीस अगोचर म्हणून कोणत्याही वाणीनें त्याचें स्वरूप सांगतां येत नाहीं, तसेंच दुसऱ्या कोणत्याही इंद्रियांनीं त्या अमूर्ताचें ग्रहण करितां येत नाहीं. याचप्रमाणें सर्व विश्वमंत्री प्राप्ति करून देणारी तपश्चर्या येथें

उपयोगी पडत नाहीं; आणि श्रौत, आग्निहोत्रादि प्रसिद्ध व महासमर्थ कर्मांनेंही ब्रह्मस्वरूपाची प्राप्ति होत नाहीं. सारांश, इंद्रियांस अगोचर असणारें, केवळ तपानें किंवा विहितकर्मानें प्राप्त न होणारें ब्रह्म इंद्रियांच्या, तपाच्या किंवा वैदिक-कर्माच्या साहाय्यानें प्राप्त होत नाहीं. मग ब्रह्मप्राप्तीचें साधन तरी काय ? असा प्रश्न उत्पन्न होतो. त्याचें उत्तर श्रुति सांगत आहे. वस्तुस्थिति अशी आहे कीं, स्वभावतः सर्वजीवांस आत्म-स्वरूपाचें ज्ञान करून घेण्याचें सामर्थ्य आहे. ब्रह्मज्ञान-प्राप्तीचें साधन जी शुद्ध बुद्धि (आत्म-चैतन्य) ती सर्वांस स्वरूपतः प्राप्त झालेली असते. पण बाह्यविषयांवरील प्रेमादिदोषांनीं कलुषित झाल्यामुळें सामान्यतः जीवांची पूर्वोक्तशुद्ध-बुद्धि अशुद्ध (मलीन) व अप्रसन्न झालेली असते. म्हणून जीवांच्या नित्य अतिनिकट सहवासास असणारें हें आत्मतत्त्व मलिन व चंचलबुद्धीला दिसत नाहीं. मळकट आरशांत किंवा नित्य चंचल असणाऱ्या जलांत जसें स्वच्छ प्रतिबिंब दिसत नाहीं, त्याप्रमाणें चंचल आणि मलीन जीवबुद्धीला यथार्थ ब्रह्मबिंब गोचर होत नाहीं. पण जेव्हां, ज्या वेळीं इंद्रियविषयसंगतीनें उत्पन्न झालेले रागद्वेषादि मलदोष नाहींसे होतात, त्या वेळीं बुद्धि प्रसन्न (निर्मळ) होते. आरशावरील मळ काढून टाकिला म्हणजे तो जसा स्वच्छ होतो, किंवा जल स्थिर झालें म्हणजे तें जसें शांत होतें, त्याप्रमाणें बुद्धीवर आलेला मळ काढून टाकिला म्हणजे ती प्रसन्न व समाहित होते. या निर्मळ व स्थिर बुद्धीच्या योगानें ज्याचें अंतःकरण शुद्ध व चैतन्यमय झालें आहे, तो मात्र ब्रह्मदर्शनाला योग्य होतो व शुद्धचित्त पुरुषाला आत्मस्वरूपाचें दर्शन होतें. हें प्रसिद्धच आहे कीं, आत्मा ह्या निष्कल म्हणजे सर्वप्रकारच्या अवयवादिभेदांनीं वर्जित आहे. तो निरवयव आहे. त्याचें एकाग्र व शुद्धचित्तानें ध्यान केलें, पांचव्या व सहाव्या मंत्रांत सांगितलेल्या सत्यादिसाधनयुक्तपुरुषानें आपलीं इंद्रियें निवृत्त करून एकाग्रमनानें श्रुत ब्रह्मस्वरूपाचें ध्यान केलें म्हणजे या निर्मळचित्त पुरुषाच्या प्रसन्न बुद्धीला निरवयव आत्मस्वरूपाचें दर्शन होतें. ॥ ८ ॥

रंगरामानुज—' ज्ञानप्रसादेन '= परमेश्वराच्या प्रसादानें.

माध्व०—ज्ञानरूप वायु, ब्रह्मदेव आणि परमज्ञानरूप हरि प्रसन्न झाल्याशिवाय कोणत्याही इंद्रियाच्या द्वारानें किंवा तदभिमानी देवतांच्या प्रसादानें ब्रह्मज्ञान प्राप्त होत नाहीं. इतर देवता केवल ब्रह्मापरोक्षज्ञानाला अनुकूल असणारें ज्ञानाची उत्पत्ति करण्यासाठीं इंद्रियांची प्रेरणा करितात. याचप्रमाणें शुद्धमनाशिवाय इतर कोणतेंही इंद्रिय भगवज्ज्ञान देण्याला समर्थ नाहीं.

मंत्र नववा.

एषोऽणुरात्मा चेतसा वेदितव्यो यस्मिन्प्राणः पञ्चधा संविवेश । प्राणैश्चित्तं सर्वमोतं प्रजानां यस्मिन्विशुद्धे विभवत्येष आत्मा ॥ ९ ॥

अन्वय व अर्थ—**यस्मिन् प्राणः पञ्चधा संविवेश, चेतसा एषः अणुः आत्मा वेदितव्यः** (ज्यामध्यें मुख्य प्राण पंचरूप होऊन प्रविष्ट झाला आहे, त्या शरीरस्थहृदयानें, शुद्धबुद्धीनें, हा अत्यंत सूक्ष्म असणारा आत्मा समजून घ्यावयाचा आहे.) **प्रजानां चित्तं प्राणैः सर्वं ओतं** (प्राणादिकांसह जीवांचें अंतःकरण चैतन्यानें ओतप्रोत व्यापिलेलें असतें.) **विशुद्धे यस्मिन् एषः आत्मा विभवति** (निर्मळ झालेल्या ज्या या चित्तांत आत्मा प्रकाशित होत असतो) तें चित्त प्राणादिकांनीं व्यापिलेलें आहे. ॥ ९ ॥

यमात्मानमेवं पश्यत्येषोऽणुः सूक्ष्मश्चेतसा विशुद्धज्ञानेन केवलेन वेदितव्यः । कासौ । यस्मिञ्शरीरे प्राणो वायुः पञ्चधा प्राणापानादिभेदेन संविवेश सम्यक्प्रविष्टस्तस्मिन्नेव शरीरे हृदये चेतसा ज्ञेय इत्यर्थः । कीदृशेन चेतसा वेदितव्य इत्याह—प्राणैः सहेन्द्रियैश्चित्तं सर्वमन्तःकरणं प्रजानामोतं व्याप्तं येन क्षीरमिव स्नेहेन काष्ठमिवाग्निना । सर्वं हि प्रजानामन्तःकरणं चेतनावत्प्रसिद्धं लोके । यस्मिंश्च चित्ते क्लेशादिमलवियुक्ते शुद्धे विभवत्येष उक्त आत्मा विशेषेण स्वेनाऽऽत्मना विभवत्यात्मानं प्रकाशयतीत्यर्थः ॥ ९ ॥

सिद्धान्ती—याप्रमाणें ज्या वेद्य व अतिसूक्ष्म आत्म्याचें शुद्धचित्ती पुरुषाला निर्मळबुद्धीनें मात्र ज्ञान व्हावयाचें तो आत्मा मुख्यतः राहतो तरी कोठे ? या प्रश्नाला येथें उत्तर दिलें आहे; ऐका: मुख्य प्राणवायु प्राणापानादिरूपांनीं भिन्नस्वरूप होऊन ज्या शरीरांत व्यवस्थेनें प्रवेश करितो त्याच शरीरांत अथवा हृदयांत हा सूक्ष्म आत्मा राहतो व येथें प्रकट होणारा आत्मा मात्र निर्मळचित्तानें (बुद्धीनें) जाणतां येतो. ही आत्मज्ञबुद्धि कोणत्या स्वरूपाची असते तो पहाः जीवांचें चित्त (अंतःकरण) तसेंच त्याचे प्राण व इंद्रियें हीं सर्व ज्ञानरूपानें ओतप्रोत व्यापिलेलीं असतात. दुग्धामध्यें घृत सर्वव्यापी असते, किंवा काष्ठामध्यें (लाकडामध्यें) अग्नि व त्याची उष्णता सर्वत्र पसरलेली असतात, त्याप्रमाणें सर्व अंतर्बाह्य इंद्रियांत शुद्धबुद्धि म्हणजे चित्कला सर्वत्र

व्यापिलेली असते. जीवाचें अंतःकरण चैतन्ययुक्त आहे, ही गोष्ट व्यवहारांत ही प्रसिद्ध आहे. असो, जें अंतःकरण क्लेशादिमलांनीं अशुद्ध झालेलें नसतें, त्या अंतःकरणांत वर सांगितलेला स्वयंप्रकाश आत्मा आपल्या तेजानें स्वतःलाच प्रकाशवित होत असतो अथवा शुद्धचित्ताच्या एकाग्रज्ञानी पुरुषास प्रकट होत असतो. ॥ ९ ॥

माध्व०—'चित्त'=मन, बुद्धि अहंकार, चित्त, चेतन. आत्मा हा ब्रह्मापरोक्ष ज्ञानाला अवश्य असणाऱ्या संकल्पनिश्चयांची शक्ति घेऊन ज्या चित्तामध्यें प्रवेश करितो, तें चित्त खरें शुद्ध होय.

मंत्र दहावा.

यं यं लोकं मनसा संविभाति विशुद्धसत्त्वः कामयते यांश्च कामान्। तं तं लोकं जयते तांश्च कामांस्तस्मादात्मज्ञं ह्यर्चयेद्भूतिकामः ॥ १० ॥

इत्यथर्ववेदीयमुण्डकोपनिषदि तृतीयमुण्डके प्रथमः खण्ड ॥ १ ॥

अन्वय व अर्थ—विशुद्धसत्त्वः यं यं लोकं मनसा संविभाति यान् च कामान् कामयते, तं तं लोकं तान् च कामान् जयते (शुद्धचित्ताचा पुरुष ज्या ज्या भुवनांचा मनानें संकल्प करितो आणि त्याच्या ज्या ज्या इच्छा असतात तो तो लोक त्याला प्राप्त होऊन त्याच्या त्या त्या इच्छाही परिपूर्ण होतात.) **तस्मात् भूतिकामः आत्मज्ञं अर्चयेत्** (म्हणून ज्याला ज्याला आपलें कल्याण करून घ्यावयाचें आहे, त्यानें आत्म्यास जाणणारी जी बुद्धि तिचें व आत्मज्ञपुरुषाचें आराधन करावें.) ॥१०॥

य एवमुक्तलक्षणं सर्वात्मानमात्मत्वेन प्रतिपन्नस्तस्य सर्वात्मत्वादेव सर्वावाप्तिलक्षणं फलमाह। यं यं लोकं पित्रादिलक्षणं मनसा संविभाति संकल्पयति मह्यमन्यस्मै वा भवेदिति विशुद्धसत्त्वः क्षीणक्लेश आत्मविन्निर्मलान्तःकरणः कामयते यांश्च कामान्प्रार्थयते भोगास्तं तं लोकं जयत्रे प्राप्नोति तांश्च कामान्संकल्पितान्भोगान्। तस्माद्विदुषः सत्यसंकल्पत्वादात्मज्ञमात्मज्ञानेन विशुद्धान्तःकरणं

ह्यर्चयेत्पूजयेत्पादप्रक्षालनशुश्रूषानमस्कारादिभिर्भूतिकामो विभूतिमिच्छुः । ततः पूजार्ह एवासौ ॥ १० ॥

इत्यथर्ववेदीयमुण्डकोपनिषद्भाष्ये तृतीयमुण्डके प्रथमः खण्डः ॥ १ ॥

सिद्धान्ती—मागील मंत्रांत ज्याचें स्वरूप सांगितलें तो सर्वांतर्यामी असणारा आत्मा ज्या आत्मज्ञ पुरुषाला स्वात्मत्वानें प्राप्त झाला, तो पुरुषही सर्वात्मक (ब्रह्म) झाल्यामुळें त्याला सर्व-प्राप्ति करून देणारें फल मिळतें, असें या मंत्रांत सांगितलें आहे. हा आत्मज्ञ पुरुष आपल्या मनानें जे जे पितरादि लोक आपल्यास किंवा इतरांस प्राप्त व्हावे असा संकल्प करितो, किंवा हा शुद्धचित्त, क्लेशशून्य, आत्मज्ञानी निर्मळ अंतःकरणाचा असल्यामुळें तो ज्या ज्या भोगांची स्वस्वेतरांसाठीं इच्छा करितो, ते ते लोक व ते ते भोग प्राप्त होण्याच्या या ब्रह्मज्ञ पुरुषाच्या इच्छा तृप्त होतात. सारांश, आत्मज्ञानी पुरुष सत्यसंकल्पी होतो, म्हणून या निर्मळ चित्ताच्या आत्मज्ञ पुरुषाची आराधना आपलें कल्याण इच्छिणाऱ्या प्रत्येक पुरुषानें करावी ही योग्य आहे. ही आराधना म्हणजे पूर्वोक्त सत्पुरुषाचें पादप्रक्षालन करणें, सेवा चाकरी करणें, त्याला नमस्कार करणें, इत्यादि प्रकारची असावी. असो; हा कल्याणकारी साधुपुरुष सर्वांस वंदनीय असावा. ॥ १० ॥

रंगरामानुज—'संविभाति'=संकल्प करितो. 'जयते'=वश करून घेतो. आपल्या सर्व इच्छा परमेश्वर वर देऊन पूर्ण करील अशी बुद्धि धरून ऐश्वर्यकामी पुरुषानें भक्तांचे सर्व मनोरथ पूर्ण करण्यास समर्थ असणाऱ्या जगन्नियंत्या परमेश्वराची उपासना करावी.

माध्व०—ज्ञानी पुरुषाचे संकल्प अमोघ असतात, म्हणून त्याच्या इच्छा पूर्ण होतात.

तृतीयमुण्डक प्रथमखण्ड समाप्त.

तृतीय-मुंडक।

खंड दुसरें.

मंत्र पहिला.

स वेदैतत्परमं ब्रह्म धाम यत्र विश्वं निहितं भाति शुभ्रम् । उपासते पुरुषं ये ह्यकामास्ते शुक्रमेतदतिवर्तन्ति धीराः ॥ १ ॥

अन्वय व अर्थ—यत्र विश्वं निहितं शुभ्रं भाति, एतत् परमं ब्रह्म धाम सः वेद (जेथें सर्व विश्व अर्पित झालें आहे आणि हें ब्रह्मतेज स्वतेजानें स्वच्छ प्रकाशित होत आहे, तें जें श्रेष्ठ ब्रह्म, सर्व कल्याणाचें निधान आहे, तें ब्रह्म या पुरुषाला गोचर झालेलें असतें.) हि ये अकामाः पुरुषं उपासते ते धीराः एतत् शुक्रं अतिवर्तंति (जे निष्काम जीव या आत्मज्ञ पुरुषाची उपासना करितात, ते ज्ञानी जीव जन्ममरणाच्या पलीकडे जातात.) ॥ १ ॥

यस्मात्स वेद जानातीत्येतद्यथोक्तलक्षणं ब्रह्म परममुत्कृष्टं धाम सर्वकामानामाश्रयमास्पदं यच्च यस्मिन्ब्रह्मणि धाम्नि विश्वं समस्तं जगन्निहितमर्पितं यच्च स्वेन ज्योतिषा भाति शुभ्रं शुद्धम् । तमप्येवमात्मज्ञं पुरुषं ये ह्यकामा विभूतितृष्णावर्जिता मुमुक्षवः सन्त उपासते परमिव सेवन्ते ते शुक्रं नृबीजं यदेतत्प्रसिद्धं शरीरोपादानकारणमतिवर्तन्त्यतिगच्छन्ति धीरा धीमन्तो न पुनर्योनिं प्रसर्पन्ति " न पुनः कचिद्रतिं करोति " इति श्रुतेः । अतस्तं पूजयेदित्याभिप्रायः ॥ १ ॥

सिद्धान्ती—ज्याअर्थी पूर्वोक्त आत्मज्ञपुरुषाला वर सांगितलेलें ब्रह्म यथार्थ समजलें—

शिष्य—या ब्रह्माचें लक्षण पुन्हां एकवार सांगावें.

सिद्धान्ती—हें ब्रह्म उत्कृष्ट असून सर्व इच्छा परिपूर्ण होण्याचें उत्तम स्थान आहे. सर्व इच्छा व संकल्प याचाच आश्रय करून राहतात. या ब्रह्मधामांत सर्व विश्व अर्पित

झालेलें आहे आणि हें ब्रह्म आपल्या स्वयंभु प्रकाशानें देदीप्यमान असतें. याचा प्रकाश शुद्ध आणि निर्मल असतो. असो, अशा ब्रह्माचें ज्ञान ज्याअर्थी त्या ब्रह्मज्ञ पुरुषाला झालें असतें, त्याअर्थी सर्व कल्याणेच्छूंनीं त्याची आराधना करावी. आतां जे लोक विषय-संपत्तिसंबंधानें किंवा ऐहिकऐश्वर्याच्या संबंधानें निष्काम होऊन मुमुक्षु होतात आणि ब्रह्मप्रमाणेंच या आत्मज्ञ पुरुषाची सेवा करितात, ते साधक मात्र शुक्र म्हणजे पुरुषबीज अथवा शरीरोत्पत्ति होण्याचें उपादानकारण, त्याचा पराभव करितात म्हणजे जन्म-मरण चुकवितात. या निष्कामज्ञानी पुरुषांना जन्म-मरणाच्या फेऱ्यांत पडावें लागत नाहीं. हे संसाराच्या किंवा मृत्यूच्या पलीकडे जातात. 'पुनः कोणत्याही प्रकारची इच्छा या पुरुषांना होत नाहीं.' अशी श्रुतिही याला प्रमाण आहे. असो, येणेंप्रमाणें जन्म-मरण चुकवून मोक्ष मिळतो म्हणून स्वकल्याणेच्छूनें आत्मज्ञ पुरुषाची सेवा करावी. ॥ १ ॥

रंगरामानुज—'धाम'=श्रेष्ठ, सर्व इच्छा पूर्ण करणारा.

माध्व०—प्राणांत वास्तव्य करणाऱ्या ब्रह्माची उपासना केली असतां प्राणव्यापी ब्रह्माचा साक्षात्कार होतो म्हणजे मोक्ष-प्राप्ती होते. 'ब्रह्मधाम'=ब्रह्मलोक. 'विश्व'=पूर्ण. जेथें पूर्णब्रह्म आपल्या शुद्धस्वरूपानें राहतें, तो प्राण जगाचें धारण करितो. प्राण हें ब्रह्माचें प्रधान गृह आहे. श्रीभगवान् सर्वदा प्राणस्थित आहे; तथापि ज्ञान उत्पन्न झालें असतां हा जास्त प्रकाशित होतो आणि प्रकाशित झाला म्हणजे श्रेष्ठज्ञानाची उत्पत्ति करितो. 'शुक्र'=ब्रह्म. अन्य कर्मादिकांचें अतिक्रमण करून शोकरहित जो श्रीभगवान् त्यापाशीं ज्ञानी साधक प्राप्त होतो. सारांश, पूर्णस्वरूपी ब्रह्म मुख्य प्राणांत राहून जगाचें धारण करितें, म्हणून मुख्य प्राण वैकुंठापेक्षांही श्रेष्ठ आहे. आत्मज्ञपुरुषाला प्रथम ब्रह्मधामाचें (प्राणाचें) नंतर प्राणस्थ ब्रह्माचें श्रवणादि उपायांनीं ज्ञान होतें. नंतर उपासकाच्या प्राणामध्यें राहून ब्रह्म प्रकाशित, ज्ञात होतें. हा तात्पर्यार्थ आहे. या भक्तांस सालोक्यादि मुक्तिरूप वृत्ति प्राप्त होते.

मंत्र दुसरा.

कामान्यः कामयते मन्यमानः स कामभिर्जायते तत्रतत्र। पर्याप्तकामस्य कृतात्मनस्त्विहैव सर्वे प्रविलीयन्ति कामाः ॥ २ ॥

अन्वय व अर्थ—**यः मन्यमानः कामान् कामयते सः तत्रतत्र कामभिः जायते** (जो जीव विषयांचें चिंतन करून अनेक इच्छा धारण करितो, तो जीव आपल्या इच्छेप्रमाणें इष्ट असणाऱ्या त्या त्या लोकांत

जन्म पावतो.) तु पर्याप्तकामस्य कृतात्मनः इह एव सर्वे कामाः प्रविलीयन्ति (पण आत्मज्ञान झाल्यामुळें ज्याच्या सर्व इच्छा पूर्ण झाल्या त्याच्या सर्व इच्छा येथेंच ह्या लोकीं व ह्याच देहांत विनाश पावतात.) ॥ २ ॥

मुमुक्षोः कामत्याग एव प्रधानं साधनमित्येतद्दर्शयति । कामान्यो दृष्टादृष्टेष्टविषयान्कामयते मन्यमानस्तद्गुणांश्चिन्तयानः प्रार्थयते स तैः कामभिः कामैर्धर्माधर्मप्रवृत्तिहेतुभिर्विषयेच्छारूपैः सह जायते तत्रतत्र । यत्रयत्र विषयप्राप्तिनिमित्तं कामाः कर्मसु पुरुषं नियोजयन्ति तत्रतत्र तेषुतेषु विषयेषु तैरिव कामैर्वेष्टितो जायते । यस्तु परमार्थतत्त्वविज्ञानात्पर्याप्तकाम आत्मकामत्वेन परि समन्तत आप्ताः कामा यस्य तस्य पर्याप्तकामस्य कृतात्मनोऽविद्यालक्षणादपररूपादपनीय स्वेन परेण रूपेण कृत आत्मा विद्यया यस्य तस्य कृतात्मनस्विहैव तिष्ठत्येव शरीरे सर्वे धर्माधर्मवृत्तिहेतवः प्रविलीयन्ति विलयमुपयान्ति नश्यन्तीत्यर्थः । कामास्तज्जन्महेतुविनाशान्न जायन्त इत्यभिप्रायः ॥ २ ॥

सिद्धान्ती—जो मुमुक्षु आहे, त्यानें आपल्या सर्व इच्छांचा त्याग केलाच पाहिजे. कामत्याग हें मोक्षाचें मुख्य साधन आहे, असें या मंत्रांत सांगितलें आहे. पहाः जो पुरुष आपल्यास इष्ट असणाऱ्या दृष्ट विषयांची किंवा अदृष्ट विषयांची इच्छा करितो, त्या त्या विषयाचे गुणधर्म चिंतीत असतो व ते ते विषय मिळावे अशी जो याचना व उद्योग करीत असतो, त्या पुरुषाला धर्माधर्म आचरण्याची प्रवृत्ति उत्पन्न करणाऱ्या विषयेच्छेमुळें जेथें जेथें त्या इच्छा पूर्ण व्हावयाच्या असतील तेथें तेथें त्यास जन्म घ्यावा लागतो. उघडच आहे कीं ह्या असणाऱ्या विषयांच्या प्राप्तीसाठीं आपल्या इच्छा जेथें जेथें आपल्यास कर्म करावयास लावितात, तेथें तेथें म्हणजे त्या त्या विषयांच्या किंवा प्रदेशांच्या ठिकाणीं त्या त्या इच्छांसह कामीपुरुषाला जन्म घ्यावा लागतो.

पण परमार्थतत्त्वाचें, आत्मतत्त्वाचें, ज्ञान-विज्ञान झाल्यामुळें ज्याच्या सर्व इच्छा परिपूर्ण झाल्या, आत्मैकत्वप्राप्तीची मात्र इच्छा तीव्रतम झाल्यामुळें ज्याच्या सर्वविषयेच्छा परिपूर्णच झाल्या तो कृतात्मा होय. म्हणजे अविद्या किंवा अज्ञान हेंच चिह्न आहे ज्याचें असें जें अपररूप (विषयभोगात्मक हें सर्व विश्व) त्याचा त्याग करून ज्यानें आपल्या श्रेष्ठ आत्मस्वरूपाला विद्येनें कृत म्हणजे प्रकट केलें आहे, साराशः जो स्वतः ब्रह्मरूप झाला आहे, त्याला कृतात्मा असें म्हणावे. असो, त्या कृतकृत्य आत्मज्ञ-

पुरुषाचें सर्व काम (इच्छा) येथेंच म्हणजे या शरीरांत नाश पावतात. प्रत्येक विषयेच्छा धर्म किंवा अधर्म आचरण्याला प्रवृत्ति उत्पन्न करिते हें तुला ठाऊक आहे. अर्थात् ज्ञानीपुरुषाच्या पुण्यपापकर्मप्रवर्तक इच्छा नाहींशा होतात. कारण या इच्छांचें आदिकारण जें अज्ञान त्याचा नाश ज्ञानी पुरुषानें केलेला असतो म्हणून त्याच्या विषयेच्छा नष्ट होतात व पुढेंही त्या उत्पन्न होत नाहींत ॥ २ ॥

रंगरामानुज—कृतात्मा=ज्ञानी आहे आत्मा ज्याचा

माध्व०—पर्याप्तकाम=भगवद्भक्तीची इच्छा पूर्ण झालेला.

मंत्र तिसरा.

नायमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न बहुना श्रुतेन । यमेवैष वृणुते तेन लभ्यस्तस्यैष आत्मा विवृणुते तनुं स्वाम् ॥ ३ ॥

अन्वय व अर्थ—**अयं आत्मा प्रवचनेन न लभ्यः, मेधया न, बहुधा श्रुतेन न** (हा आत्मा शास्त्राची पुष्कळशी चर्चा केली म्हणून प्राप्त व्हावयाचा नाहीं, तीव्रबुद्धीनें किंवा अत्यंत विस्तृत विद्वत्तेनें मिळावयाचा नाहीं.) **एषः यं एव वृणुते तेन लभ्यः** (हा विद्वान् पुरुष ज्या आत्मस्वरूपाची प्राप्ति इच्छितो त्या परब्रह्म इच्छिण्यानें मात्र हा परमात्मा प्राप्त होतो.) **एषः आत्मा तस्य स्वां तनुं विवृणुते** (हा आत्मा त्याला मात्र आपलें स्वरूप प्रकाशित करितो.) ॥ ३ ॥

यद्येवं सर्वलाभात्परम आत्मलाभस्तल्लाभाय प्रवचनादय उपाया बाहुल्येन कर्तव्या इति प्राप्त इदमुच्यते । योऽयमात्मा व्याख्यातो यस्य लाभः परः पुरुषार्थो नासौ वेदशास्त्राध्ययनबाहुल्येन प्रवचनेन लभ्यः । तथा न मेधया ग्रन्थार्थधारणशक्त्या । न बहुना श्रुतेन नापि भूयसा श्रवणेनेत्यर्थः । केन तर्हि लभ्य इत्युच्यते । यमेव परमात्मानमेवैष विद्वान्वृणुते प्राप्तुमिच्छति तेन वरणेनैष परमात्मा लभ्यो नान्येन साधनान्तरेण । नित्यलब्धस्वभावत्वात् । कीदृशोऽसौ विदुष आत्मलाभ इत्युच्यते । तस्यैष आत्माऽविद्यासंछन्नां स्वां परां तनुं स्वात्मतत्त्वं स्वरूपं विवृणुते प्रकाशयति प्रकाश इव घटादिर्वि

द्यायां सत्यामाविर्भवतीत्यर्थः । तस्मादन्यत्यागेनाऽऽत्मलाभप्रार्थनै-वात्मलाभसाधनमित्यर्थः ॥ ३ ॥

सिद्धान्ती—ज्यापक्षीं आत्मलाभ हा सर्व लाभांपेक्षां अत्यंत श्रेष्ठ आहे, त्या-पक्षीं आत्म-प्राप्तीसाठीं प्रवचनादि उपाय पुष्कळसे करावे म्हणजे इष्टसिद्धि होईल असें वाटण्याचा संभव आहे, त्याचें निराकरण या मंत्रांत केलें आहे. पहा, ज्या आत्म्याचें आतांपर्यंत व्याख्यान केलें, ज्याचा लाभ म्हणजे अत्यंत श्रेष्ठ पुरुषार्थ होय, तो आत्मा वेदशास्त्रांचें पुष्कळसें अध्ययन करून, ज्ञानाच्या जोरावर पुष्कळशीं पांडित्य-मूलक चर्चा केली म्हणून, तो प्राप्त होणें शक्य नाहीं. तसेंच ग्रंथाचा अर्थ धारण कर-ण्याचें सामर्थ्य असणारी अलौकिक बुद्धि असली तरीही तो सांपडावयाचा नाहीं. आणि वेदांतविचाराव्यतिरिक्त पुष्कळसें वेदांत श्रवण केलें तरीही आत्मप्राप्ति हाण अशक्य आहे. असें आहे तर आत्मप्राप्तीचें साधन तरी काय ? या प्रश्नाला पुढील उत्तर आहे. तें असें कीं, हा विद्वान् ज्या आत्मस्वरूपाचें वरण (स्वीकरण) करितो-'मीच परमात्मा आहें' असें नित्य अनुसंधान ठेवणें म्हणजे जीवानें आत्म्याला वरणें असें होतें-असो, अशी आत्मप्राप्तीची जी ज्ञानपूर्ण इच्छा ज्ञानी साधकाला होते, त्या इच्छेनें (त्या वरणविधीनें) मात्र म्हणजे ती इच्छा तीव्र असून जर आतांच सांगि-लेलीं साधनें केलीं तर मात्र परमात्मप्राप्ति होते. अन्य साधनानें होत नाहीं. कारण परमात्मा हा सर्व जीवांना स्वभावतःच प्राप्त झाला आहे. तो मिळवावयाचा नाहीं तर तो मिळाला आहे असें ज्ञान जीवानें करून घ्यावयाचें आहे. अर्थातच हें ज्ञान 'मीच ब्रह्म आहें' ह्या अखंड चिंतनानें प्राप्त होत असतें. असो, हा आत्मलाभ कोणत्या स्वरूपाचा असतो, तें सांगतात. अविद्येनें झांकून टाकलेलें जें आपलें पर-मोत्कृष्ट आत्मस्वरूप तें स्वस्वरूप परमात्मा ज्ञानीपुरुषाला प्रकट करून देतो. सूर्यादि-प्रकाशामध्यें घटादिक विषय प्रकट होतो त्याप्रमाणें विद्याप्रकाश झाला म्हणजे नित्य प्राप्त असलेलें आत्म-स्वरूप प्रकट होतें. म्हणून अन्यसाधनांचा त्याग करून आत्म-लाभाची प्रार्थना 'मी ब्रह्म आहें' हें अनुसंधान ठेवून करावी. हें एक मात्र आत्म-प्राप्तीचें असाधारण साधन आहे. ॥ ३ ॥

रंग०—'प्रवचन'=मनन, 'मेधा' = निदिध्यास. केवळ श्रवण-मनन-निदि-ध्यासानें आत्मा प्राप्त होत नाहीं, तर हा परमात्मा ज्या उपासकाची निवड करितो त्या उपासकाला मात्र आत्म-प्राप्ति होते. सारांश, ज्याची परमेश्वरावर अत्यंत प्रीति असते त्याला मात्र परमेश्वरी साक्षात्कार होतो. उपासना हें परमेश्वरकृत प्रेमाचें द्वार आहे.

माध्व०—ज्ञानप्रसारापमाणेंच अपरोक्षज्ञानाला विष्णुभक्तीची आवश्यकता आहे. अपरोक्षज्ञान होण्याला भगवत्प्रसन्नता अवश्य आहे. भक्ति आणि ज्ञान हीं भगवत्प्रसादाचीं द्वारें आहेत.

मंत्र चवथा.

नायमात्मा बलहीनेन लभ्यो न च प्रमादात्तपसो वाऽप्यलिङ्गात्। एतैरुपायैर्यतते यस्तु विद्वांस्तस्यैष आत्मा विशते ब्रह्मधाम ॥ ४ ॥

अन्वय व अर्थ—**बलहीनेन अयं आत्मा न लभ्यः, न च प्रमादात् वापि अलिंगात् तपसः** (हा आत्मा बलशून्य पुरुषाला मिळावयाचा नाहीं, तसेंच असावधपुरुषाला आणि लिंगशून्य तपस्व्याला मिळावयाचा नाहीं.) **तु एतैः उपायैः यः विद्वान् यतते तस्य एषः आत्मा ब्रह्मधाम विशते** (पण बलादि उपायांनीं जो विद्वान् आत्मप्राप्तीचा प्रयत्न करितो त्याचा हा आत्मा ब्रह्मलोकामध्यें प्रवेश करितो.) ॥ ४ ॥

आत्मप्रार्थनासहायभूतान्येतानि च साधनानि बलाप्रमादतपांसि लिङ्गयुक्तानि संन्याससहितानि। यस्मादयमात्मा बलहीनेन बलप्रहीणेनाऽऽत्मनिष्ठाजनितवीर्यहीनेन न लभ्यो नापि लौकिकपुत्रपश्वादिविषयसंगिनाप्रमादात्। तथा तपसो वाऽप्यलिङ्गालिङ्गरहितात्। तपोऽत्र ज्ञानम्। लिङ्गं संन्यासः। संन्यासरहिताज्ज्ञानान्न लभ्यत इत्यर्थः। एतैरुपायैर्बलाप्रमादसंन्यासज्ञानैर्यतते तत्परः सन्प्रयतते यस्तु विद्वान्विवेक्यात्मवित्तस्य विदुष एष आत्मा विशते संप्रविशति ब्रह्मधाम ॥ ४ ॥

सिद्धान्ती—आत्म-प्रार्थना करण्यामध्यें साहाय्य करण्यासाठीं लागणारीं आत्मेच्छापूर्वक प्रवचनादिसाधनें बल, अप्रमाद, तप, व लिंगयुक्त संन्यास या चिह्नांनीं युक्त असलीं पाहिजेत, असें या मंत्रांत सांगितलें आहे. कारण, हा आत्मा बलशून्यपुरुषाला प्राप्त होत नाहीं. बल म्हणजे आत्मनिष्ठेनें उत्पन्न झालेलें अभंग सामर्थ्य होय. हें सामर्थ्य ज्याजवळ नाहीं त्याला आत्मा प्राप्त होत नाहीं. (२) तसेंच व्यवहारांतील पुत्र, पशु आदि विषयांच्या संगतीनें उत्पन्न होणारा व इष्टमार्गापासून भ्रष्ट करणारा मोह (चित्तचांचल्य) असेल तर आत्मप्राप्ति व्हावयाची नाहीं. विषयसंगति झाली कीं, मूढता, काळजीचा भाव, इत्यादि गोष्टी प्राप्त व्हावयाच्या व जीव चुकीला पात्र व्हावयाचा. (३) तप म्हणजे ज्ञान व लिंग म्हणजे संन्यास. संन्यासरहित जें तप किंवा ज्ञान असतें, त्याच्या साहाय्यानें ही आत्मप्राप्ति होत नाहीं. वैराग्ययुक्त ज्ञान नसणें हें मोक्षप्राप्ति होऊं देत नाहीं. असो, बल, मोहशून्यता आणि ज्ञान हीं

साधनें संन्यासपूर्वक संपादून जो तत्पर पुरुष आत्मप्राप्तीचा उद्योग करितो, तो विद्वान् पुरुष, 'मीच आत्मा आहें' असें ज्ञान असणारा पुरुष, ब्रह्मधामामध्यें प्रवेश करितो. ब्रह्मधाम म्हणजे ब्रह्मस्वरूप. हें स्वरूप त्याच्या आत्म्याला मिळतें. तो ब्रह्म होतो. ॥४॥

रंगरामा०—'बलहीन'=देश, काल, वैगुण्य इत्यादिकांनीं आलेली हीनता. 'तप'=तपःप्रधान संन्यासाश्रम. 'लिंग'=शिक्षायज्ञोपवीतादि आश्रमचिन्हें. चारी आश्रमांतील पुरुषांस ब्रह्मविद्येचा अधिकार आहे. पण आश्रमचिन्ह नसेल त्याला आत्मप्राप्ति होत नाहीं.

माध्व०—सात्त्विकत्व मिळवून देणारें, परमश्रद्धा उत्पन्न करणारें, फलेच्छा नाहींशी करणारें, विष्णुविषयक चिंतन करविणारें, तपाचें अनुष्ठान असतें. हीं तपाचीं लिंगें आहेत. ह्या लिंगव्यतिरिक्त झालेली तपश्चर्या ब्रह्मप्राप्तीला करण होत नाहीं.

मंत्र पांचवा.

संप्राप्यैनमृषयो ज्ञानतृप्ताः कृतात्मानो वीतरागाः प्रशान्ताः । ते सर्वगं सर्वतः प्राप्य धीरा युक्तात्मानः सर्वमेवाऽऽविशन्ति ॥ ५ ॥

अन्वय व अर्थ—**एनं संप्राप्य ज्ञानतृप्ताः, कृतात्मानः, वीतरागाः, प्रशांताः, धीराः, युक्तात्मानः ऋषयः, ते सर्वगं सर्वतः प्राप्य सर्वं एव आविशन्ति** (आत्मज्ञान झाल्यानंतर ज्ञानानें तृप्त झालेले, कृतार्थ झालेले, रागद्वेषशून्य, प्रशांत, विद्वान्, युक्तात्मे ऋषी सर्वव्यापी ब्रह्म सर्वतः प्राप्त करून घेऊन सर्वव्यापी जो परमात्मा त्याच्या स्वरूपामध्यें सर्वच्या सर्व प्रवेश करितात.) ॥ ५ ॥

कथं ब्रह्म संविशत इत्युच्यते । संप्राप्य समवगम्यैनमात्मानमृषयो दर्शनवन्तस्तेनैव ज्ञानेन तृप्ता न बाह्येन तृप्तिसाधनेन शरीरोपचयकारणेन । कृतात्मानः परमात्मस्वरूपेणैव निष्पन्नात्मानः सन्तः वीतरागा विगतरागादिदोषाः । प्रशान्ता उपरतेन्द्रियाः । त एवंभूताः सर्वगं सर्वव्यापिनमाकाशवत्सर्वतः सर्वत्र प्राप्य नोपाधिपरिच्छिन्नैनैकदेशेन । किं तर्हि तद्ब्रह्मैवाद्वयमात्मत्वेन प्रतिपद्य धीरा अत्यन्तविवेकिनो युक्तात्मानो नित्यसमाहितस्वभावाः सर्वमेव समस्तं शरीरपातकालेऽप्याविशन्ति भिन्ने घटे घटाकाशवदविद्याकृतोपाधिपरिच्छेदं जहति । एवं ब्रह्मविदो ब्रह्मधाम प्रविशन्ति ॥ ५ ॥

सिद्धान्ती—ब्रह्मामध्यें प्रवेश कसा होतो तें येथें सांगितलें आहे. आत्म्याचें साक्षात् ज्ञान झाल्यानंतर सर्वद्रष्टे ऋषी त्यांच ज्ञानानें तृप्त होतात. बाहेरचीं तृप्ति-साधनें किंवा शरीर पुष्ट करणारीं साधनें हीं त्यांस मुळींच अपेक्षित नसतात. त्यांचे आत्मे परमात्म स्वरूपानें पूर्ण झालेले असतात. (परब्रह्म स्वरूपाशीं त्यांची एकात्मता झालेली असते). कामक्रोधादि सर्व दोष नाहींसे होऊन ते प्रशांत म्हणजे इंद्रिय-निवृत्त झालेले असतात. त्यांचीं सर्व इंद्रियें स्तब्ध व स्वाधीन झालीं असल्यामुळें त्यास अखंड शांति प्राप्त होते. अशा प्रकारच्या ज्ञानी पुरुषांस आकाशाप्रमाणें सर्वव्यापी परमात्म्याचा सर्वबाजूंनीं लाभ होतो. सर्व उपाधि नष्ट झाल्या असल्यामुळें एका मर्यादित बाजूनेंच त्यांस परमात्मलाभ होतो असें नाहीं, सर्वबाजूंनीं त्यास आत्म-लाभ होतो. तात्पर्य अद्वय ब्रह्माशीं एकत्व पावून, अद्वयात्मक होऊन, सारांश, ब्रह्मरूप होऊन अत्यंत विवेकी आणि अभंग समाधिस्थितीचे ते स्थितप्रज्ञ विद्वान पुरुष शरीर-पाताच्या वेळीं (मरणसमयीं) सर्वच्या सर्व ब्रह्मामध्यें प्रवेश करितात. घट फुटला असतां त्यांतील आकाश सर्वथा विमुक्त होऊन महाकाशाशीं एकरूप होते. त्याप्रमाणें अविद्येनें निर्माण केलेल्या उपाधींचा व तज्जन्यमर्यादेचा त्याग करून ते ब्रह्मस्वरूपांत सामावून जातात. सारांश शरीरपात होतांक्षणीं ते हे आत्मरूप ऋषी ब्रह्मरूप होतात, हें सांगावयास नको. जीवन्मुक्त पुरुष ब्रह्मधामांत कसे शिरतात त्याचा हा वर्णन-प्रकार आहे. ॥ ५ ॥

रंगरामानुज—जीवदशेंत ही ब्रह्मानुभव होऊन समाधान होतें. ज्ञानीलोकांस सर्व वस्तु अंतर्बाह्य व्यापणाऱ्या देशविशिष्टपरमात्म्याची प्राप्ति होऊन प्रत्येकास निर-निराळी सरूपता मुक्ति मिळते आणि सर्वज्ञत्व प्राप्त होऊन सर्ववस्तूंचा अनुभव येतो. ' ब्रह्मलोक '=ब्रह्म हाच लोक. ' परांतकाले '=शेवटच्या देहाचा पात होण्याचें वेळीं. ' परामृतात् '=प्रसन्न झालेल्या ब्रह्मामुळें. व्यासाचार्यांचा ' परामृताः '=असा एक पाठ आहे. त्याचा अर्थ शेवटचें शरीर पडण्याचें वेळीं श्रेष्ठ अमृत म्हणजे ब्रह्म-ज्ञानी लोकांस प्राप्त होतें. ब्रह्म प्राप्य आहे आणि तेंच प्रापक (ब्रह्म प्राप्त करून देणारें) आहे. ' विमुक्त '=स्वरूपाचें तिरोधान करणारी (स्वरूपाला लपविणारी) अविद्या वासनांसह नाहींशी झालेलें.

माध्व०—'सर्वतः' हें पद मुक्त याच्याशीं अन्वित करावयाचें आहे आणि देहबंध, कर्मबंध इत्यादिकांपासून मुक्त झालेले आत्मे असा अर्थ करावयाचा आहे. 'सर्वगं'= पृथिव्यादि सर्व तत्त्वांमध्यें प्रविष्ट झालेलें ब्रह्म (ब्रह्मस्थित वायु). सारांश, वैराग्यानें भक्ति तीव्र होऊन उपासना होते, ती विषय-वैराग्य उत्पन्न करिते, श्रवणमननादिकांनीं या भक्तांचें अंतःकरण भगवत्पर होतें आणि ज्ञानाची तृप्ति होतें. नंतर ब्रह्मदेवाची प्राप्ति होऊन त्याच्या उपदेशानं स्वरूपाचें (जीवस्वरूपाचे) अपरोक्ष ज्ञान होतें. हें सर्व व्याख्यान चिंतनीय आहे.

मंत्र सहावा.

वेदान्तविज्ञानसुनिश्चितार्थाः संन्यासयोगाद्यतयः शुद्धसत्त्वाः । ते ब्रह्मलोकेषु परान्तकाले परामृताः परिमुच्यन्ति सर्वे ॥ ६ ॥

अन्वय व अर्थ--ते सर्वे वेदांतविज्ञानसुनिश्चितार्थाः, संन्यासयोगात् शुद्धसत्त्वाः यतयः परान्तकाले परामृताः ब्रह्मलोकेषु परिमुच्यन्ति (वेदांताच्या ज्ञानविज्ञानानें निश्चित अर्थाची प्राप्ति करून घेतलेले, संन्यासयोगानें चित्त शुद्ध झालेले, ते संन्याशी देहपाताचे वेळीं अमर होत्साते सर्वथा विमुक्त होऊन ब्रह्मलोकीं जातात.) ॥ ६ ॥

किंच वेदान्तजनितविज्ञानं वेदान्तविज्ञानं तस्यार्थः परमात्मा विज्ञेयः सोऽर्थः सुनिश्चितो येषां ते वेदान्तविज्ञानसुनिश्चितार्थाः । ते च संन्यासयोगात्सर्वकर्मपरित्यागलक्षणयोगात्केवलब्रह्मनिष्ठास्वरूपाद्योगाद्यतयो यतनशीलाः शुद्धसत्त्वाः शुद्धं सत्त्वं येषां संन्यासयोगात्ते शुद्धसत्त्वाः । ते ब्रह्मलोकेषु । संसारिणां ये मरणकालास्ते परान्तास्तानपेक्ष्य मुमुक्षूणां संसारावसाने देहपरित्यागकालः परान्तकालस्तस्मिन्परान्तकाले साधकानां बहुत्वाद्ब्रह्मैव लोको ब्रह्मलोक एकोऽप्यनेकवद्दृश्यते प्राप्यते वा । अतो बहुवचनं ब्रह्मलोकेष्विति ब्रह्मणीत्यर्थः । परामृताः परममृतममरणधर्मकं ब्रह्माऽऽत्मभूतं येषां ते परामृता जीवन्त एव ब्रह्मभूताः परामृताः सन्तः परिमुच्यन्ति परि समन्तात्प्रदीपनिर्वाणवद्घटाकाशवच्च निवृत्तिमुपयान्ति । परिमुच्यन्ति परि समन्तान्मुच्यन्ते सर्वे न देशान्तरं गन्तव्यमपेक्षन्ते । " शकुनीनामिवाऽऽकाशे जले वारिचरस्य च । पदं यथा न दृश्येत तथा ज्ञानवतां गतिः " । " अनध्वगा अध्वसु पारयिष्णवः " इति श्रुतिस्मृतिभ्यो देशपरिच्छिन्ना हि गतिः संसारविषयैव । परिच्छिन्नसाधनसाध्यत्वात् । ब्रह्म तु समस्तत्वान्न देशपरिच्छेदेन गन्तव्यम् । यदि हि देशपरिच्छिन्नं ब्रह्म स्यान्मूर्तद्रव्यवदाद्यन्तवदन्याश्रितं सावयवमनित्यं कृतकं च स्यात् । न त्वेवंविधं ब्रह्म भवितुमर्हति । अतस्तत्प्राप्तिश्च नैव देशपरिच्छिन्ना भवितुं युक्ता ।

अपि चाविद्यादिसंसारबन्धापयनमेव मोक्षमिच्छन्ति ब्रह्मविदो न तु कार्यभूतम् ॥ ६ ॥

सिद्धान्ती—आणखी; तत्त्वज्ञानाच्या योगानें उत्पन्न झालेलें जें विज्ञान तें वेदांतविज्ञान होय. त्या ज्ञानाचा ज्ञेयविषय परमात्मा आहे. वेदान्तविज्ञानानें ज्यांनीं परमात्म्याचें विज्ञान निश्चित केलें आहे तें वेदांतविज्ञानसुनिश्चितार्थ होत. त्यांनीं संन्यासयोगाचा, म्हणजे सर्व कर्मांचा सर्वथा त्याग हें आहे लक्षण ज्याचें त्या योगाचा आश्रय केला असल्यामुळें, सारांश, केवळ ब्रह्मनिष्ठेचें अनुष्ठान अखंड करून ज्ञानयोगाची सिद्धि केली असल्यामुळें त्यांनीं इंद्रियादिकांचें दमन करून आपलें अंतःकरण निर्मळ आणि निर्मळ केलें असतें. ते ऋषी संसाराच्या अखेरीस—

शिष्य—परांतकाल म्हणजे मरणकाल असा अर्थ आहे.

सिद्धान्ती—होय. संसारी लोकांचा मरणकाल म्हणजे परांतकाल होय. पण मुमुक्षूंचा संसार संपला, विषयेच्छा संपून आत्मज्ञान झालें म्हणजेच त्यांचा देहाशीं संबंध सुटतो आणि त्यांनीं देहपरित्याग केला असें होतें. हाच त्याचा परांतकाल होय. तात्पर्य देहावसान–समयींच–जिवंतपणींच– हे साधकलोक ब्रह्मलोकामध्यें प्रवेश करितात. साधक अनेक आहेत म्हणून ब्रह्मलोक हा शब्द अनेक वचनांत झाला आहे. ब्रह्म हाच जो लोक तो ब्रह्मलोक होय. एक असून ही साधकांच्या अनेकत्वानें हा ब्रह्मलोक अनेकरूपांनीं असल्यासारखा दिसतो किंवा साधकांस प्राप्त होतो. ब्रह्मलोकांमध्यें म्हणजे ब्रह्मांत साधकांचा प्रवेश होतो. स्वभावतः ब्रह्म मरणधर्मशून्य आहे. म्हणून ते परामृत (पराकाष्ठेचे अमृत)–स्वरूपाचे होतात. तात्पर्य ते ब्रह्म होतात. केव्हां? जिवंत असतांनाच! असो; ते ब्रह्मरूप होतात आणि प्रदीपाचा निर्वाणसमय आला, घटाकाशाची घटोपाधि संपली म्हणजे दीप अथवा घटाकाश स्वरूपीं मिळून निवृत्त होतात, अदृश्य होतात, त्याप्रमाणें हे लोक जेथें असतील तेथेंच सर्वबाजूंनीं सर्वथा मुक्त होतात. यांना देशांतराला जावें लागत नाहीं. इतकेंच नव्हे तर देश, काल, इत्यादि सर्व उपाधी यांच्या संबंधानें स्वरूपतः नष्ट होतात. 'आकाशामध्यें संचार करणारे पक्षी उडत असतां आणि जलांत राहणारे मत्स्यमगरादि पोहत असतां त्यांचीं पावलें जशीं दिसत नाहींत, त्याप्रमाणें ज्ञानीलोकांची ही मुक्तिस्थितीमध्यें गति दिसत नाहीं.' कारण, ब्रह्म सर्वत्र असल्यामुळें स्वभावतः ज्ञानीलोकांचें गमनागमन संपलेलें असतें. 'मार्गांतून पार जाऊं इच्छिणारे ज्ञानीलोक कोणत्याच मार्गाचा स्वीकार करीत नाहींत' इत्यादि श्रुति स्मृति ज्ञानीलोकांस गमनागमनाची उपाधि नसते असें सांगतात. संसारी लोकांचें गमनागमन (यातायात) देशकालांनीं परिच्छिन्न, मर्यादित झालेलें असतें. कारण त्यांचें परिच्छिन्न साध्य विषयपरिच्छिन्नसाधनानींच मिळावयाचे असतात. परंतु ब्रह्म हें सर्व आणि सर्वव्यापी आहे म्हणून त्याकडे जातांना देशकालादि मर्यादांचा अवलंब अनावश्यक असतो. खरेंच आहे ब्रह्म हें देशपरिच्छिन्न आहे

असें समजलें तर तें मूर्तद्रव्यासारखें उत्पन्न व नष्ट होणारें, परतंत्र, सावयव, अनित्य आणि उत्पन्न झालेलें (उत्पन्न केलेलें) अशा स्वरूपाचें होईल. पण ब्रह्म मूर्त द्रव्य नाहीं; त्याला जन्म मरण नाहीं, तें स्वतंत्र, निष्कल, नित्य आणि स्वयंभु आहे म्हणून त्याला देशपरिच्छेद नाहीं. अर्थातच त्याची प्राप्तिही नियमितदेशीं होत नाहीं. ही प्राप्ति सर्वत्र होते. ब्रह्मवेत्ते मोक्षाची इच्छा करितात ते कांहीं नवीन वस्तु प्राप्त व्हावी अशा भावनेनें करीत नाहींत. तर अविद्येनें जें संसारादि बंधन प्राप्त झालें असतें त्या बंधनाचा निरास करणें हाच त्यांचा मोक्ष असतो. मोक्षही उत्पन्न होणारी वस्तु नाहीं. असो, हे लोक मुक्त होतात ते येथल्या येथेंच होय. ॥ ६ ॥

माध्व०—'परांतकाल'=पर म्हणजे ब्रह्मवर्षशत, त्याचा अंत म्हणते ब्रह्मदेवाची साडेबारा वर्षे. सारांश महर्लोकादिक सोडून देऊन व विरजानदींत स्नान करून परामृत (नित्यमुक्त, लक्ष्मीरुप प्रकृतिबंधापासून मुक्त झालेले). परानृत असाही एक पाठ आहे ' संन्यासयोग '=भगवदर्पण बुद्धीनें केलेली स्ववर्णाश्रमोचित कर्मे. ' वेदांत '=सर्व वेदार्थनिर्णय. हा श्रवण, मनन व निदिध्यासानें होतो.

मंत्र सातवा.

गताः कलाः पञ्चदश प्रतिष्ठा देवाश्च सर्वे प्रति देवतासु । कर्माणि विज्ञानमयश्च आत्मा परेऽव्यये सर्व एकीभवन्ति ॥ ७ ॥

अन्वय व अर्थ—**पंचदश कलाः प्रतिष्ठाः गताः, च सर्वे देवाः देवतासु प्रति** (पंधरा प्राणादि कला आपापल्या कारणस्थानाप्रत जातात; आणि सर्व इंद्रियें आपापल्या आधिदैविक कारणांत लीन होतात) **कर्माणि विज्ञानमयः च आत्मा सर्वे परे अव्यये एकीभवन्ति** (सर्व कर्मे आणि विज्ञानमय आत्मा हीं सर्व अत्यंत श्रेष्ठ जें अव्यय ब्रह्म त्यामध्यें एकरूप होतात.) ॥ ७ ॥

किंच मोक्षकाले या देहारम्भिकाः कलाः प्राणाद्यास्ताः स्वां स्वां प्रतिष्ठां गताः स्वं स्वं कारणं गता भवन्तीत्यर्थः । प्रतिष्ठा इति द्वितीयाबहुवचनम् । पञ्चदशसंख्याका या अन्यत्रश्रुतिपरिपठिताः प्रसिद्धा देवाश्च देहाश्रयाश्चक्षुरादिकरणस्थाः सर्वे प्रति देवतास्वादित्यादिषु गता भवन्तीत्यर्थः । यानि च मुमुक्षुणा कृतानि कर्माण्यप्रवृत्तफलानि प्रवृत्तफलानामुपभोगेनैव क्षीयमाणत्वाद्विज्ञानमयश्चाऽऽत्माऽविद्याकृ-

तबुद्ध्याद्युपाधिमात्मत्वेन मत्वा जलादिषु सूर्यादिप्रतिबिम्बवदिह प्रविष्टो देहभेदेषु कर्मणां तत्फलार्थत्वात्सह तेनैव विज्ञानमयेनाऽऽत्मना । अतो विज्ञानमयो विज्ञानप्रायः । त एते कर्माणि विज्ञानमयश्चाऽऽत्मोपाध्यपनये सति परेऽव्ययेऽनन्तेऽक्षये ब्रह्मण्याकाशकल्पेऽजेऽजरेऽमृतेऽभयेऽपूर्वेऽनपरेऽनन्तरेऽबाह्येऽद्वये शिवे शान्ते सर्व एकीभवन्त्यविशेषतां गच्छन्त्येकत्वमापद्यन्ते जलाद्याधारापनय इव सूर्यादिप्रतिबिम्बाः सूर्ये घटाद्यपनय इवाऽऽकाशे घटाद्याकाशाः॥७॥

सिद्धान्ती—आणखी; मोक्षकाल प्राप्त झाला म्हणजे देहाला आरंभ करणाऱ्या ज्या प्राणश्रद्धादि पंधरा* कला आहेत. त्या आपापल्या कारणांमध्यें जाऊन लीन होतात. जसें प्राण मुख्यप्राणामध्यें जाऊन तेथें लीन होतो. मंत्रांतील प्रतिष्ठा हें पद द्वितीयांत असून अनेकवचनीं आहे. या पंधरा कला कोणत्या, त्या प्रश्नोपनिषदाच्या सहाव्या प्रश्नांत सांगितल्या आहेत व त्या प्रसिद्धही आहेत. मंत्रांतील 'देवाः' हें पद देहाच्या आश्रयानें राहणारीं नेत्रादिइंद्रियें आहेत त्यांच्या ठिकाणीं राहणाऱ्या प्रसिद्ध अधिष्ठात्री देवता होत. या सर्व देवता आपापल्या कारणस्वरूपांत म्हणजे आदित्यादिकांत जाऊन मिसळतात. तसेंच, मुमुक्षूनें केलेल्या कर्मांपैकीं जीं फलोन्मुख झालीं होतीं, त्यांचें फल भोगण्यासाठीं त्याला देह प्राप्त झाला आहे व त्यांचा क्षय उपभोगानें या जन्मांत झाला म्हणून त्यांचा विचार कर्तव्य नाहीं. पण जीं कर्में फलोन्मुख झालीं नाहींत, तीं कर्में आणि विज्ञानमय आत्मा हीं सर्व—

शिष्य—विज्ञानमय आत्मा म्हणजे ?

सिद्धान्ती–अविद्येनें मन, बुद्धि आदि उपाधि निर्माण केल्या म्हणजे त्या उपाधींनीं युक्त जो जीव हाच आपला आत्मा असें समजून अज्ञानी जीव व्यापार करीत असतात. आतां जलप्रवाहांमध्यें सूर्यादिकांचीं प्रतिबिंबें पडतात त्याप्रमाणें आत्मा हा अनेक देहांमध्यें पूर्वकर्मानुसार प्रवेश करितो आणि कर्मांचें फल भोगण्यासाठीं विज्ञानमय कोशांत वास्तव्य करितो. हाच विज्ञानमय आत्मा होय. याला ज्ञान असतें पण तें अज्ञानमिश्रित असतें. असो; सर्व उपाधी नाहींशा झाल्यानंतर ज्ञानीपुरुषांचीं फलोन्मुख न झालेलीं सर्व कर्में आणि त्यांचे अज्ञानशून्य विज्ञानमय आत्मे हीं सर्वश्रेष्ठ, अव्यय, अनंत, अक्षय अशा आकाशतुल्य ब्रह्मामध्यें जाऊन त्या अज, अजर, अमृत, अभय, अपूर्व, अनपर (अद्वितीय), अनंतर (एकरस), अबाह्य (सर्वव्यापी), अद्वय, शिव (सर्वमंगल), आणि शांत अशा ब्रह्मस्वरूपांत एकरूप होतात. येथें सर्व भेदाभेद, सर्व विशेष मावळून जातात आणि सर्व एकमय होऊन जातें. जलादिकांचा आधार

* कला सोळा आहेत; पण येथें कर्मांचा उच्चार झाला आहे म्हणून १५ कलांचा मात्र निर्देश आहे.

झाली (पाणी नाहींसें झालें म्हणजे) सूर्यादिकांचीं प्रतिबिंबें सूर्यांत जाऊन मिळतात. किंवा घटादिकांचा स्फोट झाला म्हणजे घटाकाशादि आकाशांत जाऊन मिळतात व एकरूप होतात, त्याप्रमाणें मुक्तलोकांचीं कर्मे आणि त्यांचे आत्मे उपाधीनाशानंतर ब्रह्मस्वरूपांत जाऊन मिळतात व एकरूप होतात. ॥ ७ ॥

रंगरामानुज—येथें पंधरा कलांचा उल्लेख आहे. प्रश्नोपनिषदांतील कर्मनामक कला वजा केली म्हणजे प्रश्नोपनिषदांतील सोळा कलांचा हिशोब लागतो. या सर्व कला आपापल्या आधिदैविक कारणांत जाऊन राहतात, लीन होत नाहींत. कल्पपर्यंत इंद्रियादि सर्व स्वस्वरूपांत असतात, असें श्रुतीचें सांगणें आहे. 'कर्माणि' = फलोन्मुख न झालेलीं कर्मे. ब्रह्माचें यथास्वरूप ज्ञान होण्याच्या वेळीं या कर्मांचा क्षय परमेश्वरी संकल्पानें होतो. 'एकीभवन्ति' = नामरूपात्मक भेदांचा मात्र त्याग होतो.

माध्व०—"एकीभवन्ति" एकविषयक बुद्धी होते, समान ऐश्वर्य प्राप्त होतें. या मुक्तीला सार्ष्टि व चतुर्भुजत्वादि सारूप्य मिळणें याला सरूपता मुक्ति म्हणतात. एकदेशस्थिति असणें याला सलोकतामुक्ति म्हणतात. आणि भगवंताजवळ नित्य राहणें याला समीपता मुक्ति म्हणतात. याप्रमाणें एकीभवन म्हणजे ब्रह्म होणें नव्हे. एक नसेल ते एक होणें असा एकीभवनाचा अर्थ आहे. जीव आणि ब्रह्म हे स्वभावतः प्रथम एक नसतील तर केव्हांही एक होणे शक्य नाहीं. तात्पर्य एकीभाव म्हणजे स्वरूपैक्य नव्हे. एकाठिकाणीं राहणें किंवा एक-विषयक-मति होणें हा अर्थ आहे. येथें अद्वैतमतवाद्यांचा अर्थ सर्वथा चुकला आहे!

मंत्र आठवा.

यथा नद्यः स्यन्दमानाः समुद्रेऽस्तं गच्छन्ति नामरूपे विहाय । तथा विद्वान्नामरूपाद्विमुक्तः परात्परं पुरुषमुपैति दिव्यम् ॥ ८ ॥

अन्वय व अर्थ—**यथा स्यंदमानाः नद्यः नामरूपे विहाय समुद्रे अस्तं गच्छन्ति** (ज्याप्रमाणें प्रवाहशील नद्या आपापल्या नामरूपास सोडून देऊन समुद्रांत प्रवेश करितात आणि नदीस्वरूपानें नाहींशा होतात.) **तथा नामरूपात् विमुक्तः विद्वान् दिव्यं परात्परं पुरुषं उपैति** (त्याप्रमाणें नामरूपापासून विमुक्त झालेला ज्ञानी साधक दिव्य आणि परेहून पर–श्रेष्ठ असणाऱ्या श्रेष्ठ-पुरुषाप्रत जाऊन एकरूप होतात.) ॥८॥

किंच यथा नद्यो गङ्गाद्याः स्यन्दमाना गच्छन्त्यः समुद्रे समुद्रं प्राप्यास्तमदर्शनमविशेषात्मभावं गच्छन्ति प्राप्नुवन्ति । नाम च रूपं च नामरूपे विहाय हित्वा तथाऽविद्याकृतनामरूपाद्विमुक्तः सन्विद्वान्परादक्षरात्पूर्वोक्तात्परं दिव्यं पुरुषं यथोक्तलक्षणमुपैत्युपगच्छति ॥ ८ ॥

सिद्धान्ती—आणखी; ज्याप्रमाणें प्रवाहवती गंगादिनद्या समुद्राजवळ गेल्या म्हणजे आपापलीं नामरूपें टाकून देऊन आंत शिरतात, अस्तंगत होतात, भेदशून्य होतात, समुद्राशीं एकरूप होतात, त्यांचें विशेष स्वरूप नाहींसें होतें, त्याप्रमाणें अज्ञानानें उत्पन्न केलेल्या नामरूपांपासून विमुक्त झालेला विद्वान् मागें वर्णिलेल्या अक्षराच्याही पलीकडे असणारा जो दिव्य पुरुष, परमात्मा, त्याप्रत जाऊन त्याच्याशीं तादात्म्य पावतो. परमात्म्याचें लक्षण मागें सांगितलेंच आहे. ॥ ८ ॥

रंगरामानुज—या मंत्राचें कठवल्लींत विस्तारानें स्पष्टीकरण आलें आहे. तात्पर्य हें आहे कीं, मुक्त जीव परमेश्वरसदृश होतो, परमेश्वर होत नाहीं. या प्रवचनाचा विस्तार कठोपनिषदांत पहावा. जीवानें ब्रह्म होणें यांच्या मतें अशक्य आहे.

माध्व—नद्या, समुद्रांत जाऊन मिसळतात परंतु त्या एकरूप होत नाहींत. कारण वायु हा नद्यांचें मात्र उदक घेऊन मेघ उत्पन्न करितो, हें आपल्यास स्पष्ट दिसतें. त्याप्रमाणेंच जीव मुक्त झाले तरी त्यांचीं नामरूपें आपल्यास समजत नाहींत हें खरें, तथापि त्यांचीं नामरूपें नाहींशीं होत नाहींत. मंत्रांतील 'विमुक्त' याचा अर्थ अमुक असा आहे. तसेंच 'नामरूपे विहाय' या पदांत नामरूपे या पदापुढें अविग्रह असून नामरूपे अविहाय असा पाठ ठेविला पाहिजे, असा श्रुतीचा अभिप्राय आहे.

मंत्र नववा.

स यो ह वै तत्परमं ब्रह्म वेद ब्रह्मैव भवति नास्याब्रह्मवित्कुले भवति । तरति शोकं तरति पाप्मानं गुहाग्रन्थिभ्यो विमुक्तोऽमृतो भवति ॥ ९ ॥

अन्वय व अर्थ—यः ह वै तत् परमं ब्रह्म वेद सः ब्रह्म एव भवति (जो कोणी तें अतिश्रेष्ठ परब्रह्माचें ज्ञान करून घेतो तो ब्रह्मच होतो.) अस्य कुले अब्रह्मवित् न भवति (याच्या कुलांत ब्रह्म न जाणणारा पुरुष उत्पन्न होत नाहीं.) शोकं तरति, पाप्मानं तरति, गुहाग्रंथिभ्यः विमुक्तः अमृतः भवति (याचा शोक म्हणजे मनःसंताप नाहींसा

होतो, पापबुद्धि संपते आणि हृदयग्रंथींपासून हा विमुक्त होतो, अर्थातंच अमर होतो.) ॥ ९ ॥

ननु श्रेयस्यनेके विघ्नाः प्रसिद्धा अतः क्लेशानामन्यतमेनान्येन वा देवादिना च विघ्नितो ब्रह्मविदप्यन्यां गतिं मृतो गच्छति न ब्रह्मैव । न । विद्ययैव सर्वप्रतिबन्धस्यापनीतत्वात् अविद्याप्रतिबन्धमात्रो हि मोक्षो नान्यः प्रतिबन्धः । नित्यत्वादात्मभूतत्वाच्च । तस्मात्स यः काश्चिद्ध वै लोके तत्परमं ब्रह्म वेद साक्षादहमेवास्मीति स नान्यां गतिं गच्छति । देवैरपि तस्य ब्रह्मप्राप्तिं प्रति विघ्नो न शक्यते कर्तुम् । आत्मा ह्येषां स भवति । तस्माद्ब्रह्मविद्ब्रह्मैव भवति किंच नास्य विदुषोऽब्रह्मवित्कुले भवति । किंच तरति शोकमनेकेष्टवैकल्यनिमित्तं मानसं संतापं जीवन्नेवातिक्रान्तो भवति । तरति पाप्मानं धर्माधर्माख्यं गुहाग्रन्थिभ्यो हृदयाविद्याग्रंथिभ्यो विमुक्तः सन्नमृतो भवतीत्युक्तमेव भिद्यते हृदयग्रन्थिरित्यादि ॥ ९ ॥

शिष्य—भगवन् ! कल्याणाच्या मार्गांत अनेक विघ्नें असतात, हें प्रसिद्ध आहे. म्हणून अनेक क्लेशांपैकीं एक किंवा दुसरा क्लेश मोक्षमार्गाच्या आड येऊन उभा राहणार, निदान कोणा देवादिकांकडून तरी ब्रह्मवेत्त्यांस विघ्नें प्राप्त होणार, तेव्हां ब्रह्मवेत्ता जरी असला तरी त्याला ब्रह्मप्राप्ति न होतां कोणत्यातरी अन्य गतीला तो मेल्यावर गेला पाहिजे, असें झालें ?

सिद्धान्ती—नाहीं. सर्वविघ्नांचा नाश करणारी ब्रह्मविद्या त्याचें साहाय्य करून विघ्नांचा नाश करीत असते. मोक्षाला प्रतिबंध होतो तो अविद्येमुळें मात्र होतो. अविद्या हाच मोठा अहितकारी प्रतिबंध आहे. दुसरा प्रतिबंध नाहीं. तेव्हां अविद्याप्रतिबंध ब्रह्मविद्येनें नाहींसा झाला म्हणजे ब्रह्मप्राप्तीला दुसरा बंध येणें शक्य नाहीं, म्हणून अविद्या नाहींशी झाली म्हणजे नित्य असणारा मोक्ष आत्मवेत्त्याला मिळतो. कारण, मोक्ष म्हणजेच आत्मतत्त्व आहे. असो; आत्मवेत्ता मोक्षरूपच असतो. मग त्याला विघ्न कसलें ? हें स्पष्ट करण्यासाठीं श्रुति म्हणते कीं, जो कोणी मुमुक्षु या लोकीं त्या अतिश्रेष्ठ ब्रह्माचें ज्ञान करून घेतों 'मीच साक्षात् ब्रह्म आहें' असा ज्याचा निश्चय होतो.' त्याला दुसरी तिसरी गति मिळणें शक्य नाहीं. प्रत्यक्ष देवांना सुद्धां त्याच्या ब्रह्मप्राप्तीमध्यें विघ्न आणितां येत नाहीं. कारण, त्या देवांचाही तो आत्मा होऊन बसतो. अर्थातच ब्रह्म जाणणारा विद्वान् ब्रह्म होतो. तसेंच या विद्वानाच्या कुलांत कोणीही अब्रह्मज्ञानी पुरुष उत्पन्न होत नाहीं. आणखी; अनेक इष्टानिष्ट गोष्टीमुळें होणारा मानसिक संताप त्याला होत नाहीं. इतकेंच नव्हें तर तो जीवंत असतांनाही शोकमोहांच्या पलीकडे जाऊन राहतो. त्याचें सर्व धर्माधर्ममूलक कर्म किंवा पुण्यपापरूप फल संपतें. तो धर्मा-

धर्माच्या कक्षेंतून बाहेर पडतो आणि हृदयांत अविद्येनें उत्पन्न केलेल्या ग्रंथी असतात त्या सर्व तोडून टाकून त्यांच्यापासून तो मुक्त होतो, तो अमर होतो, इत्यादि मागील एका मंत्रांत (मुण्डक २।२।८) विस्तारानें सांगितलें आहे. ॥ ९ ॥

रंगरामानुज—'ब्रह्मैव भवति'=ब्रह्मरूप होतो.

माध्व०—ज्याला ब्रह्म ज्ञान होतें, तो जीव स्वतःचें स्वरूप असेल तें पूर्ण करून घेतो. 'ब्रह्म भवति'=पूर्ण होतो, तो परमात्मस्वरूपी होत नाहीं. कारण, तो परतंत्र आहे व त्याचें स्वरूप ब्रह्माहून निराळें आहे, हें याच उपनिषदांत अनेक वेळ सांगितलें आहे आणि भगवान् बादरायणांचाही अभिप्राय असाच आहे. शिवाय, न्याय असा आहे कीं, बाधक वस्तु असेल तर श्रुतीच्याही अर्थाचा संकोच करावा. जीव आणि ब्रह्म यांमध्यें अत्यंत भेद आहे हें श्रुतीला, स्मृतीला, इतिहासाला व पुराणांना मान्य आहे; म्हणून येथील श्रुतीच्या अर्थाचा संकोच करून ब्रह्म भवति म्हणजे जीव आपलें मूळरूप पावतो, असें समजावें. हें स्वरूप ब्रह्मस्वरूपाहून निराळें आहे.

मंत्र दहावा.

तदेतदृचाऽभ्युक्तम्—क्रियावन्तः श्रोत्रिया ब्रह्मनिष्ठाः स्वयं जुह्वत एकर्षिं श्रद्धयन्तः। तेषामेवैतां ब्रह्मविद्यां वदेत शिरोव्रतं विधिवद्यैस्तु चीर्णम्॥१०॥

अन्वय व अर्थ—तत् एतत् ऋचा अभ्युक्तं (ऋग्वेदांतील एका मंत्रांत हें सर्व असें म्हटलें आहे.) **क्रियावंतः, श्रोत्रियाः, ब्रह्मनिष्ठाः, एकर्षिं स्वयं जुह्वतः, श्रद्धयंतः,** (क्रियावान्, वेदवेत्ते, ब्रह्मनिष्ठ, श्रद्धावान्, स्वतः एकर्षि नामक अग्नीला हविर्भाग देणारे श्रद्धावंत जे कोणी असतील) **यैः विधिवत् शिरोव्रतं चीर्णं तेषां एव एतां ब्रह्मविद्यां वदेत** (व ज्यांनीं विधिपूर्वक शिरोव्रताचें—मस्तकावर अग्नि धारण करण्याचें-व्रत सिद्धीस नेलें आहे, त्यांना मात्र ही ब्रह्मविद्या सांगावी.)॥१०॥

अथेदानीं ब्रह्मविद्यासंप्रदानविध्युपप्रदर्शनेनोपसंहारः क्रियते । तदेतद्विद्यासंप्रदानविधानमृचा मन्त्रेणाभ्युक्तमभिप्रकाशितम् । क्रियावन्तो यथोक्तकर्मानुष्ठानयुक्ताः । श्रोत्रिया ब्रह्मनिष्ठा अपरस्मिन्ब्रह्मण्यभियुक्ताः परब्रह्मबुभुत्सवः स्वयमेकर्षिमेकर्षिनामानमग्निं जुह्वते जुह्वति श्रद्धयन्तः श्रद्दधानाः सन्तो ये तेषामेव संस्कृतात्मनां

पात्रभूतानामेतां ब्रह्मविद्यां वदेत ब्रूयाच्छिरोव्रतं शिरस्यग्निधारण-लक्षणम्। यथाऽऽथर्वणानां वेदव्रतं प्रसिद्धम्। यैस्तु यैश्च तत्कीर्णं विधिवद्यथाविधानं तेषामेव च ॥ १० ॥

सिद्धान्ती–आतां यानंतर ब्रह्मविद्येचें संप्रदान कसें करावें याचा विधि सहज सांगून उपनिषदाचा उपसंहार केला आहे. ब्रह्म–विद्येचें संप्रदान कसें करावें याचा विधि एका ऋग्मंत्रानें स्पष्ट प्रकाशित केला आहे, तो असा. जे कोणी वेदविहित कर्मांचें अनुष्ठान अखंड करितात, ज्यांनीं वेदाचें साग्र व पोक्त अध्ययन केलें आहे; ज्यांची अपरब्रह्माचे ठिकाणीं उत्कृष्ट निष्ठा असून ज्यांना परब्रह्म जाणण्याची इच्छा आहे, जे स्वतः एकर्षि-नामक अग्नीला हविर्भाग देतात आणि ज्यांची आस्तिक्य बुद्धि प्रखर आहे, त्या अंतःकरण संस्कृत झालेल्या व ब्रह्मविद्येचा उपदेश ग्रहण करण्याची योग्यता संपादन केलेल्या श्रेष्ठ लोकांपैकीं ज्यांनीं मस्तकावर अग्निधारण करण्याचें व्रत यथासांग संपा-दिलें आहे, त्यांना मात्र ब्रह्मविद्येचा उपदेश करावा. आथर्वणांना प्रसिद्ध वेदव्रत सांगि-तलें आहे, तें हेंच प्रस्तुत मंत्रातील शिरोव्रत होय. ॥ १० ॥

रंग०—एका ऋत्विजानें मात्र साध्य होणाऱ्या अग्निहोत्ररूपी उपासनेची देवता जो अग्नि त्याला एकर्षि म्हणतात. एकर्षि म्हणजे परमात्मा असाही अर्थ होईल. शिरोव्रतासं-बंधानें श्रीमद्रामानुजाचार्य शारीरक (३।३।३) या सूत्रावर व्याख्यान करतांना म्हणतात कीं, प्रत्येकशाखेनें निरनिराळी उपासना सांगितली आहे. तथापि प्रत्येक उपासनेचें तात्पर्य एकच असून ब्रह्मप्राप्तिरूप फल ही एकच आहे. मुख्य गोष्ट अशी सांगावयाची आहे कीं, आपापल्या शाखेचें अध्ययन सांगोपांग झालें असलें म्हणजे उपनिषद्रूपी स्वाध्यायाला संस्कृतत्व येतें. उपनिषदाच्या अध्ययनाचें विशेष अंग अग्निची उपासना हें आहे. विद्येचें अंग नाहीं. वेदविहित उपासना अवश्य आहे व ती प्रत्येक शाखेला निर-निराळी सांगितली आहे; तरी सर्वांचें तात्पर्य उपासनेच्या संस्कृतीमध्यें मात्र आहे. भिन्न उपासना स्वरूपतः एकरूप व उपास्यही एकरूपच आहे. म्हणून प्रत्येक मुमुक्षूनें शिरोव्रतरूपीच उपासना केली पाहिजे असे नाहीं. स्वशाखेंत विहित केलेली उपासना सिद्ध झाली म्हणजे तत्कार्य होतें; हा फलितार्थ आहे. मात्र हें लक्षांत ठेवावयाचें कीं, मुण्डकोपनिषदाचें **अध्ययन** करणारानें शिरोव्रताचें अध्ययन केलेलें असलें पाहिजे.

माध्व०—यांचा 'एकऋषीन्' असा पाठ आहे एक–ऋषि = ब्रह्मविद्यासंप्रदाय-प्रवर्तक ऋषी होत.

मंत्र अकरावा.

तदेतत्सत्यमृषिरङ्गिराः पुरोवाच नैतदचीर्णव्रतोऽधीते । नमः परमऋषिभ्यो नमः परमऋषिभ्यः ॥ ११ ॥

इति तृतीयमुण्डके द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

अन्वय व अर्थ—**तत् एतत् सत्यं अंगिराः ऋषिः पुरा उवाच** (याप्रमाणें पूर्वी अंगिरा ऋषीनें ब्रह्मरूपी सत्य प्रकट केलें) **अचीर्णव्रतः एतत् न अधीते** (जो व्रतस्थ राहात नाहीं त्याला हें सत्य अधीत करितां येणार नाहीं.) **परमऋषिभ्यः नमः, परमऋषिभ्यः नमः** (ह्या श्रेष्ठ ऋषींस नमस्कार असो, ह्या श्रेष्ठ ऋषींस नमस्कार असो.) ॥ ११ ॥

तदेतदक्षरं पुरुषं सत्यमृषिरङ्गिरानाम पुरा पूर्वं शौनकाय विधिवदुपसन्नाय पृष्टवत उवाच । तद्वदन्योऽपि तथैव श्रेयोर्थिने मुमुक्षवे मोक्षार्थं विधिवदुपसन्नाय ब्रूयादित्यर्थः । नैतद्ग्रन्थरूपचीर्णव्रतोऽचरितव्रतोऽप्यधीते न पठति । चीर्णव्रतस्य हि विद्या फलाय संस्कृता भवतीति । समाप्ता ब्रह्मविद्या सा येभ्यो ब्रह्मादिभ्यः पारम्पर्यक्रमेण संप्राप्ता तेभ्यो नमः परमऋषिभ्यः । परमं ब्रह्म साक्षाद्दृष्टवन्तो ये ब्रह्मादयोऽवगतवन्तश्च ते परमर्षयस्तेभ्यो भूयोऽपि नमः । द्विर्वचनमत्यादरार्थं मुण्डकसमाप्त्यर्थं च ॥ ११ ॥

इति तृतीयमुण्डकोपनिषद्भाष्ये द्वितीयः खण्ड ॥ २ ॥

इति श्रीमद्गोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यस्य परमहंसपरिव्राजकाचार्यस्य श्रीमच्छंकरभगवतः कृतावाथर्वणमुण्डकोपनिषद्भाष्यं समाप्तम् ॥

सिद्धान्ती—याप्रमाणें तें हें अक्षररूपी (पुरुषोत्तमरूपी) सत्य पूर्वी अंगिराऋषीनें शौनकाला प्रथमतः सांगितलें. शौनक हा शिष्यांस योग्य अशा शास्त्रपद्धतीनें येऊन या ऋषीस प्रश्न विचारता झाला होता आणि दयाघन ऋषींनीं शौनकांस हें ब्रह्मतत्त्व प्रकट केलें. शौनकाप्रमाणें दुसरा कोणीही श्रेयोर्थी मुमुक्षु विधिवत् प्राप्त झाला असतां त्याला ब्रह्मवेत्त्या व तत्त्वदर्शी आचार्यांनें हें सत्य (ब्रह्मतत्त्व) सांगणारें उपनिषद् रूपाळूपणें सांगावें, हा तात्पर्यार्थ आहे. ज्यानें विहितव्रताचें आचरण केलें

नाहीं, तो या ग्रंथाचे किंवा ग्रंथांत सांगितलेल्या ब्रह्मतत्त्वाचें अध्ययन मुद्धां करणार नाहीं आणि केलें तरी त्यांस तें समजणार नाहीं; कारण, व्रतनिष्ठ पुरुषानें अधीत केलेली विद्या मात्र फलप्रद होते, हें समजून घ्यावें.

येथें ब्रह्मविद्येचा उपदेश संपला. ब्रह्मादिक ज्या आचार्यांपासून संप्रदायपरंपरेनें ही विद्या आजपर्यंत चालत आली त्या श्रेष्ठ ऋषींस आम्ही नमस्कार करितों. ज्या श्रेष्ठपुरुषांनीं परब्रह्माचें साक्षात् दर्शन घेतलें म्हणजे ज्या ब्रह्मादिकांना संपूर्ण ब्रह्मज्ञान-विज्ञान झालें आणि म्हणून ज्यांना परम ऋषी असें म्हणतात, त्यांना पुनः नमस्कार करितों. परम म्हणजे ब्रह्म ज्यांनीं साक्षात् पाहिलें आहे, ते परम ऋषी होत. त्यांना नमस्कार असो. येथें दोनदां नमस्कार-वचन आहे ते अत्यंत आदर दर्शविण्यासाठीं आणि मुण्डकोपनिषत् समाप्त झालें, हें दाखविण्यासाठीं अवतीर्ण झालें आहे. ॥ ११ ॥

माध्व०—या प्रमाणें अंगिरा ऋषि शौनकाला जगत्-कर्तृत्वादि गुणविशिष्ट सत्य-ब्रह्माचें (श्री भगवान् विष्णूचें) व्याख्यान करिता झाला.

तृतीय मुण्डकाचें द्वितीय खंड समाप्त.

मुंडकोपनिषत्समाप्त.

श्रीमच्छंकराचार्यकृत आथर्वण मुण्डकोपनिषद्भाष्याचें भाषांतर समाप्त झालें.

ॐ

माण्डूक्योपनिषत्.

(भाष्यभाषांतरासह.)

संपादक

चिंतामण गंगाधर भानु, बी. ए.

गौडपादीयकारिकासु आगमाख्यप्रथमप्रकरणसहिता

माण्डूक्योपनिषत्.

शाङ्करभाष्यसमेता ।

ॐ तत्सद्ब्रह्मणे नमः ।

प्रज्ञानांशुप्रतानैः स्थिरचरनिकरव्यापिभिर्व्याप्य लोकान्
भुक्त्वा भोगान्स्थविष्ठान्पुनरपि धिषणोद्भासितान्कामजन्यान् ॥
पीत्वा सर्वान्विशेषान्स्वपिति मधुरभुङ्मायया भोजयन्नो
मायासंख्यातुरीयं परममृतमजं ब्रह्म यत्तन्नतोऽस्मि ॥ १ ॥

अन्वय व अर्थः—प्रज्ञानांशुप्रतानैः स्थिरचरनिकरव्यापिभिः लोकान् व्याप्य, स्थविष्ठान् भोगान् भुक्त्वा (चराचर समूहाला व्यापून टाकणाऱ्या ज्ञानरूप कूटस्थ सूर्याच्या किरणविस्तारांनीं (जीवशरीरांनीं) सर्व भुवनांस (विषयांस) व्यापून आणि सर्व स्थूल भोगांचा जागृतींत उपभोग घेऊन) **पुनरपि कामजन्यान् धिषणोद्भासितान्** (अविद्येनें प्रेरिलेल्या कर्मांनें उत्पन्न झालेल्या मनोवासनेनें पुनः प्रकाशित केलेले विषयांचा उपभोग स्वप्नांत घेऊन) **सर्वान् विशेषान् पीत्वा नः मायया भोजयन् मधुरभुक् स्वपिति** (आणि सर्व विशेष गिळून टाकून निद्रेमध्यें आनंदाचा उपभोग घेणारा व आपल्या मायेनें आम्हा सर्वांस उपभोग ध्यावयास लावणारा जो परमात्मा झोंपी जातो) **मायासंख्या तुरीयं परं अमृतं अजं यत् ब्रह्म तत् नतः अस्मि** (तो या तिन्ही अवस्थांच्या पलीकडे असणारा परम, अमृत व अजन्मा जो परमात्मा—ब्रह्म—त्याला मी नमस्कार करितों.) ॥ १ ॥

या नमनाच्या श्लोकांत आचार्यांनीं जागृतादि तिन्ही कल्पित अवस्थांचा उल्लेख करून शेवटीं तुरीयावस्थेचा उल्लेख केला आहे. आणि त्या अतिश्रेष्ठ व अमृत परब्रह्माला नमस्कार केला आहे. स्थूल भोग भोगण्याची जागरित अवस्था (विराट्त्व) पुढें, वासनात्मक भोग भोगण्याची स्वाप्निक अवस्था (हिरण्यगर्भत्व), नंतर अशेष विशेष गिळून टाकून व टाकवून आनंद भोगण्याची व भोगविण्याची अविरुतावस्था आणि

शेवटची तुरीयावस्था अशा या उपनिषदांत विवेचित केलेल्या चारी अवस्थांचा उल्लेख करून, एकच ब्रह्म सर्वव्यापी आहे, असा सहज लीलेनें पुढील विषयांचा उपोद्घातही केला आहे. येथें जीवब्रह्मैक्य हा विषय, जन्ममरण रहित असणारा जो मोक्ष त्याची प्राप्ति हें प्रयोजन सुचविलें आहे. आणि याप्रमाणें विषय व प्रयोजन सुचवून संबंध व अधिकारी यांचाही ध्वनि सूचित केला आहे. ॥ १ ॥

यो विश्वात्मा विधिजविषयान्प्राश्य भोगान्स्थविष्ठा-
न्पश्चाच्चान्यान्स्वमतिविभवाञ्ज्योतिषा स्वेन सूक्ष्मान् ॥
सर्वानेतान्पुनरपि शनैः स्वात्मनि स्थापयित्वा
*हित्वा सर्वान्विशेषान्विगतगुणगणः पातवसौ नस्तुरीयः ॥ २ ॥

अन्वय व अर्थः—विधिजविषयान्, स्थविष्ठान् भोगान् प्राश्य यः विश्वात्मा (वेदविहित आणि अविहित कर्मानें उत्पन्न झालेले, स्थूल-सूक्ष्म भोगांचे प्राशन करून जो विश्वनामक प्रत्यगात्मा स्थित होतो) **पश्चात् अन्यान् स्वमतिविभवान् सूक्ष्मान् स्वेन ज्योतिषा** (पुनः आपल्या मतीनें उत्पन्न केलेले दुसरे भोगांचा आपल्या सतेज अंतःकरणानें उपभोग घेऊन जो तैजस राहतो) **पुनरपि एतान् सर्वान् शनैः स्वात्मनि स्थापयित्वा** (पुनः हे सर्व भोग आपल्या स्वतः मध्यें हळूंहळूं लीन करणारा जो प्राज्ञ स्वरूपानें राहतो) **सर्वान् विशेषान् हित्वा विगतगुणगणः** (आणि सर्व विशेष निराकृत करून जो गुणगणशून्य होतो) **नः असौ तुरीयः पातु** (तो तुरीयावस्थेमध्यें नित्य असणारा प्रत्यगात्मा आमचें संरक्षण करो !) ॥ २ ॥

या श्लोकांत जीवात्म्याच्या चारी अवस्थांचें वर्णन करून जीवात्मा आणि परमात्मा वस्तुतः एकरूप आहेत, असें दाखविलें आहे. मागील श्लोकांत अस्तिरूप वर्णन आहे. या श्लोकांत निषेधमुखानें वर्णन केलें आहे. विश्वात्मा, तैजसात्मा, प्राज्ञ, हे अनुक्रमें जागृति, स्वप्न व सुषुप्ति यांचे अधिष्ठाते असून यांचा प्रत्यगात्मा व परमात्मा या स्वरूपांवर आरोप मात्र होतो. तुरीय हा सर्व-विलक्षण असून तोच एक आहे, असें सर्व इतर अवस्थांचा निषेध करून सांगितलें आहे. स्थूलाचा अभिमान धरणारा विश्व, सूक्ष्माचा

* येथें भाष्यकारांचे मङ्गलाचरणाचे जे श्लोक आहेत, त्यांतील दुसऱ्या श्लोकांपैकीं पहिले तीन चरण अन्यवृत्ताचे आहेत व चतुर्थ चरण अन्यवृत्तांत आहे. विचारणीय स्थळ आहे. कदाचित् 'विशेषान्वि' हें एवढें प्रक्षिप्त असावें.

ाभिमानी तैजस, आनंदाचा प्राज्ञ, या तिन्ही अवस्था कल्पित आहेत व मोक्षमार्गाचा तिरोध करणाऱ्या आहेत. यांचा त्याग या नमनांत विहित केला आहे. ॥ २ ॥

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः ।
भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ॥
स्थिरैरङ्गैस्तुष्टुवांसस्तनूभिः ।
व्यशेम देवहितं यदायुः ॥
भद्रं नो अपि वातय मनः ॥
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।

अन्वय व अर्थः—देवाः कर्णेभिः भद्रं शृणुयाम (हे देवहो ! आमच्या कानांनीं आम्हांस मंगल वृत्त ऐकण्यास येवो) यजत्राः अक्षभिः भद्रं पश्येम (हे यज्ञसंरक्षक अग्नीत्यादि महानुभावानो ! आमच्या डोळ्यांस मंगल वस्तूंचें दर्शन होवो) तनूभिः स्थिरैः अंगैः तुष्टुवांसः (स्थिर अशा अंगोपांगांनीं आम्ही परमेश्वराची सेवा व स्तुति करण्यासाठीं तत्पर असावें) यद् आयुः देवहितं व्यशेम (जोपर्यंत आयुष्य आहे, तोपर्यंत देव संतुष्ट होतील अशी आमची व्यवस्था असूं दे) भद्रं नो अपि वातय मनः (हे मना, आमचें कल्याण होईल, अशा स्वरूपानें ऐस).

ओमित्येतदक्षरमिदं सर्वं तस्योपव्याख्यानम् । वेदान्तार्थसारसंग्रहभूतमिदं प्रकरणचतुष्टयमोमित्येतदक्षरमित्याद्यारभ्यते । अत एव न पृथक्संबन्धाभिधेयप्रयोजनानि वक्तव्यानि । यान्येव तु वेदान्ते संबन्धाभिधेयप्रयोजनानि तान्येवेह भवितुमर्हन्ति । तथाऽपि प्रकरणव्याख्यानाय संक्षेपतो वक्तव्यानि ।

सिद्धान्ती—" ॐ हें जें मंगलावह अक्षर आहे; त्याचें आतां आम्ही व्याख्यान करण्यास आरंभ करितों." हें या उपनिषदांतील पहिल्या मंत्राचें प्रास्ताविक वाक्य आहे. सर्व विश्व ओंकारात्मक आहे व ओंकार हा सर्व वेदांताच्या अर्थाचें सारसर्वस्व आहे. माण्डूक्य उपनिषदामध्यें वेदांताच्या सारसर्वस्वाचें आविष्करण चार प्रकरणामध्यें केलें आहे, म्हणून (ओंकार हा विषय शास्त्रशुद्ध असून त्याच्या द्वारें अधिकारी कोण ? गुरूला शरण कसें जावें ? जीव आणि ब्रह्म यांच्या ऐक्याला जे जे विरोध येतात, त्यांच्या परिहा-

रांचीं साधनें कोणतीं, ब्रह्मात्मैक्य ज्ञानाचें फल काय, इत्यादि प्रश्नांचा निर्णय करणारा जो पदार्थ, वेदांतव्याख्यान, त्याचें सार म्हणजे जीवात्म्याचें ऐक्य, त्याचा येथें निश्चयात्मक संग्रह या प्रकरणांत केला आहे. म्हणून)–हें शास्त्रीय प्रकरण आहे म्हणून–शास्त्रास अवश्य असणाऱ्या संबंध, हेतु, इत्यादि अनुबंधचतुष्टयाचा विचार येथें निराळा करण्याचें कारण नाहीं. वेदांतशास्त्रांत संबंध, विषय, प्रयोजन इत्यादि जें अनुबंध चतुष्टय सांगितलेलें असतें, तें न सांगतांही येथें ओघानें प्राप्तच होतें. अशी जरी वस्तुस्थिति आहे, तथापि जो जो व्याख्याता कोणत्याही प्रकरणाचें प्रवचन करितो, त्याला अनुबंधचतुष्टयाचा विचार संक्षेपानें कां होईना, पण करावा लागतो. म्हणून आम्हीं आतां संक्षेपतः अधिकारी, संबंध, विषय आणि प्रयोजन या चार वस्तूंचा विचार करितों.

तत्र प्रयोजनवत्साधनाभिव्यञ्जकत्वेनाभिधेयसंबद्धं शास्त्रं पारम्पर्येण विशिष्टसंबन्धाभिधेयप्रयोजनवद्भवति ।

सिद्धान्ती–आतां शास्त्र असो किंवा प्रकरण असो, तें कोणत्यातरी प्रयोजनफलाची प्राप्ति परंपरेनें करून देणारें असतें; कारण शास्त्राचा 'ज्ञान 'रूपी साधन स्पष्ट करण्याचा हेतु असतो. अर्थातच त्याचा व विषयाचा संबंध प्राप्त येतो. यावरून जरी साक्षात् नव्हे, तरी परंपरेनें या शास्त्रप्रकरणाचा हेतु ब्रह्मज्ञान करून द्यावा, असा असतो. म्हणून ब्रह्मरूपविषयाशीं व मोक्षनामकफलाशीं या शास्त्राचा व प्रकरणाचा प्रतिपाद्यप्रतिपादकपरंपरेनें स्पष्ट होतो. सारांश, हें शास्त्र विशेषसंबंध, विशेषविषय व विशेषफल सांगणारें होतें. सारांश, मोक्षाचें साधन ब्रह्मज्ञान आहे. ब्रह्मज्ञान वेदांतशास्त्रांनें होतें, म्हणून शास्त्र व मोक्ष यांचा संबंध परंपरित असतो. असाच विषयादिकांचा शास्त्रांशीं परंपरित संबंध प्राप्त होतो.

किं पुनस्तत्प्रयोजनमित्युच्यते । रोगार्तस्येव रोगनिवृत्तौ स्वस्थता । तथा दुःखात्मकस्याऽऽत्मनो द्वैतप्रपञ्चोपशमे स्वस्थता । अद्वैतभावः प्रयोजनम् । द्वैतप्रपञ्चस्याविद्याकृतत्वाद्विद्यया तदुपशमः स्यादिति ब्रह्मविद्याप्रकाशनायास्याऽऽरम्भः क्रियते । " यत्र हि द्वैतमिव भवति । यत्र वाऽन्यदिव स्यात्तत्रान्योऽन्यत्पश्येदन्योऽन्यद्विजानीयात् । यत्र त्वस्य सर्वमात्मैवाभूत्तत्केन कं पश्येत्केन कं विजानीयात् " इत्यादिश्रुतिभ्योऽस्यार्थस्य सिद्धिः ।

सिद्धांती—या पुढें कोणीं असें विचारील कीं, शास्त्राचें प्रयोजन तरी काय आहे ? या प्रश्नाचें उत्तर असेः जो कोणीं रोगानें जर्जर झाला असेल, त्याची रोगनिवृत्ति झाली म्हणजे त्याला स्वस्थता हें फल प्राप्त होतें. याचप्रमाणें दुःखानें गांजून

गेलेल्या जीवात्म्याच्या दुःखाचा उपशम द्वैतरूपी प्रपंचाचा नाश झाला असतां मात्र होऊन त्याला स्वस्थता म्हणजे स्वरूपाची स्थिति प्राप्त होते; म्हणून अद्वैतनिश्चय करून 'मी अद्वैत आहे' अशी भावना करून देणें, हें शास्त्राचें **प्रयोजन** आहे. आतां, द्वैत-भावनेनें निर्माण केलेला प्रपंच अविद्येनें (अज्ञानानें) किंवा मायेनें उत्पन्न झालेला असतो. व त्याचा नाश विद्येनें म्हणजे ब्रह्म आणि जीवात्मा यांचें एकत्व प्रतिपादन करणाऱ्या शास्त्रानें होतो. असें आहे, म्हणून ब्रह्मविद्येचें प्रकाशन करण्यासाठीं या प्रकरणानें आरंभ करितों, असें श्रुति म्हणते.

(येथें जीवात्म्याची नित्य असणारी आत्मस्थिति अज्ञानानें नाहींशी झाली आहे, असा भास होत असतो. हें उत्पन्न झालेलें अज्ञान नाहींसें करून पूर्वीच्या स्वरूप-स्थितीचें ज्ञान निरावृत करावयाचें असतें. सारांश, येथें नवीन स्थिति उत्पन्न करावयाची नाहीं. जीवांस प्राप्त झालेलें अज्ञान नाहींसें करावयाचें आहे. आणि हें ज्ञानाचें आविष्करण अज्ञानाच्या निरसनानें होतें, हें तात्पर्य होय.)

सिद्धान्ती—म्हटलें आहे. "जेथें द्वैत आहे, असा भास असतो, जेथें दुसरा पदार्थ आहे, असें मिथ्या ज्ञान होतें, तेथें एक दुसऱ्याला पाहील, एकाला दुसऱ्याचें ज्ञान होईल, पण जेथें सर्वत्र आत्मस्वरूपाचें सर्वव्यापित्व असतें, सर्वत्र ब्रह्म दिसतें, तेथें कोण कोणाला पाहील, किंवा कोणाचें ज्ञान कोणाला होईल ?"

अर्थात् आत्मस्वरूपाचा साक्षात्कार झाला असतां, अज्ञानानें उत्पन्न झालेलें द्वैत आणि द्वैतापासून निर्माण होणारें दुःख या सर्वांचा नाश श्रुतीच्या अर्थानें म्हणजे विचारशुद्ध ब्रह्मात्मैक्यज्ञानानें होतो. सारांश, आपला पुरुषार्थ या व अन्य श्रुतींनीं सिद्ध होतो. श्रुतीचा विचार शास्त्र करितें; म्हणून शास्त्रही प्रयोजनवत् होतें. म्हणजे शास्त्राचें प्रयोजनत्व सिद्ध होतें. या प्रमाणें ब्रह्म हा विषय, अज्ञानाचा निरास निर्मळ मनानें करूं इच्छिणारा तो अधिकारी, मोक्ष हें फल आणि मोक्ष मिळविणें आणि मोक्ष देणें हा संबंध, असें अनुबंधचतुष्टय सिद्ध होतें.

तत्र तावदोंकारनिर्णयाय प्रथमं प्रकरणमागमप्रधानमात्मतत्त्व-प्रतिपत्त्युपायभूतम्। यस्य द्वैतप्रपञ्चस्योऽपशमेऽद्वैतप्रतिपत्ती रज्ज्वा-मिव सर्पादिविकल्पोपशमे रज्जुतत्त्वप्रतिपत्तिः। तस्य द्वैतस्य हेतुतो वैतथ्यप्रतिपादनाय द्वितीयं प्रकरणम्। तथाऽद्वैतस्यापि वैत-थ्यप्रसङ्गप्राप्तौ युक्तितस्तथात्वदर्शनाय तृतीयं प्रकरणम्। अद्वैतस्य तथात्वप्रतिपत्तिप्रतिपक्षभूतानि यानि वादान्तराण्यवैदिकानि तेषाम-न्योन्यविरोधित्वादतथार्थत्वेन तदुपपत्तिभिरेव निराकरणाय चतुर्थं प्रकरणम्।

सिद्धान्ती—या शास्त्रांतील पहिल्या* प्रकरणांत ओंकारस्वरूपाचा निर्णय श्रुति-वाक्यांच्या आधारें केला आहे. कारण ॐकाराचा, प्रणवाचा स्वरूपनिर्णय हा आत्म-तत्त्वाचें ज्ञान (प्राप्ति) करून देणारा एक उत्तम उपाय आहे. तसेंच, पहिल्या प्रकरणाचा मुख्य आधार श्रुति हा आहे. सारांश, पहिलें प्रकरण श्रुतिप्रधान असून आत्मतत्त्व-प्राप्तीचें साधन जो ॐकार त्याच्या स्वरूपनिर्णयांत समाप्त झालें आहे. नंतर, दुसऱ्या प्रकरणांत द्वैत आणि द्वैतप्रपंच हीं उभयतां अयथार्थ आहेत, असें सकारण व युक्तिद्वारा सिद्ध केलें आहे. पहा कीं, रज्जूचे ठिकाणीं सर्पाची भ्रांति केव्हां केव्हां होते. ती भ्रांति दीपप्रकाशानें नाहींशी झाली असतां, रज्जूच्या स्वरूपाचें ज्ञान होतें, हें सर्वांस ठाऊक आहे. त्याचप्रमाणें द्वैतानें उत्पन्न केलेल्या प्रपंच्याचा निरास ब्रह्मज्ञानानें झाला असतां, अद्वैताचें मूलस्वरूप प्रकट होतें, आणि द्वैत मिथ्या आहे, असें कळतें. या प्रमाणें द्वैताचें मिथ्यात्व हेतुद्वारा स्थापन करण्यासाठीं दुसऱ्या प्रकरणाची योजना आहे. येथील तिसऱ्या प्रकरणांत असा विषय आहे कीं, 'अद्वैत हेंही अयथार्थ आहे किंवा कसें ?' या शंकेचा निरास करून अद्वैत हीच वस्तु निराबाध सत्य आहे, असे न्यायानें म्हणजे युक्तीनें सिद्ध केलें आहे. आणि चौथ्या प्रकरणांत अद्वैताच्या यथार्थत्वाविरुद्ध जे जे प्रतिपक्ष उत्पन्न होतात, जे जे अवैदिक (वेदविरोधी) वादप्रतिवाद उत्पन्न होतात, ते ते सर्व परस्परांशीं विरोध करणारे आहेत, आणि म्हणून ते सर्वही अयथार्थ आहेत, असें सोपपत्तिक रीतीनें दाखवून देऊन, त्या सर्वांचें, सर्व द्वैतप्रतिपक्षांचें, निरा-करण केलें आहे. (या प्रमाणें या माण्डूक्य उपनिषदांतर्गत श्रीमद्गौडपादकृत चारी प्रकरणांची व्यवस्था आहे. पहिलें प्रकरण श्रुतिप्रधान असून आत्मवस्तु स्पष्ट दाखवितें, दुसरें प्रकरण अनात्म वस्तूचें अयथार्थत्व युक्तितः सिद्ध करितें, तिसरें प्रकरण अद्वैताचें यथार्थत्व स्पष्ट करून देतें, आणि चवथें प्रकरण अवैदिक मतमतांतरांची अयथार्थता संस्थापित करितें.)

कथं पुनरोंकारनिर्णय आत्मतत्त्वप्रतिपत्त्युपायत्वं प्रतिपद्यत इति। उच्यते। "ओमित्येतत्"। "एतदालम्बनम्"। "एतद्वै सत्य-काम" "ओमित्यात्मानं युञ्जीत"। "ओमिति ब्रह्म" "ओं-कार एवेदं सर्वम्" इत्यादिश्रुतिभ्यः। रज्ज्वादिरिव सर्पादिविक-ल्पस्याऽऽस्पदोऽद्वय आत्मा परमार्थः सन्प्राणादिविकल्पस्याऽऽस्पदो यथा तथा सर्वोऽपि वाक्प्रपञ्चः प्राणाद्यात्मविकल्पाविषय ओं-कार एव।

---

*श्रीमद्गौडपादाचार्यांनीं आपल्या कारिकांचीं चार प्रकरणें केलीं आहेत, त्यांस अनुसरून हा प्रास्ताविक विचार आहे.

सिद्धान्ती—आतां प्रथमच अशी शंका उत्पन्न होण्याचा संभव आहे कीं, 'ओंकार-स्वरूपाचा निर्णय झाला असतां, तो आत्मतत्त्वप्राप्तीचें साधन कसा होतो ? ओंकार-स्वरूपाच्या निर्णयानें ब्रह्मात्मधी (ब्रह्म आणि आत्मा हीं एकच आहेत असें ज्ञान) कशी उत्पन्न व्हावी ? एका वस्तूचें यथार्थ ज्ञान झालें, म्हणून त्या ज्ञानानें दुसऱ्या वस्तूचें यथाभूत ज्ञान आपल्यास होत नाहीं. सारांश, येथें ओंकारज्ञान आणि आत्म-ज्ञान यांचा साध्यसाधन संबंध आहे, असें सिद्ध होणें शक्य नाहीं. किंवा आत्मज्ञान हें ओंकारज्ञानाचें फलही नाहीं,' यावर आमचें म्हणणें असें आहे कीं, आम्हीं ओंकारस्वरूपाचा निर्णय आत्मस्वरूपाची प्राप्ति करून देतो, असें म्हटलें आहे, तें अनुमानाच्या जोरावर म्हटलें नाहीं. आमचें म्हणणें श्रुतींच्या आधारावर आहे. श्रुति हा आमचा बळकट पुरावा आहे. म्हणून आम्हांस व्याप्ति-मूलक साहचर्याचा अथवा कार्यकारणसंबंधाचा विचार करण्याचें कारण नाहीं. प्रत्यक्ष श्रुतिमाता आमच्या म्हणण्यास आधार आहे. " ओंकार हें सर्व आहे " ' ओंकार श्रेष्ठ आलंबन आहे. ' ' हे सत्यकाम ! ओंकार अपर ब्रह्माचें व परब्रह्माचें प्रतीक व वाचक आहे.' ' ओंकार आत्मस्वरूप आहे, असें समजून ध्यानमूलक योगाभ्यास करावा. ' 'ओंकार हें ब्रह्म आहे.' ' सर्व कांहीं ओंकार मात्र आहे.' इत्यादि अनेक श्रुती आमच्या म्हणण्याचें समर्थन करितात आणि ओंकारज्ञानानें ब्रह्मज्ञान होतें, असें सांगतात. सारांश ओंकाराचें ज्ञान होणें, हा ब्रह्मज्ञानप्राप्तीचा उपाय आहे, असें श्रुतिद्वारां सिद्ध होतें. तसेंच सर्प, रजत् इत्यादि भ्रांतिगतज्ञानाचें अधिष्ठान रज्जु, शुक्ति इत्यादिकांचें ज्ञान असतें, **रज्जु आहे** म्हणून रज्जूवर **सर्पाची भ्रांति** होते, सर्पभ्रांतीचे अधिष्ठान रज्जु असते; ह्या प्रमाणें आत्मा हा परमार्थ असून (सत्यस्वरूप असून) प्राणादि-सारख्या उत्पन्न होणाऱ्या भ्रांतींचें अधिष्ठान असतो, आत्मस्वरूपावर प्राणादिकांची भ्रांति होते. पण रज्जूप्रमाणें आत्मवस्तु सत्य असते आणि तिच्यावर प्राणादिकांचा आरोप होतो. आतां या आरोपांचें अधिष्ठान जसा आत्मा असतो त्याचप्रमाणें ओंकार हा सर्व वाक्प्रपंचाचें अधिष्ठान आहे. आपला हा सर्व वाक्प्रपंच ॐकारात्मक असतो. आपली ही सर्व नामरूपात्मक सृष्टि म्हणजे आत्म्यावर झालेल्या प्राणादिभ्रांतींची सृष्टि, म्हणजे वाक्प्रपंचाचा तात्पर्यतः ओंकाराचा अभिधेय विषय असतो. सारांश, आत्मस्वरूपावर जसा प्राणादि मिथ्यावस्तूंचा आरोप होतो, तसाच ॐकाररूपी अधिष्ठानावर नामरूप वाक्प्रपंचाचा आरोप होत असतो. हें पूर्वोक्त श्रुतींचें सांगणें आहे. तात्पर्य, आत्मस्वरूप आणि ओंकारस्वरूप हीं परमार्थतः एकच आहेत, असें श्रुती म्हणतात, म्हणून ओंकारस्वरूपाचें ज्ञान हें आत्मस्वरूपाचें ज्ञान करून देतें.

स चाऽऽत्मस्वरूपमेव । तदभिधायकत्वात् । ओंकारविकारशब्दा-
भिधेयश्च सर्वः प्राणादि[illegible]ल्पोऽभिधानव्यतिरेकेण नास्ति ।

" वाचारम्भणं विकारो नामधेयं " " तदस्येदं वाचा तन्त्या नाम-भिर्दामभिः सर्वं सितम् " । "सर्वं हीदं नामनि" इत्यादिश्रुतिभ्यः ।

सिद्धा०-यावरून हें सिद्ध झाले कीं, सर्व नामस्वरूपात्मक सृष्टीचें आधिष्ठान आत्मरूप आहे, तसेंच ओंकारस्वरूपही वाक्प्रपंचाचें (नामजातीचें) अधिष्ठान आहे. हीं स्वरूपें परस्पर भिन्न नसून एकात्मक आहेत. ओंकार म्हणजेच आत्मा. कारण ओंकार हें आत्म्याचें नांव आहे. आणि आत्मस्वरूपावर प्राणादिकांचे जे जे कांहीं आरोप होतात त्या सर्वांची नामें म्हटलीं म्हणजे ओंकारशब्दापासून विकृत झालेल्या सर्व शब्दांचीं स्वरूपें होत. आत्मस्वरूपाचा वाचक ॐकार आहे. त्याप्रमाणें आत्मस्वरूपावर होणारे सर्व आरोपाचे वाचक शब्द म्हणजे ओंकारापासून निर्माण झालेले सर्व विकृत शब्द होत. सारांश, आत्मस्वरूपाचें नांव ओंकार, आणि आत्मस्वरूपावर झालेल्या प्राणादि आरोपांचे वाचक शब्द म्हणजे ओंकाराची निरनिराळीं विकृत स्वरूपें होत. नांव नांहीं, असा आत्म्याचा विकल्पच नाहीं. असो; अनेक श्रुती आम्ही म्हणतो याला प्रमाण आहेत. " या प्रपंचामध्यें भासमान होणारे सर्व पदार्थ नाममात्र आहेत. शब्दापलीकडे त्यांत परमार्थतत्त्व असें कांहीं नाहीं." " हा ब्रह्मस्वरूपावर भासमान होणारा सर्व प्रपंच ओंकाररूपी-ब्रह्मवाचक वाणीरूपी-तंतूपासून उत्पन्न झालेल्या नामरूपी जाळ्यांनीं बांधून टाकलेला आहे. " " हें सर्व प्रपंच-दर्शन नाममात्र आहे. " या सर्व श्रुतींचा अभिप्राय एकच आहे.

(हा सर्व प्रपंच विवर्तरूप आहे, भ्रांतिरूप आहे. आणि याचें अधिष्ठान ब्रह्म आहे. या प्रपंचांत जीं अनंत नामरूपें दिसतात, तीं सर्व ब्रह्मवाचक ओंकाराचें विकार आहेत. सारांश, ब्रह्म म्हणजे ओंकार, आणि हा सर्व प्रपंच म्हणजे ओंकाराचीं निरनिराळीं विकृतरूपें होत, म्हणून ओंकाराचें ज्ञान झालें असतां ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान होतें, असें श्रुतीचें सांगणें आहे.)

अत आह—

सिद्धान्ती—म्हणून पहिल्या मंत्राचा अवतार करून श्रुति म्हणते—

मंत्र पहिला.

हरिः ॐ । ओमित्येतदक्षरमिदꣳ सर्वं तस्योपव्याख्यानं भूतं भवद्भविष्यदिति सर्वमोंकार एव । यच्चान्यत्त्रिकालातीतं तदप्योंकार एव ॥ १ ॥

अन्वय व अर्थः—ॐ इति एतत् अक्षरं (ॐ हें अक्षर, हें परब्रह्म आहे) इदं सर्वं तस्य उपव्याख्यानं; भूतं, भवत्, भविष्यत् इति सर्वं

ओंकारः एव (हें सर्व दृश्य विश्व त्याचें उपव्याख्यान आहे, सर्व भूत, भविष्य, वर्तमान जें कांहीं आहे तें सर्व ओंकार हेंच आहे.) **यत् च अन्यत् त्रिकालातीतं, तत् अपि ओंकारः एव** (जें कांहीं दुसरें त्रिकालाच्या पलीकडे आहे, तें सर्वही ओंकारमात्र आहे.) ॥ १ ॥

सारांश, विश्वांतील सर्व पदार्थ म्हणजे तिन्ही कालांत असणारे व त्रिकालाच्याही पलीकडे असणारे सर्व मूर्तामूर्त पदार्थ ओंकाररूपी आहेत ॥ १ ॥

ओमित्येतदक्षरमिदं सर्वमिति। यदिदमर्थजातमभिधेयभूतं तस्याभिधानाव्यतिरेकात्। अभिधानस्य ओंकाराव्यतिरेकादोंकार एवेदं सर्वम्। परं च ब्रह्माभिधानाभिधेयोपायपूर्वकमेव गम्यत इत्योंकार एव। तस्यैतस्य परापरब्रह्मरूपस्याक्षरस्योमित्येतस्योपव्याख्यानम्। ब्रह्मप्रतिपत्त्युपायत्वाद्ब्रह्मसमीपतया विस्पष्टं प्रकथनमुपव्याख्यानं प्रस्तुतं वेदितव्यमिति वाक्यशेषः। भूतं भवद्भविष्यदिति कालत्रयपरिच्छेद्यं यत्तदप्योंकार एवोक्तन्यायतः। यच्चान्यत्त्रिकालातीतं कार्याधिगम्यं कालापरिच्छेद्यमव्याकृतादि तदप्योंकार एव ॥ १ ॥

सिद्धान्तीः—विश्वामध्यें जें सर्व कांहीं दिसत भासत आहे तें सर्व ओंकारात्मक आहे, असा मंत्रारंभ आहे. ओंकार हा अक्षर म्हणजे अविनाशी आहे व तोच परमात्मा आहे. कारण, जो जो पदार्थ नाम-ग्रहण करण्यास योग्य आहे, त्याचा व त्याच्या नांवाचा नित्य संबंध असतो. म्हणजे पदार्थ व त्यांचें नांव हीं दोन्हीं साहचर्यानें राहतात. त्यांचा वियोग केव्हांही होत नाहीं. पुनः ओंकाराचा विकार असणारें नाम आणि ओंकार यांची सहचारिता नित्य आहे. म्हणून वाच्यपदार्थ आणि ॐकारवाचक नामें हीं सर्व ॐकाराभिन्न व ओंकारस्वरूपी आहेत. इतकेंच काय, पण परब्रह्मसुद्धां ज्या वेळीं परोक्षतः ज्ञात होतें, त्या वेळीं कोणत्या तरी नामानें मात्र तें अवगत होतें, म्हणून परब्रह्मही नामग्रहण करण्यास योग्य असतें! तसेंच नाम असणाऱ्या पदार्थांची व त्याच्या नामाची व्याप्ति अखंड आहे. म्हणून परब्रह्मही ओंकारात्मक होतें. अर्थात् हें परब्रह्म म्हणचे विश्वाचें अधिष्ठान असणारें ब्रह्म होय. सारांश, वाचकब्रह्म ओंकाररूपी असल्यामुळें लक्ष्यब्रह्मही ओंकाराच्या साहाय्यानें लक्षित होतें. तात्पर्य, वाणीच्या पलीकडे जें ज्ञानस्वरूप ब्रह्म आहे, तें मात्र ओंकारस्वरूपानें किंवा ओंकारनामानें गोचर होत नाहीं, हें खरें; तरी तें चिन्मात्र परब्रह्म ॐकारध्यानानें लक्षित होतें. पहा कीं, झाडाच्या फांदीवर चंद्र आहे, असें जसें आपण लक्षणेनें चंद्रज्ञान करून देतों घेतों, तसाच ओंकार हा ब्रह्मस्वरूपाचा लक्षक होतो. याप्रमाणें सर्व ॐकार आहे, हें ठरलें. असो; पर आणि

अपर ब्रह्मस्वरूपाचा-अविनाशी ब्रह्मस्वरूपाचा-ओंकार हा जो वाचक शब्द आहे, तोच पर व अपर ब्रह्माचें उत्तम उपव्याख्यान आहे. हें उपव्याख्यान समजून देण्यासाठीं श्रुति म्हणते.—

शिष्यः—उपव्याख्यान म्हणजे विशेष स्पष्टीकरण करून पदार्थाचें विस्तृत स्वरूप-वर्णन होय?

सिद्धांती—होय. ओंकार हा ब्रह्मस्वरूपाचा निकटवर्ती असणारा पदार्थ असल्यामुळें तो ब्रह्मज्ञानाचा म्हणजे ब्रह्मप्राप्तीचा उत्तम उपाय असतो. सारांश ओंकार हा ब्रह्मप्राप्तीचें उत्तम साधन असल्यामुळें ओंकाराचें स्वरूप उत्तम रीतीनें समजून घेणें प्रस्तुतप्रसंगीं योग्यच आहे. मागे जो न्याय सांगितला, जें प्रमाणसिद्ध व्याख्यान केलें, त्यावरून हें स्पष्ट होतें कीं, भूत-भविष्य-वर्तमानकालीं (तिन्ही कालांत) जे जे वाच्य पदार्थ असतात व दिसतात, त्या सर्वांचे वाचक ओंकारस्वरूपी आहेत व असले पाहिजेत. त्याचप्रमाणें त्रिकालाच्या पलीकडे जें कांहीं आहे, जें त्रिकालातीत आहे आणि कार्या-वरूनच मात्र ज्याची कल्पना करितां येते, त्या अव्याकृत, प्रधान वस्तु आणि इतर कालातीत वस्तुही ओंकारात्मक आहेत. सारांश, कालास गोचर असणाऱ्या व गोचर नसणाऱ्या सर्व वाच्य वस्तु ओंकारस्वरूपाच्या, ॐकारोत्पन्न शब्दात्मक, वाचक-स्वरूपाच्या आहेत. ॥ १ ॥

रंगरामानुज—अखिल दुःखाची निवृत्ति होऊन परम आनंदाची प्राप्ति व्हावी एतदर्थ समस्त आणि व्यस्त प्रणवाची उपासना सांगण्यासाठीं या उपनिषदाची योजना आहे. ब्रह्माला ॐ म्हणतात, याचें कारण सर्व चिदचित्प्रपंच अक्षर ब्रह्मामध्यें ओतलेला आहे. अक्षर=तिन्हीकाळीं एकस्वरूप असतें तें. व्याख्यान=विशेषणपूर्वक नाम कथन करणें. उपव्याख्यान=योग्य व्याख्यान. जें सर्व ओंस्वरूपी आहे तें ॐ आहे, दुसरें नाही. जें त्रिकालातीत आहे, तेंही ओंकार आहे, ॐकार हें ज्याचें वाचक नाम आहे, त्याचें नांव 'अक्षर' आहे. तें पूर्ण ब्रह्म आहे. ब्रह्म आत्मा आहे, कारण तो ब्रह्मादिस्तंबपर्यंत सर्वांचें आदान (ग्रहण) करितो व सर्वांचें नियमन करितो. दुसऱ्या मंत्रांत समस्त ॐकाराची उपासना सांगितली. तसेंच, त्याचे चार अंश आहेत, आणि प्रत्येक जीवाचें नियमन आत्मा आपल्या चार अंशांनीं प्रत्येकाच्या देहांत राहून करितो, असें सुचविलें.

अभिधानाभिधेययोरेकत्वेऽप्यभिधानप्राधान्येन निर्देशः कृतः । ओमित्येतदक्षरमिदं सर्वमित्याद्यभिधानप्राधान्येन निर्दिष्टस्य पुनरभिधेयप्राधान्येन निर्देशोऽभिधानाभिधेययोरेकत्वप्रतिपत्त्यर्थः । इतरथा ह्यभिधानतन्त्राभिधेयप्रतिपत्तिरित्यभिधेयस्याभिधानत्वं गौणमित्याशङ्का स्यात् । एकत्वप्रतिपत्तेश्च प्रयोजनमभिधानाभिधेययोरेके-

नैव प्रयत्नेन युगपत्प्रविलापयंस्तद्विलक्षणं ब्रह्म प्रतिपद्येतेति । तथा च वक्ष्यति—" पादा मात्रा मात्राश्च पादाः " इति । तदाह—

सिद्धान्ती–मागच्या मंत्रांत नाम आणि नाम असणारी वस्तु, ह्या दोन्ही एकस्वरूपी आहेत, असें सांगितलें; तथापि तेथें नामप्राधान्यानें (नाम हीच प्रधान वस्तु आहे, अशा स्वरूपानें) या एकत्वाचा निर्देश झाला आहे. म्हणजे हें सर्व कांहीं दिसणारें व न दिसणारें पदार्थजात ओंकारात्मक आहे, असा नामप्राधान्यानें मात्र निर्देश केला आहे; पण या निर्देशानें वाच्यवाचकांचें एकत्व एकदेशी होतें; म्हणून या दुसऱ्या मंत्रांत अभिधेयप्राधान्यानें (नाम ग्रहण करण्यास योग्य असणारी वस्तु प्रधान आहे असें समजून) ओंकाराचा निर्देश केला. हेतु हा आहे कीं, वाच्य आणि वाचक यांमध्यें असणारें एकत्व स्पष्ट प्रतीतीला यावें. असें केलें नाहीं तर (वाच्य आणि वाचक हीं दोन्हीं एका योग्यतेचीं आहेत, असें सांगितलें नाहीं तर) वाचक शब्दाच्या तंत्रानें मात्र वाच्य वस्तूचें ज्ञान होतें, असें होऊन एकत्वाला गौणत्व प्राप्त होईल. वाचक शब्दाचें (साधनाचें) व वाच्यवस्तूचें (साध्यवस्तूचें) एकत्व क्रमी योग्यतेचें आहे, अशी शंका प्राप्त होईल ! म्हणून श्रुतीनें या मंत्रांत वाच्यप्रधानत्वानें ओंकाराचा निर्देश केला आहे. वर सांगितल्याप्रमाणें हेतु हा आहे कीं, वाच्यवाचकांचें एकत्व अथवा तादात्म्य स्पष्ट प्रतीत व्हावें. हें तादात्म्य स्पष्ट झालें म्हणजे, एकप्रयत्नानें (एकदम) वाच्यवाचकांचा प्रविलाप करितां येऊन (वाच्यवाचकांचा निरास एकदम करितां येऊन) त्यांच्याहून विलक्षण असणारें जें ब्रह्म, त्याची प्राप्ति सहज होईल. उघड आहे कीं, वाच्याचा निरास आणि वाचकाचा निरास असे दोन निरास करण्याचे परिश्रम होण्याचे ऐवजीं वाच्य–वाचक एकात्मक आहेत, असें समजलें म्हणजे–उभयतांचा निरास एकदम करण्याचें कार्य लीलेनें सिद्ध होतें; आणि या उभयतांहून निराळें असणारें ब्रह्म प्रतीत होतें. हाच अभिप्राय मनांत आणून पुढेंही श्रुति असें सांगेल कीं, 'आत्म्याचें चरण ह्या ॐकारमात्रा आहेत, आणि ॐकारमात्रा ही आत्म्याचे चरण आहेत.' सारांश, मात्रा आणि चरण एकरूप व एकच आहेत, असें श्रुति पुढें सांगणारच आहे. असो; श्रुति म्हणत आहे कीं,—

मंत्र दुसरा.

सर्वं ह्येतद्ब्रह्मायमात्मा ब्रह्म सोऽयमात्मा चतुष्पात् ॥ २ ॥

अन्वय व अर्थः—एतत् हि सर्वं ब्रह्म (हें सर्व ब्रह्म आहे.) अयं आत्मा ब्रह्म (जीवात्मा ब्रह्म आहे) सः अयं आत्मा चतुष्पात् (तो हा आत्मा चार पायांचा आहे.) ॥ २ ॥

सारांश, हें सर्व विश्व आणि त्याला पाहणारा जीवात्मा ब्रह्मरूप असून त्याला चार पाय असतात. हा वाच्यप्रधान निर्देश होय. ॥ २ ॥

सर्वं ह्येतद्ब्रह्मेति । सर्वं यदुक्तमोंकारमात्रमिति तदेतद्ब्रह्म । तच्च ब्रह्म परोक्षाभिहितं प्रत्यक्षतो विशेषेण निर्दिशति । अयमात्मा ब्रह्मेति । अयमिति चतुष्पात्त्वेन प्रविभज्यमानं प्रत्यगात्मतयाऽभिनयेन निर्दिशति । अयमात्मेति । सोऽयमात्मोंकाराभिधेयः परापरत्वेन व्यवस्थितश्चतुष्पात्कार्षापणवन्न गौरिवेति । त्रयाणां विश्वादीनां पूर्वपूर्वप्रविलापनेन तुरीयस्य प्रातिपत्तिरिति करणसाधनः पादशब्दः । तुरीयस्य पद्यत इति कर्मसाधनः पादशब्दः ॥ २ ॥

सिद्धांती–सर्व कार्य आणि कारण ब्रह्मरूप आहे. यच्च यावत् कार्यें ब्रह्म आणि कारणें ब्रह्मरूप असतात.कारण मागें जें जें कांहीं ओंकारात्मक म्हणून सांगितलें आहे, तें तें परब्रह्मरूप आहे. आतां कोणी असें म्हणेल कीं, पहिल्या मंत्रांत व येथें ब्रह्माचें कथन परोक्ष झालें. प्रत्यक्ष झालें नाहीं. ही शंका निवारण करण्यासाठीं श्रुति ब्रह्माचा प्रत्यक्ष निर्देश विशेषतः करून सांगते कीं, हा आत्माही ब्रह्म आहे. ज्याला पुढे चार पाय आहेत,असें सांगावयाचें आहे. आत्म्याला चार पाय आहेत असें ज्या आत्म्याचें विभाजन करावयाचें आहे.—त्याचे भाग सांगावयाचें आहेत.—त्या प्रत्यगात्मद्वारा परमात्म्याचा निर्देश श्रुति 'हा' या समीपदर्शक सर्वनामानें करीत आहे.–आपण छातीस हात लावून " हा मी " असा आपल्या स्वतःच्या संबंधानें निर्देश करितों, त्याप्रमाणें ' हा ' या सर्वनामाचा उपयोग करून श्रुतीनें जीवात्म्याच्या द्वारें ' हा आत्मा ' असा निर्देश केला आहे.–या आत्म्याचें ही ओंकारनामानें ग्रहण होतें. हा आत्मा पर आणि अपर (श्रेष्ठ आणि कनिष्ठ) अशा स्वरूपाचा असतो. याला चार पाय आहेत; पण हे गायीला चार पाय वास्तविक असतात, त्या प्रकारचे पाय नव्हेत. तर कार्षापण या नांवाचें जें एक नाणें असेंतें, त्याच्या संबंधानें 'चार अंश' आहेत, असें आपण म्हणतों, तसे हे आत्म्याचे चार पाय असतात.

शिष्य—पाद (पाय) म्हणजे ?

सिद्धान्ती—पुढें श्रुति विश्व, तैजस आणि प्राज्ञ या आभासिक आत्म्यांचा उल्लेख करणार आहे. तो अशा करितां कीं, विश्वाचा लय तैजसांत, तैजसाचा प्राज्ञांत करून तुरीय जो आत्मा त्याची प्राप्ति व्हावी. असा हेतु मनांत आणून श्रुतीनें पाद शब्दाची योजना केली आहे. पाद म्हणजे करण, साधन, होत. कारण, त्याच्या योगानें तुरीय ब्रह्माची प्राप्ति होते. ब्रह्मप्राप्तीचें करण म्हणजे पाद होय. कुंभकाराचा दांडा हें जसें करण (हत्यार) त्याप्रमाणें पाद हें ब्रह्मप्राप्तीचें हत्यार होय. यांच्या-योगानें ब्रह्मप्राप्ति होते; पण तुरीय ब्रह्माचीही पादामध्यें गणना आहे; म्हणून तुरीय

हेंही एक करण होईल ! अशी शंका मनांत आणून पाद म्हणजे तुरीयाकडे नेणारें कर्म-साधन असा अर्थ आचार्यांनीं केला आहे. तात्पर्य पद म्हणजे विश्व, तैजस, प्राज्ञ व तुरीय हे विभाग होत. हे विभाग आभासिक आहेत, वास्तविक नाहींत. ॥ २ ॥

माध्व—हें उपनिषद् म्हणजे मंडूकरूपी वरुणानें गाइलेली नारायणाची स्तुति आहे, असें पद्मपुराणांत स्पष्ट म्हटलें आहे. अर्थात् येथें जीवस्वरूपाचें वर्णन करण्याचा संबंध नाहीं. सर्व जगत् ओत म्हणजे प्रविष्ट झालें आहे परमेश्वरामध्यें, म्हणून तो ॐ होय, असो; ॐकारानें प्रतिपाद्य असणारें जें अक्षरब्रह्म तें गुणपूर्तीनें मात्र सर्व आहे. तें सर्व आहे, किंवा सर्व ब्रह्म आहे, असें सांगण्याचा अभिप्राय नाहीं, तर तें सर्व-गुण-संपन्न आहे, असें सांगावयाचें आहे. तिन्ही काळीं हरी हा एकरूप, असून नित्य आहे. तोच एक पूर्ण व त्रिकालातीत आहे, दुसरें कोणी नाहीं. विशेषणें सांगून जें वर्णन असतें, तें व्याख्यान होय. पूर्णत्व व एक-रूपत्व हीं ॐकाराला जोडविशेषणें देणें व त्याचें वाचकत्व सार्थ करणें हें उपव्याख्यान होय. पूर्णत्वानें जीवाचा व एकरूपत्वानें जडप्रकृति, (अचेतनप्रकृति) यांचा निरास होतो. सर्व=गुणपूर्ण. हा हरि रमा, ब्रह्मा, रुद्र इत्यादि सर्व चेतनांचा आत्मा आहे. याप्रमाणें सर्व गुण परिपूर्ण असें हें ब्रह्म तिन्ही कालीं एकरूप म्हणजे निर्विकार आहे. सारांश, प्रणवप्रतिपाद्य जें अक्षरब्रह्म तें सर्व-गुण-पूर्ण आहे. ॐकार त्याचा वाचक आहे; कारण तो तिन्ही कालीं एकरूप आहे. ॐ=ॐकारवाच्य ब्रह्म. तेंच पूर्ण आहे. इतर श्रुतींचाही हाच अभिप्राय आहे. शिवाय, ब्रह्मादि देवांचा कोणी तरी आत्मा हवा. अनुमानानें ठरतें कीं परब्रह्म हा सर्वात्मा होय.

कथं चतुष्पात्त्वमित्याह—

सिद्धान्ती—अवयवशून्य आत्म्याला चार पाद आहेत, असें श्रुति म्हणते, हें कसें ? अवयवशून्याला अवयव कसे ? अशी शंका येईल, म्हणून म्हणतात.—

मंत्र तिसरा.

जागरितस्थानो बहिष्प्रज्ञः सप्ताङ्ग एकोनविंश-तिमुखः स्थूलभुग्वैश्वानरः प्रथमः पादः ॥ ३ ॥

अन्वय व अर्थः—**जागरितस्थानः, बहिष्प्रज्ञः, सप्ताङ्गः, एकोनविंशतिमुखः, स्थूलभुक्, वैश्वानरः प्रथमः पादः** (ज्याचें स्थान जागरित अवस्था हें आहे, ज्याची प्रज्ञा बाहेरील विषय बघते; ज्याला सात अंगें आहेत; ज्याला एकोणीस मुखें आहेत; जो स्थूलवस्तूंचें भक्षण करितो, तो वैश्वानर म्हणजे आत्म्याचा प्रथम पाद, आहे) ॥ ३ ॥

जागरितं स्थानमस्येति जागरितस्थानः । बहिष्प्रज्ञः स्वात्मव्यतिरिक्ते विषये प्रज्ञा यस्य स बहिष्प्रज्ञो बहिर्विषयेव प्रज्ञाऽविद्याकृताऽवभासत इत्यर्थः । तथा सप्ताङ्गान्यस्य " तस्य ह वा एतस्याऽऽत्मनो वैश्वानरस्य मूर्धैव सुतेजाश्चक्षुर्विश्वरूपः प्राणः पृथग्वर्त्मात्मा संदेहो बहुलो बस्तिरेव रयिः पृथिव्येव पादौ " इत्यग्निहोत्रकल्पनाशेषत्वेनाऽऽहवनीयोऽग्निरस्य मुखत्वेनोक्त इत्येवं सप्ताङ्गानि यस्य स सप्ताङ्गः । तथैकोनविंशतिर्मुखान्यस्य बुद्धीन्द्रियाणि कर्मेन्द्रियाणि च दश वायवश्च प्राणादयः पञ्च मनो बुद्धिरहंकारश्चित्तमिति मुखानीव मुखानि तान्युपलब्धिद्वाराणीत्यर्थः । स एवंविशिष्टो वैश्वानरो यथोक्तैर्द्वारैः शब्दादीन्स्थूलान्विषयान्भुङ्क्त इति स्थूलभुक् । विश्वेषां नराणामनेकधा नयनाद्वैश्वानरः । यद्वा विश्वश्चासौ नरश्चेति विश्वानरो विश्वानर एव वैश्वानरः । सर्वपिण्डात्मानन्यत्वात्स प्रथमः पादः । एतत्पूर्वकत्वादुत्तरपादाधिगमस्य प्राथम्यमस्य ।

सिद्धांती–ज्याचा विषय अथवा स्थान (अभिमान) जागृत अवस्था हा आहे, तो जागृत अवस्थेचा अभिमानी होय. आत्मव्यतिरिक्त जे बाह्य विषय आहेत, ते ग्रहण करण्याविषयीं मात्र ज्याची प्रज्ञा समर्थ आहे, तो बहिष्प्रज्ञ होय, वस्तुतः पाहिलें असतां बाहेरचे विषय परमार्थतः नाहींत, असा श्रुतीचा अभिप्राय आहे. म्हणून आचार्यांनीं अविद्येनें सिद्ध झालेली प्रज्ञा जणूं कांहीं परमार्थतः नसलेल्या विषयांचें, व्यावहारिक विषयांचें,ग्रहण करिते, म्हणून हे विषयग्रहण काल्पनिक अथवा प्रातिभासिक आहेत, असें सुचविण्यासाठीं ' बहिर्विषया इव (बाहेरचेच विषय जणु जिचे आहेत)' असें म्हटलें आहे. सारांश, अज्ञानकल्पित बुद्धि प्रातिभासिक (भासमान होणाऱ्या परंतु वस्तुतः न असणाऱ्या) बाह्य विषयांचें मात्र ग्रहण करिते. म्हणून बहिष्प्रज्ञ असे श्रुतीनें वैश्वानराला विशेषण दिलें आहे. त्याला सात अंगें आहेत. " त्या ह्या वैश्वानर नामक आत्म्याचें मस्तक तेजस्वी द्युलोक आहे, अनेक प्रकारचीं स्वरूपें असणारा सूर्य हा त्याचा चक्षु आहे. नानाविध मार्गांनीं संचार करणें, हा ज्याचा स्वभाव आहे, तो वायु वैश्वानराचा प्राण होय. विस्तीर्णत्व हा गुण असणारें आकाश वैश्वानराचा मध्यभाग आहे. रयि म्हणजे अन्न; त्याचा हेतु जें उदक, तें या वैश्वानराचें मूत्रस्थान आहे, आणि सर्वांस आधार देणारी पृथ्वी त्याचे दोन पाय आहेत " असें, छांदोग्यश्रुतीनें अग्निहोत्र कल्पना केली आहे, तेथें म्हटलें आहे. त्यांतील एकशेष भाग म्हणजे आहवनीय अग्नि होय, " हा अग्नि वैश्वानराचें मुख आहे. " (पहा छां० ५–१८–२). यावरून अग्नि हा वैश्वानराचें मुख होय असा भाग झाला. याप्रमाणें हीं त्यांचीं

सात अंग आहेत, असें समजावें. त्याला सप्तांग म्हणतात. तसेंच वैश्वानराला एकोणीस मुखें आहेत. तीं—पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें, पांच प्राणादि वायु, मिळून पंधरा झालीं, व मन, बुद्धि, अहंकार आणि चित्त मिळून एकोणीस होतात. हीं आत्म्याच्या उपलब्धीचीं द्वारें होतात, आत्मा प्रकट करितात, म्हणून यांना आत्म्याची जणूं कांहीं मुखेंच आहेत, असें श्रुतीनें साहजिक आलंकारिक भाषेनें म्हटलें आहे. याप्रमाणें विशिष्ट स्वरूपाचा 'वैश्वानर' आतांच सांगितलेल्या मुखांनीं शब्दादि स्थूल विषयांचा उपभोग घेतो, म्हणून ह्याला 'स्थूलभुक्' असें नांव दिलें आहे. त्याला **वैश्वानर** असें म्हणतात. कारण हा विश्व (वैश्वानर) सर्व जीवांस अनंत प्रकारानें सुखदुःखादि उपभोग तत्तत्कर्मानुसार प्राप्त करून देतो. विश्व म्हणजे सर्व, नर म्हणजे जीव (परमेश्वराच्या ताब्यांत असणारे) आहेत, म्हणून याला वैश्वानर हें नांव आहे. किंवा सर्व शरीरांत जे जीवात्मे आहेत, त्यांच्या पारमार्थिक स्वरूपाहून ज्याचें स्वरूप भिन्न नाहीं, तो विश्व, आणि असा नर तो वैश्वानर. असाही कर्मधारय समास करून अर्थ करितां येईल. याला '**पहिला** पाय' असें म्हटलें, कारण याचा पहिल्या प्रथम स्वीकार करावा, तेव्हां दुसऱ्या पादांचें ज्ञान होतें. म्हणून मात्र याला प्रथमस्थान श्रुतीनें दिलें आहे. निरास करावयाचा, तेव्हां प्रथम स्थूलभुक् वैश्वानराचा निरास करावा लागतो. म्हणून याला प्रथमत्व येतें. याप्रमाणें हा जागृतिस्थितींत असणारा, बाह्यप्रज्ञ, सप्तांगी, एकोणीस तोंडाचा, दृश्य विषयाचा भोक्ता, वैश्वानररूपी आत्मा हा प्रथम चरण आहे, असें श्रुतीचें म्हणणें आहे.

कथमयमात्मा ब्रह्मेति प्रत्यगात्मनोऽस्य चतुष्पात्त्वे प्रकृते द्युलोकादीनां मूर्धाद्यङ्गत्वमिति। नैष दोषः। सर्वस्य प्रपञ्चस्य साधिदैविकस्यानेनाऽऽत्मना चतुष्पात्त्वस्य विवक्षितत्वात्।

सिद्धान्ती—आतां 'हा आत्मा, ब्रह्म आहे' अशी प्रत्यगात्म्याच्या संबंधानें व प्रत्यगात्म्याच्या चतुष्पादत्वासंबंधानें विवादवस्तु असतां द्युलोकादि ह्या प्रत्यगात्म्याचीं मस्तकादि अंगें आहेत, असें कशाला अप्रस्तुत व्याख्यान करितां! अशी शंका येईल. 'हा जीवात्मा ब्रह्म आहे, असें दुसऱ्या मंत्रांत सांगितलें असतां, ह्या आत्म्याला द्युलोकादि विश्वांतील भाग प्रत्यगात्म्याचे अवयव होतात असें कशाला सांगतां?' पण अशी शंका येण्याचें कारण नाहीं. कारण आध्यात्मिक आणि आधिदैविक स्वरूपांमध्यें भेद नाहीं, म्हणून आधिदैविकासह सर्व आध्यात्मिक प्रपंचाचे, सर्व स्थूल-पदार्थांचे चतुष्पादत्व सांगावयाचें आहे; तें याच आत्म्याचे (विराट्, हिरण्यगर्भ, अविकृत आणि सच्चिदानंद हे आधिदैविक आत्म्याचें व वैश्वानर, तैजस, प्राज्ञ आणि तुरीय हे आध्यात्मिक आत्म्याचे कल्पित भाग होत. या आत्म्याचे) संबंधानें सांगावयाचें आहे. म्हणून द्युलोकादिकांचा मूर्धांगत्वानें उल्लेख केला आहे, तो यथायोग्यच आहे. सारांश,

मागील द्युलोकादि विषयाचा अवतार प्रस्तुत आहे, अप्रस्तुत नाहीं. स्थूल प्रपंचाचें प्रथम पादत्व विराट् व वैश्वानर स्वरूपानें सांगितलें हें तात्पर्य होय.

(शंका अशी आहे कीं, जीवात्म्याचें वर्णन चाललें असतां विराटाच्या अंगांचा विचार श्रुतीनें कसा प्रस्तुत केला. आचार्य म्हणतात, कीं हा दोष नाहीं. कारण, आध्यात्मिक जीवात्म्याचे जे चार चरण कल्पित होतात, तेच आधिदैविक आत्म्याचे होतात, हें श्रुतीला मुख्यतः सांगावयाचें आहे, आणि जीवात्म्यैक्य सिद्ध करावयाचें आहे. जीवात्म्याच्या विश्व, तैजस, प्राज्ञ व तुरीय अशा चार अवस्था असतात. तशाच आधिदैविक आत्म्याच्या विराट्, हिरण्यगर्भ, अविरुत आणि सच्चिदानंद अशा चार अवस्था असतात. म्हणून विराट् व विश्व एकच स्वरूपाचे आहेत, हें दाखविण्यासाठीं आधिदैविक स्वरूपाचा श्रुतीनें अवतार केला आहे).

एवं च सति सर्वप्रपञ्चोपशमेऽद्वैतसिद्धिः । सर्वभूतस्थश्चाऽऽत्मैको द्रष्टः स्यात् । सर्वभूतानि चाऽऽत्मनि । यस्तु सर्वाणि भूतानीत्यादिश्रुत्यर्थ उपसंहृतश्चैवं स्यात् । अन्यथा हि स्वदेहपरिच्छिन्न एव प्रत्यगात्मा सांख्यादिभिरिव द्रष्टः स्यात्तथा च सत्यद्वैतामिति श्रुतिकृतो विशेषो न स्यात् । सांख्यादिदर्शनेनाविशेषात् ।

सिद्धान्ती–असें एकत्व ज्ञान होऊन सर्व प्रपंचाचा उपशम होईल तर मात्र अद्वैताची सिद्धि होईल. आणि सर्व भूतांमध्यें राहणारा आत्मा एक व अद्वितीय आहे, असा आपण पाहिला व समजून घेतला, असें होईल. तसेंच सर्वभूतें आत्म्यामध्यें आहेत असें ही आपण पाहूं लागूं. तात्पर्य ' जो सर्वभूतें आत्म्यामध्यें आहेत,' इत्यादि श्रुतीचा अर्थ उपसंहृत केला म्हणजे असेंच तात्पर्य निघतें, असें होईल. पण, ही चतुष्पादत्वाची कल्पना घेतली नाहीं तर, ' प्रत्येक देहानें मर्यादित झालेला जीव हाच प्रतिदेहीं निराळा प्रत्यगात्मा आहे,' असें कापिलसांख्य म्हणतात, तसेंच आपल्यासही म्हणावें लागेल. एकदां ' आत्मे अनंत आहेत. ' असें सांख्याप्रमाणें आपण म्हणूं लागलों म्हणजे, अपौरुषेय श्रुतीचा विशेष जें अद्वैतज्ञान तें नाहींसें होऊन अपौरुषेय श्रुति आणि मानवी सांख्यस्मृति एकच किमतीच्या होतील; व श्रुतीच्या उपदेशाची अपेक्षा राहणार नाहीं. पण असें होणें इष्ट नाहीं.

इष्यते च सर्वोपनिषदां सर्वात्मैक्यप्रतिपादकत्वम् । अतो युक्तमेवास्याऽऽध्यात्मिकस्य पिण्डात्मनो द्युलोकाद्यङ्गत्वेन विराडात्मनाऽऽधिदैविकेनैकत्वमभिप्रेत्य सप्ताङ्गत्ववचनम् । " मूर्धा ते व्यपतिष्यत् " इत्यादिलिङ्गदर्शनाच्च ।

सिद्धान्ती—सर्व उपनिषदांमध्यें अनंत जीवांचे आत्मे एकरूपी आहेत, सर्व जीवांमध्यें एकच आत्मा वास्तव्य करीत आहे, असें स्पष्टीकरण झालें आहे. श्रुतीला

अनेक आत्मे मान्यच नाहींत. म्हणून आध्यात्मिक जो पिंडात्मा त्याचें, द्युलोकादि शिर आहे ज्याचें असा जो आधिदैविक विराट् आत्मा, त्याच्याशीं तादात्म्य आहे,–अंगोपांगें एक आहेत म्हणून, जीवात्म्याचें विराट्स्वरूपाशीं ऐक्यत्व असणें योग्यच आहे. हा अभिप्राय मनांमध्यें घेऊन या मंत्रांत श्रुतीनें 'सप्तांग' असें विश्वाचें, जीवात्म्याचें, स्वरूपवर्णन केलें आहे. श्रुतीनें 'सप्तांग' हें विशेषण विश्वाला दिलें आहे, तें सर्वश्रुतींस आध्यात्मिक व अधिदैविक आत्म्यांचें एकत्व इष्ट आहे, हा अभिप्राय लक्ष्यांत ठेऊन दिलें आहे, तें योग्यच होय. छान्दोग्यामध्यें 'तुझें शिर खालीं पडेल' असें जें श्रुतिवाक्य आहे, त्यावरून स्पष्ट होतें कीं, व्यस्त उपासनेची निंदा आणि समस्त उपासनेच्या विधीची विहितता स्थापन करणें हें श्रुतीला इष्ट आहे. (जीवानें समस्त जो आत्मा त्याची उपासना करावी हा अभिप्राय मनांत ठेऊन पिंडात्म्याच्या एकांगी उपासनेची निंदा केली आहे.) या निंदेच्या चिह्नावरून स्पष्ट होतें कीं, श्रुतीला विराट् आत्म्याची व विश्वाची एकता अभीष्ट आहे.

विराजैकत्वमुपलक्षणार्थं हिरण्यगर्भाव्याकृतात्मनोः। उक्तं चैतन्मधुब्राह्मणे—"यश्चायमस्यां पृथिव्यां तेजोमयोऽमृतमयः पुरुषो यश्चायमध्यात्मम्" इत्यादि। सुषुप्ताव्याकृतयोस्त्वेकत्वं सिद्धमेव। निर्विशेषत्वात्। एवं च सत्येतत्सिद्धं भविष्यति सर्वद्वैतोपशमे चाद्वैतमिति ॥ ३ ॥

सिद्धांतीः—पिंडात्म्याचें विराट् आत्म्याशीं एकत्व सांगितलें तें केवळ उपलक्षण होय. यावरून हिरण्यगर्भ आणि अव्याकृत यांचें ही एकत्व पिंडात्म्याशीं (तैजस व प्राज्ञ यांशीं) आहे, असें सांगण्याचा श्रुत्यभिप्राय आहे, हें उघड होतें. मधुब्राह्मणामध्यें म्हटलें आहे, 'हा जो आमचा जीवात्मा आहे, तो आणि या पृथ्वीमध्यें जो तेजोमय आणि अमृतमय आत्मा आहे'–तो एकरूप आहेत–हें वाक्य स्पष्ट सांगतें कीं, तैजस आणि हिरण्यगर्भ हे एकरूप होत. सुषुप्त (प्राज्ञ) आणि अव्याकृत या उभयतांचें एकत्व तर सिद्धच आहे. कारण त्यांमध्यें कोणता ही विशेष नाहीं. उभयतां ही निर्विशेष आहेत, उभयतांस विशेषाचें भान नसतें. सारांश, विश्व आणि विराट्, तैजस आणि हिरण्यगर्भ, प्राज्ञ आणि अव्याकृत हे सर्व समानधर्माचे आहेत, म्हणून (यांत कांहीं विशेष नाहींत म्हणून) एकच आहेत, असें सिद्ध होतें. अर्थातच यायोगें सर्व द्वैंताचा निरास होऊन एक अद्वैत मात्र सिद्ध होत.

(तात्पर्य हें आहे कीं, बाह्यदृष्टि असणारा, जागृतस्थितींत असणारा, जीवात्मा स्वरूपतः परमात्मा असतो) ॥ ३ ॥

रंगरामानुज—जागरित=चक्षु. बहिष्प्रज्ञ=बाहेरील पदार्थांचें ज्ञान निर्माण करून देणारा. सप्तांग=चार हात, दोन पाय व सोंड मिळून सात अंगें. एकोनाविंशतिमुखः—

१ २ जमुख व प्रत्येक दक्षिणोत्तर बाजूंस ९ याप्रमाणें १८ मुखें, अशीं १९ मुखें असणारा. विश्व=सर्वांनीं जाणण्यास योग्य अशी स्थूल वस्तु. ही भोगणारा तो वैश्व. हा शुभ भोगांचा मात्र उपभोग घेतो. नर=जो क्षय पावत नाहीं तो. वैश्वानर=अक्षय्य असून स्थूल शुभभोग घेणारा. हा आत्म्याचा प्रथम पाद (अंश) होय.

माध्व—यांचा अभिप्राय सामान्यतः रंगरामानुजांप्रमाणेंच आहे. विश्व=ज्ञान-विषयभूत स्थूल पदार्थ.

मंत्र चवथा.

स्वप्नस्थानोऽन्तःप्रज्ञः सप्ताङ्ग एकोनविंशतिमुखः प्रविविक्तभुक्तैजसो द्वितीयः पादः ॥ ४ ॥

अन्वय व अर्थः—स्वप्नस्थानः, अंतःप्रज्ञः, सप्तांगः, एकोनविंशति-मुखः, प्रविविक्तभुक्, तैजसः, द्वितीयः पादः (स्वप्न हें ज्याचें स्थान आहे, जो अंतर्यामांतील वासनादिकांचा ज्ञाता आहे, ज्याला सात अंगें आहेत, एकोणीस मुखें आहेत, जो वासनेचा, सूक्ष्माचा, मात्र उपभोग घेतो तो आत्म्याचा तैजस नामक द्वितीय चरण आहे). हें द्वितीय चरणाचें वर्णन आहे ॥ ४ ॥

स्वप्नः स्थानमस्य तैजसस्य स्वप्नस्थानः । जाग्रत्प्रज्ञाऽनेकसाधना-बहिर्विषयेवावभासमाना मनःस्पन्दनमात्रा सती तथाभूतं संस्कारं मनस्याधत्ते । तन्मनस्तथा संस्कृतं चित्रित इव पटो बाह्यसाधनानपेक्षमविद्याकामकर्मभिः प्रेर्यमाणं जाग्रद्वदवभासते । तथा चोक्तम्—" अस्य लोकस्य सर्वावतो मात्रामपादाय " इति । तथा " परे देवे मनस्येकीभवति " इति प्रस्तुत्य " अत्रैष देवः स्वप्ने महिमानमनुभवति " इत्यार्थवणे । इन्द्रियापेक्षयाऽन्तस्थत्वान्मनसस्तद्वासनारूपा च स्वप्ने प्रज्ञा यस्येत्यन्तःप्रज्ञः । विषयशून्यायां प्रज्ञायां केवलप्रकाशस्वरूपायां विषयित्वेन भवतीति तैजसः । विश्वस्य सविषयत्वेन प्रज्ञायाः स्थूलाया भोज्यत्वम् । इह पुनः केवला वासनामात्रा प्रज्ञा भोज्येति प्रविविक्तो भोग इति । समानमन्यत् । द्वितीयः पादस्तैजसः ॥ ४ ॥

सिद्धान्ती—तैजस नामक आत्म्याचें वसतिस्थान स्वप्न हें आहे. म्हणून त्याला स्वप्नस्थान हें नांव आहे; स्वप्न हा याचा विषय आहे. आतां, जागृतस्थितींत असणारी प्रज्ञा (बुद्धि) अनेकसाधनात्मक असते. बाह्य विषय समजून घेण्याला या प्रज्ञेला अनेक इंद्रियें असतात; म्हणून तीं जणूं कांहीं बाह्यविषयरूपानें प्रकाशित होणारी अशी प्रकट होतेशी दिसते. पण वास्तविक प्रकार असा कीं, तींच मनाचे स्पंदनरूप होते; ती परमार्थतः नाहींच. तथापि ही प्रातिभासिक बहिःप्रज्ञा त्या स्वस्वरूपानें उत्पन्न झालेले संस्कार मनामध्यें धारण करिते.*

याप्रमाणें संस्कृत झालेलें मन एखाद्या चित्रें काढलेल्या वस्त्राप्रमाणें चित्रित होतें. आणि बाह्य साधनांची अपेक्षा न करितां केवळ अविद्या, काम आणि कर्म यांनीं प्रेरित झालेलें मन जागृतस्थितींत असल्याप्रमाणें अंतर्विषयांस, वासनांस, प्रकाशित करितें. म्हटलें आहे–' सर्वसाधनसंपत्ति जेथें आहे तो सर्ववान् व लोक म्हणजे अवस्था होय, या सर्ववान् लोकांची (जागृतस्थितीची) एक मात्रा (अंश) घेऊन जीव स्वप्नस्थितीचा अनुभव घेतो ' आणि ' श्रेष्ठ आणि दिव्य मनामध्यें सर्व एक होतें ' असा प्रारंभ करून ' हा मनोदेव स्वप्नामध्यें स्वमहिम्याचा अनुभव घेतो; ' (प्रश्नोपनिषत् पहा). असें श्रुति म्हणते. याप्रमाणें मनाचें कल्पनासामर्थ्य आहे. असो; इंद्रियांच्या दृष्टीनें आंत असणारें मन आहे. ह्यामध्यें वासनारूपानें स्वप्नामध्यें जी प्रज्ञा विद्यमान असते तिला अंतःप्रज्ञा म्हणावें. आणि अंतःप्रज्ञा ज्याला असते तो अंतःऽप्रज्ञ आहे असें समजावें.

---

* जागृत स्थितींतील जिवात्म्याची बुद्धि ज्ञानेंद्रियांच्या साहाय्यानें व्यापार करीत असते, म्हणून सामान्यतः असें वाटतें कीं, तींच सर्व बाहेरचे ज्ञानविषय आहे. बाहेरचे विषय प्रकट करणारी असें तिचें स्वरूप दिसतें; पण काळजीपूर्वक पाहिलें असतां बाहेरचे विषय म्हणजे, आपल्या मनाचा व्यापार असणारे कल्पित विषय होत. म्हणून जीवाच्या मनानें केलेल्या अनेक प्रकारच्या प्रेरणा ही मनांत नेऊन ठेवितें. अथवा मनानें मात्र सर्व बाह्य विश्व उत्पन्न करणारी, मनाचें स्पंदन मात्र असणारी ही प्रज्ञा आहे; आणि अनेक संस्कार उत्पन्न करून घेऊन ते ते संस्कार ही प्रज्ञा मनामध्यें स्थापित करिते.

§ आचार्यांचा असा सिद्धांत आहे कीं, आपल्या इंद्रियांच्या द्वारांनीं जे विषय आपल्याला गोचर होतात, ते दिसतात तसे स्वरूपतः नसून आपल्या मनाच्या व्यापारांनीं उत्पन्न झालेले असतात. मनाला व्यापार करावयास लावणाऱ्या वस्तु म्हणजे अविद्या, काम आणि कर्म ही होत. स्वरूपाचें अज्ञान असतें म्हणून मनामध्यें इच्छा उत्पन्न होतात. या इच्छा कर्म करावयास लावतात. म्हणून अविद्या, काम आणि कर्म ही मनाचे प्रेरक होतात. याप्रकारें प्रेरित झालेलें मन आपल्यास दिसणारें विश्व उत्पन्न करितें. आणि तेंच मन या उत्पन्न केलेल्या विश्वाचे संस्कार आपल्यावर करून घेतें. हे संस्कार ज्या बुद्धीला समजतात त्या बुद्धिला अंतःप्रज्ञा असें म्हणतात. ही बुद्धी ज्याला असते त्याला अंतःप्रज्ञ असें म्हणावयाचे आणि स्वप्नामध्येंच वरील सर्व व्यापार होतात, म्हणून स्वप्न हेंच अंतःप्रज्ञाचें वसतिस्थान होतें, यास्तव त्याला स्वप्नस्थान असें म्हणतात.

केवळ प्रकाशरूप असणारी जी स्थूलविषयशून्य प्रज्ञा–तेजस्वरूप प्रज्ञा–हीमध्यें अंतःप्रज्ञाचा ज्ञान–विषय असतो; अंतःप्रज्ञ विषयी व मनोनिर्मित स्थूलशून्य कल्पना हा ज्ञानविषय होय. म्हणून याला **तैजस** असें म्हणतात. हा द्वितीय तैजस चरण विश्वाहून–बहिष्प्रज्ञ नामक प्रथम चरणाहून–निराळा आहे. कारण बहिष्प्रज्ञ हा बाह्य विषयांचा मात्र उपभोक्ता असतो आणि अंतःप्रज्ञ हा केवळ वासनामात्र प्रकाशस्वरूप प्रज्ञेचा भोक्ता असतो. म्हणून त्याल "प्रविविक्तभुक्" असें म्हणतात. पहिल्यामध्यें बाह्य विषयभोग असतो, आणि दुसऱ्याचा बाह्यविषयाहून निराळा, बाह्यविषयशून्य, असा वासनामात्र, सूक्ष्म भोग असतो, म्हणून त्याला प्रविविक्तभोक्ता असें म्हणावयाचें. विविक्त याचा अर्थ निराळा काढलेला एकाकी असा आहे. स्थूलापासून वेगळा काढलेला जो सूक्ष्म विषय तो प्रविविक्त होय. या प्रमाणें हा तैजस नामक द्वितीय चरण, स्वप्नस्थान, अंतःप्रज्ञ, सप्तांगी, एकोनविंशतिमुखांचा (१९ तोडांचा) आणि वासनामात्रभोक्ता असा आहे. हा लिंगात्मा होय. याचें स्वरूप आणि हिरण्यगर्भाचें स्वरूप एकच असतें. ॥ ४ ॥

रंगरामानुज—स्वप्नस्थानः=कण्ठदेश हें आहे स्थान ज्याचें. स्वप्नकाळीं जीव व आत्मा कंठांत राहून स्वप्नांतील पदार्थ पाहतात. अन्तः=बाह्यार्थापासून उत्पन्न झालेल्या वासना. प्रविविक्त=बाह्यार्थापासून निराळ्या असणाऱ्या वासना. अन्तःप्रज्ञ वासनामय असतो, वासनाचा उपभोग स्वतः घेतो व जीवांकडून घेववितो. चित्त तेजस्वी असतें म्हणून या आत्मांशाला तैजस म्हणतात.

माध्व—स्वप्न म्हणजें मन आहे स्थान ज्याचें तो स्वप्नस्थान, तैजस; जागृतींत जो पदार्थानुभव येतो, त्यामुळें उत्पन्न होणाऱ्या वासना हें ज्यांचें उपादान कारण आहे, त्या प्रविविक्त वस्तु होत. अर्थात या वस्तु स्वप्नगत मात्र असतात.

मंत्र पांचवा.

यत्र सुप्तो न कंचन कामं कामयते न कंचन स्वप्नं पश्यति तत्सुषुप्तम् । सुषुप्तस्थान एकीभूतः प्रज्ञानघन एवाऽऽनन्दमयो ह्यानन्दभुक्चेतोमुखः प्राज्ञस्तृतीयः पादः ॥ ५ ॥

अन्वय व अर्थः—**तत् सुषुप्तं; यत्र सुप्तः न कञ्चन कामं कामयते, न कञ्चन स्वप्नं पश्यति** (ती सुषुप्त स्थिति होय की जेथ सुप्त झालेला–गाढ निद्रा लागलेला पुरुष–कोणती ही इच्छा करीत नाहीं व कोणत्याही प्रकारचें स्वप्न पाहत नाहीं,) **सुषुप्तस्थानः एकीभूतः, प्रज्ञानघनः**

एव, आनंदमयः, हि आनंदभुक्, चेतोमुखः, प्राज्ञः तृतीयः पादः (सुषुप्ति हें ज्याचें वसतिस्थान झालें आहे, ज्याचें स्वरूप एकरूप मात्र आहे, जो प्रज्ञानघन, आनंदपूर्ण, आनंदभोक्ता व चेतोमुख म्हणजे अंतःकरण हेंच आहे मुख ज्याचें, असा प्राज्ञ हा तृतीय चरण आहे.) ॥ ५ ॥

दर्शनादर्शनवृत्त्योस्तत्त्वाप्रबोधलक्षणस्य स्वापस्य तुल्यत्वात्सुषुप्तिग्रहणार्थं यत्र सुप्त इत्यादिविशेषणम् । अथवा त्रिष्वपि स्थानेषु तत्त्वाप्रतिबोधलक्षणः स्वापोऽविशिष्ट इति पूर्वाभ्यां सुषुप्तं विभजते। यत्र यस्मिन्स्थाने काले वा सुप्तो न कंचन स्वप्नं पश्यति न कंचन कामं कामयते । न हि सुषुप्ते पूर्वयोरिवान्यथाग्रहणलक्षणं स्वप्नदर्शनं कामो वा कश्चन विद्यते । तदेतत्सुषुप्तं स्थानमस्येति सुषुप्तस्थानः । स्थानद्वयंप्रविभक्तं मनःस्पन्दितं द्वैतजातम् । तथा रूपापरित्यागेनाविवेकापन्नं नैशतमोग्रस्तमिवाहः सप्रपञ्चमेकीभूतमित्युच्यते । अतएव स्वप्नजाग्रन्मनःस्पन्दनानि प्रज्ञानानि घनीभूतानीव सेयमवस्थाऽविवेकरूपत्वात्प्रज्ञानघन उच्यते । यथा रात्रौ नैशेन तमसाऽविभज्यमानं सर्वं घनमिव तद्वत्प्रज्ञानघन एव । एवशब्दान्न जात्यन्तरं प्रज्ञानव्यतिरेकेणास्तीत्यर्थः । मनसो विषयविषय्याकारस्पन्दनायासदुःखाभावादानन्दमय आनन्दप्रायो नाऽऽनन्द एव । अनात्यन्तिकत्वात् । यथा लोके निरायासस्थितः सुख्यानन्दभुगुच्यते । अत्यन्तानायासरूपा हीयं स्थितिरनेनानुभूयत इत्यानन्दभुक् । " एषोऽस्य परम आनन्दः " इति श्रुतेः । स्वप्नादिप्रतिबोधचेतः प्रति द्वारीभूतत्वाच्चेतोमुखः । बोधलक्षणं वा चेतोद्वारं मुखमस्य स्वप्नाद्यागमनं प्रतीति चेतोमुखः । भूतभविष्यज्ज्ञातृत्वं सर्वविषयज्ञातृत्वमस्यैवेति प्राज्ञः । सुषुप्तोऽपि हि भूतपूर्वगत्या प्राज्ञ उच्यते । अथ वा प्रज्ञप्तिमात्रमस्यैवासाधारणं रूपमिति प्राज्ञः । इतरयोर्विशिष्टमपि विज्ञानमस्ति सोऽयं प्राज्ञस्तृतीयः पादः ॥ ५ ॥

सिद्धान्ती—बाह्य विषयांचें दर्शन होणें, ही जागृतस्थितींतील वृत्ति, आणि त्यांचें वासनामूलक दर्शन होणें ही स्वप्नस्थिति वृत्ति. या उभयतांचे ही लक्षण परमार्थ-वस्तूचें अज्ञान असणें हें आहे. तसेंच, निद्रेचेंही तेंच लक्षण आहे. या तिन्ही स्थितींचें एकच लक्षण हें आहे कीं, या तिन्ही अवस्थांत परमार्थवस्तूचें अज्ञान असतें. म्हणून जागृतस्थिति आणि स्वप्नस्थिति यांपासून सुषुप्तीला निराळें काढावें, एतदर्थ ' तीं सुषुप्तस्थिति

म्हणावा कीं जेथें ' इत्यादि विशेषण श्रुतीनें येथें उपयोजिलें आहे. किंवा तिन्ही अवस्थांत तत्त्वाचें अज्ञान (तत्त्वाचा अप्रतिबोध) हें एकच सामान्य लक्षण आहे, असें म्हणून निद्रा ही पूर्वीच्या दोन अवस्थांतून निराळी काढलेली आहे. ती अशीः ज्या स्थानीं किंवा ज्या कालीं (जेथें आणि जेव्हां) निद्रावश पुरुष कोणत्याही विषयाचें स्वप्न पाहत नाहीं किंवा कोणत्याही विषयाची इच्छा करित नाहीं, म्हणजे ज्या स्थितींत पूर्वीच्या दोन स्थितींप्रमाणें अन्यथाज्ञानाचें दर्शन होत नाहीं तें सुषुप्त होय. या स्थानीं ज्याचें वास्तव्य असतें, त्याला सुषुप्तस्थान असें म्हणतात. आतां, जेथें म्हणून मनानें उत्पन्न केलेलें द्वैत दिसतें, अनेकत्व दिसतें, तें सर्व जागृत किंवा स्वप्नास्थितींत स्वयोग्यतेनुसार समर्पित होतें. मनःकल्पित सर्व स्थूलसूक्ष्मांचें ज्ञान जागृतस्वप्नस्थितींत मात्र होतें. येथें अन्यथाज्ञान असतें. पण राहूनें ग्रस्त केलें असतां (अत्यंत गडद् अंधकार पडला असतां) जसा दिवस नाहींसा होतो किंवा सूर्य अदृश्य होतो, त्याप्रमाणें आपल्या स्वरूपाचा त्याग न करितां व आपलीं सर्व मनबुद्धि आदि साधनें यांचा त्याग न करितां जीवाला ही शुद्ध अज्ञान स्थिति प्राप्त होते; व सर्व एकरूप आहे, असें भान होतें, त्याला एकीभूत* असें म्हणावयाचें.

ह्या एकीभूत प्राज्ञाला प्रज्ञानघन असेंही नांव प्राप्त होतें. यांचें कारण स्वप्न आणि जागृतस्थितींत व्यापार करणारीं मनस्पंदनात्मक विशेष प्रज्ञानें हीं सर्व जणूं कांहीं घन होतात. म्हणजे हा सर्व कार्य-प्रपंच स्वकारणामध्यें एकरूप होतो, घट्ट होतो, एकरस होतो, म्हणून या अज्ञानरूपी जीवावस्थेला प्रज्ञानघन असें म्हणतात. अमावास्येच्या काळ्या कुट्ट अंधकारांत पदार्थांचें विभजन करितां न आल्यामुळें सर्व एकच (घन) आहे, असा भास होतो, हें प्रसिद्ध आहे. असो; मंत्रांत 'प्रज्ञानघन मात्र ' असें विशेषण दिलें आहे, याचें कारण तेथें प्रज्ञानाशिवाय दुसर कांहींएक नसतें. सारांश, तेथें विशेष प्रज्ञानें नसतात. या स्थितींत मनाला कोणत्याही प्रकारचे आयास पडत नाहींत, किंवा दुःख होत नाहीं. कारण विषयाकार होऊन व विषयी होऊन व्यापार करण्याचे श्रम या अवस्थेंत मनाला नसतात, म्हणून दुःखाचा अभाव असणारी जी अवस्था तिला प्रायः आनंदमय असें म्हटलें आहे. ही शुद्ध व अत्यंत आनंदाची अवस्था नव्हे, येथें दुःखाचा अभाव असतो, म्हणून इला आनंदमय अवस्था किंवा आनंदप्राय अवस्था

---

* अत्यंत घनदाट अंधकार पडला असतां उजेड नाहींसा होतो; म्हणून विश्वांतील सर्व पदार्थ निरनिराळ्या स्वरूपानें विद्यमान असतात, तरी ते सर्व एक स्वरूपाचे आहेत असें भान होतें. त्याप्रमाणें आपल्या बुद्धीमध्यें शुद्ध अज्ञान प्रसृत झालें, गाढनिद्रा आली, म्हणजे विद्यमान असणारीं सर्व विशेषज्ञानें जशीच्या तशींच विद्यमान असतात तरी, तीं सर्व एकरूप आहेत असा अनुभव येतो, त्याला एकीभूत असें श्रुतीनें विशेषण दिलें आहे. सुषुप्तस्थिति एकरूप असते व इतर अवस्था अनेकरूप असतात, हा उभयतांमधील विशेष आहे.

असें म्हटलें आहे. आतां हें उघड आहे कीं, शुद्ध आनंद व्हावयाचा, तो एक ज्ञान-स्थितींत मात्र होणार, प्राज्ञाची स्थिति अज्ञानघन असते; पण हें अज्ञान निर्विशेष असतें, दुःखाचें भान येथें नसतें, म्हणून या स्थितीला आनंदमय असें म्हटलें. आतां, व्यवहारामध्यें कांहीं एक आयास न करितां ज्या पुरुषाचा योगक्षेम चालतो, त्याला सुखी किंवा आनंदाचा उपभोक्ता असें म्हणतात, हें आपण नित्य ऐकतों. सुषुप्तीची स्थिति आयासशून्य आहे. तेथें यत्किंचितूही आयास नाहींतें. म्हणून या स्थितीचा अनुभव घेणाऱ्या प्राज्ञाला आनंदभुक् असें म्हणतात. 'हा त्याचा श्रेष्ठ आनंद आहे.' असें श्रुतीही म्हणतात. प्राज्ञाला चेतोमुख असेंही एक विशेषण श्रुतीनें दिलें आहे. स्वप्न आणि जागृत यांचें ज्ञान करून देणाऱ्या अंतःकरणाला जो प्राज्ञ द्वारस्वरूपानें असतो, म्हणजे ज्या अज्ञानस्वरूपाच्या योगानें जागृत आणि स्वप्न स्थितींतील अन्यथा ज्ञान किंवा विपरीत ज्ञान उत्पन्न होतें, त्या कारणस्वरूपी प्राज्ञाला (निद्रास्थितीचा अनुभव घेणाऱ्याला) चेतोमुख असें म्हटलें आहे. किंवा ज्ञानरूपी असणारें अंतःकरण ज्याचें द्वार (मुख) असतें, आणि ज्या द्वारामुळें स्वप्नादिकांचें आगमन होतें, त्याला चेतोमुख असें म्हणतात. असो; भूतभविष्य जाणणारा व सर्व विषयांचें ज्ञान असणारा हा आनंदभोक्ता असतो, म्हणून याला प्राज्ञ असें म्हटलें आहे. या प्राज्ञाला त्रैकालिक ज्ञान असतें. पहा कीं, जीव सुषुप्तस्थितींत सर्व विशेषज्ञानाविषयीं अज्ञानी असतो, तथापि भूतकालीं जीं जीं विशेषज्ञानें त्याला स्वप्नस्थितींत अथवा जागृतावस्थेंत झालेलीं असतात व भविष्यत्कालीन अनुमानें त्यानें केलेली असतात, तीं तीं सर्व त्याच्या ठिकाणीं मात्र वर्तमानकाळीं विद्यमान असतात; व निद्राभंग झाल्यावर उद्बुद्धही होतात. म्हणून त्याला प्राज्ञ असें म्हणतात. किंवा अज्ञानाचें शुद्ध ज्ञान असणें हेंच ज्याचें विलक्षण (असाधारण) स्वरूप आहे, त्याला प्राज्ञ म्हणावें, असेंही म्हणतां येईल. जागृतस्वप्नस्थितींत जीवाला विशेष विज्ञान असतें; पण सुषुप्ताला शुद्ध अविद्येचें ज्ञान असतें. म्हणूनही प्राज्ञ असें म्हणावें. हा तिसरा चरण होय. सारांश, सुषुप्तस्थितींत राहणारा, एकरूप, प्रज्ञानमात्रघन, आनंदमय, आनंदभोक्ता, चेतोमुख आणि प्राज्ञ असें याचें स्वरूप आहे. प्राज्ञ आणि अव्याकृत यांचीं एकच स्वरूपें आहेत. तात्पर्य, गाढ निद्रा लागली असतां शुद्ध अज्ञानाचें मात्र भान असणारा आनंदी आणि आनंदभोक्ता व सर्व विशेष विज्ञानांचें कारण असणारा प्राज्ञ आहे. ॥ ५ ॥

रंगरामानुज—सुप्त अज्ञानी असतो, किंवा सुखरूपी भगवंताजवळ जातो. या स्थितींत स्वतःशिवाय त्याला कांहीं दिसत भासत नाहीं. सुषुप्तस्थान हें हृदयकर्णिकेच्या अग्रावर आहे. एकीभूतः=ज्ञानानंदस्वरूपी. येथें वैश्वानर व तैजस एकत्र होऊन एका विशेष तऱ्हेनें एकरूप होतात. घनः=अविद्याकर्मनामक क्षेत्रज्ञशक्तीनें वेढलेला, तो घन (जीव). प्रज्ञानघनः=सुषुप्तिकालीन जीवाचें घनस्वरूप जाणणारा व जीवास जाणविणारा. आनंदमयः=पूर्णानंदी. येथें 'हि' शब्द 'वाणीस अगोचर असणारा'

इत्यादि अर्थ प्रकट करितो. आनंदभुक्=विषयभोगाशिवाय आनंदोपभोग घेणारा. येथें स्थूलभुक्त्व, प्रविविक्तभुक्त्व या आनंदभोक्त्याच्या क्रीडा आहेत, असें समजावयाचें. चेतोमुखः= ज्ञानरूप आहेत सर्व अवयव ज्याचे, असा. प्राज्ञः=प्रकर्षानें न जाणणारा. याला जीवस्वरूप आणि अज्ञान यांव्यतिरिक्त कांहीं एक जाणतां येत नाहीं.

माध्व—सुप्तावस्थेंत जीवस्वरूप, काल, अज्ञान आणि निद्रासुख यांशिवाय दुसऱ्या कोणत्याही पदार्थाचें जीवाला ज्ञान नसतें. प्राज्ञ हा प्रतिदिवशीं विश्वतैजसांशीं एकरूप होतो. घन=अज्ञानयुक्त, प्रज्ञानयुक्त. प्रज्ञानघन काल, निद्रासुख, जीवस्वरूप व अज्ञान यांचें ज्ञान देणारा. आनंदभुक्=केवल स्वरूपभूत आनंदाचा भोक्ता, आनंदमयः= पूर्णानंदी. चेतोमुखः=ज्ञानरूप आहे शरीर ज्याचें असा किंवा ज्ञानपूर्ण. आनंदमयत्व, चेतोमुखत्व व आनंदभुक्त्व ही प्राज्ञाप्रमाणेंच विश्वतैजसांचीं लक्षणें आहेत.

मंत्र सहावा.

एष सर्वेश्वर एष सर्वज्ञ एषोऽन्तर्याम्येष योनिः सर्वस्य प्रभवाप्ययौ हि भूतानाम् ॥ ६ ॥

अन्वय व अर्थः—एषः सर्वेश्वरः, एषः सर्वज्ञः, एषः अंतर्यामी, एषः सर्वस्य योनिः, हि भूतानां प्रभवाप्ययौ (हा प्राज्ञ सर्वस्वामी, सर्वज्ञ, सर्वांतर्यामी, सर्वकारण आणि सर्वभूतांच्या उत्पत्तिलयांचें स्थान असणारा आहे.) ॥ ६ ॥

एष हि स्वरूपावस्थः सर्वेश्वरः साधिदैविकस्य [illegible] सर्वस्येशिता नैतस्माज्जात्यन्तरभूतोऽन्येषामिव । " प्राणबन्धनं हि सोम्य मनः " इति श्रुतेः । अयमेव हि सर्वस्य सर्वभेदावस्थो ज्ञातेत्येष सर्वज्ञ एषोऽन्तर्याम्यन्तरनुप्राविश्य सर्वेषां भूतानां नियन्ताऽप्येष एव । अत एव यथोक्तं सभेदं जगत्प्रसूयत इत्येष योनिः सर्वस्य । यत एवं प्रभवश्चाप्ययश्च प्रभवाप्ययौ हि भूतानामेष एव ॥ ६ ॥

सिद्धान्ती–हा स्वरूपामध्यें राहणारा आणि चेतनैकप्रधान असणारा प्राज्ञ, सर्वेश्वर आहे. हा सर्व आधिदैविक, आधिभौतिक आणि आध्यात्मिक प्रपंचाचा, या भेदपूर्ण विश्वाचा स्वामी आहे. याच्या सारखा दुसरा कोणीही स्वतंत्र स्वामी नाहीं. इतर ठिकाणीं अनेक प्रकारचे अनेक स्वामी असतात. तसा प्रकार येथें नाहीं. 'हे सौम्य, मन हें (जीवचैतन्य हें) प्राणानें म्हणजे परब्रह्मस्वरूपानें नियंत्रित

झालें आहे.' ही श्रुति परमेश्वराचे सर्वेश्वरत्वाला प्रमाण आहे. सारांश, व्यवहारतः जीव आणि सर्व जड परमेश्वराच्या आधीन आहे. अशा अर्थाची ही श्रुति आहे. असो; हा प्राज्ञ किंवा अव्याकृताचा अभिमानी परमेश्वर सर्वभूतस्थ असल्यामुळें सर्व भेदाभेदांचा ज्ञाता, सर्वज्ञ आहे. त्याच प्रमाणें सर्वांच्या अंतःकरणांत प्रवेश करून त्यांचें नियमनही करणारा हा प्राज्ञ मात्र आहे. हा सर्वनियंता आहे, म्हणून आतांच सांगितलेलें भेदस्वरूपी मनःकल्पित स्थूल सूक्ष्म विश्व (सर्व आधिदैविक व आध्यात्मिक विश्व) या पासूनच उत्पन्न होतें. म्हणून याला सर्वकारण असें म्हणावयाचें. हा सर्वकारण आहे, म्हणून भूतांची उत्पत्ति आणि त्यांचा लय येथेंच होतो. तात्पर्य, हा सर्वांचें उपादानकारण आणि निमित्तकारण आहे. ॥ ६ ॥

माध्व—एषः=चार रूपांचा भगवान्.

अत्रैते* श्लोका भवन्ति—

हा अर्थ समर्थन करणारे श्लोक पहाः—

अत्रैतस्मिन् यथोक्तेऽर्थे एते श्लोका भवन्ति

सिद्धान्ती—येथें आतांपर्यंत जो अर्थ सांगितला त्याचें समर्थन करणारे हे पुढील श्लोक आहेत.

(गौडपादीय कारिका)

मंत्र पहिला.

बहिष्प्रज्ञो विभुर्विश्वो ह्यन्तःप्रज्ञस्तु तैजसः ।
घनप्रज्ञस्तथा प्राज्ञ एक एव त्रिधा स्मृतः ॥ १ ॥

अन्वय व अर्थः—बहिष्प्रज्ञः विभुः विश्वः (बहिष्प्रज्ञ जो विभु आत्मा त्याला विश्व म्हणतात) **हि अंतःप्रज्ञः तु तैजसः** (पण अंतःप्रज्ञाला तैजस असें प्रसिद्ध नांव आहे) **तथा घनप्रज्ञः प्राज्ञः** (तसेंच घनप्रज्ञ अथवा प्रज्ञानघनात्मा प्राज्ञ नांवानें संबोधिला जातो.) **एकः एव त्रिधा स्मृतः**—(मतः ?)—(हा आत्मा स्वरूपतः एकच असून तो तीन प्रकारचा दिसतो, असें म्हणतात) ॥ १ ॥

---

* हें वार्त्तिककारांचें वाक्य आहे.

बहिष्प्रज्ञ इति । पर्यायेण त्रिस्थानत्वात्सोऽहमिति स्मृत्या प्रतिसंधानाच्च स्थानत्रयव्यतिरिक्तत्वमेकत्वं शुद्धत्वमसङ्गत्वं च सिद्धमित्यभिप्रायः । महामत्स्यादिदृष्टान्तश्रुतेः ॥ १ ॥

सिद्धान्ती–हा एकच आत्मा क्रमाक्रमानें पर्यायानें तीन प्रकारचा भासतो. कारण, त्याला त्या त्या अवस्थांमध्यें स्थूल, सूक्ष्म आणि कारण या उपाधी असतात. उपाधींचा व्यभिचार होतो, पण आत्मस्वरूपाचा केव्हांही व्यभिचार होत नाहीं.

(तिन्ही अवस्थांत आत्मस्वरूप विद्यमान असतें. पण जागृतींत स्वप्नावस्था नसते; सुषुप्तींत इतर दोन्हीं नसतात. म्हणजे आत्मस्वरूप हें जागृतादि अवस्थांहून निराळें आहे. आणि आत्मा तीन अवस्थांमध्यें असतो.)

पुनः; 'तोच मी आहें.' हें एकस्वरूपी स्मरणानुसंधान जीवाला अखंड असतें. म्हणून स्थानत्रयाहून निराळाच असणारा, एकरूप, शुद्ध आणि असंग आत्मा आहे, असें निश्चित होतें. बृहदारण्यकांत दोन्ही तीरांस स्वच्छंदानें जाणाऱ्या महामत्स्याचा दृष्टांत देऊन एकच आत्मा स्वप्नस्थितीच्या अंताचा व जागृतस्थितीच्या अंताचा यथाकालीं द्रष्टा होतो, असें सांगितलें आहे, तेंही आत्म्याचें एकत्व सिद्ध करून या श्लोकाचें व आमचें म्हणणें समर्थन करितें. सारांश, तिन्ही अवस्थांत उपाधिनिमित्तानें मात्र भिन्न दिसणारा आत्मा स्वरूपतः एक, अद्वितीय, असंग आणि शुद्ध आहे, असें ठरतें ॥ १ ॥

रंगरामानुज—स्मृतः–मंत्रद्रष्ट्या ब्रह्मदेवानें भगवद्रूपांची एकता स्मरणप्रविष्ट केली.

माध्व—एकच भगवान् विश्वादि तीन रूपांचा, बहिःप्रज्ञादिकांचा, कारक आहे.

मंत्र दुसरा.

दक्षिणाक्षिमुखे विश्वो मनस्यन्तस्तु तैजसः ।
आकाशे च हृदि प्राज्ञस्त्रिधा देहे व्यवस्थितः ॥ २ ॥

अन्वय व अर्थः—दक्षिणाक्षिमुखे विश्वः (विश्व हा उजव्या डोळ्याच्या मुखामध्यें असतो.) **तु तैजसः मनसि अंतः** (तैजस हा मनाच्या अंतर्यामी असतो.) **प्राज्ञः च हृदि आकाशे** (प्राज्ञ हा हृदयाकाशामध्यें असतो.) **देहे त्रिधा व्यवस्थितः** (हा एकच आत्मा देहाच्या तीन ठिकाणीं तीन प्रकारें व्यवस्थित झाला आहे) ॥ २ ॥

जागरितावस्थायामेव विश्वादीनां त्रयाणामनुभवप्रदर्शनार्थोऽयं श्लोकः—दक्षिणाक्षीति। दक्षिणमक्ष्येव मुखं तस्मिन्प्राधान्येन द्रष्टा स्थूलानां विश्वोऽनुभूयते। "इन्धो ह वै नामैष योऽयं दक्षिणेऽक्षन्पुरुषः" इति श्रुतेः। इन्धो दीप्तिगुणो वैश्वानर आदित्यान्तर्गतो वैराज आत्मा चक्षुषि च द्रष्टैकः। नन्वन्यो हिरण्यगर्भः क्षेत्रज्ञो दाक्षिणेऽक्षि(क्ष)ण्यक्ष्णोर्नियन्ता द्रष्टा चान्यो देहस्वामी। न। स्वतो भेदानभ्युपगमात्। "एको देवः सर्वभूतेषु गूढः" इति श्रुतेः।

"क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत।
अविभक्तं च भूतेषु विभक्तमिव च स्थितम्" इति स्मृतेः।

सि०—स्वतः जागृतावस्थेमध्येंच विश्वादि आत्म्याची तीन्हीं आभासिक स्वरूपें अनुभवाच्या प्रत्ययास यावीं म्हणून, हा श्लोक अवतारिला आहे. दक्षिण नेत्र हाच त्याचें मुख आहे. तेथें राहून स्थूल विषयांचा द्रष्टा जो विश्व तो त्यांचा अनुभव मुख्यतः घेतो व योग्यांच्या अनुभवास येतो. म्हणून तो दक्षिणाक्षिमुख म्हणावा. 'इंध या प्रसिद्ध नांवाचा हा दक्षिण नेत्रामध्यें राहणारा पुरुष आहे' अशी श्रुति येथें प्रमाण आहे. इंध म्हणजे प्रकाशगुणात्मक वैश्वानर होय. हाच सूर्याच्या अंतर्यामीं राहणारा वैराज (विराडात्मा). अर्थात् विराट् व विश्व एकच आहेत, असें ठरलें. हा वैश्वानर डोळ्यामध्यें राहून द्रष्टा होतो. आतां अशी शंका येईल कीं, हिरण्यगर्भ* निराळा, विराडात्मा निराळ आणि क्षेत्रज्ञ निराळा. क्षेत्रज्ञ हा दक्षिणनेत्रांत राहून नेत्रद्वयाचें नियमन त तोच द्रष्टा आहे, आणि तोच देहस्वामी आहे. आतां हिरण्यगर्भ हा सूक्ष्मसमष्टीचा नियामक व विराट् हा स्थूलसमष्टीचा नियामक आहे. अर्थात् हिरण्यगर्भ व देहस्वामी क्षेत्रज्ञ (जीव) भिन्न झाले व विराट् व जीव निराळे आहेतच.

पण ही शंका बरोबर नाहीं. कारण स्वरूपीं भेदाचें ज्ञान नाहीं. भेद आहे असें गृहीतही घेतलें जात नाहीं. 'देव एक असून सर्वभूतांचे ठिकाणीं गूढरूपानें वास्तव्य करितो' अशी श्रुति आहे. तसेंच 'मी सर्व क्षेत्रांत राहणारा सर्व क्षेत्रज्ञ आहें. मी स्वरूपतः अविभक्त असूनही भूतांमध्यें मात्र देहभेदानें विभक्त झालों आहें, असा भास होतो. (भगवद्गीता अ० १३) अशी स्मृति आहे. यांवरून वस्तुतः भेद नाहीं, असें ठरतें.

---

* हिरण्यगर्भ हा सूक्ष्मप्रपंचाचा अभिमानी असून, सूर्यमंडलांच्या अंतर्यामीं राहतो आणि विराट् आत्मा स्थूल प्रपंचाभिमानी असून सूर्यमंडलात्मक असतो. पण क्षेत्रज्ञ एका देहाचा अभिमानी असून, दक्षिणनेत्रांत राहणारा आहे. म्हणून हे सर्व तिन्ही निरनिराळे असले पाहिजेत.

सर्वेषु करणेष्वविशेषेऽपि दक्षिणाक्षि(क्ष)ण्युपलब्धिपाटवदर्शनात्तत्र विशेषेण निर्देशो विश्वस्य। दक्षिणाक्षिगतो रूपं दृष्ट्वा निमीलिताक्षस्तदेव स्मरन्मनस्यन्तः स्वप्न इव तदेव वासनारूपाभिव्यक्तं पश्यति। यथाऽत्र तथा स्वप्ने। अतो मनस्यन्तस्तु तैजसोऽपि विश्व एव। आकाशे च हृदि स्मरणाख्यव्यापारोपरमे प्राज्ञ एकीभूतो घनप्रज्ञ एव भवति। मनोव्यापाराभावात्। दर्शनस्मरणे एव हि मनःस्पन्दिते तदभावे हृद्येवाविशेषेण प्राणात्मनाऽवस्थानम्। 'प्राणो ह्येवैतान्सर्वान्संवृङ्क्ते' इति श्रुतेः।

सिद्धान्ती—सर्व ज्ञानेंद्रियें सारख्याच सामर्थ्यांचीं आहेत; तथापि दक्षिण नेत्रामध्यें विषयाच्या उपलब्धीचें सौकर्य जास्त आहे, म्हणून विश्व नामक आत्मा हा तेथें, दक्षिण नेत्रांत, उपलब्ध होतो असें म्हटलें आहे. आतां दक्षिणनेत्रामध्यें उपलब्ध झालेल्या 'विश्वानें' पदार्थांचें स्वरूप पाहून आपण आपले डोळे झांकले, आणि पाहिलेल्या पदार्थरूपांचें मनामध्यें स्मरण केलें, म्हणजे ज्याप्रमाणें जागृतींत पाहिलेल्या वस्तूंचीं रूपें दिसतात, त्याप्रमाणें स्मरण करणाऱ्या पुरुषाच्या मनांत स्वप्नाप्रमाणें जागृत अवस्थेमध्येंही पाहिलेला पदार्थ वासनारूपानें उद्बुद्ध होतो; आणि मनाच्या अंतर्यामीं तो प्रकट होतो. सारांश, ज्या विश्वनामक आत्म्यानें बाह्य पदार्थ पाहिला तोच विश्व तैजस होऊन मनाच्या अंतर्यामीं दृष्ट पदार्थांचें स्वरूप पाहतो. जागृतावस्थेमध्यें स्थिति होते, तशीच स्वप्नामध्येंही होते. यावरून मनाच्या आंत असणारा तैजस आत्मा हाही वस्तुतः विश्वच आहे, असें सिद्ध होतें. याप्रमाणें विश्व आणि तैजस एकरूप आहेत असें ठरतें. याच न्यायानें हृदयाकाशांत राहणाऱ्या प्राज्ञाचें आणि विश्वाचें एकरूपत्व सिद्ध करितां येतें. पहा कीं, दर्शनासह स्मरण नामक जो चित्तव्यापार आहे, तो लीन झाला म्हणजे दर्शन, स्मरण इत्यादि व्यापारशून्य असणारा प्राज्ञ हाही विश्वरूप आत्मा आहे, हें जागृतींत सुद्धां अनुभवितां येईल. सारांश, सुषुप्तींत द्रष्टा असणारा जो प्राज्ञ, तोच दृष्ट विषयाचा आणि द्रष्ट्या विषयीचा आकार सोडून देऊन स्वरूपीं स्वस्थ असतो. तो विशेष-ज्ञानशून्य असतो, हें आपण मागें पाहिलें आहे. जागृतीमधील विश्वात्मा नेत्र निमीलन केल्यावर आणि त्याचें स्मरणादि व्यापार स्तब्ध झाल्यावर, तात्पर्य, दर्शनस्मरणादि इंद्रियमनोव्यापार स्तब्ध झाल्यावर,-हाच विश्वतैजसांचीं रूपें घेणारा व एकरूपी असणारा आत्मा प्रज्ञानघन अथवा घनप्रज्ञ जो 'प्राज्ञ' त्याच्या स्वरूपाचा होतो. एवंच विश्व हाच प्राज्ञ आहे, असें ठरतें. उघडच आहे, दर्शनस्मरणादि व्यापार मनाचे आहेत, ते स्तब्ध झाले म्हणजे, हृदयाकाशांत निर्विशेष स्वरूपानें केवळ प्राज्ञरूप मात्र राहणाऱ्या प्राणात्म्याची स्थिति उपलब्ध होते. हाच प्राज्ञ होय. म्हटलें आहे, 'हे सर्व वाणीआदि इंद्रियव्यापार मुख्य प्राणामध्यें लीन होतात.'

याप्रमाणें विश्व, तैजस आणि प्राज्ञ हें सर्व एकरूप आहेत, हें सिद्ध झालें. याचप्रमाणें आपण मागें पाहिलें आहे कीं, विश्व आणि विराट्, तैजस आणि हिरण्यगर्भ व प्राज्ञ आणि अव्याकृत हे एकस्वरूप आहेत.

(या सर्व व्याख्यानाचा हेतु हा आहे कीं, जीवात्मा आणि परमात्मा हे आपापल्या तिन्ही दृश्यभास्य स्वरूपांत वस्तुतः एकच आहेत, हें ठरावें. विश्व, तैजस आणि प्राज्ञ हीं जीवात्म्याचीं तीन निरनिराळीं दृश्य स्वरूपें एकात्मक आहेत. शेवटीं विश्व आणि विराट् हेही एकात्मक आहेत; व विराट्, हिरण्यगर्भ व अव्याकृत एकरूप आहेत; म्हणून जीवात्मा आणि परमात्मा या तीन स्वरूपांत एकच आहेत, असें सांगण्याचा या व्याख्यानाचा हेतु आहे.)

तैजसो हिरण्यगर्भो मनःस्थत्वात्। लिङ्गं मनः। " मनोमयोऽयं पुरुषः " इत्यादिश्रुतिभ्यः। ननु व्याकृतः प्राणः सुषुप्ते तदात्मकानि करणानि भवन्ति कथमव्याकृतता। नैष दोषः। अव्याकृतस्य देशकालविशेषाभावात्।

सिद्धान्ती—तैजस आणि हिरण्यगर्भ हे एकरूप आहेत. कारण उभयतांचेंही वास्तव्य मनामध्यें असतें. हिरण्यगर्भ समष्टिमनांत (सर्व चराचर सृष्टीच्या अंतर्यामांत) राहतो; आणि तैजस हा व्यष्टिमनांत राहातो. समष्टि मन आणि व्यष्टि मन या एकरूपी उपाधी आहेत. आणि त्या कर्तृसामर्थ्य देणाऱ्या असून अंतर्यामीं असतात, हेंही प्रसिद्ध आहे. या उभयतांचें लिंग मनोरूप आहे. मन हा व्यष्टीचा (व्यक्तीचा) लिंगदेह तसाच समष्टि–हिरण्यगर्भाचा ही आहे. म्हटलें आहे ' हा पुरुष मनोमय आहे ' म्हणून तैजस हाच हिरण्यगर्भ होय. असो; आतां अशी शंका येईल की, प्राण हा (प्राज्ञ हा) नामरूपांनीं व्याकृत झालेला (दर्शनरूपाला आलेला) असतो, कारण, एक जीव सुषुप्तीमध्यें असतांही तो इतर जीवांस नामरूपांनीं दृष्ट होतोच. केवळ त्याचीं ज्ञानकर्मेंद्रियें प्राणामध्यें लीन झालेलीं असतात, हें खरें; तथापि नामरूपांनीं तो प्राण अथवा तीं नामरूपें इतर जीवांस स्पष्ट दिसतात. म्हणून तो अव्याकृत रूपी आहे, असें म्हणतां यावयाचें नाहीं. ही शंका बरोबर नाहीं. कारण देशविशेष, कालविशेष आणि वस्तुविशेष या सर्वांचा अभाव झाला म्हणजे त्या अभावाला आपण अव्याकृत असें म्हणतों. सुषुप्तीमध्येंही जागृत असणारा जो प्राण (जीव) याला देश, काल आणि वस्तु यांचें ज्ञान असत नाहीं. सुषुप्तींत प्राणाची सामान्य अवस्था मात्र असते. म्हणून प्राण हा अव्याकृतच आहे. इतर जीवांस निद्रित जीवांचीं नामरूपें दिसत असलीं तरी निद्रिताला त्यांचें भान नसतें, म्हणून त्याला अव्याकृत म्हणावयाचें. इतर जीव निद्रित झाले म्हणजे त्यांस सुद्धां पहिल्या निद्रिताच्या नामरूपाचें भान असत नाहीं !

यद्यपि प्राणाभिमाने सति व्याकृततैव प्राणस्य तथाऽपि पिण्डपरिच्छिन्नविशेषाभिमाननिरोधः प्राणे भवतीत्यव्याकृत एव प्राणः सुषुप्ते परिच्छिन्नाभिमानवताम्। यथा प्राणलये परिच्छिन्नाभिमानिनां प्राणोऽव्याकृतस्तथा प्राणाभिमानिनोऽप्यविशेषापत्तावव्याकृतता समाना प्रसवबीजात्मकत्वं च तदध्यक्षश्चैकोऽव्याकृतावस्थः। परिच्छिन्नाभिमानिनामध्यक्षाणां च तेनैकत्वमिति पूर्वोक्तं विशेषणमेकीभूतः प्रज्ञानघन इत्याद्युपपन्नम्। तस्मिन्नुक्तहेतुत्वाच्च।

सिद्धान्ती—आतां जोंपर्यंत 'हा माझा प्राण आहे' असा अभिमान आहे, तोंपर्यंत माझा प्राण हा व्याकृत आहे, हें म्हणणें-ठीक आहे. तथापि सुषुप्तीच्या स्थितींत माझ्या प्राणाला 'माझ्या विशेष देहाचा' अभिमान नसतो. (गाढ निद्रा लागली असतां निद्रित जीवाच्या प्राणाला माझा देह आहे, असें भान नसतें, किंवा अभिमान नसतो) म्हणून या अवस्थेंतील प्राणाला अव्याकृतच म्हटल पाहिजे. जीवांना 'हा माझा प्राण' असा जागृतकाळीं अभिमान असतो; पण त्या प्राणाला निद्राकाळीं हा माझा देह असा अभिमान नसतो, ही मुख्य गोष्ट आहे. आणि हींच गोष्ट त्या प्राणाला अव्याकृतता देते. उदाहरणार्थ पहा, कीं ज्या वेळीं मरण प्राप्त होतें, त्याच्या आधीं म्हणजे चांगलेपणीं हा माझा प्राण आहे, असा सर्व जीवांस अभिमान असतो; तरी पण मुमुर्ष झालेल्या जीवांचा देहाभिमान सुटलेला असतो, म्हणून तो प्राण त्यावेळीं अव्याकृत होतो, त्याच्या नामरूपाचा निरोध होतो, हें आपण नित्य पाहतों. हींच स्थिति जिवंतपणीच्या निद्राकालींही असते, म्हणून सुषुप्तींतील देहाभिमानशून्य प्राणाला अव्याकृतता प्राप्त होते. याप्रमाण निद्रेंतील प्राणाचें स्वरूप अव्याकृत असतें, हें उघड आहे. पुनः, दोन्हीं ठिकाणीं प्रसवबीज असतें म्हणजे जागृतींत होणाऱ्या सर्व इंद्रिय मनोव्यापारांचें मूळ कारण निद्रास्थितींत कायम असतें; तसेंच 'अव्याकृता'मध्येंही पुढील होणाऱ्या सृष्टीचें स्वरूपबीज कायमच असतें. शेवटीं निद्रास्थितींतील द्रष्टा प्राज्ञ आणि अव्यक्ताचा द्रष्टा अपरब्रह्म हे उभयताही अव्याकृत असतात. एवंच देहाभिमानशून्यता, बीजावस्था आणि अव्याकृतावस्था हे तिन्ही असाधारण धर्म व्यष्टि–प्राज्ञ व समष्टि–अपर ब्रह्म या उभयतांच्या ठिकाणीं दिसतात. म्हणून ते एकरूप आहेत, प्राज्ञ आणि अव्याकृत एक आहेत, असें ठरतें. या पुढें येणारीं एकीभूत, प्रज्ञानघन इत्यादि विशेषणेंहीं उभयतांच्या ठिकाणीं समान असतात, हें येथें सिद्ध करावयाचें कारण नाहीं. यांची सिद्धि वरील विचारसरणीनें निराबाध होते.

कथं प्राणशब्दत्वमव्याकृतस्य। "प्राणबन्धनं हि सोम्य मनः" इति श्रुतेः। ननु तत्र "सदेव सोम्य" इति प्रकृतं सद्ब्रह्म प्राणशब्दवाच्यम्। नैष दोषः। बीजात्मकत्वाभ्युपगमात्सतः। यद्यपि

सद्ब्रह्म प्राणशब्दवाच्यं तत्र तथाऽपि जीवप्रसवबीजात्मकत्वमपरित्यज्यैव प्राणशब्दत्वं सतः सच्छब्दवाच्यता च। यदि हि निर्बीजरूपं विवक्षितं ब्रह्माभविष्यत् "नेति नेति" "यतो वाचो निवर्तन्ते" "अन्यदेव तद्विदितादथो अविदितात्" इत्यवक्ष्यत्। "न सत्तन्नासदुच्यते" इति स्मृतेः। निर्बीजतयैव चेत्सति लीनानां संपन्नानां सुषुप्तप्रलययोः पुनरुत्थानानुपपत्तिः स्यात्। मुक्तानां च पुनरुत्पत्तिप्रसङ्गः। बीजाभावाविशेषात्।

सि०—आतां, कोणीं अशी शंका घेईल कीं, प्राण शब्दाचा अर्थ अव्याकृत आहे, असें कोठें ही दिसत नाहीं. पण हें म्हणणें बरोबर नाहीं. श्रुतीमध्यें म्हटलें आहें 'हे सौम्य, मन हे प्राणबंधन आहे.' (सत् नांवाच्या ब्रह्माचें प्राण हे हीं नांव आहे; तें ज्या उपाधीनें बांधलें जातें, ती उपाधि मन होय.) या वरून श्रुतीला प्राण शब्द ब्रह्मार्थी आहे, हें संमत आहे, असें होतें.

शिष्य—हें ठीक; पण अव्याकृताचा उच्चार आपण आतां सांगितलेल्या श्रुतींत नाहीं. तेथें 'हे सौम्य, सत् मात्र' असें म्हटलें आहे व या प्रकारानें केवळ सत् नामक ब्रह्मविषयाचा उच्चार प्राण या पदानें केला आहे. तेथें प्राण म्हणजे ब्रह्म असा अर्थ आहे.

सिद्धान्ती—हें ठीक आहे; पण यानें आमच्या म्हणण्याला बाध येत नाहीं. कारण, ध्यानांत ठेव कीं, हें श्रुत्युक्त सत् बीजात्मक आहे, असा श्रुतीचा अभिप्राय आहे. पुढील सृष्टीचें बीज या सत्स्वरूपांत निविष्ट झालें आहे, असें श्रुतीस सांगावयाचें आहे. यद्यपि या पूर्वोक्त श्रुतींत प्राणशब्दानें सताचा म्हणजे ब्रह्माचा उल्लेख केला आहे, तथापि जीवाच्या उत्पत्तीचें बीज त्या सतांत आहे, हा मुख्य अर्थ सोडून न देतां (जीव-प्रसव-बीजात्मक सत् आहे, असा अर्थ लक्ष्यांत ठेवून) सताला प्राणशब्दानें संबोधिलें आहे. शिवाय, सच्छब्दाचा प्राणार्थी उपयोग केला आहे, त्याअर्थी 'अव्याकृत' हाच अर्थ असला पाहिजे. पहा कीं, जर श्रुतीला निर्बीजरूप ब्रह्माची विवक्षा असती (येथें निर्विकल्प ब्रह्मरूप सांगावयाचें असतें) तर 'नेति नेति (ब्रह्म हें नव्हें, ब्रह्म तें नव्हें),' 'जेथून वाणी परत फिरते (वाणीला ज्या ब्रह्मस्वरूपाचें वर्णन करणें अशक्य आहे),' 'तें ब्रह्मरूप ज्ञात वस्तूहून निराळें आहे, आणि अज्ञात वस्तूहूनही निराळें आहे' असें श्रुतीनें स्पष्ट किंवा अस्पष्टरीतीनें सांगितलें असतें. याचप्रमाणें 'ब्रह्माला सत् किंवा असत् असें कांहींच म्हणता येत नाहीं.' अशी स्मृति आहे. सारांश, निर्विकल्प ब्रह्माचा संबंध आम्ही उद्धृत केलेल्या प्रकरणांतील श्रुतीमध्यें सिद्ध होत नाहीं. असें असूनहीं जर कोणी म्हणेल कीं, या प्रकरणांत निर्विकल्प अथवा निर्बीज ब्रह्माची इष्टापत्ति आहे तर त्याला आम्हीं असें विचारतों कीं, लीन

झालेल्या जीवांस व उपाधिशून्य झालेल्या निद्रितांस निर्बीज निद्रामलयांपासून पुनः जागे होण्याचा किंवा पुनर्जन्म होण्याचा संभव कसा उत्पन्न होईल ! जीवाला निर्बीज ब्रह्माची अवस्था झोपेंत किंवा प्रलयानंतर प्राप्त झाली तर, झोपेतून कोणी जागें होणार नाहीं, किंवा प्रलयानंतर पुनः सृष्टीचा उद्भवही होणार नाहीं. बीजच नाहींसें झालें म्हणजे, पुनः जागें होण्याची किंवा सृष्युत्पत्तीची कथाच संपली. पण असें तर दिसत नाहीं. आपण जागें होतों व प्रलयानंतर सृष्टीची उत्पत्ति होते. तेव्हां बीजाचें अस्तित्व हवेंच आहे. सारांश येथें सत् म्हणजे बीजात्मक प्राण, अव्याकृतना, हाच अर्थ योग्य आहे. आणखी असेंही जर म्हणाल कीं, निर्बीज ब्रह्मापासून सृष्युत्पत्ति होते, तर मुक्त लोकांनाही पुनः जन्म घेण्याचा प्रसंग येईल ! पण असें म्हणणें श्रुतीच्या विरुद्ध आहे. तात्पर्य, आम्ही उद्धृत केलेली श्रुति प्राण या शब्दानें अव्याकृत प्राणाचा बोध करिते, शुद्ध आणि निर्विकार ब्रह्माचा करीत नाहीं.

ज्ञानदाह्यबीजाभावे च ज्ञानानर्थप्रसङ्गः तस्मात्सबीजत्वाभ्युपगमेनैव सतः प्राणत्वव्यपदेशः सर्वश्रुतिषु च कारणत्वव्यपदेशः । अत एव " अक्षरात्परतः परः " । "स बाह्याभ्यन्तरो ह्यजः " । " यतो वाचो निवर्तन्ते " । " नेति नेति " इत्यादिना बीजवत्त्वापनयनेन व्यपदेशः । तामबीजावस्थां तस्यैव प्राज्ञशब्दवाच्यस्य तुरीयत्वेन देहादिसंबन्धरहितां पारमार्थिकीं पृथग्वक्ष्यति । बीजावस्थाऽपि न किंचिदवेदिषमित्युत्थितस्य प्रत्ययदर्शनादेहेऽनुभूयत एवेति त्रिधा देहे व्यवस्थित इत्युच्यते ॥ २ ॥

सिद्धान्ती—शिवाय, ज्ञानानें ज्या बीजाचा (अज्ञानाचा) नाश व्हावयाचा असतो, तें अज्ञानबीजच सुषुप्तींत व प्रलयांत राहत नसेल तर, ब्रह्मज्ञान करून घेण्याचें कारण नाहींसें होईल. अज्ञानाचें जर वास्तव्य नाहीं,तर त्याचा नाश करणाऱ्या ब्रह्मज्ञानाचा तरी काय उपयोग आहे ! कांहीं नाहीं, असें होऊन ब्रह्मज्ञान विनाकारण अवतीर्ण झालें, असें होईल. पण असें तर कोणी म्हणणार नाहीं. शिवाय 'मी अज्ञ आहें' असा सर्वांचा अनुभव आहे. म्हणून अज्ञान बीज नाहीं असें म्हणतां येत नाहीं. या सर्व गोष्टींचा विचार करितां असें निश्चित ठरतें कीं, जेथें जेथें श्रुतीनें सताला प्राण शब्दानें संबोधिलें आहे, तेथें तेथें अज्ञानाचें बीज आहे, असें समजूनच (सताला प्राणशब्दानें संबोधून) श्रुतीनें सत् हें सर्वकारण आहे, असें सांगितलें आहे. आणि म्हणूनच 'अव्याकृत अक्षराहून निराळा (विलक्षण)' 'अंतर्बाह्य एकरूप आणि अजन्मा' 'जेथून वाणी परत फिरतात' 'हें ब्रह्म नाहीं, तें ब्रह्म नव्हे,' इत्यादि वाक्यें अज्ञान-बीजाचा निरास झाला आहे, असें शुद्धब्रह्मासंबंधें स्पष्ट सांगतात; सारांश, ब्रह्मांत सर्व आरोपांचा नाश झाला आहे, असें सुचवितात. पुनः आणखी; प्राज्ञ हीं जी चारवस्तु

तिचीच पारमार्थिक अवस्था निर्बीज अवस्था आहे, स्थूल-सूक्ष्मादि-संबंध-रहित तुरीयावस्था तीच आहे,असें पुढें सांगावयाचें आहे. शेवटीं, झोपेंतून जागा झालेला पुरुष 'मला निद्रेमध्यें कांहीं ज्ञान नव्हतें' असें म्हणतो, असा आपल्या सर्वांस या देहामध्येंच प्रत्यय येतो; म्हणून गाढनिद्रा ही अज्ञानबीजाची अवस्था आहे हें सिद्ध होतें. याप्रमाणें एकच आत्मा जागृत, स्वप्न आणि सुषुप्ति अवस्थात्रयांत विश्व, तैजस आणि प्राज्ञ या स्वरूपांनीं गोचर होतो. ही व्यष्टीची (एका व्यक्तीची) गोष्ट झाली. समष्टीमध्येंही (सर्व चराचर सृष्टि संघटित आहे असें धरून जी अवस्था सृष्टीची होते, त्या अवस्थेमध्येंही) एकच आत्मा स्थूल समष्टि, सूक्ष्म समष्टि आणि अव्याकृत समष्टि ह्या तिन्ही अवस्थांत विराट्, हिरण्यगर्भ आणि प्राण या स्वरूपांनीं श्रुतिगोचर होतो; आणि उपाधी काढून टाकल्या म्हणजे एकच आत्मा आहे असें सिद्ध होतें. ॥ २ ॥

रंगरामानुज—एकाच देहांत भगवान् तीन स्वरूपांनीं राहतो.

माध्व—एकच परमात्मा तीन स्थानीं तीन स्वरूपांनीं एकाच देहांत राहतो.

मंत्र तिसरा.

विश्वो हि स्थूलभुङ्नित्यं तैजसः प्रविविक्तभुक्।
आनन्दभुक्तथा प्राज्ञस्त्रिधा भोगं निबोधत ॥ ३ ॥

अन्वय व अर्थः—हि विश्वः नित्यं स्थूलभुक्, तैजसः प्रविविक्तभुक्, तथा प्राज्ञः आनंदभुक्, त्रिधा भोगं निबोधत, (विश्व हा नित्य स्थूलाचा उपभोग घेणारा, तैजस हा नित्य सूक्ष्मरूपी वासनांचा उपभोग घेणारा व प्राज्ञ हा नित्य आनंदाचा उपभोग घेणारा असतो; याप्रमाणें तीन प्रकारचे, तीन निरनिराळे भोग एकालाच आहेत असें जाणा.)

सारांश, विश्व स्थूलविषयभोगी, तैजस सूक्ष्मविषयभोगी, आणि प्राज्ञ आनंदैकविषयभोगी, आहेत असें (स्थूल, सूक्ष्म आणि आनंद हे तीन तिघांचे भोग आहेत हें) जाणून घ्यावें. ॥ ३ ॥

माध्व—विश्वादिकांचे स्थूलभोगादि त्रिविध भोग आहेत.

मंत्र चवथा.

स्थूलं तर्पयते विश्वं प्रविविक्तं तु तैजसम्।
आनन्दश्च तथा प्राज्ञं त्रिधा तृप्तिं निबोधत ॥ ४ ॥

अन्वय व अर्थः—स्थूलं विश्वं तर्पयते; तु प्रविविक्तं तैजसं; तथा च आनंदः प्राज्ञ; त्रिधा तृप्तिं निबोधत (स्थूलानें विश्वाला, सूक्ष्मानें तैजसाला, आनंदानें प्राज्ञाला आनंद होतो, तृप्ति होते, हें जाणा.)

सारांश स्थूल, सूक्ष्म आणि स्थूलसूक्ष्मशून्य आनंद हीं अनुक्रमें, विश्व, तैजस आणि प्राज्ञ या तिघांत समाधानवृत्ति उत्पन्न करितात ॥ ४ ॥

उक्तार्थौ श्लोकौ ॥ ३ ॥ ४ ॥

ह्यांचा अर्थ मागेंच स्पष्ट केला आहे, म्हणून येथें आचार्यांचें भाष्य नाहीं.

मंत्र पांचवा.

त्रिषु धामसु यद्भोज्यं भोक्ता यश्च प्रकीर्तितः ।
वेदैतदुभयं यस्तु स भुञ्जानो न लिप्यते ॥ ५ ॥

अन्वय व अर्थः—त्रिषु धामसु यत् भोज्यं, यः च भोक्ता प्रकीर्तितः (तीन वसतिस्थानांमध्यें ज्या तीन निरानिराळ्या भोज्य वस्तु सांगितल्या आणि तीन भोक्ते सांगितले, सारांश भोज्य आणि भोक्ता यांचें संकीर्तन केलें) यः तु एतत् उभयं वेद, सः भुञ्जानः न लिप्यते (हें भोज्य आणि हा भोक्तेपणा या दोन्ही गोष्टी ज्यास उत्तम समजल्या, तो भोगांचें सेवन करीत असतांही, भोगानें किंवा भोक्तृत्वानें लिप्त होत नाहीं) ॥ ५ ॥

त्रिषु धामसु जाग्रदादिषु स्थूलप्रविविक्तानन्दाख्यं भोज्यमेकं त्रिधाभूतम् । यश्च विश्वतैजसप्राज्ञाख्यो भोक्तैकः सोऽहमित्येकत्वेन प्रतिसंधानाद्दृष्टृत्वाविशेषाच्च प्रकीर्तितः । यो वेदैतदुभयं भोज्यभोक्तृतयाऽनेकधा भिन्नं स भुञ्जानो न लिप्यते । भोज्यस्य सर्वस्यैकस्य भोक्तुर्भोज्यत्वात् । न हि यस्य यो विषयः स तेन हीयते वर्धते वा । न ह्यग्निः स्वविषयं दग्ध्वा काष्ठादि तद्वत् ॥ ५ ॥

सिद्धान्ती—जागृति आदि तीन अवस्थांत अनुक्रमें स्थूल, प्रविविक्त आणि आनंद या नांवाच्या भोज्य वस्तु असतात; पण भोज्य-वस्तु-दृष्टीनें त्या एकरूप असतात; तसेंच या तिन्ही अवस्थांत अनुक्रमें विश्व, तेजस आणि प्राज्ञ हे तीन भोक्तेही वस्तुतः एकच आत्मा असतो.

शिष्य—तो एक आहे. कारण, जो मी निजलों होतों, किंवा ज्या मला स्वप्न पडत होतें; तोच मी जागा आहें' असें अनुसंधान नित्य प्रत्ययास येतें; म्हणून व

विश्व-तैजसादिकांचा असाधारण जो द्रष्टृ-स्वभाव तो एकच आहे म्हणून, (विश्व तैजसादिक तिन्ही अवस्था उपाधिवशात् एकाच आत्म्याला होतात म्हणून) तो एक आहे, असें आपलें म्हणणें ?

सिद्धान्ती—होय. याप्रमाणें तिन्ही भोग एकस्वरूप आहेत, आणि तिन्ही भोक्ते स्वरूपतः एक आहेत, असें ज्ञान ज्यास झाल, भोज्य आणि भोक्तृत्व यांचें भिन्नत्व उपाधिजन्य मात्र आहे, हें ज्यास समजलें, तो भोगाचा अनुभव घेत असतांही भोगांनीं किंवा भोक्तृत्वपणानें लिप्त होत नाहीं. कारण, सर्व भोज्य एकात्मक भोक्त्यानें भोगावयाचें असतें, व भोज्य व भोक्ता उपाधिजन्य आहेत, हें त्याला कळतें. अर्थात् उपाधिशून्य आपण भोज्याहून आणि भोक्तेपणाहून निराळे आहों, असें ज्ञान, या ज्ञानी पुरुषाला झालेलें असतें. सारांश, भोज्य आणि भोक्तृत्व या गोष्टी त्याच्या ज्ञानाचे विषय होतात. आतां, असा एक सिद्धांत आहे कीं, जो पदार्थ ज्याच्या ज्ञानाचा विषय असतो, तो पदार्थ त्या ज्ञानी पुरुषाला कमी करीत नाहीं, किंवा जास्तीही करीत नाहीं. अग्नीचा विषय जे काष्ठादि पदार्थ ते अग्नीनें जाळून टाकले, तरी अग्नि कमी होत नाहीं किंवा काष्ठादि पदार्थ मिळाले म्हणून तो ज्यास्तीही होत नाहीं. पदार्थ मिळाले तर तो जाळील, न मिळाले तर जाळण्याचें कर्म करणार नाहीं; पण स्वरूपानें अग्नि जशाचा तसाच राहील. म्हणजे दाहकशक्ति हें जें त्याचें स्वरूप, तें कमी किंवा ज्यास्ती होत नाहीं. या न्यायानें भोज्य पदार्थ कमी अधिक झाले म्हणून किंवा भोक्तेपणा कमी ज्यास्त झाला म्हणून ज्ञानरूप पुरुष कमी ज्यास्त होतो, विकृत होतो, लिप्त होतो, असा भाग नाहीं. ॥ ५ ॥

रंगरामानुज—परमेश्वर फलदाता आहे, भोगभोक्ता मी नाहीं, परमेश्वर आहे, असा निश्चय होऊन ज्ञानी जीव अविकृत राहतो.

माध्व—हाच अर्थ आहे. धामः=गृह.

मंत्र सहावा.

प्रभवः सर्वभावानां सतामिति विनिश्चयः।
सर्वं जनयति प्राणश्चेतोंऽशून्पुरुषः पृथक् ॥ ६ ॥

अन्वय व अर्थः—सर्वभावानां सतां प्राणः प्रभवः इति विनिश्चयः सर्वं जनयति, पृथक् पुरुषः चेतोंशून् जनयति (सर्व सद्रूपी वस्तूंचें उत्पत्तिस्थान प्राण आहे; तो सर्वांस उत्पन्न करितो; तोच पुरुष निरनिराळे जीव—सर्व चराचर सृष्टि—स्वरूपानुसार आपल्या ज्ञान किरणांनीं निर्माण करितो) ॥ ६ ॥

सतां विद्यमानानां स्वेनाविद्याकृतनामरूपमायास्वरूपेण सर्वभावानां विश्वतैजसप्राज्ञभेदानां प्रभव उत्पत्तिः । वक्ष्यति च—" वन्ध्यापुत्रो न तत्त्वेन मायया वाऽपि जायते " इति । यदि ह्यसतामेव जन्म स्याद्ब्रह्मणो व्यवहार्यस्य ग्रहणद्वाराभावादसत्त्वप्रसङ्गः । दृष्टं च रज्जुसर्पादीनामविद्याकृतमायाबीजोत्पन्नानां रज्ज्वाद्यात्मना सत्त्वम् । न हि निरास्पदा रज्जुसर्पमृगतृष्णिकादयः क्वचिदुपलभ्यन्ते केनचित् । यथा रज्ज्वां प्राक्सर्पोत्पत्ते रज्ज्वात्मना सर्पः सन्नेवाऽऽसीत् । एवं सर्वभावानामुत्पत्तेः प्राक्प्राणबीजात्मनैव सत्त्वम । इत्यतः श्रुतिरपि वक्ति—" ब्रह्मैवेदम् " " आत्मैवेदमग्र आसीन् " इति । सर्वं जनयति प्राणश्चेतोऽशूनंशव इव रवेश्चिदात्मकस्य पुरुषस्य चेतोरूपा जलार्कसमाः प्राज्ञतैजसविश्वभेदेन देवातिर्यगादिदेहभेदेषु विभाव्यमानाश्चेतोंशवो ये तान्पुरुषः पृथग्विषयभावविलक्षणान्अग्निविस्फुलिङ्गवत्सलक्षणाञ्जलार्कवच्च जीवलक्षणांस्तिवतरान्सर्वभावान्प्राणो बीजात्मा जनयति यथोर्णनाभिः । " यथाऽग्नेर्विस्फुलिङ्गाः " इत्यादिश्रुतेः ॥ ६ ॥

सिद्धान्ती—आपण स्वतः अधिष्ठान राहून आपल्या स्वतःच्या अविद्येनें उत्पन्न केलेल्या नामरूपादि मायास्वरूपाच्या साहाय्यानें येथें व इतरत्र विद्यमान असणाऱ्या सर्व व्यावहारिक सत् वस्तूंची, विश्व, तैजस, प्राज्ञ भेदांची, उत्पत्ति, प्राणापासून (मागें सांगितलेल्या सद्रूपी ब्रह्मापासून) होते. त्याचप्रमाणें जडाचीही उत्पत्ति तेथूनच होते. पुढेंही सांगतील कीं,–'स्वरूपतः किंवा मायेचें ग्रहण करूनही इंद्रजालादि मंत्रातंत्रांनीं वंध्यापुत्र केव्हांही निर्माण होणें शक्य नाहीं.' वंध्येचा पुत्र असणें, जिला पुत्र होणें शक्य नाहीं तिचा हा पुत्र आहे, असें म्हणणें, सर्वथा शून्यरूपापासून किंवा अत्यंत अभावापासून भावरूप पदार्थ होणें, हें सर्वथा अशक्य आहे. आतां, जर असताचा जन्म झाला, भावरूपानें नव्हतां ती वस्तु अस्तित्वांत आली, असें म्हणाल तर या असतायें कारण जें ब्रह्म त्यालाही असत्व प्राप्त होऊन ब्रह्मच नाहीं असें म्हणावें लागेल. कारण, ब्रह्मवस्तूचें ज्ञानग्रहण करण्याला साधनीभूत असणारें जें सत्, जो कार्यप्रपंच त्याचाच अभाव आहे, असें आक्षेपक म्हणतो. ह्यावरून ब्रह्मज्ञान होण्यायें साधन नाहीं असें होतें. अर्थात ब्रह्म नाहीं असें म्हणावें लागतें.

(शून्यापासून ही सर्व सृष्टि उत्पन्न झाली, असें म्हणणाऱ्या पक्षाचा येथें विचार केला आहे. दिसणाऱ्या सृष्टीची उत्पत्ति ह्या सृष्टीचें बीज नसतांनाही झाली, असें किंवा

निर्बीजापासून वृक्ष उत्पन्न झाला असें म्हटलें तर कारणस्वरूपाप्रमाणें कार्यस्वरूप असतें हा सिद्धांत घेऊन व कार्यावरून कार्याचें अनुमान करितां येतें, असें सत्य स्वीकृत करून असें ठरतें कीं, असतापासून उत्पन्न झालेला प्रपंच असत् आहे व यावरून या लिंगाच्या साधनानें, कारणब्रह्म पाहूं गेल्यास तेंही असत् होईल. पण कार्यप्रपंच दिसतो तेव्हां कारण ब्रह्म आहे, असें ठरतें. असो; पण सताची उत्पत्ति असतापासून होते, हें म्हणणें कोणत्याही पक्षास मान्य नाहीं.)

पुनः व्यवहारांत आपल्याला असें दिसतें कीं, अज्ञानानें निर्माण केलेल्या, माया-बीजानें (भ्रांतीनें) अस्तित्वांत आलेल्या, रज्जु-सर्पादि भ्रांतीचें अधिष्ठान रज्ज्वादि रूपानें विद्यमान असतें. रज्जु असेल तर तिच्यावर सर्पाची भ्रांति होईल. असा केव्हांही अनुभव नाहीं कीं, रज्जु नसतांना रज्जुसर्पभ्रांति झाली, शुक्तिका नसतांना शुक्ति-रजताची भ्रांति झाली किंवा प्रखर सूर्याचे किरण नसतांना वालुकामय प्रदेशावर मृगजलाची भ्रांति झाली! भ्रांतींतील सर्पाची उत्पत्ति होण्यापूर्वी रज्जूमध्यें रज्जुरूपानें भ्रांतिरूप सर्प होता म्हणून सर्पभ्रांति होते. याप्रमाणें मूळांत कांहीं बीज असेल तर पुढें पदार्थांची उत्पत्ति होते, असा सिद्धांत आहे. म्हणून सर्व वस्तूंची उत्पत्ति होण्या-पूर्वी त्यांच्यामध्यें बीजरूपानें प्राण विद्यमान असतो. प्राणामध्येंच सर्वांचें बीज असतें. सारांश, सर्व वस्तु बीजरूपानें व्यावहारिकतः नित्य असतात हें ठरतें. म्हणून श्रुति मुद्दाम हेंच म्हणते, 'हें सर्व ब्रह्म आहे' 'हें सर्व पूर्वी आत्मस्वरूपच होतें' तात्पर्य सद्बीजापासून सर्व सद्वस्तूंची उत्पत्ति होते.

प्राण हा सर्वांचें उत्पत्तिस्थान व उत्पत्तीचें निमित्त आहे. आतां, ज्याप्रमाणें सूर्य किरणरूपांनीं परिणत होतो, त्याप्रमाणें चिद्रूपी पुरुष (परमात्मा) चेतोरूप अनंत-जीव उत्पन्न करितो. रविकिरण जलामध्यें जाऊन अनंत सूर्य-प्रतिबिंबें उत्पन्न करितात त्याप्रमाणें प्राज्ञ, तैजस आणि विश्व अशा स्वरूपांनीं भिन्न होऊन प्राणरूपी अव्याकृताचा अध्यक्ष जो सूर्यरूपी पुरुषोत्तम तो देव, मनुष्य, पशुपक्ष्यादि भिन्न दिसणाऱ्या जीवांची (ज्ञानरूपी परिच्छिन्न किरणांची) उत्पत्ति करितो. ही उत्पत्ति अनंत प्रकारची असते. उत्पत्तीचे विषय (जीव) निराळे आणि विषय-धर्मही निरनिराळे असतात. तात्पर्य ही जीव-सृष्टि विलक्षण असते. तथापि अग्नीचे स्फुलिंग अग्निस्वरूप असतात, जलांतील सूर्य प्रतिबिंबें रविसदृश असतात; त्याप्रमाणें जीव-स्वरूप असणारे चर पदार्थ पुरुषोत्तमसदृश म्हणजे ज्ञानवान् असतात. पण अस्तित्वस्वरूप असणारे इतर पदार्थ मात्र प्राण म्हणजे बीजात्मा हाच उत्पन्न करितो. मुण्डकोपनिषदांत ऊर्णनाभीचा (कोळ्याचा) व अग्निस्फुलिंगाचा, असे दृष्टांत दिले आहेत, तेही या श्रुतीला अनुसरूनच म्हणतात कीं, बीजात्मक प्राणापासून (अव्याकृतापासून) जड सृष्टीची उत्पत्ति झाली, व जीवसृष्टि ही परमेश्वराची अंशरूप आहे. तात्पर्य, सतापासून या व्यावहारिक चराचर सतांची उत्पत्ति झाली. ॥ ६ ॥

रंगरामानुज—सर्व जनयति=ईश्वर सर्वांची उत्पत्ति करितो, हे शब्द स्पष्ट सांगतात कीं, विवर्तवाद ठीक नाहीं. पुरुषः=पूर्ण षड्गुणैश्वर्यसंपन्न विश्व-तैजसादि चार स्वरूपांचा हरि. चेतोंशून्=जीव, देवदानवादि भिन्नप्रकारक ज्ञानरश्मियुक्त जीव. याप्रमाणें परमेश्वरानें सत्यसृष्टि निर्माण केली, असा साधु पुरुषांचा निश्चय आहे.

माध्व—अभिप्राय वरप्रमाणें. चेतनाचेतनांचा उत्पादक हरि हा सिद्धांत. इतर बोलणें अपसिद्धांत. प्राण=सर्वप्रणेता. जड वस्तु स्वरूपतः व जीव देहद्वारा हरि उत्पादितो.

मंत्र सातवा.

विभूतिं प्रसवं त्वन्ये मन्यन्तेसृष्टिचिन्तकाः ।
स्वप्नमायासरूपेति सृष्टिरन्यैर्विकल्पिता ॥ ७ ॥

अन्वय व अर्थः—**अन्ये सृष्टि-चिंतकाः तु प्रसवं विभूतिं मन्यन्ते** (कित्येक सृष्टिचिंतक—सृष्टीच्यां स्वरूपासंबंधानें चिकित्सा करणारे विद्वान्—असें मानतात कीं, ही सृष्टि परमेश्वराच्या ऐश्वर्याचा विस्तार आहे) **स्वप्न-मायासरूपा सृष्टिः इति अन्यैः विकल्पिता** (पण कल्पिलेले हे सृष्टिविषयक तर्क स्वप्नमायेच्या स्वरूपासारखे असत्य आहेत व सृष्टि ही मायावी पुरुषाच्या गंधर्वनगरीप्रमाणें विकल्पित व मिथ्या आहे, असें कांहीं लोक म्हणतात) ॥७॥

विभूतिर्विस्तार ईश्वरस्य सृष्टिरिति सृष्टिचिन्तका मन्यन्ते न तु परमार्थचिन्तकानां सृष्टावादर इत्यर्थः । " इन्द्रो मायाभिः पुरुरूप ईयते " इति श्रुतेः । न हि मायाविनं माकाशे निक्षिप्य तेन सायुधमारुह्य चक्षुर्गोचरतामतीत्य युद्धेन खण्डशश्छिन्नं पतितं पुनरुत्थितं च पश्यतां तत्कृतमायादिसत्तत्त्वचिन्तायामादरो भवति । तथैवायं मायाविनः । सूत्रप्रसारणसमः सुषुप्तस्वप्नादिविकासस्तदारूढमायाविसमश्च तत्स्थः प्राज्ञतैजसादिः सूत्रतदारूढाभ्यामन्यः परमार्थमायावी । स एव भूमिष्ठो मायाछन्नोऽदृश्यमान एव स्थितो यथा तथा तुरीयाख्यं परमार्थतत्त्वम् । अतस्ताच्चिन्तायामेवाऽऽदरो मुमुक्षूणामार्याणां न निष्प्रयोजनायां सृष्टावादर इत्यतः सृष्टिचिन्तकानामेवैते विकल्पा इत्याह—स्वप्नमायासरूपेति । स्वप्नसरूपा मायासरूपा चेति ॥ ७ ॥

सिद्धान्ती—जे केवळ सृष्टिचिंतक आहेत, ते असा सिद्धांत करितात कीं, सृष्टि हा परमेश्वराच्या माहात्म्याचा विस्तार आहे. आतां जे खरोखर परमार्थाचें चिंतन करणारे आहेत, त्यांना या दृश्य सृष्टीविषयीं कोणत्याही प्रकारचा आदर वाटत नाहीं. 'अनेक माया उत्पन्न करून त्यांच्या साहाय्यानें ईद्र हा अनेक स्वरूपें धारण करितो.' अशी श्रुति आहे. आतां एखाद्या मायावी पुरुषानें आकाशांत दोरी लावून तिच्या साहाय्यानें आयुधें घेऊन तो वर चढला, तो इतका कीं आपल्यास दिसेनासा झाला, तेथें युद्ध करित असतां त्याच्या शरीराचीं अनेक खंडें विखंडें झालीं, तो तसाच छिन्नविच्छिन्न खालीं पडला आणि पुनः जिवंत झाला, असें हें सर्व नाटक पाहणाऱ्या पुरुषांस त्यानें केलेल्या मायादिकांचे ठिकाणीं तत्त्वपूर्वक विचार करण्याचा आदर केव्हांही वाटत नाहीं. ती केवळ माया आहे, असें म्हणून आपण या सर्व नाटकासंबंधानें उदासीन असतो. हा नित्यानुभव आहे. त्याचप्रमाणें सुषुप्त, स्वप्न, जागृतादि पुरुषोत्तमनिर्मित माया-विस्तार जादूगाराच्या दोरी टाकण्याप्रमाणें असत्य आहे, त्याच्यावर आरूढ झालेला आत्मा मायावीप्रमाणें असून व्यवहारसूत्र (संसार) आणि त्याच्यावर आरूढ झालेल्या पदार्थांहून (सृष्टि आणि तिचे अध्यक्षत्व असणारे प्राज्ञ-तैजसादि स्वरूपांहून) निराळा असणारा हा परमार्थ मायावी आहे. सारांश, परमार्थ आत्मा या सर्वांपासून भिन्न आहे, असें आपण समजावयाचें आहे. तो जादुगार मायावी जसा केव्हां भूमिस्थानीं, केव्हां मायेनें झांकलेला, केव्हां अदृश्य झालेला, असा असतांही भूमीवर स्वरूपतः असतो, त्याप्रमाणें तुरीय नांवाच्या परमार्थतत्त्वाची स्थिति आहे. तो पुरुषोत्तम सर्वदा वियमान आहे. म्हणून या परमार्थस्वरूपाचें शोधपूर्वक चिंतन करण्याचे कामीं, त्याचें ज्ञान करून घेण्याचे कामीं मात्र, श्रेष्ठ मुमुक्षूंचा आदर असतो. पण ज्यापासून कोणतेंही प्रयोजन सिद्ध होत नाहीं, त्या सृष्टीच्या ठिकाणीं या मुमुक्षूंचा आदर केव्हांही नसतो. म्हणून परमार्थचिंतन न करणाऱ्या सृष्टि-चिंतकांचे मात्र हे विकल्प म्हणजे तर्कवितर्क आहेत, आणि स्वप्नामध्यें किंवा मायेमध्यें जितका सत्याचा अंश असतो, तितकाच अंश या सृष्टिशास्त्रांचे तर्कवितर्कांमध्यें आहे, असें समजावें. तात्पर्य, या सर्व स्वतःच्या निराधार कल्पना आहेत, म्हणून त्यांचा त्याग करावा, असें दुसऱ्या अर्धाचें तात्पर्य आहे. ॥ ७ ॥

रंगरामानुज—ब्रह्मस्वरूपाचा एक जड परिणाम होतो, आणि जीवात्मरूपानें ब्रह्मच परिणत होतें, असें यथार्थ स्वरूप न जाणणारे सृष्टिचिंतक म्हणतात. विवर्तवादी सृष्टि ही स्वप्नवत् व मायावत् आहे, व जागृतींतील सृष्टि मायावीची माया आहे; असें म्हणतात, तेंही अयथार्थ होय.

माध्व—भगवान् उपादानकारण नाहीं, निमित्तकारण आहे. स्वतःच्या इच्छामात्रेंकरून सर्व तो सृष्टि उत्पन्न करितो, असें पुढें स्पष्ट सांगणार आहेत. भगवद्विभूति हें प्रसवकारण आहे, असें भास्कर मानितात, पण हा पक्ष खोटा; कारण 'परमे-

श्वर हा विकारशून्य आहे' असा उपनिषदभिप्राय आहे. तसेंच, प्रच्छन्नबौद्धांत जो स्वप्नमायादि पक्ष तोही असत् आहे. कारण सर्वशक्ति परमेश्वराला माया असणें किंवा सर्वज्ञाला स्वप्न पडणें, शक्य नाहीं. परमेश्वरानें सृष्टि निर्मिली, अशी श्रुति आहे. अनंत व अचिंत्य सामर्थ्याच्या हरीला मायेनें अडविणें संभवत नाहीं, हें युक्ति सांगते, स्मृति म्हणते, व श्रीमद्व्यासही ब्रह्मसूत्रांत मायावादाचा निषेध करितात, म्हणून अद्वैत्याचा मायापक्ष उपेक्ष्य होय.

मंत्र आठवा.

इच्छामात्रं प्रभोः सृष्टिरिति सृष्टौ विनिश्चिताः ।
कालात्प्रसूतिं भूतानां मन्यन्ते कालचिन्तकाः ॥ ८ ॥

अन्वय व अर्थः—इच्छामात्रं प्रभोः सृष्टिः इति सृष्टौ विनिश्चिताः (ही सर्व सृष्टि परमेश्वराच्या संकल्पानें मात्र झाली आहे, असाही सृष्टि-संबंधानें कित्येकांनीं सिद्धांत केला आहे) **कालात् भूतानां प्रसूतिः, कालचिंतकाः मन्यन्ते** (कालाचे चिंतन करणारे म्हणतात कीं, ही सृष्टि कालापासूनच उत्पन्न झाली आहे.) ॥ ८ ॥

इच्छामात्रं प्रभोः सत्यसंकल्पत्वात्सृष्टिर्घटादिः संकल्पनामात्रं न संकल्पनातिरिक्तम् । कालादेव सृष्टिरिति केचित् ॥ ८ ॥

सिद्धान्ती—कित्येक असें म्हणतात कीं, परमेश्वर हा सत्यसंकल्प आहे. आणि संकल्परूपमात्र ही सृष्टि असते, संकल्पापलीकडे, संकल्पापेक्षां ज्यास्त कांहीं एक नसतें. मनांत घटादि उत्पन्न करण्याचा संकल्प करावा, तसा हा सृष्टीच्या वियमानत्वाचा प्रकार आहे. घटकार घट करण्याचा संकल्प करून मग घट सिद्ध करितो, तसा प्रकार येथें नाहीं. तात्पर्य, ही सृष्टि ईश्वराच्या मनाचा विलास आहे. तसेंच ज्योतिषी म्हणतात कीं, ही सृष्टि कालापासून मात्र उत्पन्न झालेली आहे ॥ ८ ॥

रंगरामानुज—केवळ इच्छामात्रेंकरून, अनायासानें ही सृष्टि निर्विकारी प्रभूनें सहज निर्मिली, असा उपनिषदांचा निश्चय आहे. कालांत यदृच्छा, नियति, स्वभाव इत्यादिकांचा अंतर्भाव होतो.

माध्व—ब्रह्मादि देव 'इच्छामात्रसृष्टि' असें म्हणतात. सारांश, जगज्जन्मादि जें ब्रह्मसूत्र आहे, त्याचाच हा अनुवाद होय. हे आचार्य म्हणतात;—मध्येंमध्यें सिद्धांतवर्णन करून पूर्वपक्षांचें संकीर्तन केलें आहे, तें ज्ञानभीरु लोकांसाठीं होय. हे लोक पूर्वपक्षांच्या गर्दीनें गडबडतील, म्हणून मध्यें मध्यें सिद्धांतपक्ष दिला आहे. असो; कालप्रसूति

हाही पक्ष खोटा आहे. कालांत रुद्र, ब्रह्मदेव, प्रधान इत्यादिकांचा संग्रह आहे. काल व प्रधान जड, रुद्र, ब्रह्मा उत्पत्तिप्रलयकाळीं असत नाहींत, म्हणून हे पक्ष खोटे. केवळ नारायण हा सृष्टिनिर्माता, सृष्टिनियंता व सृष्टिप्रलयकारी, हा पक्ष खरा आहे.

मंत्र नववा.

भोगार्थं सृष्टिरित्यन्ये क्रीडार्थमिति चापरे।
देवस्यैष स्वभावोऽयमाप्तकामस्य का स्पृहा ॥ ९ ॥

अन्वय व अर्थः—अन्ये भोगार्थं सृष्टिः इति, च अपरे क्रीडार्थं इति (कांहीं लोक म्हणतात कीं, ही सृष्टि भोगासाठीं आहे व दुसरे म्हणतात कीं, क्रीडा करण्यासाठीं आहे.) **एषः देवस्य अयं स्वभावः** (खरोखर पाहतां ही सृष्टि हा देवाचा स्वभाव आहे.) **आप्तकामस्य का स्पृहा** (जो पूर्णकाम आहे त्याला कशाची इच्छा असणार ?) ॥ ९ ॥

भोगार्थं क्रीडार्थमिति चान्ये सृष्टिं मन्यन्ते। अनयोः पक्षयोर्दूषणं देवस्यैष स्वभावोऽयमिति। देवस्य स्वभावपक्षमाश्रित्य सर्वेषां वा पक्षाणामाप्तकामस्य का स्पृहेति। न हि रज्ज्वादीनामविद्यास्वभावव्यतिरेकेण सर्पाद्याभासत्वे कारणं शक्यं वक्तुम् ॥ ९ ॥

सिद्धान्ती—कांहीं लोक असें म्हणतात कीं, ही सृष्टि भोगाप्रीत्यर्थ उत्पन्न झाली आहे. कोणी म्हणतात कीं ही परमेश्वरानें क्रीडा करण्याकरितां निर्माण केली आहे. या दोन्ही पक्षांचें खंडन पुढील श्लोकार्धांत केलें आहे. तें असें कीं सृष्टि हा देवाचा स्वभाव आहे. येथें देवाच्या स्वभावाचा पक्ष अंगीकृत करून इतर सर्व पक्षांचें खंडन केलें. पूर्णकाम जो परमेश्वर त्याला कशाची इच्छा असणार आहे ? असें म्हणून सर्व पक्षांचें खंडन केलें. शिवाय रज्ज्वादिकांवर सर्पादिकांचा जो आभास होतो; त्याला भ्रांतीशिवाय दुसरें कारण जसें सांगतां येत नाहीं, त्याप्रमाणें परमेश्वरावर जो सृष्टीचा आभास होतो, त्याला परमेश्वराच्या, मायेशिवाय, स्वभावाशिवाय, दुसरें आणखी कांहींही कारण सांगतां येणें शक्य नाहीं. मायेचा आश्रय केल्याविना स्वप्न, माया, इच्छा, क्रीडा, भोग इत्यादिकांची व कालाची संगति आत्मकाम व नित्य पुरुषाशीं लागत नाहीं. एवंच सृष्टि उत्पन्न करणें इत्यादि व्यापार हा देवाचा स्वभाव (म्हणजे माया) होय. मायेनें सृष्टि-व्यापार चालविला आहे ॥ ९ ॥

रंगरामानुज—देवस्य=क्रीडा करणें हें आहे शील ज्याचें त्या देवाचा स्वभावच सृष्टि उत्पन्न करणें हा आहे.

माध्वः—विष्णूला असमाधान झालें म्हणून भोगासाठीं त्यानें सृष्टि निर्मिली, हा पक्ष असत्; कारण विष्णु आप्तकाम आहे. आलस्यपरिहारार्थ विष्णूनें हें विश्व उत्पन्न केलें, असें रामानुज म्हणतात, तेंही असत् होय. खरेंच आहे, पूर्णकामाला स्पृहा कशी असणार! सृष्टि उत्पन्न-विनष्ट करणें हा ईश्वराचा स्वभावच आहे. त्याला कार्यप्रयोजनाची अपेक्षा नसते. आतां भक्तांस आपलें स्वरूप समजावें, हा एक हेतु असतो, पण तें परप्रयोजन होय, स्वप्रयोजन नाहीं.

प्रथमखंड समाप्त.

चतुर्थः पादः क्रमप्राप्तो वक्तव्य इत्याह—नान्तःप्रज्ञमित्यादिना। सर्वशब्दप्रवृत्तिनिमित्तशून्यत्वात्तस्य शब्दानभिधेयत्वमिति विशेषप्रतिषेधेनैव च तुरीयं निर्दिदिक्षति। शून्यमेव तर्हि तत्। न। मिथ्या विकल्पस्य निर्निमित्तत्वानुपपत्तेः। न हि रजतसर्पपुरुषमृगतृष्णिकादिविकल्पाः शुक्तिकारज्जुस्थाणूषरादिव्यतिरेकेणावस्त्वास्पदाः शक्याः कल्पयितुम्।

सिद्धान्ती—येथून पुढें क्रमानें प्राप्त झालेल्या चवथ्या पादाविषयींचा विचार करावयाचा आहे. म्हणून श्रुतीनें 'नान्तःप्रज्ञं' इत्यादि मंत्राला आरंभ केला आहे. श्रुतीनें तुरीय पदार्थांचा निर्देश करण्याविषयींचा संकल्प केला आहे, तो सर्व विशेषांच्या निषेधानें मात्र सिद्ध केला आहे. जे कांहीं विशेष धर्म किंवा गुण असतात, किंवा असतील, त्यांच्या निषेधानें मात्र, तुरीयाला परोक्ष रीतीनें दाखवितां येतें. कारण सर्व शब्दांची प्रवृत्ति होण्याचें जें निमित्त (शब्दांची प्रवृत्ति गुणधर्मविशेष दाखविण्यासाठीं होत असते) त्याचा अभाव तुरीयामध्यें असल्यामुळें शब्दानें *तुरीयवर्णन करितां येत नाहीं.

'तर मग तुरीय वस्तु शून्यरूपच झाली.' अशी शंकाही बरोबर नाहीं. कारण सृष्टीच्या स्वरूपासारखा मिथ्या कां विकल्प होईना, पण त्याला कांहीं तरी निमित्त हें असलें पाहिजे. आधार असल्याशिवाय कल्पना उत्पन्न होत नाहीं.

---

* तुरीय ही वस्तु निर्विशेष आहे. इच्या ठिकाणीं गुण नाहीं, धर्म नाहीं; ही कांहीं करीत नाहीं, इला जाति नाहीं, ही व्यक्ति नव्हे, इचा संबंध कशाशींही असत नाहीं, आणि इचा अभाव केव्हांही होत नाहीं, म्हणून इचें वर्णन करावयाला शब्दामध्यें सामर्थ्य नाहीं. शब्द गुण सांगेल, स्वभाव सांगेल, कर्म वर्णन करील, जातीचें निरूपण करील, व्यक्तीचा निर्देश करील, संबंध सांगेल, निदान वस्तूचा अभाव तरी सांगेल. हें सर्व करण्याचें सामर्थ्य शब्दाला आहे. पण त्याला याच्या पलीकडे जातां येत नाहीं. म्हणून तुरीय-स्वरूप-वर्णन करण्याचें सामर्थ्य शब्दाला नाहीं.

सृष्टीची कल्पना आहे, तेव्हां तिचें अधिष्ठान कांहीं तरी असलें पाहिजे. त्याशिवाय कल्पनेची उपपन्नता सिद्ध होत नाहीं. फार लांब कशाला ? रजत (रुपें) हा विकल्प किंवा सर्प, पुरुष, मृगजल इत्यादि कोणताही विकल्प घेतला तरी त्याला शुक्तिका, रज्जु, स्थाणु (खांब किंवा खांदा नसलेला झाडाचा बुंधा), वरड जमीन इत्यादि कांहीं तरी आधार असल्याशिवाय तो तो विकल्प सिद्ध होणें शक्य नाहीं. सत्य शुक्तिका असल्याशिवाय मिथ्या रजताची भ्रांति होत नाहीं. भ्रांतीला सत्य अधिष्ठानाची अपेक्षा असते. तेव्हां सृष्टीच्या मिथ्यात्वाला मूळाशीं सत्याचा आधार पाहिजे. शून्यापासून कोणतीच कल्पना होणें शक्य नाहीं.

एवं तर्हि प्राणादिसर्वविकल्पास्पदत्वात्तुरीयस्य शब्दवाच्यत्वमिति न प्रतिषेधैः प्रत्याय्यत्वमुदकाधारादेरिव घटादेः । न प्राणादिविकल्पस्यासत्त्वाच्छुक्तिकादिष्विव रजतादेः । न हि सदसतोः संबन्धः । शब्दप्रवृत्तिनिमित्तभागवस्तुत्वात् । नापि प्रमाणान्तरविषयत्वं स्वरूपेण गवादिवत् आत्मनो निरुपाधिकत्वाद्गवादिवन्नापि जातिमत्त्वमद्वितीयत्वेन सामान्यविशेषाभावात् । नापि क्रियावत्त्वं पाचकादिवदविक्रियत्वात् । नापि गुणवत्त्वं नीलादिवन्निर्गुणत्वात् ।

सिद्धान्ती—'याप्रमाणें प्राण, हिरण्यगर्भ, विराट् अथवा प्राज्ञ, तैजस, विश्व इत्यादि मिथ्या कल्पनांस जर तुरीयाचा आधार आहे, तुरीय हें जर अधिष्ठान आहे, तर त्याचें शब्दानें वर्णन करितां येणें शक्य आहे. म्हणून 'हें नव्हे, तें नव्हे,' इत्यादि प्रतिषेधांनीं तुरीयाचा निर्देश करणें शक्य नाहीं व योग्यही नाहीं. 'उदकाचा आधार असणारे घटादि पदार्थांचें वर्णन शब्दांनीं करितां येतें. तसें सर्वाधार असणाऱ्या तुरीयाचेंही वर्णन शब्दांनीं करितां आलें पाहिजे.' असा आक्षेप कोणी घेईल, तोही अस्थानीं आहे. कारण शुक्तिकादिकांमध्यें रजतादिकांचें जसें वास्तविक अस्तित्व नसतें, त्याप्रमाणें प्राणादि कोणत्याही विकल्पनांचें पारमार्थिक अस्तित्व तुरीयामध्यें नाहीं. शब्द (वाणी) विकल्पांतच अंतर्भूत होतात, म्हणून तुरीय शब्दागोचर होय. तसेंच सद्वस्तु आणि असद्वस्तु यांमध्यें असा कोणताही सत्य संबंध नाहीं कीं, जो वर्णन करण्यामध्यें शब्दाच्या प्रवृत्तीला प्रेरणा करील. शब्दाची एक प्रवृत्ति संबंध दाखविण्यामध्यें समर्पित होते. येथें संबंधच नाहीं, तेव्हां शब्द बिचारा काय करणार ? बरें, रूढीनें वर्णन करितां येईल, असें म्हणावें तर तेंही शक्य नाहीं. पहा कीं, गाईसारखा गवा असतो, असें म्हणण्याची रूढि आहे. पण गवादिकांचें स्वरूप अन्य प्रमाणांचा विषय असतें, त्याप्रमाणेंही आत्मस्वरूपाची स्थिति नाहीं. कारण आत्मा स्वरूपतः रूपादि उपाधिशून्य आहे. अर्थातच कोणत्याही प्रमाणाला तो गोचर होत नाहीं. आणखी, गवादिकांप्रमाणें त्याला जातिमत्त्वही नाहीं. कारण आत्मा (तुरीयात्मा) अद्वितीय आहे. त्याच्या ठिकाणीं सामान्य

गुणधर्मांचाही अभाव आहे. आणखी, त्याच्या ठिकाणीं अविक्रियता आहे. तो अविकार्य आणि अविकारी आहे. म्हणून पाचकादि क्रियांचाही तेथें असंभव आहे. आणि तो निर्गुण आहे, म्हणून नीलादि कोणताही गुण त्याच्या ठिकाणीं नाहीं. एवंच तुरीयाच्या ठिकाणीं संबंधाभाव, उपाधीचा अभाव, जातिमत्व, क्रियामत्व, गुणवत्व इत्यादिकांचा अभाव आहे, म्हणून आत्मस्वरूपाचें वर्णन शब्दांनीं करितां येणें अशक्य आहे. शब्दाची मर्यादा संबंध, उपाधि, जाति, क्रिया, गुण सांगण्यापर्यंत मात्र आहे. येथें ह्यापैकीं कोणताही पदार्थ नाहीं, म्हणून तुरीय शब्दागोचर आहे, व त्याचा निर्देश निषेधांनीं मात्र करणें शक्य आहे. म्हणून हा मार्ग श्रुतीनें अवलंबिला आहे.

अतो नाभिधानेन निर्देशमर्हति । शशविषाणादिसमत्वान्निरर्थकत्वं तार्हि । न । आत्मत्वावगमे तुरीयस्यानात्मतृष्णाव्यावृत्तिहेतुत्वाच्छुक्तिकावगम इव रजततृष्णायाः । न हि तुरीयस्याऽऽत्मत्वावगमे सत्यविद्यातृष्णादिदोषाणां संभवोऽस्ति । न च तुरीयस्याऽऽत्मत्वानवगमे कारणमस्ति । सर्वोपनिषदां तादर्थ्येनोपक्षयात् । " तत्त्वमसि " । " अयमात्मा ब्रह्म " । " तत्सत्यम् । स आत्मा " " यत्साक्षादपरोक्षाद्ब्रह्म " । "स बाह्याभ्यन्तरो ह्यजः " । " आत्मैवेदं सर्वम् " इत्यादीनाम् ।

सिद्धान्त—याप्रमाणें तुरीयाचा शब्दानें निर्देश करितां येत नाहीं म्हणून तुरीय (आत्मा) शब्दागोचर आहे असें ठरलें. यावर कोणी असें म्हणेल कीं, 'शशशृंगासारखा तुरीय आत्मा असंभवनीय होतो व शशशृंगाचा जसा कांहीं उपयोग नाहीं, तसाच तुरीय ज्ञानाचा कांहीं एक उपयोग नाहीं, असें होतें.' हें म्हणणें बरोबर नाहीं, कारण शुक्तिकेचें ज्ञान झालें असतां तेथें भ्रांति झालेल्या रुप्याचा लोभ जसा नाहींसा होतो, त्याप्रमाणें 'तुरीय (ब्रह्म) मी आहें' असा साक्षात्कार झाला म्हणजे अनात्म वस्तूंविषयीं ज्या वासना असतात, त्या सर्वच्या सर्व आणि समूळ नाहींशा होतात. हा शिंपल्याचा तुकडा आहे, रुपें नव्हे, असें ज्ञान झाल्याबरोबर रजतरूप वासना नाहींशी होते. ती वासना जिवंत राहण्याचा जसा संभव नसतो, त्याप्रमाणें 'मी हें तुरीय (ब्रह्म) आहें' असा साक्षात्कार झाल्याबरोबर अविद्येपासून उत्पन्न होणाऱ्या राग-द्वेषादिकांचें आत्म्यामधील अस्तित्व असंभवनीय होऊन तुरीयज्ञान सार्थ होतें. शिवाय, तुरीयाचें ज्ञान झालें असतां आत्मज्ञान होणार नाहीं, असें म्हणण्याला व असण्याला कांहीं एक कारण नाहीं. सर्व उपनिषदें जीवात्मा आणि परमात्मा हे एकात्मक आहेत असें एककंठानें सांगण्यामध्यें समर्पित झालीं आहेत. 'तें तूं आहेस,' 'हा आत्मा ब्रह्म आहे,' 'तें सत्य आहे,' 'तोच आत्मा आहे,' 'जो आत्मा साक्षात्, अपरोक्षपणें ब्रह्म आहे,' 'जो एकरस आणि अजन्मा आहे,' 'हें

सर्वं आत्मरूप आहे' इत्यादि श्रुति कंठरवानें एकच सिद्धांत सांगतात कीं, अशेष-विशेषशून्य (सर्व विशेषशून्य) ब्रह्म हें जीवात्म्याचें तुरीय स्वरूप आहे. तेव्हां तुरीय-ज्ञानानें 'आत्मा ब्रह्म आहे' असें ज्ञान होणें शक्य नाहीं, ही शंका अस्थानीं आहे.

सोऽयमात्मा परमार्थापरमार्थरूपचतुष्पादित्युक्तस्तस्यापरमार्थरूपमविद्याकृतं रज्जुसर्पादिसममुक्तं पादत्रयलक्षणं बीजाङ्कुरस्थानीयम्। अथेदानीमबीजात्मकं परमार्थस्वरूपं रज्जुस्थानीयं सर्पादिस्थानीयोक्तस्थानत्रयनिराकरणेनाऽऽह—

सिद्धान्ती—याप्रमाणें हा आत्मा परमार्थरूप (तुरीय) आणि अपरमार्थ-रूप (विश्वादि) असून चतुष्पाद् आहे, असें जें उपनिषदाच्या प्रारंभीं सांगितलें त्याचें अपररूप हें रज्जुसर्पादि भ्रांति उत्पन्न करणाऱ्या अविद्येनें उत्पन्न झालेलें असून तें रज्जुसर्पाप्रमाणें मिथ्या आहे, हें व त्यांचें पादत्रयलक्षण आतांपर्यंत सांगितलें. आणि हें अपर स्वरूप बीजांकुरस्थानीं आहे, कार्यकारणरूप आहे, असेंही सिद्ध केलें. अव्याकृत प्राण हें बीज आहे, हिरण्यगर्भ आणि विराट् हे त्याचे अंकुर होत, अहंकार (प्राज्ञ) हें बीज आहे, तैजस आणि विश्व हे त्याचे अंकुर होत, इत्यादि पादत्रयाचें कार्यकारणात्मक वर्णन आतांपर्यंत केलें. यापुढें अबीजात्मक असणारें, रज्जूच्या ठिकाणीं राहणारें (अधिष्ठान असणारें) जें परमार्थ-स्वरूप तें सांगण्याला श्रुति आरंभ करीत आहे. हेतु हा आहे कीं, भ्रांतिस्थ सर्पस्थानीं असणाऱ्या प्राज्ञ-तैजसादि अथवा प्राणहिरण्यगर्भादिकांच्या जागृति प्रमुख तिन्ही स्थानांचें निराकरण व्हावें. सारांश, सर्व अविद्येचें निराकरण करण्यासाठीं परमार्थ-स्वरूपाचा अवतार श्रुतीनें या सातव्या मंत्रांत केला आहे, तो असा—

मंत्र सातवा.

नान्तःप्रज्ञं न बहिष्प्रज्ञं नोभयतःप्रज्ञं न प्रज्ञानघनं न प्रज्ञं नाप्रज्ञम्। अदृष्टमव्यवहार्यमग्राह्यमलक्षणमचिन्त्यमव्यपदेश्यमेकात्मप्रत्ययसारं प्रपञ्चोपशमं शान्तं शिव मद्वैतं चतुर्थं मन्यन्ते स आत्मा स विज्ञेयः ॥ ७ ॥

अन्वय व अर्थः—न अंतःप्रज्ञं, न बहिष्प्रज्ञं, न उभयतः प्रज्ञं, न प्रज्ञानघनं, न प्रज्ञं, न अप्रज्ञं, (तो अंतःप्रज्ञ नाहीं, बहिष्प्रज्ञ नाहीं, उभय प्रकारचा प्रज्ञ नाहीं, प्रज्ञानघन नाहीं, प्रज्ञ नाहीं, अप्रज्ञ नाहीं) अदृष्टं, अव्यवहार्यं, अग्राह्यं, अलक्षणं, अचिंत्यं, अव्यपदेश्यं, एकात्म-

प्रत्ययसारं, प्रपंचोपशमम्, शांतं, शिवं, अद्वैतं, चतुर्थं, मन्यन्ते; सः आत्मा, सः विज्ञेयः (तो अदृष्ट आहे, अव्यवहार्य आहे, अग्राह्य, लक्षणशून्य, अचिंत्य, अव्यपदेश्य, एकात्मत्वाच्या प्रत्ययाचें सर्वस्व, प्रपंचाचा निरास करणारा, शांत, मंगलकारी, द्वितीयशून्य असा हा चौथा चरण आहे, असें विद्वान् मानितात. तोच आत्मा होय, जाणून घेण्यास तोच योग्य आहे) ॥ ७ ॥

नान्तःप्रज्ञमित्यादि । नन्वात्मनश्चतुष्पात्त्वं प्रतिज्ञाय पादत्रयकथनेनैव चतुर्थस्यान्तःप्रज्ञादिभ्योऽन्यत्वे सिद्धे नान्तःप्रज्ञमित्यादिप्रतिषेधोऽनर्थकः । न । सर्पादिविकल्पप्रतिषेधेनैव रज्जुस्वरूपप्रतिपत्तिवत्व्यवस्थस्यैवाऽऽत्मनस्तुरीयत्वेन प्रतिपिपादयिषितत्वात् । तत्त्वमसीतिवत् ।

सिद्धान्ती—या मंत्राचें व्याख्यान करावयाच्या प्रारंभीं एक शंका घेतात; तीं अशीः 'आत्मा हा चतुष्पाद् आहे, अशी प्रतिज्ञा करून त्याच्या पादत्रयाचें व्याख्यान केलें, हें व्याख्यानच चौथ्या चरणाचें स्वरूप अन्य आहे; भिन्न आहे; असें ठरवित आहे. तर येथें हा जो निषेधात्मक मंत्र अवतीर्ण झाला आहे, तो अनावश्यक आहे.' पण असें म्हणणें बरोबर नाहीं. सर्पादि जी भ्रांति झालेली असते, तिचा प्रतिषेध केला तरच रज्जूच्या स्वरूपाचें ज्ञान होतें. त्याप्रमाणें तिन्ही भ्रांतिस्थ अवस्थांत राहणाऱ्या आत्म्याला चौथी अवस्था आहे, तुरीय आहे, असा अस्तित्वाचा उपदेश करणें इष्ट आहे. म्हणून तो करण्याचा अभिप्राय आहे. 'तें तूं आहेस' असें स्पष्ट सांगणें श्रुतीला अवश्य वाटतें. शिवाय, तुरीय आत्मा पादत्रयाहून विलक्षण आहे, असें सिद्ध झालें तरी स्थानत्रयविशिष्ट जो जीवात्मा तोच ब्रह्मस्वरूप आहे, याचें ज्ञान उपदेशाशिवाय सिद्ध होत नाहीं. एवंच 'तत्त्वमसि' इत्यादि वाक्यें लक्षणेनें ब्रह्मस्वरूपाचा बोध करितात. त्याचप्रमाणें हा निषेधात्मक मंत्र तात्पर्य-वृत्तीनें तुरीयाची स्थापना करीत आहे.

यदि हि व्यवस्थात्मविलक्षणं तुरीयमन्यत्तत्प्रतिपत्तिद्वाराभावाच्छास्त्रोपदेशानर्थक्यं शून्यतापत्तिर्वा ।

सिद्धान्ती—यावर आणखी एक शंका उत्पन्न होते, ती अशीः—तिन्ही अवस्थांतील आत्मलक्षणांहून हें तुरीय अत्यंत विलक्षण आहे, असें म्हणणें बरोबर नाहीं, तसें म्हटल्यास त्या अत्यंत विलक्षण तुरीयाचें ज्ञान होण्याला साधन असणेंच शक्य नाहीं; म्हणून शास्त्राचा उपदेश व्यर्थ होणार आहे आणि तुरीयाची प्राप्ति होणें अशक्य होणार. पुनः दुसऱ्या कोणत्याही विशिष्टस्वरूपाची प्राप्ति क्षणभंगुर; म्हणून अनवश्यक. एवंच, शून्यवादाचा प्रसंग उत्पन्न होतो. असें होणें इष्ट नाहीं म्हणून तुरीय ब्रह्मविशिष्ट विश्वादिकांहून अत्यंत विलक्षण नाहीं.

(या शंकेचा मतलब हा आहे कीं, शास्त्राला ब्रह्माचा उपदेश साक्षात् किंवा परोक्ष-रीतीनें करितां यावयाचा नाहीं. कारण, तिन्ही अवस्था व चतुर्थ अवस्था यांमध्यें कोणत्याही प्रकारचा संबंध नसल्यामुळें, तुरीयज्ञान होणें अशक्य आहे. आणि तुरीयाचें ज्ञान झालें नाहीं (तुरीय हें इंद्रियें, मन व विशिष्ट बुद्धि यांस अगोचर असतें म्हणून कोणताही संबंध नसतो.) व विश्वादि आत्मे विशिष्टस्वरूपाचे आहेत, असें म्हटलें म्हणजे निरात्मक बुद्धि किंवा शून्य बुद्धि अवतीर्ण होते. यावर हें उत्तर आहे कीं, मागें जीं तीन अंतःप्रज्ञ, बहिष्प्रज्ञ इत्यादि आत्मस्थानें सांगितलीं, तेथें प्रकाशित होणारीं स्वरूपें तुरीयाहून अत्यंत विलक्षण नाहींत. या तीन विशेषणांचा म्हणजे विशिष्टाचा अपवाद केला म्हणजे शुद्ध ब्रह्म मात्र शिलक राहतें. या ब्रह्माचा उपदेश शास्त्राला लक्षणेनें करितां येतो. शुद्ध ब्रह्म केव्हांही नाहींसें होत नाहीं म्हणून शून्यवादाचा प्रसंग येत नाहीं).

रज्जुरिव सर्पादिभिर्विकल्प्यमाना स्थानत्रयेऽप्यात्मैक एवान्तःप्रज्ञादित्वेन विकल्प्यते यदा तदाऽन्तःप्रज्ञादित्वप्रतिषेधविज्ञानप्रमाणसमकालमेवाऽऽत्मन्यनर्थप्रपञ्चनिवृत्तिलक्षणफलं परिसमाप्तमिति तुरीयाधिगमे प्रमाणान्तरं साधनान्तरं वा न मृग्यम् ।

सिद्धान्ती—भ्रांतीच्या योगानें सर्प, जलधारा इत्यादि कल्पना रज्जूवर होतात, पण अधिष्ठान जी रज्जु, ती एकच असून ती सर्वदा विद्यमान असते, त्याप्रमाणेंच मागें सांगितलेल्या स्थानत्रयांत विद्यमान असणारा आत्मा एकच असून अंतःप्रज्ञ, बहिष्प्रज्ञ इत्यादि आभासिक स्वरूपांनीं जेव्हां जेव्हां दृश्यमान होतो, तेव्हां तेव्हां तेथें दिसणारें अंतःप्रज्ञत्व, बहिष्प्रज्ञत्व इत्यादिकांचा प्रतिषेध करणारें प्रामाणिक विज्ञान आत्म्यामध्यें दृश्यमान होऊन अनर्थ उत्पन्न करणाऱ्या किंवा अतात्त्विक असणाऱ्या प्रपंचाची निवृत्ति होणें हें फल आपोआप प्राप्त होतें. म्हणून तुरीयाचा अधिगम होण्यासाठीं दुसऱ्या प्रमाणांची किंवा दुसऱ्या साधनांची मार्ग-प्रतीक्षा करण्याचें कारण राहत नाहीं.

(दोरीवर दिसणारा भ्रांतिकल्पित सर्पादि अभास नाहींसा झाल्याबरोबर रज्जूचें स्वरूप स्पष्ट दिसतें; त्याप्रमाणें आत्मस्वरूपावर स्थूलसूक्ष्मादि देहांचे जे आरोप अज्ञानानें निर्माण केलेले असतात, त्यांचानाश –निराकरण– प्रामाणिक श्रुतिज्ञानानें होतांक्षणीं आत्मस्वरूपाचें यथार्थ ज्ञान होतें. सारांश आभासांचा नाश होणें, आभास निषिद्ध होणें हीच गोष्ट स्वरूपज्ञान उत्पन्न करण्यामध्यें परिसमाप्त होते. आरशावरील मळ काढला म्हणजे आरशानें स्वरूप स्वच्छ दाखवावें, असें होतें. प्रतिबिंबदर्शनासाठीं आरशावर अन्य संस्कार करावे लागत नाहींत. असो; श्रुतिविगीत ज्ञान आभासाचा नाश करितें आणि तत्क्षणीं साधकाच स्वरूपनिश्चय होतो. तात्पर्य आभासाचा नाश झाला

कीं स्वरूपविज्ञान होतें. स्वरूपज्ञानासाठीं दुसऱ्या प्रमाणांची आवश्यकता राहत नाहीं. शिवाय, प्रमाणांस अगोचर असणारें ब्रह्म सिद्ध करणारें प्रमाणही असणें शक्य नाहीं.

रज्जुसर्पविवेकसमकाल इव रज्ज्वां सर्पनिवृत्तिफले सति रज्ज्वधिगमस्य येषां पुनस्तमोपनयव्यतिरेकेण घटाधिगमे प्रमाणं व्याप्रियते तेषां छेद्यावयवसंबन्धवियोगव्यतिरेकेणान्यतरावयवेऽपि च्छिदिर्व्याप्रियत इत्युक्तं स्यात् ।

सिद्धान्ती—याप्रमाणें रज्जुसर्पामध्यें विवेक होतांक्षणीं रज्जूमधील सर्प निवृत्त होतो म्हणजे रज्जूचें स्वरूप समजतें. असा जो अनुभव आहे, त्याचें संकीर्तन झालें. पण अंधकाराचा नाश करण्याशिवाय तेथें असलेल्या घटादिकांचें ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठीं ज्यांस दीपाशिवाय दुसरें कांहीं असावें, असें वाटतें, घट-दर्शनाच्या सिद्धीसाठीं अंधकारनाशक दीपाशिवाय आणखी कांहीं साधन हवें असें वाटतें, ते लोक समजतात कीं, च्छेद्यवक्षाचे अवयवसंबंधाचा वियोग केला, तरी त्या अवयवांचा छेद् करण्यासाठीं छेदनाचा व्यापार पुनः सुरू केला पाहिजे! असें म्हणणें अप्रयोजक वेड्यासारखें होईल. नाहीं काय ?

(ह्याचें तात्पर्य इतकेंच आहे कीं, अंधकाराचा नाश करणें हेंच मात्र दीपज्योतीचें कर्म आहे असें नव्हे, तर तेथें असलेल्या घटाचेंही दर्शन त्या दीपज्योतीनें केलें पाहिजे; मंद उजेडांत पसरलेल्या दोरीवर सर्पभ्रांति होते. आणि ही भ्रांति दीपज्योतीनें नष्ट होते; म्हणजे रज्जूचें सत्यस्वरूप प्रकट होतें. त्यासाठीं दीपाव्यतिरिक्त अन्यसाधनाची अपेक्षा असत नाहीं. सारांश, सर्पादिकांचा प्रतिषेध म्हणजेच रज्जूचा अधिगम होय. घटादि निराळ्या पदार्थांचें दर्शन दीपज्योतीनें होईल. केव्हां ? रज्जूशिवाय घटादि दुसरे पदार्थ तेथें असतील तेव्हां. पण रज्जूशिवाय दुसरा पदार्थच नाहीं, (आत्मव्यतिरिक्त दुसरा पदार्थच नाहीं,) असें शास्त्राचें सांगणें आहे. तेव्हां वेदप्रमाण शास्त्र हें, जी वस्तु जाणून टाकून द्यावयाची आहे, जो अज्ञानवृक्ष तोडावयाचा आहे, त्याचा मात्र विचार करितें. अन्य गोष्टी नसतातच; म्हणून त्यांचा विचार वैदिकशास्त्र करीत नाहीं.

यदा पुनर्घटतमसोर्विवेककरणे प्रवृत्तं प्रमाणमनुपादित्सिततमोनिवृत्तिफलावसानं छिदिरिव च्छेद्यावयवसंबन्धविवेककरणे प्रवृत्ता तदवयवद्वैधीभावफलावसाना तदा नान्तरीयकं घटविज्ञानं न तत्प्रमाणफलम् ।

सिद्धान्ती—आतां घट आणि तम यांचा विवेक करण्यासाठीं ज्या प्रमाणांचा आपण उपयोग करितों (दीपप्रकाशानें हा विवेक होतो) तें प्रमाण (दीप) अनिष्टतमाची निवृत्ति करितें. तमाचा नाश करणें हेंच काय तें दीपाचें कर्तव्य असतें.

अंधकार गेला कीं घट आपोआप दिसतो. पहा कीं, वृक्षाचा व त्याच्या शाखादिकांचा संबंध नाहींसा करण्यासाठीं ज्या छेदनव्यापाराचा आपण अंगीकार करितों, तोच व्यापार अवयवांस (वृक्षशाखांस) विभक्त करितो. या विभागीकरणाला अन्य छेदन-क्रियेची अपेक्षा असत नाहीं. याचप्रमाणें घटाची ही गोष्ट आहे. घटामध्यें व आपल्या दृष्टीमध्यें जो अंधकाराचा पडदा होता, तो दीपानें नष्ट होतो व घटप्रकटता होते. पण दीपाचें काम केवळ अंधकारविनाशाचें आहे. घट प्रकट करण्याचें नाहीं. घट आपो-आपच दिसतो. म्हणून त्याच्यासाठीं अन्यप्रमाणाची म्हणजे दीपाची आवश्यकता असत नाहीं.

(प्रश्न असा आहे; वस्तु अमुक तऱ्हेची नाहीं, तमुक तऱ्हेची नाहीं, असा प्रतिषेध केला तरी ती अमुक स्वरूपाची आहे, असें प्रमाणतः सांगितलें तर मात्र त्या वस्तूचें ज्ञान होतें. तसा प्रमाणप्रकार आत्मस्वरूपासंबंधानें नाहीं, म्हणून व्हावयाचें प्रमाणद्वारा किंवा अन्यद्वारा आत्मज्ञान नाहीं. याला उत्तर आचार्य देतात कीं, प्रमाण, प्रमेय, प्रमाता हे सर्व व्यावहारिक भेद आहेत, परमार्थांत भेद नाहीं, म्हणजे तेथें प्रमाणप्रमेयादि कांहीं नाहीं. तेव्हां व्यावहारिक जें अज्ञान व तज्जन्य प्रमाणादि भेद यांचा नाश श्रुतिवाक्यांनीं व तदाश्रित प्रत्यक्षादिप्रमाणांनीं केला म्हणजे प्रमाणादिकांची इतिकर्तव्यता संपली. हें झालें म्हणजे एक अद्वितीय ब्रह्म मात्र शुद्धस्वरूपानें अवशिष्ट राहतें. तें स्वयंप्रकाश असतें, म्हणून तें ज्ञात होण्याला प्रमाणाची अपेक्षा असत नाहीं. असो. सध्यां इतकेच पुरें.)

न च तद्वदप्यात्मन्यध्यारोपितान्तःप्रज्ञत्वादिविवेककरणे प्रवृत्तस्य प्रतिषेधविज्ञानप्रमाणस्यानुपादित्सितान्तःप्रज्ञत्वादिनिवृत्तिव्यतिरेकेण तुरीये व्यापारोपपत्तिः । अन्तःप्रज्ञत्वादिनिवृत्तिसमकालमेव प्रमातृत्वादिभेदनिवृत्तेः । तथा च वक्ष्यति—" ज्ञाते द्वैतं न विद्यते " इति । ज्ञानस्य द्वैतनिवृत्तिक्षणव्यतिरेकेण क्षणान्तरानवस्थानात् । अवस्थाने चानवस्थाप्रसङ्गाद्वैतानिवृत्तिः ।

सिद्धान्ती—त्याचप्रमाणें आत्म्यावर ज्यांचा नित्य आरोप होत असतो, त्या अंतःप्रज्ञत्वादि स्वरूपांचा विवेक करण्यासाठीं, त्याची नित्यानित्यता (सत्यासत्यता) ठरविण्यासाठीं, जें निषेधात्मक प्रामाणिकविज्ञान प्रवृत्त होतें, तें ज्ञानविज्ञान अनिष्ट म्हणजे अमंगल अंतःप्रज्ञत्वादि आभासांची निवृत्ति करितें. या पलीकडे दुसरा कांहीं एक व्यापार तें करील असें म्हणणें योग्य नाहीं. म्हणजे तुरीय शोधून काढण्याच्या कामीं तें प्रयत्न करीत नाहीं, करण्याची अपेक्षा नाहीं नव्हे ! तें करूंही शकत नाहीं. ह्याचें कारण असें आहे कीं, अंतःप्रज्ञत्वादि आरोपांची निवृत्ति होतांक्षणीं प्रमाता (प्रमाणानें शोध लावूं इच्छिणारा) प्रमेय (ज्ञेयवस्तु) आणि प्रमाण, इत्यादिकांमधील भेदांचा

नाश होऊन प्रमाता-प्रमुख सर्व द्वैतांचा नाश होतो. पुढेंच असें सांगणार आहेत कीं, 'वस्तूचें ज्ञान झाल्यानंतर द्वैत राहत नाहीं' उघड आहे कीं द्वैतनिवृत्ति होण्याच्या क्षणापलीकडे एक क्षणभरही विशिष्ट ज्ञान विद्यमान असत नाहीं. ज्ञेय वस्तु निवृत्त होतांक्षणीं ज्ञान ही निवृत्त होतें. पहा कीं 'द्वैत-निवृत्ति झाल्यावरही ज्ञान राहतें, अद्वैताचें ज्ञान असतें, असें म्हटलें म्हणजे अद्वैत आणि अद्वैताचें ज्ञान असें द्वैत उत्पन्न झालेंच म्हणावयाचें! या द्वैताची निवृत्ति करण्याला दुसरें ज्ञान हवें. तें आणि अद्वैत मिळून पुनः द्वैत झालें! अशी ही न संपणारी अनवस्था उत्पन्न होते. तात्पर्य, विशिष्ट ज्ञान एकक्षणभरही पाठीमागें राहत नाहीं. अज्ञान निवृत्त झालें कीं ज्ञानही निवृत्त होतें, आणि एक अद्वितीय आत्मा अवशिष्ट राहतो.

(येथें 'ज्ञान' शब्द नीट समजून घेतला पाहिजे. कारण हा समज नसल्यामुळें वादविवादाचा निरर्थक प्रसंग उत्पन्न होतो. ज्ञान म्हणजे जीवाला उत्पन्न होणारी जाणीव हा सर्वसंमत अर्थ आहे. पण हें ज्ञान विशिष्ट स्वरूपाचें असतें व ज्ञाता व ज्ञेय यांची अपेक्षा करितें. 'आत्मा ज्ञान आहे' या श्रुतिवाक्यांत ज्ञान म्हणजे सर्व विशिष्ट ज्ञानांचें अधिष्ठान असणारें सामान्यस्वरूप होय. ह्या सामान्य स्वरूपांत ज्ञाता, ज्ञेयाची अपेक्षा नसते हें ध्यानांत ठेवावें.)

तस्मात्प्रतिषेधविज्ञानप्रमाणव्यापारसमकालैवाऽऽत्मन्यध्यारोपितान्तःप्रज्ञत्वाद्यनर्थनिवृत्तिरिति सिद्धम् । नान्तःप्रज्ञमिति तैजसप्रतिषेधः । न बहिष्प्रज्ञमिति विश्वप्रतिषेधः । नोभयतः प्रज्ञमिति जाग्रत्स्वप्नयोरन्तरालावस्थाप्रतिषेधः । न प्रज्ञानघनमिति सुषुप्तावस्थाप्रतिषेधः । बीजभावाविवेकरूपत्वात् । न प्रज्ञमिति युगपत्सर्वविषयप्रज्ञातृत्वप्रतिषेधः । नाप्रज्ञमित्यचैतन्यप्रतिषेधः ।

सिद्धान्ती—म्हणून, अन्तःप्रज्ञत्वादि आरोपितांचा निषेध करणाऱ्या प्रामाणिकविज्ञानाचा व्यापार होतो, त्याक्षणींच आत्म्यावर आरोपित झालेल्या अंतःप्रज्ञत्वादि अर्थशून्य आभासांची निवृत्ति होते, हें सिद्ध झालें. म्हणून या सातव्या उपनिषद्मंत्रांत 'तें अंतःप्रज्ञ नाहीं' असें म्हणून तैजसाचा प्रतिषेध केला. 'बहिष्प्रज्ञ नाहीं' असें सांगून 'विश्वाचा' प्रतिषेध केला, 'उभयतः प्रज्ञ नाहीं' असें म्हणून जागृत् स्वप्नस्थितीमध्यें जो कांहीं अवकाश असेल त्या अवस्थेचाही प्रतिषेध केला. 'व तें प्रज्ञानघन नाहीं' असें म्हणून सुषुप्तावस्थेचा अथवा प्राज्ञाचा प्रतिषेध केला.

शिष्य—या गाढ निद्रावस्थेंत विपरीत ज्ञानाचें बीज म्हणजे अज्ञान असतें म्हणून या अवस्थेचा (मायेचा) निषेध केला. होय ना?

सि० होय. याच अविद्यारूपी बीजापासून पुढें जागृत् आणि स्वप्नस्थितींत विशेष म्हणून अतात्त्विक विज्ञानें होत असतात. सुषुप्तींत मात्र सर्व विशेष विज्ञानांचा अभाव असतो. तरी येथें अज्ञान असतें. याचप्रमाणें तें प्रज्ञ (एककालीं, एकदम, पूर्ण) नाहीं,

असें म्हणून सर्व विषयांचे ज्ञातृत्वांचा (जीवांचा) निषेध केला. आणि ' तें अप्रज्ञ नाहीं ' असें म्हणून जड़ाचा निषेध केला.

(येथें दिसणाऱ्या व भासणाऱ्या आब्रह्मस्तंबपर्यंत सर्व चराचरांचा, त्यांच्या गुण-धर्मांचा आणि व्यापारांचा निषेध केला आहे.)

कथं पुनरन्तःप्रज्ञत्वादीनामात्मनि गम्यमानानां रज्ज्वादौ सर्पादिवत्प्रतिषेधादसत्त्वं गम्यत इत्युच्यते। ज्ञस्वरूपाविशेषेऽपीतरेतरव्यभिचाराद्रज्ज्वादाविव सर्पधारादिविकल्पितभेदवत्सर्वत्राव्यभिचाराज्ज्ञस्वरूपस्य सत्यत्वं, सुषुप्ते व्यभिचरतीति चेन्न। सुषुप्तास्यनुभूयमानत्वात्। " न हि विज्ञातुर्विज्ञातेर्विपरिलोपो विद्यते " इति श्रुतेः।

सिद्धान्ती—आतां कोणी अशी शंका काढील कीं, रज्ज्वादि पदार्थांवर सर्पादिकांची भ्रांति होते, ते भ्रांतीतील सर्पादि असत् असतात, हें कबूल; पण आत्मस्वरूपाचे ठिकाणीं प्रमाणतः भासमान होणाऱ्या अंतःप्रज्ञत्वादि स्वरूपांस ही नित्य सत्ता नाहीं, असें कसें म्हणतां येईल ? ' यावर आमचें प्रतिविधान हें आहे. जरी अंतःप्रज्ञ, बहिष्प्रज्ञ, प्राज्ञ, प्रज्ञ इत्यादिकांमध्यें ज्ञरूप (ज्ञातृत्वरूप) सर्व साधारण आहे, तथापि येथें इतरेतरांचा व्यभिचार होत असतो. म्हणजे अंतःप्रज्ञत्व जेथें असतें, तेथें बहिष्प्रज्ञत्व असतेंच ,असा नियम नाहीं. पहा कीं, रज्ज्वादिकांचे ठिकाणीं सर्प, धारा इत्यादिकांचा विकल्प होतो. पण ज्याला सर्पभ्रांति होते त्याला जलधारेची भ्रांति होत नाहीं, किंवा ज्याला जलधारेची भ्रांति होते त्याला सर्पभ्रांति ही होत नाहीं. सारांश, व्यभिचार होतो, हें स्पष्ट आहे, त्याचप्रमाणें आत्मस्वरूपावर जेव्हां अंतःप्रज्ञत्वाची भ्रांति होते, त्यावेळीं बहिष्प्रज्ञत्वाचा आरोप होत नाहीं. म्हणजे अंतःप्रज्ञत्व आहे तर बहिष्प्रज्ञत्व नाहीं. दुसरें आहे, तेथें पहिलें नाहीं, असा व्यभिचार होतो. म्हणून ते सर्वच्या सर्व आरोप आहेत, मिथ्या आहेत, सत्य नाहींत, असें ठरतें. स्वरूपाचे मात्र तसें नाहीं. या स्वरूपाचा केव्हांही व्यभिचार होत नाहीं. हें केव्हांही नसतें असें नाहीं. अंतःप्रज्ञत्व असो, बहिष्प्रज्ञत्व वा प्रज्ञानघनत्व असो (स्वप्न असो, जागृति असो, वा सुषुप्ति असो) तेथें आत्मस्वरूप नाहीं, असें केव्हांही होत नाहीं. म्हणून ते सत्य आहे. 'ज्ञ' स्वरूपाचा अभाव सुषुप्तीमध्यें असतो असें ही म्हणतां येत नाहीं. कारण सुषुप्त जीवाला सुखाचा अनुभव होत असतो, हें ' मी अत्यंत सुखानें निजलों होतों. निद्रास्थितींत मीं अत्यंत सुखी होतों,' असें जागा झालेला जीव म्हणतो, हें सर्व विदित आहे. सारांश, तेथें ही चैतन्याचें स्फुरण निराबाध असतें. श्रुतिही म्हणते कीं, विज्ञात्याच्या विज्ञानाचा केव्हांही लोप होत नाहीं.

अत एवादृष्टम्। यस्मादृष्टं तस्मादव्यवहार्यम्। अग्राह्यं कर्मेन्द्रियैः। अलक्षणमलिङ्गमित्येतदनन्तमेयमित्यर्थः। अत एवाचिन्त्यम

अत एवाव्यपदेश्यं शब्दैः । एकात्मप्रत्ययसारं जाग्रदादिस्थानेष्वेकोऽयमात्मेत्यव्यभिचारी यः प्रत्ययस्तेनानुसरणीयम् ।

अथ वैक आत्मप्रत्ययः सारं प्रमाणं यस्य तुरीयस्याधिगमे तत्तुरीयमेकात्मप्रत्ययसारम् । " आत्मेत्येवोपासीत " इति श्रुतेः ।

सिद्धान्ती—याप्रमाणें तुरीय हें निर्विशेष आहे, म्हणून तें ज्ञानेंद्रियांस अगोचर आहे. तें इंद्रियागोचर आहे म्हणून तें क्रियारहित अथवा अविकारी आहे. अर्थात् तें कर्मेंद्रियांस अगोचर (अप्राप्य) आहे. म्हणून तें लक्षणशून्य आहे. म्हणजे त्याला असें कोणतेंहीं लिंग नाहीं, चिन्ह नाहीं, कीं ज्याच्या योगानें त्याचें व तत्स्वरूपाचें अनुमान करितां येईल. अर्थातच मनाला त्याँचें चिंतन चिंतितां येत नाहीं म्हणून वाणीला त्याचें वर्णन करितां येत नाहीं. तें एकात्मप्रत्ययसार आहे म्हणजे जागृदादि अवस्थांमध्यें असणार, हा नित्य आत्मा आहे, असा जो नित्य प्रत्यय, त्यानें हें अनुसरणीय असतें किंवा आत्मप्रत्यय हेंच त्या तुरीय ज्ञान-प्राप्तीचें प्रमाण आहे. हेंच 'आत्मप्रत्ययसार' होय. श्रुतिही म्हणते कीं, आत्मा या दृष्टीनें मात्र त्याची उपासना करा म्हणजे प्रत्यगात्म्यानें मात्र परमात्म्याचें स्वरूप समजून घ्या. स्वसंवेद्य प्रत्यगात्मा व परमात्मा एकच आहेत असा निश्चय करून आत्मोपासना म्हणजे आत्मध्यान करा.

(एवंच, आत्मा हा अदृष्ट आहे, असें म्हटलें कीं ओघानेंच तो अव्यवहार्य, अग्राह्य इत्यादि अभावसूचक विशेषणें प्राप्त होतात. सारांश, सर्वविशेषणांचा निरास होऊन एक अद्वितीय स्वरूप मात्र विद्यमान असतें आणि तें स्वसंवेद्य आहे म्हणून आत्मानुभवाला मात्र गोचर होतें. सारांश, जीवात्मा व परमात्मा एकरूप म्हणजे ज्ञानरूप आहेत असे स्वानुभवानें समजतें.)

अन्तःप्रज्ञत्वादिस्थानिधर्मः(र्मे)प्रतिषेधः कृतः । प्रपञ्चोपशममिति जाग्रदादिस्थानधर्माभाव उच्यते । अत एव शान्तं शिवं यतोऽद्वैतं भेदविकल्परहितं चतुर्थं तुरीयं मन्यन्ते प्रतीयमानपादत्रयरूपवैलक्षण्यात् । स आत्मा स विज्ञेय इति प्रतीयमानसर्पभूछिद्रदण्डादिव्यतिरिक्ता यथा रज्जुस्तथा तत्त्वमसीत्यादिवाक्यार्थ आत्माऽदृष्टो द्रष्टा " न हि द्रष्टुर्दृष्टेर्विपरिलोपो विद्यते " इत्यादिभिरुक्तो यः स विज्ञेय इति भूतपूर्वगत्या ज्ञाते द्वैताभावः ॥ ७ ॥

सिद्धान्ती—याप्रमाणें अंतःप्रज्ञत्वादि स्थानिधर्मांचा प्रतिषेध केला. या प्रतिषेधानें प्रपंचाचा निरास होतो; म्हणजे जागृति आदि अवस्थांचे जे भिन्न धर्म आहेत त्या सर्वांचा अत्यंत अभाव तुरीयामध्यें आहे, असें ठरतें, म्हणूनच त्याला प्रपंचोपशम असें म्हटलें. याप्रमाणें अनित्य व चंचल प्रपंच संपतो म्हणून तें शांतरूप आहे, मंगलरूप आहे, कारण, तें अद्वितीय आहे; असें ठरतें. येथें भेदांच्या विकल्पाचें

अवस्थान एक क्षणभरसुद्धां सहन होत नाहीं. हा तुरीयात्मक चतुर्थ चरण होय यालाच 'तुरीय' म्हणतात. कारण तुरीय हें प्रतीतीला येणाऱ्या पादत्रयांच्या स्वरूपांहून विलक्षण आहे. 'हाच आत्मा होय, हीच विज्ञेय वस्तु आहे.' असें श्रुति म्हणतात. ध्यानांत ठेवा कीं, मन्द प्रकाशांत सर्पभ्रांति, भूच्छिद्रभ्रांति, (भुईंत भेग पडली आहे अशी भ्रांति), दंडभ्रांति इत्यादि सर्व भ्रांतींपासून जशी मुक्त झालेली तद्विलक्षणरज्जु सत्य आहे, असें आपण दीपसाहाय्यानें समजून घेतों, त्याप्रमाणें 'तें तूं आहेस' इत्यादि महावाक्यांच्या साहाय्यानें अदृष्ट आत्मा मात्र सत्य असून तोच द्रष्टा आहे, हें समजून घ्यावें. 'द्रष्ट्याच्या दृष्टीचा केव्हांही लोप होत नाहीं.' इत्यादि वाक्यांनीं सांगितलेला जो आत्मा तो जाणून घ्यावा. आतां जो अविज्ञेय आहे तो कसा जाणून घ्यावा, या शंकेचें समाधान असें कीं अज्ञानावस्थेंत त्याला आपण ज्ञेय म्हणत होतों, तसाच आत्मसाक्षात्कार होईपर्यंत तो विज्ञेय आहे, असें समजावें. आणि अज्ञानाचा ध्वंस होतांक्षणीं ज्ञानाचाही लोप करून शुद्ध द्वैत-शून्य, अद्वितीय होऊन रहावें. ॥ ७ ॥

रंगरामानुज—तुरीय स्वप्नार्थप्रदर्शक नाहीं, जाग्रदर्थप्रकाशक नाहीं, बाह्याभ्यंतर रूपी अर्थ प्रकाशित नाहीं, घनप्रज्ञान (अज्ञानानें आवृत केलेल्या जीवस्वरूपाचें ज्ञान) प्रकाशित नाहीं, मानसवासना प्रकाशित नाहीं, किंवा जाग्रतींतील पदार्थ व सुषुप्तींतील जडीभाव, हेही प्रकाशित नाहीं. सारांश, जो तुरीय विश्वादित्रयांचे बाह्याभ्यंतर, एकैकशः किंवा सामग्र्यानें ज्ञापन करीत नाहीं व समाधींतील ज्ञानसंतति किंवा जडीभूत व्यापार हे ही करित नाहीं. तो अप्रज्ञ नाहीं म्हणजे योग्य मुक्तांस मात्र ज्ञान देण्याचा व्यापार करितो. तो अदृष्ट म्हणजे बद्धांस दिसण्यासारखा नाहीं, किंवा त्यांस तो अनुमेय नाहीं. मुक्तांशिवाय तो सर्वांस अग्राह्य व अव्यवहार्य आहे, त्याला अनुमापक लिंग नाहीं, तो अचिंत्य व अवर्णनीय आहे. तो ऐकात्म्यसार म्हणजे ज्ञानानंदरूप असून एक व पूर्ण आहे. तो प्रपंचोपशम म्हणजे सर्वव्यापी (प्रपंच) आणि उत्कृष्ट (उप) व आनंदी (शम) आहे. अर्थात् तो सर्वव्यापी व पूर्णानंदी आहे. किंवा देहबंधादि अनिष्टांचा नाश करणारा व षड्विकारशून्य आहे. तो शिव म्हणजे सुखदुःखशून्य आहे. तो द्वैताचा (अहंममतादि मिथ्याज्ञानाचा) निवर्तक आहे. याला विशेषतः चाररूपांनीं (विश्वादिचाररूपांनीं) मुमुक्षूंनीं जाणून घ्यावा.

माध्व—नासिकामूलापासून बारा अंगुलें अंतरावर जो मस्तक भाग येतो, तेथें तुरीयाची वसति असते. बाहेरचे पदार्थ पाहत असतांही आंतील स्वप्नें पाहण्याची जी उभयात्मक अवस्था ती उभयतःप्रज्ञावस्था. विश्वतैजस हिचे प्रवर्तक आहेत. प्रज्ञा=असंप्रज्ञातसमाधि. अप्रज्ञ=मुक्तलोकांस ज्ञान न देणारा. सारांश, मुक्तांस ज्ञान-देण्याशिवाय बाकी कोणत्याही अवस्थेंचा हा तुरीय कर्ता नाहीं. बद्धांस तुरीय अदृष्ट,

अव्यवहार्यादि गुणात्मक आहे. तो पूर्णज्ञानानंदरूप आहे. यांचा बहुतेक अभिप्राय रंगरामानुजांप्रमाणें आहे.

अत्रैते श्लोका भवन्ति ।

या मंत्रासंबंधानें अर्थ विवरण करणारे पुढील श्लोक आहेत.

मंत्र दहावा.

निवृत्तेः सर्वदुःखानामीशानः प्रभुरव्ययः ।
अद्वैतः सर्वभावानां देवस्तुर्यो विभुः स्मृतः ॥ १० ॥

अन्वय व अर्थः—सर्वदुःखानां निवृत्तेः ईशानः, प्रभुः, अव्ययः, सर्वभावानां अद्वैतः, देवः तुर्यः, विभुः, स्मृतः, (सर्व दुःखांच्या निवृत्तीचा जो स्वामी असणारा तोच प्रभु अव्यय–नित्य एक स्वरूपी–आहे, तोच सर्व व्यावहारिक व चराचर वस्तूंस अद्वैत देणारा आहे; स्वयंप्रकाश आहे; तुर्य आहे व सर्वव्यापी आहे, असें म्हणतात.) ॥ १० ॥

प्राज्ञतैजसविश्वलक्षणानां सर्वदुःखानां निवृत्तेरीशानस्तुरीय आत्मा ईशान इत्यस्य पदस्य व्याख्यानं प्रभुरिति । दुःखनिवृत्तिं प्रति प्रभुर्भवतीत्यर्थः । तद्विज्ञाननिमित्तत्वाद्दुःखनिवृत्तेः । अव्ययो न व्येति स्वरूपान्न व्यभिचरतीति यावत् । एतत्कुतः । यस्मादद्वैतः सर्वभावानां रज्जुसर्पवन्मृषात्वात्स एष देवो द्योतनात्तुरीयश्चतुर्थो विभुर्व्यापी स्मृतः ॥ १० ॥

सिद्धान्ती—प्राज्ञ, तैजस, विश्व हीं ज्यांचीं लक्षणें आहेत, अशा अवस्थांतील सर्व दुःखांच्या निवृत्तीचा स्वामी तुरीय आत्मा आहे. ईशान याचाच अर्थ प्रभु होय, कारण तुरीय हा दुःखनिवृत्ति करण्यामध्यें अत्यंत कुशल आणि सामर्थ्यवान् आहे. याचें ज्ञानविज्ञान होतांक्षणीं (याच्या ज्ञानविज्ञानानें) सर्व दुःखांची निवृत्ति होते. हा स्वरूपापासून केव्हांही ढळत नाहीं. याचें अस्तित्व केव्हांही नष्ट होत नाहीं. म्हणून याला अव्यय म्हणतात. हें कशावरून? असें विचारण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून भगवान् गौडपाद म्हणतात कीं, रज्जुसर्पासारखे सर्व भाव (सर्व चराचर वस्तु) मिथ्या आहेत, म्हणून हा अद्वितीय आहे, आणि एकच आहे, म्हणून याच्या स्वरूपाचा व्यय, व्यभिचार होत नाहीं. हा स्वयंप्रकाश आहे. म्हणून प्राज्ञादि ज्या तीन अवस्था, तीन स्वरूपें यांच्या पलीकडचा म्हणजे तुरीय अथवा चौथा आहे. तो विभु म्हणजे सर्वव्यापी आहे, असा विद्वानांचा अनुभव आहे. ॥ १० ॥

रंगरामानुज—ब्रह्मादि ईशांस प्रेरणा करणारा तो ईशान. भाव=भगवत्सत्तेनें ज्यांस अस्तित्व प्राप्त झालें, ते पदार्थ. 'ब्रह्म आहे. असें ज्ञान झालें म्हणजे हें विश्वही सत्तायुक्त होतें' (तै० २।६) देव=अधिकाऱ्यांनीं उपास्य. विभु=समर्थ. स्मृतः= मंत्रद्रष्ट्यांस समजला.

माध्व—अव्यय=तुरीय. ईशान=मुक्तांचा प्रेरक (ईश=मुक्त; अन=प्रेरक) भाव=जीव. देव=जाण्यास योग्य. मुक्तांनीं उपासना करून प्राप्त करून घेण्यास योग्य तो भावांचा देव होय.

मंत्र अकरावा.

कार्यकारणबद्धौ ताविष्येते विश्वतैजसौ।
प्राज्ञः कारणबद्धस्तु द्वौ तौ तुर्ये न सिध्यतः॥ ११॥

अन्वय व अर्थः—**तौ विश्वतेजसौ कार्यकारणबद्धौ इष्येते** (विश्व आणि तैजस हें उभयताही कार्यकारणबद्ध आहेत, असें सर्व एककंठानें म्हणतात) **तु प्राज्ञः कारणबद्धः** (आणि प्राज्ञ हा कारणबद्ध आहे) **तौ द्वौ तुर्ये न सिध्यतः** (कारणबद्ध प्राज्ञ व कार्य-कारणबद्ध विश्व व तैजस उभयताही तुरीयामध्यें असत नाहींत.)॥ ११॥

विश्वादीनां सामान्यविशेषभावो निरूप्यते तुर्ययाथात्म्यावधारणार्थम्। कार्यं क्रियत इति फलभावः। कारणं करोतीति बीजभावः। तत्त्वाग्रहणान्यथाग्रहणाभ्यां बीजफलभावाभ्यां तौ यथोक्तौ विश्वतैजसौ बद्धौ संगृहीताविष्येते। प्राज्ञस्तु बीजभावेनैव बद्धः। तत्त्वाप्रतिबोधमात्रमेव हि बीजं प्राज्ञत्वे निमित्तम्। ततो द्वौ तौ बीजफलभावौ तत्त्वाग्रहणान्यथाग्रहणे तुर्ये न सिध्यतो न विद्येते न संभवत इत्यर्थः॥ ११॥

सिद्धान्ती—तुरीयाचें यथार्थस्वरूप समजावें, म्हणून विश्वादिकांच्या सामान्य व विशेष स्वरूपांचें निरूपण या श्लोकांत केलें आहे. जें उत्पन्न होतें किंवा केलें जातें तें कार्य अथवा तो फलभाव होय. ज्याच्या योगानें फलसिद्धि होते, तें कारण अथव बीजभाव होय. तत्त्वाचें ग्रहण नसणें, (तत्त्वज्ञान नसणें) हें बीज (कारण) आणि अन्यथा ज्ञान होणें, विपरीत ज्ञान होणें, भ्रांति होणें, हें फल (कार्य) होय. य सामान्य कार्यकारणांनीं (तत्त्वाचें अज्ञान हें कारण व तत्त्वासंबंधें विपरीत ज्ञान हें कार्य, या उभयतांनीं) मागें सांगितलेलें विश्व तैजस बद्ध झालेले असतात; पण प्राज्ञ

हा अज्ञानानें म्हणजे बीजभावानें अथवा या विशेष कारणानें मात्र बद्ध झाला असतो. प्राज्ञाला तत्त्वस्वरूपाचें अज्ञान असतें म्हणूनच किंवा या कारणानें मात्र त्याला बंधनत्व प्राप्त होतें. असो; या दोन्ही बीजफलभावांपासून, कार्यकारणांपासून, तत्त्वाचें अग्रहण आणि तत्त्वसंबंधीं अज्ञानजन्य अन्यथा ग्रहण यांनीं तुर्य बद्ध झालेला नसतो. म्हणजे हे दोन्ही भाव तुर्याच्या ठिकाणीं असत नाहींत. तेथें अज्ञान नसतें व अन्यथा ज्ञान ही तेथें असणें शक्य नाहीं. ॥ ११ ॥

(तात्पर्य, विश्व व तैजस–जागृतींतील द्रष्टा व स्वप्नद्रष्टा–हे दोघेही तत्त्वज्ञानाचें अग्रहण आणि तत्संबंधीं अज्ञानजन्य विपरीत ज्ञान या कार्यकारणांनीं दूषित होतात व प्राज्ञ–सुषुप्तिद्रष्टा–अज्ञानानें–कारणानें-बद्ध असतो; पण तुरीय ज्ञानरूप आहे, म्हणून तेथें अज्ञान नाहीं व अज्ञानजन्य विपरीतज्ञानही नाहीं.)

रंगरामानुज—अज्ञानानें उत्पन्न झालेला अहंममतादि भ्रम हा कार्यबंध आणि अविद्या हा कारणबंध आहे. तुरीयांत विश्वतैजसांचे कार्यकारणबंध–नियमाचे व्यापार नाहींत किंवा प्राज्ञाचे कारणव्यापारही नाहींत.

माध्व—विश्वादि स्वतः मुक्त आहेत. जागृतादि अवस्थांतील जीवांचे बंध विश्वादिकांच्या स्वाधीन आहेत. जो बांधतो तो 'बद्ध' असाही अर्थ होतो !

मंत्र बारावा.

नाऽऽत्मानं न परांश्चैव न सत्यं नापि चानृतम् ।
प्राज्ञः किंचन संवेत्ति तुर्यं तत्सर्वदृक्सदा ॥ १२ ॥

अन्वय व अर्थ—**प्राज्ञः आत्मानं न, परान् एव न, सत्यं न अपि च अनृतं, न किंचन संवेत्ति** (प्राज्ञाला स्वतःचें ज्ञान नसतें, व इतरांचेंही नसतें. त्याला सत्य कळत नाहीं व असत्यही कळत नाहीं. सारांश त्याला कांहीं एक कळत नाहीं. पण तुरीय हा मात्र सर्वद्रष्टा आहे) ॥ १२ ॥

कथं पुनः कारणबद्धत्वं प्राज्ञस्य तुरीये वा तत्त्वाग्रहणान्यथाग्रहणलक्षणौ बन्धौ न सिध्यत इति । यस्मादात्मविलक्षणमविद्याबीजप्रसूतं बाह्यं द्वैतं प्राज्ञो न किंचन संवेत्ति यथा विश्वतैजसौ ततश्चासौ तत्त्वाग्रहणेन तमसाऽन्यथाग्रहणबीजभूतेन बद्धो भवति । यस्मात्तुरीयं तत्सर्वदृक्सदा तुर्यादृक्त्वस्याभावात्सर्वदा सदैवेति सर्वं च तद्दृक्चेति सर्वदृक्तस्मान्न तत्त्वाग्रहणलक्षणं बीजम् । तत्र तत्प्रसूतस्यान्यथाग्रहणस्याप्यत एवाभावो न हि सवितरि सदा प्रकाशात्मके

तद्विरुद्धमप्रकाशनमन्यथा प्रकाशनं वा संभवति । " न हि द्रष्टुर्दृष्टेर्विपरिलोपो विद्यते " इति श्रुतेः । अथ वा जाग्रत्स्वप्नयोः सर्वभूतावस्थः सर्ववस्तुदृगाभासस्तुरीय एवेति सर्वदृक्सदा । " नान्यदतोऽस्ति द्रष्टृ " इत्यादि श्रुतेः ॥ १२ ॥

सिद्धान्ती—प्राज्ञ हा कारणबद्ध कसा होतो, किंवा तुरीयामध्यें तत्त्वाचें अग्रहणात्मक किंवा अन्यथाग्रहणात्मक बंध (अज्ञानबंध आणि विपरीत ज्ञानबंध) कसे नसतात ? सारांश प्राज्ञ कारणबद्ध कां ? आणि तुरीय बद्ध कां नाहीं असें कोणी विचारील त्याला या श्लोकांत उत्तर दिलें आहे. ऐकाः—ज्याप्रमाणें विश्व आणि तैजस या उभयतांनाही बाह्य द्वैताचें ज्ञान होते; त्याप्रमाणें प्राज्ञाला होत नाहीं, (आत्मविलक्षण असणारें व म्हणून अविद्या.नामक बीजापासून उत्पन्न होणारें बाह्य द्वैतज्ञान प्राज्ञाला होत नाहीं) त्या अर्थी तो तत्त्वाच्या अग्रहणानें (यथार्थ ज्ञान करून घेतां येण्याचे असामर्थ्य हेंच कोणी अज्ञान; या अंधकारामुळें) मात्र बद्ध होतो. हेंच अज्ञान अन्यथा ग्रहणाचें, विपरीत ज्ञानाचें, बीज (कारण) आहे. असो; प्राज्ञ अज्ञानघन असतो म्हणून त्याला बाह्यज्ञान होत नाहीं. पण तुरीय हा सर्वद्रष्टा असतो; (तुरीयाशिवाय दुसऱ्या सर्व वस्तूंचा पारमार्थिक अभाव असल्यामुळें सर्वदा तुरीयच सर्व असून त्याचा तोच मात्र एक द्रष्टा असतो.) म्हणून त्याच्यामध्यें तत्त्वाच्या अग्रहणाचें बीज नसतें. दुसरें कांहीं असेल, तर अज्ञानाचें वास्तव्य होईल ! सारांश, अन्यथा ज्ञानाचें मूल कारण जें अज्ञान. तें त्याच्या ठिकाणीं नसल्यामुळें तें त्याला बद्ध करीत नाहीं. अर्थात् अज्ञानानें उत्पन्न केलेल्या अन्यथाज्ञानाचा किंवा विपरीतज्ञानाचाही तेथें अभाव असतो, हें सांगण्याचें कारणही नाहीं. सदा प्रकाशात्मक असणाऱ्या सूर्याचे ठिकाणीं अंधकार किंवा मंदांधकारजन्य भ्रांति असत नाहीं, त्याप्रमाणें तुरीयाचे ठिकाणीं अज्ञान किंवा तज्जन्य अन्यथा ज्ञान यांचाही संभव मुळींच असत नाहीं. ' द्रष्ट्याच्या दृष्टीचा लोप केव्हांही होत नाहीं.' अशी श्रुति प्रमाण आहे; सारांश, सर्व भूतांमध्यें राहणारा तुरीय हा जागृत-स्वप्नास्थितींचा द्रष्टा असतो. तसेंच, सर्व वस्तूज्ञानाचा आभासही तुरीयाचे ठिकाणींच असतो; म्हणून त्याला सर्व द्रष्टा असें म्हणतां येईल. सर्व अवस्थांचा व आभासांचा तोच द्रष्टा आहे. ' याच्याशिवाय दुसरा द्रष्टा नाहीं.' अशी श्रुति ही प्रमाण आहे. (येथें प्राज्ञ बद्ध कां व तुरीयबद्ध कां नाहीं हें स्पष्ट केलें.) ॥ १२ ॥

रंगरामानुज—गाढ निद्रावान् पुरुषाला जीवस्वरूप, (प्राज्ञ) हें सुख व काल यांच्या अज्ञानाशिवाय कांहीं समजूं देत नाहीं. सर्वदृक्=मुक्तांस योग्य पदार्थ दाखविणारा. या श्लोकांत (मंत्रांत) प्रज्ञानघन व अप्रज्ञ यांच्यांशीं तुरीयाचें वैधर्म्य दाखविलें.

माध्व—मुक्तस्थितींत ज्ञानोत्तर पुण्याचें ज्ञान तुरीय देतो. अद्वैतासह शिव, प्रपंचोपशम ह्यांचें ज्ञान प्राज्ञाला व तुरीयाला देतां येतें.

मंत्र तेरावा.

द्वैतस्याग्रहणं तुल्यमुभयोः प्राज्ञतुर्ययोः ।
बीजनिद्रायुतः प्राज्ञः सा च तुर्ये न विद्यते ॥ १३ ॥

अन्वय व अर्थः—उभयोः प्राज्ञतुर्ययोः द्वैतस्य अग्रहणं तुल्यं (प्राज्ञ आणि तुर्य या उभयतांनाही द्वैताचें ग्रहण करितां येत नाहीं, यामध्यें सारखेपणा आहे) **प्राज्ञः बीजनिद्रायुतः** (पण प्राज्ञ हा बीजनिद्रेनें युक्त असतो) **सा च तुर्ये न विद्यते** (ती निद्रा तुर्याचे ठिकाणीं असत नाहीं) ॥ १३ ॥

निमित्तान्तरप्राप्ताशङ्कानिवृत्त्यर्थोऽयं श्लोकः । कथं द्वैताग्रहणस्य तुल्यत्वात्कारणबद्धत्वं प्राज्ञस्यैव न तुरीयस्येति प्राप्ताऽऽशङ्का निवर्त्यते । यस्माद्बीजनिद्रायुतस्तत्त्वाप्रतिबोधो निद्रा । सैव च विशेषप्रतिबोधप्रसवस्य बीजम् । सा बीजनिद्रा । तया युतः प्राज्ञः । सदा दृक्स्वभावत्वात्तत्त्वाप्रतिबोधलक्षणा निद्रा तुरीये न विद्यते । अतो न कारणबन्धस्तस्मिन्नित्यभिप्रायः ॥ १३ ॥

सिद्धान्ती—दुसऱ्या निमित्तानें, अनुमानादिकांनीं प्राप्त होणाऱ्या शंकेचें निवारण करण्यासाठीं या श्लोकाची उत्पत्ति आहे. शंका अशी आहे कीं, 'द्वैताचें ग्रहण उभयतांसही करितां येत नाहीं, तर प्राज्ञ हाच कां कारणबद्ध होतो, तुरीय कां होत नाहीं ! या शंकेचें निराकरण येथें केलें आहे. लक्ष्य देऊन ऐका: तत्त्वाचा प्रतिबोध न करून देणारी निद्रा प्राज्ञाचे ठिकाणीं असते, म्हणून तो बीज-निद्रेनें युक्त असतो. या निद्रेला बीज-निद्रा असें म्हटलें, कारण हीच निद्रा विशेष अन्यथा ज्ञानांची उत्पत्ति करण्याचें बीज आहे. या तत्त्वाज्ञानरूपी निद्रेपासून अन्यथा ज्ञानात्मक फल उत्पन्न होतें. याप्रमाणें प्राज्ञ हा बीजनिद्रानामक उपाधीनें बद्ध झालेला आहे; पण सर्वज्ञता हाच ज्याचा स्वभाव आहे, त्याच्या ठिकाणीं तत्त्वज्ञानात्मक निद्रा असणें शक्य नसतें; म्हणून तुरीय कारण-बद्ध असत नाहीं. प्राज्ञ कारणबद्ध आहे, सोपाधिक आहे, तुरीय स्वतंत्र आणि एकरस आहे म्हणून सोपाधिक नाहीं व बद्धही नाहीं ॥ १३ ॥

रंगरामानुज—द्वैत = देहगेहादिकांचे ठिकाणीं स्वातंत्र्य. अग्रहण = ग्रहणकरणाचा अभाव.

माध्व—प्राज्ञ व तुरीय हे देहादिकांचे ठिकाणीं जीवाला "आपण स्वतंत्र आहों" असा भ्रम करूं देत नाहींत. तुरीय मायाकारक नाहीं, प्राज्ञ आहे.

मंत्र चवदावा.

स्वप्ननिद्रायुतावाद्यौ प्राज्ञस्त्वस्वप्ननिद्रया ।
न निद्रां नैव च स्वप्नं तुर्ये पश्यन्ति निश्चिताः ॥ १४॥

अन्वय व अर्थः—**आद्यौ स्वप्ननिद्रायुतौ** (पहिले दोन– तैजस आणि विश्व हे उभयतांही स्वप्ननिद्रायुत असतात) **तु प्राज्ञः अस्वप्ननिद्रया** (पण प्राज्ञ हा स्वप्नशून्य निद्रेनें युक्त असतो) **निश्चिताः तुर्ये न निद्रां न च एव स्वप्नं पश्यन्ति** (ज्यांना आत्मज्ञानविज्ञान झालें आहे, ते तुरीयस्थितींत निद्राही पहात नाहींत किंवा स्वप्नही पहात नाहींत) ॥१४॥

स्वप्नोऽन्यथाग्रहणं सर्प इव रज्ज्वाम् । निद्रोक्ता तत्त्वाप्रतिबोधलक्षणं तम इति । ताभ्यां स्वप्ननिद्राभ्यां युक्तौ विश्वतैजसौ । अतस्तौ कार्यकारणबद्धावित्युक्तौ । प्राज्ञस्तु स्वप्नवर्जितकेवलयैव निद्रया युत इति कारणबद्ध इत्युक्तम् । नोभयं पश्यन्ति तुरीये निश्चिता ब्रह्मविदो विरुद्धत्वात्सवितरीव तमः । अतो न कार्यकारणबद्ध इत्युक्तस्तुरीयः ॥ १४ ॥

सिद्धान्ती—रज्जूचे ठिकाणीं सर्पभ्रांति होणें, याचेंच नांव अन्यथा ग्रहण अथवा स्वप्न होय. निद्रेचें लक्षण मागें सांगितलेंच आहे कीं ती तत्त्वज्ञानात्मक (तत्त्वार्चे यथार्थ ज्ञान नसणारी, अज्ञान असणारी) असते. या स्वप्ननिद्रांच्या योगें विश्व व तैजस बद्ध झालेले असतात; म्हणून कार्यकारणबद्ध असतात. हें मागें अकराव्या श्लोकांत सांगितलें आहे; आणि प्राज्ञ हा शुद्ध निद्रेनें, स्वप्नशून्य निद्रेनें, युक्त असतो म्हणून तो कारणबद्ध असतो, असेंही तेथेंच आपण ठरविलें आहे. असो; आतां, ज्यांना ब्रह्मज्ञान झालें आहे, ते लोक तुरीयामध्यें कारणबद्धता किंवा कार्यकारणबद्धता हीं दोन्हींही पाहत नाहींत. सूर्यस्वरूपांत अंधकार दिसणें किंवा भ्रांति होणें जसें अशक्य, त्याप्रमाणें तुरीयांत स्वप्ननिद्रा किंवा निद्रा असणें ही अशक्य गोष्ट आहे. म्हणून तुरीय कार्यकारणबद्ध नसतो, असें तुरीयाच्या संबंधानें म्हटलें. ॥ १४ ॥

माध्व—विश्वतैजस कार्यकारणबद्धता देणारे, प्राज्ञ कारणबद्धतेचा नियामक आणि तुरीय बंधविमोचक, असा सर्वांत विशेष आहे.

मंत्र पंधरावा.

अन्यथा गृह्णतः स्वप्नो निद्रा तत्त्वमजानतः ।
विपर्यासे तयोः क्षीणे तुरीयं पदमश्नुते ॥ १५ ॥

अन्वय व अर्थः—**अन्यथा गृह्णतः स्वप्नः, तत्त्वं अजानतः निद्रा; विपर्यासे** (अन्यथा ग्रहण करणें हें स्वप्न होय. हा एक विपर्यास आहे. तत्त्वाचें सर्वथा अज्ञान असणें ही निद्रा होय. हा दुसरा विपर्यास आहे; असे दोन विपर्यास आहेत) **तयोः क्षीणे तुरीयं पदं अश्नुते** (जेव्हां हे दोन्ही विपर्यास क्षीण होतात, नाहींसें होतात, तेव्हां तुरीयाचें स्थान प्राप्त होतें) ॥ १५ ॥

कदा तुरीये निश्चितो भवतीत्युच्यते । स्वप्नजागरितयोरन्यथा रज्ज्वां सर्प इव गृह्णतस्तत्त्वं स्वप्नो भवति । निद्रा तत्त्वमजानतस्तिसृष्ववस्थासु तुल्या । स्वप्ननिद्रयोस्तुल्यत्वाद्विश्वतैजसयोरेकराशित्वम् । अन्यथाग्रहणप्राधान्याच्च गुणभूता निद्रेति तस्मिन्विपर्यासः स्वप्नः । तृतीये तु स्थाने तत्त्वाज्ञानलक्षणा निद्रैव केवलो विपर्यासः । अतस्तयोः कार्यकारणस्थानयोरन्यथाग्रहणाग्रहणलक्षणविपर्यासे कार्यकारणबन्धरूपे परमार्थतत्त्वप्रतिबोधतः क्षीणे तुरीयं पदमश्नुते तदोभयलक्षणं बन्धरूपं तत्रापश्यंस्तुरीये निश्चितो भवतीत्यर्थः॥ १५॥

सिद्धान्ती—तुरीयाचे ठिकाणीं केव्हां निश्चय होतो, तें येथें सांगितलें आहे. रज्जु-सर्प भ्रांति होणें, हें अन्यथा ज्ञान स्वप्नांत आणि जागृत स्थितींत होतें म्हणून या दोन्ही स्थितींतील अन्यथा ज्ञानाचें ग्रहण जो करणारा, त्याला स्वप्न हेंच तत्त्व होतें. आतां, ज्याला तत्त्वज्ञान झालें नाहीं, तो तिन्ही अवस्थांमध्यें सारखीच निद्रा घेत असतो, असें म्हणावयाचें. स्वप्न आणि निद्रा हीं विश्वाला व तैजसाला एकसारखींच असतात; म्हणून उभयतांसही एका राशींत घातलें आहे व म्हणून श्लोकांत द्विवचनाचा प्रयोग आहे. श्री गौडपादाचार्यांनीं येथें दोन राशी घेतल्या आहेत. एक स्वप्नराशी आणि एक निद्राराशी. आतां जागृतींत व स्वप्नांत अन्यथाग्रहणाचें प्राधान्य (प्राबल्य) आहे म्हणून तेथें निद्रा गौण होते; यास्तव तेथें स्वप्ननामक विपर्यास होतो. हा विपर्यास बाह्य ज्ञानाचा द्रष्टा असणाऱ्या विश्वाला होतो व अंतर्ज्ञान असणाऱ्या तैजसालाही होतो. विपर्यास म्हणजे अन्यथाज्ञान. अन्यथाज्ञान स्वप्नांत होतें, म्हणून स्वप्न ही उभयतांची एक राशी झाली. पण तिसरा जो प्राज्ञ त्याच्या ठिकाणीं

म्हणजे गाढ निद्रेच्या अवस्थेंत तत्त्वाचें अज्ञान असणें हा आहे स्वभाव ज्या निद्रेचा ती शुद्ध असते, म्हणजे तेथें अन्यथाज्ञानाचा उद्भव झालेला नसतो. तथापि अज्ञान हाही विपर्यास आहे. म्हणून कार्यकारणस्थानीं असणारे अन्यथाग्रहण रूपी व अग्रहणरूपी दोन्ही विपर्यास हे कार्यबंध आणि कारणबंध उत्पन्न करितात. पण परमार्थतत्त्वाचा ज्याला बोध झाला, त्याचे हे कार्यकारणरूपात्मक बंध नाहींसे होतात. नंतर त्या ज्ञानी जीवाला तुरीय पद प्राप्त होतें म्हणजे कार्यकारणात्मक बंध जेथें असत दिसत नाहींत, त्या तुरीयाचे शुद्धस्वरूपासंबंधानें ब्रह्मवेत्त्यांचा निश्चय होतो ॥ १५ ॥

रंगरामानुज—देहादि भगवंताच्या स्वाधीन असतांही तीं माझ्या स्वाधीन आहेत, असें म्हणणें हा भ्रम, हेंच मिथ्याज्ञान होय. हें जागृतींत व स्वप्नांत असतें. विपर्यास=आवर्तन.

माध्व—तत्त्व=स्वतंत्र भगवान्. निद्रा=अविद्या. विपर्यास=विपरिवर्तन.

मंत्र सोळावा.

अनादिमायया सुप्तो यदा जीवः प्रबुध्यते ।
अजमनिद्रमस्वप्नमद्वैतं बुध्यते तदा ॥ १६ ॥

अन्वय व अर्थः—**यदा अनादि मायया सुप्तः जीवः प्रबुध्यते** (अनादिमायेमुळें निद्रित झालेला जीव जेव्हां जागा होतो) **तदा अनिद्रं, अस्वप्नं, अद्वैतं, अजं, बुध्यते**) तेव्हां निद्रा न घेणारें, स्वप्न न पाहणारें, असें उत्पत्तिशून्य अद्वैत त्याला समजतें) ॥ १६ ॥

योऽयं संसारी जीवः स उभयलक्षणेन तत्त्वाप्रतिबोधरूपेण बीजात्मनाऽन्यथाग्रहणलक्षणेन चानादिकालप्रवृत्तेन मायालक्षणेन स्वप्नेन ममायं पिता पुत्रोऽयं नप्ता क्षेत्रं पशवोऽहमेषां स्वामी सुखी दुःखी क्षयितोऽहमनेन वर्धितश्चानेनेत्येवंप्रकारान्स्वप्नान्स्थानद्वयेऽपि पश्यन्सुप्तो यदा वेदान्तार्थतत्त्वाभिज्ञेन परमकारुणिकेन गुरुणा नास्यैवं त्वं हेतुफलात्मकः किं तु तत्त्वमसीति प्रतिबोध्यमानो यदा तदैवं प्रतिबुध्यते । कथं नास्मिन्बाह्यमाभ्यन्तरं वा जन्मादिभावविकारोऽस्यतोऽजं सबाह्याभ्यन्तरसर्वभावविकारवर्जितमित्यर्थः । यस्माज्जन्मादिकारणभूतं नास्मिन्नविद्यातमोबीजं निद्रा विद्यत इत्यनिद्रम् । अनिद्रं हि तत्तुरीयमत एवास्वप्नम् । तन्निमित्तत्वादन्यथाग्रहणस्य । यस्माच्चानिद्रमस्वप्नं तस्मादजमद्वैतं तुरीयमात्मानं बुध्यते तदा ॥१६॥

सिद्धान्ती—तत्त्वाचा प्रतिबोध न होणें आणि या अज्ञानबीजामुळें, या कारणांमुळें, अन्यथा ज्ञान होणें, अशा उभय लक्षणांनीं युक्त असणारें व अनादि कालापासून चालत आलेलें मायात्मक स्वप्न संसारी जीवाला पडत असतें. त्या स्वप्नांत हा माझा पिता, हा माझा पुत्र, हा नातु, हें माझें क्षेत्र (माझ्या मालकीची जमीन), हे माझे पशु (गायी, म्हशी, घोडे इत्यादि), मी यांचा स्वामी, मी सुखी आहें, दुःखी आहें, माझी अमुक कारणानें संपत्ति कमी झाली किंवा प्रकृति बिघडली, तमुक कारणामुळें मी श्रीमंत झालों किंवा प्रकृती सुधारली, इत्यादि अनंत प्रकारचीं अन्यथा दर्शनें अज्ञानी जीवाला होत असतात. हीं स्वप्नें जागृतस्थितींत व स्वप्नस्थितींत पडत असतात. पण वस्तुतः सर्वत्र अद्वैत असतें! स्वप्नादि स्थिति हीच माया. आणि अशाप्रकारें जीवाला मायेनें निर्माण केलेली झोंप लागलेली असते; पण कांहीं पूर्व संचितानें, पुण्यसामर्थ्यानें, कोणातरी एका साधूची (वेदांताचा अर्थ तात्त्विक पद्धतीनें होऊन ज्याला ज्ञान-विज्ञान झालें आहे, अशा परमोदार व परम दयाघन गुरूची) जेव्हां गांठ पडते, तेव्हां तो सदुपदेश करितो कीं, 'बाबा! तुझें स्वरूप तूं समजतोस, असें नाहीं. तूं स्वरूपतः वासनाजन्य कर्म करणारा किंवा फल भोगणारा, सारांश, अज्ञानात्मक नाहींस, तूं स्वरूपतः तें आहेस, ब्रह्म आहेस,' असा जेव्हां त्याला बोध होतो, तेव्हां तो अज्ञाननिद्रेंतून जागा होतो. या वेळीं त्याला असें कळतें कीं ज्ञानी जीवाला बाह्य किंवा आभ्यंतर (कार्यरूपी संसार आणि कारणरूपी अज्ञान) हीं कांहीं नाहींत. त्याला जन्मणें, असणें, वृद्धिंगत होणें इत्यादि कोणतेही विकार नाहींत. तो ज्ञानी जीव (मी) अजन्मा आहें, कार्य-कारणशून्य आहें, षड्विकार शून्य आहें, असें त्याला समजतें; आणि जन्माला कारण होणारें जें अज्ञान व त्यांत असणारें अन्यथा ज्ञानाचें बीज हीं कांहीं नाहींत म्हणजे मी स्वरूपतः अनिद्र आहें (सदैव ज्ञानप्रकाश आहे), म्हणून तुरीयस्वरूपी मीं निःस्वप्न आहें म्हणजे स्वप्नांत उत्पन्न होणाऱ्या अन्यथा ज्ञानाचाही ग्रहणकर्ता नव्हे. याप्रमाणें निद्राशून्य व स्वप्नशून्य तुरीय स्वरूपी मीं आहे म्हणून मीं अजन्मा आहें, अद्वितीय आहें. मी म्हणजे तुरीय हींच कायती एक वस्तु आहे म्हणून मी अद्वितीय आहें. अशा प्रकारें तुरीयाचें ज्ञान अथवा आत्मस्वरूपाचें ज्ञान त्याला होतें. सारांश, अज्ञानांतून जागा झालेला जीव तुरीयस्वरूप पाहतो; आणि तें स्वरूप अज, अनिद्र, अस्वप्न आणि अद्वैत आहे, असें ज्ञान गुरुरूपेनें त्याला होतें; किंवा तो तुरीय होतो. ॥ १६ ॥

रंगरामानुज—माया=इच्छा व तदधीन अविद्या. अनादि=विष्णु. प्रबुध्यते=भगवदिच्छेनें व त्याच्या प्रसादानें शाहणा होतो. भगवान् मात्र स्वतंत्र आहे, सर्व त्याच्या स्वाधीन आहे, हें तत्त्वज्ञान आहे. भगवानच विश्वादिकांचे व्यापार चालवितो. अद्वैत=मिथ्याज्ञाननिवर्तक व सर्वानिष्ट निवर्तक भगवान्.

माध्व—गुरूपदिष्ट ज्ञानानें भगवत्प्रबोधाचा उदय होतो. अनादि=माया विष्णूची इच्छा व तज्जन्य प्रकृति. अविद्या निद्रा भगवत्प्रसादानें व गुरूपदेशानें नष्ट होते. अद्वैत=अन्यथाज्ञानशून्य. प्रबुद्ध्यते=अपरोक्षज्ञान होतें व लागलींच विपर्यास नष्ट होतात.

मंत्र सतरावा.

प्रपञ्चो यदि विद्येत निवर्तेत न संशयः ।
मायामात्रमिदं द्वैतमद्वैतं परमार्थतः ॥ १७ ॥

अन्वय व अर्थः—**यदि प्रपंचः विद्येत, निवर्तेत; संशयः न** (जर प्रपंच—संसार—खरोखर असेल तर तो निवृत्त होईल, यांत संशय नाहीं) **इदं द्वैतं मायामात्रं, अद्वैतं परमार्थतः** (हें सर्व द्वैत मायामात्र आहे. वस्तुतः अद्वैत आहे.) ॥ १७ ॥

प्रपञ्चनिवृत्त्या चेत्प्रतिबुध्यतेऽनिवृत्ते प्रपञ्चे कथमद्वैतमिति । उच्यते । सत्यमेवं स्यात्प्रपञ्चो यदि विद्येत । रज्ज्वां सर्प इव कल्पितत्वान्न तु स विद्यते । विद्यमानश्चेन्निवर्तेत न संशयः । न हि रज्ज्वां भ्रान्तिबुद्ध्या कल्पितः सर्पो विद्यमानः सन्विवेकतो निवृत्तः । नैव माया मायाविना प्रयुक्ता तद्दर्शिनां चक्षुर्बन्धापगमे विद्यमाना सती निवृत्ता । तथेदं प्रपञ्चाख्यं मायामात्रं द्वैतं रज्जुवन्मायाविवच्चाद्वैतं परमार्थतस्तस्मान्न कश्चित्प्रपञ्चः प्रवृत्तो निवृत्तो वाऽस्तीत्यभिप्रायः ॥ १७ ॥

सिद्धान्ती—येथें अशी एक शंका उत्पन्न होते कीं, प्रपंचाची निवृत्ति झाल्यावर जीव जागा होतो, त्याला ज्ञान होतें, असें म्हटलें तर जोंपर्यंत प्रपंचाची निवृत्ति झाली नाहीं, तोंपर्यंत सर्वत्र अद्वैत आहे असें कसें म्हणतां ?' याला श्रीमद्गौडपादाचार्य उत्तर देतात. खरें आहे; प्रपंच जर वस्तुतः असेल तर तुम्हीं म्हणतां, हा पक्ष म्हणजे द्वैताचा पक्ष खरा होईल. पण प्रपंच वस्तुतः नाहींच आहे. रज्जूचे ठिकाणीं असणारी जी सर्पभ्रांति, हिला आपलें अज्ञान उत्पन्न करितें; म्हणून तो सर्प जसा कल्पित आहे; तसाच प्रपंच ही कल्पितच आहे. वस्तुतः सर्प नाहीं तसाच प्रपंचही नाहीं. प्रपंच असेल तर तो नाहींसा होईल, यांत संशय नाहीं. असें पहा कीं, भ्रांतिबुद्धीनें रज्जूचें ठिकाणीं कल्पिलेला सर्प वस्तुतः असतो व विवेकानें तो नाहींसा होतो, असा भागच नाहीं. सर्प असणें, हें जसें मिथ्या, त्याप्रमाणें त्याची निवृत्तिही मिथ्याच असते.

एखाद्या मायावी पुरुषानें उत्पन्न केलेल्या मायेचा चमत्कार पाहणारे आजुबाजूस बसलेले लोक डोळ्याचा बंध सुटल्यावर असें म्हणत नाहींत कीं, त्या मायावीची मायानिर्मित वस्तु वस्तुतः खरी होती आणि आमचा बंध सुटल्यावर ती नाहींशी झाली. याच न्यायानें हें जें प्रपंच नांवाचें द्वैत दिसतें, तें मायामात्र आहे, अज्ञानानें कल्पिलेलें आहे. वस्तुतः रज्जु सत्यवस्तु आहे, तसा मायावी हा वास्तविक पुरुष आहे; पण वास्तविक सर्प होता आणि तो नाहींसा झाला किंवा वास्तविक आंब्याचा वृक्ष होता आणि तो नाहींसा झाला, असा भाग मात्र नाहीं. म्हणून प्रपंच केव्हांही उत्पन्न झाला नाहीं, किंवा असलेला निवृत्तही होत नाहीं. अर्थात् निवृत्त होणारा प्रपंच केव्हांही असत नाहीं, म्हणून आमचें अद्वैत सर्वकाळीं कायम आहे. ॥ १७ ॥

रंगरामानुज—देहगेहादिकांवर स्वस्वामिसंबंध ठेवणें हा प्रपंच होय. हा स्वातंत्र्यानें असत नाहीं; पराधीन कां होईना, पण प्रपंच आहे कीं नाहीं असें विचारून तो आहे, असें समजलें, तरी परमेश्वरी प्रसादानें त्याची निवृत्ति होते. कशी? ईश्वराच्या इच्छेनें उत्पन्न झालेलें द्वैत (मिथ्याहानि) त्याच्याच प्रसादानें नष्ट होते.

माध्व—प्रपंच म्हणजे विषयाभिमान, हा जीवस्वरूपाचा स्वभाव नव्हे. अस्वाभाविक व अभगवद्रूप प्रपंच 'आहे' असें मानिलेंच, तर तो भगवंताच्या ज्ञानानें नष्ट होतो. भगवदिच्छा सर्व बलवती आहे. त्याच्या इच्छेनें निर्माण झालेली माया त्याच्याच इच्छेनें नष्ट होते.

मंत्र अठरावा.

विकल्पो विनिवर्तेत कल्पितो यदि केनचित् ।
उपदेशादयं वादो ज्ञाते द्वैतं न विद्यते ॥ १८ ॥

अन्वय व अर्थः—यदि केनचित् कल्पितः विकल्पः विनिवर्तेत (जर एखाद्या कारणासाठीं विकल्पाची कल्पना केली असेल, तर ती नाहींशी झालीच पाहिजे) उपदेशात् अयं वादः (पण उपदेशाकरितां हा वादविवाद आहे) ज्ञाते द्वैतं न विद्यते (ज्ञान झाल्यावर द्वैताचें अस्तित्व असत नाहीं) ॥ १८ ॥

ननु शास्ता शास्त्रं शिष्य इति विकल्पः कथं निर्वृ (वृ) त्त इत्युच्यते । विकल्पो विनिवर्तेत यदि केनचित्कल्पितः स्यात् । यथाऽयं प्रपञ्चो मायारज्जुसर्पवत्तथाऽयं शिष्यादिभेदविकल्पोऽपि

प्राक्प्रतिबोधादेवोपदेशनिमित्तोऽत्र उपदेशादयं वादः शिष्यः शास्ता शास्त्रमिति। उपदेशकार्ये तु ज्ञाने निर्वृत्ते ज्ञाते परमार्थतत्त्वे द्वैतं न विद्यते ॥ १८ ॥

सिद्धान्ती—बरें 'खरोखर अद्वैत असेल, तर शास्ता गुरु, त्यानें सांगितलेलें शास्त्र व उपदेश ऐकणारा शिष्य हा द्वैत-विकल्प, हा भेदाभेद कसा उत्पन्न होतो?' असेंही विचारण्याचें कारण नाहीं. शंकाकाराच्या म्हणण्याप्रमाणें कांहींएक हेतु मनांत आणून (शास्त्राचा उपदेश करावा म्हणून) गुरु, उपदेश, शिष्य इत्यादि विकल्प (कल्पित भेद) उत्पन्न केला असेल, तर तो नाहींसाही होईल व नाहींसा होतोही. भ्रांतीनें कल्पिलेल्या सर्पाच्या कल्पित नाशानुसार जसा कल्पिलेला प्रपंचही कल्पनेनें नाहींसा होतो, त्याप्रमाणें शिष्यादि कल्पित भेदही आत्मज्ञानाच्या आधीं उपदेशासाठीं कल्पिलेला असतो आणि उपदेशाच्या हेतूनें मात्र शिष्य, शास्ता आणि शास्त्र असा वाद, असे शब्द, अशी भाषा, उत्पन्न होते. उपदेशाचें कार्य जें ज्ञान तें प्रकट झालें, परमार्थतत्त्व समजलें, ब्रह्म आणि मी एकच आहों असा अनुभव आला, म्हणजे द्वैत राहत नाहीं. सारांश, कल्पिलेल्या वस्तु आत्म्याचे अद्वितीयत्वाचा भंग करण्यास समर्थ नसतात. सारांश, भेद वस्तुतः नाहीं किंवा तो कोणीं कल्पिलेला नाहीं. ही पारमार्थिक स्थिति होय. ॥ १८ ॥

रंगरामानुज—देहादिकांचे ठायीं स्वत्वाचा अभिमान व इतर अज्ञानें असतात, तो विकल्प. हा स्वाभाविक अज्ञानानें कल्पिला, तरी तो साधूंच्या उपदेशानें निवृत्त होतो; असा हा संतांचा वाद म्हणजे म्हणणें आहे.

माध्व—'अतः' हें पद घालून असा अर्थ करावा कीं, म्हणून कोणी अज्ञानानें कल्पिलेला विकल्प जर असलाच (वस्तुतः तो नाहीं) तर तो गुरूपदेशानें अपरोक्षज्ञान होऊन निवृत्त होतो व आनंदाचा आविर्भाव करणारी मुक्ति प्रकट होते. सारांश ज्ञान झालें म्हणजे द्वैत (अन्यथाज्ञान) जळून जातें.

उपनिषद्-मंत्र आठवा.

सोऽयमात्माऽध्यक्षरमोंकारोऽधिमात्रं पादा मात्राः। मात्राश्च पादा अकार उकारो मकार इति ॥ ८ ॥

अन्वय व अर्थः—सः अयं आत्मा अध्यक्षरं ओंकारः अधिमात्रं; पादाः मात्राः, मात्राः च पादाः, अकारः उकारः मकारः इति (तो हा आत्मा अध्यक्षर आहे, ओंकार आहे व ओंकार हा अधिमात्र आहे, पाद याच मात्रा आणि मात्रा हेच पाद आहेत. या मात्रा अकार, उकार, आणि मकार या होत. अ, उ आणि म् या तीन मात्रा आहेत) ॥ ८ ॥

अभिधेयप्रधान ओंकारश्चतुष्पादात्मेति व्याख्यातो यः सोऽयमात्माऽध्यक्षरमक्षरमधिकृत्याभिधानप्राधान्येन वर्ण्यमानोऽध्यक्षरम् । किं पुनस्तदक्षरमित्याह । ओंकारः । सोऽयमोंकारः पादशः प्रविभज्यमानोऽधिमात्रं मात्रामधिकृत्य वर्तत इत्यधिमात्रम् । कथमात्मनो ये पादास्त ओंकारस्य मात्राः । कास्ताः । अकार उकारो मकार इति ॥ ८ ॥

सिद्धान्ती—अभिधेयांमध्यें (नामात्मक वस्तूंमध्यें) असणारा ओंकार हा चतुष्पाद् असणारा आत्मा आहे, असें मागें व्याख्यान केलें आहे. ओंकार हा सर्व नामात्मक असणाऱ्या वस्तूंत श्रेष्ठ आहे. म्हणून त्याला अभिधेयप्रधान असें म्हटलें. असो. हा जो चतुष्पाद आत्मा आहे, तो अक्षराच्या दृष्टीनें अतिश्रेष्ठ नामाभिधान देऊन त्याचें वर्णन करावें अशा योग्यतेचा आहे. म्हणजे आत्मा हें नाम, हा शब्द, सर्व अक्षरांमध्यें श्रेष्ठ आहे म्हणून त्याला अध्यक्षर म्हटलें. तें श्रेष्ठ अक्षर म्हणजे ओंकार होय. हा ओंकार पादशः विभागितां येतो. म्हणजे मात्रादृष्टीनें याचा विभाग करिता येतो व तिन्ही मात्रांचा हा ओंकार मुख्य किंवा सर्वश्रेष्ठ अथवा अधिष्ठाता स्वामी असतो म्हणून त्याला अधिमात्र असें म्हटलें. याचें मोजमापही करितां येत नाहीं, कारण मोजण्याचें माप ॐच असतो. असो; आत्म्याचे जे पाद आहेत, त्या ओंकाराच्या मात्रा होत. आणि ओंकारमात्रा या आत्म्याचे पाद अथवा चरण होत. त्या मात्रा कोणत्या, असें म्हणाल तर ऐका: अकार, उकार व मकार (अ, उ व म) या त्या तीन मात्रा होत. ॥ ८ ॥

(हा व यापुढील उपदेश मन्द अधिकाऱ्यांसाठीं आहे.)

रंगरामानुज—अधि म्हणजे अधिक असून अक्षर म्हणजे अविनाशी असणारा. अधिमात्र=अधिक मात्रा आहेत, ज्याला तो ॐकार. 'अ' कार विश्व. 'उ' कार तैजस आणि 'म' कारप्राज्ञ हे ॐकाराचे पाद होत. ॐकारनाद हा ॐकाराची चतुर्थ मात्रा व तुरीय हा त्याचा पाद होय.

माध्व—पुढील दोन खंडांत विश्वादिकांचें आकारादि प्रतिपादित्व व महिमा सांगावयाचा आहे. आत्मा=विश्वादि चार रूपांचा आत्मा. अधिमात्र=पूर्णमात्रात्मक. आत्मपाद हे ॐकारमात्रांनीं वाच्य आहेत.

मंत्र नववा.

जागरितस्थानो वैश्वानरोऽकारः प्रथमा मात्राऽऽप्तेरादिमत्त्वाद्वाऽऽप्नोति ह वै सर्वान्कामानादिश्च भवति य एवं वेद ॥ ९ ॥

अन्वय व अर्थः—जागरितस्थानः वैश्वानरः अकारः प्रथमा मात्रा (जागृतस्थानीं असणारा वैश्वानर—विश्व—हा अकार आहे. ही ओंकाराची प्रथम मात्रा आहे, अशी कल्पना करावी) आप्तेः, आदिमत्त्वात् वा (अकार सर्वव्यापक आहे. किंवा प्रथम अक्षर आहे, म्हणून 'अ'काराला प्रथम मात्रा असें म्हटलें) यः एवं वेद, सर्वान् कामान् आप्नोति च आदिः भवति ह वै (हें ज्याला समजलें त्याला इष्ट असणाऱ्या सर्व वस्तु प्राप्त होतात आणि तो सर्वश्रेष्ठ होतो) ॥ ९ ॥

तत्र विशेषनियमः क्रियते । जागरितस्थानो वैश्वानरो यः स ओंकारस्याकारः प्रथमा मात्रा । केन सामान्येनेत्याह । आप्तेरात्मिर्व्याप्तिरकारेण सर्वा वाग्व्याप्ता । "अकारो वै सर्वा वाक्" इति श्रुतेः । तथा वैश्वानरेण जगत्। "तस्य ह वैतस्याऽऽत्मनो वैश्वानरस्य मूर्धैव सुतेजाः" इत्यादिश्रुतेः । अभिधानाभिधेययोरेकत्वं चावोचाम । आदिरस्य विद्यत इत्यादिमद्यथैवाऽऽदिमदकाराख्यमक्षरं तथैव वैश्वानरस्तस्माद्वा सामान्यादकारत्वं वैश्वानरस्य । तदेकत्वविदः फलमाह । आप्नोति ह वै सर्वान्कामानादिः प्रथमश्च भवति महतां य एवं वेद यथोक्तमेकत्वं वेदेत्यर्थः ॥ ९ ॥

सिद्धान्ती—आतां येथें विशेष वस्तूंचा नियम करण्यासाठीं (आत्म्याचा कोणता विशेष पाद ओंकाराच्या कोणत्या विशेष मात्रेशीं एकत्वानें असतो हें सांगण्यासाठीं) या मंत्राची योजना आहे. जागृतस्थानीं राहणारा जो वैश्वानर तो ओंकाराची प्रथम मात्रा म्हणजे 'अ'कार याच्याशीं तादात्म्यानें असतो, असें आत्मजिज्ञासु मंदाधिकाऱ्यानें समजावें. शिवाय, अशी कल्पना करणें कांहीं अयोग्य नाहीं. कारण 'अ' कारानें ('अ' या अक्षरानें) सर्व वाणी व्यापिलेली आहे. वाणींतील सर्व अक्षरें, शब्द, वाक्यें इत्यादि 'अ'कार मूलक आहेत. 'सर्व वाणी अकाररूपी आहे, हें सुप्रसिद्ध आहे.' अशी श्रुति आहे. त्याचप्रमाणें वैश्वानरानें हें सर्व जगत् व्यापिलें आहे. 'त्या ह्या वैश्वानर आत्म्याचें मस्तक सुतेजा म्हणजे द्युलोक आहे' अशीही श्रुति आहे. याप्रमाणें 'अ' सर्वव्यापी आहे, तसाच वैश्वानर हा सर्वव्यापी आहे. म्हणून 'अ' ही मात्रा वैश्वानररूपी आहे, अशी कल्पना करणें अयोग्य नाहीं. पुनः कोणतेंही नाम आणि तें नाम असणारी वस्तु हीं एकच असतात, हें आम्हीं मागें सांगितलें आहे. म्हणून 'अ'तोच विश्व आणि विश्व तोच 'अ' होय. सारांश, सर्वव्यापी 'अ'कार हाच सर्वव्यापी वैश्वानर किंवा विश्व आहे. असो, जो आदि म्हणजे

प्रथम आहे, तो आदिमान् होय. अक्षरवाटिकेंत 'अ' हें प्रथम अक्षर आहे; त्याप्रमाणें विश्वांत वैश्वानर हाही प्रथम आहे. वैश्वानर, तैजस आणि प्राज्ञ असा क्रम असतो, त्यांत वैश्वानराला अग्रस्थान दिलें आहे; म्हणून उभयतांमध्यें प्रथमत्व हा सामान्य गुण आहे. हा व सर्वव्यापित्व हे सामान्य गुण आहेत म्हणून वैश्वानर हा अकाररूपी आहे. असो; हें आतां सांगितलेलें 'अ' चें व विश्वाचें एकत्वज्ञान ज्याला होतें, त्याच्या सर्व इच्छा परिपूर्ण होतात आणि तो श्रेष्ठ पुरुषांचा प्रमुख होतो ॥ ९ ॥

रंगरामानुज—आप्तिः=त्या त्या जीवाला योग्य असे ते ते भोग मिळवून देणारा विश्व हा 'अ' मात्रा आहे. ॐचा 'अ' कार हा प्रथम अंश आहे, तसाच विश्व ह्याचे प्राज्ञ व तैजस हे आधीं असतात, म्हणून विश्व हा आदिमान् आहे. सुप्त स्थितींत व स्वप्नस्थितींत प्राज्ञतैजसांशीं एकत्व पावलेला विश्व गाढ निद्रेंतून व स्वप्नांतून उत्थान पावल्यावर दक्षिणाक्षांत येतो; म्हणून प्राज्ञ व तैजस यांच्या आधीं असून हा आदिमान् होतो. याप्रमाणें 'अ' हा विश्वाचा वाच्य आहे, असें ज्या अधिकाऱ्याला ज्ञान होतें, त्याचे सर्व योग्य कामार्थ विश्व पुरवितो व हा पुरुष आधि होतो म्हणजे ज्या मुक्तरूपानें अविर्भूत होणाऱ्या स्वरूपाचें ज्ञान उत्पन्न होतें, त्या रूपाचें हा कारण होतो, हा ध्यानप्रकार आहे. विश्व हा 'अ' आहे, असें ध्यान करावें. असेंच 'उ' व 'म' विषयीं पुढें समजावें.

माध्व—सुप्तांतून जागृतावस्थेंत परत येतो म्हणून प्राज्ञ हा विश्वाचा आदि व तसाच स्वप्नांतून जागृतींत येतो. म्हणून तैजस हा विश्वाचा आदि; एतदर्थ विश्व आदिमान् हें समजतें. त्याचे सर्व काम विश्व पुरवितो व त्याच्या मुक्तीचें कारण होतो.

मंत्र दहावा.

स्वप्नस्थानस्तैजस उकारो द्वितीया मात्रोत्कर्षादुभयत्वाद्वोत्कर्षति ह वै ज्ञानसंततिं समानश्च भवति नास्याब्रह्मवित्कुले भवति य एवं वेद ॥१०॥

अन्वय व अर्थ—**स्वप्नस्थानः तैजसः उकारः द्वितीया मात्रा** (स्वप्नस्थानांत राहणारा तैजस ही ओंकाराची द्वितीय मात्रा म्हणजे उकार-उ—आहे) **उत्कर्षात् उभयत्वात् वा** (उत्कृष्ट आहेत आणि उभयात्मक आहेत म्हणून) **यः एवं वेद ज्ञानसंततिं ह वै उत्कर्षति, समानः च भवति, अस्य कुले अब्रह्मवित् न भवति** (हें एकात्मक ज्ञान ज्याला होतें तो ज्ञानाचा विस्तार करितो, समवृत्तीनें राहतो आणि त्याच्या कुलांत अब्रह्मवेत्ता होत नाहीं) ॥ १० ॥

स्वप्नस्थानस्तैजसो यः स ओंकारस्योकारो द्वितीया मात्रा। केन सामान्येनेत्याह। उत्कर्षात्। अकारादुत्कृष्ट इव ह्युकारस्तथा तैजसो विश्वादुभयत्वाद्वाऽऽकारमकारयोर्मध्यस्थ उकारस्तथा विश्व-प्राज्ञयोर्मध्ये तैजसोऽत उभयभाक्त्वसामान्यात्। विद्वत्फलमुच्यते। उत्कर्षति ह वै ज्ञानसंततिम्। विज्ञानसंततिं वर्धयतीत्यर्थः। समान-स्तुल्यश्च मित्रपक्षस्येव शत्रुपक्षाणामप्यप्रद्वेष्यो भवति। अब्रह्मवि-दस्य कुले न भवति य एवं वेद॥ १०॥

सिद्धान्ती—स्वप्नस्थानांत राहणारा तैजस हा ओंकाराची द्वितीय मात्रा म्हणजे उकार आहे. उभयतांत कोणते गुण समान आहेत ते पहा. अकारापेक्षां उकार श्रेष्ठ आहे. कारण उत्कृष्ट अकारही उकाराच्या पुढें जणूं कांहीं सेवकासारखा असतो. याचप्रमाणें विश्वापेक्षां तैजस श्रेष्ठ आहे, उत्कृष्ट आहे. कारण तैजसाच्या प्रेरणेनें विश्व कर्म करीत असतो. तसेंच, उकार हा अकार आणि मकार यांच्यामध्यें आहे. उकाराचा उच्चार करतांना 'अ'ची स्वरात्मकता आणि 'म'ची ओष्ठस्थानता असा संबंध असतो, म्हणजे उभयतांशींही याचा संबंध आहे. तैजस हाही विश्व आणि प्राज्ञ यांच्यामध्यें असतो आणि उभयतांशीं संबंध ठेवून उभयात्मक होतो. विश्वाचें अन्यथा ज्ञान तैजसांत असतें, आणि प्राज्ञाचें अंतःप्रज्ञत्वही यांत असतें. हें उत्कृष्टत्व व हें एकत्व ज्ञान (उकाराची व तैजसाची एकात्मकता) ज्याला समजते, तो ज्ञान-विज्ञानाची व विशेषतः विज्ञानाची वृद्धि करितो; तो सर्वांशीं समवृत्तीनें वागतो. तो जसा मित्रांशीं तसाच शत्रूंशीही वागून उभयतांस अद्वेष्य होतो, अद्वेष्टा असतो. त्याच्या कुलांत ब्रह्मज्ञान नसणारा पुरुष उत्पन्न होत नाहीं, ही या ज्ञानाची फलश्रुति होय. सारांश, ॐकारांतील 'उ'कार हा 'तैजस' आहे, अशी कल्पना करून ध्यावी व उकार हा जसा 'अ' कारापेक्षां श्रेष्ठ आहे व तो 'अ' आणि 'म्' यांच्यामध्यें असून उभयतांस जवळ आणणारा आहे, तसाच विश्वप्रेरक तैजस हा विश्वापेक्षां श्रेष्ठ असून, तो विश्व आणि प्राज्ञ या उभयतांचें संनिधित्व करणारा आहे; असा निश्चय केला असतां ज्ञानवृद्धि व अद्वेष्टत्व प्राप्त होतात, हें येथें सांगितलें आहे. ॥ १० ॥

रंगरामानुज—जागृतीमध्यें जो विद्यमान देहाभिमान असतो, तो टाकून देऊन स्वप्नमंडलांत जीवाला नेणें, हा उत्कर्षव्यापार होय. तसेंच बाह्य ज्ञानाला निद्रित करणें व वासनामय विषयांचा अनुभव देणें हें उभयत्व होय. या कारणांमुळें तैज-साला 'उ' ही संज्ञा आहे. हें निमित्तद्वय 'उ' ला तैजसाचें वाच्यत्व देतें. असें ध्यानद्वारा ज्ञान होणाऱ्या अधिकाऱ्याची ज्ञानसंतति अखंड होते व देहबंधापासून उद्धार होऊन 'मान' म्हणजे अंतर्गति, इच्यासह (हा स+मान, याचा अर्थ) हा अधिकारी सर्व मोक्षाधिकाऱ्यांच्या अंतर्यामीं प्रविष्ट होतो. कारण हा दोषशून्य असून प्रीतियुक्त असतो.

माध्व—उत्कर्षति=ज्ञानसंततीनें उत्कृष्ट होतो व मुक्तांच्या मंडळींत प्रवेश करितो. तसेंच, त्याला ज्ञानी पुत्र होतात.

मंत्र अकरावा.

सुषुप्तस्थानः प्राज्ञो मकारस्तृतीया मात्रा मितेरपीतेर्वा मिनोति ह वा इदꣳ सर्वमपीतिश्च भवति य एवं वेद ॥ ११ ॥

अन्वय व अर्थः—**सुषुप्तस्थानः प्राज्ञः तृतीया मात्रा मकारः** (सुषुप्तस्थानीं असणारा प्राज्ञ ओंकाराची तिसरी मात्रा 'म' कार असतो.) **मितेः, अपीतेः, वा** (तो माप करणारा असतो व एकत्व करणारा असतो म्हणून) **यः एवं वेद, इदं सर्वं ह वै मिनोति, अपीतिः च भवति** (हें ज्ञान ज्याला होतें, तो या सर्व विश्वाचा ज्ञाता होतो आणि जगत्कारण होऊन सर्व कर्ता होतो, हें प्रसिद्ध आहे) ॥ ११ ॥

सुषुप्तस्थानः प्राज्ञो यः स ओंकारस्य मकारस्तृतीया मात्रा। केन सामान्येनेत्याह सामान्यमिदमत्र। मितेर्मितिर्मानं मीयेते इव हि विश्वतैजसौ प्राज्ञेन प्रलयोत्पत्त्योः प्रवेशनिर्गमाभ्यां प्रस्थेनेव यवाः। तथोंकारसमाप्तौ पुनः प्रयोगे च प्रविश्य निर्गच्छत इवाकारोकारौ मकारे। अपीतेर्वा। अपीतिरप्यय एकीभावः। ओंकारोच्चारणेऽन्त्येऽक्षर एकीभूताविवाकारोकारौ। तथा विश्वतैजसौ सुषुप्तकाले प्राज्ञे। अतो वा सामान्यादेकत्वं प्राज्ञमकारयोः। विद्वत्फलमाह। मिनोति ह वा इदं सर्वं जगद्याथात्म्यं जानातीत्यर्थः। अपीतिश्च जगत्कारणात्मा भवतीत्यर्थः। अत्रावान्तरफलवचनं प्रधानसाधनस्तुत्यर्थम् ॥ ११ ॥

सिद्धान्ती—सुषुप्तस्थानीं असणारा जो प्राज्ञ तो ओंकाराची तिसरी मात्रा म्हणजे 'म' कार होय. उभयतांमध्यें सामान्य गण कोणते आहेत ते पहाः— ज्याप्रमाणें प्रस्थानें * यव मोजतात. त्याप्रमाणें विश्व-तैजसांचें हा प्राज्ञ मोजमाप करितो. त्यांचे उत्पत्ति-प्रलय किंवा आपल्यामध्यें विश्वतैजसांचे प्रवेश व आपल्यामधून त्यांची

* पूर्वी प्रस्थ हें धान्य मोजण्याचें माप होतें. प्रस्थ म्हणजे बत्तीस पल = $\frac{१}{४}$ अढक = आठ (?) कुडव.

निष्कांतिही तो पाहतो; व मोजमाप करितो. त्याप्रमाणें एका ओंकाराची समाप्ति झाली व पुनः ध्यानाला प्रारंभ झाला, म्हणजे अकार व उकार हे मकारामध्यें प्रवेश करून पुनः बाहेर येतात.

तसेंच अपीतीमध्यें म्हणजे एकीभावामध्येंही साम्य आहे. ओंकाराचा उच्चार पूर्ण केला असतां शेवटचें अक्षर म्हणजे 'म्' कार हा जणूं कांहीं अकार आणि उकार यांस एकत्व देणारें अक्षर आहे. तसेंच सुषुप्तिकाली विश्व आणि तैजस हे प्राज्ञामध्यें लीन होऊन एक होतात. याप्रमाणें मापकता व अपीति हे दोन सामान्य गुण प्राज्ञ आणि मकार यांचें एकत्व स्थापित करितात. हें ज्ञान ज्याला होतें, त्याला ह्या सर्वांचें म्हणजे जगतांचें यथार्थ स्वरूप समजतें. त्याचप्रमाणें तो जगताचा कारणात्मा म्हणजे अव्याकृतस्वरूप होतो. पण येथें हीं जीं आत्मज्ञानास अप्रस्तुत असणारीं फलें सांगितलीं आहेत, तीं अर्थवादपर आहेत आणि केवळ ब्रह्मध्यानाचें साधन जो ओंकार त्याची स्तुति करण्याकरितां मात्र सांगितलीं आहेत.

सारांश, 'म्' हा किती वेळ अ व उ येऊन गेले, हें मोजण्याचें साधन आहे. नाममंत्र जपतांना शेवटच्या मण्यानें किती वेळ जप झाला हें समजतें, तसाच हा प्रकार होय. शिवाय 'म्' मध्यें 'अ' व 'उ' हे लीन होतात. हेच धर्म प्राज्ञामध्यें आहेत, म्हणून उभयतांचें साम्य आहे. शेवटीं श्रीमच्छंकराचार्य म्हणतात कीं, फलश्रुतीचा अवतार केवळ ध्यानाकडे मंदाधिकाऱ्यांची प्रेरणा करावी एतदर्थ आहे. आत्मज्ञाला फलापेक्षा नसते, हें सर्वश्रुत आहे. ॥ ११ ॥

रंगरामानुज—'म' ही मात्रा आत्म्याचा तृतीय अंश आहे. कारण हा 'मिति' कारक जोवाला आत्म्याच्या अंतर्यामी प्रविष्ट करणारा व वृत्तिज्ञानाचा लय करणारा आहे. अर्थातच ध्यानद्वारा ज्या अधिकाऱ्याला ह्या निमित्तद्वयाचे साधनानें 'म' हा प्राज्ञवाच्य आहे, असें ज्ञान होतें, त्याचा जीव अणु असतो, तरी त्याला सर्व जगतांचें ज्ञान होतें. लहानसा सूर्य जसा स्वप्रकाशानें सर्व पदार्थ प्रकाशित करितो, तद्वत् हा प्रकार होय. तसेंच हा सर्व विश्वास ज्ञानानें व्यापणारा अधिकारी दुःखादि अनिष्टाचा अव्यय म्हणजे नाश करितो.

माध्व—मिति=अंतर्गति.

अत्रैते श्लोका भवन्ति.

यासंबंधानें हे पुढील श्लोक विवरणपर आहेत—

श्लोक एकोणिसावा.

विश्वस्यात्मविवक्षायामादिसामान्यमुत्कटम् ।
मात्रासंप्रतिपत्तौ स्यादादिसामान्यमेव च ॥ १९ ॥

अन्वय व अर्थ—विश्वस्य 'अ' त्व विवक्षायां, मात्रासंप्रतिपत्तौ, आदिसामान्यं, आप्तिसामान्यं एव च, उत्कटं स्यात् (ॐ कारमात्रांस आत्मपादांचें स्वरूप द्यावयाचें असलें व विश्वाचें वर्णन 'अ' कारानें करावयाचें असलें, म्हणजे 'अ' व विश्व या उभयतांमधील आदिसामान्य व आप्तिसामान्य हीं उत्कट स्वरूपानें दृश्य होतात) ॥ १९ ॥

विश्वस्यात्वमकारमात्रत्वं यदा विवक्ष्यते तदाऽऽदित्वसामान्यमुक्तन्यायेनोत्कटमुद्भूतं दृश्यत इत्यर्थः । अत्वविवक्षायामित्यस्य व्याख्यानं मात्रासंप्रतिपत्ताविति । विश्वस्याकारमात्रत्वं यदा संप्रतिपद्यत इत्यर्थः । आप्तिसामान्यमेव चोत्कटमित्यनुवर्तते चशब्दात् ॥ १९ ॥

सिद्धान्ती—विश्वाचें अकारमात्रत्व आहे, असें बोलावयाची इच्छा जेव्हां असते, विश्वाचें आणि अकारमात्रेचें एकात्मकत्व आहे, असें ॐकारमात्रांचा आत्मपादांवर रूपकारोप करून जेव्हां आपण समजतों, तेव्हां उभयतांही आदि (प्रारंभ करणारे) आहेत, हा दोहोंमधील सामान्य गुण व दोन्हीही सर्वव्यापक आहेत, हा उभयतांस साधारण असणारा गुण, हीं दोन्ही सामान्यें स्पष्ट स्वरूपाला येऊन दृश्य होतात. सारांश, आदित्व आणि व्यापकत्व हे उभयतांचे समान गुण विशेष रीतीनें स्फुट होतात आणि स्पष्ट समजतात. (उपनिषद्-मंत्र ९ पहा) ॥ १९ ॥

रंगरामानुज—विवक्षा=उपासना. प्रणवाचा एक देश जो विश्ववाच्य 'अ' त्याची उपासना केली म्हणजे आदिमत्त्व प्राप्त होऊन विश्वसाम्य प्राप्त होतें. मात्रासंप्रतिपत्तौ=आत्म्याचा अंश जो विश्व तो आप्तिनिमित्त जो प्रणवांश 'अ' त्याचा अर्थ आहे ('अ' हा वाचक व विश्व हा वाच्य आहे) असें ध्यान केलें म्हणजे. मग सर्व कामांची प्राप्ति होऊनही विश्वसाम्य होतें.

माध्व०—मात्रासंप्रतिपत्तौ=विश्वलक्षण जो भगवदंश त्याचें ध्यान 'अ' मात्रेनें केलें असतां 'अ' ही मात्रा विश्व आहे, असें समजून ध्यान केलें असतां. येथील साम्य शब्दमात्र आहे, असा यांचा अभिप्राय दिसतो.

श्लोक विसावा.

तैजसस्योत्वविज्ञान उत्कर्षो दृश्यते स्फुटम् ।
मात्रासंप्रतिपत्तौ स्यादुभयत्वं तथाविधम् ॥ २० ॥

अन्वय व अर्थः—तैजसस्य उत्वविज्ञाने, मात्रासंप्रतिपत्तौ, उत्कर्षः तथाविधं उभयत्वं स्फुटं दृश्यते (तैजस 'उ' आहे, असें जेव्हां समजतों,

तैजसाचा उकारमात्रेशीं एकजीव आहे, असें जेव्हां मात्रांवर कल्पना-संस्कार करून त्या आत्मपाद आहेत असें आपण समजतों, तेव्हां उभयतांची उत्कृष्टता व त्यांचा (ऊचा व तैजसाचा) मध्यस्थत्वानें इतर दोघांशीं असणारा संबंध स्फुट होतो, स्पष्ट दृष्टीस पडतो) ॥ २० ॥

तैजसस्योत्वविज्ञान उकारत्वविवक्षायामुत्कर्षो दृश्यते स्फुटं स्पष्ट इत्यर्थः। उभयत्वं च स्फुटमेवेति। पूर्ववत्सर्वम् ॥ २० ॥

सिद्धान्ती—तैजस हा ओंकारांतील उकारमात्रक आहे, असें कल्पनासंस्कार-द्वारा समजून घेतलें म्हणजे उभयतांचें श्रेष्ठत्व व 'उ' चा 'अ' व 'म्' शीं आणि तैजसाचा विश्व आणि प्राज्ञाशीं, दोघांशीं असणारा, समान संबंध हीं स्पष्ट दृष्टीस पडतात. (उ०मंत्र १०पहा. बाकीचा अर्थ पूर्वीप्रमाणेंच आहे) ॥ २० ॥

रंग०—प्रणवैकदेश 'उ' या स्वरूपानें तैजसोपासना केली असतां मागें सांगि-तल्याप्रमाणें उत्कर्ष व उभयत्व प्राप्त होतात, म्हणजे ज्ञान, संतति व मोक्षाधिकाऱ्यांत प्रविष्टत्व प्राप्त होतात.

माध्व०—उभयत्व=उभयसदृशत्व. निद्रेंतील व स्वप्नांतील अनुभवांचा कर्ता परमेश्वर आहे, म्हणून त्याला उभयत्व आहे. असो; उपासक मुक्त झाला म्हणजे त्याला बाह्यविषयाचा उपरम होणें ही निद्रा येते. सारांश, त्याचीं बाह्येंद्रियें जड वस्तु पाहत नाहींत पण स्वरूपेंद्रियांनीं विषयानुभव होतो. हें मुलांचें उभयत्व होय.

श्लोक एकविसावा.

मकारभावे प्राज्ञस्य मानसामान्यमुत्कटम्।
मात्रासंप्रतिपत्तौ तु लयसामान्यमेव च ॥ २१ ॥

अन्वय व अर्थः—प्राज्ञस्य मकारभावे, मात्रासंप्रतिपत्तौ, मानसा-मान्यं तु लयसामान्यं एव च, उत्कटं (प्राज्ञाचें मकारभावानें ज्ञान करून घेतलें, प्राज्ञ आणि ओंकारांतील मकार मात्रा एकरूप आहेत असें समजलें, म्हणजे त्यांचें प्रमाणसामान्यत्व आणि लयसामान्यत्व हीं उत्कट रीतीनें दृश्य होतात) ॥ २१ ॥

मकारत्वे प्राज्ञस्य मितिलयावुत्कृष्टे सामान्ये इत्यर्थः ॥ २१ ॥

सिद्धान्ती—प्राज्ञ हा आकारांतील मकार आहे अस समजलें म्हणजे, प्राज्ञावर मकाराची कल्पनेनें स्थापना केली म्हणजे, श्रुतीनें सांगितलेलें मानैसामान्य आणि लयसामान्य हीं स्पष्ट होतात. (उ० मंत्र ११ पहा) ॥ २१ ॥

रंगरामानुज—प्राज्ञ हा 'म्' वाच्य आहे, अशी उपासना केला व प्राज्ञाचें ज्ञान करून घेतलें म्हणजे प्राज्ञाप्रमाणें सर्वांतर्यामित्व मिळून व बाह्यादि ज्ञानाचा लय करणारा व 'म्' नें वाच्य असणारा जो प्राज्ञ त्याची उपासना होऊन उपासकाचा दुःखलय होतो. अंतर्यामित्व व दुःखलय हीं दोन निमित्तें उपासकाला प्राज्ञसाम्य देतात.

माध्व—यांचा अभिप्राय वरीलप्रमाणेंच आहे.

श्लोक बाविसावा.

त्रिषु धामसु यत्तुल्यं सामान्यं वेत्ति निश्चितः ।
स पूज्यः सर्वभूतानां वन्द्यश्चैव महामुनिः ॥ २२ ॥

अन्वय व अर्थः—**त्रिषु धामसु यत् तुल्यं सामान्यं निश्चितः वेत्ति सः महामुनिः सर्वभूतानां पूज्यः वंद्यः च एव** (तिन्ही जागृतादि स्थानांतील व मात्रांतील यथाक्रम तुल्य सामान्यांचें ज्याला निश्चित ज्ञान होतें, तो महामुनि सर्व भूतांस पूज्य आणि वंद्य होतो) ॥ २२ ॥

यथोक्तस्थानत्रये तुल्यमुक्तं सामान्यं वेत्त्येवमेवैतदिति निश्चितो यः स पूज्यो वन्द्यश्च ब्रह्मविलोके भवति ॥ २२ ॥

सिद्धान्ती—मागें सांगितलेल्या, जागृति, स्वप्न, सुषुप्ति या तीन स्थानांत व अ, उ, म्, या ॐकारमात्रांत जे पूर्वोक्त समान गुण आढळले, त्यांचें यथार्थ स्वरूप ज्याला निश्चित रीतीनें समजलें व अशा प्रकारचे समानगुण आहेत, असा ज्याचा निश्चय झाला, तो ब्रह्माचें अखंडध्यान करणारा, साक्षात्कारी ब्रह्मज्ञ, त्रैलोक्यांत पूज्य आणि वंदनीय होतो. सारांश, आत्म्याचे तीन पाद आणि ओंकाराच्या तीन मात्रा एकस्वरूप असून उभयतांमध्यें समानधर्म आहेत, त्यांचें यथार्थ ज्ञान ज्याला निश्चित होतें, तो पुरुष सर्ववंद्य होतो ॥ २२ ॥

रंगरामानुज—याप्रमाणें विश्वादि अकारादि भावात्मक आहेत व हें जाणण्यास आदित्वादि फलें मिळतात, इत्यादि ज्ञान ज्याला असतें, त्याला काय फलें मिळतें, तें या कारिकेंत सांगितलें आहे.

मागें सांगितल्याप्रमाणें तिन्ही धामांचें (जागृतादिस्थानांचें) उक्त विधीनें ध्यान केलें असतां काय काय फलें निश्चितत्वानें मिळतात, हें ज्याला यथार्थ समजतें तोही ज्ञाता सर्वपूज्य सर्ववंद्य होतो.

भाष्य—वरीलप्रमाणें व्याख्यान करून म्हणतात कीं मागें, सांगितलेला ग्रंथ खोटा असता, तर भक्ताला फलें मिळतात, असें समजणाऱ्याला ज्ञानफलाची प्राप्ति झाली नसती. पण प्राप्ति होते; म्हणून वरील सर्व भाग खरा आहे. यत्तुल्यं=मोक्ष फल देणारीं म्हणून समान.

श्लोक तेविसावा.

अकारो नयते विश्वमुकारश्चापि तैजसम्।
मकारश्च पुनः प्राज्ञं नामात्रे विद्यते गतिः ॥ २३ ॥

अन्वय व अर्थः—**अकारः विश्वं नयते, उकारः च अपि तैजसं पुनः मकारः च प्राज्ञं** ('अ'कार हा विश्वाची प्राप्ति करून देतो, तिकडे नेतो, 'उ'कार तैजसाची आणि शेवटीं 'म'कार प्राज्ञाची प्राप्ति करून देतो) **अमात्रे गतिः न विद्यते** (ज्याला मात्रा नाहीं त्या तुरीयाचें ज्ञान झालें असतां गमनागमन असत नाहीं.) ॥ २३ ॥

यथोक्तैः सामान्यैरात्मपादानां मात्राभिः सहैकत्वं कृत्वा यथोक्तोंकारं प्रतिपद्य यो ध्यायीत तमकारो नयते विश्वं प्रापयति। अकारालम्बनोंकारं विद्वान्वैश्वानरो भवतीत्यर्थः। तथोकारस्तैजसम्। मकारश्चापि पुनः प्राज्ञं चशब्दान्नयत इत्यनुवर्तते। क्षीणे तु मकारे बीजभावक्षयादमात्र ओंकारे गतिर्न विद्यते क्वचिदित्यर्थः ॥ २३ ॥

सिद्धान्ती—मागें जे उभयतांस समान असणारे गुण सांगितले, ते ध्यानांत ठेवून आत्म्याचे पाद आणि ओंकाराच्या मात्रा ह्या एकरूप करून घेऊन व ओंकाराचें स्वरूप सांगितलें आहे तसें प्राप्त करून घेऊन, जो ओंकाराचें ध्यान करील, (ओंकारस्वरूपाचें ध्यान करतांना मात्रांमध्यें आणि पादांमध्यें जे सामान्य गुणधर्म आहेत, त्यांच्यासह मात्रांचें पादांशीं एकत्व करून जो ओंकाराचें ध्यान करील) त्याला 'अ' कार हा वैश्वानरापर्यंत नेऊन पोंचवील. अकाराचें आलंबन किंवा आश्रय प्रमुखत्वानें घेऊन जो विद्वान् ओंकारस्वरूपाचें ध्यान करील तो वैश्वानरच होईल. याचप्रमाणें उकार आलंबन घेऊन ओंकाराचें आतांच सांगितल्याप्रमाणें ध्यान करील तो तैजस होतो. आणि शेवटीं मकार आलंबन घेऊन ओंकारध्यान करील तो प्राज्ञ होतो. श्लोकांत 'च' शब्द आहे, तो मागील 'नय' या क्रियापदाचें अनुवर्तनाचें संकीर्तन करितो. याप्रमाणें 'अ' ची उन्नति क्रमशः 'उ' मध्यें व 'उ' ची 'म्' मध्यें करून शेवटीं 'म्'कारही क्षीण केला म्हणजे अज्ञानाचें (अज्ञानरूपी) बीज

असतें तें नाहींसें होतें आणि ध्यानाची मात्राशून्य स्थिति होते. हा स्थिति प्राप्त होऊन मात्राशून्य ओंकाराचें ध्यान सिद्ध झालें म्हणजे जीवाचें सर्व प्रकारचें जाणें–येणें संपलें.

स्थूल प्रपंच, जागृति आणि विश्व (विराट्) हें त्रितय म्हणजे 'अ'कारमात्रा, सूक्ष्म प्रपंच, स्वप्न आणि तैजस (हिरण्यगर्भ) हें त्रितय म्हणजे 'उ'कारमात्रा. आणि स्थूल-सूक्ष्म-प्रपंच-कारण, सुषुप्त व प्राज्ञ (अव्याकृत प्राण) हें त्रितय म्हणजे मकार-मात्रा अशी वस्तुस्थिति आहे. विश्वाचा (विराटाचा) लय तैजसांत (हिरण्य-गर्भांत), तैजसाचा प्राज्ञांत (अव्याकृतांत) होऊन प्राज्ञाचाही लय झाला म्हणजे व्यष्टिसमष्टि अज्ञानबीजाचा लय होतो. शेवटीं, मात्राशून्य ओंकार हा परिशुद्ध आत्म्याची, ब्रह्माची प्राप्ति आचार्यांच्या उपदेशानें करून देतो. हा ध्यानांच्या भिन्न-भूमिकांचा विचार आहे ॥ २३ ॥

रंगरामानुज—या श्लोकांत 'पुनः' हा शब्द आहे, तो असें दाखवितो कीं, प्रतिदिवशीं सुप्तीमध्यें प्राज्ञप्राप्ति होते तथापि मुक्तीमध्यें प्राज्ञप्राप्ति असतें. तुरीय हा अमात्र म्हणजे अंशशून्य आहे पण विश्वतैजस प्राज्ञांशीं एकरूप होतात म्हणून ते सर्व मात्रात्मक आहेत. असो; हा अमात्रक तुरीयाची प्राप्ति उपासकाला होत नाहीं, असें नाहीं. असा दोन निषेधांनीं 'अस्तित्व' सांगणाऱ्या द्राविडीप्राणायामाचा हेतु हा आहे कीं, येथें विश्वादिकांप्रमाणें बाह्यादि व्यवहारकारणत्व नसतें, तसें गम्यत्वही नसेल. तुरीयाची प्राप्ति उपासकाला व्हावयाची नाहीं अशी शंका येईल तिचें निराकरणार्थ 'प्राप्ति नाहीं. असें होत नाहीं' असें म्हटलें. 'नामात्रे विद्यतेऽगतिः' असा यांचा पाठ आहे.

माध्व—विश्वादि प्रत्यहीं निद्रेंत एक होतात व निद्रोत्थानकालीं विभक्त होतात; तसें तुरीयाचें नाहीं. तो अमात्र आहे. यांचाही 'अगति' असा पाठ आहे. नाद हा जीवाला आत्मप्रविष्ट करितो. जागृतादि गमन कारणें नव्हेत, विश्वादि परमेश्वराचे अंश गमनाचे प्रयोजक आहेत. इति तृतीयः खण्डः

उपनिषद्-मंत्र बारावा.

अमात्रश्चतुर्थोऽव्यवहार्यः प्रपञ्चोपशमः शिवोऽद्वैत एवमोंकार आत्मैव संविशत्यात्मनाऽऽत्मानं य एवं वेद ॥ १२ ॥

अन्वय व अर्थ—**अमात्रः चतुर्थः, अव्यवहार्यः प्रपंचोपशमः, शिवः अद्वैतः** (मात्राशून्यता हा चौथा पाद आहे. हा व्यवहार्य नाहीं. हा पाद म्हणजे प्रंपचाचा उपशम करणारा होय, हा शिवरूप आहे आणि अद्वैत

आहे) एवं ओंकारः आत्मा एव, यः एवं वेद आत्मना आत्मान संविशति (याप्रमाणें ॐकार आत्मा आहे, असें ज्याला ज्ञान होतें, तो ओंकाररूपी आत्मा आत्मसाहाय्यानें आत्मस्वरूपांत प्रवेश करितो ॥१२॥

अमात्रो मात्रा यस्य नास्ति सोऽमात्र ओंकारश्चतुर्थस्तुरीय आत्मैव केवलोऽभिधानाभिधेयरूपयोर्वाङ्मनसयोः क्षीणत्वादव्यवहार्यः । प्रपञ्चोपशमः शिवोऽद्वैतः संवृत एवं यथोक्तविज्ञानवता प्रयुक्त ओंकारस्त्रिमात्रस्त्रिपादः । आत्मैव संविशत्यात्मना स्वेनैव स्वं पारमार्थिकमात्मानं य एवं वेद । परमार्थदर्शिनां ब्रह्मविदां तृतीयं बीजभावं दग्ध्वाऽऽत्मानं प्रविष्ट इति न पुनर्जायते तुरीयस्याबीजत्वात् । न हि रज्जुसर्पयोर्विवेके रज्ज्वां प्रविष्टः सर्पो बुद्धिसंस्कारात्पुनः पूर्ववत्तद्विवेकिनामुत्थास्यति । मन्दमध्यमधियां तु प्रतिपन्नसाधकभावानां सन्मार्गगामिनां (णां) संन्यासिनां मात्राणां पादानां च क्लृप्तसामान्यविदां यथावदुपास्यमान ओंकारो ब्रह्मप्रतिपत्तय आलम्बनो भवति । तथा च वक्ष्यति—" आश्रमास्त्रिविधा हीनाः " इत्यादि ॥ १२ ॥

सिद्धान्ती—ज्याला मात्रा नाहींत तो अमात्र ओंकार होय. याला चतुर्थ किंवा तुरीय म्हणतात. हा आत्मा केवल म्हणजे अद्वितीय आहे. तसेंच, अभिधान म्हणजे नाम किंवा वाणी, व अभिधेय (नाम) आहे अशी वस्तु, नाम आणि नाम असणारी वस्तु, हीं ज्यांचीं स्वरूपें किंवा प्रकट झालेले पदार्थधर्म आहेत, तीं वाणी आणि मन हीं उभयतांही क्षीण झाल्यामुळें, मनोवाणीस अगोचर असल्यामुळें, बोलणें आणि चिंतन करणें यांस अगोचर असा हा आत्मा आहे. हा प्रपंचाचा उपशम करणारा (प्रपंचातीत), आनंदरूप आणि अद्वितीय स्वरूपाचा आहे. हें ज्ञान व आत्मपाद व ॐकारमात्रा एकच आहेत, असें विज्ञान ज्याला झालेलें आहे, त्यानें त्रिमात्र व त्रिपाद ओंकाराचें ध्यान केलें असतां (श्लोक २२-२३ पहा) तो ज्ञानी पुरुष आत्मरूप होऊन आत्मसाधनानें आपण स्वतः परमार्थतः आत्मस्वरूपामध्यें (आपल्या स्वरूपामध्यें) प्रवेश करितो. परमात्मस्वरूपानें ओंकाराचें ध्यान करणारा आत्मज्ञानी तत्त्ववेत्ता समूळ, सबीज आणि सांकुर अज्ञानाचा नाश करून तृतीयस्थानीं असणाऱ्या अज्ञानरूपी बीजाला जाळून टाकित होत्साता परमात्मस्वरूपांत प्रवेश करितो. त्याला पुनः जन्मप्राप्ति होत नाहीं. कारण तुरीयस्थान हें निर्बीज आहे. रज्जु-सर्पाचा विवेक झाल्यानंतर रज्जूमध्यें प्रविष्ट झालेला भ्रांतिजन्य सर्प जसा पुनः त्या दोरींत उत्पन्न झाला आहे, असें विवेकी पुरुषाला पूर्वीप्रमाणें दिसत नाहीं. रज्जु-सर्पभ्रांति पुनः

होत नाहीं. त्याप्रमाणें आत्मज्ञानी पुरुषाचें अज्ञान दग्ध झालें असल्यामुळें त्याला पुनः संसाराची किंवा तद्गत सुख-दुःखांची भ्रांति उत्पन्न होत नाहीं. ही उत्तम अधिकाऱ्याची गोष्ट झाली; पण जे मंदबुद्धीचे किंवा मध्यम बुद्धीचे लोक आहेत, साधक स्वरूपाला लागणाऱ्या गोष्टी ज्यांना अधिगत झाल्या आहेत, जे सन्मार्गानें जाणारे आहेत, ज्यांनीं संसारत्याग केला आहे, ओंकारमात्रा आणि आत्मपाद यांच्यामधील संस्कारजनित साम्य ज्यांना विदित आहे, त्यांनीं जर ओंकाराची ब्रह्मप्राप्तीसाठीं यथोक्त उपासना केली, तर हा उपास्यमान ओंकार ब्रह्मप्राप्तीचें साधन होईल. हा क्रम-मुक्तीचा मार्ग आहे. पुढेंही सांगणार आहेत कीं ' तीन प्रकारचे आश्रम हीन आहेत, इत्यादि ' ॥ १२ ॥

(येथें मूळ माण्डूक्योपनिषत् आणि त्याचें सभाष्य भाषांतर संपलें).

रंगरामानुज—ॐ हा तुरीयाचा नादवाच्य आहे. एकाग्र ॐकारध्यान दृढ झालें म्हणजे जो नाद ऐकूं येतो, तो तुरीयाचा वाच्य आहे. या मंत्रांत अव्यवहार्य इत्यादिकांचा पुनः अवतार केला, याचें कारण असें कीं, उपासकाला जसें ब्रह्म अव्यवहार्यादि आहे, तसेंच मुलालाही आहे, हें समजावें. असो; ॐकाराच्या नादरूपी एकदेशित्वानें जो तुरीयज्ञान करून घेतो, तो आत्मा म्हणजे शुद्धरूप होऊन (देहेंद्रियादि अभिमान्यशून्य होऊन) परमात्मप्रसादानें (आत्मना) आत्मानं (नादबोद्ध तुरीयामध्यें) प्रवेश करितो व स्वेच्छेनें स्वयोग्यभोगांचा उपभोग घेऊन सुखी होतो.

माध्व—नादप्रतिपाद्य तुरीयाची जो एकनिष्ठ उपासना करितो, तो देहादि अनात्मकांचा त्याग करून आत्मरूप होतो आणि तुरीयप्रसादानें तुरीयस्वरूपांत प्रविष्ट होतो.

पूर्ववत्—

अत्रैते श्लोका भवन्ति ॥

पूर्वीप्रमाणें गौडपादाचार्यांनीं बाराव्या मंत्राचें विवरण श्लोकरूपानें केलें आहे, तें असें:—

श्लोक चोविसावा.

ओंकारं पादशो विद्यात्पादा मात्रा न संशयः ।
ओंकारं पादशो ज्ञात्वा न किंचिदपि चिन्तयेत् ॥२४॥

अन्वय व अर्थः—पादशः ओंकारं विद्यात्, पादाः मात्राः संशयः न (पादशः—प्रत्येक चरणद्वारा—आत्म्याचा प्रत्येक—चरण घेऊन—ओंकाराचें ज्ञान करून घ्यावें. आत्मपाद हा ओंकारमात्रा आहेत, यांत संशय

नाहीं) पादशः ओंकारं ज्ञात्वा न किंचित् अपि चिंतयेत् (ओंकाराचें आत्मचरणपर ज्ञान झाल्यावर कोणतेंही चिंतन करूं नये) ॥ २४ ॥

यथोक्तैः सामान्यैः पादा एव मात्रा मात्राश्च पादास्तस्मादोंकारं पादशो विद्यादित्यर्थः। एवमोंकारे ज्ञाते दृष्टार्थमदृष्टार्थं वा न किंचित्प्रयोजनं चिन्तयेत्कृतार्थत्वादित्यर्थः ॥ २४ ॥

सिद्धान्ती—मागें जे सामान्यगुणधर्म सांगितले, त्यांच्या साहाय्यानें आत्मपाद या ओंकारमात्रा आणि ओंकारमात्रा हे आत्मपाद आहेत, असें एकात्मक ज्ञान करून घेऊन ओंकाराचें आत्मरूप ज्ञान (ओंकार हा आत्मरूप कोणत्या रूपकानें होतो व रूपकाचें कारण संपल्यावर तो आत्मरूपी कसा होतो, याचें ज्ञान) झालें म्हणजे दृश्य किंवा अदृश्य प्रयोजनाचें अथवा पाप-पुण्यात्मक धर्माधर्माचें चिंतन करूं नये. कारण ॐकारज्ञानानें कृतार्थताच प्राप्त होते; शिवाय, ॐकारज्ञानी पुरुष चिंतन करणारही नाहीं. कारण तो कृतार्थ झालेला असतो. ॥ २४ ॥

रंगरामानुज—प्रणवाच्या अवयवांनीं प्रतिपाद्य चें भगवद्रूपज्ञान तें अन्यवस्तूंच्या स्मरणत्यागानें करून घेतलें पाहिजे, यासाठीं पुढील विवेचन आहे.

समग्र प्रणवानें प्रतिपाद्य जो भगवान्, त्याचें ज्ञान उपासकांनीं पादशः करून घेतलें पाहिजे व भगवान् विश्वतैजसादि चार रूपांचा आहे, हें जाणलें पाहिजे. तसेंच दुसऱ्या कोणत्याही वस्तूचें चिंतन असतां उपयोगी नाहीं. कारण प्रणवचिंतनाचें फल सर्वोत्तम आहे व तें प्रणवचिंतनानें (अ, उ, म व नाद हे विश्व, तैजस, व तुरीय आहेत, या निश्चित चिंतनानें) मात्र साध्य व्हावयाचें आहे.

माध्व—मात्रा = अंश. ॐकार = भगवान्. तुरीय हा नादरूपी अंशानें प्रतिपाद्य आहे, असें जाणावें. किंचित् = संसारात्मक. न चिंतयेत् = चिंतन करित नाहींत. सारांश, उपासकांचा तुरीयांत प्रवेश झाला म्हणजे ते आनंदरूप होतात.

श्लोक पंचविसावा.

युञ्जीत प्रणवे चेतः प्रणवो ब्रह्म निर्भयम्।
प्रणवे नित्ययुक्तस्य न भयं विद्यते क्वचित् ॥ २५ ॥

अन्वय व अर्थः—**प्रणवे चेतः युञ्जीत** (प्रणवाचे ठिकाणीं अंतःकरणाची समाधि लावावी) **प्रणवः निर्भयं ब्रह्म** (प्रणव म्हणजे भयशून्य ब्रह्म होय) **प्रणवे नित्ययुक्तस्य क्वचित् भयं न विद्यते** (प्रणवाचे ठिकाणीं जो नित्ययुक्त झाला, त्याला कोठेंही भय असत नाहीं) ॥ २५ ॥

युञ्जीत समादध्याद्यथाव्याख्याते परमार्थरूपे प्रणवे चेतो मनः । यस्मात्प्रणवो ब्रह्म निर्भयम् । न हि तत्र सदा युक्तस्य भयं विद्यते कचित् " विद्वान्न बिभेति कतश्चन " इति श्रुतेः ॥ २५ ॥

सिद्धान्ती—प्रणवाचें परमार्थस्वरूप आम्हीं मागें वर्णिलें आहे, त्याप्रमाणें त्याचे ठिकाणीं मनाची एकाग्र समाधि लावावी. अंतःकरणाला प्रणवाचे ठिकाणीं नेऊन स्वस्थ करावें. कारण प्रणव अशाप्रकारचें ब्रह्म आहे कीं, जेथें भयाचें कारण असत नाहीं. तेथें ज्याची अखंड समाधि लागते, त्याला कालत्रयीं भीतीचा स्पर्श म्हणून होत नाहीं. ' ज्ञान-विज्ञानी पुरुषाला कसलीही भीति नसते ' अशी श्रुति प्रमाण आहे ॥ २५ ॥

रंगरामानुज—प्रणवाचें (हरीचे) ठिकाणीं मुमुक्षूनें आपलें मन तद्रूप करावें. विश्वाद्यात्मक प्रणव हा गुणपूर्ण (ब्रह्म = हरि) व निर्भय आहे. विश्वादि चार रूपांचा हरि जागृतादि चारी अवस्थांचा नेता प्रणेता आहे. ह्या प्रणवाचें (हरीचें) नित्ययोगानें ध्यान करणारा उपासक निर्भय अकुतोभय-होतो.

माध्व—प्रणव हरि कां ? कारण जागृतादि चारी अवस्थांचा नेता जो हरि तो प्रणव (अ, उ, म्, नाद) वाच्य आहे. सर्व अवस्थांचा नेता हरि व अ, उ, म्, नाद ह्या मात्रा सर्व अवस्थांचा निर्देश करितात. सारांश प्रणव हा विष्णूच्या चारी रूपांचा (विश्व, तैजस, प्राज्ञ व तुरीय रूपांचा) वाच्य आहे.

श्लोक सविसावा.

प्रणवो ह्यपरं ब्रह्म प्रणवश्च परः स्मृतः ।
अपूर्वोऽनन्तरोऽबाह्योऽनपरः प्रणवोऽव्ययः ॥ २६ ॥

अन्वय व अर्थः—हि प्रणवः अपरं ब्रह्म, च प्रणवः परः स्मृतः (प्रणव हा अपरब्रह्म आहे, प्रणव हा परमात्मा आहे, असें म्हटलें आहे.) अपूर्वः, अनन्तरः, अबाह्यः, अनपरः, अव्ययः, प्रणवः (हा प्रणव कारणशून्य आहे, भेदशून्य आहे, अद्वितीय आहे, कार्यशून्य आहे, एकरस आहे, आणि अव्यय आहे) ॥ २६ ॥

परापरे ब्रह्माणि प्रणवः परमार्थतः क्षीणेषु मात्रापादेषु पर एवाऽऽत्मा ब्रह्मेति न पूर्वं कारणमस्य विद्यत इत्यपूर्वः । नास्यान्तरं भिन्नजातीयं किंचिद्विद्यत इत्यनन्तरः । तथा बाह्यमन्यन्न विद्यत इत्यबाह्यः । अपरं कार्यमस्य न विद्यत इत्यनपरः । सबाह्याभ्यन्तरो ह्यजः सैन्धवघनवदित्यर्थः ॥ २६ ॥

सिद्धान्तो—प्रणव हा पर आणि अपर ब्रह्म आहे. मंद आणि मध्यम बुद्धीच्या पुरुषांनीं ध्यान करण्यासाठीं प्रणव (ओंकार) हा अपरब्रह्मरूप होतो आणि उत्तम अधिकाऱ्यांना तो परब्रह्मरूप होतो. म्हणजे त्यांच्या त्यांच्या यथार्थ ज्ञानाला तो गोचर होतो. अथवा त्यांचें यथार्थज्ञान आत्मरूप होतें. सारांश, आत्मज्ञानी पुरुषांस हा प्रणव आत्मसाक्षात्कार देतो. केव्हां ? जेव्हां ओंकारमात्रा आणि आत्मपाद हीं सर्व भेदासह विनष्ट होतात तेव्हां, परमार्थतः प्रणव परब्रह्म होतो. ह्या परमात्म्याच्या पूर्वी विद्यमान असणारें कारण नसतें, म्हणून हा अपूर्व आहे, कारणशून्य आहे. याच्या अंतर्यामी दुसरें कांहीं एक नसतें, म्हणून हा अनंतर म्हणजे भेदाभेदशून्य असतो किंवा याच्याशिवाय भिन्न जातीचें दुसरें कांहीं एक नसतें म्हणून हा अनंतर आहे. तसेंच तो अबाह्य म्हणजे त्याच्या बाहेर कांहीं नाहीं असा सर्वव्यापी अथवा अद्वितीय आहे. याच्यापासून कोणतेंही कार्य उत्पन्न होत नाहीं, म्हणून हा अनपर आहे. सारांश, आंत-बाहेर एकरस-स्वरूप असणारा हा प्रणव (परमात्मा) अजन्मा आणि सैंधवघनाप्रमाणें (मिठाच्या सड्याप्रमाणें आंत-बाहेर एकरूप असणारा) आहे, हें तात्पर्य आहे ॥ २६ ॥

रंगरामानुज—अपर = पूर्वतन, मूलरूप, 'हरि. हा पूर्णब्रह्म आहे.' हा 'प्रणवः अपरं ब्रह्म' या पदांचा अर्थ आहे. परः = पश्चात्तनः, विश्वादि अवताररूप. हाही अवताररूपी हरि पूर्ण आहे. मूलरूपी हरि जसा पूर्ण तसा अवताररूपी हरिही पूर्ण आहे. तो कारणशून्य, नामशून्य, सर्वव्यापी, अनपर म्हणजे स्वतंत्र आणि शाश्वत (एकप्रकारचा मात्र) आहे.

माध्व—अपर = पाश्चात्य, पश्चात् झालेला. प्रणव = ॐकारप्रतिपाद्य चतूरूप भगवान. पर = पूर्वकालीन, वासुदेवादि. प्रथम वासुदेवादि आणि नंतर प्रणव. उभयतां ब्रह्मच होत. पूर्व व पश्चिम अवतारांत ब्रह्म पूर्णच असतें. अवतारांत गुणापकर्ष होत नाहीं. प्रणव हा अनादि, अविनाशी, (किंवा ज्याशिवाय दुसरा अंतर्यामी नाहीं), सर्व विश्व व्यापून उरणारा. म्हणजे ज्याचा दुसरा स्थितिकर्ता नाहीं, असा व ज्याच्या गुणांचा नाश केव्हांही होत नाहीं, असा हा प्रणव आहे.

श्लोक सत्ताविसावा.

सर्वस्य प्रणवो ह्यादिर्मध्यमन्तस्तथैव च ।
एवं हि प्रणवं ज्ञात्वा व्यश्नुते तदनन्तरम् ॥ २७ ॥

अन्वय व अर्थः—हे सर्वस्य प्रणवः आदिः, मध्यं, तथा एव च अन्तः (कारण प्रणव हा सर्वांचा आदि, सर्वांचा मध्य आणि सर्वांचा अंत आहे) एवं हि प्रणवं ज्ञात्वा तत् अनंतरं व्यश्नुते (याप्रकारें

प्रणवाचें ज्ञान झालेला पुरुष साधननिरपेक्ष होऊन ब्रह्मस्वरूपांत प्रवेश करितो) ॥ २७ ॥

आदिमध्यान्ता उत्पत्तिस्थितिप्रलयाः। सर्वस्यैव मायाहस्तिरज्जुसर्प-मृगतृष्णिकास्वप्नादिवदुत्पद्यमानस्य वियदादिप्रपञ्चस्य यथा माया-व्यादयः । एवं हि प्रणवमात्मानं मायाव्यादिस्थानीयं ज्ञात्वा तत्क्ष-णादेव तदात्मभावं व्यश्नुत इत्यर्थः ॥ २७ ॥

सिद्धान्ती—हें जें सर्व दिसत आहे, याचा आदि, मध्य आणि अंत ही सर्व प्रणवच आहे; म्हणजे या सर्वांचीं, सर्व दृश्य विश्वाचीं, उत्पत्ति-स्थिति-लयादि कार्यें याच्या सत्तेनें होत असतात. हें सर्व विश्व कल्पित आहे. एखाद्या मांत्रिकानें उत्पन्न केलेला गज, भ्रांतीनें उत्पन्न झालेला सर्प, सूर्यकिरणांनीं निर्माण केलेलें मृगजल किंवा वासनेनें उत्पन्न झालेलें स्वप्न, इत्यादि इत्यादि, गज, सर्प, जलादि (वस्तु) मायावी-आदिकारणांमुळें कल्पित असतात, मिथ्या असतात, भ्रांतिजन्य असतात. त्याप्रमाणें आकाशादि हा सर्व प्रपंच व हें सर्व दृश्य विश्व कल्पित आहे, मायाजनित आहे, अपारमार्थिक आहे, म्हणजे सत्य नाहीं, वास्तविक नाहीं. म्हणून या सर्व मायिक विश्वाचे उत्पत्त्यादि प्रकार प्रणवाच्या अधिष्ठानावर आरोपित होतात. प्रणव ही कायमा सत्य वस्तु आहे. याप्रमाणें हा वेळपर्यंत सांगितलेलें प्रणवस्वरूप म्हणजे आत्मस्वरूप हें स्वसत्तेनें हा दृश्य व मिथ्या प्रपंच निर्माण करितें. असें यथार्थ ज्ञान झालें, प्रपंच मिथ्या आहे, ब्रह्म सत्य आहे, असा एकनिश्चय झाला कीं एकाक्षणाचाही अवकाश न लागतां हा ज्ञानी पुरुष ब्रह्मरूप होतो; हें तात्पर्य आहे ॥ २७ ॥

रंगरामानुज—सृष्टिस्थितिलयकर्ता (उत्पादक, संरक्षक व संहारक) हरि आहे, असें पूर्वादि अनंतमंगलगुणवान् ईश्वरीचें ज्ञान झालें म्हणजे 'प्रारब्ध भोगांच्या लयानंतर' ('हा तदनन्तरं' चा अर्थ) हा ज्ञाता ब्रह्मामध्यें नित्य राहून आपल्या विशिष्ट स्थानादिकांचा उपभोग घेतो. सारांश, तो ब्रह्मरूपांत प्रविष्ट होतो तरी त्याचें विशिष्ट जीवस्वरूप नष्ट होत नाहीं.

श्लोक अठ्ठाविसावा.

प्रणवं हीश्वरं विद्यात्सर्वस्य हृदि संस्थितम् ।
सर्वव्यापिनमोंकारं मत्वा धीरो न शोचति ॥ २८ ॥

अन्वय व अर्थः—सर्वस्य हृदि संस्थितं हि ईश्वरं प्रणवं विद्यात् (सर्वांच्या—सर्व ब्रह्मादिपिपीलिकेच्या—हृदयाकाशांत वास्तव्य करणारा परमेश्वर हा प्रणव आहे असें समजावें) सर्वव्यापिनं ओंकारं मत्वा

आपण सर्वव्यापी ओंकार आहोंत, असें ध्यान ठेवून) धीरः न शोचति (विद्वान् पुरुष शोकशून्य होतो) ॥ २८ ॥

सर्वप्राणिजातस्य स्मृतिप्रत्ययास्पदे हृदये स्थितमीश्वरं प्रणवं विद्यात्सर्वव्यापिनं व्योमवदोंकारमात्मानमसंसारिणं धीरो बुद्धिमान्मत्वा न शोचति । शोकनिमित्तानुपपत्तेः । " तरति शोकमात्मवित् " इत्यादिश्रुतिभ्यः ॥ २८ ॥

सिद्धान्ती—ब्रह्मदेवापासून अत्यंत सूक्ष्म पिपीलिकेपर्यंत जे जीव आहेत, त्यांचें हृदय म्हणजे स्मृतीचें व साक्षात्काराचें अथवा स्मृतिसाक्षात्कारांचें स्थान आहे. ह्या स्थानांत श्रीपरमेश्वराचें वास्तव्य आहे. म्हणून हा परमेश्वर म्हणजे ओंकार होय, असें समजून ॐकाराचें ध्यान करावें. असो; याप्रमाणें निखिल भुवनांस आकाशाप्रमाण अंतर्बाह्य व्यापणारा व आकाशालाही अंतर्भूत करणारा ॐकार हा असंसारी म्हणजे नित्य व निर्विकार आत्मा आहे, असा विद्वान् पुरुषानें साक्षात्कार करून घ्यावा. सारांश, साक्षात्कार होईपर्यंत अखंडध्यान करावें. हा साक्षात्कार झाला म्हणजे विद्वान् पुरुषाला शोकाचें कारणच उरत नाहीं. ' आत्मवेत्ता शोकसागर तरून जातो ' इत्यादि अनेक श्रुति ' आत्मवेत्ता शोकशून्य होतो ' असें प्रतिपादन करितात ॥ २८ ॥

रंगरामानुज—सर्वनियामक परमेश्वर (प्रणव) हा सर्वांच्या अंतःकरणांत आहे, असें ध्यान करावें. ही ध्यानोपासना सिद्ध झाली म्हणजे ध्याता शोकशून्य होतो व त्याचे ' अपहतपाप्मत्वादि ' अष्टगुण प्रकट होऊन तो मुक्त होतो.

याप्रमाणें समस्त व व्यस्त प्रणवाच्या साहाय्यानें भगवदुपासनेचा विधि आहे.

माध्व०—प्रणव ' अणु ' आहे, कारण तो जीवहृदयांत राहतो, पण तो व्यापी आहे म्हणून महत् आहे. हें कसें ? प्रणव हा ईश्वर आहे आणि त्याला अघटित घटकशक्ति आहे.

श्लोक एकोणतिसावा,

अमात्रोऽनन्तमात्रश्च द्वैतस्योपशमः शिवः ।
ओंकारो विदितो येन स मुनिर्नेतरो जनः ॥ २९ ॥

इति माण्डूक्योपनिषदर्थाविष्करणपरायां (सु) गौडपादीयकारिकायां (सु) प्रथममागमप्रकरणम् ॥ १ ॥

ॐतत्सत् ।

अन्वय व अर्थः—अमात्रः अनन्तमात्रः च, द्वैतस्य उपशमः, शिवः (ॐकार हा मात्राशून्य आहे, अपरिमित आहे, द्वैताचा म्हणजे संसा-

राचा उपशम करणारा आहे आणि मंगलदायक आहे) येन ओंकारः विदितः, स मुनिः, न इतरः जनः (ज्याला ओंकाराचें यथार्थज्ञान झालें तोच मुनि होय. इतर जनांस मुनि म्हणतां नये) ॥ २९. ॥

अमात्रस्तुरीय ओंकारो मीयतेऽनयेति मात्रा परिच्छित्तिः साऽनन्ता यस्य सोऽनन्तमात्रः। नैतावत्त्वमस्य परिच्छेत्तुं शक्यत इत्यर्थः। सर्वद्वैतोपशमत्वादेव शिवः। ओंकारो यथाव्याख्यातो विदितो येन स परमार्थतत्त्वस्य मननान्मुनिः। नेतरो जनः शास्त्रविदपीत्यर्थः ॥२९॥

इति श्रीगोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यस्य परमहंसपरिव्राजकाचार्यस्य शंकरभगवतः कृतावागमशास्त्रविवरणे गौडपादीयकारिकासहितमाण्डूक्योपनिषद्भाष्ये प्रथममागमप्रकरणम् ॥ १ ॥

ॐ तत्सत्।

सिद्धान्ती—तुरीय ओंकार हा अमात्र आहे, म्हणजे तुरीयाचे ठिकाणीं अ, उ, म्, ह्या मात्रा नाहींत; इतकेंच नव्हे, तर तेथें बाह्य विश्वासह विश्वज्ञानी विराट्, अंतर्विश्वासह तैजस हिरण्यगर्भ आणि प्राज्ञासह अव्याकृत प्राण नाहीं; फार काय सांगावें, ज्याला मर्यादा घालितां येत नाहीं किंवा गणती करितां येत नाहीं असा तो अनंतमात्रात्मक आहे. तो अशा अशा परिमाणाचा किंवा इतक्या इतक्या वजनाचा आहे, असें कांहींच सांगतां येत नाहीं. असो; असा हा अमात्र व अनंतमात्र ओंकार सर्वद्वैतशून्य आहे आणि म्हणूनच तो शिवरूप अथवा मंगलदायक आहे. अंतर्बाह्यव्यापी ओंकार एकच असतो, म्हणून त्याचे ठिकाणीं द्वैताचा गंधही नसतो आणि द्वैत संपलें कीं शुद्धानंदस्थिति असते. यांप्रमाणें अमात्र, अनंतमात्र, अद्वैत व शिव असें ओंकारस्वरूप ज्याला यथार्थ समजून या परमार्थ तत्त्वाचें ज्यानें अखंड मनन केलें, तोच खरा मुनि होय. इतरांस सर्व शास्त्रें विदित असतील; पण ओंकारस्वरूप ज्यांस समजलें नाहीं, व ज्यानें त्याचें ध्यान केलें नाहीं, तो खरा मुनि नव्हे ॥२९॥

आगमप्रकरण व श्रीगौडपादकृत कारिकांचें भाष्य—भाषांतर समाप्त.

रंगरामानुज—अमात्र=निरंश, मूलरूपी. अनंतमात्र=जगद्व्यापारासाठीं विश्वतैजसादि अनंत अंशांनीं प्रकट होणारा. द्वैतोपशम=उपासकांची अरिष्टसंतति नष्ट करणारा. हें जाणणारा मुनि मुक्त होतो; इतर लोक जन्ममरणाच्या चक्रांत राहतात. 'स मुनिर्नेतरो जनः' हे शब्द दोनदां आहेत, त्याचा अभिप्राय (१) सर्व प्रपंच नीट लक्ष्य देऊन ध्यानांत ठेवावीं हा व (२) उपनिषद् संपलें हें सांगावें हा आहे.

टीप.—अमानवाभ्यो वारिह. · मुनिः—अपरोक्षज्ञानी. यांच्याही पाठांत "स मुनिर्नेतरो जनः" याची द्विरुक्ति आहे. हीं वेद व वैदिक ग्रंथांत अर्थाचें अवधारणकरण्यासाठीं [illegible] शेवटीं हा श्लोक आहे.

एको ऽपि निर्विशेषो ऽपि चतुर्धा व्यवहारभाक्
यस्तं वन्दे चिदानन्दं विष्णुं विश्वादिरूपिणम्

एकच एक असूनही जो सर्वविशेषशून्य आहे; पण असें असतांही जो विश्वादि-चार रूपें धारण करितो, त्या ज्ञानानन्द-रूपी व विश्वादिरूपी विष्णूला मी प्रणिपात करितों.

मागें एकदां सांगितल्याप्रमाणें आलांही म्हणावेसें वाटतें कीं श्रीरंगरामानुज व श्रीमाध्व सामान्यतः एक पंथानेंच जाणें उपनिषदांचें व्याख्यान करितात. असो; मला जे भाग [illegible] भागांत थोडक्यांत अवतरण मी केलें आहे तें तुह्मांस सांगण्याचें कारण नाहीं.

हें श्रीमाध्वभाष्यसार श्रीनिवासतीर्थीय [illegible] आधारें काढलें आहे.

कारिकासु

द्वितीय-तृतीय-चतुर्थ प्रकरणानि

अन्यस्मिन् स्वरूपसंदर्भे संकलितानि

ॐ

तैत्तिरीयोपनिषत्

(भाष्यभाषांतरसहितः)

संपादक

[illegible] गंगाधर भानु बी॰ए॰

ऐतरेयोपनिषत्.

आचार्यकृत–प्रस्तावनेचा सारांश.

जीवाचा पुरुषार्थ 'आपण ब्रह्म आहों' हें विचारदृष्टीनें समजून घेण्याचा आहे; असें आचार्यांनीं ठिकठिकाणीं सांगून ठेविलें आहे. स्वरूपतः जीव ब्रह्म होता, ब्रह्म आहे आणि ब्रह्म असेल, असा त्यांचा पूर्ण निश्चय आहे; आणि तो उपनिषदांच्या शास्त्रशुद्ध आणि संप्रदायपूर्वक अभ्यासानें सिद्ध झाला आहे. त्यांचा निश्चय म्हणजे कविकल्पना नव्हे, किंवा प्रतिपक्षाचें खंडन करण्यासाठीं उत्पन्न केलेलें शब्दच्छलात्मक नैयायिकशास्त्रही नव्हे. असो; त्यांनीं या प्रस्तावनेंत कोणकोणत्या मुख्य गोष्टींचा उल्लेख केला आहे; त्यांचें ह्या सारांशामध्यें एकत्र ग्रथन केलें असतां आचार्यांची प्रस्तावना वाचकांस ठीक रीतीनें समजेल, या हेतूनें पुढील प्रयत्न केला आहे.

एतरेय–आरण्यकाच प्रथम उपासनात्मक भाग आटपल्यानंतर ज्ञानकांडाला आरंभ होतो. प्रथमतःच आचार्यांनीं सांगून ठेविलें आहे कीं, 'आपलें चैतन्य ज्ञानरूप करणें' हा प्रत्येक जीवाचा अंतिम पुरुषार्थ आहे आणि त्याचेंच प्रतिपादन या ज्ञानकांडांत केलें आहे. येथें श्रुति–कथित प्रयोजक कर्म परिसमाप्त होतें. उपासनेमध्यें ज्ञान आणि कर्म यांचा समुच्चय होतो आणि त्याचें फल अपरब्रह्म विषयाचें ज्ञान ब्रह्मप्राप्ति हें होतें. उपासनेमध्यें प्राणाख्य ब्रह्म हेंच उपास्य आहे, सर्व देवता याच्याच विभूति: आहेत; अपरब्रह्माची प्राप्ति झाली म्हणजे आपल्यासही देवतासामर्थ्य प्राप्त होतें, सर्वप्रकारचें ऐश्वर्य मिळतें; आणि उपासनेच्या आनंदांत बाकीचे सर्व आनंद संग्रहित होऊन सांसारिक जीवाचें पूर्ण सार्थक्य होतें. ज्ञान–कर्म–समुच्चयवादी हें फल सांगत असतात. जीवाला यापलीकडे जातां येत नाहीं; असें त्यांचें म्हणणें आहे. ह्या पक्षाचा निरास करण्यासाठीं आचार्यांनीं पुढील व्याख्यान केलें आहे.

ते म्हणतात, 'शुद्ध आत्मस्वरूपाचें ज्ञान सांगावें' असा प्रस्तुत उपनिषदाचा हेतु आहे. कारण, कर्मकांडांमध्यें ज्या अग्निप्रमुख देवता सांगितल्या आहेत, त्या **संसारी** आहेत; **उत्पन्न झाल्या आहेत,** वासना, अभिमान, क्षुधा, तृष्णा, इत्यादि उपाधी आम्हां संसाऱ्यांप्रमाणें त्यांच्याही मागें लागल्या आहेत, असें या उपनिषदांत सांगितलें आहे. पण परब्रह्माला या उपाधींचा स्पर्श नसतो. म्हणून देवतांची प्राप्ति किंवा अपरब्रह्माचें ज्ञान इत्यादि फलें ज्ञानकर्मसमुच्चयानें

प्राप्त झाली, तरी जीवाचें संसारित्व आणि तज्जन्य दुःख-भावत्व संपत नाहीं. अर्थात् हा शेवटचा पुरुषार्थ नव्हे.

प्रतिपक्षालाही हें म्हणणें संमत झालें. कारण, जन्म-मरणात्मक संसाराचा निरास करावा, हा प्रत्येक वैदिक मताला मान्य असणारा पुरुषार्थ आहे. तथापि अद्वैतेतर तत्त्वज्ञांस वेदांचें व वेदप्रणीत कर्मांचें अत्यंत महत्त्व वाटत असतें. कर्म सोडावें, असें त्यांस केव्हांही वाटत नाहीं, किंवा कर्म झुटेल, ही गोष्ट त्यांना शक्य दिसत नाहीं, म्हणून कर्माभिमानी प्रतिपक्षी पुढील आक्षेप घेतो. (अ) ऐतरेयश्रुति प्रथम कर्म सांगून नंतर ज्ञान सांगते. (आ) संन्यासाश्रमाचा उल्लेख श्रुतीनें केला नाहीं. (इ) येथें 'हा ब्रह्म आहे, हा इंद्र आहे' असा उपक्रम करून (खंड ५ मंत्र ३ पहा) त्याच मंत्राच्या शेवटीं सर्व स्थावरजंगम पदार्थ ब्रह्मात्मक आहेत, असें सांगितलें आहे. याच अर्थाचा उल्लेख ब्राह्मण-मंत्रांतही झाला आहे. इतर ठिकाणींही श्रुतीचा असाच अभिप्राय प्रकट झाला आहे. या उपनिषदांतसुद्धां 'प्रज्ञानी असणारें प्राणात्मक ब्रह्म अंतिम पुरुषार्थ आहे' असें सांगितलें आहे. (ई) आचार्य पुनरुक्तीचा दोष काढतील, त्याच्या निराकरणासाठीं प्राणाख्य ब्रह्म म्हणजे 'विश्वाची सृष्टि-प्रभृति कर्में करणारा ईश्वर होय.' असा अर्थ केला आहे. तसेंच येथें केवळ उपासना मात्र सांगितली आहे आणि ही उपासना 'मी ब्रह्म आहें' अशा भावनेनें करावयाची आहे. असा अर्थ समजून घेतला म्हणजे ब्राह्मणांत सांगितलेल्या अर्थाची पुनरुक्ति होत नाहीं. (उ) विद्या म्हणजे उपासना आणि अविद्या म्हणजे कर्म या उभयतांचाही साहचर्यानें उपयोग होतो, 'या लोकीं शंभर वर्षे कर्म करीत रहावें.' इत्यादि मंत्र स्पष्ट सांगतात कीं, ज्ञान मिळविण्याचा अधिकार कर्म करणाऱ्याला मात्र आहे. 'जीवाचें दहन यज्ञपात्रांनीं होतें.' यावरून जीवानें शेवटपर्यंत याज्ञिक असलें पाहिजे, असें ठरतें आणि शेवटीं 'जीवाला लोकऋण, ऋषिऋण आणि देवऋण हीं तीन ऋणें यावयाचीं असतात; हीं फेडल्याशिवाय संसार संपावयाचा नाहीं.' असा श्रुतिपठित न्याय आहे.

तात्पर्य, श्रुतीनें कर्माधिकाऱ्याला मात्र ज्ञानाचा अधिकार दिला आहे, हें सिद्ध आहे. आतां संन्यास घ्यावा, असें कोठें कोठें सांगितलें आहे; तें एकतर ज्ञानस्तुत्यर्थ असावें, किंवा ज्याला कर्म करण्याचा अधिकार नाहीं, अशा अद्विजासाठीं किंवा ज्याला कर्म करितां येत नाहीं, अशा अंधपंगूसाठीं सांगितलें असावें.

आचार्य म्हणतात: हें प्रतिपक्षाचें म्हणणें व्यर्थ आहे. कारण, ज्याला फलाची अपेक्षा नसते, त्यानें कर्म करणें संभवनीय नाहीं. ब्रह्मज्ञान झालें म्हणजे फलाशा संपते, तेव्हां कर्म आणि ज्ञान यांचा समुच्चय शक्य नाहीं; शिवाय, प्रथम भागांत कर्म सांगितलें, तें ज्ञानासकट सांगितलें. आतां ज्ञानकांडांत 'शुद्ध व सर्वसंसारदोषशून्य असें पूर्णकाम ब्रह्म मी आहें' हें सांगावयाचें आहे; अर्थात् येथें

कृत किंवा अकृत, कर्तव्य अथवा अकर्तव्य व प्रयोजन यांचा संबंध मुळींच राहत नाहीं. संन्यासाचा साक्षात् उल्लेख श्रुतीनें केला नाहीं, तरी 'मी प्रज्ञानब्रह्म आहें, वामदेवानें शरीराचे सर्व कोश फोडून आत्मलोक सिद्ध केला' इत्यादि वाक्यें परिग्रहत्यागाचा परंपरया उल्लेख करितात. येथें शुद्ध ब्रह्म मात्र सांगितलें आहे, 'असें 'प्रज्ञानं ब्रह्म' या उक्तीनें स्पष्ट ठरतें. आतां 'श्रुतीचा अधिकार अप्रतिहत आहे, तिनें सांगितलेलें कर्म ब्रह्मज्ञानेंही केलें पाहिजे.' असें प्रतिपक्षी म्हणेल तर आचार्य म्हणतातः श्रुतीचा जनक जो परमात्मा, तद्रूप जीव झाला म्हणजे त्याच्यावर श्रुतीची सत्ता चालत नाहीं. ज्याला कांहीं भीति असेल, कांहीं हवें असेल; सारांश, जो तिच्या राज्यांत संचार करील, त्याच्यावर तिची सत्ता चालेल; शिवाय, सर्वांनीं श्रुतीनें सांगितलेलीं सर्व कर्में केलीं पाहिजेत, असें ठरल्यास ब्रह्मचाऱ्यानें गृहस्थाचीं किंवा द्रव्यार्थी वैश्यानें ज्ञानार्थी ब्राह्मणाचीं कर्में केलीं पाहिजेत, असा घोंटाळा उत्पन्न होईल. श्रुतीचें काम व्यवस्था करण्याचें आहे, घोंटाळा करण्याचें नाहीं. आणखी, जी श्रुति, जीव आणि ब्रह्म यांच्यामध्यें भेद आहे, प्रत्येक कर्माचें फल कर्मकर्त्यास मिळालें पाहिजे, असें सांगते, तीच श्रुति 'जीव-ब्रह्म एक आहेत व कर्माचें फल मिळावयाचें नाहीं;' असें कसें सांगेल? (अ) 'मी ब्रह्म आहें, ज्ञानपूर्ण आहें' असें ज्ञान व विज्ञान ज्याला झालें, तो उपासना कोणाची करणार? आपण स्वतःच उपास्य झाल्यानंतर उपासनेचा प्रश्न राहतो कोठें?

व्युत्थानें किंवा संन्यास घेण्याला सांगण्याची आवश्यकता शास्त्राला नसते. जो पूर्ण विरक्त झाला, तो वस्तुतः संन्याशीच होतो. शिवाय, 'इष्ट-वस्तूची इच्छा करा, अनिष्ट-वस्तूची करूं नका, असें शास्त्र केव्हांही सांगत नाहीं; किंवा त्याला सांगतांही येणार नाहीं. इष्ट-वस्तूची इच्छा असणें स्वभावसिद्ध आहे. शास्त्र केव्हांही स्वभावसिद्ध गोष्टींची आज्ञा करीत नाहीं. ज्ञानकांडाचें काम केवळ ब्रह्मवस्तूचें प्रतिपादन करावें, इतकेंच आहे. आतां 'संन्यास घ्यावा, असें आज्ञापर विधान कोठें कोठें आढळतें, त्याचा अर्थ 'क्रियेचा परित्याग करावा' हा आहे. क्रिया अविद्याजन्य असतें. कांहीं कर्में शुभ असतील, हें खरें; पण त्या कर्माचा परिपाक संसारोत्पत्ति हा होतो. विरक्त जिज्ञासूला संसार नको असतो, म्हणून तो कोणत्याही कर्माच्या वाटेला जात नाहीं. 'भिक्षा मागणें, हें तरी कर्मच आहे ना? जर भिक्षूनें कर्मत्याग केला तर गृहत्याग करणें किंवा भिक्षाटन करणें, हीं कर्में तरी तो कशाला करील?' असेंही म्हणतां येत नाहीं. गृह, गृहिणी, पत्र, इत्यादि सर्व कार्यें नैमित्तिक असतात. काम-नाश केलेला भिक्षु यांच्याशीं संबंध ठेवित नाहीं, हें नीटच आहे. आतां तो भिक्षाटन करितो तें तो श्रुतीनें सांगितलें आहे, म्हणून करीत नाहीं; तर वैराग्य उत्पन्न होत असतां शरीरधारणासाठीं ज्या भिक्षासंप्रदायाचा त्यानें स्वीकार केला असतो, तोच तो पुढें चालवितो. इतकाच कायतो खरा भाग आहे. (आ) यावज्जीव कर्म करावें

हें केवळ अविद्वानाला (अब्रह्मज्ञाला) लागू आहे. तात्पर्य, ज्याला ज्याला म्हणून पूर्ण वैराग्य प्राप्त झालें, त्यानें यच्चावत् सर्व कर्मांचा त्याग करून संन्यास घ्यावा, मग तो ब्रह्मचारी असो, गृहस्थ असो किंवा वानप्रस्थ असो. 'अपरब्रह्माचें ज्ञान होण्यासाठीं तरी कर्म करावें' हें म्हणणेंही योग्य नाहीं. कारण अमृतत्व देणारें ब्रह्मज्ञान नाम, रूप, कर्म, इत्यादिकांनीं सर्वथा विवर्जित असतें. अपरब्रह्म नामकर्मसहित असतें. ऋणाचा प्रश्नही अविद्वानासंबंधानें असतो. विद्वानाला त्याचा कांहीं एक संबंध नाहीं. सर्वच ऋणी आहेत, असें म्हटलें तर ब्रह्मचाऱ्यानेंही अग्निहोत्र धारण केलें पाहिजे, असें होईल ! हें असें होणें प्रतिपक्षालाही इष्ट नाहीं. कर्म करण्याचा अधिकार ज्यांना नाहीं त्यांची व्यवस्था श्रुतीनें निराळीच केली आहे. आतां श्रुतीची सत्ता संपली, नीति-अनीतीचीं बंधनें तुटलीं, तर ब्रह्मज्ञ पुरुष काय हवें तें करावयास मोकळा होईल, तो बाटेल ती अनर्थोत्पादक कर्मे करील, अशी शंका घेणेंही योग्य नाहीं. कारण त्यानें कर्म-प्रवृत्त करणाऱ्या कामाचा विनाश सर्वथा केलेला असतो. अज्ञानी पुरुष स्वैराचरण करील. ज्ञानी पुरुष केव्हांही असत्-आचरण करणार नाहीं. 'अविद्येसह विद्या असली पाहिजे' या श्रुतीचा अर्थ असा आहे कीं, ज्या मुमुक्षूनें तपःप्रभृति व गुरूपासनाप्रभृति कर्मे करून अविद्येचा नाश केला, त्याला मृत्यूचें अतिक्रमण करितां येतें. आणि नंतर तो पूर्ण निष्काम झाला, म्हणजे तो अमृत होतो. तात्पर्य विद्या व अविद्या केव्हांही सहचारी असत नाहींत.

याप्रमाणें कर्म आणि ब्रह्मज्ञान यांचा संबंध कोणत्याही प्रकारें असणें शक्य नाहीं, असें आचार्यांनीं सिद्ध केलें आहे. ही सिद्धि केव्हां श्रुतिसाहाय्यानें, केव्हां श्रुत्यनुकूल युक्तीच्या साहाय्यानें आणि केव्हां स्वानुभवाच्या साहाय्यानें केली आहे. कर्म हें अभिमानजन्य आणि वासनाप्रेरित असतें. कर्माचा उगम भेदज्ञानापासून आहे आणि त्याचें पर्यवसानही भेदमूलक होतें. कर्म नित्य असो, नैमित्तिक असो, काम्य असो किंवा निषिद्ध असो; त्याचा उद्भव भेदज्ञानापासूनच असतो. अर्थात् हें असलें कर्म भेदपर्यवसायी व्हावयाचें. असल्या कर्माचा निष्काम, निरभिमान आणि अभेदमूलक ज्ञानाशीं संबंध होणें किंवा साहचर्य असणें शक्य नाहीं. ज्या मुमुक्षूनें वासनेचा व अभिमानाचा सर्वथा त्याग केला आहे त्याला मात्र ब्रह्मज्ञान होण्याचा संभव आहे, तोच ब्रह्मज्ञानाचा अधिकारी होतो. असो; या उपनिषदांतील **विषय** शुद्ध ब्रह्मज्ञान आहे, हें आचार्यांनीं प्रथमच सांगितलें आहे. तसेंच ब्रह्मज्ञान झालें असतां ब्रह्मज्ञाला अमृतत्वाची प्राप्ति होते, हें **फल**ही सांगितलें आहे. आणि ज्याला मोक्ष हवा असेल, त्यानें ब्रह्मज्ञानसंपादनाचा प्रयत्न करावा, हा **संबंध** होय. याप्रमाणें अधिकारी, विषय, फल आणि संबंध या अनुबंधचतुष्टयाची सिद्धि आचार्यांनीं आक्षेपांचा निरास करितां करितां केली आहे.

ही प्रस्तावना मुमुक्षूंनीं अति काळजीपूर्वक वाचावी, अशी सर्वांस विनंति करून आचार्यप्रस्तावनेचा सारांश येथें संपवितों.

आचार्यांची प्रस्तावना.

परिसमाप्तं कर्म सहापरब्रह्म—विषयविज्ञानेन। सैषा कर्मणो ज्ञानसहितस्य परा गतिरुक्थविज्ञानद्वारेणोपसंहृता। एतत्सत्यं ब्रह्म प्राणाख्यम्। एष एको देवः। एतस्यैव प्राणस्य सर्वे देवा विभूतयः। एतस्य प्राणस्यात्मभावं गच्छन् देवता अप्येति इत्युक्तम्। सोऽयं देवताप्ययलक्षणः परः पुरुषार्थः। एष मोक्षः। स चायं यथोक्तेन ज्ञानकर्मसमुच्चयेन साधनेन प्राप्तव्यो नातः परमस्तीत्येके प्रतिपन्नाः। तान्निराचिकिर्षुरुत्तरं केवलात्मज्ञानविधानार्थम् 'आत्मा वा इदम्' इत्याद्याह।

सिद्धान्ती—आपलें कर्म तर सर्व संपलें. अपरब्रह्माचें स्वरूप हाच कोणी एक विषय, त्याचें ज्ञानविज्ञान आम्हांस होऊन (व त्याची प्राप्ति होऊन,) आपलें कर्म परिसमाप्त झालें. कारण, **उक्थ** नामक जी ऋचांची माळा आहे, तिचें ज्ञान होऊन तिच्या ज्ञानद्वारानें जें अंतिम फल मिळावयाचें, अपरब्रह्माचें ज्ञान आणि तत्प्राप्त्यर्थ अवश्य असणारें कर्म यांच्या समुच्चयानें अपरब्रह्म नामक विषयज्ञान–विज्ञान होऊन जें श्रेष्ठ फल मिळावयाचें, तें फल आम्हांस मिळालें आहे. या ज्ञानविज्ञानाचा उपसंहार उक्थ मंत्रांनीं केला आहे, तो असाः 'सर्व भोज्य वस्तूंचा अंतर्भाव करणारा जो अध्यात्मीक अधिदैवी प्राण, जें **प्राण–नामक** ब्रह्म तेंच काय तें सत्य आहे. प्राणब्रह्म हाच काय तो एक सर्वेश्वर आहे. इतर सर्व देवता (इंद्रियांच्या अधिष्ठात्या देवता) या मुख्य प्राणाच्या विभूती (अंशावतार, विस्तार) आहेत. हा सर्वात्मक प्राण स्वस्वरूप आहे. असें विज्ञान झालें व विज्ञानासहित ध्यानोपासनादि कर्म झालें, म्हणजे सर्व–देवतात्मक–प्राणाची प्राप्ति, हें फल मिळतें.' हा उक्थ–नामक मंत्रमालेचा इत्यर्थ आहे. असो; प्राणनामक ब्रह्माची प्राप्ति होऊन ज्ञानसहित कर्मांची परमावधि झाली, तथापि शुद्ध आत्मस्वरूपाची प्राप्ति झाली नाहीं.

पूर्वपक्षी—कां बरें? आम्हीं तर म्हणतों, कीं, हा देवतात्मक प्राण म्हणजेच परमपुरुषार्थ आहे. हाच मोक्ष होय. कर्मसहित–ज्ञानोपासना विहित करणाऱ्या श्रुतिमंत्रांनीं व ब्राह्मणांनीं स्पष्ट सांगितलें आहे कीं, ज्ञानकर्मसमुच्चयानें मात्र ह्या प्राणनामक अपरब्रह्माची प्राप्ति करून घ्यावी. यापलीकडे दुसरी मोक्ष म्हणून वस्तु नाहीं व ज्ञानही नाहीं. अपरब्रह्माचें ज्ञान होऊन विहितकर्मानें प्राणनामक ब्रह्माची प्राप्ति करून घेतली, म्हणजे मोक्ष मिळतो. यापुढें ज्ञातव्य किंवा कर्तव्य असें कांहीं एक राहिलें नाहीं.

सिद्धान्ती—ह्या तुमच्यासारख्या पंडितांचें मत निराकृत करण्यासाठींच श्रुतीनें पुढील ग्रंथाचा अवतार केला आहे. प्राणब्रह्माचा अधिगम झाल्यानंतर पुढें जें निर्विशेष ज्ञानविज्ञान आहे, शुद्ध आत्मज्ञान आहे, तें सांगण्यासाठीं 'प्रथमतः आत्माच हें सर्व होता' इत्यादि ग्रंथाची योजना आहे. यापुढें 'कर्माचा किंवा कर्मसंबंधी ज्ञानाचा आत्मस्वरूपाशीं संबंध नाहीं' हें ठरवावयाचें आहे. जो शुद्धचित्त होऊन कर्मशून्य झाला, त्याला मात्र आत्मज्ञानाचा अधिकार आहे.

कथं पुनरकर्मसंबन्धिकेवलात्मविज्ञानविधानार्थ उत्तरो ग्रन्थ इति गम्यते? अन्यार्थानवगमात्। तथा च पूर्वोक्तानां देवता मन्यादीनां संसारित्वं दर्शयिष्यत्यशनायादिदोषवत्त्वेन। 'तमशनायापिपासाभ्यामन्ववार्जत्' इत्यादिना। अशनायादिमत्सर्वं संसार एव, परस्य ब्रह्मणोऽशनायाद्यत्ययश्रुतेः। भवत्वेवं केवलात्मज्ञानं मोक्षसाधनम्, न त्वत्राकर्म्येवाधिक्रियते; विशेषाश्रवणात्। अकर्मिण आश्रम्यन्तरस्येहाश्रवणात्। कर्म च बृहतीसहस्रलक्षणं प्रस्तुत्य अनन्तरमेवात्मज्ञानं प्रारभ्यते। तस्मात्कर्म्येवाधिक्रियते। न च कर्मासंबन्ध्यात्मविज्ञानम्, पूर्ववदन्ते उपसंहारात्। यथा कर्मसंबन्धिनः पुरुषस्य सूर्यात्मनः स्थावरजङ्गमादिसर्वप्राण्यात्मत्वमुक्तं ब्राह्मणेन मन्त्रेण च 'सूर्य आत्मा' इत्यादिना, तथैव 'एष ब्रह्मैष इन्द्रः' इत्याद्यपक्रम्य सर्वप्राण्यात्मत्वम्। 'यच्च स्थावरम्, सर्वं तत्प्रज्ञानेत्रम्' इत्युपसंहरिष्यति। तथा च संहितोपनिषत्—'एतं ह्येव बह्वृचा महत्युक्थे मीमांसन्ते' इत्यादिना कर्मसंबन्धित्वमुक्त्वा 'सर्वेषु भूतेष्वेतमेव ब्रह्मेत्याचक्षते' इत्युपसंहरति। तथा तस्यैव 'योऽयमशरीरः प्रज्ञात्मा' इत्युक्तस्य 'यश्चासावादित्य एकमेव तदिति विद्यात्' इत्येकत्वमुक्तम्। इहापि 'कोऽयमात्मा' इत्युपक्रम्य प्रज्ञात्मत्वमेव 'प्रज्ञानं ब्रह्म' इति दर्शयिष्यति। तस्मान्नाकर्मसंबन्ध्यात्मज्ञानम्।

पूर्व०—हें कशावरून? 'कर्मविरहित आत्मज्ञानाचें मात्र सेकीर्तन पुढील ग्रंथांत केलें आहे, आत्मज्ञान मात्र सांगितलें आहे,' असें म्हणण्याला तुम्हाला काय आधार आहे? आत्मज्ञानांत कर्माचा यत्किंचितूही संबंध नाहीं, असें तुम्ही कशावरून म्हणतां

सिद्धान्ती—कारण, या ग्रंथाचा दुसऱ्या तऱ्हेनें अर्थच लागत नाहीं. दुसरा, तुम्ही म्हणतां, तसा अर्थ करतांच येत नाहीं. उपक्रम, उपसंहार पहा; श्रुतीचें तात्पर्य

पहा; तुम्हांस आढळून येईल कीं, शुद्ध परमात्म्याचा व कर्मांचा कसलाही संबंध श्रुतीला इष्ट नाहीं. शिवाय, वरतीं ज्या अग्निप्रमुख-देवतांचा उल्लेख आला आहे, किंवा सृष्युत्पत्ति सांगणाऱ्या हिरण्यगर्भादि देवतांचा उल्लेख कराल, त्या सर्व खानपानादि-दोषांनीं युक्त असल्यामुळें संसृतीला म्हणजे जन्ममरणाला वश होणाऱ्या आहेत, सदोष आहेत, असेंही श्रुति दाखवून देईल. 'प्राण-नामक मुख्य आदितत्त्वाला **क्षुधा, तृष्णा इत्यादिकांनीं हा आत्मा संयुक्त करिता झाला**' ही श्रुतिच प्रत्यक्ष सांगते कीं, प्राणादि सर्व देवता दोषलिप्त आहेत. जेथें भूक, तहान वगैरे उपाधी आहेत, वृद्धि, क्षय असतात, तेथें संसार (जन्ममरण) असावयाचा. संसार वृद्धि-क्षयात्मक असतो, हें तुम्हांसही संमत असलें पाहिजे. पण परब्रह्माचे ठिकाणीं 'क्षुधातृष्णादि सर्व उपाधींचा निरास असतो' अशी श्रुति प्रस्तुतप्रसंगीं प्रमाण आहे. सारांश, ब्रह्मेतर सर्व दृश्य (संसारी) म्हणजे जन्ममरणात्मक असतें. आत्मा मात्र असंसारी आहे.

पूर्व०—बरें आहे, महाराज ! केवल म्हणजे असंसारी आत्म्याचें ज्ञान मोक्ष-दायक आहे, असें आम्हीही कबूल करितों. पण हें आत्मज्ञान मिळविण्याला वर्णाश्रमशून्य झालेला संन्यासी मात्र अधिकारी आहे, असें म्हणण्याला आधार ? श्रुतीनें अकर्मी म्हणजे संन्यासी हाच आत्मज्ञानाला अधिकारी आहे, असें कोठें विशेषरीतीनें सांगितलेंही नाहीं, हें निषेधात्मक प्रमाण झालें. आतां विधायी-प्रमाण पहा; अनेक-सहस्र-लक्षणांनीं युक्त जें कर्म त्याचें सादर विधान करून लागलेंच श्रुति आत्मज्ञानाच्या विषयाला प्रारंभ करिते. कर्म सांगून मागोमाग जर आत्मज्ञान श्रुति सांगते, कर्मविधान व आत्मज्ञान यांच्यामध्यें जर कोणताही दुसरा विषय येत नाहीं, तर आपल्यासही असें म्हणणें भाग पडेल कीं, कर्म करण्याला अधिकारी अस-णारे जीवच आत्मज्ञानाला अधिकारी होतात. कर्मविरक्त संन्यासी मात्र हा आत्मज्ञानाचा अधिकारी आहे, असें या उपनिषदाच्या उपसंहारावरूनही सिद्ध होत नाहीं. या उपनिषदाचा आरंभ कर्मात्मक आहे, तसाच उपसंहारही कर्मात्मक आहे.

शिष्य०—तो कसा बरें ?

पूर्व०—ऐका: ऐतरेय-ब्राह्मणामध्यें कर्म करण्यास अधिकारी असणारा पुरुष 'सूर्यात्मा होतो व सर्व स्थिरचर प्राण्यांचा आत्मा होतो' असें सांगितलें आहे. 'सूर्य हाच आत्मा आहे' इत्यादि मंत्रांमध्येंही असेंच सांगितलें आहे, त्याचप्रमाणें या उपनिषदांतही 'हाच ब्रह्म, हाच इंद्र' असा उपक्रम करून 'आणखी जें कांहीं स्थावर आहे, तें सर्व प्रज्ञानेत्र आहे' असा उपसंहार करणार आहेत; आणि सर्व प्राण्यांचा आत्मा ब्रह्म आहे, असें सांगणार आहेत. संहितोपनिषदामध्येंही असाच अर्थ वर्णिला आहे. 'महत्-उक्थामध्यें' ह्याच आत्म्याच्यासंबंधानें बह्वृच-शतर्ची-ऋग्वेदी-ऊहापोह करीत असतात' मंत्रानें आत्म्याशीं कर्माचा संबंध आहे, कर्म कर-

ण्याचा अधिकार असणाऱ्यानें आत्मविचार करावा, असें सांगून 'सर्व भूतांमध्यें हेंच ब्रह्म आहे, असें म्हणतात' असा उपसंहार केला आहे. त्याचप्रमाणें 'प्रज्ञात्मा नामक जो हा अशरीर आत्मा आहे' आणि 'जो हा आदित्यरूपी तो आहे' असें ज्याविषयीं वर्णन आहे, तो 'हे उभयतांही एकरूप आहेत, असें समजावें' असें एकत्व सांगितलें आहे.

(महत्—उक्थ नामक स्तोत्रामध्यें ऋग्वेदी आत्म्याच्या संबंधानें चर्चा करितात, त्यावरून यज्ञ करणाऱ्या लोकांनीं आत्मज्ञान करून घ्यावें, असा संबंध स्पष्टत्वानें प्रतीत होतो, आणि ज्या आत्म्याची हे याज्ञिक चर्चा करितात, तेंच हें ब्रह्म आहे; असा उपसंहार संहितोपनिषदांत केला आहे. त्याचप्रमाणें अशरीर प्रज्ञात्मा आणि आदित्य हे उभयतां एक आणि एकरूप आहेत, असें पूर्वोक्त आत्म्यासंबंधानें सांगितलें आहे. सारांश, कर्म करणाऱ्या अधिकाऱ्यालाही म्हणजे ब्रह्मचारी, गृहस्थ आणि वानप्रस्थ यांसही आत्मविचार करण्याचा अधिकार आहे, असें ठरतें.)

पू०—या उपनिषदांतही 'हा आत्मा कोण आहे?' असा उपक्रम करून 'प्रज्ञान हाच आत्मा होय' असें प्रज्ञात्व मात्र सिद्ध करणार आहेत. प्रज्ञा म्हणजे कर्म व ज्ञान यांचा समुच्चय करून होणारें ज्ञानविज्ञान होय. एवंच, आत्मज्ञानसंपादन करण्याचा अधिकार असणारा पुरुष कर्मविन्मुखच असला पाहिजे, संन्याशी असला पाहिजे, असें होत नाहीं. आत्मज्ञानाचा व कर्मांचा कांहीं एक संबंध नाहीं, असा वरील विवेचनाचा इत्यर्थ होत नाहीं. तात्पर्य, कर्माधिकाऱ्याला ब्रह्मज्ञानाचा अधिकार आहे, असें ठरतें.

पुनरुक्त्यानर्थक्यमिति चेत्—'प्राणो वा अहमस्म्यृषे' इत्यादि ब्राह्मणेन, 'सूर्य आत्मा' इति च मन्त्रेण निर्धारितस्यात्मनः 'आत्मा वा इदम्' इत्यादि ब्राह्मणेन 'कोऽयमात्मा' इति प्रश्नपूर्वकं पुनर्निर्धारणं पुनरुक्तमनर्थकमिति चेत्, न; तस्यैव धर्मान्तरविशेषनिर्धारणार्थत्वान्न पुनरुक्तदोषः। कथम्? तस्यैव कर्मसंबन्धिनो जगत्सृष्टिस्थितिसंहारादिधर्मविशेषनिर्धारणार्थत्वात् केवलोपास्त्यर्थत्वाद्वा; अथवा, आत्मेत्यादिः परो ग्रन्थसन्दर्भः आत्मनः कर्मिणः कर्मणोऽन्यत्रोपासनाप्राप्तौ कर्मप्रस्तावेऽविहितत्वाद्वा केवलोऽप्यात्मोपास्य इत्येवमर्थः। भेदाभेदोपास्यत्वाच्च 'एक एवात्मा' कर्मविषयं भेददृष्टिभाक्। स एवाकर्मकाले अभेदेनाप्युपास्य इत्येवमपुनरुक्तता॥

शि०—पण, येथें पुनरुक्तीचा दोष येतो, कसा तो पहा. 'हे ऋषे, प्राण हाच मी (आत्मा) आहें' इत्यादि ब्राह्मणांतील वाक्यानें व 'सूर्य हा आत्मा आहे' या

मंत्रानें ज्याचें स्वरूप निश्चित झालें आहे, त्याच आत्म्याचा स्वरूपनिश्चय 'हा आत्मा सूर्य आहे' इत्यादि ब्राह्मण-वाक्यानें सांगून, पुनः 'कोणता तो आत्मा! आत्मा म्हणजे काय?' इत्यादि प्रश्न उत्पन्न करून पुनः वाद-प्रतिवाद करावा, ही पुनरुक्ति नव्हे तर काय? आत्म्याचा स्वरूप-निश्चय मंत्रामध्यें आणि ब्राह्मणामध्यें झाल्यानंतर पुनः तोच तो प्रश्न उपनिषदामध्यें काढून तेंच चर्वित-चर्वण करावें, हें योग्य नव्हे. ही पुनरुक्ति अर्थशून्य असते, ह्याचे सर्व श्रम व्यर्थ होतात.

पू० प०—नाहीं. पुनरुक्तीचा दोष येथें येत नाहीं. कसा तो पहाः आत्म्याचे जे विशेष धर्म आहेत, त्यांचें स्वरूप ठरविण्यासाठीं या उपनिषदांत पुनः आत्मविचाराचा उपक्रम केला आहे; म्हणून पुनरुक्तीचा दोष येत नाहीं.

शि०—हें कसें?

पूर्व०—ऐका-ज्या आत्म्याचा कर्मांशीं संबंध आहे, त्याच आत्म्याचे विशेष धर्म सांगण्यासाठीं म्हणजे तोच आत्मा जगतांची उत्पत्ति, त्यांची स्थिति आणि त्यांचा संहार करणें इत्यादि धर्मात्मक आहे, इत्यादि त्याचे धर्म-विशेष आहेत, हें जीवास कळावें, एतदर्थ या प्रश्नाची पुनः उभारणी केली आहे; किंवा केवल जो आत्मा त्याची उपासना करावी. म्हणजे 'हा आत्मा' इत्यादि जीं पुढील ग्रंथसंदर्भांचीं वाक्यें आहेत, तेथें कर्मांशिवाय अन्य साधनाची म्हणजे उपासनेची प्राप्ति होते अथवा कर्मप्रसंगीं उपासना विहित करणें अप्रशस्त असतें, म्हणून आत्मा केवलरूपी जरी आहे; तथापि तो उपास्य आहे, अशी येथें उपासना विहित करावयाची आहे. उपासनेमध्यें आत्मा निराळा आणि कर्मद्वारा उपासना करणारा मी निराळा, असा संबंध असतो. पण, 'केवल आत्मा आहे व त्याच्यांशीं अभिन्न असणारा मी उपासक आहें,' अशी केवलोपासनेमध्यें दृष्टि असते. सारांश, उपासनेमध्यें भेददृष्टि असते. व अभेददृष्टीही असते. असा निराळा अर्थ येथें उत्पन्न होतो, म्हणून पुनरुक्तीचा दोष येत नाहीं.

(जगताची उत्पत्ति-आदि कर्म करण्याचे विशेष आत्म-धर्म स्पष्ट प्रतीतीला यावे, तसे मंत्रांमध्यें किंवा ब्राह्मणांमध्यें येत नाहींत, म्हणून आत्मस्वरूपाचा प्रश्न येथें उत्पन्न केला आहे. शिवाय उपासनेमध्यें केव्हां केव्हां अभिन्नदृष्टीनें उपासनेचा भाग येत नाहीं, म्हणून ही उपासना विहित करण्यासाठीं ह्या प्रश्नाची उत्पत्ति आहे. कर्मामध्यें उपासना होत असली तरी ती भेददृष्टीची असते. केवलात्म्याची उपासना अभेद-दृष्टीची असते. आत्मा एकच खरा; पण कर्मदृष्टीनें हा आत्मा उपास्य आणि मी उपासक असा भेद उल्लिखित होतो. पण केवलात्म्याच्या उपासनेमध्यें (अकर्मकाळीं) उपास्य आत्मा तोच उपासक आत्मा असें स्पष्ट होतें. हें सर्व जीवांच्या प्रत्ययाला यावें, म्हणून पुनरुक्तीचा दोष येथें येत नाहीं, असा पूर्वपक्ष आहे.)

'विद्यां चाविद्यां च यस्तद्वेदोभयꣳसह। अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययामृतमश्नुते' इति 'कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेच्छतꣳसमाः' इति च वाजिनाम्। न च वर्षशतात्परमाꣳमर्त्यानाम्, येन कर्मपरित्यागेन आत्मानमुपासीत। दर्शितं च तावन्ति पुरुषायुषोऽह्नां दशसहस्राणि भवन्ति' इति। वर्षशतं चायुः कर्मणैव व्याप्तम्। दर्शितश्च मन्त्रः 'कुर्वन्नेवेह कर्माणि' इत्यादिः; तथा 'यावज्जीवमग्निहोत्रं जुहोति' 'यावज्जीवं दर्शपूर्णमासाभ्यां यजेत' इत्याद्याश्च; 'तं यज्ञपात्रैर्दहन्ति' इति च। ऋणत्रयश्रुतेश्च। तत्र हि पारिव्राज्यादिशास्त्रम् 'व्युत्थायाथ भिक्षाचर्यं चरन्ति' इत्यात्मज्ञानस्तुतिपरोऽर्थवादोऽनधिकृतार्थो वा॥

पू०—पुनः पहाः-ईशावास्यामध्यें 'विद्या आणि अविद्या या उभयतांचेंही ज्ञान ज्याला एकदम होतें, तो अविद्येच्या साहाय्यानें मृत्यूचें उत्तरण करून विद्येनें अमृताचा भोक्ता होतो' असें म्हटलें आहे. तसेंच, त्याच शुक्लयजुर्वेदी-उपनिषदांमध्यें 'या लोकीं कर्मे करीत राहून मात्र शंभर वर्षे जगण्याची इच्छा करावी' असा मंत्र आहे, या मंत्रावरून काय स्पष्ट होतें बरें? मनुष्याला शंभर वर्षांहून जास्त आयुष्य नाहीं. या शंभर वर्षांच्या आयुष्यामध्यें म्हणजे सर्व आयुष्यभर जीवानें कर्मच करीत असावें, असें सांगितलें आहे. तेव्हां असा कांहीं आयुष्याचा भाग शिल्लक उरतच नाहीं, कीं जेव्हां कर्मत्याग करून आत्म्याची उपासना करावी. ही उपासना करण्या-प्रीत्यर्थ जीवाला वेळच नसतो. तेव्हां कर्म करतानांच आत्मोपासना केली पाहिजे, असें होत नाहीं काय? 'पुरुषाला दशसहस्र (?) दिवस आयुष्य आहे' असें स्पष्ट म्हटलें आहे. शंभर वर्षे तर कर्मानेंच व्याप्त झालीं पाहिजे आहेत, असें सांगणारा ईशावास्यांतील मंत्र आतांच आम्हीं उल्लेखित केला आहे. त्यांचेप्रमाणें 'जोंपर्यंत आयुर्दाय आहे, तोंपर्यंत अग्निहोत्रद्वारानें कर्म करावें' 'जोंपर्यंत देहांत प्राण आहे, तोंपर्यंत दर्शपूर्णमासांनीं यजन करावें,' इत्यादि मंत्र स्पष्ट सांगतात, कीं यावज्जीव मनुष्यानें कर्म केलें पाहिजे. 'त्याचें यज्ञपात्रांनीं दहन करितात' इत्यादि मंत्रही स्पष्ट सांगतात, कीं मरणकाळीं मृद्धा जीवाच्या देहाचें दहन यज्ञपात्रांनीं म्हणजे श्रुतिविहित कर्मानें झालें पाहिजे. आणखी; 'प्रत्येक जीवाला तीन ऋणें फेडावयाची असतात.' हें श्रुतिवाक्यही प्रत्येकानें गृहस्थाश्रम स्वीकारला पाहिजे, ब्रह्मचर्यांतच कर्म सोडून चालत नाहीं, याच अर्थाचा उद्बोध करीत आहे.

शिष्य:—पण, 'कर्मविन्मुख होऊन भिक्षाटन करितात' या संन्यास विहित करणाऱ्या वाक्याची वाट कशी लावितां?

पू०—हें वाक्य केवळ आत्मज्ञानाच्या स्तुतीकरितां उपयोजिलें आहे. हें केवळ अर्थवादपर वाक्य आहे. याचें तात्पर्य 'जीवानें कर्मविन्मुख व्हावें, असें नाहीं. शिवाय ज्यांना कर्म करण्याचा अधिकारच नाहीं, अशा अंध, पंगु इत्यादि विकलांग जीवांसाठीं वरील वाक्य विदित केलें असावें; हाही संभव आहे.तात्पर्य,(१) विद्या आणि अविद्या यांचा समुच्चय विहित केला आहे, म्हणून (२) शंभरवर्षेपर्यंत कर्मच करीत राहावें, असें सांगितलें आहे, म्हणून (३) मनुष्याचें दहनमुद्दां कर्मानिंच करावें, असें सांगितलें आहे, म्हणून (४) आणि जीवाला जन्मादारभ्य तीन ऋणें फेडावयाचीं असतात, म्हणून यावज्जीव कर्म सुटत नाहीं, असा श्रुतीचा इत्यर्थ आहे. आतां,-कर्मविन्मुख व्हावें, अशा अर्थाचीं वाक्यें कोठें कोठें आढळतात. पणं तीं केवळ आत्म-स्तुतिपर आहेत, असें समजावें, किंवा अंगवैकल्यामुळें ज्यांना कर्म करतां येतच नाहीं, त्यांच्यासाठीं हीं वाक्यें सांगितलीं असावीं. एवंच यावज्जीव जीवाचें कर्म सुटत नाहीं, हें तात्पर्य आहे. तेव्हां आत्मज्ञानाचें संपादन करण्याचा केवळ संन्याशाला मात्र अधिकार आहे असें जें तुम्हीं म्हणतां, तें व्यर्थ व अवैदिक आहे. केवलात्म्याची उपासना करावी, त्याचें ज्ञान संपादन करावें. कोणी ? कर्म करण्याचा अधिकार असणाऱ्या पुरुषानें हें सर्व करावें, हें तात्पर्य होय.

न, परमार्थात्मविज्ञाने फलादर्शने क्रियानुपपत्तेः—यदुक्तं कर्मिण एव चात्मज्ञानं कर्मसंबन्धि चेत्यादि, तन्न; परं ह्याप्तकामं सर्व-संसारदोषवर्जितं ब्रह्माहमस्मीत्यात्मत्वेन विज्ञानेन, कृतेन कर्तव्येन वा प्रयोजनमात्मनोऽपश्यतः फलादर्शने क्रिया नोपपद्यते । फला-दर्शनेऽपि नियुक्तत्वात्करोतीति चेत्, न; नियोगाविषयात्मदर्शनात् । इष्टयोगमनिष्टवियोगं वात्मनः प्रयोजनं पश्यंस्तदुपायार्थी यो भवति, स नियोगस्य विषयो दृष्टो लोके न तु तद्विपरीतनियोगाविषय-ब्रह्मात्मत्वदर्शी । ब्रह्मात्मत्वदर्श्यपि संश्चेन्नियुज्येत, नियोगावि-षयोऽपि सन्न कश्चिन्न नियुक्त इति सर्वं कर्म सर्वेण सर्वदा कर्तव्यं प्राप्नोति । तच्चानिष्टम् । न च स नियोक्तुं शक्यते केनचित् । आम्नायस्यापि तत्प्रभवत्वात् । न हि स्वविज्ञानोत्थेन वचसा स्वयं नियुज्यते । नापि बहुवित्स्वामी अविवेकिना भृत्येन । आम्नायस्य नित्यत्वे सति स्वातन्त्र्यात्सर्वान्प्रति नियोक्तृत्वसामर्थ्यमिति चेत्, न; उक्तदोषात् । तथापि सर्वेण सर्वदा सर्वमविशिष्टं कर्म कर्तव्य-मित्युक्तो दोषोऽप्यपरिहार्य एव । तदपि शास्त्रेणैव विधीयत इति चेत्—यथा कर्मकर्तव्यता शास्त्रेण कृता, तथा तदप्यात्मज्ञानं तस्यैव

कर्मिणः शास्त्रेण विधीयत इति चेत्, न; विरुद्धार्थबोधकत्वानुपपत्तेः । न ह्येकस्मिन्कृताकृतसंबन्धित्वं तद्विपरीतत्वं च बोधयितुं शक्यम् । शीतोष्णत्वमिवाग्नेः । न चेष्टयोगचिकीर्षा आत्मनोऽनिष्टवियोगचिकीर्षा च शास्त्रकृता, सर्वप्राणिनां तदर्शनात् । शास्त्रकृतं चेत्, तदुभयं गोपालादीनां न दृश्येत, अशास्त्रज्ञत्वात्तेषाम् । यद्धि स्वतोऽप्राप्तम्, तच्छास्त्रेण बोधयितव्यम् । तच्चेत्कृतकर्तव्यताविरोध्यात्मज्ञानं शास्त्रेण कृतम्, कथं तद्विरुद्धां कर्तव्यतां पुनरुत्पादयेत् शीतताभिवाग्नौ, तम इव च भानौ ? न बोधयत्येवेति चेत्, न; 'स म आत्मेति विद्यात्प्रज्ञानं ब्रह्म' इति चोपसंहारात् । 'तदात्मानमेवावेत्तत्त्वमसि' इत्येवमादिवाक्यानां तत्परत्वात् । उत्पन्नस्य ब्रह्मात्मविज्ञानस्याबाध्यमानत्वान्नानुत्पन्नं भ्रान्तं वा इति शक्यं वक्तुम् । त्यागेऽपि प्रयोजनाभावस्य तुल्यत्वमिति चेत् 'नाकृतेनेह कश्चन' इति स्मृतेः—॥

सिद्धान्ती—तुम्ही म्हणतां असें श्रुतीचें रहस्य नाहीं. परमार्थाचें ज्ञान झालें असतां तेथें कोणत्याही प्रकारची फलप्राप्ति दृष्टोत्पत्तीला येत नाहीं. पण कर्माचें फल तर अवश्य झालें पाहिजे, म्हणून आत्मज्ञानाचें संपादन झालें असतां, कर्माच्या अस्तित्वाची उपपत्ति होत नाहीं. पहाः- (१); तुम्ही प्रथम असें म्हणालांत कीं, कर्माधिकारी पुरुषाला मात्र आत्मज्ञान होतें, व ज्ञान आणि कर्म यांचा नित्य संबंध आहे. पण हें म्हणणें श्रुतितात्पर्याशीं विरोधी आहे. पहा कीं, 'सर्वश्रेष्ठ, सर्व कामप्राप्त आणि सर्व-संसार-दोषांनीं अलिप्त असें शुद्धब्रह्म मीं आहें' असें आत्मैक्यविज्ञान झालें असतां केलेल्या म्हणजे कृत किंवा कर्तव्य असणाऱ्या कर्माचें प्रयोजन आत्म्याला ब्रह्मज्ञाला दिसत नाहीं, अर्थात् फलदर्शन होणें शक्य नाहीं, म्हणन आत्मज्ञानाच्या वेळीं कर्माच्या साहचर्याची उपपत्ति होत नाहीं. आत्मज्ञान आणि कर्म यांचें साहचर्य असणें शक्य नाहीं. कर्म हें नित्यफलात्मक असतें. आत्मज्ञानांत कर्मफल दिसत नाहीं, म्हणून ज्ञान आणि कर्म यांचा समुच्चय करणें श्रुतीला संमत नाहीं. तात्पर्य, फल हवें असलें म्हणजे कर्म होतें. आत्मैक्यज्ञान झालेल्याला कर्म करणें अशक्य आहे. अशक्य व विरोधात्मक उपदेश श्रुति केव्हांही करीत नाहीं.

पू०—फल दिसलें नाहीं, तरा श्रुतीचें आज्ञा आहे; म्हणून आत्मज्ञानी कर्म करितो. किंवा त्यानें तें केलेंच पाहिजे.

सिद्धान्ती—तसें नाहीं. आत्मज्ञान केव्हांही आज्ञेचा विषयच होत नाहीं. 'तें फल मिळविण्यासाठीं हें मला करावयास पाहिजे' असें ज्याला वाटत असेल, तो

आज्ञेच्या कक्षेंत येतो. 'मी असंग आहें,' असें ज्ञान ज्याला झालें, अहं-ममत्व ज्याचें सर्वथा सुटलें, त्याला श्रुतिसुद्धां आज्ञा करूं शकत नाहीं. केव्हांही झालें तरी इष्ट-वस्तूची प्राप्ति व्हावी, किंवा अनिष्ट-वस्तु नाहींशी व्हावी, असा प्रत्येक संसारी जीवाचा हेतु असतो; आणि त्या हेतूच्या सिद्ध्यर्थ जो उपाय शोधीत असतो, असा पुरुष आज्ञेच्या कक्षेंत येतो. हें ठीक आहे; पण ज्यानें इष्टानिष्ट-सर्व-हेतूंचा परित्याग केला, जो सर्वथा निरिच्छ झाला आणि मीच ब्रह्म आहें, असें ज्याला ज्ञान झालें, त्याला साधनान्वेषणाची अपेक्षा नसते, तो पुरुष श्रुतिनिगदित आज्ञा-कक्षेच्या बाहेर असतो. सारांश, विहित करणें अथवा अहित त्यागणें हा प्रश्न ब्रह्मात्मैक्य-ज्ञानांत उत्पन्न होत नाहीं. ब्रह्मज्ञ हा आज्ञाक्षेत्रांत येत नाहीं. सरेंच, आप्तकामाला कोण आज्ञा करूं शकेल?

पू०—अशा ज्ञानी पुरुषालाही कर्म करावयाची आज्ञा श्रुति करील. ती सर्व-समर्थ आहे. कोणी आज्ञेचा विषय असो वा नसो—

सि०—हें म्हणणं न्याय्य नाहीं. कोणीही अनियुक्त नाहीं, सर्व नियुक्त आहेत, असें म्हटलें तर क्षत्रियास मात्र विहित असणारा राजसूय-यज्ञ ब्राह्मणांनीं करावा व क्षत्रियांनीं ब्राह्मणांस मात्र विहित असणारा अग्निष्टोम करावा, सारांश, श्रुतीनें सांगतलेलीं सर्व कर्में सर्वांनीं सर्वदा करावीं, असा प्रसंग प्राप्त होईल! हें तर सर्वथा अनिष्ट आहे. ब्राह्मणांनीं क्षत्रियांचीं कर्में करावीं, किंवा ब्रह्मचाऱ्यानें गृहस्थाचीं कर्में करावीं, असें तुम्हीही म्हणणार नाहीं. स्वाभाविक गुणावरून मात्र कर्म करण्याचा अधिकार ठरतो, हें तत्त्व तुम्हांसही मान्य असलें पाहिजे. तेव्हां ब्राह्मणाचे गुण असणाऱ्यानें क्षात्रकर्म करावें, किंवा क्षत्रियाचे मात्र गुण असणाऱ्यानें ब्रह्मकर्म करावें, असें तुम्हीही म्हणणार नाहीं. तात्पर्य, श्रुतीनें सर्वांस सारखें कर्म करण्याची आज्ञा केली आहे, हें म्हणणें युक्त नाहीं; तेव्हां हा न्याय येथें लागू पडत नाहीं. शिवाय, त्याला आज्ञा करणें श्रुतीलाही शक्य नाहीं. अहो! प्रत्यक्ष वेदाचीसुद्धां उत्पत्ति आत्मस्वरूपापासूनच आहेना? ब्रह्मज्ञ ब्रह्मच ना? तेव्हां आपणापासून उत्पन्न झालेले वेद आपल्या जनकाच्या सामर्थ्य-सर्वस्वाचा प्रतिरोध करतील किंवा जनकालाच आज्ञा करतील, हें म्हणणें संभवत नाहीं. कोणाही बहुश्रुत यजमानाला त्याचा अविवेकी भृत्य (सेवक) आज्ञा करूं शकत नाहीं.

पू०—असें कसें? आम्नाय म्हणजे वेद. हे नित्य असून स्वतंत्र आहेत व त्यांना अनात्मज्ञाप्रमाणें आत्मज्ञासही आज्ञा करण्याचें, त्यांनीं काय करावें व काय करूं नये, हें सांगण्याचें सामर्थ्य आहे. हें सामर्थ्य नाहींसें कसें होणार?

सिद्धान्ती—आतांच आम्हीं सेव्य-सेवकाचा दृष्टांत दिला ना? तसेंच, आत्मज्ञ पुरुष हा वेदाचा उत्पन्नकर्ता आहे, हें सांगितलेंना? निर्विषय झालेल्या ब्रह्मज्ञाला विशेष विषयासंबंधें आज्ञा करणारी श्रुति काय करायला सांगेल? सर्वव्यापी व आत्म

काम ब्रह्मज्ञ श्रुतिविषय होईल कसा? शिवाय, सर्वांनीं सर्वदा सर्व प्रकारचीं कर्में केलीं पाहिजेत, तेथें कोणताही भेदाभेद नाहीं, असें म्हटल्यानें जो दोष उत्पन्न होतो, तोही वरती स्पष्ट केलाच आहे.

पू०—असेल; पण शास्त्रानें आज्ञा केली आहे, ती सर्वांस मान्य असलीच पाहिजे. कर्मकर्तव्यता ठरविणाऱ्या शास्त्रानें ब्रह्मज्ञानाचें संपादन कर्माधिकाऱ्यानें करावें व त्यानें कर्मही करावें, असें सांगितलें आहे. दोन्हीही आज्ञा प्रमाणच आहेत. तेव्हां जीवानें केव्हां आत्मज्ञान मिळवावें, आणि त्यानेंच केव्हां केव्हां कर्मानुष्ठान करावें, असा शास्त्राच्या आज्ञेनुसार प्रसंग प्राप्त होतो.

सि०—ज्या शास्त्रानें ज्या जीवाला कमकतव्यतेची आवश्यकता सांगितली, त्याच शास्त्रानें त्याच पुरुषाला आत्मज्ञान संपादन करावें, असें सांगण संभवत नाहीं; कारण परस्परविरुद्ध अर्थाचा बोध करणारें हें शास्त्र आहे, असा म्हणण्याचा प्रसंग प्राप्त होईल. एकाच पुरुषाला कार्य-कारणाचा संबंध सांगून पुनः त्यालाच आणि त्याच काळीं तद्विपरीताचें (कार्यकारणशून्य असणाऱ्या ब्रह्माचें) ज्ञान शास्त्रानें सांगणें शक्य नाहीं. 'विशेष कर्म केलें असतां कर्त्याला विशेष फल प्राप्त होईल,' अस सांगणारें शास्त्र त्याच पुरुषाला व त्याच वेळीं 'जीव कर्म-कर्ता नाहीं व कर्म-फल-भोक्ता नाहीं' हें सांगेल, असें संभवत नाहीं. एकच पुरुष कर्ता आणि अकर्ता, भोक्ता आणि अभोक्ता आहे, असा ज्ञानसंचय कसा व्हावा? अग्नीचें ठिकाणीं शैत्य आणि उष्णता एकदम कधीं संभवतील काय? इष्टफलाची इच्छा करणें किंवा अनिष्टफलाची इच्छा न करणें हीं शास्त्रान सर्व प्राण्यांना विहित केलीं नसलीं पाहिजेत. ज्यांना आत्मज्ञान झालें आहे, त्यांनीं इष्ट-फलाची इच्छा करावी, अनिष्ट-फलाची करूं नये; असें सर्वज्ञ शास्त्र कधींही सांगणार नाहीं.

पू०—पण 'इष्टाची इच्छा असते, अनिष्टाची नसते.' असें तर शास्त्र सांगत आहे, असें दिसतें.

सि०—हें असें शास्त्रानें सांगण्याचें कारण नाहीं. कारण इष्टाची इच्छा व अनिष्टाची अनिच्छा असणें, हें सर्व प्राण्यास स्वाभाविक आहे. मग स्वाभाविक गोष्ट शास्त्र कशाला सांगेल? आतां शास्त्र सांगतेंच, असा आग्रह धरून तुम्ही म्हटलें, तर मग गोपालादि जे शास्त्रसंबंधें अज्ञ प्राणी आहेत, त्यांच्याठिकाणीं ही इष्टाची इच्छा दिसूं नये. कारण, त्यांना शास्त्राचें ज्ञान बिलकुल नसतें. पण ही इच्छा गोपालांत दिसते, म्हणून ही इच्छा शास्त्रकथित नव्हे. असो; जें जें स्वतः प्राप्त होत नाहीं व जें जें जीवाला सहज समजत नाहीं, तें तें शास्त्रानें सांगावें, असा न्याय आहे. तेव्हां स्वभावतः अप्राप्त व अज्ञात कृत-कर्तव्यता-विरोधी आत्मज्ञान (कर्मविरोध) ज्या शास्त्रानें सांगितलें आहे, तेंच शास्त्र आत्मज्ञानविरुद्ध असणाऱ्या कर्तव्याचें व तद्विच्छेचें ज्ञान कसें

सांगेल ? अग्निमध्यें शत्य उत्पन्न होतें, किंवा सूर्य-किरणांत अंधकार असतो, असें ज्ञान कधीं शास्त्र सांगेल काय ?

पू०—शास्त्र केवळ ज्ञान सांगतें, असें नव्हें; तर तें कर्म करण्याची आज्ञाही करीत असतें.

सि०—नाहीं. 'हा माझा जीव आत्मा मात्र आहे, असें जाणा' असा व 'प्रज्ञान हेंच ब्रह्म आहे' असा शास्त्राचा उपसंहार आहे, 'त्या आत्मस्वरूपाचें ज्ञान करून घे, तें तूं आहेस' इत्यादि वाक्यें आत्मपर आहेत, याविषयीं शंका नाहीं. यावरून ब्रह्मज्ञान केवळ ज्ञानसमर्पक आहे, असें सिद्ध होतें. तें विधिप्रवर्तक आहे, (कर्मांची प्रवृत्ति करणारें आहे) असें सिद्ध होत नाहीं. पुनः; 'ब्रह्म आणि आत्मा एकच आहेत' हें शास्त्रानें सांगितलेलें ज्ञान चित्तशुद्धीनंतर जीवाच्या अंतर्यामीं उत्पन्न झालेलें असलें तरी स्वानुभवानें त्याच्या यथार्थत्वाची सिद्धि होते, म्हणून तें ज्ञान उत्पन्नच होत नाहीं किंवा भ्रांतियुक्त असतें, असें म्हणतां यावयाचें नाहीं. हें ज्ञान सर्वथा सत्य असतें.

पू०—ठीक आहे. ब्रह्मज्ञानानें सर्व कर्मांचें प्रयोजन नष्ट केल्यामुळें सर्व कर्म संपतें, असें असेल, तर कर्म न करण्याचें, प्रयोजन नसल्यामुळें (**कर्म टाकण्याचें** प्रयोजन नसल्यामुळें) ब्रह्मज्ञान्यानें कर्मत्यागच **करावा**, असेंही होत नाहीं. सहज प्राप्त झालेलें किंवा शास्त्रानें सांगितलेलें कर्म तरी ब्रह्मज्ञान्यानें कां टाकावें ?

सि०—भगवद्गीतेंमध्यें सांगितलें आहेना ! कीं, ब्रह्मज्ञान्याला येथें व इतरत्र अकृताशीही कांहीं संबंध नाहीं म्हणून ! सारांश, ब्रह्मज्ञाला कर्मपरित्यागाचाही दोष लागत नाहीं. कर्माकरणाचा दोष त्याच्याकडे येत नाहीं. कारण, तो कर्मफल टाकतो, व कर्मवासनाही दूर करितो. शास्त्राची आज्ञा येथें कांहीं नसते.

य आहुर्विदित्वा ब्रह्म व्युत्थानमेव कुर्यादिति, तेषामप्येष समानो दोषः प्रयोजनाभाव इति चेत्, न; अक्रियामात्रत्वाद्व्युत्थानस्य। अविद्यानिमित्तो हि प्रयोजनस्य भावः, न वस्तुधर्मः, सर्वप्राणिनां तद्दर्शनात्, प्रयोजनतृष्णया च प्रेर्यमाणस्य वाङ्मनःकायैः प्रवृत्तिदर्शनात्, 'सोऽकामयत जाया मे स्यात्' इत्यादिना पुत्रवित्तादि पाङ्क्तलक्षणं काम्यमेवेत्युभे ह्येते साध्यसाधनलक्षणे एषणे एवेति वाजसनेयिब्राह्मणेऽवधारणात्। अविद्याकामदोषनिमित्ताया वाङ्मनःकायप्रवृत्तेः पाङ्क्तलक्षणाया विदुषोऽविद्यादिदोषाभावादनुपपत्तेः क्रियाभावमात्रं व्युत्थानम्। न तु यागादिवदनुष्ठेयरूपं भावात्मकम्। तच्च विद्यावत्पुरुषधर्म इति न प्रयोजनमन्वेष्टव्यम्।

न हि तमसि प्रवृत्तस्य उदिते आलोके यद्गर्तपङ्ककण्टकाद्यपतनम्, तत्किं प्रयोजनमिति प्रश्नार्हम्। व्युत्थानं तर्ह्यर्थप्राप्तत्वान्न चोदनार्थ इति। गार्हस्थ्ये चेत्परं ब्रह्मविज्ञानं जातम्, तत्रैवास्त्वकुर्वत आसनं न ततोऽन्यत्र गमनमिति चेत्, न; कामप्रयुक्तत्वाद्गार्हस्थ्यस्य। 'एतावान्वै कामः' 'उभे ह्येते एषणे एव' इत्यवधारणात् कामनिमित्तपुत्रवित्तादिसंबन्धनियमाभावमात्रम्। न हि ततोऽन्यत्र गमनं व्युत्थानमुच्यते। अतो न गार्हस्थ्य एवाकुर्वत आसनमुत्पन्नविद्यस्य। एतेन गुरुशुश्रूषातपसोरप्यप्रतिपत्तिर्विदुषः सिद्धा॥

पू०—तर मग 'ब्रह्मज्ञान झाल्यानंतर व्युत्थान करावें, कर्मत्याग करावा, कर्मविरक्त व्हावें' असें जें बृहदारण्यकामध्यें सांगितलें आहे, तेंही वरीलप्रमाणें दोषयुक्तच आहे, असें म्हणावयाचें? प्रयोजनाचाच अभाव असेल, तर त्यांनीं तरी तसें कां सांगावें? सांगितलें आहे म्हणून 'कर्मत्याग करा' ही तरी शास्त्राची आज्ञा ब्रह्मज्ञान्यानें कां मान्य केली पाहिजे.

सि०—नाहीं. शास्त्राचा संबंधच तेथें पोंहचत नाहीं. उपनिषदांतील व्युत्थान शब्दाचा अर्थ अक्रिया, कर्मांचा अभाव, कर्मांसंबंधानें उदासीनता असा आहे. तेथें, प्रयोजनाचा (हेतूचा) संबंध नाहीं. येथें आज्ञा नाहीं, केवळ वस्तुस्थितीचें वर्णन आहे. समजलें? अहो! प्रयोजन हेंच मुळीं अविद्येचें फल आहे, अविद्यानिमित्तक आहे, अज्ञान असलें म्हणजे प्रयोजनाला अस्तित्व प्राप्त होतें. 'मी ब्रह्म नाहीं' असें अज्ञान असलें म्हणजे 'मला कांहीं तरी हवें आहे' अशी इच्छा उत्पन्न होते, आणि 'मी कर्म करितों.' सारांश, प्रयोजन हें अविद्येचें कार्य आहे. प्रयोजन हा जीवाचा वस्तुधर्म नव्हे. तसें असतें तर, निद्राकालीं व मूर्च्छाकालींही जविांस प्रयोजन दिसलें असतें; पण तसें तर नाहीं. [ब्रह्मस्वरूप झालेल्या पुरुषाला ब्रह्मस्वरूपाशिवाय इतर ज्ञानाची किंवा फलाची अपेक्षा असणें शक्य नाहीं, बरें! आतां सर्व अज्ञानी प्राणी प्रयोजनानेंच प्रेरित होतात. कांहीं तरी हेतु सिद्ध व्हावा या तृष्णेनें मात्र प्रेरित झालेले प्राणी वाणीनें, मनानें आणि देहानें कर्म करितांना दिसतात, हा केवळ अज्ञानाचा भाग आहे. तात्पर्य, विषयेच्छा तेथून दुष्ट वर्ती अज्ञान्याला कर्मप्रेरित करिते.

पू०—असें कां बरें? 'त्याला इच्छा उत्पन्न झाली, मला स्त्री असावी, पुत्र असावा, वित्त मिळावें' इत्यादि वचनें उपनिषदामध्यें आहेत, म्हणून ह्या इच्छा पांक्त (शुद्ध) आहेत, असें सिद्ध होत नाहीं काय? केवळ इच्छा दिसतात, इतकेंच नव्हे; तर ब्रह्मविद्येतही या साध्यसाधनात्मक (इच्छा कारण असून कर्म हें त्यांचें फल आहे, म्हणून कार्यकारणात्मक) प्रयोजनांचा उल्लेख केला आहे, त्यावरून या इच्छा शास्त्रोपपन्न आहेत, असें होतें.

शि०—नाहीं. तसें कांहीं होत नाहीं. जाया, पुत्र, वित्त, इहलोक, स्वर्ग या पंचलक्षणात्मक इष्ट-वस्तूंविषयीं तन, मन, वाणींची जी प्रवृत्ति होते, ती अविद्येनें उत्पन्न होणाऱ्या इच्छा-दोषाचें फल आहे. अविद्या असते म्हणून या इच्छा उत्पन्न होतात; आणि शास्त्रही अज्ञानी लोकांच्या इच्छास्वातंत्र्याचें नियमन व्हावें, म्हणून त्यांचा उल्लेख करून त्या इच्छा कोणत्या तरी उन्नतिमूलक विषयाविषयीं असाव्या, असें नियमन करीत असतें; पण आत्मज्ञानी पुरुषाचे ठिकाणीं अविद्यादि-दोषांचा गंध नसल्यामुळें त्याला 'कर्म कर' म्हणून किंवा 'कर्मत्याग कर' म्हणून—अनात्मज्ञांस सांगणाऱ्या—शास्त्राचा संबंध पोंहचत नाहीं. सारांश, व्युत्थान याचा अर्थ कर्माभाव आहे. येथें वस्तुस्थितीचें वर्णन आहे, आज्ञा नाहीं. ज्याप्रमाणें शास्त्र यज्ञयागादिकांची आज्ञा अनात्मज्ञांस करितें, 'कर्म करा' म्हणून सांगतें, तसा भाग येथें नाहीं. ज्ञानी पुरुष झाला, ब्रह्मज्ञ झाला म्हणजे तो अकर्मीच होतो. अकर्म हा ज्ञानाचा धर्म, ब्रह्मज्ञानाचा स्वभाव आहे. तेथें कोणत्याही प्रयोजनाची अपेक्षा नसते. पहा कीं: पूर्ण अंधकारांत प्रविष्ट झालेल्या पुरुषाला तेजस्वी सूर्याचें पूर्ण प्रतिबिंब दिसलें, म्हणजे तो खाच-खळग्यामध्यें, चिखलामध्यें किंवा काटेरी झुडपांत जाऊन पडत नाहीं; हा अनुभव आहे. पण येथें 'गर्तादिकांमध्यें तो कां पडला नाहीं?' 'यांत त्याचा हेतु काय असावा?' असें आपण कधीं तरी विचारतों का? स्पष्ट उजेड असला म्हणजे गर्तादिकांमध्यें पतन न पावणें हा उजेडांत काळजीपूर्वक चालणाऱ्या डोळस जीवाचा धर्म आहे. त्याप्रमाणें ज्ञान झालेल्या पुरुषानें अविद्येमध्यें किंवा तज्जन्य वासनादिकांमध्यें मग्न होणें शक्यच नाहीं. वस्तुबलानेंच तो कर्मविरक्त होतो. 'तूं कर्मापासून अलिप्त रहा' असें सांगण्याची अपेक्षा असत नाहीं.

पू०—अहो! या तुमच्या म्हणण्यानें असें होतें: 'गृहस्थाश्रमामध्यें असतांनाच जर परब्रह्माचें ज्ञान-विज्ञान झालें, तर त्यानें त्याच आश्रमांत रहावें, तेथून दुसऱ्या आश्रमाचा स्वीकार करूं नये' असा तुमच्या म्हणण्याचा अर्थ होणार आणि गृहस्थाला तर शास्त्रानें विशेष कर्में विहित केलीं आहेत. तीं केलीं नाहींत तर प्रत्यवाय (दोष) उत्पन्न होणार; म्हणजे कर्म करावें कीं करूं नये, यासंबंधें तुमच्या मतामध्यें घोटाळा उत्पन्न होतो. ब्रह्मज्ञान झालेल्या गृहस्थानें कर्म करणें अशक्य आहे, असें तुम्ही म्हणतां व गृहस्थानें कर्म केलें पाहिजे, असें शास्त्र सांगतें. सारांश, अव्यवस्था उत्पन्न होते.

शि०—तुम्हीं मुळीं भलत्याच गोष्टी गृहीत करीत आहांत. गृहस्थाश्रमाची उत्पत्ति वासनेपासून आहे. ज्या कांहीं वासना असतात, त्यांनीं प्रेरित होऊन जीव गृहस्थाश्रमाचा स्वीकार करितो. 'कामाची म्हणजे वासनेची येथपर्यंत मात्र गति आहे 'ह्या दोन्हीही एषणा गृहस्थाश्रमांत मात्र विद्यमान असतात,' असें बृहदारण्यक

श्रुतीमध्ये स्पष्ट रीतीनें सांगितलें आहे. हें 'एव' या शुद्धशब्दयोगी अव्ययानें समजलें. जीवाला जी एषणा असते, तिच्या निमित्तानें उत्पन्न होणाऱ्या पुत्र-वित्तादि संबंधाचे इष्टत्व नियमांचा अभाव मात्र येथें विहित केला आहे. सारांश, अभिमानांचा अभाव मात्र येथें सांगितला आहे. ब्रह्मज्ञाला 'हा माझा मुलगा' असा अभिमान नसतो व 'मला भार्या हवी' असेंही वाटत नाहीं. समजलां ? येथें वस्तुनिर्देश मात्र आहे. गृहस्थाश्रमांतून अन्यत्र म्हणजे संन्याशाच्या आश्रमांत गमन करणें म्हणजे व्युत्थान असें नव्हे; म्हणून ज्याला ब्रह्मज्ञान झालें आहे, त्यानें कांहीं कर्म न केलें तरी त्याला गृहांत राहतां येणें शक्य नाहीं. सारांश, ब्रह्मवेत्त्यानें मोहोत्पादक गृहांत राहणें अशक्य आहे. असें श्रुति स्पष्ट म्हणते; म्हणून विद्वानाला 'गरुसेवा करणें' किंवा 'तपश्चर्या करणें' हींही कर्मे प्राप्त होत नाहींत, असें सिद्ध होतें. सारांश, येथें सर्व कर्मनिवृत्ति होते, ही वस्तुस्थिति मात्र श्रुति सांगते.

अत्र केचिद्गृहस्था भिक्षाटनादिभयात्परिभवाच्च त्रस्यमानाः सूक्ष्मदृष्टितां दर्शयन्त उत्तरमाहुः । भिक्षोरपि भिक्षाटनादिनियमदर्शनाद्देहधारणमात्रार्थिनो गृहस्थस्यापि साध्यसाधनैषणोभयविनिर्मुक्तस्य देहमात्रधारणार्थमशनाच्छादनमात्रमुपजीवतो गृह एवास्त्वासनमिति; न, स्वगृहविशेषपरिग्रहनियमस्य कामप्रयुक्तत्वादित्युक्तोत्तरमेतत् । स्वगृहविशेषपरिग्रहाभावे च शरीरधारणमात्रप्रयुक्ताशनाच्छादनार्थिनः स्वपरिग्रहविशेषभावेऽर्थाद्भिक्षुकत्वमेव । शरीरधारणार्थायां भिक्षाटनादिप्रवृत्तौ यथा नियमो भिक्षोः शौचादौ च, तथा गृहिणोऽपि विदुषोऽकामिनोऽस्तु नित्यकर्मसु नियमेन प्रवृत्तिर्यावज्जीवादिश्रुतिनियुक्तत्वात्प्रत्यवायपरिहारायेति । एतन्नियोगाविषयत्वेन विदुषः प्रत्युक्तमशक्यानियोज्यत्वाच्चेति । यावज्जीवादिनित्यचोदनानर्थक्यमिति चेत्, न; अविद्वद्विषयत्वेनार्थक्यत्वात् । यत्तु भिक्षोः शरीरधारणमात्रप्रवृत्तस्य प्रवृत्तेर्नियतत्वम्, तत्प्रवृत्तेन प्रयोजकम् । आचमनप्रवृत्तस्य पिपासापगमवन्नान्यप्रयोजनार्थत्वमवगम्यते । न चाग्निहोत्रादीनां तद्वदर्थप्राप्तप्रवृत्तिनियतत्वोपपत्तिः । अर्थप्राप्तप्रवृत्तिनियमोऽपि प्रयोजनभावेऽनुपपन्न एवेति चेत्, न; तन्नियमस्य पूर्वप्रवृत्तिसिद्धत्वात्तदतिक्रमे यत्नगौरवादर्थप्राप्तस्य व्युत्थानस्य पुनर्वचनाद्विदुषो मुमुक्षोः कर्तव्यत्वोपपत्तिः । अविदुषापि मुमुक्षुणा पारिव्राज्यं कर्तव्यमेव; तथा च, 'शान्तो दान्तः' इत्यादिवचनं प्रमाणम् । शमदमादीनां चात्म-

दर्शनसाधनानामन्याश्रमेष्वनुपपत्तेः । 'अत्याश्रमिभ्यः परमं पवित्रं प्रोवाच सम्यगृषिसंघजुष्टम्' इति च श्वेताश्वतरे विज्ञायते । 'न कर्मणा न प्रजया धनेन त्यागेनैके अमृतत्वमानशुः' इति च ब्रह्मचर्यादिविद्यासाधनानां च साकल्येनात्याश्रमिषूपपत्तेर्गार्हस्थ्येऽसंभवात् । न च असंपन्नं साधनं कस्यचिदर्थस्य साधनायालम् । यद्विज्ञानोपयोगीनि च गार्हस्थ्याश्रमकर्माणि, तेषां परमफलमुपसंहृतं देवताप्ययलक्षणं संसारविषयमेव । यदि कार्मण एव परमात्मविज्ञानमभविष्यत्, संसारविषयस्यैव फलस्योपसंहारो नोपापत्स्यत ॥

सि०—आतां, कांहीं गृहस्थ भिक्षा मागण्याकरितां जें फिरावें लागतें, त्यापासून परावृत्त होतात. कारण, आपला अपमान होईल, अशी त्यांस भीति वाटते; आणि भिक्षाटनानें त्रास होतो, हें त्यांस विदित असतें; म्हणून ते गृहांत राहतात. अर्थातच ते येथें आपल्या नाजुक (संकुचित) दृष्टीचेंही प्रदर्शन करितात. ते म्हणतात कीं, भिक्षूला मुद्दां भिक्षाटनाचे जे नियम श्रुतीनें सांगितले आहेत, ते जर देह-धारणासाठीं मात्र आहेत, तर साध्य-साधनादिकांच्या (कर्मप्रवृत्ति हें साधन व फलप्राप्ति हें साध्य, एतदात्मक दोन्ही) एषणांपासून मुक्त झालेला ब्रह्मज्ञ, हा केवळ देहधारण करण्यासाठीं अन्न-आच्छादन मात्र घेऊन गृहामध्यें राहिला असतां काय प्रत्यवाय आहे ? कांहीं नाहीं; म्हणून त्यानें गृहाचा त्याग न करितां तेथेंच रहावें.' येथें त्यांचें कल्पनाचातुर्य दिसतें, पण ह्यांत शास्त्रविचाराचें प्रदर्शन नाहीं. असो; पण हें त्यांचें म्हणणें बरोबर नाहीं. आम्हीं वर स्पष्ट उत्तर दिलेंच आहे कीं, स्वगृहाचा किंवा स्वपत्नीचा परिग्रह करून गृहांत राहणें हा विचार एषणा-जन्य मात्र आहे; म्हणून (१) तुमचें म्हणणें त्याज्य आहे. शिवाय (२) पत्नीही नसेल तर, द्रव्यपरिग्रहाचा (द्रव्य मिळविणें किंवा मिळालेल्याचें संरक्षण करणें इत्यादि उपाधींचा या परिग्रह शब्दांत समावेश होतो) स्वीकार होतोच; पण हा परिग्रहही पत्नीच्या अभावीं करितां येत नाहीं. आतां, शरीरधारणापुरती मात्र सिद्ध झालेली अन्न-आच्छादनाची अपेक्षा भागविण्यापुरता जरी गृहाचा स्वीकार केला, तरी तो एक प्रकारचा परिग्रह होतो. तेव्हां परिग्रहशून्य व्हावयाचें (दारा-द्रव्य इत्यादिकांवरील स्वत्व सोडून द्यावयाचें) म्हणजे भिक्षु-वृत्तिच पत्करली पाहिजे, दुसरा उपाय नाहीं. मग ती घरीं मागा किंवा बाहेर जा. दोन्हींमध्यें जर भिक्षावृत्तिच आहे, तर बाहेर जाण्याला लाज कसली ? शिवाय मोहोत्पादक गृहांत राहण्याचा मोह कां ? याप्रमाणें हें म्हणणें जुळत नाहीं, समजलें ?

पू०—ठीक आहे. शरीरधारणाकरितां भिक्षाटण करण्याला प्रवृत्त झालेल्या भिक्षूला भिक्षेचे व आचरणशुद्धीचे नियम सांगितले आहेत.

सि०—'भिक्षूनें सातच घरें भिक्षा मागावी' इत्यादि नियम ना ?

पू०—होय. भिक्षूला नियम सांगितले आहेत. त्याचप्रमाणें जो ब्रह्मज्ञ झाला, कामक्रोधादिशून्य झाला, त्यालाही यावज्जीवादि 'श्रुतीनें सांगितलेलीं नित्यकर्मे केलीं पाहिजेत,' असा नियम कां लागू असूं नये? भिक्षूलाही नियम विहित केले आहेत, तसेच स्वगृहीं राहिलेल्या संन्याशानेंही अग्निहोत्रादि कर्मांचे नियम पाळून घरीं राहिल्यास काय प्रत्यवाय आहे? कांहीं नाहीं. नित्य कर्मे केलीं नाहींत, तर कांहीं पापें उद्भून होतात, त्यांचा उद्भव हीं नित्यकर्मे केलीं असतां होणार नाहीं. सारांश, दोषपरिहारास्तव नित्य कर्मे करावीं, असा श्रुतीचा अभिप्राय दिसतो; कारण, भिक्षूलाही नियम सांगितले आहेत. एवंच भिक्षूलाही श्रुतिनियम पाळावे लागतात, हें ठरतें. तसेंच, ब्रह्मज्ञ गृहस्थानें गृहस्थाश्रमाचे नियम पाळले पाहिजेत.

सि०—नाहीं, असें नाहीं. आम्हीं आतांच सांगितलें ना? कीं, जो ब्रह्मज्ञ होऊन सर्वसंसारविरक्त झाला, त्या श्रुतीच्या जनकाला श्रुतिनियम लागू होत नाहींत म्हणून? तो श्रुतिनियमांच्या शासनापलीकडे राहणारा असतो. शिवाय, भिक्षूला जे भिक्षाटनाचे नियम सांगितले आहेत, ते सहजसिद्ध असणारे आहेत. ब्रह्मज्ञ तसेंच आचरण करितो. येथें श्रुतीची आज्ञा आहे, म्हणून तो हे नियम पाळतो, असें नाहीं. समजलांत कां आतां तरी?

पू०—मग यावज्जीवादि श्रुतिविहित जी कर्मचोदना आहे, ती तुमच्या म्हणण्याप्रमाणें व्यर्थ होते. श्रुतीनें सर्वसाधारण नियम केला आहे.

सि०—नाहीं. श्रुतिनियम केवळ ब्रह्मज्ञान न झालेल्या लोकांकरितां मात्र आहेत. श्रुतीची सार्थकता संसारी-लोकांच्या संबंधानें पूर्ण होते. संसारविरक्त ब्रह्मज्ञ तिच्या कक्षेंत येतच नाहीं. आतां, भिक्षूला जे भिक्षाटणाचे नियम सांगितले, त्यांचा विचार वर सांगितलाच आहे. अहो! शरीर-संरक्षणासाठीं मात्र भिक्षाटनाचे जे नियम सांगितले आहेत, ते नियम भिक्षाटन करविण्याला प्रयोजक होत नाहींत.

शि०—म्हणजे काय?

सि०—पहा! संध्येच्या प्रारंभीं व इतर कालीं आचमनाचा विधि सांगितला आहे. आचमन केलें असतां सहजच तृषा-शमन होतें. येथें तृषा-शमन हा विधि नाहीं, किंवा 'तृषा-शमन करा' असें श्रुति सांगतही नाहीं. तृषा-शमनानें दुसरा कांहीं शास्त्रोक्त हेतु सिद्ध होतो, असें नाहीं. आचमनानें जसें कांहीं एक अपूर्व (अदृष्ट) सिद्ध होत, तसें तृष्णा-शमनानें होत नाहीं. समजलें? अग्निहोत्रादि जीं नित्य कर्मे सांगितलीं आहेत, तीं कांहीं एक विशेष अदृष्ट सिद्ध करण्याकरितां संसारी पुरुषास विहित केला आहेत. तृष्णा-शमनाप्रमाणें तीं सहज किंवा वस्तुबलानें प्राप्त होत नाहींत. आचमन हा विधि आहे. हा विधि पाळिला असतां सहज तृष्णेचें शमन होतें. तसा प्रकार अग्निहोत्रादिकांचा नाहीं. म्हणजे अग्निहोत्रादि दुसऱ्या एखाद्या वेधीच्या अंगबलानें सिद्ध होत नाहींत. त्यांचें कांहीं तरी विशेष अदृष्ट सांगितलेलें

असतें. आणि या अदृष्टासाठीं आचमनाचा किंवा अग्निहोत्राचा विधि श्रुति सांगते. तृष्णा-शमनाचा तसा प्रकार नाहीं. तें सहज-प्राप्त आहे. त्याच्यापासून तृष्णा-शमनात्मक दृष्ट फलाशिवाय कोणतेंही अदृष्ट उत्पन्न होत नाहीं. येथें केवळ तृष्णा-शमनाचे कांहीं नियम मात्र सांगितलेले असतात. हें तुला समजलें; होयना ? असाच प्रकार सर्वथा विरक्त झालेल्या भिक्षूच्या भिक्षेसंबंधानें असतो. सर्वस्वाचा त्याग केलेल्या भिक्षूला शरीरधारणासाठीं मात्र भिक्षा सांगितली व तिचे नियमही केले; पण या भिक्षाविधीनें कांहीं दुसरें अदृष्ट उत्पन्न व्हावयाचें आहे, कांहीं दुसरें फल उत्पन्न व्हावयाचें आहे, असें नाहीं; म्हणून हे भिक्षाटनाचे नियम प्रयोजन-शून्य असतात.

पू०—जर हे नियम प्रयोजनशून्य आहेत, अप्रयोजक आहेत, तर ते करावे तरी कशाला ? अर्थाची सिद्धि वस्तुबलानेंच होत आहे, तर नियम कशाला व श्रुति तें सांगते तरी कां ?

सि०—ब्रह्मज्ञान उत्पन्न होण्यापूर्वीच ते ते नियम विद्या शिकतांना सिद्ध झालेले असल्यामुळें विरक्त भिक्षु पूर्वीचा आपला संप्रदाय सहज कायम ठेवितो. हे पूर्वी-पासून चालत आलेले नियम मोडावयाचे म्हणजे भिक्षूला हे नियम मोडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सहजसिद्ध प्राप्त झालेल्या मनोघटनेचा नाश केला पाहिजे. विषय-प्राप्तीला प्रवृत्त करणाऱ्या मनाचाच नाश झाला असल्यामुळें ही संवय मोडणें शक्य नाहीं; निदान श्रम-साध्य आहे. प्रयोजक विधि श्रमाशिवाय सिद्ध होतच नाहीं. सारांश, संवय मोडणें श्रम-साध्य आहे व भिक्षु तर श्रम-शून्य असतो. तेव्हां भिक्षाटनाचे नियम सहज-सिद्ध झालेले असतात. त्यांची उपपत्ति करण्याला इतर प्रयोजनाची अपेक्षा असत नाहीं. ज्ञानबलानें प्राप्त झालेल्या वैराग्यानें भिक्षु संस्कृत होतो, असें असतांही श्रुतीनें 'विरक्त होऊन, संसारनिवृत्त होऊन' असें पूर्वीप्रमाणेंच स्पष्ट सांगितलें असल्यामुळें, भिक्षाटनाचे पूर्वपठित नियम भिक्षूनें पाळणें हें उपपन्नच होतें. हें ब्रह्मज्ञ संन्यासासंबंधानें झालें. त्याचें सर्व प्रयोजक कर्म संपलेलें असतें; तथापि व्युत्थानानें प्राप्त झालेलें पण प्रयोजनशून्य असलेलें कर्म मात्र त्याला करणें अवश्य असतें. आतां, जो अविद्वान् आहे; तथापि मुमुक्षु आहे, त्यानें संन्यासाला विहित असलेलें पारिव्राज्य कर्म केलेंच पाहिजे. 'मुमुक्षूनें शांत व्हावें, दान्त व्हावें, उपरत व्हावें, सहनशील असावें; आणि जीवब्रह्मैक्यज्ञान करून घ्यावें' इत्यादि श्रुतिवचनांवरून अविद्वान् मुमुक्षूला शमदमादि साध्य करून घ्यावयाचे असतात व म्हणून श्रुतीला अविद्वानाच्या संबंधानें पारिव्राज्यविधि सांगावा लागतो. हा उभयतांमध्यें विशेष आहे. विद्वानाचे शमदमादि सिद्ध झालेले असतात, मुमुक्षूला ते साध्य करून घ्यावयाचे असतात. शमदम इत्यादि आत्म-दर्शनाचीं साधनें आहेत. हीं विविदिषु संन्यासाला मात्र उपपन्न असतात. आत्मदर्शन

करविणाऱ्या या साधनांची उपपन्नता इतर आश्रमामध्यें सिद्ध होत नाहीं. 'अतिश्रेष्ठ, अतिपवित्र, अत्यंत सम्यक् आणि वेदवेत्त्या ऋषींसारख्या ज्ञानी लोकांनीं सेवित असें ज्ञान अत्याश्रमी (आश्रमकक्षेच्या बाहेर असणाऱ्या) मुमुक्षूस सांगते झाले.' असें श्वेताश्वतर उपनिषदांत सांगितलें आहे. कैवल्य श्रुतीही म्हणते कीं, 'कर्मानें, प्रजोत्पादनानें किंवा धनानें अमृतत्वाची (मोक्षाची) प्राप्ति होत नाहीं; तर त्यागानें मात्र कित्येक मुमुक्षु ज्ञान--प्राप्ति करून घेऊन मोक्ष मिळविते झाले.' स्मृतिही असें म्हणते कीं, 'ज्ञान झाल्यानंतर नैष्कर्म्याचें आचरण करावें.' आणि 'ब्रह्माश्रमांत (संन्यासाश्रमांत) रहावें.' या सर्व श्रुति-स्मृति-प्रमाणांवरून विद्वानाला कर्मनिष्ठेचा संबंध प्राप्त होत नाहीं, इतकेंच नव्हे; तर मोक्ष मिळविण्यासाठीं ब्रह्मज्ञान संपादणाऱ्या मुमुक्षूलाही कर्मनिष्ठेचा संबंध नाहीं, असें ठरतें. मनाचें संयमन करून, ब्रह्मपर राहून, ब्रह्मनिष्ठ असावें, इत्यादि जीं ब्रह्मचर्यादि विद्या-साधनें आहेत, त्या सर्वांची संन्यासाश्रमामध्यें मात्र उपपत्ति होते. वासनाऽभिमानांकित गृहस्थाश्रमांत हीं साधनें संभूत होत नाहींत. एखादें दुसरें साधन गृहस्थाश्रमामध्यें प्राप्त होईल; परंतु सर्व साधनांचा संभव तेथें असणें शक्य नाहीं; आणि हीं सर्व साधनें नसतील तर साधनांचें कार्य जें ज्ञान, तेंही प्राप्त व्हावयाचें नाहीं.

पू०—मग 'बृहतीसहस्र-लक्षणात्मक' कर्मानें विज्ञान संपादन सांगितलें आहे, तें व्यर्थच झालें.

सि०—नाहीं. गृहस्थाश्रमाला योग्य असणाऱ्या या कर्मांचें श्रेष्ठ फल सांगितलें आहे. देवताप्राप्ति (हिरण्यगर्भाची प्राप्ति) हें तें फल आहे; पण हें संसारविषयक मात्र आहे. हिरण्यगर्भसुद्धां संसारी आहे. आतां, कर्म करणाऱ्या पुरुषाला सुद्धां परमात्मज्ञान होतें, असा श्रुतीला अभिप्राय सांगावयाचा असता, तर तिनें 'संसारविषयक हिरण्यगर्भाची मात्र प्राप्ति कर्मनिष्ठाला होते' असें कां सांगितलें असतें? व सांगितलें असतें तरी, हें तिचें म्हणणें योग्य झालें असतें काय? नाहीं. तेव्हां **कर्माचें फल संसारमात्र आहे**, आणि **नैष्कर्म्याचें** (ज्ञानाचें) **फल आत्मज्ञान हें आहे**, हा श्रुत्यभिप्राय आहे.

अङ्गफलं तदिति चेत्; न तद्विरोध्यात्मवस्तुविषयत्वादात्मविद्यायाः। निराकृतसर्वनामरूपकर्मपरमार्थात्मवस्तुविषयमात्मज्ञानममृतत्वसाधनम्। गुणफलसंबन्धे हि निराकृतसर्वविशेषात्मवस्तुविषयत्वं ज्ञानस्य न प्राप्नोति; तच्चानिष्टम्, 'यत्र त्वस्य सर्वमात्मैवाभूत्' इत्यधिकृत्य क्रियाकारकफलादिसर्वव्यवहारनिराकरणाद्विदुषः; तद्विपरीतस्याविदुषः 'यत्र हि द्वैतमिव भवति' इत्युक्त्वा क्रियाकारकफलरूपस्य संसारस्य दर्शितत्वाच्च वाजसनेयिब्राह्मणे।

तथेहापि देवताप्ययं संसारविषयं यत्फलमशनायादिमद्वस्त्वात्मकं तदुपसंहृत्य केवलं सर्वात्मकवस्तुविषयं ज्ञानममृतत्वाय वक्ष्यामीति प्रवर्तते । ऋणप्रतिबन्धश्चाविदु एव मनुष्यपितृदेवलोकप्राप्तिं प्रति, न विदुषः; 'सोऽयं मनुष्यलोकः पुत्रेणैव' इत्यादिलोकत्रयसाधननियमश्रुतेः । विदुषश्च ऋणप्रतिबन्धाभावो दर्शित आत्मलोकार्थिनः 'किं प्रजया करिष्यामः' इत्यादिना । तथा 'एतद्ध स्म वै तद्विद्वांस आहुर्ऋषयः कावषेयाः' इत्यादि 'एतद्ध स्म वै तत्पूर्वे विद्वांसोऽग्निहोत्रं न जुहवांचक्रुः' इति च कौषीताकिनाम् । अविदुषस्तार्हि ऋणानपाकरणे पारिव्राज्यानुपपत्तिरिति चेत्; न, प्राग्गार्हस्थ्यप्रतिपत्तेर्ऋणित्वासंभवादधिकारानारूढोऽपि ऋणी चेत्स्यात्, सर्वस्य ऋणित्वमित्यनिष्टं प्रसज्येत । प्रतिपन्नगार्हस्थ्यस्यापि गृहाद्वनीभूत्वा प्रव्रजेद्यदि वेतरथा ब्रह्मचर्यादेव प्रव्रजेद्गृहाद्वा वनाद्वा' इत्यात्मदर्शनसाधनोपायत्वेनेष्यत एव पारिव्राज्यम् । यावज्जीवादिश्रुतीनामविद्वदमुमुक्षुविषये कृतार्थता । छान्दोग्ये च केषांचिद्द्वादशरात्रमग्निहोत्रं हुत्वा तत ऊर्ध्वं परित्यागः श्रूयते । यत्त्वनधिकृतानां पारिव्राज्यामिति, तन्न; तेषां पृथगेव 'उत्सन्नाग्निरनग्निको वा' इत्यादिश्रवणात्; सर्वस्मृतिषु च अविशेषेण आश्रमविकल्पः प्रसिद्धः, समुच्चयश्च । यत्तु विदुषोऽर्थप्राप्तं व्युत्थानमित्यशास्त्रार्थत्वे, गृहे वने वा तिष्ठतो न विशेष इति, तदसत् । व्युत्थानस्यैवार्थप्राप्तत्वान्नान्यन्नावस्थानं स्यात् । अन्यत्रावस्थानस्य कामकर्मप्रयुक्तत्वं ह्यवोचाम; तदभावमात्रं व्युत्थानमिति च । यथाकामित्वं तु विदुषोऽत्यन्तमप्राप्तम्, अत्यन्तमूढविषयत्वेनावगमात् । तथा शास्त्रचोदितमपि कर्मात्मविदोऽप्राप्तं गुरुभारतयावगम्यते; किमुत अत्यन्ताविवेकनिमित्तं यथाकामित्वम् ? न ह्यन्मादतिमिरदृष्ट्युपलब्धं वस्तु तदपगमेऽपि तथैव स्यात्, उन्मादतिमिरदृष्टिनिमित्तत्वादेव तस्य । तस्मादात्मविदो व्युत्थानव्यतिरेकेण न यथाकामित्वम्, न चान्यत्कर्तव्यमित्येतत्सिद्धम् । यत्तु 'विद्यां चाविद्यां च यस्तद्वेदोभयꣳसह' इति न विद्यावतो विद्यया सहाविद्यापि वर्तत इत्ययमर्थः; कस्तार्हि ? एकस्मिन्पुरुषे एतेन सह संबन्धेयातामित्यर्थः; यथा शुक्तिकायां रजतशुक्तिकाज्ञाने

एकस्य पुरुषस्य । 'दूरमेते विपरीते विषूची अविद्या या च विद्येति ज्ञाता' इति हि काठके । तस्मान्न विद्यायां सत्यामविद्यायाः संभवोऽस्ति । 'तपसा ब्रह्म विजिज्ञासस्व' इत्यादिश्रुतेः । तपआदि विद्योत्पत्तिसाधनं गुरूपासनादि च कर्म अविद्यात्मकत्वादविद्योच्यते । तेन विद्यामुत्पाद्य मृत्युं काममतितरति । ततो निष्कामस्त्यक्तैषणो ब्रह्मविद्यया अमृतत्वमश्नुत इत्येतमर्थं दर्शयन्नाह—'अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययामृतमश्नुते' इति । यत्तु पुरुषायुः सर्वं कर्मणैव व्याप्तम्, 'कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेच्छतꣳसमाः' इति, तदविद्वद्विषयत्वेन परिहृतम्, इतरथा असंभवात् । यत्तु वक्ष्यमाणमपि पूर्वोक्ततुल्यत्वात्कर्मणा अविरुद्धमात्मज्ञानमिति, तत्सविशेषनिर्विशेषात्माविषयतया प्रत्युक्तम्; उत्तरत्र व्याख्याने च दर्शयिष्यामः । अतः केवलनिष्क्रियब्रह्मात्मैकत्वविद्याप्रदर्शनार्थमुत्तरो ग्रन्थ आरभ्यते ॥

पू०—हें फल (हिरण्यगर्भाची प्राप्ति) अंगफल आहे, असें समजलें तर ? परमात्मज्ञानाचें अंगभूत पृथिव्यादि देवताज्ञान आहे, असें मानलें, तर काय बिघडेल ? परमात्मज्ञानाचें फल मोक्ष, असो; पण मोक्षाच्या अंगभूत असणारें जें देवताज्ञान, तें कर्माचें फल आहे, असें समजा. काय बिघडेल ?

सि०—बिघडतें इतकेंच, कीं असें होणें अशक्य आहे. आत्मविद्येचा विषय आत्मवस्तु हा आहे; आणि ही वस्तु संसाराचा अत्यंत विरोध करणारी आहे. संसार आणि आत्मा यांचें साहचर्य किंवा अंगांगीभाव केव्हांही असणें शक्य नाहीं. पहा। कीं; सर्व नामें, सर्व रूपें, आणि सर्व कर्मे जेथें शून्यरूप होतात, निःशेष होतात, तीं अत्यंत श्रेष्ठ व मोक्ष-साधक आत्मवस्तु ब्रह्मज्ञानाचा विषय आहे. तात्पर्य, या ज्ञानांत नामरूपादिकांचा किंवा गुणफलांचा संबंध स्फुटलेला असतो. पण या ज्ञानांत जर कां चुकून गुणफलांचा संबंध असेल, तर यद्यावत् जे विशेष ते निराकृत केलेली, विशेषाचा यत्किंचितूही गंध नसणारी, आत्मवस्तु त्या ज्ञान्यांना सांपडावयाचीच नाहीं, असल्या गुणसंबंधात्मक ज्ञानाचा विषय आत्मवस्तु केव्हांही व्हावयाची नाहीं. अर्थात् मोक्ष मिळावयाचा नाहीं. मग असलें ज्ञान अनिष्ट असतें, हें सांगावयास नको ! असो; 'जेथें ब्रह्मज्ञाता हें सर्व आत्मरूप झालें' असा उपक्रम करून श्रुतीनें ब्रह्मज्ञाच्यासंबंधानें क्रिया, कारक, फल इत्यादि सर्व व्यवहाराचें निराकरण केलें आहे. ब्रह्मज्ञाता कोणतींही आज्ञा करणें विच्युक्त नाहीं' असेंही स्पष्ट सांगितलें आहे. आणि ब्रह्मज्ञाहून विलक्षण असणारा जो अविद्वान् किंवा संसारी त्याच्या संबंधानें जेथे द्वैताप्रमाणे भास आहे' असें सांगून संसाऱ्याला क्रिया, कारक आणि फल एवं-

गुणांनीं विशिष्ट असणारा संसार विशिष्ट-श्रुतीनें विहित केला आहे. वरील दोन्ही वाक्यें बृहदारण्याकांतील आहेत. असो; तेथें सांगितलें आहे, तसेंच येथेंही संसारविषयक देवताप्राप्ति नामक (भोजन, पान इत्यादि लक्षणात्मक) फल कर्मनिष्ठाला मिळावयाचें असतें, तें सांगून नंतर केवल आणि सर्वात्मक अशी जी आत्मवस्तु ती मात्र ज्या ज्ञानाचा विषय आहे, तें ज्ञान मोक्षदायक आहे व तेंच मी पुढें सांगणार आहें, असें सांगितलें आहे. तात्पर्य, कर्मापासून होणारें फल देवतांचें ज्ञान व देवताप्राप्ति होणें हें आहे. पण या देवता संसारी आहेत. तेव्हां अर्थातच आपण संसारी राहणार. हें सर्व प्रथम सांगून नंतर पण असेंही सांगितलें आहे कीं, अशेष-विशेष निराकृत करणारें, सर्व विशेषांचा निरास करणारें आत्मज्ञान हेंच काय तें मोक्षाचें साधन आहे. मोक्ष हवा असेल, तर संसारप्रवर्तक कर्म उपयोगी नाहीं. उत्कृष्टप्रकारचें वैराग्य, पहिल्याप्रतीचा मनोविजय, आणि उत्तम प्रतीचा विवेक हीं साध्य करून घेऊन ब्रह्मात्मैक्यज्ञान मिळवूं इच्छिणाऱ्या मुमुक्षूला मात्र अखंड परिश्रमानें मोक्षप्राप्ति होते, हें तात्पर्य आहे.

पू०—असेल; पण आम्ही तीन ऋणांचा उल्लेख केला होता व तीं तीन ऋणें फिटल्याशिवाय मोक्षप्राप्ति व्हावयाची नाहीं, असें सांगितलें होतें, त्याचें काय ?

सि०—हीं ऋणें व तत्कृतप्रतिबंध अविद्वानाला, संसाऱ्याला, ब्रह्माज्ञान्याला मात्र लागू असतात. 'ज्याला मनुष्यलोक किंवा पितृलोक किंवा देवलोक हवा आहे,' त्यानें पुत्रप्राप्ति करून घेऊन मात्र ह्या लोकीचें ऋण फेडावें, कर्मानें पितृलोक साधावा आणि विद्येनें म्हणजे उपासनेनें देवलोक साधून देवऋण फेडावें. असे नियम अविद्वानासाठीं केले आहेत; विद्वानासाठीं नव्हेत. विद्वानाला ऋणांचा प्रतिबंध होतच नाहीं. ज्याला आत्मलोक मात्र हवा आहे, त्याला या ऋणांचा संबंधच प्राप्त होत नाहीं.

पू०—हें कशावरून ?

सि०—'आम्हाला प्रजा उत्पन्न करून, अध्ययन करून, किंवा उपासना करून काय करावयाचें आहे.' इत्यादि श्रुति आत्मलोकार्थी विद्वानाला पूर्वोक्त ऋणांचा प्रतिबंध होत नाहीं, असें स्पष्ट सांगतात. तसेंच, तें हें ब्रह्म जाणणारे कावषेय ऋषि म्हणाले कीं, 'आम्ही आतां काय म्हणून अध्ययन करावें ? त्याचप्रमाणें 'ह प्रसिद्ध आहे कीं, पूर्वीचे प्रसिद्ध विद्वानांनीं (आत्मज्ञान्यांनीं) अग्निहोत्र नामक होम केला नाहीं ' (पहा कौषीतकी उप० अध्या० २ खंड ४) सारांश, अत्मज्ञानी पुरुषाला ऋणत्रयाचा संबंध असत नाहीं, असें सांगणाऱ्या श्रुति प्रमाण आहेत.

पू०—अर्थातच अविद्वानांनीं आपल्या ऋणांचें अपाकारण केलें नाहीं (ऋण फेडलें नाहीं) तर त्यांना संन्याशाचा आश्रम घेतां येणें शक्य नाहीं, इतकें तरी सिद्ध होतेंना ?

सि०—असेंही नाहीं. ज्याला लोकत्रय मिळविण्याची इच्छा नाहीं, त्याला या ऋणांचा संबंध नसतो. शिवाय, असें पहा कीं, ब्रह्मचाऱ्याला हीं तीन ऋणें असत नाहींत. अहो, गृहस्थाश्रम स्वीकारण्याच्या पूर्वीच ब्रह्मचाऱ्यानें पुत्रोत्पत्ति करून लोक-ऋण फेडणें किंवा अग्निहोत्रादि कर्म करून पितृ-ऋण फेडणें अशक्य आहे.

पू०—त्याला म्हणजे ब्रह्मचाऱ्याला गृहस्थाचीं कर्में करण्याचा अधिकार प्राप्त झाला नसेल; पण तो ऋणी असतोच. म्हटलें आहेः 'उत्पन्न झाल्याबरोबर ब्राह्मणाच्या पाठीमागें तीन ऋणें फेडावयाची जबाबदारी असते.'

सि०—तुम्हीं जें प्रमाण पुढें केलें आहे, तें केवळ ब्रह्मचर्यादि कर्में करावीं, इतकेंच कायतें सुचवितें. गृहस्थाश्रमाचा अधिकार प्राप्त झाल्यानंतर हीं अग्निहोत्रादि कर्में करून ऋणें फेडावयाचीं असतात. इतकाच त्याचा अर्थ आहे. शब्दार्थच घेतला तर उत्पन्न होतांक्षणीं ब्रह्मचर्य साधत नाहीं, यज्ञ करवत नाहीं, किंवा प्रजोत्पादनाचा संभवही नसतो. शिवाय, ब्राह्मणमात्र ऋणत्रयानें युक्त आहे, असें म्हणतांच क्षत्रियादिवर्ण अजीबात सुटतात. त्यांच्या पाठीमागें हीं ऋणें नाहींत कीं काय?

पू०—ब्राह्मण शब्दानें द्विजांचा म्हणजे तिन्ही वर्गांचा उल्लेख होतो, असें समजावें.

सि०—त्याचबरोबर गृहस्थाश्रम प्राप्त होतांक्षणी या तीन ऋणांची जबाबदारी येते, असेंही समजावें. तात्पर्य, ब्रह्मचर्याश्रमांत हीं ऋणें नसतात. तुमचा अर्थ गृहीत धरल्यास सर्वच जीव ऋणी ठरतील आणि एखादा ब्रह्मनिष्ठ ब्रह्मचारी मरण पावल्यास त्याला आत्मप्राप्ति व्हावयाची नाहीं, असें होईल! हें होण तर अनिष्ट आहे। पुराणांतरीं अनेक ब्रह्मचाऱ्यांना मुक्ति मिळाली, असा उल्लेख आहे.

पू०—निदान प्रत्येक गृहस्थाला तरी हीं तीन ऋणें फेडावयांचीं असतात.

सि०—नाहीं. तसेंही नाहीं. उत्तम वैराग्य व उत्तम विवेक प्राप्त झाल्यामुळें आत्मदर्शनाची ज्याला उत्कटतम इच्छा प्राप्त झाली आहे, 'त्यानें गृहस्थाश्रमांतून वानप्रस्थांत जावें किंवा ब्रह्मचर्याश्रमांतूनच संन्याशी व्हावें, मुमुक्षूनें संन्यास कोणत्याही आश्रमांतूनच बाहेर निघून घ्यावा.' अशी श्रुति आहे. संन्यास हेंच आत्मदर्शनाचें साधन आहे व ज्याला अधिकार प्राप्त झाला असेल, वैराग्य बाणलें असेल, त्यानें कोणत्याही आश्रमांत संन्यास घ्यावा.

पू०—मग यावज्जीवादि श्रुतीची वाट काय?

सि०—अमुमुक्षु म्हणजे संसारी लोकांच्या संबंधानें ती श्रुति यथार्थ असते. संसारी लोकांस मात्र यावज्जीवादि श्रुतीप्रमाणें चालावें लागतें. कशावरून म्हणाल तर पहाः छांदोग्यामध्यें असें सांगितलें आहे कीं, कांहीं गृहस्थ द्वादशरात्र अग्निहोत्र करून नंतर ह्या कर्मांचा परित्याग करते झाले. कारण त्यांस वैराग्य प्राप्त झालें होतें.

पू०—सारांश, अनधिकाऱ्यांनींही संन्यास घ्यावा असें झालें.

सि०—नाहीं. अनधिकारी म्हणजे ज्यांचा अग्नि नष्ट झाला आहे किंवा ज्यांनीं अग्नींचा स्वीकार केला नाहीं, ते लोक होत; असें श्रुति म्हणते: त्यांचा येथें संबंधच नाहीं. जाबाली-उपनिषदांत सांगितलें आहे कीं 'ज्यावेळीं उत्कृष्ट वैराग्य प्राप्त होईल, त्यावेळीं संन्यास घ्यावा. मग तो विरक्त पुरुष ब्रह्मचारी असो, वानप्रस्थ असो, व्रती असो, नसो, स्नातक असो वा नसो, नष्टाग्नि असो, किंवा अनग्निक असो, वैराग्य झालें कीं, संन्यास घ्यावा.' सर्व श्रुति-स्मृतींमध्येंही सामान्यत्वानें आश्रमांचा विकल्प सांगितला आहे. सारांश, विरक्त पुरुषानें कोणत्याही आश्रमांतून संन्यास घ्यावा किंवा तिन्ही आश्रमांतील कर्में संपादून संन्यास घ्यावा असा समुच्चयही श्रुति-स्मृतींनींच सांगितला आहे.

पू०—विद्वानाला कर्मविन्मुखता वैराग्यबलानेंच प्राप्त होते. तेथें कर्मप्रतिपादक शास्त्राचा कांहीं संबंध नाहींना ? मग त्यानें घरीं रहावें किंवा वनांत रहावें. दोन्हीही गोष्टी सारख्याच, असें होतें. मग त्यानें घरींच रहावयास काय हरकत आहे ?

सि०—कर्मविन्मुखता उत्पन्न करणारे वैराग्य ओघबलानें मुमुक्षूस प्राप्त झालें, म्हणजे गृहस्थाश्रमादि संन्यासेतर आश्रमांत विरक्तानें राहणें शक्य नाहीं. कारण इतर आश्रमांत वासनाजन्य कर्मानें व्यवहाराची प्रेरणा होते, असें आम्हीं मागेंच बोलून गेलों आहों. वासनाजन्य कर्माचा अभाव याचाच अर्थ व्युत्थान होय. हेंही आम्हीं प्रतिपादिलें आहे. आतां कां हें अर्थ-शून्य पिष्टपेषण ?

पू०—अर्थात् अशाकरितां कीं अशा पुरुषाला शास्त्रनियमांची आज्ञा मान्य नसल्यामुळें तो वाटेल तसा वागेल, त्याला नीति-अनीति, न्याय-अन्याय, धर्म-अधर्म इत्यादिकांचा विचारच राहणार नाहीं, अशी आम्हांस भीति वाटते.

सि०—शिव ! शिव ! ! काय बोलतां हें ? वासना ओढून नेतील तिकडे जाणें, हें केवळ अत्यंत मूर्ख मनुष्याला मात्र संभवनीय आहे. ज्या विद्वानाची वासना समूळ व सफळ नष्ट झाली, तो वाटेल तसा बहकेल, असें तुमच्यानें म्हणवतें तरी कसें ? अहो ! शास्त्रानें सांगितलेलें कर्म सुद्धां जर आपल्या गुरुभाराच्या ऐश्वर्यबलानें आत्मवेत्त्याजवळ जाऊं शकत नाहीं, शास्त्रानें सांगितलेलें सात्त्विक कर्म सुद्धां जड असल्यामुळें शुद्ध चैतन्यात्मक असणाऱ्या ब्रह्मज्ञाला गांठूं शकत नाहीं, तर तुमचें अविवेकजन्य कर्म (येथेष्ट चेष्टा) आत्मज्ञान्याला कर्मप्रवृत्त करतील हें केव्हांही संभवनीय नाहीं. पहा कीं, उन्मत्त झाल्यामुळें किंवा दृष्टि-दोष असल्यामुळें दिसणारी अयथार्थ वस्तु उन्माद किंवा दृष्टि-दोष नाहींसा झाल्यावर त्याच स्वरूपांत कधींही दिसावयाची नाहीं. अयथार्थ ज्ञान झालें होतें, तें उन्मादानें किंवा दृष्टिदोषानें मात्र झालें होतें. याप्रमाणें वासनेनें प्रेरित केल्यामुळें जें कर्म करावेसें वाटतें किंवा जो पदार्थ हवासा वाटतो, तो ती कर्म करण्याची किंवा पदार्थ मिळविण्याची हौस व वासना नष्ट झाल्यावर नष्ट होतो. सर्व प्रकारचें कर्म जड असतें म्हणून आत्मवेत्त्याला व्युत्थाना

व्यतिरिक्त यथेष्ट चेष्टा करण्याची किंवा शास्त्रीय कर्म करण्याची प्रेरणा होत नाहीं व प्रेरणा करण्याचें सामर्थ्यही शास्त्राला किंवा इतर कोणाला नाहीं. सारांश, यथेष्ट चेष्टा, शास्त्रविहित कर्म, हें आत्मज्ञानाशीं केव्हांही संगत होत नाहीं.

पू०—पण विद्या आणि अविद्या या उभयतांचेंही ज्ञान एकदम होतें' असें ईशावास्य श्रुति म्हणते ना ?

सि०—विद्येसह अविद्याही विद्वानाच्या ठिकाणीं राहते, असा त्या श्रुतीचा मुळीं अर्थच नाहीं. तुमचा अर्थच चुकला आहे.

पू०—मग अर्थ तरी काय ?

सि०—एकच पुरुषाचे ठिकाणीं एकाच वेळीं विद्या आणि अविद्या यांचा समुदाय होत नाहीं. पहा कीं, शुक्तीचे ठिकाणीं एकाच काळीं एकाच पुरुषाला रजताचें व शुक्तीचें ज्ञान होत नाहीं. शुक्तिज्ञान नसतें, किंवा रुपें आहे असें ज्ञान असलें, म्हणजे शिंपल्याचें ज्ञान नसतें. शिवाय, 'जिला विद्या म्हणतात ती, व जिला अविद्या म्हणतात ती, त्या उभयतांमध्यें अत्यंत भेद आहे. स्थानभेद आहे, गुणभेद आहे, उभयतांचे मार्ग निराळे आहेत' असें कठोपनिषदांत सांगितलें आहे. म्हणून विद्या (म्हणजे ब्रह्मज्ञान) असेल तेव्हां अविद्येचा संभव मुळीं नसतो. 'तपानें ब्रह्म जाणून घ्यावें' इत्यादि श्रुति आमच्या म्हणण्यास प्रमाण आहेत. तपःप्रमुख विद्योत्पत्तीचीं साधनें व गुरुसेवाप्रमुख कर्में हीं उभयतां अविद्यात्मकच आहेत. म्हणून त्यांस 'अविद्या' असें ईशावास्यांत म्हटलें आहे. तपादिकांनीं व गुरुसेवेनें विद्या उत्पन्न होऊन त्यांच्या द्वारा मृत्यु म्हणजे वासना इचें अतिक्रमण करितां येतें. तपानें व गुरुसेवेनें निष्कामत्व प्राप्त होतें व मुमुक्षूच्या सर्व एषणा नष्ट होतात. **मग पुढें ब्रह्मविद्या प्राप्त करून** घेतल्यावर मोक्ष मिळतो, हा खरा अर्थ आहे.

पू०—कशावरून ?

सि०—पुढच्याच पंक्तींत 'अविद्येनें मृत्युसागर उत्तीर्ण होऊन विद्येनें अमृत मिळवितो, मोक्ष मिळवितो' असें सांगितलें आहे. सारांश, निष्काम कर्मानें वासना-नाश होतो, म्हणजे मृत्यूचें उत्तरण होतें, व विद्याधिगमानें अमृतत्व मिळतें.

पू०—परंतु 'जावत्काल आयुर्दाय आहे, तावत्काल कर्म करावें. कर्म करून मात्र शंभर वर्षेपर्यंत जगण्याची इच्छा करावी' असा श्रुतीनें जो नियम घातला आहे, तो काय फुकटच आहे ?

सि०—तो संसारी-लोकांकरितां आहे. इतरत्र त्याचा संबंध नाहीं, असें आम्हीं सांगितलेंना ? आतां आणखी जें काय 'आत्मज्ञान आणि कर्म हीं परस्पर आविरुद्ध आहेत, इत्यादिप्रकारचे आक्षेप तुम्ही याच उपनिषदांतील कांहीं वाक्यां-वरून घ्याल, त्यांचेंही समाधान आम्हीं असें करितों कीं, कर्म आणि ब्रह्म यांचा

संबंध सांगितला असेल, तेथें श्रुतीला सविशेष म्हणजे सगुण ब्रह्म अभिप्रेत आहे; पण श्रुतीला मुख्यतः केवळ (निर्गुण, निर्विशेष) ब्रह्माचें वर्णन करावयाचें आहे, निर्गुण-ब्रह्मांत कर्म व अविद्या यांचा संबंध असणें शक्य नाहीं, असें आम्ही मागें सांगितलें आहे, व या उपनिषदाचें व्याख्यान करतांना पुढेंही सांगूं. असो; आतां केवल, निष्क्रिय असें जें ब्रह्म तें व केवल आणि निष्क्रिय आत्मा हीं दोन्हीं (ब्रह्म व आत्मा हीं दोन्हीं) एकच आहेत, असें ज्ञान प्रकट करण्यासाठीं या उपनिषदाला प्रारंभ केला आहे. त्याचा अर्थ करण्याच्या उद्योगास आम्हीं लागतों. (निर्विशेष आत्मा हा **विषय**, उत्कृष्ट वैराग्यशील व विवेकशील मुमुक्षु हा **अधिकारी**, **मोक्ष** हें प्रयोजन इत्यादि साधनचतुष्टय सिद्ध करण्यासाठीं वरील विवेचन आचार्यांनीं केलें आहे.)

मंत्र पहिला.

आत्मा वा इदमेक एवाग्र आसीत्।
नान्यत्किंचन मिषत्। स ईक्षत लोकान्नु सृजा इति॥१॥

अन्वय व अर्थः—अग्रे इदं वै आत्मा एकः एव आसीत् (प्रारंभीं, हें दृश्य विश्व म्हणजे वस्तुतः एक आत्मा मात्र होता. हें सर्व दृश्य प्रथमतः आत्मरूप मात्र होतें) **अन्यत् किंचन मिषत् न** (मिषत् म्हणजे व्यापारवंत असणारें असें दुसरें कांहीं एक नव्हतें) **स ईक्षत** (त्यानें—आत्म्यानें—विचारपूर्वक पाहून संकल्प केला) **लोकान् नु सृजै, इति** (कर्मफलाचा उपभोग जीवांनीं घ्यावा, एतदर्थ अनेक लोक-उपभोगस्थानें—निर्माण करीन).

सारांश, जीवांनीं पूर्वसंचिताचा उपभोग घ्यावा व आपआपल्या मोक्षप्राप्तीचा उद्योग करावा, एतदर्थ मी ब्रह्मांड उत्पन्न करीन, असा एक व एकरूप ब्रह्मानें संकल्प केला ॥ १ ॥

आत्मेति। आत्मा आप्नोतेरत्तेरततेर्वा परः सर्वज्ञः सर्वशक्तिरशनायादिसर्वसंसारधर्मवर्जितो नित्यशुद्धबुद्धमुक्तस्वभावोऽजोऽजरोऽमरोऽमृतोऽभयोऽद्वयो वै। इदं यदुक्तं नामरूपकर्मभेदभिन्नं जगत् आत्मैव एकः अग्रे जगतः सृष्टेः प्राक् आसीत्। किं नेदानीं स एवैकः ? न। कथं तर्हि आसीदित्युच्यते ? यद्यपीदानीं स एवैकः, तथाप्यस्ति विशेषः। प्रागुत्पत्तेः अव्याकृतनामरूपभेद-

आत्मभूतमात्मैकशब्दप्रत्ययगोचरं जगत्, इदानीं व्याकृतनामरूपभेदत्वादनेकशब्दप्रत्ययगोचरमात्मैकशब्दप्रत्ययगोचरं चेति विशेषः। यथा सलिलात्पृथक् फेननामरूपव्याकरणात्प्राक्सलिलैकशब्दप्रत्ययगोचरमेव फेनम्, यदा सलिलात्पृथङ्नामरूपभेदेन व्याकृतं भवति, तदा सलिलं फेनं चेति। अनेकशब्दप्रत्ययभाक् सलिलमेवेति चैकशब्दप्रत्ययभाक्च फेनं भवति, तद्वत्। न अन्यत्किंचन न किंचिदपि मिषत् निमिषव्यापारवदितरद्वा। यथा सांख्यानामनात्मपक्षपाति स्वतन्त्रं प्रधानम्, यथा च काणादानामणवः, न तद्वदिहान्यदात्मनः किंचिदपि वस्तु विद्यते। किं तर्हि? आत्मैवैक आसीदित्यभिप्रायः। सः सर्वज्ञस्वाभाव्यात् आत्मा एक एव सन ईक्षत। ननु प्रागुत्पत्तेरकार्यकारणत्वात्कथमीक्षितवान्? नायं दोषः, सर्वज्ञस्वाभाव्यात्। तथा च मन्त्रवर्णः—'अपाणिपादो जवनो ग्रहीता' इत्यादिः। केनाभिप्रायेणेत्याह—लोकान् अम्भःप्रभृतीन्प्राणिकर्मफलोपभोगस्थानभूतान् नु सृजै सृजेऽहम् इति ॥ १ ॥

सि०—आत्मा ह्या शब्दाचा यौगिक अर्थ तुमच्या लक्षांत आहेच. 'आप्' म्हणजे ज्ञानी असणें, किंवा अद् म्हणजे खाणें किंवा सामर्थ्य असणें (ग्रहण करणें) किंवा अत् म्हणजे नित्य असणें, या यौगिक निर्वचनान्वयें 'आत्मा' या शब्दाचे सर्वज्ञ, सर्वशक्ति व क्षुधा, तृष्णा इत्यादि सर्व संसारधर्मांनीं वर्जित असण्याचा भाव, म्हणजे असंसारी असे अर्थ प्रकट होतात. तात्पर्य तो नित्य, शुद्ध, बुद्ध आणि मुक्त आहे, तो अज, अजर अमर, अमृत, अभय व अद्वय आहे. हें सर्व सुप्रसिद्ध आहे, असें 'वै' शब्दानें सुचविलें.

शि०—इदं म्हणजे?

सि०—भिन्न-नामरूपांनीं व भिन्न-कर्मांनीं विचित्र झालेलें, अनेक रसात्मक असणारें, नामरूपकर्म-भेदांनीं नानारूप झालेलें हें दृश्य विश्व असें 'हें' या समीपदर्शक सर्वनामानें सुचविलें.

शि०—येथें माझा घोंटाळा झाला, मंत्राच्या प्रथम चरणाचा अर्थ माझ्या लक्षांत येत नाहीं.

सि०—श्रुति म्हणत आहे, कीं हें जें नानारूपी विश्व दिसत आहे, तें सृष्टीची उत्पत्ति होण्यापूर्वी सर्वज्ञ सर्व सर्वज्ञत्वादि गुणसंपन्न आत्मा तद्रूपच होतें. केवळ आत्मा मात्र एक वस्तु प्रथम होती.

पू०—म्हणजे आतां तो आत्मा एक नाहीं, असें झालें. असतां हें प्रत्यक्ष दिसणारें स्वतंत्र विश्व जमेस धरिलें म्हणजे 'आत्मा मात्र एक आहे' या तुझ्या सिद्धांताला हरताळ लागली. आतां तरी आत्मा एक नाहीं, असें झालें.

सि०—छेः छेः! तसें होणें शक्यच नाहीं. जडाला किंवा मायेला स्वातंत्र्य कोठचें?

पू०—मग श्रुतीनें 'आसीत्=असता झाला' असा भूतकाळी प्रयोग केला आहे. त्याला कांहीं किंमतच नाहीं वाटतें?

सि०—किंमत आहे तर? श्रुतीला असें म्हणावयाचें आहे, कीं यद्यपि आत्मा शुद्धा आत्मा ही एकच वस्तु आहे, तथापि शुद्ध आत्मस्वरूपांत व आतां दृश्य भास्य होणाऱ्या या आत्मस्वरूपांत एक मोठा विशेष आहे.

पू०—तुम्ही 'विशेष' काढून साखरेची साल काढिलीत, तरी 'अग्रे-प्रथम' हें पदही आम्हीं म्हणतों, तोच अर्थ प्रतिष्ठापित करितें.

सि०—थोडें दमानें घ्या. ज्यावेळीं ब्रह्मांडाची उत्पत्ति झाली नव्हती, हें दृश्य ब्रह्मांड जेव्हां अव्यक्त स्थितींत होतें, नामरूपादिकांनीं हें व्याकृत न झाल्यामुळें आत्मभूत-आत्म्याशीं एकत्व नसतांही अव्यक्तत्वामुळें विचारदृष्टीला एकरूप भासणारें-व म्हणूनच 'आत्मा' या शब्दानें संबोधिलें जाणारें-हें विश्व **आतां** नामरूपांच्या भेदांनीं व्याकृत झालें आहे. येथें निरनिराळे पदार्थ आतां दिसतात व द्रष्टेही अनेक आहेत. म्हणून या विश्वाला व तद्गत-पदार्थांला अनेक शब्दांनीं संबोधितां येतें व निरनिराळे पदार्थ द्रष्ट्याच्या मनांत अनेक कल्पनाही उत्पन्न करितात. पण पुनः या सर्व विश्वाला 'आत्मा' या शब्दानें व प्रत्ययानें ओळखितां येतें. हा विशेष आहे. सृष्टीच्या अव्याकृत-स्थितींत एक आत्मा हाच शब्द व प्रत्यय उपयोजणें शक्य असे. आतां व्याकृत-स्थितींत 'ब्रह्मांड, विश्व, जगत्' इत्यादि अनेक नांवें भेदानुसार प्राप्त होतात व 'आतां' हेंही नांव साजिरें होतें. हा भेद श्रुतीला जीवकल्याणार्थ त्याच्या अधिकारानुरूप सांगावयाचा आहे; उदाहरणार्थः—पाण्यावर आतां पांढरा फेंस दिसत आहे. 'पांढरा' हें रूप व 'फेंस' हें नांव होय, पण पाण्यावर फेंस येण्यापूर्वी, फेंसाचें रूप व नाम प्राप्त होण्यापूर्वी पाण्याला 'पाणी' ह्याच नांवानें आपण ओळखीत होतो. नव्हे! आतां पाण्याहून फेंसाचें रूप निराळें झालें आहे, फेंस हें नांव निराळें आहे, तरी आपण जसा फेंस शब्दानें प्रस्तुतच्या व्याकृत स्थितीचा बोध करून घेतों, तसेंच त्याला पाणी व फेंस हीं नांवें देतों. सारांश, 'पाणी' हें नांव जसें पूर्वी होतें, तसेंच आतां आहे. **आतां फेंससह पाणी आहे, पूर्वी पाणी होतें.** सर्वदा पाणीच आहे. तसेंच या दृश्य ब्रह्मांडासंबधानें आहे. व्याकृत व अव्याकृत हा भेद आहे. सारांश, आत्म्याचें एकत्व मुळींच बाधित झालें नाहीं. असो; हें व्यक्त जेव्हां अव्यक्तस्थितींत होतें, तेव्हां आत्मवस्तूशिवाय इतर दुसरी कोणतीही वस्तु नव्हती. व्यापार करणारी किंवा स्थिर असणारी दुसरी कोणतीही वस्तु नव्हती.

शि०—म्हणजे अनात्मक असें कांहीं नव्हतें. पण सांख्य म्हणतात कीं, आत्मव्यतिरिक्त 'प्रधान' या नांवाचें स्वतंत्र असें अनात्मक तत्त्व आहे, तें पूर्वीही होतें. काणादप्रभृति वैशेषिक म्हणतात कीं, अनंत परमाणू प्रथमपासूनच स्वतंत्रतेनें विद्यमान आहेत. सारांश, अनात्मक असें दुसरें कांहीं तरी स्वतंत्र तत्त्व असतें व असलें पाहिजे, असें आपल्याशिवाय इतर बहुतेक वादी म्हणतात.

सि०—पण सर्वज्ञ श्रुति सांगते कीं, आत्मव्यतिरिक्त दुसरी स्वतंत्र किंवा अस्वतंत्र वस्तुच नाहीं. एक 'आत्मा' कायतो पूर्वी होता व आतांही आहे. हें श्रुतीला मुख्यतः सांगावयाचे आहे. श्रुति सामान्यतः जीवांस समजेल, या मार्गानेंच आपला उपदेश सांगत असते: पहा सर्वज्ञत्व हा आत्म्याचा स्वभाव आहे. तेव्हां एक, एकाकी व एकरस असूनही त्या आत्म्यानें विचारपूर्वक संकल्प केला कीं 'आपण आतां लोक म्हणजे भुवनें उत्पन्न करावीं.'

पू०—अहो! तुमच्या या अर्थाच्या लठ्ठ व कडु गोळ्या आम्हीं गिळाव्या तरी कशा? आतांचेंच वाक्य घ्या. तो आत्मा **एकरस** आहे, म्हणतां आणि लागलींच 'त्यानें विचार केला, संकल्प केला' म्हणतां, हें आहे, तरी काय? ज्या आत्म्याला 'देह नाहीं, व इंद्रियें नाहींत' त्यानें विचार कसा केला व संकल्प तरी कसा केला? कार्य म्हणजे देह व कारण म्हणजे जर इंद्रियें; परमात्मा जर कार्यकारणशून्य आहे, तर परमात्म्यानें विचार करणें शक्य नाहीं. मग हें तुम्ही सांगावें कसें व आम्हीं ऐकावें तरी कसें?

सि०—यांत कांहीं दोष नाहीं. तुमचा भारी उतावळा स्वभाव! अहो! 'सर्वज्ञत्व' हा आत्म्याचा स्वभाव आहे, असें प्रथमपासून आम्हीं सांगत आहोंत; तें तुम्हीं ध्यानांत ठेविलें नाहीं.

पू०—नसेल कदाचित्, पण हा त्याचा स्वभाव आहे, हें कशावरून?

सि०—'त्याला पाय नसून तो अतिचपल आहे, हात नसून तो पदार्थ देतो, घेतो' 'त्याला कर्ण नसून तो ऐकतो, डोळे नसून तो पाहतो' इत्यादि अनेक श्रुति त्याचें सर्वज्ञत्व सिद्ध करितात. हा विषय मोठा आहे. त्याचा विचार अन्यत्र करूं.

शि०—पुढच्याच मंत्रांत सांगितलेलीं 'अंभःप्रभृति' अनेक भुवनें उत्पन्न करावीं, हा त्याचा अभिप्राय होता. पण ही नसती उठाठेव कशाला?

सि०—जीवांनीं केलेल्या कर्मांच्या फळांचा उपभोग घेण्यासाठीं या स्थानांत उन्मोचक किंवा बद्धक कर्म करण्यासाठीं स्थळें असावीं, एतदर्थ परमात्म्यानें सृष्युत्पत्तीचा विचार केला. आतां 'जीवांनीं केव्हां कर्म केलें होतें.' इत्यादि त्याचा विचारही आपण हें उपनिषद्भाष्य संपल्यानंतर करूं.

तात्पर्य सृष्टि उत्पन्न करण्याचा, व्याकृत करण्याचा परमात्मसंकल्प झाला ॥ १ ॥

मंत्र दुसरा.

स इमाँल्लोकानसृजत। अम्भो मरीचीर्मरमापोऽ-
दोऽम्भः परेण दिवं द्यौः प्रतिष्ठान्तरिक्षं मरीचयः।
पृथिवी मरो या अधस्तात्ता आपः ॥ २ ॥

अन्वय व अर्थः—सः इमान् लोकान् असृजत (त्यानें हे सर्व लोक उत्पन्न केले) **अम्भः, मरीचीः, मरं, आपः** (अंभ, मरीची, मर–मर्त्यलोक–व आप् म्हणजे जल, असे हे लोक होत) **अदः** (याप्रमाणें) **परेण दिवं अंभः** (द्युलोकाच्या पलीकडचा लोक तो अंभ होय) **द्यौः प्रतिष्ठा** (द्युलोक हा त्याचा आश्रय आहे) **अंतरिक्षं मरीचयः** (अंतरिक्ष या मरीचि होत) **पृथिवी मरः** (पृथ्वी ही मर–मर्त्यलोक–होय) **याः अधस्तात् ताः आपः** (पातालांतील लोकांस आप् म्हणावें) **अंभ** म्हणजे द्युलोकापलीकडील लोक, **मरीचि** म्हणजे अंतरिक्ष, **मर** म्हणजे पृथ्वी आणि **आप** म्हणजे पाताळ, असे हे लोक होत ॥ २ ॥

एवमीक्षित्वा आलोच्य सः आत्मा इमान् लोकान् असृजत सृष्टवान्। यथेह बुद्धिमांस्तक्षादिः एवंप्रकारान्प्रासादादीन्सृजे इतीक्षित्वा ईक्षणानन्तरं प्रासादादीन्सृजति, तद्वत्। ननु सोपादानस्तक्षादिः प्रासादादीन्सृजतीति युक्तम्; निरुपादानस्त्वात्मा कथं लोकान्सृजतीति ? नैष दोषः। सलिलफेनस्थानीये आत्मभूते नामरूपे अव्याकृते आत्मैकशब्दवाच्ये व्याकृतफेनस्थानीयस्य जगतः उपादानभूते संभवतः। तस्मादात्मभूतनामरूपोपादानभूतः सन् सर्वज्ञो जगन्निर्मिमीते इत्यविरुद्धम्। अथवा, विज्ञानवान्यथा मायावी निरुपादानः आत्मानमेव आत्मान्तरत्वेन आकाशेन गच्छन्तमिव निर्मिमीते, तथा सर्वज्ञो देवः सर्वशक्तिर्महामायः आत्मानमेव जगद्रूपेण निर्मिमीते इति युक्ततरम्। एवं च सति कार्यकारणोभयासद्वाद्यादिपक्षाश्च न प्रसज्जन्ते, सुनिराकृताश्च भवन्ति। कान् लोकानसृजतेत्याह—अम्भो मरीचीर्मरमापः इति। आकाशा-

दिक्रमेण अण्डमुत्पाद्य अम्भःप्रभृतीन् लोकानसृजत । तत्र अम्भः-प्रभृतीन्स्वयमेव व्याचष्टे श्रुतिः । अदः ततः अम्भःशब्दवाच्यो लोकः, परेण दिवं द्युलोकात्परेण परस्तात्, सोऽम्भःशब्दवाच्यः, अम्भो भरणात् । द्यौः प्रतिष्ठा आश्रयः तस्याम्भसो लोकस्य । द्युलोकादधस्तात् अन्तरिक्षं यत्, तत् मरीचयः । एकोऽपि अनेक-स्थानभेदत्वाद्बहुवचनभाक्–मरीचय इति; मरीचिभिर्वा रश्मिभिः संबन्धात् । पृथिवी मरः—म्रियन्ते अस्मिन् भूतानीति । याः अधस्तात् पृथिव्याः, ताः आपः उच्यंते, आप्नोतेः, लोकाः । यद्यपि पञ्चभूतात्मकत्वं लोकानाम्, तथापि अब्बाहुल्यात् अन्नाम-भिरेव अम्भो मरीचीर्मरमापः इत्युच्यन्ते ॥ २ ॥

सि०—याप्रमाणें संकल्प केल्यानंतर तो आत्मा हे सर्व लोक–भुवनें–उत्पन्न करिता झाला. पहाः येथील कोणीही हुशार सुतार किंवा बुद्धिवान गवंडी घेतला तरी 'या या प्रमाणें मी मंदिराची उभारणी करीन' असा मनामध्यें संकल्प ठरवून–प्रसंगीं नकाशाही काढून–मंदिरादिकाची उठावणी करितो, तशीच परमात्म्यानें प्रथमतः आपल्या संकल्पाची यथायोग्य मांडणी केली व नंतर तो या सर्व भुवनांस उत्पन्न करिता झाला.

पूर्व०—पण तक्षादिकांजवळ लांकुड, माती इत्यादि सामग्री–उपादान–असतें. तेव्हां त्यांनीं मंदिरादि बांधावीं हें योग्य आहे. पण तुमच्या परमात्म्याजवळ तर कांहीं एक सामग्री नव्हती, 'परमात्मा ही कायती एक, एकाकी व एकरसात्मक वस्तु होती' असें तुम्ही म्हणतां, यावरून दिसतें. मग सामग्रीशून्य परमात्म्यानें हे सर्व लोक उत्पन्न केले, असें कसें म्हणतां येईल ?

सिद्धान्ती—हा कांहीं दोष नाहीं. पहा कीं, आत्मरूप म्हणजे सृष्टिपूर्वकालांत आत्मभूत असणारीं अव्याकृत नामरूपें आत्मशब्दानेंच ओळखलीं जातात. म्हणजेः-प्रलय झाल्यानंतर सर्व व्याकृत सृष्टि स्वकारणांत–ब्रह्मांत–अव्याकृतरूपानें लीन होते. सृष्टि म्हणजे नामरूप. तेव्हां सृष्टि–पूर्वी ब्रह्मांत नामरूपात्मक सृष्टि अव्याकृत असते. उदाहरणार्थ जल घ्या. ह्या जलांत जल व अव्याकृत रूपानें फेन (फेस) असतात. आपण सर्वांला जलच म्हणतों. पण स्पष्ट दिसणाऱ्या फेनाचें जलांतील अव्याकृत फेन उपादान असतें. याप्रमाणें अव्याकृत नामरूपें जलफेनस्थानीं होतीं. जलरूप असणारें, जलनाम ग्रहण करणारें व नामरूप व्याकृत न झालेलें जल म्हणजे फेसासहजल (जलाला व फेनाला–फेसाला–आश्रय देणारें जलच म्हणा !) जशी फेसाची सामग्री होते, त्याप्रमाणें आत्मरूप होऊन अव्याकृत-स्थितींत राहणारें व आत्मनांवानें ओळखलें जाणारें अव्याकृत नामरूप हें ह्या विद्यमान

ब्रह्मांडाचें उपादानकारण असणें शक्य नाहीं काय? आहे; तात्पर्य हे की, अव्यक्त असल्यामुळें आत्मभूत असणाऱ्या नामरूपांची सामग्री परमात्म्याजवळ सिद्धच होती. तोही सर्वज्ञच. तेव्हां अव्यक्त नामरूपाच्या साहाय्यानें सर्वज्ञ परमात्म्यानें हें सर्व अनंतकोटीब्रह्मांड उत्पन्न केलें, असें संसारी जीवानें समजून घेण्यास काय हरकत आहे? बाकी परब्रह्माला व्यक्त किंवा अव्यक्त नामरूप नाहीं, किंवा तो दुसऱ्या कशाचा आश्रयही नाहीं, हा सिद्धांत उपनिषदांमध्यें प्रसिद्ध असून ब्रह्मज्ञाच्या दृष्टीला 'उत्पत्तिविनाश' असणारें विश्व सत् नाहीं, हें ठरलेंच आहे. असो; व्यवहारदृष्टीनें 'मात्र जगतांची उत्पत्ति झाली, ती परमात्म्यानें केली. अव्यक्त नामरूपें ही सामग्री आहे' इत्यादि सिद्धांत श्रुति येथें सांगत आहे. व्यवहारदृष्टीनें येथें कांहीं विरोधही नाहीं. आतां दुसऱ्या दृष्टीनें पहाः एखादा चतुर मायावी कांहीं एक सामग्री न घेतां आपण पृथ्वीवर उभा राहतो व त्याचवेळीं जणु कांहीं आपणच दुसरा होऊन आकाशांत संचार करीत आहे, असा चमत्कार दाखवितो, हें तुम्ही पाहिलें असेल, निदान ऐकिलें तरी असेल. त्याचप्रमाणें सर्वज्ञ, सर्वशक्ति व महामायावी (महानाटकी) परमात्मा आपण स्वतः स्वरूपांत राहूनही पुनः त्याचवेळीं आपण अन्यस्वरूपानें म्हणजे जगद्रूपानें प्रकट होतो व याप्रमाणें जगत् निर्माण करितो. हें उदाहरण तरी तुम्हांस पटलें पाहिजे व तें समजलेंही पाहिजे. असो; याप्रमाणें हें सर्व विश्व मायामय आहे, परमात्माच हें सर्व नटून राहिला आहे, असें स्पष्ट समजून घेतलें म्हणजे कार्य सत् कीं असत्, कारण सत् कीं असत् किंवा कार्यकारणें हीं सदसतें आहेत कीं नाहींत, इत्यादि पक्ष-प्रतिपक्ष उत्पन्न होत नाहींत, इतकेंच नव्हें, तर त्यांचें उत्तमप्रकारें निराकरणही होतें. कार्यकारण हा सर्व मायेचा विलास आहे, हें नीट समजलें म्हणजे आरंभवाद, परिणामवाद, शून्यवाद, यदृच्छावाद इत्यादि सर्व वाद लटपटून जातात व आत्मैक्यवाद स्पष्ट होतो. विशेष विस्तार मांडूक्यांत झालाच आहे. या श्रुतिबाह्य असणाऱ्या सर्वांचें खंडन तेथें होऊन एक अद्वैतसिद्धांत मात्र सर्वथा निर्दोष आहे, असें तेथें आपण ठरविलें आहे. असो; मायावीचा दृष्टांत जास्त चांगला, बरें. आतः—

शिष्य—परमात्म्यानें अंभ, मरीची, मर आप हे लोक उत्पन्न केले, असें श्रुति म्हणते. हे लोक कोणतें, बरें?

सिद्धान्ती—प्रथमतः आकाशादि क्रमानें अंड (ब्रह्मांड) उत्पन्न केलें. नंतर 'परमात्म्यानें अंभःप्रभृति लोकांची उत्पत्ति केली, हें श्रुति स्वतः सांगून त्यांचें निर्वचनही करीत आहे. कारण ही गोष्ट अप्रसिद्ध आहे. असो.' 'अंभ' शब्दानें वाच्य असणारे व द्युलोकाच्या आश्रयानें असणारे त्या पलीकडील 'महर्जनतपःसत्य' लोक होत. अंभ म्हणजे स्वर्लोक व पलीकडील लोके होत.

शिष्य—अंभ म्हणजे भरण म्हणून व वृष्टीचें अंभ (जल) तेथें असतें म्हणून कीं काय?

सिद्धान्ती—होय. या 'अंभ' लोकाची प्रतिष्ठा आश्रयस्थान—द्युलोक आहे, हें तुम्हास वरील निर्वचनानें समजलेंच आहे. ह्या द्युलोकाच्या खालीं व पृथ्वीच्या वर जो अंतरिक्ष प्रदेश आहे, त्याला मरीचि म्हणतात.

शिष्य—पण मंत्रांत 'मरीची' बहुवचनांत आहे, तें अंतरिक्षांत अनेक स्थानें भेद आहेत, म्हणून वाटतें ?'

सिद्धान्ती—किंवा मरीचींचा म्हणजे अनंत किरणांचा संबंध अंतरिक्षाशीं येतो, म्हणून अनेकवचनी प्रयोग आहे. मरलोक म्हणजे भूलोक. येथें मर्त्यत्व आहे, जीव मरतात, वस्तू नाश पावतात, म्हणून पृथ्वीला 'मर' म्हटलें. पृथ्वीच्या खालच्या लोकांस 'आप' म्हटलें. आप म्हणजे प्राप्त होणें. पाताळाला 'आप' हें नांव दिलें. आतां, सर्व सृष्टि जरी पंचभूतात्मक आहे, सर्वत्र पृथ्व्यादि भूतांचा संबंध आहे, तथापि सर्वत्र जलबाहुल्य आहे, म्हणून सर्वत्र भुवादि लोकांस जलनामें श्रुतीनें दिलीं ॥ २ ॥

मंत्र तिसरा.

स ईक्षतेमे नु लोका लोकपालान्नु सृजा इति।
सोऽद्भ्य एव पुरुषं समुद्धृत्यामूर्छयत् ॥ ३ ॥

अन्वय व अर्थः—**स** ईक्षत (त्यानें–पुनः–विचार केला) **'इमे नु लोकाः** (हे सर्व लोक तर झाले. पण) **लोकपालान् नु सृजे'** (लोकपाल उत्पन्न केले पाहिजेत) **इति** (असा त्यानें संकल्प केला) **सः अद्भ्यः एव पुरुषं समुद्धृत्य अमूर्छयत्** (नंतर त्यानें जलापासूनच एक पुरुष उत्पन्न केला व त्याला सर्व अवयवांनीं परिपूर्ण केला) लोकपाल उत्पन्न करण्यासाठीं प्रथम विराट्–पुरुषाला निर्माण केलें ॥ ३ ॥

सर्वप्राणिकर्मफलोपादानाधिष्ठानभूतांश्चतुरो लोकान्सृष्ट्वा सः ईश्वरः पुनरेव ईक्षत–इमे नु तु अम्भःप्रभृतयः मया सृष्टा लोकाः पालयितृवार्जिता विनश्येयुः; तस्मादेषां रक्षणार्थं लोकपालान् लोकानां पालयितॄन् नु सृजै सृजेऽहम् इति । एवमीक्षित्वा सः अद्भ्य एव अप्रधानेभ्य एव पञ्चभूतेभ्यः, येभ्योऽम्भःप्रभृतीन्सृष्टवान्, तेभ्य एवेत्यर्थः, पुरुषं पुरुषाकारं शिरःपाण्यादिमन्तं समुद्धृत्य अद्भ्यः समुपादाय, मृत्पिंडमिव कुलालः पृथिव्याः, अमूर्छयत् मूर्छितवान्, संपिण्डितवान्स्वावयवसंयोजनेनेत्यर्थः ॥ ३ ॥

सिद्धान्ती—सर्व प्राण्यांस कर्मफलांचें व कर्मसामग्रीचें अधिष्ठान असलेलें हें अंभ, मरीचि, मर व आप नामक जलबहुलत्वांकित चार लोक निर्माण केल्यावर पुनः परमात्मा विचार करिता झाला कीं, हे जे मीं अंभःप्रमुख चार लोक निर्माण केले आहेत, त्यांचें यथायोग्य पालन करणारा जर कोणी नसेल, तर त्यांचा नाश होईल. एतदर्थ या भुवनांचें पालन-पोषण करणारे लोकपालांची उत्पत्ति करणें मला अवश्य आहे. असा विचार करून परमात्म्यानें ज्या जलप्रधान पंचमहाभूतांपासून अंभःप्रभृति चार लोक उत्पन्न केले होते, त्याच जलात्मक उपादान कारणांपासून पुरुषांच्या आकाराचा म्हणजे हस्तमस्तकादियुक्त आकाराचा एक पुरुष समुद्भूत म्हणजे निर्माण केला.

शिष्य—म्हणजे कुलाल जसा पृथ्वींतील मातीचा भाग घेऊन त्याचा गोळा करितो, तसाच ना ?

सिद्धान्ती—होय. आणि त्या गोळ्याला योग्य असे अवयव देऊन त्याला साकारून सावयवत्व येईल, असें केलें. हे अवयव म्हणजेच लोकपालांची योजना होय ॥ ३ ॥

मंत्र चवथा.

तमभ्यतपत्तस्याभितप्तस्य मुखं निरभिद्यत यथाण्डं मुखाद्वाग्वाचोऽग्निर्नासिके निरभिद्येतां नासिकाभ्यां प्राणः प्राणाद्वायुरक्षिणी निरभिद्येतामक्षिभ्यां चक्षुश्चक्षुष आदित्यः कर्णौ निरभिद्यतां कर्णाभ्यां श्रोत्रं श्रोत्राद्दिशस्त्वङ् निरभिद्यत त्वचो लोमानि लोमभ्य ओषधिवनस्पतयो हृदयं निरभिद्यत हृदयान्मनो मनसश्चन्द्रमा नाभिर्निरभिद्यत नाभ्या अपानोऽपानान्मृत्युः शिश्नं निरभिद्यत शिश्नाद्रेतो रेतस आपः ॥ ४ ॥

॥ इति प्रथमः खण्डः ॥

अन्वय व अर्थः—**तं अभ्यतपत्** (नंतर त्या पिंडासंबंधानें दृढ विचार केला) **तस्य अभितप्तस्य मुखं निरभिद्यत, यथा अंडं; मुखात् वाक्; वाचः अग्निः** (उष्णानें फुटणाऱ्या अंड्याप्रमाणें ईश-संकल्पानें अभितप्त झालेला पिंड फुटून मुख झालें. मुख वाणीचें स्थान. ह्या वाणीची अधिष्ठात्री देवता अग्नि होय) **नासिके निरभिद्येतां, नासिकाभ्यां प्राणः, प्राणात् वायुः; अक्षिणी निरभिद्येतां, अक्षिभ्यां चक्षुः, चक्षुषः आदित्यः; कर्णौ निरभिद्येतां, कर्णाभ्यां श्रोत्रं, श्रोत्रात् दिशः; त्वक् निरभिद्यत, त्वचः लोमानि, लोमभ्यः ओषधीवनस्पतयः; हृदयं निरभिद्यत, हृदयात् मनः, मनसः चंद्रमाः; नाभिः निरभिद्यत, नाभ्याः अपानः, अपानात् मृत्युः; शिश्नं निरभिद्यत, शिश्नात् रेतः रेतसः आपः** (नासिकापुटें-नाकपुडथा—उत्पन्न झाल्या, तेथून प्राण उत्पन्न झाला व त्याची पालनकर्त्री देवता-वायु—उत्पन्न झाली; दोन नेत्रपुटें पिंडाला झालीं, नेत्रपुटांपासून नेत्र झाले, व या नेत्रापासून नेत्रपालनकर्ता सूर्य उत्पन्न झाला; कान व्यक्त झाले, कर्णेंद्रिय उत्पन्न झालें व त्यापासून कर्णपालक दिशा झाल्या; त्वचा व्यक्त झाली, त्वचेपासून लोम—अंगावरील केस व त्यांपासून ओषधीवनस्पती झाल्या; पिंडाला हृदय मिळालें, तेथून मन व मनापासून मनोधिष्ठाता चंद्रमा झाला; नाभि उत्पन्न होऊन तेथून अपानवायु व त्यापासून मृत्यु देवता झाली; शिश्न उत्पन्न झालें, त्यापासून रेत व रेतापासून आप झालें) याप्रमाणें मुख, नासिका, नेत्र, कर्ण व त्वचा हीं स्थानें (गोलक) वाणी (रसना) घ्राण, चक्षु, श्रोत्र व स्पर्श हीं इंद्रियें, अग्नि, वायु, सूर्य, दिशा व वनस्पति ह्या देवता, यांची व हृदय, मन व चंद्रमा; नाभि, अपान व मृत्यु; आणि शिश्न, रेत आणि जलदेवता, यांची उत्पत्ति झाली आहे ॥ ४ ॥

प्रथमखंड समाप्त.

तं पिण्डं पुरुषविधमुद्दिश्य अभ्यतपत्, तदभिध्यानं संकल्पं कृतवानित्यर्थः 'यस्य ज्ञानमयं तपः' इत्यादि श्रुतेः। तस्य अभितप्तस्य ईश्वरसंकल्पेन तपसाभितप्तस्य पिण्डस्य मुखं निरभिद्यत मुखाकारं सुषिरमजायत; यथा पक्षिणः अण्डं निर्भिद्यते एवम्। तस्माच्च निर्भिण्णात् मुखात् वाक् करणमिन्द्रियं निरवर्तत; तदधिष्ठाता अग्निः, ततो वाचः, लोकपालः। तथा नासिके निरभिद्येताम्। नासिकाभ्यां प्राणः, प्राणाद्वायुः; इति सर्वत्राधिष्ठानं करणं देवता—त्रयं क्रमेण निर्भिण्णमिति। अक्षिणी, कर्णौ, त्वक्, हृदयमन्तःकरणाधिष्ठानम्, मनः अन्तःकरणम्; नाभिः सर्वप्राणबन्धनस्थानम्। अपानसंयुक्तत्वात् अपान इति पायविन्द्रियमुच्यते; तस्मात् तस्याधिष्ठात्री देवता मृत्युः। यथा अन्यत्र, तथा शिश्नं निरभिद्यत प्रजननेन्द्रियस्थानम्। इन्द्रियं रेतः रेतोविसर्गार्थत्वात्सह रेतसोच्यते। रेतस आपः इति॥ ४॥

॥ इति प्रथमखण्डभाष्यम्॥

सिद्धान्ती—याप्रमाणें पुरुषाच्या आकाराचा जो पिंड त्याला उद्देशून परमात्म्यानें ध्यानरूप उग्र तपश्चर्या केली म्हणजे दृढ संकल्प करून निश्चय ठरविला, हें तात्पर्य आहे. 'परमात्म्याचें तप ज्ञानमय असतें' अशी श्रुति प्रमाण होय. या ज्ञानरूप तपानें तो पिंड खूप तापून गेला व उबलेल्या अंड्याला जसें भोक पडतें, त्याप्रमाणें या पिंडाला प्रथमतः तोंड आलें, तोंडाच्या आकाराचें भोक पडलें. ह्याप्रमाणें तोंड फुटलेल्या पिंडाला तोंडांतच वाणी (रसना) हें इंद्रिय निर्माण झालें. आणि या वाणीपासून वाणीचा पालक जो अग्नि तो उत्पन्न झाला. नाकपुड्या, तेथून प्राणवायु व त्यापासून वायु देवता याप्रमाणें नेत्र, कर्ण व त्वचा यांची व सर्वत्र **अधिकरण** (स्थान), **इंद्रिय** व **देवता** या त्रायची क्रमानें उत्पत्ति झाली. हृदयकमल हें अंतःकरणाचें स्थान, यापासून मन व मनापासून चंद्र झाला. नाभि हें सर्व प्राणांचें निबंधनस्थान आहे. येथून अपान व अपानाशीं संयुक्त असलेलें गुदद्वार व तेथून त्याचा अधिष्ठाता मृत्यु झाला. याचप्रमाणें शिश्न. तेथून रेतोत्पत्ति व त्यापासून आप (जल) झालें. प्रजोत्पत्तीचें स्थान शिश्न. रेतासह तेंच रेतस्खलनाचा अवयव होतें. ॥ ४ ॥

प्रथमखंड समाप्त.

द्वितीयः खण्डः ॥

मंत्र पहिला-

ता एता देवताः सृष्टा अस्मिन्महत्यर्णवे प्रापतं-स्तमशनायापिपासाभ्यामन्ववार्जत्। ता एनमब्रुवन्नायतनं नः प्रजानीहि यस्मिन्प्रतिष्ठिता अन्नमदामेति ॥१॥

अन्वय व अर्थः—ताः एताः सृष्टाः देवता अस्मिन् महति अर्णवे प्रापतन् (त्या ह्या उत्पन्न झालेल्या देवता या महा घोर समुद्रामध्यें—भवार्णवामध्यें-या पिंडभूत विराट्—पुरुषाच्या शरीरांत येऊन पडल्या) तं अशनायापिपासाभ्यां अन्ववार्जत् (त्या पिंडाला क्षुधा आणि तृषा यांची उपाधि परब्रह्मानें लावून दिली) 'यस्मिन् प्रतिष्ठिताः अन्नं अदाम, आयतनं नः प्रजानीहि 'इति ताः एनं अब्रुवन् (ज्याच्यामध्यें आम्ही प्रतिष्ठित झालों असतां आम्हांस अन्न खातां येईल, असें स्थान आम्हांला द्या, अशी देवतांनीं ब्रह्माला विनंति केली ॥ १ ॥

ता एता अग्न्यादयो देवताः लोकपालत्वेन संकल्प्य सृष्टा ईश्वरेण अस्मिन् संसारार्णवे संसारसमुद्रे महति अविद्याकामकर्मप्रभवदुःखोदके तीव्ररोगजरामृत्युमहाग्राहे अनादौ अनन्ते अपारे निरालम्बे विषयेन्द्रियजनितसुखलवलक्षणविश्रामे पञ्चेन्द्रियार्थतृष्णारुताविक्षोभोत्थितानण्शतमहोर्मौ महारौरवाद्यनेकनिरयगतहाहेत्यादिकूजिताक्रोशनोद्भूतमहारवे सत्यार्जवदानदयाहिंसाशमदमधृत्याद्यात्मगुणपाथेयपूर्णज्ञानोडुपे सत्सङ्गसर्वत्यागमार्गे मोक्षतीरे एतस्मिन् महत्यर्णवे प्रापतन् पतितवत्यः। तस्मादग्न्यादिदेवताप्ययलक्षणापि या गतिर्व्याख्याता ज्ञानकर्मसमुच्चयानुष्ठानफलभूता, सापि नालं संसारदुःखोपशमनायेत्ययं विवक्षितोऽर्थोऽत्र । यत एवम्, तस्मादेवं विदित्वा, परं ब्रह्म, आत्मा आत्मनः सर्वभूतानां च, यो वक्ष्यमाणविशेषणः प्रकृतश्च जगदुत्पत्तिस्थितिसंहारहेतुत्वेन, स सर्वसंसारदुःखोपशमनाय वेदितव्यः । तत्मात् 'एष पन्था

एतत्कर्मैतद्ब्रह्मैतत्सत्यम् ' यदेतत्परब्रह्मात्मज्ञानम्, ' नान्यः पन्था विद्यतेऽयनाय इति मन्त्रवर्णात्। तं स्थानकरणदेवतोत्पत्तिबीजभूतं पुरुषं प्रथमोत्पादितं पिण्डमात्मानम् अशनायापिपासाभ्याम् अन्ववार्जत् अनुगमितवान् संयोजितवानित्यर्थः। तस्य कारणभूतस्य अशनायादिदोषवत्त्वात् तत्कार्यभूतानामपि देवतानामशनायादिमत्त्वम्। ताः ततः अशनायापिपासाभ्यां पीड्यमानाः एनं पितामहं स्रष्टारम् अब्रुवन् उक्तवत्यः। आयतनम् अधिष्ठानं नः अस्मभ्यं प्रजानीहि विधत्स्व, यस्मिन् आयतने प्रतिष्ठिताः समर्थाः सत्यः अन्नम् अदाम भक्षयाम इति ॥ १ ॥

सिद्धान्ती—याप्रमाणें त्या ह्या अग्निप्रमुख देवतांची लोकपालक म्हणून उत्पत्ति करण्याचा परमेश्वरानें संकल्प केला, व संकल्पानुसार उत्पन्न झाल्यावर ते लोकपाल महासागरामध्यें येऊन पडले.

शिष्य—हा महासागर तो कोणता भगवन् ?

सिद्धान्ती—विराट् पुरुषाचें जगद्व्यापी शरीर हाच तो महासागर होय. हाच संसार-सागर म्हणजे भवसमुद्र होय. या सागराचें वर्णन करणें दुरापास्त आहे. श्रुतीनचें याला 'महा' असें विशेषण दिलें आहे. कारण अविद्याजन्य जो काम, व तज्जन्य जी वासना, त्यांनीं प्रेरित केल्यामुळें जीव कर्म करितात व त्या कर्मापासून सर्वदा दुःखरूपी **जल** विद्यमान होत असतें. या सागरांत यातना देणारे रोग, वार्धक्य, मृत्यु इत्यादि मोडमोठाले **नक्र** हिंडत असतात. हा सागर अनादि, अनंत, अपार व निराधार आहे. यामध्यें नित्य विश्रांति देणारें असें एकही स्थान नाहीं.

पूर्व०—कां बरें ? याच संसारांत इष्ट विषयांशीं इंद्रियांचा संगम झाला असतां जीवाला किती तरी सुख होत असतें ?

सिद्धान्ती—अहो ! पण हें सुख किती अल्प असतें बरें ? हें क्षणभर होणारें अल्प सुख एखाद्या महा अरण्यांत असणाऱ्या हिरवाळ जागेंतील प्रारंभीं सुख देणाऱ्या परंतु अंतीं दुःखद होणाऱ्या मृगजलाप्रमाणें असतें. असो; या संसारसमुद्रावरून वाहणारे झंझावात अनर्थकारी असतात. आपल्या पांच इंद्रियांस हवे असणाऱ्या इष्ट पदार्थांची उत्कट तृष्णा असणें, हाच तो भयप्रद **झंझावात** होय. या वातांनीं हा संसारजलधि प्रक्षुब्ध केल्यामुळें महा अनर्थकारी अशा शतशः पर्वतप्राय **ऊर्मी** (लाटा) येथें नित्य आपला प्राण-घेणी खेळत असतात. तेथेंच महा रौरवा-सारखे अनेक नरक असून त्यांत कुचंबणाऱ्या लोकांचे ' हाय हाय ' इत्यादि प्रकारचे मंद्ध्वनि आणि तारस्वराचे आक्रोश उत्पन्न होतात आणि त्यामुळें हा खवळून गेलेला सागर प्रतिक्षणीं **घनघोर गर्जना** करीत आहे, असें दिसतें. असो; हा भवसागर अशा भयंकर स्वरूपाचा आहे.

शिष्य—भगवन्, ह्या अतिघोर सागरांत सांपडलेल्या बिचाऱ्या जीवांची सुटका होण्याचा मार्गच मला दिसत नाहीं.

सिद्धान्ती—असें कसें म्हणतोस ? जीवानें विवेक धारण केला व सत्य, आर्जव (सरळपणा), दान, दया, अहिंसा (निरुपद्रवीपणा), शम, दम, धृति (धैर्य, उत्साह) इत्यादि आत्मसाधक जे गुण आहेत, तद्रूप पाथेयानें (प्रवासोपयोगी सामग्रीनें) पूर्ण उदित झालेलें ज्ञान ही नौका या समुद्राच्या तीराशीं नित्य सिद्ध केलेली असते. या सामग्रीचा आश्रय केला, ज्ञाननौकेंत बसलें, सत्संग (सद्गुरूचा अनुग्रह) आणि सर्वत्याग (संन्यास) हें मिळविलें व या मार्गानें ज्ञानरूपी नौका संसारार्णवांतून दृढनिश्चयानें चालविली म्हणजे मुमुक्षु जीव या अर्णवाच्या मोक्षतीराला सुखरूप जाऊन पोहोंचतो. असो; याप्रमाणें वर वर्णिलेल्या घनघोर महासागरामध्यें सर्व देवता येऊन पडल्या; म्हणजे स्वरूपाच्या अज्ञानामुळें या सर्व देवताही अहंकारानें दूषित झाल्या. तात्पर्य, ज्ञान आणि कर्म यांचा समुच्चय करून दृढ अनुष्ठान केलें असतांही काय फलप्राप्ति होते, असें विचारशील तर अग्निप्रमुख संसारीदेवतांची प्राप्ति होणें, हें या फलाचें लक्षण आहे; आणि आतांच म्हटल्याप्रमाणें अग्निप्रमुख-देवता अहंकारानें दूषित झालेल्या असतात; म्हणून ह्या देवतांची प्राप्ति मुद्धां संसारदुःखाचा उपशम करण्याला समर्थ नाहीं, असा अर्थ स्पष्ट करण्याचा श्रुत्यभिप्राय आहे. असो; असें आहे म्हणून अथवा अशा प्रकारची स्थिति आहे, असें जाणून, सर्व भूतांचा व आपला आत्मा जें परब्रह्म, जो परमात्मा, त्याचें मात्र ज्ञान संसारदुःखानें पोळलेल्या मुमुक्षु जीवानें करून घेतलें पाहिजे. या प्रस्तुत (ज्याचा विचार प्रस्तुत आहे, अशा) परमात्म्याचें स्वरूप आम्हीं सांगणारच आहोंत. बाबारे! सर्व विश्वाची उत्पत्ति, स्थिति आणि लय यांचें आदिकारण हाच प्रस्तुतचा परमात्मा आहे, आणि म्हणून तोच कायतो सर्व संसारदुःखांचें परिमार्जन करण्यास समर्थ आहे हें जाणून घ्यावें, हा श्रुतीचा अभिप्राय आहे. इतर श्रुतीही 'आत्मज्ञान, हाच मार्ग आहे,' 'हेंच कर्म आहे,' 'हेंच ब्रह्म, हेंच सत्य, हेंच परब्रह्म आहे.' 'ब्रह्मज्ञान होण्याला म्हणजे संसार-विमोचनाला दुसरा कोणताही मार्ग नाहीं.' असें म्हणतात. असो; आतां प्रस्तुत-विषयाकडे वळूं. त्या स्थान, इंद्रियें, देवता या सर्वांची उत्पत्ति होण्याचें बीजस्थान असणाऱ्या व प्रथमच उत्पन्न केलेल्या पिंडरूपी पुरुषाला क्षुधा आणि तृषा या दोन कर्मप्रेरक वृत्तींचा (संवेगांचा) परमात्म्यानें संयोग करून दिला.

शिष्य—म्हणजे क्षुधेनें आणि तृषेनें आम्हीं जीव कर्मप्रवृत्त होतों; तसेंच, विराट्-पुरुषानेंहि व्हावें, अशी परब्रह्माची योजना आहे.

सिद्धान्ती—इतकेंच नव्हे; पण सर्व कारण असणाऱ्या विराट्-पुरुषाला क्षुधा-तृषांचा उपसर्ग झाला, तसाच त्याच्यापासून कार्यरूपानें उत्पन्न झालेल्या अग्निप्रमुख

देवतांसही क्षुधादिकांचा उपद्रव होऊं लागला। याप्रमाणें क्षुधादिकांनीं पीडित झालेल्या देवता आपल्या आजोबाला, सर्वकर्त्या परमेश्वराला म्हणाल्या—

शिष्य—विराट्-पुरुष हा देवतांचा पिता, परमात्मा विराट्-पुरुषाचा पिता, म्हणून तो पितामह (आजोबा) झाला. असो; देवता काय म्हणाल्या!

सिद्धान्ती—आम्हांला राहण्यास योग्य असें प्रत्येकीं स्थान द्यावें कीं, जेथें राहिलों असतां समर्थ होऊन आम्हांस आमचें अन्न खावयास मिळेल. सारांश, इंद्रिय-देवतांनीं व्यष्टि शरीर (आम्हांस राहण्याचें स्थान) असावें, असें मागणें मागितलें॥१॥

मंत्र दुसरा.

ताभ्यो गामानयत्ता अब्रुवन्न वै नोऽयमलमिति।
ताभ्योऽश्वमानयत्ता अब्रुवन्न वै नोऽयमलमिति॥ २॥

अन्वय व अर्थः—**ताभ्यः गाम् आनयत्** (देवतांच्यासाठीं उदकापासून गोरूपी पिंड आणून परमेश्वरानें त्यांस दाखविला) **ताः अब्रुवन् 'अयं वै नः न अलं' इति** (देवता म्हणाल्या कीं, पिंड आम्हांस उपयोगीं नाहीं.) **ताभ्यः अश्वम् आनयत्** (परमेश्वरानें अश्व आणिला) **ताः अब्रुवन्** (त्या म्हणाल्या) **'अयं वै नः न अलं इति'** (हाही आमच्या उपयोगाचा नाहीं)॥ २॥

एवमुक्त ईश्वरः ताभ्यः देवताभ्यः मां गवाकृत्तिविशिष्टं पिण्डं ताभ्य एवाद्भ्यः पूर्ववत्पिण्डं समुध्दृत्य मूर्छयित्वा आनयत् दर्शितवान्। ताः पुनः गवाकृतिं दृष्ट्वा अब्रुवन्। न वै नः अस्मदर्थम् अधिष्ठाय अन्नमत्तुम् अयं पिण्डः अलं न वै। अलं पर्याप्तः। अत्तुं न योग्य इत्यर्थः। गवि प्रत्याख्याते तथैव ताभ्यः अश्वम् आनयत्। ता अब्रुवन्—न वै नोऽयमलमिति, पूर्ववत्॥ २॥

सिद्धान्तीः—याप्रमाणें देवतांचें भाषण ऐकून परमेश्वरानें त्यांच्यासाठीं गायीच्या आकृतीचा एक पिंड त्याच उदकांपासून पूर्वीच्या पुरुषपिंडाप्रमाणें उद्धृत केला, आणि सर्व अवयवांनीं युक्त करून त्यांस आणून दाखविला. तेव्हां ती गवाकृति पाहून त्या पुनः म्हणाल्या 'येथें राहून अन्न खाण्याला आम्हाला समर्थ करील, असा हा गोपिंड नाहीं. म्हणून आम्हांस हा नको.' याप्रमाणें 'गो नको' 'हें अधिष्ठान नको' म्हणून सांगितल्यावर परमेश्वरानें अश्वपिंड आणिला. पण त्याची ही तशीच अवस्था

झाली. म्हणजे 'तोही नको' असें देवता म्हणाल्या. सारांश, गो आणि अश्व यांचे प्रत्याख्यान करून (आम्हांस नको, असें म्हणून) देवतांनीं बहुतेक सर्व पिंड नाकारून टाकिले ॥ २ ॥

मंत्र तिसरा.

ताभ्यः पुरुषमानयत्ता अब्रुवन्सुकृतं बतेति, पुरुषो वाव सुकृतम्। ता अब्रवीद्यथायतनं प्रविशतेति ॥ ३ ॥

अन्वय व अर्थः—ताभ्यः पुरुषं आनयत् (नंतर परमेश्वरानें पुरुषरूपी पिंड आणून दाखविला)—तो पाहून—**ताः अब्रुवन् 'सु कृतं बत' इति** (देवता म्हणाल्या हें अधिष्ठान खरोखर अत्युत्तम आहे) **पुरुषः वाव सुकृतम्** (पुरुषपिंड हेंच सर्व शुभकर्मांचें साधन आहे) **ताः 'यथायतनं प्रविशत' इति—स ताः अब्रवीत्** ('तुम्हांस योग्य असणाऱ्या स्थानांमध्यें आतां प्रवेश करा'—अशी देवतांना परमेश्वरानें आज्ञा केली) ॥ ३ ॥

सर्वप्रत्याख्याने ताभ्यः पुरुषमानयत् स्वयोनिभूतम् । ताः स्वयोनिं पुरुषं दृष्ट्वा अखिन्नाः सत्यः सु कृतं शोभनं कृतम् इदमधिष्ठानं बत इति अब्रुवन् । तस्मात्पुरुषो वाव पुरुष एव सुकृतम्, सर्वपुण्यकर्महेतुत्वात्; स्वयं वा स्वेनैवात्मना स्वमायाभिः कृतत्वात्सुकृतमित्युच्यते । ताः देवताः ईश्वरः अब्रवीत् इष्टमासामिदमधिष्ठानमिति मत्वा—सर्वे हि स्वयोनिषु रमन्ते; अतः यथायतनं यस्य यत् वदनादि क्रियायोग्यमायतनम्, तत् प्रविशत इति ॥ ३ ॥

सिद्धान्ती—याप्रमाणें गो-अश्व-प्रभृति सर्व पिंडांचें प्रत्याख्यान झाल्यावर परमेश्वरानें आपल्या स्वतःपासून निर्माण झालेला व विराट्-पुरुषाच्या आकृतीसारखा असणारा पुरुषपिंड आणून दाखविला. तेव्हां तो विराट्-पुरुष-सदृश-पिंड पाहून देवतांची खिन्नता नष्ट झाली, त्यांस आनंद झाला आणि त्या म्हणाल्या, 'हें अधिष्ठान वसतिस्थान, सुकृत म्हणजे चांगलें केलेलें, सर्व योग्य असणारें आहे. यांत शंका नाहीं.' देवता असें म्हणाल्या, म्हणून सुघटित पुरुषपिंड (मनुष्यशरीर) हा सर्व श्रेष्ठ आहे. कारण, या शरीरांत राहिलें असतां मात्र सर्व प्रकारची पुण्यकर्मे करितां येतात.

शिष्य—सुकृत म्हणजे स्वरुत अथवा स्वतः उत्पन्न केलेला, असा अर्थ होईल. कारण स्वतः केलेलें काम नेहमीं यथाशास्त्र आणि यथासांग होतें.

सिद्धान्ती—तसाही अर्थ होईल. पण मायेचें साहाय्य घेऊन परमेश्वरानें हें मनुष्य शरीर उत्पन्न केलें व विराट्-पुरुषासह यच्चावत् विश्व उत्पन्न केलें, असें नीट ध्यानांत ठेव. असो; परमेश्वरानें स्वतः किंवा आपल्या समक्ष पुरुषपिंड तयार केला म्हणून त्याला सुकृत म्हणतात. असो; नंतर त्यानें देवतांस सांगितलें कीं, "हें स्थान तुम्हांस सर्वथा इष्ट आहे. कारण, कोणीही झाला तरी त्याला स्वतःची योनि (जाति, स्वतःस योग्य असणारें स्थान स्वजाति, स्वोत्पत्तिस्थान) अत्यंत रमणीय वाटतें. तेव्हां ज्या देवतेला जें स्थान योग्य असेल व जेथें आपापलें भाषणादि नियत कर्म उत्तम करतां येईल, त्या त्या स्थानांत प्रत्येक देवतेनें प्रवेश करावा. सारांश, याप्रमाणें व्यक्ति-देहाची उत्पत्ति सांगून तेथें इंद्रियांच्या गोलकांचा व इंद्रियदेवतांचा स्वस्वयोनींत प्रवेश कसा झाला, हें येथें सांगितलें ॥ ३ ॥

मंत्र चवथा.

अग्निर्वाग्भूत्वा मुखं प्राविशद्वायुः प्राणो भूत्वा नासिके प्राविशदादित्यश्चक्षुर्भूत्वाक्षिणी प्राविशद्दिशः श्रोत्रं भूत्वा कर्णौ प्राविशन्नौषधिवनस्पतयो लोमानि भूत्वा त्वचं प्राविशंश्चन्द्रमा मनो भूत्वा हृदयं प्राविशन्मृत्युरपानो भूत्वा नाभिं प्राविशदापो रेतो भूत्वा शिश्नं प्राविशन् ॥ ४ ॥

अन्वय व अर्थः—वाक् भूत्वा अग्निः मुखं प्राविशत्; प्राणः भूत्वा वायुः नासिके प्राविशत्; चक्षुः भूत्वा आदित्यः अक्षिणी प्राविशत्; श्रोत्रं भूत्वा दिशः कर्णौ प्राविशन्; लोमानि भूत्वा ओषधिवनस्पतयः त्वचं प्राविशन्; मनः भूत्वा चंद्रमा हृदयं प्राविशत्; अपानोभूत्वा मृत्युः नाभिं प्राविशत्; रेतं भूत्वा आपः शिश्नं प्राविशन् (वाणी होऊन अग्नीनें मुखांत प्रवेश केला; प्राण होऊन वायूनें नासिकापुटांत प्रवेश केला; चक्षू होऊन आदित्यानें डोळ्यांत (नेत्रगोलकांत) प्रवेश केला; श्रोत्र होऊन दिशानीं कर्णांत प्रवेश केला; लोम-लव-होऊन

ओषधींनीं व वनस्पतीनीं त्वचेंत प्रवेश केला; मन होऊन चंद्रानें हृदयांत प्रवेश केला; अपान-वायु होऊन मृत्यूनें नाभिकमलांत प्रवेश केला; आणि रेतोरूप होऊन जलांनीं शिश्नामध्यें प्रवेश केला) ॥ ४ ॥

तथास्त्वित्यनुज्ञां प्रतिलभ्येश्वरस्य नगर्यामिव बलाधिकृतादयः अग्निः वागाभिमानी वागेव भूत्वा स्वयोनिं मुखं प्राविशत् तथोक्तार्थमन्यत् । वायुर्नासिके, आदित्योऽक्षिणी, दिशः कर्णौ, ओषधिवनस्पतयस्त्वचम्, चन्द्रमा हृदयम्, मृत्युर्नाभिम्, आपः शिश्नम्, प्राविशन् ॥ ४ ॥

सिद्धान्ती—परमेश्वराची अनुज्ञा मिळाल्यावर 'तथास्तु' असें म्हणून प्रत्येक देवतेनें आपापल्यास योग्य असणाऱ्या उत्पत्ति-स्थानांमध्यें म्हणजे नेत्रादि-गोलकांमध्यें प्रवेश केला.

शिष्य—खरेंच आहे; राजानें आज्ञा केल्यावर त्याचे सैन्याधिपती एखाद्या नवीन काबीज केलेल्या नगरींत प्रवेश करून आपापल्या स्थानीं जाऊन बसतात; त्याप्रमाणेंच ह्या देवतांनीं ईश्वरी-अनुज्ञेनें स्वस्थानीं प्रवेश केला.

सिद्धान्ती—अग्नि हा वाणीची अभिमानी देवता होऊन, तात्पर्य वाणीच होऊन वाणीचें उत्पत्तिस्थान जें मुख त्यांत प्रवेश करिता झाला. असाच बाकीच्याही देवतांनीं आपआपल्या उत्पत्तिस्थानांत प्रवेश केला म्हणजे नाकामध्यें वायु, नेत्रामध्यें सूर्य, कर्णामध्यें दिशा, त्वचेमध्यें ओषधिवनस्पती, हृदयामध्यें चंद्रमा, नाभीमध्यें मृत्यु, आणि शिश्नामध्यें जलदेवता यांनीं प्रवेश केला. ध्यानांत ठेव, मुख हा गोलक, वाणी हें इंद्रिय आणि अग्नि ही वाणीची अभिमानी देवता आहे. याप्रमाणेंच प्रत्येक इंद्रियाचा गोलक व त्याची अभिमानी देवता निरनिराळी आहे. या प्रमाणें गोलक, इंद्रिय आणि देवता यांची व्यष्टिशरीरांत योजना झाली आणि हें सर्व ईश्वराज्ञेनें झालें ॥ ४ ॥

मंत्र पांचवा.

तमशनायापिपासे अब्रूतामावाभ्यामभिप्रजानीहीति । ते अब्रवीदेतास्वेव वां देवतास्वाभजाम्येतासु भागिन्यौ करोमीति । तस्माद्यस्यै कस्यै च देवतायै हविर्गृह्यते भागिन्यावेवास्यामशनायापिपासे भवतः ॥ ५ ॥

॥ इति द्वितीयः खण्डः ॥

अन्वय व अर्थः—अशनायापिपासे तं अब्रूताम् ' आवाभ्याम् अभिप्रजानीहि ' इति (परमेश्वराला क्षुधा आणि तृषा म्हणाल्याः ' आम्हांलाही योग्य अधिष्ठान मिळालें पाहिजे. त्याची योजना करा, तें तें आम्हांस द्या) **एतासु एव देवतासु वां आभजामि, एतासु भागिन्यौ करोमि इति-सः ते अब्रवीत्** (' ह्याच देवतांमध्यें तुम्हांला वृत्ति देऊन तुमच्यावर अनुग्रह करितों, आणि यांना जें काय मिळेल, त्यांतच तुमचा वांटा ठेवितों ' असें परमेश्वरानें क्षुधेला आणि तृषेला सांगितलें) **तस्मात् यस्यै कस्यै च देवतायै हविः गृह्यते, अशनायापिपासे अस्यां भागिन्यौ एव भवतः** (म्हणून ज्या कोणत्याहि देवतेला हवि दिला जाईल, त्यांमध्येंच अशना आणि पिपासा ह्यांना भाग मिळतो) ॥ ५ ॥

द्वितीयखण्ड समाप्त.

एवं लब्धाधिष्ठानासु देवतासु निरधिष्ठाने सत्यौ अशनायापिपासे तम् ईश्वरम् अब्रताम् उक्तवत्यौ—आवाभ्याम् अधिष्ठानम् अभिप्रजानीहि चिन्तय विधत्स्वेत्यर्थः । स ईश्वर एवमुक्तः ते अशनायापिपासे अब्रवीत् । न हि युवयोर्भावरूपत्वाच्चेतनावद्वस्त्वनाश्रित्य अन्नात्तृत्वं संभवति । तस्मात् एतास्वेव अग्न्याद्यासु वां युवां देवतासु अध्यात्माधिदेवतासु आभजामि वृत्तिसंविभागेनानुगृह्णामि । एतासु भागिन्यौ यद्देवत्यो यो भागो हविरादिलक्षणः स्यात्, तस्यास्तेनैव भागेन भागिन्यौ भागवत्यौ व करोमीति । सृष्ट्यादावीश्वर एवं व्यदधाद्यस्मात्, तस्मात् इदानीमपि यस्यै कस्यै च देवतायै देवताया अर्थाय हविर्गृह्यते चरुपुरोडाशादिलक्षणं भागिन्यौ एव भागवत्यावेव अस्यां देवतायाम् अशनायापिपासे भवतः ॥ ५ ॥

॥ इति द्वितीयखण्डभाष्यम् ॥

सिद्धान्ती—याप्रमाणें देवतांना योग्य स्थानें मिळालीं खरीं; परंतु क्षुधा आणि तृष्णा यांना मात्र स्वतंत्र स्थान मिळालें नाहीं. कारण, विराट्-देहांतही यांस स्वतंत्र स्थान मिळालें नव्हतें. मग व्यष्टि देहांत कोठून मिळणार! म्हणून त्या ईश्वराला म्हणाल्या. 'भगवन्, आम्हांलाही आमच्या योग्य स्थानें मिळतील अशी योजना करा.' तें ऐकून परमेश्वरानें त्यांस सांगितलें, तुम्हीं केवळ गुणधर्मरूपी आहांत, म्हणून तुम्हाला सचेतन वस्तूचा आश्रय केल्याविना तुमचें खाद्यपान तुम्हाला मिळणें संभवनीय नाहीं. म्हणून ह्या अग्निप्रमुख ज्या अध्यात्म आणि अधिदैवी देवता आहेत, त्यांच्यामध्येंच वृत्तिसंविभाग करून मी तुमच्यावर अनुग्रह करितों.

शिष्य—वृत्तिसंविभाग म्हणजे?

सिद्धान्ती—वृत्ति म्हणजे भोगाचा एक देश, संविभाग म्हणजे दान. तात्पर्य हें आहे कीं, 'ज्या ज्या देवतेला जो जो हविर्भाग मिळेल, त्या त्या देवतेच्या त्या त्याच भागानें तुम्हांलाही भाग मिळेल व तुमचें समाधान होईल' असें क्षुधातृषेस सांगण्याचा परमेश्वरी अभिप्राय आहे. याप्रमाणें परमेश्वरानें सृष्टीच्या आरंभीं योजना ज्याअर्थी केली, त्याअर्थी आतांसुद्धां ज्या ज्या देवतेला चरु, पुरोडाश इत्यादि स्वरूपाचा हवि मिळतो, त्या त्या देवतेच्या त्या त्या भागांनीं क्षुधा व तृष्णा यांसही त्यांचे भाग मिळतात. तात्पर्य, वाणीची क्षुधा बोलण्यानें शांत होते, नेत्राची रूपदर्शनानें. याप्रमाणें ज्या ज्या इंद्रियांची जी जी अध्यात्म देवता आहे (व्यष्टिगत इंद्रियाची देवता आहे) किंवा विराट्गत अधिदेवता आहे, त्या त्या देवतेमध्येंच क्षुधा आणि तृषा यांचा प्रवेश होऊन त्या त्या देवतेचा हविर्भाग तिला मिळाला म्हणजे प्रत्येक देवतेची क्षुधा, तृषा तत्तत्कालापुरती शांत होते ॥ ५ ॥

दुसरें खंड संपलें.

तृतीयः खण्डः ॥

मंत्र पहिला.

स ईक्षतेमे नु लोकाश्च लोकपालाश्चान्नमेभ्यः सृजा इति॥१॥

अन्वय व अर्थः—सः ईक्षत 'इमे नु लोकाः च लोकपालाः च; एभ्यः अन्नं सृजै' इति (परमेश्वरानें विचार केला कीं, हे लोकपाल मीं उत्पन्न केले आहेत, आणि त्यांस क्षुधा व तृष्णा यांची उपाधिही लावून दिली आहे.—म्हणून यांच्यासाठीं मला अन्न उत्पन्न केलें पाहिजे) ॥ १ ॥

सः एवमीश्वरः ईक्षत । कथम् ? इमे नु लोकाश्च लोकपालाश्च मया सृष्टाः, अशनायापिपासाभ्यां च संयोजिताः । अतो नैषां स्थितिरन्नमन्तरेण । तस्मात् अन्नम् एभ्यः लोकपालेभ्यः सृजै सृजे इति । एवं हि लोके ईश्वराणामनुग्रहे निग्रहे च स्वातंत्र्यं दृष्टं स्वेषु । तद्वन्महेश्वरस्यापि सर्वेश्वरत्वात्सर्वान्प्रति निग्रहे अनुग्रहे च स्वातन्त्र्यमेव ॥ १ ॥

सिद्धान्ती—याप्रमाणें उत्पत्ति झाल्यावरं परमेश्वरानें विचार केला, तो असा; मीं हे सर्व लोक (भुवनें), व्यष्टि-शरीरें आणि लोकपाल उत्पन्न केले आहेत व क्षुधा आणि तृषा या उपाधीही त्यांच्यामागें लावून दिल्या आहेत. अर्थातच अन्नाशिवाय यांची स्थिति ठीक राहणें शक्य नाहीं. म्हणून यांच्यासाठीं (लोकपालांसाठीं) मी आतां अन्न उत्पन्न करीन.' व्यवहारांतही निग्रहानुग्रह करण्याचें, दंड आणि दया करण्याचें स्वातंत्र्य लोकेश्वरांना, राजांना असतें, हें प्रसिद्धच आहे. सृष्टि उत्पन्न करणारा महेश्वर म्हणजे सर्वांचा ईश्वर आहे, हेंही निर्विवाद आहे. तेव्हां कोणावरही कृपा करणें किंवा कोणालाही शासन करणें याची पूर्ण स्वतंत्रता त्याला असते, हें सांगावयास नको. आपल्या इच्छेप्रमाणें तो दंड किंवा दया करितो. अर्थातच त्यानें लोक आणि लोकपाल यांचा योगक्षेम चालविण्यासाठीं त्यांच्यावर दया केली, यांत कांहीं आश्चर्य नाहीं. लोकपालांनीं विनंति केली म्हणून परमेश्वरानें अन्नसृष्टि म्हणजे भोग्यसृष्टि उत्पन्न केली, असें नाहीं. तर दयाघन परमेश्वरानें 'अन्नाव्यतिरिक्त यांची स्थिति राहणार नाहीं.' असा विचार स्वतंत्र दयास्फूर्तीनें केला आणि ही अन्नसृष्टि आपण होऊन उत्पन्न केली, हें तात्पर्य आहे. ॥ १ ॥

मंत्र दुसरा.

सोऽपोऽभ्यतपत्ताभ्योऽभितप्ताभ्यो मूर्तिरजायत।
या वै सा मूर्तिरजायतान्नं वै तत् ॥ २ ॥

अन्वय व अर्थः—सः अपः अभ्यतपत्; अभितप्ताभ्यः आभ्यः मूर्तिः अजायत; या वै मूर्तिः अजायत, सा तत् अन्नं वै (त्यानें पंचमहाभूतांचा विचार करून संकल्प केला आणि जलादि पंचमहाभूतांचा विचारपूर्वक संकल्प केल्यावर त्या अभितप्त भूतांपासून परमेश्वरानें एक मूर्ति उत्पन्न केली. जी ही मूर्ति उत्पन्न झाली, तेंच तें अन्न होय) ॥ २ ॥

सः ईश्वरः अन्नं सिसृक्षुः ता एव पूर्वोक्ता अपः उद्दिश्य अभ्यतपत् । ताभ्यः अभितप्ताभ्यः उपादानभूताभ्यः मूर्तिः घनरूपं धारणसमर्थं चराचरलक्षणम् अजायत उत्पन्नम् । अन्नं वै तत् मूर्तिरूपं या वै सा मूर्तिरजायत ॥ २ ॥

सिद्धान्ती—वर सांगितल्याप्रमाणें अन्नाच्या उत्पत्तीची इच्छा करणाऱ्या परमेश्वरानें प्रथमखंडांत सांगितलेल्या जलांस (जलप्रधान पंचमहाभूतांस) उद्देशून तपश्चर्या केली. म्हणजे त्यांच्यापासून काय उत्पन्न करावयाचें, त्याचा परमेश्वरानें विचारपूर्वक संकल्प केला, आणि याप्रमाणें उपादान कारण होणाऱ्या जलांपासून (ह्या जलात्मक पंचमहाभूतांपासून) घनरूप (कठिण असणारी) व लोक आणि लोकपाल यांचीं शरीरें नीट ठेवितां येतील, असें सामर्थ्य असणारा पदार्थ म्हणजे मूर्ति उत्पन्न केली. ही मूर्ति चर म्हणजे चेतनायुक्त असणारी व स्थिर म्हणजे स्थावर असणारी (अचेतनरूप) होती.

शिष्य—चराचर म्हणजे ?

सिद्धान्ती—'जीव हा जीवाचें अन्न आहे.' या न्यायानें मूषकादि प्राणी मार्जारांचें भक्ष्य होतील व तंडुलादि अचेतन वस्तु मनुष्यादिकांचें अन्न होतील, अशी व्यवस्था केली. अन्नामध्यें मूषकादिकांसारखे चेतन आणि तंडुलादिकांसारखे अचेतन पदार्थ असतात. तात्पर्य, जे जे म्हणून जीव उत्पन्न केले, त्यांच्या त्यांच्यासाठीं परमेश्वरानें चराचर आणि मूर्तामूर्त वस्तु उत्पन्न केल्या आणि याप्रमाणें जारज, अंडज, स्वेदज, आणि उद्भिज या सर्व प्राण्यांस उपयोगी पडेल, असें अन्न म्हणजे मंत्रांतील मूर्ति उत्पन्न केली. जी ही भोक्तृशरीरधारक मूर्ति तेंच अन्न होय ॥ २ ॥

मंत्र तिसरा.

तदेनदभिसृष्टं पराङत्यजिघांसत्तद्वाचाजिघृक्षत्तन्नाशक्नोद्वाचा ग्रहीतुम्। स यद्वैनद्वाचाग्रहैष्यदभिव्याहृत्य हैवान्नमत्रप्स्यत् ॥ ३ ॥

अन्वय व अर्थः—तत् अभिसृष्टं एनत् पराङ् अत्यजिघांसत् (तें हें उत्पन्न झालेलें अन्न–प्राण्यापासून–पलीकडे, दूर दूर पळून जाण्याची इच्छा करूं लागलें) तत् वाचा अजिघृक्षत् (तेव्हां प्राण्यांनीं आपल्या वाणीनें तें अन्न ग्रहण करण्याचा प्रयत्न केला) वाचा तत् ग्रहीतुं न अशक्नोत् (पण ते प्राण्याला वाणीच्या योगानें घेतां येईना) यत् ह एनत् वाचा सः अग्रहैष्यत्, अभिव्याहृत्य ह एव अन्नं अत्रप्स्यत् (जर हें अन्न, प्राणी वाणीच्या योगानें घेण्यास समर्थ झाले असते, तर केवळ हें अन्न आहे, असें म्हणण्यानें मात्र त्या अन्नानें प्राण्यांची तृप्ति केली असती) ॥ ३ ॥

मंत्र चौथा.

तत्प्राणेनाजिघृक्षत्तन्नाशक्नोत्प्राणेन ग्रहीतुम्।
स यद्वैनत्प्राणेनाग्रहैष्यदभिप्राण्य हैवान्नमत्रप्स्यत् ॥ ४ ॥

अन्वय व अर्थः—तत् प्राणेन अजिघृक्षत्; तत् प्राणेन् ग्रहीतुं न अशक्नोत्, यत् ह एनत् प्राणेन सः अग्रहैष्यत्, अभिप्राण्य ह एव अन्नं अत्रप्स्यत् (त्यानें प्राणाच्या साहाय्यानें अन्न घेण्याचा प्रयत्न केला, पण तो सिद्धीला गेला नाहीं. प्राणाच्या साहाय्यानें जर त्याला अन्न घेतां आलें असतें तर 'हा प्राण आहे' असें जाणून श्वासोच्छ्वासानें मात्र त्या प्राण्याची तृप्ति झाली असती) ॥ ४ ॥

मंत्र पांचवा.

तच्चक्षुषाजिघृक्षत्तन्नाशक्नोच्चक्षुषा ग्रहीतुम् । स यद्धैनच्चक्षुषाग्रहैष्यदृष्ट्वा हैवान्नमत्रप्स्यत् ॥ ५ ॥

अन्वय व अर्थः—तत् चक्षुषा अजिघृक्षत्; तत् चक्षुषा ग्रहीतुं न अशक्नोत्; यत् ह एनत् चक्षुषा सः अग्रहैष्यत्, दृष्ट्वा ह एव अन्नं अत्रप्स्यत् (त्यानें चक्षूच्या साहाय्यानें अन्न घेण्याची इच्छा केली, पण ती सफल झाली नाहीं. जर त्याला चक्षूच्या साहाय्यानें अन्न ग्रहण करतां आलें असतें, तर 'अन्न पाहून मात्र' त्याची तृप्ति झाली असती)॥५॥

मंत्र सहावा.

तच्छ्रोत्रेणाजिघृक्षत्तन्नाशक्नोच्छ्रोत्रेण ग्रहीतुम् । स यद्धैनच्छ्रोत्रेणाग्रहैष्यच्छ्रुत्वा हैवान्नमत्रप्स्यत् ॥६॥

अन्वय व अर्थः—तत् श्रोत्रेण अजिघृक्षत्; तत् श्रोत्रेण ग्रहीतुं न अशक्नोत्; यत् ह एनत् श्रोत्रेण सः अग्रहैष्यत, अन्नं श्रुत्वा ह एव अत्रप्स्यत् (त्यानें कर्ण–साहाय्यानें अन्न घेण्याचा व्यर्थ प्रयत्न केला. जर तो सिद्धीला गेलाच असता, तर अन्नाचें 'श्रवण' होऊन मात्र त्याची तृप्ति झाली असती) ॥ ६ ॥

मंत्र सातवा.

तत्त्वचाजिघृक्षत्तन्नाशक्नोत्त्वचा ग्रहीतुम् । स यद्धैनत्त्वचाग्रहैष्यत्स्पृष्ट्वा हैवान्नमत्रप्स्यत् ॥ ७ ॥

अन्वय व अर्थः—तत् त्वचा अजिघृक्षत्; तत् त्वचा ग्रहीतुं न अशक्नोत्; यत् ह एनत् त्वचा सः अग्रहैष्यत्, अन्नं स्पृष्ट्वा ह एव अत्रप्स्यत् (त्यानें त्वचेच्या योगानें अन्न–ग्रहणाचा विफल प्रयत्न केला. जर तो फलप्रद झालाच असता, तर 'अन्न–स्पर्श' करून मात्र त्याची तृप्ति झाली असती)

मंत्र आठवा.

तन्मनसाजिघृक्षत्तन्नाशक्नोन्मनसा ग्रहीतुम्। स यद्धैनन्मनसाग्रहैष्यद्ध्यात्वा हैवान्नमत्रप्स्यत् ॥ ८ ॥

अन्वय व अर्थः—तत् मनसा अजिघृक्षत्; तत् मनसा ग्रहीतुं न अशक्नोत्; यत् ह एनत् मनसा सः अग्रहैष्यत्, अन्नं ध्यात्वा एव ह अत्रप्स्यत् (त्यानें मनानें अन्न–ग्रहणाचा अयशस्वी प्रयत्न केला. तो प्रयत्न यशस्वी झाला असता, तर ' अन्नचिंतनानें ' मात्र त्याची तृप्ति झाली असती) ॥ ८ ॥

मंत्र नववा.

तच्छिश्नेनाजिघृक्षत्तन्नाशक्नोच्छिश्नेन ग्रहीतुम्। स यद्धैनच्छिश्नेनाग्रहैष्यद्विसृज्य हैवान्नमत्रप्स्यत् ॥९॥

अन्वय व अर्थः—तत् शिश्नेन अजिघृक्षत्; तत् शिश्नेन ग्रहीतुं न अशक्नोत्; यत् ह एनत् शिश्नेन सः अग्रहैष्यत्, अन्नं विसृज्य एव ह अत्रप्स्यत् (त्यानें अन्नग्रहण करण्याचा शिश्न–साहाय्यानें व्यर्थ प्रयत्न केला. जर ह्या रीतीनें त्याला अन्न ग्रहण करतां आलें असतें, तर अन्नाचें विसर्जन करूनही त्याची क्षुधा–शांति झाली असती) ॥ ९ ॥

मंत्र दहावा.

तदपानेनाजिघृक्षत्तदावयत् । सैषोऽन्नस्य ग्रहो यद्वायुरन्नायुर्वा एष यद्वायुः ॥ १० ॥

अन्वय व अर्थः—तत् अपानेन अजिघृक्षत्; तत् आवयत् (अपान वायूनें अन्नग्रहणाचा त्यानें संकल्पपूर्वक प्रयत्न केला व तो सिद्धीलाही गेला) यत् वायुः सः एषः अन्नस्य ग्रहः; यत् एषः वायुः वै अन्नायुः (जो हा अपान वायु आहे, तो मात्र अन्नाचा ग्राहक आहे. हा जो वायु आहे, तो प्रत्यक्ष अन्नाच्या योगानें मात्र जिवंत राहणारा आहे. याला अन्नायु म्हणावें) ॥ १० ॥

तदेनत् अन्नं लोकलोकपालान्नाद्यार्थ्याभिमुखे सृष्टं सत्, यथा मषकादिर्मार्जारादिगोचरे सन्, मम मृत्युरन्नाद इति मत्वा पराग्भवतीति पराङ् पराक्सत् अतन् अतीत्य अजिघांसत् अतिगन्तुमैच्छत् पलायितुं प्रारभतेत्यर्थः। तमन्नाभिप्रायं मत्वा स लोकलोकपालसंघातकार्यकरणलक्षणः पिण्डः प्रथमजत्वादन्यांश्चान्नादानपश्यन्, तत् अन्नं वाचा वदन-व्यापारेण अजिघृक्षत् ग्रहीतुमैच्छत्। तत् अन्नं नाशक्नोत् न समर्थोऽभवत् वाचा वदनक्रियया ग्रहीतुम् उपादातुम्। सः प्रथमजः शरीरी यत् यदि ह एतत् वाचा अग्रहैष्यत् गृहीतवान्स्यात् अन्नम्, सर्वोऽपि लोकः तत्कार्यभूतत्वात् अभिव्याहृत्य हैव अन्नम् अत्रप्स्यत् तृप्तोऽभविष्यत्। न चैतदस्ति। अतो नाशक्नोद्वाचा ग्रहीतुमित्यवगच्छामः पूर्वजोऽपि। समानमुत्तरम्। तत्प्राणेन तच्चक्षुषा तच्छ्रोत्रेण तत्त्वचा तन्मनसा ताच्छिश्नेन तेन तेन करणव्यापारेण अन्नं ग्रहीतुमशक्नुवन्पश्चात् अपानेन वायुना मुखच्छिद्रेण तत् अन्नम् अजिघृक्षत्, तदावयत् तदन्नमेवं जग्राह अशितवान्। तेन स एषः अपानवायुः अन्नस्य ग्रहः अन्नग्राहक इत्येतत्। यद्वायुः यो वायुरन्नायुः अन्नबन्धनोऽन्नजीवनो वै प्रसिद्धः स एष यो वायुः ॥ ३ ते १० ॥

सिद्धान्ती—या प्रमाणें लोक आणि लोकपाल यांकरितां तें हें प्रत्यक्ष असलेलें अन्न परमेश्वरानें उत्पन्न केलें व त्यांच्यासमोर ठेविलें. पण मार्जारादि जवळ आले असतां 'आपला मृत्यु आला' असें समजून आपला भक्षक जवळ आहे, असें पाहून, मूषकादि पळून जाण्याचा प्रयत्न करितात, आपल्या भक्षकांची दृष्टि चुकवून पळीकडे जातात; त्याप्रमाणें हें उत्पन्न झालेलें अन्नही लोक-लोकपालांपासून एकीकडे जाण्याचा प्रयत्न करूं लागलें, तात्पर्य पळूं लागलें. हा अन्नाचा अभिप्राय जाणल्यानंतर तो लोक-लोकपालांचा संघात, तो विराट्पुरुष—

शिष्य—याला परमेश्वरानें उत्पन्न केले म्हणून हा **कार्यरूपी** आहे, आणि सर्व चराचरांची उत्पत्ति याच्यापासूनच होणार म्हणून विराट्पुरुष **कारणरूपी आहे. बरे!**

सिद्धान्ती—होय. तसेंच पूर्वसंचित कर्माचें हा विराट् कार्य असतो व पुढें येणाऱ्या जन्मांचें कारण होणारें कर्म या जन्मीं करितो, म्हणून कारणही होतो, असाही अर्थ समजून घ्यावा. असो; हा पिंडरूपीं विराट्-पुरुष सर्वांच्या आधीं उत्पन्न झाला, हें आपण पाठीमागें समजून घेतलें आहे. या विराट्-पुरुषानें पाहिलें का, उत्पन्न झालेलें

अन्न पिंडाबाहेर आहे, पिंडाच्या आंत नाहीं. तथापि तें अन्न आपल्यास मिळावें आणि आपली क्षुधाशांति व्हावी, अशी त्याला तीव्र इछा होती, पण हा पहिल्यांदाच उत्पन्न झालेला. याला पूर्वजन्मीचा किंवा आनुवंशिक संस्कार प्रकटित नव्हता; म्हणून या जन्मांत अन्नग्रहण कोणत्या मार्गानें करावें, हें त्याला ठाऊकच नव्हतें. तेव्हां दुसऱ्या कशानेंही अन्न ग्रहण करितां येणार नाहीं, असें व व्यष्टीस अन्न ग्रहण करण्याचें ठाऊकच नाहीं, असें कल्पून त्यानें वाणीच्या व्यापारानें, बोलण्यानें, शब्दानें, अन्न-ग्रहण करण्याचा संकल्प केला. हा प्रयत्न अर्थातच सिद्धीला गेला नाहीं. म्हणजे वाणीच्या योगानें, वदन-व्यापारानें, शब्दोच्चारानें त्याला अन्नग्रहणाचें समार्थ्य आलें नाहीं. आतां, विराट्पुरुष म्हणजे प्रथम उत्पन्न झालेला देही होय. त्याला जर वाणीनेंच अन्न-ग्रहण करण्याचें साधन प्राप्त झालें असतें, त्याची वाणी जर अन्न ग्रहणास समर्थ असती, तर त्याच्यापासूनच उत्पन्न होणारे आपणा सर्व जीवांस 'अन्न अन्न' असा शब्द उच्चारून मात्र-सर्व जीवांस-क्षुधाशांति करून घेतां आली असती.

शिष्य—तात्पर्य वाणीचें कर्म बोलण्याचें मात्र आहे, केवळ बोलण्याच्या व्यापारानेंच अन्नग्रहण झालें असतें, तर 'अन्न अन्न' असे शब्द उच्चारून ही जीवांची क्षुधा शांत झाली असती.

सिद्धान्ती—पण तसें तर होत नाहीं, केवळ 'अन्न' शब्दाच्या उच्चारानें तृप्ति होत नाहीं. यावरून असें स्पष्ट अनुमान निघतें कीं, आपला पूर्वज जो विराट्-पुरुष त्याला शुद्धां वाणीनें अन्न ग्रहण करितां आलें नाहीं.

शिष्य—पुढच्याही सर्व मंत्रांचा अर्थ असाच असला पाहिजे!

सिद्धान्ती—होय. नवव्या मंत्रापर्यंत असाच अर्थ करावयाचा. म्हणजे प्राण, नेत्र, कर्ण, त्वचा, मन, शिश्न ह्यांपैकीं कोणत्याही ज्ञानेंद्रियाला किंवा कर्मेंद्रियाला आपल्या करण-सामर्थ्यानें अन्न घेतां आलें नाहीं. शेवटीं आंत ओढण्याची शक्ति असणारा अपान-वायु मात्र अन्न ग्रहण करण्यास समर्थ झाला. मुखरूपीं जें छिद्र आहे, त्याच्या द्वारानें अपानवायूला अन्न ग्रहण करितां येऊन विराट्-पुरुषाची क्षुधाशांति झाली. सारांश, या प्रमाणें विराट्-पुरुषाला अन्न ग्रहण करितां आलें. तसेंच जल-ग्रहणही करतां आलें. आणि त्याची क्षुधा व तृषा शांत झाल्या. यावरून तुला स्पष्ट दिसेल कीं, अपानवायु हाच अन्नाचा ग्राहक आहे. जो हा अपानवायु आहे, त्याला अन्नायु म्हणतात. अन्नानें मात्र जिवंत राहणारा, अन्न हेंच ज्याचें बंधन, आश्रय, आहे, असा हा प्रसिद्ध वायु होय. अन्न असेल तर मात्र हा वायु जिवंत राहील आणि वाणी, नेत्र, कर्ण इत्यादि सर्वांस जिवंत ठेवील.

शिष्य—सारांश, परमेश्वरानें उत्पन्न केलेलें अन्न अपानवायुद्वारा विराट्-पुरुषानें ग्रहण केलें, असें, आपण जीव त्याच मार्गानें अन्नग्रहण करितों, यावरून स्पष्ट दिसतें.

सिद्धांती—होय. पुनः असेंही समजून घेतलें पाहिजे कीं, अन्नादन हा अपश्वस-नामा जो अपानवायु, त्याचा धर्म आहे, आत्म्याचा नव्हे. अशनादिकापासून आत्मा स्वरूपतः अलिप्त आहे. अन्नपाण्यानें अपानाची तृप्ति होऊन इतरांचें रक्षण होतें व शब्दस्पर्शादिकांनीं इतर इंद्रियांची व तद्देवतांची तृप्ति होते हें ठीक आहे. पण यांपैकीं कशाचाही म्हणजे अन्नादिकांचा व रूपस्पर्शादिचा आत्म्याशीं संबंध नाहीं, हें जाणून घेणें अगत्याचें आहे. समजलें? ॥ ३ ते १० ॥

मंत्र अकरावा.

स ईक्षत कथं न्विदं मदृते स्यादिति, स ईक्षत कतरेण प्रपद्या इति, स ईक्षत यदि वाचाभिव्याहृतं, यदि प्राणेनाभिप्राणितं यदि चक्षुषा दृष्टं, यदि श्रोत्रेण श्रुतं, यदि त्वचा स्पृष्टं, यदि मनसा ध्यातं, यद्यपानेनाभ्यपानितं, यदि शिश्नेन विसृष्टमथ कोऽहमिति ॥ ११ ॥

अन्वय व अर्थः—सः ईक्षत 'कथं नु इदं मदृते स्यात्' इति (परमेश्वरानें पुनः पाहिलें कीं, माझ्याशिवाय या सर्वांची व्यवस्था कशी ठीक चालेल? चालणार नाहीं) सः ईक्षत 'कतरेण प्रपद्यै' इति (त्यानें प्रश्नपूर्वक विचार केला कीं, कोणत्या द्वारानें ह्या समष्टि—पिंडांत व व्यष्टि—पिंडांत शिरावें) सः ईक्षत् 'यदि वाचा अभिव्याहृतं, यदि प्राणेन अभिप्राणितं, यदि चक्षुषा दृष्टं, यदि श्रोत्रेण श्रुतं, यदि त्वचा स्पृष्टं, यदि मनसा ध्यातं, यदि अपानेन अभ्यपानितं, यदि शिश्नेन विसृष्टं, अथ कः अहं इति (त्यानें विचार केला कीं, जर वाणी बोलली, प्राणानें श्वासोच्छ्वास केला, नेत्रानें पाहिलें, कानानें ऐकलें, त्वचेनें स्पर्श केला, मनानें चिंतिलें, अपानानें अभिपान केलें, किंवा शिश्नानें विसर्जन केलें, तथापि, मी कोण आहें?' याचें ज्ञान होणार नाहीं.)—म्हणून कोणत्या मार्गानें आंत शिरलें असतां स्वरूपाचें ज्ञान होईल, यासंबंधानें परमेश्वरानें विचार केला) ॥११॥

सः एवं लोकलोकपालसंघातस्थितिम् अन्ननिमित्तां कृत्वा पुरपौरतत्पालयितृस्थितिसमां स्वामीव ईक्षत—कथं नु केन प्रकारेण नु इति वितर्कयन्, इदं मत् ऋते मामन्तरेण पुरस्वामिनम्; यदिदं कार्यकरणसंघातकार्यं वक्ष्यमाणं कथं नु खलु मामन्तरेण स्यात् परार्थं सत् । यदि वाचाभिव्याहृतमित्यादि केवलमेव वाग्व्यहरणादि, तन्निरर्थकं न कथंचन भवेत् बलिस्तुत्यादिवत् । पौरबन्धादिभिः प्रयुज्यमानं स्वाम्यर्थं सत्स्वामिनमन्तरेण असत्येव स्वामिनि, तद्वत् । तस्मान्मया परेण स्वामिना अधिष्ठात्रा कृताकृतफलसाक्षिभूतेन भोक्त्रा भवितव्यं पुरस्येव राज्ञा । यदि नामैतत्संहतकार्यस्य परार्थत्वम्, मां चेतनं त्रातारमन्तरेण भवेत्, पुरपौरकार्यमिव तत्स्वामिनम् । अथ कोऽहं किंस्वरूपः कस्य वा स्वामी ? यद्यहं कार्यकरणसंघातमनुप्रविश्य वागाद्यभिव्याहृतादिफलं नोपलभेय राजेव पुरमाविश्याधिकृतपुरुषकृताकृतादिलक्षणम् न कश्चिन्माम् अयं सन् एवंरूपश्च इत्यधिगच्छेद्विचारयेत् । विपर्यये तु, योऽयं वागाद्यभिव्याहृतादीदमिति वेद स सन् वेदनरूपश्च इत्यधिगन्तव्योऽहं स्याम्, यदर्थमिदं संहतानां वागादीनामभिव्याहृतादि । यथा स्तंभकुड्यादीनां प्रासादादिसंहतानां स्वावयवैरसंहतपरार्थत्वम्, तद्वदिति । एवमीक्षित्वा अतः कतरेण प्रपद्या इति । प्रपदं च मूर्धा च अस्य संघातस्य प्रवेशमार्गौ; अनयोः कतरेण मार्गेणेदं कार्यकरणसंघातलक्षणं पुरं प्रपद्ये प्रपद्ये इति ॥११॥

शिष्य—या प्रमाणें भोगविषयात्मक असणारें भोग्य अन्न, उपभोगाचीं इंद्रियें, व त्यांच्या देवता, उपभोगास अवश्य असणारें शरीर, त्याचप्रमाणें क्षुधा आणि तृषा ह्या कर्म—प्रेरक, इत्यादिकांची म्हणजे संसारामध्यें पडणाऱ्या अन्न-पुष्ट व्यष्टिसमष्टि सृष्टीची व्यवस्था झाली. पण येथें सामग्री तर सर्व झाली आणि या सामग्रीचा उपयोग करणाऱ्याचा उल्लेख तर झाला नाहीं. हें कसें ?

सिद्धान्ती—यासाठींच आतांच्या ह्या मंत्राची योजना आहे. मागें सांगितल्याप्रमाणें लोक आणि लोकपाल यांच्या संघाताची म्हणजे विराट्-पुरुषाची व्यष्टि-पिंडाची स्थिति अन्ननिमित्त करून, अन्न मिळालें तरच,-ह्या ब्रह्मांड पिंडाची वा व्यष्टिपिंडाची व्यवस्था ठीक चालेल, अशी योजना करून मग परमेश्वर मोक्त्यासंबंधानें विचार करूं लागला.

शिष्य—खरेंच आहे. एखादें नगर निर्माण करावें, त्या नगराची निरनिराळीं कार्यें करण्यासाठीं निरनिराळ्या अधिकाऱ्यांची योजना करावी, असा संकल्प करून ज्या

प्रमाणें नगरपति, 'त्या नगरींत राहणार कोण, कोणासाठी हा सर्व कारभार करावयाचा' असा विचार करितो, त्या प्रमाणेंच हा परमेश्वरी विचार म्हणावयाचा। असो, पण परमेश्वरानें कोणत्याप्रकारचा विचार केला बरें?

सिद्धान्ती—नगरस्वामीशिवाय, हें नगर, आणि येथील अधिकारी यांचा कांहींएक उपयोग असत नाहीं. राजा व प्रजाच नसतील, तर केवळ नगराचा आणि राजाप्रजासाठीं मात्र काम करणाऱ्या अधिकारी वर्गाचा काय उपयोग आहे? असा राजा विचार करितो, त्या प्रमाणेंच परमेश्वराची विचार-परंपरा होती. अस्मितेची जाणीव असणाऱ्या चैतन्याशिवाय हा शरीरेंद्रियरूपी कार्यकारण-संघात व्यर्थ होणार. शरीरादि सर्व कार्यरूप, जड आणि चैतन्यासाठीं मात्र काम करणारीं आहेत. जर चैतन्य नसेल, तर या सर्व सामग्रीचा कांहीं उपयोग नाहीं. पहाः जरी वाणीप्रभृतींनीं भाषणादि व्यापार केले, तरी ते सर्व भाषणादि व्यवहार ज्याच्यासाठीं-हे व्यवहार-करावयाचे, त्याशिवाय वस्तुतः निरर्थक होणार। कोणासाठीं हा सर्व व्यवहार करावयाचा हें ठरलें नसेल, तर भाषणादि सर्व व्यवहार निरर्थक होतात. व चैतन्याशिवाय ते ते व्यवहार व्हावयाचेही नाहींत. स्तुति करण्यास किंवा करभार देण्यास योग्य असा राजा नसेल तर भाटांचे सर्व पोवाडे किंवा मंत्र्यांचे सर्व कारभार व्यर्थ होतात, त्याप्रमाणेंच शरीराची ही स्थिति होते. भाट किंवा नागरिक इत्यादि भृत्य जीं जीं कामें करितात, तीं तीं सर्व स्वामीसाठीं म्हणजे राजासाठीं असतात. राजाच जर नाहीं, तर हीं सर्व कर्में निरर्थक होतात. शिवाय, हीं होताल कशीं व कशाला? व्हावयाचींच नाहींत. त्याचप्रमाणें विराट्-पुरुषाचें अथवा व्यक्तीचें शरीर काय? किंवा इंद्रियें काय? त्या सर्वांना जर चालक कोणी नसेल किंवा त्यांच्या कर्माचा उपभोग घेणारा कोणी नसेल, तर त्यांचीं सर्वहीं कर्में व्यर्थ होतील. भोगेंद्रियें आणि भोगायतन (शरीर) हीं स्वतंत्र नाहींत. हीं कार्यें आहेत. याचें सर्व कर्म परार्थासाठीं, दुसऱ्यासाठीं, यजमानाप्रीत्यर्थ, असतें. हीं स्वतः अचेतन असल्यामुळें यांचे सर्व कारभार चैतन्याप्रीत्यर्थ व्हावयाचे असतात. चैतन्यच नसेल, ज्याच्यासाठीं हे सर्व कारभार करावयाचे, त्याचाच ठाव-ठिकाणा नसेल, तर आतांपर्यंत उत्पन्न झालेली सृष्टि निरर्थक होणार. म्हणून या सर्वांहून विलक्षण, परंतु यांचा स्वामी असणारा, यांचा चालक, यांचें आश्रयस्थान जो मी, त्यानें कृताकृताच्या (पुण्यपापादिकांच्या) फलाचा साक्षी मात्र होऊन, अशारीतीनें मात्र भोक्ता होऊन, अवतीर्ण झालें पाहिजे, नगरीचा जसा नगरपति तसाच या विराट्-पिंडाचा व व्यष्टिपिंडाचा पति मला झालें पाहिजे, कारण, हा जो शरीरसंघात मी उत्पन्न केला आहे, त्याला स्वतःचा कांहीं अर्थ नसल्यामुळें तो सर्वथा दुसऱ्याकरितांच काय तें कार्य करणारा आहे, म्हणून त्यांचें परार्थत्व चैतन्यरूपी जो मी, त्याशिवाय सिद्ध व्हावयाचें नाहीं. राजाशिवाय राजकार्य नाहीं. किंवा राजकार्यधुरंधराचेंही कार्य नाहीं. त्याप्रमाणेंच माझ्याशिवाय या सृष्टींचें वाग्व्यापारादि व माझें आत्मबोधादि,

इष्ट कार्य होणार नाहीं. हा कार्यकारणाचा संघात असणारा जो हा विराट्-देह व व्यष्टिदेह त्यामध्यें प्रवेश करून व वाणीप्रभृति इंद्रियांचें भाषणादि फल उत्पन्न करून जर मी मिळविलें नाहीं, तर या शरीरेंद्रियांपैकीं कोणीही 'आत्मा आहे, हा अमुक आहे, अमक्या स्वरूपाचा आहे' असा विचार करणार नाहीं. आपल्या आज्ञेप्रमाणें कार्या-कार्य होऊन उत्पन्न झालेल्या नगरींत प्रवेश करून तेथें नेमलेल्या अधिकाऱ्यांनीं कार्य केलें किंवा नाहीं, याची जर परीक्षा करणारा राजा नसेल, तर राजा म्हणजे काय? किंवा त्याचें स्वरूप कसें असतें, याचा नगर व नगराधिकाऱ्यांपैकीं कोणीं विचारच करणार नाहीं.

शिष्य—तात्पर्य, 'मी आहें,' 'माझें स्वरूप काय,' 'मी कोणाचा स्वामी आहे? असा स्वस्वरूपविषयक विचार कोणीही करणार नाहीं.

सिद्धान्ती—कारण, चैतन्याशिवाय त्यांस तसा विचार करितां येणारच नाहीं. जडच ते! 'पण मी या विराटादि देहांत प्रवेश केला आणि वाणीप्रभृति इंद्रियांचे भाषणादि व्यवहार हें सर्व ज्ञेय आहे, असें समजून घेतलें, म्हणजे 'मी स्वतः वेदनरूप आहें, मी ज्ञानरूप आह.' असें ज्ञान मला व जीवांना प्राप्त होईल. तात्पर्य, माझें स्वरूप मला समजेल. तसेंच, केवळ माझ्यासाठींच संहत झालेल्या वाणीप्रमुख-इंद्रियांचे सर्व व्यवहार मत्प्रीत्यर्थ आहेत, असेंही समजेल. म्हणजे ज्याच्यासाठीं वाणीप्रमुख इंद्रियें भाषणादि व्यवहार करितात, तो ज्ञानरूप आत्मा, या वाणीप्रमुख-इंद्रियांहून व शरीराहून निराळा आहे, असेंही ज्ञान मला होईल.

शिष्य—एखाद्या मंदिराचे खांब किंवा त्याच्या भिंती प्रासादापासून निराळ्या असतात. प्रासादाकरितां मात्र त्यांचें अस्तित्व असतें. म्हणजे आपल्याशीं एकजीव न झालेला जो प्रासाद त्याच्यासाठीं मात्र जसे खांब आणि भिंती अस्तित्वांत असतात, त्याप्रमाणें आपल्या अवयवांशीं कोणत्याही रीतीनें एकरूप न झालेला जो जीव त्याच्यासाठीं मात्र वाक्प्रभृति-इंद्रियांचे व शरीराचे अस्तित्व असतें. ज्ञानरूप जीव सर्वांहून निराळा आहे आणि इंद्रियादि सर्व उपकरणें जीवासाठीं मात्र कर्म करीत असतात.

सिद्धान्ती—असो; याप्रमाणें विचार-परंपरेनें संकल्प करून परमेश्वरानें आपल्या स्वतःस प्रश्न केला कीं, आतां कोणत्या द्वारानें या विराटादि देहांत प्रवेश करावा?

शिष्य—शरीररूपी नगरींत प्रवेश करण्याला दोन मार्ग. एक पायांकडून व एक डोक्याकडून.

सिद्धान्ती—होय. आतां चरणाच्या अंगुष्ठांतून प्रवेश करावा किंवा या संघाताच्या शिराकडून या कार्य-कारण-संघात असणाऱ्या विराटादि देहामध्यें प्रवेश करावा,

असा त्यानें आपल्या स्वतःला प्रश्न केला. विराटादिदेहांचा संघात कसा आहे, हें तुला सांगितलेंच आहे. तात्पर्य, इंद्रियांचें होणारें भाषण, प्राणन, दर्शन, इत्यादि सर्व व्यवहाराला सार्थ करण्यासाठीं आपण कोणत्यातरी द्वारानें आंत प्रवेश केला पाहिजे, असा परमेश्वरानें निश्चय केला ॥ ११ ॥

मंत्र बारावा.

स एतमेव सीमानं विदार्यैतया द्वारा प्रापद्यत । सैषा विदृतिर्नाम द्वास्तदेतन्नान्दनम् । तस्य त्रय आवसथास्त्रयः स्वप्ना अयमावसथोऽयमावसथोऽयमावसथ इति ॥ १२ ॥

अन्वय व अर्थः—सः एतम् एव सीमानं विदार्य एतया द्वारा प्रापद्यत (तो ह्याच शिवणीचें विदारण करून त्या द्वारानें आंत प्रवेश करिता झाला) **सा एषा विदृतिः नाम द्वाः** (ती ही 'विदृति' नांवाचें द्वार आहे) **तत् एतत् नान्दनम्** (तें हें आनंदाचें स्थान आहे) **तस्य त्रयाः आवसथाः; त्रयः स्वप्नाः** (त्याचीं तीन वसतिस्थानें आहेत, तीन स्वप्नस्थानें आहेत) **अयं आवसथः, अयं आवसथः, अयं आवसथः इति** (हें—पहिलें—स्थान, हें—दुसरें—स्थान आणि हें—तिसरें—स्थान होय) ॥ १२ ॥

एवमीक्षित्वा न तावन्मद्भृत्यस्य प्राणस्य मम सर्वाधिकृतस्य प्रवेशमार्गेण प्रपदाभ्यामधः प्रपद्ये । किं तर्हि, पारिशेष्यादस्य मूर्धानं विदार्य प्रपद्ये इति लोक इव ईक्षितकारी य स्रष्टेश्वरः स एतमेव मूर्धसीमानं केशविभागावसानं विदार्य च्छिद्रं कृत्वा एतया द्वारा मार्गेण इमं कार्यकारणसघातं प्रापद्यत प्राविवेश । सेयं हि प्रसिद्धा द्वाः मूर्ध्नि तैलादिधारणकाले अन्तस्तद्रसादिसंवेदनात् । सैषा विदृतिः विदारितत्वाद्विदृतिर्नाम प्रसिद्धा द्वाः । इतराणि तु श्रोत्रादिद्वाराणि भृत्यादिस्थानीयसाधारणमार्गत्वान्न समृद्धीनि नानन्दहेतूनि । इदं तु द्वारं परमेश्वरस्यैव केवलस्येति । तदेतत् नान्दनं नन्दनमेव । नान्दनमिति दैर्घ्यं छान्दसम् । नन्द-

स्यनेन द्वारेण गत्वा परस्मिन्ब्रह्मणीति । तस्यैवं सृष्ट्वा प्रविष्टस्यानेन जीवेनात्मना राज्ञ इव पुरम्, त्रय आवसथाः—जागरितकाले इन्द्रियस्थानं दक्षिणं चक्षुः, स्वप्नकाले अन्तर्मनः, सुषुप्तिकाले हृदयाकाश इत्येते; वक्ष्यमाणा वा त्रय आवसथाः—पितृशरीरं मातृगर्भाशयः, स्वं च शरीरमिति । त्रयः स्वप्ना जाग्रत्स्वप्नसुषुप्त्याख्याः । ननु जागरितं प्रबोधरूपत्वान्न स्वप्नः । नैवम्; स्वप्न एव । कथम्? परमार्थस्वात्मप्रबोधाभावात् स्वप्नवदसद्वस्तुदर्शनाच्च । अयमेव आवसथश्चक्षुर्दक्षिणं प्रथमः । मनोऽन्तरं द्वितीयः । हृदयाकाशस्तृतीयः । अयमावसथः इत्युक्तानुकीर्तनमेव । तेषु ह्ययमावसथेषु पर्यायेणात्मभावेन वर्तमानोऽविद्यया दीर्घकालं गाढं प्रसुप्तः स्वाभाविक्या न प्रबुध्यतेऽनेकशतसहस्रानर्थसंनिपातजदुःखमुद्ररा‌भिघातानुभवैरपि ॥ १२ ॥

सिद्धान्ती—मीं आतां सांगितला व पुढें सांगणार आहें, त्याप्रमाणें परमेश्वरानें विचार केला. माझा 'सर्वाधिकारी' भृत्य (सेवक) जो प्राण तो ज्या द्वारानें प्रवेश करितो, त्या पायाखालीं असणाऱ्या मार्गानें, मला, सर्व अर्थांविषयीं प्राणाला सामर्थ्य देण्याचा अधिकार असणाऱ्या मला, प्रवेश करणें योग्य नाहीं. प्राण ज्या मार्गानें जातो, त्या मार्गानें मी जाणारच नाहीं; तर मग त्याचे प्रवेशमार्ग एकीकडे टाकून देऊन मीं परमेश्वरानें या पिंड–मस्तकाचें विदारण करून आंत शिरण्याचें कार्य करावें, हेंच योग्य आहे.' दोहोंपैकीं पहिला मार्ग प्रवेशास अयोग्य, म्हणून राहिलेल्या दुसऱ्या मार्गानें परमेश्वरी प्रवेश होण्याचा संकल्प झाला. परमेश्वरानें केलेला जो विचार मी सांगणार होतों, तो हाच होय.

शिष्य—खरेंच आहे. आपल्या सेवकांसाठीं तयार केलेल्या मार्गानें कोणताही राजा आपल्या मंदिरांत प्रवेश करीत नाहीं. त्याप्रमाणेंच परमात्म्यानें विचार केला म्हणावयाचा?

सिद्धांती—होय. नंतर तो सर्व जगतांचा स्रष्टा काय करिता झाला? तर शरीराच्या मस्तकांत असलेली ही शिवण विदारिता झाला आणि याप्रमाणें छिद्र करून त्या द्वारानें ह्या कार्य–कारण–संघातात्मक लोकांमध्यें (जीव–पिंडामध्यें व विराट्–पिंडामध्यें) प्रवेश करिता झाला. ही मस्तकाची शिवण स्त्रिया वेणीच्या भांगानें दाखवीत असतात. शिवाय कोणाच्याही मस्तकावरील कांहीं केंस डावीकडे व कांहीं उजवीकडे ताड करून वाढत असतात. जेथें हा डावा उजवा फरक होतो, तेथेंच ही शिवण आहे. हें द्वार प्रसिद्धच आहे. सर्व लोकांस तें ठाऊक असतें. मस्तकावर तेल वगैरे ओतितात, टाळूंत तेल भरितात, तेव्हां त्या तैलादिकांच्या रसाचें ज्ञान ह्या

द्वारानें तात्काल होतें. म्हणून हें ज्ञानप्रवेशक द्वार होय, असें सर्व-प्रसिद्ध आहे. विदारण करून हें द्वार निर्माण केलें, म्हणून याला 'विदृति' असें सर्वविश्रुत नाम देत असतात. इतर जीं कर्णादि द्वारें आहेत, त्यांचा उपयोग प्राणादि सर्व सेवक करितात, म्हणून ते मार्ग विशेष आनंददायक होत नाहींत व तीं द्वारें आनंदानें भरलेलींही नसतात. 'विदृति' हें द्वार सर्वस्वामी जो परमेश्वर त्याच्या मात्र प्रवेशाच्या उपयोगीं पडतें. आनंद देणारें हें द्वार आहे, म्हणून त्याला नंदन असें म्हणतात.

शिष्य—मंत्रांत नांदन हा शब्द आहे; पण हा आर्षकालीन शब्द असावा. असो; या आनंद देणाऱ्या द्वारानें परमेश्वरानें प्रवेश केला.

सिद्धान्ती—शिवाय, या ब्रह्मरंध्राच्या द्वारानें जर ज्ञानी जीवानें प्रकृत देह सोडून ह्या लोकांतून मार्गक्रमण केलें, तर तो आनंदरूप परब्रह्मामध्यें प्रवेश करितो, असें आत्मैक्यबोधक श्रुति-वाक्यानें समजतें. याप्रमाणें आपण आपणच समष्टीची व व्यष्टीची, सारांश, सर्व ब्रह्मांडाची उत्पत्ति करून त्यामध्यें जीवासह शिरणारा आत्मा या पिंडांत राजासारखा शोभूं लागला. राजाला ज्याप्रमाणें राहण्याचीं अनेक मंदिरें असतात, त्याप्रमाणें आत्म्यानेंहि ह्या पिंडांत आपल्याला राहण्यासाठीं तीन विलासस्थानें केलीं आहेत. ज्यावेळीं जागृतीचा काल असतो, त्यावेळीं जीव आणि परमात्मा उजव्या डोळ्यांत, उजव्या नेत्रगोलकांत राहतात. नेत्र हें एक इंद्रिय आहे, हें सांगावयास नकोच. स्वप्नकालीं जीवात्म्यासह परमात्मा अंतःकरणांत राहतो आणि सुषुप्तिकालीं ते हृदयाकाशांत राहतात.

शिष्य—किंवा आतां इतक्यांतच ज्यांचें वर्णन येणार आहे, तीं हीं आत्म्याचीं विलास-वसतिस्थानें समजावीं. तीं कोणतीं, तर पित्याचें शरीर, मातेनें गर्भ-धारण करण्याचें स्थान आणि तिसरें आपलें स्वतःचें शरीर, अशीं हीं तीन स्थानें आहेत.

सिद्धान्ती—होय. दोन्हींही अर्थांचें तात्पर्य एकच आहे. पहिला अर्थ एका शरीरांतील तीन स्थानें दाखवितो व दुसरा अर्थ तीन निराळीं शरीरें दाखवितो. पहिल्यानें जीवाचें अवस्थात्रय समजतें, व दुसऱ्यानें जीवाच्या जन्मत्रयाची व्यवस्था लागत आहे. असो; तीन स्वप्नें असतात.

शिष्य—हीं तीन स्वप्नें कोणतीं?

सिद्धान्ती—जागृतावस्था, स्वप्नस्थिति आणि सुषुप्ति हीं तीन स्वप्नें होत.

पूर्व०- तुम्हीं प्रबोधरूप जागृतीलाही स्वप्न म्हणतां? मोठें आश्चर्य आहे!

सिद्धान्ती—अहो! जागृति म्हणजे स्वप्नच! नव्हे, तर काय? पहा; जागृतींत विषयांचें ज्ञान होतें, हें खरें. पण मुख्य परमार्थ कोणता आहे, पहा बरें! आत्मस्वरूपाचं ज्ञान-विज्ञान व्हावें हा आपणा सर्वांचा उत्तम पुरुषार्थ आहे. अज्ञानी जीवाला त्याचा संबंध जागृतींत एवढासा तरी असतो का? नाहीं. ज्याप्रमाणें स्वप्नांत आप-

ल्याला सन्या वस्तूचें दर्शन न होतां भलत्याच वस्तूचें दर्शन होतें, तसाच प्रकार जागृतींत होत नाहीं का? सारांश, जागृतींत व स्वप्नांत स्वरूप-ज्ञान नसून अयथार्थ ज्ञान होतें आणि सुषुप्तींत स्वरूप-ज्ञान होत नाहीं, हें तुम्हांलाही संमत असलें पाहिजे. तात्पर्य, या तिन्ही अवस्था स्वप्नतुल्य, अज्ञानरूप आहेत. आत्म्याचीं तीन राहण्याचीं स्थानें सांगितलीं, तीं ही वस्तुतः स्वप्नतुल्यच होत. असो; उजवा डोळा हें एक स्थान, मनाचा अंतर्भाग हें दुसरें स्थान, आणि हृदयाकाश हें तिसरें स्थान होय.

शिष्य—भगवन्, 'हें स्थान, हें स्थान' असा तीन वेळ मंत्रांत पुनः पुनः उच्चार झाला आहे, त्याचें रहस्य काय? शिवाय 'आवसथ' या शब्दाचा गृह असा अर्थ आहे; पण नेत्र गोलकाला कोणी 'घर' असें म्हणत नाहीं.

सिद्धांती—अरे, तीन स्थानें दाखवावयाचीं होतीं म्हणून मंत्रामध्यें तीनदां 'हें स्थान' या शब्दांचें अनुकीर्तन झालें आहे. शिवाय, आतांच सांगितलेल्या तिन्ही स्थानांचा अभिमान धारण करून दीर्घ-कालपर्यंत 'हा मी आणि हें माझें' असें स्वाभाविक अज्ञान धारण करणारा जीव मायाबलानें-दीर्घ कालपर्यंत-त्या त्या स्थानांत राहतो, म्हणून त्यांना 'आवसथ' असें म्हटलें. स्वाभाविक अविद्येनें उत्पन्न केलेली निद्रा (अज्ञान) इतकी गाढ असते कीं, हजारो हजार अनर्थ-परंपरांनीं उत्पन्न केलेल्या दुःखरूपी मुद्गरांच्या ताडनरूपी अनुभवांनीं सुद्धां जीव जागे होत नाहींत! तात्पर्य, अनेक घोरतर संकटांचा अनुभव येत असतांही जीव अज्ञानापासून परावृत्त होत नाहींत, तेव्हां हें अज्ञान किती तरी गाढ असलें पाहिजे? असो; थोडे दिवस जेथें आपण राहतों, त्याला सुद्धां आपण 'माझें घर' असें म्हणतों, तर नेत्रादिकांच्या ठिकाणीं आपण हजारों हजार वर्षें राहिल्यास त्याला श्रुतीनें वसतिगृहाचें नांव दिलें, यांत नवल तें कसलें? मुद्गर म्हणजे ठोकण्याचें यंत्र! ॥ १२ ॥

मंत्र तेरावा.

स जातो भूतान्यभिव्यैख्यत्किमिहान्यं वावदिषदिति।
स एतमेव पुरुषं ब्रह्म ततममपश्यदिदमदर्शमिति ॥ १३ ॥

अन्वय व अर्थः—**सः जातः भूतानि अभिव्यैख्यत्** (उत्पन्न झाल्याबरोबर-शरीरांत प्रवेश केल्याबरोबर-परमात्म्यानें-जीवानें-सर्व भूतांस नामरूपें देऊन व्याकृत केलें, म्हणजे त्यांचें रूप समजून घेऊन त्यांस रूपानुसार नांवें दिलीं.) **किं इह अन्यं वावदिषत् इति** (येथें दुसरें जाणण्यासारखें काय आहे? असें त्यास वाटलें) **सः एतम् एव**

पुरुषं ब्रह्म ततमम् अपश्यत्, इदं अदर्शं इति (नंतर हें सर्वव्यापी ब्रह्म किंवा हा पुरुषोत्तम तो जीव पाहता झाला आणि 'सर्व परिपूर्ण ब्रह्म मला दिसलें' असें म्हणून अत्यंत आनंद पावता झाला) ॥ १३ ॥

स जातः शरीरे प्रविष्टो जीवात्मना भूतानि अभिव्यैख्यत् व्याकरोत् । स कदाचित्परमकारुणिकेन आचार्येणात्मज्ञानप्रबोधकृच्छब्दिकायां वेदान्तमहाभेर्यां तत्कर्णमूले ताड्यमानायाम्, एतमेव सृष्ट्यादिकर्तृत्वेन प्रकृतं पुरुषं पुरि शयानमात्मानं ब्रह्म बृहत् ततमं तकारेणैकेन लुप्तेन ततततमं व्याप्ततमं परिपूर्णमाकाशवत् प्रत्यबुध्यत् अपश्यत् । कथम्? इदं ब्रह्म मम आत्मनः स्वरूपमदर्शं दृष्टवानस्मि । अहो इति । विचारणार्था प्लुतिः पूर्वम् ॥१३॥

सिद्धान्ती—जीवात्म्यासह परमेश्वरानें शरीरांत प्रवेश केल्यानंतर, त्यानें सर्व भूतांस नाम-रूप देऊन व्याकृत केलें. म्हणजे प्रत्येक पदार्थाचें स्वरूप त्याला समजलें आणि त्याचें नामकरणही आत्माभिमानानें जीवरूपानें केलें. तात्पर्य, या शरीरांत जन्म घेतल्यासारखें, करितांक्षणीं 'मी मनुष्य आहें,' 'मी देह आहें,' 'मी सुखी आहें,' 'मी दुःखी आहें.' इत्यादि प्रकार म्हणजे आत्माभिमान होय.—*प्रथमतः आत्माभिमानाशिवाच जीवाला दुसरी वस्तुच (आत्म वस्तु-)* दिसली नाहीं, किंवा तिचें नाकरणही त्यानें केलें नाहीं.* असो; पुढें जीवाच्या भागधेयानें त्याची व एका परम दयाघन सद्गुरूची कांहीं दिवसांनीं गांठ पडली. तेव्हां आत्मज्ञानाचा प्रबोध करणारीं वेदांचीं महा-वाक्यें त्याच्या कर्ण-पथावर येऊन आदळलीं.

शिष्य—ही वेदांतांतील महावाक्यें म्हणजे महाशब्द करणाऱ्या प्रत्यक्ष दुंदुभीच होत ! यांचा गंभीर स्वर कोणा विवेकी पुरुषाला ऐकूं जाणार नाहीं व हा घंटारव सारखा चालू असल्यानंतर कोण स्वरूपाच्या शुद्धीवर येणार नाहीं ?

सिद्धान्ती—असो; याप्रमाणें अज्ञाननिद्रेतून खडखडीत जागा झालेला जीव 'पुरुषाचें' ज्ञान करून घेतो.

शिष्य—पुरुष म्हणजे शरीरांत शयन करणारा जो परमात्मा तो होय. प्रस्तुतप्रकरणीं हा सृष्टिप्रमुख ब्रह्मांडें उत्पन्न करणारा परमात्मा ही प्रकृत वस्तु आहे. त्या पुरुषाचें जीवाला दर्शन होतें. होय ना ?

सिद्धांती—होय. हा परमात्मा म्हणजे ब्रह्म होय. ब्रह्म हे सर्व दृश्य वस्तूंहून अत्यंत मोठें आहे, हें दाखविण्यासाठींच श्रुतीनें 'ततमम्' या शब्दाची योजना

* हा मजकूर मूळ भाष्यांत नाहीं.

केली आहे. 'ततम्' या शब्दांत आणखी एक 'तकार' घातला म्हणजे 'ततमम्' असा शब्द सिद्ध होतो. आणि परब्रह्माचा व्याप आकाशाप्रमाणें परिपूर्ण, सर्व व्यापी आहे, असा 'ततमं' शब्दाचा अर्थ होतो. असो; या सृष्टिकर्त्या, देहकारी आणि सर्वव्यापी परब्रह्माचें स्वरूप पाहतां येईल, इतका तो ब्रह्मज्ञ महावाक्यांनीं जागृत होतो.

शिष्य—त्याला हें ब्रह्म कोणत्या स्वरूपांत दिसतें बरें?

सिद्धांती—'हें ब्रह्म माझ्या आत्म्याचें म्हणजे माझें स्वरूप आहे' असें त्याला समजतें आणि ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान झालें म्हणून तो पूर्णानंदरूप, धन्य आणि कृतार्थ होतो. त्याची धन्यता दाखविण्यासाठीं श्रुतीनें दीर्घप्लुताची योजना केली आहे. तीन मात्रा उच्चारण्यास जो वेळ लागतो, तो वेळ एखाद्या स्वराचा उच्चार करण्यास लागावयाचा असला, म्हणजे त्या स्वराला प्लुत असें म्हणतात. ह्रस्व, दीर्घ आणि प्लुत असे तीन प्रकारचे स्वर असतात. दुरून हांक मारावयाची असते, तेव्हां प्लुताचा उपयोग आपण करितों ॥ १३ ॥

मंत्र चौदावा.

तस्मादिदन्द्रो नामेदन्द्रो ह वै नाम तमिदन्द्रं सन्तमिन्द्रं सन्तमिन्द्र इत्याचक्षते परोक्षेण। परोक्षप्रिया इव हि देवाः परोक्षप्रिया इव हि देवाः ॥१४॥

अन्वय व अर्थः—**तस्मात् इदंद्रः नाम** (म्हणून 'इदंद्र=हें पाहाणारा' हें नांव आहे) **इदन्द्रः ह वै नाम** (इदंद्र हें नांव प्रख्यातच आहे) **तं इदंद्रं सन्तं इंद्रः इति परोक्षेण आचक्षते** (तो प्रत्यक्ष इदंद्र असतांही त्याला इंद्र असें अप्रत्यक्ष-रीतीनें म्हणतात) **हि परोक्षप्रियाः इव देवाः** (हें प्रसिद्धच आहे कीं, देव हे परोक्षप्रिय असल्यासारखे, परोक्षप्रियच, असतात) **हि परोक्षप्रियः इव देवाः** (हें प्रसिद्धच आहे कीं, देव हे परोक्षप्रिय असतात) ॥ १४ ॥

यस्मादिदमित्येव यस्साक्षादपरोक्षाद्ब्रह्म सर्वान्तरमपश्यत् न परोक्षेण, तस्मात् इदं पश्यतीति इदन्द्रो नाम परमात्मा। इदन्द्रो ह वै नाम प्रसिद्धो लोके ईश्वरः। तम् एवम् इदन्द्रं सन्तम् इन्द्र इति परोक्षेण परोक्षाभिधानेन आचक्षते ब्रह्मविदः संव्यवहारार्थं

पूज्यतमत्वात्प्रत्यक्षनामग्रहणभयात् । तथा हि परोक्षप्रियाः परोक्षनामग्रहण प्रिया इव एव हि यस्मात् देवाः । किमुत सर्वदेवानामपि देवो महेश्वरः । द्विर्वचनं प्रकृताध्यायपरिसमाप्त्यर्थम् ॥ १४ ॥

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यस्य श्रीगोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यस्य श्रीमच्छंकरभगवतः कृतौ ऐतरेयोपनिषद्भाष्ये प्रथमोऽध्यायः ॥

सिद्धांती—असा प्रकार ज्याअर्थी शाला, 'हें हेंच आहे' असें ज्याअर्थी समजलें, म्हणजे ज्यापक्षीं साक्षात् असणारें, अपरोक्ष व सर्वांतर्यामी असणारें ब्रह्म जीवानें प्रत्यक्ष पाहिलें व तें तेंच आहे' असें ओळखिलें, त्यापक्षीं जो ब्रह्मज्ञ, परमात्मा हें-ब्रह्म-पाहतो, त्या परमात्म्याला 'इदंद्र' हेंच नांव योग्य आहे. हें पाहणारा तो इदंद्र होय. परमात्मा हाच प्रत्यगात्मा आहे, असा प्रत्यक्ष साक्षात्कार ज्याला होतो, त्याला इदंद्र हेंच नांव योग्य आहे. इदंद्र हें नांव ईश्वर-अर्थी आहे, असें व्यवहारांत ही प्रसिद्ध आहे. त्याच इदंद्राला-सर्वसाक्षीला-परोक्षतः ब्रह्मवेत्ते 'इंद्र' असें नांव देत असतात. इंद्र हें नांव व्यावहारिक आहे. इदंद्र हें नांव अत्यंत पवित्र म्हणून अत्यंत पूज्य आहे. पवित्र नांवाचा उद्गार व्यवहारांत करूं नये, असें शास्त्र आहे. पवित्र वस्तूचें प्रत्यक्ष नामग्रहण करण्याला व्यवहारांत भीति वाटते.

शिष्य—भीति कसली यांत ?

सिद्धान्ती—व्यवहारांत पवित्र नामाचा वाटेल तेव्हां व वाटेल त्याप्रसंगीं उच्चार केला असतां त्या नांवाच्या पवित्रतेचा भंग होईल, अशी ब्रह्मवेत्त्यांना भीति असते. 'तात्या, बाबा' या नांवांनीं आपण वडील पुरुषांस संबोधितों, म्हणून ते परमेश्वराला व्यवहारांत 'इंद्र' या नांवानें संबोधितात. अरे ! सर्व मनुष्य व देवसुद्धां परोक्षप्रिय आहेत, म्हणजे त्यांच्या स्वनामानें त्यांस हांक न मारतां व्यावहारिकनामानें व्यवहारांत त्यांस जीवांनीं संबोधावें, अशी त्यांची इच्छा असते. ही जर देवांची इच्छा, तर देवांचा देव जो महादेव, महेश्वर किंवा परमात्मा त्याचाही 'इंद्र' नांवानेंच उच्चार व्हावा, हेंच त्याला प्रिय असलें पाहिजे, हें सांगावयासच नको. मंत्रांत दोनवेळ 'देव परोक्षप्रियच आहेत' असें म्हटलें आहे, तें केवळ अध्यायाच्या परिसमाप्तीसाठीं आहे.

शिष्य—मंत्रांत इव शब्द आहे त्याचा अर्थ काय ?

सिद्धान्ती—इव हें एव या अर्थी आहे. देवच परोक्षप्रिय आहेत, असा सर्व वाक्याचा अर्थ आहे ॥ १४ ॥

तृतीय-खंड-भाष्याचें भाषांतर संपलें.

ऐतरेय-द्वितीयारण्यक-चतुर्थ-अध्याय समाप्त.

आचार्यांच्या प्रस्तावनेचा साराश.

गेल्या अध्यायांत जगताचा उत्पादक, संरक्षक आणि संहारक परमात्मा हा सर्वज्ञ, सर्वशक्ति, इत्यादि गुणान्वित आहे, त्यानें इतर कोणत्याही गोष्टीचा आश्रय न घेतां आकाशादि-क्रमानें हें सर्व विश्व स्वतः उत्पन्न केलें आणि आपल्या प्रबोधनासाठीं सर्व प्राण्यांच्या शरीरांत प्रवेश केला, आणि स्वस्वरूप समजून घेतलें. अतएव तोच एक आत्मा आहे, दुसरा नाहीं, असें ठरतें, हें सिद्ध केलें. येथें तोच एक आत्मा आहे, तोच सर्वव्यापी आहे, असेंही सांगितलें. यावर अशी एक शंका येते कीं, सर्वव्यापी परमात्म्याला असें कोणतें विवर सांपडलें कीं, जेथें परमात्म्याची वसति नव्हती. अशाच प्रकारच्या पुष्कळशा शंका मागील प्रकरणावरून उद्भूत होतात. पण गेल्या प्रकरणांत उत्पत्तीचा जो प्रकार सांगितला आहे, तो केवळ अर्थवादपर आहे, वस्तु-स्थितिपर नाहीं. जशी मायावीची माया तसेंच परमेश्वराचे उत्पादकत्वादि सर्व मायिक होय. सृष्टि कशी उत्पन्न झाली, असा प्रश्न ब्रह्मवेत्त्यांच्या मुखांतून येत नाहीं. मायावश पुरुषाला मायेच्या पलीकडे जातां येणें शक्य नाहीं; म्हणून त्यालाही उत्तर देतां येत नाहीं. तथापि, त्याच्या मनाची तळमळ अमळशी नाहींशी व्हावी, म्हणून श्रुति मायेचे विलास सांगत असते. या ज्ञानापासून मोक्षदृष्टीनें फळ नाहीं. तात्पर्य, एक आत्मा सर्वव्यापी आहे, जीवही आत्माच आहे, हे सिद्ध आहे, असें या प्रस्तावनेंत सांगितलें आहे. आतां **संसारीआत्मा**, जगत्कर्तृत्वादि **लक्षणांनीं** अनुमेय **परमेश्वर** आणि श्रुतिप्रणीत **परमात्मा** असे तीन आत्मे असतात, असा समज प्रायः सर्वत्र प्रचलित आहे. या भ्रांतिमूलक समजुतीचे आचार्यांनीं न्यायशुद्धरीतीनें परीक्षण करून तीन आत्म्यांचें अस्तित्व ठरवितां येत नाहीं, असें सिद्ध केलें आहे. जीवसिद्धीला किंवा आत्मसिद्धीला प्रत्यक्ष व अनुमानप्रमाणांचा कांहीं एक उपयोग होत नाहीं. येथें जिज्ञासूला सर्वथा स्तब्ध बसावें लागून श्रुति जें काय सांगते तें निमुटपणें कबूल करावें लागतें. जीवाचें, तसेंच परमात्म्याचें ज्ञानरूपत्व हेंच स्वरूप आहे, असें आचार्यांनीं श्रुतिसाह्यानें सिद्ध केलें आहे. साक्षी एकच असणार आणि तो नित्य असणार, हें त्यांच्या सिद्धांताचें सार आहे. आत्म्याचें नित्यज्ञानत्व स्थापून त्यांनीं नैय्यायिक मत खोडून काढिलें आणि आत्म्याचें एकत्व कबूल केलें नाहीं तर, श्रुतीचा अर्थ बराबर होत नाहीं, असें सांगितलें आहे. शेवटीं असेंही सांगितलें कीं, आत्म्याची आत्मदृष्टि नित्य आहे; पण बाह्य पदार्थ अनित्य असल्यामुळें जिवाचें विषयज्ञान अनित्य असतें.

याप्रमाणें अद्वैतेतर-पक्षांचे खंडन करून आपला पक्ष आचार्यांनीं सिद्ध केला आहे. शेवटीं एक गमतीची गोष्ट सांगून विषयाचा उपसंहार केला आहे. या गोष्टीचें मर्म इतकेंच आहे कीं, 'तूं जीवरूपी आत्मा आहेस, इंद्रिय, मनःकल्पित आणि मनःकल्प्य दृश्य वस्तूंपैकीं कोणतीही वस्तु नाहींस, तात्पर्य तूं आत्मरूप आहेस' हाच सिद्धांत या पुढील प्रकरणांत सिद्ध व्हावयाचा आहे. येथें जें संसारवर्णन आहे, तें शुद्ध वैराग्याच्या प्राप्तीसाठीं आहे, हे मुमुक्षूंनीं समजून घेतल्याशिवाय राहूं नये.

॥ द्वितीयोऽध्यायः ॥

अस्मिन्नध्याये एष वाक्यार्थः—जगदुत्पत्तिस्थितिप्रलयकृदसंसारी सर्वज्ञः सर्वशक्तिः सर्ववित्सर्वमिदं जगत्स्वतोऽन्यद्वस्त्वन्तरमनुपादायैव आकाशादिक्रमेण सृष्ट्वा स्वात्मप्रबोधनार्थं सर्वाणि च प्राणादिमच्छरीराणि स्वयं प्रविवेश; प्रविश्य च स्वमात्मानं यथाभूतमिदं ब्रह्मास्मीति साक्षात्प्रत्यबुध्यत; तस्मात्स एव सर्वशरीरेष्वेक एवात्मा, नान्य इति । अन्योऽपि 'स म आत्मा ब्रह्मास्मीत्येवं विद्यात्' इति 'आत्मा वा इदमेक एवाग्र आसीत्' ततमम्' इति चोक्तम् । अन्यत्र च सर्वगतस्य ह्यात्मनो बालाग्रमात्रमप्यप्रविष्टं नास्तीति कथं सीमानं विदार्य प्रापद्यत पिपीलिकेव सुषिरम्? नन्वल्पमिदं चोद्यम् । बहु चात्र चोदयितव्यम् । अकरणः सन्नीक्षत । अनुपादाय किंचिल्लोकानसृजत । अद्भ्यः पुरुषं समुद्धृत्यामूर्च्छयत् । तस्याभिध्यानान्मुखादि निर्भिन्नं मुखादिभ्यश्चाग्न्यादयो लोकपालाः । तेषां चाशनायादिसंयोजनं, तदायतनप्रार्थनं, तदर्थं गवादिप्रदर्शनं, तेषां च यथायतनप्रवेशनं, सृष्टस्यान्नस्य पलायनं, वागादिभिस्तज्जिघृक्षेति । एतत्सर्वं सीमाविदारणप्रवेशसममेव ॥

सिद्धान्ती—ह्या गेल्या चवथ्या अध्यायामध्यें जें काय सांगितलें आहे, त्याचें तात्पर्य हें आहे—जगांची उत्पत्ति, त्यांची स्थिति आणि त्यांचा संहार करणारा, असंसारी (जन्ममरणादि विकार नसणारा), सर्वज्ञ, सर्वशक्ति, सर्ववेत्ता जो परमात्मा त्यानेंच हें सर्व विश्व दुसऱ्या कोणत्याही वस्तूचा आश्रय न घेतां आपण स्वतः आकाशादि–क्रमानें (आकाश, वायु, तेज, जल, पृथ्वी असा हा क्रम आहे) उत्पन्न करून आपल्या स्वतःच्या प्रबोधनासाठीं सर्व प्राणादि इंद्रियावयवांनीं युक्त असणाऱ्या समष्टीच्या व व्यष्टि–जीवांच्या शरीरांत आपल्या एकच एक स्वरूपानें स्वतः आपण होऊन प्रवेश केला आणि प्रवेश केल्यानंतर आपल्या स्वरूपाचें यथार्थ ज्ञान करून घेऊन 'हें सर्व ब्रह्म मी आहें' असा प्रत्यक्ष साक्षात्कार करून घेतला. म्हणून तो परमात्मा मात्र सर्व शरीरांत राहून तोच त्या शरीरांचा अंतर्यामी होतो. येथें परमात्म्याशिवाय दुसरा आत्मा नाहीं. हें श्रुतीचें तात्पर्य आहे. व आपणा जीवासही असेंच ज्ञानविज्ञान करून घेतलें पाहिजे, असा चवथ्या अध्यायाचा अभिप्राय आहे. 'दुसरा जो कोणी आत्मा (जीवात्मा)

आहेसा वाटतो, तो, माझाच आत्मा आहे, मी ब्रह्म आहें, परमात्मा आणि जीवात्मा हे भिन्न नाहींत.' असें मुमुक्षुनें ज्ञान करून घेतलें पाहिजे.

पू०—असें कशावरून?

सिद्धांती—'हें सर्व प्रथमारंभीं आत्मरूप होतें, आत्माच कायतो प्रथमतः एक होता.' असा उपक्रम व 'ब्रह्म सर्वव्यापी आहे' असा उपसंहार करणारीं वाक्यें या उपनिषदांतच आलीं आहेत. दुसरीकडेही अशाच अर्थांचीं वाक्यें आढळतात. उदाहरणार्थः 'सोम्य! सत् हेंच प्रथम होतें; हें सर्व सत्च होतें.'

पू०—'एकच आत्मा सर्व-व्यापी आहे,' 'तो सर्वात्मा आहे.' 'असें कोणतेंही सूक्ष्मतम सुद्धां स्थळ नाहीं कीं, जेथें आत्म्याचा प्रवेश प्रथमपासूनच झालेला नाहीं' असें श्रुतींच्या अभिप्रायाचें प्रतिपादन तुम्ही नित्य करीत असतां व येथेंही तोच तात्पर्यार्थ तुम्ही लाविला आहे. तेव्हां, आम्हाला असें सांगा, कीं या अध्यायांत 'मस्तकशकलांची शिवण विदीर्ण करून आत्म्यानें शरीरांत प्रवेश केला' असें वाक्य आलें आहे. एखादी मुंगी एखाद्या छिद्रांत प्रवेश करिते, त्याप्रमाणें आत्म्यानें मस्तक-छिद्राच्या द्वारें जीवशरीरांत प्रवेश केला, असें सांगणाऱ्या श्रुतींचा व 'आत्मा सर्वव्यापी आहे.' 'अवघें ब्रह्मरूप रिता नाही ठाव' अशा अर्थाच्या श्रुतीचा विरोध होत नाहीं काय? एकतर आत्मा सर्वव्यापी आहे, म्हणजे त्यानें व्यापलें नाहीं, असें स्थळच नाहीं, व कोठेंही त्याचा प्रवेश होणें राहिलें नाहीं, असें तरी म्हणा, किंवा त्यानें मस्तक-रन्ध्रांतून प्रवेश केला म्हणून एवढीशी तरी जागा होती, कीं जी त्यानें व्यापलेली नव्हती, असे तात्पर्य निघाल्यामुळें तो सर्वव्यापी नाहीं, असें तरी म्हणा. असा व्यर्थ घोंटाळा करूं नका. सर्वव्यापी म्हणाल, तर प्रवेश शक्य नाहीं, प्रवेश केला, असें म्हणाल तर आत्मा सर्वव्यापी नाहीं, असें होतें. पण तुमचा मात्र ब्रह्मघोंटाळा आहे.

सिद्धान्ती—ही तर तुमची इवलीशि, अति अल्प मोलाची, शंका आहे. शंकाच व्यावयाच्या असतील, तर येथें अनेक मोठमोठाल्या शंका घेतां येतील.

शिष्य—म्हणजे!

सिद्धान्ती—कोणतेंही इंद्रिय नसून परमात्म्यानें पाहणें, कोणत्याही मृत्तिकादि उपादानकारणाचा इवलासाहि आश्रय न घेतां ब्रह्मांडाची विरचना परमात्म्यानें करणें, जलांतून पुरुषाला हस्तविरहित परमात्म्यानें बाहेर काढून त्याला सावयव करणें, मनादिक नसतांही संकल्पविचारादि करून मुखादिकांचें नूतन भेदन करणें, मुखादिकांपासून अग्निप्रमुख लोकपाल उत्पन्न करणें, लोकपालांस क्षुधा-तृषादि उपाधींची योजना करणें, त्यांनीं स्थानांची प्रार्थना करणें, त्यांच्यासाठीं गवादिकांचें प्रदर्शन करणें, लोकपालांनीं आपापल्या योग्य स्थानांत प्रवेश करणें, उत्पन्न झालेल्या अचेतन अन्नाचें पळणें, जिव्हादि इंद्रियांच्या साहाय्यानें त्या पळणाऱ्या अन्नाला पकडण्याचा

प्रयत्न होणें, इत्यादि अनेक गोष्टींसंबंधानें अनेक शंका उत्पन्न होतात व त्यांची योग्यता या पूर्वपक्षकारांनीं काढलेल्या शंकेच्या योग्यतेसारखीच आहे. म्हणून आम्हीं यांस विचारतों कीं, ही तुम्हीं एकच शंका कां काढलीत ?

अस्तु तर्हि सर्वमेवेदमनुपपन्नम् । न, अत्रात्मावबोधमात्रस्य विवक्षितत्वात्सर्वोऽयमर्थवाद इत्यदोषः । मायाविद्वा; महामायावी देवः सर्वज्ञः सर्वशक्तिः सर्वमेतच्चकार सुखावबोधप्रतिपत्त्यर्थं लोकवदाख्यायिकादिप्रपञ्च इति युक्ततरः पक्षः । न हि सृष्ट्याख्यायिकादिपरिज्ञानात्किंचित्फलमिष्यते । ऐकात्म्यस्वरूपपरिज्ञानात्तु अमृतत्वं फलं सर्वोपनिषत्प्रसिद्धम् । स्मृतिषु च गीताद्यासु ' समं सर्वेषु भूतेषु तिष्ठन्तं परमेश्वरम् ' इत्यादिना ॥

पू०—येथील श्रुतिसंभार असा शंकास्पद आहेना ? तर मग या अध्यायांतील सर्वच व्यवहार अनुपपन्न आहे, असें म्हणा तरी ! कशास कांहीं ठिकाण नाहीं, असें समजून आपण स्वस्थ बसूं या.

सिद्धान्ती—येथें म्हणजे या उपनिषदांत उपपत्ति करितां येत नाहीं, असा एकमुद्दां शब्द नाहीं.

पू०—मग व्यवस्था लावून दाखवा. उपपत्तीच्या कक्षेंत हें सर्व आणा.

सिद्धान्ती—येथें अघटित-घटना मुळींच नाहीं. खरी अघटित घटना संभवतच नाहीं. ऐका—श्रुतीला येथें मुख्यतः सांगावयाची गोष्ट म्हणजे आत्मज्ञानमात्र आहे. अर्थात् बाकीच्या सर्व गोष्टी अर्थवादात्मक होतात. सृष्टीची उत्पत्ति सांगावी, उत्पत्तीच्या प्रकारांचें वर्णन करावं, हें श्रुतीचें तात्पर्यच नाहीं. तिला आत्मस्वरूपाचा अवबोध मात्र करून द्यावयाचा असतो. म्हणजे आत्मज्ञानाव्यतिरिक्त बाकीचें तिचें सर्व सांगणें अर्थवादपर असतें. केवळ आत्मज्ञानाचा उपदेश सौकर्यानें करण्यासाठीं उत्पत्ति-आदि किरकोळ प्रकरणांचा उल्लेख श्रुति बालबोधार्थ करीत असते; दुसरें असेंही एक रहस्य लक्षांत ठेवा, कीं एखादा अस्सल पटाइत जादूगार आपलें थक्क करून सोडणारें गोंडबंगाल प्रकट करितो, त्यावेळीं ते ते प्रकट झालेले पदार्थ खरेसे भासतात. परंतु वस्तुतः ते खरे नसतात, हें मागाहून समजते. असो; अघटितघटना करण्याचें महासामर्थ्य जिला आहे, त्या महामायेचा स्वामी श्रीपरमेश्वर हा सर्वज्ञ आणि सर्वशक्ति असतो, म्हणून माया-साहाय्यानें हें सर्व असत् विश्व त्यानें उत्पन्न केलेंसें दिसतें. वस्तुतः हें सर्व मायिक आहे. हें मायावी नाटक व त्याचें तात्पर्य सर्वांस सुकरतेनें कळावें, एतदर्थ उत्पत्त्यादि प्रकरणांचा उल्लेख श्रुति करीत असते. व्यवहारांत जशा आपण कांहीं कावळा-चिमणींच्या गोष्टी विशेष तत्त्वांच्या सिद्धयर्थ सांगत असतों, तसेच, आत्मतत्त्व कळावें, एतदर्थ हे उत्पत्त्यादि प्रकार श्रुतीनें वर्णिले आहेत, समजलां ?

शिष्य—अर्थवाद म्हणण्यापेक्षां 'ही सर्व माया आहे' हें समजणें जास्त चांगलें.

पू०—पण ही माया आहे, कशावरून ? खरें पाहिलें असतां सृष्टीच्या उत्पत्तीचें यथार्थ ज्ञान होणें, ही गोष्ट केवळ अशक्य आहे. पण अशा अपूर्व गोष्टींचें ज्ञान जीवांस देण्यासाठीं श्रुतीचा अवतार असतो. तात्पर्य, प्रामाणिक—सृष्टि—श्रुती खऱ्याच गोष्टी सांगतात. मायेचें त्या वर्णन करीत नाहींत, हें स्पष्ट आहे.

सिद्धांती—नाहीं, सृष्टयुत्पत्तीच्या गोष्टी समजून कोणत्याही प्रकारची पारमार्थिक प्राप्ति होत नसते. मग असल्या गोष्टी सांगण्यांत श्रुतीचा मतलब काय असणार ? विफल गोष्ट श्रुति सांगतच नाहीं, असें तुमच्याप्रमाणें आम्हीही म्हणतों. जीवात्मैक्य-स्वरूपाचें उत्कृष्ट ज्ञान झालें असतां अमृतत्वाची प्राप्ति होते, हें उत्तमोत्तम फल आहे. हेंच तात्पर्य सर्वश्रुति एक-कंठानें सांगतात. सर्व गीतादि स्मृति जीवात्म्यैकाचा अनुवाद करितात. 'सर्व भूतांमध्यें समत्वानें राहणारा परमेश्वर' इत्यादि श्रीमद्भगवद्गीतेंतील सिद्धांत प्रमाणभूत आहेत. ह्याचप्रमाणानें या अध्यायाचेंही तात्पर्य आत्म्यैक्यपर असलें पाहिजे, असें होतें; तथापि सृष्टीचा इतिहास श्रुति सांगते व द्वैतमास उत्पन्न करितें. पण हें तिचें तात्पर्य नव्हें, म्हणून हा इतिहास पारमार्थिक नव्हे. आत्म्यैक्य हें तत्त्व मात्र पारमार्थिक आहे, आणि हा परमार्थ सांगण्यांत मात्र श्रुतीचें एककंठानें पर्यवसान होत आहे.

ननु त्रय आत्मानो भोक्ता कर्ता संसारी जीव एकः सर्वलोक-शास्त्रप्रसिद्धः । अनेकप्राणिकर्मफलोपभोगयोग्यानेकाधिष्ठानवल्लो-कदेहनिर्माणेन लिङ्गेन यथाशास्त्रप्रदर्शितेन पुरप्रासादादिनिर्माणलि-ङ्गेन तद्विषयकौशलज्ञानवांस्तत्कर्ता तक्षादिरिव ईश्वरः सर्वज्ञो जगतः कर्ता द्वितीयश्चेतन आत्मा अवगम्यते । 'यतो वाचो निवर्तन्ते' 'नेति नेति' इत्यादिशास्त्रप्रसिद्ध औपनिषदः पुरुषस्तृतीयः । एवमेते त्रय आत्मानोऽन्योन्यविलक्षणाः । तत्र कथमेक एवात्मा अद्वितीयः असंसारीति ज्ञातुं शक्यते ? ॥

पू०—असें कसें म्हणतां ! **तीन आत्मे आहेत**, ही गोष्ट सर्व व्यवहाराला व शास्त्रांना समंत आहे.

शिष्य—ते कोणते ?

पू०—ऐका:—जीव हा भोक्ता कर्ता, संसारी; हा पहिला आत्मा होय. अनंत जीवांच्या कर्मफलांला यथायोग्य उपयोगीं असणारीं अनंत स्थानें व अनंत देह निर्माण करून, (तात्पर्य, जग, तें उत्पन्न करून) आपलें अस्तित्व अनुमानप्रमाणांनीं सिद्ध करून देणारा सर्वज्ञ आत्मा हा दुसरा आत्मा होय. एखादें नगर किंवा त्यांतील सर्व

मंदिरें यथाशास्त्र उत्पन्न झालेलीं आहेत, असें आपण पाहिलें म्हणजे स्थापत्य-विद्याविशारदगणन्या कौशल्याचें पूर्ण ज्ञान असणारा 'तक्षा (सुतार) नगर-मंदिरांचा निर्माणकर्ता असला पाहिजे, असें आपण अनुमान करितों. त्याचप्रमाणें या सृष्टींतील अनंत चमत्कार पाहून व अनंत जीवांस उपयोगी पडतील, असे प्रदेहविन्यास आणि पंचमहाभूतांची यथायोग्य व्यवस्था पाहून या सृष्टीला कोणी कर्ता असलाच पाहिजे आणि तो अत्यंत कुशल, अत्यंत ज्ञानी असला पाहिजे, असें अनुमान सहज निष्पन्न होतें. हा दुसरा आत्मा. आणि 'जेथून वाणी निवृत्त होते,' 'जो हें नाहीं, जों तें नाहीं' असा घंटारव ज्यासंबंधानें सर्व शास्त्रें करीत असतात; ज्याचें स्वरूप उपनिषदांच्या द्वारानें परोक्षतः समजतें, तो तिसरा आत्मा होय. याप्रमाणें संसारी, सर्वकर्ता आणि सर्वांगोचर, असे तीन प्रकारचें अन्योन्य विलक्षण आत्मे आहेत, असें सर्व व्यवहार, सर्व शास्त्रें व सर्व उपनिषदें सांगत असतांही 'एकच आत्मा आहे, तो अद्वितीय आहे, तोच असंसारी आहे,' असें ज्ञान कसें होईल. व आपल्यांस असें कसें म्हणतां येईल? तात्पर्य आत्मे अनेक आहेत. प्रत्यक्ष-प्रमाणानें संसारी आत्मा, अनुमान-प्रमाणानें ईश्वरात्मा व शब्दप्रमाणानें 'परमात्मा' असें शास्त्रें समजतात.

तत्र जीव एव तावत्कथं ज्ञायते? नन्वेवं ज्ञायते श्रोता मन्ता द्रष्टा आदेष्टा घोष्टा विज्ञाता प्रज्ञातेति । ननु विप्रतिषिद्धं ज्ञायते, यः श्रवणादिकर्तृत्वेन अमतो मन्ता अविज्ञातो विज्ञाता इति च । तथा 'न मतेर्मतारं मन्वीथा न विज्ञातेर्विज्ञातारं विजानीथाः' इत्यादि च । सत्यं विप्रतिषिद्धम्, यदि प्रत्यक्षेण ज्ञायेत सुखादिवत् । प्रत्यक्षज्ञानं च निवार्यते 'न मतेर्मन्तारम्' इत्यादिना । ज्ञायते तु श्रवणादिलिङ्गेन; तत्र कुतो विप्रतिषेधः? ननु श्रवणादिलिङ्गेनापि कथं ज्ञायते, यावता यदा शृणोत्यात्मा श्रोतव्यं शब्दम्, तदा तस्य श्रवणक्रिययैव वर्तमानत्वान्मननविज्ञानक्रिये न संभवत आत्मनि परत्र वा । तथा अन्यत्रापि मननादिक्रियासु । श्रवणादिक्रियाश्च स्वविषयेष्वेव । न हि मन्तव्यादन्यत्र मन्तुः मननक्रिया संभवति । ननु मनसः सर्वमेव मन्तव्यम् । सत्यमेवम्; तथापि सर्वमपि मन्तव्यं मन्तारमन्तरेण न मन्तुं शक्यम् । यद्येवं किं स्यात्? इदमत्र स्यात्-सर्वस्य योऽयं मन्ता, स मन्तैवेति न स मन्तव्यः स्यात् । न च द्वितीयो मन्तुर्मन्तास्ति । यदा स आत्मनैव मन्तव्यः, तदा येन च मन्तव्य आत्मा आत्मना, यश्च मन्तव्य आत्मा, तौ द्वौ प्रसज्येयाताम् । एक एव आत्मा द्विधा

मन्तृमन्तव्यत्वेन द्विशकलीभवेद्वंशादिवत्, उभयथाप्यनुपपत्तिरेव। यथा प्रदीपयोः प्रकाश्यप्रकाशकत्वानुपपत्तिः, समत्वात्, तद्वत्। न च मन्तुर्मन्तव्ये मननव्यापारशून्यः कालोऽस्त्यात्ममननाय। यदापि लिङ्गेनात्मानं मनुते मन्ता, तदापि पूर्ववदेव लिङ्गेन मन्तव्य आत्मा, यश्च तस्य मन्ता, तौ द्वौ प्रसज्येयाताम्; एक एव वा द्विर्धेति पूर्वोक्तो दोषः॥

शिष्य—पण जीवाचें स्वरूप तुम्हांस कसें समजतें? प्रत्यक्ष तर तें दिसत नाहीं.

पू०—तो श्रोता, मंता, (विचार करणारा), द्रष्टा, आदेष्टा (वर्णात्मकशब्दांचा उच्चार करणारा), आघोष्टा (ध्वन्यात्मक शब्द काढून मात्र आपला अभिप्राय व्यक्त करणारा) आणि प्रज्ञाता इत्यादि श्रुतिवाक्यांवरून व प्रत्यक्ष चिह्नांवरून जीवाचें आपल्यांस ज्ञान होतें.

शिष्य—पण हें ज्ञान तर विप्रतिषिद्ध आहे, म्हणून अनुपपन्न आहे.

पू०—ते कसें?

शि०—'श्रोता, मंता इत्यादि जीवाचीं कर्तृत्वादि लक्षणें आहेत' असें सांगणारी श्रुतिच म्हणते कीं, 'तो अमत असून मंता आहे, अविज्ञात असून, विज्ञाता आहे' त्याप्रमाणेंच 'तो मतीचा मंता आहे, किंवा विज्ञातीचा विज्ञाता आहे, असें समजूं नका.' हेंही तीच श्रुति सांगते. मग येथें तो श्रोता, मंता आहें, ही श्रुति प्रमाण मानावयाची? किंवा तो विज्ञातीचा, विज्ञाता नाहीं, असें सांगणारी श्रुति प्रमाण मानावयाची? तात्पर्य, तो ज्ञेय नाहीं व ज्ञाताही नाहीं, असें म्हणणाऱ्या श्रुतींची व्यवस्था तुम्हांस लाविता येत नाहीं. सारांश, येथें तुम्ही कांहीं तरी परस्पर विरोधी सिद्धांताचा उल्लेख करून विषयाचा घोंटाळा करीत आहां. आणि जीवाचें स्वरूप कसें ओळखावयाचें हें स्पष्टपणें सांगत नाहीं.

पू०—तुम्ही म्हणतां तसा विप्रतिषेध होईल खरोखर, जर जीवाचें ज्ञान प्रत्यक्ष प्रमाणानें मात्र होत असेल तर. सुख, दुःख जसें प्रत्यक्ष समजतें, तसें जीवाचें स्वरूप प्रत्यक्ष समजत नाहीं. तरी पण ध्यानांत ठेवा कीं, जीव हा **अविज्ञेय आहे, असें आपल्यास प्रत्यक्ष ज्ञान** होतें, आणि **तो विज्ञेय आहे, हें अनुमानानें ज्ञान होते.**

शि०—कशावरून?—

पू०—तो 'मतीचा मंता नाहीं' इत्यादि श्रुतिवाक्यांवरून जीवाचें विज्ञेयत्व प्रत्यक्ष व्हावयाचें नाहीं, असें म्हणून श्रुति जीवविषयक प्रत्यक्षज्ञानाचें निवारण करितें, तरी पण श्रवणादि चिन्हांनीं जीव विज्ञेय आहे, **असें अनुमान** करितां येतें.

असें सांगतें. प्रत्यक्ष न होणारें जीव-विषयक ज्ञान अनुमानानें होतें. तेव्हां येथें विप्रतिषेध आहे कोठें! **जीव ज्ञेय आहे**, असें अनुमान प्रमाण सांगतें ना!

सिद्धांती—थांबा! थांबा! श्रवणादि चिह्नांनीं तरी जीवस्वरूप कसें समजणार? पहा कीं, ज्यावेळीं आत्मा हा श्रोतव्य शब्द ऐकत असतो; त्यावेळीं त्याचें सर्व कर्म श्रवणक्रियेमध्येंच समर्पित झालें असल्यामुळें त्याचवेळीं त्याला मनन आणि विज्ञान या क्रिया करितांच येणार नाहींत. जीवाला एककालीं दोन ज्ञानें होणें शक्य नाहीं. सारांश, ज्यावेळीं आत्मा शब्द श्रवण करितो, त्याचवेळीं त्याला आपल्या स्वरूपाचें किंवा दुसऱ्या कोणत्याही वस्तूच्या स्वरूपाचें मनन-विज्ञान अथवा अनुमान करितां येणें शक्य नाहीं. याच प्रमाणें मनन करीत असतांही त्याला श्रवणादि क्रिया करितां येणार नाहींत; तात्पर्य श्रवण (प्रत्यक्ष) आणि मनन (अनुमान) हीं दोन कार्यें एकदम होणें शक्य नाहीं. श्रवणादि क्रिया आपापल्या विषयामध्यें मात्र समर्पित होतात. त्यांना **श्रोत्याचें ज्ञान होत** नाहीं. तसेंच जो मंता आहे (विचार करणारा आहे) त्याला मंतव्याशिवाय (ज्या गोष्टींचा विचार करितो, त्या वस्तु-विचाराशिवाय, दुसरी कोणतीही मननक्रिया करितां येणार नाहीं. यावरून क्रियेच्या योगानें **कर्ता जाणतां** येत नाहीं किंवा कर्त्याच्या क्रियेनेंही **कर्त्याचे स्वरूप कर्त्याला कळत नाहीं**. मंता म्हणजे मनन करणारा. आत्म्याचा तर 'तो मंतव्य नाहीं.' असा श्रुतीनें निषेध केला आहे. म्हणून त्यालाही मननक्रिया संभवतच नाहीं. सारांश, मंत्याला आत्मज्ञान (जीवविषयक ज्ञान) अनुमानानें होणें शक्य नाहीं. येथें मनाचा कांहीं उपयोग नाहीं.

पूर्व०—पण 'मनानें सर्व विषयांचा विचार करितां येतो' असें श्रुतीचेंच म्हणणें आहे.

सिद्धान्ती—सरें आहे. तथापि जे जें म्हणून कांहीं मनानें मंतव्य आहे, जो जो विचाराचा (मनाचा) विषय आहे, त्याचा त्याचा **मंत्याशिवाय** विचार करितां येणें शक्यच नाहीं. मन हें एक उपकरण मात्र आहे; तेव्हां **करणाचा उपयोग करणारा कर्ता असल्याशिवाय करणरूपी मनाला** शुद्धां स्वतः मात्र कोणत्याहि गोष्टीचा विचार करितां येत नाहीं.

पूर्व०—बरें, असें झालें म्हणून काय बिघडलें? तुम्हीं आमचेंच म्हणणें कबूल करीत आहांत! मनानें जीवस्वरूप जाणतां येतें, असें म्हणत आहांत.

सिद्धान्ती—नाहीं. तुमचें म्हणणें अशुद्ध आहे. पहा कीं, मनानें मंता (जीव, आत्मा) **जाणतां येतो**, असें तुम्हीं म्हणतां व ज्याला आम्हीं मंता असें म्हणतों, तो नित्य 'मंता' **याच स्वरूपांत राहणार**. तो कधीं **जाणण्याचा, विचाराचा, विषय होणें शक्य नाहीं**. आत्मा हा ज्ञाता म्हणजे साक्षी आहे. हा कधीं ज्ञेय होत नाहीं. तसेंच, या साक्षीचा दुसरा कोणी साक्षी असणें शक्य नाहीं.

पूर्व०—कां बरें!

सिद्धान्ती—आत्म्याचा साक्षी दुसरा कोणी असणें म्हणजे तो तद्विलक्षण असला पाहिजे. म्हणजे तो साक्षी अनात्मा आहे, असें होईल. अनात्मा अचेतन असतो; तेव्हां अचेतन वस्तूला आत्म्याचें साक्षित्व प्राप्त होणें, अचेतन वस्तूनें आत्मा पहाणें, हें अशक्य आहे.

पूर्व०—तसें नव्हे; आत्माच आत्म्याला पाहातो, आत्म्यानेंच आत्म्याचा विचार करावा, असा आमचा अर्थ आहे.

सिद्धान्ती—ठीक आहे. ज्यावेळीं आत्मा आत्म्याला आत्म्याचाच विचारावषय करितो, तेव्हां जो विचारविषय करितो तो एक, आणि जो विचारविषय होतो तो एक, असे दोन आत्मे मानण्याची पाळी येते! पण 'आत्मा एकच आहे' असें श्रुतीचें स्पष्ट सांगणें आहे. मग **ज्ञाता**-आत्मा व **ज्ञेय**-आत्मा असें दोन आत्में, कसे मानितां येतील?

पूर्व०—तसें नव्हे. एकच आत्मा मंता व मंतव्य या दोन स्वरूपांनीं प्रकट होतो. एकाच वेळूचीं दोन शकलें होतात, त्याचप्रमाणें **विचारी आत्मा** हें एक शकल आणि **विचार्य आत्मा** हें दुसरें; अशीं आत्म्याचीं दोन शकलें (स्वरूपें) होतात; असें मानण्यास काय प्रत्यवाय आहे?

सिद्धान्ती—प्रत्यवाय आहेत तर! आत्म्याचीं दोन भिन्न व विरोधीं स्वरूपें झालीं, तर स्वभेदामुळें तीं विचाऱ्या शरीराचाच नाश करतील. शिवाय, दोन शकलें होतात, असें म्हणणें म्हणजे आत्म्याला आकार व अवयव आहेत, असें म्हणण्यासारखे होतें. सावयव वस्तु विनाशी असते. तेव्हां आत्मा तुमच्या प्रक्रियेनें मर्त्य होणार, ही दुसरी अनुपपत्ति आहे. दोन दीपज्योतींचेंच उदाहरण घ्या. या ज्योतींत एक प्रकाश देणारी आहे, आणि दुसरी प्रकाश घेणारी आहे, असें आपण कधीं तरी म्हणतो काय? ज्योतीचा धर्म नेहमीं प्रकाश देणें हा आहे. बाहेरून प्रकाश घेण्याचा तिचा धर्म नाहीं. ह्याचप्रमाणें आत्मा हा **साक्षी म्हणून मात्र नित्य असावयाचा.** तो कधींही **ज्ञानविषय व्हावयाचा नाहीं.** मग तुमच्या दोन शकलांचा उदय होणार कसा व त्यांचा उपयोग तरी काय? शिवाय, मंत्याला (आत्म्याला) मंतव्यासाठीं (विचार करण्यासाठीं) मननव्यापारवर्जित असा कालही असणें शक्य नाहीं. कारण काल ही मनःकल्पना आहे व मंत्याला (आत्म्याला) मन नाहीं. 'जो मनानें केव्हांही मनन करीत नाहीं' अशी श्रुतिही आहे. याप्रमाणें अत्यक्ष प्रमाणाच्या संबंधानें (आत्मा मनानें मनन करितो, यासंबंधानें) अनेक दोष उत्पन्न होतात. आतां अनुमानपक्षानें पाहिलें असतां काय निष्पन्न होतें, पाहूं या. जेव्हां आत्मा कोणत्या तरी चिह्नाचीं (हेतूचा) आश्रय करून आत्मस्वरूपाविषयींचें अनुमान

करितो, त्यावेळीं वर सांगितल्याप्रमाणेंच (१) मंतव्य आत्मा व (२) मंता आत्मा, असे दोन आत्मे मानण्याचा प्रसंग येतो. दोन आत्मे मानणें शक्य नाहीं. एकच दोन स्वरूपें घेतो, असें म्हटले तरी आतांच प्रत्यक्ष-पक्षाचें विवेचन करितांना प्राप्त झालेले दोष उत्पन्न होतात. तेव्हां इत्यर्थ हा कीं, जीव काय ? किंवा आत्मा काय ? त्यांचें प्रत्यक्षप्रमाणानें किंवा अनुमानानें ज्ञान होणें शक्य नाहीं.

न प्रत्यक्षेण, नाप्यनुमानेन ज्ञायते चेत्, कथमुच्यते 'स म आत्मेति विद्यात्' इति, कथं वा श्रोता मन्तेत्यादि ? ननु श्रोतृत्वादिधर्मवानात्मा, अश्रोतृत्वादि च प्रसिद्धमात्मनः; किमत्र विषमं पश्यसि ? यद्यपि तव न विषमम्; तथापि मम तु विषमं प्रतिभाति । कथम् ? यदासौ श्रोता, तदा न मन्ता; यदा मन्ता, तदा न श्रोता । तत्रैवं सति, पक्षे श्रोता मन्ता, पक्षे न श्रोता नापि मन्ता । तथा अन्यत्रापि च । यदैवम्, तदा श्रोतृत्वादिधर्मवानात्मा अश्रोतृत्वादिधर्मवानन्वेति संशयस्थाने कथं तव न वैषम्यम् ? यदा देवदत्तो गच्छति, तदा न स्थाता, गन्तैव । यदा तिष्ठति, न गन्ता, स्थातैव; तदास्य पक्ष एव गन्तृत्वं स्थातृत्वं च, न नित्यं गन्तृत्वं स्थातृत्वं वा, तद्वत् । तथैवात्र काणादादयः पश्यन्ति । पक्षप्राप्तेनैव श्रोतृत्वादिना आत्मोच्यते श्रोता मन्तेत्यादिवचनात् । संयोगजत्वमयौगपद्यं च ज्ञानस्य ह्याचक्षते । दर्शयन्ति च अन्यत्रमना अभूवं नादर्शम् इत्यादि युगपज्ज्ञानानुत्पत्तिर्मनसो लिङ्गमिति च न्याय्यम् । भवत्वेवं किं तव नष्टं यद्येवं स्यात् ? अस्त्वेवं तवेष्टं चेत्; श्रुत्यर्थस्तु न संभवति । किं न श्रोता मन्तेत्यादिश्रुत्यर्थः ? न, न श्रोता न मन्तेत्यादिवचनात् । ननु पाक्षिकत्वेन प्रत्युक्तं त्वया; न, नित्यमेव श्रोतृत्वाद्यभ्युपगमात्, 'न हि श्रोतुः श्रुतेर्विपरिलोपो विद्यते' इत्यादिश्रुतेः । एवं तर्हि नित्यमेव श्रोतृत्वाद्यभ्युपगमे, प्रत्यक्षविरुद्धा युगपज्ज्ञानोत्पत्तिः अज्ञानाभावश्चात्मनः कल्पितः स्यात् । तच्चानिष्टमिति । नोभयदोषोपपत्तिः, आत्मनः श्रुत्यादिश्रोतृत्वादि धर्मवत्त्वश्रुतेः । अनित्यानां मूर्तानां च चक्षुरादीनां दृष्टाद्यनित्यमेव संयोगवियोगधार्मणाम् । यथा अग्नेर्ज्वलनं तृणादिसंयोगजत्वात्, तद्वत् । न तु नित्यस्यामूर्तस्यासंयोगविभागधार्मणः संयोगजदृष्टाद्यनित्यधर्म-

वत्त्वं संभवति । तथा च श्रुतिः ' न हि द्रष्टुर्दृष्टेर्विपरिलोपो विद्यते ' इत्याद्या । एवं तर्हि द्वे दृष्टी चक्षुषोऽनित्या दृष्टिः नित्या चात्मनः । तथा च द्वे श्रुती श्रोत्रस्यानित्या, नित्या चात्मस्वरूपस्य । तथा द्वे मती विज्ञाती बाह्याबाह्ये । एवं ह्येव चेयं श्रुतिरुपपन्ना भवति— ' द्रष्टेर्द्रष्टा श्रुतेः श्रोता ' इत्याद्या । लोकेऽपि प्रसिद्धं चक्षुस्तिमिरागमापाययोः नष्टा दृष्टिः जाता दृष्टिः इति चक्षुर्दृष्टेरनित्यत्वम् । तथा च श्रुतिमत्यादीनामात्मदृष्ट्यादीनां च नित्यत्वं प्रसिद्धमेव लोके । वदति ह्युद्धृतचक्षुः स्वप्नेऽद्य मया भ्राता दृष्ट इति । तथा अवगतबाधिर्यः स्वप्ने श्रुतो मन्त्रोऽद्येत्यादि । यदि चक्षुःसंयोग जैवात्मनो नित्या दृष्टिस्तन्नाशे नश्येत्, तदा, उद्धृतचक्षुः स्वप्ने नीलपीतादि न पश्येत । ' नहि द्रष्टुर्दृष्टेः ' इत्याद्या च श्रुतिः अनुपपन्ना स्यात् । 'तच्चक्षुः पुरुषे येन स्वप्नं पश्यति ' इत्याद्या च श्रुतिः । नित्या आत्मनो दृष्टिर्बाह्यानित्यदृष्टेर्ग्राहिका । बाह्यदृष्टेश्च उपजनापायाद्यनित्यधर्मवत्त्वात् ग्राहिकाया आत्मदृष्टेस्तद्वदवभासत्वमनित्यत्वादि भ्रांतिनिमित्तं लोकस्येति युक्तम् । यथा भ्रमणादिधर्मवदलातादिवस्तुविषयदृष्टिरपि भ्रमतीव, तद्वत् । तथा च श्रुतिः ' ध्यायतीव लेलायतीव ' इति । तस्मादात्मदृष्टेर्नित्यत्वान्न यौगपद्यमयौगपद्यं वा अस्ति । बाह्यानित्यदृष्ट्युपाधिवशात्तु लोकस्य । तार्किकाणां च आगमसंप्रदायवर्जितत्वात् अनित्या आत्मनो दृष्टिरिति भ्रांतिरुपपन्नैव । जीवेश्वरपरमात्मभेदकल्पना च एतन्निमित्तैव । तथा अस्ति नास्ति, इत्याद्याश्च यावन्तो वाङ्मनसयोर्भेदा यत्रैकं भवंति, तद्विषयाया दृष्टेर्निर्विशेषायाः । अस्ति नास्ति, एकं नाना, गुणवद्गुणम्, जानाति न जानाति, क्रियावदक्रियम्, फलवदफलम्, सबीजं निर्बीजम्, सुखं दुःखम्, मध्यममध्यम्, शून्यमशून्यम्, परोऽहमन्यः, इति वा सर्ववाक्प्रत्ययागोचरे स्वरूपे यो विकल्पयितुमिच्छति, स नूनं खमपि चर्मवद्वेष्टयितुमिच्छति, सोपानमिव च पद्भ्यामारोढुम्; जले खे च मीनानां वयसां च पदं दिदृक्षते; ' नेति नेति ' ' यतो वाचो निवर्तन्ते ' इत्यादि श्रुतिभ्यः ' को अद्धा वेद ' इत्यादि-मन्त्रवर्णात् ।

पूर्व०—असें जर आहे, प्रत्यक्षानें व अनुमानानें ज्ञान होत नाहीं, हा जर श्रुत्यर्थ आहे, तर 'हा माझा आत्मा आहे, असें जाणून घ्यावें' किंवा 'आत्मा हा श्रोता मंता आहे' असें श्रुती सांगत असतात, त्याची वाट काय?

शिष्य—आत्मा हा नित्य श्रोतृत्वादि-धर्मयुक्त आहे, व आत्म्याचें अश्रोतृत्वही श्रुतिप्रसिद्धच आहे. येथें तुम्हांला वैषम्य कोठें दिसतें?

पूर्व०—तुम्हांला वैषम्य दिसत नसेल, पण मला तर वैषम्य स्पष्ट दिसतें.

शिष्य—तें कसें?

पूर्व०—ज्यावेळीं तो श्रोता असतो, त्यावेळीं तो मंता नसतो, व ज्यावेळीं तो मंता असतो, त्यावेळीं तो श्रोता नसतो, असें झालें म्हणजे कधीं तो श्रोता व मंता आणि कधीं तो श्रोता नाहीं व मंताही नाहीं, असें होतें. याप्रमाणें तो नित्य श्रोता व मंता नाहीं, असें होतें. याच-प्रमाणें त्याचें द्रष्टत्व, विज्ञातृत्व इत्यादिसुद्धां अनित्य होतात. तात्पर्य, आत्मा कधीं श्रोतृत्वादि धर्मवान् व कधीं तसा नाहीं, हा पक्ष सिद्ध झाला. याप्रमाणें आत्मा हा श्रोतृत्वादि धर्मवान् आहे किंवा अश्रोतृत्वादि धर्मवान् आहे, असा संशय प्रत्येक वेळीं उत्पन्न होतो; हें खरें असतांहि तुम्हांला वैषम्य दिसत नाहीं, याला काय म्हणावें? अहो, ज्यावेळीं देवदत्त चालत असतो, त्यावेळीं तो स्थिर नसतो, तो चालणाराच असतो, त्याचप्रमाणें तो ज्यावेळीं स्थिर असतो, त्यावेळीं तो चालणारा नसतो, तर स्थिरच असतो. तात्पर्य, त्याचें चलनत्व किंवा स्थिरत्व नित्य नसतें; म्हणजे त्यांचें चलन नित्य नसतें, व त्याचें स्थिरत्वही नित्य नसतें. याचप्रमाणें आत्म्याचें श्रोतृत्व व अश्रोतृत्व नित्य नाहीं. म्हणजे श्रोतृत्वादि नित्य नाहीं. तसेंच, अश्रोतृत्वादि नित्य नाहीं. दोन्हींही अनित्य आहेत. येथें आचार्य काणादादि काय म्हणतात; तेंही पहाः 'आत्म्याला श्रोतृत्वादि आहे, म्हणून त्याला श्रोता, मंता इत्यादि म्हणतात. आतां त्याला जें ज्ञान होतें, तें आत्मा आणि मन यांचा प्रथम संयोग होऊन नंतर इंद्रियद्वारा मनाचा पदार्थांशीं संयोग झाला म्हणजे ज्ञान होतें. मन अणु आहे, म्हणून त्याला सर्व विषयाचें ज्ञान एककालीं होत नाहीं. 'माझें मन दुसरीकडे गेलें होतें; म्हणून मला हा पदार्थ दिसला नाहीं' इत्यादि आपण नित्य म्हणतों. अर्थात् सर्व पदार्थांचें एकदम ज्ञान होणें; अशक्य आहे; असें काणादाप्रमाणेंच आपणही म्हणतों. एकदम ज्ञान न होणें हेंच मनाच्या अणुत्वाचे चिन्ह आहे. तात्पर्य 'आत्मा हा नित्य श्रोतादि नाहीं व नित्य अश्रोतादि ही नाहीं,' असें काणादप्रमुख नैय्यायिक म्हणतात. असेंच तुम्ही ही म्हणा. उगीच 'नित्य साक्षी आत्मा आहे, म्हणून त्याचे श्रोतृत्वादि ही नित्य आहे व कधींकाळीं होणारें ज्ञान मिथ्या आहे म्हणून असत् आहे व याअर्थीं आत्मा हा नित्य अश्रोता आहे,' अशी भानगड उत्पन्न करितां कशाला? आत्म-मनाचा संयोग झाला म्हणजे त्याला विषयज्ञान होतें, असें म्हणा; यांत तुमचें बिघडतें काय?

सिद्धान्ती—असें असेल, तर असो बापडें ! तुम्हाला जर 'आत्म्याचें श्रोतृत्व अनित्य आहे' असें म्हणणें गोड वाटत असेल, तर खुशाल म्हणा; पण श्रुतीचा अर्थ मात्र येथें विपरीत होतो. तुमच्या म्हणण्यानें श्रुतीचा खरा अर्थ संभवत नाहीं.

पूर्व०—कां नाहीं संभवत ? 'आत्मा श्रोता व मंता इत्यादि आहे.' हाच श्रुतीचा अर्थ आहे.

सिद्धान्ती—नाहीं. कारण, 'तो श्रोता नाहीं, तो मंता नाहीं.' इत्यादि श्रुति-वचनें स्पष्ट आहेत.

पूर्व०—हें काय ? तुम्हीं एकाच श्रुतीचा आश्रय घेऊन आम्हांला प्रत्युत्तर देत आहां.

सिद्धान्ती—नाहीं नाहीं. आत्म्याचे **श्रोतृत्वादि धर्म नित्य** आहेत, हें गृहीत करूनच आम्ही तुम्हांस उत्तर देतों आहों. 'श्रोत्याच्या श्रुतीचा लोप केव्हांही होत नाहीं.' इत्यादि श्रुति प्रमाण आहेत.

पूर्व०—असें असेल, तर म्हणजे 'आत्म्याचें श्रोतृत्वादि धर्म नित्य आहेत' असें गृहीत केलें, तर एकदम सर्व ज्ञान व्हावें, पण तसें तर होत नाहीं. अर्थात् या प्रत्यक्ष अनुभवाशीं, प्रत्यक्षप्रमाणाशीं विरोध येतो, आणि 'आत्मा हा सर्वज्ञ आहे, आणि तेथें अज्ञानाचा अभाव आहे.' असें म्हणावें लागतें; आणि हें तर अनिष्ट आहे. कारण तसा अनुभव नाहीं.

सिद्धान्ती—नाहीं. सांगतों ऐका. तुम्हीं म्हणतां, ते दोन्हीही दोष उपपन्न होत नाहींत. 'आत्मा हा श्रुत्यादि धर्मवान् आणि श्रोतृत्वादि धर्मवान् आहे.' अशी श्रुतिच आहे. म्हणजे तो सर्वसाक्षी असल्यामुळें त्याचें ज्ञान व त्याचें ज्ञातृत्व हीं नित्य आहेत.

पूर्व०—मग विषयज्ञानाला अनित्य म्हणतां, याचें तात्पर्य काय ?

सिद्धान्ती—नेत्रकर्णादिकांसारख्या अनित्य व साकार इंद्रियांची दृष्टि, श्रवण, इत्यादि सर्व (रूपज्ञान, शब्दज्ञान इत्यादि सर्व क्षणभंगुर वृत्ति) अनित्य असतें, कारण, अर्थांचा इंद्रियांशीं, इंद्रियांचा मनाशीं व तुमच्या प्रक्रियेप्रमाणें मनाचा आत्म्याशीं जेव्हां संयोग होतो, तेव्हां विषय-ज्ञान होतें व यांचा वियोग होतो तेव्हां ज्ञान होत नाहीं. म्हणून शब्दरूपादि ज्ञान अनित्य असतें. तृणादिकांचा अग्नीशीं संयोग होतो, तेव्हां ज्वालेचा आविर्भाव होतो. म्हणून ही ज्वाला जशी अनित्य, त्याप्रमाणेंच विषयज्ञान अनित्य असतें. पण आत्मा नित्य आहे. अग्नीची दाहकशक्ति जशी नित्य, तसा आत्मा हा ज्ञानरूप अमूर्त (निराकार) आहे; हा सर्वव्यापी असल्यामुळें येथें संयोग-वियोगांचा संबंध येत नाहीं. म्हणून संयोग-द्वारानें उत्पन्न झालेल्या साकार नामरूपादि ज्ञानाप्रमाणें आत्म्याचें ज्ञान अनित्य नसतें. 'द्रष्ट्याच्या दृष्टीचा

(आत्म्याच्या ज्ञानाचा) लोप (अभाव) केव्हाही होत नाहीं' इत्यादि श्रुती आम्ही म्हणतों त्याला प्रमाण आहेत.

पूर्व०—याप्रमाणें दोन दृष्टी झाल्या—**नेत्राची दृष्टि अनित्य** आणि **आत्म्याची नित्य.** तसेंच, श्रोत्राचें श्रवण अनित्य आणि आत्मस्वरूपाचें नित्य; तसेंच, मनन ही दोन प्रकारचें, ज्ञान दोन प्रकारचें, एक बाह्य आणि एक अबाह्य (एक विषयज्ञान आणि एक आत्मज्ञान)—हे आमचें विभाजन तुम्हांस कबूल आहे काय ?

सिद्धान्ती—हो ! हो !! कबूल आहे; म्हणून काय विचारावें ? असा अर्थ केला तरच 'दृष्टीचा द्रष्टा, श्रुतीचा श्रोता' इत्यादि श्रुतींची व्यवस्था लागेल. तात्पर्य दृष्टि (रूप) श्रुति (शब्द) इत्यादि अनित्य, नेत्रकर्णादि अनित्य असेनात, पण या सर्वांचा साक्षी नित्य असतो. व्यवहारांतही प्रसिद्ध आहे कीं, डोळ्याला कांहीं विकार झाला, तर दृष्टि मंद होते किंवा नष्ट होते व तो विकार नाहींसा झाला म्हणजे दृष्टि येते, पुनः प्राप्त होते. म्हणजे **नेत्राच्या दृष्टीचें अनित्यत्व** व्यवहारांतही सर्व-मान्य आहे. याचप्रमाणें **कर्णाचें श्रवण, मनाचें मनन** इत्यादि सर्व अनित्य असतात. पण आत्मदृष्टीचें किंवा आत्मश्रुतीचें तसें नाहीं. आत्मदृष्टि, आत्मश्रुति, आत्ममति, इत्यादि नित्य असतात. हें मुद्दां व्यवहारांत प्रसिद्ध आहे. आपण नित्य म्हणतों कीं, माझे डोळे स्तब्ध व निमीलित झालें असतांही किंवा मी अंधळा असतांही स्वप्नांमध्यें मी आज आपला बंधु पाहिला. तसेंच, ज्याला बधिरत्व प्राप्त झालें आहे, तोही म्हणतो कीं, मी आज स्वप्नामध्यें मंत्राचें श्रवण केलें. हीं व अशा प्रकारचीं वाक्यें काय सुचवितात बरें ? डोळे नसतांही आत्म्यास दिसतें, व कान बहिरे असतांही त्याला स्वप्नामध्यें ऐकावयास येतें, इत्यादींचा अर्थ आत्मदृष्टि व आत्मश्रुति इत्यादि नित्य आहेत, असें सुचवीत नाहींत काय ? उलटपक्षीं, जर चक्षुःसंयोगानें मात्र उत्पन्न होणारी आत्मदृष्टि नित्य आहे, असें म्हटलें, तर नेत्रनाश झाला असतां अंधळ्याला किंवा नेत्रसंयोगाच्या अभावीं स्वप्नस्थाला स्वप्नामध्यें निळें, पिवळें इत्यादि रूप दिसणार नाहीं. आणि 'द्रष्ट्याची दृष्टि' इत्यादि श्रुति अनुपपन्न होईल. सारांश, 'ज्याच्या सत्तेनें स्वप्नांमध्यें पाहणें ही क्रिया होते, जो शरीरामध्यें राहून साक्षी असतो' इत्यादि श्रुतीही उपपन्न होणार नाहींत. सारांश, नित्य आत्म्याची दृष्टि (साक्षित्व) ही बाह्य आणि अनित्य असणाऱ्या दृष्टीची ग्रहणकर्त्री आहे. आतां बाह्यदृष्टीला उत्पत्ति, विनाश इत्यादि अनित्य धर्म असल्यामुळें तिच्या मुळें तिचीही ग्राहक असणारी आत्मदृष्टिहि तिच्यासारखीच आहे, तीही अनित्य आहे, असा आभास व्यवहारांत होतो, हें म्हणणें योग्य आहे; पण आत्मदृष्टि अनित्य आहे, हें व्यवहारांतील बोलणें आहे. परमार्थतः 'आत्मदृष्टि अनित्य आहे' असें म्हणणें ही भ्रांति आहे. एक उदाहरणच पहा. भ्रमण करणें इत्यादि धर्म असणाऱ्या

अलातादि वस्तु ज्या दृष्टीचे विषय असतात, ती दृष्टिसुद्धां अलातादिकांच्या भ्रमणाप्रमाणें भ्रमण करिते, अशी आपल्याला व्यवहारांत भ्रांति होते. आपली दृष्टी स्थिर असते, तथापि ती फिरत आहे, असा आपल्यास भ्रम होतो. तसाच आत्मदृष्टिसंबंधानेंही आपल्यास भ्रम होतो. 'आत्मा जणूं कांहीं ध्यान करितो आहे, क्रीडा करितो आहे' असे उल्लेख करणारी श्रुतिही आमच्या विधानास प्रमाण आहे. असो; या सर्व विवेचनावरून असा सिद्धांत निघतो, कीं आत्मदृष्टि नित्य आहे, तिचे ठिकाणीं यौगपद्य (एककालीं सर्व ज्ञान होणें) किंवा अयौग्यपद्य (क्रमाक्रमानें, एकामागून दुसऱ्याचें ज्ञान होणें आत्म्याचे ठिकाणीं) नाहीं. आत्मेतर वस्तू अनेक आहेत, म्हणून आत्म्याला अनेक वस्तूंचें ज्ञान एकदम होणें किंवा आत्मेतर वस्तुच नाहीं म्हणून यौगपद्याचा अभाव असणें, हें त्याचेठिकाणीं कांहींच संभवत नाहीं. नैय्यायिक काय, किंवा इतर पंडित काय, यांची गोष्ट पुढें बोलूं. पण बाकीचे सर्व लोक (पंडित व अपंडित) बाह्य व अनित्य-दृष्टीच्या उपाधीला वश झाले असल्यामुळें त्यांना आत्मदृष्टि नित्य आहे, हें समजत नाहीं. तसेंच, तर्कप्रधानादि पंडितांनीं वेदाचा संप्रदाय टाकून दिल्यामुळें, वेदरहस्याचा त्यांनीं अनादर केल्यामुळें 'आत्मदृष्टि अनित्य आहे' अशी त्यांस भ्रांति उत्पन्न होते, हेंही योग्यच आहे. जीव, ईश्वर आणि परमात्मा इत्यादि कल्पनाविजृंभणानें केलेले पदार्थ आहेत. ते परमार्थतः अवैदिक म्हणजे ह्या सर्व भेदमूलक कल्पना अज्ञान्यजन्य व्यर्थ हे लोक उत्पन्न करितात. पण 'ही कल्पना भ्रांतिनिमित्त आहे.' त्याचप्रमाणें 'आत्मा आहे,' 'आत्मा नाहीं' इत्यादि जे जे म्हणून कांहीं **वाणीनें** आणि **मनानें** भेद उत्पन्न केले आहेत, ते सर्व भेदही जेथें एकरूप होतात, तो वस्तु नित्य आणि निर्विशेषदृष्टीचा मात्र विषय आहे. सारांश, सर्व भेद नष्ट करणारी आत्मवस्तु आत्मवस्तूनेंच समजून घ्यावयाची आहे. आत्मवस्तु स्वसंवेद्य आहे. असें असतांही 'तो आहे,' 'तो नाहीं' 'तो अनेकगुणसंपन्न आहे,' 'तो निर्गुण आहे,' 'तो ज्ञानी आहे, ज्ञानी नाहीं,' 'तो क्रियावान् आहे,' 'तो क्रियावान् नाहीं,' 'तो फलवंत आहे,' 'तो निष्फल आहे,' 'तो सबीज आहे,' 'तो निर्बीज आहे,' 'तो सुखरूप आहे,' 'तो दुःखरूप आहे,' 'तो शरीरामध्यें असतो,' 'तो तेथें नसतो,' 'तो शून्यरूप आहे,' 'तो शून्य रूप नाहीं,' 'तो निराळा आहे व मी निराळा आहें' इत्यादि सर्व मनःकल्पना जो कोणी पंडित वाणीला व ज्ञानाला अगोचर असणाऱ्या एक व एकरसात्मक आत्म्याचेठिकाणीं आरोपूं इच्छितो, तो खरोखर आकाशालाही चर्माचें वेष्टन घालूं इच्छितो किंवा आकाशांत पायानें जाण्यासाठीं एखाद्या सोपानाची (जिन्याची) विरचना करितो! असें म्हटलें पाहिजे. जलामध्यें मत्स्याचीं किंवा अंतरालांत पक्ष्यांची पाऊलें पाहूं इच्छिणाऱ्या पंडितांच्या ज्ञानकर्तृत्व संबंधानें काय बोलावयाचें! अर्थात् हे सर्व पंडित अवैदिक आहेत, भ्रांतियुक्त आहेत, असें मात्र म्हणून आम्हीं थांबतों. अहो, 'तो हें नव्हे, तो तें नव्हे,' 'जेथून वाणी परत मागे फिरते, वाक्यें वदणारी श्रुति जेथें थकते, इत्यादि' किंवा

'कोणी हें सर्व जाणलें आहे?' इत्यादि मंत्र प्रकट करणारे वेदांनीं जेथें हात टकले, तो सर्वव्यापी केवल परमात्मा वाणी-मनादिकांस सर्वथा अगोचर आहे, असेंच आपल्यास म्हणणें भाग नाहीं काय? तात्पर्य, तो एक आहे, नित्य आहे, भेदशून्य आहे, सर्वसाक्षी आहे; हा श्रुतिविगीत सिद्धांत होय. आपल्या दृष्टीनें व श्रुतीच्याही दृष्टीनें तो सर्वथा अज्ञेय आहे.

कथं तर्हि तस्य स म आत्मेति वेदनम्; ब्रूहि केन प्रकारेण तमहं स म आत्मेति विद्याम्। अत्राख्यायिकामाचक्षते-कश्चित्किल मनुष्यो मुग्धः कैश्चिदुक्तः कस्मिंश्चिदपराधे सति धिक्त्वां नासि मनुष्य इति। स मुग्धतया आत्मनो मनुष्यत्वं प्रत्याययितुं कंचिदुपेत्याह-ब्रवीतु भवान्कोऽहमस्मीति। स तस्य मुग्धतां ज्ञात्वा आह-क्रमेण बोधयिष्यामीति। स्थावराद्यात्मभावमपोह्य न त्वममनुष्य इत्युक्त्वोपरराम। स तं मुग्धः प्रत्याह-भवान्मां बोधयितुं प्रवृत्तस्तूष्णीं बभूव, किं न बोधयतीति। तादृगेव तद्भवतो वचनम्। नास्यमनुष्य इत्युक्तेऽपि मनुष्यत्वमात्मनो न प्रतिपद्यते यः; स कथं मनुष्योऽसीत्युक्तोऽपि मनुष्यत्वमात्मनः प्रतिपद्येत? तस्माद्यथाशास्त्रोपदेश एवात्मावबोधविधिः, नान्यः; न ह्यग्नेर्दाह्यं तृणादि अन्येन केनचिद्दग्धुं शक्यम्। अत एव शास्त्रमात्मस्वरूपं बोधयितुं प्रवृत्तं सत् अमनुष्यत्वप्रतिषेधेनैव 'नेति नेति' इत्युक्त्वोपरराम। तथा 'अनन्तरमबाह्यम्' 'अयमात्मा ब्रह्म सर्वानुभूः' इत्यनुशासनम्'; 'तत्त्वमसि' 'यत्र त्वस्य सर्वमात्मैवाभूत्तत्केन कं पश्येत्' इत्येवमाद्यपि च। यावदयमेव यथोक्तमिममात्मानं न वेत्ति, तावदयं बाह्यानित्यदृष्टिलक्षणमुपाधिमात्मत्वेनोपेत्य अविद्यया उपाधिधर्मानात्मनो मन्यमानो ब्रह्मादिस्तम्बपर्यन्तेषु स्थानेषु पुनः पुनरावर्तमानः अविद्याकामकर्मवशात्संसरति। स एवं संसरन् उपात्तदेहेन्द्रियसंघातं त्यजति। त्यक्त्वा अन्यमुपादत्ते। पुनः पुनरेवमेव नदीस्रोतोवज्जन्ममरणप्रबंधाविच्छेदेन वर्तमानः कामिरवस्थाभिर्वर्तते इत्येतमर्थं दर्शयन्त्याह श्रुतिः वैराग्यहेतोः—

पूर्व०—तर मग 'तो माझा आत्मा आहे' हें ज्ञान तरी कसें होणार? कोणत्या मार्गानें तो माझा आत्मा आहे, हें मी जाणून घेऊं? सांगा. आत्मा अज्ञेय, असें तुम्ही म्हणतां.

सिद्धान्ती—तुम्हांस एक दंतकथातुल्य असणारी गोष्ट सांगतों. तिच्यावरून कांहीं बोध झाला तर पहा. मागें एकदां एका मूर्ख मनुष्यानें कांहीं अपराध केला

होता. तेव्हां लोकांनीं त्याचा धिक्कार केला आणि म्हणाले 'तूं मनुष्यच नव्हेस.' तो बेटा मूर्खच। तेव्हां आपण मनुष्य आहों कीं नाहीं, हें पारखून घेण्याकरितां तो एका समंजस गृहस्थाकडे गेला आणि म्हणाला. 'भगवन्, मी कोण आहे, तें मला सांगा.' तेव्हां विचारणारा मनुष्य अज्ञानी आहे, असें समजून उत्तर देणाऱ्या मनुष्यानें 'क्रमाक्रमानें याला बोध करूं' असा विचार केला व म्हणाला, 'तूं स्थावरादि रूपवान् नाहींस, तूं पशु नव्हेस तूं अमनुष्य नाहींस,' असें बोलून तो थांबला. तेव्हां पुनः अज्ञानी मनुष्य म्हणाला, 'मला बोध करण्यासाठीं आपण कृपा करून सिद्ध झालांत आणि मध्येंच कां थांबलांत ?' हें जसें अज्ञानी मनुष्याचें करणें व बोलणें, त्याप्रमाणेंच तुमची ही प्रस्तुतची शंका आहे। 'तूं अमनुष्य नाहींस' असें सांगितलें असतांही ज्या पुरुषाला आपल्या मनुष्यत्वाची प्रतिपत्ति होत नाहीं, त्याला 'तूं मनुष्य आहेस' असें सांगितलें, तरी आपल्या मनुष्यत्वाचें ज्ञान थोडेंच होणार। तुम्हींच पहाः 'आपला आत्मा स्थावर-जंगमादि ज्ञेय वस्तु नाहीं. तो इंद्रियमनोगोचर नाहीं' असें सांगीतलें असतांही 'मला आत्मज्ञान कसें होणार ?' असें विचारीतच आहां ! जी स्वतः गोष्ट समजावयाची, ती मला सांगा असें म्हणणाराला काय सांगावें ? मला क्षुधा लागली आहे कीं नाहीं, हें ओळखायला शिकवा, असें विचारणाराला काय शिकवावयाचें ? म्हणून ज्याप्रमाणें शास्त्रानें 'आत्मा हें नव्हें' 'आत्मा तें नव्हें' असा उपदेश केला आहे, श्रुतीनें ज्या मायानिरासाच्या मार्गानें जावयास सांगितलें आहे, तोच आत्मज्ञानाचा मार्ग आहे, दुसरा नाहीं. तृणादि दग्ध करण्याचें अग्निसामार्थ्य दुसऱ्या पदार्थास असणें शक्य नाहीं, त्याप्रमाणें आत्मबोध करण्याचें सामर्थ्य आत्मेतर वस्तुला असणें शक्य नाहीं. हें सर्व मनांत आणून आत्मस्वरूप सांगण्यासाठीं प्रवृत्त झालेलें शास्त्र, 'तूं अमनुष्य नाहींस' असें म्हणून सिद्ध होणाऱ्या मनुष्यत्वाप्रमाणें 'तूं हें नाहींस' 'तूं तें नाहींस' इतका प्रतिषेध करून स्तब्ध होतें. कारण, आत्मस्वरूपाचा प्रत्यक्ष निर्देश करणें शास्त्रालाही शक्य नाहीं. याचप्रमाणें हें आत्मरूप एकरस आहे, अबाह्य आहे, ब्रह्म आहे, सर्व अनुभवाचा साक्षी आहे,' हें उपदेश किंवा 'तूं तें आहेस' हा सिद्धांत किंवा 'जेथें सर्वच आत्मरूप झालें, तेथें कोणी पाह्यवें आणि काय पाहावें' इत्यादि आप्तश्रुतींचा अभिप्राय लक्षांत आणा, म्हणजे आम्ही काय म्हणतों, तें तुमच्या लक्षांत येईल; पण जावत्कालपर्यंत आतांच सांगितलेलें स्वरूप जो जीव, जावत्कालपर्यंत बाह्य आणि अनित्य दृष्टि असणें हेंच लक्षण ज्या उपाधीचें आहे, ती उपाधि आपणच आहोंत, अशीच कल्पना करीत राहील, अविद्येनें उत्पन्न केलेले उपाधि-धर्म आत्म्याचे-ठिकाणीं आरोपित करील, तो जीव तावत्कालपर्यंत अविद्येनें उत्पन्न होणाऱ्या वासनेच्या प्रेरणेनें कर्म करून देव, पशु, पक्षी, मनुष्य इत्यादि ब्रह्मादिस्तंबपर्यंतच्या अनेक योनींमध्यें जन्ममरणाचें दुःख भोगीत राहील ! असा संसार करितां करितां प्राप्त झालेल्या देह-इंद्रियादि संघाताचा तो त्याग करील व लागलींच दुसऱ्या देहेंद्रियादिकांचा स्वीकार करील! आणि याप्रमाणें नदीच्या प्रवाहप्रमाणें-सतत वाहणाऱ्या जन्ममरणांच्या

अविच्छिन्न संसारांत अनेक कष्ट भोगित होत्साता अज्ञानामध्यें डुंबत राहील. असो, हा अर्थ स्पष्टपणें सांगण्यासाठीं व जीवास प्राप्त होणाऱ्या अवस्थांचें बीभत्सत्व पाहून तरी वैराग्य उत्पन्न व्हावें, यासाठीं चतुर्थ-खंडांतील कित्येक मंत्रांचा अवतार श्रुति करीत आहे. असो; सर्वजण इकडे सावधान असा, असें सूचवून श्रुतिमंत्रांचें प्रवचन करण्यास आम्ही आरंभ करितोः—

मंत्र पहिला.

हरिः ॐ। पुरुषे ह वा अयमादितो गर्भो भवति। यदेतद्रेतस्तदेतत्सर्वेभ्योऽङ्गेभ्यस्तेजःसंभूतमात्मन्येवात्मानं बिभर्ति तद्यदा स्त्रियां सिञ्चत्यथैनज्जनयति तदस्य प्रथमं जन्म ॥ १ ॥

अन्वय व अर्थः—**अयं ह वै आदितः पुरुषे गर्भः भवति** (हा वासना आणि अभिमान असणारा जीव प्रथम **पुरुषाच्या** शरीरामध्यें गर्भरूपानें राहतो) **यत् एतत् रेतः** (हा गर्भ म्हणजे जें रेत **असतें**, तें होय) **तत् एतत् सर्वेभ्यः अंगेभ्यः तेजःसंभूतं** (तें हें रेत म्हणजे मनुष्याच्या सर्व अंगांपासून उत्पन्न झालेलें तेज होय) **आत्मनि एव आत्मानं बिभर्ति** (पिता आपल्या शरीरामध्येंच त्या आत्मरूपाचें धारणपोषण करितो) **यदा स्त्रियां तत् सिंचति, अथ एनत् जनयति** (जेव्हां स्त्रीसमागम पूर्ण होऊन तेथें रेतोधान होतें, तेव्हां या त्या जीवाचा जन्म होतो) **तत् अस्य प्रथमं जन्म** (तो हा याचा पहिला जन्म आहे) ॥१॥

अयमेवाविद्याकामकर्माभिमानवान् यज्ञादिकर्म कृत्वा अस्माल्लोकाद्धूमादिक्रमेण चन्द्रमसं प्राप्य क्षीणकर्मा वृष्ट्यादिक्रमेण इमं लोकं प्राप्य अन्नभूतः पुरुषाग्नौ हुतः। तस्मिन्पुरुषे ह वै अयं संसारी रसादिक्रमेण आदितः प्रथमतः रेतोरूपेण गर्भो भवतीति एतदाह—यदेतत्पुरुषे रेतः, तेन रूपेणेति, तच्च एतत् रेतः अन्नमयस्य पिण्डस्य सर्वेभ्यः अङ्गेभ्यः अवयवेभ्यो रसादिलक्षणेभ्यः तेजः साररूपं शरीरस्य संभूतं परिनिष्पन्नं, तत् पुरुषस्य आत्मभूतत्वादात्मा, तमात्मानं रेतोरूपेण गर्भीभूतम् आत्मन्येव स्वशरीर

एव आत्मानं बिभर्ति धारयति । तत् रेतः स्त्रियां सिञ्चति यदा, यस्मिन्काले भार्या ऋतुमती तस्यां योषाग्नौ स्त्रियां सिञ्चति उपगच्छन्, अथ तदा एनत् एतद्रेतः आत्मनो गर्भरूपं जनयति पिता । तत् अस्य पुरुषस्य स्थानान्निर्गमनं रेतःसेककाले रेतोरूपेण अस्य संसारिणः प्रथमं जन्म प्रथमावस्थाभिव्यक्तिः । तदेतदुक्तं पुरस्तात् 'असावात्मा अमुमात्मानम्' इत्यादिना ॥ १ ॥

सिद्धान्ती—अविद्या म्हणजे माया. मायाजन्य काम (वासना) आणि तज्जन्य कर्म. या सर्वांचा अभिमान असणारा हाच जीव पूर्वजन्मीं यज्ञादि सकाम पुण्यकर्मे करून या लोकांतून धूमादि-मार्गानें (पितृयाण-मार्गानें) चंद्रलोकाप्रत जातो आणि तेथें त्याच्या पुण्य-कर्म-फलाचा उपभोगानें क्षय झाल्यावर †पर्जन्यवृष्टि इत्यादि क्रमानें पुनः मृत्युलोकीं येतो आणि अन्नस्वरूपी होऊन, पुरुषरूपी अग्नीमध्यें भक्षणरूपी आहुतीनें आहुत होतो. तात्पर्य, हा जीव पुरुष-शरीरांत अन्नरूपानें प्रवेश करितो. नंतर तेथें हा अन्नरूपानें पुरुष-शरीरांत गेलेला संसारी, रसादि जे सप्त धातु आहेत, त्यांच्या क्रमानें जातां जातां शेवटीं रेतोरूप होऊन प्रथमतः (गर्भस्वरूपानें) पुरुष-शरीरांत राहतो. सारांश, पुरुष-शरीरांत जी रेतोरूप धातु असते त्या रूपानें हा जीव राहतो. रेत ही शेवटची धातु आहे. उत्कृष्टतम आहे, म्हणजे अन्नमय जो हा आपला शरीर-पिंड आहे, त्याच्या सर्व अंगोपांगांपासून म्हणजे रस, रक्त, मांस, अस्थि इत्यादि इतर धातूंपासून उत्पन्न झालेलें हें तेज आहे. सारांश, रेत हें शरीराचें सारसर्वस्व आहे. अर्थात् हें पुरुषाचें आत्मभूत द्रव्य आहे. याप्रमाणें रेतःस्वरूप धारण करून पुरुष-गर्भामध्यें राहणारा व आत्मभूत झालेला संसारी (नवीन जीव) पित्याच्या शरीरामध्यें आत्मरूप होऊन राहतो आणि पुरुषही त्याचें आपल्या आत्म्याप्रमाणेंच धारण व संरक्षण करितो. नंतर भार्या ज्यावेळीं ऋतुमती होते, त्यावेळीं तिच्याशीं समागम करून त्या स्त्रीरूपी अग्नीमध्यें रेतोरूप आहुति देतो. नंतर गर्भभूत झालेल्या या पितृ-रेतोरूपी जीवाला-मातेच्या उदरीं जन्म प्राप्त होतो. म्हणजे पिता नवीन जन्माला येणाऱ्या संसारी जीवाला जन्म देतो. पुरुषाच्या जननेंद्रिय-स्थानांतून बाहेर निघून मैथुनकाळीं रेतोरूप स्खलनरूपानें ज्यावेळीं स्त्रीयोनि-सिंचित होते, त्यावेळीं या संसारी जीवाचा **प्रथम जन्म** होतो. अथवा हा जन्म म्हणजे प्रथम अवस्थेची अभिव्यक्ति (प्रकट होणें) आहे. 'हा आत्मा या स्वीय आत्म्याला' इत्यादि श्रुती आम्ही म्हणतों, याचें समर्थन करितात. 'हा आत्मरूपी पुरुष हा आपल्या आत्म्याला, स्वरेतो-रूपाला, आपल्या भार्यारूपी-हाही एक आत्माच आहे!-दान देतो'-हा आतांच उल्लेखिलेल्या श्रुतीचा अर्थ आहे ॥ १ ॥

---

† बृहदा० ६।२।२ पहा. आकाश, वायु, वृष्टि, पृथ्वी, अन्न असा हा क्रम आहे.

मंत्र दुसरा.

तत्स्त्रिया आत्मभूयं गच्छति यथा स्वमङ्गं तथा। तस्मादेनां न हिनस्ति सास्यैतमात्मानमत्र गतं भावयति ॥ २ ॥

अन्वय व अर्थः—यथा स्वं अंगं तथा तत्स्त्रियाः आत्मभूयं गच्छति (ज्याप्रमाणें आपलें अंग स्वशरीरच असतें, त्याप्रमाणें तें रेत स्त्रियेच्या शरीराचा एक भाग होतें) **तस्मात् एनां न हिनस्ति** (म्हणून त्या स्त्रीचा नाश हा गर्भस्थ जीव करीत नाहीं) **सा अस्य एतं आत्मानं अत्र गतं भावयति** (आणि ती स्त्री ही आपल्या पतीच्या रेताला, आपल्या उदरांत प्रविष्ट झालेल्या रेताला, स्वपति–शरीराचाच हा भाग आहे, असें समजून त्याचें संरक्षण करीते) ॥ २ ॥

तत् रेतः यस्यां स्त्रियां सिक्तं सत्तस्याः स्त्रियाः आत्मभूयम् आत्माव्यतिरेकतां, यथा पितुः एवं, गच्छति प्राप्नोति; यथा स्वमङ्गं स्तनादि, तथा तद्वदेव । तस्माद्धेतोः एनां मातरं स गर्भो न हिनस्ति पिटकादिवत् । यस्मात्स्तनादि स्वाङ्गवदात्मभूयं गतम्, तस्मान्न हिनस्ति न बाधत इत्यर्थः । अन्तर्वत्नी एतम् अस्य भर्तुरात्मानम् अत्र आत्मन उदरे गतं प्रविष्टं बुद्ध्वा भावयति वर्धयति परिपालयति गर्भविरुद्धाशनादिपरिहारम् अनुकूलाशनाद्युपयोगं च कुर्वती ॥ २ ॥

सिद्धान्ती—ज्या स्त्रीरूपी अग्नीमध्यें ह्या रेतोरूपी आहुतीचें सिंचन झालें, त्या स्त्रियेशीं तें रेत एकात्मभाव पावतें. पितृ–शरीरांत त्याला जशी एकरूपता प्राप्त झाली होती, तशीच स्त्री–पिंडाशीं या रेताची एकात्मकता होते आणि स्त्रियेचे जसे स्तनादि अवयव (शरीरघटक) असतात, तसाच हा गर्भही शरीराचें एक अंग होतो. हें एकरूपत्व प्राप्त झाल्यामुळें हा गर्भ आपल्या मातेचा नाश करीत नाहीं.

शिष्य—भगवन्! व्रण होऊन गांठी आल्या किंवा गळू वगैरे झालें, म्हणजे मनुष्यशरीराची हानि होते; त्याप्रमाणें हा गर्भ शरीर–हानि करीत नाहीं. कारण स्तनादि अवयवाप्रमाणें मातृ–शरीराशीं हा गर्भ एकरूप झालेला असतो. तात्पर्य गर्भाची आणि मातृ–शरीराची एकरूपता होते. असेंच ना ?

सिद्धान्ती—होय. पुढें, ती गर्भिणी ही आपल्या भर्त्याचें आत्मरूपच झालेला ह्या गर्भ (भर्त्याचा आत्मा) आपल्या उदरामध्यें प्रविष्ट झाला आहे, असें जाणून मोठ्या सावधपणानें त्याचें परिपालन करिते. गर्भाला प्रतिकूल होईल, तें सामोपिंपें वर्ज्य करून त्याला अनुकूल होईल, असेंच अन्नपान करित असते. वत्सा, गर्भिणीनें कसें वागावें आणि गर्भरक्षण कसें करावें व का करावें, हेंही प्रसंगोत्पात्त श्रुतीनें सहज सांगितलें आहे. जीवांच्या कल्याणाविषयीं श्रुतीची केवढी आस्था आहे पहा। ॥ २ ॥

मंत्र तिसरा.

सा भावयित्री भावयितव्या भवति, तं स्त्री गर्भं बिभर्ति, सोऽग्र एव कुमारं जन्मनोऽग्रेऽधि-भावयति। स यत्कुमारं जन्मनोऽग्रेऽधिभावयत्या-त्मानमेव तद्भावयत्येषां लोकानां संतत्या एवं संतता ह्यिमे लोकास्तदस्य द्वितीयं जन्म ॥ ३ ॥

अन्वय व अर्थः—**सा भावयित्री भावयितव्या भवति** (गर्भाचा सांभाळ करणाऱ्या त्या स्त्रियेचें संरक्षण तिच्या पतीनें केलें पाहिजे) **स्त्री तं गर्भं बिभर्ति** (स्त्री त्या गर्भाचें धारण करिते) **सः जन्मनः अग्रे एव कुमारं अधिभावयति** (पुत्रजन्माच्या आधीं पिता गर्भस्थ कुमाराचें संस्करण करितो) **अग्रे अधिभावयति** (जन्मानंतर तो कुमाराला संस्कृत करितो) **यत् कुमारं जन्मनः अग्रे सः अधिभावयति, आत्मानं एव तत् भावयति**(जन्मानंतर तो पिता कुमाराचे जें संस्करण व संरक्षण करितो, तें आपल्या स्वतःचेंच संरक्षण होय) **एवं एषां लोकानां संतत्या हि इमे लोकाः संततः** (या-प्रमाणें ह्या लोकांच्या पुत्रपौत्रादि संततीनें हे लोक, हे संसार, अविच्छिन्न राहिले आहेत) **तत् अस्य द्वितीयं जन्म** (तो याचा दुसरा जन्म आहे) ॥३॥

सा भावयित्री वर्धयित्री भर्तुरात्मनो गर्भभूतस्य भावयितव्या वर्धयि-तव्या च भर्त्रा भवति। न ह्युपकारप्रत्युपकारमन्तरेण लोके कस्य-चित्केनचित्संबन्ध उपपद्यते। तं गर्भं स्त्री यथोक्तेन गर्भधारण-विधानेन बिभर्ति धारयति। अग्रे प्राग्जन्मनः सः पिता अग्रे एव

पूर्वमेव जातमात्रं कुमारं जन्मनः अधि ऊर्ध्वं जन्मनः जातं कुमारं जातकर्मादिना पिता भावयति । सः पिता यत् यस्मात् कुमारं जन्मनः अधि ऊर्ध्वं अग्रे जातमात्रमेव जातकर्मादिना यद्भावयति, तत् आत्मानमेव भावयति; पितुरात्मैव हि पुत्ररूपेण जायते । तथा ह्युक्तम् ' पतिर्जायां प्रविशति ' इत्यादि । तत्किमर्थमात्मानं पुत्ररूपेण जनयित्वा भावयतीति उच्यते । एषां लोकानां संतत्यै अविच्छेदायेत्यर्थः, विच्छिद्येरन्हीमे लोकाः पुत्रोत्पादनादि यदि न कुर्युः । एवं पुत्रोत्पादनादिकर्माविच्छेदेनैव संततः प्रबन्धरूपेण वर्तन्ते हि यस्मात् इमे लोकाः, तस्मात्तदविच्छेदाय तत्कर्तव्यम्; न मोक्षायेत्यर्थः । तत् अस्य संसारिणः कुमाररूपेण मातुरुदराद्यन्निर्गमनम्, तत् रेतोरूपापेक्षया द्वितीयं जन्म द्वितीयावस्थाभिव्यक्तिः ॥ ३ ॥

सिद्धान्ती—गर्भाचें परिपालन करून गर्भवृद्धि करणाऱ्या-आपल्या मर्त्याचा अप्रत्यक्ष आत्माच गर्भभूत झाला आहे, अशी भावना धरून त्या गर्भाचें संरक्षण आणि संवर्धन करणाऱ्या-या-स्त्रियेचें रक्षणही तिच्या मर्त्यानें योग्यतऱ्हेनें केलें पाहिजे.

शिष्य—पत्नि संरक्षणार्ह होते;कारण भर्त्याच्या आत्म्याचें ती संरक्षण करीत असते? व्यवहारांत आपण दुसऱ्यावर जो उपकार करितों, तो दुसरा आपल्यावर प्रत्युपकार करील, हा अभिप्राय मनांत आणूनच-आपण उपकार-करीत असतों. उगीच उपकार करितो कोण कोणावर! उपकार-प्रत्युपकार असल्याशिवाय कोणीही दुसऱ्याशी संबंध ठेवीत नाहीं, असेंच ना?

सिद्धांती—होय. उपकाराला प्रत्युपकाराची जोड मिळेल, असा संभव असेल तरच व्यवहार-संबंध घडतो. परमार्थी मुमुक्षूच्या उपकाराची गोष्ट निराळी. असा हाच व्यावहारिक अभिप्राय मनांत आणून श्रुति म्हणतेः ती स्त्रीही वर सांगितलेल्या प्रकारें गर्भ-धारण करीत असते. शिवाय, पितापत्नी गर्भाचें संरक्षण करितात, तें तो पुढें सत्कर्म करून कुलपरंपरा चालवील, या आशेनें होय. असो; नंतर तो पिता प्रथमतःच, जन्म होण्याच्या आधीं, व जन्म झाल्यानंतर सीमंतादि व जातकर्मादि संस्कार करीत असतो. तो पिता कुमार-जन्माच्या आधी, कुमार-जन्म होतांच व जन्म झाल्यानंतर जे जे संस्कार करितो, ते ते संस्कारही त्याच्या आत्म्यालाच उपकारक असतात, असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण, पित्याचा आत्मा हाच पुत्ररूपानें जन्माला येतो. म्हटलें आहे ' पति हा आत्मरूपानें पत्नीच्या शरीरांत प्रवेश करून पुत्ररूपानें जन्माला येतो '

शिष्य—पुत्ररूपानें जन्म घेऊन पिता पुत्र-संस्कारही करितो व पुत्रपालन करितो, याचें रहस्य काय ?

सिद्धान्ती—ऐक, हा पुत्रपौत्रादि लोकांची संतति अविच्छिन्न राहावी म्हणून. बरें। कोणीच जर पुत्रोत्पादन केलें नाहीं, तर हे लोक (हें जगत्) छिन्नविच्छिन्न होऊन जातील. समजलास ? या प्रमाणें प्रजोत्पत्तीचें कर्म अखंड चालूं राहिलें, म्हणजे पुत्र-पौत्रादि वंशाची, कुलाची किंवा जातीची परंपरा अखंड चालते, म्हणून, लोकांचें अस्तित्व अखंड राहावें, म्हणून मात्र प्रजोत्पादन व प्रजापालन करावयाचें आहे. पुत्रोत्पादन करणें हें कांहीं मोक्षाचें साधन नव्हे. यानें मोक्ष मिळावयाचा नाहीं किंवा संसारही सुटावयाचा नाहीं. असो; याप्रमाणें मातेच्या उदरांतून बाहेर येऊन कुमाररूपानें जन्म घेणें हा मातृगर्भामध्यें सिंचनाच्या अपेक्षेनें संसारी जीवाचा दुसरा जन्म आहे. रेतोरूपी पहिला जन्म पहिल्या मंत्रांत सांगितला. पहिली अभिव्यक्ति ती आणि दहामहिन्यानंतर दुसरी अभिव्यक्ति ही म्हणजे दुसरा जन्म होय ॥ ३ ॥

मंत्र चौथा.

सोऽस्यायमात्मा पुण्येभ्यः कर्मभ्यः प्रतिधीयते ।
अथास्यायमितर आत्मा कृतकृत्यो वयोगतः प्रैति,
स इतः प्रयन्नेव पुनर्जायते तदस्य तृतीयं जन्म ॥ ४ ॥

अन्वय व अर्थः—**सः अस्य अयं आत्मा पुण्येभ्यः कर्मभ्यः प्रतिधीयते** (तो हा पुत्र म्हणजे पित्याचा आत्मा पुण्यकर्माचरणासाठीं प्रतिनिधि म्हणून ठेविला असतो) **अथ अस्य अयं इतरः आत्मा कृतकृत्यः वयोगतः प्रैति** (नंतर त्या पुरुषाचा दुसरा आत्मा त्याचा स्वशरीरस्थ आत्मा कृतकृत्य होतो, त्याचा देह वृद्ध होतो, आणि तो देहांतर करितो) **इतः प्रयन् एव सः पुनः जायते** (येथून प्रयाण करून तो पुनः जन्म पावतो) **तत् अस्य तृतीयं जन्म** (तो हा त्याचा तिसरा जन्म होय) ॥ ४ ॥

अस्य पितुः सोऽयं पुत्रात्मा पुण्येभ्यः शास्त्रोक्तेभ्यः कर्मभ्यः कर्मनिष्पादनार्थं प्रतिधीयते पितुः स्थाने पित्रा यत्कर्तव्यं तत्करणाय प्रतिनिधीयत इत्यर्थः । तथा च संप्रत्ति-विद्यायां वाजसनेयके—' पित्रानुशिष्टोऽहं ब्रह्माहं यज्ञ इत्यादि प्रतिपद्यते ' इति ।

अथ अनन्तरं पुत्रे निवेश्याऽऽत्मनो भारम् अस्य पुत्रस्य इतरः अयं यः पित्रात्मा कृतकृत्यः, कर्तव्यात् ऋणत्रयात् विमुक्तः कृत-कर्तव्य इत्यर्थः, वयोगतः गतवयाः जीर्णः सन् प्रैति म्रियते । सः इतः अस्मात् प्रयन्नेव शरीरं परित्यजन्नेव, तृणजलूका-दिवत्, देहान्तरमुपाददानः कर्मचितम्, पुनर्जायते । तदस्य मृत्वा प्रतिपत्तव्यं यत्, तत् तृतीयं जन्म । ननु संसरतः पितुः सकाशाद्रेतोरूपेण प्रथमं जन्म; तस्यैव कुमाररूपेण मातुर्द्वितीयं जन्मोक्तम्; तस्यैव तृतीये जन्मनि वक्तव्ये, प्रयतस्तस्य पितुर्यज्जन्म, तृतीयमिति कथमुच्यते ? नैष दोषः, पितापुत्रयोरेकात्मत्वस्य विवक्षितत्वात् । सोऽपि पुत्रः स्वपुत्रे भारं निधाय इतः प्रयन्नेव पुनर्जायते यथा पिता । तदन्यत्रोक्तमितरत्राप्युक्तमेव भवतीती मन्यते श्रुतिः । पितापुत्रयोरेकात्मत्वात् ॥ ४ ॥

सिद्धांती—हा त्या पित्याचा पुत्ररूपी आत्मा आहे. ह्या पुत्रानें शास्त्रविहित व शिष्टाचारप्रणीत कर्माचें अनुष्ठान करावें, एतदर्थ पिता आपल्या पुत्राला आपला प्रतिनिधि करितो.

शिष्य—प्रतिनिधि म्हणजे ?

सिद्धान्ती—पित्यानें जीं काय पुण्यकर्में करावयाचीं असतात, त्या सर्वांचा अधिकार पुत्राला दिला म्हणजे तो पित्याचा प्रतिनिधि झाला. बृहदारण्यकामध्यें 'संप्रत्तिविद्या' असें एक प्रकरण आहे. तेथें सांगितलें आहे कीं,—

शिष्य—संप्रत्तिविद्या म्हणजे ?

सिद्धांती—पित्याला जें काय करावयाचें आहे, त्याची स्थापना करण्याचा विचार या 'संप्रत्तिविद्या' नामक प्रकरणांत सांगितला आहे. संप्रत्ति म्हणजे संप्रदान, त्याची विद्या ती संप्रत्तिविद्या. 'बाप मुलाला सांगतो: तूं ब्रह्म आहेस, तूं यज्ञ आहेस, तूं लोक आहेस, म्हणजे मी जें वेदाध्ययन करावयाचें, जो यज्ञ करावयाचा, जो लोक संपादन करावयाचा, तें सर्व तुला केलें पाहिजे.' अशी पित्याची आज्ञा झाल्यावर मुलगा म्हणतो कीं, 'मी ब्रह्म आहें, मी यज्ञ आहें,' इत्यादि सर्व प्रकार वाजसनेयक (बृहदारण्यक) उपनिषदामध्यें सांगितला आहे. असो; नंतर लौकरच आपला सर्व आत्मभार पुत्राचे ठिकाणीं ठेऊन पुत्राचा दुसरा जो हा पित्रात्मा (पित्याचा आत्मा) तो कृतरुत्य होतो. म्हणजे पुत्राकडे सर्व अधिकार दिल्यानंतर त्या पुरुषाला ‡देव-ऋण, ऋषि-ऋण आणि पितृ-

‡ मनुष्यलोक, पितृलोक आणि देवलोक असे तीन लोक आहेत. पुत्र—प्राप्तीनें मनुष्य लोक साध्य होतो. यज्ञानें पितृलोक आणि विद्येनें देवलोक साध्य होतात. या

ऋण अशी जी तीन ऋणें द्यावयाचीं असतात, त्या पासून तो विमुक्त होतो. त्याचे येथील सर्व व्यावहारिक कर्तव्य संपतें. तो वयस्क होतो, क्षीण होतो आणि पुढें मरून जातो. या प्रमाणें तो ह्या लोकांतून जात असतां (म्हणजे आपलें पहिलें शरीर सोडून देत असतांनाच) तो दुसऱ्या देहाचा स्वीकार करितो.

शिष्य—म्हणजे कसें ?

सिद्धान्ती—तृणावर असलेल्या जलूका (कीटक) तूं पाहिल्या च असशील ! गवतांच्या एका काडीवरून दुसऱ्या काडीवर जात असतां दुसऱ्या काडीचा पूर्ण आश्रय मिळाल्या खेरीज त्या जलूका पहिल्या काडीला सोडीत नाहींत. त्याप्रमाणेंच आपल्या स्वकर्मानें उत्पन्न केलेल्या दुसऱ्या देहांत प्रवेश करण्याची संधि आल्या-शिवाय देहत्याग करणारा जीव आपला पहिला देह सोडीत नाहीं. याप्रमाणें मरून पुनः दुसरा होणारा जो जन्म तो जीवाचा तिसरा जन्म होय.

शिष्य—भगवन्, पित्याच्या रेतोरूपानें मातृगर्भांत प्रवेश करणें हा जीवाचा पहिला जन्म सिद्ध होतो. कुमाररूपानें मातेच्या उदरांतून बाहेर आल्यानंतर त्याच संसारी जीवाचा दुसरा जन्म होतो, असें आपण सांगितलें व तें मला समजलेंही. यापुढें या संसारी जीवाचाच (ज्याचे दोन जन्म सांगितले त्याचाच) तिसरा जन्म सांगण्याच्या ऐवजी परत झालेल्या पित्याला जो दुसऱ्या देहांत जन्म प्राप्त होतो, तो वादविषयक संसारी जीवाचा तिसरा जन्म होय, असें आपण कसें म्हणतां ? श्रुतीला तरी हें कसें मानवतें ? ज्या जीवाचे दोन जन्म सांगितले, त्याचाच तिसरा जन्मवृत्तांत न सांगतां त्याच्या बापाला दुसरा देह प्राप्त होतो, तो पुत्राचा तिसरा जन्म होतो, असें कां म्हटलें आहे ?

सिद्धान्ती—अरे ! तुला जो हा विरोध दिसतो आहे, तो केवळ आभास मात्र आहे. प्रत्येक वेळीं आम्ही असें सांगत आलों आहों, व येथेंही हेंच सांगावयाचें आहे कीं, पिता आणि पुत्र हे दोघेही एकात्मकच आहेत. पूर्वीचे जे दोन जन्म सांगितले, ते पित्याचेच जन्म होत. पुत्ररूपानें पिता जन्मतो, असें श्रुतिही म्हणतेना ? किंवा, पिता मरण पावल्यानंतर त्याला जसा पुनर्जन्म प्राप्त होतो, तसाच वंशविस्तार करून संसारभाराचें ओझें घेणारा प्रतिनिधि उत्पन्न करणाऱ्या पुत्रालाही जो पुनर्जन्म प्राप्त होतो, तो त्याचाही तिसरा जन्म होऊं शकेल. हा अर्थ तुला जास्त मानवत असेल तर घे. आमचा कांहीं प्रत्यवाय नाहीं. कारण, आचार्यच पुढें म्हणतात ' तो पुत्रही आपल्या पुत्रावर सर्व भार ठेवून तो पित्याप्रमाणें देहत्याग करितो आणि पुनः जन्माला येतो; ' सारांश एकाठिकाणीं एक सर्वमान्य सिद्धांत

साठींच ब्रह्म (विद्या), यज्ञ आणि पुत्र हीं तीन पूर्वोक्त तीन लोकांची साधनें आहेत असें सांगितलें आहे.

सांगितला म्हणजे तो सर्वत्र सारखाच लागूं पडतो, असा श्रुतीचा अभिप्राय आहे. तात्पर्य, पिता आणि पुत्र हे एकात्मक आहेत, असें सांगण्याचा श्रुतीचा कटाक्ष आहे, व म्हणून तिनें संसारी जीवाचा (वर्णन केलेल्याचा) तिसरा जन्म शब्दतः न सांगतां, पित्याचा पुनर्जन्म यारूपानें सांगितला आहे ॥ ४ ॥

मंत्र पांचवा.

तदुक्तमृषिणा । गर्भे नु सन्नन्वेषामवेदमहं देवानां जनिमानि विश्वा । शतं मा पुर आयसीररक्षन्नधः श्येनो जवसा निरदीयमिति गर्भ एवैतच्छयानो वामदेव एवमुवाच ॥ ५ ॥

अन्वय व अर्थः—ऋषिणा तत् उक्तं (ऋषीनें असें म्हटलें आहे) **गर्भे नु सन् एषाम् देवानां अहं विश्वा जनिमानि अन्वेवदं** (गर्भामध्यें असतानांच मी ह्या सर्व देवांचे—वाणी—अग्निप्रमुख इंद्रियदेवतांचे—सर्व जन्म पाहिले. मला त्यांचें ज्ञान झालें आहे) **मा शतं आयसीः पुरः अधः अरक्षन्** (शेकडो लोखंडी नगरानीं माझें संरक्षण केलें) **श्येनः जवसा निरदीयं** (मी नंतर आपल्या सामर्थ्यानें श्येनाप्रमाणें हें सर्व फोडून—मी—बाहेर आलों) **इति गर्भे एव शयानः वामदेवः एतत् एवं उवाच** (याप्रमाणें गर्भामध्यें शयन करीत असणारा वामदेव हें असें बोलता झाला) ॥ ५ ॥

एवं संसरन्नवस्थाभिव्यक्तित्रयेण जन्ममरणप्रबन्धारूढः सर्वो लोकः संसारसमुद्रे निपतितः कथंचिद्यदा श्रुत्युक्तमात्मानं विजानाति यस्यां कस्यांचिदवस्थायां, तदैव मुक्तसर्वसंसारबन्धनः कृतकृत्यो भवतीत्येतद्वस्तु, तत् ऋषिणा मन्त्रेणापि उक्तमित्याह-गर्भे नु मातुर्गर्भाशय एव सन्, नु इति वितर्के । अनेकजन्मान्तरभावनापरिपाकवशात् एषां देवानां वागग्न्यादीनां जनिमानि जन्मानि विश्वानि सर्वाणि अन्वेवेदम् अहम् अहो अनुबुद्धवानस्मीत्यर्थः । शतम् अनेकाः बह्व्यः मा मां पुरः आयसीः आयस्यो लोहमय्य इवाभेद्यानि शरीराणीत्याभिप्रायः । अरक्षन् रक्षितवत्यः संसार-

पाशनिर्गमनात् अधः । अथ श्येन इव जालं भित्वा जवसा आत्मज्ञानकृतसामर्थ्येन निरदीयं निर्गतोऽस्मि । अहो गर्भे शयानो वामदेव ऋषिः एवमुवाच एतत् ॥ ५ ॥

सिद्धान्ती—याप्रमाणें संसरत जाणारा म्हणजे तीन अवस्थांमध्यें प्रकट होऊन जन्ममरणाच्या अखंड प्रवाहामध्यें वाहत जाणारा जीवमात्र भवचक्रांत सांपडला आहे. मागच्या मंत्रांत सांगितल्याप्रमाणें सर्व जीव भवसागरामध्यें गटंकळ्या खात पडलेले आहेत. यांपैकीं काहीं जीवांचा भाग्योदय झाला असतां कोणत्या तरी वर सांगितलेल्या तीन अवस्थांपैकीं एका अवस्थेमध्यें श्रुतीनें जें आत्मस्वरूप सांगितलें आहे, त्याचें जीवाला यथार्थ ज्ञान होतें. हें ज्ञान होतांक्षणीं संसाराच्या सर्व बंधनांपासून ज्ञानी जीव मुक्त होतो आणि कृतकार्य होतो. ही बंधमोक्षाची गोष्ट त्या श्रीवामदेवऋषीनें प्रस्तुतच्या मंत्रानेंच सांगितली आहे. हा ऋषि मातेच्या गर्भामध्यें असतांनाच काय चमत्कार झाला कीं, त्याला अनेक जन्मांत प्राप्त झालेल्या संस्कारांमुळें आत्मानात्मविवेकामध्यें परिपक्वता प्राप्त झाली। अर्थात् त्याला वाणी-प्रमुख इंद्रियांचें व अग्नि-प्रमुख सर्व इंद्रिय-देवतांचें जन्ममरणसंबंधी यथार्थ ज्ञान झालें. 'मला या देवतांच्या जन्मांचें ज्ञान आत्मानात्मविवेकानें झालें, हें केवढें आश्चर्य आहे!' असें वामदेव ऋषि गर्भामध्यें असतांनाच म्हणूं लागला. तो पुढें म्हणाला; शेंकडो लोखंडी शरीरें म्हणजे अभेद्य चिलखतेंच जणू कांहीं माझें संरक्षणच करण्याकरितां निर्माण करण्याचा मक्का अविद्येनें घेतला होता।

शिष्य—म्हणजे संसाराचे जे पाश आहेत, त्या पाशांतून जीवानें सुटून जाऊं नये, म्हणून अविद्येनें हीं चिलखतें निर्माण केलीं आहेत। आणि जीवाला जन्ममरणात्मक निकृष्ट* लोकांत कोंडून ठेविलें आहे, नव्हे बरें? अभेद्य पाश किंवा अगोचर नगरींचे भक्कम प्रकारच—होत!

सिद्धान्ती—होय—पण, 'एखादा श्येनपक्षी जसा पारध्यानें घातलेल्या जाळ्याचा उच्छेद स्वसामर्थ्यानें करितो, त्याप्रमाणें विलक्षण-सामर्थ्य-पूर्ण असणाऱ्या आत्मज्ञानाच्या साहाय्यानें जन्ममरणात्मक अभंग प्रबंधाचा ही उच्छेद मला करितां येऊन मी ह्या लोखंडी तुरुंगांतून बाहेर पडलों आहे.' वामदेव म्हणाले 'काय आश्चर्य आहे!' वामदेवऋषि गर्भामध्यें राहत असतांनाच ही सुंदर, उद्बोधक आणि रमणीय वाक्यें बोलते झाले. त्यांलाही आत्मज्ञान-सामर्थ्याचें आश्चर्य वाटलें आणि त्यांच्या मुखांतून अमोघ अमृतवाणी ह्या मंत्ररूपानें बाहेर पडली ॥ ५ ॥

---

* मंत्रांत 'अधः' शब्द आहे त्याचा 'अर्थ' म्हणजे 'नंतर' असाही अर्थ होईल. एकपाठ 'अर्थ' असाच आहे.

मंत्र सहावा.

स एवं विद्वानस्माच्छरीरभेदादूर्ध्व उत्क्रम्यामुष्मिन्स्वर्गे लोके सर्वान्कामानाप्त्वामृतः समभवत्समभवत् ॥ ६ ॥

इति चतुर्थः खण्डः ॥

अन्वय व अर्थः—सः एवं विद्वान् अस्मात् शरीरभेदात् ऊर्ध्वः उत्क्रम्य अमुष्मिन् स्वर्गे लोके सर्वान् कामान् आप्त्वा अमृतः समभवत्, समभवत् (याप्रमाणें विद्वान् असणारा आत्मवेत्ता वामदेव शरीरभेद करून बाहेर आला आणि सर्व वासनांची तृप्ति करून घेऊन, निरिच्छ होऊन, त्या स्वर्गलोकामध्यें अमृत झाला, अमृत झाला) ॥ ६ ॥

इत्यैतरेये-द्वितीयारण्यके द्वितीयोऽध्यायः ॥

सः वामदेवः ऋषिः यथोक्तमात्मानम् एवं विद्वान् अस्मात् शरीरभेदात् शरीरस्य अविद्यापरिकल्पितस्य आयसवदनिर्भेद्यस्य जननमरणाद्यनेकानर्थशताविष्टशरीरप्रबन्धस्य परमात्मज्ञानामृतोपयोगजनितवीर्यकृतभेदात् शरीरोत्पत्तिबीजाविद्यादिनिमित्तोपमर्दहेतोः शरीरविनाशादित्यर्थः । ऊर्ध्वः परमात्मभूतः सन् अधोभवात्संसारात् उत्क्रम्य ज्ञानावद्योतितामलसर्वात्मप्रभावमापन्नः सन् अमुष्मिन् यथोक्ते अजरेऽमरेऽमृतेऽभये सर्वज्ञेऽपूर्वेऽनपरेऽनन्तरेऽबाह्ये प्रज्ञानामृतैकरसे स्वर्गे लोके स्वस्मिन्नात्मनि स्वे स्वरूपे अमृतः समभवत् आत्मज्ञानेन पूर्वमाप्तकामतया जीवन्नेव सर्वान्कामानाप्त्वा इत्यर्थः । द्विर्वचनं सफलस्य सोदाहरणस्य आत्मज्ञानस्य परिसमाप्तिदर्शनार्थम् ॥ ६ ॥

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यस्य श्रीगोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यस्य श्रीमच्छंकरभगवतः कृतौ ऐतरेयोपनिषद्भाष्ये द्वितीयोऽध्यायः ॥

सिद्धान्ती—त्या वामदेव-ऋषीला वर सांगितल्याप्रमाणें आत्मस्वरूप 'असें असें' आहे, असें यथार्थ ज्ञान झालें. नंतर त्यानें ह्या शरीराचा भेद केला म्हणजे नाश

केला. वत्सा, हें आपलें जड शरीर अविद्येनें परिकल्पित केलें आहे. अविद्येनें निर्माण केलेलें हें शरीर वज्राप्रमाणें अभेद्य आहे. हें शरीर म्हणजे जनन-मरणादि अनंत अनर्थांचें अधिष्ठान आहे. समजलास ? या शरीर-प्रबंधाचा, अखंड जन्ममरणाचा, नाश करावयाचा असल्यास परमात्मज्ञानाचे अमृताचा सतत उपयोग केला पाहिजे. या ज्ञानामुळें असें एक अमोघ व निष्टंक सामर्थ्य उत्पन्न होतें कीं, जें शरीराला उत्पन्न करणारीं, शरीराचें बीज असणारीं जीं अविद्यादि कारणें आहेत, त्यांचा सर्वथा उच्छेद करितें. तात्पर्य, परमात्मज्ञान होऊन जीव-ब्रह्मैक्य-ज्ञान झालें म्हणजे शरीर आणि त्याची माता अविद्या या उभयतांचा समूळ विनाश होतो. मग पुनः जन्ममरणाच्या भीतीचें नांवच नको ! वामदेव ऋषि किंवा त्याच्यासारखाच दुसरा कोणीही ब्रह्मज्ञ परमात्ममूतच व्हावयाचा. तो ब्रह्मज्ञ परब्रह्म होतो. परब्रह्मत्व सर्वश्रेष्ठ आहे, म्हणून ब्रह्मज्ञ पुरुष हा निरुष्ट जो संसार त्याला केव्हांही वश होत नाहीं. कारण ब्रह्मज्ञानाचा तेजस्वी प्रदीप प्रज्वलित झाल्यामुळें निर्मळ आणि निर्दोष असा सर्वात्मभाव त्याला प्राप्त होतो. तो ब्रह्मज्ञ विश्वरूप होतो, आणि श्रुतिविगीत ह्या अजर, अमर, अमृत अभय, सर्वज्ञ, अपूर्व (कारणशून्य) अनपर (कार्यशून्य) अनंत, अबाह्य अशा एकरस ब्रह्मज्ञानामृतामध्यें हा ब्रह्मज्ञ नित्य राहतो. तो ज्ञानरूप होतो. तात्पर्य, एखादा प्रदीप निर्वाण पावला म्हणजे तो जसा शुद्ध तेजामध्यें एकरस होऊन राहतो, त्याप्रमाणें ब्रह्मज्ञ जीव स्वर्गलोकामध्यें शांतिरूपानें स्वानंदांत राहातो, ब्रह्म होतो.

शिष्य—भगवान् स्वर्गलोक तो कोणता ?

सिद्धान्ती—अरे ! स्वर्गलोक म्हणजे काय ? तें ऐकः स्व म्हणजे आत्मा, स्वस्वरूप. त्या स्वरूपामध्यें राहणें हा स्वर्ग होय. स्वर्ग कांहीं दुसरीकडे नाहीं. आत्मज्ञान प्राप्त होणें म्हणजे स्वर्गप्राप्ति होय. जिवंत असतांनाच जीव आप्तकाम झाला, सर्व इच्छा परिपूर्ण होऊन तो निरिच्छ झाला, उत्तमप्रकारचें तीव्र वैराग्य सर्वांगामध्यें भिनलें, म्हणजे नंतर श्रुतिश्रवणमननादिकांनीं आत्मज्ञान होतें. ही स्थिति म्हणजे अतिश्रेष्ठ स्वर्ग होय. येथें दोन वेळ ' समभवत् (झाला) ' या शब्दांचा उच्चार आहे, तो फलासह व उदाहरणासह सिद्ध झालेल्या आत्मज्ञानाची परिसमाप्ति झाली, असें दाखवितो. अमृतत्व प्राप्त होणें, हें आत्मज्ञानाचें फल आहे आणि हें फल निःसंशय प्राप्त होतें, असें वामदेवाच्या उदाहरणानें सिद्ध होतें. या दोन गोष्टी स्पष्ट करण्यासाठीं वरील शब्दांची द्विरुक्ति आहे ॥ ६ ॥

चतुर्थ खंड भाष्य आणि भाषांतर संपलें.

ऐतरेय द्वितीयारण्यकांतील पांचवा अध्याय संपला.

तृतीयोऽध्यायः ॥

ब्रह्मविद्यासाधनकृतसर्वात्मभावफलावाप्तिं वामदेवाद्याचार्यपरम्परया पारम्पर्यश्रुत्यावद्योत्यमानां ब्रह्मवित्परिषद्यत्यन्तप्रसिद्धाम् उपलभमाना मुमुक्षवो ब्राह्मणा अधुनातनाः ब्रह्मजिज्ञासवः अनित्यात्साध्यसाधनलक्षणात्संसारात् आजीवभावाद्व्याविवृत्सवो विचारयन्तः अन्योन्यं पृच्छन्ति । कथम् ?

सिद्धान्ती—वामदेवादि आचार्यप्रणीत संप्रदायपरंपरेनें शिष्यानुशिष्यांस जें परंपरागत श्रुतिज्ञान प्राप्त झालें, त्यायोगानें उज्ज्वालित झालेली जी सर्वात्मभाव-नामक फलाची प्राप्ति आहे, ती ब्रह्मविद्येच्या साधनानें मात्र संपादन करितां येते.

शिष्य—ब्रह्मज्ञान होण्याला (ब्रह्मात्मैक्य संपादून विश्वरूप होण्याला) ब्रह्मविद्या हेंच काय तें एक साधन आहे, असें मागच्या अध्यायांत आपण सांगितलें, तसेंच वामदेवाचें उदाहरण देऊन श्रुतीनें असेंही सिद्ध केले कीं, सर्वात्मभाव किंवा विश्वरूपभाव होण्याला, जीवानें जगद्रूप होण्याला, ब्रह्मविद्या हेंच काय तें साधन आहे. हें मला समजलें. पण संप्रदायपरंपरेनें श्रुतिज्ञान झालें, तरी आत्मरूप समजतें, त्याचें स्वरूप काय, हें नाहीं आलें माझ्या लक्षांत.

सिद्धान्ती—ठीक आहे, ब्रह्मवेत्त्यांच्या परिषदांमध्यें त्वां सुद्धां केलेली पृच्छा व श्रुतिज्ञान विज्ञानानें प्राप्त होणारें अमृतफळ, हीं सर्व प्रसिद्ध आहेत. असोः; ज्या आत्मरूपज्ञानानें सर्वात्मभाव प्राप्त होतो, संसार सुटतो व शुद्ध अमरत्व प्राप्त होतें, तें आत्मज्ञान मिळवून आपणही संसारविमुक्त व्हावें, अशी इच्छा करणारे अर्वाचीन (अलीकडील) मुमुक्षू ब्राह्मण विचार करूं लागले, परस्परांस विचारूं लागले—

शिष्य—ब्राह्मणच असा विचार करतात काय ? क्षत्रिय-वैश्यादि करीत नाहींत ?

सिद्धान्ती—अरे, ब्राह्मण हा शब्द येथें जाति-वाचक किंवा वर्ण-वाचक नाहीं. ब्राह्मण या शब्दाचा अर्थ ब्रह्म जाणण्याची इच्छा ज्यांना आहे, असे विवेक-वैराग्यादि साधन-चतुष्टयसंपन्न अधिकारी पुरुष असा आहे. असो; ह्या अनित्य म्हणजे क्षणभंगुर आणि कार्यकारणात्मक संसारापासून अथवा जिच्यामुळें हा परिच्छिन्न जीवभाव-व्यष्टिभाव-प्राप्त झाला त्या संसारोत्पादक आणि विषयार्थी तादात्म्य उत्पन्न करणाऱ्या अविद्येपासूनच आपलें विमोचन व्हावें, अशी इच्छा धारण करणारे पुरुष ब्राह्मणच होत. ते परिषदेमध्यें जमून परस्परांस उत्कटतेनें विचारूं लागले.

शिष्य—काय विचारूं लागले यरें ? त्यांचा प्रश्न काय होता ?

सिद्धान्ती—ऐक, श्रुति काय सांगत आहे तेः—

मंत्र पहिला.

कोऽयमात्मेति वयमुपास्महे कतरः स आत्मा येन वा पश्यति येन वा शृणोति येन वा गन्धान्-जिघ्रति येन वा वाचं व्याकरोति येन वा स्वादु-चास्वादु च विजानाति ॥ १ ॥

अन्वय व अर्थः—कः अयं आत्मा इति वयं उपास्महे (तो हा कोण आत्मा आहे कीं, ज्याची आम्ही उपासना करावी) **कतरः सः आत्मा** (दोन आत्म्यांपैकीं तो आत्मा कोणता ?) **येन वा पश्यति, येन वा शृणोति, येन वा गन्धान् आजिघृति, येन वा वाचं व्याकरोति, येन वा स्वादु च अस्वादु च विजानाति** (ज्याच्या योगानें रूप पाहतो, शब्द ऐकतो, गन्धाचा वास घेतो, वाणीचे व्यापार करितो, किंवा गोड कडू जाणतो, तो हा आत्मा आहे काय ?) ॥ १ ॥

यमात्मानम् अयमात्मा इति साक्षात् वयमुपास्महे कः स आत्मेति; यं चात्मानमयमात्मेति साक्षादुपासीनो वामदेवः अमृतः समभवत्; तमेव वयमप्युपास्महे को नु खलु स आत्मेति एवं जिज्ञासापूर्वमन्योन्यं पृच्छताम् अतिक्रान्तविशेषविषयश्रुतिसंस्कार-जनिता स्मृतिरजायत—तम् ' प्रपदाभ्यां प्रापद्यत ब्रह्मेमं पुरुषम् ' ' स एतमेव सीमानं विदार्य एतया द्वारा प्रापद्यत ' ' एतमेव पुरुषं द्वे ब्रह्मणी इतरेतरप्रातिकूल्येन प्रतिपन्ने ' इति । ते चास्य पिण्ड-स्थात्मभूते । तयोरन्यतर आत्मोपास्यो भवितुमर्हति । योऽत्रोपास्यः कतरः स आत्मा इति विशेषनिर्धारणार्थं पुनरन्योन्यं पप्रच्छुर्विचा-रयन्तः । पुनस्तेषां विचारयतां विशेषविचारणास्पदविषया मतिर-भूत् । कथम् ? द्वे वस्तुनी अस्मिन्पिण्डे उपलभ्येते—अनेकभेद-भिन्नेन करणेन येनोपलभते, यश्चैक उपलभते, करणान्तरोपलब्धि-विषयस्मृतिप्रतिसंधानात् । तत्र न तावत् येनोपलभते, स आत्मा भवितुमर्हति । केन पुनरुपलभत इति, उच्यते—येन वा चक्षुर्भूतेन रूपं पश्यति, येन वा शृणोति श्रोत्रभूतेन शब्दम्, येन वा घ्राणभू-तेन गन्धानाजिघ्रति, येन वा वाक्करणभूतेन वाचं नामात्मिकां

व्याकरोति गौरश्व इत्येवमाद्याम्, साध्वसाध्विति च येन वा जिह्वाभूतेन स्वादु च अस्वादु च विजानातीति ॥ १ ॥

सिद्धान्ती—पृच्छा अशी आहे. " ज्या आत्म्याला ' हा येथें आत्मा आहे ' असें म्हणून जीवाला त्याची साक्षात् उपासना करतां येईल, तो आत्मा कोणता ? " असा हा त्यांचा प्रश्न होय.

पूर्व०—बरोबर आहे. येथें उपासनेचा प्रश्न ठीक आला. ' परमेश्वर उपास्य आहे. आणि जीव उपासक आहे. ' हें आम्ही म्हणतों, तेंच येथें श्रुतीनें स्पष्ट सांगितलें आहे. ठीक झालें

सिद्धान्ती—दमानें घ्या; ऐका ! उपासन या शब्दांत ' उप ' आणि ' आसन ' असे दोन शब्द आहेत. उप म्हणजे अत्यंत समीपतेनें (तात्पर्य ऐक्यवृत्ति होऊन) आसन म्हणजे त्या-ऐक्याच्या-स्थितींत-राहणें म्हणजे उपासन होय. असो; आसन शब्दाला ' उप ' हा उपसर्ग लागला म्हणजे सिद्ध होणाऱ्या अर्थाचें तात्पर्य हें आहे. ज्याची साक्षात् उपासना केली असतां, ज्याच्याशीं ऐक्यवृत्ति होऊन असेर वास्तव्य त्या स्थितींत केलें असतां, अमृतत्व-प्राप्ति होते, तो प्रत्यक्ष असणारा आत्मा कोणता !—

शिष्य—म्हणजे ' हा आत्मा आहे, अशी भावना करून घेऊन वामदेवानें ज्याच्याशीं साक्षात् आत्मवृत्ति केली आणि अमृतत्व मिळविलें, त्या आत्म्याची मात्र आम्ही उपासना करणार' असा अभिप्राय मनांत आणून, असा तो हा आत्मा कोणता ? हें ब्रह्मजिज्ञासूंनीं विचारण्यास आरंभ केला, होयना !

सिद्धान्ती—बरोबर आहे. याप्रमाणें जिज्ञासापूर्वक परस्परांशीं वाद-विवाद करितांना त्यांच्या लक्षांत एक गोष्ट आली. त्यांना एक आठवण झाली.

शिष्य—कोणती आठवण ती !

सिद्धान्ती—पूर्वी विशेष-विषयांचा निरास संपादून विचार करणाऱ्या काहीं श्रुतींच्या संसारानें त्यांस आठवण झाली. त्यांनीं ज्या निर्विशेष श्रुतींचें अध्ययन केलें होतें, त्यांचें स्मरण त्यांस झालें.

पूर्व०—म्हणजे काय !

सिद्धान्ती—याच उपनिषदांतील पूर्वीच्या अध्यायांत सांगितलें आहे कीं, त्या ह्या विराट्पुरुषाच्या शरीरांत पायांच्या टोंकांकडून ह्या ब्रह्मानें प्रवेश केला म्हणजे प्राणस्वरूपी अपरब्रह्म पायांच्या टोकांकडून विराट्शरीरांत प्रवेश करितें झालें, हा श्रुतीची त्यांस आठवण झाली.

पूर्व०—मग त्याचा येथें संबंध काय !

सिद्धान्ती—अंमळ दमानें घ्या; पण दुसरी एक श्रुति त्यांस आठवली. ती अशी सांगते कीं, मस्तकांतील शिवणींचें विदारण करून त्या द्वारानें ज्ञानरूप परमात्मा ह्या पुरु-

पाऱ्या राशींत प्रवेश करिता झाला. यामुळें दोन विरुद्ध मार्गांनीं प्रवेश करणारी दोन ब्रह्मे श्रुतींवरून प्रतीत होतात; आणि तीं वर परस्परांशीं प्रतिकूल असून एकमेकांच्या समोरासमोर सामन्यास येतात ! असो; असें ज्या श्रुतींनीं प्रतिपादन केलें आहे, त्या श्रुतींचें स्मरण ब्रह्मजिज्ञासूंस झालें. दोन्हींही ब्रह्मे शरीरपिंडाचे आत्मे आहेत. प्राणाशिवाय शरीराचें कांहीं चालावयाचें नाहीं, तसेंच ज्ञानाशिवायही शरीराचा व्यवहार अशक्य होतो. दोन्हींही शरीराचे आत्मभूत आहेत. तेव्हां या दोहोंपैकीं कोणाची उपासना करावयाची, हा प्रश्न सहजच उत्पन्न झाला. तात्पर्य या दोहोंत श्रेष्ठ कोण हा प्रश्न आहे.

शिष्य—प्रश्न बरोबरच आहे. कारण सर्वथा संसारविमुक्त असणारा व विमुक्त करणारा आत्मा एकच असला पाहिजे आहे, आणि तो एकच आहे, असें त्या ब्रह्मजिज्ञासूंस विदित होतें. 'एकच आत्मा हें सर्व असता झाला' असा मुळीं या उपनिषदाचा उपक्रमच आहे.'

सिद्धान्ती—तात्पर्य, उपास्य म्हणजे ज्ञेय आत्मा कोणता? त्याचें स्वरूपलक्षण काय? तसेंच, स्वरूपाचा निश्चय कसा करावा? इत्यादि प्रकारच्या प्रश्नांचा निर्णय करण्यासाठीं त्यांनीं आत्ममीमांसेला पुनः प्रारंभ केला. विशेष विचार करितां करितां त्यांची बुद्धि परिशुद्ध होऊन तत्त्व-विनिश्चयाला समर्थ झाली. ती अशीः ते म्हणालेः ह्या पिंडामध्यें दोन वस्तू उपलब्ध होतात. एक ज्ञान-साधन आहे व दुसरी ज्ञानरूप आहे. अनेक भेदांनीं भिन्न झालेल्या करणांच्या (साधनांच्या) द्वारानें जें उपलब्ध होतें, तें भिन्नरूपी एक आणि साधनाशिवाय उपलब्ध-विषयाची स्मृति अखंड राखतें तें एकरस ब्रह्म दुसरें, अशा दोन ब्रह्मवस्तु उपलब्ध होतात.

शिष्य—अनेक रसात्मक साधनांनीं उपलब्ध होणारी ब्रह्मवस्तु आणि साधनाव्यतिरिक्त उपलब्ध होणारें (स्मरणाचें अखंड प्रतिसंधान ठेवणारें) एकरसात्मक ब्रह्म दुसरें, असा आपल्या म्हणण्याचा भावार्थ आहे. मग त्यांत प्राप्तव्य ब्रह्म कोणतें? तें तात्पर्यतः सांगावें.

सिद्धान्ती-तात्पर्य, अनेक साधनांनीं संहत होणारें प्राणात्मक ब्रह्म दुसऱ्या कोणाकरितां असतें, पराधीन असतें, म्हणून तें **साधन** होतें आणि ज्याच्या सत्तेनें हें साधन सिद्ध होतें, तें परब्रह्म साध्य किंवा प्राप्तव्य होय, म्हणून ज्या साधनानें (प्राणात्मक ब्रह्मानें) उपलब्धि होते, ज्ञान होतें, तें उपास्य आत्मरूप होण्याला योग्य नाहीं.

शिष्य—बरें, हें प्राणात्मक ब्रह्म कसें उपलब्ध होतें!

सिद्धान्ती—ऐक; ज्याच्यायोगानें चक्षुरूप होऊन रूप पहातां येतें, कर्णरूप होऊन शब्द ऐकतां येतो, घ्राणरूप होऊन गंधग्रहण करितां येतें, वाग्-इंद्रिय होऊन प्राणात्मक वाणी-व्यापार-करिते, तें—

शिष्य—' हा घोडा आहे, ' ' हा अश्व आहे ' इत्यादि, किंवा ' हें बरें आहे ' ' हें वाईट आहे ' इत्यादिप्रकारची मनोवृत्ति प्रकट करणारी वाणी उत्पन्न करितें असेंच ना ?

सिद्धान्ती—होय, किंवा जिव्हारूप होऊन ' हें गोड आहे, हें कडू आहे, ' असें ज्ञान उत्पन्न करितें, तें प्राणात्मक ब्रह्म होय. सारांश, सर्व ज्ञान-कर्मेंद्रियांच्या व्यापारांचें प्राणात्मक ब्रह्म हें अधिष्ठान आहे. व हें प्राणात्मक ब्रह्म ज्ञान-कर्मेंद्रियेंही आपणच होतें. या ब्रह्माला आपणच झालेल्या इंद्रियांच्या द्वारें ज्ञान करून द्यावें लागतें ॥ १ ॥

मंत्र दुसरा.

यदेतद्धृदयं मनश्चैतत् । संज्ञानमाज्ञानं विज्ञानं प्रज्ञानं मेधा दृष्टिर्धृतिर्मतिर्मनीषा जूतिः स्मृतिः संकल्पः क्रतुरसुः कामो वश इति । सर्वाण्येवैतानि प्रज्ञानस्य नामधेयानि भवन्ति ॥ २ ॥

अन्वय व अर्थः—यत् एतत् हृदयं, एतत् च मनः (जें हें हृदय आहे किंवा मन आहे) **संज्ञानं, आज्ञानं, विज्ञानं, प्रज्ञानं, मेधा, दृष्टिः, धृतिः, मतिः, मनीषा, जूतिः, स्मृतिः, संकल्पः, क्रतुः, असुः, कामः, वशः, इति एतानि, सर्वाणि एव प्रज्ञानस्य नामधेयानि भवंति** (चैतन्य, ऐश्वर्य, विशेषज्ञान, वस्तुज्ञान, धारणा, विषयदर्शन, उत्साह, मनन, स्वतंत्रविचार, दुःखित्व, स्मरण, विषयचिंतन, निश्चय, प्राणवृत्ति, तृष्णा, अभिलाष, या ज्या अंतःकरणवृत्ती आहेत, त्या ह्या सर्व प्रज्ञानाचीं निरनिराळीं नामें आहेत) ॥ २ ॥

किं पुनस्तदेकमनेकधा भिन्नं करणमिति, उच्यते । यदुक्तं पुरस्तात् प्रजानां रेतो हृदयं हृदयस्य रेतो मनः मनसा सृष्टा आपश्च वरुणश्च हृदयान्मनो मनसश्चन्द्रमाः तदेवैतद्धृदयं मनश्च, एकमेव तदनेकधा । एतेनान्तःकरणेनैकेन चक्षुर्भूतेन रूपं पश्यति, श्रोत्रभूतेन शृणोति, घ्राणभूतेन जिघ्रति, वाग्भूतेन वदति, जिह्वाभूतेन रसयति, स्वेनैव विकल्पेन मनसा संकल्पयति, हृदयरूपेणा-

ध्यवस्यति। तस्मात्सर्वकरणविषय[illegible]कमेकमिदं करणं सर्वोपलब्ध्यर्थमुपलब्धुः। तथा च कौषीतकिनाम् 'प्रज्ञया वाचं समारुह्य वाचा सर्वाणि नामान्याप्नोति, प्रज्ञया चक्षुः समारुह्य चक्षुषा सर्वाणि रूपाण्याप्नोति' इत्यादि। वाजसनेयके च—'मनसा ह्येव पश्यति मनसा शृणोति हृदयेन हि रूपाणि विजानाति' इत्यादि। तस्माद्धृदयमनोवाच्यस्य सर्वोपलब्धिकरणत्वं प्रसिद्धम्। तदात्मकश्च प्राणः 'यो वै प्राणः, सा प्रज्ञा, या वै प्रज्ञा स प्राणः' इति हि ब्राह्मणम्। करणसंहतिरूपश्च प्राण इत्यवोचाम प्राणसंवादादौ। तस्माद्यत्पङ्क्त्यां प्रापद्यत, तद्ब्रह्म तदुपलब्धुरुपलब्धिकरणत्वेन गुणभूतत्वान्नैव तद्वस्तु ब्रह्म उपास्य आत्मा मोऽस्माकं भवितुमर्हतीति निश्चयं कृतवन्तः। तदन्तःकरणोपाधिस्थानस्योपलब्धुः प्रज्ञानरूपस्य ब्रह्मण उपलब्ध्यर्था या अंतःकरणवृत्तयो बाह्यान्तर्वार्तिविषयविषयाः, ता इमा उच्यन्तेः-संज्ञानं संज्ञप्तिः चेतनभावः; आज्ञानम् आज्ञप्तिः ईश्वरभावः; विज्ञानं कलादिपरिज्ञानम्; दृष्टिः इन्द्रियद्वारा सर्वविषयोपलब्धिः, धृतिः धारणम् अवसन्नानां शरीरेंद्रियाणां ययोत्तम्भनं भवति; 'धृत्या शरीरमुद्वहन्ति' इति हि वदन्ति; मतिः मननम्; मनीषा तत्र स्वातन्त्र्यम्; जूतिः चेतसो रुजादिदुःखित्वभावः; स्मृतिः स्मरणम्; संकल्पः शुक्लकृष्णादिभावेन संकल्पनं रूपादीनाम्; क्रतुः अध्यवसायः; असुः प्राणनादिजीवनक्रियानिमित्ता वृत्तिः; कामः असंनिहितविषयाकाङ्क्षा तृष्णा; वशः स्त्रीव्यतिकराद्यभिलाषः; इत्येवमाद्या अन्तःकरणवृत्तयः उपलब्धुरुपलब्ध्यर्थत्वाच्छुद्धप्रज्ञानरूपस्य ब्रह्मण उपाधिभूतास्तदुपाधिजनितगुणनामधेयानि संज्ञानादीनि सर्वाण्येवैतानि प्रज्ञप्तिमात्रस्य प्रज्ञानस्य नामधेयानि भवन्ति, न स्वतः साक्षात्। तथा चोक्तम् 'प्राणन्नैव प्राणो नाम भवति' इत्यादि ॥ २ ॥

पूर्व०—पण असें कोणतें एक तत्त्व आहे कीं, जें आपणच अनेकप्रकारें भिन्न होऊन पुनः आपणच साधनरूप होतें ?

सिद्धान्ती—ऐका: 'प्रजांचें सारभूत द्रव्य म्हणजें हृदय व हृदयाचें सार मन होय' असें मागें सांगितलें आहे. मनानें जल आणि जलदेवता हीं उत्पन्न झालीं.

हृदयापासून मन व मनापासून चंद्र उत्पन्न झाला. ज्या हृदयापासून व मनापासून हे सर्व अनेकप्रकार झाले, तेंच तें तुम्ही विचारित आहां. तेंच हें करणरूपी एक तत्त्व होय. हृदय आणि मन मिळून अंतःकरण होतें. एकच अंतःकरण चक्षूरूप होऊन रूप पाहतें, कर्णरूप होऊन शब्द ऐकतें, प्राणरूप होऊन वास घेतें, वाणीरूप होऊन बोलतें, जिव्हारूप होऊन रसास्वाद घेतें. किंवा ह्या अंतःकरणरूपी साधनानें संघातात्मक पुरुष-रूपादिकांचा द्रष्टाहि होतें. तसेंच, तें अंतःकरण स्वतः विकल्पनात्मक मन होऊन पुरुषाला संकल्प-विकल्पात्मक करितें व हृदय होऊन निश्चय करावयास लावितें. म्हणून सर्व इंद्रियें आणि विषय हे ज्याचे व्यापार आहेत, असे हें एकच प्राणरूपी करण (साधन) ज्ञात्याला सर्वप्रकारचें ज्ञान व्हावें, एतदर्थ समर्पित झालेलें असतें. तात्पर्य हृदय म्हणजे बुद्धि. हीच इंद्रियात्मक व विषयात्मक व्यापार करविते. कौषीतकी उपनिषदामध्येंहि म्हटलें आहे कीं, प्रज्ञेनें (*चिदाभासयुक्त बुद्धीनें) वाणीवर आरूढ होऊन (बुद्धीचा वाण्यात्मक परिणाम झाला म्हणजे) व बुद्धिद्वारा वाणीचा अभिमानी होऊन जीव सर्व शब्दांची उत्पत्ति करितो. बुद्धिही नेत्रेंद्रियावर आरूढ झाल्यावर नेत्रांच्या योगानें नेत्राभिमानी जीव सर्व रूपें पाहतो. इत्यादि' 'मनानेंच पाहतो, मनानें ऐकतो, हृदयानें म्हणजे बुद्धीनें रूपांचें ज्ञान करून घेतो, इत्यादि' करणद्वारा ज्ञान करून घेणाऱ्या अभिमानी जीवाचें प्रतिपादन करणारी बृहदारण्यकश्रुति प्रमाण आहे. म्हणून हृदय आणि मन हे ज्याचे वाचक शब्द आहेत, असें अंतःकरण हें सर्व ज्ञानाचें साधन आहे, ही गोष्ट सर्व-प्रसिद्ध आहे. प्राण हा हृदयात्मक आहे, 'जो प्राण तीच प्रज्ञा (हृदय) आणि (हृदय) तोच प्राण होय;' असें ब्राह्मणांत म्हटलें आहे. सर्व करणांचा संघात म्हणजे प्राण होय. हें आम्ही प्राणसंवादाचे † ठिकाणीं सांगितलें आहे. म्हणून जें पायाच्या अग्राकडून विराट् शरीरांत प्रविष्ट झालें, तें ब्रह्म प्राण होय. हें उपलब्धा जो ज्ञानरूप आत्मा त्याच्या उपलब्धीचें साधन असल्यामुळें कमी प्रतीचें होतें. सारांश, प्राणब्रह्म हें करण आणि ज्ञानब्रह्म साध्य म्हणजे प्राप्तव्य म्हणून उपास्य आहे.

शिष्य—ज्ञानरूपी ब्रह्माचें हें प्राणात्मक ब्रह्म एक साधन मात्र असतें, म्हणून तें कमी प्रतीचें ठरतें, असेंच ना?

सिद्धान्ती—होय. अर्थात् साधन हें केव्हांही साध्य होत नाहीं व कधींही उपास्य व्हावयाचें नाहीं. विराट्शरीरांत दोन ब्रह्में उपलब्ध झालीं, तेव्हां उपास्य ब्रह्म कोणतें हा प्रश्न उत्पन्न झाला. पण दोहोंपैकीं एक ब्रह्म उपास्य होणें शक्य नाहीं,

---

* शुद्ध-चैतन्याचें हृदयांत पडलेलें प्रतिबिंब म्हणजे चिदाभास.

† प्राणाच्या व इंद्रियांच्या श्रेष्ठत्वाबद्दल वाद-प्रतिवाद होऊन प्राणाचें श्रेष्ठत्व ठरलें तो प्रसंग येथें अभिप्रेत आहे काय?

असें ठरलें. तेव्हां बाकीचें राहिलेलें ब्रह्म उपास्य होणार. हा ज्ञानरूप व ज्ञाता आत्मा ब्रह्माला विशेष विषय–ज्ञानद्वारा प्रकट व्हावा, एतदर्थ ह्या हृदय–मनोरूप साधनाच्या ज्या निरनिराळ्या वृत्ती श्रुतीला सांगावयाच्या आहेत, त्यांचा जो उपलब्धता, जो ज्ञाता, तो मात्र आत्मा आम्हांला उपास्य झाला पाहिजे, असा त्यांनीं न्यायपूर्वक निश्चय केला.

शिष्य—पुढें आपण ज्या मनोवृत्ति सांगणार आहां, त्यांचें अंतःकरण हें अधिष्ठान आहे. आणि त्या सर्व वृत्ती ज्ञानरूप आत्म्याच्या सत्तेनें स्व–व्यापार करून आपलें सर्व व्यापार त्याला समर्पित करीत असतात. असेंच ना !

सिद्धान्ती—होय. पण हें ध्यानांत ठेवा कीं, अंतःकरणांत राहून अंतःकरणाची उपाधि घेणारा व त्या त्या उपाधीला सत्ता देणारा जो प्रज्ञानरूप आत्मा आहे, त्याच्या उपलब्धीसाठीं, त्याला ज्ञान व्हावें एतदर्थ, व्यापार करणाऱ्या वृत्तींचा उल्लेख श्रुति करीत आहे. या सर्व अंतःकरण–वृत्तींचे विषय सर्व अंतर्बाह्य विषय होतात. म्हणजे सर्व अंतर्विषयांचें व बाह्यविषयांचें ज्ञान करून देण्यास या वृत्ति योग्यप्रसंगीं समर्थ असतात. त्या वृत्ति ह्या:–**संज्ञा** (ही वृत्ति सर्व–शरीरव्यापी असते आणि इच्यायोगें जीव चेतनयुक्त आहे, असें समजतें; जाणीव) **ऐश्वर्य**, कलादिकांचें ज्ञान करून देणारी **विज्ञानवृत्ति**, प्रज्ञान म्हणजे **प्रतिभा**, ग्रंथधारण करण्याचें सामर्थ्य देणारी वृत्ति, **मेधा** म्हणजे विषय–धारणाशक्ति, इंद्रियद्वारांनीं विषयांची उपलब्धि करून देणारी **दृष्टि**, शरीर आणि इंद्रियें विगलित झालीं असतां त्यांस उत्तेजन देणारी **धृति**, **उत्साह** (' धृतीनें शरीर धारण करितात, असें श्रुतिवचन प्रमाण आहे ') **मनन**, स्वतंत्रतेनें मनोव्यापार चालविणारी **मनीषा**, रोगादिकांनीं दुःखित्वभाव उत्पन्न करणारी ' **जूति** ' (संवेग), **स्मरण**, रूपादिकांचे शुक्ल–कृष्णादि भाव–संकल्पित करणारा **संकल्प**, **निश्चायक बुद्धि**, प्राणादिकांचें जीवन–क्रिया–निमित्त असणारी **असु** नामक वृत्ति, आपल्या जवळ जो विषय नाहीं, त्याची तृष्णा उत्पन्न करणारा **काम**, स्त्रियादिकांचा अभिलाष उत्पन्न करणारी **वश** नामक वृत्ति, या सोळा वृत्ती अनेक अंतःकरणवृत्तींपैकीं कांहीं आहेत; आणि यांचा व्यापार म्हणजे ज्ञान–मात्र–रूप असणाऱ्या उपलब्ध्याला (ज्ञात्याला) प्रकट करणें, हा आहे. या सर्व वृत्ती म्हणजे शुद्ध ज्ञानरूप असणाऱ्या ब्रह्माच्या उपाधी असून ह्या उपाधींच्या योगानें शुद्ध ब्रह्मावर जे जे गुण आरोपित होतात, त्यांची ज्ञानरूप आत्मगुणांची ह्या संज्ञादि सर्व सोळा वृत्ती निरनिराळीं नांवें होतात. म्हणून शुद्धध्यानरूप आत्म्याचीं हीं लक्षणानें परोक्षतः नांवें होतात. साक्षात् नाहीं. ' प्राणरूप होऊन प्राणनामक होतो ' असें आत्म्याचें वर्णन अनेक श्रुतींनीं केलें आहे. सारांश, सर्व इंद्रियें आणि सर्वज्ञानवृत्ती यांहून निराळा असणारा स्वयंप्रकाश व सर्वसाक्षी (सर्व–वृत्तींस सत्ता देणारा) एकच आत्मा आहे, आणि तोच काय तो उपलब्धा आहे, असें ठरलें ॥ २ ॥

मंत्र तिसरा.

एष ब्रह्मैष इन्द्र एष प्रजापतिरेते सर्वे देवा इमानि च पञ्च महाभूतानि पृथिवी वायुराकाश आपो ज्योतींषीत्येतानीमानि च क्षुद्रमिश्राणीव । बीजानीतराणि चेतराणि चाण्डजानि च जारुजानि च स्वेदजानि चोद्भिज्जानि चाश्वा गावः पुरुषा हस्तिनो यत्किंचेदं प्राणि जङ्गमं च पतत्रि च यच्च स्थावरम् । सर्वं तत्प्रज्ञानेत्रं प्रज्ञाने प्रतिष्ठितं प्रज्ञानेत्रो लोकः प्रज्ञा प्रतिष्ठा प्रज्ञानं ब्रह्म ॥ ३ ॥

अन्वय व अर्थः—एषः, ब्रह्म, एषः इंद्रः एषः प्रजापतिः, एते सर्वे देवाः, इमानि च पृथिवी, वायुः आकाशः, आपः, ज्योतींषि; इति पञ्च महाभूतानि एतानि इमानि; च क्षुद्रमिश्राणि इव (हाच अपरब्रह्म, हाच इंद्र, हाच प्रजापति, हे सर्व देव व पृथ्वी,-वायु, आकाश, जल, तेज, हीं पञ्च महाभूतें व हीं क्षुद्रमिश्रभूतें जंणूं कांहीं हाच परमात्मा आहे) बीजानि च, इतराणि इतराणि, च, अण्डजानि च, जारुजानि च, स्वेदजानि च, उद्भिज्जानि च, अश्वाः, गावः, पुरुषाः, हस्तिनः यत्किंच इदं, प्राणि च, पतत्रि च जङ्गमं च, यत् च स्थावरम् (सर्व स्थावरजंगम बीजें; आणि अंडज, जारज, स्वेदज, उद्भिज्ज, तसेच अश्व, वृषभ, पुरुष, गज, सारांश सर्व प्राणी, सर्व पक्षी, सर्व स्थावर आणि जङ्गम–हेंच परब्रह्म आहे) सर्वं तत् प्रज्ञानेत्रं, प्रज्ञाने प्रतिष्ठितम्, प्रज्ञानेत्रः लोकः, प्रज्ञा प्रतिष्ठा, प्रज्ञानं ब्रह्म (हें सर्व प्रज्ञानेत्र आहे, प्रज्ञानामध्यें स्थापित झालें आहे, सर्व लोक प्रज्ञानेत्र आहेत, प्रज्ञा ही जगताची प्रतिष्ठा आहे, प्रज्ञान हेंच ब्रह्म होय) सारांश, हें सर्व ब्रह्म आहे ॥ ३ ॥

स एषः प्रज्ञानरूप आत्मा ब्रह्म अपरं सर्वं शरीरस्थः प्राणः प्रज्ञात्मा अन्तःकरणोपाधिष्वनुप्रविष्टो जलभेदगतसूर्यप्रतिबिम्ब-

वत् हिरण्यगर्भः प्राणः प्रज्ञात्मा । एष एव इन्द्रः गुणात् देवराजो वा । एष प्रजापतिः यः प्रथमजः शरीरी; यतो मुखादिनिर्भेदद्वारेणाग्न्यादयो लोकपाला जाताः, स प्रजापतिरेष एव । येऽपि एते अग्न्यादयः सर्वे देवा एष एव । इमानि च सर्वशरीरोपादानभूतानि पञ्च पृथिव्यादीनि महाभूतानि अन्नान्नादत्वलक्षणानि एतानि । किं च, इमानि च क्षुद्रमिश्राणि क्षुद्रैरल्पकैर्मिश्राणि, इवशब्दः अनर्थकः, सर्षादीनि । बीजानि कारणानि इतराणि चेतराणि च द्वैराश्येन निर्दिश्यमानानि । कानि तानि? उच्यन्ते—अण्डजानि पक्ष्यादीनि, जारुजानि जरायुजानि मनुष्यादीनि, स्वेदजानि यूकादीनि, उद्भिज्जानि च वृक्षादीनि । अश्वाः गावः पुरुषाः हस्तिनः अन्यच्च यत्किंचेदं प्राणि । किं तत्? जङ्गमं यच्चलति पद्भ्यां गच्छति; यच्च पतत्रि आकाशेन पतनशीलम्; यच्च स्थावरम् अचलम्; सर्वं तत् अशेषतः प्रज्ञानेत्रम्, प्रज्ञानिः प्रज्ञा तच्च ब्रह्मैव, नीयतेऽनेनेति नेत्रम्, प्रज्ञा नेत्रं यस्य तदिदं प्रज्ञानेत्रम्; प्रज्ञाने ब्रह्मण्युत्पत्तिस्थितिलयकालेषु प्रतिष्ठितम्, प्रज्ञाश्रयमित्यर्थः। प्रज्ञानेत्रो लोकः पूर्ववत्; प्रज्ञाचक्षुर्वा सर्व एव लोकः। प्रज्ञा प्रतिष्ठा सर्वस्य जगतः । तस्मात् प्रज्ञानं ब्रह्म । तदेतत्प्रत्यस्तमितसर्वोपाधिविशेषं सत् निरञ्जनं निर्मलं निष्क्रियं शान्तम् एकम् अद्वयं नेति नेतीति सर्वविशेषापोहसंवेद्यं सर्वशब्दप्रत्ययागोचरं तदत्यन्तविशुद्धप्रज्ञोपाधिसंबंधेन सर्वज्ञमीश्वरं सर्वसाधारणाव्याकृतजगद्बीजप्रवर्तकं नियन्तृत्वादन्तर्यामिसंज्ञंभवति । तदेव व्याकृतजगद्बीजभूतबुद्ध्यात्माभिमानलक्षणं हिरण्यगर्भसंज्ञ भवति । तदेव अन्तरण्डोद्भूतप्रथमशरीरोपाधिमत् विराट् प्रजापतिसंज्ञं भवति । तदुद्भूताग्न्याद्युपाधिमत् देवतासंज्ञं भवति । तथा विशेषशरीरोपाधिष्वपि ब्रह्मादिस्तम्बपर्यन्तेषु तत्तन्नामरूपलाभो ब्रह्मणः । तदेवैकं सर्वोपाधिभेदभिन्नं सर्वैः प्राणिभिस्तार्किकैश्च सर्वप्रकारेण ज्ञायते विकल्प्यते च अनेकधा । 'एतमेके वदन्त्यग्निं मनुमन्ये प्रजापतिम्। इन्द्रमेकेऽपरे प्राणमपरे ब्रह्म शाश्वतम्' इत्याद्या स्मृतिः ॥ ३ ॥

सिद्धान्ती—तो हा प्रज्ञानरूप आत्मा हें सर्व होय. कसें ते पहाः सर्व समष्टिशरीरांचा प्राण असणारा जो हिरण्यगर्भ,त्याला **प्रज्ञात्मा** म्हणतात. हा अंतःकरणांच्या उपाधीमध्यें समष्टिलिंगशरीरांत अनुप्रविष्ट झाला म्हणजे त्याला हिरण्यगर्भ अशी संज्ञा येते. जसें जलामध्यें सूर्यप्रतिबिंब पडलें असतां तें प्रतिबिंब निराळें आणि सूर्य निराळा, त्याप्रमाणें समष्टीच्या अंतःकरणांत प्रवेश करणारा, प्राणरूप होणारा, ज्ञानक्रियांचें कारण असणारा हिरण्यगर्भ निराळा व परमात्मा निराळा. म्हणजे हाच परमात्मा अंतःकरणामध्यें प्रवेश करून तेथें क्रियाशक्ति आणि ज्ञानशक्ति उत्पन्न करितो, आणि म्हणून त्याला हिरण्यगर्भ असें नांव प्राप्त होतें. तात्पर्य, हाच परमात्मा हिरण्यगर्भ, हाच इंद्र (इंद्र म्हणजे सर्व पाहणारा; सर्वसाक्षित्व हा त्याचा गुण आहे. किंवा देवांचा राजा). हाच परमात्मा प्रजापति होय. कारण, प्रथमतः उत्पन्न होऊन प्रजापति शरीरी झाला. प्रजापति म्हणजे विराट् होय. येथेंच मुखादि छिद्रें उत्पन्न होऊन अग्न्यादि लोकपाल उत्पन्न झाले. सारांश, परमात्मा हाच हिरण्यगर्भ, हाच प्रजापति आणि सर्व अग्निप्रमुख देवता होय. शरीराचे उपादानकारण असणारी पृथिव्यादि हीं सर्व पंचमहाभूतें हाच आहे.

शिष्य—हीं महाभूतें आपण स्वतः अन्न असून अन्नग्रहण करणारींही आहेत. जलाचें अन्न पृथ्वि, तेजाचें अन्न जल, असें म्हणतात.

सिद्धांती—तसेंच, हीं सर्व क्षुद्र-भूतांपासून झालेलीं द्रव्येंही आत्माच आहे. तसेंच, सर्वेतरांचीं कारण असणारीं बीजें (क्षुद्रभूतें) व त्यांचीं कार्यें आणि स्थावर-जंगमादि दोन जातींचीं सर्व द्रव्यें हाच परमात्मा आहे.

शिष्य—तीं कोणतीं ?

सिद्धांती—पक्ष्यादि अण्डज, मनुष्यादि जरायुज, यूकादि (ढेकूण, उवा इत्यादि) स्वेदज, वृक्षादि उद्भिज्ज, तसेंच अश्व, धेनु, पुरुष, हस्ति, सारांश, सर्व प्राणिजात म्हणजे सर्व जंगम अथवा सर्व पायानें चालणारे प्राणी, तसेच आकाशांत उडणारे प्राणी, हा परमात्मा आहे. त्याचप्रमाणें सर्व निःशेष स्थावर म्हणजे अचल पदार्थ हाच आहे. हे सर्व स्थावर, जंगम पदार्थ स्वरूपतः ब्रह्म असून ब्रह्माच्या सत्तेच्या योगानेंच सर्व स्व-व्यापार करण्याला समर्थ होतात. ब्रह्मसत्तेमुळें सत्तावंत होतात, म्हणून त्यांना प्रज्ञानेत्र असें म्हणतात. हे सर्व दृश्यभास्य पदार्थ प्रज्ञानामध्यें मात्र उत्पत्ति, स्थिति पावून तेथेंच संहारकालीं प्रतिष्ठित होतात, म्हणजे हे सर्व प्रज्ञानाच्या आश्रयानें मात्र सर्व कालीं विद्यमान असण्यास समर्थ असतात. त्याचप्रमाणें हा लोक (जगत्) ही प्रज्ञानेत्र आहे. सर्वांचा स्फुरण-हेतु प्रज्ञान आहे म्हणून जगताला प्रज्ञाचक्षु असें म्हणतात. प्रज्ञा हीच सर्व जगताची प्रतिष्ठा आहे, म्हणून प्रज्ञान हेंच ब्रह्म होय.

शिष्य—हेंच पुनः एकदां निराळ्या शब्दांनीं स्पष्ट करून सांगावें ?

सिद्धान्ती—अरे, ब्रह्म हें शुद्ध ज्ञानरूप आहे. येथें अखिल उपाधिविशेषांचा सर्वथा निरास होतो. म्हणजे हें सर्वथा निरुपाधि आहे. हें निरंजन (दोषशून्य) निर्मळ, निष्क्रिय, शांत, एक, अद्वितीय, 'हें नाहीं, तें नाहीं' इत्यादि सर्व विशेषांचा निरास करून मात्र समजणारें, सर्व शब्दांना आणि सर्व प्रत्ययांना अगोचर असणारें, असें हें ब्रह्म आहे. हें शुद्ध ब्रह्माचें स्व-संवेद्य स्वरूप होय. पण हेंच परमात्मतत्त्व अत्यंत शुद्ध अशा ज्ञानाची उपाधि लावून घेऊन सर्वज्ञ ईश्वर होतें. परब्रह्माला शुद्ध ज्ञानोपाधीचा संयोग, झाला म्हणजे तेंच सर्वज्ञ ईश्वर होतें.

शिष्य—कशाला हा ईश्वरी अवतार ?

सिद्धान्ती—सर्वांना साधारण असणारे जें अव्यक्त आणि अव्याकृत जगद्बीज आहे, त्याला परिणत करणारें आणि त्याचें नियंत्रण करणारें हें ईश्वरी तत्त्व आहे. यालाच अंतर्यामी ही संज्ञा आहे. प्रलयकाळीं सर्व विश्व परमात्म्यामध्यें लीन होतें. नंतर कांहीं योग्य काल झाल्यावर पूर्वकल्पांतीं जीवांच्या लानं झालेल्या वासना उद्भूत होण्याचा समय प्राप्त होतो, तेव्हां परमात्मा ज्ञानोपाधीनें सर्वज्ञ ईश्वर होऊन या जगद्बीजाला परिणत होण्याची प्रवृत्ति करितो.ही गोष्ट या उपनिषदांतील प्रथमखंडाच्या पहिल्या मंत्रांतील शेवटच्या चरणांत सांगितली आहे. नंतर तेंच ब्रह्म काय होतें! तर व्याकृत झालेलें जें जगद्बीज म्हणजे जगत्कारण त्याची जी समष्टि-बुद्धि तींच आपला आत्मा आहे, असा अभिमान असणाऱ्या **हिरण्यगर्भ** नामक रूपांत परिणत होतें.

शिष्य—तात्पर्य, बुद्धीला विशिष्टत्व प्राप्त न होतां, ती सामान्यत्वानें असते; तेव्हां ज्याला तिचा अभिमान उत्पन्न होतो, तो हिरण्यगर्भ असें म्हणावयाचें.

सिद्धान्ती—होय. ईश्वर हा शुद्ध ज्ञानोपाधि आहे आणि हिरण्यगर्भाला 'ही माझी बुद्धि' असा अभिमान उत्पन्न होतो. ईश्वराचे स्वरूपांत अज्ञान नसतें, पण जवळ असणाऱ्या अज्ञानाचा तो स्वामी असतो. हिरण्यगर्भाला ममत्वाचा अभिमान होतो म्हणून त्याच्या स्वरूपांत अज्ञानाचा प्रवेश होतो. असो; नंतर तेंच ब्रह्म अंडापासून किंवा अंड ही उपाधि घेऊन प्रथम शरीरी होणाऱ्या त्या विराट् किंवा प्रजापति स्वरूपांत दिसतें. हिरण्यगर्भाची उपाधि सूक्ष्म असते. विराट् स्थूल उपाधीनें विकृत होतो. पुढें त्यापासूनच अग्न्यादि उपाधि घेऊन हेंच ब्रह्म अनेक देवता होतें. शेवटीं, आपल्याला जी ही निरनिराळीं विशेष शरीरें दिसतात, त्यांच्यांमध्यें सुद्धां जीवरूपानें तोच अवतीर्ण होतो. सारांश, ब्रह्मादि स्तंबपर्यंत जें अनंत पदार्थ दिसतात, त्यांच्यामध्यें प्रवेश केल्यामुळें ब्रह्माला तीं तीं अनंत नामें प्राप्त झालीं आहेत. वस्तुतः तें एकच असतांना अनेक, अनंत उपाधि-भेदांनीं भिन्न झालेलें आहे, असें सर्व जीवांस व सर्व तार्किकांस वाटतें; आणि ज्याची जशी बुद्धि चालेल, त्याचप्रमाणें तो या ब्रह्माचें 'तसें तसें स्वरूप आहे' अशी कल्पना करितो. अर्थात्

कल्पना अनंत असतात म्हणून ब्रह्माचें स्वरूपही अनंतप्रकारें वर्णिलें जातें. कोणी याला 'अग्नि या नांवानें आळवितात, कोणी मनु नांवानें हांक मारतात, कोणी प्रजापति, कोणी इंद्र, कोणी प्राण, कोणी शाश्वत ब्रह्म म्हणतात.' अशी स्मृति आहे. सारांश, एकाच ब्रह्माला अनेक नांवें अनेक लोक देतात ॥ ३ ॥

मंत्र चौथा.

स एतेन प्रज्ञेनात्मनास्माल्लोकादुत्क्रम्यामुष्मिन्स्वर्गे लोके सर्वान्कामानाप्त्वामृतः समभवत्समभवत् ॥४॥

इति पञ्चमः खण्डः ॥

अन्वय व अर्थः—एतेन प्रज्ञेन आत्मना सर्वान् कामान् आप्त्वा सः अस्मात् लोकात् उत्क्रम्य अमुष्मिन् स्वर्गे लोके अमृतः समभवत्, समभवत् (ह्या प्रज्ञ–आत्म्याच्या साहाय्यानें सर्वथा आप्तकाम व निरिच्छ होऊन तो वामदेव ह्या लोकांतून उत्क्रांत झाला, स्वर्गलोकांत गेला आणि अमृत झाला, अमृत झाला) ॐ इति (हें त्रिवार सत्य आहे) ॥ ४ ॥

पंचम खंड समाप्त.

स वामदेवोऽन्यो वा एवं यथोक्तं ब्रह्म वेद प्रज्ञेनात्मना, येनैव प्रज्ञेन आत्मना पूर्वे विद्वांसोऽमृता अभूवन् तथा अयमपि विद्वान् एतेनैव प्रज्ञेन आत्मना अस्मात् लोकात् उत्क्रम्येत्यादि व्याख्यातम् । अस्माल्लोकादुत्क्रम्य अमुष्मिन् स्वर्गे लोके सर्वान्कामान् आप्त्वा अमृतः समभवत्समभवदित्योमिति ॥ ४ ॥

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यस्य श्रीगोविंद-
भगवत्पूज्यपादशिष्यस्य श्रीमच्छंकरभगवतः
कृतौ ऐतरेयोपनिषद्भाष्यं संपूर्णम् ॥

सिद्धान्ती—याप्रमाणें वामदेव व वामदेवाप्रमाणें विचार करणाऱ्या ज्या दुसऱ्या कोणाला ब्रह्माचें यथास्वरूप ज्ञान झालें, ते मुक्त झाले. कारण, ते स्वतः प्रज्ञानरूप म्हणजे आत्मरूप झाले होते. आत्मा स्वसंवेद्य आहे. सर्व उपाधींचा परित्याग करून स्वस्थ राहिलें म्हणजे आत्मसाक्षात्कार होतो. आणि त्याला ब्रह्मत्व म्हणजे मोक्ष मिळतो. असो;—ज्या प्रज्ञानरूपी आत्मज्ञानानें पूर्वीचे विद्वान् अमृत झाले, त्याच ज्ञानानें हाही विद्वान् वामदेव हा जड लोकाचा त्याग करिता झाला; आणि येथून उत्क्रांत होऊन म्हणजे सर्व वासनांची तृप्ति झाल्यामुळें निरिच्छ होऊन स्वर्गलोकांत म्हणजे आत्म-लोकांत जाता झाला. तो अमृत झाला, तो अमर झाला, हें सांगण्याचें कारणच नाहीं. ॐ तथास्तु ॥ ४ ॥

पञ्चमखंड माध्याचें भाषांतर संपलें.

ऐतरेय-शांति-मंत्र.

वाङ्मे मनसि प्रतिष्ठिता मनो मे वाचि प्रतिष्ठितमाविरावीर्म एधि। वेदस्य म आणीस्थ श्रुतं मे मा प्रहासीः। अनेनाधीतेनाहोरात्रान्संदधाम्यृतं वदिष्यामि। सत्यं वदिष्यामि। तन्मामवतु। तद्वक्तारमवतु अवतु मामवतु वक्तारमवतु वक्तारम् ॥

॥ ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

शांतिपाठाचा अर्थ*

(हे प्रकाशरूप परमात्मन्! मला तूं प्रकट होऊन माझी वाणी मनामध्यें प्रतिष्ठित होईल व माझें मन वाणीमध्यें प्रतिष्ठित होईल असें कर. माझें मन आणि वाणी वेदराशीला मजजवळ आणितील व मी जें अध्ययन करीन तें मजजवळून जाणार नाहीं, असें कर. मी जें अध्ययन केलें आहे, त्याचें अहोरात्र चिंतन करून माझें आचरण, विचार व उच्चार तद्रूप करीन. मी नित्य ऋत बोलेन, सत्य बोलेन. तें ब्रह्म अथवा माझें ब्रह्मार्पित सत्यव्रत, माझें आचार्याचें व आम्हा गुरुशिष्याचें संरक्षण करो!)

॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

---

* उपसंहारांत या शांतिमंत्राचा विचार करूं.

ॐ

तैत्तिरीयोपनिषत्

(भाष्यभाषांतर सह)

संपादक

चिंतामण गंगाधर भानु बी. ए.

तैत्तिरीयोपनिषत्.

श्लोक पहिला.

यस्माज्जातं जगत्सर्वं यस्मिन्नेव प्रलीयते ।
येनेदं धार्यते चैव तस्मै ज्ञानात्मने नमः ॥ १ ॥

सिद्धान्ती—जेथून या सर्व जगाची अथवा विश्वाची उत्पत्ति झाली, जेथें हें विश्व प्रलयकाळीं लीन होतें आणि ज्याच्या सत्तेनें या सर्व विश्वाचें धारण होतें, त्या ज्ञानरूपी परमात्म्याला मी नमस्कार करितों ॥ १ ॥

श्लोक दुसरा.

यैरिमे गुरुभिः पूर्वं पदवाक्यप्रमाणतः ।
व्याख्याताः सर्ववेदान्तास्तान्नित्यं प्रणतोऽस्म्यहम् ॥२॥

सिद्धान्ती—ज्या परम कृपाळू गुरुचरणांनीं प्रथमतः या वेदांतांतील पदें, वाक्यें आणि प्रमाणें या सर्वांचें साहाय्य घेऊन वेदांताचें उत्तमोत्तम व्याख्यान केलें; म्हणजे पदांचा अर्थ, तात्पर्यार्थ, परस्पर-वाक्यांची प्रमाणशुद्ध संगति आणि समन्वय मला बालबोध-रीतीनें व विवेचनपूर्वक करून दाखविला, त्यांना माझे नित्य साष्टांग नमस्कार असोत. कारण मी त्यांचा नित्य ऋणी आहें ॥ २ ॥

श्लोक तिसरा.

तैत्तिरीयकसारस्य मयाऽऽचार्यप्रसादतः ।
विस्पष्टार्थरुचीनां हि व्याख्येयं संप्रणीयते ॥ ३ ॥

सिद्धान्ती—आचार्यांच्या प्रसादानें तैत्तिरीयकशास्त्रेचें सार म्हणजे जें हें उपनिषद् त्याचें व्याख्यान करण्याला मी आरंभ करितों. अर्थात् हें व्याख्यान ज्यांना स्वतःस्वरूपाचें निःशेष अनुसंधान ठेवितां येत नाहीं; आणि म्हणून उपनिषदांतील पदें आणि त्यांचा अर्थ यांचें निश्चित ज्ञान ज्यांस हवें आहे, प्राप्त व्हावें, अशी ज्यांची इच्छा आहे, त्यांच्यासाठीं माझी ही व्याख्या आहे ॥ ३ ॥

नित्यान्यधिगतानि कर्माण्युपात्तदुरितक्षयार्थानि, काम्यानि च फलार्थिनां पूर्वस्मिन्ग्रन्थे ।

सिद्धान्ती—पूर्वीच्या ग्रंथांत म्हणजे कर्मकांडांत नित्य आणि काम्य-कर्मांचा मात्र विचार केला आहे. नित्य कर्मे विहित केलीं आहेत, तीं आमच पूर्वी जे काय दुष्कर्म केलें असेल, त्याच्या क्षयासाठीं शास्त्रानें सांगितलीं आहेत. आणि काम्य-कर्मे सांगितलीं आहेत, तीं फलांची वाञ्छा असणाऱ्या लोकांकरितां सांगितलीं आहेत. तात्पर्य, पूर्वीचें पाप विनष्ट करण्यासाठीं आणि पुढें पुण्यफल मिळण्यासाठीं नित्य आणि काम्य-कर्मांची योजना आहे. पण मोक्ष मिळवूं इच्छिणाऱ्यानें अमुक एक कर्म करावें, असें कर्म-कांडांत सांगितलें नाहीं. संसार-विमोचनाचा विचार कर्मकांड करीत नाहीं, तर संसाराचा विचार करितें आणि संसार हें तर कर्मांचें फल आहे. म्हणजे संसार-विरकाला कर्म-प्रतिपादक श्रुतीचा कांहीं एक उपयोग नाहीं.

इदानीं कर्मोपादानहेतुपरिहाराय ब्रह्मविद्या प्रस्तूयते। कर्महेतुः कामः स्यात्। प्रवर्तकत्वात्। आप्तकामानां हि कामाभावे स्वात्मन्यवस्थानात्प्रवृत्त्यनुपपत्तिः। आत्मकामत्वे चाऽऽप्तकामता। आत्मा हि ब्रह्म। तद्विदो हि परप्राप्तिं वक्ष्यति। अतोऽविद्यानिवृत्तौ स्वात्मन्यवस्थानं परप्राप्तिः। "अभयं प्रतिष्ठां विन्दते" "एतमानन्दमयमात्मानमुपसंक्रामति" इत्यादिश्रुतेः।

सिद्धांती—आम्ही ब्रह्मविद्येच्या प्रस्तावनेला आरंभ करितों, तो कर्मांच्या उपादानाचा, स्वीकाराचा अथवा अनुष्ठानाचा जो हेतु (संसाराची प्राप्ति करून देणाऱ्या कर्मांची जननी जी अविद्या किंवा तज्जन्य जो काम) त्याचा परिहार करण्यासाठीं होय.

शिष्य—कर्मांचा हेतु काम म्हणजे विषयवासना आहे, हें आम्हां जीवाला ही वासना कर्मप्रवृत्त करिते, त्यावरून सिद्ध होतें, नव्हे बरें ?

सिद्धांती—होय. तेव्हां ज्यांच्या सब इच्छा परिपूर्ण झाल्या किंवा वासनेसंबंधानें तिरस्कार उत्पन्न होऊन जे निरिच्छ झाले, त्यांना कर्मप्रवर्तक कामाची बाधा होणें शक्य नाहीं. ते आत्मज्ञानाच्या सामर्थ्यानें आत्मरूपामध्यें स्वानंद-साम्राज्याचा अनुभव घेतात; म्हणून त्यांना कर्म करण्याची प्रवृत्ति होणें संभवनीय नाहीं. शिवाय, आत्मस्वरूपाविषयीची इच्छा म्हणजे स्वतःच्या शुद्ध-स्वरूपाविषयीची इच्छा. ही उत्पन्न होऊन ती उत्कट झाली म्हणजे इतर विषयांविषयीची वासना सर्वथा निवृत्त होते. म्हणून आत्मेच्छूला पूर्ण-कामत्व (पूर्ण विषयवैराग्य) प्राप्त होतें. आत्मा म्हणजेच ब्रह्म. याचें ज्ञान ज्याला झालें, तो उत्तमपदाला, ब्रह्मपदाला जाऊन पोहोंचतो, असें श्रुति सांगेल. म्हणून आम्हीं म्हणतों कीं, अविद्येची निवृत्ति झाली म्हणजे स्वस्वरूपामध्यें मात्र नित्य रममाण होण्याची स्थिति, ज्ञानैक्यस्थिति प्राप्त होते; आणि ही नित्य स्थिति म्हणजे ब्रह्मप्राप्ति होय. 'आत्मज्ञाला ब्रह्मप्राप्ति होते.' 'भयशून्य स्थान आत्मज्ञाला प्राप्त होतें.'

"या आनंदरूप आत्मस्थितीप्रत" आत्मज्ञ जाऊन पोहोंचतो" इत्यादि याच उपनिषदांत अवतीर्ण केलेल्या श्रुती आम्ही म्हणतों, त्याचें समर्थन करितांक. म्हणून उपनिषद्विद्येच्या प्रवचनाला आरंभ करणें इष्ट आहे.

काम्यप्रतिषिद्धयोरनारम्भादारब्धस्य चोपभोगेन क्षयान्नित्यानुष्ठानेन प्रत्यवायाभावादयत्नत एव स्वात्मन्यवस्थानं मोक्षः। अथवा निरतिशयायाः प्रीतेः स्वर्गशब्दवाच्यायाः कर्महेतुत्वात्कर्मभ्य एव मोक्ष इति चेन्न। कर्मानेकत्वात्। अनेकानि ह्यारब्धफलान्यनारब्धफलानि चानेकजन्मान्तरकृतानि विरुद्धफलानि कर्माणि संभवन्ति। अतस्तेष्वनारब्धफलानामेकस्मिञ्जन्मन्युपभोगक्षयासंभवाच्छेषकर्मनिमित्तशरीरारम्भोपपत्तिः कर्मशेषसद्भावसिद्धिश्च। "तद्य इह रमणीयचरणाः" "ततः शेषेण" इत्यादिश्रुतिस्मृतिशतेभ्यः। इष्टानिष्टफलानामनारब्धानां क्षयार्थानि नित्यानीति चेन्न। अकरणे प्रत्यवायश्रवणात्। प्रत्यवायशब्दो ह्यनिष्टविषयः। नित्याकरणनिमित्तस्य प्रत्यवायस्य दुःखरूपस्याऽऽगामिनः परिहारार्थानि नित्यानित्याभ्युपगमान्नानारब्धफलकर्मक्षयार्थानि। यदि नामानारब्धकर्मक्षयार्थानि नित्यानि कर्माणि तथाऽप्यशुद्धमेव क्षपयेयुर्न शुद्धम्। विरोधाभावात्। न ह्यिष्टफलस्य कर्मणः शुद्धरूपत्वान्नित्यैर्विरोध उपपद्यते। शुद्धाशुद्धयोर्हि विरोधो युक्तः।

पूर्व०—ब्रह्मविद्येची अपेक्षा व त्या विद्येची चर्चा कशाला हवी? जर जीवानें काम्य-कर्में आणि निषिद्ध-कर्में मुळीं केलींच नाहींत, जर नित्य-कर्मांचें अनुष्ठान करून पूर्वी पापकर्में केल्यामुळें उत्पन्न होणाऱ्या सर्व प्रत्यवायांचा निरास केला, आणि ज्या प्रारब्धकर्मानें हा जन्म प्राप्त झाला, त्याचा सर्वथा क्षय जर या जन्मांतील उपभोगांनीं होतो, तर—

शिष्य—तुमचा सर्व अभिप्राय एकदम सांगा पाहूं!

पूर्व०—सकाम आणि निषिद्ध कर्में केलींच नाहींत, तर पुढें होणाऱ्या जन्माला उत्पन्न करणारें कर्म केलें नाहीं, असें होतें. म्हणजे एतावता पुढच्या जन्माची क्रियमाणाची, गोष्ट संपली. तसेंच, श्रुतीनें विहित केलेलीं नित्य कर्में केलीं म्हणजे पूर्वजन्मांतील कर्मफलांचा क्षय होतो. तात्पर्य, संचितकर्माचा नाश होतो. शेवटीं, ज्या प्रारब्ध कर्मानें, फलोन्मुख झालेल्या कर्मानेंच, हा जन्म प्राप्त झाला, त्याचा उपभोगानें क्षय होऊन तें प्रारब्ध-कर्मही संपतें. याप्रमाणें क्रियमाण-कर्मांचा सर्वथा क्षय होतो. कर्मानें संसार उत्पन्न होतो. हें तुमचें म्हणणें कबूल केलें, तरी वरील पद्धतीनें

कर्मक्षय होतो अथवा संसार संपतो, असें होतें. अर्थात् संसार संपला म्हणजे सहजच, कोणताही यत्न केल्याशिवाय, स्वरूपामध्यें राहतां येईल आणि मोक्ष मिळेल. म्हणून मोक्षासाठीं ब्रह्मविद्या संपादन करण्याचें कांहीं एक कारण नाहीं.

शिष्य—झालें तुमचें म्हणणें !

पूर्व०—थांबा. आणखी आम्हाला असेंही म्हणतां येतें कीं, 'स्वर्गशब्दानें ज्या पदार्थाचा बोध होतो, तें स्थानच अत्यंत प्रीतीचें अधिष्ठान आहे. प्रत्येक मनुष्याला स्वर्ग हवा असतो. 'हा स्वर्ग ज्योतिष्टोमादि यज्ञ केल्याशिवाय मिळत नाहीं,' असें श्रुतीचें सारसर्वस्व आहे; म्हणून कर्मानेंच मोक्ष मिळतो, हें सिद्ध होतें. सारांश, कर्मानें स्वर्ग मिळतो. स्वर्ग अत्यंत प्रीतीचें स्थान म्हणजे मोक्ष होय. तेव्हां मोक्षासाठीं श्रुतिविहित ज्योतिष्टोमादि कर्म तरी केलेंच पाहिजे किंवा सर्वकर्माचा क्षय झाला म्हणजे विद्येशिवायच मोक्ष मिळाला पाहिजे. एतावता विद्येची आवश्यकता दोन्ही पक्षांत येत नाहीं, हें उघड झालें.

सिद्धान्ती—असें होत नाहीं. कर्मे अनेक असतात. ज्यांच्या फालाला आरंभ झाला आहे, अशीं व आरंभ झाला नाहीं अशीं अनेक जन्मांमध्यें केलेलीं अनेक, प्रायः अनंत, कर्मे असतात. यांतील कित्येक कर्मांचीं फळें परस्पर-विरोधी असतात. म्हणून तीं सर्वच्या सर्व एकत्र होऊन विद्यमान शरीराला आरंभ करतील आणि एका जन्माच्या उपभोगानें त्या सर्वांचा क्षय होईल, असें संभवत नाहीं. तेव्हां, त्यांपैकीं ज्या कर्मांच्या फळाला आरंभ झाला नाहीं, त्या कर्मांचा एका जन्मामध्येंच उपभोगानें क्षय होणें अशक्य आहे. हें असें असल्यामुळें राहिलेल्या कर्मांच्या फळाचा उपभोग घेण्यासाठीं पुनः जन्म घेतलाच पाहिजे. पूर्व-संचित सर्व कर्म प्रारब्धरूपानें अवतीर्ण होत नाहीं. जीं फलोन्मुख कर्मे होतात, त्यांचें मात्र प्रारब्धरूपानें अवतरण होतें. बाकीं पुष्कळ अफलोन्मुख कर्मे (ज्यांचीं फलें पक्व झालीं नाहींत, अशीं कर्मे) अवशिष्ट राहतातच कीं !

पूर्व०—कर्म-शेष राहतो, असें म्हणण्याला तुमच्यापाशीं कांहीं प्रामाणिक पुरावा आहे काय ? किंवा शुद्ध तर्कावरच काम भागवावयाचें आहे ?

सिद्धान्ती—प्रत्यक्ष शेकडों श्रुतिस्मृती आम्हीं म्हणतां, याला प्रमाण आहेत. 'जे कोणीं येथें पुण्याचरण करणारे आहेत' 'नंतर बाकी राहिलेल्या कर्मांनीं' इत्यादि श्रुतिस्मृती आम्हीं उदाहरणासाठीं मात्र पुढें केल्या आहेत. तात्पर्य, एका जन्मानें संचित आणि प्रारब्धकर्मांचा क्षय होतो, हें म्हणणें बरोबर नाहीं. काम्य व निषिद्ध कर्मे जरी केलीं नाहींत, तरी परस्परविरोधी फळें देणाऱ्या संचित-कर्म-सहस्रांचा क्षय एका जन्मांत होणें शक्य नाहीं.

पूर्व०—असें कां म्हणतां ? परस्परविरोधी इष्ट आणि अनिष्ट फळें देणाऱ्या अनारब्ध कर्मांचा क्षय नित्यकर्मांच्या अनुष्ठानानें होतो, असें भाट्टादि मीमांसक म्हणतात.

सिद्धांती—तसें नाहीं. नित्यकर्मे केलीं नाहींत, तर कांहींएक प्रत्यवाय उत्पन्न होतो, असें श्रुति सांगते. प्रत्यवाय शब्द हा अनिष्टविषयाचा वाचक आहे. नित्यकर्मे केलीं नाहींत, तर उत्पन्न होणारा प्रत्यवाय दुःखरूप असतो. तें पुढें उत्पन्न होणारें दुःख होऊं नये, म्हणून नित्यकर्मे करावीं, असें शास्त्राचें सांगणें आहे. यावरून ज्या कर्मांचें फल आरब्ध झालें नाहीं, त्यांच्या क्षयासाठीं नित्यकर्मे नाहींत, हें उघड आहे, यद्यपि 'तसें आहे' असें म्हटलें, तथापि नित्यकर्मे अशुद्धकर्मांचा, पापकर्मांचा, मात्र नाश करतील. शुद्ध म्हणजे पुण्यकर्मांचा क्षय करणार नाहींत. कारण, नित्यकर्मेंही शास्त्रशुद्ध असतात; अतएव नित्यकर्म आणि संचित पुण्यकर्म हीं दोन्हींहीं शुद्धस्वरूपाचीं असल्यामुळें त्यांचा विरोध असणें शक्य नाहीं. शुद्ध आणि अशुद्ध यांमध्यें विरोध असणें नीट आहे. शुद्धशुद्धांमध्यें असणें असंभवनीय आहे. म्हणून वेदोक्त नित्य कर्मे शुद्ध कर्मांचा क्षय करतील हें संभवत नाहीं. आणि जों पर्यंत शुद्ध कर्मे जिवंत आहेत, तोंपर्यंत शरीर-प्राप्ति चुकत नाहीं. पुण्यकर्मांचें फल भोगण्यासाठीं तरी जन्म घ्यावाच लागणार!

न च कर्महेतूनां कामानां ज्ञानाभावे निवृत्त्यसंभवादशेषकर्मक्षयोपपत्तिः । अनात्मविदो हि कामोऽनात्मफलविषयत्वात्स्वात्मनि च कामानुपपत्तिर्नित्यप्राप्तत्वात्स्वयं चाऽऽप्ता परं ब्रह्मेत्युक्तम् । नित्यानां चाकरणमभावस्ततः प्रत्यवायानुपपत्तिरिति । अतः पूर्वोपचितदुरितेभ्यः प्राप्यमाणायाः प्रत्यवायक्रियाय नित्याकरणं लक्षणमिति "अकुर्वन्विहितं कर्म" इति हि शतुर्नानुपपत्तिः ।

सिद्धान्ती—पुनः, असें ध्यानांत ठेवा कीं, जोंपर्यंत ब्रह्मज्ञान झालें नाहीं, 'मी ब्रह्म आहें' असें जोंवर कळलें नाहीं, जोंपर्यंत द्वैताचें भान आहे, तोंपर्यंत कर्म-प्रवर्तक कामाची निवृत्ति होणें अशक्य आहे. अर्थातच काम्य-निषिद्धादि कर्मांस प्रवृत्त करणारा काम जिवंत असल्यामुळें ज्ञानाच्या अभावीं कर्माचा निःशेष क्षय होणें, युक्ति-संमत नाहीं. अनात्म-वेत्त्यांना, द्वैत मानणाऱ्यांना मात्र कामबाधा (विषय बाधा) होते; कारण, त्यांचा चिंतनविषय (त्यांचें प्राप्तव्य) अनात्मक असतो. हाच काम होय. आणि कामाचा विषय अनात्मक फल देणारा आहे. पण आत्मरत आत्मज्ञांस काम-बाधा होत नाहीं. कारण, त्यांला आत्मप्राप्ति निरंतरची झालेली असते. म्हणून त्याला नित्य-नैमित्तिकाचें कारण नसतें. स्वतः आत्मा म्हणजे ब्रह्म, हें आम्ही मागें सांगितलेंच. दुसरा पदार्थ आहे, असें ज्ञान असलें म्हणजे, तो इष्ट असेल तर तत्प्राप्तीची इच्छा व तद्वियोगाचें भय आणि अनिष्ट असेल तर तत्प्राप्तीचें भय आणि तद्वियोगाची इच्छा, असा प्रकार असावयाचा. पण आत्मव्यतिरिक्त कांहीं नाहीं, असें ठरलें म्हणजे इच्छा व भय ही म्हणजे कामाची निवृत्ति निःशेष होते. शिवाय,

नित्यकर्मे न करणें हा अभाव आहे. या अभावापासून प्रत्यवाय नामक भाव (वस्तु) उत्पन्न व्हावी, हें असंभवनीय आहे. म्हणून पूर्वी संचितके लेल्या पापकर्मापासून उत्पन्न होणारी जी प्रत्यवायक्रिया, तिचें लक्षण नित्य कर्माचें अकरण हें आहे.

शि०—म्हणजे काय ?

सिद्धान्ती—पूर्वकृत-पापांनीं कांहीं प्रत्यवाय उत्पन्न होतात. हें कशावरून समजतें ? तर नित्यकर्माचें आचरण न करणें यावरून समजतें. 'जो नित्यकर्माचें आचरण करीत नाहीं.' त्यानें पूर्वी पापकर्मे केलीं असलीं पाहिजेत, असें ठरतें. सारांश, नित्याचें अकरण हें पूर्वसंचित-पापाचें सूचक आहे. 'विहित-कर्मे न करितां' इत्यादि वाक्यांवरूनही आम्ही म्हणतों, त्याचें समर्थन होतें.

पू०—असें कसें ? विहित कर्म केलें नाहीं, तर प्रत्यवाय उत्पन्न होतो व जीव नरकाप्रत जातो, असें म्हणतात.

सिद्धान्ती—असें नाहीं. जर नित्यकर्माचें अनुष्ठान केलें, तर पूर्वी केलेल्या पापाचा क्षय होतो, असें शिष्ट म्हणत असतात. म्हणून 'अकुर्वन्' हा व्याकरण-सिद्ध शब्दाचा प्रयोग इतकेंच सांगतो कीं, नित्य नैमित्तिक कर्मे केलीं, तर पूर्व-दुरित नष्ट होतें व नाहीं केले तर तीं पापें तशींच राहतात आणि म्हणून प्रत्यवाय होतो. समजलें ?

अन्यथाऽभावाद्भावोत्पत्तिरिति सर्वप्रमाणव्याकोप इति। अतोऽयत्नतः स्वात्मन्यवस्थानमित्यनुपपन्नम्।

सिद्धान्ती—नाहीं तर नित्याच्या **अकरणापासून** प्रत्यवायनामक **वस्तूची**, अथवा 'अभावापासून भावाची उत्पत्ति होते,' असें म्हणून आपण सर्व प्रमाणांचा व्याकोप केल्यासारखें होतें; कोणतही प्रमाण आपल्यास मान्य नाहीं, असें आपण दाखवितों. पण हें म्हणणें किंवा दाखविणें अन्याय्य आहे. एतदर्थ आत्मज्ञाला कर्मापेक्षा असणें शक्य नाहीं. म्हणून अज्ञान, तज्जन्य काम व कर्म संपविण्यासाठीं आत्मज्ञानच करून घेतलें पाहिजे. तात्पर्य, नित्यादि कर्माच्या **आचरणानें** मात्र सर्वसंचित-कर्माचा क्षय होत नाहीं; आणि संसार संपत नाहीं. संसार संपविण्यासाठीं कर्म संपविलें पाहिजे. काम नाहींसा झाला म्हणजे कर्म संपतें. अविद्येचा नाश झाल्याशिवाय कर्म संपत नाहीं; आणि अविद्या ही विद्येनें मात्र निवृत्त होते. तेव्हां नित्य कर्माचरणानें सहज आत्मप्राप्ति होईल, त्याला ज्ञानाची अपेक्षा नाहीं, असें जें तुम्हीं म्हणालांत, तें अन्याय्य आणि अवैदिक आहे.

यच्चोक्तं निरतिशयप्रीतेः स्वर्गशब्दवाच्यायाः कर्मनिमित्तत्वात्कर्मारब्ध एव मोक्ष इति। तन्न। नित्यत्वान्मोक्षस्य। न हि नित्यं किंचिदारभ्यते। लोके यदारब्धं तदनित्यमिति। अतो न कर्मा-

रब्धो मोक्षः । विद्यासहितानां कर्मणां नित्यारम्भसामर्थ्यमिति चेत् । न । विरोधात् । नित्यं चाऽऽरभ्यत इति विरुद्धम् । यद्विनष्टं तदेव नोत्पद्यत इति । प्रध्वंसाभाववन्नित्योऽपि मोक्ष आरभ्य एवेति चेन्न । मोक्षस्य भावरूपत्वात् । प्रध्वंसाभावोऽप्यारभ्यत इत्यभावस्य विशेषाभावाद्विकल्पमात्रमेतत् । भावप्रतियोगी ह्यभावः ।

सिद्धांती—आतां, तुमचें दुसरें असें म्हणणें होतें कीं, 'निरतिशयप्रीतीचा वाचक शब्द जो स्वर्ग (तुमच्या समजुतीप्रमाणें मोक्ष) हा ज्योतिष्टोमादि नुसतें कर्म, किंवा तेंच ज्ञानासह व उपासनेसह आरंभून शेवटास नेलें तर मिळतो, तात्पर्य, कर्मानें किंवा ज्ञानकर्मानें मोक्ष प्राप्त होतो, मोक्ष मिळतो. पण हें म्हणणें योग्य नाहीं. कारण मोक्ष ही नित्य वस्तु आहे. नित्यवस्तूला केव्हांही जन्म नसतो. व्यवहारांत ज्या गोष्टीला आरंभ होतो, तिचा जन्म होतो व ती अनित्य असते. म्हणून कर्मानें किंवा ज्ञानसहित-कर्मानें मोक्ष उत्पन्न होतो, हें म्हणणें शास्त्र-शुद्ध नाहीं. कर्मानें मोक्षाचा आरंभ म्हणजे जन्म होत नाहीं.

पूर्व०—पण विद्येसह कर्में केलीं, तर नित्य-मोक्षालाही आरंभ-सामर्थ्य प्राप्त होईल.

सिद्धान्ती—छेः छेः ! नांव कशाला घेतां ! 'वस्तु नित्य आहे; आणि तिला आरंभ होतो' हें विरोधी वाक्य तुम्हांला उच्चारवतें तरी कसें ? अहो ! तुमचा स्वर्गरूपी मोक्ष **कार्य आहे, कर्मानें उत्पन्न होणारा** आहे, व **तो नित्य आहे,** असें तुम्ही न्यायपंडित म्हणतां तरी कसे !

पू०—असें काय ? जें एकदां विनष्ट होतें, त्याला केव्हांही जन्म प्राप्त होत नाहीं तें **नित्य** होतें. हणजे **अभावाला जन्म येतो;** पण तो पुढें सर्वदां नित्य असतोच कीं नाहीं ?

शिष्य—याला कांहीं उदाहरण ?

पू०—एखादा घट आपण फोडला, म्हणजे त्या घटाचा जो अभाव **उत्पन्न होतो,** तो पुढें **नित्यच** असतो कीं नाहीं ? त्या घटाभावाचा किंवा घटप्रध्वंसाचा नाश केव्हांही होत नाहीं. तो नित्य असतो, तरी त्याला जन्म आहेच. त्याप्रमाणेंच स्वर्गनामक मोक्ष नित्य असूनही त्याचा आरंभ होऊं शकेल, म्हणजे तो कर्मकार्य असेल.

सिद्धांती—नाहीं. मोक्ष ही वस्तु किंवा तुमचाही नित्य मोक्ष **भावरूपी** आहे. पण प्रध्वंस (किंवा प्रध्वंसाभाव) हा **अभावरूपी आहे.** म्हणून तुमचा दृष्टांत चुकला. तथापि त्या प्रध्वंसाचा आरंभ होतो, यावरूनच या अभावाला कोण-त्याही प्रकारचा विशेष म्हणजे भावत्व असत नाहीं. सारांश, ही कल्पना मात्र आहे; वास्तविक पाहिलें असतां अभाव हा भावाचा प्रतियोगी असतो, म्हणजे तो भावाचा

विरोधी आहे आणि अभावमात्र त्याचें स्वरूप आहे. म्हणून त्याला भावरूप असणें शक्य नाहीं. तात्पर्य, प्रध्वंसाभाव हें कल्पनाविजृंभण आहे.

शिष्य—मला कांहीं एक समजलें नाहीं.

सिद्धान्ती—म्हणजे असें:-मोक्ष ही एकप्रकारची **सिद्ध वस्तु** आहे. प्रध्वंसाभाव ही तशाप्रकारची वस्तु नाहीं. प्रध्वंस-अभाव व प्रध्वंसाभाव हे दोन्ही ही अभावच! हे दोन्ही असत्स्वरूपी असल्यामुळें (नाहीं, नसणें हेंच त्यांचें स्वरूप असल्यामुळें) त्यांचा आरंभ होतो, असें म्हणणें ही शुद्ध भ्रांति आहे. ते अस्तिस्वरूपाच्या विरुद्ध असतात. भावाला अस्तित्व असतें. जन्म म्हणजे अस्तित्वाचा एक भाग. अभावाला (अस्तित्वविरोधाला) जन्म असणें शक्य नाहीं. म्हणून 'अभावाला जन्म' ही शुद्ध कल्पना आहे.

शिष्य—एखादें उदाहरण घेऊन सांगा, भगवन्?

यथा ह्यभिन्नोऽपि भावो घटपटादिभिर्विशेष्यते। अभिन्न एव घटभावः पटभाव इत्येवं निर्विशेषो भावाभावः क्रियागुणयोगाद्द्रव्यादिवद्विकल्प्यते। न ह्यभाव उत्पलादिवद्विशेषणसहभावी। विशेषणवत्त्वे भाव एव स्यात्। विद्याकर्मकर्तृनित्यत्वाद्विद्याकर्मसंतानजनितमोक्षनित्यत्वमिति चेन्न। गङ्गास्रोतोवत्कर्तृत्वस्य दुःखरूपत्वात्। कर्तृत्वोपरमे च मोक्षविच्छेदात्। तस्मादविद्याकामकर्मोपादानहेतुनिवृत्तौ स्वात्मन्यवस्थानं मोक्ष इति। स्वयं चाऽऽत्मा ब्रह्म; तद्विज्ञानादविद्यानिवृत्तिर्मोक्ष इति ब्रह्मविद्यार्थोपनिषदारभ्यते।

सिद्धान्ती—ज्या प्रमाणें भाव म्हणजे सत्ता (अस्तित्व) ही एकरसात्मक वस्तु आहे, तथापि घट-भाव (घटाचें अस्तित्व) पट-भाव, इत्यादि निर-निराळ्या विशेषणांनीं मूळच्या भावस्वरूपाला भिन्न भिन्न विशेष स्वरूप प्राप्त होतें. भिन्न असले तरी घटभाव, पटभाव हे **भावदृष्टीनें** (सत्तादृष्टीनें, अस्तित्वदृष्टीनें) एकस्वरूपच असतात; पण **घटदृष्टीनें** व **पटदृष्टीनें** निरनिराळेसे भाव दिसतात. त्याप्रमाणेंच भावाभावही (भावाचा अभावही) निर्विशेष, विशेषणशून्य असतो. आणि ज्याप्रमाणें द्रव्याला कर्मांच्या योगानें किंवा गुणाच्या योगानें निरनिराळीं स्वरूपें प्राप्त होतातशीं **दिसतात** (अशी आपली कल्पना असतें) त्याप्रमाणेंच अभावालाही गुणकर्मांच्या योगानें भिन्न स्वरूपें प्राप्त होतात, असें आपण कल्पितों. पण तीं भिन्नस्वरूपें आपल्यास दिसतही नाहींत. उदाहरणार्थ, द्रव्य उत्पन्न होतें, नष्ट होतें, अशा गुणोत्पत्तीनें व क्रियोत्पत्तीनें आपण कल्पना करितों. तथापि तें दृश्य असतें. त्याप्रमाणें अभावासंबंधानेंहीं 'तो घटाभाव इत्यादि' उत्पन्न झाला, तो नष्ट झाला

इत्यादि कल्पना आहेत, पण त्या कल्पनामात्र आहेत. त्या कल्पना दृश्यही नाहींत, शुद्ध कल्पना कांहीं वस्तु नव्हे. आणखी; व्यावहारिक सत्ता असणाऱ्या नील कमलाला जसें नीलत्व हें विशेषण नित्य असतें, नीलत्वाचा व कमलत्वाचा कधींही व्यभिचार होत नाहीं, तशी घटाभावाची व अभावाची स्थिति नाहीं. जर तशी असती, तर अभावालाही भाव, स्थिति व रूपत्वच प्राप्त झालें असतें. तुमच्या म्हणण्याप्रमाणें घटाचा प्रध्वंस हा जर नित्य असता (घटप्रध्वंस नित्य आहे असें जर तुम्ही म्हणाल) तर घटाभावाला नित्यत्व आहे, घटाभाव ही अस्तित्ववाचक वस्तु आहे असें होतें. म्हणून घट हें त्याचें विशेषण तेंही नित्य आहे, असेंही तुम्हांस म्हणावें लागेल! तात्पर्य अभावाच्या नित्यत्वाची कल्पना शुद्ध कल्पना आहे म्हणून अभावाचें नित्यत्व हें कोणत्याही पद्धतीनें आत्म-नित्यत्वाशीं तोलितां येणार नाहीं.

पूर्व०—तें असो; पण तुमच्या मताप्रमाणें शुद्धां विद्याकर्मांचें अनुष्ठान करणारा जीव हा तरी नित्य आहे? तेव्हां विद्या आणि कर्म यांच्या कर्त्याशीं अविच्छिन्न संयोगानें उत्पन्न झालेला मोक्ष ही नित्यच असला पाहिजे. सारांश, मोक्ष विद्याकर्म-संयोगानें उत्पन्न होतो, पण तो नित्य असतो.

सिद्धान्ती—उत्पन्न होऊन नित्य असणें ही गोष्ट अशक्य आहे. तुम्हीं कर्ता नित्य आहे, असें म्हणतां ना? श्रीगंगेचा प्रवाह जसा नित्य असतो, तसाच तुमचा कर्म-कर्ता नित्य आहे ना? आहे, असें म्हणाल तर काय प्रसंग प्राप्त होतो तो पहा. कर्तृत्व नित्य झालें, म्हणजे कर्ता नित्य दुःखी आहे, असें होतें. दुःखाच्या निवारणासाठीं मात्र आपण कर्म करितों. आणि नित्य कर्म करीत असलों म्हणजे सुखस्वरूप मोक्षाची प्राप्ति केव्हांही होत नाहीं. समजलें?

पू०—नाहीं समजलें?

सिद्धान्ती—दुःख निवारण करण्यासाठीं मात्र कर्म करणारा कर्ता जर कर्तृस्वरूपानें नित्य राहील, तर जेथें दुःख नाहीं, अशा मोक्षाची प्राप्ति त्याला झाली आहे, असें कसें सिद्ध होईल? लोहास आकर्षण करणारा चुंबक नित्य असेल तर तें लोह केव्हांही स्थिर राहणार नाहीं, चंचलच असेल. त्याचप्रमाणेंच कर्मजन्य मोक्षाची स्थिति चंचल राहील; पण मोक्ष-शब्दाचा हा अर्थ नव्हे. बरें; उलटपक्षीं, कर्ता जर कर्म करण्याचें थांबवील तर मोक्षच मिळणार नाहीं. कारण तुमच्या प्रक्रियेंत विद्या आणि कर्म यांची संगति असेल तेव्हांच मोक्षप्राप्ति होते! तें कांहीं नव्हे. विद्या आणि कर्मांच्या समुच्चयानें किंवा कर्मांनें मात्र मोक्ष मिळावयाचा नाहीं. म्हणून अविद्या, तिचा पुत्र काम आणि त्यांनें उत्पन्न केलेलें कर्म, यांचा नाश झाल्याविना मोक्षप्राप्ति केव्हांही व्हावयाची नाहीं. पण ज्ञानानें ही त्रयी निवृत्त झाली, अविद्येचें उपादान व तिचा हेतु यांचा विनाश झाला, म्हणजे नित्य आत्मस्थिति प्राप्त होते, हाच मोक्ष आहे. कारण हाच

आत्मा स्वतः ब्रह्म असतो. आत्मविज्ञान झालें म्हणजे अविद्येची निवृत्ति होते. आणि ही निवृत्ति म्हणजे मोक्ष होय. हें मनांत आणून ब्रह्मविद्या हेंच ज्याचें रहस्य आहे, त्या उपनिषदाला श्रुति आरंभ करीत आहे.

उपनिषदिति विद्योच्यते । तच्छीलिनां गर्भजन्मजरादिनिशात-नात्तदवसादनाद्वा ब्रह्मणो वोपनिगमयितृत्वादुपनिषण्णं वाऽस्यां परं श्रेय इति । तदर्थत्वाद्ग्रन्थोऽप्युपनिषत् ।

सिद्धान्ती—उपनिषद् म्हणजे विद्या. विद्या संपादन करणें, हेंच ज्याचें शील आहे, त्यांची गर्भग्रंथि व जन्मजरादि ग्रंथि शिथिल करणें, अथवा त्यांचा नाश करणें, हें ज्याच्यामध्यें सामर्थ्य आहे, किंवा ब्रह्माच्या जवळ नेण्याचें सामर्थ्य ज्याला आहे किंवा ज्याचें आत्मस्वरूपानें सतत ध्यान केलें असतां, परम कल्याण होतें, असें ज्याचें स्वरूप असतें, त्या परम निःश्रेयस अंतर्भूत करणाऱ्या वस्तूला उपनिषद् म्हणतात. हा उपनिषद् या सोपसर्गधातूचा यौगिक अर्थ झाला. ही प्राप्ति ग्रंथाच्या सार्थ अध्ययनानें होते, म्हणून ग्रंथालाही उपनिषद् म्हणतात.

हरि ॐ

शं नो मित्रः शं वरुणः । शं नो भवत्वर्यमा ।
शं न इन्द्रो बृहस्पतिः । शं नो विष्णुरुरुक्रमः ॥

अन्वय व अर्थः—**मित्रः शं नः, वरुणः शं नः भवतु** (मित्र-नामक सूर्य देवता आमचें कल्याण करो, वरुण देवता आमचें कल्याण करो ! आम्हांस या दोन्ही देवता मंगलप्रद होवोत !) **अर्यमा नः शं भवतु; इंद्रः बृहस्पतिः शं नः; उरुक्रमः विष्णुः शं नः** (अर्यमा, इंद्र, बृहस्पति, महा पराक्रमी विष्णु, आम्हांस कल्याणप्रद होवोत) ॥

शं सुखं प्राणवृत्तेरह्नश्चाभिमानी देवतात्मा मित्रो नोऽस्माकं भवतु । तथैवापानवृत्ते रात्रेश्चाभिमानी देवतात्मा वरुणः । चक्षुष्या-दित्ये चाभिमान्यर्यमा । बल इन्द्रः । वाचि बुद्धौ च बृहस्पतिः । विष्णुरुरुक्रमो विस्तीर्णक्रमः पादयोरभिमानी । एवमध्यात्मदेवताः । शं नो भवत्विति सर्वत्रानुषङ्गः । तासु हि सुखकृत्सु विद्याश्रवण-धारणोपयोगा अप्रतिबन्धेन भविष्यन्तीति तत्सुखकर्तृत्वं प्रार्थ्यते—शं नो भवत्विति ॥

सिद्धान्ती—सकल प्राणवृत्तींचा व दिवसाची अभिमानी असणाऱ्या देवतेचा आत्मा जो मित्र (सूर्य) तो आम्हांस सुखकारक होवो। याचप्रमाणें अपानवृत्तीचा व रात्रीचा अभिमानी असणाऱ्या देवतेचा आत्मा वरुण हाही सुख देवो। नेत्रेंद्रियांचा व आदित्याचा अभिमानी अर्यमा, बलाचा अभिमानी इंद्र, वाणीचा व बुद्धीचा बृहस्पति (गुरु), पायांचा अभिमानी व सर्व विश्व तीन पावलांनीं मोजणारा विष्णु हे सर्व सुखकारक होवोत। या मित्रवरुणादि सर्व अध्यात्म देवता (जीवांच्या शरीरांत राहून इंद्रियांचें नियमन करणाऱ्या देवता) आहेत.

शिष्य—'आम्हांस सुखकर होवो।' ह्या पदांचा अन्वय सर्वत्र करावयाचा आहे. होयना ? असो; पण यांची प्रार्थना कशाला ?

सिद्धांती—ह्या सर्व सुखकारी देवता प्रसन्न झाल्या, म्हणजे त्यांच्या साह्याने उपयुक्त विद्येचें श्रवण आणि त्याचें धारण सुखानें होतें. तेथें कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध उत्पन्न होत नाहीं. श्रवण आणि धारण निर्विघ्नपणानें चालतें, म्हणून या देवतांचें सुखकर्तृत्व अभीष्ट असतें. 'ह्या देवता आम्हांस सुखकर होवोत' अशी प्रार्थना करून गुरुचरणांजवळ श्रवणाला आरंभ केला, आणि श्रवणाचें धारण करण्याचा व चिंतन करण्याचा संकल्प केला, म्हणजे शिष्याला गुरुजी जें काय सांगतात, त्याचा विशेष उपयोग होतो. सारांश, अध्यात्मदेवतांची प्रार्थना करणें अवश्य आहे.

नमो ब्रह्मणे। नमस्ते वायो । त्वमेव प्रत्यक्षं ब्रह्मासि। त्वमेव प्रत्यक्षं ब्रह्म वदिष्यामि । ऋतं वदिष्यामि। सत्यं वदिष्यामि। तन्मामवतु। तद्वक्तारमवतु। अवतु माम्। अवतु वक्तारम् ॥

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

सत्यं वदिष्यामि पञ्च च ॥

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि शीक्षाध्याये प्रथमोऽनुवाकः॥१॥

अन्वय व अर्थः—हे वायो, **ब्रह्मणे, ते नमः, नमः** (हे वायुदेवते, तूं ब्रह्मस्वरूपी आहेस, तुला मी नमस्कार करितों, तुला मी नमस्कार करितों) **त्वं एव प्रत्यक्षं ब्रह्म असि** (तूं प्रत्यक्ष ब्रह्म आहेस) **त्वं**

एव प्रत्यक्षं ब्रह्म वदिष्यामि, ऋतं वदिष्यामि, सत्यं वदिष्यामि (तूं प्रत्यक्ष ब्रह्म आहेस, ऋत आहेस, सत्य आहेस, असें मी म्हणतों, किंवा म्हणेन) **तत् मां अवतु, तत् वक्तारम् अवतु, मां अवतु, वक्तारम् अवतु** (म्हणून तें माझें संरक्षण करो, आचार्यांचें संरक्षण करो, माझें संरक्षण करो, आचार्यांचें संरक्षण करा !) ॥

ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

ब्रह्म विविदिषुणा नमस्कारवन्दनक्रिये वायुविषये ब्रह्मविद्योपसर्गशान्त्यर्थं क्रियेते । सर्वक्रियाफलानां तदधीनत्वाद्ब्रह्म वायुस्तस्मै ब्रह्मणे नमः । ब्रह्मीभावं करोमीति वाक्यशेषः । नमस्ते तुभ्यं हे वायो । नमस्करोमीति परोक्षप्रत्यक्षाभ्यां वायुरेवाभिधीयते । किंच त्वमेव चक्षुराद्यपेक्ष्य बाह्यं संन्निकृष्टमव्यवहितं प्रत्यक्षं ब्रह्मासि यस्मात्तस्मात्त्वामेव प्रत्यक्षं ब्रह्म वदिष्यामि । ऋतं यथाशास्त्रं यथाकर्तव्यं बुद्धौ सुपरिनिश्चितमर्थं तदपि त्वदधीनत्वात्त्वामेव वदिष्यामि । सत्यमिति वाक्कायाभ्यां संपाद्यमानः सोऽपि त्वदधीन एव संपाद्य इति त्वामेव सत्यं वदिष्यामि । तत्सर्वात्मकं वाय्वाख्यं ब्रह्म मयैवं स्तुतं सन्मां विद्यार्थिनमवतु विद्यासंयोजनेन । तदेव ब्रह्म वक्तारमाचार्यं वक्तृत्वसामर्थ्यसंयोजनेनावतु । मामवतु वक्तारमिति पुनर्वचनमादरार्थम् । ॐ शान्तिः शान्तिः शान्तिरिति त्रिर्वचनमाध्यात्मिकाधिभौतिकाधिदैविकानां विद्याप्राप्त्युपसर्गाणां प्रशमार्थम् ॥

सिद्धांती—ब्रह्मविद्येचें जिज्ञासापूर्वक अध्ययन करीत असतां, जीं काय विघ्नें उत्पन्न होतात, त्यांची शांति करण्यासाठीं ब्रह्म-जिज्ञासूनें वायुविषयक ब्रह्माला नमस्कारशब्दपूर्वक वंदन क्रिया समर्पण करावी. कारण, ज्या ज्या आपण क्रिया करितों, त्या व त्यांचीं फलें त्याच्या (वायूच्या) स्वाधीन असतात. म्हणून येथें प्रथमतः, वायुरूपी जें ब्रह्म त्याला उच्चारपूर्वक नमस्कार केला आहे. सारांश, ब्रह्मजिज्ञासु शिष्य वायूला साष्टांगनमस्कार करून शरण गेला आहे, हा तात्पर्यार्थ आहे. तो म्हणतो, हे वायो, तुला मी नमस्कार करितों.

शिष्य—भगवन्, येथें प्रथम ब्रह्माला नमस्कार करून पुनः वायूला नमस्कार केला आहे. तेव्हां ब्रह्म निराळें आणि वायु निराळा, असें समजावयाचें कीं काय ?

सिद्धान्ती—नाहीं. ब्रह्म इंद्रिय-प्रत्यक्ष नसतें व वायु प्रत्यक्ष (इंद्रिय-प्रत्यक्ष) असतो. तेव्हां इंद्रियपरोक्ष ब्रह्म वायुच आहे, असें ब्रह्मशब्दानें सांगून ब्रह्माला म्हणजे परोक्षवायूला नमस्कार केला आहे आणि प्रत्यक्ष असणाऱ्या वायूलाही नमस्कार केला आहे.

शिष्य:—म्हणजे ब्रह्मशब्दानें येथें सूत्रात्मा समजावयाचा आणि वायुशब्दानें प्राण हा अर्थ घ्यावयाचा. प्राण प्रत्यक्ष आहे. सूत्रात्मा अप्रत्यक्ष आहे.

सिद्धान्ती—होय. पुढें जिज्ञासु म्हणतो, हे वायो, नेत्रादिकांच्या अपेक्षेनें तूं आत्मबाह्य दिसतोस. स्पर्शरूपरसादिकांनीं मात्र वायूचें अनुमान करतां येतें. म्हणून तो बाह्य इंद्रियांच्या अपेक्षेनें सन्निध आहे.

शिष्य—कारण रूपरसादि बाहरच पदार्थ आहेत.

सिद्धान्ती—होय. आणि त्यावरूनच म्हणजे रूपदर्शनावरूनच वायूचें अनुमान होतें, आणि प्राण हा तर जीवाला, साक्षीला, प्रत्यक्ष असतो. म्हणून जिज्ञासु म्हणतो, हे वायो, तूं प्रत्यक्ष ब्रह्म आहेस, असें मी म्हणतों. तसेंच, शास्त्रविहित जें कर्तव्य आहे, याचा बुद्धीमध्यें उत्कृष्ट निश्चय होऊन अर्थ सिद्ध होणें, त्याला 'ऋत' असें म्हणतात, तें ऋतही तूंच आहेस. कारण तें ऋत (निश्चितकर्तव्याचा पदार्थ) तुझ्या स्वाधीन असतें. देवा, तूंच सत्य आहेस, म्हणजे वाणीनें आणि शरीरानें जो काय अर्थ संपादन करावयाचा असतो, तो तुझ्या सत्तेनेंच संपादित होतो. तात्पर्य, शास्त्रसिद्ध कर्तव्याच। अर्थ तें ऋत अणि वाणीप्रमुख देहानें संपादावयाचें तें सत्य, वायुरूप होय. देवा, तूंच सर्वात्मक वायु-नांवाचें ब्रह्म आहेस आणि तुला शरण जाऊन मी विद्यार्थ्यानें तुझी स्तुति केली आहे; म्हणून कृपा करून माझें संरक्षण कर, मला विद्येची प्राप्ति होऊं दे. त्याचप्रमाणें हे देवा, विद्या सांगणारे ज आचाब, त्यांचेंही संरक्षण कर म्हणजे ब्रह्मविद्येच्या विवेचनाचें सामर्थ्य त्यांस असूं दे।

शिष्य—'माझें व आचार्यांचें संरक्षण कर' या वाक्याचा दोनदा उच्चार झाला आहे, यावरून शिष्याची उत्कट इच्छा आणि श्रेष्ठप्रतीचा आदर हीं व्यक्त होतात. पण शांतिशब्दाची तीन वेळ आवृत्ति केली आहे, तिचें प्रयोजन काय?

सिद्धान्ती—अध्यात्मिक, अधिभौतिक आणि अधिदैविक अशीं तीन प्रकारचीं विघ्नें, प्रत्यवाय, ब्रह्म-विद्या संपादनाच्या मार्गामध्यें येतात. त्या सर्वांचें प्रशमन व्हावें. म्हणून ही तीन वेळ आवृत्ति आहे.

प्रथम अनुवाक संपला.

शीक्षाध्याय द्वितीयानुवाक.

मंत्र पहिला.

ॐ शीक्षां व्याख्यास्यामः । वर्णः स्वरः । मात्रा बलम् । साम संतानः । इत्युक्तः शीक्षाध्यायः ॥(१)॥

शीक्षां पञ्च ॥

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि शीक्षाध्याये द्वितीयोऽनुवाकः॥२॥

अन्वय व अर्थः—ॐ शीक्षां व्याख्यास्यामः (आम्ही आतां शिक्षाध्यायाचें स्पष्ट व्याख्यान करितों) **वर्णः, स्वरः, मात्रा, बलं, साम, संतानः** (अकारादि वर्ण, उदात्तअनुदात्तादिस्वर, ह्रस्वदीर्घादि मात्रा, बल, समता आणि संतान म्हणजे संहिता हे शिक्षेचे विभाग आहेत) **इति शीक्षाध्यायः उक्तः** (याप्रमाणें शिक्षाध्यायाचें प्रवचन झालें) ॥ (१) ॥

अर्थज्ञानप्रधानत्वादुपनिषदो ग्रन्थपाठे यत्नोपरमो मा भूदिति शीक्षाध्याय आरभ्यते-शिक्षा शिक्ष्यतेऽनयेति वर्णाद्युच्चारणलक्षणम्। शिक्ष्यन्त इति वा शिक्षा वर्णादयः । शिक्षैव शीक्षा । दैर्घ्यं छान्दसम् । तां शीक्षां व्याख्यास्यामो विस्पष्टमा समन्तात्कथयिष्यामः । चक्षिङो वा ख्याञादिष्टस्य व्याङ्पूर्वस्य व्यक्तत्वात्क (वाक्)र्मण एतद्रूपम् । तत्र वर्णोऽकारादिः स्वर उदात्तादिः । मात्रा ह्रस्वाद्याः। बलं प्रयत्नविशेषः । साम वर्णानां मध्यमवृत्त्योच्चारणं समता । संतानः संततिः संहितेत्यर्थः । एष हि शिक्षितव्योऽर्थः शिक्षा यस्मिन्नध्याये सोऽयं शीक्षाध्याय इत्येवमुक्त उदित उक्त इत्युपसंहार उत्तरार्थः ॥१॥

सिद्धांती—येथें शिक्षाध्यायाला प्रथम आरंभ केला आहे, त्याचें एक रहस्य आहे. सामान्यतः उपनिषदें अर्थज्ञानप्रधान असतात. अर्थाचें ज्ञान झालें, म्हणजे उपनिषदांच्या अध्ययनाचें काम संपलें, असा लाक-समज आहे. पण तसें होऊं देऊं नये, अर्थज्ञान होत असतांना व झाल्यावर समग्र ग्रंथाचें पठण ठीक चालावें, ग्रंथ पाठ

करण्याचा उद्योग शिथिल किंवा स्तब्ध होऊं नये, म्हणून शिक्षाध्याय मुद्दाम सांगितला आहे.

शि०—याला शिक्षाध्याय असें कां नांव दिलें ?

सिद्धांती—वर्णस्वरादिकांचे उच्चार कसे करावे, हें ज्या शास्त्राच्या योगानें समजतें किंवा वर्ण कोणते, स्वर कोणते हे ज्या शास्त्राच्या योगानें समजतें, त्याला शिक्षाशास्त्र किंवा शिक्षा असें म्हणतात. शिक्षा म्हणजेच शीक्षा होय.

शिष्य—म्हणजे मूळांतील 'शिक्षा' हा शब्द-प्रयोग आर्ष असावा. होय ना ?

सिद्धान्ती—होय. श्रुतीचे द्रष्टे आचार्य म्हणतातः आम्ही शिक्षेचें समग्र स्वरूप विस्पष्टरीतीनें विस्तार करून सांगतों.

शिष्य—व्याख्या हा शब्द 'ख्या' धातूला 'वि' आणि 'आ' हे दोन उपसर्ग लागून सिद्ध झाला आहे. 'वि' म्हणजे विशेषरीतीनें स्पष्ट आणि 'आ' म्हणजे सामथ्यानें. आपणही असाच अर्थ केला आहे.

सिद्धान्ती—तात्पर्य, व्याख्या हें वाणींचें एक कर्म आहे. व्याख्याशब्दाची व्याकरणरीत्या सिद्धि कशी झाली, हा विषय कठिण आहे, म्हणून त्याची चर्चा मी करीत नाहीं. असो; शिक्षेमध्यें अकारादि हकारान्त सर्व **वर्ण** येतात. उदात्त, अनुदात्त आणि स्वरित, असे तीन **स्वर** असतात. लघु, गुरु, आणि प्लुत हा **मात्रा** होय. ह्रस्व अक्षराची एक मात्रा, दीर्घाच्या दोन आणि प्लुताला तीन मात्रा असतात. शब्दांतील अक्षरांचा उच्चार करण्याला जो विशेष प्रयत्न लागतो, त्याला बल म्हणतात.

शिष्य—म्हणजे ?

सिद्धान्ती—प या अक्षराचा उच्चार करतांना दोन्ही ओठ एकत्र मिळण्याला जो प्रयत्नविशेष करावा लागतो, किंवा तवर्गाचा उच्चार करतांना जीभ आणि दांत यांच्या संयोगासाठीं जो प्रयत्नविशेष लागतो, त्याचें बल हें नांव आहे. साम म्हणजे वर्णांचें मध्यमवृत्तीनें उच्चारण करणें होय. संतान म्हणजे संतति किंवा संहिता. याप्रमाणें योग्य पठणासाठीं वर्ण, स्वर, मात्रा, बल, साम आणि संतान ह्या सहा अंगांचें ज्ञान करून घ्यावयाचें असतें. हें ज्ञान करून देणारी शिक्षा ज्या अध्यायांत सांगितली असते, त्याचें शिक्षाध्याय हें नांव आहे. याप्रमाणें शिक्षाध्यायाचें विवेचन झालें. ॥ १ ॥

द्वितीय अनुवाक संपला.

शीक्षाध्याय तृतीयानुवाक.

सह नौ यशः । सह नौ ब्रह्मवर्चसम् ।

अन्वय व अर्थः—नौ सह यशः (आम्हां उभयतांनाही एककालीं यशःप्राप्ती होवोत) **नौ सह ब्रह्मवर्चसं** (आम्हा उभयतांनाही ब्रह्मतेजें एककालींच प्राप्त होवोंत !)

अधुना संहितोपनिषदुच्यते । तत्र संहिताद्युपनिषत्परिज्ञाननिमित्तं यद्यशः प्रार्थ्यते तन्नावावयोः शिष्याचार्ययोः सहैवास्तु । तन्निमित्तं च यद्ब्रह्मवर्चसं तेजस्तच्चावयोः सहैवास्त्विति शिष्यवचनमाशीः । शिष्यस्य ह्यकृतार्थत्वात्प्रार्थनोपपद्यते नाऽऽचार्यस्य कृतार्थत्वात् । कृतार्थो ह्याचार्यो नाम भवति ।

सिद्धांती—आतां यापुढें ' संहिता ' नामक उपनिषदाला आरंभ करितात. प्रथमतः संहितादि उपनिषदांचें उत्कृष्ट ज्ञान व्हावें व तन्निमित्त यशोलाभ व्हावा, एतदर्थ जी गुरुशिष्यांसाठीं शिष्यानें प्रार्थना केली आहे, त्या प्रार्थनेंत शिष्य आणि आचार्य या उभयतांसही यशःप्राप्ति बरोबर (एककालीं) व्हावी, दोघांसही यश यावें, असें प्रार्थिलें आहे. त्याच प्रमाणें उपनिषद्-ज्ञानाला उपकारक जें ब्रह्मतेज तेंही उभयतांस असावें, अशी शिष्यानें प्रार्थना केली आहे; आणि आचार्यांनीं आशिर्वाद दिला आहे.

शिष्यः—असा भेद कां ?

सिद्धान्तीः—शिष्याला अद्यापि ब्रह्मविद्या प्राप्त झाली नसते, तो कृतार्थ झाला नसतो, म्हणून प्रार्थना त्यानें मात्र करणें योग्य आहे; पण आचार्य कृतार्थ झालेले असतात. म्हणून त्यांनीं प्रार्थना न करितां आशीर्वाद देणें, हेंच योग्य आहे. तात्पर्य, या मंत्राचें पठण शिष्यानें मात्र करावयाचें आहे. आचार्यास हा मंत्र म्हणण्याचें कारण नाहीं, यद्यपि म्हटला, तर तो प्रार्थनात्मक न होतां आशीर्वादात्मक मात्र होतो.

मंत्र पहिला.

अथातः संहिताया उपनिषदं व्याख्यास्यामः । पञ्चस्वधिकरणेषु । अधिलोकमधिज्यौतिषमाधिविद्यमधिप्रजमध्यात्मम् ॥

अन्वय व अर्थः—अथ अतः संहितायाः उपनिषदं व्याख्यास्यामः (या नंतर अर्थ–ज्ञान होण्यासाठीं संहिताविषयात्मक उपनिषदाचें समग्र व्याख्यान स्पष्ट करितों) **पंचसु अधिकरणेषु** (यांत पांच अधिकरणें म्हणजे ज्ञानविषय आहेत) **अधिलोकं, अधिज्यौतिषं, अधिविद्यं, अधिप्रजं, अध्यात्मं** (अधिलौकिक, अधिज्यौतिष, अधिविद्य, अधिप्रज आणि अध्यात्म असे हे ज्ञानविषय आहेत)

अथानन्तरमध्ययनलक्षणविधानस्य यतोऽत्यर्थं ग्रन्थभाविता बुद्धिर्न शक्यते सहसाऽर्थज्ञानविषयेऽवतारयितुमित्यतः संहिताया उपनिषदं संहिताविषयं दर्शनमित्येतद्ग्रन्थसंनिकृष्टामेव व्याख्यास्यामः पञ्चस्वधिकरणेष्वाश्रयेषु ज्ञानविषयेष्वित्यर्थः। कानि तानीत्याह—अधिलोकं लोकेष्वधि यद्दर्शनं तदधिलोकम्। तथाऽधिज्यौतिषमधिविद्यमधिप्रजमध्यात्ममिति॥

सिद्धान्ती—अध्ययन कसें करावें, याचें लक्षण सांगितल्यानंतर लागलींच संहितोपनिषदाचें व्याख्यान करण्यास आरंभ करावयाचा आहे. कारण, ग्रंथाच्या अध्ययनानें मात्र संस्कृत झालेली बुद्धि सहसा उपनिषदाच्या अर्थज्ञानविषयामध्यें स्वयमेव प्रवेश करूं शकत नाहीं. शब्दज्ञान झालें तरी गुरुमुखाशिवाय उपनिषदांचें जें रहस्य आहे, त्याचें ज्ञान जीव–बुद्धीला होत नाहीं. म्हणून संहिता हा ज्याचा विषय आहे, तें, या ग्रंथामध्येंच असलेलें, उपनिषद् स्पष्टरीतीनें सांगण्यास आम्ही आरंभ करितों. या ग्रंथांत जें उपनिषद्रहस्य आहे तें स्पष्ट करितों, असें आचार्य म्हणतात. या संहितोपनिषदांत पांच अधिकरणें म्हणजे समजून घेण्याचे ज्ञान विषय आहेत.

शिष्य—कोणते ते पांच ज्ञानविषय ?

सिद्धान्ती—अधिलोक, अधिज्यौतिष, अधिविद्य, अधिप्रज आणि अध्यात्म, असे ते पांच ज्ञानविषय आहेत. यांचीं लक्षणें आतांच स्पष्टरीतीनें सांगतों. अधिलोक म्हणजे सर्व जगतांचा ज्यांत विचार केला असतो, तें शास्त्र होय. (२ ज्योतिषाचा, (३) विद्येचा, (४) प्रजोत्पादनाचा आणि (५) जीवशरीरसंबंधी समग्र विचार ज्यांत केलेला असतो, त्यांस अनुक्रमें अधिज्यौतिष, अधिविद्य, अधिप्रज, आणि अध्यात्म हीं नांवें आहेत.

ता महासंहिता इत्याचक्षते । अथाधिलोकम् । पृथिवी पूर्वरूपम् । द्योरुत्तररूपम् । आकाशः संधिः(१)॥

अन्वय व अर्थः—'ताः महासंहिताः इति आचक्षते (त्यांना महासंहिता असें म्हणतात) अथ अधिलोकं (प्रथम अधिलोकाचा विचार करावयाचा.) पृथिवी पूर्वरूपं, द्योः उत्तररूपं, आकाशः संधिः (पृथ्वी हें पूर्वरूप आहे. ' द्योः ' हें उत्तररूप आहे. पृथ्वी आणि द्युलोक यांस सांधणारें आकाश हा पदार्थ आहे) ॥ १ ॥

ता एताः पञ्चविषया उपनिषदो लोकादिमहावस्तुविषयत्वात्संहिताविषयत्वाच्च महत्यश्च ताः संहिताश्च महासंहिता इत्याचक्षते कथयन्ति वेदविदः । अथ तासां यथोपन्यस्तानामधिलोकं दर्शनमुच्यते । दर्शनक्रमविवक्षार्थोऽथशब्दः सर्वत्र । पृथिवी पूर्वरूपं पूर्वो वर्णः पूर्वरूपम् । संहितायाः पूर्वे वर्णे पृथिवीदृष्टिः कर्तव्येत्युक्तं भवति । तथा चोत्तररूपमाकाशोऽन्तरिक्षलोकः । संधिर्मध्यं पूर्वोत्तररूपयोः संधीयेते अस्मिन्पूर्वोत्तररूपे इति ॥ १ ॥

सिद्धान्तीः—आतां हीं पूर्वोक्त पंचविषयक उपनिषदें अधिलोकादि मोठमोठ्या विषयांचा व संहिता–विषयाचा विचार करितात म्हणून यांना महासंहिता असें वेदवेत्ते म्हणतात. मोठ्या अशा ज्या संहिता असतात, त्या महासंहिता होत.

(मूलांत संहितादृष्टीनें संप्रदायशुद्धपद्धतीनें मंत्र तोडले आहेत. पण मी अर्थाच्या सोईसाठीं मात्र येथें संहिता कोठें कोठें विभक्त केली आहे.)

सिद्धांती—या नंतर ज्या पांच ज्ञान–विषयांचा उपन्यास केला आहे, त्यांच्या पैकीं प्रथमतः अधिलोक–दर्शनाचा विचार करितों.

शिष्य—मंत्रामध्यें जो अथ शब्द आहे त्याचा उपयोग काय ?

सिद्धांती—उपासकाला म्हणजे विद्यार्थ्याला उपास्यविषयांचा, दर्शनांचा क्रम दाखविणारा हा अथ शब्द आहे. ह्याचा अन्वय सर्वत्र करावा. पृथ्वी पूर्वरूप आहे; म्हणजे पृथ्वी हा पूर्व वर्ण आहे. संहितेच्या–

शिष्य—भगवन्, संहिता शब्दाचा अर्थ मला चांगलासा समजला नाहीं.

सिद्धान्ती—वर्णांचे परस्पर अत्यंत सामीप्य असून त्यांपासून अर्थबोध करणारें जें वाक्य असतें, त्याला संहिता असें म्हणतात. तसेच येथें उपनिषद् या शब्दाचा अर्थ उपासना असा आहे. आणि या उपासनेचें फळ

प्रजा, पशु इत्यादिकांची प्राप्ति आहे. आतां ज्या उपासनेमध्यें प्रवृत्त झालेल्या पुरुषाला वेदपाठाचा संबंध नाहीं, अशा उपासनेमध्यें पुरुषाचा चित्तप्रवेश होऊं शकत नाहीं. म्हणून वेदपाठांचा संबंध सांगणारी संहिता किंवा संहितोपनिषद् येथें अवतीर्ण करण्याचें प्रयोजन आहे. समजलास? आतां अधिलोकाच्या संबंधानें विचार करावयाचा 'अधिलोकादि सर्व विषय पूज्य आहेत' अशा दृष्टीनें त्यांची उपासना करावी लागते; म्हणून अधिलोकादि संहितांचें महत्त्व आहे. अधिलोकाचें पूर्वरूप म्हणजे संहितेंतील पहिला वर्ण पृथ्वी अथवा तिची अभिमानी देवता होय. ही उपास्य आहे. त्याचप्रमाणें अधिलोकाचा उत्तर वर्ण द्युलोक अथवा त्याची अभिमानी देवता उपास्य आहे. या दोन परस्पर-संबद्ध वर्णांमध्यें (पृथ्वी आणि द्युलोकांमध्यें) असणारी आकाश म्हणजे आकाशाभिमानी देवता ही उपास्य आहे. ॥१॥

वायुः संधानम्। इत्यधिलोकम्। अथाधिज्यौतिषम्। अग्निः पूर्वरूपम्। आदित्य उत्तररूपम्। आपः संधिः। वैद्युतः संधानम्। इत्यधिज्यौतिषम्। अथाधिविद्यम्। आचार्यः पूर्वरूपम् (२)। अन्तेवास्युत्तररूपम्। विद्या संधिः। प्रवचनꣳसंधानम्। इत्यधिविद्यम्। अथाधिप्रजम्। माता पूर्वरूपम्। पितोत्तररूपम्। प्रजा संधिः। प्रजननꣳसंधानम्। इत्यधिप्रजम् (३) अथाध्यात्मम्। अधरा हनुः पूर्वरूपम्। उत्तरा हनुरुत्तररूपम्। वाक्संधिः। जिह्वा संधानम्। इत्यध्यात्मम्। इतीमा महासꣳहिताः। य एवमेता महासꣳहिता व्याख्याता वेद। संधीयते प्रजया पशुभिः। ब्रह्मवर्चसेनान्नाद्येन सुवर्ग्येण लोकेन (४)॥

सांधिराचार्यः पूर्वरूपमित्यधिप्रजं लोकेन॥

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि शीक्षाध्याये तृतीयोऽनुवाकः॥३॥

अन्वय व अर्थः—वायुः संधानं इति अधिलोकं (वायूच्या योगानें उभयतांमध्यें संधि होतो. याप्रमाणें अधिलोकांचें वर्णन झालें) अथ अधिज्यौतिषं; अग्निः पूर्वरूपं, आदित्यः उत्तररूपं,

आपः संधिः वैद्युतः संधानम्; इति अधिज्यौतिषम् (आतां अधिज्यौतिषाचा विचार करितों. याचें पूर्वरूप अग्नि आहे, सूर्य हें उत्तररूप आहे. जल हा संधी आणि विद्युत् हें संधान, सांधण्याचें साधन आहे. हा अधिज्यौतिषासंबंधानें विचार झाला) **अथ अधिविद्यं आचार्यः पूर्वरूपं (२) अंतेवासी उत्तररूपं, विद्या संधिः प्रवचनं संधानं; इति अधिविद्यं** (आतां अधिविद्य विषयाला आरंभ करितों. येथें आचार्य हें पूर्वरूप, शिष्य हें उत्तररूप, विद्या हा उभयतांमधील संधी, मध्यभाग आणि प्रवचन,–व्याख्यान–हें संधान आहे. हें अधिविद्येचें प्रवचन झालें) **अथ अधिप्रजं; माता पूर्वरूपं पिता उत्तररूपं, प्रजा संधिः, प्रजननं संधानं, इति अधिप्रजं** (अधिप्रजनामक ज्ञान सांगतों. माता हें पूर्वरूप, पिता हें उत्तररूप, प्रजा–पुत्रादि संधी आणि प्रजनन, उत्पादन, हें संधान होय. याप्रमाणें अधिप्रजाचा विचार झाला) **(३) अथ अध्यात्मं; अधरा हनुः पूर्वरूपं, उत्तरा हनुः उत्तररूपं, वाक् संधिः, जिह्वा संधानं; इति अध्यात्मं** (आतां अध्यात्माचा विचार करतों. खालची हनुवटी पूर्वरूप, वरचा ओठ उत्तररूप, वाणी संधी आणि जिव्हा हें संधान होय. असा हा अध्यात्मविचार आहे) **इति इमाः महासंहिताः** (याप्रमाणें या सर्व महासंहिता आहेत) **यः एवं एताः व्याख्याताः महासंहिताः वेद** (ज्या कोणाला वर सांगितल्याप्रमाणें या महा संहितांचें ज्ञान झालें–त्याला—) **प्रजया पशुभिः ब्रह्मवर्चसेन, अन्नाद्येन सुवर्ग्येण लोकेन संधीयते** (प्रजा, पशु, ब्रह्मतेज, अन्नादि संपत्ति आणि जेथें उत्तमप्रकारचें सुख आहे, असा स्वर्गलोक प्राप्त होतो) ॥ ४ ॥

वायुः संधानम् । संधीयतेऽनेनेति संधानम् । इत्यधिलोकंदर्शनमुक्तम् । अथाधिज्यौतिषमित्यादि समानम् ।

इतीमा इत्युक्ता उपप्रदर्श्यन्ते । यः कश्चिदेवमेता महासंहिता व्याख्याता वेदोपास्ते । वेदेत्युपासनं स्याद्विज्ञानाधिकारात् " इति प्राचीनयोग्योपास्स्व " इति च वचनात् । उपासनं च यथाशास्त्रं

तुल्यप्रत्ययसंततिरसंकीर्णा चातत्प्रत्ययैः शास्त्रोक्तालम्बनविषया च। प्रसिद्धश्चोपासनशब्दार्थो लोके गुरुमुपासते (स्ते), राजानमुपास्त इति, यो हि गुर्वादीन्संततमुपचरति स उपास्त इत्युच्यते। स च फलमाप्नोत्युपासनस्य। अतोऽत्रापि च य एवं वेद संधीयते प्रजादिभिः स्वर्गान्तैः प्रजादिफलान्याप्नोतीत्यर्थः॥ २-३-४॥

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यगोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यश्रीमच्छंकरभगवतः कृतौ तैत्तिरीयोपनिषच्छीक्षाध्यायभाष्ये तृतीयोऽनुवाकः॥ ३॥

सिद्धांती—आतां द्यौ व आकाश ह्या उभयतांस जोडणारा जो वायु तोही उपास्य आहे; अशी दृष्टि ठेऊन अधिलोकाची उपासना करावी. याचप्रमाणें बाकींच्याही विचारतः परामृष्ट झालेल्या ज्ञानविषयांचा, दर्शनांचा, उपासनादृष्टीनें विचार करावयाचा आहे. यांतील रहस्य उपसंहारांत सांगूं. असो;—

शिष्य—या आतांच सांगितलेल्या पंचविषयक उपासनांचें कांहीं फल आहे, असें आपण सांगितलें; तें कोणतें बरें?

सिद्धान्ती—या व्याख्यानांत केलेल्या पंचमहासंहितांतील देवतांची जो यथास्थित उपासना करितो—

पूर्व०—पण वेद या शब्दाचा जाणतो असा अर्थ आहे ना?

सिद्धांती—वेद म्हणजे जाणणें हा नित्य अर्थ आहे खरा; पण या उपनिषदांतच उपासना अर्थानें 'वेद' या शब्दाचा श्रुति उपयोग करीत आहे. 'हे प्राचीनयोग्या, तूं उपासना कर' असा प्रयोग याच उपनिषदांत आहे. हें वाक्य सहाव्या अनुवाकांत आढळेल. आणि शब्दाचाही यौगिक अर्थही उपासना असा आहे. म्हणून आम्हीं त्या अर्थाचें ग्रहण करितों. उपासनेला फल असतें. शुद्धज्ञानाला बाहेरून मिळणारें फल नसतें.

शिष्य—उपासना कशी करावयाची?

सिद्धान्ती—आपलें जें ध्येय आहे; आणि ज्या ध्येयाचा शास्त्रामध्यें सांगितलेलें अवलंबन (आलंबन) हा विषय आहे, त्या ध्येयाच्या सदृश अविच्छिन्न प्रत्यय असणें, दुसऱ्या कोणत्याही वस्तूचा प्रत्यय न येणें, हें उपासनेचें लक्षण आहे. उदाहरणार्थ;आपण ओंकाराचें किंवा विष्णूचें अथवा कोणत्याही शास्त्रोक्त-देवतेचें ध्यान करीत असतांना एक ओंकाराचा मात्र किंवा विष्णूचा मात्र अखंड प्रत्यय असणें,हा प्रत्यय सांसारिकगोष्टींनीं केव्हांही विच्छिन्न न होणें, ही खरी उपासना होय. व्यवहारांतही आपण असेंच म्हणतों. गुरूची जो सर्वात्मना अखंड सेवा करून त्याच्या जवळ असतो; किंवा दुसरा कोणी राजाची एकनिष्ठेनें अखंड सेवा करितो व जवळ असतो, त्याला आपण गुरूपासक किंवा नृपोपासक असें म्हणतों. अर्थात् या उपासनांचें फळ शिष्याला किंवा प्रजेला

मिळतें. या रीतीची एकनिष्ठ आणि अखंड उपासना महासंहितांची झाली म्हणजे वर सांगितलेल्या व्यावहारिकफलाप्रमाणें येथेंही या उपासनांचे फल मिळतें. म्हणजे त्याला संतति-संपत्तिपासून तों स्वर्गांतील उत्कृष्ट सुख देणारीं फलें मिळतात. त्याला प्रजा, पशु, विद्या, ऐश्वर्य, अन्नादि-संपत्ति आणि स्वर्गसुख इत्यादि मिळतें ॥ (२-३-४) ॥

तिसरा अनुवाक समाप्त.

शीक्षाध्याये चतुर्थोऽनुवाकः ।

यश्छन्दसामृषभो विश्वरूपः । छन्दोभ्योऽध्यमृतात्संबभूव । स मेन्द्रो मेधया स्पृणोतु । अमृतस्य देव धारणो भूयासम् । शरीरं मे विचर्षणम् । जिह्वा मे मधुमत्तमा । कर्णाभ्यां भूरि विश्रुवम् । ब्रह्मणः कोशोऽसि मेधया पिहितः । श्रुतं मे गोपाय । आवहन्ती वितन्वाना (१) ॥

कुर्वाणाऽचीरमात्मनः । वासाꣳसि मम गावश्च । अन्नपाने च सर्वदा । ततो मे श्रियमावह । लोमशां पशुभिः सह स्वाहा । आ मा यन्तु ब्रह्मचारिणः स्वाहा । वि माऽऽयन्तु ब्रह्मचारिणः स्वाहा । प्र माऽऽयन्तु ब्रह्मचारिणः स्वाहा । दमायन्तु ब्रह्मचारिणः स्वाहा । शमायन्तु ब्रह्मचारिणः स्वाहा (२) ॥

यशो जनेऽसानि स्वाहा । श्रेयान्वस्यसोऽसानि स्वाहा । तं त्वा भग प्रविशानि स्वाहा । स मा भग प्रविश स्वाहा । तमिन्त्सहस्रशाखे । नि भगाहं त्वयि मृजे स्वाहा । यथाऽऽपः प्रवताऽऽयन्ति । यथा मासा अहर्जरम् । एवं मां ब्रह्मचारिणः । धातरायन्तु सर्वतः स्वाहा । प्रतिवेशोऽसि प्र मा भाहि प्र मा पद्यस्व (३) ॥

वितन्वाना शमायन्तु ब्रह्मचारिणः स्वाहा, धातरायन्तु सर्वतः स्वाहैकं च॥

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि शीक्षाध्याये चतुर्थोऽनुवाकः ॥४॥

अन्वय व अर्थः—**यः छंदसां ऋषभः, विश्वरूपः, अध्यमृतात् छंदोभ्यः संबभूव** (जो छंदांचा नायक आहे, वेदनायक आहे, सर्वरूपी आहे, आणि अमृतरूपी वेदापासून ज्याचा जन्म झाला) **सः इन्द्रः मा मेधया स्पृणोतु** (तो इंद्र, ईश्वररूपी ओंकार, मला उत्तमप्रकारची बुद्धि देऊन माझें बुद्धिबल वाढवो) **देव अमृतस्य धारणो भूयासं** (हे देवा, मी अमृत फल देणारें ज्ञान–धारण करणारा होऊं दे) **मे शरीरं विचर्षणं, मे जिह्वा मधुमत्तमा, कर्णाभ्यां भूरि विश्रुवं,** (माझें शरीर बलवंत होवो, जिह्वा अत्यंत मधुरभाषिणी असो, कर्णांनीं मला पुष्कळ मधुर श्रवण घडूं दे) **ब्रह्मणः कोशः असि** (तूं परब्रह्माचा कोश–कवच–आहेस) **मेधया पिहितः** (तूं आमच्या विषयग्राहक बुद्धीमुळें आम्हांस दिसत नाहींस) **मे श्रुतं गोपाय** (मी श्रवण केलेलें ज्ञान रक्षण कर) **आवहंती, वितन्वाना** (स्वतः आणणारी, विस्तार करणारी, संपत्ती —मला असावी–) ॥ १ ॥

आत्मनः अचीरं (**चीरं**) **कुर्वाणा** (आत्म्याला नित्य करणारी– संपत्ति मला असावी–) **मम वासांसि, गावः च अन्नपाने च, सर्वदा** (मला नेहमीं वस्त्रें, धेनु, अन्न, आणि पेय असो) **ततः मे लोमशां पशुभिः सह श्रियं आवह** (बुद्धि इत्यादि उत्तम साधनें मिळाल्यामुळें मला शेंळ्या–मेंढ्यादि पशूंसह संपत्ति मिळो) **स्वाहा** (मागीलमंत्र म्हणून आहुति देणेची आहे,) **मा ब्रह्मचारीणः आयन्तु स्वाहा** (माझ्याकडे ब्रह्मचारी येवोत, असें म्हणून एक आहुति द्यावयाची आहे) **मा ब्रह्मचारिणः व्यायन्तु स्वाहा** (माझ्याकडे ब्रह्मचारी लवकर लवकर येवोत, ही एक आहुति देणेची आहे) **मा ब्रह्मचारिणः प्रायन्तु स्वाहा, ब्रह्मचारिणः दमायन्तु स्वाहा, ब्रह्मचारिणः शमायन्तु स्वाहा** (ब्रह्मचारी माझ्याकडे जलद येवोत, ते इंद्रियनिग्रह केलेले असोत व मनोनिग्रह केलेले असोत, असें म्हणून तीन आहुति देणेच्या आहेत) ॥ २ ॥

जने यशः असानि स्वाहा (लोकांमध्यें मी यशस्वी होवो, ही आहुति) **श्रेयान् वस्यसः असानि स्वाहा** (मला कल्याणकारी संपत्ति असो,–ही आहुति–) **भग तं त्वा प्रविशानि स्वाहा** (हे भगवन्, त्या तुझ्यामध्यें माझा प्रवेश असो; ही आहुति–) **भग सः मा प्रविश स्वाहा** (हे भगवन्, तो तूं माझ्यामध्यें प्रवेश कर; ही आहुति–) **भग अहं सहस्रशाखे तस्मिन् त्वै निमृजे स्वाहा** (हे पूजनीय, मी तुझ्या त्या बहुरूपी शरीरामध्यें पापक्षालनासाठीं प्रवेश करितों,ही आहुति)अशा आहुती देणेच्या आहेत–) **यथा प्रवताः आपः आयन्ति, यथा मासाः अहर्जरं, एवं धातः मां सर्वतः ब्रह्मचारिणः आयन्तु स्वाहा** (ज्याप्रमाणें जलप्रवाह उतरत्या प्रदेशानें मार्ग काढीत जातो किंवा दिनकृत मास वर्षाच्या शेवटाला जातात, त्याप्रमाणें हे सर्व पालक, माझ्याकडे सर्व–देशांतून विद्यार्थी शिकण्याकरितां येवोत–ही आहुति देणेची आहे) **प्रतिवेशः असि** (तूं शुद्धिकारक आश्रयस्थान आहेस) **मा प्रभाहि, मा प्रपद्यस्व** (म्हणून माझ्यावर ज्ञानप्रकाश असूं दे आणि मला आपल्याकडे घेऊन चल, माझ्याकडे ये) ॥ ३ ॥

यच्छन्दसामिति । मेधाकामस्य श्रीकामस्य च तत्प्राप्तिसाधनं जपहोमावुच्येते । " स मेन्द्रो मेधया स्पृणोतु " " ततो मे श्रियमावह " इति च लिङ्गदर्शनात् । यच्छन्दसां वेदानामृषभ इवर्षभः प्राधान्यात् । विश्वरूपः सर्वरूपः सर्ववाग्व्याप्तेः, "तद्यथा शङ्कुना" इत्यादिश्रुत्यन्तरात् । अत एवर्षभत्वमोंकारस्य । ओंकारो ह्यत्रोपास्य इति ऋषभादिशब्दैः स्तुतिर्न्याय्यैवोंकारस्य । छन्दोभ्यो वेदेभ्यो वेदा ह्यमृतं तस्मादमृतादधिसंबभूव । लोकदेववेदव्याहृतिभ्यः सारिष्टं जिघृक्षोः प्रजापतेस्तपस्यत ओंकारः सारिष्टत्वेन प्रत्यभादित्यर्थः । न हि नित्यस्योंकारस्याजसैवोत्पत्तिरवकल्पते । स एवंभूत ओंकार इन्द्रः सर्वकामेशः परमेश्वरो मा मां मेधया प्रज्ञया स्पृणोतु प्रीणयतु बलयतु वा । प्रज्ञाबलं हि प्रार्थ्यते । अमृतस्यामृतत्वहेतुभूतस्य ब्रह्मज्ञानस्य तदधिकारात्, हे देव धारणो धारयिता भूया-

सं भवेयम् । किंच शरीरं मे मम विचर्षणं विचक्षणं योग्यमित्येतत् । भूयादिति प्रथमपुरुषविपरिणामः । जिह्वा मे मधुमत्तमा मधुमत्यतिशयेन मधुरभाषिणीत्यर्थः । कर्णाभ्यां श्रोत्राभ्यां भूरि बहु विश्रुवं व्यश्रवं श्रोता भूयासमित्यर्थः। आत्मज्ञानयोग्यः कार्यकारणसंघातोऽस्त्विति वाक्यार्थः । मेधा च तदर्थमेव हि प्रार्थ्यते । ब्रह्मणः परमात्मनः कोशोऽसि असेरिवोपलब्ध्यधिष्ठानत्वात् । त्वं हि ब्रह्मणः प्रतीकं त्वयि ब्रह्मोपलभ्यते । मेधया लौकिकप्रज्ञया पिहित आच्छादितः स त्वं सामान्यप्रज्ञैरविदिततत्त्व इत्यर्थः श्रुतं श्रवणपूर्वकमात्मज्ञानादिकं मे गोपाय रक्ष । तत्प्राप्त्यविस्मरणादि कुर्वित्यर्थः । जपार्था एते मन्त्रा मेधाकामस्य । होमार्थास्त्वधुना श्रीकामस्य मन्त्रा उच्यन्ते । आवहन्त्यानयन्ती । वितन्वाना विस्तारयन्ती । तनोतेस्तत्कर्मत्वात् ॥ १ ॥

कुर्वाणा निर्वर्तयन्ती । अचीरमचिरं क्षिप्रमेव । छान्दसो दीर्घः । चिरं वा कुर्वाणा । आत्मनो मम, किमित्याह - वासांसि वस्त्राणि मम गावश्च गाश्चेति यावत् । अन्नपाने च सर्वदैवमादीनि कुर्वाणा श्रीर्या तां ततो मेधानिर्वर्तनात्परमावहाऽऽनय । अमेधसो हि श्रीरनर्थायैवेति । किंविशिष्टाम् । लोमशामजाव्यादियुक्तामन्यैश्च पशुभिः संयुक्तामावहेत्यधिकारादोंकार एवाभिसंबध्यते । स्वाहा, स्वाहाकारो होमार्थमन्त्रान्तज्ञापनार्थः । आयन्तु मामिति व्यवहितेन संबन्धः । ब्रह्मचारिणो विमाऽऽयन्तु प्रमाऽऽयन्तु दमायन्तु शमायन्त्वित्यादि ॥ २ ॥

यशो यशस्वी जने जनसमूहेऽसानि भवानि । श्रेयान्प्रशस्यतरो वस्यसो वसीयसो वसुतरवत्तरः । वत्तराऽसानीत्यन्वयः । किंच तं ब्रह्मणः कोशभूतं त्वा त्वां हे भग भगवन्पूजावन्प्रविशानि प्रविश्य चानन्यस्त्वदात्मैव भवानीत्यर्थः । स त्वमपि मा मां भग भगवन्पूजावन्प्रविशाऽऽवयोरेकत्वमेवास्तु । तस्मिंस्त्वयि सहस्रशाखे बहुभेदे निमृजे शोधयाम्यहं पापकृत्याम् । यथा लोक आपः प्रवता प्रवणवता निम्नवता देशेन यन्ति गच्छन्ति । यथा च मासा अहर्जरं संवत्सरोऽहर्जरः । अहोभिः परिवर्तमानो लोकाञ्जरयतीत्यहानि वाऽस्मिञ्जीर्यन्त्यन्तर्भवन्तीत्यहर्जरः । तं च यथा मासा यन्त्येवं मां ब्रह्मचारिणो हे धातः सर्वस्य विधातः, मामायन्त्वागच्छन्तु सर्वतः

सर्वदिग्भ्यः प्रतिवेशः श्रमापनयनस्थानमासन्नगृहमित्यर्थः । एवं त्वं प्रतिवेश इव प्रतिवेशस्त्वच्छीलिनां सर्वपापदुःखापनयनस्थानमसि, अतो मा मां प्रति प्रभाहि प्रकाशयाऽऽत्मानं प्रपद्यस्व च । मां रसविद्धमिव लोहं त्वन्मयं त्वदात्मानं कुर्वित्यर्थः । श्रीकामोऽस्मिन्विद्याप्रकरणेऽभिधीयमानो धनार्थः । धनं च कर्मार्थम् । कर्म चोपात्तदुरितक्षयाय । तत्क्षये हि विद्या प्रकाशते ।

तथा च स्मृतिः—

" ज्ञानमुत्पद्यते पुंसां क्षयात्पापस्य कर्मणः ।
यथाऽऽदर्शतले प्रख्ये पश्यन्त्यात्मानमात्मनि " इति ॥ ३ ॥

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यगोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यश्रीमच्छंकरभगवतः कृतौ तैत्तिरीयोपनिषच्छीक्षाध्यायभाष्ये चतुर्थोऽनुवाकः ॥ ४ ॥

सिद्धान्ती—हे मंत्र जपहोमात्मक आहेत. ज्या मुमुक्षु पुरुषाला आत्मप्राप्त्यर्थ बुद्धिबलाची आणि संपत्तीची इच्छा असते, त्याला प्रज्ञा व संपत्ति मिळवून देण्याचीं हीं जपहोमात्मक साधनें म्हणजे हे मंत्र आहेत.

शिष्य—कशावरून बरें, भगवन् ?

सिद्धांती—' तो इंद्र मला बुद्धिबल देवो ' ' बुद्धि-दानानें मला संपत्ति आणून दे ' इत्यादि मंत्रगत चिन्हांवरून स्पष्ट निघतें कीं, हे मंत्र बुद्धिप्रापक आणि संपत्तिदायक आहेत. या मंत्रांत ओंकाराची स्तुति केली आहे. ओंकार हा सर्व वेदांमध्यें श्रेष्ठ आहे. ऋषभ याचा सारसर्वस्व, प्रधान, श्रेष्ठ, असा अर्थ आहे. ओंकार हा प्रणव सर्ववाणीचा व्यापक आहे. ' ज्याप्रमाणें एखादा शंकु सर्व पृष्ठांस किंवा पर्णांत एकत्र ठेवितो ' इत्यादि दुसरी श्रुति ओंकाराचें प्रधानत्व स्पष्ट सांगत आहे. म्हणून ओंकार हा सर्ववेदांत श्रेष्ठ आहे. ओंकार हीच वस्तु येथें उपास्य आहे. आणि म्हणूनच ऋषभादि शब्दांनीं ओंकाराची जी स्तुति केली आहे, ती ही न्याय्यच आहे. वेद हे अमृतस्वरूपी आहेत. वेद म्हणजे छंद. तेव्हां, अमृतापासून म्हणजे छंदांपासून ओंकाराची उत्पत्ति झाली आहे, हें स्पष्ट आहे. लोक, देव, वेद, यांचे स्वरूप सांगणाऱ्या भूर्भुवादि व्याहृतींपेक्षा ओंकार हा प्रणव सर्वश्रेष्ठ आहे. अत्युत्तम वस्तु प्राप्त करून घेण्याच्या इच्छेनें तपश्चर्या करणारा जो प्रजापति त्याला, अति उत्कृष्ट जो ओंकार, जो भूर्भुवादिकांचें सारसर्वस्व आहे, त्याचा साक्षात्कार झाला. खरेंच आहे; नित्यस्वरूपी जो ओंकार त्याची उत्पत्ति होते, अशी कल्पना करणें संमजस नाहीं. म्हणून ' अभिसंबभूव ' याचा अर्थ साक्षात्कार झाला, ओंकारस्वरूप प्रकट झालें, असा केला पाहिजे. असो; या वर सांगितलेल्या स्वरूपाचा ओंकार हा इंद्र म्हणजे सर्वकामनांचा स्वामी व

सर्व मनोरथ पूर्ण करणारा परमेश्वरच आहे. हा ओंकारस्वरूपी परमेश्वर बुद्धि देऊन माझी मनकामना पूर्ण करो व मला आनंद देवो; माझें बुद्धिबल वृद्धिंगत करो।—

शिष्य—तात्पर्य, या उपासकानें बुद्धिबल मागितलें आहे.

सिद्धान्ती—कारण हें आहे कीं, अमृतरूपी अथवा अमृताचा हेतु असणारें जें ब्रह्मज्ञान तें प्राप्त होण्याला प्रज्ञाबल अवश्य पाहिजे. म्हणून उपासक म्हणतो 'हे देवा, मला बुद्धिबल दे; म्हणजे मी ब्रह्मज्ञानाचें धारण करण्यास योग्य होईन. त्याप्रमाणेंच माझें शरीरही निरोगी आणि ज्ञानधारणयोग्य असावें.

शिष्य—भगवन्, मंत्रांतील 'शरीर' या प्रथमांत शब्दाला 'भूयासं' (मी होवों) हें क्रियापद चालावयाचें नाहीं. 'भूयात्' (असें होवो) हें क्रियापद हवें.

सिद्धान्ती—तूं म्हणतोस, तें रूप भूयासं याचाच विपरिणाम आहे, असें समज. असाच अन्वय अवश्य तेथें पुढेंही, लावीत जा. असो; माझी जिव्हा अत्यंत मधुरभाषिणी होवो. त्याच प्रमाणें माझ्या दोन्ही कर्णांच्या द्वारें मला उत्कृष्टप्रकार पुष्कळ ज्ञान ऐकावयास लवकर सांपडो. तात्पर्य, 'आत्मज्ञान ग्रहण करण्याला योग्य असा कार्य-कारण-संघातात्मक देह मला प्राप्त होवो.' ही प्रार्थना आहे. याचप्रमाणें उपासकानें आत्मज्ञान देणारें बुद्धिबलही मागितलें आहे, हें तुला स्मरतेंच. उपासक पुनः म्हणतो. 'हे प्रणवा, तूं परमात्म्याचा संरक्षक-कोश (कवच) आहेस. तरवारीला जशी म्यान तसा तूं आपल्या स्वरूपामध्यें परमात्म्याचें संरक्षण करितोस. खड्ग सांपडण्याचें स्थान जसें म्यान, तसें परमात्म्याच्या उपलब्धीचें स्थान तूं आहेस. तूं ब्रह्माचें प्रतीक आहेस आणि तुझ्यामध्यें शोध केला असतां मात्र ब्रह्माची प्राप्ति होते.'

शिष्य—ओंकारोपासनेनें ब्रह्मप्राप्ति होते, हा विषय **कठमांडुक्यादि**-उपनिषदांत येऊन गेलाच आहे.

सिद्धान्ती—आणि त्याचाच अनुवाद उपासक येथें करीत आहे. उपासकानें दिव्य बुद्धि मागितली आहे. त्याचें रहस्य हें आहे कीं, लोकांच्या प्राकृत बुद्धीनें ओंकारस्वरूप आच्छादित झालेलें असतें. सामान्यबुद्धीच्या मनुष्याला प्रणवाचें रहस्य कळत नाहीं. यासाठीं अलौकिकबुद्धीचें मागणें उपासकानें केलें. शेवटीं, उपासक मागतो कीं, श्रवणादिपूर्वक जें आत्मज्ञानादि प्राप्त होईल, त्याचें संरक्षण प्रणवानें करावें. म्हणजे प्राप्त झालेल्या ज्ञानाचें मला विस्मरण होऊं नये. याप्रमाणें जपार्थक मंत्राचा विचार झाला. हा बुद्धि हवी असणाऱ्या उपासकानें करावयाचा जप आहे. यापुढें संपत्ति इच्छिणाऱ्या उपासकाला जो होम विहित केला आहे, त्याचे मंत्र श्रुति सांगत आहे ॥ १ ॥

'हे देवा, हे ओंकार, मला वस्त्रें, धेनु, अन्नपान सर्वदा प्राप्त करून देणारी, लवकर लवकर त्यांचा विस्तार करणारी आणि त्या नित्य वस्तू प्रत्यक्ष आणून देणारी संपत्ति

मला दे. माझी पशुसंपत्ति पुष्कळ असावी. तशीच अजा (शेळ्या) व अवि (मेंढ्या) अशी संपत्ति मला पुष्कळशी दे. माझ्या बुद्धिसामर्थ्यानेंच मला ही संपत्ति प्राप्त होऊं दे. कारण, ज्याला बुद्धि नाहीं, त्याची संपत्ति अनर्थांची परंपरा उत्पन्न करिते. असा हा ओंकारप्रार्थनेचा मंत्र म्हणून आहुति द्यावयाची आहे. ओंकाराशीं सर्व क्रियापदें संबद्ध आहेत. अचीर=अचिर=लौकर. चिर म्हणजे नित्य होय.

शिष्य—स्वाहा या शब्दाचा या मंत्रांत बराच वेळ उच्चार झाला आहे. याचें तात्पर्य काय ?

सिद्धान्ती—अग्निकुंडांत देवांस समंत्रक आहुती द्यावयाच्या असल्या म्हणजे स्वाहा या शब्दाचा उच्चार करितात. स्वाहा म्हटल्यानंतर एक होमात्मक प्रार्थना-मंत्र संपूर्ण झाला, असें समजावें. याच संहितेत पुढें पांच आहुती सांगितल्या आहेत. त्यांचा अभिप्राय इतकाच आहे कीं, अनेकविषयांचें अध्ययन करणारे विषयविरक्त आणि मनोविजयी ब्रह्मचारी आपल्याकडे अध्ययनास लवकर येवोत. त्यांस येतांना अडचणी येऊं नयेत व ते ब्रह्मविद्येसाठींच यावेत, हा अभिप्राय आहे ॥ २ ॥

सिद्धान्ती—या तिसऱ्या संहितेंतही होम करणारानें सहा आहुती दिल्या आहेत. प्रथमतः तो लोकांमध्यें आपली कीर्ति सर्वत्र पसरो, असें मागतो. त्याचें दुसरें मागणें हें कीं; आपण अत्यंत श्रीमंत, श्रीमंतांपेक्षांही जास्त श्रीमंत, व्हावें. तिसरें मागणें हें: 'हे ब्रह्मकवचा, हे भगवन्, हे ऐश्वर्य, ज्ञान, वैराग्य, धर्मादि षड्गुण संपन्न प्रणवदेवा, माझा तुझ्या पूज्यस्वरूपांत प्रवेश होऊन त्वदात्मक मी होवों. चौथें मागणें: तूंही आपल्या पूज्यस्वरूपानें माझ्यामध्यें प्रवेश कर. तूं व मी एक होऊं दे. पांचवें मागणें: या तुझ्या अनंत शक्त्यात्मक शुद्धस्वरूपांत मी आपल्यास शुद्ध करून घेतों, मी आपली सर्व पाप-कृत्यें धुवून काढितों. निसर्ग-व्यवस्थेमध्यें जलप्रवाह उतरत्या मार्गानें खालीं खालीं जातात; आणि चैत्र वैशाखादि महिनें अहर्जराकडे जातात—

शिष्य—अहर्जर म्हणजे ?

सिद्धांती—दिवसा-दिवसांनीं परिवृत होऊन लोकांस वृद्ध करणारा किंवा दिवसांचा अंतर्भाव-स्वस्वरूपामध्यें करणारा जो संवत्सर (वर्ष) तो अहर्जर होय. असो; उतरत्या प्रांताकडे जलप्रवाह जातात व वर्षाकडे महिने जातात, त्याप्रमाणें विश्व-व्यवस्था ठेवणाऱ्या हे प्रणवा, माझ्याकडेही धांवत धांवत दाही दिशांकडील ब्रह्मचारी अभ्यासासाठीं यावे. हें प्रणवा, तूं श्रमाचा अपहार करणारे विश्रांतीचें जणूं कांहीं स्थानच, रुग्णालयच आहेस. तुझा आश्रय करणाऱ्या भक्तांचीं सर्व पापें व सर्व दुःखें, यांचा प्रतिकार करण्याचें स्थान तूं आहेस. म्हणून तूं आपल्या प्रकाशानें मला प्रकाशित कर; आणि माझ्यावर अनुग्रह करून मला प्राप्त हो. रसविद्ध लोहाप्रमाणें मला त्वन्मय आणि त्वदात्मक होऊं दे. रसविद्ध लोह जसें एकरूप होतें, तसा मी त्वन्मय व्हावा.

शिष्य—हें असें सर्व कोण मागणें मागतो आहे. हें तर सर्व विद्याप्रकरण चाललें आहे; आणि त्यांत संपत्ति मागणाराचा काय संबंध आहे. ?

सिद्धान्ती—हा भक्त धन मागत आहे, तें कर्म करण्यासाठीं होय. कर्मसाधनानें पूर्वसंचित (पूर्वकर्मांनें प्राप्त झालेलें सर्व पाप) विनष्ट होतें. आणि पाप-विनाश झाला म्हणजे आत्मविद्या प्रकाशित होते. स्मृतिही याप्रमाणेंच म्हणते. पापकर्मांचा समूळ क्षय झाला असतां जीवांना ब्रह्मज्ञान प्रकट होतें. मळ काढून टाकलेल्या स्वच्छ आरशामध्यें जसें आपलें स्वरूप आपल्यास स्पष्ट दिसतें, त्याप्रमाणें अविद्येसह पाप-विमुक्त झालेल्या लोकांस ज्ञानाच्या द्वारें स्वस्वरूप यथार्थरीतीनें साक्षात्कृत होतें ॥३॥

चौथा अनुवाक संपला.

शीक्षाध्याये पञ्चमोऽनुवाकः

भूर्भुवः सुवरिति वा एतास्तिस्रो व्याहृतयः । तासामु ह स्मैतां चतुर्थीम् । माहाचमस्यः प्रवेदयते । मह इति । तद्ब्रह्म । स आत्मा । अङ्गान्यन्या देवताः । भूरिति वा अयं लोकः । भुव इत्यन्तरिक्षम् । सुवरित्यसौ लोकः (१) ॥

मह इत्यादित्यः । आदित्येन वाव सर्वे लोका महीयन्ते । भूरिति वा अग्निः । भुव इति वायुः । सुवरित्यादित्यः । मह इति चन्द्रमाः । चन्द्रमसा वाव सर्वाणि ज्योतींषि महीयन्ते । भूरिति वा ऋचः । भुव इति सामानि । सुवरिति यजूंषि (२) ॥

मह इति ब्रह्म । ब्रह्मणा वाव सर्वे वेदा महीयन्ते । भूरिति वै प्राणः । भुव इत्यपानः । सुवरिति व्यानः । मह इत्यन्नम् । अन्नेन वाव सर्वे प्राणा महीयन्ते । ता वा एताश्चतस्रश्चतुर्धा । चतस्रश्चतस्रो व्याहृतयः । ता यो वेद । स वेद ब्रह्म । सर्वेऽस्मै देवा बलिमावहन्ति (३) ॥

असौ लोको यजूंषि वेद द्वे च ॥

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि शीक्षाध्याये पञ्चमोऽनुवाकः॥५॥

अन्वय व अर्थः–भूः, भुवः, सुवः, इति; एताः तिस्राः व्याहृतयः वै (भूः, भुवः, आणि सुवः अशा या तीन व्याहृती सर्वप्रसिद्ध आहेत) **तासां एतां चतुर्थीं 'महः' इति माहाचमस्यः प्रवेदयते उ ह स्म** (त्यांच्या-पेक्षां मह या नांवाची ही चौथी व्याहृति अत्यंत श्रेष्ठ आहे, असें माहा-चमस्य ऋषि म्हणतात) **तत् ब्रह्म, सः आत्मा** (तें महद् ब्रह्म आहे, तोच महद् आत्मा होय) **अन्याः देवताः अंगानि** (अन्यदेवता ह्या आत्म्याचीं अंगें होत) **'भूः इति' वै अयं लोकः; 'भुवः इति' अन्तरिक्षं; सुवः इति असौ लोकः** (ह्या मर्त्यलोकाला 'भू' हें नांव आहे, अंतरिक्ष म्हणजे 'भुवः' लोक. सुवः म्हणजे स्वर्लोक म्हणजे स्वर्ग-लोक होय) (१) ॥

महः इति आदित्यः, सर्वे लोकाः आदित्येन महीयन्ते (मह म्हणजे आदित्य लोक होय. आदित्यामुळेंच सर्व लोकांस महत्व प्राप्त झालें आहे. सर्व लोकांची वृद्धि आदित्याच्या सत्तेनें होते) **भूः इति वै अग्निः; भुवः इति वायुः; सुवः इति आदित्यः महः इति चन्द्रमाः; सर्वाणि ज्योतींषि चन्द्रमसा वाव महीयन्ते** (भू म्हणजे अग्नि; भुवः म्हणजे वायु; सुवः म्हणजे आदित्य, महः म्हणजे चंद्रमा होय, सर्व तेजोगोलक खरोखर चंद्रमाच्या सत्तेनें पूज्यता पावतात) **भूः इति वै ऋचः; भुवः इति सामानि; सुवः इति यजूंषि** (भू हा ऋग्वेद, ऋचा; भुवः हा सामवेदगत सामें; सुवः हा यजुर्वेद गत यजु) (२) ॥

महः इति ब्रह्म; सर्वे वेदाः ब्रह्मणा वाव महीयन्ते (मह हें ब्रह्म होय. ब्रह्मानें मात्र सर्व वेदांस महत्त्व प्राप्त होतें) **भूः इति वै प्राणः; भुवः इति अपानः; सुव इति व्यानः; महः इति अन्नं; सर्वे प्राणाः अन्नेन वाव महीयन्ते** (किंवा भू हा प्राणवायु, भुवः हा अपानवायु, सुवः हा व्यान-वायु आणि महः हें अन्न होय. अन्नाच्या सत्तेनें सर्व प्राण्यांस श्रेष्ठत्व प्राप्त होतें) **एताः ताः चतुर्धा चतस्रः, चतस्रः चतस्रः व्याहृतयः** (ह्या त्या

चार प्रकारच्या चार म्हणजे चारगुणिले चार, बरोबर सोळा व्याहृती आहेत) यः ताः वेद, सः ब्रह्म वेद (ज्याला ह्या सर्व सोळा व्याहृती समजल्या, तो ब्रह्म जाणणारा होतो) अस्मै सर्वे देवाः बलिं आवहन्ति (सर्व देव त्याला बलि—नजराणा—घेऊन जातात) (३) ॥

संहिताविषयमुपासनमुक्तं तदनु मेधाकामस्य श्रीकामस्य मन्त्रा अनुक्रान्तास्ते च पारम्पर्येण विद्योपयोगार्था एव । अनन्तरं व्याहृत्यात्मनो ब्रह्मणोऽन्तरुपासनं स्वाराज्यफलं प्रस्तूयते । भूर्भुवः सुवरित्युक्तोपप्रदर्शनार्थः । एतास्तिस्र इति प्रदर्शितानां परामर्शार्थः । परामृष्टाः स्मार्यन्ते तावत् । तासामियं चतुर्थी व्याहृतिर्मह इति । तामेतां चतुर्थीं महाचमसस्यापत्यं माहाचमस्यः प्रवेदयते । उ ह स्म, इत्येतेषां वृत्तानुकथनार्थत्वाद्विदितवान्ददर्शेत्यर्थः । माहाचमस्यग्रहणमार्षानुस्मरणार्थम् । ऋषिस्मरणमप्युपासनाङ्गमिति गम्यत इहोपदेशात् । येयं माहाचमस्येन दृष्टा व्याहृतिर्मह इति तद्ब्रह्म महद्धि ब्रह्म । महश्च व्याहृतिः । किं पुनस्तत् । स आत्मा । आप्नोतेर्व्याप्निकर्मणः । आत्मेतराश्च व्याहृतयो लोका देवा वेदाः प्राणाश्च मह इत्यनेन व्याहृत्यात्मनाऽऽदित्यचन्द्रब्रह्मान्नभूतेन व्याप्यन्ते यतः। अतोऽङ्गान्यवयवा अन्या देवताः । देवताग्रहणमुपलक्षणार्थं लोकादीनाम् । मह इत्येतस्य व्याहृत्यात्मनो देवलोकादयः सर्वेऽवयवभूताः । यत आहाऽऽदित्यादिभिर्लोकादयो महीयन्त इति । आत्मनो ह्यङ्गानि महीयन्ते महनं वृद्धिरुपचयो महीयन्त वर्धन्त इत्यर्थः । अयं लोकोऽग्निर्ऋग्वेदः प्राण इति प्रथमा व्याहृतिर्भूरिति । अन्तरिक्षं वायुः सामानि अपानः इति द्वितीया व्याहृतिः, भुवः असौ लोकः आदित्यः यजूंषि व्यानः इति तृतीया व्याहृतिः, सुवः आदित्यः चन्द्रमाः ब्रह्म अन्नम् इति चतुर्थी व्याहृतिः महः इति एवमुत्तरोत्तरैकैका चतुर्धा भवति ।

मह इति ब्रह्म । ब्रह्मेत्योंकारः । शब्दाधिकारेऽन्यस्यासंभवात् । उक्तार्थमन्यत् । ता वा एताश्चतस्रश्चतुर्धेति । ता वा एता भुर्भूवः सुवर्मह इति चतस्र एकैकशश्चतुर्धा चतुष्प्रकाराः । धाशब्दः प्रकारवचनः । चतस्रश्चतस्रः सत्यश्चतुर्धा भवन्तीत्यर्थः । तासां यथाक्रम-

ज्ञानां पुनरुपदेशस्तथैवोपासनानियमार्थः । ता यथोक्तव्याहृतीर्यो वेद स वेद विजानाति । किं ब्रह्म । ननु—तद्ब्रह्म स आत्मेति ज्ञाते ब्रह्मणि न वक्तव्यमविज्ञातवत्स वेद ब्रह्मेति । न। तद्विशेषविवक्षुत्वाददोषः । सत्यं विज्ञातं चतुर्थव्याहृत्यात्मा ब्रह्मेति न तु तद्विशेषोहृदयान्तरुपलभ्यत्वं मनोमयत्वादिश्च । 'शान्तिसमृद्धम्' इत्येवमन्तो विशेषणविशेष्यरूपो धर्मपूगो विज्ञायत इति तद्विवक्षुर्हि शास्त्रमविज्ञातमिव ब्रह्म मत्वा स वेद ब्रह्मेत्याह । अतो न दोषः । यो हि वक्ष्यमाणेन धर्मपूगेन (ण) विशिष्टं ब्रह्म वेद स वेद ब्रह्मेत्यभिप्रायः । अतो वक्ष्यमाणानुवाकेनैकवाक्यताऽस्योभयोर्ह्यनुवाकयोरेकमुपासनं लिङ्गाच्च । भूरित्यग्नौ प्रतितिष्ठतीत्यादिकं लिङ्गमुपासनैकत्वे विधायकाभावाच्च । न हि वेद उपासितव्य इति विधायकः कश्चिच्छब्दोऽस्ति । व्याहृत्यनुवाके 'ता यो वेद' इति च वक्ष्यमाणार्थत्वान्नोपासनभेदकः । वक्ष्यमाणार्थत्वं च तद्विशेषविवक्षुत्वादित्यादिनोक्तम् । सर्वे देवा अस्मा एवं विदुषेऽङ्गभूता आवहन्त्यानयन्ति बलिं स्वाराज्यप्राप्तौ सत्यामित्यर्थः ॥ १–३ ॥

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यगोविन्दभगवत्पूज्यपादाशिष्यश्रीमच्छंकरभगवतः कृतौ तैत्तिरीयोपनिषच्छीक्षाध्यायभाष्ये पञ्चमोऽनुवाकः ॥ ५ ॥

सिद्धान्ती—संहिता हा ज्या उपनिषदाचा विषय होता, तदात्मक उपासना कशी करावी, हें प्रथम सांगितलें. नंतर बुद्धिबल व संपत्तिबल इच्छिणाऱ्या उपासकांसाठीं अवश्य असणारे मंत्रही हा वेळपर्यंत उद्धृत करून त्यांचा अर्थही सांगितला. कारण उघड आहे कीं, या सर्वांचा परंपरेनें आत्मज्ञानोपयोग आहे. संहिताविषयक उपासना, बुद्धि आणि संपत्ति यांच्या प्राप्तीविषयीची प्रार्थना हा सर्व परोक्षतः आत्मज्ञानाच्या उपयोगी असतात. हा सर्व बाह्योपासनेचा प्रकार झाला. आतां, यापुढें व्याहृति नामक जें ब्रह्म आहे, त्याची आंतर्–उपासना सांगावयाची आहे. स्वाराज्य हें या उपासनेचें फल आहे.

शिष्य—स्वाराज्य हें मानसिक उपासनेचें फल आहे काय ?

सिद्धान्ती—होय. कारण ही श्रद्धापूर्वक उपासना साक्षात् असते, मनःप्रत्यक्ष असते. या मानसिक उपासनेनें परमात्मा प्रत्यक्ष होतो, म्हणूनही व्याहृतींचें शरीर जें हिरण्यगर्भात्मक ब्रह्म त्याची उपासना सांगितली. या उपासनेचें फलही फार मोठें आहे. असो; भूर्भुवादि व्याहृती मागें सांगितल्याच आहेत, हें दाखविण्यासाठीं 'इति'

हा शब्द उपयोजिला आहे; आणि त्यांचें पाठीमागें शोलेलें कथन स्पष्ट प्रतीत व्हावें, यासाठीं 'हा तीन' या शब्दांचा उपयोग केला आहे. अत्यंत प्रसिद्ध असणाऱ्या पदार्थांचें स्मरण 'हे' या शब्दानें होतें. म्हणजे तीन प्रसिद्ध असणाऱ्या ह्या व्याहृतींचें स्मरण 'हे' या शब्दानें होतें.

शिष्य—व्याहृति म्हणजे उच्चार. मंत्राचा उच्चार होतो; म्हणून त्यांस व्याहृति असें म्हणतात. होय ना ?

सिद्धान्ती—किंवा अग्निहोत्रादि अनेक कर्मांमध्यें यांचा प्रयोग होतो, म्हणून ही यांस 'व्याहृति' म्हणतात. भूः, भुवः आणि स्वः या तिन्ही व्याहृती कर्मकांडामध्यें प्रसिद्ध आहेत. असो; ही चौथी महः-नांवाची व्याहृतिही उपासनात्मक आहे. इचा उपदेश प्रथमतः महाचमसाच्या 'माहाचमस्य' नामक पुत्रानें केला. मंत्रामध्यें 'ऊ, ह, स्म' हे निपात आहेत, ते मागें सांगितलेल्या गोष्टींचें पुनः कथन केलें आहे, असें दाखवितात. तात्पर्य, ही चौथी व्याहृति पूर्वीही विद्यमान होती. पण माहाचमास्याला इचा प्रथम साक्षात्कार झाला आणि त्या ऋषीनें इचा संप्रदाय सुरू केला. हें त्या ऋषीच्या नामग्रहणावरून स्पष्ट दिसतें आणि 'माहाचमस्य' या नांवाचा श्रुतीनें उच्चार केला आहे; यावरून तो ऋषि होता, हें दिसतें. या अवतारानें असेंही आपल्यास विदित होतें कीं, इचा येथें उपदेश केला आहे, म्हणून हें उपासनेचें अंग आहे. असो; माहाचमस्याला ज्या महः-नामक व्याहृतीचा साक्षात्कार झाला ती व्याहृति म्हणजे प्रत्यक्ष 'महद् ब्रह्म' होय. तसेंच ही व्याहृति म्हणजे प्रत्यक्ष 'महद्-आत्मा' होय.

शिष्य—आत्मा हा सर्वव्यापी आहे. तशीच ही चौथी व्याहृति सर्वव्यापी आहे; म्हणून हिला महदात्मा म्हणावयाचें ना ?

सिद्धान्ती—होय. हेंच ब्रह्म, हाच शरीरामध्यें असणारा आत्मा, असें 'महः' व्याहृतीच्या द्वारां चिंतन करावें—

शिष्य—म्हणजे बाकीच्या सर्व भूर्भुवादि व्याहृती अंगें, अवयव, झाल्या कीं काय ?

सिद्धांती—हें सांगावयास का हवें ? महः नामक व्याहृति ही आदित्य, चंद्र, ब्रह्म, अन्न या स्वरूपांनीं सर्व लोक, देव, वेद आणि प्राण या सर्वांस व्यापून टाकिते, असें मंत्रांतच सांगितलें आहे. म्हणून लोकदेवादि प्रदर्शक भूर्भुवादि व्याहृती ह्या अंगें किंवा अवयव होतात आणि आदित्यचंद्रादिप्रदर्शक 'महः' व्याहृति अंगी, अवयवी, आत्मा होते. महः हा आत्मा आणि बाकीच्या सर्व देवता त्या अंगीचे अवयव होत. सर्व देव अंगें होत.

शिष्य—लोक, वेद, प्राण यांस आपण देवता कोठें म्हणतों ?

सिद्धान्ती—अरे, हें उपलक्षण आहे. देवताशब्दानें लोकादि सर्वांचा संग्रह करावयाचा आहे. देवलोकादि सर्व महः या व्याहृत्यात्मक आत्मारामाचे अवयव होतात. आणि म्हणूनच मंत्रामध्यें म्हटलें आहे कीं, आदित्यचंद्रादिकांच्या सत्तेनें लोकदेवादि मोठे होतात, वाढतात, योग्यतेचे होतात, म्हणजे आत्म्याचे अवयवच आत्मसत्तेनें महत्पदाला योग्य होतात.

शिष्य—'महत्' याचा अर्थ वृद्धि किंवा उपचय अथवा संपन्नता असा आहे. तात्पर्य, मंत्रांतील 'महीयंते' याचा अर्थ देवता मोठ्या होतात, वाढतात, असा आहे. पहिली व्याहृति हा मर्त्य लोक, अग्नि, ऋग्वेद, प्राण इत्यादि स्वरूपात्मक आहे. त्याप्रमाणेंच अंतरिक्ष, वायु, सामें, अपान ही भुवः व्याहृति; तो स्वर्गलोक, आदित्य, यजु, व्यान ही सुवर्व्याहृति आणि आदित्य, चंद्रमा, ब्रह्म व अन्न ही महर्व्याहृति याप्रमाणें उत्तरोत्तर श्रेष्ठ असणारी प्रत्येक व्याहृति चार स्वरूपाची होते, असें होतें; असेंच समजावयाचें ?

सिद्धान्ती—होय. महः याचा अर्थ ब्रह्म आहे. ब्रह्म म्हणजे ॐकार होय.

पूर्व०—कशावरून ?

सिद्धान्ती:—शब्दाच्या अधिकारावरून ! ब्रह्मशब्दाचा येथें दुसरा अर्थ होणें शक्य नाहीं. मंत्रांत बहुतेक शेवटपर्यंत जो मजकूर आहे, त्याचा अर्थ मागच्या संहितेंत सांगितलाच आहे. याप्रमाणें 'भूः, भुवः, सुवः, महः' या चार व्याहृती प्रत्येकी अग्निप्रमुख चार चार स्वरूपें धारण करितात; किंवा चार चार स्वरूपांनीं ओळखतां येतात. म्हणून सर्वांचे मिळून सोळा प्रकार होतात.

शिष्य—मंत्रांत चतुर्धा असा शब्द आहे, त्यांतील 'धा' हा शब्द प्रकारवाचक आहे. होय ना ?

सिद्धान्ती—होय. चारी व्याहृती चार चार प्रकारांनीं आपलें स्वरूप आविष्कृत करितात. आतां हें समजून ठेवा कीं, भू ही व्याहृति मनुष्यलोकवाचक किंवा अग्निवाचक इत्यादि चार पदार्थांची वाचक होते, ती केवळ वेद-कल्पना आहे; आणि मोठ्या वस्तूची कल्पना अल्पज्ञ जीवांच्या ध्यानांत येण्यासाठीं आपण कांहीं एका विवक्षितशब्दानें त्यांचा उद्बोध करून घेतों, त्याप्रमाणें मृत्युलोक, अग्नि, ऋग्वेद, प्राण इत्यादि वस्तूंच्या अभिमानी देवतांचें स्वरूप ध्यानामध्यें यावें, एतदर्थ भू-व्याहृतीचा उपयोग श्रुतीनें केला आहे. असेंच बाकींच्या तिन्ही व्याहृतींसंबंधानें समजावें. हेतु हा आहे कीं, श्रुतीनें जसें त्या त्या देवतांचें त्या त्या व्याहृतींनीं रूप कल्पिलें आहे, तसेंच त्या त्या व्याहृतींनीं त्यांची त्यांची उपासना अल्पज्ञ जीवांनीं श्रद्धापुरःसर करावी. असो; ज्याप्रमाणें व्याहृतींचें स्वरूपनिदर्शन केलें आहे. त्याप्रमाणें तत्तत् स्वरूप जो जाणतो आणि उपासना करितो, त्याला खरोखर ब्रह्मस्वरूप समजतें व उमजतें.

पूर्व०—अहो, 'तें ब्रह्म आहे,' 'तो आत्मा आहे,' 'आत्मा व ब्रह्म एकच आहे' असें तुम्ही याच अनुवाकांत सांगितलें आहे. आणि आत्मस्वरूपाचें ज्ञानही झालें आहे, असें तुम्ही तेथें स्पष्ट म्हणालांत. आणि आतां त्याला तें ब्रह्म आतां समजलें, पूर्वी समजलें नव्हतें, असें अज्ञानी पुरुषाप्रमाणें म्हणतां, याचा अर्थ काय! 'मी ब्रह्म आहे' असें समजणारा ज्ञाता पुरुष मला किंवा त्याला तें ब्रह्म समजलें नव्हतें, असें अनात्मज्ञाप्रमाणें कसें बोलेल?'

सिद्धान्ती—तुमच्या लक्षांत श्रुतीचा अभिप्राय आला नाहीं. येथें श्रुतीला उपास्य-ब्रह्माचा एक विशेष सांगावयाचा आहे. म्हणून तुम्ही आरोपिलेला दोष श्रुतीच्या किंवा आमच्या माथीं येत नाहीं. 'महः' या व्याहृतीनें 'आत्मा ब्रह्म आहे' हें कळलें खरें; तथापि हृदयांतच त्याची उपलब्धि होते, तो मनोमयत्वानें प्रत्यक्ष होतो, तसेंच तो आत्मा (तें ब्रह्म) शांति-समृद्ध आहे, इत्यादि सहाव्या अनुवाकाच्या शेवटपर्यंत विशेषण-विशेष्यरूपानें जो धर्मपूग समजून द्यावयाचा आहे—

शिष्य—धर्मपूग म्हणजे, धर्मसंग्रह होय ना!

सिद्धान्ती—होय. पण हा धर्मपूग समजला नाहीं, म्हणून हा धर्मपूग समजून सांगणार शास्त्र जणूं कांहीं ब्रह्म समजलेंच नाहीं, असें मानून 'त्याला उपास्य ब्रह्म समजलें' असें श्रुति येथें म्हणत आहे. हा शास्त्राचा अभिप्राय आहे, म्हणून तुम्ही म्हणतां तो दोष येथें उत्पन्न होत नाहीं. पुढें, सहाव्या अनुवाकांत, जो धर्म-संग्रह सांगावयाचा आहे, त्या धर्मसंग्रहाच्या गुण-धर्मांनीं विशिष्ट असलेलें ब्रह्म ज्याला समजलें, त्याला तें समजलें; असा श्रुतीचा अभिप्राय आहे. हा अभिप्राय समजून घेतला म्हणजे पुढील अनुवाक आणि हा पांचवा अनुवाक यांची एकवाक्यता होते. कारण, दोन्हीही अनुवाकांची उपास्य वस्तु व उपासना एकच आहेत. तसेंच, अनुमान काढण्यास अवश्य असणारें लिंग (चिह्न) हेंही एकच आहे.

शिष्य—तें कोणतें?

सिद्धांती:—'भूः' ही व्याहृति अग्नीचें प्रतीक आहे", अशी श्रद्धा ठेऊन अग्नीचे ठिकाणीं भू-व्याहृतीची प्रतिष्ठापना करितो. हें चिह्न व सहाव्या अनुवाकांतील चिह्न एकच. दोन्ही ही अनुवाकांत हें स्पष्ट आहे. शिवाय विधायकाचा अभाव आहे.

शिष्य—म्हणजे काय?

सिद्धांती—'वेदाची किंवा समजलेल्या वस्तूची उपासना करावी,' असा विधि सांगणारा शब्द दोन्ही अनुवाकांत कोठेंही नाहीं. व्याहृति-अनुवाकामध्यें (पांचव्या अनुवाकामध्यें) 'त्यांना जो जाणतो' असे शब्द आहेत, ते पुढें जो अर्थ श्रुतीला वक्तव्य आहे, त्याचेच अनुवादक आहेत. पण त्या अर्थां-

वरून ते शब्द उपसना सांगतात, विधिपूर्वक उपासना विहित करितात, असें निष्पन्न होत नाहीं. पण पुढें जो अर्थ वक्तव्य म्हणजे सांगावयाचा आहे, तो कांहीं विशेष प्रकार सांगावयाचे आहेत, म्हणून श्रुति सांगत आहे, हें आम्ही बोलून गेलोंच. असो; ब्रह्म जाणणाऱ्या ह्या ब्रह्मज्ञाला सर्व देव बली (उपहार) अर्पण करितात, म्हणजे अंगभूत ज्या देवता आहेत, त्या देवता ब्रह्मज्ञाला स्वाराज्याची प्राप्ति झाली, हिरण्यगर्भ-स्थिति मिळाली, म्हणजे आपल्या स्वामीला बली अर्पण करितात; तात्पर्य, सर्व अंगदेवता ह्या हिरण्यगर्भभूत विद्वान् उपासकाची एकनिष्ठ सेवा करितात ॥ १-३ ॥

पांचवा अनुवाक संपला.

शीक्षाध्याये षष्ठोऽनुवाकः

भूर्भुवःसुवःस्वरूपा मह इत्येतस्य व्याहृत्यात्मनो ब्रह्मणोऽङ्गान्यन्या देवता इत्युक्तम् । यस्य ता अङ्गभूतास्तस्यैतस्य ब्रह्मणः साक्षादुपलब्ध्यर्थमुपासनार्थं च हृदयाकाशः स्थानमुच्यते शालग्राम इव विष्णोः । तस्मिन्हि तद्ब्रह्मोपास्यमानं मनोमयत्वादिधर्मविशिष्टं साक्षादुपलभ्यते । पाणाविवाऽऽमलकम् । मार्गश्च सर्वात्मभावप्रतिपत्तये वक्तव्य इत्यनुवाक आरभ्यते—

सिद्धान्ती—भूर्भुवादि अंगदेवताप्रदर्शक व्याहृती तर ब्रह्म-प्रदर्शक 'महः' व्याहृतीचे अवयव आहेत, उपास्य ब्रह्म हें 'महः' व्याहृत्यात्मक आहे, असें पांचव्या अनुवाकांत सांगितलें. प्रस्तुत अनुवाकांत त्या देवता ज्या ब्रह्माच्या अंगभूत आहेत, त्या ह्या ब्रह्माची साक्षात् उपलब्धि व्हावी आणि उपासना करितां यावी, म्हणून हृदयाकाश हें त्या ब्रह्माचें स्थान आहे, असें या अनुवाकांत सांगावयाचें आहे.

शिष्य—शालग्राम हें जसें विष्णूचें स्थान, त्याप्रमाणें हृदयाकाश हें ब्रह्मस्थान आहे काय?

सिद्धान्ती—होय. त्या हृदयाकाशस्थानामध्यें त्या ब्रह्माची उपसना करीत असतां त्याचे मनोमयत्वादि धर्म प्रत्यक्ष उपलब्ध होतात. हस्तामध्यें धारण केलेला आंवळा जसा प्रत्यक्ष दिसतो, तसें मनोमयेत्यादि धर्मविशिष्ट ब्रह्म हृदयाकाशांत प्रत्यक्ष उपलब्ध होतें. शिवाय, ब्रह्म हें सर्वात्मक आहे. सर्वांच्या अंतर्यामी तें असतें. हें कसें, तें समजण्याला योग्यमार्ग सांगितला पाहिजे, म्हणून 'महः' व्याहृत्यात्मक ब्रह्माचें प्रतिपादन करणाऱ्या या सहाव्या अनुवाकाची योजना आहे व या हेतूनेंच प्रस्तुत अनुवाकाला आरंभ केला आहे.

स य एषोऽन्तर्हृदय आकाशः। तस्मिन्नयं पुरुषो मनोमयः। अमृतो हिरण्मयः। अन्तरेण तालुके। य एष स्तन इवावलम्बते। सेन्द्रयोनिः। यत्रासौ केशान्तो विवर्तते। व्यपोह्य शीर्षकपाले। भूरित्यग्नौ प्रतितिष्ठति। भुव इति वायौ (१)।

सुवरित्यादित्ये। मह इति ब्रह्मणि। आप्नोति स्वाराज्यम्। आप्नोति मनसस्पतिम्। वाक्पतिश्चक्षुष्पतिः। श्रोत्रपतिर्विज्ञानपतिः। एतत्ततो भवति। आकाशशरीरं ब्रह्म। सत्यात्म प्राणारामं मनआनन्दम्। शान्तिसमृद्धममृतम्। इति प्राचीनयोग्योपास्व (२)॥

वायावमृतमेकं च

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि शीक्षाध्याये षष्ठोऽनुवाकः॥६॥

अन्वय व अर्थः—यः एषः अंतर्हृदये आकाशः तस्मिन् सः अयं मनोमयः पुरुषः अमृतः हिरण्मयः (हृदयाच्या अंतर्भागीं जें हें आकाश आहे, त्याच्यामध्यें तो हा मनोमय, अमृत आणि हिरण्मय पुरुष आहे) तालुके अंतरेण यः एषः स्तनः इव अवलंबते (तालूच्या मध्यें जो स्तनासारखा लोंबत असतो) यत्र असौ केशान्तः विवर्तते (आणि जेथें हा केसांचा अंत विभक्त होतो) शीर्षकपाले व्यपोह्य (मस्तकाचें कपाल,-कवटी—फोडून परत फिरतो—दोन्ही केशभाग परस्परविरुद्ध दिशेनें जातात) सा इंद्रयोनिः (तो ब्रह्माचा मार्ग आहे. सारांश, मस्तकाच्या तालुभागीं शिवण आहे, त्यांतून ब्रह्माचा जाणे येणेचा मार्ग आहे) भूः इति अग्नौ प्रतितिष्ठति (भू व्याहृतिरूप अग्नीमध्यें राहून हा जो भूलोक व्यापितो) भुवः इति वायौ, (१) सुवः इति आदित्ये, महः इति ब्रह्मणि (भुवर्व्याहृतिरूप वायु, सुव-

व्याहृतिरूप आदित्य, महः हे व्याहृतिरूप ब्रह्म, यांच्याठिकाणीं राहून तद्द्वारा वायु, आदित्य व ब्रह्म जो व्यापितो)–**सः–स्वाराज्यं आप्नोति, मनसस्पतिं आप्नोति** (तो स्वाराज्य प्राप्त करून घेतो; तसेंच, तो सर्व मनांचें स्वामित्व मिळवितो) **वाक्पतिः, चक्षुष्पतिः, श्रोत्रपतिः विज्ञानपतिः एतत् ततः भवति** (तो वाणीचा स्वामी, नेत्रस्वामी, कर्णस्वामी आणि बुद्धीचा स्वामी होतो, इतकेंच नव्हें–तो यांच्याहूनही अधिक होतो) **आकाशशरीरं ब्रह्म, सत्यात्म, प्राणारामं, मन–आनंदं, शांतिसमृद्धं, अमृतं, इति** (तो आकाशशरीरात्मक ब्रह्म होतो, म्हणजे तो सत्यात्मा, प्राणाचें विश्रांतिस्थान, मनाला आनंद देणारी वस्तु, शांतीचें माहेरघर आणि अमरणधर्मा होतो, असें जाण) **प्राचीनयोग्य उपास्व** (हे प्राचीनयोग्या, निष्पाप झालेल्या जीवा, अशी फलप्राप्ति होते, म्हणून ब्रह्माची उपासना कर) येथें ' महः ' व्याहृत्यात्मक सगुणब्रह्माची उपासना सांगितली आहे (२) ॥

स इति व्युत्क्रम्य ' अयं पुरुषः ' इत्यनेन संबध्यते । य एषोऽन्तर्हृदये हृदयस्यान्तर्हृदयमिति पुण्डरीकाकारो मांसपिण्डः प्राणायतनोऽनेकनाडीसुषिर ऊर्ध्वनालोऽधोमुखो विशस्यमाने पशौ प्रसिद्ध उपलभ्यते । तस्यान्तर्य एष आकाशः प्रसिद्ध एव कर्काकाशवत् । तस्मिन्सोऽयं पुरुषः । पुरि शयनात्पूर्णा वा भूरादयो लोका येनेति पुरुषो मनोमयः । मनो विज्ञानम् । मनुतेर्ज्ञानकर्मणस्तन्मयस्तदुपलभ्यत्वात्, मनुतेऽनेनेति वा मनोऽन्तःकरणं तदभिमानी तन्मयस्तल्लिङ्गो वा । अमृतोऽमरणधर्मा हिरण्मयो ज्योतिर्मयः । तस्यैवंलक्षणस्य हृदयाकाशे साक्षात्कृतस्य विदुष आत्मभूतस्येन्द्रस्येदृशस्वरूपप्रतिपत्तये मार्गोऽभिधीयते । हृदयादूर्ध्वं प्रवृत्ता सुषुम्ना नाम नाडी योगशास्त्रेषु च प्रसिद्धा । सा चान्तरेण मध्ये प्रसिद्धे तालुके तालुकयोर्गता । यश्चैष तालुकयोर्मध्ये स्तन इवालम्बते मांसखण्डस्तस्य चान्तरेणेत्येतत् । यत्र च केशान्तः केशानामन्तोऽवसानं मूलं केशान्तो विवर्तते विभागेन वर्तते मूर्धप्रदेश इत्यर्थः । तं देशं प्राप्य तत्र विनिःसृता । व्यपोह्य विभज्य विदार्य शीर्षकपाले

शिरःकपाले विनिर्गता या सेन्द्रयोनिरिन्द्रस्य ब्रह्मणो योनिर्मार्गः स्वरूपप्रतिपत्तिद्वारमित्यर्थः ।

तयैवं विद्वान्मनोमयात्मदर्शी मूर्ध्नो विनिष्क्रम्यास्य लोकस्याधिष्ठाता भूरितिव्याहृतिरूपो योऽग्निर्महतो ब्रह्मणोऽङ्गभूतस्तस्मिन्नग्नौ प्रतितिष्ठत्यग्न्यात्मनेमं लोकं व्याप्नोतीत्यर्थः । तथा भुव इति द्वितीयव्याहृत्यात्मनि वायौ । प्रतितिष्ठतीत्यनुवर्तते ॥ १ ॥

सुवरिति तृतीयव्याहृत्यात्मन्यादित्ये । मह इत्याङ्गिनि चतुर्थव्याहृत्यात्मनि ब्रह्मणि प्रतितिष्ठति । तेष्वात्मभावेन स्थित्वाऽऽप्नोति ब्रह्मभूतः स्वाराज्यं स्वराड्भावं स्वयमेव राजाऽधिपतिर्भवति । अङ्गभूतानां देवानां यथा ब्रह्म । देवाश्च सर्वेऽस्मै बलिमावहन्त्यङ्गभूता यथा ब्रह्मणे । आप्नोति मनसस्पतिम् । सर्वेषां हि मनसां पतिः सर्वात्मकत्वाद्ब्रह्मणः । सर्वाँर्हि मनोभिस्तन्मनुते । तदाप्नोत्येवं विद्वान् । किंच वाक्पतिः सर्वासां वाचां पतिर्भवति । तथैव चक्षुष्पतिश्चक्षुषां पतिः श्रोत्रपतिः श्रोत्राणां पतिः । विज्ञानपतिर्विज्ञानानां च पतिः । सर्वात्मकत्वात्सर्वप्राणिनां करणैस्तद्वान्भवतीत्यर्थः । किंच ततोऽप्यधिकतरमेतद्भवति । किं तत् । उच्यते । आकाशशरीरम् । किं तत् । अकृतं ब्रह्म । सत्यात्म सत्यं मूर्तामूर्तमवितथं स्वरूपं चाऽऽत्मा स्वभावोऽस्य तदिदं सत्यात्म । प्राणारामं प्राणेष्वा(राम आ) रमणमाक्रीडा यस्य तत्प्राणारामम् । प्राणानां वाऽऽरामो यस्मिंस्तत्प्राणारामम् । मनआनन्दम् । आनन्दभूतं सुखकृदेव यस्य मनस्तन्मनआनन्दम् । शान्तिसमृद्धं शान्तिरुपशमः शान्तिश्च तत्समृद्धं च शान्तिसमृद्धम् । शान्त्या वा समृद्धं तदुपलभ्यत इति शान्तिसमृद्धम् । अमृतममरणधर्मि । एतच्चाधिकतरं विशेषणं तत्रैव मनोमय इत्यादौ द्रष्टव्यमिति । एवं मनोमयत्वादिधर्मैर्विशिष्टं यथोक्तं ब्रह्म हे प्राचीनयोग्य, उपास्स्वेत्याचार्यवचनोक्तिरादरार्था ॥ २ ॥

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यगोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यश्रीमच्छंकरभगवतः कृतौ तैत्तिरीयोपनिषच्छीक्षाध्यायभाष्ये षष्ठोऽनुवाकः ॥ ६ ॥

सिद्धान्ती—मंत्रांतील 'सः' या शब्दाचा संबंध याच मंत्रांतील 'अयं पुरुषः' (हा पुरुष) याच्याकडे आहे. या संबंधाचा व्युत्क्रम कसा झाला, हें आतांच कळेल. असो; हृदयाच्या आंत कमलाच्या आकारासारखा जो हा मांसपिंड आहे, जो प्राणांचें वसतिस्थान आहे, जेथें अनेक रक्तवाहिनी-नाड्यांचें मुख आहे, ज्याचा नाल (पोकळ नळी) ऊर्ध्वगामी आहे, ज्याचें मुख खालीं आहे, यज्ञपशु कापीत असतां, ज्याचें स्पष्ट स्वरूप उपलब्ध होतें, त्या मांसपिंडाच्या आंत दहराकाश नामक एक आकाश प्रसिद्ध आहे. गारेच्या अंतर्यामीं, चऱ्याचे आंत, जसें आकाश असतें, तसेंच आकाश या मांसपिंडांत असतें. या आकाशांत हा तो पुरुष राहतो. मागें सांगितलेल्या 'सः' चा येथें संबंध आला. असो; पुरुष म्हणजे—

शिष्य—भगवन्, अंमळ थांबा 'पुरि' म्हणजे शरीरांत जो 'शेते' म्हणजे निद्रा करितो, तोच पुरुष ना? पुरुष म्हणजे शरीरांत राहणारा किंवा भूभुर्वादि जे लोक आहेत, त्या लोकांस पूर्णत्व देणारा तो पुरुष होय; असेंच आहेना?

सिद्धान्ती—होय. बरोबर अर्थ सांगितलास. हा पुरुष मनोमय आहे. मन हें ज्ञानाकारानें परिणत होतें. हें मन म्हणजे विज्ञान, मन (विज्ञान) हें नेहमीं ज्ञानात्मक आणि कर्मात्मक असतें. सारांश, ज्ञानानें व कर्मानें पूर्ण असणें म्हणजे मनोमय असणें होय. ज्ञानकर्मांच्या योगानेंच (त्या द्वारांनीं) या पुरुषाची उपलब्धि मनांत होते, किंवा ज्ञान हें मनाचें कर्म असतें, असेंही समजावें.

शिष्य—किंवा ज्या मनाच्या योगानें तो विचार करितो, त्याला मनोमय म्हणावें.

सिद्धान्ती—किंवा मन म्हणजे अंतःकरण, त्याचा जो अभिमानी तो मनोमय होय. किंवा मन हें ज्याचें चिह्न आहे, तो मनोमय होय. तात्पर्य, मनःप्रधान (ज्ञानकर्मप्रधान) असणारा, जिज्ञासूंच्या मनानें त्यास प्रत्यक्ष होणारा, किंवा उपासक ज्याचें मनानें मात्र ध्यान करतात, तो मनाचा अभिमानी व मनोदृश्य म्हणजे मनोमय होय. हा मनोमय पुरुष अमृत (अमर) आहे; आणि अत्यंत तेजस्वी आहे. या अमर, तेजस्वी, मनोमय, इत्यादि लक्षणात्मक पुरुषाचें साक्षात् दर्शन हृदयाकाशांत होतें. सारांश, जो ज्ञानी पुरुषाचा आत्मभूत व साक्षी नित्य-असतो, त्या सर्वज्ञ, सर्वस्वामी परमेश्वराच्या स्वरूप-प्रतिपत्तीचा (स्वरूपज्ञान-प्राप्तीचा) मार्ग मुमुक्षुला येथें सांगितला आहे.

शिष्य—मनोमयादि धर्मविशिष्ट आणि हृदयाकाशांत राहणाऱ्या परमेश्वराचें स्वरूप कोठें पाहावें, आणि कसें पाहावें, त्याचा मार्ग येथें सांगितला आहे. हा मार्ग कोणता बरें?

सिद्धान्ती—आपल्या मुखाच्या आंत ज्या उजव्या व डाव्या बाजूकडे दोन प्रसिद्ध तालू (तालु-खंड) आहेत त्या तालूंच्यामध्यें लहान वासरांच्या स्तनासारखा जो लोंबणारा मांस-खंड आहे, त्याच्या मधून मस्तकाच्या वरील मार्गांत जेथें केसांचें

विभाजन होतें, जेथें ब्रह्मच्छिद्र आहे, त्या मूर्धाप्रदेशांतून जाणारी सुषुम्णी या नांवाची हृदयांतून वर जाणारी नाडी योग-शास्त्रामध्यें प्रसिद्ध आहे. समजलें ? हृदयांतून वर निघून तालूच्या मधून जाणारी व ब्रह्म-रंध्रापर्यंत जाऊन मस्तकाची जीं दोन अस्थि-शकलें आहेत, त्यांतून निघणारी सुषुम्ना नाडी ही इंद्राची (ब्रह्माची) योनि म्हणजे मार्ग आहे. ब्रह्माचें स्वरूपज्ञान होण्याचें द्वार सुषुम्ना नाडी हें आहे. ध्यानस्थ योग्यानें हें सुषुम्नानाडीचें द्वार शुद्ध करून एकाग्र चित्तानें ध्यानांत पाहिलें म्हणजे हृदयाकाशांत राहणाऱ्या अमृत, तेजस्वी आणि मनोमय ब्रह्मपुरुषाचें साक्षात् दर्शन होतें.

शिष्य—या दर्शनाचें फल काय बरें ?

सिद्धान्ती—या द्वारानें मनोमय आत्म्याचें दर्शन घेणारा ज्ञानी पुरुष श्रेष्ठ होतो. म्हणजे ब्रह्मरंध्रानें त्याचा जीव निघून ह्या लोकांचा अधिष्ठाता म्हणजे स्वामी होतो.

शिष्य—तो कसा ?

सिद्धान्ती—भूः या व्याहृतिरूपानें प्रकट होणारा जो अग्नि, तो ब्रह्माचा एक अवयव आहे, असें आपण मागें समजून घेतलें आहे. त्या अग्नीचा हा ब्रह्मवेत्ता पुरुष आत्मा होतो; आणि ज्याप्रमाणें अग्नि ह्या मृत्युलोकास व्यापून टाकितो, त्याचप्रमाणें अग्नीचा आत्मा म्हणजे स्वामी असणारा विद्वान् पुरुष हा लोक व्यापितो. अशाच रीतीनें द्वितीय व्याहृतीचा आत्मा जो वायु त्याचा स्वामी होऊन हा विद्वान् पुरुष अंतरिक्षव्यापी होतो. तिसऱ्या व्याहृतीचा स्वामी जो आदित्य त्याचाही स्वामी होऊन हा विद्वान् पुरुष द्यु-लोकव्यापी होतो आणि चतुर्थ-व्याहृतीचा स्वामी जें महद् ब्रह्म (याचेच अग्नि, वायु आणि आदित्य हे अवयव आहेत) तद्रूप होऊन तेथें वास्तव्य करितो.

शिष्य—सारांश, हा विद्वान् पुरुष अग्नि, वायु, आदित्य आणि ब्रह्म ह्या सर्वांचें जणूं कांहीं आत्मरूप होऊन ब्रह्मभूत होतो.

सिद्धान्ती—पण या एकनिष्ठ उपासनेचें अंतिम फल नाहीं, समजलें तुला अद्यापि। हा स्वाराज्यप्राप्ति करून घेतो म्हणजे आपणच सर्व देव-देवतांचा राजा म्हणजे स्वामी होतो. देवांचें स्वामित्व ब्रह्माकडे असल्यामुळें सर्व अंगभूत देव-देवता ब्रह्माला ज्याप्रमाणें बलि अर्पण करितात, तशाच सर्व देव-देवता यालाही करभार देऊन याची सेवा करण्यास सिद्ध होतात. तसेंच, हा सर्वांच्या मनांचा स्वामी म्हणजे नियामक होतो. ब्रह्म सर्वात्मक आहे. तसाच हा पुरुष सर्वात्मक झाल्यामुळें तो सर्वांच्या मनाचा चालक आणि प्रेरक होतो. सर्व जीव याचें म्हणजे (ब्रह्माचें) मनानें मनन करितात, हें प्रसिद्धच आहे. म्हणून ब्रह्माला सर्वात्मक म्हणतात. ह्या ज्ञान्याला हें

सर्वात्मकत्वाचें फल प्राप्त होतें. आणखी; हा सर्वांच्या वाणीचा, सर्वांच्या नेत्रांचा, सर्वांच्या कर्णांचा आणि सर्वांच्या बुद्धीचाही स्वामी होतो.

शिष्य—खरेंच आहे. हा विद्वान् पुरुष सर्वात्मक झाला म्हणजे सर्व जीवांचीं इंद्रियावयवेंही ह्याचींच झाल्यामुळें तो मनसस्पति इत्यादि होतो, यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

सिद्धान्ती—एवढ्यानेंच काय झालें आहे ? यांच्यापेक्षांही हें श्रेष्ठ स्वरूप त्याला प्राप्त होतें. म्हणजे असेंः—आकाश आहे शरीर ज्याचें किंवा आकाशासारखे सूक्ष्म आहे शरीर ज्याचें, असा तो उपासक आकाश—शरीर म्हणजे ब्रह्मस्वरूपच होतो. हेंच प्रकृत असणारें विराट्स्वरूप होय. तसेंच, तो मूर्त किंवा अमूर्त असें सत्य आहे स्वरूप ज्याचें आणि आत्मा म्हणजे स्वभाव आहे ज्याचा, असा तो सत्यात्मा होतो. तो प्राणांमध्यें क्रीडा करणारा किंवा प्राण हे त्याच्या स्वरूपांत क्रीडा करणारे, असा तो प्राणाराम होतो. त्याचें मन शुद्ध आनंदरूप, सुखरूप होतें. शांतिस्वरूप, समाधान-स्वरूप जें ब्रह्म तें तो होतो, किंवा अविक्षिप्त-चित्तानें (एकाग्र-चित्तानें) तो सर्व-पूर्ण जें ब्रह्म त्याची प्राप्ति करून घेतो; तो अमर होतो. हीं सर्व आतां अधिक सांगितलेलीं विशेषणें या अनुवाकाच्या पहिल्या संहितेंत मनोमयस्वरूप सांगितलें आहे, तेथीलच आहेत, असें समजावें. याप्रमाणें मनोमयत्वादिधर्मांनीं विशिष्ट, असें जें हें ब्रह्म त्याची, हे प्राचीन योग्या, तूं उपासना कर.

शिष्य—प्राचानयोग्य याचा अर्थ काय ?

सिद्धान्ती—पूर्वीच्या कर्मकांडांत जीं नित्य-नैमित्तिक कर्में सांगितलीं आहेत, तीं करून पापविनिष्ट झाल्यामुळें उपसनाविधीला जो पुरुष अधिकारी होतो, तो प्राचनियोग्य होय ॥ १-२ ॥

साहावा अनुवाक समाप्त.

शीक्षाध्याये सप्तमोऽनुवाकः ।

यदेतद्व्याहृत्यात्मकं ब्रह्मोपास्यमुक्तं तस्यैवेदानीं पृथिव्यादिपाङ्क्तस्वरूपेणोपासनमुच्यते । पञ्चसंख्यायोगात्पङ्क्तिश्छन्दःसंपत्तिः । ततः पाङ्क्तत्वं सर्वस्य । पाङ्क्तश्च यज्ञः । " पञ्चपदा पाङ्क्तिः । पाङ्क्तो यज्ञः " इति श्रुतेः । तेन यत्सर्वं लोकाद्यात्मान्तं च पाङ्क्तं परिकल्पयन्ति(ति) यज्ञमेव तत्परिकल्पयति । तेन यज्ञेन परिकल्पितेन पाङ्क्तात्मकं प्रजापतिमभिसंपद्यते । तत्कथं पाङ्क्तमिदं सर्वमित्यत आह—

सिद्धान्ती—सहाव्या अनुवाकांत व्याहृत्यात्मक जें हिरण्यगर्भ नांवाचें ब्रह्म तें उपास्य आहे, असें सांगितलें. त्याचीच उपासना या अनुवाकांत पांक्तस्वरूपानें सांगावयाची आहे.

शिष्य—पांक्त म्हणजे काय ?

सिद्धान्ती—पांच पदार्थांचा जेथें एकत्र योग होतो, त्याला तेथें पांक्त नांवाची छंदःप्राप्ति होते. आठ अक्षरांचे पांच चरण म्हणजे वैदिक पंक्तिछंद होतो. पंक्तिच्छंद जेथें असतो, तें सर्व पांक्त होतें. तात्पर्य, पांच पदार्थांचा संयोग होणें हें पांक्तांचें लक्षण आहे. यज्ञही पांक्त आहे. कारण तेथें पत्नी, यजमान, पुत्र, दैव, मानुष, अशीं पांच वित्तें असतात. 'पंक्ति पंचपदा असते' 'यज्ञ पांक्त असतो' असें श्रुतीही सांगतात. या न्यायानें प्रस्तुतच्या अनुवाकांत पृथ्वीच्याही पांक्त स्वरूपानें हिरण्यगर्भाची उपासना करावी, असा विधि येथें सांगितला आहे. या लोकापासून आत्मारामापर्यंत जें काय सर्व आहे, तें सर्व पांक्त आहे, अशी एकनिष्ठ-श्रद्धा झाली म्हणजे, तो एक प्रकारचा यज्ञच होतो; आणि या श्रद्धापूर्वक केलेल्या यज्ञानें पांक्त स्वरूपाचा आत्मा जो प्रजापति (हिरण्यगर्भ) त्याची प्राप्ति होते.

शिष्य—पण अधिलोकांपासून आत्म्यापर्यंतचे सर्व पदार्थ पांक्त कसे ?

सिद्धान्ती—ऐक—

पृथिव्यन्तरिक्षं द्यौर्दिशोऽवान्तरदिशाः। अग्निर्वायुरादित्यश्चन्द्रमा नक्षत्राणि। आप ओषधयो वनस्पतय आकाश आत्मा। इत्यधिभूतम्।

अथाध्यात्मम्। प्राणो व्यानोऽपान उदानः समानः। चक्षुः श्रोत्रं मनो वाक्त्वक्। चर्म मांसं स्नावास्थि मज्जा। एतदधिविधाय ऋषिरवोचत्। पाङ्क्तं वा इदꣳसर्वम्। पाङ्क्तेनैव पाङ्क्तꣳस्पृणोतीति (१)

सर्वमेकं च॥

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि शीक्षाध्याये सप्तमोऽनुवाकः॥७॥

अन्वय व अर्थः—पृथिवी, अंतरिक्षं, द्यौः दिशः, अंवातरदिशाः (पृथिवी, अंतरिक्ष, द्युलोक, चार मुख्य दिशा आणि चार अवांतर दिशा हे पाच लोक पांक्त आहेत.) अग्निः, वायुः, आदित्यः, चंद्रमाः, नक्ष-

त्राणि, (अग्नि, वायु, आदित्य चंद्र आणि नक्षत्रें या त्या त्या लोकांच्या अनुक्रमें पांच देवता पांक्त आहेत) **आपः, ओषधयः, वनस्पतयः, आकाशः, आत्मा** (जल, ओषधी, वनस्पती, आकाश, आत्मा, हे भूत-पंचक पांक्त होय) **इति अधिभूतं** (हें अधिभूत त्रय वर्णन झालें)

अथ अध्यात्मं (आतां अध्यात्मपांक्तत्रयाचें वर्णन करितों) **प्राणः, व्यानः, अपानः, उदानः, समानः** (प्राण, व्यान, अपान, उदान, समान हें प्राणपंचक होय) **चक्षुः, श्रोत्रं, मनः, वाक्, त्वक्** (नेत्र कर्ण, मन, वाणी आणि त्वचा हें इंद्रियपंचक होय) **चर्म, मांसं, स्नावास्थिमज्जा** (चर्म, मांस, स्नायु, अस्थि आणि मज्जा हें धातुपंचक होय) **एतत् अधिविधाय ऋषिः अवोचत्** (हें सर्व पांक्त आहे, अशी श्रद्धा ठेऊन (रूपक करून) ऋषी म्हणाला) **इदं सर्वं पांक्तं वै** (खरोखर हीं सर्व पंचकें पांक्त आहेत) **पांक्तेन एव पांक्तं स्पृणोति इति,** (कारण, हीं सर्व पांच पांच आहेत म्हणूनच त्याचें अध्यात्म जें पांक्तत्रय तें अधिभौतिक पांक्तत्रयाला पूर्णता देतें—असे तो ऋषि म्हणाला) ॥ १ ॥

पृथिव्यन्तरिक्षं द्यौर्दिशोऽवान्तरदिशा इति लोकपाङ्क्तम्। अग्निर्वायुरादित्यश्चन्द्रमा नक्षत्राणीति देवतापाङ्क्तम् । आप ओषधयो वनस्पतय आकाश आत्मेति भूतपाङ्क्तम् । आत्मेति विराड्भूताधिकारात् । इत्यधिभूतमित्यधिलोकाधिदैवतपाङ्क्तद्वयोपलक्षणार्थम् । लोकदेवता पाङ्क्तयोश्चाभिहितत्वात् ।

अथानन्तरमध्यात्मं पाङ्क्तत्रयमुच्यते—प्राणादि वायुपाङ्क्तम् । चक्षुरादीन्द्रियपाङ्क्तम् । चर्मादि धातुपाङ्क्तम् । एतावद्धीदं सर्वमाध्यात्मम् । बाह्यं च पाङ्क्तमेवेत्येतदेवमाधिविधाय परिकल्प्यार्षिर्वेद एतद्दर्शनसंपन्नो वा कश्चिदृषिरवोचदुक्तवान् । किमित्याह—पाङ्क्तं वा इदं सर्वं पाङ्क्तेनैवाऽऽध्यात्मिकेन संख्यासामान्यात्पाङ्क्तं बाह्यं स्पृणोति वलयति पूरयति । एकात्मतयोपलभ्यत इत्येतदेव । पाङ्क्तमिदं सर्वमिति यो वेद स प्राजापत्यात्मैव भवतीत्यर्थः ॥ १ ॥

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यगोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यश्रीमच्छंकरभगवतः कृतौ तैत्तिरीयोपनिषच्छीक्षाध्यायभाष्ये सप्तमोऽनुवाकः ॥ ७ ॥

सिद्धान्ती–पृथ्वीलोक, अंतरिक्षलोक, द्युलोक, दिग्लोक (मुख्य चार दिशा) आणि अवांतर दिशा हें लोकपंचक पांक्त आहे. अग्नि, वायु, आदित्य, चंद्र आणि नक्षत्रें हें देवतापंचक दुसरें पांक्तपंचक आहे. जल, औषधी, वनस्पति, आकाश आणि आत्मा हें भूतपंचक तिसरें पांक्तपंचक आहे.

शिष्य—यांत आत्म्याचा उल्लेख कसा बरें ?

सिद्धान्ती—प्रकरणावरून स्पष्ट होतें कीं, येथें आत्मा म्हणजे विराट् शरीर आहे. हे आतांच सांगितलेलें पंचकत्रय अधिभौतिक आहे, असें श्रुतीनें म्हटलें आहे; पण यांतच लोकपंचकाचा व देवतापंचकाचा अंतर्भाव केला आहे; म्हणून येथें अधिलोक आणि अधिदैवत असें पंचकद्वय आहे, असें समजून घ्यावयाचें आहे. हें अधिभौतिक वर्णन झालें.

यानंतर अध्यात्मिक पांक्तत्रय सांगतात. मंत्राचा अर्थ स्पष्टच आहे. प्राणादि वायुपंचक, नेत्रादि इंद्रियपंचक, चर्मादि धातुपंचक, हीं तिन्हीं पंचकें प्रत्येकीं पांक्त आहेत. येथपर्यंत हें सर्व अध्यात्मिक पांक्तत्रय झालें.

शिष्य—पण हें अध्यात्मिक पांक्तत्रय पांक्त म्हणजे पवित्र कसें ?

सिद्धान्ती—बाहेरचें अधिभौतिक पंचकत्रय पांक्त म्हणजे पवित्र आहे, तसेंच किंवा म्हणून हें अध्यात्मिक पंचकत्रयही पवित्र आहे. अशी श्रद्धा एका ऋषीनें परिकल्पित केली. श्रद्धेनें हा साक्षात्कार झाल्यानंतर ऋषीला समजलें, किंवा कोणी ऋषि म्हणाला; हें अध्यात्मिक पांक्तत्रय बाह्यपांक्तत्रयाशीं एकात्मक आहे. कारण उभयतांच्याही संख्या समसमान आहेत. म्हणून अध्यात्मिक पांक्तत्रय अधिभौतिक पांक्तत्रयाला गांठते किंवा त्याला पूर्ण करितें. हें वेद किंवा मंत्रद्रष्टे ऋषी सांगतात. सारांश, उभयताही एकात्मक आहेत, असें ज्ञान होतें. असो; याप्रमाणें हें सर्व अध्यात्मिक, अधिलौकिक आणि अधिदैविक पांक्त आहे, असें ज्याला समजलें, समजून ज्यानें उपासना केली, तो प्रजापत्यात्मक (हिरण्यगर्भात्मक) होतो, हा इत्यर्थ आहे ॥ १ ॥

सातवा अनुवाक समाप्त.

शीक्षाध्याये अष्टमोऽनुवाकः

व्याहृत्यात्मनो ब्रह्मण उपासनमुक्तम् । अनन्तरं च पाङ्क्तस्वरूपेण तस्यैवोपसनमुक्तम्। इदानीं सर्वोपासनाङ्गभूतस्योंकारस्योपासनं विधित्स्यते । परापरब्रह्मदृष्ट्या ह्युपास्यमान ओंकारः शब्दमात्रोऽपि परापरब्रह्मप्राप्तिसाधनं भवति । स ह्यालम्बनं ब्रह्मणः परस्यापरस्य

च । प्रतिमेव विष्णोः । " एतेनैवाऽऽयतनेनैकतरमन्वेति " इति श्रुतेः ।

सिद्धान्ती—व्याहृतींचा आत्मा जो हिरण्यगर्भ (हिरण्यगर्भात्मक ब्रह्म) त्याची उपासना सहाव्या अनुवाकांत सांगितली. नंतर सातव्या अनुवाकांत पांक्तस्वरूपानें त्याचीच उपासना सांगितली. आतां, या अनुवाकांत सर्व प्रकारक उपासनेच्या अंगभूत असणारा जो ॐकार त्याची उपासना विधिसह विहित करावयाची आहे. कारण, परब्रह्मदृष्टीनें व अपरब्रह्मदृष्टीनें ॐकार हा उपास्यच होतो. फार काय सांगावें ? शब्दमात्र ॐकाराचा केवळ श्रद्धापूर्वक उच्चारसुद्धां, केवळ शब्द मात्र आहे तरी, ॐकार हा शब्दच, पर आणि अपर ब्रह्माच्या प्राप्तीचें साधन होतो.

शिष्य—खरें आहे. कठ, माण्डुक्यादि उपनिषदांत आपण पाहिलेंच आहे कीं, ॐकार (प्रणव) हा पर आणि अपर ब्रह्माचें आलंबन आहे. तो परब्रह्माचें प्रतीक आहे; आणि अपरब्रह्माचा वाचक आहे, हें मला समजलें आहे.

पू०—ॐकार हा शब्द तर अचेतन आहे. अचेतनाच्या उपासनेपासून फल तें काय प्राप्त होणार ? अचेतनाला ज्ञानच नाहीं. तर तो देणार काय ? किंवा मक्ताची इच्छा पूर्ण तरी करणार कशी ?

सिद्धान्ती—विष्णूची प्रतिमा अचेतनच असते, नाहीं बरें ? तथापि तिची शुद्धा उपासना तुम्ही करितां आणि फलप्राप्ति होईल, अशी भावनाही करितां व तुम्हांस फलप्राप्ति होतेही. मग याचें रहस्य काय असावें बरें ? रहस्य हें कीं प्रतिमेमध्यें सर्वव्यापी विष्णु चैतन्यस्वरूपानें राहतो, अशी आपण एकनिष्ठ श्रद्धा ठेविली, म्हणजे आपलें इच्छित आपल्यांस प्राप्त होतें. ही इष्टप्राप्ति अचेतन प्रतिमा करून देत नाहीं. तर तेथें जें श्रद्धास्थापित सगुणचैतन्य असतें, तें आपले मनोरथ पूर्ण करिते. हा श्रद्धेचा भाग आहे. शिवाय, श्रुतिही म्हणते कीं, ह्याच आलंबनानें मात्र भक्त हा परब्रह्माची अथवा अपरब्रह्माची प्राप्ति करून घेतो. ऐका:—

ओमिति ब्रह्म । ओमितीदं सर्वं ।

अन्वय व अर्थः—स्पष्टच आहेत.

ओमिति । इतिशब्दः स्वरूपपरिच्छेदार्थः । ओमित्येतच्छब्दरूपं ब्रह्मेति मनसा धारयेदुपासीत । यत ओमितीदं सर्वं हि शब्दरूपमोंकारेण व्याप्तम् । " तद्यथा शङ्कुना " इति श्रुत्यन्तरात् । अभिधानतंत्रं ह्याभिधेयमित्यत इदं सर्वमोंकार इत्युच्यते ।

सिद्धान्ती—मंत्रांत इति शब्द आहे. ता ब्रह्माचे 'ॐ' हें निश्चित स्वरूप आहे, असें स्पष्ट सांगतो. ब्रह्माला परिच्छेद नाहीं, उपासकानें मात्र 'ॐ' हा परिच्छेद श्रुतिविगीत आहे, अशी श्रद्धा ठेवावी. तात्पर्य, उपासकानें 'ॐ हें शब्दस्वरूप ब्रह्म आहे' असें श्रद्धापूर्वक समजून त्याची उपासना करावी. 'ॐ हेंच हें सर्व आहे. कारण या प्रणवानेंच सर्व वाणीला व्यापून टाकिलें आहे. आणि सर्व जगत् शब्द-मात्र आहे. म्हणून सर्व जगत् ब्रह्मरूप आहे. 'शंकू ज्याप्रमाणें पर्णांस एकत्र करितो, त्याप्रमाणें हा प्रणव' अशी दुसरी श्रुति प्रमाण आहे.

शिष्य—शिवाय, हे सर्व नामरूप असणारे पदार्थ नामाच्या स्वाधीन असल्यानें. सर्व नामें ओंकाररूप आहेत, म्हणून हें सर्वही ओंकाररूप आहे. असेंही म्हणतां येतें.

सिद्धान्ती—ठीक आहे. सारांश, उपासकाला 'ॐ' हें ब्रह्म आहे. पुढचा ग्रंथ ऐका.—

ओमित्येतदनुकृति ह स्म वा अप्यो श्रावयत्या-श्रावयन्ति । ओमिति सामानि गायन्ति । ओꣳ शोमिति शस्त्राणि शꣳसन्ति । ओमित्यध्वर्युः प्रति-गरं प्रतिगृणाति । ओमिति ब्रह्मा प्रसौति । ओमित्य-ग्निहोत्रमनुजानाति । ओमिति ब्राह्मणः प्रवक्ष्यन्नाह ब्रह्मोपाप्नवानीति । ब्रह्मैवोपाप्नोति (१) ॥

ओं दश ॥

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि शीक्षाध्यायेऽष्टमोऽनुवाकः ॥८॥

अन्वय व अर्थः—ओं इति एतत् अनुकृति ह स्म वै (ओं हा शब्द अनुकरणवाची आहे) अपि 'ओ' श्रावयति; आश्रावयंति ओं इति सामानि गायन्ति; ओं, शों, इति शस्त्राणि शंसंति; ओं इति अध्वर्युः प्रतिगरम् प्रतिगृणाति; ओं इति ब्रह्मा प्रसौति, ओं इति अग्निहोत्रम् अनुजानाति, ओं इति ब्राह्मणः प्रवक्ष्यन् आह, ब्रह्म उपप्नवानि इति ('ओ' मंत्र म्हणा, असें म्हणावयास सांगतात; ओं म्हणून—ऐकतात; ओं म्हणून सामें गातात; ओं आणि शों म्हणून सूक्तमंत्र म्हणतात; ओं असें अध्वर्यु प्रत्येक वेळेला म्हणतो; ओं असा

उच्चार करून ब्रह्मा आज्ञा देतो; ओं म्हणून अग्निहोत्राला परवानगी मिळते. प्रवचन करणारा ब्राह्मण आणि अध्ययन करणारा शिष्य ओं असें म्हणतात; आणि मीं वेदराशीचा स्वीकार करितों; असें ओंकारपूर्वक शिष्य म्हणतो) **ब्रह्म एव उपाप्नोति** (त्याला वेदोक्त ब्रह्म-प्राप्ति होते) (१) ॥

ओंकारस्तुत्यर्थमुत्तरो ग्रन्थः । उपास्यत्वात्तस्य ॥ ओमित्येतदनुकृतिरनुकरणम् । करोमि यास्यामि चेति कृतमुक्तमोमित्यनुकरोत्यन्यः । अत ओंकारोऽनुकृतिः । ह स्म वा इति प्रसिद्धावद्योतकाः । प्रसिद्धं ह्योंकारस्यानुकृतित्वम् । अपि च " ओ श्रावय " इति प्रैषपूर्वकमाश्रावयन्ति प्रतिश्रावयन्ति । तथोमिति सामानि गायन्ति सामगाः । ओमिति शस्त्राणि शंसन्ति शस्त्रशंसितारोऽपि । तथोमित्यध्वर्युः प्रतिगरं प्रतिगृणाति । ओमिति ब्रह्मा प्रसौत्यनुजानाति प्रैषपूर्वकमाश्रावयति ओमित्यग्निहोत्रमनुजानाति । जुहोमीत्युक्त ओमित्येवानुज्ञां प्रयच्छति । ओमित्येव ब्राह्मणः प्रवक्ष्यन्प्रवचनं करीष्यन्नध्येष्यमाण ओमित्येवाऽऽह । ओमिति प्रतिपद्यतेऽध्येतुमित्यर्थः । ब्रह्म वेदमुपाप्नवानीति प्राप्नुयां ग्रहीष्यामीति । उपाप्नोत्येव ब्रह्म । अथवा ब्रह्म परमात्मा तमुपाप्नवानीत्यात्मानं प्रवक्ष्यन्प्रापयिष्यन्नोमित्येवाऽऽह । स च तेनोंकारेण ब्रह्म प्राप्नोत्येव । ओंकारपूर्वं प्रवृत्तानां क्रियाणां फलवत्त्वं यस्मात्तस्मादोंकारं ब्रह्मेत्युपासीतेति वाक्यार्थः ॥ १ ॥

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यगोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यश्रीमच्छंकरभगवतः कृतौ तैत्तिरीयोपनिषच्छीक्षाध्यायभाष्येऽष्टमोऽनुवाकः ॥ ८ ॥

सिद्धान्ती—हा पुढील ग्रंथ ओंकाराच्या स्तुत्यर्थ अवतारिला आहे. कारण, मागें सांगितल्याप्रमाणें ओं ही वस्तु उपास्य आहे.

शिष्य—ओं याचा प्राकृत अर्थ ' होय, बरें आहे, ठीक आहे; ' असा आहे. कोणी ' मी हें काम करितों, मी जातों ' असें दुसऱ्यास सांगतांना म्हटलें म्हणजे श्रोता ' ठीक आहे ' असें म्हणतो; म्हणून ओं हा अनुकरणवाचक शब्द आहे, हें कोणाला ठाऊक नाहीं, असें नाहीं. ओं हा अनुमतिदर्शक शब्द आहे, हें सर्वांस ठाऊक आहे. शिवाय, अध्वर्यु अग्नीधाला सांगतात, प्रेष देतात, त्यावेळीं ओं श्रावय ' असा

मंत्र म्हणतात. म्हणजे हे अग्नीध्रा, देवांना हवी देण्याचा समय आम्हांस ऐकूं दे,' असा अर्थ आहे. 'ओ म्हणजे ॐ.' नंतर अध्वर्युही ओं असें म्हणून तो मंत्र ऐकवितात. याचप्रमाणें सामगायन करणारे उद्गाते ओंकारपूर्वक सामगान करितात. ऋग्वेदी होतेही प्रणवोच्चारपूर्वक म्हणजे 'ओं,' 'शों' असें म्हणून प्र-उ-गादि शस्त्रें (मंत्र, गीतिरहित ऋचा) म्हणतात. त्याचप्रमाणें अध्वर्यूची अनुज्ञा मागणारे होते ऋत्विज मंत्रानें परवानगी मागतात;आणि अध्वर्युही ओं असें म्हणून होत्यांला मंत्र म्हणण्याची अनुज्ञा देतात. प्रतिगर म्हणजे होत्यांच्या विनंतीला अध्वर्यूनें दिलेलें उत्तर होय. ब्रह्मा म्हणजे तिन्ही वेदांचे प्रयोग जाणणारा ऋत्विज. हा अन्य ऋत्विजांस प्रोक्षणादि क्रिया करावयास सांगतो, त्या सांगतांना हा ऋत्विज प्रणवपुरःसर अनुज्ञा देतो. अग्निहोत्रामध्येंही जेव्हां अध्वर्यु होमद्रव्य हवन करण्यासाठीं-स्रुवेमध्यें घेतो, तेव्हां तो ओंकारपूर्वक यजमानाची अनुज्ञा घेतो आणि यजमानही ओंकारपूर्वक अनुज्ञा देतो. याप्रमाणें वैदिककर्मांत ओंकाराची सर्वत्र व्याप्ति आहे, असें आपण पाहिलें. तसेंच, ब्रह्मयज्ञ (वाग्यज्ञ) करणारा ब्राह्मण त्या यज्ञाचें प्रवचन करण्याच्या आधीं ओंकाराचा उच्चार करितो. वेदाध्ययनाचे वेळींही प्रथमतः ओंकाराचा उच्चार गुरुशिष्यांकडून होऊन मग अध्ययनाला आरंभ होतो. शिष्य ओंकारपूर्वक म्हणतो कीं 'मी आतां वेदाचें ग्रहण करितों.' अर्थात् त्याला वेदप्राप्ति होते. किंवा ब्रह्म म्हणजे जो परामात्मा त्याला मी प्राप्त करून घेईन, असें उपासक आपल्या स्वतःशीं बोलतो; म्हणजे संकल्प करितो; आणि प्राप्त करून घेण्याच्या इच्छेनें ओं असा उच्चार करितो. या ओंकाराचें सामर्थ्य असें आहे कीं, त्या त्या उपासकाला ब्रह्मप्राप्ति होतेच होते. तात्पर्य, ओंकारपूर्वक ज्या ज्या क्रिया होतात त्या त्या सर्व सफल होतात. म्हणून ओंकारस्वरूपी ब्रह्माची उपासना नित्य करावी, 'ओं ब्रह्म आहे' अशी भावना करून ओंकारोपासना करावी, असा वाक्यार्थ आहे ॥ १ ॥

आठवा अनुवाक समाप्त.

शीक्षाध्याये नवमोऽनुवाकः।

ऋतं च स्वाध्यायप्रवचने च। सत्यं च स्वाध्यायप्रवचने च। तपश्च स्वाध्यायप्रवचने च। दमश्च स्वाध्यायप्रवचने च। शमश्च स्वाध्यायप्रवचने च। अग्नयश्च स्वाध्यायप्रवचने च। अग्निहोत्रं च स्वाध्यायप्रवचने च। अतिथयश्च स्वाध्यायप्रवचने च। मानुषं च स्वाध्यायप्रवचने च। प्रजा च स्वाध्या-

यप्रवचने च । प्रजनश्च स्वाध्यायप्रवचने च । प्रजातिश्च स्वाध्यायप्रवचने च । सत्यमिति सत्यवचा राथीतरः । तप इति तपोनित्यः पौरुशिष्टिः । स्वाध्यायप्रवचने एवेति नाको मौद्गल्यः । तद्धि तपस्तद्धि तपः (१) ॥

प्रजा च स्वाध्यायप्रवचने च षट् च ॥

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि शीक्षाध्याये नवमोऽनुवाकः ॥९॥

अन्वय व अर्थ—या मंत्राचा अन्वय स्पष्ट आहे. अर्थही भाष्यप्रवचनांत स्पष्ट होणारच आहे; म्हणून तो येथें दिला नाहीं. ॥ १ ॥

विज्ञानादेवाऽऽप्नोति स्वाराज्यमित्युक्तत्वाच्छ्रौतस्मार्तानां कर्मणामानर्थक्यं प्राप्तमित्यतस्तन्मा प्रापदिति कर्मणां पुरुषार्थं प्रति साधनत्वप्रदर्शनार्थमिहोपन्यासः । ऋतमिति व्याख्यातम् । स्वाध्यायोऽध्ययनम् । प्रवचनमध्यापनं ब्रह्मयज्ञो वा । एतान्यृतादीन्यनुष्ठेयानीति वाक्यशेषः । सत्यं च सत्यवचनं यथाव्याख्यातार्थं वा । तपः कृच्छ्रादि । दमो बाह्यकरणोपशमः । शमोऽन्तःकरणोपशमः । अग्नय आधातव्याः । अग्निहोत्रं च होतव्यम् । अतिथयश्च पूज्याः । मानुषमिति लौकिकः संव्यवहारः । तच्च यथाप्राप्तमनुष्ठेयम् । प्रजा चोत्पाद्या । प्रजनश्च प्रजननमृतौ भार्यागमनमित्यर्थः ।

प्रजातिः पौत्रोत्पत्तिः पुत्रो निवेशयितव्य इत्येतत् । सर्वैरेतैः कर्मभिर्युक्तस्यापि स्वाध्यायप्रवचने यत्नतोऽनुष्ठेये, इत्येवमर्थं सर्वेण सह स्वाध्यायप्रवचनग्रहणम् । स्वाध्यायाधीनं ह्यर्थज्ञानम् । अर्थज्ञानायत्तं च परं श्रेयः । प्रवचनं च तदविस्मरणार्थं धर्मप्रवृद्ध्यर्थं च । अतः स्वाध्यायप्रवचनयोरादरः कार्यः । सत्यमिति सत्यमेवानुष्ठातव्यमिति सत्यवचाः सत्यमेव वचो यस्य सोऽयं सत्यवचा नाम वा तस्य । राथीतरो रथीतरस्य गोत्रो राथीतराचार्यो मन्यते ।

तप इति तप एव कर्तव्यमिति तपोनित्य तपसि नित्यस्तपःपरस्तपोनित्य इति वा नाम । पौरुशिष्टिः पुरुशिष्टस्यापत्यं पौरुशिष्टि-

राचार्यो मन्यते। स्वाध्यायप्रवचने एवानुष्ठेये इति नाको नामतो मुद्गलस्यापत्यं मौद्गल्य आचार्यो मन्यते। तद्धि तपस्तद्धि तपः। हि यस्मात्स्वाध्यायप्रवचने एव तपस्तस्मात्ते एवानुष्ठेये इति। उक्तानामपि सत्यतपःस्वाध्यायप्रवचनानां पुनर्ग्रहणमादरार्थम् ॥ १ ॥

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यगोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यश्रीमच्छंकरभगवतः कृतौ तैत्तिरीयोपनिषच्छीक्षाध्यायभाष्ये नवमोऽनुवाकः ॥ ९ ॥

पूर्व०—तुमच्या या सर्व म्हणण्याचें तात्पर्य असें दिसतें कीं, जीवाला स्वाराज्य मिळतें, तें केवळ ज्ञानानें मात्र मिळतें. असें हें तुमचें म्हणणें सहाव्या अनुवाकांत स्पष्ट झालें आहे. त्यावरून सातव्या व आठव्या अनुवाकांत जी उपासना व वैदिककर्में सांगितलीं आहेत, तीं सर्व श्रौतस्मार्त कर्में व्यर्थ आहेत, असा श्रुतीचा आणि तुमचा अभिप्राय दिसतो. तेव्हां ही कर्मांची दगदग जीवांच्या पाठीमागें कशाला लावितां?

सिद्धान्ती—तुम्ही म्हणतां, असा श्रुतीचा अभिप्रायच नाहीं. श्रुतिविहित कर्म पुरुषार्थसाधनाला (अपरब्रह्मप्राप्तीला) व परंपरेनें ब्रह्मप्राप्तीला उपयोगी पडतात. हें स्पष्ट सांगण्यासाठीं या अनुवाकांतील मंत्रांचा सिद्धांतपूर्वक उपन्यास आहे. असो; ऋत* आणि अध्ययनपूर्वक अध्यापन† इत्यादिकांचें नित्य अनुष्ठान केलें पाहिजे. प्रवचन म्हणजे ब्रह्मयज्ञ असाही अर्थ आहे. सत्य म्हणजे सत्यवचन. दुसरा अर्थ मागें सांगितलाच. ऋत आणि अध्ययनपूर्वक अध्यापन, तपश्चर्या आणि अध्ययनपूर्वक अध्यापन, इंद्रियदमन आणि अध्ययनपूर्वक अध्यापन, अंतःकरणाची शांति आणि अध्ययनपूर्वक अध्यापन, अग्नींचें आधान आणि अध्ययनपूर्वक अध्यापन, अग्निहोत्र आणि अध्ययनपूर्वक अध्यापन, अतिथि-पूजा आणि अध्ययनपूर्वक अध्यापन, लौकिक व्यवहार आणि अध्ययनपूर्वक अध्यापन, प्रजासंरक्षणासाठीं अवश्य असलेले विहित संस्कार आणि अध्ययनपूर्वक अध्यापन, भार्यागमन आणि अध्ययनपूर्वक अध्यापन, या सर्वांचें अनुष्ठान नित्य केलें पाहिजे.

सिद्धान्ती—प्रजाति म्हणजे पौत्राची उत्पत्ति आणि अध्ययनपूर्वक अध्यापन, हीं कर्में यथास्थित करावीं. सर्व कर्में ज्ञानपूर्वक, मनःपूर्वक आणि यत्नपूर्वक करावीं आणि युक्त पुरुषानें केलेल्या सर्व यथासांग कर्मांबरोबर स्वाध्याय आणि प्रवचन हीं असावीं, हें तात्पर्य आहे. नित्य स्वाध्याय असेल तरच अर्थज्ञान होईल; परमश्रेयाची

---

* याचा अर्थ पहिल्या अनुवाकांत यथाशास्त्रकर्तव्याच्या बुद्धीमध्यें निश्चय असा केलाच आहे. † प्रवचन याचा अर्थ ब्रह्मयज्ञ असाही आहे; अध्ययन आणि अध्यापन असाही अर्थ होईल.

प्राप्ति अर्थज्ञानाच्या मात्र आधीन आहे. तसेंच प्रवचन (अध्यापन) हे अविस्मरणासाठीं, अर्थज्ञानाच्या अखंडतेसाठीं, आणि धर्मप्रवृद्धीसाठीं अवश्य आहे. म्हणून स्वाध्याय (अध्ययन) आणि प्रवचन यांचा आदरपूर्वक स्वीकार श्रुतीनें केला आहे, व आपणही केलाच पाहिजे. यथार्थ बोलणारे साधू म्हणतात कीं, सत्यांचेंच अनुष्ठान नित्य केलें पाहिजे.

शिष्य—किंवा ' सत्यवचा ' नांवाचा ' रथीतर ' गोत्रोत्पन्न ऋषि म्हणतो, असें म्हटलें तर ?

सिद्धान्ती—तात्पर्य एकच. तोही अधिकारी आचार्य होता, असें समजावें. तसेंच नित्य तपश्चर्या करणारा किंवा पुरुशिष्टीचा मुलगा ' तपोनित्याचार्य म्हणतो कीं, तपाचें मात्र अनुष्ठान नित्य केलें पाहिजे. मुद्गल पुत्र मौद्गल्याचार्य (याचे नाक हें नांव होतें) म्हणतो कीं, स्वाध्याय आणि प्रवचन यांचेंच अनुष्ठान नित्य केलें पाहिजे. कारण, स्वाध्याय व प्रवचन नित्य करणें हेंच उत्कृष्ट प्रकारचें तप आहे.

शिष्य—सत्यतपादिकांचा उल्लेख पाठीमागें झालाच आहे ?

सिद्धान्ती—आतांही त्यांचा उल्लेख केला आहे, तो सत्यतपादिकांविषयीं आदरपूर्वक पूज्यबुद्धि आहे, हें दाखविण्यासाठीं आहे ॥ १ ॥

नववा अनुवाक संपला.

शीक्षाध्याये दशमोऽनुवाकः ।

अहं वृक्षस्य रेरिवा । कीर्तिः पृष्ठं गिरेरिव । ऊर्ध्वपवित्रो वाजिनीव स्वमृतमस्मि । द्रविण ँसुवर्चसम् । सुमेधा अमृतोक्षितः । इति त्रिशङ्कोर्वेदानुवचनम् (१) ॥

अह ँ षट् ॥

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि शीक्षाध्याये दशमोऽनुवाकः ॥ १० ॥

अन्वय व अर्थः—**अहं वृक्षस्य रेरिवा** (मी क्षणभंगुर वृक्षाचा प्रेरिता आहे) **गिरेः पृष्ठं इव कीर्तिः** (पर्वताच्या शिखराप्रमाणें माझी कीर्ति उंच आहे) **वाजिनि सु अमृतं इव ऊर्ध्वपवित्रः अस्मि** (अन्न उत्पन्न करणाऱ्या सूर्याप्रमाणें ऊर्ध्व लोकांस नेणारें पवित्र ब्रह्म

ज्या माझें आहे, तो ऊर्ध्वपवित्ररूपी मी उत्कृष्ट अमृतरूप आहे) **द्रविणं सुवर्चसं** (मी अत्यंत तेजस्वी धन आहे) **सुमेधाः अमृतोक्षितः** (मी सुंदरबुद्धीचा असून अमरणधर्मा आहे, अमृतामध्यें सचैल स्नान नित्य करीत असल्यामुळें अमर झालों आहे; आणि अव्यय आहे) **इति त्रिशंकोः वेदानुवचनं** (याप्रमाणें त्रिशंकूचें वेदानुवचन होतें) ॥ १ ॥

अहं वृक्षस्य रेरिवेति स्वाध्यायार्थो मन्त्राम्नायः । स्वाध्यायश्च विद्योत्पत्तये । प्रकरणात् विद्यार्थं हीदं प्रकरणम् । न चान्यार्थत्वमवगम्यते । स्वाध्यायेन च विशुद्धसत्त्वस्य विद्योत्पत्तिरवकल्प्यते । अहं वृक्षस्योच्छेदात्मकस्य संसारवृक्षस्य रेरिवा प्रेरयिताऽन्तर्याम्यात्मना । कीर्तिः ख्यातिर्गिरः पृष्ठमिवोच्छ्रिता मम । ऊर्ध्वपवित्र ऊर्ध्वकारणं पवित्रं पावनं ज्ञानप्राकाश्यं पवित्रं परमं ब्रह्म यस्य सर्वात्मनो मम सोऽहमूर्ध्वपवित्रः । वाजिनीव वाजवतीव । वाजमन्नं तद्वति सवितरीत्यर्थः । यथा सवितर्यमृतमात्मतत्त्वं विशुद्धं प्रसिद्धं श्रुतिस्मृतिशतेभ्य एवं स्वमृतं शोभनं विशुद्धमात्मतत्त्वमस्मि भवामि ।

द्रविणं धनं सवर्चसं दीप्तिमत्तदेवाऽऽत्मतत्त्वमस्मीत्यनुवर्तते । ब्रह्मज्ञानं वाऽऽत्मतत्त्वप्रकाशकत्वात्सुवर्चसम् । द्रविणमिव द्रविणं मोक्षसुखहेतुत्वात् । अस्मिन्पक्षे प्राप्तं मयेत्यध्याहारः कर्तव्यः । सुमेधाः शोभना मेधा सर्वज्ञलक्षणा यस्य मम सोऽहं सुमेधाः । संसारस्थित्युत्पत्त्युपसंहारकौशलयोगात्सुमेधस्त्वम् । अत एवामृतोऽमरणधर्माऽक्षितोऽक्षीणोऽव्ययः । उक्षितो वाऽमृतेन वोक्षितः सिक्तः । " अमृतोक्षितोऽहम् " इत्यादि ब्राह्मणम् । इत्येवं त्रिशङ्कोर्ऋषेर्ब्रह्मभूतस्य ब्रह्मविदो वेदानुवचनम् । वेदो वेदनमात्मैकत्वविज्ञानं तस्य प्राप्तिमनुवचनं वेदानुवचनम् । आत्मनः कृतकृत्यताख्यापनार्थं वामदेववत्त्रिशङ्कुनाऽऽर्षेन दर्शनेन दृष्टो मन्त्राम्नाय आत्मविद्याप्रकाशक इत्यर्थः । अस्य च जपो विद्योत्पत्त्यर्थोऽवगम्यते । ऋतं चेत्यादिकर्मोपन्यासादनन्तरं च वेदानुवचनपाठादेतदवगम्यते । एवं श्रौतस्मार्तेषु नित्येषु कर्मसु युक्तस्य निष्कामस्य परं ब्रह्म विविदिषोत्पद्यते दर्शनानि प्रादुर्भवन्त्यात्मादिविषयाणीति ॥ १ ॥

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यगोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यश्रीमच्छंकरभगवतः कृतौ तैत्तिरीयोपनिषच्छीक्षाध्यायभाष्ये दशमोऽनुवाकः ॥ १० ॥

सिद्धान्ती—हा मंत्र स्वाध्यायासाठीं वेदानें आम्नात केला आहे, सांगितला आहे. स्वाध्याय हा ज्ञानाची उत्पत्ति व्हावी, अशा दृष्टीनें करावयाचा असतो.

पूर्व०—कशावरून ?

सिद्धांती—संबंधच तसा आहे. हें विद्येचें प्रकरण आहे. या प्रकरणाचा उद्भव ज्ञानासाठीं आहे. ज्ञानाशिवाय याचा दुसरा अर्थ शक्य नाहीं; (व दुसरीकडे कोठें उपयोग आहे, असें दिसत नाहीं) स्वाध्यायानें (श्रुतीच्या नित्य अध्ययनानें) जो शुद्धचित्त झाला आहे, त्यालाच ब्रह्मज्ञानाची उत्पत्ति होते, असा सिद्धांत करणें श्रुतीस योग्य वाटलें आहे. या मंत्राचा ऋषि त्रिशंकु आहे. आणि पंक्तिछंद आहे. त्रिशंकु म्हणतो, 'मी विनाशी जो संसारवृक्ष त्याचा 'रेरिवा' म्हणजे अंतर्यामी आहे. संसाराच्या अंतर्यामीं राहून मी त्याचा प्रेरक होतों.

शिष्य—किंवा या मंत्रखंडाचा असाही अर्थ होईल कीं, मी या चंचल संसार-वृक्षाचा उच्छेद वैराग्यरूपी शस्त्रानें करीन. 'रि' या धातूचा अर्थ हिंसा करणें असा आहे.

सिद्धान्ती—असो; संसारप्रेरक असणाऱ्या किंवा त्याची विच्छित्ति करणाऱ्या माझी कीर्ति गगनचुंबी पर्वताच्या उत्तुंग शिखराप्रमाणें त्रैलोक्यांत प्रकट आहे. वाजी म्हणजे अन्न देणारा किंवा अत्यंत शीघ्रगती असणारा जो सूर्य त्याच्यामध्यें जसें कल्याणकारी अमृत अत्यंत शुद्ध असतें, त्याप्रमाणें मी ही ऊर्ध्वपवित्र आहे.

शिष्य—ऊर्ध्वपवित्र म्हणजे ?

सिद्धान्ती—ऊर्ध्व म्हणजे उत्कृष्ट आहे पवित्र म्हणजे शुद्धि ज्याची किंवा ऊर्ध्व म्हणजे उन्नत करणारें आहे, पवित्र म्हणजे ज्ञानानें प्रकाशित होणारें ब्रह्म ज्याचें, तो मी सर्वात्मा अत्यंत शुद्ध आणि निःसीम सर्वज्ञ होईन. तात्पर्य, सर्वांस जन्म देणाऱ्या व त्यांस जिवंत ठेवणाऱ्या सवित्याचें आत्मतत्त्व शुद्ध आहे, असें शेंकडों श्रुतिस्मृतींमध्यें प्रसिद्ध आहे. त्याप्रमाणें विशुद्ध असा परमात्मा मी आहें. तात्पर्य, संसारप्रेरक, कीर्तिवंत आणि विशुद्धसत्त्व असा मी आहें.

सिद्धान्ती—त्याचप्रमाणें ज्याचें धन देदिप्यमान आहे, तें आत्मतत्त्व मी आहें. किंवा द्रविण म्हणजे ब्रह्मज्ञान हें आत्मतत्त्वाचें प्रकाशक आहे; म्हणून तें अत्यंत तेजस्वी असतें. हें ज्ञान मी मिळवितों.

पू०—पण द्रविण याचा अर्थ ब्रह्मज्ञान आहे, याला प्रमाण ?

सिद्धान्ती—संसारामध्यें धन जसें सुख देतें, त्याप्रमाणें ब्रह्मज्ञान मोक्षसुखाचें कारक आहे. म्हणून द्रविण याचा अर्थ ब्रह्मज्ञान असा आम्ही करितों. मात्र हा दुसरा अर्थ केला तर 'हें ब्रह्मज्ञान मीं मिळविलें आहे' असें अध्याहृत घेतलें पाहिजे. असो; त्रिशंकु पुढें म्हणतोः मी सुमेधा आहे म्हणजे माझी मेधा (बुद्धीमध्यें

जें कर्तृत्वसामर्थ्य असतें, त्याला मेधा असें म्हणावें.) बुद्धि 'सु' म्हणजे सुंदर अथवा सर्वज्ञलक्षणाची आहे. तात्पर्य माझी कर्तृत्वबुद्धि सर्वज्ञ आहे.

शिष्य—हें कशावरून ?

सिद्धान्ती—संसाराची स्थिति, उत्पत्ति आणि लय या सर्वठिकाणीं तिचें कौशल्य दृष्टीस पडतें, म्हणून तिला सुमेधा असें म्हटलें. ब्रह्मज्ञ झालेला पुरुष जगद्व्यवस्था ठेवण्यालाही अधिकारी होतो, असें म्हणण्यास हरकत नाहीं. अर्थात् जन्माचा आणि मृत्यूचा नियामक जो मी तो अमर आणि अक्षित म्हणजे अक्षीण असणारा अथवा अव्यय होय.

शिष्य—अमृतोक्षित या शब्दामध्यें अमृत आणि उक्षित असे दोन शब्द आहेत, असें समजून सर्व शब्द समस्त आहे, असें समजलें, तर अमृतानें ब्रह्मज्ञ पूर्ण भिजतो, परिपूर्ण होतो, सारांश त्रिशंकु [परिपूर्ण झाला, असा अर्थ होईल. करावा काय असा अर्थ ?

सिद्धांती—खुशाल करावा. 'मी अमृतानें स्नात झालो आहें.' असें ब्राह्मणांत एक वाक्य आहे.' याप्रमाणें ब्रह्मवेत्त्या आणि ब्रह्मभूत झालेल्या त्रिशंकूचें वेदानुवचन आहे. वेद म्हणजे वेदन अथवा आत्मैकत्वसाक्षात्कार. अनु म्हणजे हा साक्षात्कार झाल्यावर, वचन (म्हणणें) आहे. आत्मैकत्वाचा साक्षात्कार झाल्यानंतर ब्रह्मज्ञ त्रिशंकुऋषीचें हें वचन आहे.

शिष्य—' मी संसाराचा प्रेरिता, प्रसिद्धकीर्ति, तेजस्वी सूर्याप्रमाणें शुद्ध आणि पवित्र, सर्वैश्वर्यसंपन्न, सर्वज्ञ, सर्वशक्ति आणि अमर आहें, असा त्रिशंकूच्या म्हणण्याचा अर्थ होतो.

सिद्धान्ती—आणि म्हणूनच ऐतरेयामध्यें उल्लेखिलेल्या वामदेवाप्रमाणें त्रिशंकूला ब्रह्मसाक्षात्कार झाला आणि त्याला हा आत्मविद्याप्रकाशक मंत्र दिसला. असें सांगण्याचें तात्पर्यच हें आहे कीं, तो आत्मदृष्टीनें सर्वथा कृतार्थ झाला होता. त्याची कृतकृत्यता स्पष्ट सांगण्यासाठींच वामदेवाप्रमाणें त्रिशंकूलाही हा ब्रह्मविद्येला प्रकाशित करणारा मंत्र दृष्टीस पडला, असें इतिवृत्त श्रुति सांगते. त्या मंत्राचा तो द्रष्टा झाला म्हणून त्याला ऋषि असें म्हणावयाचें. असो; या मंत्राचा जप केला असतां आत्मविद्येचें ज्ञान प्रकाशित होतें.

शिष्य—हें कशावरून ?

सिद्धान्ती—मागच्या अनुवाकांत 'स्वाध्यायप्रवचन करावें' असा कर्माचा उपन्यास केल्याबरोबर लागलींच हा वेदानुवचनाचा पाठ सांगितला आहे व हा जपविहित केला आहे. त्याचें प्रयोजन अर्थातच विद्योत्पादन हेंच असलें पाहिजे.

शिष्य—यावरून असें दिसतें कीं, श्रुतिस्मृतींनीं विहित केलेलीं नित्य कर्म निरिच्छतेनें अथवा कर्तव्यदृष्टीनें मात्र केलीं असतां परब्रह्मजिज्ञासूला आत्मज्ञान कथन करणारे मंत्र प्रकट होतात. शुद्धचित्त झालेल्या जिज्ञासूला आत्मादि साक्षात्कारविषयक मंत्र निदिध्यासानें प्रकट होतात हा सिद्धांत होय.

दु० शिष्य—प्रकट होतात; म्हणजे दिसतात ?

सिद्धान्ती—दिसतात इतकेंच काय ? आत्म्याचा साक्षात्कार होऊन मुमुक्षु ब्रह्मही होतो ॥ १ ॥

दहावा अनुवाक संपला.

शीक्षाध्याय एकादशोऽनुवाकः ।
वेदमनूच्याऽऽचार्योऽन्तेवासिनमनुशास्ति ।

अन्वय व अर्थः–वेदं अनूच्य आचार्यः अन्तेवासिनं अनुशास्ति

(वेदाचें प्रवचन संपल्यानंतर गुरूजी आपल्या शिष्याला उपदेश करितात)

वेदमनूच्येत्येवमादिकर्तव्यतोपदेशारम्भः प्राग्ब्रह्मविज्ञानान्नियमेन कर्तव्यानि श्रौतस्मार्तकर्माणीत्येवमर्थः । अनुशासनश्रुतेः पुरुषसंस्कारार्थत्वात् । संस्कृतस्य हि विशुद्धसत्त्वस्याऽऽत्मज्ञानमञ्जसैवोत्पद्यते । " तपसा कल्मषं हन्ति विद्ययाऽमृतमश्नुते " इति स्मृतिः । वक्ष्यति च–' तपसा ब्रह्म विजिज्ञासस्व ' इति । अतो विद्योत्पत्त्यर्थमनुष्ठेयानि कर्माणि । अनुशास्तीत्यनुशासनशब्दादनुशासनातिक्रमे हि दोषोत्पत्तिः । प्रागुपन्यासाच्च कर्मणां । केवलब्रह्मविद्यारम्भाच्च पूर्वं कर्माण्युपन्यस्तानि । उदितायां च विद्यायाम् " अभयं प्रतिष्ठां " " न बिभेति कुतश्चन " " किमहं साधु नाकरवम्" इत्येवमादिना कर्मनैष्किंचन्यं दर्शयिष्यतीत्यतोऽवगम्यते पूर्वोपचितदुरितक्षयद्वारेण विद्योत्पत्त्यर्थानि कर्माणीति। मन्त्रवर्णाश्च– " अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुते " इति । ऋतादीनां पूर्वत्रोपदेशः आनर्थक्यपरिहारार्थः ! इह तु ज्ञानोत्पत्त्यर्थत्वात्कर्तव्यनियमार्थः । वेदमनूच्याध्याप्याऽऽचार्योऽन्तेवासिनं शिष्यमनुशास्ति ग्रन्थग्रहणादनु पश्चाच्छास्ति तदर्थं ग्राहयतीत्यर्थः । अतोऽवगम्यतेऽधीतवेदस्य धर्मजिज्ञासामकृत्वा गुरुकुलान्न समावर्तितव्यमिति । " हुत्वा कर्माणि चाऽऽरभेत् " इति स्मृतेश्च ।

सिद्धांती—हा जो मंत्रखंड आहे, त्यांत स्पष्टतेनें सांगितलेलीं सर्व कर्मे वैदिकांनीं अवश्य केलीं पाहिजेत, अशा अर्थावर दृष्टि ठेऊन उपदेशाला आरंभ झाला आहे. ब्रह्मविज्ञान होण्यापूर्वी नियमानें कोणतीं श्रौत आणि स्मार्त कर्मे जीवानें केलीं पाहिजेत, तीं येथें सांगितलीं आहेत. वरील श्रुतीमध्यें 'अनुशासन' हा शब्द आहे, त्यावरून स्पष्ट होतें कीं, ज्याला हीं संस्कारीं कर्मे सांगितलीं, तो पुरुष हीं कर्मे केल्यावर संस्कृत होतो. तोच पुरुष संस्कृत झाला, विशुद्धसत्त्व झाला, त्याचें चित्त शुद्ध आणि निर्मळ झालें, म्हणजे त्याला आत्मज्ञान वेदांतश्रवणादिकांनीं वस्तुबलानें म्हणजे सहजच प्रकाशित होतें. शुद्धचित्त पुरुषाला आत्मज्ञानाच्या प्राप्तीसाठीं श्रवण-मननाखेरीज कोणतेंही कर्म करावें लागत नाहीं. 'तपाच्या योगें पापाचा विनाश करून विद्येच्या साह्यानें अमृतप्राप्ति करून घेतो' अशी स्मृति आहे. तसेंच, 'तपाच्या साह्यानें ब्रह्मसाक्षात्कार करून घेण्याची इच्छा कर' असें याच उपनिषदांत पुढें सांगणार आहेत. म्हणून या अनुवाकांत कर्मांचें अनुष्ठान करावें, असें जें सांगितलें आहे, तें विद्योत्पत्तीसाठीं आहे, विद्या उत्पन्न झाल्यानंतर कर्म करण्यासाठीं नव्हे.

शिष्य—मंत्रामध्यें अनुशासन असा शब्द आहे. संस्काराशिवाय आणखी कांहीं त्या शब्दाचें रहस्य आहे काय ?

सिद्धांती—आहे तर ! येथें केलेल्या आज्ञेचें उल्लंघन केलें असतां दोषांची उत्पत्ति होते, पाप उत्पन्न होतें ! हें समजावें, म्हणून अनुशासन हा शब्द साभिप्राय आहे. शिवाय, कर्मांचा उपन्यास प्रथमच केला आहे, म्हणून हीं कर्मे चित्तशुद्धीसाठीं आहेत, असें स्पष्ट होतें. तात्पर्य केवळ ब्रह्माचें विद्येला आरंभ करण्यापूर्वीच कर्मोपन्यास केला आहे, तो चित्तशुद्धीसाठीं केला आहे; पण विद्येला आरंभ होऊन ती सर्व प्रकट झाली म्हणजे 'निर्भय असें स्थान ब्रह्मज्ञ मिळवितो' 'त्याला मग कशाचें भय उरत नाहीं,' 'मी पुण्यकर्म कीं केलें नाहीं, असा पश्चात्ताप ब्रह्मज्ञाला होत नाहीं.' इत्यादि श्रुती कर्म हें अकिंचित्कर आहे, ब्रह्मज्ञाला कर्मांचा कांहीं उपयोग होत नाहीं, तो कर्म करीत नाहीं, त्याला कर्मापेक्षा नसते किंवा कर्म करणें त्याला शक्य नाहीं, असें याच उपनिषदांत सांगतील. या सर्व विवेचनावरून हें स्पष्ट होतें कीं, येथें जीं कर्मे करावयास सांगितलीं आहेत, तीं पूर्वसंचित पापाचा क्षय करितात, आणि क्षय झाल्यानंतर तींच परंपरेनें विद्योत्पत्तीचीं साधनें होतात, म्हणून सांगितलीं. 'अविद्येनें-तपादि निष्काम कर्मांनें-मृत्यूचे उत्तरण होतें; आणि विद्येनें अमृतप्राप्ति होते' असें ईशावास्य श्रुति म्हणते. असो; ऋतादिकांचा पूर्वी जो उपदेश नवव्या अनुवाकांत केला, तो अनर्थपरिहारासाठीं होता, पापनिवारणासाठीं होता. येथें ऋतस्वाध्यायादिकांचा उपदेश केला आहे, तो ज्ञानोत्पत्तीसाठीं आहे. ज्ञानोत्पत्तीसाठीं जें श्रवणमनन करावें लागतें, त्याच्या नियमनासाठीं हा कर्तव्याचा उपदेश आहे. तात्पर्य, वेदाचें अध्ययन संपल्यानंतर

गुरुजी आपल्या सन्निकट राहणाऱ्या वेदाधीत शिष्याला अनुशासन करितात, तें ग्रंथग्रहण झाल्यानंतर पुढील कर्मव्यवस्थेसाठीं सांगितलेलें असतें. प्रथम सर्व ग्रंथ-ग्रहण, आणि नंतर त्याच्या अर्थांचा न्यायपूर्वक विचार; असा श्रुतिप्रणीत संप्रदाय आहे. यावरूनही असें स्पष्ट होतें कीं, वेदाध्ययन केल्यानंतर धर्मजिज्ञासा न करतां गुरुकुलांतून बाहेर जातां येत नाहीं. कारण, जाऊं नये असा शास्त्रविधि आहे. अर्थ-ग्रहण, वेदाध्ययन, धर्मविचार इत्यादि सर्व संपल्यानंतर समावर्तनाचा विधि सिद्ध होतो.

सिद्धांती—अध्ययन संपवून गुरूच्या अनुज्ञेनें शिष्य स्नातक झाला (विद्याप्राप्ती-नंतरचें स्नान केलें म्हणजे त्यानें गुरुकुल सोडावें, असा पूर्वकालीन संप्रदाय होता) ' कर्मांचें स्वरूप समजून घेऊन व निष्कामबुद्धीनें तीं करून चित्तशुद्धि झाली, म्हणजे आत्मविद्येला आरंभ करावा ' अशी स्मृतीची आज्ञा आहे.

शिष्य—अथवा कर्मांचें स्वरूप समजून घेऊन मग कर्म करण्याला आरंभ करावा, असाही या स्मृतीचा अर्थ कोठें कोठें केला आहे.

सिद्धान्ती—तोही अर्थ ठीक आहे. आतां श्रुतीचें अनुशासन ऐक.—

सत्यं वद । धर्मं चर । स्वाध्यायान्मा प्रमदः । आचार्याय प्रियं धनमाहृत्य प्रजातन्तुं मा व्यवच्छेत्सीः । सत्यान्न प्रमदितव्यम् । धर्मान्न प्रमदितव्यम् । कुशलान्न प्रमदितव्यम् । भूत्यै न प्रमदितव्यम् । स्वाध्यायप्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम् ॥ (१) ॥

देवपितृकार्याभ्यां न प्रमदितव्यम् । मातृदेवो भव । पितृदेवो भव । आचार्यदेवो भव । अतिथिदेवो भव । यान्यनवद्यानि कर्माणि । तानि सेवितव्यानि नो इतराणि । यान्यस्माकꣳ सुचरितानि । तानि त्वयोपास्यानि ॥ (२) ॥

नो इतराणि । ये के चास्मच्छ्रेयाꣳसो ब्राह्मणाः । तेषां त्वयाऽऽसनेन प्रश्वसितव्यम् । श्रद्धया देयम् । अश्रद्धयाऽदेयम् । श्रिया देयम् । ह्रिया देयम् । भिया देयम् । संविदा देयम् । अथ यदि ते कर्मविचिकित्सा वा वृत्तविचिकित्सा वा स्यात् ॥ (३) ॥

ये तत्र ब्राह्मणाः संमर्शिनः । युक्ता अयुक्ताः । अलूक्षा धर्मकामाः स्युः । यथा ते तत्र वर्तेरन् । तथा तत्र वर्तेथाः । अथाभ्याख्यातेषु ये तत्र ब्राह्मणाः संमर्शिनः । युक्ता आयुक्ताः । अलूक्षा धर्मकामाः स्युः । यथा ते तेषु वर्तेरन् । तथा तेषु वर्तेथाः । एष आदेशः । एष उपदेशः । एषा वेदोपनिषत् । एतदनुशासनम् । एवमुपासितव्यम् । एवमु चैतदुपास्यम् ॥ (४) ॥

स्वाध्यायप्रवचनाभ्यां न प्रमदितव्यं तानि त्वयोपास्यानि
स्यात्तेषु वर्तेरन्सप्त च ॥

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि शीक्षाध्याय
एकादशोऽनुवाकः ॥ ११ ॥

अन्वय व अर्थः—येथील अन्वय स्पष्ट आहे आणि अर्थही भाष्याधारानें होत आहे, म्हणून अन्वयार्थ स्वतंत्रतेनें दिला नाहीं ॥ १—४ ॥

कथमनुशास्तीत्याह—सत्यं वद यथाप्रमाणावगतं वक्तव्यं तद्वद। तद्वद्धर्मं चर। धर्म इत्यनुष्ठेयानां सामान्यवचनं सत्यादिविशेषनिर्देशात्। स्वाध्यायादध्ययनान्मा प्रमदः प्रमादं मा कार्षीः। आचार्यायाऽऽचार्यार्थं प्रियमिष्टं धनमाहृत्याऽऽनीय दत्त्वा विद्यानिष्क्रयार्थम्। आचार्येण चानुज्ञातोऽनुरूपान्दारानाहृत्य प्रजातन्तुं प्रजासंतानं मा व्यवच्छेत्सीः प्रजासंततेर्विच्छित्तिं कर्तव्या। अनुत्पद्यमानेऽपि पुत्रे पुत्रकाम्यादिकर्मणा तदुत्पत्तौ यत्नः कर्तव्य इत्यभिप्रायः। प्रजाप्रजननप्रजातित्रयनिर्देशसामर्थ्यात्। अन्यथा प्रजननश्रेत्येतदेकमेवावक्ष्यत्।

सत्यान्न प्रमदितव्यं प्रमादो न कर्तव्यः। सत्याच्च प्रमदनमनृतप्रसङ्गः। प्रमादशब्दसामर्थ्यात्। विस्मृत्याप्यनृतं न वक्तव्यमित्यर्थः। अन्यथाऽसत्यवदनप्रतिषेध एव स्यात्। धर्मान्न प्रमदितव्यम्। धर्मशब्दस्यानुष्ठेयविषयत्वादननुष्ठानं प्रमादः स न कर्तव्यः। अनुष्ठातव्य

एव धर्म इति यावत्। एवं कुशलादात्मरक्षार्थात्कर्मणो न प्रमदितव्यम्। भूतिर्विभूतिस्तस्यै भूत्यै भूत्यर्थान्मङ्गलयुक्तात्कर्मणो न प्रमदितव्यम्। स्वाध्यायप्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम्। स्वाध्यायोऽध्ययनं प्रवचनमध्यापनं ताभ्यां न प्रमदितव्यम्। ते हि नियमेन कर्तव्ये इत्यर्थः॥ १॥

तथा देवपितृकार्याभ्यां न प्रमदितव्यम्। दैवपित्र्यै कर्मणी कर्तव्ये। मातृदेवो माता देवो यस्य स त्वं मातृदेवो भव स्याः। एवं पितृदेव आचार्यदेवोऽतिथिदेवो भव। देवतावदुपास्या एत इत्यर्थः। यान्यपि चान्यान्यनवद्यान्यनिन्दितानि शिष्टाचारलक्षणानि कर्माणि तानि सेवितव्यानि कर्तव्यानि त्वया। नो अकर्तव्यानीतराणि सावद्यानि शिष्टकृतान्यपि। यान्यस्माकमाचार्याणां सुचरितानि शोभनचरितान्याम्नायाद्यविरुद्धानि तान्येव त्वयोपास्यान्यदृष्टार्थान्यनुष्ठेयानि, नियमेन कर्तव्यानीति यावत्॥ २॥

नो इतराणि विपरीतान्याचार्यकृतान्यपि। ये के च विशेषिता आचार्यत्वादिधर्मैरस्मदस्मत्तः श्रेयांसः प्रशस्यतरास्ते च ब्राह्मणा न क्षत्रियादयस्तेषामासनेनाऽऽसनदानादिना त्वया प्रश्वसितव्यम्। प्रश्वसनं प्रश्वासः श्रमापनयः, तेषां श्रमस्त्वयाऽपनेतव्य इत्यर्थः। तेषां चाऽऽसने गोष्ठीनिमित्ते समुदिते तेषु न प्रश्वसितव्यं प्रश्वासोऽपि न कर्तव्यः। केवलं तदुक्तसारग्राहिणा भवितव्यम्। किं च यत्किंचिद्देयं तच्छ्रद्धयैव दातव्यम्। अश्रद्धयाऽदेयं न दातव्यम्। श्रिया विभूत्या देयं दातव्यम्। ह्रिया लज्जया च देयम्। भिया च भयेन देयम्। संविदा च। संविन्मित्रादिकार्यम्। अथैवं वर्तमानस्य यदि कदाचित्ते तव श्रौते स्मार्ते वा कर्मणि वृत्ते वाऽऽचारलक्षणे विचिकित्सा संशयः स्यात्॥ ३॥

ये तत्र तस्मिन्देशे काले वा ब्राह्मणास्तत्र कर्मादौ युक्ता इति व्यवहितेन संबन्धः कर्तव्यः। संमर्शिनो विचारक्षमाः। युक्ता अभियुक्ताः कर्मणि वृत्ते वा। आयुक्ता अपरप्रयुक्ताः। अलूक्षा अरूक्षा अक्रूरमतयः। धर्मकामा अदृष्टार्थिनोऽकामहता इत्येतत्स्युर्भवेयुः। ते यथा येन प्रकारेण ब्राह्मणास्तत्र तस्मिन्कर्मणि वृत्ते वा वर्तेरंस्तथा त्वमपि वर्तेथाः। अथाभ्याख्यातेष्वभ्युक्ता दोषेण सं-

दिह्यमानेन संयोजिताः केनचित्तेषु च यथोक्तं सर्वमुपनयेद्वे तत्रेत्यादि। एष आदेशो विधिः। एष उपदेशः पुत्रादिभ्यः पित्रादीनाम्। एषा वेदोपनिषद्वेदरहस्यं वेदार्थ इत्येतत्। एतदेवानुशासनमीश्वरवचनम्। आदेशवाक्यस्य विधेरुक्तत्वात्सर्वेषां वा प्रमाणभूतानामनुशासनमेतत्। यस्मादेवं तस्मादेवं यथोक्तं सर्वमुपासितव्यं कर्तव्यम्। एवमु चैतदुपास्यमुपास्यमेव चैतन्नानुपास्यमित्यादरार्थं पुनर्वचनम् ॥ ४ ॥

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यगोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यश्रीमच्छंकरभगवतः कृतौ तैत्तिरीयोपनिषच्छीक्षाध्यायभाष्य एकादशोऽनुवाकः ॥ ११ ॥

सिद्धांती—श्रुतीचें अनुशासन काय व कोणत्या प्रकारचें आहे तें ऐका:—(१) 'सत्य बोला' म्हणजे प्रमाणशुद्धज्ञान आपल्यास झालें असेल, जशी वस्तुस्थिति प्रमाणशः आपल्यास समजली असेल, तसेंच बोला परहितकारी योग्य बोलत जा. (२) याचप्रमाणें 'धर्माचें आचरण करा' असा या अनुशासनाचा अर्थ आहे. येथें धर्म म्हणजे जीं जीं कर्तव्यें आपल्यास करावयाचीं आहेत, तीं तीं होत, असें सामान्यत्वानें सांगितलें आहे. धर्म म्हणजे सर्वसामान्य धर्म होय, कर्तव्यें होत. कारण विशेष सत्यादिकांचा निर्देश श्रुतीनें निराळा केला आहे. (३) स्वाध्यायापासून केव्हांही भ्रष्ट होऊं नका! म्हणजे तुम्हीं जें अध्ययन केलें आहे, त्याची आवृत्ति करण्यामध्यें केव्हांही आळस करूं नका. किंवा तुम्ही जें अध्ययन केलें आहे, तें वाढविण्यामध्यें केव्हांही आळस करूं नका. (४) गुरूजीसाठीं-त्यांना आनंद होईल इतकें-धन मिळवून आणा; आणि आपण त्यांच्यापाशीं जी विद्या शिकलों, तिचें उतराई त्यांस तें धन देऊन व्हा. प्रथम गुरूचें ऋण फेडा. गुरुवर प्रत्युपकार धनरूपानें तरी करा. नंतर विवाह करण्याप्रीत्यर्थ आचार्यांची परवानगी घेऊन तुमच्या कुलशीलादिकांस योग्य अशी तुमच्या इच्छेप्रमाणें भार्या पसंत करून प्रजातंतु विच्छिन्न होणार नाहीं, वंशविस्तार कायम राहील, असें करा; वंश-वृक्षाचा उच्छेद होईल असें करूं नका. वंशविस्तार केला म्हणजे पितृ-ऋण फिटतें.

शिष्य—पुत्रोत्पत्ति झालीच नाहीं तर?

सिद्धांती—पुत्रकाम्यादि इष्टि करावी. पुत्रोत्पत्तीसाठीं दैवी यत्नही करावा. सारांश, वंशविच्छेद करूं नये, हा अर्थ आहे. पुत्रोत्पत्ति, ऋतुकालीं भार्यागमन आणि पौत्रोत्पत्ति, हे तीन अर्थ दाखविण्याचें 'प्रजा' या शब्दांत सामर्थ्य आहे. (अनुवाक ९ पाहा) तसा श्रुतीचा उद्देश नसता तर 'प्रजनन' एक हाच शब्द श्रुतीनें उपयोजिला असता (५) 'सत्यभ्रष्ट होऊं नका, सत्य बोलण्यासंबंधानें आळस करूं नका,

मनुष्य सत्यभ्रष्ट झाला, म्हणजे अनृताचा प्रसंग उत्पन्न होतो. हें 'प्रमाद' शब्दाच्या सामर्थ्यानें कळतें. विस्मृति जरी झाली, तथापि खोटें बोलूं नये. प्रमाद म्हणजे 'चुकी' ती करूं नये. चुकी म्हणजे खोटें बोलणें, अन्यथा बोलणें होय. म्हणून सत्यभ्रष्ट होऊन असत्यप्रसंग ओढवूं नका. हा असा श्रुतीचा अभिप्राय नसता तर तिनें असत्य बोलण्याचा प्रतिषेध साक्षात् केला असता. तसा केला नाहीं यावरून विस्मरण झालें तरी खोटें बोलूं नये, मला स्मरण नाहीं असें सांगावें; असा श्रुत्यभिप्राय आहे. (६) 'धर्मभ्रष्ट होतां उपयोगी नाहीं. जें जें काय कर्तव्य धर्मतः प्राप्त झालें आहे, तें न करणें हा प्रमाद होय. तेव्हां असला प्रमाद कधींही करूं नये. तात्पर्य धर्माच्या व स्वकर्तव्याच्या अनुष्ठानामध्यें नित्य दक्ष असावें. (७) आपल्या रक्षणार्थ जें काय करावें लागतें, त्याला 'कुशल-कर्म' असें म्हणावें. या कुशल-कर्मांत केव्हांही प्रमाद होऊं देऊं नये. (८) 'भूति' म्हणजे विभूति, मंगलकारी कर्तव्यें, यांमध्येंही प्रमाद होऊं देऊं नये. तात्पर्य पुण्यकर्म करण्याला जें अवश्य द्रव्य-साहाय्य, शरीर-साहाय्य, मनः-साहाय्य इत्यादि लागतें, तें मिळविण्यामध्यें केव्हांही प्रमाद किंवा आळस उपयोगी नाहीं. (९) स्वाध्याय प्रवचनांपासून (अध्ययन-अध्यापनांपासून) भ्रष्ट होऊं नये. दोन्हीचेंही अनुष्ठान नित्य करावें.

शिष्य—मागें स्वाध्याय सांगितलाच आहे ?

सिद्धान्ती—तेथें स्वतःचें अध्ययन मात्र उद्दिष्ट आहें. येथें अध्यापनासाठीं लागणाऱ्या विशेष अध्ययनाची आवश्यकता स्पष्ट केली आहे.

(१०) याचप्रमाणें देवसंबंधी व पितृसंबंधी कर्तव्यांत चुकी होऊं देऊं नये. देवसंबंधी व पितृसंबंधीं कर्तव्यें अवश्य करावीं. हीं कर्में आपली कृतज्ञताबुद्धि जागृत ठेऊन स्वार्थी कुबुद्धीला आळा घालितात. (११) 'मातेला देवाप्रमाणें समजावें' माता हाच ज्याचा देव तो मातृदेव होय. त्याचप्रमाणें हे शिष्यानो, (१२) पितृदेव, (१३) आचार्यदेव आणि (१४) अतिथिदेव हो; म्हणजे या सर्वांस देवाप्रमाणें उपास्य समज. हीं सर्व उपास्य-दैवतेंच आहेत. (१५) यांशिवाय जीं कांहीं दुसरीं निर्दोष, अनिंद्य, शिष्टाचाराचीं कर्में आहेत, तींच तूं नेहमीं करीत राहा. तूं केव्हांही दुष्ट, निंद्य आणि अशिष्ट कर्में करूं नयेस. शिष्ट-लोकांनीं निंद्य कर्में केलीं, तरी तूं मात्र तसलीं अपकृत्यें करूं नकोस. (१६) जीं आमच्यासारख्या आचार्यांचीं पुण्यकारक कर्में असतात व जीं वेदविरुद्ध नसतात, त्यांचेच मात्र तूं अनुकरण करावेंस, वेदानें विहित केलेल्या कर्मांपासून कांहींएक अदृष्ट उत्पन्न होत असतें. म्हणून तूं वेद-विहित कर्में नित्य करीत जा. (१७) पण आचार्यांनींसुद्धां वेदविरुद्ध कर्में करण्याचा संप्रदाय घातला असला, तरी तूं त्यांचा स्वीकार करूं नकोस.

सिद्धान्ती—तसेंच, (१८) जे कोणीं आचार्यत्वादिधर्मांनीं विशेष प्रसिद्धीस आले असतात, जे आमच्याहूनही श्रेष्ठतर आहेत. ते ब्राह्मण असतील, तर मात्र त्यांना आसन, अर्घ्य, इत्यादि देऊन त्यांस झालेल्या श्रमांचा परिहार करीत जा, केवळ क्षत्रियादिकांचा असा सम्मान करण्याचें कांहीं कारण नाहीं.

शिष्य—कारण धनादिकांनीं ते समृद्ध व सुसंपन्न असतात. त्यांचे आदरातिथ्य केलें, तर धनप्राप्ति होईल, ह्या मोहानें शिष्य श्रीमंताचें व सत्ताधीशाचें आतिथ्य करील, विद्यादेवीच्या शुद्ध मक्काचें करणार नाहीं, असा अभिप्राय मनांत आणून आचार्यांनीं ब्राह्मणाचा उल्लेख केला ?

सिद्धांती—शाबास, होय ! असो; हे श्रेष्ठतर ब्राह्मण आसनस्थित झाल्यानंतर कांहीं उपदेश करूं लागतील, किंवा ब्रह्मचर्चा करतील, तेव्हां आपण चकार शब्द सुद्धां काढूं नेय; इतकेंच नव्हे पण सुसता श्वासोच्छ्वास देखील करूं नये, ते जो काय उपदेश करतील त्याचें रहस्य मात्र समजून घ्यावें. आचार्य आचार्य एकत्र होऊन ते महत्त्वाच्या विषयाची चर्चा करूं लागले, म्हणजे अतज्ज्ञांनीं मध्यें बोलूं नये, असा श्रुत्यभिप्राय होय.

सिद्धान्ती—तसेंच (१९) जे कांहीं द्यावयाचें असेल, तें श्रद्धापूर्वक दान करावें (२०) अश्रद्धापूर्वक केव्हांही करूं नये. दक्षणा देतांना (२१) वित्तशाठ्य करूं नये. पुष्कळ देण्याचें सामर्थ्य असतां थोडें देऊं नये. (२२) दान करितांना एकांत ठेवावा. (२३) भीति बाळगून दान द्यावें. (२४) विवेकपूर्वक सत्पात्रीं दान करावें, अथवा मित्रकार्य नेहमीं करीत असावें (२४) आतां, असें आचरण करीत असतां जर केव्हां तुला श्रौत किंवा स्मार्त-कर्मप्रसंगीं किंवा कांहीं गोष्टीच्या संबंधानें, वृत्तासंबंधानें, आचरण कसें करावें, व खरें खोटें काय मानावें, या-विषयीं शंका उत्पन्न झाली, तर त्या त्या देशामध्यें किंवा त्या त्या काळीं जे कोणीं वैदिक ब्राह्मण सत्कर्मनिष्ठ व बहुश्रुत असतील, विचार करण्यास समर्थ असतील, कर्मयुक्त किंवा ज्ञानयुक्त असतील, आयुक्त असतील, म्हणजे दुसऱ्याच्या सांगण्याप्रमाणें चालणारे नसतील, स्वतंत्र विचाराचे असतील, अलूक्ष म्हणजे दयाशील अंतःकरणाचे असतील, धर्मकाम म्हणजे पुण्येच्छु मात्र असतील, निरिच्छ असतील, ते असले ब्राह्मण जसे त्या कर्म-प्रसंगी वागत असतील किंवा सत्यासत्याचा निर्णय करतील, तसाच तूंही वागत जा. पण अभ्याख्यात म्हणजे दोषानें लिप्त झालेल्या पुरुषाशीं किंवा संशयित वर्तनाच्या पुरुषाशीं केव्हांही व्यवहार करूं नकोस. असल्या पुरुषाशीं आतांच सांगितलेले विचारी, विवेकी, कर्मनिष्ठ, धर्मनिष्ठ, दयाशील, ब्राह्मण जसे वागत असतील, तसाच तूंही वागत जा.

हा वर सांगितलेला सर्व विधि तूं पाळला पाहिजेस. हाच उपदेश पिता, गुरु इत्यादि आपल्या पुत्रशिष्य इत्यादिकांस करीत असतो. हेंच वेदोपनिषत् म्हणजे वेदरहस्य आहे. वेदाचा अर्थ हाच होय. हें अनुशासन आहे. म्हणजे हे ईश्वराचें त्रिकालाबाधित वचन आहे. सारांश, हा विधि आहे म्हणून व श्रुति, परमेश्वर आणि सर्व प्रामाणिक शिष्ट आम्हीं वर सांगितलेल्या मार्गानेंच चालतों, म्हणून तूंही या मार्गाची उपासना एकनिष्ठेनें करावीस. हेंच उपास्य आहे, हेंच उपासितव्य कर्तव्य आहे. दुसरा कोणताही आचरण ठरविणारा मार्ग उपास्य नाहीं. उपासितव्य आणि उपास्य हे दोन्ही शब्द अर्थतः एकच आहेत. पण आदर दाखविण्यासाठीं त्यांचा दोनदां उच्चार केला आहे. सारांश, हेंच उपास्य आहे, अनुपास्य नाहीं. म्हणून या उपास्याविषयीं व कर्तव्याविषयीं दक्ष असावें; तटस्थ किंवा उदासीन असूं नये ॥ १-४ ॥

अकरावा अनुवाक संपला.

शीक्षाध्याये द्वादशोऽनुवाकः ।

शं नो मित्रः शं वरुणः । शं नो भवत्वर्यमा । शं न इन्द्रो बृहस्पतिः । शं नो विष्णुरुरुक्रमः । नमो ब्रह्मणे । नमस्ते वायो । त्वमेव प्रत्यक्षं ब्रह्मासि । त्वामेव प्रत्यक्षं ब्रह्मावादिषम् । ऋतमवादिषम् । सत्यमवादिषम् । तन्मामावीत् । तद्वक्तारमावीत् । आवीन्माम् । आवीद्वक्तारम् । ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः (१) ।

सत्यमवादिषं पञ्च च ॥

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि शीक्षाध्याये द्वादशोऽनुवाकः ॥ १२ ॥

अतीतविद्याप्राप्त्युपसर्गशमनार्थं शान्तिं पठति-शं नो मित्र इति। व्याख्यातमेतत्पूर्वम् ।

सिद्धांती—आतां जो हा विद्याप्राप्तीचा मार्ग सांगितला, त्यामार्गांत विघ्न येऊं नये, आलें तर त्याचें उपशमन व्हावें, म्हणून हा शांतिपाठ सांगितला आहे. हा पाठाचा अर्थ पूर्वी झालाच आहे. तेथें शेवटीं 'अवतु=रक्षण करो' शब्दप्रयोग आहे; येथें

'आवीत्=मोक्षें रक्षण अपरब्रह्मानें केलें' असा प्रयोग आहे. हाच काय तो विशेष होय.

कर्म, विद्याकर्म, कर्मविद्या आणि विद्या यासंबंधानें चर्चा.

अत्रैतच्चिन्त्यते; विद्याकर्मणोर्विवेकार्थं किं कर्मभ्य एव केवलेभ्यः परं श्रेय उत विद्यासव्यपेक्षेभ्य आहोस्विद्विद्याकर्मभ्यां संहताभ्यां विद्याया वा कर्मापेक्षाया उत केवलाया एव विद्याया इति । तत्र केवलेभ्य एव कर्मभ्यः स्यात् । समस्तवेदार्थज्ञानवतः कर्माधिकारात् । "वेदः कृत्स्नोऽधिगन्तव्यः सरहस्यो द्विजन्मना" इति स्मरणात् । अधिगमश्च सहोपनिषदर्थेनाऽऽत्मज्ञानादिना । "विद्वान्यजते" "विद्वान्याजयति" इति च विदुष एव कर्मण्यधिकारः प्रदर्श्यते सर्वत्र । "ज्ञात्वा चानुष्ठानम्" इति च । कृत्स्नश्च वेदः कर्मार्थ इति हि मन्यन्ते केचित् । कर्मभ्यश्चेत्परं श्रेयो नावाप्यते वेदोऽनर्थकः स्यात् ।

न नित्यत्वान्मोक्षस्य । नित्यो हि मोक्ष इष्यते । कर्मकार्यस्यानित्यत्वं प्रसिद्धं लोके, कर्मभ्यश्चेच्छ्रेयोऽनित्यं स्यात्तच्चानिष्टम् । "तद्यथेह कर्मचितो लोकः क्षीयते" इति न्यायानुगृहीतश्रुतिविरोधात् । काम्यप्रतिषिद्धयोरनारम्भादारब्धस्य च कर्मण उपभोगेन क्षयान्नित्यानुष्ठानाच्च ज्ञाननिरपेक्ष एव मोक्ष इति चेत् । तच्च न । शेषकर्मसंभवात्तन्निमित्तशरीरान्तरोत्पत्तिः प्राप्नोतीति प्रत्युक्तम् । कर्मशेषस्य च नित्यानुष्ठानेनाविरोधात्क्षयानुपपत्तिरिति च । यदुक्तं समस्तवेदार्थज्ञानवतः कर्माधिकारादित्यादि । तच्च न । श्रुतज्ञानव्यतिरेकादुपासनस्य । श्रुतज्ञानमात्रेण हि कर्मण्यधिक्रियते नोपासनामपेक्षते । उपासनं च श्रुतज्ञानादर्थान्तरं विधीयते । मोक्षफलमर्थान्तरप्रसिद्धं च स्यात् । "श्रोतव्यः" इत्युक्त्वा तद्व्यतिरेकेण "मन्तव्यो निदिध्यासितव्यः" इति यत्नान्तरविधानान्मननानिदिध्यासनयोश्च प्रसिद्धं श्रवणज्ञानादर्थान्तरत्वम् ।

एवं तर्हि विद्यासव्यपेक्षेभ्यः कर्मभ्यः स्यान्मोक्षः । विद्यासहितानां च कर्मणां भवेत्कार्यान्तरारम्भसामर्थ्यम् । यथा स्वतो मरणज्वरादिकार्यारम्भसामर्थ्यानामपि विषदध्यादीनां मन्त्रशर्करादि-

संयुक्तानां कार्यान्तरारम्भसामर्थ्यम्, एवं विद्यासहितैः कर्मभिर्मोक्ष आरभ्यत इति चेत्। न। आरभ्यस्यानित्यत्वादित्युक्तो दोषः। वचनादारभ्योऽपि नित्य एवेति चेत्। न। ज्ञापकत्वाद्वचनस्य। वचनं नाम यथाभूतस्यार्थस्य ज्ञापकं विद्यमानस्य कर्तृ। न हि वचनशतेनापि नित्यमारभ्यत आरब्धं वाऽविनाशि भवेत्।

एतेन विद्याकर्मणोः संहतयोर्मोक्षारम्भकत्वं प्रत्युक्तम्। विद्याकर्मणी मोक्षप्रतिबन्धहेतुनिवर्तके इति चेत्। न। कर्मणः फलान्तरदर्शनात्। उत्पत्तिसंस्कारविकाराप्तयो हि फलं कर्मणो दृश्यते। उत्पत्त्यादिफलविपरीतश्च मोक्षः। गतिश्रुतेराप्य इति चेत्। सूर्यद्वारेण "तयोर्ध्वमायन्" इत्येवमादिगतिश्रुतिभ्यः प्राप्यो मोक्ष इति चेत्। न। सर्वगतत्वाद्वन्तृभिश्चानन्यत्वादाकाशादिकारणत्वात्सर्वगतं ब्रह्म। ब्रह्माव्यतिरिक्ताश्च सर्वे विज्ञानात्मानः। अतो नाऽऽप्यो मोक्षः। गन्तुरन्यद्विभिन्नं देशं प्रति भवति गन्तव्यम्। न हि येनैवाव्यतिरिक्तं यत्तत्तेनैव गम्यते तत्। अनन्यत्वप्रसिद्धेश्च, "तत्सृष्ट्वा तदेवानुप्राविशत्" "क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि" इत्येवमादिश्रुतिस्मृतिशतेभ्यः।

गत्यैश्वर्यादिश्रुतिविरोध इति चेत्। अथापि स्याद्यद्यप्राप्यो मोक्षस्तदा गतिश्रुतीनां "स एकधा" "स यदि पितृलोककामो भवति" "स्त्रीभिर्वा यानैर्वा" इत्यादिश्रुतीनां च कोपः स्यादिति चेत्। न। कार्यब्रह्मविषयत्वात्तासाम्। कार्ये हि ब्रह्मणि रूयादयः स्युर्न कारणे "एकमेवाद्वितीयं" यत्र नान्यत्पश्यति" "तत्केन कं पश्येत्" इत्यादिश्रुतिभ्यः। विरोधाच्च विद्याकर्मणोः समुच्चयानुपपत्तिः। प्रविलीनकर्त्रादिकारकविशेषतत्त्वविषया हि विद्या तद्विपरीतकारकसाध्येन कर्मणा विरुध्यते। न ह्येकं वस्तु परमार्थतः कर्त्रादिविशेषवत्तच्छून्यं चेत्युभयथा द्रष्टुं शक्यते। अवश्यं ह्यन्यतरन्मिथ्या स्यादन्यतरस्य च मिथ्यात्वप्रसङ्गे युक्तं यत्स्वाभाविकाज्ञानविषयस्य द्वैतस्य मिथ्यात्वम्, "यत्र हि द्वैतमिव भवति" मृत्योः स मृत्युमाप्नोति" "अथ यत्रान्यत्पश्यति तदल्पम्" "अन्योऽसावन्योऽहमस्मि" "उदरमन्तरं कुरुते" "अथ तस्य भयं भवति" इत्यादिश्रुतिशतेभ्यः। सत्यत्वं चैकत्वस्यैकधैवानुद्रष्टव्यम्। "एकमेवाद्वितीयम्" "ब्रह्मै-

वेद॰ सर्वम्" "आत्मैवेद॰ सर्वम्" इत्यादिश्रुतिभ्यः। न च संप्रदानादिकारकभेदादर्शने कर्मोपपद्यते। अन्यत्वदर्शनापवादश्च विद्याविषये सहस्रशः श्रूयते। अतो विरोधो विद्याकर्मणोः। अतश्च समुच्चयानुपपत्तिः।

तत्र यदुक्तं संहताभ्यां विद्याकर्मभ्यां मोक्ष इति। अनुपपन्नं तत्। विहितत्वात्कर्मणाम्। श्रुतिविरोध इति चेत्। यद्युपमृद्य कर्त्रादिकारकविशेषमात्मैकत्वविज्ञानं विधीयते। सर्पादिभ्रान्तिविज्ञानोपमर्दकरज्ज्वादिविषयविज्ञानवत्प्राप्तः कर्मविधिश्रुतीनां निर्विषयत्वाद्विरोधः। विहितानि च कर्माणि। स च विरोधो न युक्तः। प्रमाणत्वाच्छ्रुतीनामिति चेन्न पुरुषार्थोपदेशपरत्वाच्छ्रुतीनाम्।

विद्योपदेशपरा तावच्छ्रुतिः संसारात्पुरुषो मोक्षयितव्य इति संसारहेतोरविद्याया विद्यया निवृत्तिः कर्तव्येति विद्याप्रकाशकत्वेन प्रवृत्तेति न विरोधः। एवमपि कर्त्रादिकारकसद्भावप्रतिपादनपरं शास्त्रं विरुध्यत एवेति चेन्न। यथाप्राप्तमेव कारकास्तित्वमुपादायोपात्तदुरितक्षयार्थं कर्माणि विदधच्छास्त्रं मुमुक्षूणां फलार्थिनां च फलसाधनं न कारकास्तित्वे व्याप्रियते। उपचितदुरितप्रतिबन्धस्य हि विद्योत्पत्तिर्नावकल्पते। तत्क्षये च विद्योत्पत्तिः स्यात्ततश्चाविद्यानिवृत्तिस्तत आत्यन्तिकः संसारोपरमः।

अपि चानात्मदर्शिनो ह्यनात्मविषयः कामः। कामयमानश्च करोति कर्माणि। ततस्तत्फलोपभोगाय शरीराद्युपादानलक्षणः संसारः। तद्व्यतिरेकेणाऽऽत्मैकत्वदर्शिनो विषयाभावात्कामानुत्पत्तिरात्मनि चानन्यत्वात्कामानुत्पत्तौ स्वात्मन्यवस्थानं मोक्ष इत्यतोऽपि विद्याकर्मणोर्विरोधः।

विरोधादेव च विद्या मोक्षं प्रति न कर्माण्यपेक्षते। स्वात्मलाभे तु पूर्वोपचितप्रतिबन्धापनयद्वारेण विद्याहेतुत्वं प्रतिपद्यन्ते कर्माणि नित्यानीति। अत एवास्मिन्प्रकरण उपन्यस्तानि कर्माणीत्यवोचाम। एवं चाविरोधः कर्मविधिश्रुतीनाम्। अतः केवलाया एव विद्यायाः परं श्रेय इति सिद्धम्।

एवं तर्ह्याश्रमान्तरानुपपत्तिः । कर्मनिमित्तत्वाद्विद्योत्पत्तेः । गार्हस्थ्ये च विहितानि कर्माणीत्यैकाश्रम्यमेव । अतश्च यावज्जीवादिश्रुतयोऽनुकूलतराः । न । कर्मानेकत्वात् । न ह्यग्निहोत्रादीन्येव कर्माणि । ब्रह्मचर्यं तपः सत्यवदनं शमो दमोऽहिंसेत्येवमादीन्यपि कर्माणीतराश्रमप्रसिद्धानि विद्योत्पत्तौ साधकतमान्यसंकीर्णत्वाद्विद्यन्ते ध्यानधारणादिलक्षणानि च । वक्ष्यति च—" तपसा ब्रह्म विजिज्ञासस्व " इति । जन्मान्तरकृतकर्मभ्यश्च प्रागपि गार्हस्थ्याद्विद्योत्पत्तिसंभवात्कर्मार्थत्वाच्च गार्हस्थ्यप्रतिपत्तेः कर्मसाध्यायां च विद्यायां सत्यां गार्हस्थ्यप्रतिपत्तिरनर्थिकैव । लोकार्थत्वाच्च पुत्रादीनाम् पुत्रादिसाध्येभ्यश्चायं लोकः पितृलोको देवलोक इत्येतेभ्यो व्यावृत्तकामस्य नित्यसिद्धात्मलोकदर्शिनः कर्मणि प्रयोजनमपश्यतः कथं प्रवृत्तिरुपपद्यते । प्रतिपन्नगार्हस्थ्यस्यापि विद्योत्पत्तौ विद्यापरिपाकाद्विरक्तस्य कर्मसु प्रयोजनमपश्यतः कर्मभ्यो निवृत्तिरेव स्यात् । प्रव्रजिष्यन्वा अरेऽहमस्मात्स्थानादस्मि " इत्येवमादिश्रुतिलिङ्गदर्शनात् । कर्म प्रति श्रुतेर्यत्नाधिक्यदर्शनादयुक्तमिति चेदग्निहोत्रादिकर्म प्रति श्रुतेरधिको यत्नो महांश्च कर्मण्यायासोऽनेकसाधनसाध्यत्वादग्निहोत्रादीनाम् । तपोब्रह्मचर्यादीनां चेतराश्रमकर्मणां गार्हस्थ्येऽपि समानत्वादल्पसाधनापेक्षत्वाच्चेतरेषां न युक्तस्तुल्यवद्विकल्प आश्रमिभिस्तस्येति चेन्न । जन्मान्तरकृताग्रहात् ।

यदुक्तं कर्मणि श्रुतेरधिको यत्न इत्यादि । नासौ दोषः । यतो जन्मान्तरकृतमप्यग्निहोत्रादिलक्षणं कर्म ब्रह्मचर्यादिलक्षणं चानुग्राहकं भवति विद्योत्पत्तिं प्रति । येन जन्मनैव विरक्ता दृश्यन्ते केचित् । केचित्तु कर्मसु प्रवृत्ता अविरक्ता विद्याविद्वेषिणः । तस्माज्जन्मान्तरकृतसंस्कारेभ्यो विरक्तानामाश्रमान्तरप्रतिपत्तिरेवेष्यते कर्मफलबाहुल्याच्च पुनः स्वर्गब्रह्मवर्चसादिलक्षणस्य कर्मफलस्यासंख्येयत्वात् । तत्प्रति च पुरुषाणां कामबाहुल्यदर्शनादर्थः श्रुतेरधिको यत्नः कर्मसूपपद्यते । आशिषां बाहुल्यदर्शनादिदं मे स्यादिदं मे स्यादित्युपायत्वाच्च । उपायभूतानि हि कर्माणि विद्यां प्रतीत्यवोचाम । उपायेऽधिको यत्नः कर्तव्यो नोपेये ।

कर्मनिमित्तत्वाद्विद्याया यत्नान्तरानर्थक्यमिति चेत्कर्मभ्य एव पूर्वोपचितदुरितप्रबन्धक्षयादेव विद्योत्पद्यते चेत्कर्मभ्यः पृथगुपनिषच्छ्रवणादियत्नोऽनर्थक इति चेत्। न। नियमाभावात्। न हि प्रतिबन्धक्षयादेव विद्योत्पद्यते न त्वीश्वरप्रसादतपोध्यानाद्यनुष्ठानादिति नियमोऽस्ति। अहिंसाब्रह्मचर्यादीनां च विद्यां प्रत्युपकारकत्वात्साक्षादेव च कारणत्वाच्छ्रवणमननिदिध्यासनानाम्। अतः सिद्धान्याश्रमान्तराणि। सर्वेषां चाधिकारो विद्यायां परं च श्रेयः केवलाया विद्याया एवेति सिद्धम्॥

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यगोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यश्रीमच्छंकरभगवतः कृतौ तैत्तिरीयोपनिषच्छीक्षाध्यायभाष्ये द्वादशोऽनुवाकः॥ १२॥

पूर्व०—हें सर्व तुमचें म्हणणें तुमच्या मताप्रमाणें ठीकच आहे. पण मला कांहीं शंका आहेत. त्यांचें समाधान करा व मग पुढें चला.

शिष्य—सांगातर तुमच्या शंका।

पूर्व०—ऐका. श्रुतीनें कोठें कर्माचा व कोठें विद्येचा मोक्षसाधन म्हणून निर्देश केला आहे. तेव्हां (१) केवळ एकट्या कर्मानें परमश्रेयाची प्राप्ति होते? किंवा (२) विद्येच्या साह्यानें जीं कर्में होतात, त्यामुळें होते? अथवा (३) विद्याकर्माचा समुच्चय होऊन होते! वा (४) कर्माची अपेक्षा करणाऱ्या विद्येनें होते? किंवा (५) शुद्ध विद्येनें मात्र होते? या प्रश्नपंचकाचा निकाल करून पुढील मार्ग आक्रमावा, हें बरें. आतां, प्रथमतः मला वाटतें कीं, केवळ कर्म हेंच मोक्ष देण्याला समर्थ आहे. कारण, समस्त वेदाचा अर्थ जाणणाऱ्याला कर्म करण्याचा अधिकार आहे. आणि वेदांत तर कर्म करण्याव्यतिरिक्त दुसरा उपदेश नाहीं. शिवाय, 'द्विजांनीं सकल वेदोराशीचें अध्ययन (अधिगम) सरहस्य करावें' अशी स्मृतिही आहे, अधिगमांतच आत्मज्ञानादि उपनिषदांच्या अर्थासह वेदाध्ययनाचा अंतर्भाव होतो. आणखी, 'विद्वान् यज्ञ करितो', 'विद्वान् यज्ञ करवितो' 'याजन करितो' इत्यादि श्रुती सर्वत्र विद्वानाला मात्र कर्म करण्याचा अधिकार आहे, असें एककंठानें सांगतात, 'अर्थज्ञान करून घेऊन मग अनुष्ठान करावें, असेंही वाक्य प्रमाण आहे. आतांच मी म्हटल्याप्रमाणें सकल वेद कर्मप्रीत्यर्थ आहे असें **अनेक विद्वानांचें मत आहे**. आणखी, आत्मज्ञान हें कर्म करणाऱ्यावर जे संस्कार होतात त्याचें फल आहे. म्हणजे तें कर्मशेष आहे. असो; कर्मानें जर परमश्रेयाची प्राप्ति होणार नाहीं, तर 'सर्व वेद अनर्थक, प्रयोगशून्य होईल. बोला, यावर तुमचें काय म्हणणें आहे तें!

सिद्धान्ती—विद्या व कर्म यांचीं फलें भिन्न भिन्न कशीं असतात, याचा विवेक तुमच्या या शंकांनीं सहजच होणार आहे. असो; कर्मानें मोक्षप्राप्ति होणें शक्य नाहीं; कारण मोक्ष नित्य आहे, हा सिद्धांत सर्व वाद्यांस संमत आहे. कर्म केल्यानंतर तो उत्पन्न होतो, असें नाहीं. 'मोक्ष नित्य आहे' असा तर सर्व वेदांताचा डांगोरा आहे. मोक्षाचें नित्यत्व गृहीत करूनच तर वेदवेदांताची प्रवृत्ति होत असते. पण कर्मापासून होणारें कार्य अनित्य असतें, हें व्यवहारांत सुद्धां प्रसिद्ध आहे. तेव्हां कर्मापासून जर श्रेयाची (मोक्षाची) उत्पत्ति होत आहे,असें समजलें, तर तें फल, मोक्ष अनित्य होईल. पण हें अनित्य होणें अनिष्ट आहे. 'ज्याप्रमाणें अपारमार्थिक म्हणजे कर्मानें उत्पन्न केलेला व्यवहार क्षीण होतो, नष्ट होतो,' इत्यादि श्रुतीचें न्यायघटित सांगणें, हें तुमच्या कल्पनेला विरोधि आहे. सारांश, नित्य मोक्षाची उत्पत्ति अनित्य कर्मानें होणें अशक्य आहे.

पू०—माझें म्हणणें असें आहे. काम्य कर्में व श्रुतीनें निषिद्ध ठरविलेलीं कर्में केलींच नाहींत, तर काम्यकर्मानें उत्पन्न होणारें विषायमिळापी शरीर व निषिद्धकर्मानें उत्पन्न होणारें देहात्मक दुःखद उपभोग निर्माणच व्हावयाचें नाहींत. बरें; पूर्वसंचितांतील प्रारब्धकर्मानें उत्पन्न झालेल्या या देहांत असणाऱ्या देहीचे विषयोपभोगानें पूर्वसंचित संपतें, आणि नित्यकर्मांचें मात्र अनुष्ठान केलें, म्हणजे पुढें प्राप्त होणारे प्रत्यवायही आडवे येत नाहींत. याप्रमाणें, आत्मज्ञानाशिवायच नैष्कर्म्यसिद्धि होते, नित्यमोक्ष मिळतो ! तेव्हां काम्यनिषिद्धांचा परित्याग व नित्य कर्मांचें अनुष्ठान हीं केलीं म्हणजे अज्ञानी मनुष्याला सुद्धां नित्य कर्मानुष्ठानानें मोक्ष मिळतो. शरीरोत्पादक कारणांच्या नष्टते-बरोबर मोक्षच ठेवलेला !

सिद्धान्ती—पुनः पुनः तीच तीच शंका कां घेतां ? प्रारब्धाशिवाय प्रत्येकाच्या पूर्वसंचितांत आणखी पुष्कळ प्रकारचें अफलोन्मुख कर्म असतें. तें फलोन्मुख झालें म्हणजे शरीरप्राप्ति होणारच ! हें जें आम्ही पूर्वी सांगितलें, तें विसरलांत वाटतें ? शिवाय, या अवशिष्ट राहिलेल्या कर्मांचा (पूर्वसंचितांतील प्रारब्धव्यतिरिक्त असलेल्या कर्मांचा) व नित्यकर्मांचा असा विरोधही नाहीं कीं, जेणेंकरून नित्यकर्मांचें अनुष्ठान होंच तें अवशिष्ट पूर्वसंचित कर्म नष्ट करील.

पूर्व०—पण समस्तवेदाचा अर्थ शुद्ध कर्मपर आहे, असें जाणणाराच मुळीं कर्माला अधिकारी आहे. गुरुगृहीं समस्त कर्मपर वेद शिकून तयार झालेला पुरुष कर्माला मात्र अधिकारी आहे. वेदोक्त असें दुसरें कांहीं नाहींच.

सिद्धान्ती—असें कसें ? गुरुकुलीं वेदाध्ययन करून कर्मापुरता मात्र वेदवाक्यांचा विचार केलेल्या पुरुषाला प्राप्त झालेल्या कर्मोपयोगी ज्ञानानें काय तो कर्म करण्याचा अधिकार मिळतो. पण समस्त वेद म्हणजे कर्मकथा नव्हे. तेथें दुसऱ्या अनेक

वस्तू आहेत. म्हणून हें कर्मोपयोगी ज्ञान उपासनेला (ब्रह्मसाक्षात्कार हें फल जिचें आहे, त्या उपासनेला) तो अधिकारी होत नाहीं. श्रुत ज्ञानाहून उपासना निराळी आहे. केवळ श्रुतज्ञान कर्म विहित करितें, तर उपासना निराळीच वस्तु प्राप्त होईल, असें विधान करिते. ही निराळी वस्तु म्हणजे मोक्ष होय. अर्थात् हा मोक्ष म्हणजे हिरण्यगर्भाची प्राप्ति, हें सर्वप्रसिद्धच आहे. या प्रसिद्ध मोक्षासाठीं विधानही निराळें आहे. श्रुतीनें " हा आत्मा श्रोतव्य आहे." असें सांगून व पुढें तो " मन्तव्य आणि निदिध्यासितव्य आहे " असें सांगून मनन आणि निदिध्यास हे दोन निराळेच विधि उपासनेप्रीत्यर्थ विहित केले. शिवाय, तुम्हाला हें सांगावयास नकोच आहे कीं, ' श्रवण ' हें मनन आणि निदिध्यास याहून अत्यंत भिन्न आहे.

पूर्व०—एवंच, तुमचें म्हणणें विद्या म्हणजे उपासना शिकून तयार झालेल्या अधिकाऱ्यानें कर्म केलें, उपासनेसहित कर्म केलें म्हणजे त्याला मोक्ष मिळतो. ठीक आहे. उपासनेसहित झालेल्या कर्माचें फल जर मोक्षाची उत्पत्ति करीत असेल, तर तीही आम्हांस इष्टच आहे. नुसत्या कर्मानें मोक्ष उत्पन्न होत नाहीं, न होऊं द्या. कर्मांत असणाऱ्या उपासनेसह असणाऱ्या कर्मानें मोक्षारंभ होऊंद्या. अहो ! विष व दहीं, यांस जीवनाश करण्याचें आणि ज्वरादि रोग उत्पन्न करण्याचेंच काय तें अनुक्रमें सामर्थ्य असतें. त्याचप्रमाणें कर्माला जन्मात्मक संसार उत्पन्न करण्याचें तेवढें सामर्थ्य असेल. पण विषावर मंत्र घातला किंवा दह्यांत साखर मिसळली म्हणजे जसें इष्ट कार्य होतें, अनिष्ट होत नाहीं, त्याप्रमाणें जन्मात्मक कर्माला जर उपासनेची जोड दिली, तर हें विद्यान्वित कर्म मोक्षालाही आरंभ करूं शकेल. सारांश, विद्यासहित कर्मानें मोक्ष मिळालाच पाहिजे, मोक्षाला आरंभ झालाच पाहिजे.

सिद्धांती—काय म्हणावें तुमच्यापुढें आतां ! अहो ! आरंभ झालेली गोष्ट विनाशी असते, अनित्य असते, असा कंठशोष श्रुतीनें व आचार्यांनीं हजारों वेळ केला आहेना ! मोक्ष नित्य आहे, हा सिद्धांत आहे. म्हणून त्याला केव्हांही आरंभ होत नाहीं. कर्मफलाचा तर जन्म किंवा आरंभ होतो, म्हणून मोक्ष केव्हांही कर्मफळ होणार नाहीं.

पूर्व०—' मग तो–उपासनाकर्मकर्ता–कधीं परत येत नाहीं, त्याचें जन्ममरण संपतें ' असें श्रुतिवचन आहे, तें खोटेंच वाटतें !

सिद्धान्ती—अहो महाराज ! या वचनाचा अधिकार किती, याचा विचार करा. वस्तु असेल, तसें तिचें ज्ञान करून देणें, हें वचनाचें कार्य आहे. असलेल्या वस्तूचें तें ज्ञान करून देईल. पण त्याला काय नसलेली वस्तु उत्पन्न करण्याचें सामर्थ्य आहे म्हणतां ? अहो ! हेंच नव्हे; पण तुम्ही असलीं शेकडों वचनें आणिलींत, म्हणून काय तीं नित्य असणाऱ्या वस्तूला जन्म देतील किंवा जन्मलेली वस्तु अविनाशी करतील ? छेः ! छेः असें कालत्रयीं घडणार नाहीं.

पूर्व०—एकूण श्रुतिवचन खोटेंच म्हणतां ?

सिद्धान्ती—असें कोण म्हणेल ? श्रुतिवचनांचा अर्थ नीट करा, ज्या योग्य पदार्थाला हें वचन लावणें श्रुतीला इष्ट आहे, तिकडे लावा, श्रुतिवचन खरेंच ठरेल. भलताच अर्थ करून श्रुतीला खोटें पाडण्याचा कशाला व्यर्थ श्रम करितां ! असो; याप्रमाणें निवळ कर्मानें किंवा विद्यान्वित कर्मानें मोक्ष उत्पन्न होत नाहीं, हें ठरलें.

पूर्व०—राहिलें ! पण विद्याकर्मांच्यामुळें मोक्षाला प्रतिबंध करणारीं जीं कारणें आहेत, त्यांचा निरास होतो, हें तरी तुम्हाला कबूल आहे ?

सिद्धान्ती—कसें व्हावें ? कर्माचें फल नित्यमोक्षविलक्षण असतें, हें स्पष्ट आहे. त्याचें फल दुसरेंच असतें.

शिष्य—तें कसें ?

सिद्धांती—अरे ! कर्माचें फल म्हणजे कशाची तरी उत्पत्ति, कशाला तरी विकार; किंवा संस्कार किंवा एखाद्या वस्तूची प्राप्ति, यांपैकीं एका स्वरूपाचें असतें, हा नित्याचा, रोजचा, अनुभव आहे. पण मोक्ष उत्पन्न होत नाहीं, विकृत होत नाहीं, संस्कृत होत नाहीं, किंवा दुसरीकडून येऊन मिळत नाहीं, म्हणजे त्याला गतिही नाहीं. म्हणून मोक्ष हें कर्मफल नव्हें.

पूर्व०—आतां मात्र शर्थ झाली. 'सूर्यद्वारानें' 'त्या उभयतांमधून वर जाऊन' इत्यादि अनेक गतिश्रुती तुमच्या म्हणण्याचा विरोध करीत आहेतना ?

सिद्धान्ती—नांव सुद्धां घेऊं नका. आमचा मोक्ष म्हणजे ब्रह्म सर्वव्यापी आहे, फार काय सांगावें ? जो 'मोक्षगामी आत्मा' म्हणून आपण म्हणतों, त्याहून तें ब्रह्म निराळें नाहींच आहे। सर्वव्यापी आकाशादिकांचें ही कारण असणारें ब्रह्म सर्वव्यापीच असलें पाहिजे. तसेंच, जो कोणी विज्ञानात्मा आहे, जो कोणी ब्रह्मज्ञ आहे, तो ब्रह्माहून निराळाही नसतो. आपणास ज्ञानविज्ञान नसतें, म्हणून आपण ब्रह्मव्यतिरिक्त आहों, असें अज्ञानानें वाटतें मात्र. बाकीं प्रत्येक वस्तूच्या अंतर्यामी ब्रह्मच आहे. म्हणून विद्वानाला मोक्ष 'मिळतो' असें म्हणणें अशुद्धच होय. गंतव्य म्हणजे जाण्याचें ठिकाण जाणाऱ्याहून निराळें व निराळे ठिकाणीं असणारें हवें. पण जी वस्तु आपणच आहों, जी वस्तु व आपण भिन्न नाहीं, तिच्याकडे **उठून जाण्याचें**, ती **प्राप्त** करून घेण्याचें कारण काय ? आणि असें वेड्याशिवाय करील तरी कोण ? मोक्षाकरितां जावें-करावें लागत नाहीं.

शिष्य—ब्रह्मच हें सर्व आहे, तें सर्वानन्य आहें, 'तें आपण उत्पन्न करून त्यांतच आपण शिरता झालों' यावरून सिद्ध झालेंच आहे.

सिद्धांती–अरे! हेंचसें श्रुतिवाक्य काय? आणखी किती तरी सांगतां येतील. 'सर्वक्षेत्रांचा-शरीरांचा-मी क्षेत्रज्ञ-ज्ञाता-आहे' असें भगवंतांनींसुद्धां सांगितलें नाहीं काय? हें सर्व ब्रह्म आहे, असें एककंठानें सर्व श्रुतिस्मृती सांगतात.

पूर्व०—अंमळ जपून बोला. ब्रह्माचें जाणेंयेणें व त्याचें ईश्वरत्व सांगणाऱ्या किती एक श्रुती उल्लेखितां येतील! आणि जर मोक्ष 'अप्राप्य'च असेल, नित्य सिद्ध असेल, तर 'तो एकस्वरूपाचा असून अनेकस्वरूपाचा होतो' 'त्याला जर पितृलोकांत जाण्याची इच्छा झाली' 'स्त्रियांसह व वाहनांसह' इत्यादि कित्येक वाक्यांचा प्रकोप होईल, नव्हे, त्यांस हरताळ लावावी लागेल! ब्रह्म जातें, येतें व ऐश्वर्यही भोगितें, असें आम्ही उद्धरलेल्या वाक्यांवरून स्पष्ट आहे.

सिद्धान्ती—श्रुतींचें अवतरण करितांना त्या कोठील आहेत, किंविषयक आहेत, हें तरी पहात जा. या तुमच्या प्रयत्नांवरून तुमची भक्ति प्रगट होते पण ती अंध आहे, असें कष्टानें म्हणावें लागतें. तुम्ही उद्धरिलेल्या श्रुती कार्यब्रह्मसंबंधाच्या आहेत, सगुणब्रह्म, विराट्ब्रह्म, व्यष्टिब्रह्म, हे त्यांचे विषय आहेत समजलें? कार्य-ब्रह्माला–व्यवहारांत प्रकट झालेल्या ब्रह्माला गति, ऐश्वर्य, इत्यादि असतील व असतात, नाहीं कोण म्हणतो? पण कारण ब्रह्माला मात्र गति नाहीं वा संस्कारविकार नाहीं. 'तें एकच अद्वितीय आहे' 'जेथें दुसरें असें दर्शन किंवा दृश्य किंवा दृष्टा नाहीं' 'ब्रह्मांत कोणी पाहावें? व काय पाहावें?' इत्यादि श्रुती गतीचा, ऐश्वर्याचा किंवा संस्कारविकाराचा व उत्पत्तीचा ठाम निषेध करितात. निर्गुण ब्रह्म सर्वथा निर्विकार असून एकच आहे. सगुणाची उपासनेनें प्राप्ति होईल. निर्गुण **प्राप्य** नाहीं.

पूर्व०–पण विद्या म्हणजे तुमच्या मतानुसार 'ब्रह्मात्मैक्यज्ञान' असें आम्ही म्हणतों आणि विद्या व कर्म यांचा समुच्चय करावा, असें म्हणतों.

सिद्धान्ती—सर्वथा अशक्य! द्वैत सोडून केवल अद्वैताचा जर तुम्हांस आश्रय करावयाचा असेल, तर एक तत्त्व ध्यानांत ठेवा. आत्मज्ञानाच्या विरोधें कर्ता, कर्म, करण, इत्यादि सर्व द्वैतात्मक वस्तू–कार्यंच हीं सगळीं!–अगदीं नष्टविनष्ट झालेल्या असतात; पण कर्मामध्यें कर्ता, कर्म, करण इत्यादि साधनांची अत्यंत आवश्यकता असते. हीं असतील तरच कर्म होईल. म्हणून द्वितीयशून्य वस्तु आणि सद्वितीय वस्तु यांत नेहमीं विरोध असलाच पाहिजे.

पूर्व०–कां? विश्रांति घेणारा पुरुष काम करूं लागला तर तो कांहीं निराळा होत नाहीं!

सिद्धांती—तें खरें. पण परमार्थतः कर्ता, कर्म असणारी वस्तु त्याचवेळीं कर्ता-कर्मशून्य आहे, अशी कशी दिसेल? निर्गुण ब्रह्म तर नित्य कारकशून्य आहे.तेव्हां नित्य सकारकाशीं त्याचें तादात्म्य कसें होईल? होणार नाहीं. आतां श्रुतिसिद्धांत तर हा

आहे कीं, 'एकच वस्तु आहे' ब्रह्म व व्यवहार, विद्या आणि कर्म, यामध्यें तर अत्यंत विरोध आहे. तेव्हां या दोहोंपैकीं एक वस्तु सत्य आणि एक मिथ्या असली पाहिजे.

पूर्व०—मग तुमचें निर्गुण ब्रह्मच मिथ्या! तें दिसतसुद्धां नाहीं.

सिद्धान्ती—पण श्रुतिवचनांच्या संबंधानें आपण विचार करीत आहों, त्यावर श्रद्धा असेल तर सर्व श्रुती असें म्हणतात कीं तेथें अज्ञानाचा गंधही नाहीं. तेव्हां स्वाभाविक अज्ञानानें किंवा अविद्येनें उत्पन्न होणारें जें द्वैत तें मिथ्या आहे, असेंच म्हटलें पाहिजे. श्रुतीही असेंच म्हणतात; 'जेथें द्वैत नसतां द्वैताभास होतो' 'तो द्वैती जन्ममरणाच्या अविच्छिन्न चक्रांत सांपडतो' 'जेथें दुसरें आहे, असें दुष्ट भान होतें तें अल्प होय' 'मी निराळा व परमात्मा निराळा' 'इवलेंसें जर भेदज्ञान असलें, तर त्याला भय-प्राप्ति होते' इत्यादि श्रुती तारस्वरानें द्वैताचें मिथ्यात्वच वर्णितात. अद्वैताचें सत्यत्वही त्या वर्णितात. पहाः 'एकस्वरूपानें मात्र ब्रह्मज्ञान करून घ्यावें' 'हें सर्व ब्रह्म आहे' 'हें सर्व आत्मा मात्र आहे' इत्यादि श्रुती अद्वैताचें सत्यत्व सांगत आहेत. सारांश, कर्ता, कर्म, संप्रदानादि कारक नसतील, द्वैत नसेल तर कर्मांची उपपत्तिच होत नाहीं. ब्रह्मज्ञानांत द्वैतदर्शनाचा अभाव सहस्र वेळां सांगितला आहे. म्हणून विद्याकर्मांत विरोध आहे. अर्थात् विद्या व कर्म यांचा समुच्चय होणें शक्य नाहीं.

पूर्व०—हें तुमचें म्हणणें मुळींच योग्य नाहीं. विद्याकर्मांचा समुच्चय होणें किंवा या द्वारानें मोक्ष मिळणें हें उपपन्न नाहीं' असें तुमचें म्हणणें अयुक्त आणि श्रुतिविरुद्ध आहे. कारण श्रुतीनें कर्म तर विहित केलें आहे.

शिष्य—म्हणजे काय?

पूर्व०—अहो! सर्पादिकांची भ्रांति उत्पन्न करणारें रज्जुविषयक अज्ञाननिरसन करण्यासाठीं रज्जुज्ञान करून घ्यावें, हा जसा विधि सांगणारा उपदेश असतो, त्याप्रमाणें कर्ता, कर्म इत्यादि कारकविशेष नष्ट करून आत्मज्ञानविज्ञान करून घ्यावें,' असा विधिपर उपदेश श्रुति करिते आणि 'आत्मा ऐकावा, त्याचें मनन करावें,' असें कर्महीं करावयास सांगते. आतां, तुमच्या म्हणण्याप्रमाणें कर्मादि विशेषच नसतील तर साध्यसाधन प्रतिपादक श्रुतीला सांगण्याचा विषयच राहत नाहीं. तात्पर्य, कर्मश्रुति निर्विषय होते. हाच विरोध होय. पण श्रुतीनेंच श्रोतव्य, मन्तव्यादि कर्म सांगितलें आहे; आणि हें सांगणें प्रमाण आहे, हें तुम्हांसही नाकबूल करितां यावयाचें नाहीं. तात्पर्य, असला विरोध योग्य नाहीं. म्हणून विद्या व कर्म यांचा समुच्चय न्यायसिद्ध आहे, असें आम्हीं म्हणतों. आत्मज्ञान ही विद्या व श्रोतव्य हें कर्म; तेव्हां विरोध नाहीं. आहेच म्हणाल तर वचनांची व्यवस्था लावा.

सिद्धान्ती—असें ह्मणून कसें चालेल? श्रुतींचा अवतार पुरुषार्थाचा उपदेश करण्यासाठीं मात्र आहे. विद्येनें पुरुषार्थ सिद्धि होतें. ह्मणून श्रुती विद्येचा उपदेश करितात.—

शिष्य०—ह्मणजे श्रुतींची प्रवृत्ति संसारापासून जीवाचें विमोचन करावयाचें एतदर्थ आहे. संसाराची उत्पत्ति अविद्येपासून होते. अविद्येचा नाश करण्याला एक आत्मविद्या मात्र समर्थ आहे. तेव्हां विद्येच्या द्वारें अविद्येची निवृत्ति करा आणि संसारापासून मुक्त व्हा, असा उपदेश सांसारिकांस (पण मुक्त होण्याची इच्छा असणाऱ्या सांसारिकांस) श्रुति करिते. होयना?

सिद्धान्ती—तात्पर्य, श्रुति विद्याप्रकाशक आहे. या प्रकाशनसामर्थ्यानें ती उपदेश करिते. येथें मुमुक्षू व त्यांचें अज्ञान हा विषय आहेच. म्हणून पूर्वपक्षांनें विषयाभावाचा जो विरोध उपन्न केला होता, तो नष्टच होतो. सारांश, तिची प्रवृत्ति कर्म सांगण्याची नाहीं. आत्मज्ञानाचा प्रकाश पाडिला कीं, मुमुक्षूस विद्याप्राप्तीची आवड उपन्न होते व तो आत्मदर्शक कर्म ह्मणजे मननादि करूं लागतो. येथें विषयात्मक फल उत्पन्न करणारें कर्म करण्यास श्रुति सांगत नाहीं, तर तसल्या कर्मांपासून निवृत्त व्हा, असें सांगते.

पूर्व०—तरी काय झालें? कर्ता, कर्म इत्यादि कारक वस्तू आहेत, असें सांगणाऱ्या या विद्याप्रकाशक श्रुतींशीं तुमच्या ह्मणण्याचा विरोध आहेच ना?

सिद्धांती—नाहीं, नाहीं. जीवांच्या अज्ञानानें प्राप्त झालेलें जें कारकांचें अस्तित्व, तें कांहीं वेळ मात्र गृहीत करून आपलें शास्त्र पूर्वसंचित पापांच्या क्षयासाठीं मुमुक्षूंना निष्काम कर्म करावयास सांगतें व सांसारिकांस फल देणारें कर्म करावयास सांगतें. कारक आहे कीं नाहीं, याचा विचार शास्त्र करीतच नाहीं. मोक्ष हवा असेल, तर निष्काम कर्म करा, स्वर्ग हवा असेल, तर सकाम ज्योतिष्टोम करा, हेंच शास्त्र सांगणार. जीव मोक्षार्थी कीं संसारार्थी आहे, हें शास्त्र ठरवीत नाहीं. सारांश, **कर्ताकर्मादि आहेत**, हें सांगणें शास्त्राचें कामच नाहीं. ते असतील व त्यांस इच्छा असेल, तर त्यांनीं अमुक करावें, इतकेंच सांगणें शास्त्राचें काम आहे. अज्ञानी लोक कारकत्व गृहीत करितात. तेंच अज्ञानरूप कारकत्व घेऊन तत्क्षयार्थ निष्कामकर्म किंवा उपासना श्रुति सांगते. मोक्षाकरितां कर्म सांगत नाहीं.

शिष्य—पण नित्यकर्म केलें नाहीं, तर पूर्वपापें तशींच राहतात. यामुळें मोक्ष, प्रतिबंधक पापें विनष्ट झाल्या विना विद्याप्राप्ति व्हावयाचीच नाहीं, असें ठरतें.

सिद्धान्ती—होय. तथापि नित्यकर्माच्या अनुष्ठानानें मोक्षप्रतिरोधी पूर्व संचित संपलें ह्मणजे विद्या प्रकाशित होते. विद्याप्रकाशानें अविद्या विनष्ट होते; आणि तिच्या बरोबरच तिचें बालक जो अविद्याजन्य व अविद्योपजीवी संसार, तो संपतो.

शिष्य—एवंच 'नित्यकर्मांचे अनुष्ठानानें मोक्षविरोधि पूर्वसंचित संपतें व आत्मश्रवण करावें, तन्मनन करावें' इत्यादिकांचा उपदेश विद्येच्या प्रकाशासह होतो. तात्पर्य हें कर्म नव्हे आणि विद्याकर्मांचा संगमही नव्हे.

सिद्धान्ती—पण अनात्मदर्शी जो जीव आहे, त्याची इच्छा ही अनात्मक असते. या विषयलालसेनें तो कर्म करितो आणि त्या कर्मांचें फल भोगण्यासाठीं त्याला शरीरादि संघातस्वरूपी संसार उत्पन्न होतो. हेंच संसाराचें आवर्ती चक्र होय. आतां, विषयविलक्षण जो आत्मा, त्याचे मात्र दर्शनाची इच्छा तीव्र झालेल्या जीवाच्या विषयावर शून्य पडल्यामुळें विषय-काम जन्मालाच येत नाहीं. त्याची जाणीव आत्मस्वरूपाशीं तादात्म्य पावलेली असते. येथें अविद्याजन्म कामादिकांचा गंधही नसतो. हें झालें म्हणजे 'निजरूपीं रंगूनि राहे, आत्मपदीं मन स्थीर' असें होतें. हाच मोक्ष होय. या विवेचनावरून तुम्हांला समजेल की, आत्मैकविषयात्मक सत्यरूपी विद्या आणि असत्यरूपी अनात्मविषयक कर्म यांचा नित्य अत्यंत विरोध असलाच पाहिजे.

शिष्य—यावरून हेंही उघड आहे कीं, ह्या विरोधामुळें मोक्षमार्गदर्शक विद्येला कर्मांची मुळींच अपेक्षा असत नाहीं.

सिद्धान्ती—तरी पण या नित्यकर्मांस परंपरेनें मात्र विद्याहेतुत्व प्राप्त होतें. घाबरूं नकोस. वायु जसा कृष्णमेघांस दूर सारून सूर्यप्रकाशाचें निमित्त होतो, तद्वत् पूर्वसंचिताचें आत्मज्ञानप्रतिबंधक आवरण (आच्छादन, अवगुंठन) विनष्ट करून टाकण्याचें हीं नित्यकर्में एक निमित्तकारण आहे. इतकाच कार्यभाग नित्यकर्मांकडे आहे; आणि हें असें आहे म्हणून नित्यकर्माचा अवतार या प्रकरणांत केला आहे.

शिष्य—हें आपण प्रथमच सांगितलें आहे, भगवन्! आणि आपण जें आतां सविस्तर विवेचन केलें, त्यावरून कर्मविधि श्रुतींचा (श्रवणादि नित्यकर्म सांगणाऱ्या श्रुतींचा) व आत्मज्ञानपर श्रुतींचा विरोध मुळींच नाहीं, हें ही मला समजलें. पूर्वसंचित विनष्ट होण्यासाठीं केलेलें नित्यकर्म विद्योत्पादनाचा प्रतिबंध करणाऱ्या अज्ञानाचा क्षय करितें. याशिवाय त्याच्याकडे दुसरी कामगिरी नाहीं.

सिद्धान्ती—म्हणून परमश्रेयाचें साधन म्हणजे आत्मैकज्ञान सांगणारी ब्रह्मविद्या मात्र होय, असा सिद्धांत ठरला. ही विद्या आली म्हणजे पूर्वसंचितांपैकीं अवशिष्ट कर्मांचा व विद्वानाचा संबंधही नष्ट होतो.

पूर्व०—पण ज्यापक्षीं विद्योत्पत्तीचें निमित्तकारण कर्म आहे, त्यापक्षीं कर्म करण्याचा अधिकार ज्या आश्रमाला आहे, तदितर सर्व आश्रम अनुपपन्न, अयोग्य, असें झालें. गृहस्थाश्रमांत मात्र कर्म करण्याचा अधिकार जीवाला आहे. यावरून श्रुतीला मान्य असा एक गृहस्थाश्रम मात्र. इतर ब्रह्मचर्यादि आश्रम अवैदिकच होतात. वाहवा!

अर्थात् ' यावज्जीव हवन करा ' अशी आज्ञा करणाऱ्या श्रुतीही तुम्हांस सर्वकाळीं व सर्वस्थळीं संमत असल्या पाहिजेत.

सिद्धांती—कमाल आहे, तुमच्या अधीर कल्पनाप्रतिभेची ! काय ? गृहस्थांस विहित अशीं अग्निहोत्रादिच काय तीं कर्मे आहेत काय ? नित्य, नैमित्तिक, इत्यादि अनेकप्रकारचीं कर्मे गृहस्थासही असतात, हें कृपा करून विसरूं नका. ब्रह्मचर्य, तप, सत्यवाणी, शम, दम, अहिंसा, अस्तेय इत्यादि अनेकप्रकारचीं कर्मे इतर अनेक आश्रमांसही योग्य असतात, हें ध्यानात ठेवा. विद्येच्या उत्पत्तीला हीं सत्यादि अत्यंत उपकारक आहेत. यज्ञादिकांत होणाऱ्या हिंसेपासून हीं सर्वथा मुक्त म्हणजे शुद्ध आहेत. ध्यान, धारणा, समाधि ह्या लक्षणांची हीं व असलींच दुसरी शोधक कर्मे विद्येच्या जन्माआड येणाऱ्या पूर्वसंचिताचा क्षय करितात. यास प्रमाण म्हणून पुढेंही श्रुति सांगेल 'तपानें ब्रह्मज्ञान करून घे.'

पूर्व०—पण तपाच्या आधीं तरी याच जन्मांत गृहस्थाश्रम घेतलाच पाहिजे !

सिद्धान्ती—असा नियम नाहीं. जन्मजन्मांतरीं केलेल्या नित्यकर्माच्या अनुष्ठानानें सर्व दुरितक्षय झालेला असला तर गृहस्थाश्रमाच्या आधीं, ब्रह्मचर्याश्रमांतही ही विद्या प्रकाशित होईल !

शिष्य—गृहस्थाश्रम हवा असतो, कर्म करण्यासाठीं. पण नित्यकर्मांच्या साह्यानें प्रकाशित होणारी विद्या जर आधींच अधिगत झाली, तर मग गृहस्थाश्रमाची अपेक्षा करण्याचें कारण काय ! तात्पर्य. प्रत्येक जन्मांत सर्वांना गृहस्थाश्रमांतून गेलेंच पाहिजे, असा नियम व्यर्थ आहे.

सिद्धांती—पुत्रोत्पत्ति कशाकरितां ? हा लोक साध्य व्हावा म्हणून ! पण पुत्रादिकांच्या साह्यानें लब्ध होणारे जे लोक—

शिष्य—म्हणजे हा लोक, पितृलोक व देवलोक. होय ना !

सिद्धान्ती—होय. ह्या सर्व लोकांविषयीं ज्याला तीव्र वैराग्य प्राप्त झालें आहे, नित्यसिद्ध जो आत्मलोक त्याच्या दर्शनोत्सुक्यामुळें ज्याला सर्व विषयात्मक कर्म निष्प्रयोजन झालें, सारांश, प्राप्तव्य प्राप्त झाल्यामुळें जो पूर्णानंदीं राहतो, त्याची तुमच्या धिक्कार कर्माकडे प्रवृत्ति होणार कशी आणि कशाला ? फार तर काय ? पण गृहस्थाश्रमाच्यें विद्योत्पत्ति होऊन तिचा पूर्ण परिपाक झाला व यामुळें जो त्याच आश्रमांत वैराग्यपूर्ण झाला, त्यालाहुद्धां कर्म करण्याची प्रवृत्ति होणार नाहीं. ' अरे ! मी या स्थानापासून (गृहस्थाश्रमांतून) निवृत्त होण्याची इच्छा करीत आहे ' अशा अर्थाच्या श्रुती हेंच सूचवितात कीं, आत्मज्ञान्याला गृहस्थाश्रमांत सुद्धां कर्म करण्याची इच्छा राहत नाहीं. अर्थात्, कर्मांची व कर्म सांगणाऱ्या श्रुतींची मातब्बरी अनात्मक विष-

यांची इच्छा जिवंत असते, तोंपर्यंत. ही संपली कीं, सर्व अनात्मक कर्म संपलें व तें सांगणाऱ्या श्रुतींचा अधिकारही संपला.

पूर्व०—असें काय कठोर शब्दांनीं अवैदिक सिद्धांत बोलतां ? कर्मांसाठीं श्रुतींनें केवढा तरी दीर्घ प्रयत्न केला आहे ? अग्निहोत्रादि कर्मासंबंधानें श्रुतींनें केवढा आटापीट केला आहे ? तसेंच त्या अग्निहोत्रादि कर्मांचीं साधक साधनें कितीतरी आयासाचीं आहेत ? या कष्टसाध्य कर्मांची व तप, ब्रह्मचर्य इत्यादि अल्प आयासी कर्मांची बरोबरी कालत्रयींही व्हावयाची नाहीं, बरें ! इतर आश्रमांस तपादि कर्में सांगितलीं, पण तीं कमी आयासाचीं, कमी मोलाचीं म्हणून श्रुतींनें त्यांच्याविषयीं फारशी खटपट केलेली दिसत नाहीं. शिवाय, इतर आश्रम्यांचीं कर्में गृहस्थाला करितां येतील, पण त्या लोकांस गृहस्थाचीं नित्य व काम्य कर्में करितां यावयाचीं नाहींत. तेव्हां इतर आश्रमीयांनीं गृहस्थाश्रमाची बरोबरी करूं नये, हेंच नीट आहे. सारांश, श्रुतींनें कळकळीनें केलेल्या अधिक प्रयत्नावरून तिला सर्वश्रेष्ठ गृहस्थाश्रमच मान्य होता, व अग्निहोत्रादि दीर्घायासी कर्म मात्र मान्य होतें, असें दिसतें.

सिद्धान्ती—ठीक आहे. पण गृहस्थाश्रमानें जो अनुग्रह व्हावयाचा, तो पूर्वजन्मींच झाला असला तर ! मग प्रकृत जन्मांतही पुनः तेंच करित बसणें वेडेपणाचें होईल. आतां श्रुतींनें अधिक प्रयत्न केल्याचें तुम्ही म्हणतां; पण हा कांहीं दोष आमच्या म्हणण्यास लागू पडत नाहीं.

पूर्व०—म्हणजे ?

सिद्धान्ती—म्हणजे असें; जन्मांतरीं सुद्धां केलेलें अग्निहोत्र व तत्सदृश कर्म, तसेंच ब्रह्मचर्यादि शमात्मक कर्म हीं विद्योत्पत्तीला अनुग्राहकच होतात. म्हणून आम्हीं त्यांची बरोबरी करितों. हीं अनुग्राहक कर्में झालीं असल्यामुळें म्हणजे विद्योत्पत्तीच्या मार्गातील सर्व अडचणी दूर झाल्यामुळेंच कित्येक पुरुष जन्मतःच विरक्त असतात. इतर दुसरे लोकांच्या हातून हीं अनुग्राहक कर्में झालीं नसतील, तर ते कर्ममध्येंच गुरफटून राहतात, वैराग्यशून्य असतात, इतकेंच काय, पण ब्रह्मात्मविद्येचे कट्टे द्वेष्टे असतात.

शिष्य—यावरून बोध काय घ्यावयाचा ?

सिद्धां०—हा कीं जन्मांतरामध्यें केलेल्या नित्य कर्मांच्या अनुष्ठानानें संस्कृत झालेल्या विरक्तांस ब्रह्मचर्य, वानप्रस्थ, संन्यास हेच आश्रम योग्य होतात.

पूर्व०—तथापि आयासबाहुल्याचा प्रश्न सुटत नाहीं.

सिद्धांती—सुटतो, तर काय ! अहो ! अग्निहोत्रादि कर्में व त्यांचीं फलें काय एक प्रकारचींच आहेत ? हजारों प्रकारचीं कर्मफलें व कर्में ! कोणी पुत्र मागतो,

कोणाला संपत्ति हवी, कोणी स्वर्गाची यात्रा करितो, कोणी ब्रह्मवर्चसप्राप्त्यर्थ प्रयत्न करितो । याप्रमाणें अनंत जीवाच्या अनंत फलेच्छा असतात. सारांश, पुरुषांच्या इच्छा अनंत आहेत. अर्थात् तसल्या इच्छांची तृप्ति होण्याचीं साधनें म्हणजे अनंत कर्मेंही सांगावीं लागलीं आहेत.तेव्हां श्रुतीला कर्मसंबंधानें प्रयत्नबाहुल्य अवश्यच करावें लागलें. 'मला हें हवें, मला तें हवें' अशा मागण्या अनेक प्रकारच्या म्हणून इच्छापूरक साधनें किंवा उपायही अनेक झाले, यांत काय आश्चर्य आहे ? शिवाय, कर्म हें विद्येचे प्रतिबंध निवारितें, असेंही आम्ही अनेक वेळ सांगून गेलों आहों. आणखी; तुम्हांस हें ठाऊक आहे कीं, नेहमीं अधिक प्रयत्न करावा लागतो, तो उपायासंबंधान; उपेय, प्राप्तव्य सामान्यतः सहज साध्यच असतें.

पूर्व०—बरें. आतां आम्हांस एकच गोष्ट सांगा. कर्म हेंच जर विद्येचें निमित्त आहे, कर्मानेंच जर सर्व प्रतिबंधांचा नाश होतो, तर तुमच्या आत्मविद्येच्या श्रवणादि विषयक प्रयत्नाचें प्रयोजन काय आहे सांगा. पुनः आणखी; कर्माहून जास्त जो श्रवणादि तो यत्न व्यर्थच नाहीं का ?

सिद्धान्ती—पूर्वसंचित पाप संपलें कीं, विद्या उगवली, असा नियम कोठें आहे ? विद्योत्पत्तीला ईश्वरीप्रसाद, तप, ध्यान इत्यादिकांचें अनुष्ठान अवश्य आहे. तें केलें नाहीं, तरी प्रतिबंधक्षयाबरोबर विद्या प्रकाशित होते, असें नाहीं. सारांश, प्रतिबंधविनाश झाला तरी ईश्वरी प्रसाद, तप, ध्यान इत्यादिकांची आवश्यकता आहेच आहे. अहिंसा, ब्रह्मचर्य इत्यादि केवळ विद्येचीं **उपकारक कारणें** आहेत, तीं परोक्ष असून परंपरेनें कारण होतात. श्रवण, मनन आणि निदिध्यास हीं **साक्षात् कारणें** आहेत. श्रवण–मननादि विद्यासाधनें होत. या साधनांनीं मात्र विद्या साध्य होणार व विद्या मात्र मोक्ष देणार. तेव्हां ब्रह्मचर्य पाळणारे, तपश्चर्या करणारे, श्रवण-मननादि करणारे, असे आश्रमस्थ लोक आत्मज्ञानाला अधिकारी होतात. तात्पर्य, गृहस्थाश्रमाशिवाय इतर आश्रम असणें अत्यंत अवश्य आहे, हें ठरलें. दुसरी गोष्ट अशी ठरली कीं ब्रह्मविद्येचा अधिकार कोणत्याही आश्रमांत प्राप्त होतो; आणि तिसरें असें कीं, परमश्रेयाची प्राप्ति होण्याला विद्या हेंच साधन आहे.

शं नो मह इत्यादित्यो नो इतराणि त्रयोविंशतिः

शं नः शीक्षाꣳसह नौ यश्छन्दसां भूः स यः पृथिव्योमित्यमृतं चाहं वेदमनूच्य शं नो द्वादश ॥

शं नो मित्रः शं वरुणः । शं नो भवत्वर्यमा । शं न इन्द्रो बृहस्पतिः । शं नो विष्णुरुरुक्रमः । नमो ब्रह्मणे । नमस्ते वायो । त्वमेव प्रत्यक्षं ब्रह्मासि ।

त्वमेव प्रत्यक्षं ब्रह्म वदिष्यामि । ऋतं वदिष्यामि । सत्यं वदिष्यामि । तन्मामवतु । तद्वक्तारमवतु । अवतु माम् । अवतु वक्तारम् ।

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।

हरि ॐ ।

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि प्रथमः शीक्षाध्यायः समाप्तः ॥ १ ॥

सिद्धान्ती—आतांपर्यंत उपासनाप्राप्तीची जी विद्या सांगितली, तिच्या मार्गांत येणारे उपसर्ग नष्ट व्हावे, म्हणून हें शांतिपठण आहे. वा मंत्राचा अर्थ आपण पूर्वी केलाच आहे.

शीक्षावल्ली संपली.

ॐ

ब्रह्मानंदवल्ली.

शं नो मित्र इत्याद्यतीतविद्याप्राप्त्युपसर्गप्रशमनार्था शान्तिः पठिता । इदानीं तु वक्ष्यमाणब्रह्मविद्याप्राप्त्युपसर्गोपशमनार्था शान्तिः पठ्यते—

सिद्धान्त—पूर्वी शीक्षावल्लीचा पाठ संपल्यावर जो शांतिपाठ केला, तो ती विद्या प्राप्त होण्याला येणाऱ्या विघ्नांचें प्रशमन व्हावें एतदर्थ केला. आतां हा जो शांतिपाठ करावयाचा, तो ब्रह्मविद्याप्राप्तीच्या मार्गात येणाऱ्या विघ्नांच्या उपशमनार्थ करावया आहे. तो असा—

हरिः ॐ ।

शं नो मित्रः शं वरुणः । शं नो भवत्वर्यमा । शं न इन्द्रो बृहस्पतिः । शं नो विष्णुरुरुक्रमः । नमो ब्रह्मणे । नमस्ते वायो । त्वमेव प्रत्यक्षं ब्रह्मासि । त्वमेव प्रत्यक्षं ब्रह्म वदिष्यामि । ऋतं वदिष्यामि । सत्यं वदिष्यामि । तन्मामवतु । तद्वक्तारमवतु । अवतु माम् । अवतु वक्तारम् ॥ सह नाववतु । सह नौ भुनक्तु । सह वीर्यं करवावहै । तेजस्वि नावधीतमस्तु । मा विद्विषावहै ।

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।

शं नो मित्र इति सह नाववत्विति च । शं नो मित्र इत्यादि पूर्ववत्स्पष्टम् । सह नाववतु नौ शिष्याचार्यौ सहैवावतु रक्षतु । सह नौ भुनक्तु भोजयतु । सह वीर्यं विद्यादिनिमित्तं सामर्थ्यं करवावहै निर्वर्तयावहै । तेजस्वि नावावयोस्तेजस्विनोरधीतं स्वधीतमस्तु । अर्थज्ञानयोग्यमस्त्वित्यर्थः । मा विद्विषावहै विद्याग्रहणनिमित्तं शिष्यस्याऽऽचार्यस्य वा प्रमादकृतादन्यायाद्विद्वेषः प्राप्तस्तच्छमनायेयमाशीर्मा विद्विषावहा इति । मैवेतरेतरं विद्वेषमापद्यावहै । शान्तिः शान्तिः शान्तिरिति त्रिर्वचनमुक्तार्थम् ।

वक्ष्यमाणविद्याविघ्नप्रशमनार्थं चेयं शान्तिः । अविघ्नेनाऽऽत्मविद्या-प्राप्तिराशास्यते तन्मूलं हि परं श्रेय इति ।

सिद्धान्ती—या शांतिपाठाचा अन्वयार्थ पूर्वी अनेक वेळ सांगितला आहे व तुम्हास समजलाही आहे. शिष्य व आचार्य यांचें संरक्षण व्हावें, अन्नभोजन व विद्याभोजन मिळावें, वियेस अवश्य असणारें व वियेनें प्राप्त होणारें सामर्थ्य उभयतांमध्यें प्रकट व्हावें, उभयतांचें पठणपाठणांचें कार्य, अर्थज्ञान, योग्य असावें, ही प्रार्थना आहे. विद्याग्रहण करितांना शिष्य चुकला तर आचार्य रागावतात म्हणून शिष्य त्यांचा द्वेष करितात व शिकत असतां शिष्यानें प्रमाद केला, अन्याय केला म्हणून आचार्यांची शिष्यावर अप्रीति होते. तेव्हां शिष्यकृत द्वेष अथवा शिष्यसंबंधी गुरुकृत कोध हे उत्पन्नच होऊं नयेत. सारांश, पुढें जी विद्या सांगावयाची आहे, तेथें हीं विघ्नें येऊं नयेत, एतदर्थ हा शांतिपाठ आहे, सर्वत्र निर्विघ्न होऊन आत्मविद्या प्राप्त व्हावी, अशा अर्थाची ही मांगलिक प्रार्थना आहे. आत्मविद्या प्राप्त झाली म्हणजे निःश्रेयसाचा (मोक्षाचा) लाभ होतो, हें सर्व श्रुतच आहे.

द्वितीयो ब्रह्मवल्ल्यध्यायः ।

प्रथमोऽनुवाकः ।

ॐ ब्रह्मविदाप्नोति परम् । तदेषाऽभ्युक्ता सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म । यो वेद निहितं गुहायां परमे व्योमन् । सोऽश्नुते सर्वान्कामान्सह । ब्रह्मणा विपश्चितेति । तस्माद्वा एतस्मादात्मन आकाशः संभूतः । आकाशाद्वायुः । वायोराग्निः । अग्नेरापः अद्भ्यः पृथिवी । पृथिव्या ओषधयः । ओषधीभ्योऽन्नम् । अन्नात्पुरुषः । स वा एष पुरुषोऽन्नरसमयः । तस्येदमेव शिरः । अयं दक्षिणः पक्षः । अयमुत्तरः पक्षः । अयमात्मा । इदं पुच्छं प्रतिष्ठा । तदप्येष श्लोको भवति ॥ १ ॥

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि द्वितीये ब्रह्मवल्ल्यध्याये प्रथमोऽनुवाकः ॥ १ ॥

अन्वय व अर्थः—**ओम्; ब्रह्मवित् परम् आप्नोति** (ब्रह्मवेत्याला श्रेष्ठ ब्रह्म प्राप्त होतें) **तत् एषा अभ्युक्ता** (ह्याचें समर्थन करण्यासाठीं ही ऋग्वेदांतील ऋचा सांगितली आहे) **सत्यं ज्ञानं अनंतं ब्रह्म** (सत्य, ज्ञान, आणि अनंत हें ब्रह्माचें स्वरूप आहे) **गुहायां परमे व्योमन्-व्योम्नि-निहितं यः वेद** (अंतःकरणांतील गूढबुद्धीच्या आंत असणाऱ्या श्रेष्ठ आकाशांत राहणाऱ्या ब्रह्माचें ज्याला यथार्थ ज्ञान झालें) **सः सर्वान् कामान् सह अश्नुते,** (तो यच्चावत् सर्व आकांक्षांचा उपभोग एककाळीं घेतो) **विपश्चिता ब्रह्मणा इति** (सर्वज्ञ जें ब्रह्म तद्रूप होऊन ब्रह्मज्ञाला सर्व प्रकारचे उपभोग एक काळीं होतात, असा हा ऋग्वेदोक्त मंत्र आहे) **तस्मात् एतस्मात् आत्मनः वै आकाशः संभूतः; आकाशात् वायुः; वायोः अग्निः, अग्ने आपः; अद्भ्यः पृथिवी; पृथिव्याः ओषधयः; ओषधीभ्यः अन्नं; अन्नात् पुरुषः;** (त्या ह्या परमात्म्यापासून आकाश उत्पन्न होतें; आकाशापासून वायु; वायूपासून अग्नि; अग्नीपासून जल; जलापासून पृथ्वी; पृथ्वीपासून ओषधी—वृक्षसृष्टी—ओषधीपासून अन्न आणि अन्नापासून पुरुष, या क्रमानें उत्पत्ति होत असते) **सः एषः अन्नरसमयः वै** (तो हा दृश्य पुरुष अन्नरसाचा परिणाम आहे) **तस्य इदं एव शिरः; अयं दक्षिणः पक्षः; अयं उत्तरः पक्षः; अयं आत्मा; इदं पुच्छं प्रतिष्ठा; तत् अपि एष श्लोकः भवति** (त्या पुरुषाचें हें प्रत्यक्ष मस्तक आहे. त्याचा उजवा हात हा दक्षिणेकडील पंख; डावाहात हा उत्तर पंख; शरीराचा मध्यभाग हा आत्मा, आणि नाभिखालचाभाग हें पुच्छ, पुरुषाचें संरक्षण करणारें आहे. ह्या संबंधानें ब्राह्मणांत पुढील श्लोक आम्नात केला आहे) तात्पर्य; ब्रह्मवेत्याला ब्रह्मप्राप्ति होते, ब्रह्माचे सच्चिदानंद स्वरूप आपणच आहों, असें ज्याला समजतें, तो ब्रह्मस्वरूप होऊन सर्व प्रकारचे उपभोग निर्विकारत्वानें एकदम घेण्यास समर्थ होतो. या ब्रह्मापासूनच आकाशादिक्रमानें अन्नात्मक पुरुषदेहाची उत्पत्ति झाली आहे. त्याचें स्वरूप पंचभागात्मक पक्षिस्वरूपासारखे असतें. ॥ १ ॥

संहितादिविषयाणि कर्मभिरविरुद्धान्युपासनान्युक्तानि । अनन्तरं चान्तःसोपाधिकात्मदर्शनमुक्तं व्याहृतिद्वारेण स्वाराज्यफलम् । न चैतावताऽशेषतः संसारबीजस्योपमर्दनमस्तीत्यतोऽशेषोपद्रवबीजस्याज्ञानस्य निवृत्त्यर्थं विधूतसर्वोपाधिविशेषात्मदर्शनार्थमिदमारभ्यते ब्रह्मविदाप्नोति परमित्यादि । प्रयोजनं चास्या ब्रह्मविद्याया अविद्यानिवृत्तिस्तत आत्यन्तिकः संसाराभावः । वक्ष्यति च– " विद्वान्न बिभेति कुतश्चन " इति । संसारनिमित्ते च सत्यभयं प्रतिष्ठां च विन्दत इत्यनुपपन्नम् । " कृताकृते पुण्यपापे न तपतः " इति च । अतोऽवगम्यतेऽस्माद्विज्ञानात्सर्वात्मब्रह्मविषयादात्यन्तिकः संसाराभाव इति । स्वयमेव च प्रयोजनमाह ब्रह्मविदाप्नोति परमित्यादावेव संबन्धप्रयोजनज्ञापनार्थम् । निर्ज्ञातयोर्हि संबन्धप्रयोजनयोर्विद्याश्रवणग्रहणधारणाभ्यासार्थे प्रवर्तते । श्रवणादिपूर्वकं हि विद्याफलम् " श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्यः " इत्यादिश्रुत्यन्तरेभ्यः । ब्रह्मविद्ब्रह्मेति वक्ष्यमाणलक्षणं बृहत्तमत्वाद्ब्रह्म तद्वेत्ति विजानातीति ब्रह्मविदाप्नोति परं निरतिशयं तदेव ब्रह्म परम् । न ह्यन्यस्य विज्ञानादन्यस्य प्राप्तिः । स्पष्टं च श्रुत्यन्तरं ब्रह्मप्राप्तिमेव ब्रह्मविदो दर्शयति " स यो ह वै तत्परमं ब्रह्म वेद ब्रह्मैव भवति " इत्यादि ।

सिद्धान्ती—आतांपर्यंत विहित-कर्मांशीं अविरुद्ध असून वेदब्राह्मणामध्यें सांगितलेल्या उपासनांचें प्रतिपादन प्रथमतः केलें आणि नंतर व्याहृतीच्या-प्रणवाच्या-किंवा ओंकाराच्या द्वारानें मानसिक, अंतःकरणांतील, उपासनेचा उपक्रम करून स्वाराज्य फळ देणारे सोपाधिक आत्मदर्शनाचा मार्गही सांगितला. पण त्या दोन्ही-प्रकारच्या उपासना केल्या असतांही संसाराचें मूळकारण जें अज्ञान, त्याचा निःशेष निरास होत नाहीं, अविद्येचा सबीज उच्छेद होत नाहीं. असें पाहून दयाळु श्रुतीनें परब्रह्माचें दर्शन होईल, अखिल दुःखाचें बीज जें अज्ञान त्याची सर्वथा निवृत्ति करील, असा एक उपाय मुमुक्षुजीवांकरितां सांगितला आहे. ह्या उपायाचें अवलंबन केलें असतां जेथून सर्व उपाधी नाहींशा झाल्या आहेत, अशा निर्विशेष परब्रह्म-स्वरूपाचें साक्षात् दर्शन होऊन संसाराचा सर्वदा उपरम होतो. तात्पर्य, अखिल दुःखांची आत्यंतिक निवृत्ति होऊन परमसुखाची प्राप्ति मुमुक्षूंस व्हावी एतदर्थ ह्या प्रकरणाचा आरंभ केला आहे.

शिष्य—म्हणजे अविद्या-निवृत्ति व्हावी; आणि ही निवृत्ति झाली असतां संसारवृक्षाचा उच्छेद व्हावा; हें या ब्रह्मविद्येचें **प्रयोजन** आहे, असेंच आपलें म्हणणें ना ?

सिद्धान्ती—होय; आणि पुढेंही असेंच सांगतील कीं "ब्रह्मवेत्ता हा सर्वथा निर्भय होतो." खरेंच आहे, संसाराचें मूळबीज जिवंत असतां भीतिशून्यत्व प्राप्त व्हावें आणि अचल स्थैर्य प्राप्त व्हावें, हा गोष्टी अशक्य आहेत. तात्पर्य, ब्रह्मदर्शन झालें असतां भीतिशून्यता प्राप्त होते, ती संसाराच्या समूळ विनाशामुळें होय. तसेंच. पुढें आणखी असेंही सांगतील कीं "ब्रह्मवेत्त्याला कर्माकर्म किंवा पुण्यपाप हीं त्रास होण्याला समर्थ नसतात." यावरूनच हें स्पष्ट सिद्ध होतें कीं, सर्वत्र एकच ब्रह्म विद्यमान आहे, जीव आणि ब्रह्म एकच आहेत, हें ज्ञान-विज्ञान झालें असतां संसाराचा अत्यंताभाव होतो. शिवाय, श्रुतीच स्वतः या प्रकरणाचें प्रयोजन सांगत आहे कीं, ब्रह्मवेत्त्याला ब्रह्मप्राप्ति होते. येथे मुमुक्षु व ब्रह्मविद्या यांचा संबंध व ब्रह्मज्ञानाची फलश्रुति सांगितली !

शिष्य—भगवन् ! ही फलश्रुति प्रथमच कां सांगितली ?

सिद्धान्ती—संबंध आणि प्रयोजन यांचें स्पष्ट ज्ञान प्रथमतःच झालें असतां, ब्रह्मविद्येचें श्रवण, तिचें ग्रहण, तिची धारणा आणि तिचा अभ्यास निश्चयानें करण्याला मुमुक्षूला प्ररोचना (अधिक आवड) प्राप्त होते.

शिष्य—बरोबरच आहे. विद्येचें फळ मिळवून देणारीं श्रवणमननादि साधनें प्रथमतःच विद्यमान असलीं पाहिजेत. दुसऱ्याही इतर श्रुती याचप्रमाणें म्हणत आहेत कीं, "आत्मा हा श्रोतव्य, मंतव्य आणि निदिध्यासितव्य आहे." असो; ब्रह्म म्हणजे काय ?

सिद्धांती:—ब्रह्माचें लक्षण आतां इतक्यांतच श्रुति सांगणार आहे. येथें तुम्हांस इतकेंच सांगून ठेवतों कीं, ब्रह्म-शब्दाचा यौगिक अर्थ (धात्वर्थ) अतिशय मोठेपणा, निरतिशयमहत्त्व हा आहे. याहून मोठी असणारी दुसरी वस्तुच नाहीं. असो; ह्या वस्तूचें ज्याला ज्ञान-विज्ञान होतें, तो ब्रह्मवेत्ता होय. यालाच निरतिशय ब्रह्माचें दर्शन म्हणजे परब्रह्माची प्राप्ति होते. तो परब्रह्म होतो. कारण उघड आहे कीं, एका वस्तूचें ज्ञान-विज्ञान झालें असतां तिच्याहून दुसरी वस्तु केव्हांही प्राप्त व्हावयाची नाहीं. तात्पर्य, ज्या वस्तूची प्राप्ति करून घ्यावयाची असते, तिचेंच ज्ञान-विज्ञान आपल्यास झालें असलें पाहिजे. 'ज्या पुरुषास परब्रह्माचें ज्ञान होतें, तो परब्रह्म होतो' इत्यादि दुसरी श्रुति स्पष्टतेनें असें सांगत आहे कीं, ब्रह्मवेत्त्याला मात्र ब्रह्मप्राप्ति होते. तात्पर्य ब्रह्मवेत्ता हा ब्रह्मरूपच होतो. परब्रह्म-प्राप्ति व्हावी असेल, तर परब्रह्माचें ज्ञानविज्ञान झालें पाहिजे.

ननु सर्वगतं सर्वस्याऽऽत्मभूतं ब्रह्म वक्ष्यति । अतो नाऽप्यं, प्राप्तिश्चान्यस्यान्येन परिच्छिन्नस्य च परिच्छिन्नेन दृष्टा । अपरिच्छिन्नं सर्वात्मकं च ब्रह्मेत्यतः परिच्छिन्नवदनात्मवच्च तस्याऽऽप्तिरनुपपन्ना । नायं दोषः । कथम् । दर्शनापेक्षत्वाद्ब्रह्मण आप्त्यनाप्त्योः । परमार्थतो ब्रह्मरूपस्यापि सतोऽस्य जीवस्य भूतमात्राकृतबाह्यपरि-

च्छिन्नान्नमयाद्यात्मदर्शिनस्तदासक्तचेतसः प्रकृतसंख्यापूरणस्याऽव्यवहितस्यापि बाह्यसंख्येयविषयासक्तचित्ततया स्वरूपाभावदर्शनवत्परमार्थब्रह्मस्वरूपाभावदर्शनलक्षणयाऽविद्ययाऽन्नमयादीन्बाह्यानात्मन आत्मत्वेन प्रतिपन्नत्वादन्नमयाद्यनात्मभ्यो नान्योऽहमस्मीत्यभिमन्यते । एवमविद्ययाऽऽत्मभूतमपि ब्रह्मानाप्तं स्यात् । तस्यैवमविद्ययाऽनाप्तब्रह्मस्वरूपस्य प्रकृतसंख्यापूरणस्याऽऽत्मनोऽविद्ययाऽनाप्तस्य सतः केनचित्मारितस्य पुनस्तस्यैव विद्ययाऽऽप्तिर्यथा तथा श्रुत्युपदिष्टस्य सर्वात्मब्रह्मण आत्मत्वदर्शनेन विद्यया तदाप्तिरुपपद्यत एव ।

पूर्व०—अहो, तुमचें हें म्हणणें ठीक दिसत नाहीं. कारण 'ब्रह्म हें सर्वगामी असून प्रत्येक पदार्थाचा आत्मा आहे' असें ब्रह्माचें स्वरूप याच उपनिषदांत स्पष्ट होणार आहे. तेव्हा ब्रह्म आहे आत्मा ज्या व्यक्तीचा, तिला सर्वव्यापी असणाऱ्या ब्रह्माची प्राप्ति ती काय होणार ? मी जर ब्रह्मच आहें, तर मला आणखी ब्रह्माची प्राप्ति ती काय व कशी व्हावयाची आहे ? शिवाय, एका परिच्छिन्न (मर्यादित) वस्तूला दुसऱ्या परिच्छिन्न वस्तूची प्राप्ति होते, असा तुमचा आमचा सगळ्यांचा अनुभव आहे. ब्रह्म तर अपरिच्छिन्न (मर्यादाविरहित) आणि सर्वांचा आत्मा असणारें आहे. म्हणून एकाद्या परिच्छिन्न आणि अनात्मक–वस्तूच्या प्रमाणें तुम्ही ब्रह्माची प्राप्ति होतें, असें म्हणतां; हें तुमचें म्हणणें योग्य नाहीं. तात्पर्य, **ब्रह्माची प्राप्ति होते** हें म्हणणें खरें असेंल तर ब्रह्म परिच्छिन्न होणार आणि त्याचें ब्रह्मत्व नष्ट होणार ! मग त्याची प्राप्ति करून घेण्याचें कारण नाहीं, असा पक्ष उत्पन्न होणार. तेव्हां तुम्ही ब्रह्माचें लक्षण तरी बदला, किंवा हें प्रकरण तरी पुढें चालवूं नका.

सिद्धान्ती—श्रुतीनें 'प्राप्ति' ह्या शब्दाची योजना केली जाहे, ती जाणून सवरून केली व तीच सर्वथा योग्य आहे.

शिष्य—हें कसें ?

सिद्धान्ती—ऐका. ब्रह्माची प्राप्ति किंवा अप्राप्ति ह्या दोन्ही शब्दांची योजना सापेक्ष आहे. म्हणजे ब्रह्माचें **ज्ञान झालें** तर ब्रह्म–प्राप्ति झाली, असें म्हणावयाचें. ज्ञान नसलें म्हणजे ती प्राप्ति नाहीं, असें समजावयाचें. वस्तुतः पाहिलें असतां जीव हा स्वरूपतः ब्रह्मरूपच आहे. तथापि, आकाशादि पंचमहाभूतांच्या अंशांनीं उत्पन्न केलेले दिसणारे बाह्य आणि मर्यादित अन्नमयादि कोश हेच आत्मस्वरूप आहेत, असें समजून त्यांच्या ठिकाणीं आसक्त झालेल्या जीवाजवळ ब्रह्म असताहीं (तो स्वतः ब्रह्मरूप असताहीं) त्याला तें स्वरूप दिसत नाहीं. एकदा दृढ पुरुष नदी

उतरूनें बाहेर आल्यावर गणती करूं लागले. तेव्हां प्रत्येकानें आपणास मोजलें नाहीं; आणि याप्रमाणें नऊ जणच नदी तरून बाहेर आले, अशी समजूत करून घेतली. आपण दहावा त्यांच्या जवळ असतांही, 'दहावा आहे' हें त्या दहाही अज्ञानी मनुष्यांस समजलें नाहीं. त्याप्रमाणें परमात्मा, किंवा ब्रह्म आपल्याजवळ नित्य असतांही आपलें चित्त बाहेर आणि मर्यादित-वस्तूंमध्यें गुरफटून गेलें असतें, म्हणून **मी देह आहें, माझें धन** आहें, अशी भ्रांति होऊन जसें आपलें स्वतःचें स्वरूप आपल्यास समजत नाहीं, त्याप्रमाणें तें पारमार्थिक ब्रह्म स्वरूपही दिसत नाहीं. ब्रह्मस्वरूपाची ओळख न करून देणें हें अविद्येचें लक्षण आहे. ही स्वरूपाची ओळख करून देत नाहीं; इतकेंच नव्हे तर आपण अन्यस्वरूप आहोंत, अशी भ्रांति उत्पन्न करिते. आपण देह आहों, प्राण आहों, इत्यादिप्रकारें अनात्मक वस्तूंला आत्मरूपी समजतों. देहापासून आपण भिन्न नाहीं, असा अभिमान आपल्यास अविद्येमुळें उत्पन्न होतो. हा सर्व अविद्येचा विलास होय. याप्रमाणें आपण स्वतः ब्रह्मरूप असूनही अविद्येनें आपल्यास तें **प्राप्त** (म्हणजे ज्ञात) झालेलें नसतें. म्हणून अविद्येनें ज्याची असलेली ब्रह्मप्राप्ति नाहींशी केली, त्याला स्वरूप दाखविणारी श्रुति त्याच्या सौभाग्यानें प्राप्त होते. त्या दहा अज्ञानी पुरुषांमध्यें दहावा पुरुष असतांही तो त्यांस दिसला नाहीं; पण तो दाखविणारा चतुर पुरुष भेटल्यावर 'आपण सर्वजण जिवंत आहों' अशी त्या सर्वांची खात्री झाली. त्याप्रमाणें मी आत्मा नाहीं, असें अविद्या-मोहानें मानणाऱ्या अज्ञानी पुरुषाची खात्री 'तूंच आत्मा आहेस' 'हें सर्व तंच आहेस' असें म्हणून श्रुति करिते व याप्रमाणें त्याला आत्मप्राप्ति करून देते. तात्पर्य, आपण आत्मरूप असतांही 'आपण आत्मा नाहीं' असें वाटणें, आत्मा अप्राप्त आहे, असा मोह होणें, ही आत्म्याची अप्राप्ति होय. अर्थातच विद्येनें आपण आत्मा आहों, असें आपल्यास ज्ञान झालें म्हणजे आत्मप्राप्ति झाली, असें म्हणण्यास काय प्रत्यवाय आहे! असो; हा अभिप्राय मनांत आणून श्रुतीनें प्राप्ति आणि अप्राप्ति हें शब्द उपयोजिले आहेत. आत्मा सर्वदा प्राप्तच आहे. अविद्येनें तो तसा नाहीं, अशी भ्रांति होते; आणि भ्रांति नष्ट झाली, म्हणजे आपल्याजवळ असलेला आत्मा आपल्यास **मिळतोसा** वाटतो, म्हणून श्रुति तसें सांगतें—

ब्रह्मविदाप्नोति परमिति वाक्यं सूत्रभूतं सर्वस्य वल्ल्यर्थस्य ब्रह्मविदाप्नोति परमित्यनेन वाक्येन वेद्यतया सूत्रितस्य ब्रह्मणोऽनिर्धारितस्वरूपाविशेषस्य सर्वतो व्यावृत्तस्वरूपविशेषसमर्पणसमर्थस्य लक्षणस्याभिधानेन स्वरूपनिर्धारणायाविशेषेण चोक्तवेदनस्य ब्रह्मणो वक्ष्यमाणलक्षणस्य विशेषेण प्रत्यगात्मतयाऽनन्यरूपेण विज्ञेयत्वाय ब्रह्मविद्याफलं च ब्रह्मविदो यत्परब्रह्मप्राप्तिलक्षणमुक्तं स सर्वात्म-

भावः सर्वसंसारधर्मातीतब्रह्मस्वरूपत्वमेव नान्यदित्येतत्प्रदर्शनायै-षर्गुदाह्रियते—

तदेषाऽभ्युक्तेति। तत्तस्मिन्नेव ब्राह्मणवाक्योक्तेऽर्थ एषर्गभ्युक्ताऽऽ-म्नाता। सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्मेति ब्रह्मणो लक्षणार्थं वाक्यम्। सत्या-दीनि हि त्रीणि विशेषणार्थानि पदानि विशेष्यस्य ब्रह्मणः। विशेष्यं ब्रह्म विवक्षितत्वाद्वेद्यतया। विशेषणविशेष्यत्वादेव सत्यादीन्येक-विभक्त्यन्तानि पदानि समानाधिकरणानि। सत्यादिभिस्त्रिभिर्विशे-षणैर्विशेष्यमाणं ब्रह्म विशेष्यान्तरेभ्यो निर्धार्यते। एवं हि तज्ज्ञानं भवति यदन्येभ्यो निर्धारितम्। यथा लोके नीलं महत्सुगन्ध्यु-त्पलमिति।

सिद्धान्ती—"ब्रह्मवेत्याला परब्रह्मप्राप्ति होते" हें वाक्य सूत्ररूपी आहे. सर्व ब्रह्म-वल्लीचा अर्थ या संग्रह-वाक्यांत आला आहे. तथापि, या वाक्यामध्यें जाणून घेण्यास योग्य असणाऱ्या ब्रह्माचें स्वरूप अनिश्चित-पद्धतीनें सांगितलें आहे. या सूत्रावरून ब्रह्माचें विशेष स्वरूप कोणतें, त्याचा निश्चय अज्ञानी जीवाला होत नाहीं. म्हणन सर्व दृश्य-भास्य पदार्थांपासून व्यावृत्त होणारा (निराळा असणारा) जो ब्रह्मस्वरूपाचा विशेष तो ब्रह्मस्वरूपीं दाखवून त्याचा अर्थ यथास्थितरीतीनें स्पष्ट करण्यास समर्थ असणारें लक्षण आतांच सांगणार आहेत. हें लक्षण सामान्यतः पूर्वोक्त अनिश्चितरीतीनें सांगितलेल्या ब्रह्मस्वरूपाचा स्पष्ट निश्चय करितें. तसेंच विशेषतः या लक्षणानें प्रत्यगात्मा आणि परमात्मा हे दोन्ही एकच आहेत. असेंही विज्ञान होतें. अर्थातच ब्रह्मविद्येचें फल म्हणजे ब्रह्मवेत्त्याला ब्रह्मप्राप्ति होय हें वर सांगितलेंच. ही ब्रह्मप्राप्ति म्हणजे "सर्व ठिकाणीं आत्मस्वरूप आहे, मी आत्मस्वरूप आहें; ब्रह्म हें सर्व संसारधर्मांच्या पलीकडचें आहे; म्हणून मीही हें सर्व असून सर्वांचा आत्मा व सर्व जन्ममरणादि संसारधर्म-वर्जित आहें, ब्रह्मा-व्यतिरिक्त दुसरें कांहीं नाहीं," असें ज्ञान-विज्ञान होतें. हाच अर्थ स्पष्ट करण्यासाठीं श्रुतीनें ऋग्वेदांतील एक मंत्र उद्धृत केला आहे; ब्राह्मणांतील वाक्यामध्यें सांगित-लेला अर्थ स्पष्ट करण्यासाठीं या ऋचेचा अवतार आहे. त्या मंत्राच्या पहिल्याभागाचा अर्थ असा "ब्रह्म हें सत्य, ज्ञान आणि अनंत आहे." हें ब्रह्माचें स्वरूपलक्षण होय.

शिष्य—स्वरूपलक्षण म्हणजे त्रिकालाबाधित लक्षण ?

सिद्धान्ती—होय. असो; सत्यादि जीं तीन पदें आहेत, तीं विशेष्य जें ब्रह्म त्याचीं विशेषणें आहेत, ब्रह्माचा विशेष सांगणारीं, ब्रह्मास इतर दृश्यभास्याहून व्यावृत्त करणारीं, हीं पदें होत. ब्रह्म विशेष्य आहे. त्याचेंच स्वरूप आपल्यास समजून द्यावयाचें, असा

आपला मनोदय आहे. त्यांची मीमांसा यासाठींच आपण करीत आहोंत. आतां ज्यापक्षीं ब्रह्माचीं प्राधान्यानें विवक्षा आहे, ज्यापक्षीं हें ब्रह्मप्रकरण आहे, त्यापक्षीं ब्रह्म हें विशेष्य आणि सत्य-ज्ञानादि विशेषणें होत, हें ठरलें. म्हणून सत्यादि विशेषणार्थक शब्द आणि ब्रह्म विशेष्य यांच्यामध्यें विशेषणविशेष्यभाव आहे. अर्थातूच सर्वपदें एका विभक्तींतच असून सर्वांचें समानाधिकरण आहें. या तीन विशेषणांनीं विशिष्ट झालेलें ब्रह्म इतर विशेष्यांपासून (पदार्थांपासून) निराळें, असें या विशेषणांनीं निश्चित करितां येतें. एका वस्तूला अन्यवस्तूपासून निराळी काढून 'ती अशीं अशीं आहे' असा निर्धार केला म्हणजे त्या वस्तूचे ज्ञान आपल्यास झालें, असें समजावें.

शिष्य—व्यवहारांतहीं आपण म्हणतो कीं, 'हें कमळ निळें व मोठें असून सुवासिक आहे.' निळेपणा, मोठेपणा, आणि सौगंध, हे तीन गुण आपल्यास विवक्षित असणाऱ्या कमळाला इतर कमळापासून निराळें करून त्याच्या स्वरूपाचेंही ज्ञान आपल्यास करून देतात. समानाधिकरण म्हणजे एकाच क्रियेशीं समान संबंध असणारीं दोन किंवा अधिक नामें होत. होयना? ठीक.

ननु विशेष्यं विशेषणान्तरं व्यभिचरद्विशेष्यते। यथा नीलं रक्तं चोत्पलमिति। यदा ह्यनेकानि द्रव्याण्येकजातीयान्यनेकविशेषणयोगीनि तदा विशेषणस्यार्थवत्त्वम्। न ह्येकस्मिन्नेव वस्तुनि विशेषणान्तरायोगाद्यथाऽसावेक आदित्य इति। तथैकमेव च ब्रह्म न ब्रह्मान्तराणि येभ्यो विशेष्येत नीलोत्पलवत्। न। लक्षणार्थत्वाद्विशेषणानाम्। नायं दोषः। कस्मात्। यस्माल्लक्षणार्थप्रधानानि विशेषणानि न विशेषणप्रधानान्येव। कः पुनर्लक्षणलक्ष्ययोर्विशेषणविशेष्ययोर्वा विशेष इति। उच्यते। समानजातीयेभ्य एव निवर्तकानि विशेषणानि; विशेष्यस्य लक्षणं तु सर्वत यथाऽवकाशदात्राकाशमिति। लक्षणार्थं च वाक्यमित्यवोचाम।

पूर्व०—तुम्ही म्हणतां हें योग्य नाहीं. उदाहरणांतील कमळ निळेंच असतें, असें नाहीं. तें तांबडेंही असूं शकतें. म्हणजे कमळ दुसऱ्या विशेषणाचा स्वीकार करूं शकतें; म्हणून 'निळें कमळ' असें म्हणून आपण इतर कमळांपासून त्याला विभक्त करितों. ज्यावेळीं एकाच जातीमध्यें अनेक पदार्थ भिन्न भिन्न गुणांनीं संपन्न असतात, तेव्हां कोणताही पदार्थ निश्चित करण्याला विशेष विशेषणांचा उपयोग होतो. कमळें अनेक असतात व अनेक रंगाचीं असतात. कोणतेंही विशिष्ट कमळ हवें असल्यास आपण निळें, तांबडें किंवा सुगंधी अशीं विशेषणें देऊन तें कमळ निश्चित करितों. पण जर वस्तु एकच असेल, तर तेथें एकाधिक दुसऱ्या विशेषणाचा कांहीं

एक उपयोग नसतो. तुम्ही ब्रह्म एकच आहे असें म्हणतां आणि त्याला तीन विशेषणें देतां, हें काय ? एका वस्तला एकाधिक अनेक विशेषणाचें कारण नाहीं. पहाः आपण नेहमीं म्हणतोः सूर्य एकच आहे. तसें ब्रह्म ही एकच आहे. अनेक ब्रह्में नाहींत, कीं विशेषणें देऊन प्रत्येक ब्रह्मास विशिष्ट करितां येईल. अनेक कमळांतील एक कमळ विशिष्ट करण्यासाठीं **निळें** असें विशेषण आपण उपयोजितों. तसा प्रकार तर येथें नाहीं. तात्पर्य, निर्विशेष ब्रह्माला तीन विशेषणांचें मुळींच प्रयोजन नाहीं.

सिद्धान्ती—तुम्ही म्हणतां, तशा अर्थानें आम्ही विशेषण या शद्बाचा उपयोग केला नाहीं.

पूर्व०—म्हणजे तुम्ही शब्दांचे मूळ अर्थही बदलणार कीं काय ?

सिद्धान्ती—नाहीं; विशेषण या शब्दाचा येथें लक्षणात्मक अर्थ आहे व श्रुतीनें उपयोजिलेलीं विशेषणें लक्षणार्थांचीं आहेत, त्यांत लक्षणार्थ प्रधान आहे. विशेषणी अर्थ प्रधान नाहीं.

शिष्य—भगवन्! लक्षण–लक्ष्यांमध्यें व विशेष्यां–विशेषणांमध्यें काय फरक आहे ?

सिद्धान्ती—समान जातींतील पदार्थांस एकमेकांपासून विभक्त करणारीं ती **विशेषणें** होत. कमळाला **निळें** असें विशेषण दिलें, म्हणजे तें इतर कमलांपासून निळ्या कमळास विभक्त करितें. पण लक्षणाचा स्वभाव असा आहे कीं, ज्याचें आपण लक्षण करितों, तो पदार्थ सजातीय आणि विजातीय पदार्थांपासून विभक्त होतो. जसें ' आकाश हें अवकाश देणारे आहे ' असें म्हटलें, म्हणजे तें सजातीय पृथ्वी-आदि पंच महाभूतांपासून व विजातीय आत्मादि वस्तूंपासून विभक्त होतें. सारांश, सर्व सजातीय–विजातीयांपासून लक्ष्य पदार्थ **लक्षणानें विभक्त** होतो. आणि विशेषणें केवळ सजातीयांपासून मात्र विशेष्यांस विभक्त करितात. असो; ह्या दृष्टीनें श्रुतीनें सत्यादि लक्षणात्मक विशेषणांचा उपयोग केला आहे. आणि आम्ही प्रथमच बोलून गेलों आहों कीं ' ब्रह्म सत्य, ज्ञान आणि अनंत आहे. ' हें वाक्य लक्षणात्मक आहे.

सत्यादिशब्दा न परस्परं संबध्यन्ते परार्थत्वाद्विशेष्यार्था हि ते। अत एकैको विशेषणशब्दः परस्परं निरपेक्षो ब्रह्मशब्देन संबध्यते। सत्यं ब्रह्म ज्ञानं ब्रह्मानन्तं ब्रह्मेति। सत्यमिति यद्रूपेण यन्निश्चितं तद्रूपं न व्यभिचरति तत्सत्यं, यद्रूपेण निश्चितं यत्तद्रूपं व्यभिचरदनृतमित्युच्यते। अतो विकारोऽनृतं " वाचारम्भणं विकारो नामधेयं मृत्तिकेत्येव सत्यम् " एवं सदेव सत्यमित्यवधारणादतः सत्यं ब्रह्मेति ब्रह्मविकारान्निवर्तयति। अतः कारणत्वं प्राप्तं ब्रह्मणः। कारणस्य च कारकत्वं वस्तुत्वान्मृद्वदचिद्रूपता च प्राप्ताऽत इदमुच्य-

ते ज्ञानं ब्रह्मेति। ज्ञानं ज्ञप्तिरवबोधो भावसाधनो ज्ञानशब्दो ब्रह्मविशेषणत्वात्सत्यान्ताभ्यां सह। न हि सत्यताऽनन्तता च ज्ञानकर्तृत्वे सत्युपपद्यते। ज्ञानकर्तृत्वेन हि विक्रियमाणं कथं सत्यं भवेदनन्तं च। यद्धि न कुतश्चित्प्रविभज्यते तदनन्तम्। ज्ञानकर्तृत्वे च ज्ञेयज्ञानाभ्यां प्रविभक्तमित्यनन्तता न स्यात्। "यत्र नान्यद्विजानाति स भूमा" "अथ यत्रान्यद्विजानाति तदल्पम्" इति श्रुत्यन्तरात्।

सिद्धान्ती—या लक्षणवाक्यांतील तिन्ही शब्दांचा परस्पर कांहीं एक संबंध नाहीं. त्यांचा प्रत्येकाचा अर्थ अत्यंत श्रेष्ठ आहे. त्यांचा अर्थ ब्रह्म हाच आहे. म्हणजे 'सत्यं ब्रह्म' इतकेंच लक्षण केलें तरी ब्रह्माचें स्वरूप-लक्षण होतें. ह्याच्या सिद्धीला 'ज्ञानं ब्रह्म' याची अपेक्षा नसते. आतां प्रत्येक लक्षण ब्रह्मलक्षण करण्याला समर्थ आहे, तरी तीन लक्षणार्थांचीं विशेषणें दिलीं, तीं केवळ मंदमतीलाही ब्रह्माचें स्वरूप समजावें, एतदर्थ होय, सारांश, सत्य, अनंत यांतील प्रत्येक विशेषण इतरांशीं निरपेक्ष असून (संबंधशून्य असून) ब्रह्मशब्दाशीं मात्र त्याचा नित्य संबंध आहे; कारण, प्रत्येकाचा निरपेक्षतेनें 'ब्रह्म' हा अर्थ आहे.

शिष्य—म्हणजे काय?

सिद्धांती—म्हणजे सत्य ब्रह्म आहे, ज्ञान ब्रह्म आहे, आणि अनंत ब्रह्म आहे. असा या वाक्यांचा अर्थ आहे. हीं तिन्हीं लक्षणें ब्रह्मस्वरूपाचें निर्धारणास समर्थ आहेत. असो;—

शिष्य—सत्य म्हणजे काय? भगवन्!

सिद्धान्ती—ज्या स्वरूपानें पदार्थांचा निश्चय होतो, तें रूप त्या पदार्थापासून केव्हांही नाहींसें न होणें, म्हणजे तें सत्य होय. सत्य म्हणजे सत्ता; अस्तित्व. अस्तित्वस्वरूपापासून ब्रह्म केव्हांही व्यभिचरित होत नाहीं, किंवा ब्रह्मापासून अस्तित्व कधींही निराळें होत नाहीं, म्हणून ब्रह्म हें सत्य आहे, किंवा सत्य हें ब्रह्म आहे, असें स्वरूपलक्षण ठरतें. तसेंच ज्या स्वरूपावरून एकाद्या पदार्थाचा निश्चय होतो, तें स्वरूप त्या पदार्थापासून विभक्त झालें म्हणजे तें स्वरूप व तो पदार्थ हीं असत्यं, किंवा अनृत होतात. निळेपणा हें स्वरूप अनृत आहे, कारण कमळें तांबडीं किंवा पांढरीं असतात. अथवा, आकाश निळें असतें. म्हणजे निळेपणा आणि कमल यांचा व्यभिचार होतो. कमळाला सोडून निळेपणा आकाशाकडे जातो व निळेपणा सोडून कमळ पांढरें असतें. याप्रमाणें जेवढे म्हणून विकार आहेत, ते सर्व अनृत म्हणजे असत्य असतात. "कोणताही घटादि विकार केवळ नामात्मक

मात्र असून तो वाणीचा विलास मात्र आहे. मृत्तिका हीच काय ती सत्य वस्तु आहे" ही श्रुति आम्ही म्हणतों, याला प्रमाण आहे. याप्रमाणें सत्ता किंवा अस्तित्व म्हणजे सत्य होय, असें झालें. असा निश्चय झाला म्हणजे, आणि सत्य हेंच ब्रह्म आहे, या वाक्याची ओळख पटली म्हणजे, हें वाक्य-ज्ञान ब्रह्माला सर्व विकारापासून व विकार्य वस्तूंपासून एकीकडे करितें. तात्पर्य, ब्रह्म विकारशून्य आहे, असें ठरवितें.

पूर्व०—ब्रह्म विकारवंत नसेल तर तें सर्व विकारांचें कारण असलें पाहिजे. कारण म्हटलें कीं, तेथें कारकता किंवा कर्तृत्व प्राप्त होतें. कारण, 'कारण' ही वस्तु असते. अर्थातच ही वस्तु मृत्तिकेसारखी अचिद्रूप (ज्ञानशून्य) असावयाची, असें ठरलें. एवंच ब्रह्म म्हणजे अज्ञान असें झालें !

सिद्धान्ती–थांबा, थांबा, याच वाक्यांत "ज्ञान ब्रह्म आहे" हे शब्द विसरूं नका.

शिष्य—ज्ञान म्हणजे काय ?

सिद्धान्ती–ज्ञप्ति किंवा अवबोध हा ज्ञानशब्दाचा अर्थ आहे. ज्ञप्तीपलीकडे ज्ञानशब्दाचा अर्थ घेणें संभवनीय नाहीं. कारण तो ब्रह्माचें विशेषण आहे. आणि त्याच्याबरोबर सत्य आणि अनंत, हींही विशेषणें ब्रह्माचे ठिकाणीं नित्य विद्यमान आहेत.

शिष्य—म्हणजे काय ?

सिद्धांती—म्हणजे असें ज्ञानशब्दाचा अर्थ जर ज्ञानकर्तृत्व, ज्ञाता, असा केला, तर ब्रह्माचे ठिकाणीं सत्यता व अनंतता हीं विशेषणें उत्पन्न होत नाहींत.

पूर्व०—कां बरें ?

सिद्धान्ती—ब्रह्माचे ठिकाणीं जर आपण ज्ञानकर्तृत्वाचा, ज्ञातृत्वाचा, आरोप केला, तर तें ब्रह्म विकारवश होतें. ज्ञातृत्व असण्याला बाहेरील ज्ञेय वस्तूंचा संसर्ग होणें, अत्यंत अवश्य असतें. ज्ञाता व ज्ञेय वस्तू झाल्या कीं विकार ठेवलेला ! पण ब्रह्म विकार्य नाहीं, म्हणून ज्ञातृ नाहीं. ज्ञातृत्व हा विकार आहे. आतांच आपण पाहिले कीं, ब्रह्म हें शुद्ध आहे, विकारवंत नाहीं. तसेंच तें अनंत आहे, त्याला विकार होणें शक्य नाहीं. म्हणून ज्ञातृत्व ह्या विकाराचा आरोप ब्रह्मावर करितां येत नाहीं; अतएव ज्ञान या शब्दाचा ज्ञप्ति किंवा अवबोध किंवा निर्विशेष ज्ञान, हाच कायतो अर्थ आहे, असें ठरतें.

शिष्य—खरेंच आहे. ज्याचां कोणत्याहीप्रकारें विभाग होऊं शकत नाहीं, तेंच अनंत होय. वाक्यांतील ज्ञानशब्दाचा ज्ञानकर्तृत्व असा अर्थ घेतला, तर तें ज्ञानकर्तृत्व हें ज्ञेय वस्तु आणि उत्पन्न झालेलें ज्ञान यांहून निराळें असणार व अर्थात् त्यांची अनंतता नाहींशी होणार. तेव्हां ज्ञान शब्दाचा ज्ञप्ति हाच अर्थ केला पाहिजे. असा

अर्थ करणें यालाच व्याकरणांत भावसाधन असें म्हणतात. तात्पर्य, ज्ञानशब्दाचा निर्विशेष ज्ञान किंवा शुद्ध चिन्मात्रता हाच अर्थ येथें उपपन्न होतो. होयना ?

सिद्धान्ती—ठीक आहे. 'जेथें असतांना, जें झालें असतां, दुसऱ्या वस्तूंचें ज्ञान होतच नाहीं, तो भूमा' व 'जेथें अन्य वस्तूंचें ज्ञान होतें तें अल्प' हा श्रुती आम्ही म्हणतों याला प्रमाण आहेत. सारांश, विशेष ज्ञान न होणें याचें नांव भूमा. भूमा म्हणजे अत्यंत मोठी वस्तु. (आणि विशेष ज्ञान होतें ती अल्प वस्तु परिछिन्न वस्तु) असते, हें श्रुतीचें मनोगत सर्वत्र दृष्टीस पडतें.

नान्यद्विजानातीति विशेषप्रतिषेधादात्मानं विजानातीति चेन्न। भूमलक्षणविधिपरत्वाद्वाक्यस्य। यत्र नान्यत्पश्यतीत्यादि भूम्नो लक्षणविधिपरं वाक्यम्। यथा प्रसिद्धमेवान्योऽन्यत्पश्यतीत्येतदुपादाय यत्र तन्नास्ति स भूमेति भूमस्वरूपं तत्र ज्ञाप्यतेऽन्यग्रहणस्य प्राप्तप्रतिषेधार्थत्वान्न स्वात्मनि क्रियास्तित्वपरं वाक्यम्। स्वात्मनि च भेदाभावाद्विज्ञानानुपपत्तिः। आत्मनश्च विज्ञेयत्वे ज्ञात्रभावप्रसङ्गः। ज्ञेयत्वेनैव विनियुक्तत्वात्। एक एवाऽऽत्मा ज्ञेयत्वेन ज्ञातृत्वेन चोभयथा भवतीति चेन्न युगपत्, अनंशत्वात्। न हि निरवयवस्य युगपज्ज्ञेयज्ञातृत्वोपपत्तिः। आत्मनश्च घटादिवद्विज्ञेयत्वे ज्ञानोपदेशानर्थक्यम्। न हि घटादिवत्प्रसिद्धस्य ज्ञानोपदेशोऽर्थवान्। तस्माज्ज्ञातृत्वे सत्यानन्यानुपपत्तिः। सन्मात्रत्वं चानुपपन्नं ज्ञानकर्तृत्वादिविशेषवत्त्वे सति। सन्मात्रत्वं च सत्यत्वम्, तत्सत्यमिति श्रुत्यन्तरात्। तस्मात्सत्यानन्तशब्दाभ्यां सह विशेषणत्वेन ज्ञानशब्दस्य प्रयोगाद्भावसाधनो ज्ञानशब्दः। ज्ञानं ब्रह्मेति कर्तृत्वादिकारकनिवृत्त्यर्थं मृदादिवदचिद्रूपतानिवृत्त्यर्थं च प्रयुज्यते। ज्ञानं ब्रह्मेतिवचनात्प्राप्तमन्तवत्त्वम्। लौकिकस्य ज्ञानस्यान्तवत्त्वदर्शनात्। अतस्तन्निवृत्त्यर्थमाह—अनन्तमिति।

पूर्वः—'दुसऱ्या कोणत्याही वस्तूंचें ज्ञान होत नाहीं' असें तुम्ही ब्रह्माचें लक्षण करून विशेष वस्तूंचा प्रतिषेध केला आहे. त्यावरून स्पष्ट असा बोध होतो कीं, ब्रह्माला आपलें स्वतःचें ज्ञान तरी असतें. सारांश, ब्रह्माला स्वतःची तरी जाणीव असावी व असली पाहिजे. अशा रीतीनें तें ज्ञातृ झालेंच.

सिद्धान्ती—तसेंही नाहीं. आतांच जें श्रुतीचें वाक्य उद्धृत केलें आहे, त्यांत भूमा या पदाचा लक्षण-विधि सांगितला आहे. 'जेथें दुसऱ्या वस्तूंचें दर्शन होत नाहीं,

इत्यादि जें भूमा-शब्दाचें लक्षणविधिपर वाक्य आहे, त्याचें तात्पर्य असें आहे. पहाः ही गोष्ट प्रसिद्ध आहे कीं, एक वस्तु दुसऱ्या वस्तूस पाहत असते. ही प्रसिद्ध गोष्ट स्वीकृत करून श्रुति म्हणते कीं, जेथें ही प्रसिद्ध गोष्टही होत नाहीं, जेथें एक वस्तु दुसऱ्या वस्तूंस पाहील असा संबंध नाहीं, तो भूमा असें भूम स्वरूपाचें लक्षण श्रुतीनें केलें आहे. त्यावरून हें स्पष्ट कळून येतें कीं, अन्य वस्तूचें ग्रहण करणें या अज्ञान-प्राप्त झालेल्या प्रसिद्ध गोष्टीचा पूर्ण निषेध करण्यासाठीं अन्य-वस्तूंचा निर्देश केला आहे. अन्याच्या प्रतिषेधासाठीं हें वाक्य आहे. स्वतःमध्यें ज्ञातृत्वाची क्रिया असते, असें सांगण्याकरितां या वाक्याची योजना नाहीं. शिवाय, ब्रह्मस्वरूपामध्यें तिन्ही प्रकारच्या भेदांचा अभाव असल्यामुळें स्वरूपांत ज्ञातृत्व असणें संभवनीयच नाहीं. शिवाय आत्मा स्वतःलाच जाणावयास लागला म्हणजे आत्मस्वरूपांतील ज्ञातृत्वाचाही प्रतिषेध होणार.

शिष्य—हें नाहीं मला समजलें.

सिद्धान्ती—आत्म्याला आत्मवस्तूचें ज्ञान होतें, ह्या म्हणण्यानें आत्मवस्तु **ज्ञेय** म्हणजे **जाणण्यास योग्य** अशीं झाली. म्हणजे ज्या ज्ञातृत्वाचा आरोप हे आक्षेपक करीत आहेत, तें ब्रह्म-ज्ञातृत्व नाहींसें झालेंच पाहिजे. कोणतीही वस्तु केव्हांही ज्ञेय आणि ज्ञानी असणें शक्य नाहीं. ती ज्ञेय असते, किंवा ज्ञानी असते. मग आत्मवस्तु ज्ञेय झाली, तर तुमचें ज्ञातृत्व कोठें राहिलें ?

पूर्वः—असें कां म्हणतां ? आत्मा ही वस्तु सर्वविलक्षण आहे. तेव्हां तिच्या ठिकाणीं ज्ञेयत्व व ज्ञातृत्व हे दोन्हीही धर्म एककाळीं विद्यमान असणें शक्य आहे.

सिद्धान्ती—नाहीं. दोन्ही धर्म एककाळीं असणें शक्य नाहीं. कारण ब्रह्मामध्यें अंश म्हणजे भाग नाहींत. भाग असतील तर एक भाग पाहणारा आणि दुसरा भाग पाहण्याची वस्तु होणें संभवनीय आहे. ब्रह्म-भागशून्य आहे. आपणां मानवी जीवांस शरीरादिकांची उपाधि आहे. या जड उपाधींचें ज्ञान जीवात्म्याला होतें, पण आपलाही आत्मा असणाऱ्या ब्रह्माला उपाधि नाहीं, म्हणून त्याला स्वतःचें ज्ञातृत्व असणें शक्य नाहीं. सारांश, ब्रह्म निरवयव आहे, म्हणून तेथें एककाळीं ज्ञेयत्व आणि ज्ञातृत्व हे धर्म उपपन्न होत नाहींत, शिवाय, आपल्यास घरादिकांचें ज्ञान होतें, त्याप्रमाणेंच आत्मवस्तु ज्ञात होण्यासारखी असेल, तर ब्रह्म हें ज्ञानरूप आहे, असा जो श्रुतीनें उपदेश केला आहे, तोही अनर्थक होईल.

शिष्य—कां बरें ?

सिद्धान्ती—अरे, घटादिकांसारख्या प्रसिद्ध असणाऱ्या अल्प परिच्छिन्न वस्तूला 'ही ज्ञानरूप वस्तु आहे' जसें कोणी कधीं तरी आपल्यास सांगतो काय ? व तो उपदेश सार्थ तरी होईल काय ? बरें; परिछिन्न घटाप्रमाणें ज्ञात्या आत्म्याला आत्मवस्तु

समजते, असें म्हटलें कीं तिला परिच्छिन्नत्व येतें. म्हणून ब्रह्मवस्तूमध्यें ज्ञातृत्व आहे, असें म्हटलें तर ती वस्तू परिच्छिन्न होते. मग तिला 'अनंत' हें विशेषण योग्य कसें होणार? नाहीं व्हावयाचें. याचप्रमाणें ब्रह्म वस्तूचे ठिकाणीं श्रुतीनें सत्यत्व स्थापिलें आहे, तेंही अयोग्य होईल, जर आपण ब्रह्माचे ठिकाणीं विकारयुक्त ज्ञानकर्तृत्वादि विशेष धर्मांचा आरोप केला, तर! सत्यत्व म्हणजेच समानत्व. "तें सत्य आहे" ही श्रुति 'ब्रह्म स्वज्ञातृ नाहीं' ह्या सिद्धांताचें समर्थन करणारी आहे. या सर्व विवेचनाचें तात्पर्य हें आहे कीं, ज्या पक्षीं सत्य आणि अनंत या शब्दांसह ज्ञानशब्दाचा विशेषणत्वानें प्रयोग झाला आहे, त्यापक्षीं ज्ञान या शब्दाचा अर्थ, ज्ञप्ति, ज्ञानक्रिया, सामान्यत्व, निर्विशेष ज्ञान, शुद्ध चिन्मात्रता, असाच केला पाहिजे. हेंच भावसाधन होय. "ज्ञान ब्रह्म आहे" हें वाक्य कर्तृत्वादि कारकनिवृत्तीसाठीं व मृत्तिकादि वस्तूंची जडता ब्रह्माचे ठिकाणीं येऊं नये, म्हणून उपयोजिलें आहे. येथें कार्यकारणसंबंध नाहीं व जडताही नाहीं, हें "ज्ञान ब्रह्म आहे" या वाक्यावरून सिद्ध होतें. कारण उघड आहे कीं, निर्विशेष-ज्ञानाचे ठिकाणीं जडता, अज्ञानत्व, संभवत नाहीं. तसेंच शुद्ध-ज्ञानाचे ठिकाणीं कर्तृत्व, करणत्व इत्यादि कारकांचाही संभव असत नाहीं.

पूर्व०—बरें. हें ठीक आहे. पण "ज्ञान ब्रह्म आहे" हें वाक्य उच्चारतांक्षणीं 'ब्रह्म सान्त आहे, अनंत नाहीं' असा अर्थ स्पष्ट होतो. व्यवहारांतच पहा ना! आपल्यास जें ज्ञान असतें, तें उत्पन्नविनष्ट होणारें असतें. पूर्वी नसलेलें ज्ञान आपल्यास होतें व असलेलें ज्ञान विसरून जातें किंवा नाहींसें होतें. तात्पर्य, ज्ञान उत्पन्न-विनष्ट होणारें म्हणजे सादि व सान्त आहे, अनंत नाहीं. हा सर्व परिणाम "ज्ञान ब्रह्म आहे" या वाक्यावरून झाला.

सिद्धान्ती—ही तुमची शंका दूर करण्यासाठींच श्रुती म्हणत आहे कीं, 'अनंत हें ब्रह्माचें लक्षण आहे.'

सत्यादीनाननृतादिधर्मानिवृत्तिपरत्वाद्विशेष्यस्य ब्रह्मण उत्पलादिवदप्रसिद्धत्वात्।

"मृगतृष्णाम्भसि स्नातः खपुष्पकृतशेखरः।
एष वन्ध्यासुतो याति शशशृङ्गधनुर्धरः" ॥

इतिवच्छून्यार्थतैव प्राप्ता सत्यादिवाक्यस्येति चेन्न। लक्षणार्थत्वात्। विशेषणत्वेऽपि सत्यादीनां लक्षणार्थप्राधान्यमित्यवोचाम। शून्ये हि लक्ष्येऽनर्थकं लक्षणवचनं लक्षणार्थत्वान्मन्यामहे न शून्यार्थतेति। विशेषणार्थत्वेऽपि च सत्यादीनां स्वार्थापरित्याग एव।

शून्यार्थत्वे हि सत्यादिशब्दानां विशेष्यनियन्तृत्वानुपपत्तिः । सत्याद्यर्थैरर्थवत्त्वे तु तद्विपरीतधर्मवद्भ्यो विशेषेभ्यो ब्रह्मणो विशेष्यस्य नियन्तृत्वमुपपद्यते, ब्रह्मशब्दोऽपि स्वार्थेनार्थवानेव । तत्रानन्तशब्दोऽन्तवत्त्वप्रतिषेधद्वारेण विशेषणम् । सत्यज्ञानशब्दौ तु स्वार्थसमर्पणेनैव विशेषणे भवतः ।

पूर्व०—तुम्ही सत्य म्हणजे अनृत धर्मांची निवृत्ति करणारा विशेष, ज्ञान म्हणजे ज्ञानाची निवृत्ति करणारा धर्म, इत्यादि निवृत्तिपर लक्षणें सांगून ब्रह्म ही वस्तुच नाहीं, असें ठरवीत आहांत. तुमचीं सर्व विशेषणें अभावाचीं दर्शक असल्यामुळें ज्या ब्रह्माचें लक्षण तुम्ही करूं पाहत अहांत, तें वस्तुतः नाहीं, असें म्हणण्यास काय प्रत्यवाय आहे ? अहो ! घटकाभर असें निःपक्षपात बुद्धीनें पाहूं या.

आम्ही व्यवहारांत उत्पलादिकाचें लक्षण करितों तेव्हां ते उत्पलादि (कमलादि) पदार्थ इतर प्रमाणांनीं सिद्ध झालेले असतात. तुमचें ब्रह्म तर कोणत्याही प्रमाणाला गोचर नाहीं; असिद्ध असें आहे; तेव्हां ' मृगजलाच्या ओघामध्यें स्नान केलेला हा वन्ध्यासुत मस्तकावर आकाश-पुष्पाचा तुरा खोऊन व हातांत शशशृंगरूपी धनुष्य धारण करून चालला आहे. ' असाच तुमच्या ब्रह्माचा प्रकार म्हणावयाचा ! मृगजलीं स्नान करणें, आकाशपुष्प मिळविणें, किंवा सश्याच्या शिंगाचें धनुष्य करणें, ह्या असंभवनीय लक्षणांनीं युक्त असणारा वन्ध्यासुत (वंधेला सुत होणें हेंही अशक्यच आहे !) जातो ! ह्याचप्रमाणें अभाव सांगणारीं हीं तुमचीं तिन्हीं लक्षणें लक्ष्य वस्तुही (ब्रह्म हेंही) अभावात्मक आहे, असें स्पष्ट सांगतात; ब्रह्माची सिद्धि करणारें प्रमाणच नाहीं. तेव्हां हें स्पष्ट होतें कीं, कोणत्याही प्रमाणांनीं न सिद्ध होणारें ब्रह्म तुमच्या या अभावात्मक अनृतादि तिन्हीं लक्षणांनीं अभावात्मक होतें. तात्पर्य, तुमचें ब्रह्म अर्थशून्य आहे !

सिद्धान्ती—असें नाहीं. सर्व विशेषणांचा अर्थ लक्षणार्थक आहे. असलेल्या वस्तूंचें लक्षण करणें हा त्यांचा धर्म आहे. हीं तिन्हीं विशेषणें लक्षणार्थप्रधान आहेत, असें आम्हीं प्रथमच सांगितलें आहे. जर आमचें लक्ष्य (लक्षण करण्याची वस्तू) शून्यरूप असेल, तर तेथें लक्षण हा शब्द अयोग्य होईल. पण ज्या अर्थी लक्षण-शब्दाची योजना श्रुतीनें केली आहे, त्या अर्थी ब्रह्म हें शून्यरूप नाहीं, असेंच आम्ही म्हणणार. शिवाय, सत्यज्ञानादि जे विशेषणार्थक शब्द उपयोजिले आहेत, ते विशेषणात्मक आहेत, तरी आपापल्या अर्थांचा त्याग करीतच नाहींत.—

शिष्य—हें मला समजलें नाहीं.

सिद्धान्ती—सांगतों ऐक.

सिद्धान्ती—शून्यच अर्थ असेल तर सत्यादि शब्दाचें विशेष्य जें ब्रह्म, त्याचें नियंतृत्वाचीं, विशेषणभाक्त्वाचीं, हीं विशेषणें ब्रह्माचें लक्षण करून तें नियंत्रित करितात, त्याची अनुपपत्ति होते. म्हणजे सत्यादि शब्द शून्याचीं विशेषणें आहेत, असें होऊन त्यांचें विशेषणत्व नाहींसें होईल प्रत्येक विशेषण आपल्या विशेष्याला नियमित करीत असतें. सत्यादि शब्दांच्या अर्थाच्या योगानें कोणत्या तरी अस्तित्व असणाऱ्या वस्तूंचीं हे शब्द विशेषणें असतील तर, ते विपरीत धर्म असणाऱ्या विशेषणांपासून ब्रह्माला काढून त्याचें नियंतृत्व संपादितात आणि तें उपपन्न आहे. ब्रह्म शब्द हाही स्वयंभूत्वानें अर्थवान् आहे. म्हणून शून्यार्थाची प्राप्ति होते, असें म्हणणें योग्य नाहीं.

शिष्य—मला हा भाग नीटसा समजला नाहीं.

सिद्धान्ती—पहाः सत्यादि शब्द एखाद्या सार्थ-वस्तूचीं (अस्तित्ववाचक वस्तूचीं) विशेषणें आहेत, असें पत्करिलें, म्हणजे ते ते शब्द ब्रह्माला इतर धर्म असणाऱ्या वस्तूंपासून निराळे करितात; म्हणजे असद्रूपी व अज्ञानरूपी ज्या वस्तू आहेत, त्या वस्तूंपासून ब्रह्म हें सत्यादि विशेषणांनीं निराळें होतें, असा अर्थ प्रतीत होतो. आणि ब्रह्मशब्दाचा मूळ अर्थ अत्यंत मोठी वस्तु, असा सर्व वादि-प्रतिवादींस मान्य आहे. म्हणून येथें 'सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म' या सर्व वाक्याचा अर्थ शून्यवाचीं होत नाहीं. तात्पर्य हेंः ब्रह्मशब्दाचा अर्थ शून्यवाची नाहीं. सत्यादि-लक्षणात्मक विशेषणें हीं अस्तित्ववाचक ब्रह्माला विशेषित करितात, म्हणून तीं सार्थ आहेत; तेव्हां त्यांचें सार्थत्व म्हणजे ब्रह्मावितिरिक्त पदार्थांपासून ब्रह्माला व्यावृत्त करणें होय. अर्थात् आक्षेपकांचा आक्षेप अर्थशून्य झाला! असो; सत्य आणि ज्ञान या विशेषणांचे काय अर्थ आहेत, हें आपण पाहिलें. आतां अनंत शब्द हें विशेषण अंतवत्त्वाचा, सान्तत्वाचा, विनाशाचा, प्रतिषेध करितें. विनाशी वस्तूंचा प्रतिषेध करून अनंतत्व हें ब्रह्माचें विशेषण होतें; पण सत्य आणि ज्ञान हे शब्द ब्रह्मामध्यें आपल्या अर्थाचें समर्पण करून ब्रह्माचीं विशेषणें होतात; म्हणजे असेंः सत्यत्व म्हणजे नित्यत्व होय; हें अनित्याचा विरोध करितें. अर्थात् आपला नित्यत्वाचा अर्थ ब्रह्माला समर्पण करून ब्रह्माचा आणि अनित्यत्वाचा कांहीं एक संबंध नाहीं, विरोध आहे; असें सत्य दाखवितें. 'ज्ञानशब्दही' व्यावहारिकज्ञानाचा निरोध करून आपला ज्ञानसामान्यत्वाचा अर्थब्रह्माचे ठिकाणीं समर्पण करितो. अनंताची मात्र तशीं स्थिति नाहीं. तो केवळ अंतवान् वस्तूंची निवृत्ति ब्रह्मापासून करितो.

तस्माद्वा एतस्मादात्मन इति ब्रह्मण्येवाऽऽत्मशब्दप्रयोगाद्वेदितुरात्मा ब्रह्म। एतमानन्दमयमात्मानमुपसंक्रामतीति च तत्प्रवेशाच्च। तत्सृष्ट्वा तदेवानुप्राविशदिति च तस्यैव जीवरूपेण शरीरप्रवेशं दर्शयति। अतो वेदितुः स्वरूपं ब्रह्म। एवं तर्ह्यात्मत्वाज्ज्ञानकर्तृत्वम्। आत्मा

ज्ञातेति हि प्रसिद्धम् । सोऽकामयतेति च कामिनो ज्ञानकर्तृत्वप्रसिद्धिः । अतो ज्ञानकर्तृत्वाज्ज्ञप्तिर्ब्रह्मेत्ययुक्तमनित्यत्वप्रसङ्गाच्च । यदि नाम ज्ञप्तिर्ज्ञानमिति भावरूपता ब्रह्मणस्तथाऽप्यनित्यत्वं प्रसज्येत पारतन्त्र्यं च । धात्वर्थानां कारकापेक्षत्वात् । ज्ञानं च धात्वर्थोऽतोऽस्यानित्यत्वं परतन्त्रता च । न, स्वरूपाव्यतिरेकेण कार्यत्वोपचारात् । आत्मनः स्वरूपं ज्ञप्तिर्न ततो व्यतिरिच्यतेऽतो नित्यैव । तथाऽपि बुद्धेरुपाधिलक्षणायाश्चक्षुरादिद्वारैर्विषयाकारेण परिणामिन्या ये शब्दाद्याकारावभासास्त आत्मविज्ञानस्य विषयभूता उत्पद्यमाना एवाऽऽत्मविज्ञानेन व्याप्ता उत्पद्यन्ते । तस्मादात्मविज्ञानावभास्याश्च ते विज्ञानवाच्याश्च धात्वर्थभूता आत्मन एव धर्मा विक्रियारूपा इत्यविवेकिभिः परिकल्प्यन्ते ।

सिद्धान्ती—'त्या ह्या आत्म्यापासून' असें श्रुतिवाक्य आहे. या वाक्यांत श्रुतीनें ब्रह्माचे ठिकाणीं 'आत्म' शब्दाचा उपयोग केला आहे, त्यावरून हें सिद्ध होते कीं, जाणणाऱ्या मनुष्याचा आत्मा म्हणजेच ब्रह्म होय.

शिष्य—हें कसें ?

सिद्धान्ती—श्रुतीनें ब्रह्माचें लक्षण सांगून ब्रह्मज्ञाचे प्रकरणास प्रारंभ केला आहे. 'तस्मात्' म्हणजे **त्या**पासून व 'एतस्मात्' **ह्या**पासून. तें म्हणजे श्रुतिकथित आणि हें म्हणजे प्रत्यक्ष अनुभूत. समजलें ? असो; पुनः; 'ह्या आनंदमय आत्म्याजवळ–आत्मा–जातो' व 'त्यामध्यें प्रवेश करितो' असें श्रुतीचें म्हणणें आहे. म्हणून हा जीवात्मा हाच परमात्मा आहे, असें सिद्ध होतें. शिवाय, 'त्याची उत्पत्ति करून त्यांतच प्रवेश करिता झाला' ही श्रुतिही परमात्म्यानेंच जीवस्वरूप घेऊन शरीरांत प्रवेश केला, असें सांगते. म्हणून जाणणाऱ्या पुरुषाचा आत्मा ब्रह्मरूप आहे, ब्रह्मज्ञच ब्रह्म आहे, असें ठरतें.

पूर्व०—फार चांगलें ! परमात्माच जर जीवात्मा असेल, तर तो ज्ञाता आहे, असेंही सिद्ध होईल. पहा कीं, जीवात्मा ज्ञाता असतो, हें सर्वांस मान्य आहे. "त्यानें इच्छा केली" अशी कामी असणाऱ्या आत्म्याची ज्ञातृत्वासंबंधानें प्रसिद्धि आहे. श्रुतिही तेंच म्हणते. म्हणून आत्मा म्हणजे ब्रह्म हें **ज्ञाते** शालें, ज्ञानी होण्याचा धर्म याचेठिकाणीं आला ! अर्थातच 'ज्ञप्ति हें ब्रह्माचें विशेषण आहे, तेथें 'ज्ञेयत्व आणि ज्ञातृत्व नाहीं' असें जें तुम्ही मागें म्हणालांत, तें अनुपपन्न होतें; शिवाय, ब्रह्माचे ठिकाणीं ज्ञातृत्वाचा धर्म आल्यामुळें तें अनित्य होण्याचा प्रसंग येतो. असें हें सर्व तुमच्याच म्हणण्यावरून सिद्ध होतें. आतां पुन्हा; ज्ञान म्हणजे ज्ञप्ति इत्यादि भावसाधनाचें पिलूं काढून तुम्ही आपला अर्थ सजविला होता, त्या अर्थानेंही ब्रह्माला

अनित्यत्व व परतंत्रता प्राप्त होतें. ब्रह्म कामी म्हणून ज्ञातृ, म्हणून अनित्य होय. एवंच ब्रह्म अनित्य म्हणजे परतंत्र झालें. अशी ब्रह्माची परतंत्रता व अनित्यता स्पष्ट होते.

शिष्य—ती कशी ?

पूर्व०—ज्ञप्ति हें कारक आहे. यांत 'ज्ञा' हा धातु आहे. कोणत्याही धातूचा अर्थ घेतला तरी त्याला कारकाची, कर्त्यादिकांची अपेक्षा असते. ज्ञान हा एका धातूचा अर्थ आहे; म्हणून त्याला कारकाची गरज असलीच पाहिजे. ज्ञान झालें कीं, ज्ञान होणारा कोणी तरी पुरुष असलाच पाहिजे; म्हणून त्या पुरुषाच्या आधीन हें ज्ञान झालें, **परतंत्र** झालें. आणि पुरुष केव्हां ज्ञाता असेल, केव्हां नसेल; ह्या दृष्टीनें तें ज्ञानही **अनित्य** झालें. एवंच भावसाधन करूनही ज्ञानाला अनित्यत्व आणि पारतंत्र्य प्राप्त होतात.

सिद्धान्ती—नाहीं, तसें नाहीं. येथें ज्ञानकार्यत्वाचा जो उपचार होतो (जो विकार होतोसा दिसतो) तो होत असतां ब्रह्माचें स्वस्वरूप न सुटतांच होत असतो. ज्ञानाचें स्वरूप नित्य आणि स्वतंत्र आहे. केव्हां केव्हां कार्याचें स्वरूप प्राप्त होतेंसें दिसतें. किंवा आपण त्याच्यावर कार्यत्वाचा आरोप करितों. तथापि, ज्ञान आपलें स्वरूप केव्हांही सोडीत नाहीं. ज्ञान हें आत्म्याचें स्वरूप आहे. तो ज्ञानापासून केव्हांही व्यतिरिक्त होत नाहीं. ज्ञप्ति हीही स्वरूपापासून केव्हांही निराळी होत नाहीं. म्हणून ती नित्यच आहे. तथापि तुम्ही म्हणतां तशी बुद्धि ही उपाधि-लक्षणात्मक आहे. म्हणजे, ती नेहमीं इंद्रियादिकांनीं सोपाधिक होतें. आणि ती नेत्रादि इंद्रियांच्या द्वारांनीं विषयाकार होते. म्हणून तिला रूपादि आकारांचा अवभास होतो, रूप-शब्दादिकांचें ज्ञान होतें. तथापि ते ते अवभास किंवा तें तें विशेष ज्ञान, हीं साक्षी आत्मविज्ञानाचे विषय होतात आणि उत्पन्न-विनष्ट होतात. असें त्यांचें स्वरूप आहे, उत्पन्नविनष्ट होतांनाहीं हीं रूपरसगंधादि विशेष ज्ञानें आत्मविज्ञानानें व्याप्त झालेलीं असतात. सारांश, आत्मविज्ञानाच्या अधिष्ठानावर हीं विशेष ज्ञानें उत्पन्न-विनष्ट होत असतात. असें आहे; म्हणून म्हणजे आत्मविज्ञानाचे ते अवभास आहेत, त्यांनाहीं विज्ञानशब्दानें ओळखण्याचा संप्रदाय आहे, धात्वर्थही तसाच आहे, म्हणूनच 'तें आत्म्याचेच धर्म आहेत, त्या त्या रूपांनीं आत्मा विकृत होतो,' असें अविवेकी लोक म्हणत असतात. परंतु हा सर्व भ्रम आहे; आत्मा (ज्ञप्ति) विकृत होत नाहीं. आत्म्याला विकार होतो, असें अज्ञानी लोक म्हणतात. अर्थात् ही भ्रांति आहे.

यत्तु त (य) द्ब्रह्मणो विज्ञानं तत्सवितृप्रकाशवदग्न्युष्णवच्च ब्रह्मस्वरूपाव्यतिरिक्तं स्वरूपमेव तत्। न तत्कारणान्तरसव्यपेक्षम्। नित्यस्वरूपत्वात्। सर्वभावानां च तेनाविभक्तदेशकालत्वात्कालाकाशादिकारणत्वाच्च निरतिशयसूक्ष्मत्वाच्च न तस्यान्यद्विज्ञेयं सूक्ष्मं

व्यवहितं विप्रकृष्टं भूतं भवद्भविष्यद्वाऽस्ति तस्मात्सर्वज्ञं तद्ब्रह्म । मन्त्रवर्णाच्च—

"अपाणिपादो जवनो ग्रहीता पश्यत्यचक्षुः स शृणोत्यकर्णः ।
स वेत्ति वेद्यं न च तस्यास्ति वेत्ता तमाहुरग्र्यं पुरुषं महान्तम्"इति ।
"न हि विज्ञातुर्विज्ञातेर्विपरिलोपो विद्यतेऽविनाशित्वान्न तु तद्द्वितीयमस्ति" इत्यादिश्रुतेश्च ।

सिद्धान्ती—सरोसर पाहिलें असतां सूर्य आणि प्रकाश, अग्नि आणि उष्णता हीं जशीं नित्य सहचारीं असतात, तसेंच ब्रह्म आणि विज्ञान यांचें नित्य साहचर्य असतें. इतकेंच नव्हे; तर स्वरूपच ज्ञान आहे. ज्ञान म्हणजे ब्रह्म आणि ब्रह्म म्हणजे ज्ञान होय. हें निर्विशेष आणि स्वतंत्र असतें. तसेंच तें स्वरूपतः नित्य आहे; म्हणून त्याला कोणत्याही अन्य कारणाची अपेक्षा नसते. कोणत्याही देशीं व कोणत्याही कालीं तें ज्ञान सर्वदृश्य-पदार्थांचें अधिष्ठान असल्यामुळें व काल, आकाश इत्यादिकांचें तें कारण असल्यामुळें, तसेंच तें अत्यंत सूक्ष्म असल्यामुळें ब्रह्माला अज्ञेय (समजण्यास योग्य नाहीं,) अशी किंवा सूक्ष्म स्थूल. जवळची किंवा लांबची, कोणतीही दुसरी गोष्ट त्रिकालांत किंवा त्रैलोक्यांत विद्यमान असत नाहीं. म्हणून तें ब्रह्म सर्वज्ञ आहे. "हस्त-पादादिकांच्या अभावीं तो परमात्मा सर्व वस्तू ग्रहण करितो आणि वाटेल तिकडे अतिशय जलद जातो. नेत्र नसून तो बघतो, व कान नसून ऐकतो. तो सर्वज्ञ, सर्वजाण आहे; पण त्याला मात्र कोणी जाणत नाहीं. त्या पुरुषाला—परमात्म्याला—आदिपुरुष महान् व पुरुषोत्तम असें म्हणतात." "विज्ञात्याच्या-परमात्म्याच्या-विज्ञानाचा विपरिलोप (सर्वथा विनाश) केव्हांही होत नाहीं, कारण तो स्वतः अविनाशी आहे. तसेंच तो अद्वितीय आहे." इत्यादि मंत्रवर्ण आणि श्रुति आम्ही म्हणतों त्याप्रमाणें ब्रह्माच्या सर्वज्ञत्वाविषयीं प्रमाण आहेत.

विज्ञातृस्वरूपाव्यतिरेकात्करणादीनिमित्तानपेक्षत्वाच्च ब्रह्मणो ज्ञानस्वरूपत्वेऽपि नित्यत्वप्रसिद्धरतो नैव धात्वर्थस्तदक्रियारूपत्वात् । अत एव च न ज्ञानकर्तृ, तस्मादेव च न ज्ञानशब्दवाच्यमपि तद्ब्रह्म । तथाऽपि तदाभासवाचकेन बुद्धिधर्मविषयेण ज्ञानशब्देन तल्लक्ष्यते न तूच्यते, शब्दप्रवृत्तिहेतुजात्यादिधर्मरहितत्वात् । तथा सत्यशब्देनापि सर्वविशेषप्रत्यस्तमितस्वरूपत्वाद्ब्रह्मणो बाह्यसत्तासामान्यविषयेण सत्यशब्देन लक्ष्यते सत्यं ब्रह्मेति न तु सत्यशब्दवाच्यमेव ब्रह्म । एवं सत्यादिशब्दा इतरेतरसंनिधावन्योन्यनियम्यनियामकाः सन्तः सत्यादिशब्दावाच्यात्तन्निवर्तका ब्रह्मणो

लक्षणार्थाश्च भवन्तीत्यतः सिद्धं " यतो वाचो निवर्तन्ते । अप्राप्य मनसा सह " " अनिरुक्तेऽनिलयने " इति चावाच्यत्वं नीलोत्पलवदवाक्यार्थत्वं च ब्रह्मणः ।

पूर्वः—अहो, तुमच्या ब्रह्माचा आणि ज्ञातृस्वरूपाचा नित्य विरह आहे, ब्रह्माला नेत्रकर्णादि इंद्रियें व हस्तपादादि अवयव नाहींत, म्हणून तुमच्या ज्ञानस्वरूपीही ब्रह्माची नित्यत्व प्रसिद्धि आहे! तथापि, त्याचें स्वरूप घटविणारें ज्ञान हें 'ज्ञा=जाणणें' या धातूपासून सिद्ध होत नाहीं. कारण तें ब्रह्म अक्रिय आहे; आणि धातूचा अर्थ क्रियारूप आहे. तात्पर्य येथें ज्ञान नाहीं.

सिद्धांती—श्रुतिप्रणीत ब्रह्म विकारी नाहीं. स्वतंत्र आहे. याच कारणासाठीं तें ज्ञानकर्तृ नाहीं. तसेंच याच कारणासाठीं ज्ञानशब्दानें सुद्धां श्रुतिप्रणीत ब्रह्म वाच्यही नाहीं.

शिष्य—म्हणजे काय?

सिद्धान्ती—अश्व हा शब्द जसा अश्वपदार्थवाचक आहे, तसा ज्ञान शब्द ब्रह्मवस्तूचा वाचक नाहीं. हें खरें; तथापि बुद्धीचा ज्ञान हा विशेष धर्म असल्यामुळें तो शब्द केवळ ब्रह्मस्वरूपाच्या आभासाचा वाचक होतो. आणि तोच शब्द ब्रह्माचें लक्ष्यवृत्तीनें प्रदर्शन करितो.

शिष्यः—नाहीं समजलें.

सिद्धान्ती—लहान मुलाला चंद्र दाखवावयाचा असला म्हणजे 'तो झाडाच्या फांदीवर बसला आहे.' असें सांगून मुलाचें लक्ष आकाशस्थ चंद्राकडे वळवितात. त्याच शासाचंद्रन्यायानें ज्ञान हा शब्द ब्रह्माचा लक्षक होतो. 'फांदीवरील चंद्र ही शब्दश्रेणी आकाशस्थ चंद्राची वाचक नाहीं, त्याप्रमाणें ज्ञानशब्दही ब्रह्माचा वाचक नाहीं, तो ब्रह्माचा लक्षक मात्र होतो. कारण उघडच आहे कीं, कोणत्याही शब्दाची प्रवृत्ति होते, ती तिचे हेतू जात्यादि धर्म असतात, म्हणून होते. 'ही काळी गाय' असें म्हटलें म्हणजे काळेपणा हा गुण आणि गोजातीतील एक व्यक्ति ही जाती, इत्यादि धर्म प्रकट होत असतात. ब्रह्माला जाति नाहीं, किंवा गुणधर्म नाहींत. म्हणून कोणताही शब्द ब्रह्मवस्तूचा वाचक व्हावयाचा नाहीं.

शिष्य—ह्याचप्रमाणें सत्यशब्दाचीही वाट लागणार तर मग?

सिद्धान्ती—होय. जेथें सर्वविशेषांचा अस्त झालेला आहे, असें ब्रह्माचें स्वरूप असल्यामुळें आणि सर्व इष्ट पदार्थांत जी सामान्य सत्ता असते—(अस्तित्व असतें) तोच सत्यशब्दाचा विषय असल्यामुळें सत्य हाही शब्द ब्रह्माचा लक्षक होतो. वाच्य होत नाहीं. " सत्य हें ब्रह्म आहे. " असें जेव्हां श्रुति म्हणते, तेव्हां सत्यशब्दानें ब्रह्मवस्तु वाच्य आहे' असें तिचें मनोगत नसतें. असो; याप्रमाणें सत्यादि शब्द परस्पराजवळ स्वतंत्रतेनें आले असतांही परस्परांचे नियामक होतात व परस्परां-

कडून नियमित होतात. अर्थातच या नियम्य-नियामक भावामुळें सत्यशब्दानें वाच्य असणारें जड व इतर वस्तू व ज्ञानशब्दानें वाच्य असणारा सोपाधिक जीव इत्यादिकांची, सहजच निवृत्ति होते.

शिष्य—म्हणजे ज्ञानशब्दाच्या सन्निधीनें जडाची निवृत्ति व सत्यशब्दामुळें सोपाधिक जीवाची (परिच्छिन्न ज्ञात्याची) निवृत्ति होते. सारांश, लक्ष्य ब्रह्मा शिवाय इतर सर्व पदार्थांची निवृत्ति " सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म " या लक्षणानें होते, असें सिद्ध झालें.

सिद्धांती—म्हणूनच आम्ही सत्यादिशब्दास ' लक्षणार्थ ' असें म्हटलें होतें. हे शब्द वाचक नाहींत, लक्षक आहेत, ही गोष्ट तुला समजलीना ? अर्थात् " जेथून वाणी मनासह परत फिरते, जें वाणीला व मनाला ' अगोचर आहे ' " ज्याचें निर्वचन करितां येत नाहीं, व ज्याला राहण्याचें कोणचेंही ठिकाण नाहीं " इत्यादि श्रुती सार्थ होतात आणि ब्रह्मवस्तूचें अवाच्यत्व सिद्ध होतें. ' तें कमळ निळें आहे.' या वाक्यांतील प्रत्येक पद आपापल्या पदार्थाचे गुणधर्माचें वाचक आहे, तसा येथें प्रकार नाहीं. तात्पर्य, वाक्यांतील पदांच्या वाचकत्वानें किंवा वाक्यार्थानें ब्रह्मस्वरूपाचें वर्णन व्हावयाचें नाहीं. अर्थात्, सत्यज्ञानादि शब्दांनीं उत्पन्न होणारें कारकत्व, अनित्यत्व व सांतत्व हीं ब्रह्माला स्पर्श करीत नाहींत.

तद्यथाव्याख्यातं ब्रह्म यो वेद विजानाति निहितं स्थितं गुहायाम् । गूहतेः संवरणार्थस्य निगूढा अस्यां ज्ञानज्ञेयज्ञातृपदार्था इति गुहा बुद्धिः । गूढावस्यां भोगापवर्गौ पुरुषार्थाविति वा तस्यां परमे प्रकृष्टे व्योमन्व्योम्न्याकाशेऽव्याकृताख्ये । तद्धि परमं व्योम " एतस्मिन्खल्वक्षरे गार्ग्याकाशः " इत्यक्षरसंनिकर्षात् । गुहायां व्योम्नीति वा सामानाधिकरण्यादव्याकृताकाशमेव गुहा, तत्रापि निगूढाः सर्वे पदार्थास्त्रिषु कालेषु कारणत्वात्सूक्ष्मतरत्वाच्च । तस्मिन्नन्तर्निहितं ब्रह्म । हार्दमेव तु परमं व्योमेति न्याय्यं विज्ञानाङ्गत्वेनोपासनाङ्गत्वेन व्योम्नो विवक्षितत्वात् ।

सिद्धान्ती—असो, ज्या ब्रह्मस्वरूपाचें विवेचन एवढा वेळ केलें, तें ' अंतःकरणांतील गुहेमध्यें राहणारें ब्रह्म जो स्पष्टपणानें जाणतो ' इत्यादि वाक्यांचा अर्थ आतां करावयाचा. गूह म्हणजे संवरण करणें, आच्छादन करणें होय. जिच्यामध्यें ज्ञान, ज्ञेयवस्तू आणि ज्ञातृत्व हे पदार्थ गूढतः आच्छादित असतात, ती गुहा म्हणजे बुद्धि. बुद्धीच्या आंत ज्ञानादिपदार्थ आच्छादित झालेले असतात; किंवा उपभोग आणि मोक्ष हें दोन पुरुषार्थ जिच्यामध्यें गूढरीतीनें राहिलेले असतात, तिलाही बुद्धि असें म्हणावें. जीवाला उपभोगाची व मोक्षाची प्रेरणा होते, ती येथून म्हणजे बुद्धीमधूनच

होते. भोगापवर्ग येथेंच लीन असतात. शिवाय, या बुद्धीमध्यें एक श्रेष्ठप्रकारचें आकाश आहे, त्याला अव्याकृत असें म्हणतात.

पू०—हें आकाश म्हणजे आपल्यास विदित असलेलें पंचमहाभूतांपैकीं असणारें आकाश होय कीं काय?

सिद्धान्ती—नाहीं. 'परम (अतिश्रेष्ठ) हें आकाशाचें विशेषण आहे; म्हणून येथें कार्यरूपी आकाश घेतां येत नाहीं. तर अव्याकृत म्हणजे कारणरूपी आकाशच घेतलें पाहिजे. 'हे गार्गी! या अक्षरामध्यें आकाश आहे' येथें 'अक्षर' शब्द आहे, अक्षर म्हणजे अविनाशी. म्हणून अविनाशी अथवा कारणरूपी अव्याकृताचा जसा गार्गीला बोध झाला, तसाच बोध आपणही करून घेतला पाहिजे. सारांश, बुद्धीमध्यें अव्याकृत आकाश आहे, त्यांत राहणारें ब्रह्म असा अर्थ झाला. 'गुहायां परमे व्योमन्' या शब्दांचा हा अर्थ होय.

शिष्य—गुहा आणि व्योम या उभयतांचेंही सामानाधिकरण्य आहे, म्हणून (दोन्ही शब्द समान-विभक्तिक आहेत म्हणून) असा अर्थ करावा, कीं अव्याकृत आकाश हीच गुहा होय. तिचेच ठिकाणीं सर्व पदार्थ तिन्हीकाळीं विलीन झालेले असतात. कारण अव्याकृत हें सर्वांचें कारण असून सर्वांपेक्षां अत्यंत सूक्ष्म आहे. तात्पर्य, या अव्याकृताच्या अंतर्यामीं ब्रह्म नियामकत्वानें असतें. असा अर्थ होईल काय?

सिद्धान्ती—होय, होईल.

पूर्व०—अंतःकरणांतील आकाशालाच 'परम' असें विशेषण कां उपयोजिलें?

सिद्धान्ती—ठीकच आहे. या आकाशाची ओळख लवकर व्हावी; आणि उपासनाही करिता यावी, हें सांगण्याचा श्रुतीचा अभिप्राय आहे.

"यो वै स बहिर्धा पुरुषादाकाशो यो वै सोऽन्तः पुरुष आकाशो योऽयमन्तर्हृदय आकाशः" इति श्रुत्यन्तरात्प्रसिद्धं हार्दस्य व्योम्नः परमत्वम्। तस्मिन्हार्दे व्योम्नि या बुद्धिर्गुहा तस्यां निहितं ब्रह्म तद्व्यावृत्त्या विविक्ततयोपलभ्यत इति। न ह्यन्यथा विशिष्टदेशकालसंबन्धोऽस्ति ब्रह्मणः सर्वगतत्वान्निर्विशेषत्वाच्च।

सिद्धांती—"जें पुरुषाच्या बाहेर आकाश आहे व जें पुरुषाच्या आंत आहे व जें हें पुरुषाच्या हृदयांत आहे" अशी दुसरी प्रसिद्ध श्रुति स्पष्ट प्रतिपादित आहे कीं, अंतःकरणांतील आकाश सर्वश्रेष्ठ आहे. "त्या श्रेष्ठ हृदयाकाशांत जी बुद्धि आहे, तिलाच गुहा असें म्हणतात. त्याच्याठिकाणीं स्थित असणारें ब्रह्म ज्याला स्पष्टपणानें समजते" असा या मंत्रांतील या भागाचा अर्थ आहे. ही गुहास्थित बुद्धि काढून घेऊन तेथें असणाऱ्या ब्रह्माचें मात्र चिंतन केलें असतां तें स्पष्ट प्रतीत होतें, हें सांगण्याचा मतलब आहे. उलटपक्षीं, दुसऱ्या तऱ्हेनें; ब्रह्माला विशिष्ट देशकालादिकांचा

संबंध असणें शक्य नाहीं. कारण ब्रह्म सर्वगामी आणि निर्विशेष आहे. सारांश, बुद्धि किंवा हृदयाकाश, हा ब्रह्मोपाधी नाहींत. निर्विशेष ब्रह्म सर्वत्र असतें, म्हणून तेथें, बुद्धीमध्यें, उपलब्ध होतें, इतकाच काय तो तात्पर्यार्थ समजून घेणेचा आहे.

स एवं ब्रह्म विजानन्किमित्याह—अश्नुते भुङ्क्ते सर्वान्निरवशिष्टान्कामान्भोगानित्यर्थः । किमस्मदादिवत्पुत्रस्वर्गादीन्पर्यायेण नेत्याह । सह युगपदेकक्षणोपारूढानेवैकयोपलब्ध्या सवितृप्रकाशवन्नित्यया ब्रह्मस्वरूपाव्यतिरिक्तया यामवोचाम सत्यं ज्ञानमनन्तमिति । एतत्तदुच्यते—ब्रह्मणा सहेति । ब्रह्मभूतो विद्वान्ब्रह्मस्वरूपेणैव सर्वान्कामान्सहाश्नुते, न यथोपाधिकृतेन स्वरूपेणाऽऽत्मना जलसूर्यकादिवत्प्रतिबिम्बभूतेन सांसारिकेण धर्मादिनिमित्तापेक्षांश्चक्षुरादिकरणापेक्षांश्च कामान्पर्यायेणाश्नुते लोकः । कथं तर्हि यथोक्तेन प्रकारेण सर्वज्ञेन सर्वगतेन सर्वात्मना नित्यब्रह्मात्मस्वरूपेण धर्मादिनिमित्तानपेक्षांश्चक्षुरादिकरणनिरपेक्षांश्च सर्वान्कामान्सहैवाश्नुत इत्यर्थः । विपश्चिता मेधाविना सर्वज्ञेन । तद्धि वैपश्चित्यं यत्सर्वज्ञत्वं तेन सर्वज्ञस्वरूपेण ब्रह्मणाऽश्नुत इति । इतिशब्दो मन्त्रपरिसमाप्त्यर्थः ।

सिद्धांती—अशाप्रकारें ज्याला हृदयाकाशांत उपलब्ध होणाऱ्या निर्विशेष ब्रह्माचें स्पष्ट विज्ञान झालें, तो सर्व अखिल भोगांचा आस्वाद घेतो. सर्वप्रकारचे भोग निरवशेषत्वानें त्याला मिळतात. हा अर्थ आहे. तात्पर्य हृदयाकाशांत सांपडणाऱ्या सत्य–ज्ञान–अनंत–लक्षणात्मक ब्रह्माचें ज्याला विज्ञान होतें, तो सर्वज्ञ ब्रह्माच्या ज्ञानानें अखिल भोगांचा **एककालींच** उपभोग घेतो. असा ऋग्वेदांतील मंत्राचा तात्पर्यार्थ आहे.

पूर्व०—म्हणजे ? आमच्यासारख्या संसाऱ्यांना पुत्रस्वर्गादिकांचे उपभोग पर्यायानें मिळतात, एक संपल्यानंतर दुसरा उपभोग प्राप्त होतो, तसेच ब्रह्मज्ञाला हे सर्व उपभोग एकामागून एक असे मिळत असतील !

सिद्धान्ती—नाहीं, सह म्हणजे एकदम, एकाक्षणींच सर्व आरूढ झालेले, असे सर्व प्रकारचे उपभोग त्याला मिळतात. सूर्याचा प्रकाश जसा नित्य सूर्यसहचारी आहे, व सूर्याच्या उपलब्धीबरोबर (प्राप्तीबरोबर, ज्ञानाबरोबर) प्रकाशाचीही उपलब्धि होते, त्याप्रमाणेंच पूर्वोक्त सत्यज्ञानानंत–लक्षणात्मक ब्रह्माची उपलब्धि झाल्याबरोबर त्याचक्षणीं सर्वभोगांची उपलाब्धि होते.

शिष्य—म्हणजे कसें ?

सिद्धांती—ऐका: ब्रह्मज्ञ झालेला म्हणजे स्वरूपतः ब्रह्मच झालेला विद्वान् सर्व-उपभोगांचा एककाळींच उपलब्धा होतो. आपल्यासारख्याचें स्वरूप उपाधींनें कलुषित झालेलें असतें, आपलें आत्मस्वरूप उपाधिग्रस्त असतें.—

शिष्य—म्हणजे ! पाण्यांत प्रतिबिंबित झालेल्या सूर्य-बिंबाप्रमाणें आपलें आत्म-स्वरूप देहेंद्रियादि व कालस्थलादि उपाधींनीं दूषित झालेलें असतें. असेंचना ?

सिद्धान्ती—होय; तात्पर्य, आपलें सांसारिक स्वरूप आहे, त्यामुळें आपल्याला जे क्रमशः उपभोग मिळतात, ते धर्मानुसार (पापपुण्यानुसार) व नेत्र-कर्णादि इंद्रियांच्या साह्यानें कालस्थलपरत्वें मिळत असतात. तसें ब्रह्मज्ञपुरुषाचें नाहीं. सांसारिक पुरुषाचें पुण्यपाप असेल त्या प्रमाणानें व त्याच्या अन्तर्बाह्य इंद्रियांचा विकास झाला असेल तसा, सांसारिक उपभोगाचा वांटा क्रमशः मिळत असतो. ब्रह्मज्ञ पुरुषाची तशी स्थिति नसते. कारण तो सर्वज्ञ, सर्वगामी व सर्वांचा अंतर्यामी आपल्या ब्रह्मज्ञानानें झाला असतो. तात्पर्य, त्याच्याठिकाणीं ब्रह्माचें व आत्म्याचें ऐक्य झालेलें असतें. त्याला पापपुण्यादि निमित्तांची अपेक्षा असत नाहीं. तसेंच तो कार्य-कारणात्मक उपाधींच्या व इंद्रियमनादिकांच्या पलीकडे गेलेला असतो. सारांश, सर्वथा निरुपाधिक झाल्यामुळें, त्याच्या सर्व आशा परिपूर्ण होऊन तो नित्यस्वरूपी होतो. मंत्रांतील ' विपश्चित ' या पदाचा सर्वज्ञ असा अर्थ आहे. या सर्वज्ञस्वरूपी ब्रह्मा-सह तो सर्वथा निष्काम होतो. सारांश तो ब्रह्म होतो. मंत्राच्या शेवटीं जो ' इति ' शब्द आहे तो मंत्रसमाप्ति झाली, असें दाखवितो. याप्रमाणें ऋग्वेदांतील मंत्राच्या अर्थाचें विवेचन करून आपण स्पष्ट पाहिलें कीं, ब्रह्मस्वरूपाचें ज्याला यथार्थ ज्ञान झालें, तो प्रत्यक्ष ब्रह्म होतो. अर्थात् ऋग्वेदांतील ही ऋचा पहिल्या सूत्रभूत 'ब्रह्मवेत्ता पर-ब्रह्म होतो ' या श्रुतिवाक्याचें उत्कृष्ट समर्थन करिते. हिरण्यगर्भापासून तों पिपीलिके-पर्यंतच्या सांसारिक उपभोगांनीं विशेष आनंद होतो, त्या सर्वांचा एक समयावच्छेदेंकरून ब्रह्मानंदांत समावेश होतो, असें तात्पर्य आहे. हें कसें, तें आपण पुढें पाहूं.

सर्व एव वल्ल्यर्थो ब्रह्मविदाप्नोति परमिति ब्राह्मणवाक्येन सूत्रितः । स च सूत्रितोऽर्थः संक्षेपतो मन्त्रेण व्याख्यातः । पुनस्तस्यैव विस्तरेणार्थनिर्णयः कर्तव्य इत्युत्तरस्तद्वृत्तिस्थानीयो ग्रन्थ आरभ्यते तस्माद्वा एतस्मादित्यादिः । तत्र च सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्मेत्युक्तं मन्त्रादौ तत्कथं सत्यं ज्ञानमनन्तं चेत्यत आह । तत्र त्रिविधं ह्यानन्त्यं देशतः कालतो वस्तुतश्चेति । तद्यथा देशतोऽनन्त आकाशो न हि देशतस्तस्य परिच्छेदोऽस्ति । न तु कालतश्चाऽऽनन्त्यं वस्तुतश्चाऽऽकाशस्य । कस्मात्कार्यत्वात् । नैवं ब्रह्मण आकाशवत्कालतोऽप्यन्तवत्त्वमकार्यत्वात । कार्यं हि वस्तु कालेन परिच्छिद्यते । अकार्यं

च ब्रह्म । तस्मात्कालतोऽप्यनन्तम् । तथा वस्तुतः । कथं पुनर्वस्तुत आनन्त्यं सर्वानन्यत्वात् । भिन्नं हि वस्तु वस्त्वन्तरस्यान्तो भवति । वस्त्वन्तरबुद्धिर्हि प्रसक्ता वस्त्वन्तरान्निवर्तते । यतो यस्य बुद्धेर्विनिवृत्तिः स तस्यान्तः । तद्यथा गोश्वबुद्धिरश्वत्वाद्विनिवर्तत इत्यश्वत्वान्तं गोत्वमित्यन्तवदेव भवति । स चान्तो भिन्नेषु वस्तुषु दृष्टो नैवं ब्रह्मणो भेदः । अतो वस्तुतोऽप्यानन्त्यम् । कथं पुनः सर्वानन्यत्वं ब्रह्मण इत्युच्यते, सर्ववस्तुकारणत्वात् । सर्वेषां हि वस्तूनां कालाकाशादीनां कारणं ब्रह्म । कार्यापेक्षया वस्तुतोऽन्तवत्त्वमिति चेन्न । अनृतत्वात्कार्यवस्तुनः । न हि कारणव्यतिरेकेण कार्यं नाम वस्तुतोऽस्ति । यतः कारणबुद्धिर्विनिवर्तेत । वाचारम्भणं विकारो नामधेयं मृत्तिकेत्येव सत्यमेवं सदेव सत्यमिति श्रुत्यन्तरात् । तस्मादाकाशादिकारणत्वाद्देशतस्तावदनन्तं ब्रह्म । आकाशो ह्यनन्त इति प्रसिद्धं देशतस्तस्य चायं कारणं तस्मात्सिद्धं देशत आत्मन आनन्त्यम् । न ह्यसर्वगतात्सर्वगतमुत्पद्यमानं लोके किंचिद्दृश्यते । अतो निरतिशयमात्मन आनन्त्यं देशतस्तथाऽकार्यत्वाच्च कालतस्तद्धि अवस्त्वन्तराभावाच्च वस्तुतोऽत एव निरतिशयसत्यत्वम् ।

सिद्धान्ती—आम्हीं प्रथमच म्हटलें आहे कीं "ब्रह्मवेत्ता परब्रह्माचा प्राप्ती करून घेतो" हें ब्राह्मणवाक्य (या उपनिषदांत आलेलें वाक्य) सूत्ररूप आहे. आणि सर्व वल्लीचा अर्थ या सूत्रांत संग्रहित झाला आहे. सूत्राचा हाच अर्थ ऋग्वेदांतील मंत्रानें संक्षेपतः व्यक्त करून दाखविला आहे. तथापि, या सूत्राचा विस्तारानें अर्थनिर्णय करावा, एतदर्थ पुढील ग्रंथाची योजना आहे. 'त्या ह्या प्रसिद्ध' इत्यादि प्रकारें पुढें येणारा ग्रंथ प्रथमतः उद्धृत केलेल्या सूत्राची वृत्ति (स्पष्ट व्याख्या) होय. आतां तेथें 'सत्य, ज्ञान आणि अनंत ब्रह्म आहे' असें सांगितलें आहे.

पूर्व०—अहो, 'सत्य, ज्ञान, अनंत ब्रह्म आहे' असा मंत्र असतांना तुम्ही आपल्या पदरचें 'आणि' हें उभयान्वय कोठून आणलेंत ?

सिद्धान्ती–ऐका; आनंत्य तीनप्रकारचें असतें. देशासंबंधानें आनंत्य, कालासंबंधानें आनंत्य आणि वस्तूसंबंधानें आनंत्य. असें आनंत्याचे तीन प्रकार असतात. आकाशच घ्याना. देशाच्या दृष्टीनें आकाश अनंत आहे. आकाशाला देशाचा परिच्छेद नाहीं. असा कोणताही प्रदेश नाहीं, कीं जेथें आकाश संपतें. सारांश, देशदृष्टीनें आकाश अनंत आहे, पण कालदृष्टीनें किंवा वस्तुदृष्टीनें तें अनंत नाहीं.

शिष्य—कशावरून ?

सिद्धान्ती—कारण, आकाश हें कार्य आहे. कार्य हें केव्हां तरी उत्पन्न होतें. आकाश उत्पन्न झालेलें आहे; म्हणून तें कार्य आहे, म्हणून कालदृष्टीनें तें अनंत नाहीं. पण ब्रह्म कार्य नाहीं. सर्वांचें कारण ब्रह्म आहे. म्हणून आकाशाप्रमाणें ब्रह्म हें सान्त नाहीं. कालदृष्टीनें तें अनंत आहे. असें पहा कीं, जी जी म्हणून कार्यवस्तु आहे, ती तीच काल-परिच्छिन्न असतें. ब्रह्म अकार्य आहे; म्हणून तें कालतः अनंत आहे. वस्तुदृष्टीनेंही अनंतत्व स्थापित होतें.

पूर्वः—असें कसें होईल ? सर्वच ब्रह्म आहे, तें सर्वानन्य आहे, असें तर तुम्ही नेहमीं म्हणतां. सर्व वस्तू प्रत्येकी अंतवंत असतात, सान्त असतात, अर्थात् सर्व वस्तूंत राहणारे ब्रह्मही सान्त असलें पाहिजे.

सिद्धांती—नाहीं. तें सर्वानन्य आहे; म्हणजे सर्वांच्या अंतर्यामीं आहे, म्हणूनच तें अनंत आहे. म्हणजे असेः भिन्न भिन्न वस्तू असल्या म्हणजे एक वस्तु दुसरीचा अंत होते.

शिष्यः—हें नाहीं समजत मला.

सिद्धान्ती—आपली बुद्धि एका वस्तुकडे लागलेली असली, म्हणजे दुसऱ्या वस्तूकडे तिचें ध्यान नसतें. दुसऱ्या पदार्थीकडे नियुक्त झालेली बुद्धि एका पदार्थापासून निवृत्त झालेली असते.

शिष्यः—म्हणजे लिहीण्याच्या कागदाकडे नियुक्त झालेली बुद्धि शाईच्या दौतीपासून परावृत्त झालेली असते. यावरून कागदाकडे नियुक्त झालेली बुद्धि दौतीवरील बुद्धीचा अंत करिते. अथवा कागद हा दौतीचा अंत होतो.

सिद्धान्ती—हें तुझें उदाहरण झालें. तें ठीकच आहे. पण आचार्यांनीं दिलेलें उदाहरण निराळें आहे. तें असें. अश्वत्वापासून गोत्वबुद्धि निवृत्त होते, म्हणून गोत्व हें अश्वत्वाचा अंत आहे. कारण गोत्वावरील बुद्धि अश्वत्वबुद्धीचा अंत करिते. बुद्धि, मानवी किंवा परिच्छिन्न बुद्धि, एका वस्तूचें, मात्र समग्र स्वरूप एककालीं ग्रहण करिते. गोत्वाकडे बुद्धि विनियोजिली, म्हणजे अश्वत्वावरील बुद्धि नाहींशी होते. गोत्व हें अश्वत्वाहून निराळें आहे, असें विषयज्ञान देणाऱ्या बुद्धीला भान होतें; अर्थात् भान भिन्न म्हणून विषयभिन्न होतात; आणि एक विषय दुसऱ्याचा अंत होतो. असो; हा अंत भिन्न भिन्न वस्तू असल्या म्हणजे दृश्य होतो. पण ब्रह्मामध्यें भेद नाहीं. तें एकरस आहे, म्हणून वस्तूदृष्टीनेंही ब्रह्माला अंतवत्त्व प्राप्त होत नाहीं. म्हणजे त्या दृष्टीनेंही तें अनंत आहे.

पूर्वः—असें असेल तर "ब्रह्म हें सर्वानन्य आहे," "हें सर्व ब्रह्म आहे." असें म्हणावयाचें सोडून द्या. ब्रह्मस्वरूपांत भेद नसेल तर तें हे सर्व भिन्न पदार्थ होणें शक्य नाहीं; व तें भिन्न पदार्थ असणेंही शक्य नाहीं.

सिद्धान्ती:—तुम्हाला सर्वानन्य या शब्दाचा अर्थ कळल. नाहीं, असें वाटतें. ते सर्वानन्य आहे; म्हणजे तें सर्व वस्तूंचें कारण आहे. काल, आकाश, आदि सर्व वस्तूंचें कारण ब्रह्म आहे.

पूर्व०—म्हणूनच आम्ही म्हणतों कीं, ज्यापक्षीं कार्य हें कारणापासून निराळें असतें, त्यापक्षीं कारणाचा अंतत्व करणारें जें कार्य त्या कार्यापेक्षेनें ब्रह्माला सान्तत्व येतें. कार्यांत ब्रह्म नसतें, म्हणून ब्रह्म सान्तच होतें.

सिद्धान्ती—नाहीं. प्रथमतः, जें जें म्हणून कार्य आहे; तें तें अनृत, असत्य, अनित्य असतें. अनृत वस्तूला सांत किंवा अनंत म्हणतांच येत नाहीं. हेंही तुम्हास मान्य नसेल, तर असें ध्यानांत ठेवा कीं, कारणाशिवाय कार्याचें अस्तित्वच संभवत नाहीं. कार्यबुद्धि उत्पन्न झाली, कीं तेथें कारणबुद्धि नित्य असतेच. कारणबुद्धि केव्हांही निवृत्त होत नाहीं; म्हणून ती अनंत असते. शिवाय "घटादि विकार केवळ नाममात्र असतात. मृत्तिका हीच काय ती सत्य वस्तु असते; म्हणून जें जें सत्य तें तें सत् असते' असें इतर श्रुतीही सांगतात. असो; ह्या सर्व विवेचनावरून व देशदृष्टीनें अनंत असणाऱ्या आकाशादिकांचेंही कारण असणारें ब्रह्म देशतः अनंत आहे, असें या सिद्धांतावरून ठरतें.

शिष्य—देशदृष्टीनें आकाश अनंत आहे. हें प्रसिद्ध आहे. याच आकाशाचें कारण ब्रह्म. म्हणून ब्रह्म किंवा आत्मा हें देशतः अनंत आहे, हें सिद्ध झालें.

सिद्धान्ती—होय; पण दुसरें असें लक्षांत ठेव कीं, एका परिच्छिन्न वस्तूपासून दुसरी सर्वगामी वस्तू उत्पन्न होते, असें व्यवहारांत कोठेंही दिसत नाहीं. म्हणून देशदृष्टीनें ब्रह्माचें आनंत्यबुद्धि निरतिशय आहे. तसेंच, तें कार्य नाहीं, उत्पन्नविनष्ट होणारें नव्हे, म्हणून कालदृष्टीनें अनंत आहे. आणि शेवटीं, त्याच्याहून भिन्न असणारी दुसरी वस्तु परमार्थतः नाहीं, म्हणून वस्तुदृष्टीनेंही तें अनंत आहे. तात्पर्य, तें सर्वदृष्टीनें निरतिशय अनंत आहे. म्हणजे तीच काय ती एक सत्य वस्तु अनंत आहे. ब्रह्म मात्र सत्य ज्ञान आणि अनंत आहे. या दृष्टीनें 'आणि' या उभयान्वयी अव्ययाचा आम्ही जो उपयोग केला तो श्रुतीचें मनोगत जाणूनच केला, आपल्या पदरचा केला नाहीं, हें तुमच्या लक्षांत आलेंच असेल.

तस्मादिति मूलवाक्यसूत्रितं ब्रह्म परामृश्यते। एतस्मादिति मन्त्रवाक्येनानन्तरं यथालक्षितम्। यद्ब्रह्माऽऽदौ ब्राह्मणवाक्येन सूत्रितं यच्च सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्मेत्यनन्तरमेव लक्षितं तस्मादेतस्माद्ब्रह्मण आत्मस्वरूपादाकाशः संभूतः समुत्पन्नः। आकाशो नाम शब्दगुणोऽवकाशकरो मूर्तद्रव्याणाम्। तस्मादाकाशात्स्वेन स्पर्शगुणेन पूर्वेण च कारणगुणेन शब्देन द्विगुणो वायुः संभूत इत्यनुवर्तते। वायोश्च स्वेन रूपगुणेन पूर्वाभ्यां च त्रिगुणोऽग्निः संभूतः। अग्नेः स्वेन रस-

गुणेन पूर्वैश्च त्रिभिश्चतुर्गुणा आपः संभूताः । अद्भ्यः स्वेन गन्धगुणेन पूर्वैश्चतुर्भिः पञ्चगुणा पृथिवी संभूता । पृथिव्या ओषधयः । ओषधीभ्योऽन्नम् । अन्नाद्रेतोरूपेण परिणतात्पुरुषः शिरःप्राण्याद्याकृतिमान् । स वा एष पुरुषोऽन्नरसमयोऽन्नरसविकारः । पुरुषाकृतिभावितं हि सर्वेभ्योऽङ्गेभ्यस्तेजः संभूतं रेतो बीजं तस्माद्यो जायते सोऽपि तथा पुरुषाकृतिरेव स्यात् । सर्वजातिषु जायमानानां जनकाकृतिदर्शनात् ।

सिद्धान्ती—येथें 'त्यापासून' हें पद मूळच्या सूत्ररूप वाक्यांत सांगितलेल्या ब्रह्माशीं संबंध दाखवितें. आणि 'ह्यापासून' हें पद ऋग्वेदांतील लक्षणात्मक वाक्यानें निर्दर्शित केलेल्या ब्रह्माशीं संबंध दाखवितें. तात्पर्य, श्रुतिवाक्यानें सूत्ररूपतः त्या ब्रह्माचा उल्लेख केला व लागलींच 'सत्य, ज्ञान आणि अनंत ब्रह्म आहे' असें लक्षण करून ब्रह्म लक्षित केलें; त्या ह्या ब्रह्मापासून म्हणजे आत्म्यापासून—

शिष्य—आत्मा हा शब्द वृत्तिस्थानीं असलेल्या मंत्रांत अभिप्रेत आहे. आत्म म्हणजे ब्रह्म आणि ब्रह्म म्हणजे आत्मा. आत्मा हा ब्रह्माचा वाचक शब्द, असें येथें आपल्यास सागावयाचें आहे ?

सिद्धान्ती—होय. पण आम्ही नुसतें सांगत नाहीं; आम्ही म्हणतों याला श्रुतीचें प्रत्यंतर आहे. "तें (ब्रह्म), सर्वांचा आत्मा आहे, तें सत्य आहे. तोच आत्मा होय." अशा श्रुती प्रमाण आहेत. म्हणून आत्मा हा ब्रह्माचा वाचक शब्द आहे, असें आम्ही म्हणतों. असो; त्या ह्या आत्मस्वरूपी ब्रह्मापासून आकाशाची उत्पत्ति झाली. आकाश म्हणजे अवकाश. मूर्त द्रव्यांमध्यें जें अवकाश, अंतर, उत्पन्न करितें, तें आकाश होय. या आकाशाचा गुण 'शब्द' हा होय. शब्दगुणी आकाश ब्रह्मापासून उत्पन्न होतें. त्या आकाशापासून स्पर्शगुण असणारा वायु स्वकारणगुणासह म्हणजे आकाशाच्या शब्दगुणासह उत्पन्न होतो. म्हणून वायूला स्पर्श व शब्द असे दोन गुण असतात. वायूपासून अग्नि उत्पन्न होतो. तो स्वकारणांचे शब्द व स्पर्श हे गुण स्वीकृत करून आपला रूपगुण प्रकट करितो. अग्नीपासून उत्पन्न होणारें जल स्वकारणांचे तिन्ही गुण घेऊन आपला रसगुण प्रकट करितें. आणि पृथ्वी पूर्वीच्या चार गुणांसह जलापासून उत्पन्न होऊन आपला गंधगुण प्रकट करिते. पृथ्वी पंचगुणात्मक आहे. पृथ्वीपासून ओषधी. ह्यांपासून अन्न. अन्नापासून परिणाम पावलेल्या रेतोरूपानें हस्तमस्तकादिआकृतिमान् पुरुष उत्पन्न होतो. हा पुरुष अन्नरसमय आहे, अन्नरसाचा विकार आहे; हें प्रसिद्धच आहे. आणि ह्या पुरुषाच्या सर्व अंगांपासून उत्पन्न होणारें व पुरुषाकृति धारण करणारें द्रव्य म्हणजेच रेतोरूपी तेजोभूत बीज होय. ह्या बीजापासून जो उत्पन्न होतो तोही पुरुषाकृतिच असतो. कारण, सर्वयोनींमध्यें

असा नियम दिसतो कीं, उत्पन्न होणारीं मुलें जनकाच्या आकृतीसारखींच असतात. मुलें जनकाकृतीं असतात, म्हणून रेतोरूपी बीजाचा आकारही रेतःकार्य असणाऱ्या पुरुषाचाच असला पाहिजे, हें सिद्धच आहे.

सर्वेषामप्यन्नरसविकारत्वे ब्रह्मवंश्यत्वे चाविशिष्टे कस्मात्पुरुष एव गृह्यते प्राधान्यात्। किं पुनः प्राधान्यम्। कर्मज्ञानाधिकारः। पुरुष एव हि शक्तत्वादर्थित्वादपर्युदस्तत्वाच्चार्थी विद्वान्समर्थः कर्मज्ञानयोरधिक्रियते—" पुरुषे त्वेवाऽऽविस्तरामात्मा स हि प्रज्ञानेन संपन्नतमो विज्ञातं वदति विज्ञातं पश्यति वेद श्वस्तनं वेद लोकालोकौ मर्त्येनामृतमीप्सति इत्येवं संपन्नः, अथेतरेषां पशूनामशनायापिपासे एवाभिविज्ञानमित्यादि" श्रुत्यन्तरदर्शनात्।

पूर्व०—सर्व प्राण्यांची उत्पत्ति अन्नरसापासून होते, सर्वच अन्नरसाचे परिणाम असतात व सर्वही प्राणी ब्रह्माचे अंश किंवा ब्रह्माचे वंशज सर्वसामान्यत्वानें असतात. होय ना! असें जर आहे, हा जर सर्वसामान्य नियम आहे; तर श्रुतीनें पुरुषाचा (मनुष्याचा) मात्र कां उल्लेख करावा!

सिद्धान्ती—कारण, मनुष्य हा सर्व प्राण्यामध्यें प्रधान आहे.

पूर्व०—कोणते असे गुण आहेत कीं, जे मनुष्याला प्राधान्य देतात!

सिद्धान्ती—त्याला मात्र विहित कर्म करण्याचा आणि ज्ञान संपादण्याचा अधिकार आहे, इतरांस नाहीं. मनुष्यप्राण्याला मात्र विधिनिषेध (विवेकानें काय करावें, काय करूं नये, हें) जाणण्याचें व आत्मस्वरूप जाणण्याचें सामर्थ्य आहे. तसेंच, त्याला मात्र वाटेल तें व तेवढें अंतिम ध्येय विवेकपूर्वक धारण करून तें संपादन करण्याचा अधिकार प्राप्त करून घेतां येतो. कोणताही पुरुषार्थ साध्य करून घेण्याला त्याला प्रतिबंध नाहीं, किंवा त्याचें सामर्थ्य कुंठित होत नाहीं. असो; जो विद्वान् आहे, समर्थ आहे आणि ज्याला पुरुषार्थ साध्य करण्याचा नित्य ध्यास लागला आहे, तोच कर्माला किंवा ज्ञानाला अधिकारी होतो. " मनुष्यस्वरूपामध्यें मात्र आत्मा अत्यंत स्पष्टरीतीनें प्रकट होतो. कारण; मनुष्याला मात्र प्रज्ञानसंपन्न होतां येते, झालेलें विज्ञान सांगतां येतें, ज्ञात पदार्थ पहातां येतात; काल, आज, उद्यां, म्हणजे भूत, वर्तमान, भविष्य इत्यादि कालभेद समजतात. लोकालोकांचें, दृश्यादृश्य जगताचें, ज्ञान त्याला होतें आणि मर्त्य असूनही, किंवा मर्त्य साधन संपादूनही त्याची अमृतत्वाची इच्छा नित्य जागृत असते." ह्या श्रुतीवरून त्याची ज्ञानसंपत्ति व कर्मसंपत्ति सर्व-विलक्षण कशी आहे, हें स्पष्ट होतें. " बाकी मनुष्येतर पशूंना खाणें-पिणें एवढ्यापुरतेंच विज्ञान असतें " इत्यादि श्रुती आम्ही जें म्हणतों त्याचेंच समर्थन करितात.

स हि पुरुष इह विद्ययाऽन्तरतमं ब्रह्म संक्रामयितुमिष्टस्तस्य च बाह्याकारविशेषेष्वनात्मस्वात्मभाविता बुद्धिरनालम्ब्य विशेषं कंचित्सहसाऽन्तरतमप्रत्यगात्माविषया निरालम्बना च कर्तुमशक्येति दृष्टशरीरात्मसामान्यकल्पनया शाखाचन्द्रनिदर्शनवदन्तः प्रवेशयन्नाह—तस्येदमेव शिरः। तस्यास्य पुरुषस्यान्नरसमयस्येदमेव शिरः प्रसिद्धम्। प्राणमयादिष्वशिरसां शिरस्त्वदर्शनादिहापि तत्प्रसङ्गो मा भूदितीदमेव शिर इत्युच्यते। एवं पक्षादिषु योजना। अयं दक्षिणो बाहुः पूर्वाभिमुखस्य दक्षिणः पक्षः। अयं सव्यो बाहुरुत्तरः पक्षः। अयं मध्यमो देहभाग आत्माऽङ्गानाम्। "मध्यं ह्येषामङ्गानामात्मा" इति श्रुतेः। इदमिति नाभेरधस्ताद्यदङ्गं तत्पुच्छं प्रतिष्ठा। प्रतितिष्ठत्यनयेति प्रतिष्ठा पुच्छमिव पुच्छमधोलम्बनसामान्याद्यथा गोः पुच्छम्। एतत्प्रकृत्योत्तरेषां प्राणमयादीनां रूपकत्वसिद्धिः। मूषानिषिक्तद्रुततान्नप्रतिमावत्। तदप्येष श्लोको भवति। तत्तस्मिन्नेवार्थे ब्राह्मणोक्तेऽन्नमयात्मप्रकाशक एष श्लोको मन्त्रो भवति।

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यगोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यश्रीमच्छंकरभगवतः कृतौ तैत्तिरीयोपनिषदि द्वितीयब्रह्मवल्ल्यध्यायभाष्ये प्रथमोऽनुवाकः॥ १॥

सिद्धान्ती—येथें केवळ ज्ञानाच्या साह्यानें अत्यंत अंतःप्रदेशीं असणाऱ्या ब्रह्मास्वरूपत प्रत्येक पुरुषास पोहोंचविण्याचें ब्रह्मविद्येचें इष्ट मनोगत आहे; पण आत्मबाह्य असणाऱ्या अनात्मक आकारविशेषांचें ठिकाणीं पुरुषाच्या बुद्धीनें, आत्मबुद्धीनें आरोपित केली आहे—

शिष्य—म्हणजे अनात्मकवस्तूंलाच आत्मवस्तु असें पुरुषाच्या बुद्धीनें ग्रहण केलें आहे?

सिद्धान्ती—होय. ही अशी कलुषित झालेली बुद्धि निर्विशेष होणें केवळ अशक्य आहे.

शिष्य—म्हणजे काय?

सिद्धान्ती—प्रत्येक सांसारिक पुरुषाच्या अनात्मकबुद्धीनें अनात्मवस्तूंचा आश्रय करून आपला व्यवहार चालविलेला असतो. बुद्धीला कांहीं तरी आश्रय हवा असतो. तेव्हां, कोणत्याही विशेषाचा आश्रय न घेतां अत्यंत अंतःप्रदेशाचे ठिकाणीं वास्तव्य करणाऱ्या प्रत्यगात्मस्वरूपाचा साक्षात्कार एकदम किंवा एकाएकीं करून घेण्याला सांसारिकाची बुद्धि असमर्थ असते. आश्रयाशिवाय तिला स्वतंत्रतेनें राहण्याचें सामर्थ्य नसतें. हें श्रुतीला ठाऊक आहे, म्हणून व दृष्ट शरीर हाच आत्मा आहे, अशी

सामान्य कल्पना प्रथमतः अज्ञानी मुमुक्षूला कळेल, असें जाणून ती कल्पना श्रुतीनें उत्थापित केली आहे. मागें आपण शाखाचंद्रन्यायाचा अवतार केला होता, तो तुम्हा सर्वांच्या ध्यानांत असेलच; त्याचाच आश्रय घेऊन, सर्वसामान्यत्वानें असणारा आत्मा दृष्टशरीराचे ठिकाणींही असतो, म्हणून व दृष्ट शरीर मानवी बुद्धीला समजतें म्हणून, बुद्धीचा प्रवेश आत्मस्वरूपापर्यंत करविण्यासाठीं मात्र दृयाघनश्रुतीनें दृष्टशरीराचा उल्लेख केला आहे. सर्वत्र वियमान असणाऱ्या ब्रह्माचें स्वरूप श्रुति येथें उल्लेखित करीत आहे, तें केवळ अज्ञानी व आश्रयाची अपेक्षा करणाऱ्या परिच्छिन्न बुद्धीसाठीं मात्र होय. याच ज्ञानमार्गानें ती जीवाला अज्ञातब्रह्माकडे नेणार. असो; ती म्हणते:-" त्या पुरुषाचें-अन्नरसमयपुरुषाचें-प्रसिद्ध असणारें हें मस्तक आहे.

शिष्य—हें मस्तक असें म्हणण्याचा अभिप्राय काय ?

सिद्धान्ती—यापुढें श्रुतीला क्रमशः प्राणमयादि कोशांचा विचार करणें तो पक्ष्याचें रूपक करून कर्तव्य आहे. पण प्राणमयादि कोशांत शिरोभाग आढळत नाहीं. तसाच येथेंही नाहीं कीं काय-असा शंकाप्रसंग येऊं नये, म्हणून ' हें शिर ' असें श्रुतीनें स्पष्ट म्हटलें आहे. याप्रमाणेंच पुढील पक्षादिकांचीही योजना आहे. श्रुतीनें हें रूपक केलें आहे. असो; पूर्वेकडे मुख करून उभें राहिले असतां जो दक्षिण बाहू होतो, तो त्याचा दक्षिणपक्ष होय, डावा हात उत्तर पक्ष. देहाचा जो मध्य भाग आहे, तो सर्वांगाचा मुख्य भाग; म्हणून त्याला ' आत्मा ' असें म्हटलें. " ह्या अंगांचा शरीर-मध्यभाग हा आत्मा आहे. " अशी श्रुति आहे. नाभि-प्रदेशाच्या खालचा जो भाग आहे, तो या कल्पितपक्ष्याचें पुच्छ होय. हीच सर्वांची प्रतिष्ठा म्हणजे आश्रयस्थान आहे.

शिष्य—या अधोभागाला पुच्छ असें कां म्हटले ?

सिद्धान्ती—गाईचें पुच्छ जसें खाली लोंबत असतें, तशीच ह्या भागाची स्थिति आहे. म्हणून त्याच्या वर ही श्रुतीनें पुच्छाची कल्पना स्थापित केली आहे. असो; हाच प्रकार ध्यानांत ठेऊन ती कल्पना समजून घ्यावी. या उपनिषदांत प्राणमयादि कोशांचे रूपक सिद्ध केलें आहे. मुशीमध्यें घातलेल्या ताम्ररसाला जसें प्रतिमेचें (मूर्तीचें) स्वरूप प्राप्त होतें, तसेंच प्राणमयादि अमूर्त पदार्थांसही पक्ष्याचें मूर्त स्वरूप उपनिषदानें कल्पना-सिद्ध केलें आहे. ह्याप्रमाणें ध्यानसौकर्यासाठीं श्रुतीनें शरीरावर पक्ष्याचें रूपक करून आत्मस्वरूपाची ओळख जीवाला व्हावी, अशी योजना केली आहे. आणि आपल्या योजनेला समर्थक म्हणून पुढील श्लोकाचा अवतार केला आहे. या श्लोका-वरूनही अन्नमय कोश हा आत्मस्वरूपाचा कसा प्रकाशक होतो, तें स्पष्ट दिसेल. हा श्लोक-मंत्र असा आहे:—

पहिला अनुवाक समाप्त.

ब्रह्मवल्ल्यध्याये द्वितीयोऽनुवाकः।

अन्नाद्वै प्रजाः प्रजायन्ते याः काश्च पृथिवीꣳ श्रिताः। अथो अन्नेनैव जीवन्ति। अथैनदपि यन्त्यन्ततः। अन्नꣳ हि भूतानां ज्येष्ठम्। तस्मात्सर्वौषधमुच्यते॥

अन्वय व अर्थः—अन्नात् वै प्रजाः प्रजायन्ते (अन्नरसापासून सर्व प्राण्यांची उत्पत्ति होते) **याः काः च पृथवीं श्रिताः** (पृथ्वीचा आश्रय करून राहणाऱ्या सर्व प्राण्याची उत्पत्ति अन्नापासून होते) **अथो अन्नेन एव जीवन्ति** (अन्नानेंच मात्र जीवांचें रक्षण होतें) **अथ अन्ततः एनत् अपि यन्ति** (नंतर शेवटीं ह्या अन्नामध्यें जाऊन हे सर्व प्राणी लीन होतात) **हि भूतानम् अन्नं ज्येष्ठं** (कारण, अन्न हें सर्व पदार्थांमध्यें श्रेष्ठ आहे, सर्वांचें तें आदि आहे) **तस्मात् सर्वौषधं उच्यते** (म्हणून अन्नाला औषध असें नांव आहे) तात्पर्य अन्न हेंच सर्व प्राण्यांचें उत्पत्तिस्थान, जीवन आणि विश्रांतिस्थान आहे. तेंच तारक आणि मारक आहे. अतएव त्याला 'औषध' ही संज्ञा आहे.

अन्नाद्रसादिभावपरिणतात्। वा इति स्मरणार्थः। प्रजाः स्थावरजङ्गमाः प्रजायन्ते। याः काश्च विशिष्टाः पृथिवीं श्रिताः पृथिवीमाश्रितास्ताः सर्वा अन्नादेव प्रजायन्ते। अथो अपि जाता अन्नेनैव जीवन्ति प्राणान्धारयन्ति वर्धन्त इत्यर्थः। अथाप्येनदन्नमपि यन्त्यपि गच्छन्ति। अपिशब्दः प्रतिशब्दार्थे। अन्नं प्रति प्रलीयन्त इत्यर्थः। अन्ततोऽन्ते जीवनलक्षणाया वृद्धेः परिसमाप्तौ। कस्मात्। अन्नं हि यस्माद्भूतानां प्राणिनां ज्येष्ठं प्रथमजम्। अन्नमयादीनां हीतरेषां भूतानां कारणमन्नमतोऽन्नप्रभवा अन्नजीवना अन्नप्रलयाश्च सर्वाः प्रजाः। यस्माच्चैवं तस्मात्सर्वौषधं सर्वप्राणिनां देहदाहप्रशमनमन्नमुच्यते।

सिद्धान्ती—अन्नरसादिकांच्या भावांचा जो परिणाम होतो, अन्नापासून ज्या सप्त रसादि धातू परिणत होतात, त्यांपासून पृथ्वीचा आश्रय करून राहणाऱ्या सर्व स्थावर–जंगम किंवा सचेतन व अचेतन पदार्थांची उत्पत्ति होते. अन्नापासूनच

सर्वांचा जन्म आहे. उत्पन्न झालेले सर्व चेतनाचेतन पदार्थ अन्नानेंच जगतातं; म्हणजे प्राणधारण करितात आणि वृद्धिंगत होतात. आणि शेवटीं याच अन्नाप्रत जाऊन मिळतात, अन्नरूप होतात.

शिष्य—येथें "अथः" म्हणजे अपि ? तरी हा अर्थ. होय ना ? दुसऱ्या "अपि" शब्दाचा अर्थ "कडे, फिरून" असा आहे. होय ना ?

सिद्धान्ती—होय. तात्पर्य ते अन्नामध्यें जाऊन लीन होतात. जीवनरूपी जी वृद्धि ती संपली, म्हणजे सर्व पदार्थ शेवटीं अन्नरूपी होतात.

शिष्य—कशावरून ?

सिद्धान्ती—कारण; सर्वप्राण्यांच्या आधीं अन्नाची उत्पत्ति झालेली आहे. अन्नमय असणाऱ्या सर्व इतर पदार्थांचें अन्न हें उत्पत्ति-कारण आहे. कारणापासून कार्य उत्पन्न होतें. कारणाच्या अस्तित्वानें कार्याचें अस्तित्व असतें. आणि कारणामध्येंच कार्य लीन होतें, असा सिद्धांत आहे. म्हणून सर्व प्राणी अन्नज, अन्नजीवन आणि अन्नप्रलय असतात. अर्थात् अन्नामध्यें सर्व पदार्थ लीन होतात. असा प्रकार आहे, म्हणून अन्नाला सर्वौषध असें म्हटलें आहे. सर्व प्राण्यांच्या देहामध्यें जो दाह (ताप) होतो त्याची शांति अन्नानें मात्र होते. म्हणून अन्न हें औषध आहे. सारांश, अन्नरूपी औषधानें सर्व अन्नमयभूतें उत्पन्न होतात, जगतात, मरतात आणि शेवटीं अन्नांत लीन होतात. तेव्हां या भूमिकेंत 'अन्न हेंच ब्रह्म' असें झालें.

सर्वं वै तेऽन्नमाप्नुवन्ति । येऽन्नं ब्रह्मोपासते । अन्नꣳ हि भूतानां ज्येष्ठम् । तस्मात्सर्वौषधमुच्यते । अन्नाद्भूतानि जायन्ते । जातान्यन्नेन वर्धन्ते । अद्यतेऽत्ति च भूतानि । तस्मादन्नं तदुच्यत इति ।

अन्वय व अर्थः—**ये अन्नं ब्रह्म उपासते, ते वै सर्वं अन्नं आप्नुवंति** (जे लोक अन्नब्रह्माची उपासना करितात त्यांना सर्व प्रकारच्या अन्नाची प्राप्ति होते) **हि भूतनां अन्नं ज्येष्ठं, तस्मात् सर्वौषधं उच्यते.** (याचा अर्थ आतांच केला आहे) **अन्नात् भूतानि जायन्ते, जातानि अन्नेन वर्धन्ते** (अन्नापासून सर्व वस्तूंचा जन्म आणि जन्मलेल्या वस्तूंची वृद्धि होते) **अद्यते भूतानि अत्ति च; तस्मात् तत् अन्नं उच्यते; इति** (भूतें अन्न खातात आणि भूतांस अन्न खातें, म्हणून त्याला अन्न असें म्हणतात, असा हा श्लोक आहे)

अन्नब्रह्मविदः फलमुच्यते। सर्वं वै ते समस्तमन्नजातमाप्नुवन्ति। के। येऽन्नं ब्रह्म यथोक्तमुपासते। कथमन्नजोऽन्नात्माऽन्नप्रलयोऽहं तस्मादन्नं ब्रह्मेति। कुतः पुनः सर्वान्नप्राप्तिफलमन्नात्मोपासनमित्युच्यते। अन्नं हि भूतानां ज्येष्ठम्। भूतेभ्यः पूर्वं निष्पन्नत्वाज्ज्येष्ठं हि यस्मात्तस्मात्सर्वौषधमुच्यते। तस्मादुपपन्ना सर्वान्नात्मोपासकस्य सर्वान्नप्राप्तिः। अन्नाद्भूतानि जायन्ते। जातान्यन्नेन वर्धन्त इत्युपसंहारार्थं पुनर्वचनम्। इदानीमन्ननिर्वचनमुच्यते अद्यते भुज्यते चैव यद्भूतैर्भुज्यमानत्वाद्भूतभोक्तृत्वाच्चान्नं तदुच्यते। इतिशब्दः प्रथमकोशपरिसमाप्त्यर्थः।

सिद्धान्ती—अन्नब्रह्माचें ज्ञान झाल्यावर फलप्राप्ति काय होते, तें येथें सांगितलें आहे. अन्नब्रह्माची जे लोक यथोक्त उपासना करितात, त्यांना सर्व प्रकारच्या अन्नाची प्राप्ति होते.

शिष्य—ही उपासना कशी?

सिद्धान्ती—"मी अन्नापासून उत्पन्न झालों आहें, अन्न हाच माझा आत्मा आहे; आणि अन्नामध्यें मी शेवटीं लीन होणार; म्हणून अन्न हेंच ब्रह्म होय." अशी जो अन्नाची उपासना करितो; त्याला अन्नजाताची प्राप्ति होते.

शिष्य—अन्नात्म्याची उपासना केली असतां, सर्वान्नाची प्राप्ति हें फळ कसें मिळतें?

सिद्धान्ती—त्याचें कारण हें कीं, अन्न हें सर्व भूतांच्या आधीं उत्पन्न झालें असल्यामुळें तें सर्व-श्रेष्ठ आहे; आणि म्हणूनच तें सर्वांचें औषध आहे. अर्थातच सर्वान्नब्रह्माची उपासना करणाऱ्याला सर्वान्नाची प्राप्ति होते. अन्नापासून भूतें उत्पन्न होतात, जन्मलेलीं वाढतात, हा भाग पुन्हा सांगितला; तो केवळ विषयाचा उपसंहार करण्यासाठीं होय. आतां पुढें श्रुति अन्नाचें निर्वचन करित आहे, तें असें.—अद्=खाणें. यावरून जें भूतांकडून खालें जातें, त्याला अन्न असें म्हणतात. तसेंच, जें स्वतः भूतांस खातें, त्यालाही अन्न असें म्हणतात! तात्पर्य, भूतें ज्यास खातात आणि जें भूतांस खातें त्याला (भूतभोज्याला व भूतभोक्त्याला) अन्न असें म्हणावें. अन्न खातात, तेव्हां भूतें जगतात व त्यांस अन्न खातें, तेव्हां तीं भूतें मरतात. एवंच तारकमारक दोन्हीं अन्नच आहे. याप्रमाणें अन्नब्रह्माचें वर्णन झालें. अर्थात् हा प्रथमकोशाचा म्हणजे अन्नमयकोशाचा विचार येथें संपला. हें दाखविण्यासाठीं 'इति' हा शब्द आहे.

तस्माद्वा एतस्मादन्नरसमयात् । अन्योऽन्तर आत्मा प्राणमयः । तेनैष पूर्णः ।

अन्वय व अर्थः—तस्मात् एतस्मात् अन्नरसमयात् वै अन्यः प्राणमयः अन्तरः आत्मा (त्या ह्या अन्नरसमय आत्म्याहून दुसरा आणि त्याच्या आंत राहणारा प्राणमय आत्मा आहे, हें प्रसिद्ध आहे) **तेन एषः पूर्णः** (त्या प्राणमय आत्म्यानें अन्नरसमय आत्मा पूर्ण होतो.)

अन्नमयादिभ्य आनन्दमयान्तेभ्य आत्मभ्योऽभ्यन्तरतमं ब्रह्म विद्यया प्रत्यगात्मत्वेन दिदर्शयिषु शास्त्रमविद्याकृतपञ्चकोशापनयनेनानेकतुषकोद्रवविषुकरणेनेव तदन्तर्गततण्डुलान्प्रस्तौति तस्माद्वा एतस्मादन्नरसमयादित्यादि । तस्मादेतस्माद्यथोक्तादन्नरसमयात्पिण्डादन्यो व्यतिरिक्तोऽन्तरोऽभ्यन्तर आत्मा पिण्डवदेव मिथ्यापरिकल्पित आत्मत्वेन प्राणमयः प्राणो वायुस्तन्मयस्तत्प्रायः । तेन प्राणमयेनान्नरसमय आत्मैष पूर्णो वायुनेव दृतिः ।

सिद्धान्ती—अन्नमयादि कोशापासून आनंदमयान्तकोशापर्यंतचे जे निरनिराळे आत्मे दिसतात, त्या सर्वांच्याही अंतर्यामी वास्तव्य करणारें ब्रह्म (विद्येनें प्रत्यगात्मस्वरूपांत ओळखलें जाणारें) आहे व तें ब्रह्मविद्येनें प्राप्त होतें, असें दाखविण्याची इच्छा करणारें शास्त्र काय करीत आहे, तें पहाः—

शिष्य—सर्वांच्या अंतर्यामी ब्रह्म आहे; आणि ज्ञानानें मात्र जीवात्मा व परमात्मा एकच आहेत, असें समजतें, हें शास्त्राला सांगावयाचें आहे, असेंच आपलें म्हणणें ?

सिद्धान्ती— होय. शास्त्र काय करितें तें हें. अविद्येनें उत्पन्न केलेलें जे अन्नमय, प्राणमय मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय असें पांच कोश आहेत, त्या कोशांची अथवा कोशपंचक आत्म्याची, निवृत्ति शास्त्र करितें.

शिष्य—आपण शिजविण्याचे तांदूळ तयार करितांना तांदुळावर असलेलीं जीं निरनिराळीं कवचें असतात, तीं कांडून व सडून जशीं नाहींशीं करितों व आंत असलेला तांदूळ स्वीकारतों, त्याप्रमाणेंच श्रुतीचा हा प्रकार मला दिसतो.

सिद्धान्ती—ठीक आहे. श्रुति म्हणतेः त्या ह्या आतांच सांगितलेल्या अन्नरसमय कोशाहून (पिंडाहून) निराळा असा एक पिंड असतो. हाच प्राणमय पिंड होय. हा पिंड अन्नरसमयाच्या अभ्यंतरीं असतो.

शिष्य०—प्राणाला, पिंड म्हणणें ही केवळ कल्पनेची सृष्टि आहे. असो; या पिंडाला ' आत्मा ' असें म्हटलें, तें केवळ तो अन्नमयाच्या अंतर्यामी राहतो म्हणून होय ना !

सिद्धान्ती—होय. याला प्राणमय आत्मा म्हणतात. प्राण म्हणजे वायु. वायुसदृश हा आहे, वायुघटित आहे, म्हणून याला प्राणमय म्हटलें. हा प्राणमय आत्मा अन्नरसमयाला पूर्णता देतो, प्राणमयाशिवाय अन्नरसमयाला पूर्णता येत नाहीं. म्हणून प्राणमयाला अन्नमयाचा आत्मा असें म्हटलें. वायू जसा मेघाला पूर्णत्व देतो, किंवा फुंकण्याच्या भात्याला पूर्णत्व देतो, तसा हा प्राणमय अन्नरसमयाला पूर्ण करितो.

स वा एष पुरुषविध एव। तस्य पुरुषविधताम्। अन्वयं पुरुषविधः। तस्य प्राण एव शिरः। व्यानो दक्षिणः पक्षः। अपान उत्तरः पक्षः। आकाश आत्मा। पृथिवी पुच्छं प्रतिष्ठा। तदप्येष श्लोको भवति।

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि द्वितीये ब्रह्मवल्ल्यध्याये द्वितीयोऽनुवाकः ॥ २ ॥

अन्वय व अर्थः—**सः एषः वै पुरुषविधः एव** (तो हा प्राणमय पुरुषाकारच आहे) **तस्य पुरुषविधतां अनु अयं पुरुषविधः** (अन्नमयाच्या पुरुषाकारतेमागून प्राणमयाला पुरुषाकरता प्राप्त होते) **तस्य प्राणः एव शिरः; व्यानः दक्षिणः पक्षः; अपानः उत्तरः पक्षः; आकाशः आत्मा; पृथिवी पुच्छं प्रतिष्ठा** (त्याचें प्राणवायु हें मस्तक, व्यान उजवा पंख, अपान डावा पंख, आकाश आत्मा आणि पृथ्वी पुच्छ असून प्रतिष्ठा आहे) **तत् अपि एषः श्लोकः भवति.** (हाच अर्थ प्रतिपादणारा पुढील श्लोक आहे)

स वा एष प्राणमय आत्मा पुरुषविध एव पुरुषाकार एव। शिरःपक्षादिभिः किं स्वत एव, नेत्याह। प्रसिद्धं तावदन्नरसमयस्याऽऽत्मनः पुरुषविधत्वम्। तस्यान्नरसमयस्य पुरुषविधतां पुरुषाकारताम्। अन्वयं प्राणमयः पुरुषविधो मूषानिषिक्तप्रतिमावन्न स्वत एव। एवं पूर्वस्य पूर्वस्य पुरुषविधतामनूत्तरोत्तरः पुरुषविधो भवति। पूर्वः पूर्वश्चोत्तरोत्तरेण पूर्णः। कथं पुनः पुरुषविधताऽस्येत्युच्यते। तस्य प्राणमयस्य प्राण एव शिरः प्राणमयस्य वायुविका-

रस्य प्राणो मुखनासिकानिःसरणो वृत्तिविशेषः शिर एव परिकल्प्यते वचनात्। सर्वत्र वचनादेव पक्षादिकल्पना। व्यानो व्यानवृत्तिर्दक्षिणः पक्षः। अपान उत्तरः पक्षः। आकाश आत्मा य आकाशस्थो वृत्तिविशेषः समानाख्यः स आत्मेवाऽऽत्मा। "मध्यं ह्येषामङ्गानामात्मा" इति श्रुतिप्रसिद्धं मध्यमस्थस्याऽऽत्मत्वम्। पृथिवी पुच्छं प्रतिष्ठा। पृथिवीति पृथिवी देवताऽऽध्यात्मिकस्य प्राणस्य धारयित्री स्थितिहेतुत्वात्। "सैषा पुरुषस्यापानमवष्टभ्य" इति हि श्रुत्यन्तरम्। अन्यथोदानवृत्त्योर्ध्वगमनं गुरुत्वाच्च पतनं वा स्याच्छरीरस्य। तस्मात्पृथिवी देवतापुच्छं प्रतिष्ठा प्राणमयस्याऽऽत्मनः। तत्तस्मिन्नेवार्थे प्राणमयात्मविषय एष श्लोको भवति।

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यगोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यश्रीमच्छंकरभगवतः कृतौ तैत्तिरीयोपनिषदि द्वितीयब्रह्मवल्ल्यध्यायभाष्ये द्वितीयोऽनुवाकः॥ २॥

सिद्धान्ती--हा प्राणमय आत्मा पुरुषाकाराचाही असतो. म्हणजे त्यालाही मस्तक, पंख, इत्यादि असतात.

शिष्य--काय प्राणमयाला स्वतःला मस्तकादि अवयव असतात?

सिद्धान्ती--अन्नरसमय पिंडाला, अन्नरसमय आत्म्याला, पुरुषविधत्व म्हणजे पुरुषाचा आकार असतो, हें प्रसिद्धच आहे. त्याच्या मागून प्राणमयाला पुरुषाचा आकार प्राप्त होतो, अशी कल्पना येथें केली आहे. व अशी कल्पना श्रुति करणार आहे, हें मागेंच सांगितलेलें विसरलास वाटतें? असो; मुशींतील धातुरसाला प्रतिमेचें स्वरूप मागाहून येतें, स्वतः तो मूर्त नसतो; त्याप्रमाणेंच प्राणमयाला पुरुषाकार येतो, तो अन्नरसमयामुळें होय. याप्रमाणेंच पुढेंही असेंच समजावयाचें कीं, पहिल्या पहिल्या कोशाला पुरुषाकारता प्राप्त झाली म्हणजे त्याच्यामागून येणाऱ्या पिंडास ती प्राप्त होते; व पहिल्या पहिल्या पिंडास पूर्णत्व येतें, तें मागून येणाऱ्या पिंडामुळें येतें. असो; आतां याला पुरुषाचा आकार कशारीतीचा प्राप्त होतो, तें पहा. प्राणमयाचें मस्तक, प्राणवायु असतो; प्राणमय पिंड हा वायुविकार आहे, हें आतांच सांगितलें आहे. मुख व नासिका, यांतून बाहेर येणारा जो वायु तो प्राणवायु होय. हा प्राणवायु प्राणमयाचें मस्तक अशी श्रुतीनें प्रत्यक्ष शब्दांनीं कल्पना केली आहे.

शिष्य--म्हणजे श्रुतिवचन हाच या कल्पनेचा आधार?

सिद्धान्ती--होय. व्यानवायु उजवीकडील पंख व अपान डावीकडील पंख होत. समान नामक हृदयाकाशांत राहणारा जो विशेष वायु, तो या कल्पित पक्ष्याचा जणों

कांहीं आत्मा होय. प्राणवृत्तींच्या प्रकरणांत आकाश शब्द आला आहे. हृदयाकाशांत समानवायु असतो. म्हणून आकाशाला आत्मा म्हटलें. हा समान वायु प्राणवृत्त्यात्मक आहे. हा शरीराच्या मध्यभागीं राहतो; म्हणून इतर वायूंच्या अपेक्षेनें याला आत्मा असें म्हटलें. "ह्या अंगांच्या मध्याला आत्मा" असें श्रुतीनें नांव दिलेलें आहे. तात्पर्य, मध्यभागीं राहणाऱ्या वायूला आत्मत्व येतें, अशी श्रुतिकल्पना आहे.

त्या पक्ष्याचें पुच्छ पृथ्वी हें होय. येथें. पृथ्वी म्हणजे पृथ्वीची अधिष्ठात्री देवता, असें समजावयाचें. ही शरीरांत राहणाऱ्या प्राणाचा आधार आहे. हीच देवता त्याला स्थैर्य देते. 'पुरुषाच्या अपान वायूला व्याप्त करून ती ही' ही श्रुति प्रमाण आहे. पृथ्वीचा आश्रय नसता, तर उदानवायूच्या योगानें प्राणी वर गेले असते व जडत्वानें त्यांचें शरीर खालीं पडलें असतें. पृथ्वीचा आधार आहे, म्हणून प्राण्यांची स्थिति ठीक असते. म्हणून पृथ्वीदेवतेला 'आश्रय देणारें पुच्छ' असें म्हटलें आहे. ही देवता प्राणमयाचें आधारस्थान आहे. हा सर्व अर्थ स्पष्ट करण्यासाठीं, प्राणमय आत्मारामाचें विवरण करण्यासाठीं, श्रुतीनें पुढील श्लोकाची योजना केली आहे.

दुसरा अनुवाक समाप्त.

ब्रह्मवल्ल्यध्याये तृतीयोऽनुवाकः।

प्राणं देवा अनु प्राणन्ति। मनुष्याः पशवश्च ये। प्राणो हि भूतानामायुः। तस्मात्सर्वायुषमुच्यते। सर्वमेव त आयुर्यन्ति। ये प्राणं ब्रह्मोपासते। प्राणो हि भूतानामायुः। तस्मात्सर्वायुषमुच्यत इति। तस्यैष एव शारीर आत्मा। यः पूर्वस्य।

तस्माद्वा एतस्मात्प्राणमयात्। अन्योऽन्तर आत्मा मनोमयः। तेनैष पूर्णः। स वा एष पुरुषविध एव। तस्य पुरुषविधताम्। अन्वयं पुरुषविधः। तस्य यजुरेव शिरः। ऋग्दक्षिणः पक्षः। सामोत्तरः पक्षः। आदेश आत्मा। अथर्वाङ्गिरसः प्रतिष्ठा। तदप्येष श्लोको भवति।

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि द्वितीये ब्रह्मवल्ल्यध्याये तृतीयोऽनुवाकः॥ ३॥

अन्वय व अर्थः—ये देवाः, मनुष्याः, पशवः च प्राणम् अनु प्राणन्ति (सर्व देवता आणि सर्व मनुष्यें व पशू आहेत, ते सर्व प्राणवायूच्या आधारानें जिवंत राहतात) हि भूतानां प्राणः आयुः (कारण प्राण हा जीवांचें, भूतांचें, आयुष्यकारण आहे) तस्मात् सर्वायुषम् उच्यते (म्हणून सर्वायुष असें म्हणतात) ये प्राणं ब्रह्म उपासते, ते सर्वम् एव आयुः यन्ति (जे प्राणब्रह्माची उपासना करितात त्यांना सर्व आयुष्याची प्राप्ति होते) हि प्राणः भूतानाम् आयुः, तस्मात् सर्वायुषम् उच्यते (याचा अर्थ आतांच सांगितला आहे) इति (हा या श्लोकाचा अर्थ आहे) तस्य यः पूर्वस्य शारीरः आत्माः एषः एव (त्यापूर्वी सांगितलेल्या अन्नरसमय आत्म्याच्या शरीरांत राहणारा जो प्राणमय आत्मा तो हा–आहे.)

तस्मात् एतस्मात् प्राणमयात् अन्यः वै अन्तरः मनोमयः आत्मा (हें सिद्ध आहे कीं, त्या ह्या प्राणमय आत्म्याच्या अंतर्यामीं जो मनोमय नामक अन्य आत्मा आहे) तेन एषः पूर्णः (त्यानें हा प्राणमय आत्मा पूर्ण होतो) सः वै एषः पुरुषविधः एव (त्या ह्याला पुरुषाकारता प्राप्त होते) तस्य पुरुषविधतां अनु अयं पुरुषविधः (त्या प्राणमयाच्या पुरुषाकारतेमुळें या मनोमयाला पुरुषाकारत्व प्राप्त होतें) तस्य यजुः एव शिरः; ऋक् दक्षिणः पक्षः; साम उत्तरः पक्षः; आदेशः आत्मा; अथर्वांगिरसः प्रतिष्ठा (मनोमयाचें यजुर्वेद मस्तक, ऋग्वेद उजवा पंख, सामवेद डावा पंख, इतिकर्तव्यता हा आत्मा, आणि अथर्वांगिरस पुच्छ आणि प्रतिष्ठा आहे) तत् अपि एषः श्लोकः भवति (त्याच्या संबंधानें हा पुढील श्लोक श्रुति अवतारित आहे)

प्राणं देवा अनु प्राणन्ति । देवा अग्न्यादयः प्राणं वाय्वात्मानं प्राणनशक्तिमन्तमनु तदात्मभूताः सन्तः प्राणन्ति प्राणनकर्म कुर्वन्ति प्राणनक्रियया क्रियावन्तो भवन्ति । अध्यात्माधिकाराद्देवा इन्द्रियाणि प्राणमनु प्राणन्ति मुख्यप्राणमनु चेष्टन्त इति वा । तथा मनुष्याः पशवश्च ये ते प्राणनकर्मणैव चेष्टावन्तो भवन्ति । अतश्च

चान्नमयेनैव परिच्छिन्नेनाऽऽत्मनाऽऽत्मवन्तः प्राणिनः । किं तर्हि तदन्तर्गतेन प्राणमयेनापि साधारणेनैव सर्वपिण्डव्यापिनाऽऽत्मवन्तो मनुष्यादयः । एवं मनोमयादिभिः पूर्वपूर्वव्यापिभिरुत्तरोत्तरैः सूक्ष्मैरानन्दमयान्तैराकाशादिभूतारब्धैरविद्याकृतैरात्मवन्तः सर्वे प्राणिनः । तथा स्वाभाविकेनाऽऽप्याकाशादिकारणेन नित्येनाविकृतेन सर्वगतेन सत्यज्ञानानन्तलक्षणेन पञ्चकोशातिगेन सर्वात्मनाऽऽत्मवन्तः । स हि परमार्थत आत्मा सर्वेषामित्येतदप्यर्थादुक्तं भवति । प्राणं देवा अनु प्राणन्तीत्युक्तं तत्कस्मादित्याह । प्राणो हि यस्माद्भूतानां प्राणिनामायुर्जीवनम् । " यावद्धयस्मिञ्छरीरे प्राणो वसति तावदायुः " इति श्रुत्यन्तरात् । तस्मात्सर्वायुषम् । सर्वेषामायुः सर्वायुरेव सर्वायुषमित्युच्यते । प्राणापगमे मरणप्रसिद्धेः । प्रसिद्धं हि लोके सर्वायुश्च प्राणस्य । अतोऽस्माद्बाह्यादसाधारणादन्नमयादात्मनोऽपक्रम्यान्तः साधारणं प्राणमयमात्मानं ब्रह्मोपासते येऽहमस्मि प्राणः सर्वभूतानामात्माऽऽयुर्जीवनहेतुत्वादिति ते सर्वमेवाऽऽयुरस्मिँल्लोके यन्ति नापमृत्युना म्रियन्ते प्राक्प्राप्तादायुष इत्यर्थः । शतं वर्षाणीति तु युक्तं सर्वमायुरिति श्रुतिप्रसिद्धेः । किं कारणं प्राणो हि भूतानामायुस्तस्मात्सर्वायुषमुच्यत इति । यो यद्गुणकं ब्रह्मोपास्ते स तद्गुणभाग्भवतीति विद्याफलप्राप्तेर्हेत्वर्थं पुनर्वचनं प्राणो हीत्यादि । तस्य पूर्वस्यान्नमयस्यैष एव शारीरेऽन्नमये भवः शारीर आत्मा । कः । य एष प्राणमयः ।

सिद्धान्ती—सर्व अग्निप्रमुख देव जिवंत राहतात, ते वायुरूपी प्राणाच्या–म्हणजे प्राणनशक्तिवंताच्यामुळें; सारांश, ते सर्व देव प्राणमयानें आत्मरूप असतात; म्हणून प्राणन–कर्म करितात, जिवंत राहतात व जिवंत राहून आपापले व्यापार करितात. अध्यात्मसंबंधानें आपण विचार करीत आहोंत, म्हणून देव म्हणजे इंद्रियें होत, असें येथें समजावयाचें. हीं इंद्रिये जिवंत राहतात, तीं मुख्यतः प्राणशक्तीच्या आश्रयानें जिवंत राहतात; किंवा आपापलीं कर्में करितात. ह्याचप्रमाणें मनुष्यें आहेत, पशु आहेत, तेही जिवंत राहतात व म्हणूनच स्वस्व–कर्में करितात. यावरून हें उघड होते कीं, केवळ अन्नमय जो परिछिन्न आत्मा त्यानेंच प्राणी आत्मवंत होतात, असें नाहीं; तर अन्नमयाच्या अंतर्यामीं असणाऱ्या सर्वसाधारण प्राणमय–आत्म्यानें, सर्व पिंडांस व्यापून टाकणाऱ्या प्राणमयानें, मनुष्यादि आत्मवंत होतात. याच न्यायानें पूर्व-पूर्वीचे कोश व्यापून टाकणाऱ्या मनोमयादि पुढच्या पुढच्या सूक्ष्म व सूक्ष्मतर आनंदमय कोशापर्यंतच्या सर्व पंचकोशांनीं सर्व प्राणी आत्मवंत होतात.

शिष्य--म्हणजे, आकाशादि पंचमहाभूतांनीं आरब्ध केलेला अन्नमय, त्यास व्यापणारा प्राणमय, इत्यादि सर्व पंचकोश जीवाचे उत्तरोत्तर श्रेष्ठश्रेष्ठ असणारे आत्मे आहेत, असें झालें.

सिद्धांती—होय; पण हें ध्यानांत ठेव कीं, हे पांचही कोशरूपी आत्मे अविद्येनें उत्पन्न केलेले आहेत. अर्थातच स्वभावसिद्ध असणारा, आकाशादि महाभूतांचें कारण असणारा, जो नित्य, अविकृत, सर्वगामी, सत्यज्ञानानंतलक्षणात्मक, पंचकोशातीत सर्वात्मा आहे, परमात्मा आहे, त्यानें सर्व प्राणी आत्मवंत होतात. याचा अर्थ असा आहे कीं, परमार्थतः हाच सर्वांचा खरा आत्मा असतो. बाकीचे सर्व आत्मे अविद्याजन्य असतात, असें समजून घेणें अगत्याचें आहे.

शिष्य—हें मला समजलें; पण देव म्हणजे आपल्या इंद्रियदेवता किंवा इंद्रियें, हीं प्राणामुळें जिवंत राहतात, असें श्रुति म्हणतें. तें कसें? हें मला समजत नाहीं.

सिद्धान्ती—कारण हें आहे कीं, सर्व-भूतांचें (प्राण्यांचें) जीवन हा मुख्य प्राण आहे. "जोंपर्यंत ह्या शरीरांत प्राण राहतो, तोंपर्यंतच त्याला आयुष्य असतें." असें अन्य श्रुति म्हणते; आणि म्हणूनच प्राणाला किंवा प्राणशक्तीला 'सर्वायुष्' असें नांव आहे.

शिष्य—सर्वायु म्हणजे?

सिद्धान्ती—सर्वांचें आयुष्य. सर्वायु आणि सर्वायुष यांचा अर्थ एकच आहे. कारण, प्राणविनाश झाला म्हणजे मरण प्राप्त होतें, हें सर्व-विदित आहे. व्यवहारांतही प्राणाचें सर्वायुषत्व प्रसिद्ध आहे. तात्पर्य, प्राणमय श्रेष्ठ आहे. म्हणून बाह्य असणारा जो असाधारण (अनित्य; विशेषपरिस्थितींत असणारा;) अन्नमय आत्मा, त्याच्याठिकाणीं असलेली आत्मबुद्धि सोडून देऊन सर्व-साधारण असणारा जो प्राणमय आत्मा आहे, त्याची (अंतर्बाह्य वियमान-असणाऱ्याची) उपासना करणें इष्ट आहे. प्राणमय आत्म्याला ब्रह्म समजून त्याची जे उपासना करितात—

शिष्य—या उपासनेचें विधिविधान काय?

सिद्धान्ती—"मी स्वतः प्राण आहें, सर्व-भूतांचा आत्मा (प्राण) आहें. त्यांना जिवंत ठेवणारें आयुष्य मी आहें" अशी भावना असणें हींच प्राणोपासना होय. अशीं जे उपासना करितात, त्यांना सर्वच्या सर्व आयुष्य याही लोकांत प्राप्त होतें. त्यांना अपमृत्यूची बाधा होत नाहीं. पूर्वकर्मानें त्यांचा जो आयुर्दाय नियमित झालेला असतो, तितके दिवस ते जगतात. इतकेंच काय? पण मानवी प्राण्याच्या आयुर्दायाची सीमा शंभर वर्षें ठरविली आहे, तितके दिवस ते जगतात. सर्वायुष्य म्हणजे शंभर वर्षें होत, हें श्रुतिसिद्ध आहे. सारांश, मानवाचें सर्व आयुष्य प्राणोपासकाला मिळतें.

त्याचें कारण हें आहे कीं, प्राण हा सर्वभूतांचें आयुष्य आहे; आणि म्हणूनच त्याला 'सर्वायुष' अशी संज्ञा आहे. आतां, हें प्रसिद्ध आहे, तरी श्रुति येथें स्पष्ट सांगते कीं, ब्रह्मावर ज्या गुणाचा आरोप करून आपण तद्गुणवत ब्रह्माची उपासना करितों, ते गुण आपल्यास प्राप्त होतात. प्राणब्रह्माची उपासना केलीं असतां सर्वायुषाची प्राप्ति होणे, प्राणोपासनेचें हें फळ आहे, हें सांगण्यासाठीं श्रुतीनें पुन्हां प्राण हा सर्वांचें आयुष्य आहे व म्हणूनच त्याला सर्वायुष असें म्हणतात, हें सांगितलें. पूर्वी ज्या अन्नमयब्रह्माचा उल्लेख केला, तेंच शरीर होऊन त्यामध्यें राहणारा हा प्राणमय आत्मा असतो. अन्नमय-शरीरामुळें याला 'शरीरी' असें म्हणतात. हा आत्मा--

शिष्य—कोणता आत्मा भगवन्!

सिद्धान्ती—हा प्राणमय आत्मा होय. अन्नमयाचा आत्मा प्राणमय आणि प्राणमयाचें शरीर अन्नमय, अशीही श्रुतिगीत विरचना आहे.

तस्माद्वा एतस्मादित्युक्तार्थमन्यत्। अन्योऽन्तर आत्मा मनोमयः। मन इति संकल्पाद्यात्मकमन्तःकरणं तन्मयो मनोमयो यथाऽन्नमयः। सोऽयं प्राणमयस्याऽऽभ्यन्तर आत्मा। तस्य यजुरेव शिरः। यजुरित्यनियताक्षरपादावसानो मन्त्रविशेषस्तज्जातीयवचनो यजुःशब्दस्तस्य शिरस्त्वं प्राधान्यात्। प्राधान्यं च यागादौ संनिपत्योपकारात्। यजुषा हि हविर्दीयते स्वाहाकारादिना। वाचनिकी वा शिरआदिकल्पना सर्वत्र। मनसो हि स्थानप्रयत्ननादस्वरवर्णपदवाक्यविषया तत्संकल्पात्मिका तद्भाविता वृत्तिः श्रोत्रादिकरणद्वारा यजुःसंकेतविशिष्टा यजुरित्युच्यते। एवमृगेवं साम च। एवं च मनोवृत्तित्वे मन्त्राणां वृत्तिरेवाऽऽवर्त्यत इति मानसो जप उपपद्यते अन्यथाऽविषयत्वान्मन्त्रो नाऽऽवर्तयितुं शक्यो घटादिवदिति मानसो जपो नोपपद्यते। मन्त्रावृत्तिश्च चोद्यते बहुशः कर्मसु। अक्षरविषयस्मृत्यावृत्त्या मन्त्रावृत्तिः स्यादिति चेन्न। मुख्यार्थासंभवात्। "त्रिः प्रथमामन्वाह त्रिरुत्तमाम्" इति ऋगावृत्तिः श्रूयते। तत्रर्चोऽविषयत्वे तद्विषयस्मृत्यावृत्तौ च क्रियमाणायां त्रिः प्रथमामन्वाहेति ऋगावृत्तिर्मुख्योऽर्थश्चोदितः परित्यक्तः स्यात्। तस्मान्मनोवृत्त्युपाधिपरिच्छिन्नं मनोवृत्तिनिष्ठमात्मचैतन्यमनादिनिधनं यजुःशब्दवाच्यमात्मविज्ञानं मन्त्रा इति। एवं च नित्यत्वोपपत्तिर्वेदानाम्। अन्यथाविषयत्वे रूपादिवदनित्यत्वं च स्यान्नैतद्युक्तम्। "सर्वे वेदा यत्रैकं भवन्ति स मानसीन आत्मा"

इति च श्रुतिर्नित्यात्मनैकत्वं ब्रुवत्यृगादीनां नित्यत्वे समञ्जसा स्यात्।
" ऋचो अक्षरे परमे व्योमन्यस्मिन्देवा अधि विश्वे निषेदुः "
इति च मन्त्रवर्णः।

सिद्धान्ती—पूर्वी सांगितलेल्या अर्थपद्धतीनेंच ह्या त्या प्राणमयाच्या अंतर्यामी असणारा अन्य (तद्विलक्षण) दुसरा आत्मा आहे, त्याचें नांव मनोमय आत्मा होय, असा श्रुत्यर्थ ठरतो.

शिष्य—मन म्हणजे संकल्प-विकल्पाला धारण करणारें अंतःकरण; संकल्प-विकल्पानें जो घटित होतो तो मनोमय आत्मा, असेंच ना ?

सिद्धान्ती—होय; हा मनोमय प्राणमयाच्या अंतर्यामी असतो. त्याचें यजुः हें मस्तक होय.

शिष्य—यजुः म्हणजे ?

सिद्धान्ती—ज्या मंत्रांतील अक्षरांचा, चरणांचा किंवा अवसानांचा नियम नसतो, त्या मंत्रविशेषाला यजु असें म्हणतात. त्या सर्व मंत्र-जातीला यजु हें नांव आहे. म्हणून या मंत्रांतील ' यजुष् ' शब्द तदर्थक आहे.

शिष्य—यजुः मस्तक कां ?

सिद्धान्ती—कारण, यजुः प्रधान आहे म्हणून. यज्ञयागादिकांच्या अनुष्ठानांत वियमान राहून हा 'यजुः' अत्यंत उपकारक होतो. म्हणून हा प्रधान आहे. स्वाहाकारादि जें जें हविर्दान करावयाचें असतें, तें यजुर्वेदाच्या साहाय्यानें होतें. हा यजुर्वेद मनोमयाचें मस्तक आहे. वास्तविक पाहतां मनोमयाला शिर, दक्षिणपक्ष, उत्तरपक्ष इत्यादि कांहीं नसतें. तथापि जीवांची समजूत सोकर्यानें व्हावी, म्हणून शिरादिकांची श्रुतीनें कल्पना केली आहे. अर्थात् ही केवळ शाब्दिक कल्पना आहे.

शिष्य—तथापि मनाचा आणि यजुर्वेदाचा काय संबंध आहे, हें मला समजत नाहीं.

सिद्धान्ती—अरे; आपल्यास कांहींही अर्थ बोलावयाचा असला म्हणजे त्या त्या वर्णांचें स्थान, त्याला लागणारा प्रयत्न, त्याचा नाद, स्वर, वर्ण, पद, वाक्य इत्यादि विषयांचा संकल्प करून तदात्मक झालेल्या मनाच्या वृत्ती कर्णादि इंद्रिय-द्वारानें उद्भूत होतात. संकल्प ही मानसिक क्रिया आहे. ही मनःक्रिया यजुःसंकेत-विशिष्ट असली (यजुर्मंत्रांचा शास्त्रोक्त उच्चार करण्याचा तिचा संकल्प असला) म्हणजे त्या मनोवृत्तीला यजुः म्हणावें. ऋक् आणि साम नामकही मनोवृत्ती अशाच उत्पन्न होतात. याप्रमाणें सर्व मंत्रांस मनोवृत्तित्व प्राप्त होतें. ह्या मनोवृत्तींची पुनः पुनः आवृत्ति होते, म्हणन आवृत्ति हा सर्व मानसिक जप होतो, असें म्हणणें योग्यच होतें.

शिष्य—खरेंच आहे, यजुःप्रणीत मंत्र जर मनाचे विषय नसतील, घटादिकांसारखे ते बाहेरचे विषय असतील, तर मनानें मात्र त्या त्या 'बाह्य' मंत्रांची आवृत्ति होणें शक्यच नाहीं. अर्थात् मग मानसिक जपाचें नांवच घ्यावयास नको.

सिद्धांती—आणि श्रुतीनें तर पुष्कळ ठिकाणीं 'मंत्रावृत्ति करावी. मानसिक जप करावा' अशी कर्मविधान सांगतांना आज्ञा केली आहे. यावरूनच श्रुतीला आवृत्त होणाऱ्या मनोवृत्तींचीच अपेक्षा होती, असें स्पष्ट होतें.

पूर्व०—मंत्रांतील अक्षरांचा जो विषय असतो, जो मंत्रार्थ असतो, त्याचें स्मरण करून अर्थाची आवृत्ति केली म्हणजे ही मंत्रावृत्तिच होईल.

सिद्धान्ती—हें ठीक; पण तुमच्या अर्थानें मुख्यार्थाचा बाध होतो; आणि हें तर इष्ट नाहीं. शिवाय, जेथें मुख्यार्थाचा संभव असतो, तेथें गौणार्थाचा स्वीकार करावा, हें योग्यही नव्हे.

पूर्व०—कसा बाध होतो मुख्यार्थाचा?

सिद्धान्ती—जेव्हां अध्वर्यु सामिधेनि नामक-समिधांची आहुति देत असतो, तेव्हां "प्र वो वाजा अभिध्यवः", हें अठरा ऋचांचें सूक्त होता ह्मणत असतो. त्या ऋचांतील 'पहिली ऋचा व शेवटची ऋचा तीन तीन वेळ म्हणावी' अशी श्रुतीची आज्ञा आहे. आतां तुमच्या म्हणण्याप्रमाणें हे मंत्र मनाचे विषय नाहींत व त्यांत असणाऱ्या विषयाच्या अर्थाची मात्र स्मरणपूर्वक आवृत्ति केली तर चालते, असें मानल्यास "पहिल्या ऋचेची व शेवटल्या ऋचेची तीन तीन वेळ आवृत्ति करावी, अक्षरावृत्ति करावी, असा जो मुख्य अर्थ आहे, तो सोडून द्यावा लागतो. अर्थात् श्रुतीच्या आज्ञेविरुद्ध वागावें लागतें. हें तर इष्ट नाहीं. म्हणून यजुः, ऋक्, आणि साम ह्या मनोवृत्ती आहेत असें संपादून म्हणणें भाग आहे. या प्रमाणें मनोवृत्तींच्या उपाधीनें मर्यादित होऊन मनोवृत्तिनिष्ठ असणारें जें आत्मचैतन्य अनाद्यनंत असतें, तेंच यजुः शब्दानें वर्णिलेलें आत्मविज्ञान म्हणजे वेदमंत्र होत. आपण असा अर्थ केला तरच, वेदांचे नित्यत्व सिद्ध होतें.

शिष्य—म्हणजे काय?

सिद्धान्ती—'वेद नित्य आहेत' हा सिद्धांत आहे. तेव्हां वेदांतील मंत्रांच्या संकेतानें विशिष्ट असणाऱ्या मंत्रविशिष्ट मनोवृत्तींमध्यें आत्मचैतन्य आहे, असें मानल्याशिवाय वेदनित्यत्व सिद्धच होणार नाहीं.

शिष्य—वेद हें घटपटादिकांसारखें बाह्य विषय आहेत, असें मानिलें तर?

सिद्धांती—ते वेद बाह्य-रूपरंगासारखे अनित्य होतील; आणि हें तर योग्य नाहीं. शिवाय, 'जेथें सर्व वेद एकस्वरूप होतात. तो मानसिक, मनोनिष्ठ आत्मा होय,' असें श्रुतीचें सांगणें आहे. नित्य असणाऱ्या आत्म्याशीं ऋग्वेदादि-

कांचें एकत्व आहे, हा श्रुतीचा अभिप्राय आहे; तेव्हां ऋग्वेदादिही* नित्य असतील, तरच श्रुतींचें म्हणणें समंजस होईल.

"श्रेष्ठ आणि अविनाशी अशा आकाशांमध्यें (ब्रह्मामध्यें) सर्व देव आश्रय घेऊन राहतात. तेथेंच ऋग्वेदाचे विधिनिषेधरूप मंत्र एकस्वरूपानें देवीसाह्य घेऊन व्यवस्थित केले आहेत." हा श्वेताश्वेतरोक्त मंत्रवर्णही ऋग्वेदाचें अविनाशी आकाशाशीं, (ब्रह्माशीं) एकत्व दाखवीत आहे.

ओदेशोऽत्र ब्राह्मणमतिदेष्टव्यविशेषानतिदिशतीति । अथर्वाङ्गिरसा च दृष्टा मन्त्रा ब्राह्मणं च शान्तिकपौष्टिकादिप्रतिष्ठाहेतुकर्मप्रधानत्वात्पुच्छं प्रतिष्ठा । तदप्येष श्लोको भवति मनोमयात्मप्रकाशकः पूर्ववत् ।

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यगोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यश्रीमच्छंकरभगवतः कृतौ तैत्तिरीयोपनिषदि द्वितीयब्रह्मवल्ल्यध्यायभाष्ये तृतीयोऽनुवाकः ॥ ३ ॥

सिद्धान्ती—येथें आदेश आत्मा आहे. अमुक करावें, अमुक करूं नये, असा जो उपदेश त्याचा अतिदेश करून श्रुति म्हणते कीं, त्या ह्या उपदेशाला आदेश असें म्हणावयाचें. हा आदेश मनोमयाचा आत्मा आहे. शेवटीं, अथर्वांगिरस ऋषींनीं जे मंत्र व ब्राह्मण पाहिले, अथर्वांगिरस ज्या शांती-पुष्टि-तुष्टि-आदि प्रतिष्ठापक कर्म सांगणाऱ्या मंत्रांचे द्रष्टे झाले, ते ऋषी अथवा त्यांनीं पाहिलेले मंत्र हें मनोमयाचें पुच्छ होय. हेंच त्याचें आश्रयस्थान आहे. या सर्व विवेचनाचें समर्थन करणारा व मनोमय आत्म्याचें प्रकाशन करणारा पुढील श्लोक आहे.

तिसरा अनुवाक संपूर्ण.

---

* वेद नित्य आहेत. कारण, नित्य असणाऱ्या परमात्म्याचा जो व्यावहारिक भाग 'मनोमय' तो नित्य आहे व या मनोमयाच्या वृत्तींत वेदमंत्रांचीं अक्षरें एकरूप होतात. म्हणून वेद नित्य आहेत, असें म्हणण्याचा भावार्थ दिसतो; पण याचा अधिक ऊहापोह उपसंहार-समयीं करूं.

ब्रह्मवल्ल्यध्याये चतुर्थोऽनुवाकः ।

यतो वाचो निवर्तन्ते । अप्राप्य मनसा सह । आनन्दं ब्रह्मणो विद्वान् । न बिभेति कदाचनेति । तस्यैष एव शारीर आत्मा । यः पूर्वस्य । तस्माद्वा एतस्मान्मनोमयात् । अन्योऽन्तर आत्मा विज्ञानमयः । तेनैष पूर्णः । स वा एष पुरुषविध एव । तस्य पुरुषविधताम् । अन्वयं पुरुषविधः ।

तस्य श्रद्धैव शिरः । ऋतं दक्षिणः पक्षः । सत्यमुत्तरः पक्षः । योग आत्मा । महः पुच्छं प्रतिष्ठा । तदप्येष श्लोको भवति ।

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि द्वितीये ब्रह्मवल्ल्यध्याये चतुर्थोऽनुवाकः ॥ ४ ॥

अन्वय व अर्थः—अप्राप्य यतः मनसा सह वाचः निवर्तन्ते (अगोचर आहे, असें पाहून जेथून मनासह वाणी—वाणी चार प्रकारची आहे-परत फिरते) ब्रह्मणः आनंदं विद्वान् कदाचन न बिभेति (त्या ब्रह्माचा आनंद जाणणारा विद्वान् केव्हांही भीतीला वश होत नाहीं) इति (असा या श्लोकाचा भावार्थ आहे. याचें स्पष्टीकरण नवव्या अनुवाकाच्या शेवटीं आपण करूं) पूर्वस्य तस्य यः शारीरः आत्मा एषः एव (त्या पूर्वी प्रतिपादलेल्या प्राणमयाचा जो शारीरी आत्मा तो हाच होय) तस्मात् एतस्मात् मनोमयात् वै अन्यः विज्ञानमयः अन्तरः आत्मा, तेन एषः पूर्णः (त्या ह्या मनोमयाहून निराळा असणारा विज्ञानमय आत्मा अंतर्यामी असतो व त्यानेंच त्या प्राणमयाला पूर्णत्व येतें) सः एषः वै पुरुषविधः एव, तस्य पुरुषविधताम् अनु अयं पुरुषविधः (तो हा शरीराकाराचाच आहे. त्या मनोमयाच्या पुरुषाकारामुळें ह्याला पुरुषाकारत्व प्राप्त होतें)

तस्य श्रद्धा एव शिरः, ऋतं दक्षिणः पक्षः, सत्यम् उत्तरः पक्षः योगः आत्मा, महः पुच्छं प्रतिष्ठा (यांचें श्रद्धा हेंच शिर, ऋत उजवा पंख, सत्य डावा पंख, योग म्हणजे समाधान हा आत्मा; आणि महत्–सर्व सामान्य बुद्धि–द्रव्य–ह्यांचें पुच्छ आणि प्रतिष्ठा आहेत) **तत् अपि एषः श्लोकः भवति.** (हाच अभिप्राय समर्थित करणारा पुढील श्लोक आहे.)

यतो वाचो निवर्तन्ते । अप्राप्य मनसा सहेत्यादि । तस्य पूर्वस्य प्राणमयस्यैष एवाऽऽत्मा शारीरः शरीरे प्राणमये भवः शारीरः । कः । य एष मनोमयः । तस्माद्वा एतस्मादित्यादि पूर्ववत् । अन्योऽन्तर आत्मा विज्ञानमयो मनोमयस्याऽऽभ्यन्तरो विज्ञानमयो वेदात्मोक्तः । वेदार्थविषया बुद्धिर्निश्चयात्मिका विज्ञानं तच्चाध्यवसायलक्षणमन्तःकरणस्य धर्मः । तन्मयो निश्चयविज्ञानैः प्रमाणस्वरूपैर्निर्वर्तित आत्मा विज्ञानमयः । प्रमाणविज्ञानपूर्वको हि यज्ञादिस्तायते । यज्ञादिहेतुत्वं च वक्ष्यति श्लोकेन ।

सिद्धांती—या अनुवाकांत जो श्लोक आहे. त्याचें विस्तृत व्याख्यान व तात्पर्य ब्रह्मवल्लीच्या शेवटीं मी सांगणार आहें. कारण, तें आतांच सांगितलें तर तुम्हांला नीटसें समजणार नाहीं. असो; त्या तिसऱ्या अनुवाकांतील प्राणमयाचा मनोमय हा आत्मा आहे. हा प्राणमयामध्यें प्रकट होऊन राहतो; म्हणून त्याचें प्राणमय शरीर आणि हा प्राणमयाचा शरीरी असा संबंध आहे.

शिष्य—हा म्हणजे मनोमय आत्मा ?

सिद्धान्ती—होय; त्या ह्या मनोमय आत्म्याहून निराळा पण त्याच्या अंतर्यामीं राहणारा विज्ञानमय आत्मा आहे; आपण आतांच पाहिलें आहे कीं, मनोमय हा वेदात्मा आहे. अर्थातच मग विज्ञानमय आत्मा ह्या वेदात्म्याचाही आत्मा आहे.

शिष्य—नाहीं समजलें.

सिद्धान्ती—वेदाचा जो अर्थ असतो तो बुद्धीचा विषय असतो. बुद्धि निश्चयात्मक आहे. हिलाच विज्ञान म्हणतात. विज्ञान निश्चयलक्षणात्मक असून अंतःकरणाचा धर्म आहे. तन्मय म्हणजे ज्या निश्चय–विज्ञानाचें स्वरूप प्रमाणशुद्ध आहे, त्यांनीं सिद्ध होणें होय. असा सिद्ध झालेला आत्मा तो विज्ञानमय आत्मा होय. ज्याला प्रमाणविज्ञानांचें उत्कृष्ट ज्ञान झालें, तोच यज्ञादिकांचें अनुष्ठान करितो. विज्ञान हा यज्ञादिकांचा हेतु आहे, हें पुढच्या श्लोकांत सांगत आहेत.

निश्चयविज्ञानवतो हि कर्तव्येष्वर्थेषु पूर्वं श्रद्धोत्पद्यते। सा सर्वकर्तव्यानां प्राथम्याच्छिर इव शिरः। ऋतसत्ये यथाव्याख्याते एव। योगो युक्तिः समाधानम्। आत्मेवाऽऽत्मा। आत्मवतो हि युक्तस्य समाधानवतोऽङ्गानीव श्रद्धादीनि यथार्थप्रतिपत्तिक्षमाणि भवन्ति, तस्मात्समाधानं योग आत्मा विज्ञानमयस्य। महः पुच्छं प्रतिष्ठा। महः इति महत्तत्त्वं प्रथमजम्। "महद्यक्षं प्रथमजम्।" इति श्रुत्यन्तरात्। पुच्छं प्रतिष्ठाकारणत्वात्। कारणं हि कार्याणां प्रतिष्ठा। यथा वृक्षवीरुधां पृथिवी। सर्वबुद्धिविज्ञानानां च महत्तत्त्वं कारणम्। तेन तद्विज्ञानमयस्याऽऽत्मनः प्रतिष्ठा। तदप्येष श्लोको भवति पूर्ववत्। यथाऽन्नमयादीनां ब्राह्मणोक्तानां प्रकाशकः श्लोका एवं विज्ञानमयस्यापि॥

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यगोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यश्रीमच्छंकरभगवतः कृतौ तैत्तिरीयोपनिषदि द्वितीयब्रह्मवल्ल्यध्यायभाष्ये चतुर्थोऽनुवाकः॥ ४॥

सिद्धान्ती—ज्याला हा निश्चय–विज्ञान प्राप्त झालें आहे, त्याला तत्त्वात्मक विहित कर्तव्यांचें ठिकाणीं प्रथमतः श्रद्धा उत्पन्न होते.

शिष्य—म्हणजे कोणत्याही पुरुषार्थांचें प्रामाणिक ज्ञानविज्ञान झालें, म्हणजे तो अर्थ प्राप्त करून देण्याच्या साधनाविषयीं व साध्याविषयीं जो विश्वास प्रथम उत्पन्न होतो, ज्ञानविज्ञान प्राप्त करून देणाऱ्या साधनावर व प्राप्तव्य साध्यावर जो विश्वास उत्पन्न होतो, त्याला श्रद्धा असें म्हणावयाचें. ही सर्वकर्तव्याच्या पूर्वी उत्पन्न होते.

सिद्धान्ती—म्हणूनच श्रुतीनें कर्तव्यप्रेरक श्रद्धेला शिर असें म्हटलें आहे. ऋत व सत्य यांचा अर्थ पूर्वीच सांगितला आहे. योग म्हणजे समाधान अथवा निर्विकार चित्तवृत्ति. हें समाधान विज्ञानमयाचा आत्माच जणों कांहीं आहे. निर्विकारी चित्ताच्या युक्त पुरुषाला उत्कृष्ट समाधान असलें, म्हणजे शारीरिक अंगोपांगाप्रमाणें श्रद्धादि इतर अंगें व उपांगें आपआपलीं विशेष–कर्मे करण्यास समर्थ होऊन आपापले अर्थ प्राप्त करून घेतात. म्हणून समाधान हा आत्मा आहे, असें श्रुति म्हणते.

शिष्य—आत्मस्थानीं असणारें समाधान म्हणजे निर्विकारता मूर्तिमंत असल्यावर बाकीचीं अंगें स्वस्वकार्य–समर्थ–स्थितींत असतात, हें नीटच आहे. आणि म्हणूनच विज्ञानमय–शरीराच्या आत्मस्थानीं समाधानाची योजना केली आहे. समाधान हा जणों सर्वनियामक आत्माच होय.

सिद्धान्ती—असो. महः म्हणजे सृष्टीच्या प्रारंभीं उत्पन्न झालेलें महत्–तत्त्व. हें हा विज्ञानमयाचें पुच्छ आणि प्रतिष्ठा आहे. "पूजनीय महत् हें प्रथमतः उत्पन्न

झालें " अशी श्रुति प्रमाण आहे. महत् म्हणजे सर्वसामान्य बुद्धितत्त्व आहे; म्हणून त्याच्या आधारानें विज्ञानमय आत्म्याची स्थापना होते.

शिष्य—बरोबरच आहे. महत्-तत्त्व (सर्वसाधारण बुद्धितत्त्व) हें सर्व बुद्धि-विज्ञानाचें कारण आहे. वृक्षवेलींचें कारण पृथ्वी होय, तसें महत् हें बुद्धिकारण होय. तात्पर्य कारणामुळें कार्यांची प्रतिष्ठापना होते.

सिद्धान्ती—आणि म्हणूनच महत्-तत्त्वामुळें विज्ञानमयआत्म्याला प्रतिष्ठा (स्थिति) प्राप्त होते, हाच अर्थ सांगणारा पुढील श्लोक आहे. मागें अन्न-मयादिकांचे अर्थ प्रकाशित करणारे श्लोक जसे ब्राह्मणग्रंथांमधून घेतले, तसाच हाही श्लोक आहे.

ब्रह्मवल्ल्यध्याये पञ्चमोऽनुवाकः ।

विज्ञानं यज्ञं तनुते । कर्माणि तनुतेऽपि च । विज्ञानं देवाः सर्वे । ब्रह्म ज्येष्ठमुपासते । विज्ञानं ब्रह्म चेद्वेद । तस्माच्चेन्न प्रमाद्यति । शरीरे पाप्मनो हित्वा । सर्वान्कामान्त्समश्नुत इति ।

तस्यैष एव शारीर आत्मा । यः पूर्वस्य । तस्माद्वा एतस्माद्विज्ञानमयात् । अन्योऽन्तर आत्माऽऽनन्द-मयः । तेनेष पूर्णः । स वा एष पुरुषविध एव । तस्य पुरुषविधताम् । अन्वयं पुरुषविधः ।

तस्य प्रियमेव शिरः । मोदो दक्षिणः पक्षः । प्रमोद उत्तरः पक्षः । आनन्द आत्मा । ब्रह्म पुच्छं प्रतिष्ठा । तदप्येष श्लोको भवति ।

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि द्वितीये ब्रह्मवल्ल्यध्याये पञ्चमोऽनुवाकः ॥ ५ ॥

अन्वय व अर्थः—**विज्ञानं यज्ञं तनुते, कर्माणि अपि च तनुते** (विज्ञान हेंच यज्ञास आणि कर्मास पुष्टि देतें) **सर्वे देवाः ज्येष्ठं विज्ञानं ब्रह्म उपासते** (सर्व इंद्रादि देव ज्येष्ठ विज्ञान-ब्रह्माची उपासना

करितात) **विज्ञानं ब्रह्म वेद चेत्, तस्मात् न प्रमाद्यति चेत्, शरीरे पाप्मनः हित्वा सर्वान् कामान् समश्नुते** (विज्ञानब्रह्माचें ज्ञान झालें, आणि तेथें कोणताही प्रमाद झाला नाहीं, तर शरीरसंबंधीं सर्व पापांचा त्याग करून विज्ञान ब्रह्मवेत्ता आपल्या सर्व सदिच्छा परिपूर्ण करून घेतो) **इति** (असा हा ब्राह्मणोक्त श्लोक आहे)

पूर्वस्य तस्य यः शारीरः आत्मा, एषः एव (त्या ह्या पूर्वीच्या विज्ञानमयाचा जो शारीर आत्मा आहे तो हाच–आनंदमय–आत्मा होय) **तस्मात् एतस्मात् विज्ञानमयात् वै अन्यः अन्तरः आनंदमयः आत्मा; तेन एषः पूर्णः** (त्या ह्या विज्ञानमयाहून निराळा पण त्याचा अंतर्यामी जो आनंदमय आत्मा असतो, त्यानें विज्ञानमयाला पूर्णता प्राप्त होते) **सः एषः पुरुषविधः वै, तस्य पुरुषविधतां अनु अयं पुरुषविधः** (तो हा विज्ञानमय पुरुषाकारी असतो, आणि त्याच्या पुरुषाकारतेमुळें ह्यालाही पुरुषाकार प्राप्त होतो)

तस्य प्रियं एव शिरः; मोदः दक्षिणः पक्षः; प्रमोदः उत्तरः पक्षः; आनंदः आत्मा; ब्रह्म पुच्छं प्रतिष्ठा (त्याचें प्रिय हें शरीर, मोद उजवा पंख, प्रमोद डावा पंख, आनंद आत्मा आणि ब्रह्म पुच्छ म्हणजे प्रतिष्ठा होय) **तत् अपि एषः श्लोकः भवति** (ह्यासंबंधानें पुढील श्लोक प्रमाण आहे.)

विज्ञानं यज्ञं तनुते । विज्ञानवान्हि यज्ञं तनोति श्रद्धादिपूर्वकम् । अतो विज्ञानस्य कर्तृत्वं तनुत इति, कर्माणि च तनुते । यस्माद्विज्ञानकर्तृकं सर्वं तस्माद्युक्तं विज्ञानमय आत्मा ब्रह्मेति । किंच विज्ञानं ब्रह्म सर्वे देवा इन्द्रादयो ज्येष्ठं प्रथमजत्वात्सर्वप्रवृत्तीनां वा तत्पूर्वकत्वात्प्रथमजं विज्ञानं ब्रह्मोपासते ध्यायन्ति तस्मिन्विज्ञानमये ब्रह्मण्यभिमानं कृत्वोपासत इत्यर्थः । तस्मात्ते महतो ब्रह्मण उपासनाज्ज्ञानैश्वर्यवन्तो भवन्ति । तच्च विज्ञानं ब्रह्म चेद्यदि वेद विजानाति न केवलं वेदैव तस्माद्ब्रह्मणश्चेन्न प्रमाद्यति । बाह्येष्वेवानात्मस्वात्मभावितत्वात्प्राप्तं विज्ञानमये ब्रह्मण्यात्मभावनायाः प्रमदनं, तन्निवृत्त्य-

र्थमुच्यते तस्माच्चेन्न प्रमाद्यतीति । अन्नमयादिष्वात्मभावं हित्वा केवले विज्ञानमये ब्रह्मण्यात्मत्वं भावयन्नास्ते चेदित्यर्थः । ततः किं स्यादित्युच्यते–शरीरे पाप्मनो हित्वा शरीराभिमाननिमित्ता हि सर्वे पाप्मानस्तेषां च विज्ञानमये ब्रह्मण्यात्माभिमानान्निमित्तापाये हानमुपपद्यते । छत्रापाय इव च्छायापायः । तस्माच्छरीराभिमाननिमित्तान्सर्वान्पाप्मनः शरीरप्रभवाञ्छरीर एव हित्वा विज्ञानमयस्वरूपापन्नस्तत्स्थान्सर्वान्कामान्विज्ञानमयेनैवाऽऽत्मना समश्नुते सम्यग्भुङ्क्ते इत्यर्थः ।

सिद्धान्ती—जो विज्ञानवान् आहे, तोच श्रद्धादिपूर्वक यज्ञांचें अनुष्ठान करितो. म्हणून श्रुतीनें विज्ञानाला यज्ञाचें आणि सर्व कर्मांचें कर्तृत्व दिलें आहे. ज्यापक्षीं यच्चयावत् सर्व कर्में विज्ञानद्वारा होतात; अथवा विज्ञानकर्तृक असतात, त्यापक्षीं विज्ञानमय आत्म्याला श्रुतीनें ब्रह्म असें म्हटलें आहे, तें योग्यच आहे. शिवाय, इंद्रादि सर्व देव सर्वांत वयानें ज्येष्ठ व ज्ञानानें श्रेष्ठ जें विज्ञान त्याची उपासना करितात. विज्ञान प्रथम सृष्टीच्या आधीं जन्म पावलें म्हणून, किंवा सर्व प्रवृत्तींच्या आधीं विज्ञानाचा जन्म आहे म्हणून, निदान सर्व कर्में आणि कर्मप्रवृत्ती विज्ञानपूर्वक होतात म्हणून, विज्ञानब्रह्माला सर्वांपेक्षां वडील असें म्हटलें. हिरण्यगर्भाबरोबरच विज्ञानाचा जन्म झाला आहे. प्रायः विज्ञान म्हणजे हिरण्यगर्भच होय. असो; हे सर्व इंद्रादि देव विज्ञानब्रह्माची उपासना करितात म्हणजे त्याचें ध्यान करितात. किंवा विज्ञानमयब्रह्माचे ठिकाणीं अभिनिवेश, अभिमान, निष्ठा ठेऊन त्याची उपासना करितात. विज्ञानमय आत्मा हाच पुरुषार्थ आहे, अशी निष्ठा ठेवून देव विज्ञानमयाची उपासना करितात. अर्थातच या महद्-ब्रह्माच्या उपासनेचें फळ म्हणजे ज्ञानलाभ आणि ऐश्वर्यप्राप्ति देवांस होते. या सर्वश्रेष्ठ, सर्वैश्वर्यसंपन्न व श्रेयस्कारी ब्रह्माचें जर स्पष्ट ज्ञानविज्ञान झालें, इतकेंच नव्हे, तर त्या ब्रह्मापासून जर भ्रष्टता झाली नाहीं—

शिष्य—भ्रष्टता म्हणजे ?

सिद्धान्ती—बाह्य ज्या अनात्मक वस्तू आहेत, त्याच आत्मस्वरूप आहेत, असें वाटून विज्ञानमय ब्रह्माचे ठिकाणीं असावयाची जी भावना (एकतान-चित्तवृत्ति) ती भ्रष्ट झाली, तात्पर्य, विज्ञानमय ब्रह्म हें आत्मस्वरूप नसून बाह्य अनात्मक वस्तू आत्मरूप आहेत, त्यांची प्राप्ति हाच आपला पुरुषार्थ आहे, अशी जर भ्रांति झाली, तर तोच प्रमाद किंवा भ्रष्टता निर्माण करण्याचें कारण होय. असो; याप्रमाणें विज्ञान ब्रह्म हेंच काय तें ज्ञेय आहे व प्राप्तव्य आहे, असा निर्भ्रांत निश्चय झाला—

शिष्य—म्हणजे अन्नमयादिकांचे ठिकाणीं असलेला आत्मभाव (ममता) सोडून देऊन ' केवल विज्ञानमय ब्रह्म हेंच आत्मरूप आहे ' असा सर्वात्मना जर निश्चय (भावना) झाला, असेंच आपले म्हणणें ?

सिद्धांती—होय; तर शरीराच्या अभिमानानें उत्पन्न होणारीं सर्व पापें नाहींशीं होतात; सारांश विज्ञान-ब्रह्मज्ञ पापमुक्त होतो. कारण उघडच आहे कीं, अब्रह्मविषयांच्या संबंधानें असणारा अभिमान नाहींसा झाला व विज्ञानमयाचे ठिकाणीं योग्य अभिमान (दृढनिष्ठा) स्थापित झाली; म्हणजे शरीरनिमित्तक सर्व पापें नाहींशीं होणारच. शीतळ छाया प्राप्त झाली म्हणजे छत्रीची अपेक्षा कोण करणार! किंवा छत्री मिटली म्हणजे तिची छायाही नष्ट होते। म्हणून शरीरापासून होणारीं व शरीराच्या अभिमानानें निर्माण होणारीं सर्व पापें शरीराबरोबरच त्यागून, शरीरांतच त्यांस विलीन करून, विज्ञानमय जें ब्रह्म त्या स्वरूपाला प्राप्त झाला, पूर्ण विज्ञानमय झाला, म्हणजे त्या उपासकाच्या सर्व तत्रस्थ इच्छांचा उपभोग तो आपल्या विज्ञानमय आत्म्यानें मात्र घेतो. हाच विहित उपभोग होय. असा या श्लोकाचा अर्थ आणि फलश्रुति आहे. सारांश, यथार्थज्ञान व निष्काम-कर्म, यांतच त्याचा विज्ञानमय आत्मा समर्पित होतो.

तस्य पूर्वस्य मनोमयस्याऽऽत्मैष एव शरीरे मनोमये भवः शारीरः । कः । य एष विज्ञानमयः । तस्माद्वा एतस्मादित्युक्तार्थम् । आनन्दमय इति कार्यात्मप्रतीतिरधिकारान्मयट्शब्दाच्च । अन्नादिमया हि कार्यात्मानो भौतिका इहाधिकृताः । तदधिकारपतितश्चायमानन्दमयः । मयट्चात्र विकारार्थे दृष्टो यथाऽन्नमय इत्यत्र । तस्मात्कार्यात्माऽऽनन्दमयः प्रत्येतव्यः । संक्रमणाच्च, आनन्दमयमात्मानमुपसंक्रामतीति वक्ष्यति । कार्यात्मनां च संक्रमणमनात्मनां दृष्टम् । संक्रमणकर्मत्वेन चाऽऽनन्दमय आत्मा श्रूयते । यथाऽन्नमयमात्मानमुपसंक्रामतीति । न चाऽऽत्मन एवोपसंक्रमणम् । अधिकारविरोधादसंभवाच्च । न ह्यात्मनैवाऽऽत्मन उपसंक्रमणं संभवति । स्वात्मनि भेदाभावात् । आत्मभूतं च ब्रह्म संक्रमितुः । शिरआदिकल्पनानुपपत्तेश्च । न हि यथोक्तलक्षण आकाशादिकारणेऽकार्यपतिते शिरआद्यवयवरूपकल्पनोपपद्यते । अदृश्येऽनात्म्येऽनिलयनेऽनिरुक्तेऽस्थूलमनणु नेति नेत्यात्मेत्यादिविशेषापोहश्रुतिभ्यश्च । मन्त्रोदाहरणानुपपत्तेश्च । न हि प्रियशिरआद्यवयवविशिष्टे प्रत्यक्षतोऽनुभूयमान आनन्दमय आत्मनि ब्रह्मणि नास्ति ब्रह्मेत्याशङ्काभावात् " असन्नेव स भवति । असद्ब्रह्मेति वेद चेत् " इति

मन्त्रोदाहरणमुपपद्यते । ब्रह्म पुच्छं प्रतिष्ठेत्यपि चानुपपन्नं पृथग्ब्रह्मणः प्रतिष्ठात्वेन ग्रहणम् । तस्मात्कार्यपतित एवाऽऽनन्दमयो न पर एवाऽऽत्माआनन्द इति विद्याकर्मणोः फलम् । तद्विकार आनन्दमयः । स च विज्ञानमयादन्तरः । यज्ञादिहेतोर्विज्ञानमयस्यान्तरत्व श्रुतेः । ज्ञानकर्मणोर्हि फलं भोक्त्रर्थत्वादन्तरतमं स्यात् । अन्तरतमश्चाऽऽनन्दमय आत्मा पूर्वेभ्यः । विद्याकर्मणोः प्रियाद्यर्थत्वाच्च । प्रियादिप्रयुक्ते हि विद्याकर्मणी । तस्मात्प्रियादीनां फलरूपाणामात्मसंनिकर्षाद्विज्ञानमयस्याऽऽभ्यन्तरत्वमुपपद्यते प्रियादिवासनानिर्वृत्तो ह्यानन्दमयो विज्ञानमयाश्रितः स्वप्न उपलभ्यते ।

सिद्धान्ती—त्या पूर्वीच्या मनोमय आत्म्याचा हा विज्ञानमय (कोश) हा आत्मा आहे. हा मनोमयशरीरांत प्रकट होतो. त्या ह्या विज्ञानमयाहून निराळा असून–

शिष्य—समजलों. आनंदमय हा विज्ञानमयाचा अंतर्यामी आहे.

सिद्धान्ती—ठीक ठीक; हा आनंदमयही कार्यात्मा आहे, अशी प्रतीति येते.

शिष्य—कशावरून ?

सिद्धान्ती—कार्यब्रह्माचें प्रकरण चाललें आहे; आणि 'मयट्' हा शब्द येथेंही आहे; म्हणून. आतांपर्यंत आपण ज्या अन्नमयादि आत्म्यांचा (कोशांचा) विचार केला, ते सर्व कार्यात्मे असून (कोणत्या तरी कारणाचे विकार असून) भौतिक म्हणजे जड आहेत. प्रकरणच तें आहे; म्हणून आनंदमयही कार्यात्मा असून भौतिक आहे. तसेंच, 'मयट्' हा शब्द विकारार्थक आहे. अन्नमय, प्राणमय, इत्यादि आतांपर्यंत सर्व कोश प्राणादिकांचे विकार होत; असेंच आपण समजून घेतलें आहे. तसाच प्रकार येथेंही आहे. म्हणून आनंदमय आत्मा कार्य आहे, असेंच आपण ज्ञान करून घेतलें पाहिजे, शिवाय "आनंदमय आत्म्याकडे संक्रमण होत असतें" असें पुढें श्रुति स्वतःच सांगणार आहे; म्हणूनही तो कार्यात्मक आहे.

शिष्य—हें कसें ?

सिद्धांती—अनात्मक जे अन्नादिक कार्यात्मे त्यांच्याच ठिकाणीं संक्रमणाचा व्यापार संभवनीय दिसतो व आपल्यासही दिसला. 'आनंदमय आत्मा संक्रमणाचें कार्य होतो.' असें श्रुतीवरून दिसते. "अन्नमय–आत्म्याकडे संक्रमण करितो" अशी श्रुति आहे. असाच प्रकार प्राणमयादिकांच्या संबंधानें श्रुतीनें वर्णिला आहे (आठवा खंड पहा. ब्रह्मवल्ली) सारांश, हे सर्व संक्रमणाचें कर्म होतात. असो; आणखी पुन्हा; शुद्ध आत्म्याला संक्रमणव्यापार असतच नाहीं. शुद्ध आत्मा संक्रमणाचें कर्म होत नाहीं. कारण श्रुतीनें ह्या आत्म्याचें निराळेंच प्रकरण केलें आहे. शिवाय, असंभवही आहे.

पूर्व०—कां बरें ?

सिद्धान्ती—कारण एकरस आत्म्यानेंच आत्म्याकडे जाणें (स्वतःकडे जाणें) किंवा संक्रमण करणें संभवत नाहीं. आत्म्यामध्यें जर भेद असते, तर संक्रमण संभवतें. पण एकरस आत्मस्वरूपांत भिन्नभाव नसतो, म्हणून संक्रमणाची असंभावना होते. शिवाय, ब्रह्म म्हणजे संक्रमण करणाऱ्याचा आत्माच होय. अर्थात् येथें संक्रमण (जाणें येणें) असंभवनीय आहे. आणखी; निराकार ब्रह्माला मस्तक, उजवा पंख, इत्यादि शरीरकल्पना लावितांच येत नाहींत. 'सत्यज्ञानानंतता' हें ज्याचें लक्षण, जो आकाशादिकांचें कारण, म्हणून ज्याच्याठिकाणीं कार्यत्वाचा सर्वथा असंभव, त्याला हस्तमस्तकादि अवयवांची कल्पना स्वप्नांत सुद्धां अशक्य, अयोग्य व अन्याय्यच आहे. "तो अदृश्य, अशरीर, अनिर्वचनीय, निराधार" "अस्थूल, अनणु, (जो स्थूल नाहीं व सूक्ष्म नाहीं)" "तो हा नव्हे, तो तो नव्हे" इत्यादि अशेष-विशेष-शून्य आहे, असें अनेक श्रुति सांगत आहेत. त्याच्याठिकाणीं कोणताही विशेष नाहीं, असें त्याचें स्वरूप श्रुती वर्णन करितात; म्हणून हस्तमस्तकांची कल्पना तेथें योग्य नव्हे. आणखी पुढें सहाव्या अनुवाकांतील मंत्रांत जें प्रतिपादन केलें आहे, त्याचीही उपपत्ति होणार नाहीं.

पूर्व०—म्हणजे काय ?

सिद्धान्ती—ऐका; प्रिय हें शिर, इत्यादि अवयवांनीं विशिष्ट असणारें, प्रत्यक्ष अनुभवाला येणारें, आनंदमय ब्रह्म (आत्मा) **विद्यमान असतां** " ब्रह्म नाहीं. " अशीं शंका कोणालाही येणें शक्य नाहीं. हें जर खरें आहे, तर " ब्रह्म असत् आहे असें ज्याला ज्ञान होतें, तो असद्रूपी मात्र होतो " हें मंत्रांतील उदाहरणवाक्य उपपन्न होत नाहीं.

शिष्य—म्हणजे प्रत्यक्ष असणाऱ्या आनंदमय ब्रह्माच्या संबंधानें शंका येणें संभवनीय नाहीं; आणि ती शंका ज्याअर्थीं श्रुतींनें घेतली आहे, त्याअर्थीं त्या मंत्रांतील ब्रह्म निराळें आहे, हें खास. कोणी झाला तरी प्रत्यक्षाविषयीं साशंक असत नाहीं. शंका तर घेतली आहे ! म्हणून शंकाविषयक ब्रह्म अन्नमयादि आनंदमयान्त कार्यब्रह्मांहून निराळेंच असलें पाहिजे.

सिद्धान्ती—बरोबर; शिवाय शेवटचें असें कारण आहे कीं, "ब्रह्म पुच्छ आणि प्रतिष्ठा आहे" असें श्रुति म्हणते. त्यांत निराळ्याच ब्रह्माचा निर्देश असून तें ब्रह्म आनंदमयाची प्रतिष्ठा आहे, असें सांगितलें आहे. जर आनंदमय हें कार्यब्रह्म नसतें, तर निराळ्या ब्रह्माचा निर्देश श्रुतींनें करणें अयोग्य झालें असतें; व तिनें निर्देश केलाही नसता. निर्देश केला आहे, त्यावरून आनंदमय हें कार्यब्रह्म आहे, परब्रह्म नव्हे, असें सिद्ध झालें.

तात्पर्य, संक्रमण-कर्मात्मक आनंदमय आहे, कार्यब्रह्माचें प्रकरण आहे, परब्रह्माला शिरहस्तादि अवयव नसतात, याला आहेत, हें प्रत्यक्ष असल्यामुळें आनंदमय शंकास्पद् नाहीं; हें आश्रित आहे, म्हणून आनंदमय हें कार्यब्रह्म होय.

शिष्य—'आनंद हा आत्मा आहे' असें म्हटलें आहे, त्याचा अर्थ काय ?

सिद्धांती—येथील आनंद म्हणजे विद्या आणि कर्म यांचें फळ होय. या फळाचा जो विकार (कार्य) तो आनंदमय होय. तो विज्ञानमयाचा अंतर्यामी आहे; कारण यज्ञादिकांचा हेतु जो विज्ञानमय त्याच्याहीपेक्षां सूक्ष्म आणि त्याच्या आंत राहणारा हा आहे, असें श्रुति म्हणते. शिवाय, भोक्त्याचा (उपभोग घेणाऱ्याचा) जो अर्थ—

शिष्य—"मी सुखी आहें" असा मला भोगाच्या संबंधानें जो अनुभव येतो, तो अर्थ, सुखकारक अर्थ, **सुख** होतें तो **आनंद**, आणि ज्याला सुख होतें तो **आनंदी** आनंदमय, असें तात्पर्य झालें. अर्थात् **सुख** हें माझ्या सुखित्वाचें कारण आणि माझ्या ज्ञानकर्मांचें फल होय. म्हणून हें फळ पदार्थांचें (उपभोगाचें) अंतर्यामी असलें पाहिजे.

तात्पर्य, आनंदमय हा अन्नमयादि सर्व पूर्वकोशांच्या अंतर्यामी असतो.

सिद्धान्ती—शिवाय, कोणताही कर्म करणारा पुरुष आपल्यास प्रियवस्तु कोणती आहे, तो ठरवून आणि तिचीं साधनें विज्ञान आणि कर्म यांचे अनुष्ठान करितो. म्हणून व प्रिय, मोद, प्रमोदादि सर्व फलरूप पदार्थ आत्मस्वरूपाच्या अत्यंत निकटवर्ती असल्यामुळें विज्ञानमयाचे अंतर्यामी असतात. हें म्हणणें योग्यच आहे. प्रिय, मोद, प्रमोदादि वासनांनीं प्रेरित झालेल्या विज्ञानमय आत्म्याच्या आश्रयानें आनंदमय आत्मा असतो; आणि तो स्वप्नामध्यें प्रियादि वासनांच्या प्रपूर्तीनें उपलब्ध होतो. विज्ञानमय हें शरीर आणि आनंदमय शरीरी.हा स्वप्नांतच (गाढ निद्रेंतच) उपलब्ध होतो.

शिष्य—हें कसें ?

सिद्धान्ती—प्रिय-प्रमोदादि लक्षणात्मक विशेषणांनीं युक्त असलेल्या व विज्ञानाचा आश्रय घेणाऱ्या आनंदमयाची स्वप्नामध्यें उपलब्धि होते. कारण, तेथें आत्मा, आणि उपलब्धि (आनंदमय व आनंद ही ज्ञात झालेली वस्तु) सुषुप्तीमध्यें असते. सुषुप्तीमध्यें अन्न, प्राण, मन, विज्ञान, यांची वार्ता नसून केवळ आनंद व त्याचा भोक्ता आनंदमय, या उभयतांचें. मात्र ज्ञान असतें व तें जागृतीमध्यें स्मरतें. हा अनुभव आहे. 'मी सुखानें निजलों होतों, मला कांहीं कळत नव्हतें' हा निद्रेंतील अनुभव सर्व प्रत्यक्ष आहे. पण या अनुभवांतही साक्षी निराळा आहे, असें तात्पर्य असल्यामुळें आनंदमय हा मुख्य आत्मा नव्हे.

तस्याऽऽनन्दमयस्याऽऽत्मन इष्टपुत्रादिदर्शनजं प्रियं शिर इव शिरः प्राधान्यात् । मोद इति प्रियलाभनिमित्तो हर्षः । स एव च प्रकृष्टो हर्षः प्रमोदः । आनन्द इति सुखसामान्यमात्मा प्रियादीनां सुखावयवानां तेष्वनुस्यूतत्वादानन्द इति परं ब्रह्म । तद्धि शुभकर्मणा प्रत्युपस्थाप्यमाने पुत्रमित्रादिविशेषोपाधावन्तःकरणवृत्तिविशेषे तमसाऽप्रच्छाद्यमाने प्रसन्नेऽभिव्यज्यते । तद्विषयसुखमिति प्रसिद्धं

लोके । तद्वृत्तिविशेषप्रत्युपस्थापकस्य कर्मणोऽनवस्थितत्वात्सुखस्य क्षणिकत्वम् । तद्यदाऽन्तःकरणं तपसा तमोन्नेन विद्यया ब्रह्मचर्येण श्रद्धया च निर्मलत्वमापद्यते यावद्यावत्तावत्तावद्विविक्ते प्रसन्नेऽन्तः-करण आनन्दविशेष उत्कृष्यते विपुलीभवति । वक्ष्यति च– "रसो वै सः । रसं ह्येवायं लब्ध्वाऽऽनन्दी भवति । एष ह्येवाऽऽनन्दयाति । एतस्यैवाऽऽनन्दस्यान्यानि भूतानि मात्रामुपजीवन्ति" इति च श्रुत्यन्तरात् । एवं च कामोपशमोत्कर्षापेक्षया शतगुणोत्तरोत्कर्ष आनन्दस्य वक्ष्यते । एवं चोत्कृष्यमाणस्याऽऽनन्दमयस्याऽऽत्मनः परमार्थब्रह्मविज्ञानापेक्षया ब्रह्म परमेव यत्प्रकृतं सत्यज्ञानानन्तलक्षणं यस्य च प्रतिपत्त्यर्थं पञ्चान्नादिमयाः कोशा उपन्यस्ताः । यच्च तेभ्योऽभ्यन्तरं येन च ते सर्वं आत्मवन्तस्तद्ब्रह्म पुच्छं प्रतिष्ठा । तदेव च सर्वस्याविद्यापरिकल्पितस्य द्वैतस्यावसानभूतमद्वैतं ब्रह्म प्रतिष्ठा । आनन्दमयस्यैकत्वावसानत्वात् । अस्ति तदेकमविद्या-कल्पितस्य द्वैतस्यावसानभूतमद्वैतं ब्रह्म प्रतिष्ठा पुच्छं तदेतस्मिन्नप्यर्थ एष श्लोको भवति ।

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यगोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यश्रीमच्छंकरभगवतः कृतौ तैत्तिरीयोपनिषदि द्वितीयब्रह्मवल्ल्यध्याये पञ्चमोऽनुवाकः ॥ ५ ॥

सिद्धान्ती—सर्व जीवजातीला पुत्रमित्रादि जे इष्ट पदार्थ आहेत, त्यांच्या दर्शना-पासून प्रियत्व प्राप्त होतें. तें **प्रियत्व** ह्या आनंदमय आत्म्याचें मस्तक आहे. कारण प्रियता ही सर्वश्रेष्ठ आहे. प्रियवस्तूंचा लाभ झाला असतां हर्ष होतो, त्याला **मोद** म्हणावें. विशेष हर्ष झाला म्हणजे **प्रमोद** म्हणावें. आनंद हा आत्मा आहे, कारण आनंद हें सर्वसाधारण सुख आहे; आणि त्याचेच प्रिय–मोदादि अवयव असतात. प्रिय, मोद आणि प्रमोद ह्या सर्वांत आनंद सामान्यत्वानें असतो, ह्या सर्वांस व्याप्त करितो, म्हणून आनंद हा आत्मा, किंवा औपाधिक परब्रह्म आहे. हा आनंद केव्हां प्रकट होतो, असें विचाराल तर ऐका—शुभकर्म केलें असतां किंवा पुत्रमित्रादि विषयांच्या संबंधानें विशेष उपाधी विद्यमान असतां जो एक अंतःकरणाचा वृत्तिविशेष उद्भूत होतो व इतर अज्ञानरूपी तम नाहींसे झाल्यामुळें अंतःकरण प्रसन्न होतें, त्यावेळीं हा आनंद प्रकट होतो. यालाच व्यवहारामध्यें विषयसुख असें म्हणतात. हें सुख क्षणभंगुर असतें. कारण अंतः-करणाच्या ज्या वृत्तिविशेषानें हें सुख प्रकट होतें, तो वृत्तिविशेष उत्पन्न करणारें कर्म क्षणभंगुर असतें. म्हणून तज्जन्य सुखही क्षणभंगुर असतें.

शिष्य—सर्वच आनंद क्षणभंगुर असेल तर त्याच्या प्राप्तीसाठीं एवढा अट्टाहास सारी कां करावा ?

सिद्धांती—बाबारे, ऐक; जेव्हां अज्ञानरूपी अंधकाराचा नाश करणारें तप, विद्या, ब्रह्मचर्य आणि श्रद्धा, यांच्या योगानें आपलें अंतःकरण जसजसें निर्मळ होत जातें, तसतसा त्याच शुद्ध आणि प्रसन्न होत जाणाऱ्या अंतःकरणामध्यें श्रेष्ठ योग्यतेचा आनंद विपुल आणि विपुलतर होत जातो. पुढें श्रुतिही सांगणार आहे कीं, तो-परमात्मा रसरूप आहे. जीवाला हा ब्रह्मरस प्राप्त झाल्यानंतर तो आनंदी होतो. आनंद देणारा हाच ब्रह्मरस होय. अन्यपदार्थांपासून उत्पन्न होणारे आनंद ब्रह्मानंदाचे केवळ अत्यंत अल्प अंश असतात.' याप्रमाणें जसजसा कामाचा (विषयवासनेचा) उपशम उत्कर्षाप्रत पावत जाईल, तसतसा शतगुणानें उत्तरोत्तर वाढत जाणारा आनंद प्रत्यक्ष होत जातो. हें सर्व श्रुतिच सांगणार आहे. अर्थात् उत्तरोत्तर वृद्धिंगत होत जाणाऱ्या आनंदमय आत्म्याचें ब्रह्म हें पुच्छ आहे. परमार्थतः ब्रह्म-ज्ञान-विज्ञानाची व आनंदमयाची तुलना केली असतां आनंदमयादिकांहून ब्रह्म अत्यंत श्रेष्ठ आहे; असें ठरतें. हेंच ब्रह्म आपला प्रकृत विषय आहे.

शिष्य—याच ब्रह्माचें स्वरूपलक्षण सत्य, ज्ञान आणि अनंत हें आहे.

सिद्धान्ती—आणि या परब्रह्माची ओळख व्हावी; म्हणून अन्नमयादि कोश-पंचकाचा उल्लेख करून श्रुतीनें त्याचा विस्तार केला आहे. सारांश, या पंच-कोशांच्याही अंतर्यामीं असणार आणि या सर्वांस आत्मवंत करणारें, जें परब्रह्म तें आनंदमयाचें पुच्छ आणि त्याची प्रतिष्ठा आहे. सारांश, अविद्येनें निर्माण केलेला हा जो सर्व द्वैतप्रपंच त्याचा अंत करणारें हें परब्रह्म अद्वितीय असून त्या सर्वांचा आधार आहे.

शिष्य—खरेंच आहे; सर्व इतर कोशांच्या अंतर्यामीं असणारा जो शुद्ध आनंदमय कोश त्या एकरस-आनंदाचा अंतरात्मा एकस्वरूपच असावयाचा.

सिद्धान्ती—याप्रमाणें अविद्येनें कल्पिलेल्या द्वैताचा अंत करणारें एक आणि अद्वितीय ब्रह्म, सर्वाधार, सर्वांस अस्तित्व देणारें आणि सर्व श्रेष्ठ परब्रह्म आहे. हाच अर्थ प्रकट करणारा पुढील श्लोक आहे. हा श्लोक सर्वाधार असणाऱ्या ब्रह्माचें प्रकाशन करितो.

पांचवा अनुवाक संपूर्ण.

ब्रह्मवल्ल्यध्याये षष्ठोनुवाकः ।

असन्नेव स भवति । असद्ब्रह्मेति वेद चेत् ।
अस्ति ब्रह्मेति चेद्वेद । सन्तमेनं ततो विदुरिति ।

तस्यैष एव शारीर आत्मा।
यः पूर्वस्य। अथातोऽनुप्रश्नाः॥
उताविद्वानमुं लोकं प्रेत्य। कश्चन
गच्छतीः। आहो विद्वानमुं लोकं
प्रेत्य। कश्चित्समश्नुता३ उ॥
सोऽकामयत। बहु स्यां प्रजायेयेति। स तपोऽ-
तप्यत। स तपस्तप्त्वा। इदꣳसर्वमसृजत॥
यदिदं किंच। तत्सृष्ट्वा। तदेवानुप्राविशत्॥
तदनुप्रविश्य। सच्च त्यच्चाभवत्। निरुक्तं
चानिरुक्तं च। निलयनं चानिलयनं
च। विज्ञानं चाविज्ञानं च। सत्यं
चानृतं च सत्यमभवत्। यदिदं किंच॥
तत्सत्यमित्याचक्षते। तदप्येष श्लोको भवति॥

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि द्वितीये ब्रह्मवल्ल्यध्याये षष्ठोऽनुवाकः॥ ६॥

अन्वय व अर्थः—'असत् ब्रह्म' इति वेद चेत्, सः असन् एव भवति ('ब्रह्म असत् आहे' असें ज्याला वाटत असतें, तो असत्-सारखा—नाहीं असा—असतच होतो) 'ब्रह्म अस्ति' इति वेद चेत्, एनं ततः सन्तं विदुः (पण 'ब्रह्म आहे' असें ज्याला ज्ञान असतें, तो अस्ति-स्वरूप किंवा साधुस्वरूप आहे, असें ब्रह्मवेत्ते म्हणतात) इति (असा हा ब्रह्मप्रकाशक श्लोक आहे)

तस्य पूर्वस्य यः शारीरः आत्मा, एषः एव (त्या पूर्वीच्या विज्ञानमय शरीराचा हा आनंदमय परमात्मा शरीरी अथवा आत्मा आहे) अथ अतः अनुप्रश्नाः (यानंतर ह्यावरच उत्पन्न होणाऱ्या शंका येतात त्या ह्या)

कश्चन अविद्वान् प्रेत्य अमुं लोकं गच्छति उत (कोणी अविद्वान् मनुष्य मेल्यावर ह्या ब्रह्मलोकाप्रत जातो काय?) आहो, कश्चित् विद्वान्

प्रेत्य अमुं लोकं समश्नुते उ (किंवा कोणी विद्वान् मेला असतां, तो ह्या ब्रह्मलोकाचा उपभोग घेतो काय ?)

बहु स्यां प्रजायेय सः अकामयत (मी पुष्कळ होऊन उत्पन्न करीन–अशी त्यानें परब्रह्मानें–इच्छा केली) **इति** (अशी) **सः तपः अतप्यत** (त्यानें तपश्चर्या केली) **सः तपः तप्त्वा इदं सर्वम् असृजत** (त्यानें तपश्चर्या करून हें सर्व उत्पन्न केलें.)

यत् किंच इदं, तत् सृष्ट्वा तत् एव अनुप्राविशत् (जें कांहीं हें आहे, तें उत्पन्न करून त्याच्या मध्येंच–परमात्म्यानें–प्रवेश केला)

तत् अनुप्रविश्य सत् च, त्यत् च, निरुक्तं च अनिरुक्तं च, निलयनं च अनिलयनं च, विज्ञानं च अविज्ञानं च, सत्यं च अनृतं च अभवत् (त्यांत प्रवेश करून तो सत्–मूर्त–आणि त्यत्–अमूर्त–झाला. तो निरुक्त (नामरूपी) व अनिरुक्त, आश्रय घेणारा आणि निराश्रित, विज्ञान आणि अविज्ञान, सत्य आणि असत्य झाला) **यत् किंच इदं सत्यं अभवत्** (येथें जें कांहीं आहे, तें सद्रूप झालें.)

तत् सत्यं इति आचक्षते (त्यालाच सत्य असें म्हणतात) **तत् अपि एषः श्लोकः भवति** (त्या सत्याचा प्रकाशक पुढील श्लोक आहे) ॥

असन्नेवासत्सम एव यथाऽसन्नपुरुषार्थसंबन्ध्येवं स भवति अपुरुषार्थसंबन्धी । कोऽसौ । योऽसद्विद्यमानं ब्रह्मेति वेद विजानाति चेद्यदि । तद्विपर्ययेण यत्सर्वविकल्पास्पदं सर्वप्रवृत्तिबीजं सर्वविशेषप्रत्यस्तमितमप्यस्ति तद्ब्रह्मेति वेद चेत् । कुतः पुनराशङ्का तन्नास्तित्वे, व्यवहारातीतत्वं ब्रह्मण इति ब्रूमः । व्यवहारविषये हि वाचारम्भणमात्रेऽस्तित्वभाविता बुद्धिस्तद्विपरीते व्यवहारातीते नास्तित्वमपि प्रतिपद्यते । यथा घटादिर्व्यवहारविषयतयोपपन्नः संस्तद्विपरीतोऽसान्निति प्रसिद्धम् । एवं तत्सामान्यादिहापि स्याद्ब्रह्मणो नास्तित्वप्रत्याशङ्का । तस्मादुच्यते—अस्ति ब्रह्मेति चेद्वेदेति । किं पुनः स्यात्तदस्तीति विजानतस्तदाह–सन्तं विद्यमानब्रह्मस्वरूपेण परमार्थसदात्मापन्नमेनमेवंविदं विद्वद्ब्रह्मविदस्ततस्तस्मादस्तित्ववेदना-

त्सोऽन्येषां ब्रह्मवद्विज्ञेयो भवतीत्यर्थः । अथवा यो नास्ति ब्रह्मेति मन्यते स सर्वस्यैव सन्मार्गस्य वर्णाश्रमादिव्यवस्थालक्षणस्याश्रद्धानतया नास्तित्वं प्रतिपद्यतेऽब्रह्मप्रतिपत्त्यर्थत्वात्तस्य । अतो नास्तिकः सोऽसन्नसाधुरुच्यते लोके । तद्विपरीतः सन्योऽस्ति ब्रह्मेति चेद्वेद स तद्ब्रह्मप्रतिपत्तिहेतुं सन्मार्गं वर्णाश्रमादिव्यवस्थालक्षणं श्रद्धानतया यथावत्प्रतिपद्यते यस्मात्ततस्तस्मात्सन्तं साधुमार्गस्थमेनं विदुः साधवः । तस्मादस्तीत्येव ब्रह्म प्रतिपत्तव्यमिति वाक्यार्थः ।

सिद्धान्ती—ब्रह्म अविद्यमान आहे, असें जर कोणा पुरुषाला ज्ञान झालें, तर तो असत्सारखाच पुरुष होतो; म्हणजे त्याला पुरुषार्थच असत नाहीं.

शिष्य—पुरुषार्थ असत नाहीं म्हणजे ?

सिद्धान्ती—या सर्व विश्वाचें मूळकारण काय आहे, आपलें स्वरूप काय आहे, हें समजून घेण्याची ज्याला इच्छा नसते व जो पुरुष ब्रह्म नाहीं (पुरुषार्थ नाहीं) असें म्हणतो, त्याला पुरुषार्थाची ओळख नसल्याकारणानें व कांहीं श्रेष्ठ कर्तव्य नसल्यामुळें तो अपुरुषार्थी, पुरुषार्थशून्य असा होतो. पण त्याच्या उलट ज्या पुरुषाची भावना ज्ञानविज्ञानमय असते; म्हणजे सर्व विकल्पांचे मूळ अधिष्ठान, सर्व प्रवृत्तींचे बीज (मूळ कारण, मुख्य प्रवर्तक) आणि सर्व-विशेष-शून्य, अशा स्वरूपाचें **जें ब्रह्म तें आहे**, असें ज्याला निश्चयात्मक ज्ञान असते–

पूर्व०—काय हो ! ब्रह्म नाहीं, अशी शंका तरी श्रुतीनें कां उपस्थित केली ! ही शंका निरर्थक आहे, असें दिसतें.

सिद्धान्ती—नाहीं, निरर्थक नाहीं. ब्रह्म व्यवहारातीत आहे, नामरूपातीत आहे, ब्रह्म दृश्य किंवा वाच्य नाहीं. म्हणून ' तें नाहीं ' अशी पूर्वपक्षी शंका घेऊन तिचें समाधान करणें हें श्रुतीला कर्तव्य आहे. व्यवहारांतच पहाना ! नामरूपात्मक जेवढें पदार्थ आहेत, तेच आहेत, अशी आपल्या बुद्धीची भावना असते. जे पदार्थ दृश्य-वाच्य नाहींत ' तें नाहींतच ' असें आपण बुद्धिपूर्वक म्हणतों. घटमठादि दृश्य-वाच्य वस्तु दृश्यभास्य दिसते; म्हणून ती आहे, असा बुद्धि सद्ग्रह धारण करिते. पण इंद्रिय-संनिध प्राप्त झाली असतां मात्र ती वस्तु आहे, असें आपण म्हणतों आणि अदृश्य किंवा अवाच्य वस्तु असेल तर ती नाहीं, असें आपण व्यवहारांत म्हणतों. ब्रह्माची दृश्यतेची किंवा वाच्यतेची स्थिति नाहीं; म्हणून व्यावहारीक पुरुष ब्रह्माला ' तें नाहीं ' असेंच म्हणणार. अर्थात् व्यवहारांत येणाऱ्या शंकेचा श्रुतीनें निर्देश केला, तो यथायोग्यच आहे. कोणाही व्यवहारी पुरुषाला जी शंका येणार, ती श्रुतीनें निर्दिष्ट केली हें ठीकच केलें. असो.

शिष्य—तात्पर्य, ब्रह्म नाहीं, या दृश्यभास्याचें अदृश्यरूपी मूळ अधिष्ठान नाहीं; व अर्थातच अदृश्य अशा प्राप्तव्याची अपेक्षा करणें व्यर्थ आहे, असें जो म्हणतो, व्यवहाराच्या प्रमाणांचा मात्र जो विचार करितो, तो ज्ञानाच्या व पुरुषार्थाच्या अभावीं ज्ञेय म्हणजे जडवस्तूंचें चिंतन करितो; आणि म्हणून असद्रूप होतो, असें आपल्यास म्हणावयाचें, हें मी समजलों. पण ब्रह्माचे अस्तित्वाचा निश्चय असलेल्या पुरुषासंबंधानें काय म्हणावयाचें होतें आपल्याला ?

सिद्धान्ती—हा ब्रह्मज्ञ पुरुष सद्रूप होतो, ब्रह्मज्ञानाच्या योगानें निरतिशय जें ब्रह्म, त्याच्या अस्तित्वाप्रत येऊन पोहोंचतो, सद्रूप ब्रह्म होतो, असें ब्रह्मवेत्ते म्हणतात. सारांश, ज्याला ब्रह्मज्ञान आहे, तो पुरुष इतरांस ब्रह्मासारखा विज्ञेय आणि पूज्य होतो.

शिष्य—अर्थात् ब्रह्म नाहीं, असें जो म्हणतो, तो पुरुषार्थहीन होतो; आणि जो आहे, असें म्हणतो तो ब्रह्मरूप होऊन सर्वांनीं साध्य करण्यास योग्य अशा अवस्थेप्रत जाऊन पोहोंचतो.

सिद्धान्ती—किंवा जो नास्तिक आहे (ब्रह्म नाहीं, असें म्हणतो) तो ब्रह्मप्राप्ति परंपरेनें करून देणाऱ्या वर्णाश्रमादि समाजव्यवस्थापक सन्मार्गाविषयीं अश्रद्ध असल्यामुळें 'सन्मार्गच नाहीं' असें म्हणूं लागतो; त्याला जडत्व, अचेतनत्व प्राप्त होतें. उघडच आहे. त्याला मिळवून घेण्याचा अर्थ म्हणजे अब्रह्मता, अचैतन्य किंवा जडता होय. अशा अपुरुषार्थी व वर्णाश्रमविरहित असणाऱ्या नास्तिकाला व्यवहारांत असाधु म्हणतात. पण याच्या उलट जो आस्तिक आहे (ब्रह्म आहे, असें निश्चयानें जाणतो) तो ब्रह्माकडे नेणारा जो वर्णाश्रमादि व्यवस्थापक सन्मार्ग त्यावर श्रद्धा ठेवतो व त्या मार्गाचें यथार्थ अनुपालन करितो. म्हणून त्याला व्यवहारांत साधूलोक 'सन्त' (साधुमार्गांत असणारा) असें म्हणतात. या विवेचनावरून तुझ्या लक्षांत आलेंच असेल कीं, आपण 'ब्रह्म आहे' असेंच नित्य निश्चयात्मक ज्ञान करून घ्यावें. हाच वरील श्लोकाचा तात्पर्यतः अर्थ आहे.

तस्य पूर्वस्य विज्ञानमयस्यैष एव शरीरे विज्ञानमये भवः शारीर आत्मा । कोऽसौ । य एष आनन्दमयः । तं प्रति नास्त्याशङ्का नास्तित्वे, अपोढसर्वविशेषत्वात्तु ब्रह्मणो नास्तित्वं प्रत्याशङ्का युक्ता । सर्वसामान्याच्च ब्रह्मणो यस्मादेवमतस्तस्मात् । अथानन्तरं श्रोतुः शिष्यस्यानुप्रश्ना आचार्योक्तिमन्वेते प्रश्ना अनुप्रश्नाः ।

सिद्धांती—त्या पूर्वीच्या विज्ञानमय शरीरांत अंतर्यामित्वानें प्रकट झालेला हा आनंदमय आत्मा विज्ञानशरीरी आहे. 'आनंदमय आत्मा नाहीं' अशी शंका येणें शक्यच नाहीं. पण जेथें सर्व विशेष (व्यक्तिभाव) नष्ट होतात, त्या ब्रह्माचें अस्तित्वासंबंधानें

शंका येणें योग्यच आहे. कारण उघड आहे कीं, ब्रह्म हें सर्वसामान्य आहे. म्हणजे तें सर्वत्र आहे, सर्वसम आहे; पण त्याच्याठिकाणीं कोणताही विशेष नाहीं; म्हणून 'निर्विशेष वस्तु आहे कीं नाहीं, अशा जातीच्या' शंकेला जागा आहे. असें आहे म्हणून आचार्यांनीं सांगितल्यानंतर श्रद्धेनें श्रवण करणाऱ्या शिष्याला कांहीं प्रश्न उत्पन्न झाले, ते पुढें दिले आहेत. व्याख्यानानंतर उत्पन्न झालेल्या प्रश्नांस अनुप्रश्न म्हणतात.

सामान्यं हि ब्रह्माऽऽकाशादिकारणत्वाद्विदुषोऽविदुषश्च । तस्मादविदुषोऽपि ब्रह्मप्राप्तिराशङ्क्यते । उतापि । अविद्वानमुं लोकं परमात्मानमितः प्रेत्य कश्चन । चनशब्दोऽप्यर्थे । अविद्वानपि गच्छति प्राप्नोति किंवा न गच्छतीति द्वितीयोऽपि प्रश्नो द्रष्टव्योऽनुप्रश्ना इति बहुवचनाद्द्विद्वांसं प्रत्यन्यौ प्रश्नौ । यद्यविद्वान्सामान्यं कारणमपि ब्रह्म न गच्छति ततो विदुषोऽपि ब्रह्मगमनमाशङ्क्यते । अतस्तं प्रति प्रश्न आहो विद्वानिति । विद्वान्ब्रह्मविदपि कश्चिदितः प्रेत्यामुं लोकं समश्नुते उ इत्येवं स्थितेऽयादेशे यलोपे च कृतेऽकारस्य प्लुतिः समश्नुता उ इत्युकारं च वक्ष्यमाणमधस्तादपकृष्य तकारं च पूर्वस्मादुतशब्दाद्व्यासज्याऽऽहो इत्येतस्मात्पूर्वमुतशब्दं संयोज्य पृच्छयत उताऽऽहो विद्वानिति । विद्वान्समश्नुतेऽमुं लोकम् ।

किंवा यथाऽविद्वानेव विद्वानपि न समश्नुत इत्यपरः प्रश्नः द्वावेव वा प्रश्नौ विद्वदविद्वद्विषयौ । बहुवचनं तु सामर्थ्यप्राप्तप्रश्नान्तरापेक्षया घटते । " असद्ब्रह्मेति वेद चेत् । अस्ति ब्रह्मेति चेद्वेद " इति श्रवणादस्ति नास्तीति संशयस्ततोऽर्थप्राप्तः किमस्ति नास्तीति प्रथमोऽनुप्रश्नः । ब्रह्मणोऽपक्षपातित्वादविद्वान्गच्छति न गच्छतीति द्वितीयः । ब्रह्मणः समत्वेऽप्यविदुष इव विदुषोऽप्यगमनमाशङ्क्यते । किं विद्वान्समश्नुते न समश्नुत इति तृतीयोऽनुप्रश्नः । एतेषां प्रतिवचनार्थमुत्तरग्रन्थ आरभ्यते । तत्रास्तित्वमेव तावदुच्यते । यच्चोक्तं " सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म " इति, तच्च कथं सत्यत्वमित्येतद्वक्तव्यमितीदमुच्यते सत्त्वोक्त्यैव सत्यत्वमुच्यते । उक्तंहि " सदेव सत्यम् " इति तस्मात्सत्त्वोक्त्यैव सत्यत्वमुच्यते । कथमेवमर्थताऽवगम्यतेऽस्य ग्रन्थस्य, शब्दानुगमादनेनैव ह्यर्थेनान्वितान्युत्तराणि वाक्यानि । " तत्सत्यमित्याचक्षते " " यदेष आकाश आनन्दो न स्यात् " इत्यादीनि ।

तत्रासदेव ब्रह्मेत्याशङ्क्यते । कस्मात् । यदस्ति तद्विशेषतो गृह्यते यथा घटादि । यन्नास्ति तन्नोपलभ्यते यथा शशविषाणादि । तथा नोपलभ्यते ब्रह्म । तस्माद्विशेषतोऽग्रहणान्नास्तीति । तन्न । आकाशादिकारणत्वाद्ब्रह्मणः । न नास्ति ब्रह्म कस्मादाकाशादि हि सर्वं कार्यं ब्रह्मणो जातं गृह्यते । यस्माच्च जायते किंचित्तदस्तीति दृष्टं लोके यथा घटाङ्कुरादिकारणं मृद्बीजादि । तस्मादाकाशादिकारणत्वादस्ति ब्रह्म । न चासतो जातं किंचिद्दृश्यते लोके कार्यम् । असतश्चेन्नामरूपादिकार्यं निरात्मकत्वान्नोपलभ्येत । उपलभ्यते तु, तस्मादस्ति ब्रह्म । असतश्चेत्कार्यं गृह्यमाणमप्यसदन्वितमेव तत्स्यात् । न चैवं तस्मादस्ति ब्रह्म ।

तत्र कथमसतः सज्जायेतेति श्रुत्यन्तरमसतः सज्जन्मासंभवमन्वाचष्टे न्यायतः । तस्मात्सदेव ब्रह्मेति युक्तम् । तद्यदि मृद्बीजादिवत्कारणं स्यादचेतनं तर्हि । न, कामयितृत्वात् । न हि कामयित्रचेतनमस्ति लोके । सर्वज्ञं हि ब्रह्मेत्यवोचाम । अतः कामयितृत्वोपपत्तिः । कामयितृत्वादस्मदादिवदनाप्तकामं चेत्, न । स्वातन्त्र्यात्, यथाऽन्यान्परवशीकृत्य कामादिदोषाः प्रवर्तयन्ति न तथा ब्रह्मणः प्रवर्तकाः कामाः कथं तर्हि, सत्यज्ञानलक्षणाः स्वात्मभूतत्वाद्विशुद्धा न तैर्ब्रह्म प्रवर्त्यते । तेषां तु तत्प्रवर्तकं ब्रह्म प्राणिकर्मापेक्षया । तस्मात्स्वातन्त्र्यं कामेषु ब्रह्मणः । अतो नानाप्तकामं ब्रह्म साधनान्तरानपेक्षत्वाच्च ।

किंच यथाऽन्येषामनात्मभूता धर्मादिनिमित्तापेक्षाः कामाः स्वात्मव्यतिरिक्तकार्यकारणसाधनान्तरापेक्षाश्च न तथा ब्रह्मणो निमित्ताद्यपेक्षत्वं किं तर्हि स्वात्मनोऽनन्यास्तदेतदाह—

पूर्वपक्ष—पहिली शंका अशी, ब्रह्म हें आकाशादि पंचमहाभूतांचें व इतर सर्वांचें उपादान कारण आहे; म्हणून तें सामान्यत्वानें विद्वानाजवळ असलें, तसेंच तें अविद्वानाजवळही असावयाचें. म्हणून अविद्वानालाही ब्रह्मप्राप्ति झालीच पाहिजे. सर्वव्यापी ब्रह्म आहे, तर तें अविद्वानालाही प्राप्तच असलें पाहिजे. म्हणून सर्वकारणब्रह्मामध्येंच सर्वांचा लय व्हावा.

सिद्धांती—तुम्ही शंका घेतां, अशीच शिष्यानेंही शंका घेतली. तो म्हणतो; कोणी अविद्वान् (ब्रह्म न जाणणारा) पुरुष पंचत्व पावल्यावर परमात्मलोकाला जातो कीं नाहीं ?

शिष्य—अविद्वानासंबंधानें 'तो जातो काय ?' असा प्रश्न असतांही 'तो जातो काय ?' व 'जात नाहीं काय ?' असें आपण दोन अर्थ-प्रश्न केले, ते वरच्या मंत्रभागांत 'अनुप्रश्न अनेक आहेत' ह्या बहुवचनी प्रयोगावरून म्हटलें ?

सिद्धान्ती—होय. तसे लागलींच ब्रह्मवेत्त्यासंबंधानेंही असेच दोन प्रश्न आहेत. एवंच चार प्रश्न झाले. श्रुति-शब्दांवरून दोनच प्रश्न असावेत, असें वाटतें. पण ज्याअर्थी 'अनुप्रश्नाः' असा बहुवचनी प्रयोग आहे, त्याअर्थी विद्वान् आणि अविद्वान् यांच्यासंबंधानें प्रत्येकी दोन दोन प्रश्न आहेत, असें सिद्ध होतें.

पूर्व०— होय; मीही विचारणारच होतों कीं, सर्वव्यापित्वानें असणारें जें सर्वकारण ब्रह्म त्याची प्राप्ति जर अविद्वानाला होत नाहीं, तर विद्वानालाही ब्रह्मप्राप्ति होऊं नये.

सिद्धान्ती—हाच अभिप्राय मनांत आणून श्रुति प्रश्नद्वय उपस्थित करिते कीं, पंचत्व पावल्यावर विद्वान पुरुषही ब्रह्मलोकाप्रत जातो किंवा नाहीं ?

शिष्य—'उ' म्हणजे काय ? शिवाय समश्नुते यापुढें 'उ' आला आहे, तेव्हां येथें संधि कां केला नाहीं ?

सिद्धान्ती—हा प्रयोग आर्ष आहे. पण श्रुतीनें 'समश्नुते' असा अक्षरविन्यास केला आहे, प्लुति केली आहे, यावरून येथें संधि होतो, हें श्रुतीलाही विदित होतें. असो; येथें 'उ' चा अर्थ 'उत' असा आहे. हा प्रश्नार्थक शब्द आहे. 'उताऽऽहो' म्हणजे 'काय हो ?' विद्वानाला ब्रह्मलोक मिळतो काय किंवा अविद्वानासारखा मिळत नाहीं कीं काय, हा वाक्यार्थ आहे.

शिष्य—किंवा विद्वानासंबंधानें एक प्रश्न व अविद्वानासंबंधानें एक प्रश्न, असें दोनच प्रश्न आहेत, असें म्हटलें तर ?

सिद्धान्ती—कांहीं प्रत्यवाय नाहीं.

पूर्व०—पण अनुप्रश्नाः हें बहुवचन आहेना ?

शिष्य—सर्व मंत्राच्या तात्पर्यावरून जी अर्थापत्ति होते, तींवरून आणखी तिसराही प्रश्न उत्पन्न होतो, त्यासाठीं हें बहुवचन आहे.

पूर्व०—कोणता तो तिसरा प्रश्न ?

शिष्य—'ब्रह्म असत् आहे व ब्रह्म सत् आहे, असें ज्ञान असेल तर' हा मंत्रभाग श्रवण केल्याबरोबर 'ब्रह्म आहे कीं नाहीं ?' असा संशय प्राप्त होतो. आणि 'ब्रह्म आहे किंवा नाहीं' असा या संशयावरून अनुप्रश्न होतो; हा पहिला प्रश्न. अविद्वान् ब्रह्माच्या पक्षांत पडणारा नसल्यामुळें (ब्रह्मपक्षपाती नसल्यामुळें) 'तो ब्रह्मलोकाप्रत जातो कीं नाहीं ?' हा दुसरा प्रश्न. आणि ब्रह्म सर्वसामान्य आहे, म्हणून अविद्वानाप्रमाणेंच 'विद्वानालाही ब्रह्मप्राप्ति होत नाहीं कीं काय ?' असा संशय उत्पन्न होऊन विद्वानाला ब्रह्मप्राप्ति होते किंवा होत नाहीं, हा तिसरा अनुप्रश्न आहे. बरोबर आहेना भगवन् ?

सिद्धान्ती—ठीक आहे. आणि ह्या तीन प्रश्नांस यथास्थित उत्तर द्यावें. म्हणून पुढील ग्रंथाचा अवतार आहे. ब्रह्म आहे, असें श्रुतीनें स्पष्ट सांगितलें आहे

पूर्व०—कोठें आहे तें ?

सिद्धान्ती—'सत्य ज्ञान आणि अनंत ब्रह्म आहे' असें श्रुतीनें ब्रह्माचें लक्षण केलें. अहो ! तें तुम्ही इतक्यांतच विसरलां काय ?

पूर्व०—विसरलों नाहीं बरें ! तेथें शब्द 'सत्य' आहे. पण तेथें सत्त्व म्हणजे अस्तित्व कसें प्राप्त होतें ?

सिद्धांती—ऐका; सत्त्व (सत्ता, अस्तित्व) हा श्रुतीनें उपयोजिलेला शब्द आहे. 'सत् हेंच सत्य आहे' अशी श्रुतिही प्रमाण आहे; म्हणून सत्यशब्दानेंच सत्त्वाचा अर्थ प्रकट होतो.

पूर्व०—श्रुतीला हाच अर्थ मान्य आहे, 'सत्त्व म्हणजे सत्यत्व' असेंच श्रुतीस म्हणावयाचें आहे, असें कशावरून ?

सिद्धान्ती—ह्या ग्रंथांतील 'सत्य' शब्दाच्या अनुगमानेंच हा अर्थ सिद्ध होतो. ह्याच अर्थानें पुढील वाक्यांत सत्यशब्दाची योजना आहे. पहा 'त्याला सत्य असें म्हणावें' 'जर हें आकाश आनंदरूप **नसतें**' इत्यादि श्रुतीवाक्यें आमचें म्हणणें सिद्ध करितात.

पूर्व०—ब्रह्म असत् आहे, असेंही श्रुतीनें म्हटलें आहे.

सिद्धान्ती—होय. पण ही शंका आहे, हा पूर्वपक्ष आहे.

पूर्व०—कशावरून ?

सिद्धान्ती—ऐका; घटमठादि जें कांहीं असतें, त्याचें ग्रहण आपण त्याच्या विशेष गुणधर्मादिकांनीं करितो. शशशृंगादि जें नसतेंच, त्याचें ग्रहण आपल्यास करितां येत नाहीं. कारण, ग्रहण करण्यासारखे विशेष धर्म तेथें नसतात. याचप्रमाणें ब्रह्मही उपलब्ध होत नाहीं. कारण, त्याला विशेष नसतात. तें निर्विशेष असतें. अर्थात् तें अगोचर असतें. म्हणून तें नाहीं, अशी सहज शंका उत्पन्न होते. मग या शंकेचें समाधान कसें ? असें विचाराल तर ऐका; ब्रह्म हें आकाशादि पंचमहाभूतांचें कारण आहे, तेव्हां 'ब्रह्म नाहीं' असें म्हणतांच येत नाहीं.

पूर्व०—कां बरें ?

सिद्धान्ती—आकाशादि सर्व **कार्यें** आहेत, आणि तीं ब्रह्मानें उत्पन्न केलीं आहेत, असें श्रुतीनें सांगितलें आहे. (प्रथम अनुवाक पहा.) व आपण त्या त्या कार्याचें ग्रहणही करितों, तेव्हां त्याचें कारण **असलेंच** पाहिजे. शिवाय, ज्यापासून एकादी वस्तु उत्पन्न होते ती कारणवस्तु अस्तित्वांत **असते**, असें आपण व्यवहारांतही म्हणतों. घट व अंकुर यांचीं कारणें मृत्तिका आणि बीज हीं असतात. कार्य **असलें** म्हणजे

त्याचें कारण अवश्य **असतें**. आकाशादि कार्यें आहेत. म्हणून त्यांचें **कारण** हें असलेच पाहिजे. या सर्व-कारणालाच श्रुतीनें ब्रह्म हें नांव दिलें आहे.

शिष्य—शिवाय व्यवहारांत असें कोणतेंही कार्य दिसत नाहीं, कीं जें असतापासून उत्पन्न झालेलें असतें.

सिद्धान्ती—बरोबर आहे. हें सर्व नामरूपादि कार्य जर असतापासून झालें असतें, तर तें आत्मशून्य (निरात्मक-कारण-शून्य) म्हणून आपल्यास उपलब्धही झालें नसतें. पण नामरूपाची उपलब्धि होतें. म्हणून त्याचें कारण जें ब्रह्म, तें आहे, हा सिद्धांत होय.

पूर्व०—असतापासून झालेलें कार्य उपलब्ध झालेंच तर ?

सिद्धान्ती—होणार नाहीं. अहो ! कारणच जर असत् असेल तर कार्यही असत् पाहिजे. पण कार्य सत् आहे, असें आपण म्हणतों. म्हणून कारण ही सत् असलें पाहिजे. म्हणून आम्ही म्हणतों कीं, **ब्रह्म आहे**, हा सिद्धांत होय. शिवाय, आपल्यास असें दिसून येईल कीं, " असतापासून सताची उत्पत्ति कशी व्हावी ? " असा प्रश्न उत्पन्न करून न्यायशुद्धरीतीनें ' असतापासून सताचा जन्म होणें असंभाव्य आहे. ' असें श्रुतिमाता सिद्ध करील. म्हणूनही ब्रह्म हें सद्रूप आहे, असेंच सिद्ध होतें.

पूर्व०—ठीक आहे; तुमचें सर्व-कारण असणारें ब्रह्म मृत्तिकेप्रमाणें किंवा बीजादिकां प्रमाणें जर कारण असेल तर तें असेना बापडें; पण तें त्यांच्याप्रमाणेंच अचेतन (जड) असणार.

सिद्धान्ती—नाहीं, नाहीं. त्याला **इच्छा करण्याचें** सामर्थ्य आहे. इच्छा करणारी वस्तु (जीव) व्यवहारांत क्षुद्रा अचेतन नसते. शिवाय ब्रह्म सर्वज्ञ असतें, हे आम्ही श्रुतीच्या आधारें आधींच सांगितलें आहे. यावरून ब्रह्म हें इच्छा करणारें आहे, म्हणून तें अचेतन नाहीं, चैतन्यपूर्ण आहे, असें ठरतें.

पूर्व०—पण ज्याची वासना पूर्ण झाली नाहीं, तो इच्छा करितो. तुमचे ब्रह्माला इच्छा आहे, म्हणून तें आप्तकाम नाहीं. आमच्यासारखेंच वासनान्वित आहे, असें झालें.

सिद्धांती—नाहीं, तें स्वतंत्र आहे. तुमच्या आमच्यामध्यें असणारे कामक्रोधादि दोष तुम्हा-आम्हांस वश करून कर्म करावयास लावितात. त्याप्रमाणें ब्रह्माची इच्छा प्रवृत्त करणारे कामादि विकार (संवेग) ब्रह्माचे स्वामी नसतात. तें ब्रह्म विकारवश नाहीं. म्हणून ब्रह्मकाम ज्ञानात्मक असतात. कारण ब्रह्म सत्यज्ञानात्मक म्हणजे शुद्ध आहे. अत एव ब्रह्माच्या इच्छा आत्मरूपी म्हणजे विकारशून्य असल्यामुळें त्या सर्व निर्मळ असतात. शिवाय, इच्छा ब्रह्माला प्रवृत्त करीत नाहींत. तर प्राणी कर्मांच्या अपेक्षेनें (जीवांचें पूर्वसंचित कर्म जसें असेल तसतशारीतीनें) ब्रह्म

आपल्या इच्छांस जीवकल्याणासाठीं प्रवृत्त करितें; म्हणून ब्रह्म हें इच्छाधीन नाहीं, स्वतंत्र आहे. अनाप्तकाम नाहीं. तें आप्तकाम आहे.

शिष्य—आणखी मला असें वाटतें कीं, कर्म करण्याला जीवांना बाह्य साधनांची अपेक्षा असते. तशी अपेक्षा ब्रह्माला नसते. आमच्या ज्या ज्या इच्छा असतात त्या सर्व अनात्मभूत (आमच्या स्वतःपासून निष्पन्न न झालेल्या, जड, आम्ही स्वतः प्रेरित न केलेल्या) असतात. आमच्या इच्छांचें आम्ही प्रेरक नसतों. तर आमचीं पूर्व पाप-पुण्यें आणि धर्माधर्म हीं कारणें प्रेरक असतात. तसेंच, आमच्या स्वरूपाहून निराळीं असणारीं कार्यकारणात्मक साधनें आम्हांस इष्टविषय प्राप्ति करून देण्याला हवीं असतात. सारांश, जीवाला कोणतीही विषयात्मक इच्छा झाली तर ती त्याच्या पूर्वकर्मसंचितानें उत्पन्न केलेली असते; आणि ती इच्छा पूर्ण करण्याची साधनें बाह्य, कार्यकारणात्मक, त्याच्याहून निराळीं, त्याच्या तंत्रानें न चालणारीं, अशीं असतात.

सिद्धान्ती—ठीक सांगितलेंस. पण ब्रह्माची स्थिति अशी नाहीं. त्याच्या इच्छांचें कारण तोच आणि साधनेंही तोच असतो. तो सर्वथा स्वतंत्र आहे, एक आहे, आणि अनन्य आहे. याप्रमाणें ब्रह्म आहे; तें सचेतन, सर्वज्ञ, आप्तकाम, स्वतंत्र आणि अद्वितीय आहे, असें आपण ठरविलें. आतां श्रुति काय सांगत आहे, तें पहा.

सोऽकामयत स आत्मा यस्मादाकाशः संभूतोऽकामयत कामितवान्। कथं, बहु स्यां बहु प्रभूतं स्यां भवेयम्। कथमेकस्यार्थान्तराननुप्रवेशे बहुत्वं स्यादित्युच्यते । प्रजायेयोत्पद्येय। न हि पुत्रोत्पत्त्येवार्थान्तराविषयं बहुभवनं कथं तर्ह्यात्मस्थानभिव्यक्तनामरूपाभिव्यक्त्या। यदाऽऽत्मस्थे अनभिव्यक्ते नामरूपे व्याक्रियेते तदा नामरूपे आत्मस्वरूपापरित्यागेनैव ब्रह्मणाऽप्रविभक्तदेशकाले सर्वावस्थासु व्याक्रियेते तदा तन्नामरूपव्याकरणं ब्रह्मणो बहुभवनम्। नान्यथा निरवयवस्य ब्रह्मणो बहुत्वापत्तिरुपपद्यतेऽल्पत्वं वा। यथाऽऽकाशस्याल्पत्वं बहुत्वं च वस्त्वन्तरकृतमेव। अतस्तद्वाणैवाऽऽत्मा बहु भवति। न ह्यात्मनोऽन्यदनात्मभूतं तत्प्रविभक्तदेशकालं सूक्ष्मं व्यवहितं विप्रकृष्टं भूतं भवद्भविष्यद्वा वस्तु विद्यते। अतो नामरूपे सर्वावस्थे ब्रह्मणैवाऽऽत्मवती, न ब्रह्म तदात्मकम्। ते तत्प्रत्याख्याने न स्त एवेति तदात्मके उच्येते। ताभ्यां चोपाधिभ्यां ज्ञातृज्ञेयज्ञानशब्दार्थादिसर्वसंव्यवहारभाग्ब्रह्म। स आत्मैवंकामः संस्तपोऽतप्यत। तप इति ज्ञानमुच्यते। "यस्य ज्ञानमयं

तप्रः" इतिश्रुत्यन्तरादाप्तकामत्वाच्चेतरस्यासंभव एव तपसः। तत्तपोऽतप्यत तप्तवान् । सृज्यमानजगद्रचनादिविषयामालोचनामकरोदात्मेत्यर्थः । स एवमालोच्य तपस्तप्त्वा प्राणिकर्मादिनिमित्तानुरूपमिदं सर्वं जगद्देशतः कालतो नाम्नारूपेण च यथानुभवं सर्वैः प्राणिभिः सर्वावस्थैरनुभूयमानमसृजत सृष्टवान् ।

सिद्धान्ती—ज्याच्यापासून आकाश उत्पन्न झालें, तो आत्मा इच्छा करिता झाला; कीं मी पुष्कळ होईन.

पूर्व०—आत्मा जर एकच एक आहे, तो प्रवेश करील, अशी दुसरी वस्तुच नाहीं, तर तो पुष्कळ कसा होणार ?

सिद्धान्ती—हेंच मनांत आणून श्रुति म्हणते 'मी उत्पन्न करीन'. येथें 'पुष्कळ होणें ही जी क्रिया आहे, ती पित्रादींकडून पुत्रादिकांच्या उत्पत्तीप्रमाणें दुसऱ्या पदार्थासंबंधानें नसते. पुत्रादिकांस जन्म होऊन आपण 'एकाचे एकवीस व पांचाचे पंचवीस' करितों. तसा भाग येथें नाहीं, तर स्वरूपामध्येंच अभिव्यक्त नसणारीं (अप्रकट असलेलीं) नामरूपें प्रकट करून पुष्कळ होण्याचीही क्रिया आहे. येथें **दुसऱ्या पदार्थाच्या** उत्पत्तीचा संबंधच नाहीं. **अप्रकट असलेलीं नामरूपें प्रकट करणें; म्हणजे बहु होणें होय.** स्वरूपाचे ठिकाणीं असणारीं अप्रकट (अनुद्भूत) नामरूपें जेव्हां व्याकृत होतात, प्रकट होतात, व्यक्तिस्वरूपानें दिसतात, तेव्हां स्वस्वरूपाचा परित्याग न करितां ब्रह्म हें नामरूपांचें व्याकरण (प्रकटीकरण, व्यक्तीकरण) करितें. आणखी थोडें पहा. प्रलयकालीं सर्व वस्तू स्वस्वकारणांत आणि हीं कारणें ब्रह्मांत लीन होतात. दृश्यभास्य वस्तू नामरूपात्मक आहेत, हें सर्व तत्त्वज्ञांस मान्य आहे. असो; नामरूपात्मक वस्तू ब्रह्मांत लीन होतात, म्हणजे ह्यांचीं नामरूपें अप्रकटरूपानें ब्रह्मांत राहतात. पुढें उत्पत्तिकालीं ब्रह्मस्वरूपाचा त्याग स्वरूपतः न करितां हींच प्रकट होतात. असो; हें प्रकटीकरण, व्याकरण, सर्व अवस्थांमध्यें होतें. तथापि हें चाललें असतां देश आणि काल हें व्यक्तिस्वरूपाप्रत आलेले नसतात.

शिष्य—म्हणजे काय ?

सिद्धान्ती—हें व्याकरण होतें, तें देशातीत आणि कालातीत असतें. ब्रह्म पुष्कळ झाल्यानंतर मग देशाची आणि कालाची उत्पत्ति होते. आधीं नामरूपांची प्रकटता आणि मग देश व काल यांची प्रकटता होते. असो; याप्रमाणें नामरूपाची व्याकृति होणें म्हणजे ब्रह्माचें पुष्कळ होणें होय. सृष्टीच्या आरंभाचा हा प्रकार आहे.

शिष्य—खरेंच आहे. ब्रह्म स्वरूपतः निरवयव आहे. मोठें होणें किंवा अल्प होणें, पुष्कळ होणें किंवा थोडें होणें, अवयवीला संभवनीय. ब्रह्म निरयव. तेव्हां यांचा संभवच तेथें नाहीं. घटमठादि लहानमोठ्या वस्तूंमुळें आकाशाला 'अल्प' किंवा 'बहु',

असे शब्द आपण उपयोजितों. पण दुसऱ्या वस्तूंच्या अभावामुळें ब्रह्माचेठिकाणीं तसल्या अल्पत्वबहुत्वाचा संभव नसतो. तेव्हां त्याच्या स्वरूपांत लीन असलेलीं नामरूपें त्याच्या स्वतंत्र इच्छेनें प्रकट होणें, हेंच त्याचें बहुभवन होय. हें मला समजलें.

सिद्धान्ती—शाबास ! याच नामरूपाच्या प्रकटीकरण–व्यवहारानें आत्मा पुष्कळ होतो. तूं म्हणतोस तें खरें आहे. ब्रह्माव्यतिरिक्त व तद्विलक्षण दुसरी वस्तुच त्रिकालांतही सांपडणें शक्य नाहीं, कीं जी आत्म्याहून निराळ्या प्रदेशीं, किंवा निराळ्या कालीं लहानमोठ्या स्वरूपानें किंवा दूर जवळ राहून विद्यमान असेल. अतएव सर्वावस्थांतील नामरूपें आत्मवंत असतात, तीं ब्रह्मामुळेंच होय. आत्म्यानें प्रकट केलेलीं नामरूपें केव्हांही व कोठेंही आत्मवंतच असणार.

पूर्व०– म्हणजे ब्रह्माला तीं आत्मत्व देतात !

सिद्धांती—नाहीं. **ब्रह्मामुळें तीं आत्मवंत होतात.** ब्रह्म नसेल तर नामरूपें असणेंच शक्य दिसत नाहीं. नामरूपाशिवाय ब्रह्म असतें. पण ब्रह्माशिवाय नामरूपें असत नाहींत. म्हणून तीं ब्रह्मात्मक किंवा आत्मवंत असतात. असो; नामरूप ह्या उपाधी झाल्या. या दोन उपाधींनीं ज्ञाता, ज्ञेय, ज्ञान, शब्द आणि त्यांचे अर्थ, इत्यादि सर्व व्यवहार ब्रह्मामध्येंच होऊं लागतो. म्हणजे ब्रह्म नामरूपात्मक उपाधींनीं सर्व व्यवहाराला पात्र होतें. तात्पर्य, आपला व्यवहार ब्रह्मनिर्मित (प्रकटीकृत) नामरूपांनीं उत्पन्न झालेला आहे. असो; याप्रमाणें तो आत्मा बहु होण्याची इच्छा करीत होत्साता तपश्चर्या करिता झाला. तप म्हणजे ज्ञान. 'त्याचें तप ज्ञानमय आहे' अशी श्रुति प्रमाण आहे. शिवाय, ब्रह्म स्वतः आप्तकाम असल्यामुळें (त्याच्या सर्व इच्छा तृप्त झाल्या असल्यामुळें) इतर प्रकारच्या तपाचा (विषयात्मक तपाचा) असंभवच आहे. आपण जीव अप्राप्त वस्तूंच्या इच्छेनें तपश्चर्या करितों, ब्रह्माची स्थिति तशी नाहीं. तेव्हां, त्याचें तप ज्ञानमयच होतें, हें निर्विवाद आहे. अर्थात् आपल्यास पुढें जें जगत् निर्माण करावयाचें आहे, त्याच्या रचनेचें आलोचन आत्म्यानें केलें म्हणजे तपश्चर्या केली. याप्रमाणें आलोचनरूपी तपश्चर्या करून, निरनिराळ्या प्राण्यांच्या कर्मादि निमित्तांस अनुरूप असें (सर्व जगत्–देश, काल, नाम आणि रूप यांनीं संघटित असें) जगत् उत्पन्न केलें. सर्वावस्थेतील सर्व प्राण्यास सर्वकाळीं व सर्वदेशीं जसें जगत् अनुभवास येतें, तसेंच त्यानें तें उत्पन्न केलें.

यदिदं किंच यत्किंचेदमविशिष्टम् । तदिदं जगत्सृष्ट्वा किमकरोदित्युच्यते—तदेव सृष्टं जगदनुप्राविशदिति । किं यः स्रष्टा स तेनैवाऽऽत्मनाऽनुप्राविशदुतान्येनेति, किं तावद्युक्तम् । कर्त्वाप्रत्ययश्रवणाद्यः स्रष्टा स एवानुप्राविशदिति ।

सिद्धान्ती—जें जें कांहीं तेथें उत्पन्न झालेलें आहे, त्यांतील प्रत्येक वस्तु परमात्म्यानेंच उत्पन्न केली आहे. उत्पत्तीनंतर आपण निर्मिलेल्या प्रत्येक वस्तूंत आत्म्यानें प्रवेश केला.

शिष्य—तो कसा? जो स्रष्टा तोच स्वरूपानें वस्तूंत प्रवेश करिता झाला, किंवा अन्य स्वरूप घेऊन त्यानें प्रवेश केला? येथें कोणता पक्ष घ्यावा? 'घ्या' 'ऊन'—प्रत्यक्ष दिसत आहे, उत्पन्न करून मग प्रवेश केला, असें श्रुति म्हणत आहे. त्यावरून ज्यानें सृष्टि उत्पन्न केली, तोच स्वस्वरूपानें जगतामध्यें प्रविष्ट झाला असला पाहिजे.

ननु न युक्तं मृद्बुद्धेत्कारणं ब्रह्म तदात्मकत्वात्कार्यस्य । कारणमेव हि कार्यामत्ना परिणतमित्यतोऽप्रविष्ट इव कार्योत्पत्तेरूर्ध्वं पृथक्कारणस्य पुनः प्रवेशोऽनुपपन्नः । न हि घटपरिणामव्यतिरेकेण मृदो घटे प्रवेशोऽस्ति । यथा घटे चूर्णात्मना मृदोऽनुप्रवेश एवमन्येनाऽऽत्मना नामरूपकार्येऽनुप्रवेश आत्मन इति चेच्छ्रुत्यन्तराच्च "अनेन जीवेनाऽऽत्मनाऽनुप्रविश्य" इति नैवं युक्तमेकत्वाद्ब्रह्मणः । मृदात्मनस्त्वनेकत्वात्सावयत्वाच्च युक्तो घटे मृदश्चूर्णात्मनाऽनुप्रवेशः । मृदश्चूर्णस्याप्रविष्टदेशवत्त्वाच्च । न त्वात्मन एकत्वे सति निरवयवत्वादप्रविष्टदेशाभावाच्च प्रवेश उपपद्यते, कथं तर्हि प्रवेशः स्यात् । युक्तश्च प्रवेशः श्रुतत्वात्तदेवानुप्राविशदिति । सावयवमेवास्तु तर्हि सावयवत्वान्मुखे हस्तप्रवेशवन्नामरूपकार्ये जीवात्मनाऽनुप्रवेशो युक्त एवेति चेन्नाशून्यत्वात् । न हि कार्यात्मना परिणतस्य नामरूपकार्यदेशव्यतिरेकेणाऽऽत्मशून्यः प्रदेशोऽस्ति यं प्रविशेज्जीवात्मना । कारणमेव चेत्प्रविशेज्जीवात्मत्वं जह्याद्यथा घटो मृत्प्रवेशे घटत्वं जहाति । तदेवानुप्राविशदिति च श्रुतेर्न कारणानुप्रवेशो युक्तः ।

कार्यान्तरमेव स्यादिति चेत् । तदेवानुप्राविशदिति जीवात्मरूपं कार्यं नामरूपपरिणतं कार्यान्तरमेवाऽऽपद्यत इति चेन्न । विरोधात् । न हि घटो घटान्तरमापद्यते व्यतिरेकश्रुतिविरोधाच्च । जीवस्य नामरूपकार्यव्यतिरेकानुवादिन्यः श्रुतयो विरुध्येरन् । तदापत्तौ मोक्षासंभवाच्च । न हि यतो मुच्यमानस्तदेवाऽऽपद्यते । न हि शृङ्खलापत्तिर्बद्धस्य तस्करादेः ।

पूर्व०—घटाच्या मृत्तिकेसारखे जर ब्रह्म हें सर्व दृश्यभास्याचें उपादान कारण आहे, तर घट जसा मृत्तिकामय असतो, त्याप्रमाणें जगत्ही ब्रह्ममय असणार. कारण, उपादान कारण हेंच कार्यस्वरूपानें परिणत होतें. म्हणून जगतांमध्यें ब्रह्माचा प्रवेश आधींच, उत्पन्न होत असतांनाच, झाला आहे. अतएव ज्या पृथक्करणाचा जगतामध्यें प्रवेश झाला नाहीं, त्याचा प्रवेश कार्योत्पत्तीनंतर झाला, असें म्हणणें कसें योग्य होईल ? पण तेथें तर तसें म्हटलें आहे, तेव्हां मला स्पष्ट दिसतें कीं, ब्रह्मानें कार्यांमध्यें तदुत्पत्तीनंतर प्रवेश केला, हें श्रुतिचें म्हणणें योग्य नाहीं. उघडच आहे कीं, घटरूपी जो परिणाम त्याच्या शिवाय घटाचें कारण जी मृत्तिका तिचा प्रवेश घटामध्यें निराळा होत नाहीं., हा नित्याचा अनुभव आहे. आतां ज्यांमाणें घटामध्यें मातीची पूड घालून मातीचा प्रवेश झाला, असें आपल्यास म्हणतां येतें, याप्रमाणें आत्म्यानें अन्यस्वरूप घेऊन नामरूप–कार्यांमध्यें प्रवेश केला, असें म्हणाल व 'त्याच जीवरूपी आत्म्यानें प्रवेश करून ' अशी श्रुतीप्रमाण म्हणून सांगाल तर हेंही म्हणणें योग्य नाहीं. कारण ब्रह्म हें एकरस आहे. त्याला दुसरें स्वरूप नाहीं. मृत्तिकेचीं स्वरूपें अनेक असतात, मृत्तिका सावयव असते. म्हणून घटामध्यें मृत्तिकेचा चूर्णस्वरूपानें घटोत्पत्तीनंतरही प्रवेश होतो.शिवाय मृत्तिकेच्या चूर्णांचें प्रवेशस्थानही घटकारण जी मृत्तिका, तिच्याहून निराळें असतें. चूर्ण घटांत असतें, घट नसतें. पण आत्मा एकरूप आहे, निरवयव आहे, त्याचा प्रवेश झाला नाहीं, असा देशही नाहीं. म्हणून ' सृष्टीच्या ' उत्पत्तीनंतर आत्म्यानें सृष्टीमध्यें प्रवेश केला, हें म्हणणें कोणालाही योग्य नाहीं. मग असा अयोग्य प्रवेश श्रुति तरी कसा सांगेल ?

शिष्य—प्रवेश न व्हावयास काय झालें ? प्रत्यक्ष सर्वदा प्रमाण असणारी श्रुति मागाहून प्रवेश केला, असें सांगत आहे ना ! अर्थात् ब्रह्म सावयव आहे, असें सांगण्याचा श्रुतीचा अभिप्राय असेल. सावयव मुखामध्यें सावयव हस्ताचा प्रवेश होतो, त्याप्रमाणें नामरूपी–जगतांत जीवात्म्याचा अनुप्रवेश युक्तच आहे.

पूर्व०—असें म्हणून कसें चालेल ? प्रवेश करण्याला देश हवाना ? अहो, शिष्यराज ! कार्यस्वरूपानें परिणत झालेल्या ब्रह्माला प्रवेश करण्यासारखा नामरूपकार्यांच्या (जगत्, सृष्टी) व्यतिरिक्त (आत्मशून्य) असा प्रदेश आहे काय, कीं जेथें ब्रह्म जीवात्मस्वरूपानें प्रवेश करील ? महाराज, असा प्रदेशच नाहीं. आतां, कारण-ब्रह्मामध्यें (जें कार्यांमध्यें परिणत झालें आहे त्या कारणामध्यें) कार्यविशेष जो जीवात्मा तो प्रवेश करितो, असें म्हणाल; तर तें ही चालावयाचें नाहीं; कारण, मग ब्रह्माचें जीवात्मत्व नाहींसे होईल.

शिष्य—तें कसें ?

पूर्व०—कार्यविशेष जो घट त्यानें कारणामध्यें (मृत्तिकेंमध्यें) प्रवेश केला, तर त्याचें घटत्व नाहींसें होतें. म्हणून जीवानें ब्रह्मांत प्रवेश केला, तर त्याचें जीवत्व

संपेल, पण श्रुतीला असें म्हणतां यावयाचें नाहीं. शिवाय " त्यामध्यें (कार्यामध्यें) ब्रह्मानें प्रवेश केला " असें श्रुतीचें स्पष्ट वाक्य आहे. तेव्हां कारणाध्यें प्रवेश केला, असा अर्थच होणें शक्य नाहीं.

शिष्य—जगताशिवाय दुसरें कांहीं कार्य असेल. जीवात्मारूप जें कार्य, तें नामरूपानें परिणामास आलेलें जगद्रूपी जें अन्य कार्य, त्याच्यामध्यें प्रवेश करितें झालें. असें म्हटलें तर जुळतें कीं नाहीं ? तात्पर्य सृष्युत्पत्तीनंतर जीवानें जगतांत प्रवेश केला, असा अर्थ केला, म्हणजे ठीक जुळतें.

पूर्व०—नाहीं; कारण विरोध आहे. केव्हांही एक घट दुसऱ्या घटामध्यें प्रवेश करितांना आपण पाहत नाहीं. शिवाय, व्यतिरेकश्रुतींचा विरोध आहे, तो निराळाच.

शिष्य—म्हणजे काय ?

पूर्व०—' जीवाचें नामरूपकार्यांशीं विलक्षणत्व आहे, ' असा अनुवाद करणाऱ्या अनेक श्रुती आहेतना ? त्यांच्याशीं तुमचें म्हणणें विरोधात्मक होतें. आणखी; तुमचें म्हणणें खरें धरलें तर (जीव हें कार्य आहे; व तो जीव सृष्टिकार्यांमध्यें प्रवेश करितो, असें धरलें तर) मोक्षाचा संभवच नाहींसा होतो. जेथून आपल्यास सुटावयाचें आहे. तें आपण कधींही प्राप्तकरून घेत नाहीं. अहो ! बांधलेल्या तस्करादिकांस मोकळें करण्याच्या प्रसंगी कधीं शृंखलाची देणगी देतात काय ? बांधलेल्या कैद्याला सोडतांना कधीं शृंखला अर्पण करीत नाहींत ! अत एव हे तुमचें म्हणणें योग्य नाहीं.

बाह्यान्तरभेदेन परिणतमिति चेत्तदेव कारणं ब्रह्म शरीराद्याधारत्वेन तदन्तर्जीवात्मनाऽऽधेयत्वेन च परिणतमिति चेन्न, बहिष्ठस्य प्रवेशोपपत्तेः। न हि यो यस्यान्तःस्थः स एव तत्प्रविष्ट उच्यते। बहिष्ठस्यानुप्रवेशः स्यात्प्रवेशशब्दार्थस्यैवं दृष्टत्वात्। यथा गृहं कृत्वा प्राविशदिति। जलसूर्यकादिप्रतिबिम्बवत्प्रवेशः स्यादिति चेन्न। अपरिच्छिन्नत्वादमूर्तत्वाच्च। परिच्छिन्नस्य मूर्तस्यान्यस्यान्यत्र प्रसादस्वभावके जलादौ सूर्यकादिप्रतिबिम्बोदयः स्यात्। न त्वात्मनः, अमूर्तत्वादाकाशादिकारणस्याऽऽत्मनः, व्यापकत्वात्। तद्विप्रकृष्टदेशप्रतिबिम्बाधारवस्त्वन्तराभावाच्च प्रतिबिम्बवत्प्रवेशो न युक्तः।

शिष्य—बाह्य आणि आंतर यांत भेद आहेच. या भेदासह ब्रह्म हें परिणत होऊन जीवरूपानें व जगद्रूपानें प्रकट झालें, असें मानिलें तर, सर्व ग्रंथ यथास्थित लागेल.

पूर्व०—म्हणजे ?

शिष्य—सर्वकारण जें ब्रह्म त्यानें आपलें बाह्यस्वरूप जें जड त्याचा परिणाम शरीरादि आकारवंत जडामध्यें करून त्यांस आधार केलें; आणि आपला जो अंतर्भाग,

तो जीवात्म्यामध्यें परिणत करवून त्याला आधेय केलें. तात्पर्य आपणच बाह्यत्वानें आधाररूपी शरीरादि जगत् झालें व आपणच त्यांत जीवरूपानें आपल्या अंतर्यामाचा प्रवेश करविला. असें म्हटलें म्हणजे या श्रुतीची व्यवस्था लागते. तात्पर्य, स्वस्वरूपाची परिणति करून बाह्य जडांत आंतर-जीवरूपानें प्रवेश केला. जड बाह्य व जीव आंतर. म्हणून परिणतिरूपानें जगताची उत्पत्ति करून तो (तत्) त्यांत शिरला.

पूर्व०—नाहीं. कारण, कोणताही आंतच असणारा पदार्थ आंत प्रवेश करितो, असें होत नाहीं व असें आपण म्हणतहीं नाहीं. बाहेरचा पदार्थ दुसऱ्या पदार्थांत प्रवेश करितो. प्रवेश शब्दाचा अर्थच पहा कीं! म्हणून ब्रह्माचा अंतर्याम ब्रह्मांतच प्रविष्ट झाला, हें म्हणणें योग्य नव्हें. आपण बाहेर राहून घर तयार करितों व तें गृह सिद्ध झाल्यावर त्यांत प्रवेश करितों. गृहांत राहणारा 'गृहस्थ' गृहप्रवेश करितो, असें म्हणणें अनुचित होय.

दुसरा शिष्य—जलांमध्यें किंवा सूर्यकांतमण्यांमध्यें प्रतिबिंबरूपानें सूर्य प्रवेश करितो, तद्वत्, ब्रह्मबिंब हें जीवनरूपानें जगतांत प्रतिबिंब होतें, असें म्हणूं या.

पूर्व०—नाहीं. ब्रह्म अमूर्त आहे. त्याचें प्रतिबिंब पडेल कसें ? शिवाय, ब्रह्म अपरिच्छिन्न म्हणजे मर्यादाशून्य व उपाधिशून्य आहे; तेव्हां प्रतिबिंबरूपानें त्याचा प्रवेश होणें अशक्य आहे अहो ! एका परिच्छिन्न पदार्थाचें दुसऱ्या स्वच्छ जलादिकांमध्यें प्रतिबिंबरूपानें प्रवेश होतो. पण आकाशादि अमूर्त वस्तूंचेंही कारण असणारा जो आत्मा तो जगतादिकांत कसा प्रतिबिंबित होणार ? शिवाय, आत्मा सर्वव्यापी आहे. त्यानें व्यापलेला नाहीं असा व त्याच्यापासून दूर राहून त्याच्या प्रतिबिंबाला आधार होणारा असा देशच नाहीं, तेव्हां प्रतिबिंबासारखा त्याचा प्रवेश होणेंही योग्य नाहीं. एवंच, उपादान-कारणानें कार्य उत्पन्न केल्यावर मग उपादानकारण कार्यांत प्रवेश करीत नाहीं; उपादानाला आपलें स्वरूप सोडितां येत नाहीं; ब्रह्म सर्वव्यापी आहे; तें निरवयव आहे ! जीव ब्रह्मांत शिरत नाहीं; तो जगद्रूप होत नाहीं; ब्रह्माचे जीव व जगत् असे दोन भाग होत नाहींत; बिंबप्रतिबिंबभाव होत नाहीं, म्हणून 'प्रवेश' श्रुतियोग्य नाहीं.

एवं तर्हि नैवास्ति प्रवेशो न च गत्यन्तरमुपलभामहे । " तदेवानुप्राविशत् " इति च श्रुतेः । श्रुतिश्च नोऽतीन्द्रियविषये विज्ञानोत्पत्तौ निमित्तम् । न चास्माद्वाक्याद्यत्नवतामपि विज्ञानमुत्पद्यते । हन्त तर्ह्यनर्थकत्वादपोह्यमेतद्वाक्यं " यत्सृष्ट्वा तदेवानुप्राविशत् " इति । न । अन्यार्थत्वात् । किमर्थमस्थाने चर्चा । प्रकृतौ ह्यन्यो विवक्षितोऽस्य वाक्यस्यार्थोऽस्ति स स्मर्तव्यः । " ब्रह्मविदाप्नोति परम् " " सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म " " यो वेद निहितं गुहायाम् "

इति। तद्विज्ञानं च विविक्षितं प्रकृतं च तत्। ब्रह्मस्वरूपानुगमाय चाऽकाशाद्यन्नमयान्तं कार्यं प्रदर्शितं ब्रह्मानुगमश्चाऽऽरब्धः। तत्रान्नमयादात्मोऽन्योऽन्तर आत्मा प्राणमयस्तदन्तर्मनोमयो विज्ञानमय इति। विज्ञानगुहायां प्रवेशितस्तत्र चाऽऽनन्दमयो विशिष्ट आत्मा प्रदर्शितः अतः परमानन्दमयलिङ्गाधिगमद्वारेणाऽऽनन्दविवृद्ध्यवसान आत्मा। ब्रह्म पुच्छं प्रतिष्ठा सर्वविकल्पास्पदो निर्विकल्पोऽस्यामेव गुहायामधिगन्तव्य इति तत्प्रवेशः प्रकल्प्यते।

पूर्व०—याप्रमाणें ब्रह्माचा प्रवेश होत नाहीं, असें सिद्ध झालें. दुसरें कोणी शिरलें, असेंही म्हणतां येत नाहीं, कारण 'त्यांमध्यें तेंच प्रविष्ट होतें झालें' अशी श्रुति आहे. आतां, जे विषय अतींद्रिय आहेत, त्यांचे विज्ञान उत्पन्न करून द्यावें, हें श्रुतीचें मुख्य प्रयोजन आहे. आणि आपण इतका वेळ झटपट केली, पण इतके प्रयत्न करूनही आपल्यास ज्ञानाचा एक कणही मिळाला नाहीं. यावरून आम्ही असें ठाम विधान करितों कीं, हें वाक्य अर्थशून्य आहे; व म्हणून श्रुतिसंग्रहांतून या वाक्याला काट द्यावा. प्रवेश सिद्ध होत नाहीं, म्हणून हें वाक्य काढून टाकावें, अशी आमची शिफारस आहे.

सिद्धांती—छेः! छेः!! काय भलतें भाषण बोलतां हें! अहो! या वाक्यांचा तुम्ही समजतां, असा अर्थ नाहींच आहे मुळीं!

पूर्व०—कशाला आतां ही अप्रस्तुत चर्चा? ही चर्चा अस्थानीं आहे.

सिद्धान्ती—ही चर्चा प्रकृतच आहे. या वाक्याचा विवक्षित जो अन्य अर्थ आहे, त्याचें स्मरण करूं या. 'ब्रह्मज्ञाला ब्रह्म-प्राप्ति होते' 'सत्य, ज्ञान, व अनंत हें ब्रह्म आहे' 'बुद्धीमध्यें वास्तव्य करणाऱ्या आत्म्याचें ज्ञान ज्याला झालें' हीं ब्रह्मज्ञानाचें फल, ब्रह्माचें स्वरूप सांगणारीं वाक्यें व त्यांचा अर्थ स्मरणांत आणा. या अर्थाचें विज्ञान कसें करून घ्यावयाचें, ब्रह्मस्वरूप कसें व तें कसें समजून घ्यावयाचें, तें प्रकृत सांगावयाचें आहे. अर्थात् विज्ञान हें प्रकृत (वादविषयक, प्रस्तुत) आहे. अहो! ब्रह्मस्वरूपाचा अनुगम व्हावा, कार्यस्वरूप समजल्यावर कारणस्वरूपाची यथार्थ कल्पना व्हावी, म्हणून 'आकाशापासून अन्नमयापर्यंतच्या सर्व कार्याचा निर्देश करून ब्रह्माच्या अवगमाला आरंभ केला. तेथें अन्नमयाहून अन्य व अन्नमयाच्या आंत असणारा आत्मा प्राणमय, त्याचा अंतर्यामी मनोमय, त्याचा ही अंतर्यामी विज्ञानमय आहे, असें सांगितलें. नंतर विज्ञानगुहेमध्यें प्रवेशित केलेला आनंदमय नामक विशिष्ट आत्मा-आनंदमयता, हें चैतन्याचें चिन्ह होय-तो प्रकट केला. यावरून सिद्ध झालें नाहीं काय कीं, परमानंद हेंच ज्याचें चिन्ह आहे, त्याचा ह्या 'परमानंदमय चिन्हानें' अधिगम लक्ष्यत्वेंकरून होतो. तात्पर्य, 'आनंदाच्या वृद्धीची जेथें सीमा

होते, जेथें आनंद 'अनंत होतो, तो आत्मा होय,' हें ज्ञान आपल्यास होतें. 'ब्रह्म हें आनंदमयाचें पुच्छ व आधार आहे' ह्या श्रुतीवरूनच सिद्ध झालें कीं, सर्व विकल्पनांचें (संशयांचें, आरोपांचें) अधिष्ठान असणारा जो स्वरूपतः निर्विकल्प आत्मा आहे, तो विज्ञानगुहेमध्येंच समजून घेऊन प्राप्त करून घ्यावा. सारांश, विज्ञानगुहेमध्यें ज्या आनंदमयाचा कल्पित, लाक्षणिक, प्रवेश होतो, त्याचें अत्युत्कृष्ट व निर्विकल्प जें स्वरूप, तें आत्मरूप आहे. अर्थात् आनंदमयाचा प्रवेश तोच आत्मप्रवेश होय, अशी ही कल्पना आहे, व ही अज्ञानी माणसांस ज्ञान व्हावें, एतदर्थ केली आहे.

न ह्यन्यत्रोपलभ्यते ब्रह्म निर्विशेषत्वाद्विशेषसंबंन्धो ह्युपलब्धिहेतुर्दृष्टः । यथा राहोश्चन्द्रार्कविशिष्टसंबन्धः । एवमन्तःकरणगुहात्मसंबन्धो ब्रह्मण उपलब्धिहेतुः । सन्निकर्षादवभासात्मकत्वाच्चान्तःकरणस्य । यथा चाऽलोकविशिष्टा घटाद्युपलब्धिरेवं बुद्धिप्रत्ययालोकविशिष्टात्मोपलब्धिः स्यात्तस्मादुपलब्धिहेतौ गुहायां निहितमिति प्रकृतमेव । तद्वृत्तिस्थानीये त्विह पुनस्तत्सृष्ट्वा तदेवानुप्राविशदित्युच्यते ।

सिद्धान्ती—ब्रह्म स्वरूपतः निर्विशेष आहे. बुद्धीशिवाय दुसरीकडे त्याची उपलब्धि होणें शक्यच नाहीं, म्हणून बुद्धिप्रवेशाची **कल्पना** सिद्ध केली. आतां, निर्विशेषाची बुद्धीमध्येंसुद्धां कशी उपलब्धि होते म्हणाल, तर बुद्धीचा व आत्म्याचा तसाच कांहीं विशेष संबंध आहे. व म्हणून ह्या विशेषसंबंधामुळें आत्म्याची उपलब्धि करून देण्याला बुद्धि समर्थ होते.

शिष्य—खरेंच आहे. विशेष संबंध समजला, तरच कोणत्याही पदार्थांचें ज्ञान होतें. पहा कीं, राहूचा व सूर्यचंद्राचा विशेष संबंध असल्यामुळें अमावास्या-पौर्णिमेच्या दिवशीं राहूची उपलब्धि होण्याचा संभव असतो. याचप्रमाणें अंतःकरणांत असणारी जी विज्ञानमय गुहा तिचा व आत्म्याचा विशेष संबंध हाच आत्म्याच्या उपलब्धीचा हेतु होतो.

पूर्व०—आत्मा असंग आहे ना ?

सिद्धान्ती—होय. पण सर्वव्यापी म्हणजे सर्वांस अस्तिभातित्व देणारा आत्मा हा प्राणिदेहांच्या अंतर्यामीं राहणाऱ्या बुद्धीच्या अत्यंत निकट राहून तेथें प्रकटत्वानें असतो; म्हणून व अंतःकरणाचा व देहाचा नित्यसंबंध आहे म्हणून आत्मा व अंतःकरण यांत एक विशेष संबंध उत्पन्न होतोसा दिसतो. शिवाय अंतःकरण हें अभिव्यंजक, म्हणजे अवभासात्मक, प्रकाशात्मक, अत्यंत स्वच्छ, असतें. तात्पर्य सूर्यप्रकाशामुळें जशी घटपटादिकांस प्रकाशविशिष्ट प्रकटता प्राप्त होते, त्याप्रमाणें आत्म्याशीं निकट राहणारें

व स्वतः स्वच्छ असणारें प्रकाशमय अंतःकरण हें आत्म्याच्या प्रकाशाविशिष्ट उपलब्धीला निमित्त होतें, अंतःकरणाच्या द्वारानें सर्वांतर्यामी आत्मा आपल्यास म्हणजे आपल्या प्रकाशक बुद्धीस प्रकट होतो. अर्थात्, आत्मोपलब्धीला निमित्त असणारी जी विज्ञानगुहा, त्यांत तो वास्तव्य करितो, असें म्हणणें योग्यच आहे. ऋग्वेदमंत्रानें हेंच सांगितलें व हाच आपल्या विचाराचा विषय आहे; आणि वेद-मंत्रानें सांगितलेल्या सिद्धांताचें स्पष्टीकरण करण्यासाठीं श्रुतीनें पुनः 'तें (सर्व जगत्) उत्पन्न करून त्यांत तोच परमात्मा प्रवेश करिता झाला' असें विधान केलें आहे. सारांश, सर्वत्र विद्यमान असणारा आत्मा प्रकाशक अंतःकरणाच्या द्वारानें प्रकट होतो, म्हणून तो तेथें राहतो अथवा अंतःकरणगुहेंत तो प्रवेश करितो, असें सांगून श्रुतीनें आत्मोपलब्धीचा उपायही सांगितला. जडप्रकाशालासुद्धां अंधकारनाशाचें सामर्थ्य असतें, तद्वत् प्रत्ययाचा आकार धारण करणाऱ्या शुद्ध अंतःकरणालाही अज्ञानाचा नाश करून देण्याचें सामर्थ्य असतें. असो.

तदेवेदमाकाशादिकारणं कार्यं सृष्ट्वा तदनुप्रविष्टमिवान्तर्गुहायां बुद्धौ द्रष्टृ श्रोतृ मन्तृ विज्ञात्रित्येवं विशेषवदुपलभ्यते। स एव तस्य प्रवेशस्तस्मादस्ति तत्कारणं ब्रह्म। अतोऽस्तित्वादस्तीत्येवोपलब्धव्यं तत्। तत्कार्यमनुप्रविश्य, किं, सच्च मूर्तं त्यच्चामूर्तमभवत्। मूर्तामूर्ते ह्यव्याकृतनामरूपे आत्मस्थे अन्तर्गतेनाऽऽत्मना व्याक्रियेते व्याकृते च मूर्तामूर्तशब्दवाच्ये ते आत्मना त्वप्रविभक्तदेशकाले इति कृत्वाऽऽत्मा ते अभवदित्युच्यते। किंच निरुक्तं चानिरुक्तं च निरुक्तं नाम निष्कृष्य समानासमानजातीयेभ्यो देशकालविशिष्टतयेदं तदित्युक्तमनिरुक्तं तद्विपरीतं निरुक्तानिरुक्ते अपि मूर्तामूर्तयोरेव विशेषणे। यथा सच्च त्यच्च प्रत्यक्षपरोक्षे, तथा निलयनं चानिलयनं च। निलयनं नीडमाश्रयो मूर्तस्यैव धर्मः। त्यदनिरुक्तानिलयनान्यमर्तधर्मत्वेऽपि व्याकृतविषयाण्येव। सर्गोत्तरकालभावश्रवणात्। त्यदिति प्राणाद्यनिरुक्तं तदेववानिलयनं च। अतो विशेषणान्यमूर्तस्य। व्याकृतविषयाण्येवैतानि। विज्ञानं चेतनमविज्ञानं तद्रहितमचेतनं पाषाणादि सत्यं च व्यवहारविषयमधिकारान्न परमार्थसत्यमेकमेव हि परमार्थसत्यं ब्रह्म। इह पुनर्व्यवहारविषयमापेक्षिकं सत्यं मृगतृष्णिकाद्यनृतापेक्षयोदकादि सत्यमुच्यते। अनृतं च तद्विपरीतम्। किं पुनस्तद्ब्रह्म। सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्मेति प्रकृतत्वात्।

सिद्धान्ती—याप्रमाणें आकाशादिकांचें कारण असणारें ब्रह्म हें आकाशादि उत्पन्न करून आपणच स्वतः स्वकार्यांत प्रविष्ट झाल्यासारखें प्रकट होतें झालें, आणि म्हणून तें अंतर्गुहा जी बुद्धि, तीमध्यें राहून 'पाहणारें, ऐकणारें, मनन करणारें, विज्ञान करून घेणारें' इत्यादि विशिष्ट झालेलें (विशेषात्मक) दिसूं लागलें.

शिष्य—म्हणजे निर्विशेष ब्रह्म विशेषात्मक झालें. त्यानें अंतःकरणगुहेंतून इंद्रियमनद्वारां प्रकट होण्यास आरंभ केला. **हें ब्रह्माचें बुद्धिद्वारा प्रकटीभवन म्हणजेच ब्रह्माचा स्वकार्यांत प्रवेश होय.** ही व्यावहारिक मीमांसा आहे.

सिद्धांती— अर्थात्, या सर्वानुभूत प्रवेशाचें कारण जें ब्रह्म, **तें आहे, असलें पाहिजे,** असें सिद्ध झालें. म्हणून **तें आहें.** वास्तव आपण जीवांनींही **'तें आहे'** असेंच **ज्ञानविज्ञान** करून घेतलें पाहिजे. पाहणें, ऐकणें इत्यादिकांचें प्रत्यक्ष कारण जें ब्रह्म तें असलेंच पाहिजे.

शिष्य—बरें, याप्रमाणें कार्यप्रवेश करून ब्रह्मानें काय केलें ?

सिद्धान्ती—तें सत् म्हणजे मूर्त आणि त्यत् म्हणजे अमूर्त झालें.

पूर्व०—म्हणजे ! ब्रह्मानें विशेष स्वरूपें धारण केलीं कीं काय !

सिद्धान्ती—नाहीं. सृष्टीच्या अगोदर आत्मस्वरूपांत राहणारीं मूर्तामूर्तात्मक नामरूपें अव्याकृत (व्याकृत न झालेलीं, विशेष स्वरूपास न आलेलीं, अनुद्भूत) असतात. त्यांचें व्याकरण सर्वांतर्यामी आत्मा करितो. आणि या दृश्य व्याकृत नामरूपांस आपण 'मूर्त' व 'अमूर्त' अशीं नांवें देतों. मूर्त म्हणजे पृथ्वी, आप, तेज हीं महाभूतें व अमूर्त म्हणजे वायु व आकाश होत. असो; हीं मूर्तामूर्तें स्वरूपतः देश-काल या उपाधींनीं ब्रह्मस्वरूपांत अप्रविभक्त होतीं, म्हणजे सृष्टीच्या पूर्वी देशातीत व कालातीत होतीं. सृष्ट्युत्पत्तीच्या वेळीं व नंतर हीं मूर्तामूर्त नामरूपें **'आत्मा स्वतः झाला'** असें श्रुति म्हणते. तात्पर्य या आत्मस्थित व अव्याकृत नामरूपी मूर्तामूर्तांस व्याकृत करून पुनः त्यांस देशविशिष्ट व कालविशिष्ट आत्म्यानें केलें; अथवा आत्माच सर्वरूपांनीं नटला.

शिष्य—म्हणजे आत्माच देशकाल होऊन पुनः देशविशिष्ट व कालविशिष्ट मूर्तामूर्त नामरूपांनीं हाच आत्मा अवतीर्ण झाला. असा अर्थ !

सिद्धांती—होय. याप्रमाणें तो निरुक्त व अनिरुक्त झाला. निरुक्त म्हणजे समानजाती व विषमजाती, यांपासून एकीकडे काढून घेऊन, निराळी करून 'ही देशविशिष्ट व कालविशिष्ट वस्तु' असें म्हणणें म्हणजे तिचें निर्वचन करणें होय. हेंच 'निरुक्त'.

शिष्य—**'ही गाय'** असें म्हटलें म्हणजे ही देशकालांनीं परिच्छिन्न झालेली गाय इतर **गोजातींतील** व्यक्तींहून निराळी, **इतर घटत्वपटत्वजातींहून** निराळी असल्याचें **न येथें आतां** प्रत्यक्ष दिसणारी वस्तु दाखविली पाहिजे, असें झालें. 'ही'

हें दर्शक सर्वनाम गायीला देशकालविशिष्ट करितें व गोजातींतील इतर समानजातीय गायीपासून निराळी करिते. 'गाय' हा शब्द इतर जातींपासून, असमानजातींपासून गायीला विभक्त करितो. असें केलें म्हणजे 'ही गाय' ह्या पदार्थाचें निर्वचन झालें. ज्याचें निर्वचन झालें नाहीं, तो पदार्थ अनिरुक्त होय ना ?

सिद्धान्ती—होय. निरुक्त व अनिरुक्त हीं अनुक्रमें मूर्त व अमूर्त, यांचींच विशेषणें होत. निरुक्त, मूर्त व अनिरुक्त, अमूर्त, इत्यादि प्रयोग आपण करितों. असो; ज्याप्रमाणें सत् हें प्रत्यक्ष व त्यत् हें परोक्ष असतात, त्याचप्रमाणें 'निलयन' व अनिलयन यांची ही व्यवस्था आहे.

शिष्य—ठीकच आहे. निलयन म्हणजे नीड किंवा आश्रयाचें स्थान. हा मूर्ताचा धर्म असावयाचा व तद्विपरीत 'अनिलयन' हा अमूर्ताचा असावयाचा.

सिद्धान्ती—त्यत्-अनिरुक्त-अनिलयन हे अमूर्ताचे धर्म आहेत, तथापि, यांचे सर्व विषय (अनिरुक्त पदार्थ) व्याकृत असतात.

पूर्व०—हें काय ! अनिरुक्तादि विशेषणें सूचवितात कीं, हे पदार्थ अव्याकृत असले पाहिजेत.

सिद्धांती—नाहीं. कारण 'सृष्ट्युत्पत्तीनंतर यांचें अस्तित्व विशेषत्वानें प्रकट होतें' अशी श्रुति आहे. सृष्टि झाली, तेव्हांच सर्वांचें व्याकरण झालें. पहा कीं, प्राणादि परोक्ष वस्तु अनिरुक्त व अनिलयन असतात. त्याचे देशकाल ठरलेले नसून त्यांचीं आश्रयस्थानेंही अज्ञात असतात. तसेंच त्यांचें सजातीय व विजातीय विभजनही झालेलें नसतें. तथापि 'प्राण' ही वस्तू व्याकृत असते. म्हणून अमूर्तांचीं सर्व विशेषणें व्याकृत विषयात्मकच असतात. तात्पर्य, हें व्याकृताचें प्रकरण आहे.

शिष्य—ब्रह्म-विज्ञान व अविज्ञान झालें म्हणजे ?

सिद्धान्ती—विज्ञान म्हणजे जीवादि चेतन वस्तू व अविज्ञान म्हणजे पाषाणादि जड वस्तू होत.

पूर्व०—बरें ! आतां 'ब्रह्म सत्य झालें व असत्य ही झालें' असें श्रुति म्हणत आहे. यावरून श्रुतीलाही 'ब्रह्म असत्य होतें' हें तत्त्व मान्य आहे !

सिद्धान्ती—नाहीं. येथें 'सत्य' म्हणजे व्यावहारिक सत्य होय. कारण वरील सर्व प्रकरणच व्यवहारांतील आहे. परमार्थ सत्य म्हणजे ब्रह्म होय. हें एकच आहे. परमार्थतः ब्रह्मांत अनेकत्व नाहीं व ब्रह्माव्यतिरिक्त दुसरी केवल सत्य वस्तु नाहींही.

शिष्य—म्हणजे हें व्यावहारिक अथवा आपेक्षिक सत्य होय. कारण, याच्याच जोडीला 'असत्य' ही आहे.

सिद्धान्ती—तात्पर्य, 'मृगजल', 'शुक्तिरजत' इत्यादि आभास मनांत आणिले असतां उदकाला किंवा शुक्तीला 'सत्यत्व' असतें, तें हें सत्य होय. पण उदकशु-

क्किकादि हीं परमार्थसत्यें नव्हत. या व्यावहारिक सत्यांहून विपरीत, तें अनृत, व्यवहारांतील असत्य होय. असो; मूर्तामूर्तादि सत्यानृतापर्यंतच्या सर्व वस्तू ब्रह्म (म्हणजे परमार्थसत्य हें) झालें. ब्रह्म म्हणजे 'सत्य, ज्ञान, अनंत' हें लक्षण पूर्वीच दिलें आहे. परमार्थसत्य अशा ब्रह्माची येथें उपलब्धि कशी होते, हें विशेषतः सांगावयाचें आहे.

यस्मात्सत्त्यदादिकं मूर्तामूर्तधर्मजातं यत्किंचेदं सर्वमविशिष्टं विकारजातमेकमेव सच्छब्दवाच्यं ब्रह्माभवत्तद्व्यतिरेकेणाभावान्नामरूपविकारस्य, तस्मात्तद्ब्रह्म सत्यमित्याचक्षते । ब्रह्मविदोऽस्ति नास्तीत्यनुप्रश्नः प्रकृतस्तस्य प्रतिवचनविषय एतदुक्तमात्माऽकामयत बहु स्यामिति । स यथा कामं चाऽऽकाशादिकार्यं सत्त्यदादिलक्षणं सृष्ट्वा तदनु प्रविश्य पश्यञ्छृण्वन्मन्वानो विजानन्ब्रह्मभवत्तस्मात्तदेवेदमाकाशादिकारणं कार्यस्थं परमे व्योमन्हृदयगुहायां निहितं तत्प्रत्ययावभासविशेषेणोपलभ्यमानमस्तीत्येवं विजानीयादित्युक्तं भवति । तदेतस्मिन्नर्थे ब्राह्मणोक्त एष श्लोको मन्त्रो भवति । यथा पूर्वेष्वन्नमयाद्यात्मप्रकाशकाः पञ्चस्वप्येवं सर्वान्तरतमात्मास्तित्वप्रकाशकोऽपि मन्त्रः कार्यद्वारेण भवति ।

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यगोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यश्रीमच्छंकरभगवतः कृतौ तैत्तिरीयोपनिषदि द्वितीयब्रह्मवल्ल्यध्यायभाष्ये षष्ठोऽनुवाकः ॥ ६ ॥

पूर्व०—पण तुमचें परमार्थ सत्य जें परब्रह्म तेंच सर्वकारण आहे, असें युक्तीनें सिद्ध करा पाहूं.

सिद्धान्ती—ज्यापक्षीं सत्, त्यत् आदि सर्व मूर्तामूर्त-धर्मक वस्तू; सारांश, सर्व यच्चावत् वस्तू, ह्या विकारजात (कार्यरूप) आहेत, यांत कोठें ही अपवाद नाहीं, त्यापक्षीं त्या त्या कार्यास कारण असलें पाहिजे. अर्थात् शोधान्तीं सर्व कार्यांचें एकच कारण असून तें ब्रह्म आहे, असें श्रुतीवरून कळतें. पुनः, सर्वच जर विकारजात आहे, तर निर्विकार अशी एक वस्तु असलीच पाहिजे. शिवाय, ब्रह्माव्यतिरिक्त नामरूपात्मक विकार असणें शक्य नाहीं. ब्रह्म नसेल तर त्या वस्तू नसतात; ब्रह्म असेल तर असतात; पण नामरूपाव्यतिरिक्त ब्रह्म असतें; इत्यादि सर्वसिद्ध गोष्टींवरून ब्रह्म हें नामरूपांचें कारण आहे; म्हणून, व नामरूपादि नाहींशीं होतात, ब्रह्म केव्हांही नाहींसें होत नाहीं, म्हणून, ब्रह्म हींच काय ती परमार्थतः **सत्य वस्तु आहे**, असें ठरतें. हें सर्व ब्रह्मवेत्त्यांनींच सिद्ध करून ठेविलें आहे.

शिष्य—याप्रमाणें 'ब्रह्म आहे कीं नाहीं?' असा जो प्रश्न उत्पन्न झाला होता, तो प्रस्तुतच होता व त्याचें हें उत्तर झालें. होयना?

सिद्धान्ती—होय, या प्रश्नाचें उत्तर देण्यासाठींच 'आत्म्यानें इच्छा केली कीं, मी पुष्कळ होईन' या वाक्याचा अवतार आहे. इच्छानुरूप मूर्तामूर्तादि लक्षणात्मक आकाशादि कार्यें उत्पन्न करून व त्यांतच प्रवेश करून, द्रष्टा, श्रोता, मंता, विज्ञाता इत्यादि विशेषरूपें धारण करित होत्साता, आत्मा पुष्कळ झाला. म्हणून, तें हें—आकाशादिकांचें कारण असून कार्यांमध्यें राहणारें—ब्रह्म जीवांच्या हृदयनामक गुहेंत—आत्मरूपानें—राहतें व अंतःकरणांच्या प्रत्ययांस प्रकाशित करून त्या प्रत्ययस्वरूपानें प्रकट होतें. अर्थात् या प्रकटीभवनाच्या चिन्हांवरून 'तें आहे व तें ब्रह्म व हा आत्मा एकच आहेत' असें विज्ञान होतें; अथवा हें विज्ञान करून घ्यावें. अर्थात् 'मी पाहतों' इत्यादि रूपांनीं प्रकट होणारें आत्मरूप जरी ज्ञेय असतें, तथापि 'पाहणें' हें रूप मात्र ज्ञेय आहे, वास्तविक असणारें केवल आत्मरूप ज्ञेय नसतें. विशेषावरून सामान्य ओळखून घ्यावयाचें असतें.

शिष्य—सर्व कारणब्रह्म जीवांच्या अंतर्यामी आत्मरूपानें राहतें व कर्ता, भोक्ता, या देहातिरिक्त जीवरूपानें प्रकट होतें. यावरून 'तें ब्रह्म आहे' असें त्याच्या अस्तित्वाचें व त्याच्या स्वरूपाचें ज्ञान करून घ्यावें, हा श्रुतीचा उपदेश आहे. ब्रह्म हेंच काय तें एक सत्य होय.

सिद्धान्ती—हाच सांगितलेला अर्थ विशद करणारा पुढील श्लोक आहे. अन्नमयादि पूर्वोक्त श्लोकपंचकांत जसें अन्नमयादि विशेष आत्म्यांचें स्पष्टीकरण झालें, तसेंच सर्वांतर्यामी सर्वश्रेष्ठ आत्म्याचें अस्तित्व प्रकाशन करणारा हा श्लोक आहे. हेही प्रकाशन कार्यद्वारानें होणार, हें उघड आहे. कारण, सर्व-कारण ब्रह्म वाणीनें प्रकट होणें शक्य नाहीं; व मनानें चिंतित होणेंही शक्य नाहीं.

सहावा अनुवाक समाप्त.

ब्रह्मवल्ल्यध्याये सप्तमोऽनुवाकः।

असद्वा इदमग्र आसीत्। ततो वै सदजायत। तदात्मानꣳ स्वयमकुरुत। तस्मात्तत्सुकृतमुच्यत इति।

यद्वै तत्सुकृतम्। रसो वै सः। रसꣳ ह्येवायं लब्ध्वाऽऽनन्दी भवति। का ह्येवान्यात्कः प्राण्यात्। यदेष आकाश आनन्दो न स्यात्। एष ह्येवाऽऽनन्दयाति।

यदा ह्येवैष एतस्मिन्नदृश्येऽनात्म्येऽनिरुक्तेऽनिलयनेऽभयं प्रतिष्ठां विन्दते। अथ सोऽभयं गतो भवति। यदा ह्येवैष एतस्मिन्नुदरमन्तरं कुरुते। अथ तस्य भयं भवति। तत्त्वेव भयं विदुषोऽमन्वानस्य। तदप्येष श्लोको भवति।

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि द्वितीये ब्रह्मवल्ल्यध्याये सप्तमोऽनुवाकः ॥ ७ ॥

अन्वय व अर्थः—**इदं अग्रे वै असत् आसीत्** (हें सर्व–दृश्य–पूर्वी–असत् होतें) **ततः वै सत् अजायत** (त्या असतापासून सताची उत्पत्ति झाली) **तत् आत्मानं स्वयं अकुरुत** (त्या असतानें आपणा स्वतःला आपण स्वतः सत् केलें) **तस्मात् तं सुकृतं उच्यते** (म्हणून त्याला सुकृत अथवा स्वकृत असें म्हणतात) **इति** (असा हा श्लोक आहे)

यत् वै तत् सुकृतं (जें कांहीं आहे, तें स्वकृत आहे) **सः रसः वै** (तो रसरूप आहे) **रसम् एव लब्ध्वा हि अयम् आनन्दी भवति** (हा रस प्राप्त होतो, म्हणून तर जीव आनंदी होतो) **यत् एषः आकाशः आनंदः न स्यात्, कः हि एव अन्यात् कः हि एव प्राण्यात्** (जर हें आकाश आनंदरूप नसतें, तर प्राणापानादि चेष्टा कोणास करिता आल्या असत्या ?) **एषः हि एव आनन्दयाति** (हा परमात्मा सर्वांस आनंद देतो)

हि एषः एव यदा एतस्मिन् अदृश्ये, अनात्म्ये अनिरुक्ते, अनिलयने अभयं प्रतिष्ठां विन्दते, अथ सः अभयं गतः भवति (हें प्रसिद्ध आहे कीं, जेव्हां हा–मुमुक्षु ह्या अदृश्य, अनात्म्य, अनिरुक्त, अनिलयन ब्रह्माच्या स्वरूपांत मात्र भीतिशून्य असा आश्रय मिळवितो, तेव्हां त्याला मात्र निर्भयस्थिति प्राप्त होते)–पण–**यदा हि एषः**

एव एतस्मिन् उदरं अन्तरं कुरुते अथ तस्य भयं भवति (जेव्हां का कोणी ब्रह्माच्या ठिकाणीं कांहीं भेदभाव आहे, अशी कल्पना करितो, तेव्हां त्याला भयाची प्राप्ति होते) **अमन्वानस्य विदुषः तत् तु भयं एव** (हें मान्य न करणाऱ्याला विद्वानाला ब्रह्म हें भीतिजनकच असते) **तत् अपि एषः श्लोकः भवति** (ह्याच अर्थाचा समर्थक हा पुढील श्लोक आहे.

असद्वा इदमग्र आसीत्। असदिति व्याकृतनामरूपविशेषविपरीतरूपमविकृतं ब्रह्मोच्यते। न पुनरत्यन्तमेवासत्। न ह्यसतः सज्जन्मास्ति। इदमिति नामरूपविशेषवद्व्याकृतं जगदग्रे पूर्वं प्रागुत्पत्तेर्ब्रह्मैवासच्छब्दवाच्यमासीत्। ततोऽसतो वै सत्प्रविभक्तनामरूपविशेषमजायतोत्पन्नम्। किं ततः प्रविभक्तं कार्यमिति पितुरिव पुत्रो नेत्याह। तदसच्छब्दवाच्यं स्वयमेवाऽऽत्मानमेवाकुरुत कृतवत्। यस्मादेवं तस्मात्तद्ब्रह्मैव सुकृतं स्वयं कर्तृच्यते। स्वयं कर्तृ ब्रह्मेति प्रसिद्धं लोके सर्वकारणत्वात्। यस्माद्वा स्वयमकरोत्सर्वं सर्वात्मना तस्मात्पुण्यरूपेणापि तदेव ब्रह्म कारणं सुकृतमुच्यते। सर्वथाऽपि तु फलसंबन्धादिकारणं सुकृतशब्दवाच्यं प्रसिद्धं लोके। यदि पुण्यं यदि वाऽन्यत्सा प्रसिद्धिर्नित्ये चेतनवत्कारणे सत्युपपद्यते तस्मादस्ति तद्ब्रह्म सुकृतप्रसिद्धेः।

सिद्धान्ती—ही गोष्ट श्रुतिप्रसिद्ध आहे कीं, हें सर्व दृश्य विश्व प्रथमतः असत होतें.

शिष्य—असत् म्हणजे ?

सिद्धान्ती—अविकृत. नामरूपात्मक विशेष जेथें व्याकृत, उद्भूत, प्रकट झालेले नसतात, तें अव्याकृत म्हणजे असत् होय.

पूर्व०—असत् म्हणजे कोणत्याही प्रकारचें अस्तित्व नसलेलें, हा अर्थ आहे.

सिद्धांती—आहे. पण तो अर्थ येथें इष्ट नाहीं. तुमच्या असतापासून कधीं तरी सताची उत्पत्ति झाली आहे काय ? शून्यापासून उत्पत्ति होणार कशी ? तात्पर्य असत् म्हणजे अव्याकृत होय. असो; नामरूपात्मक विशेषांनीं व्याकृत झालेलें हें विश्व सृष्टीच्या अगोदर असत्-शब्दानें अव्याकृत, नामरूपास अंतर्भूत करणारें अव्याकृत ब्रह्म, असा अर्थ ध्यावयाचा. प्रलय झाला म्हणजे आदिकारण जें ब्रह्म

त्यांत सर्व पदार्थ कारणरूपानें लीन होतात, असा श्रुतिसिद्धांत आहे. असो, या असतापासून, ब्रह्मापासून, हें नामरूपांनीं विभक्त झालेलें—भिन्न नामरूपी पदार्थांचा संग्रह करणारें विश्व (सत्) उत्पन्न झालें. तात्पर्य, सृष्टीपूर्वी असत् हेंच ब्रह्माचें नाम होतें. त्यानें स्वतः स्वतःमधून ही सृष्टि उत्पन्न केली.

पूर्व०—म्हणजे हें कार्यरूपी जगत् ब्रह्मापासून वेगळें झालें. पिता जसा पुत्राला उत्पन्न करितो; व पिता आणि पुत्र ह्या दोन निरनिराळ्या व्यक्ती होतात, त्याप्रमाणें ब्रह्म आणि जगत् हे दोन भिन्न पदार्थ उत्पत्ती-नंतर झाले.

सिद्धान्ती—नाही, नाहीं. हें असत्-शब्दानें ओळखिलें जाणारें ब्रह्म आपण स्वतःच जगद्रूपानें परिणाम झालेंसें दिसूं लागलें. म्हणजे कर्ताही ब्रह्म आणि कार्य ही ब्रह्मच. म्हणूनच ब्रह्माला सुकृत म्हणजे स्वयंकर्तृ (स्वयमेव कर्ता) असें म्हणतात. शिवाय, सर्वकारण जें ब्रह्म तें स्वयंकर्ता आहे, हें व्यवहारांतही प्रसिद्ध आहे.

शिष्य—सुकृत म्हणजे सत्कार्य पुण्य असा अर्थ आहे.

सिद्धान्ती—तरीही तात्पर्य तेंच. ज्यापक्षीं सर्वात्मना आपणच स्वतः ब्रह्म हें सर्व दृश्य विश्व उत्पन्न करितें झालें, त्यापक्षीं पुण्यरूप जें सर्वकारण-ब्रह्म त्याला 'सुकृत' म्हणणें हें कांहीं बावगें नाहीं. कारण फलसंबंध इत्यादिकांचें सर्वथा कारण असणाऱ्यालाच 'सुकृत' (पुण्य, ब्रह्म) या उपपदांनीं व्यवहारांत संबोधितात. पुण्य असो किंवा दुसरें कांहीं असो, त्याची असली प्रसिद्धि **चेतन कारण असेल** तरच योग्य होईल. तात्पर्य, ब्रह्म हें स्वयंकर्तृ आहे किंवा पुण्यात्मक आहे, अशी त्याची प्रख्याति आहे, यावरूनच हें सिद्ध होतें कीं, **तें आहे व तें ज्ञानरूप आहे.**

यद्वै तत्सुकृतम् । रसो वै सः । रसो नाम तृप्तिहेतुरानन्दकरो मधुराम्लादिः प्रसिद्धो लोके । रसमेवायं लब्ध्वा प्राप्याऽऽनन्दी सुखी भवति । नासत आनन्दहेतुत्वं दृष्टं लोके । बाह्यानन्दसाधनरहिता अप्यनीहा निरेषणा ब्राह्मणा बाह्यरसलाभादिव सानन्दा दृश्यन्ते विद्वांसो नूनं ब्रह्मैव रसस्तेषाम् । तस्मादस्ति तत्तेषामानन्दकारणं रसवद्ब्रह्म । इतश्चास्ति कुतः । प्राणनादिक्रियादर्शनात् । अयमपि हि पिण्डो जीवतः प्राणेन प्राणित्यपानेनापानिति । एवं वायवीया ऐन्द्रियकाश्च चेष्टाः संहतैः कार्यकरणैर्निर्वर्त्यमाना दृश्यन्ते । तच्चैकार्थवृत्तित्वेन संहननं, नान्तरेण चेतनमसंहतं संभवति । अन्यदर्शनाभा । तदाह—यद्यदि एष आकाशे परमे व्योम्नि गुहायां

निहित आनन्दो न स्यान्न भवेत्को ह्येव लोकेऽन्याद्यात्प्राण्याच्चेष्टां कुर्यादित्यर्थः। कः प्राण्यात्प्राणनं वा कुर्यात्तस्मादस्ति तद्ब्रह्म। यदर्थाः कार्यकरणप्राणनादिचेष्टास्तत्कृत एव चाऽऽनन्दो लोकस्य। कुतः। एष ह्येव परः आत्माऽऽनन्दयात्यानन्दयति सुखयति लोकं धर्मानुरूपम्। स एवाऽऽत्माऽऽनन्दरूपोऽविद्यया पाप्मच्छन्नो विभाव्यते प्राणिभिरित्यर्थः। भयाभयहेतुत्वाद्द्विद्वदविदुषोरस्ति तद्ब्रह्म। सद्वस्त्वाश्रयणेन ह्यभयं भवति। नासद्वस्त्वाश्रयणेन भयनिवृत्तिरुपपद्यते।

सिद्धान्ती—ब्रह्माचें अस्तित्व सिद्ध करणारें दुसरें एक कारण, हेतु आहे. 'तें कोणतें' असें विचाराल तर ऐकाः तें ब्रह्म रसरूप आहे.

पूर्व०—'ब्रह्म रसरूप आहे' अशी वस्तु सिद्ध तर प्रथम करा.

सिद्धान्ती—ऐकाः येथें जें जें कांहीं आहे, तें सर्व सुकृत (ब्रह्मकृत, पुण्यरूप) आहे. म्हणून ब्रह्म किंवा परमात्मा 'रस' आहे. रस म्हणजे तृप्तीचा हेतु. ज्यामुळें तृप्ति होतें, आनंद होतो, तो रस होय. व्यवहारांतही मधुर, आंबट इत्यादि षड्रस प्रसिद्ध आहेत.

शिष्य—काव्यांतही नवरसांची प्रसिद्धि आहे. दहावा शांतरस तो निराळाच!

सिद्धान्ती—पण त्यांचा येथें विशेष संबंध नाहीं. रस आनंदजनक आहे; आणि जीवाला रसप्राप्ति झाली तरच तो आनंदी (सुखी) होतो. जीवाला सुख होतें, हें आपण पाहतों. म्हणून **रस आहे, ब्रह्म रसरूप आहे**, म्हणून **ब्रह्म आहे**, व तें रस आहे; म्हणून आनंदरूप आहे. शिवाय, ब्रह्म जर असत् म्हणजे शून्यरूप असतें, तर आनंदाचा हेतु जो रसरूप परमात्मा, तोच नाहींसा झाल्यामुळें विश्रांत आनंदाचें ठाणेंच दिसलें नसतें. पण आनंद दिसतो, या वरून त्याचें कारण ब्रह्म हें असलेंच पाहिजे. आणखी; ज्या ब्रह्मनिष्ठ म्हणजे निरिच्छ आणि आशाशून्य ब्रह्मज्ञांस विषयानंदाचें कोणतेंही अंतर्बाह्य साधन नसतांही ते आनंदी दिसतात व असतात, बाह्य-रसांच्या प्राप्तीनें जसा सांसारिकांस आनंद होतो, तसे ते आनंदी दिसतात, त्याबरून त्यास आनंद देणारा कोणता तरी अंतर्निष्ठ पदार्थ खरोखर असलाच पाहिजे. हा पदार्थ, रस, म्हणजेच ब्रह्म होय. तात्पर्य, ब्रह्मनिष्ठांचें आनंदकारण जें ब्रह्म तें सद्रूप, अस्तित्वरूप, असलेंच पाहिजे. ब्रह्माच्या अस्तित्वसिद्धीचें आणखी एक प्रमाण आहे. पहाः सर्व जिवंत असणारे प्राणीपिंड प्राण-अपान-आदि क्रिया करितात, श्वासोच्छ्वासादि क्रिया करितात, तशाच ज्ञानकर्मेंद्रियांनींही क्रिया करितात; हें तुम्ही आम्ही पाहतों. आतां, या सर्व प्राणक्रिया व इंद्रियक्रिया अनेक कार्यकरणाच्या करणांच्या (इंद्रियावयवांच्या) संघातानें होत असतात, हें प्रसिद्ध आहे. तेव्हां तुम्हीच पहा कीं, हीं सर्व अचेतन करणें जीवसंरक्षणात्मक एकच कार्य करण्या-

मध्यें, एकच अर्थ संपादण्यामध्यें, समर्पित होतात, त्याचें कारण, त्या सर्वांचा संघात त्यांहून अलिप्त असणाऱ्या चेतन-वस्तूनें केलेला असतो, हें होय. चेतन वस्तु जर प्रेरक किंवा प्रयोजक नसती, तर या सर्वांचा एकार्थसंपादक संघात होताच ना.

शिष्य—ज्ञानी प्रेरक नसेल, तर अचेतन वस्तू मिळून एक ठराविक कार्य नियमानें संपादितात, असा अनुभवच नाहीं.

सिद्धांती—हेंच विशद करण्यासाठीं श्रुति म्हणते: हृदयामध्यें जें श्रेष्ठ 'महदाकाश' आहे, जी गुहा आहे, तेथें जर आनंदरूपी ब्रह्माचें (आत्म्याचें) वास्तव्य नसतें, तर या जगतांत कोणाला तरी श्वास घेण्याची किंवा उच्छ्वास टाकण्याची प्रेरणा झाली असती काय? पण प्राणापानादि क्रिया जिवंत प्राणी करितात, यावरून प्राणापानादि प्रेरक ब्रह्म आहे, असें सिद्ध होतें. ज्याच्या प्रेरणेनें व ज्याच्यासाठीं इंद्रियावयवांच्या व प्राणापानादि-वायूंच्या चेष्टा चालतात, तें या विश्वांतील लोकांस आनंद देणारें कारण आहे. कारण, श्रुति सांगत आहे कीं, हा परमात्माच काय तो विश्वांतील प्राण्यांस त्यांच्या त्यांच्या पुण्यानुसार सुखी करीत असतो. हाच आनंदरूप आत्मा होय.

पूर्वः—मग तो सर्वांस दिसत कां नाहीं स्वस्वरूपानें?

सिद्धान्ती—अनुभवांस येत नाहीं कसा? आनंदरूपाच्या प्राप्तीसाठीं ज्ञान संपादण्याच्या व कर्म करण्याच्या रूपानें व अल्पानंदानें प्रकट होतोच. तथापि तो स्वरूपानें पूर्णप्रकटच नाहीं; कारण आपला आत्मा आपणा जीवांच्या अज्ञानानें परिच्छिन्न झालेला असतो. आपला आनंद अल्प असतो, कारण आपण संसारमूढ असतों. तथापि, याही स्थितींत आपण अल्पानंदाचा उपभोग घेतोंच. अर्थात् अज्ञानतिमिर उच्छिन्न झालें म्हणजे आपल्यासच पूर्ण आनंदरूप प्रकट होईल. अथवा आपणच आनंदरूप होऊं. ब्रह्मास्तित्वाचें आणखी एक प्रमाण आहे. पहाः विद्वानाला भय कारण नसतें, संसाऱ्याला असतें. ब्रह्म हेंच भयाभयाचें कारण आहे. सद्वस्तूचा-ब्रह्मवस्तूचा-आश्रय केला तर भय नामशेष होतें. पण निर्भयत्व देणारें ब्रह्म नसतें, तर नसणाऱ्या वस्तूचा आश्रय करून भयनिवृत्ति कशी झाली असती? भयनिवृत्ति तर होते. यावरून ब्रह्म आहे, हें सिद्ध आहे.

पूर्वः—ब्रह्म अभय हेतु कशावरून?

सिद्धांती—ऐका.

यदा ह्येव यस्मादेष साधक एतस्मिन्ब्रह्मणि किंविशिष्टेऽदृश्ये अदृश्यं नाम द्रष्टव्यं विकारो दर्शनार्थत्वाद्विकारस्य। न दृश्यमदृश्यमविकार इत्यर्थः। एतस्मिन्नदृश्येऽविकारेऽविषयभूतेऽनात्म्येऽशरीरे यस्मादभयं तस्मादनात्म्यं यस्मादनात्म्यं तस्मादनिरुक्तम्। विशेषो

हि निरुच्यते । विशेषश्च विकारः । अविकारं च ब्रह्म । सर्वविकार-हेतुत्वात्तस्मादनिरुक्तम् । यत एवं तस्मादनिलयनं निलयनं नीड आश्रयो न निलयनमनिलयनमनाधारं तस्मिन्नेतस्मिन्नदृश्येऽनात्म्येऽनिरुक्तेऽनिलयने सर्वकार्यधर्मविलक्षणे ब्रह्मणीति वाक्यार्थः । अभयमिति क्रियाविशेषणम् । अभयमिति वा लिङ्गान्तरं परिणम्यते । प्रतिष्ठां स्थितिमात्मभावं विन्दते लभते । अथ तदा स तस्मिन्नानात्वस्य भयहेतोरविद्याकृतस्यादर्शनादभयं भवति नाऽऽत्मन एवाऽऽत्मनो भयं युक्तं तस्मादात्मैवाऽऽत्मनोऽभयकारणम् । सर्वतो हि निर्भया ब्राह्मणा दृश्यन्ते सत्सु भयहेतुषु तच्चायुक्तमसति भयत्राणे ब्रह्मणि । तस्मात्तेषामभयदर्शनादस्ति तदभयकारणं ब्रह्मेति । कदाऽसावभयं गतो भवति साधको यदा नान्यत्पश्यत्यात्मनि चान्तरं भेदं न कुरुते तदाऽभयं गतो भवतीत्यभिप्रायः । यदा पुनरविद्यास्थायां हि यस्मादेषोऽविद्यावानविद्यया प्रत्युपस्थापितं वस्तु तैमिरिकद्वितीयचन्द्रवत्पश्यत्यात्मनि चैतस्मिन्ब्रह्मणि उदपि,अरमल्पमप्यन्तरं छिद्रं भेददर्शनं कुरुते । भेददर्शनमेव ह्यन्तरकरणमल्पमपि भेदं पश्यतीत्यर्थः । अथ तस्माद्भेददर्शनाद्भेतोरस्य भेददर्शिन आत्मनो भयं भवति । तस्मादात्मैवाऽऽत्मनो भयकारणमविदुषस्तदेतदाह । तद्ब्रह्म त्वेव भयं भेददर्शिनो विदुष ईश्वरोऽन्यो मत्तोऽहमन्यः संसारीत्येवं विदुषो भेददृष्टमीश्वराख्यं तदेव ब्रह्माल्पमप्यन्तरं कुर्वतो भयं भवत्येकत्वेनामन्वानस्य । तस्माद्विद्वानप्यविद्वानेवासौ योऽयमेकमभिन्नमात्मतत्त्वं न पश्यत्युच्छेदहेतुदर्शनाद्धयुच्छेद्याभिमतस्य भयं भवति । अनुच्छेद्यो ह्युच्छेदहेतुस्तत्रासत्युच्छेदहेतावुच्छेद्ये न तद्दर्शनकार्यं भयं युक्तम् । सर्वं च जगद्भयवद्दृश्यते । तस्माज्जगतो भयदर्शनाद्भम्यते नूनं तदस्ति भयकारणमुच्छेदहेतुरनुच्छेद्यात्मकं यतो जगद्बिभेतीति । तदेतस्मिन्नप्यर्थ एष श्लोको भवति ।

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यगोविन्दभगत्वपूज्यपादशिष्यश्रीमच्छंकरभगवतः कृतौ तैत्तिरीयोपनिषदि द्वितीये ब्रह्मवल्ल्यध्यायभाष्ये सप्तमोऽनुवाकः ॥ ७ ॥

सिद्धांती—जेव्हां कोणी मुमुक्षु साधक ब्रह्माचा आश्रय घेतो, तेव्हां तो भयशून्य होतो, त्याची भीति नाहींशी होते, असा अनुभव आहे; म्हणून ब्रह्म अभयहेतुक आहे.

शिष्य—भगवन्! ब्रह्माचें स्वरूप कसें?

सिद्धान्ती—हें स्वरूप सांगणें अशक्य आहे; तथापि निषेधात्मक-शब्दांनीं 'तें नाहीं' 'हें नाहीं' या शब्दांनीं,श्रुति ब्रह्मस्वरूप सांगत आहे.तें अदृश्य आहे, दृश्य नाहीं. दृश्य म्हणजे पाहण्यास योग्य. अर्थात् दृश्यता हा विकार आहे. दिसण्याचा जो विषय, तोहीं इंद्रियार्थसंन्निकर्षामुळें विकारच असावयाचा, मनोवृत्तिरूप असावयाचा. पण ब्रह्म मात्र अदृश्य म्हणजे निर्विकार, अविषय होय. अनात्म्य म्हणजे अशरीर. ब्रह्म दृश्यच नाहीं, तेव्हां त्याला शरीर नसणें, हें स्वभाविकच आहे. तें अशरीर ब्रह्म अनिरुक्त असतें. शरीरादि विशेष विकारच त्याला नाहींत. विशेष सांगतां येतात. ब्रह्म निर्विशेष आहे; व सर्व विकारांचें अधिष्ठान आहे; म्हणून तें अनिरुक्त आहे. तें सर्वाधिष्ठान आहे; म्हणून तें स्वतः अनिलय म्हणजे निरधिष्ठान (निराधार किंवा स्वाधार) आहे. याप्रमाणें अविकार, अशरीर, अनिर्वचनीय आणि निराधार—

शिष्य:—तात्पर्य, कार्याचा कोणताही धर्म नसणारें तें कार्य-विलक्षण ब्रह्म होय.

सिद्धांती—एवं लक्षणात्मक ब्रह्माचा जो निर्भय-चित्तानें आश्रय घेतो—

शिष्य—'अभयं' हें क्रियाविशेषण आहे काय? असेल तर असो; किंवा 'अभयं' आर्षप्रयोगाला 'अभया' असें संस्कृत केलें तर जो ब्रह्माचा निर्भय आश्रय घतो, असा अर्थ होईल. तात्पर्य एकच आहे.

सिद्धान्ती-'मीच स्वरूपतः ब्रह्म आहें' अशी दृढभावना करून तिचें एकाग्र निदिध्यासन केलेंच तरच साधकाला ब्रह्मात्मैक्य-स्थिति प्राप्त होऊन तो भीतिशून्य होणार बरें! असो; ब्रह्मात्मैक्य आहे अशा भावनेचा आश्रय करणाऱ्या साधक मुमुक्षूला भयाचें कारणच उरत नाहीं.

शिष्य—भगवन्! भय असतें भेदाच्या भावनेंत. अनेकत्व आहे, असें वाटूं लागलें कीं, भीतीचा पगडा बसतो.

सिद्धान्ती—आणि हें अनेकत्व अविद्या उत्पन्न करिते. पण 'मी ब्रह्म आहें' असा ज्याचा निश्चय होतो, त्याची भय-निवृत्ति होते, त्याला अनेकत्व दिसत भासत नाहीं. अर्थात् त्याचें भय संपून तो निर्भय होतो.

शिष्य—म्हणजे तो स्वरूपाचे ठिकाणीं प्रतिष्ठित होतो.

सिद्धान्ती—शाबास! मग त्याला दुसरें कांहीं दिसत नाहीं, ऐकायला येत नाहीं, किंवा दुसऱ्या वस्तूचें विज्ञानही त्याला होत नाहीं. तात्पर्य, अन्यच नाहीं, तर भीति कोठील? शुद्धीवर असतांना व कोणतेही पापकर्म केलें नसतांना आपण तर आपल्यालाच कधीं भीत नाहीं. एवंच, आत्मा हाच अभयकारक असून तो आत्मज्ञाला [illegible]

शिष्य—खरें भगवन्! आम्हा सांसारिकांस मात्र भय उत्पन्न करणाऱ्या ह्या भयंकर गोष्टींच्या राशींत वसून व संचार करून स्वस्थ व समाधानी चित्तानें आत्मचिंतन करणारे ब्रह्मनिष्ठ केव्हां केव्हां दिसतात. काय त्यांच्या मनाची रमणीय स्वस्थता असते?

सिद्धान्ती—अर्थात्, ज्या ब्रह्माच्या चिंतनानें हे ब्रह्मनिष्ठ निर्भय होतात, तें भय निवृत्तीचें कारण ब्रह्म, हें असलेंच पाहिजे तर मग?

शिष्य—तेव्हां असें ठरलें कीं, अन्यदर्शन संपलें, त्याची वार्ता नामशेष झाली, ब्रह्मात्मस्वरूपांत यत्किंचित्ही भेद नाहीं, असा निश्चय झाला; म्हणजे साधकाला साक्षात्कार होऊन निर्भयता प्राप्त होते.

सिद्धान्ती—पण बाबा, जर का प्रपंचांत लुडबुडणाऱ्या संसाऱ्यान आपल्या अविद्येनें निर्माण केलेल्या भिन्न वस्तू पाहिल्या, परमार्थतः एकच चंद्र असतां विकारी डोळ्याला दोन चंद्र दिसतात, तशी परमार्थतः एकच ब्रह्म वस्तु असतां हा संसारी तेथेंच अनेकत्व पाहूं लागला, जीवात्म्यामध्यें व परमात्म्यामध्यें फार मोठा भेद आहे, असें भ्रांतज्ञान जर कां त्याला या ब्रह्मासंबंधें झालें तर त्याला या संसारांत व स्वर्गांत क्षुद्रा भीतीची संतति कशी सतावून सोडते, हें तुम्हा-आम्हांसारख्या संसाऱ्यांस सांगण्याचें कारणच नाहीं. फार काय सांगावें! श्रुति म्हणतेः ब्रह्माचें जें एकरस स्वरूप आहे, त्यांत रतिमात्र भेद आहे, मुंगीच्या अग्राएवढेंच भोंक असून ब्रह्मांत इवलीशी भिन्नता आहे, सारांश, ब्रह्मांत त्यानें अत्यल्प कां होईना, पण भेद पाहिला, तरी क्षुद्रा त्याला भीति उत्पन्न होते! कारण भेद हा भीतीचा जनक आहे. मग तो भेद म्हणजे अनेकत्व तो जीव विश्वांत पाहो किंवा ब्रह्म आणि जीव यांत भेद पाहो, भीतीचा ब्रह्मराक्षस त्याच्या पाठीं लागलाच म्हणून समजावें. तात्पर्य, भेद आला, कीं भीति आली. पण, या भीतीचें आदिकारण कोण? आत्मा. तेव्हां संसाऱ्याला आत्मा हा भीतीचें कारण होतो. हीच गोष्ट श्रुति विशद करिते. ऐकः तें ब्रह्मच भेददर्शी विद्वानालाही—

शिष्य—भेददर्शी विद्वान् म्हणजे?

सिद्धान्ती—'माझ्याहून ईश्वर निराळा, मी संसारी' असा समज असणारा केवढाही पंडित असेना, त्यालाही भय उत्पन्न होतेंच होतें. या विद्वानाचें ब्रह्म म्हणजे त्याच्याहून भिन्न असणारा ईश्वर. हा भेददृष्टिपंडितानें मानलेला व जाणलेला ईश्वरच त्याला भयप्रद होतो. कां? तर 'हा जीवात्मा व परमात्मा हें एकच आहेत' असें तो मानीत नाहीं, म्हणून. एवंच, विद्वान् असूनही तो अविद्वानच होतो. कारण, एकरस आत्मतत्त्वांत तो भेद पाहतो व आत्म्याचें अभिन्नत्व त्याला समजत नाहीं. सारांश, प्रेमस्थान जें ब्रह्म, तें भीतिस्थान होतें! अरेरे!

शिष्य—याला भय तरी कसलें?

सिद्धान्ती—अज्ञानत्वानें पापाचरण नित्य होत असल्यामुळें किंवा परमेश्वरी हेतू न कळल्यामुळें सर्वांचा उच्छेद करणारा, सर्वसंहारक ईश्वर मला अनाथाला दुःखांत

घालील ही त्याला भीति असते. समजलास ? शिवाय हें भीतिकारण, दुःखमय जीवित, टाकावें म्हटलें तर सदैव अमर असणारे जीवाचा, ब्रह्माचा संहारही कोणास करितां येणें शक्य नाहीं. तेव्हां ही दुःखाची भीति जीवाला नित्य राहणारच. तात्पर्य, अविद्वानाची भीति केव्हांही संपत नाहीं. कार्य संपेल. केव्हां, जेव्हां भयकारण आणि भिणारा हे दोन्ही एकरूप होतील तेव्हां. पण ही विद्वानाची गोष्ट।

पूर्व०—पण दुसऱ्या तऱ्हेनें, हा भयकर्ता परमेश्वरच नाहीं, असें म्हटलें तर ?

सिद्धान्ती—विश्वांतील सर्व भयाचें अस्तित्वच नाहींसें होईल. पण सर्व जगतांतील सर्व प्राणी भयग्रस्त आहेत, हें आम्ही पाहतों. त्यावरून असें निर्भ्रान्त अनुमान स्पष्ट काढितां येतें कीं, सर्वसंहारक पण स्वतः अमर व सर्वशक्ति असें जें भयकारण, ब्रह्म, ईश्वर, तें आहे. ईश्वर आहे. आणि त्यालाच ससारी भितात. हाच अर्थ जास्त स्पष्ट करणारा पुढील श्लोक पहाः—

सातवा अनुवाक संपला.

ब्रह्मवल्ल्यध्यायेऽष्टमोऽनुवाकः ।

भीषाऽस्माद्वातः पवते । भीषोदेति सूर्यः । भीषाऽस्मादग्निश्चेन्द्रश्च । मृत्युर्धावति पञ्चम इति । सैषाऽऽनन्दस्य मीमांसा भवति । युवा स्यात्साधुयुवाऽध्यापकः । आशिष्ठो दृढिष्ठो बलिष्ठः । तस्येयं पृथिवी सर्वा वित्तस्य पूर्णा स्यात् । स एको मानुष आनन्दः । ते ये शतं मानुषा आनन्दाः ॥ १ ॥

स एको मनुष्यगन्धर्वाणामानन्दः । श्रोत्रियस्य चाकामहतस्य । ते ये शतं मनुष्यगन्धर्वाणामानन्दाः । स एको देवगन्धर्वाणामानन्दः । श्रोत्रियस्य चाकामहतस्य । ते ये शतं देवगन्धर्वाणामानन्दाः । स एकः पितृणां चिरलोकलोकानामानन्दः । श्रोत्रियस्य चाकामहतस्य । ते ये शतं पितृणां चिरलोकलोकानामानन्दाः । स एक आजानजानां [illegible]नन्दः ॥ २ ॥

श्रोत्रियस्य चाकामहतस्य । ते ये शतमाजानजानां देवानामानन्दाः। स एकः कर्मदेवानां देवानामानन्दः । ये कर्मणा देवानपियन्ति । श्रोत्रियस्य चाकामहतस्य । ते ये शतं कर्मदेवानां देवानामानन्दाः । स एको देवानामानन्दः । श्रोत्रियस्य चाकामहतस्य । ते ये शतं देवानामानन्दाः । स एक इन्द्रस्याऽऽनन्दः ॥ ३ ॥

श्रोत्रियस्य चाकामहतस्य । ते ये शतमिन्द्रस्याऽऽनन्दाः । स एको बृहस्पतेरानन्दः । श्रोत्रियस्य चाकामहतस्य । ते ये शतं बृहस्पतेरानन्दाः । स एकः प्रजापतेरानन्दः । श्रोत्रियस्य चाकामहतस्य । ते ये शतं प्रजापतेरानन्दाः । स एको ब्रह्मण आनन्दः । श्रोत्रियस्य चाकामहतस्य ॥ ४ ॥

अन्वय व अर्थः—अस्मात् भीषा वातः पवते; भीषा सूर्यः उदेति; अस्मात् भीषा अग्निः च इंद्रः च, पंचमः मृत्युः-च-धावति (ह्याच्या भीतीनें वायु वाहतो, सूर्य उगवतो, अग्नि, इंद्र आणि पांचवा मृत्यु, हे सर्व याच्या भीतीनें आपापलीं नेमलेलीं कर्में करितात) सा एषा आनंदस्य मीमांसा भवति (आतां पुढें होणारी, ती ही आनंदाची मीमांसा होय)

युवा, अध्यायकः, आशिष्ठः, दृढिष्ठः, बलिष्ठः साधुयुवा स्यात्, तस्य इयं सर्वा पृथ्वी वित्तस्य पूर्णा स्यात् (तरुण, वेदाधीत, उत्कृष्ट शास्ता, निश्चयी आणि बलवान् साधु तरुण मनुष्य असेल, तर त्याला ही सर्व वित्तपूर्ण पृथ्वी वश होते; किंवा तो ही पृथ्वी वित्तपूर्ण करितो) स मानुषः आनंदः एकः (या मानवी आनंदाला आपण 'एक' ही संज्ञा देऊं) ते ये शतं मनुषाः आनंदाः, सः अकामहतस्य श्रोत्रियस्य एकः मनुष्यगंधर्वाणां आनंदः; ते ये मनुष्यगंधर्वाणां शतं

आनंदाः, सः अकामहतस्य श्रोत्रियस्य एकः देवगंधर्वाणां आनंदः ते ये देवगंधर्वाणां शतं आनंदाः, सः अकामहतस्य श्रोत्रिय च चिरलोकलोकानां पितृणां एकः आनंदः; ते ये चिरलोकानां पितृणां शतं आनंदाः, सः अकामहतस्य श्रोत्रियस्य आजानजानां देवानां एकः आनंदः (मनुष्याचे शंभर आनंद म्हणजे तो निष्काम वैदिकाचा मनुष्यगंधर्वी एक आनंद होय; मानवीगंधर्ववंताचे शंभर आनंद म्हणजे निष्काम वैदिकाचा एक देवगंधर्वी आनंद; देवगंधर्वांचे शंभर आनंद म्हणजे निष्काम वैदिकास प्राप्त होणारा नित्य पितृलोकवासी पितरांचा एक आनंद; असले शंभर आनंद म्हणजे निष्काम वैदिकास मिळणारा देवलोकस्थ देवांचा एक आनंद होय.)

(या पुढील मंत्राचा अन्वय व अर्थ सामान्यतः वरील सारखाच असल्यामुळें दिला नाहीं. सर्व वाचकांस तो सहज समजण्यासारखा आहे)

भीषा भयेनास्माद्वातः पवते । भीषोदेति सूर्यः । भीषाऽस्मादग्निश्चेन्द्रश्च । मृत्युर्धावति पञ्चम इति । वातादयो हि महार्हाः स्वयमीश्वराः सन्तः पवनादिकार्येष्वायासबहुलेषु नियताः प्रवर्तन्ते । तद्युक्तं प्रशास्तरि सत्यन्यस्मिन्नियमेन, तेषां प्रशास्तृ ब्रह्म । यतस्ते भृत्या इव राज्ञोऽस्माद्ब्रह्मणो भयेन प्रवर्तन्ते तच्च भयकारणमानन्दं ब्रह्म ।

सिद्धान्ती—मागच्या अनुवाकांत अविद्वानांनीं मानिलेला स्वामिन परमेश्वर भयहेतु आहे, असें सांगून तत्समर्थक श्लोक या अनुवाकांत दिला आहे. श्लोकाचा अर्थ असाः भेददृष्ट्यांस भयकारी असणाऱ्या या परमेश्वराच्या भयानें वायु वाहतो, सूर्य उगवतो, अग्नि, इंद्र व मृत्यु हे सर्व आपापलीं कामें करितात.

शिष्य०—वायु, सूर्य, अग्नि, इंद्र, मृत्यु हे पांचही ऐश्वर्यवंत आहेत, नव्हे ?

सिद्धान्ती—होय. त्यांची योग्यता मोठी, हे स्वतः भाग्यशाली ऐश्वर्यांचे भोक्ते असे असतांही यांस अनुक्रमें वाहण्याचें (वारा वाहतो व हवा शुद्ध करितो) सूर्यास उगवून व प्रकाशित करून व्यवहार सुलभ करण्याचें, अग्नीस अंतर्बाह्य पाकसिद्धि करून देवांस व जीवांस तृप्त करण्याचें, मृत्यूस नेमून करून धर्मवृद्धीचें व संहार करून जीवांची उत्क्रांति करण्याचें, [illegible] कामें करावीं लागतात. आपण आपलीं कामें नियमानें करितों,

तीं कोणीतरी आपल्यावर सत्ता चालविणारा असतो, त्याच्या भयानें करितों. याच न्यायानें पूर्वोक्त देवही नियमानें आपआपल्या वाट्यास आलेलीं कर्मे करितात. यावरून हें सिद्ध होतें कीं, त्यांस ही भीति उत्पन्न करून त्यांच्याकडून नियमानें कर्मे करून घेणारें (शास्तें) ब्रह्म आहे; व असलेंच पाहिजे. ब्रह्म नसतें व असूनही तें सत्ताधीश व निग्रहानुग्रह समर्थ नसतें, तर हे सामर्थ्यवंत देव राजसेवकांप्रमाणें राबतेना. एवंच या देवांसही निग्रह करणारें ब्रह्म आहे. सारांश, आनंदरूप ब्रह्म भिन्नदृष्टि जीवाला (मग तो मोठा पंडित असो, किंवा स्वर्गांतील ऐश्वर्यवंत देव असो) भय-हेतु आहे, हें ठरतें. पण जो अभेददृष्टि आहे, त्याला हेंच आनंदरूप ब्रह्म आनंदाचें अधिष्ठान होऊन शेवटीं ज्ञानी ब्रह्मज्ञाला आनंदरूप करितें.

तस्यास्य ब्राह्मण आनन्दस्यैषा मीमांसा विचारणा भवति। किमानन्दस्य मीमांस्यमित्युच्यते । किमानन्दो विषयविषयिसंबंन्धजनितो लौकिकानन्दवदाहोस्वित्स्वाभाविक इत्येवमेषाऽऽनन्दस्य मीमांसा ।

शिष्य—भगवन् ! आनंदरूप ब्रह्माच्या आनंदाची कांहीं तरी कल्पना करिता येते काय ?

सिद्धान्ती—अरे, अनंतरूपाची कल्पना कोण करील ? तथापि कांहींतरी अंधुक कल्पना असावी, म्हणून श्रुतिमाता ' ब्रह्मानंदाची ' पुढें चर्चा करीत आहे.

पूर्व०—त्यांत कसली चर्चा करावयाची आहे ? आमच्या आनंदापेक्षां कांहीं पटीनें जास्तें असेल ब्रह्मानंद, इतकेंच !

सिद्धान्ती—असें काय ? ब्रह्मानंदाची जातिही निराळी आहे. आपले जे आनंद असतात, ते विषयाचा व विषयीचा (बाह्य भोग्यवस्तूचा व भोग्याचा) संबंध झाल्यावर उत्पन्न होतात. अशाच जातीचा म्हणजे परतंत्र ब्रह्मानंद आहे ? किंवा स्वाभाविक, सहजसिद्ध, स्वयंभु (स्वतंत्र) आहे ? याचा विचार करणें, हें पुढील मीमांसेचें कार्य आहे. तात्पर्य; ही विचारणा जात्यात्मक व संख्यात्मक आहे. आनंदाची जाति कोणती व त्या आनंदाचें मोजमाप काय, हें आतां सांगावयाचें आहे.

तत्र लौकिक आनन्दो बाह्याध्यात्मिकसाधनसंपत्तिनिमित्त उत्कृष्टः । स य एष निर्दिश्यते ब्रह्मानन्दानुगमार्थम् । अनेन हि प्रसिद्धेनाऽऽनन्देन व्यावृत्तविषयबुद्धिगम्य आनन्दोऽनुगन्तुं शक्यते । लौकिकोऽप्यानन्दो ब्रह्मानन्दस्यैव मात्राऽविद्यया तिरस्क्रियमाणे विज्ञान उत्कृष्यमाणायां चाविद्यायां ब्रह्मादिभिः कर्मवशाद्यथाविज्ञानं विषयादिसाधनसंबन्धवशाच्च विभाव्यमानश्च लोकेऽनवस्थितो लौकिकः संपद्यते स एवाविद्याकामकर्मापकर्षेण मनुष्यगन्धर्वाद्युत्तरो-

त्तरभूमिष्वकामहतविद्वच्छ्रोत्रियप्रत्यक्षो विभाव्यते शतगुणोत्तरोत्कर्षेण यावद्धिरण्यगर्भस्य ब्रह्मण आनन्द इति ।

सिद्धान्ती—आतां, येथें लौकिक (व्यावहारिक, ऐहिक) आनंदाचा जो उल्लेख केला आहे, तो केवळ ब्रह्मानंदाची कल्पना करितां यावी, एतदर्थ आहे. लौकिक आनंद म्हणजे बाह्य विषय आणि अध्यात्मिक विषयी (अंतःकरणादिमान् भोक्ता) या साधनांच्या एकीकरणानें उत्पन्न होणारा आनंद होय. यांतही, सामान्य, चांगला, उत्कृष्ट, असे प्रकार असतातच. तेव्हां उत्कृष्ट लौकिक आनंदाचा निर्देश करून ब्रह्मानंद कोणत्या जातीचा व किती मोठा असतो, हें दाखवावयाचें आहे. अर्थात्, सर्वांच्या प्रतीतीला येणारा व म्हणून प्रसिद्ध असणारा हा लौकिक आनंद दाखविला म्हणजे विषयनिवृत्तीचा आनंद कसा असेल, त्याचा अनुगम करण्यास ठीक पडतें. असो; आनंद लौकिक कां होईना, तो सुद्धां सर्वव्यापी ब्रह्मानंदाचा अंशच असतो. जाति-निराळी, पण संख्यादृष्टीनें तो अंश असतो.

शिष्य—मग हा अंश तरी स्वरूपानें कां नाहीं प्रकट होत ?

सिद्धान्ती—विज्ञानगुहेंत गूढत्वानें राहणारा हा लौकिकी आनंद सुद्धां कसा प्रकट होणार स्वरूपानें ? बाबा ! अविद्या आहे ना ? ही जीवाच्या मूळस्वरूपी विज्ञानालाच धिःकारून टाकिते. अर्थात्, मग अविद्येचा उत्कर्ष होतो व ब्रह्मदेव—प्रमुख सर्व प्राणी कर्मीला आणि व्यावहारिक ज्ञानानुसार विषयादिकांच्या आनंदसाधनसंपत्तीला वश होतात. झालें. या पारतंत्र्य देणाऱ्या यथाज्ञानी कर्मवशत्वानुसार व साधनसंपत्तीच्या धोरणानें जो कांहीं व्यावहारिक व परतंत्री आनंद यथाज्ञान प्रकट होतो, तेवढाच जीवांच्या वांट्याला येतो. परंतु, या आनंदाचें मूळ अधिष्ठान जो आत्मा, त्याचें अज्ञान असल्यामुळें या परतंत्री व विषयजन्य आनंदाला व्यवस्थित स्वरूप प्राप्त होत नाहीं. एवंच, लौकिक आनंद हा जरी ब्रह्मानंदाचा एक अंश आहे, तथापि तो अल्प, अनित्य आणि परतंत्र असल्यामुळें त्याची जाति व त्याचें आकारमान हीं ब्रह्मानंदाहून अत्यंत भिन्न असतात.

शिष्य—मग जीवाला ब्रह्मानंद प्राप्त होण्याची आशाच नको !

सिद्धान्ती—नाहीं; असें निराश होण्याचें कारण नाहीं. बाबा ! अविद्येनें निर्माण केलेली विषयोपभोगाची इच्छा आणि तत्प्रेरित विषयभोगसंबंधी कर्म, यांचा जर आपण अपकर्ष करित गेलों, श्रुतिप्रणीत सिद्धांतांचें श्रवण श्रद्धापुरःसर करून आपण आपल्या विषयवासना क्रमशः विनष्ट करीत राहिलों, तर आपल्यास स्वरूपतः असलेलें ज्ञान प्रकट होत जाईल; व आपल्या हातून जसजसें निष्काम कर्म होत जाईल, तसतशा पुढें सांगितलेल्या मनुष्यगंधर्वादि भूमिका प्राप्त होऊन तेथें आपल्यास मागिल्या भूमिकेवरील आनंदाच्या शंभरपट आनंद देणारी दुसरी भूमिका, दुसरीहून तिसरी

या व्यवस्थेनें आपल्यास आनंदाचें स्वरूप क्रमशः प्रकट होत जाईल, आणि याप्रमाणें क्रमशः आपण हिरण्यगर्भ नामक ब्रह्माला होणाऱ्या महानंदाचा अनुभव घ्यावयास लागूं. मात्र श्रुतिज्ञानावर पूर्ण श्रद्धा आणि निष्कामतेनें विहितकर्माचें आचरण, या दुचीचा ब्रह्मचिंतनासह आपण अनन्य आश्रय केला पाहिजे.

निरस्ते त्वविद्याकृते विषयविषयिविभागे विद्यया स्वाभाविकः परिपूर्ण एक आनन्दोऽद्वैतो भवतीत्येतमर्थं विभावयिष्यन्नाह—

शिष्य—हें कसें ?

सिद्धान्ती—बाबा ! अविद्येनें निर्माण केलेला जो विषयप्रपंच आणि विषयी प्रपंच आहे, जो भेदभाव आहे. त्याचा ब्रह्मज्ञानानें उच्छेद केला म्हणजे, स्वाभाविक, सहजसिद्ध, स्वयंभु, स्वतंत्र असा अद्वितीय ब्रह्मानंद स्वतःच्या पूर्णस्वरूपानें प्रकट होतो. हा कसा, हें स्पष्ट करण्यासाठीं पुढील मंत्रभागाची योजना आहे.

युवा प्रथमवयाः । साधुयुवेति साधुश्चासौ युवा चेति यूनो विशेषणम् । युवाऽप्यसाधुर्भवति साधुरप्ययुवाऽतो विशेषणं युवा स्यात्साधुयुवेति । अध्यायकोऽधीतवेदः । आशिष्ठ आशास्तृतमः दृढिष्ठो दृढतमः बलिष्ठो बलवत्तमः । एवमाध्यात्मिकसाधनसंपन्नः । तस्येयं पृथिव्युर्वी सर्वा वित्तस्य वित्तेनोपभोगसाधनेन दृष्टार्थेनादृष्टार्थेन च कर्मसाधनेन संपन्ना पूर्णा राजा पृथिवीपतिरित्यर्थः । तस्य च य आनन्दः स एको मानुषो मनुष्याणां प्रकृष्ट एक आनन्दः । ते ये शतं मानुषा आनन्दाः स एको मनुष्यगन्धर्वाणामानन्दः । मानुषानन्दाच्छतगुणेनोत्कृष्टो मनुष्यगन्धर्वाणामानन्दो भवति । मनुष्याः सन्तः कर्मविद्याविशेषाद्गन्धर्वत्वं प्राप्ता मनुष्यगन्धर्वाः । ते ह्यन्तर्धानादिशक्तिसंपन्नाः सूक्ष्मकार्यकरणाः । तस्मात्प्रतिघातात्पत्वं तेषां द्वंद्वप्रतिघातशक्तिसाधनसंपत्तिश्च । ततोऽप्रतिहन्यमानस्य प्रतीकारवतो मनुष्यगन्धर्वस्य स्याच्चित्तप्रसादः । तत्प्रसादविशेषात्सुखविशेषाभिव्यक्तिः । एवं पूर्वस्याः पूर्वस्या भूमेरुत्तरस्यामुत्तरस्यां भूमौ प्रसादविशेषतः शतगुणेनाऽऽनन्दोत्कर्ष उपपद्यते । प्रथमं त्वकामहताग्रहणं मनुष्यविषयभोगकामानभिहतस्य श्रोत्रियस्य मनुष्यानन्दाच्छतगुणेनाऽऽनन्दोत्कर्षो मनुष्यगन्धर्वेण तुल्यो वक्तव्य इत्येवमर्थम् । साधुयुवाऽध्यायक इति श्रोत्रियत्वाद्व्रजिनत्वे गृह्येते । ते ह्याविशिष्टे सर्वत्र । अकामहतत्वं

तु विषयोत्कर्षापकर्षतः सुखोत्कर्षापकर्षाय विशेष्यते । अतोऽकाम-हतग्रहणम्, तद्विशेषतः शतगुणसुखोत्कर्षोपलब्धेरकामहतत्वस्य परमानन्दप्राप्तिसाधनत्वविधानार्थम् । व्याख्यातमन्यत् । देवगन्धर्वा जातित एव । चिरलोकलोकानामिति पितृणां विशेषणम् । चिरकालस्थायी लोको येषां पितृणां ते चिरलोकलोका इति । आजान इति देवलोकस्तस्मिन्नाजाने जाता आजानजा देवाः स्मार्तकर्मविशेषतो देवस्थानेषु जाताः ।

सिद्धांती--युवा म्हणजे तरुण. साधुयुवा म्हणजे सच्छील असणारा तरुण होय.

शिष्य--युवा म्हणजे 'साधु' हें 'तरुणाचें' विशेषण आहे. पण भगवन् ! कांहीं तरुण दुश्चरित असतात व कांहीं अतरुण सच्छील असतात ना ? मग तरुणाचेंच साधु हें विशेषण कां ?

सिद्धान्ती—सामान्यतः तरुण जीव उदारवृत्तीचे असतात. बरें, तें असो; येथें सच्छील तरुणांचा मात्र निर्देश आहे. असो; असा सच्छील युवा जर वेदशास्त्रसंपन्न असेल (विद्येनें सुसंस्कृत झाला असेल) अधिकारसंपन्न असेल, दृढनिश्चयाचा व अत्यंत बलवान् असेल, एवंच सर्व अध्यात्मिक साधनसंपत्तीनें परिपूर्ण असेल, (सच्छील, विद्या, अधिकार, निश्चय आणि शरीरबल, या साधनांनीं संपन्न असेल) तर ही सर्व पृथ्वी त्याला वश होऊन ती पृथ्वी-माता आपल्याजवळ असणारी सर्व अंतर्बाह्य संपत्ति ह्या पुरुषापुढें उपभोगासाठीं आणून ओतील. ह्याचप्रमाणें हा तरुण सच्छील असल्यामुळें दृष्टफल देणारीं व्यावहारिक कर्मे व अदृष्टफल देणारीं धार्मिक कर्मे व त्यांचीं साधनें ही पृथ्वी-माता त्याला सुलभ करील.

शिष्य—म्हणजे हा तरुण पृथ्वीपति, सार्वभौम राजराजेश्वरच, झाला म्हणावयाचा.

सिद्धान्ती—होय. अशा कार्यक्षम व उपभोगक्षम सच्छील, सुविद्य आणि सुसंपन्न राजाला जो आनंद होतो, तो मानवी आनंदांत सर्वोत्कृष्ट होय. या आनंदाला आपण 'एक' असें म्हणूं या. या 'एक' मानवी आनंदाच्या शतपट उत्कृष्ट मनुष्यगंधर्वाचा आनंद असतो.

शिष्य--मनुष्यगंधर्व म्हणजे ?

सिद्धान्ती—मनुष्य असूनही कांहीं विशेष कर्म व विशेष विद्या संपादन केल्यामुळें ज्यास गंधर्वत्व प्राप्त होतें, ते मनुष्यगंधर्व होत. तात्पर्य, वाटेल तेव्हां प्रकट होण्याचें व वाटेल तेव्हां अंतर्धान पावण्याचें सामर्थ्य ज्यांस असतें व ज्यांचीं शरीर, इंद्रियें, व अवयव स्थूलत्व सोडून देऊन--हीं सर्व--विद्येनें व कर्मानें सूक्ष्मत्व प्राप्त करून घेतात, ते गंधर्व होत. अर्थात् त्यांच्या इच्छा व कर्म निष्फल होण्याचा संभव अत्यंत अल्प असल्यामुळें आणि जीवनकलहांत प्राप्त होणाऱ्या प्रतिबंधांचा

उच्छेद करण्याचें उत्कृष्ट सामर्थ्य असल्यामुळें, सारांश, पराभव होण्याच अल्पसंभव आणि संकटांचा प्रतीकार करण्याचें सामर्थ्य अत्युत्कृष्ट असल्यामुळें ह्या मनुष्यगंधर्वांचें चित्त सर्वदा प्रसन्न असतें व याप्रमाणें प्रसन्न चित्तांत अभिव्यक्त (प्रकट) होणारा आनंद विशेषस्वरूपांचा असून तो मानवानंदाच्या शंभरपट उत्कृष्ट असतो.

शिष्य—याचप्रमाणानें मनुष्यगंधर्वांच्या आनंदाच्या शतपट देवगंधर्वांचा आनंद, त्याच्या शतपट पितरांचा, असा क्रम शेवटपर्यंत चालावयाचा, हें मला समजलें. पण 'अकामहतस्य श्रोत्रियस्य' हीं पदें प्रथमपासून कां घेतलीं नाहींत, मनुष्यगंधर्वांच्या आनंदसमयींच कां घेतलीं ? हें रूपा करून मला सांगावें.

सिद्धान्ती—कारण इतकेंच कीं, मनुष्याचे जे विषयभोग आहेत, तत्संबंधानें ज्या विद्वानांच्या आशा अभिहत झाल्या नाहींत, नष्ट झाल्या नाहींत, त्यांना सर्व संपत्ति व विद्वत्ता अनुकूल असतांही त्यांच्यापेक्षां निःस्पृह मनुष्यगंधर्वांचा (यांनीं कामाचा वासनांचा प्रतिरोध केलेला असतो) आनंद शतपट अधिक आहे, हें कळावें; म्हणून हीं त्वां उल्लेखिलेलीं पदें प्रथमतः घेतलीं नाहींत. सारांश, विषयभोग निरुद्ध झाले नसतील, तर विद्वानांचा उत्कृष्ट आनंद मुद्दां अत्यंत अल्पमोल आहे. हें जीवांस कळावें, एतदर्थ ही योजना आहे. अर्थात् अज्ञानी विषयोपभोग्यांची गोष्टच काढूं नये, असें झालें.

शिष्य—'साधुयुवा' म्हणजे विद्वान् व निष्पाप तरुण, हें पद प्रथमतःमात्र कां घेतलें ?

सिद्धांती—नाहीं. नाहीं, त्याचा अन्वय सर्वत्र आहे. विद्वत्ता, निष्पापता, निर्लोभता व श्रुतिनिष्ठता, हीं सर्वत्र अनुस्यूत केलीं पाहिजेत. ह्यांचा जसा उत्कर्ष होत जातो, तशी श्रेष्ठ श्रेष्ठ भूमिका प्राप्त होऊन श्रेष्ठ, श्रेष्ठ-तर आनंदाची आवाप्ति होते. तथापि निर्लोभता, विषयवैराग्य, हें विशेषत्वानें उल्लेखिण्याचें कारण आहे. निर्लोभतेच्या उत्कर्षानें सुखाची उत्कृष्टता व निर्लोभतेच्या अपकर्षानें सुखाची निकृष्टता होत असते. हें स्पष्ट समजावें म्हणून 'ज्ञानी अकामहतत्त्वाचा' उल्लेख प्रत्येक पर्यायांत (ठिकाणीं) केला आहे. आणि शेवटीं जेव्हां विषयवैराग्याची परमावधि होते, तेव्हां तर प्रत्येक निष्पापी श्रोत्रियाला परमानंदाची प्राप्ति होते, हें वैराग्याचें शतपट वृद्धिंगत होणारें फल आहे, हें निराबाध कळावें, ह्याही शंभरपटीनें वाढत जाणाऱ्या 'अकामहतस्य' या पदाचा वारंवार उच्चार करण्याचा हेतु आहे.

शिष्य—बाकीचें सर्व स्पष्टीकरण व्याख्यात झाल्यासारखेंच आहे. आतां, देवगंधर्व कोण हें सांगावें.

सिद्धान्ती—स्वर्गांत राहणारी एक गायनकुशल जाति आहे. तसेंच, चिरलोक—लोकपितर म्हणजे पितृलोकांत नित्य राहणारे पितर. इतरांप्रमाणें यांस पुनः मनुष्यलोकीं जन्म येत नाहीं. आजान=देवलोक. तेथें जन्मलेले ते आजानज. हे देवविशेष

होत. वेदविहित **स्मार्तकर्म-विशेषांनीं** जीवांस हा जन्म प्राप्त होतो. सर्वत्र विद्वत्ता, निष्पापता, निर्लोभता व श्रुतिनिष्ठता यांचें प्रतिपदीं वर्धन अवश्य आहे बरें !

कर्मदेवा ये वैदिकेन कर्मणाऽग्निहोत्रादिना केवलेन देवानपियन्ति । देवा इति त्रयस्त्रिंशद्धविर्भुजः । इन्द्रस्तेषां स्वामी । तस्माऽऽचार्यो बृहस्पतिः । प्रजापतिर्विराट्त्रैलोक्यशरीरो ब्रह्मा समष्टिव्यष्टिरूपः संसारमण्डलव्यापी । यत्रैष आनन्दभेदा एकतां गच्छन्ति धर्मश्च तन्निमित्तो ज्ञानं च तद्विषयमकामहतत्वं च निरतिशयं यत्र स एष हिरण्यगर्भो ब्रह्मा, तस्यैष आनन्दः श्रोत्रियेणावृजिनेनाकामहतेन च सर्वतः प्रत्यक्षमुपलभ्यते । तस्मादेतानि त्रीणि साधनानीत्यवगम्यते । तत्र श्रोत्रियत्वावृजिनत्वे नियते अकामहतत्वं तूत्कृष्यत इति प्रकृष्टसाधनताऽवगम्यते । तस्याकामहतत्वप्रकर्षश्चोपलभ्यमानः श्रोतियप्रत्यक्षो ब्रह्मण आनन्दो यस्य परमानन्दस्य मात्रैकदेशः । " एतस्यैवाऽऽनन्दस्यान्यानि भूतानि मात्रामुपजीवन्ति " इति श्रुत्यन्तरात् । स एष आनन्दो यस्य मात्रा समुद्राम्भस इव विप्रुषः प्रविभक्ता यत्रैकतां गता स एष परमानन्दः स्वाभाविकोऽद्वैतत्वादानन्दानन्दिनोश्चाविभागोऽत्र ।

सिद्धान्ती—कर्मदेव म्हणजे अग्निहोत्रादि केवल **श्रौतकर्म** करून देवलोकाप्रत जातात, ते होत. याप्रमाणें आजानज व कर्मदेव झाले. आतां, देव म्हणजे यज्ञांतील हवींचा उपभोग घेणारे. दोन अश्विनीकुमार, आठ वसु, अकरा रुद्र, बारा आदित्य, असे तेहतीस देव होत. कुमारांच्या ऐवजीं इंद्र व प्रजापति हे कोणी घेतात. असो. हविर्भाग घेणारे ते देव होत. यांचा स्वामी इंद्र आहे व गुरु बृहस्पति आहे. प्रजापति म्हणजे **विराट् ब्रह्मदेव होय.** त्रैलोक्य हें याचें शरीर असून हा सर्व संसारमंडलाचा (सर्व व्यवहाराचा) व्यापक आहे. हाच समष्टिव्यष्टिरूप आहे. समष्टिरूप असून तो व्यष्टिरूप असतो.

शिष्य—भगवन् ! ' समष्टिरूपः व्यष्टिरूपः संसार-मंडलव्यापी ' असा एक पाठ आहे.

सिद्धांती—चांगला आहे पाठ तो. ब्रह्मा स्वतः समष्टि असून सर्व व्यष्टींच्या संसाराचा व्यापक आहे; असा या पाठाचा अर्थ आहे. असो; आतां हे सर्व मनुष्य, मनुष्यगंधर्वादि भिन्न भिन्न आनंद सांगितले, त्या सर्वांस जेथें एकरूपता प्राप्त होते, धर्माचरणही ज्याप्रीत्यर्थ होतें, ज्ञानाचा विषय जो असतो, ज्या ठिकाणीं विषयदोषवाला निःसीमता प्राप्त होते, तो हा **हिरण्यगर्भ ब्रह्मदेव** होय. त्या हिरण्यगर्भाच्या

पूर्ण आनंदाचा प्रत्यक्ष अनुभव निष्पापी, निर्लोभि श्रोत्रियाला (हिरण्यगर्भाच्या उपासकाला) सर्वदा सर्वत्र येतो. तेव्हां आनंदाला उत्तरोत्तर वरवरच्या भूमिकेंत न्यावयाचें असेल (अथवा आपल्याला उत्तरोत्तर श्रेष्ठ होत जाणाऱ्या भूमिकांचा आनंद आस्वादावयाचा असेल) तर आपण निष्पापता, निर्लोभता आणि श्रुतिनिष्ठ विद्वत्ता यांचा अनन्य आश्रय केला पाहिजे. उद्धार करणारीं हीं तीन साधनें आहेत. यांत निष्पापता व विद्वत्ता हीं सर्वत्र एकरूपाचीं असतात. पण निर्लोभता किंवा वैराग्य उत्कृष्ट होत जातें; म्हणून ब्रह्मविद्येंत वैराग्याचें माहात्म्य अत्यंत सांगितलें आहे. असो; या वैराग्यपूर्णतेनें उत्कृष्ट स्वरूपास पावलेला श्रोत्रिय-प्रत्यक्ष हिरण्यगर्भाचाही आनंद ज्या **परमानंदाचा** एक अंश आहे--

पूर्व०—या म्हणण्याला कांहीं आधार ?

सिद्धान्ती—'याच आनंदाचा एक अंश मात्र ब्रह्मादिस्थावरांत भूतांस प्राप्त होतो' अशी श्रुति प्रमाण आहे. असो; त्याच ह्या परमानंदाचे अंश-

शिष्य—विप्रुष म्हणजे थेंब. तेव्हां, समुद्रांतील जलाचे बिंदु निरनिराळे होतात, त्याप्रमाणें या परमानंदाचे अंश या सर्व सृष्टींत पसरून पुनः ते ब्रह्मस्वरूपीं एकरूप होतात. सर्व आनंदांचा ब्रह्मानंदांतच अंतर्भाव होतो.

सिद्धान्ती—अरे ! ते एकरूपच आहेत, नित्य आपल्यास भ्रांतीनें ते विभक्तसे दिसतात. असो; ब्रह्मानंद हा एक, पूर्ण, स्वतंत्र स्वाभाविक आनंद होय. कारण तो ब्रह्मरूप आहे; आणि ब्रह्म एकच आहे. तसेंच, येथें आनंद ब्रह्म, आनंदाचा विषय ब्रह्म व आनंद भोक्ताही ब्रह्मच होय. हें तरी समजण्यासाठीं म्हणावयाचें. बाकी, वस्तुतः ब्रह्म हें आनंदरूप आहे. येथें विषय आणि विषयभोक्ता हा प्रविभागच नाहीं. येथें ब्रह्मज्ञ ब्रह्मानंदाचा प्रत्यक्ष अनुभव घेतो, म्हणजे तो स्वतः ब्रह्मानंदरूप होतो; समजलें ?

शिष्य—सर्व साधनसंपन्न मनुष्याचा आनंद, निर्लोभी विद्वानाचा मनुष्यगंधर्वानंद, देवगंधर्वाचा, चिरपितरांचा आजानज-देवांचा, कर्मदेवांचा, देवांचा, इंद्राचा, बृहस्पतीचा, प्रजापतीचा, हिरण्यगर्भाचा, हे सर्व शतपटीनें वाढत जाणारे आनंद हे ब्रह्मानंदाचा एक अंश मात्र होत ना ? असो; पण या मीमांसेचें फल काय बरें ?

सिद्धांती—ऐकः—

स यश्चायं पुरुषे । यश्चासावादित्ये । सः एकः ॥

अन्वय व अर्थः—सः यः अयं पुरुषे च, यः च असौ आदित्ये, सः एकः (हा जो या पुरुषांत आहे, व तो जो त्या आदित्यांत आहे, ते दोन्ही 'तो' व 'हा' एकच आहेत) सारांश, जीवात्मा आणि परमात्मा एकच आहेत.

स यश्चायं पुरुष इति । यो गुहायां निहितः परमे व्योम्न्याकाशादिकार्यं सृष्ट्वाऽन्नमयान्तं तदेवानुप्रविष्टः स य इति निर्दिश्यते । कोऽसावयं पुरुषे । यश्चासावादित्ये यः परमानन्दः श्रोत्रियप्रत्यक्षो निर्दिष्टो यस्यैकदेशं ब्रह्मादीनि भूतानि सुखार्हाण्युपजीवन्ति स यश्चासावादित्य इति निर्दिश्यते । स एको भिन्नप्रदेशस्थघटाकाशाकाशैकत्ववत् । ननु तन्निर्देशे स यश्चायं पुरुष इत्यविशेषतोऽध्यात्मं न युक्तो निर्देशो यश्चायं दक्षिणेऽक्षन्निति तु युक्तः प्रसिद्धत्वात् । न पराधिकारात् । परो ह्यात्माऽत्राधिकृतोऽदृश्येऽनात्म्ये भीषाऽस्माद्वातः पवते सैषाऽऽनन्दस्य मीमांसेति । न ह्यकस्मादप्रकृतो युक्तो निर्देष्टुं परमात्मविज्ञानं च विवक्षितम् । तस्मात्पर एव निर्दिश्यते स एक इति । नन्वानन्दस्य मीमांसा प्रकृता तस्या अपि फलमुपसंहर्तव्यम् । अभिन्नः स्वाभाविक आनन्दः परमात्मैव न विषयविषयिसंबन्धजनित इति । ननु तदनुरूप एवायं निर्देशः स यश्चायं पुरुषे यश्चासावादित्ये स एक इति भिन्नाधिकरणस्थविशेषोपमर्देन । नन्वेवमप्यादित्यविशेषग्रहणमनर्थकम् । नानर्थकम् । उत्कर्षापकर्षापोहार्थत्वात् । द्वैतस्य हि मूर्तामूर्तलक्षणस्य पर उत्कर्षः सवित्रभ्यन्तर्गतः स चेत्पुरुषगतविशेषोपमर्देन परमानन्दमपेक्ष्य समो भवति न कश्चिदुत्कर्षोऽपकर्षो वा तां गतिं गतस्येत्यभयं प्रतिष्ठां विन्दत इत्युपपन्नम् ।

सिद्धान्ती—ऐका: जो विज्ञानगुहेंतील अतिश्रेष्ठ दहराकाशांत वास्तव्य करितो, ज्यानें आकाशादि अन्नमयापर्यंतची सर्व कार्यसृष्टि उत्पन्न केली, जो ही सर्व सृष्टि उत्पन्न करून तिच्यामध्यें आपण प्राविष्ट झाला, तो परमात्मा 'सः यः' ह्या पदांनीं निर्दिष्ट केला आहे.

पूर्व०—कोण ? तो परमात्मा ?

सिद्धान्ती—होय. पुरुषामध्यें असणारा जो 'हा' व आदित्यामध्यें असणारा जो 'तो' हे दोन्ही एकच आहेत. अहो ! जो परमानंद श्रोत्रिय-प्रत्यक्ष म्हणून निर्देशिला व ब्रह्मदेवादि सर्व भूतें ज्या परमानंदाचा एक अंश मात्र प्राप्त होण्याला योग्य आहेत, तो परमानंद 'जो तो आदित्यांमध्यें आहे' या पदसमूहानें निर्दिष्ट केला आहे. पुरुषांतील ब्रह्मानंद व आदित्यांतील परमानंद हे एकस्वरूपच आहेत.

शिष्य—म्हणजे भिन्न भिन्न प्रदेशांत असणारे घट आकाशयुक्त असतात व त्या घटांतील आकाशांस आपण निरनिराळीं घटाकाशें समजतों. यद्यपि असें आहे,

तथापि तीं सर्व आकाशें महाकाशरूप असून स्वरूपतः एकच आहेत. त्याप्रमाणें जीवामध्यें राहणारा आत्मा व आदित्यामध्यें राहणारा आत्मा हे दिसतांना मात्र भिन्न दिसतात, तथापि स्वरूपतः एकच आहेत, असा आपल्या सांगण्याचा इत्यर्थ आहे.

सिद्धान्ती—बरोबर समजलास. जीवात्मा काय, आदित्यात्मा काय, ते दोन्ही परमात्मरूपच आहेत.

पूर्व०—असें कसें ? 'तो जो या पुरुषांत आहे' हा अध्यात्मसंबंधानें म्हणजे व्यक्तीमध्यें असणाऱ्या आत्म्यासंबंधानें, सारांश जीवात्म्यासंबंधानें अविशेष उल्लेख आहे. उल्लेख ब्रह्मपर असता, तर श्रुतीनें असा निर्विशेष अध्यात्म उल्लेख केलाच नसता. पण अध्यात्मक निर्देश आहे; म्हणून परमात्म्यासंबंधानें हा उल्लेख आहे, असें म्हणणें कोणत्याही वाटेनें योग्य नाहीं. अर्थात् 'दक्षिणनेत्रामध्यें असणारा जो जीवात्मा' श्रुतिप्रसिद्ध आहे, तत्संबंधीं हा निर्देश असला पाहिजे; असें न्यायतः ठरत आहे. शिवाय, उपासना सांगण्यासाठीं जीवात्म्याचा अध्यात्मिक व सूर्यात्म्याचा 'अधिदैविक' निर्देश असणें, संभवनीय आहे.

सिद्धान्ती—ही तुमची शंका व्यर्थ आहे. कारण 'पर' आत्म्याचा अधिकार आहे, म्हणजे परमात्म्याचें प्रकरण प्रस्तुत आहे. 'तो अदृश्य, अशरीरी आहे' 'त्याच्या निग्रहाला भिऊन वायु वाहतो' 'ही आनंदाची सीमा आहे' इत्यादि सर्व श्रुतिवाक्यें परमात्म्याचें वर्णन करण्यांत समर्पित झालीं आहेत. एवंच, हें परमात्मप्रकरण आहे, म्हणून या वाक्यांत उल्लेखिलेला आत्मा परमात्माच होय. उपासनेचा संबंधच येथें नाहीं.

शिष्य—शिवाय, पाठीमागचा पुढचा संबंध नसतां एकदम विशिष्ट आत्म्याचा अकारण निर्देश श्रुति करील व अप्रस्तुत-प्रशंसेचा दोष आपल्या माथ्यावर घेईल, हेंही संभवनीय नाहीं.

सिद्धान्ती—आणखी; परमात्मस्वरूपाचे विज्ञानाची विवक्षा आहे, सांगण्याचा विषय परमात्मा आहे, हें ध्यानांत ठेवा. म्हणून 'तो एकच आहे' हें वाक्य स्पष्ट सिद्ध करितें कीं, येथील सर्व उल्लेख परमात्मपरच आहेत. परमात्माच येथें वक्तव्य आहे, असें मनांत आणूनच 'तो एक आहे' असें श्रुतीनें विषयाचें पर्यवसान केलें आहे.

पूर्व०—पण येथें 'आनंदाची सीमा कोणती,' हें वक्तव्य आहे, ही वस्तु प्रस्तुत आहे, हेंही विसरूं नका. मीमांसेचें फलही सांगावयाचें आहे.

सिद्धान्ती—होय. या मीमांसेच्या फलाचाही येथें उपसंहार करावयाचा आहेच. तो उपसंहार असा. जो आनंद स्वाभाविक (सहज, स्वयंभु) आहे, ज्यांत कोठेंही भिन्नस्वरूप नाहीं, जीवांत व सूर्यांत जो एकरूपच असतो, तो म्हणजे परमात्मा होय. आनंद म्हणजे परमात्मा. हाच उपसंहार होय. विषय आणि विषयी (भोग्यपदार्थ व भोक्ता) यांचा संबंध झाला असतां जो आनंद होतो, तो स्वाभाविक आनंद नव्हे. तो

सोपाधिक आनंद असतो. पण निर्विषय आनंद तोच परमात्मा आहे, असें ज्ञानविज्ञान झालें म्हणजे आनंदाची सीमा (आनंदरूपता) प्राप्त होऊन ब्रह्मत्व मिळतें. हा श्रुतीचा विचारोपसंहार आहे.

पूर्व०—मग तसा निर्देश तरी स्पष्ट पाहिजे. पण आम्ही म्हणतों असा मात्र उलट निर्देश आहे.

सिद्धान्ती—आहेच स्पष्ट उल्लेख आम्ही म्हणतों तसाः " जो स्वाभाविक आनंद जीवशरीरांत राहणाऱ्या आत्म्याचें स्वरूप असतो व जो स्वाभाविक आनंद सूर्याचे ठिकाणीं अधिदैवी आत्मरूपानें राहतो, तो व हा हे दोन्ही एकच " असाच श्रुतीचा अभिप्राय आहे. म्हणजे भिन्नभिन्न ठिकाणीं वास्तव्य करणाऱ्या भिन्न विशेषांचा उपमर्द करून (नाश करून) येथें स्पष्ट सांगितलें कीं कोठेंही असो, आनंदरूप आत्मा एकरसच असतो.

पूर्व०—असें असेल तर, श्रुतीनें 'आदित्य' या विशेषाचा (विशेष स्थानाचा) जो बुद्धिपूर्वक अवतार केला आहे, तो निरर्थक होतो. श्रुति केव्हांही अर्थशून्य प्रयोग करीत नाहीं..

सिद्धांती—आणि आम्हीं केलेल्या अर्थानेंही श्रुतीचा बोल 'अनर्थक' होत नाहींच नाहीं. श्रुतीनें हें 'आदित्य' विशेषण उपयोजिलें आहे, तें साभिप्रायच आहे, तिला 'आदित्यांत भासमान होणारा उत्कर्ष व जीवशरीरांत भासणारा अपकर्ष' यांचा समूळ उच्छेद करावयाचा आहे. अहो ! मूर्त आणि अमूर्त असें लक्षण आहे ज्या द्वैताचें, तें पत्करिलें म्हणजे आदित्याच्या अंतर्यामीं असणाऱ्या आनंदाचा जो उत्कर्ष होतोसा वाटतो, जो आनंद उत्कृष्टतम आहे, असा भास होतो; तोच-जीवशरीराचा विशेष अपकर्ष काढिला म्हणजे, तोच-परमानंदाच्या दृष्टीनें समस्वरूपी असतो. सारांश, जीवशरीरांत राहणारा व अपकृष्ट वाटणारा तथापि वस्तुतः निर्विशेष आनंद (आत्मा) व परमोत्कृष्ट वाटणारा आदित्यांतील आधिदैविक आनंद (आत्मा) हे दोन्ही परमानंदरूप आहेत. तेथें उंच-नीच असा भेद यत्किंचितही नाहीं. हें श्रुतीला सांगणें अभीष्ट आहे. तसेंच, ही निर्विशेष परमानंदप्राप्ति झाली, म्हणजे भीतिशून्य आश्रय (म्हणजे परब्रह्मप्राप्ति) मिळतो, हेंही श्रुतीला सांगावयाचें आहे. अर्थात् हें सांगण्यासाठीं श्रुतीनें आदित्यादिकांचा स्पष्ट उल्लेख करणें हें उपपन्न म्हणजे नीटच आहे. येथें अनर्थक शब्द एकही नाहीं. समजलां ?

अस्ति नास्तीत्यनुप्रश्नो व्याख्यातः । कार्यरसलाभप्राणनाभयप्रतिष्ठाभयदर्शनोपपत्तिभ्योऽस्त्येव तदाकाशादिकारणं ब्रह्मेत्यपाकृतोऽयमेकः, द्वावन्यावनुप्रश्नौ विद्वद्विदुषोर्ब्रह्मप्राप्त्यप्राप्तिविषयौ तत्र विद्वान्समश्नुते न समश्नुत इत्यनुप्रश्नोऽन्त्यस्तदपाकरणायो-

च्यते। मध्यमोऽनुप्रश्नोऽन्त्यापाकरणादेवापाकृत इति तदपाकरणाय न यत्यते।

सिद्धांती—याप्रमाणें 'परब्रह्म आहे कीं नाहीं' हा जो प्रश्न तुम्हीं प्रथमतः काढिला होता, त्याचें विवेचन झालें. ब्रह्मकार्य, तद्रस, तल्लाभ, तत्प्राणन, तत्प्राप्तीनें मिळणारें अभय व प्रतिष्ठा, त्याच्या निग्रहानें वायुप्रमुखांची कार्यप्रवृत्ति, या सर्व चिन्हांनीं (हेतूंनीं) तें आकाशादिकांचें कारण असणारें ब्रह्म आहे, असें उपपत्तिपूर्वक ठरलें. अर्थांतच 'तें आहे कीं नाहीं?' या अनुप्रश्नाचा निर्णय 'अस्तिपर (ब्रह्म आहे असा)' झाला. आतां, 'विद्वानाला ब्रह्मप्राप्ति होते व अविद्वानाला ती होत नाहीं' यासंबंधाचे दोन अनुप्रश्न राहिले. त्यांतही विद्वानाला ब्रह्मरूप प्राप्त होतें कीं नाहीं' हा शेवटचा म्हणजे दुसरा प्रश्न आहे. या प्रश्नाचा निर्णय करण्यासाठीं पुढील श्रुति-वाक्यांचा अवतार आहे. मधला जो प्रश्न आहे, आतांच्या दोन प्रश्नांपैकीं जो पहिला प्रश्न आहे, त्याचा निकाल दुसऱ्याच्या निकालानें सहजच होतो, म्हणून श्रुति त्याच्या निराकरणाची खटपट करीत नाहीं, हें नीटच आहे.

स य एवंवित्। अस्माल्लोकात्प्रेत्य। एतमन्नमयमात्मानमुपसंक्रामति। एतं प्राणमयमात्मानमुपसंक्रामति। एतं मनोमयमात्मानमुपसंक्रामति। एतं विज्ञानमयमात्मानमुपसंक्रामति। एतमानन्दमयमात्मानमुपसंक्रामति। तदप्येष श्लोको भवति।

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि द्वितीये ब्रह्मवल्ल्यध्यायेऽष्टमोऽनुवाकः ॥ ८ ॥

अन्वय व अर्थः—यः एवंवित्, सः अस्मात् लोकात् प्रेत्य एतम् अन्नमयम् आत्मानम् उपसंक्रामति; एतं प्राणमयम् आत्मानं उपसंक्रामति; एतं मनोमयम् आत्मानं उपसंक्रामति; एतं विज्ञानमयम् आत्मानं उपसंक्रामति; एतं आनंदमयम् आत्मानम् उपसंक्रामति (याप्रमाणें ज्याला निरनिराळ्या भूमिकेवरून जातां जातां शेवटीं ब्रह्मज्ञान झालें, तो ह्या भिन्नाभास दाखविणाऱ्या लोकाचा मर्त्य-लोकाचा त्याग केल्यावर, १ह्या 'अन्नमय' नामक आत्मस्वरूपाप्रत, (२) 'प्राणमय' आत्मरूपाप्रत, (३) 'मनोमय'

आत्मरूपाप्रत, (४) 'विज्ञानमय' आत्मरूपाप्रत आणि (५) 'आनंदमय' (आत्मरूपाप्रत) जातो–सारांश, जीवाला ज्या आत्मरूपाचें ज्ञान–विज्ञान होऊन साक्षात्कार झाला असेल, त्या आत्मरूपाचा त्याला लाभ होतो. तो जीव आपला पुरुषार्थ साधून घेतो. ज्यानें एकनिष्ठ चिंतन केलें असेल, त्या पुरुषार्थाची प्राप्ति त्याला होते. पण त्यानें आपला शास्त्रोक्त विचार कायम ठेविल्यास तो अन्नमयांतून प्राणमयांत–या मार्गानें आनंदमयापर्यंत जातो.)

स यः काश्चिदेवं यथोक्तं ब्रह्मोत्सृज्योत्कर्षापकर्षमद्वैतं सत्यं ज्ञानमनन्तमस्मीत्येवं वेत्तीत्येवंवित् एवंशब्दस्य प्रकृतपरामर्शार्थत्वात्। स किम्, अस्मात्लोकात्प्रेत्य दृष्टादृष्टेष्टविषयसमुदायो ह्ययं लोकस्तस्मादस्मात्लोकात्प्रेत्य प्रत्यावृत्य निरपेक्षो भूत्वैतं यथाव्याख्यातमन्नमयमात्मानमुपसंक्रामति विषयजातमन्नमयात्पिण्डात्मनो व्यतिरिक्तं न पश्यति सर्वं स्थूलभूतमन्नमयमात्मानं पश्यतीत्यर्थः। ततोऽभ्यन्तरमेतं प्राणमयं सर्वान्नमयात्मस्थमविभक्तम्। अथैतं मनोमयं विज्ञानमयमानन्दमयमात्मानमुपसंक्रामति। अथादृश्येऽनात्म्येऽनिरुक्तेऽनिलयनेऽभयं प्रतिष्ठां विन्दते।

सिद्धान्ती—मागच्या व या अनुवाकांत जीं ब्रह्मस्वरूपें व आनंदरूपें अधिकारानुसार विहित केलीं आहेत, ते ते अधिकार प्राप्त करून घेऊन जो कोणी साधक स्वयोग्य ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान–विज्ञान करून घेतो व त्या त्या आनंदाचा उपभोग घेतो, आणि याप्रमाणें क्रमशः मार्गक्रमण करीत असतां व केल्यावर ज्याला 'उत्कर्षापकर्षशून्य– भेदशून्य–आणि सत्यज्ञान अनंतलक्षणात्मक ब्रह्म आहे, तें मीच आहें' असें निश्चित ज्ञानविज्ञान होतें—

शिष्य—मंत्रांतील 'एवं' शब्दाचा अर्थ 'याप्रमाणें' असा आहे ना?

सिद्धान्ती—होय. येथें प्रस्तुत (वादविषयक) ब्रह्मरूपाचें वर्णन केलें. तसें ज्ञानविज्ञान झालेला, असा 'एवंवित्' याचा अर्थ करावयाचा. सारांश, ज्या संसारविमोचक व एकरसात्मक ब्रह्माचें वर्णन केलें आहे, त्या सत्यज्ञानानन्तात्मक ब्रह्माचें स्वरूप ज्याला यथार्थ समजलें, श्रुतीनें लक्षणादि–साधनांनीं सांगितलें, तसेंच ज्याला समजलें, इतका 'एवंवित्' शब्दाचा अर्थ आहे. असो; ज्याला हें समजलें—

शिष्य—भगवन्! मंत्रांतील 'सः' चा संबंध?

सिद्धान्ती—तो विशेषब्रह्माचें ज्ञानविज्ञान झालेला ब्रह्मज्ञ ह्या लोकाचा त्याग करितो [illegible] मरतो तेव्हां, त्याला काय जी प्राप्ति होते, तिचें संपादकत्व 'सः (तो)'

या पदानें सुचविलें आहे. पुढें जें ' उपसंक्रामति ' असें क्रियापद आहे, त्यांचा 'तो' हा कर्ता आहे.

शिष्य—हा लोक म्हणजे मर्त्य लोक ?

सिद्धांती—होय. याच लोकांत ' दृष्ट, अदृष्ट आणि इष्ट विषयांचा ' समुदाय असतो. दृष्ट विषय आणि इष्ट विषय हे तर सर्वांसच समजतात. पण ' अदृष्टा ' ची तशी गोष्ट नाहीं. आपण इष्टविषयाच्या प्राप्त्यर्थ जें कर्म करितों तें व्यवस्थितकाळीं फलप्रद झालें तर त्याचें फल मिळालेलें दिसतें, म्हणून त्याला ' दृष्ट ' फल असें म्हणावें. पण 'दृष्ट फल' हाच कांहीं आपल्या कर्माचा विपाक नसतो. दिसलेल्या फलाव्यतिरिक्त कर्माचें अदृश्य असें कांहीं एक फल निर्माण होतें, त्याला ' अदृष्ट, ' धार्मिक-भाषेंत ' पापपुण्य ' असें नांव आहे. या अदृष्टाचें मूर्तिमंत फल कालांतरानें मिळतें. हें काय आहे, हें दिसणें किंवा समजणें कठिण; म्हणून याला ' अदृष्ट ' म्हणतात. योग्य श्रम करून दृश्य फल न मिळणें किंवा योग्य असें कांहींच न करितां फल मिळणें, हें अदृष्टानें होतें, अशी पूर्वकालीन समजूत आहे. अदृष्ट म्हणजे भागधेय अथवा ' नशीब ' होय. असो; या मर्त्यलोकांत दृष्ट, अदृष्ट व इष्ट असे अनंत विषय आहेत, हें प्रसिद्धच आहे.

शिष्य—दृष्ट म्हणजे घटमठादि दिसणारें, अदृष्ट म्हणजे मन, बुद्धि आदि न दिसणारें, असा अर्थ केला तर ?

सिद्धान्ती—कांहीं फारशी हरकत नाहीं. पण या तुझ्या अर्थानें पुण्यपापाची जी पूर्वकालीन समजूत व सुदैव आणि दुर्दैव ही फलात्मक समजूत यांचा विचार होत नाहीं. असो; येथील मर्त्य जीव या लोकांतून निघाला, सांसारिक-विषयांचा वीट आल्यामुळें पुनः मर्त्यलोकीं विषयभोगासाठीं यावयाचें नाहीं, असा निश्चय करून परत फिरला, म्हणजे तो मागें सांगितलेल्या अन्नमय आत्म्याकडे जातो; म्हणजे ज्ञानतः ' अन्नमय ' आत्मरूप होतो. तात्पर्य, हें सर्व विषयसर्वस्व, हें सर्व स्थूल, सूक्ष्म, दृश्य विषय अन्नात्मक आहेत, अन्नाव्यतिरिक्त येथें दुसरें कांहीं नाहीं, अन्नमयत्व हाच सर्वांचा (सर्व पिंडांचा) आत्मा आहे, असें ज्ञानविज्ञान करून घेतो; तो ज्ञानी मागें वर्णिलेल्या तेथील आनंदाचा उपभोग घेतो व अन्नमय होतो. या अन्नासारखाच आपला आत्मा स्थूल आहे, असें त्याचें ज्ञानविज्ञान असतें. तुला आठवतच असेल कीं, या लोकांतील उत्कट उपभोगात्मक आनंद म्हणजे तरुण सार्वभौम राजाला होतो, तो होय. असो, हा पक्ष शुद्ध चार्वाकांचा आहे, असें समजावें. या स्थूल आत्म्याला चिकटून बसणाऱ्या जीवापेक्षां जास्त अधिकाराचा पुरुष म्हणजे जो अन्नमयाच्या अंतर्यामीं असणाऱ्या प्राणमय आत्म्याचें ज्ञानविज्ञान करून घेऊन विशेष आनंदाचा उपभोग घेतो व प्राणमय होतो, तो होय. असाच प्राणमयाच्या आंत मनोमय, त्याचा अंतर्यामी विज्ञानमय, त्याचा

आनंदमय, असा उत्तरोत्तर व उत्कृष्टतर क्रममार्ग आहे. विचारद्वारा क्रमाक्रमानें उत्तर अधिकार प्राप्त करून घेऊन उत्तर भूमिकेचें आक्रमण करणारा साधक या मार्गानें जातो.

शिष्य—पण वामदेवासारखे ऋषी जन्मादारभ्य जीवन्मुक्तच असतात.

सिद्धान्ती—खरें आहे. पण त्यांनीं हें मार्गक्रमण पूर्वजन्मींच केलेलें असतें. मोक्षपंथाचा हा मार्ग आहे. असो; आनंदमयाच्याही पुढें गेल्यावर दृढाभ्यासी मुमुक्षूला अदृश्य, अशरीर, अनिर्वचनीय, निराधार असें जें परमात्मस्वरूप तें प्राप्त होतें. मग तो निर्भय होतो व त्याला कायमचें वसतिगृह मिळतें. पण परमात्मस्वरूप समजून उमजल्यावर 'तो' व्यष्टिदृष्टीनें किंवा समष्टिदृष्टीनें राहतच नाहीं म्हणाना! तो स्वतःच ब्रह्मरूप होतो. अथवा त्याचें मूळचें ब्रह्मरूप त्याला मिळतें. तात्पर्य, 'सच्चिदानंद' असें लक्षण करून ज्या ब्रह्मस्वरूपाला सरस्वतीची वाणी लक्षित मात्र करिते, तें शुद्धआत्मस्वरूप तो होतो. तेथें सर्व अज्ञान व तज्जन्य द्वैत संपतें म्हणून व निर्भयता व निर्विशेषता प्राप्त होते म्हणून 'परेहूनि परतें घर' मिळून आपला मुमुक्षु 'तेथें निरंतर राहतो.'

तत्रैतच्चिन्त्यम्। कोऽयमेवंवित्कथं वा संक्रामतीति। किं परस्मादात्मनोऽन्यःसंक्रमणकर्ता प्रविभक्तं उत स एवेति। किं ततः, यद्यन्यः स्याच्छ्रुतिविरोधः। "तत्सृष्ट्वा तदेवानुप्राविशत्" "अन्योऽसावन्योऽहमस्मीति।" "न स वेद" "एकमेवाद्वितीयम्" "तत्त्वमसि" इति। अथ स एवाऽऽनन्दमयमात्मानमुपसंक्रामतीति, कर्मकर्तृत्वानुपपत्तिः। परस्यैव च संसारित्वं पराभावो वा। यद्युभयथा प्राप्तो दोषो न परिहर्तुं शक्यत इति व्यर्था चिन्ता। अथान्यतरस्मिन्पक्षे दोषाप्राप्तिस्तृतीये वा पक्षेऽदुष्टे स एव शास्त्रार्थ इति व्यर्थैव चिन्ता। न, तन्निर्धारणार्थत्वात्सत्यं प्राप्तो दोषो न शक्यः परिहर्तुमन्यतरस्मिंस्तृतीये वा पक्षेऽदुष्टेऽवधृते व्यर्था चिन्ता स्यान्न तु सोऽवधृत इति तदवधारणार्थत्वादर्थवत्येवैषा चिन्ता। सत्यमर्थवती चिन्ता। शास्त्रार्थावधारणार्थत्वात् चिन्तयसि च त्वं न तु निर्णेष्यसि, किं न निर्णेतव्यमिति वेदवचनं, न, कथं तर्हि बहुप्रतिपक्षत्वादेकत्ववादी त्वं, वेदार्थपरत्वाद्बहवो हि नानात्ववादिनो वेदबाह्यास्त्वत्प्रतिपक्षा अतो ममाऽऽशङ्कां न निर्णेष्यसीत्येतदेव मे स्वस्त्ययनं यन्मामेकयोगिनमनेकयोगिबहुप्रतिपक्षमात्थ। अतो जेष्यामि सर्वानारभे च चिन्ताम्।

पूर्व०—शाले तुमचें! अहो! तुमच्या बोलांत कांहीं तरी बोल? एकदां जीव आणि ब्रह्म एक आहे व तें ब्रह्म हलत चालत नाहीं, असें म्हणतां आणि पुनः जीव संक्रमण करितो, असें पहिल्याच्या उलट सांगतां! आहे काय हा गोंधळ? हें काय वाक्चापल्य कीं अज्ञानविजृंभण! सांगा पाहूं कोणतें तुम्हाला पत्करतें तें?

सिद्धान्ती—थांबा! अशी गर्दी करूं नका.

पूर्व०—असा आमचा कोंडमारा करूं नका. प्रथम हें सांगा कीं, हा संक्रमणकर्ता कोण? हा पांथ काय परमात्म्याहून निराळाच असणारा दुसरा कोणी आहे किंवा संक्रमण करणारा परमात्माच आहे? दोहोंपैकीं 'एक संक्रमण करितो' असें तुम्हाला तर म्हटलेंच पाहिजे.

शिष्य—पण हें समजून मिळवावयाचें काय?

पूर्व०—काय म्हणजे सत्याची प्राप्ति! अहो महाराज! संक्रमणकर्ता जीव परमात्म्याहून भिन्न आहे, असें म्हणाल, तर प्रत्यक्ष श्रुतिच तुमचा विरोध करील, 'तें उत्पन्न करून त्यांतच आपण जीवरूपानें-शिरता झाला' 'तो-परमात्मा-निराळा व मी-जीव-निराळा असें ज्याचें ज्ञानविज्ञान असतें, त्याला कांहीं समजत नाहीं' 'आत्मा एक व अद्वितीय आहे' 'तें-ब्रह्म-तूंच आहेस, हे जीवा!' या श्रुतींला हरताळच लावावी लागेल, जर तुम्ही जीव संक्रमण करितो, असें म्हणाल, तर! बरेंच आहे आमच्या दृष्टीनें म्हणा. तुम्ही दुसरा पक्ष घेतला तरी हीच रड आहे.

शिष्य—भाषा थोडी शिष्ट असूं द्या कृपाकरून?

पूर्व—समजलें रे! अहो! आचार्यमताचे पुरस्कर्ते! परमात्माच आनंदमयापर्यंत संक्रमण करितो, असें आपलें अनिर्वाह-पक्षप्राप्तीमुळें म्हणणें असेल, तर तेंही जुळत नाहीं. कारण परमात्मा कोणतेंही कर्म करीत नाहीं, त्याकडे कसलेंच कर्तृत्व असत नाहीं, हें तर तुमचें आवडतें प्रमेय आहे. असो; या विकल्पामध्यें हें रहस्य निघालें कीं संक्रमण आहे. हें संक्रमण करितो कोण? परमात्मा संक्रमण करीत नाहीं, हें ठरलें आहे. तेव्हां तें दुसऱ्यानें जीवानें केलें पाहिजे. एकूण 'दुसरा नाहीं' म्हणण्यानें संक्रमण जुळत नाहीं व संक्रमण असलें कीं, जीव येतो।

शिष्य—पण जीवाला संसरण नाहीं. तो परमात्मा आहे.

पूर्व०—तर मग 'परमात्मा संसारी' असें ठरवा.

शिष्य—तसेंही नाहीं.

पूर्व०—अहो! परमात्मा संसारी आहे, असें म्हणा; किंवा संसारच नित्य आहे, परमात्म्याला संसार नसतो, म्हणून परमात्मा नाहीं; असें वाटेल तर म्हणा! आमची

कांहीं हरकत नाहीं. सारांश, परमात्मा व जीव एक म्हटले, तर उपसंक्रमण थांबतें. उपसंक्रमण आहे, तें जीव करितो असें म्हणा, व संसाराला नित्य ठरवा. तात्पर्य, परमात्मा संसारी तरी आहे; किंवा तो मुळांतच नाहीं. असो; असा हा उभय बाजूंनीं प्राप्त झालेला दोष तुम्हाला काढून टाकतांच येत नसेल, तर ही असली दुष्ट मीमांसा चालविली आहे तरी कशाला, हें सांगा.

शिष्य—परब्रह्माला अथवा जीवाला परमार्थतः संसारित्व आहे असेंही नाहीं किंवा पराचा म्हणजे आत्म्याचा अभाव व्यवहारतःही आहे, असेंही नाहीं. दोन्ही पक्ष दोषप्राप्त नाहींत. तिसरा पक्ष, 'तोच आनंदमयाकडे जातो' हा पक्ष, अदुष्टच आहे, असें शास्त्र सांगत आहे.

पूर्व०—शास्त्र सांगतें ना ? मग त्यावर श्रद्धा—अंधश्रद्धा—ठेवा आणि बसा स्वस्थ ही एवढी थोरली मीमांसा चालवितां कशाला व तुमचा कंठशोष आणि आमच. कर्णशोष करितां कशाला ?

सिद्धान्ती—असें काय म्हणतां ? शास्त्राचा, त्याचे मनोगताचा, निश्चय तर केला पाहिजे. शास्त्राला काय सांगावयाचें आहे, तें तरी ठाम समजून घेतलें पाहिजे. दोन्ही पक्षांत येणारे किंवा तुम्हीं आरोपित केलेले दोष अपरिहार्य असतील किंवा तिसरा पक्ष शास्त्रशुद्ध आहे, असें आपल्यास कळलें असेल, तर ही सर्व मीमांसा व्यर्थ होईल, हें खरें आहे; पण जोंपर्यंत शास्त्रार्थाचें अवधारण झालें नाहीं तोंपर्यंत आम्ही करीत आहोंत, ही मीमांसा सार्थच आहे. शास्त्रार्थाचा विनिश्चय करणें आहे, म्हणून ही चिंता, हें चिंतन व ही मीमांसा अर्थवती असलीच पाहिजे.

पूर्व०—चिंतन करा वाटेल तेवढें ! तुम्हांला निश्चित असा निर्णय सांगतां येणें अशक्यच आहे ?

सिद्धान्ती—कां हो बुआ ! 'निर्णय करूं नये' असें कांहीं वेदवचन गंवसलें आहे कीं काय तुम्हांला ?

पूर्व०—तसें नाहीं म्हणा !

सिद्धांती—मग 'निर्णयच करितां येणार नाहीं' असें कां म्हणतां ?

पूर्व०—अहो ! तुम्हाला अनेक प्रतिपक्ष्यांच्या अनेक आक्षेपांचें खंडन केलें पाहिजे. तेव्हां हें कसें शक्य आहे ! शिवाय, तुम्ही वेदप्रामाण्याचा आश्रय घेऊन एकत्व प्रतिपादणार. पण 'येथें नानात्व आहे, अनेकत्व आहे' असें प्रतिपादणारे अनेक वेदबाह्य सांख्यादि प्रतिपक्षी आहेत. म्हणून मला वाटतें निर्णय करण्याचा तुम्हाला प्रायः अशक्यच आहे.

सिद्धांती—फार उत्तम ! फार उत्कृष्ट !! मार्ग यांत तर अत्यंत कल्याणच आहे

शिष्य—तें कसें भगवन !

सिद्धान्ती—मी एकनिष्ठेनें सत्यवक्त्या वेदप्रमाणांचा आश्रय घेऊन एकत्वाची स्थापना करणार. आणि 'नानात्व'वादी जे प्रतिपक्ष आहेत, ते अनेक भिन्न भिन्न प्रमाणें घेऊन वाद करण्यास सिद्ध झाले, म्हणजे एक प्रतिपक्षी दुसऱ्याचें खंडण, दुसरा तिसऱ्याचें, असा प्रसंग येऊन, ते सर्व प्रतिपक्षी प्रत्येक आक्षेप व सर्व आक्षेप दुष्ट आहेत, असें ठरवून माझ्या वेदांतसंमत पक्षाचें मात्र समर्थन करणार ! अर्थात् ही संधि उत्तमच आहे, सर्व वेदबाह्य प्रतिपक्ष्यांचा पराभव करण्याची ! ठीक आहे, सर्व वेदबाह्य पक्षांचा पूर्ण समाचार घेऊन वेदमत स्थापण्यासाठीं मी आतां या मीमांसेला आरंभ करितों.

स एव तु स्याच्चद्भावस्य विवक्षितत्वात् । तद्विज्ञानन परमात्मभावो ह्यत्र विवक्षितो ब्रह्मविदाप्नोति परमिति । न ह्यन्यस्यान्यभावापत्तिरुपपद्यते । ननु तस्यापि तद्भावापत्तिरनुपपन्नैव । न । अविद्याकृततादात्म्यापोहार्थत्वात् । या हि ब्रह्मविद्यया स्वात्मप्राप्तिरुपदिश्यते साऽविद्याकृतस्यान्नादिविशेषात्मन आत्मत्वेनाध्यारोपितस्यानात्मनोऽपोहार्था।कथमेवमर्थताऽवगम्यते विद्यामात्रोपदेशात्। विद्यायाश्च दृष्टं कार्यमविद्यानिवृत्तिस्तच्चेह विद्यामात्रमात्मप्राप्तौ साधनमुपदिश्यते । मार्गविज्ञानोपदेशवदिति चेत्तदात्मत्वे विद्यामात्रसाधनोपदेशोऽहेतुः । कस्मात् । देशान्तरप्राप्तौ मार्गविज्ञानोपदेशदर्शनात् । न हि ग्राम एव गन्तेति चेत् । न, वैधर्म्यात् । तत्र हि ग्रामविषयं विज्ञानं नोपदिश्यते तत्प्राप्तिमार्गविषयमेवोपदिश्यते विज्ञानं; न तथेह ब्रह्मविज्ञानव्यतिरेकेण साधनान्तरविषयं विज्ञानमुपदिश्यते । उक्तकर्मादिसाधनापेक्षं ब्रह्मविज्ञानं परप्राप्तौ साधनमुपदिश्यत इति चेत् । न । नित्यत्वान्मोक्षस्येत्यादिना प्रत्युक्तत्वात् । श्रुतिश्च तत्सृष्ट्वा तदेवानुप्राविशदिति कार्यस्थस्य तदात्मत्वं दर्शयति । अभयप्रतिष्ठोपपत्तेश्च । यदि हि विद्यावान्स्वात्मनोऽन्यन्न पश्यति ततोऽभयं प्रतिष्ठां विन्दत इति स्याद्भयहेतोः परस्यान्यस्याभावात् ।

अन्यस्य चाविद्याकृतत्वे विद्ययाऽवस्तुत्वदर्शनोपपत्तिस्ताद्धि द्वितीयस्य चन्द्रस्य सत्त्वं यदतैमिरिकेण चक्षुष्मता न गृह्यते । नैवं न गृह्यत इति चेन्न सुप्तसमाहितयोरग्रहणात् । सुषुप्तेऽग्रहणमन्यासक्तवदिति चेत् । न । सर्वाग्रहणात् । जाग्रत्स्वप्नयोरन्यस्य ग्रहणात्स-

त्त्वमेवेति चेत् । न । अविद्याकृतत्वाज्जाग्रत्स्वप्नयोर्यदन्यग्रहणं जाग्रत्स्वप्नयोस्तदविद्याकृतमविद्याभावेऽभावात् ।

सुषुप्तेऽग्रहणमप्यविद्याकृतामिति चेत् । न । स्वाभाविकत्वात् । द्रव्यस्य हि तत्त्वमविक्रिया परानपेक्षत्वाद्विक्रिया न तत्त्वं परापेक्षत्वात् । न हि कारकपेक्षं वस्तुनस्तत्त्वं सतो विशेषः । कारकापेक्षो विशेषश्च विक्रिया । जाग्रत्स्वप्नयोश्च ग्रहणं विशेषः । यद्धि यस्य नान्यापेक्षं स्वरूपं तत्तस्य तत्त्वं यदन्यापेक्षं न तत्तत्त्वम् । अन्याभावेऽभावात् । तस्मात्स्वाभाविकत्वाज्जाग्रत्स्वप्नवन्न सुषुप्ते विशेषः ।

येषां पुनरीश्वरोऽन्य आत्मनः, कार्यं चान्यत्तेषां भयानिवृत्तिर्भयस्यान्यनिमित्तत्वात्सतश्चान्यस्याऽऽत्महानानुपपत्तिः । न चासत आत्मलाभः । सापेक्षस्यान्यस्य भयहेतुत्वमिति चेन्न तस्यापि तुल्यत्वात् । यदधर्माद्यनुसहायीभूतं नित्यमनित्यं वा निमित्तमपेक्ष्यान्यद्भयकारणं स्यात्त (त्,न, त) स्यापि तथाभूतस्याऽऽत्महानाभावाद्भयानिवृत्तिरात्महाने वा सदसतोरितरेतरापत्तौ सर्वत्रानाश्वास एव ।

एकत्वपक्षे पुनः सानिमित्तस्य संसारस्याविद्याकल्पित्वादोषः । तैमिरिकदृष्टस्य हि द्वितीयचन्द्रस्य नाऽऽत्मलाभो नाशो वाऽस्ति । विद्याविद्ययोस्तद्धर्मत्वमिति चेन्न प्रत्यक्षत्वात् । विवेकाविवेकौ रूपादिवत्प्रत्यक्षावुपलभ्येते अन्तःकरणस्थौ । न हि रूपस्य प्रत्यक्षस्य सतो द्रष्टृधर्मत्वम् । अविद्या च स्वानुभवेन रूप्यते मूढोऽहमविविक्तं मम विज्ञानमिति । तथा विद्याविवेकोऽनुभूयते । उपदिशन्ति चान्येभ्य आत्मनो विद्यां बुधाः । तथा चान्येऽवधारयन्ति तस्मान्नामरूपपक्षस्यैव विद्याविद्ये नामरूपे च नाऽऽत्मधर्मौ । " नामरूपयोर्निर्वहिता ते यदन्तरा तद्ब्रह्म " इति श्रुत्यन्तरात् । ते च पुनर्नामरूपे सवितर्यहोरात्रे इव कल्पिते न परमार्थतो विद्यमाने । अभेदे " एतमानन्दमयमात्मानमुपसंक्रामति " इति कर्मकर्तृत्वानुपपत्तिरिति चेन्न । विज्ञानमात्रत्वात्संक्रमणस्य । न जलूकादिवत्संक्रमणमिहोपदिश्यते किं तर्हि विज्ञानमात्रं संक्रमणश्रुतेरर्थः ।

ननु मुख्यमेव संक्रमणं श्रूयत उपसंक्रामती[ती]ति चेत् । न । [illegible]ऽदर्शनात् । न ह्यन्नमयमुपसंक्रामतो बाह्यादस्माल्लोकाज्जलू-

कावत्संक्रमणं दृश्यतेऽन्यथा वा। मनोमयस्य बहिर्निर्गतस्य विज्ञानमयस्य वा पुनः प्रत्यावृत्त्याऽऽत्मसंक्रमणमिति चेत्। न। स्वात्मनि क्रियाविरोधादन्योऽन्नमयमन्यमुपसंक्रामतीति प्रकृत्य मनोमयो विज्ञानमयो वा स्वात्मानमेवोपसंक्रामतीति विरोधः स्यात्। तस्मान्नाऽऽनन्दमयस्याऽऽत्मसंक्रमणमुपपद्यते। तस्मान्न प्राप्तिः संक्रमणं नाप्यन्नमयादीनामन्यतमकर्तृकं पारिशेष्यादन्नमयाद्यानन्दमयान्तात्मव्यतिरिक्तकर्तृकं ज्ञानमात्रं च संक्रमणमुपपद्यते। ज्ञानमात्रत्वे चाऽऽनन्दमयान्तःस्थस्यैव सर्वान्तरस्याऽऽकाशाद्यन्नमयान्तं कार्यं सृष्ट्वाऽनुप्रविष्टस्य हृदयगुहाभिसंबन्धादन्नमयादिष्वनात्मस्वात्माविभ्रमः संक्रमणेनाऽऽत्मविवेकविज्ञानोत्पत्त्या विनश्यति। तदेतस्मिन्नविद्याभ्रमनाशे संक्रमणशब्द उपचर्यते न ह्यन्यथा सर्वगतस्याऽऽत्मनः संक्रमणमुपपद्यते। वस्त्वन्तराभावाच्च। न च स्वात्मन एव संक्रमणम्। न हि जलूकाऽऽत्मानमेव संक्रामति। तस्मात्सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्मेति यथोक्तलक्षणात्मप्रतिपत्त्यर्थमेव बहुभवनसर्गप्रवेशरसलाभाभयसंक्रमणादि परिकल्प्यते ब्रह्मणि सर्वव्यवहारविषये न तु वस्त्वर्थतो निर्विकल्पे ब्रह्मणि काश्चिदपि विकल्प उपपद्यते।

तमेतं निर्विकल्पमात्मानमेवं क्रमेणोपसंक्रम्य विदित्वा न बिभेति कुतश्चनाभयं प्रतिष्ठां विन्दत इत्येतस्मिन्नर्थेऽप्येष श्लोको भवति। सर्वस्यैवास्य प्रकरणस्याऽऽनन्दवल्ल्यर्थस्य संक्षेपतः प्रकाशनायैष मन्त्रो भवति।

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यगोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यश्रीमच्छंकरभगवतः कृतौ तैत्तिरीयोपनिषदि द्वितीयब्रह्मवल्ल्यध्यायभाष्येऽष्टमोऽनुवाकः॥ ८॥

सिद्धान्ती—'तोच–परमात्मस्वरूपी जीवात्माच–उपसंक्रमण करितो' असें पूर्वपक्षाच्या शंकेला उत्तर असलें पाहिजे.

शिष्य—हें कसें?

सिद्धांती—जीवात्म्याला परमात्मभाव, परमात्मस्वरूप प्राप्त व्हावयाचें आहे, असें प्रतिपादन करण्याचें श्रुतिमनोगत आहे. ब्रह्मवेत्ता परमपद–प्राप्त होतो, ब्रह्म होतो' असें श्रुतिवाक्य आहे. अर्थात्, 'ब्रह्मविज्ञानानें परमात्मस्थिति मिळते,' असें श्रुतीला सांगावयाचें आहे. एक स्वरूप असतांना कोणाला दुसरें स्वरूप प्राप्त होईल, हें म्हणणें उप-

पन्न नाहीं व संभाव्यही नाहीं. जीवाचें ब्रह्मस्वरूप असतें, म्हणून तो त्या स्वरूपाला —ज्ञानद्वारा—जाऊन पोहोंचतो. मळाला कितीही धुतला, तरी त्याला आरशाचें रूप नाहीं प्राप्त होणार !

पूर्व०—पण जो ब्रह्मस्वरूप आहे, त्याला ब्रह्मरूपप्राप्ति होते, हें तरी काय म्हणणें ? 'आरसा आरसा झाला,' असें नाहीं, आपण म्हणत कधीं ! रासभाचा अश्व होत नाहीं, कबूल; पण 'अश्व अश्व झाला' हें तरी श्रुतीला कसें म्हणवतें व तुम्हांला कसें मानवतें ? कृपा करा आणि हा शब्दच्छल आतां टाकून द्या.

सिद्धान्ती—तुम्ही म्हणतां हें ठीक. पण तुम्ही अद्यापि सर्व बाजूंनीं विचार केला आहे, असें दाखवीत नाहीं. असो; श्रुतिमनोगत पहाः देह, इंद्रियें, मन इत्यादि ज्या वस्तू आत्मरूप नव्हत, ज्या केवळ येणाऱ्या जाणाऱ्या आहेत, स्वरूपात्मक नाहींत, त्या आत्मरूप आहेत, 'देह मी व देह माझा' हें जें अविद्येनें अयथार्थज्ञान उत्पन्न केलें आहे, तें अयथार्थज्ञान व त्याचें कारण अविद्या, या उभयतांच्या निरसनाप्रीत्यर्थ विद्याप्राप्ति करून घेणें व 'मीच आत्मा, परमात्मा आहें' असा निश्चय करून घेणें, हें कर्तव्य आहे. अर्थात् याची फलप्राप्ति म्हणजे ब्रह्मस्वरूपाची प्राप्ति होय. सारांश, 'ब्रह्मविद्येनें स्वात्मप्राप्ति, ब्रह्मप्राप्ति, होते' असें श्रुतिवाक्य आहे. यांत 'प्राप्ति' याचा अर्थ पहा, काय होतो तो. अन्नमयादि जे कोश सांगितले व जे प्रत्यक्ष अनुभवास येतात, ते आत्मरूपच आहेत, असा ज्यांचा अध्यारोप अविद्येनें आत्मरूपावर आपण करित असतों, त्यांचा, अध्यारोपांचा व तत्कारण अविद्येचा निरास करून स्वच्छ **आत्मरूप ओळखणें** म्हणजे **आत्मप्राप्ति करून घेणें होय.**

शिष्य—भलत्या ठिकाणीं ठेवल्यामुळें वस्तु नाहींशी झाली, हा समज ती वस्तु सांपडल्यावर नाहींसा होतो व ती वस्तु '**मिळाली**' असें म्हणतों; किंवा मळलेल्या आरशास घांसून पुसून स्वच्छ केल्यावर 'आरसा **आरसा झाला**' असें म्हणतों, तद्वतच 'आत्मरूपावर आरोपिलेल्या अनात्मक वस्तूंचा अपोह करून ज्ञानानें आत्मवस्तु **कळली**; म्हणजे ती वस्तु **'प्राप्त झाली'** असें म्हणावयाचें ! होय, नाहीं भगवन्!

सिद्धान्ती—बरोबर समजलास.

पूर्व०—पण, असाच 'आप्ति' शब्दचा अर्थ आहे, हें कशावरून ? जीवानें मार्गक्रमण करून स्वेतर जो परमात्मा त्याकडे जावयाचें नाहीं, हें कशावरून ?

सिद्धान्ती—कारण, विद्येचा मात्र उपदेश केला आहे. अविद्येची निवृत्ति करावी, हें विद्येचें कार्य आपण नित्यशः पाहतों. थोडेंसें लक्ष द्या. येथें ब्रह्मप्राप्तीला साधन काय सांगितलें आहे ? विद्या. विद्या अविद्यानिवर्तक आहे. कर्मांसारखी ती स्वर्गाला नेत नाहीं; किंवा उपासनेप्रमाणें ती कैलास-वैकुंठालाही नेत नाहीं. तर 'तूं आहे, तुजपाशीं' असें सांगून व शिकवून व पटवून ती मोकळी होते.

पूर्व०—तसें नाहीं. जीवाला 'ब्रह्माकडे जाण्याचा मार्ग विद्या दाखविते' असें कां नाहीं समजूं ? असें समजलें म्हणजे जीव निराळा व ब्रह्म निराळें, हें स्पष्ट होतें. पण, जीव जर परमात्मा आहे, स्वतः ब्रह्म आहे, असें तुमचें म्हणणें असेल, तर 'विद्या हेंच साधन आहे' हा उपदेश व्यर्थ आहे.

सिद्धान्ती—कांहो बोआ ?

पूर्व०—देशांतराला जावयाचें असेल, एका गांवाहून दुसऱ्या गांवास जाणें असेल, तर मार्गविज्ञानाचा उपदेश करितात. याप्रमाणें जीव स्वतः ब्रह्म नसेल, तरच विद्येचा मार्गोपदेश अभ्यासद्वारानें सफळ होतो. म्हणजे जीव मार्गक्रमण करून ब्रह्मपदार्थापर्यंत जातो. येथें विद्या हा हेतु होतो; पण, जीव स्वतःच ब्रह्म असेल, तर हा उपदेश अहेतुक आहे. गांवाला जाणारा गांव, गांव, हा जप करावा, असें समजत नाहीं व कोणी तसा उपदेशही करीत नाहीं. शिवाय; गांवही गंता नाहीं.

सिद्धान्ती—या तुमच्या दृष्टांतांत वैधर्म्य आहे, तें तुम्हांस विदित झालें नाहीं, तुमच्या लक्षांत आलें नाहीं. परग्रामाला जाण्याचे वेळीं 'तूंच (जाणाराच) गांव आहेस' असा उपदेश नसतो; आणि येथें तर 'हे जीवा, तूंच ब्रह्म आहेस' असा उपदेश स्पष्ट प्रतीत होतो. एवंच, उपदेशभिन्नता आहे, म्हणून दृष्टांतांची समता नाहीं, हें उघड आहे. शिवाय, तेथें **ग्रामासंबंधानें** उपदेश असत नाहीं; त्या ग्रामाला पोहोंचविणाऱ्या मार्गाचा उपदेश असतो. ग्रामप्रापक-मार्गाचें विज्ञान सांगतात, ग्रामाचें विज्ञान कोणी सांगत नाहीं. पण ब्रह्मविद्येमध्यें प्रकार कसा आहे बरें ? येथें ब्रह्मज्ञान-विज्ञानाव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही साधनाचा उपदेश असत नाहीं. येथें केवळ ब्रह्मस्वरूपाचें विज्ञान प्रतिपादिलेलें असतें.

पूर्व०—असें कां बरें ? परब्रह्मप्राप्तीला साध्य करून देणारें जें ब्रह्मविज्ञान आहे, तें सांगतांनाच त्याचें साधन म्हणून, साधनापेक्षी ब्रह्मविज्ञान आहे म्हणून, श्रुती विहित कर्मांचा व उपासनेचा उपदेश करीत असतात. नव्हे ?

सिद्धान्ती—अनेक वेळां या तुमच्या शंकेचें खंडन केलें असतांही ती महिरावणाप्रमाणें पुनः पुनः जिवंत होते, याचें तात्पर्य काय ? मोक्ष नित्य आहे, ब्रह्मस्वरूप नित्य आहे, तें अनित्यकर्मानें किंवा जीवकृत उपासनेनें उत्पन्न होत नाहीं, प्राप्त होत नाहीं, असें आम्ही किती वेळां सांगितलें आहे बरें ! तसेंच, येथील श्रुतिही नीट पहाः—'तें उत्पन्न करून त्यांतच स्वतः प्रवेश करिता झाला' यावरून उत्पन्न झालेलें दिसणारें कार्यही ब्रह्मात्मक आहे, तेथेंही ब्रह्मवास्तव्यच आहे, असें नाहींका स्पष्ट होत ? शिवाय एकत्व असल्या व्यतिरिक्त 'अभयप्रतिष्ठेची, पूर्ण निर्भयतेची' उपपत्ति व्हावयाची नाहीं. दुसरा कोणी भयहेतु जेव्हां नसेल, आत्मस्वरूपाव्यतिरिक्त दुसरा सत्य पदार्थ नाहीं, अशा विद्वानाचा निश्चय झाला असेल,

तेव्हां मात्र भ्रमात्मक भयहेतूचा निरास होऊन अभयाची प्रतिष्ठापना होते, हें विसरूं नका.

पूर्व०—दुसरा सत्य पदार्थच नाहीं, हें सिद्ध कराल किंवा नुसतें तोंडानेंच बोलाल!

सिद्धांती—अहो 'दुसरें आहे' असा जो भास होतो, तो अविद्यारूप आहे; व या भ्रांतीचा नाश विद्या करिते. ज्ञानानें नष्ट होणारी वस्तु परमार्थतः सत्य असत नाहीं. निर्दुष्ट नेत्राला दोन चंद्र दिसत नाहींत. या अनुभवावरूनच दोन चंद्र पाहणारे नेत्र दूषित आहेत व त्यांतील दुसरा चंद्र मिथ्या आहे, असें आपण म्हणतोंना!

पूर्व०—चंद्रदृष्टीनें तुम्ही बोललात हें ठीक. पण हा दृष्टांत ब्रह्मज्ञ–जीवन्मुक्ताच्या ठिकाणीं लागत नाहीं. पहा कीं, जीवन्मुक्ताला 'हें सर्व मिथ्या आहे, इंद्रजाल आहे' असा उपदेश होऊन तो ठसला असतांही त्याची भोजनादिकाकडे प्रवृत्ति होते. भोजनादि सर्व ईश्वराच्या लीलेनें उत्पन्न होतें. म्हणून त्या जीवन्मुक्ताला नित्य ईश्वर मानिलाच पाहिजे. एवंच 'जीवात्म्याशिवाय परमात्म आहे; व तो सत्य आहे,' हें मानिल्याशिवाय गत्यंतर नाहीं. म्हणून चंद्रदृष्टांत फसला; व दृष्टांतांतील दुसरा चंद्र खोटा, तसा दुसरा आत्माही खोटा, हें म्हणणें फसलें.

सिद्धान्ती—शाबास आहे तुमच्या चातुर्याची! असो; ज्या भोजनादि संसाराला व म्हणून तन्नियामक परमेश्वराला नित्य सत्य मानतो, त्यांचें भान नित्यज्ञानी जीवाला गाढ निद्रेंत किंवा समाधि–स्थितींत असतें काय? नाहीं. तेव्हां तें नित्य कसें व सत्य तरी कसें?

पूर्व०—'निद्रादिकांत भान नसतें' हा अनुभव सर्वसाधारण आहे खरा; पण येथें संसाराचें वा परमेश्वराचें भान नसतें, तें निद्रिस्थाचें व समाधिस्थाचें लक्ष दुसरीकडे गुंतलें असतें, म्हणून नसतें. अर्जुनासारख्या एकनिष्ठ धनुर्धाऱ्याला लक्ष्याशिवाय कांहीं दिसत नाहीं, म्हणून तें असत् आहे, असे नव्हें.

सिद्धान्ती—पण सुषुप्तींत कोणत्याच विषयाचें ग्रहण होत नाहीं. 'मला कांहीं कळत नव्हतें' असा तुमचाही अनुभव असेलच; नाहीं बरें? तेव्हां संसाराला नित्य सत्य कसें म्हणणार, सुषुप्त्यादिकांत ते संसारादि परमेश्वरान्त व्यभिचरित होतात, तर! अहो! निद्रेंत नसणारें तें असत्य असतें!

पूर्व०—पण बेबें आम्ही प्रतिप्रश्न करितों कीं, जागृतींत व स्वप्नांत जर अन्यवस्तु स्पष्ट दिसतात, तर त्या तरी खोट्या कां?

सिद्धान्ती—कारण, या अवस्था अविद्यारूप आहेत. म्हणून त्या त्या अवस्थांमधील पदार्थज्ञानही अविद्यात्मक आहे. विद्या प्राप्त झाली कीं, अविद्या आपल्या कार्यासह निवृत्त होते.

पूर्व०—अशीच सुषुप्तिही अविद्यात्मकच आहे. तेव्हां तेथील अभानही अविद्यात्मकच

सिद्धांती—नाहीं. येथें म्हणजे या अवस्थेंत विकार करणारी कोणतीच वस्तु नसल्यामुळें वस्तुस्वरूप अविकृत राहतें. अहंकारादि सर्व व्यावहारिक ज्ञानाचीं वैकारिक उपकरणें लीन झाल्यामुळें वस्तु असेल, तशीच असते. सुषुप्तींत भान नाहीं, म्हणून वस्तुतः आत्मव्यतिरिक्त वस्तुचें नाहीं. हें स्वभावतः सिद्ध होतें. अविकृत राहणें हें द्रव्याचें तत्त्व आहे. तत्त्व स्वतंत्र असतें. विकारिता (विक्रिया) परतंत्र असते.

शिष्य—म्हणजे तात्त्विक वस्तूला कर्ता, करण इत्यादि कारकांचा गंधही लागत नाहीं, ती स्वयंभू आणि स्वतंत्र असते.

सिद्धान्ती—होय; पण सद्वस्तूला जर विशेष स्थिति प्राप्त होईल, तर त्या विशेष-स्थितीला कारकाची अपेक्षा अवश्य असते.

शिष्य—' **आहेपणा**, अस्तित्व ' ही तात्त्विक वस्तु स्वतंत्र; पण ' **घोडा** आहे **गाडी** आहे, इत्यादि जे अस्तित्वाचे विशेष (**घोड्याचा** आहेपणा, **गाडीचा** आहे-पणा, इत्यादि) उत्पन्नविनष्ट होण्याला कर्ता, करण इत्यादिकांची आवश्यकता असते.

सिद्धान्ती—शाबास ! ठीक समजलास. आतां, तुम्हां उभयतांस हें समजेल कीं, विशेष म्हणजेच विक्रिया किंवा विकार होय. तेव्हां जागृति व स्वप्न यांत जें पदार्थ-ग्रहण होतें, तें सर्व विशेषात्मक असतें. सारांश, जें ज्याचें परापेक्ष स्वरूप नाहीं (जें वस्तूचें स्वयंभू स्वरूप आहे) तें त्याचें तत्त्व (तेंपणा) होय. एवंच अन्यापेक्ष-स्वरूप तत्त्व नाहीं, असें झालें. कारण संपलें कीं, हें स्वरूपही संपतें.

शिष्य—जास्वंदीच्या सहवासानें स्फटिकाला प्राप्त झालेली रक्तिमा स्फटिकाचें स्वरूप नव्हे; किंवा अतिरिक्त शीतप्रभावानें जलाला प्राप्त झालेली घनता (बर्फपणा) अथवा अतिशय उष्णतेनें प्राप्त झालेली बाष्पता (वाफपणा) हीं जशीं जलाचीं स्वरूपें नव्हत, तसेंच कारणानें उत्पन्न झालेला विकार किंवा विशेष, हें वस्तूचें तत्त्व नव्हे, हें स्पष्ट आहे.

सिद्धांती—आणि म्हणूनच अहंकार, बुद्धि इत्यादिकांची लीनता, पक्षीं अभाव, हें सुषुप्तीमध्यें नसल्यामुळें व साक्षीरूपानें विद्यमान असणारें आत्मस्वरूप स्वाभाविक असल्यामुळें तेथें जें व्यावहारिक वस्तूंचें अग्रहण असतें, तें स्वरूपात्मक असतें, सत्तात्मक असतें. जागृति व स्वप्न जें विशेष उत्पन्न करितात, ते येथें नसतात. म्हणून स्वरूपांत नसणारें जें अन्यत्व तें आभासिक, असत्य व अयथार्थ आहे. अर्थात् हें अत्याज्य आहे व ब्रह्म-ज्ञाला तर तें अन्यत्व विद्यमानच असत नाहीं. म्हणून ते सर्वथा ' अभय ' होतात; पण ' मी निराळा, ईश्वर निराळा, जगत् निराळें ' असें ज्याला भान असतें, त्याच्या भयाची निवृत्ति केव्हांही होत नाहीं. दुसरी वस्तु असली किंवा आहे, असें भान असलें, म्हणजे भय उत्पन्न होतें. बरें ? हें भय नाहींसें होईल, असें म्हणावें, तरी तेंही जुळत नाहीं. कारण, जोंपर्यंत अन्य वस्तु आहे, तोंपर्यंत हें भय असावयाचें आणि आत्मघात

होऊन भय संपेल म्हणावें, तर तो दुसरा आत्मा मरतो 'सद्वस्तुच असत् होतें' असा वेडगळ प्रलाप केल्यासारखें होतें. आणखी; दुसरें आहे, पण असत् आहे, असें कल्पिलें, तरी या दुसऱ्यापासून आत्मलाभ (निर्भयता) ही होत नाहीं. सद्रूपी आत्म्याला आत्मलाभ होतो, असें म्हणणें म्हणजे 'अश्वानें अश्वरूप मिळविलें' असें म्हणण्यासारखें आहे. आणि असद्रूपी असणारें जें भय तें आत्मस्वरूप म्हणजे निर्भय-निमित्त होतें, म्हणजे हालाहल विष स्वस्वभाव सोडून अमृतस्वरूप धारण करितें, असें म्हणण्यासारखें आहे. सारांश चित् (ज्ञान) आणि सत्ता (अस्तित्व) एवंरूपी आत्मस्वरूपाशिवाय परमार्थतः दुसरें कांहीं नाहीं. चित्-सत्ता-व्यतिरिक्त दुसरें कांहीं आहें, प्रधान आहे; किंवा ईश्वर आहे, असें म्हणणाऱ्या सांख्य-पंडितांस 'मुक्त पुरुष सर्वथा निर्भय होतो' या श्रुतिवाक्याची व्यवस्था कोणत्याही प्रमाणानें लाविता येत नाहीं. आणि स्वकल्पनेनें त्यांनीं सद्वस्तूचें किंवा असद्वस्तूचें अस्तित्व स्थापित केलें तर भयाची निवृत्ति होत नाहीं, नैयायिकाच्या ईश्वराचीही अशीच स्थिति ! तात्पर्य, द्वैतनिश्चय आहे, तोंपयत अभयप्राप्ति होत नाहीं.

पूर्व०—आम्ही मानलेला ईश्वर जेव्हां सापेक्ष असतो, तेव्हां मात्र तो जीवाला भय देणारा होतो. अन्यथा नाहीं.

शिष्य—म्हणजे काय ?

पूर्व०—जीवानें सत्कर्म केलें नाहीं, तर व असत्कर्म केलें तर जीवाला ईश्वराचें भय असतें. धर्माचरण केलें नाहीं, किंवा अधर्माचरण केलें, तर मात्र जीव ईश्वराच्या कोपाला पात्र होतात; पण जे साधु मुक्त झाले, त्यांना ईश्वराची भीति बाळगण्याचें कारण असत नाहीं. तात्पर्य, धर्मादिकांच्या अपेक्षेनें ईश्वर भयहेतु होतो. मुक्ताला ईश्वराची भीति नसते; व दुसरी वस्तु असूनही त्यांस अभयप्राप्ति होते.

सिद्धान्ती—तुम्हीं असें म्हटलें, तरी फलश्रुति एकच आहे. कारण धर्माधर्मादिकांचे साह्य घेऊन, तसेंच नित्य किंवा अनित्य निमित्तांची अपेक्षा करून जो तुमचा ईश्वर भयकारण होतो, तो सापेक्ष असला तरीही त्याची आत्महानि होत नाहीं; आणि त्यापासून उत्पन्न होणारें भय निवृत्त होत नाहीं. बरें ! त्याची आत्महानि होते, असें म्हणणें म्हणजे सत्स्वरूपी वस्तु असत् होते; आणि असत्स्वरूपी वस्तु सत् होते, असें म्हणण्यासारखें आहे. तात्पर्य, आत्म्याची हानि होते किंवा अनात्मा आत्मा होतो, असें म्हटलें कीं, सर्वत्र अविश्वास उत्पन्न होऊन कशाचाच कांहीं पत्ता लागावयाचा नाहीं.

शिष्य—यावरून एकत्व-पक्षच सत्य आहे, असें ठरतें.

सिद्धान्ती—होय. एक ब्रह्म मात्र वस्तु आहे, असा ज्यांचा निश्चय आहे, त्यांना दृष्टीनें पाहिलें असतां भयाची निवृत्ति होऊन अभयप्राप्ति होते. कारण, पर-

मार्थतः संसाररूपी कार्य अविद्येनें निर्माण होतें. अविद्येचा नाश विद्येनें करितां येतो. विद्या म्हणजे ब्रह्मज्ञान; तें झालें, म्हणजे संसार आपल्या कारणासह नष्ट होतो. आणि ब्रह्मज्ञ जीवाला अभयस्थिति प्राप्त होते.

पूर्व०—तथापि संसार ही दुसरी वस्तु आहेच कीं नाहीं ?

सिद्धांती—आम्हीं अनेक वेळां सांगितलें आहे कीं, हा दृश्यभास्य संसार म्हणजें डोळे विंघडलेल्या मनुष्यास दिसणाऱ्या दोन चंद्रासारिखा आहे. चंद्र एकच असतो. दुसरा चंद्र दिसतो, तो मिथ्या असतो. अर्थातच त्याला अस्तित्व आहे कीं नाहीं, हा प्रश्न अप्रस्तुत होतो. जो वस्तुतः मिथ्या आहे. त्याला अस्तित्व आहे, किंवा त्याच्या अस्तित्वाचा नाश झाला, हें म्हणणें आकिंचित्कर आहे. तात्पर्य, मायेनें उत्पन्न केलेला संसार वस्तुतः मिथ्या असल्यामुळें त्याच्यापासून वास्तविक भय उत्पन्न होणें शक्य नाहीं. अतएव ब्रह्मज्ञ पुरुष सर्वथा निर्भय असतो. ब्रह्म म्हणजे 'सत्य, ज्ञान आणि अनंत होय.'

पूर्व०—विद्या आणि अविद्या हे तरी ब्रह्माचे धर्म असले पाहिजेत ?

सिद्धांती—नाहीं. कारण या दोन्ही गोष्टी प्रत्यक्ष दिसतात. रूपरसादि जसें आपल्या नेत्रजिह्वादि इंद्रियांस गोचर होतात, त्याप्रमाणें विवेक आणि अविवेक (विद्या आणि अविद्या) अंतःकरणांत राहून प्रत्यक्ष होतात. प्रत्यक्ष असणाऱ्या रूपाला आपण केव्हांही तो आत्मधर्म आहे, असें म्हणत नाहीं. शिवाय 'मी मूढ आहें, माझें ज्ञान अस्पष्ट आहे' अशाप्रकारच्या स्वानुभवानें अविद्येचें रूप आपल्यास दिसत असतें. याचप्रमाणें विद्येनें उत्पन्न होणाऱ्या विवेकाचाही अनुभव येतो. तुम्हांस हेंही सांगावयास नको कीं, विद्वान् तत्त्वदर्शी आत्मविद्या शिष्यांस उपदेशितात; आणि शिष्यही त्या विद्येचें ग्रहण करितात. तात्पर्य, विद्या आणि अविद्या हे स्वस्वरूपानें प्रकट होतात आणि विद्या देतां घेतां येते, म्हणून सर्व इंद्रियागोचर जो आत्मा त्याचे हे धर्म होऊं शकत नाहींत. तर जेथें नामरूपांचा अंतर्भाव होतो, तेथेंच विद्याविद्येचाही अंतर्भाव होतो. म्हणजे हे अंतःकरणाचे धर्म आहेत, असें ठरतें. 'नामरूपांचें व्याकरण करणारें ब्रह्म आहे. ब्रह्मच त्यांस निर्माण करून सत्ता देतें. तीं नामरूपें ज्याच्यामध्यें आरोपित मात्र आहेत; तें ब्रह्म होय' ही श्रुति स्पष्ट सांगते कीं, नामरूपांस त्याचप्रमाणें विद्याविद्येस योग्यकाळीं **निर्माण करणाऱ्या** व किंचित्काल अस्तित्व देणाऱ्या ब्रह्माचें (आत्म्याचें) विद्याविद्या हे धर्म असणें शक्य नाहीं. पुनः सूर्यनिमित्तानें जशी दिनयामिनीची कल्पना सिद्ध होते, त्याप्रमाणें परब्रह्माच्या अधिष्ठानावर नामरूपांचा आरोप आपण कल्पनेनें करितों. नामरूपांस वास्तविक अस्तित्व नाहीं. तसेंच, विद्याविद्येसही वास्तविक अस्तित्व नाहीं. परब्रह्म एकरस आहे. तेथें गुणधर्मांचा संभव नाहीं.

पूर्व०—ब्रह्म एकरस आहे असें म्हणतां ? नव्हे ? आतां 'हा आनंदमय आत्म्याकडे संक्रमण करितो' अशी श्रुति आहे. ब्रह्म किंवा आत्मा अभिन्न असेल तर

संक्रमणाची क्रिया त्याला कशी करितां येईल ? आपल्याकडे आत्मा आपणच कसा जाईल ? पण श्रुति तर संक्रमण सांगते. तेव्हां तुम्ही ब्रह्म अभिन्न म्हणतां, तें योग्य दिसत नाहीं.

सिद्धान्ती—तुमची शंका व्यर्थ आहे. येथें संक्रमणाचा अर्थ विज्ञानमात्रत्व आहे. जलूका (जळु) एक स्थान सोडून दुसऱ्या स्थानाकडे जाते, तसें मुमुक्षु एक स्थान सोडून दुसऱ्या स्थानाप्रत जातो, हें येथें श्रुतीला सांगावयाचें नाहीं. संक्रमण म्हणजे **विज्ञान** असा श्रुतिगत अर्थ आहे.

पूर्व०—गौण अर्थ येथें कसा व्हावा ? संक्रमणाचा मुख्यार्थच घेतला पाहिजे. कारण ' उपसंक्रामति ' या शब्दांत उप म्हणजे समीप हा उपसर्ग आहे. समीप शब्द हा स्थानाचा बोध करितो. म्हणून येथें मुख्यार्थच घेतला पाहिजे.

सिद्धान्ती—नाहीं. तुमच्या अर्थाप्रमाणें अन्नमय-विषयक उपसंक्रमणाची व्यवस्था लागत नाहीं. अन्नमयाकडे जाणारा मुमुक्षु हा बाह्यलोकांपासून अन्नमयाकडे (स्वदेहादिकांकडे) जळूसारखा जातांना कधीं दिसत नाहीं. किंवा दुसऱ्या कोणत्यातऱ्हेनें येथें प्रवेश करितो, असेंही दिसत नाहीं.

शिष्य—पक्षी आपल्या घरट्यांत प्रवेश करितात. ही दुसरी तऱ्हा होय ना ?

पूर्व०—पण बाहेर जाऊन तेथील पदार्थ पाहणारा मनोमय किंवा विज्ञानमय आत्मा पुनः स्वस्थानामध्यें (अन्नमयांत) प्रवेश करितो. त्याप्रमाणेंच आत्मसंक्रमण आहे, असें म्हटल्यास बिघडतें काय ? दुःखी झालेला पुरुष आनंदमयकोशांत जातो, संक्रमण करितो, असें म्हणण्यास काय प्रत्यवाय आहे ?

सिद्धान्ती—एकरस अशा आत्म्यामध्यें कोणत्याही प्रकारचें कर्म होत नाहीं व होणें शक्य नाहीं, इतकाच काय तो प्रत्यवाय आहे. शिवाय, **एक कोणीतरी आत्मा दुसऱ्या** अन्नमय कोशाकडे उपसंक्रमण करितो; असा उपक्रम करून पुनः मनोमय आत्मा व विज्ञानमय आत्मा हे स्वस्वरूपाप्रत उपसंक्रम करितात, असा प्रकरण-विरोधि सिद्धांत सांगितल्याचा दोष उत्पन्न होतो ! त्याचप्रमाणें आनंदामयाचें आत्मसंक्रमण तुमच्या अर्थानें (एक जागा सोडून दुसऱ्या जागेकडे जाणें) जुळत नाहीं. म्हणून संक्रमण म्हणजे प्राप्ति नव्हे. तसेंच, अन्नमयादि कोणीही मुख्यार्थानें संक्रमण करीत नाहींत. तेव्हां शेवटचा पक्ष इतकाच राहिला कीं, अन्नमयापासून आनंदमयापर्यंतच्या आत्मव्यतिरिक्त अनात्मकांकडून सिद्ध झालेलें संक्रमण केवळ ज्ञानमात्रच असलें पाहिजे. संक्रमण म्हणजे ज्ञान. हा असा संक्रमणाचा अर्थ समजून घेतला म्हणजे आनंदमयाच्याही अंतर्यामीं राहणारें, तात्पर्य, सर्वांचें अंतर्यामीं असणारें, जें ज्ञान तें आकाशादि अन्नमयापर्यंतचीं सर्व कार्यें उत्पन्न करून त्यांत प्रवेश करितें, हें स्पष्ट होतें. ब्रह्म म्हणजे आत्मा. आत्म्याचा हृदयगुहेशीं अव्यभिचारी संबंध आहे. त्याचें

वास्तव्य हृदयगुहेंत मात्र व्यक्त होतें. असो; हृदयगुहेंत उपलब्ध होणारा आत्मा स्वरूपतः असतो. तथापि अन्नमयादि अनात्मक पंचकोशांचे ठिकाणीं आत्म्याचा आभास होतो. पण हा आभास किंवा भ्रम ह्या उपनिषदांत सांगितलेल्या संक्रमणात्मक विवेक-विज्ञानानें नाहींसा होतो. अविद्येनें उत्पन्न केलेल्या ह्या भ्रमनाशाचा स्पष्ट बोध होण्यासाठीं संक्रमण-शब्द लक्षणेनें उपयोजिला आहे.

शिष्य—खरेंच आहे. सर्वव्यापी जो आत्मा तो संक्रमण करितो, इकडे तिकडे जातो, असें म्हणतांच येत नाहीं. शिवाय, इकडे तिकडे जाण्याला दुसरी वस्तु नाहीं; व इकडे तिकडे म्हणजे आत्मव्यतिरिक्त आकाशही नाहीं.

सिद्धान्ती—तसेंच, अभिन्न आत्मा स्वतःमध्येंही संक्रमण करूं शकत नाहीं. शेवटीं, जलूका कधीं आपल्या स्वतःकडेच जातांना पाहिली आहे काय ? नाहीं. एवंच स्वतःकडे गमन नाहीं, स्वतःमध्यें गमन नाहीं, दुसरी वस्तु नाहीं आणि आत्मा सर्वव्यापी आहे; म्हणून जाण्याला जागा नाहीं. अतएव संक्रमणाचा अर्थ स्थानप्राप्ति नसून ज्ञान मात्र आहे.

शिष्य—एकंदर उपनिषदाचा फलितार्थ काय ?

सिद्धांती—विवेचनाचें तात्पर्य हें आहे कीं, सत्य, ज्ञान आणि अनंत हें ब्रह्माचें लक्षण श्रुतीनें सांगितलें. या लक्षणाची प्रतिपत्ति जीवास व्हावी; म्हणून त्याचें पुष्कळ होणें, सृष्टीमध्यें प्रवेश करणें, आनंदाचा लाभ करून घेणें, अभय असणें, संक्रमण करणें, इत्यादि गोष्टी-सर्व व्यवहारांचें अधिष्ठान व विषय असणाऱ्या ब्रह्माचे ठिकाणीं, ब्रह्मावर, आरोपित केल्या आहेत. आत्मप्रतिपत्ति व्हावी, म्हणून श्रुतीनें ही कल्पना-हीं कुसुममाला सिद्ध केली आहे. खरोखर पाहिलें असतां निर्विकल्प ब्रह्माचे ठिकाणीं कोणताही विकल्प उपपन्न होत नाहीं. असो; त्या ह्या निर्विकल्प आत्म्यानें अन्नमयादि क्रमानें ज्ञानविज्ञान करून घेऊन (उपसंक्रमण करून) जो ब्रह्मज्ञ झाला, त्याला भिण्याचें कारण किंवा भय कांहींच राहत नाहीं. तो अभयाचे ठिकाणीं प्रतिष्ठित होतो. त्याला अभयप्राप्ति होते. हाच अर्थ स्पष्ट करण्यासाठीं पुढील श्लोकांची योजना आहे. सारांश, ह्या आनंद-वल्ली-नामक प्रकरणाचा अर्थ संक्षेपानें प्रकाशित करण्यासाठीं ह्या मंत्राची योजना आहे.

आठवा अनुवाक संपूर्ण.

अथ ब्रह्मवल्ल्यध्याये नवमोऽनुवाकः ।

यतो वाचो निवर्तन्ते । अप्राप्य मनसा सह ।
आनन्दं ब्रह्मणो विद्वान् । न बिभेति कुतश्चनेति ।

एतꣳह वाव न तपति । किमहꣳ साधु नाकरवम् । किमहं पापमकरवमिति । स य एवं विद्वानेते आत्मानꣳ स्पृणुते । उभे ह्येवैष एते आत्मानꣳ स्पृणुते । य एवं वेद । इत्युपनिषत् ।

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि द्वितीये ब्रह्मवल्ल्यध्याये नवमोऽनुवाकः ॥ ९ ॥

अन्वय व अर्थः—मनसा सह अप्राप्य यतः वाचः निवर्तते, ब्रह्मणः आनंदं विद्वान् कुतश्चन न बिभेति, इति (मनासह वाणीला ब्रह्मस्थानापर्यंत जातां न आल्यामुळें मन आणि वाणी जेथून परत फिरतात, त्या ब्रह्मस्वरूपाचा आनंद विज्ञात झालेला पुरुष कोणत्याही कारणानें भीतिग्रस्त होत नाहीं. असा या श्लोकाचा अर्थ आहे) **ह वाव एतं न तपति** (या ब्रह्मज्ञाला कोणत्याही प्रकारचा ताप होत नाहीं) **किं अहं साधु न अकरवम्; किं अहं पापं अकरवम् इति** (मी पुण्यकर्म कां केलें नाहीं, तसेंच पापकर्म कां केलें, अशा प्रकारचा संताप त्याला होत नाहीं) **यः एवं विद्वान् एते आत्मानं स्पृणुते, उभे हि एव एते स एषः आत्मानं स्पृणुते** (अशा प्रकारचा जो विद्वान् पापपुण्याला आत्मस्वरूप करून टाकितो, तो हा या उभयतांसही आत्मस्वरूप देतो. **यः एवं वेद** (ज्याला हें ज्ञानविज्ञान झालें,—तो तापशून्य होतो— **इति उपनिषत्** (अशा प्रकारचें हें उपनिषदाचें रहस्य आहे) तात्पर्य ब्रह्मज्ञ पुरुषाला पापपुण्यापासून कोणत्याही प्रकारची भीति नसते. कारण तो मनोवाणीसही जें अगोचर तें ब्रह्म आणि त्याचा आनंद या स्वरूपास पावलेला असतो. म्हणजे तो ब्रह्मरूप आणि आनंदरूप होतो.

यतो यस्मान्निर्विकल्पाद्यथोक्तलक्षणादद्वयानन्दादात्मनो वाचोऽभिधानानि द्रव्यादिसविकल्पवस्तुविषयाणि वस्तुसामान्यान्निर्विकल्पेऽद्वयेऽपि ब्रह्मणि प्रयोक्तृभिः प्रकाशनाय प्रयुज्यमानान्यप्राप्याप्रकाश्यैव निवर्तन्ते स्वसामर्थ्याद्धीयन्ते । मन इति प्रत्ययो

विज्ञानम्। तच्च यत्राभिधानं प्रवृत्तमतीन्द्रियेऽप्यर्थे तदर्थे च प्रवर्तते प्रकाशनाय। यत्र च विज्ञानं तत्र वाचः प्रवृत्तिः। तस्मात्सहैव वाङ्मनसयोरभिधानप्रत्यययोः प्रवृत्तिः सर्वत्र। तस्माद्ब्रह्मप्रकाशनाय सर्वथा प्रयोक्तृभिः प्रयुज्यमाना अपि वाचो यस्मादप्रत्ययविषयादनभिधेयादृश्यादिविशेषणात्सहैव मनसा विज्ञानेन सर्वप्रकाशनसमर्थेन निवर्तन्ते तं ब्रह्मण आनन्दं श्रोत्रियस्यावृजिनस्याकामहतस्य सर्वैषणाविनिर्मुक्तस्याऽऽत्मभूतं विषयविषयिसंबन्धविनिर्मुक्तं स्वाभाविकं नित्यमाविभक्तं परमानन्दं ब्रह्मणो विद्वान्यथोक्तेन विधिना न बिभेति कुतश्चन निमित्ताभावात्। न हि तस्माद्विदुषोऽन्यद्वस्त्वन्तरमस्ति भिन्नं यतो बिभेति। अविद्यया यदोदरमन्तरं कुरुते। अथ तस्य भयं भवतीति ह्युक्तम्। विदुषश्चाविद्याकार्यस्य तैमिरिकदृष्टद्वितीयचन्द्रवन्नाशाद्भयनिमित्तस्य न बिभेति कुतश्चनेति युज्यते। मनोमये चोदाहृतो मन्त्रो मनसो ब्रह्मविज्ञानसाधनत्वात्। तत्र ब्रह्मत्वमध्यारोप्य तत्स्तुत्यर्थं न बिभेति कदाचनेति भयमात्रं प्रतिषिद्धमिहाद्वैतविषये न बिभेति कुतश्चनेति भयनिमित्तमेव प्रतिषिध्यते।

नन्वस्ति भयनिमित्तं साध्वकरणं पापक्रिया च। नैवम्। कथमित्युच्यते—

एतं यथोक्तमेवंविदम्। ह वावेत्यवधारणार्थौ। न तपति नोद्वेजयति न संतापयति। कथं पुनः साध्वकरणं पापक्रिया न च तपतीत्युच्यते। किं कस्मात्साधु शोभनं कर्म नाकरवं न कृतवानस्मीति पश्चात्संतापो भवत्यासन्ने मरणकाले। तथा किं कस्मात्पापं प्रतिषिद्धं कर्माकरवं कृतवानस्मीति च नरकपतनादिदुःखभयात्तापो भवति। ते एते साध्वकरणपापक्रिये एवमेनं न तपतो यथाऽविद्वांसं तपतः।

कस्मात्पुनर्विद्वांसं न तपत इत्युच्यते—

स य एवं विद्वानेते साध्वसाधुनी तापहेतू इत्यात्मानं स्पृणुते प्रीणयति बलयति वा परमात्मभावेनोभे पश्यतीत्यर्थः। उभे पुण्यपापे हि यस्मादेवमेष विद्वानेते आत्मानमात्मरूपेणैव पुण्यपापे स्वेन

विशेषरूपेण शून्ये कृत्वाऽऽत्मानं स्पृणुत एव। को य एवं वेद यथोक्तमद्वैतमानन्दं ब्रह्म वेद तस्याऽऽत्मभावेन दृष्टे पुण्यपापे निर्वीर्ये अतापके जन्मान्तरारम्भके न भवत इतीयमेवं यथोक्ताऽस्यां वल्ल्यां ब्रह्मविद्योपनिषत्सर्वाभ्यो विद्याभ्यः परमरहस्यं दर्शितमित्यर्थः। परं श्रेयोऽस्यां निषण्णमिति।

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यगोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यश्रीमच्छंकरभगवतः कृतौ तैत्तिरीयोपनिषदि द्वितीयब्रह्मवल्ल्यध्यायभाष्ये नवमोऽनुवाकः ॥ ९ ॥

सिद्धान्ती—निर्विकल्प ब्रह्माचें स्वरूप मागच्या अनुवाकांत सांगितलें आहे. त्याचें 'सत्य-ज्ञान-अनंतात्मक' लक्षण करून ब्रह्मरूप किंवा आत्मरूप हें अद्वितीय आनंदाचें सारसर्वस्व आहे, असेंही सांगितलें. या ब्रह्मस्वरूपापासून वाणी म्हणजे नामें परत फिरतात.

शिष्य—भगवन्! द्रव्यगुणकर्मादि सविकल्पक वस्तू या नामांचे विषय असतात. हीं वस्तुनामें किंवा हे शब्द ब्रह्मापासून परत फिरतात. ब्रह्म त्यांना गोचर होत नाहीं. शब्दस्पर्शादि दृश्यमास्य विषयांचे वाचक शब्द, अशब्द, अस्पर्श्य, इत्यादि प्रकारें सकल धर्मव्यतिरिक्त ब्रह्माला गोचर करूं शकत नाहींत. सविकल्पक-वस्तूंचे वाचक शब्दाला निर्विकल्पक ब्रह्म गोचर होत नाहीं, हें ठीकच आहे. पण मला हें समजत नाहीं कीं, ब्रह्मप्रकाशनाचें काम यांनीं पत्करलें तरी कसें?

सिद्धान्ती—अरे! दृश्यमास्य द्रव्यादि वस्तू आहेत, असें आपण व्यवहारांत समजतों. ब्रह्म हीही वस्तुच आहे. उभयतांमध्यें वस्तुत्व हा भाग सामान्य आहे. म्हणूनच निर्विकल्प आणि अद्वय ब्रह्मवस्तूचें प्रकाशन करण्यासाठीं ब्रह्मादि जीव अनेक शब्दांचा उपयोग करितात. पण ब्रह्मापर्यंत जाण्याची शब्दांची शक्ति नसल्यामुळें, ब्रह्मप्रकाशनाचें काम त्यांच्या आंवाक्याबाहेर असल्यामुळें, दृश्यमास्यवस्तूंचे वाचक शब्द येथें हतवीर्य होतात. जशी वाणीची गति तशीच मनाचीही गति होते.

शिष्य—मन म्हणजे प्रत्यय किंवा विज्ञान होय. हें विज्ञान नित्यशः वाणीचें सहचर असतें. जेथें जेथें वाणीची प्रवृत्ति होते, तेथें तेथें मनाचीही प्रवृत्ति होते.

सिद्धान्ती—इतकेंच काय? पण इंद्रियांस अगोचर असणारे पदार्थ वाणीला गोचर झाले, तर ते मनालाही गोचर होतात. जेथें शब्द तेथें प्रत्यय (विज्ञान) आणि जेथें विज्ञान तेथें शब्द, अशी या उभयतांची सहचारी प्रवृत्ति आहे.

शिष्य—तात्पर्य, जेथें वाचकशब्दाची प्रवृत्ति असते, तेथें वाच्य अर्थ प्रकट होतो आणि प्रकट झालेला वाच्यार्थ शब्दसाह्यानें प्रसिद्ध होतो.

सिद्धान्ती—सारांश, मनोवाणींची प्रवृत्ति साहचर्यानें असते. म्हणून ब्रह्म-स्वरूपाचे सामर्थ्यानें प्रकाशन करण्यासाठीं जीवांनीं शब्दांचा जरी उपयोग करण्याचा प्रयत्न केला; तथापि त्या शब्दांस मनासह (सर्व दृश्यभास्याचें प्रकाशन करण्यास समर्थ असणाऱ्या विज्ञानासह) परत फिरावें लागतें. कारण उघड आहे कीं, ब्रह्म हें विज्ञानाला किंवा शब्दाला किंवा इंद्रियाला गोचर होणारा विषय नव्हे. ब्रह्म अशब्द, अस्पर्श, अरूप, आणि बुद्धीच्याही पलीकडचें आहे. म्हणून मनोवाणींस अज्ञेय ब्रह्म-स्वरूप प्रकट करण्याचें सामर्थ्य नाहीं, त्यांनीं प्रयत्न केला तरी तो सर्व विफल होऊन त्यांस परत फिरावें लागतें. असो; अशा निर्विकल्प, अद्वितीय व सर्वागोचर ब्रह्म-स्वरूपाचा आनंद किंवा आनंदरूपी ब्रह्मस्वरूप—

शिष्य—भगवन्! चवथ्या अनुवाकांत सांगितल्याप्रमाणें जे वेदांतवेत्ते संसार-विन्मुख, वासनाशून्य व ज्ञानविज्ञानशाली पंडित असतात, त्यांस होणारा आनंद हाच ब्रह्मानंद होय. हें असें सांगितले आहे, तोच हा ब्रह्मस्वरूपी आनंद काय!

सिद्धान्ती—होय. शिवाय लक्षांत ठेव कीं, हा आनंद विषयविषयींच्या संयोगानें किंवा संबंधानें उत्पन्न होणारा आनंद नव्हे. तो नित्य (अविनाशि), स्वाभाविक (स्वयंसिद्ध), आणि अविभक्त (एकरस) असा असतो. हा आनंद म्हणजेच ब्रह्म-ज्ञांचा आत्मा होय. परमानंदच हा. असो; असा आनंद ज्या अधिकारी पुरुषाला वेदांतांच्या-श्रवण-मननादिकांनीं ज्ञात-विज्ञात झाला, त्याला कोठूनही भय प्राप्त होण्याचा संभव नसतो. भयाच्या निमित्ताचा (अज्ञानाचा) अभाव झाल्या नंतर 'उरला भेद न ज्या कांहीं, त्याला कोठें भय नाहीं,' अशी स्थिति होते. दुसरी वस्तुच जर नाहीं, तर विद्वानाला भयोत्पत्ति होणार तरी कशी! पण 'अज्ञानानें भेददृष्टि यत्किंचितूही उत्पन्न झाली, तर अज्ञानी पुरुषाला भय उत्पन्न होतें, हें योग्य आहे.' पण इकडे, जो ब्रह्मज्ञ पुरुष आहे, त्यानें अविद्येनें निर्माण केलेलें जें भय-कारण त्याचा ब्रह्मविद्येनें विनाश केला असल्यामुळें तो सर्वत्र निर्भय होतो, असेंच म्हणणें योग्य आहे.

शिष्य—आपल्या नेत्रांत कांहीं वैगुण्य आलें असतां किंवा डोळ्यांत अंगुली घातली असतां दोन चंद्र आपल्यास दिसतात; आणि वैगुण्य नाहींसें झालें किंवा बोट काढून घेतलें, म्हणजे एकचा एक चंद्र विद्यमान आहे, असें आपल्यास समजतें. अविद्येनें निर्माण केलेल्या वस्तू असत् आहेत, असें एकदां कळलें, म्हणजे सर्व भीति-कारणांचा निरास होतो.

सिद्धांती—बरोबरच आहे. एकच ब्रह्म आहे; आणि तें आपणच आहों, असें ज्ञान झालेला पुरुष सर्वथा निर्भय होतो.

पूर्व०—हाच मंत्र चौथ्या अनुवाकांत आला होता. नव्हे?

शिष्य—होय. आणि तेथें आपण असेंही सांगितलें होतें कीं, या मंत्राचा समग्र अर्थ आम्ही या मंत्राच्या अनुवाकांत करूं. चौथ्या अनुवाकांत या मंत्राचा अवतार कांहींएक हेतु मनांत ठेऊन केला होता, तो हाः ब्रह्मविज्ञानाचें मन हें एक साधन आहे. त्या मनावर ब्रह्मत्वाचा आरोप केला होता, तो केवळ मनाची योग्यता कळवावी व त्याची स्तुति करावी, अशा अर्थानें केला होता. तसेंच, तेथ विद्वानाला **भीति** उरत नाहीं, इतकेंच सांगण्याचा मतलब होता. पण येथें आपण सर्व अध्यारोपांचा निरास करून शुद्ध वस्तुस्थिति प्रकाशित करीत आहोंत; आणि विद्वानाला **भय उत्पन्न करणाऱ्या सर्व कारणांचा** निषेध करीत आहोंत. चौथ्या अनुवाकांत भयरूपी फलाचा निषेध केला. येथें भयकारणांचा म्हणजे भय-कार्यकारणांचा निषेध केला आहे. सारांश, विद्वानाला भय-कारण असत नाहीं व भयकार्य नसतें, असें येथें स्पष्ट करावयाचें आहे.

पूर्व०—अहो ! पुरुष कितीही विद्वान् झाला, तरी त्यानें पुण्यकर्म केलें नाहीं, आणि पापाचरण केलें, नित्य किंवा विहित कर्म केलें नाहीं; आणि निषिद्धाचरण केलें, तर त्याला भीत्युत्पादक दृष्टादृष्ट कारणें उत्पन्न होतातच.

सिद्धान्ती—नाहीं. नाहीं. कसें तें ऐका. आतांपर्यंत सांगितलेल्या मार्गानें ज्यानें ब्रह्मज्ञानविज्ञान करून घेतलें, त्याला कोणतीही गोष्ट ताप देत नाहीं किंवा उद्विग्न करीत नाहीं. अथवा त्याला तापही होत नाहीं.

पूर्व०—साधुकर्म केले नाहीं, तरी संताप होणार ! पापाचरण केलें, तरी संताप होणारच !

सिद्धान्ती—ऐका, सामान्यतः मरणकाल जसजसा जवळ येऊं लागतो तसतसा 'मी कां शुभकर्म केले नाहीं' असा पश्चात्ताप जीवाला होतो. त्याच प्रमाणें मी पापाचरण कां केलें ! आतां मला नरकवासांत होणारीं दुःखें प्राप्त होतील, अस भयभीत झालेल्या जीवास संताप होतो. हा असा सामान्य अनुभव आहे. पण पुण्याकरण आणि पापाचरण हीं दोन्हीं विद्वानाला, ब्रह्मज्ञाला, ताप देऊं शकत नाहींत अज्ञानी पुरुषाला हीं ताप देतील व देतात. पण विद्वान् या उभयतांसही अगोचर असतो

शिष्य—कां बरे विद्वानाला ताप होत नाहीं ?

सिद्धान्ती—कारण, हे दोन्ही तापहेतू विद्वानानें आत्मस्वरूप केलेले असतात उभयतांसही तो आत्मस्वरूपानें पाहत असतो. तेव्हां, ज्यापक्षीं आत्म्यानें आत्म्यालाच त्रास देणें संभवनीय नाहीं, त्यापक्षीं हे आत्मभूत झालेले तापहेतू ब्रह्मज्ञाचा आत्मभाव दृढ करण्यास किंवा त्याला आनंद देण्यास मात्र कारणीभूत होतात याप्रमाणें हे दोन्ही पुण्यपापरूपी तापहेतू आपले स्वतःचें विशेष स्वरूप नाहींसें करून म्हणजे पुण्याचें पुण्यत्व व पापाचें पापत्व शून्यरूप करून-हे उभयतां-

अस्तित्वस्वरूप म्हणजे ब्रह्मस्वरूप होतात, त्यांचें आगंतुक अनात्मत्व जाऊन त्यांस स्वाभाविक आत्मस्वरूप मिळतें. असो; आतांपर्यंत सांगितल्याप्रमाणें परमश्रेष्ठ, अद्वितीय, आनंदरूप जें ब्रह्म त्याचें ज्ञान-विज्ञान ज्याला झालें, त्याला पुण्य पापादिकांस आत्मस्वरूप देतां येतें. ब्रह्मज्ञाच्या दृष्टीनें ते निर्वीर्य होतात. संताप देण्याचें त्यांचें सामर्थ्य संपतें. अर्थातच धर्माधर्म निर्वीर्य झाल्यामुळें त्यांस पुनर्जन्माचा प्रसंग आणून ब्रह्मज्ञाला ताप देतां येत नाहीं. याप्रमाणें या वल्लींत अवतारिलेल्या ब्रह्मविद्याप्रतिपादक उपनिषदाचें यथासांग विवेचन झालें. इतर ज्या सर्व कांहीं विद्या आहेत, त्यांच्यापेक्षा हें उपनिषद् श्रेष्ठ आहे. कारण यांत विद्येचें परम रहस्य सांगितलें आहे. परमश्रेष्ठ जो मोक्ष त्याची गुरुकिल्ली या उपनिषदामध्यें सांठवून ठेवलेली आहे.

नववा अनुवाक संपूर्ण.

ब्रह्मानंदवल्ली समाप्त.

शांतिपाठ.

सह नाववतु । सह नौ भुनक्तु । सह वीर्यं करवावहै । तेजस्वि नावधीतमस्तु मा विद्विषावहै ।

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः । हरिः ॐ ।

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि द्वितीयो ब्रह्मवल्ल्यध्याय समाप्तः ॥ २ ॥

ब्रह्मविदिदमेकविꣳशतिरन्नादन्नारसमयात्प्राणो व्यानोऽपान आकाशः पृथिवी पुच्छꣳषड्विꣳशतिः प्राणं यजुर्ऋक्सामाऽऽदेशोऽथर्वाङ्गिरसः पुच्छं द्वाविꣳशतिर्यतः श्रद्धर्तꣳसत्यं योगो महोऽष्टादश विज्ञानं प्रियं मोदः प्रमोद आनन्दो ब्रह्म पुच्छं द्वाविꣳशतिरसन्नेवाष्टाविꣳशतिरसत्षोडश भीषाऽस्मादेकपञ्चाशद्यतः कुतश्चैकादश ॥

(ही अनुक्रमणिका आहे. पदसंख्याही येथें ग्रथित केली आहे. हें सर्व अध्येत्यांच्या व अध्यापकांच्या सोईसाठीं आहे, हें सांगणें नलगे)

अथ तृतीयो भृगुवल्ल्यध्यायः ।

तत्र प्रथमोऽनुवाकः ।

सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्माऽऽकाशादिकार्यप्रपञ्चमयान्तं सृष्ट्वा तदे-, वानुप्रविष्टं विशेषवदिवोपलभ्यमानं यस्मात्तस्मात्सर्वकार्यविलक्षण-मदृश्यादिधर्मकमेवाऽऽनन्दं तदेवाहमिति विजानीयादनुप्रवेशस्य तदर्थत्वात्तस्यैवं विजानतः शुभाशुभे कर्मणी जन्मान्तरारम्भके न भवत इत्येवमानन्दवल्ल्यां विवक्षितोऽर्थः । परिसमाप्ता च ब्रह्म-विद्या । अतःपरं ब्रह्मविद्यासाधनं तपो वक्तव्यमन्नादिविषया चोपासनान्यनुक्तानीत्यत इदमारभ्यते—

सिद्धान्ती—आपण मागच्या वल्लींत सिद्ध केलें कीं, (१) ' ब्रह्म हें सत्य, ज्ञान आणि अनंत या स्वरूपाचें आहे. (२) आकाशापासून अन्नमयापर्यंतचीं सर्व कार्यें उत्पन्न केल्यासारखें करून व विशेष-स्वरूप घेतल्यासारखें करून त्या कार्यांतच आपण स्वतः ब्रह्म शिरलें झालें. आणि (३) विशेषस्वरूपीच जणों आहे, असें प्रकट झालें. हें असें सिद्ध होतें म्हणून, निर्विशेष ब्रह्म सविशेषस्वरूपानें जीवांस प्रकट होतेंसें दिसतें; म्हणून, आपल्यास असें समजून घेतलें पाहिजे कीं, हें सर्वकारण ब्रह्म सर्वकार्यविल-क्षण आहे, कार्याचे दृश्यत्वादि गुणधर्म त्यांत नाहींत, ब्रह्माचें स्वरूप ' अदृश्य, निराधार, स्वतंत्र, निर्गुण ' इत्यादि प्रकारचें शुद्ध आनंदरूपच असलें पाहिजे. तसेंच जीवात्म्यानें हेंही समजून घेतलें पाहिजे कीं, तें ब्रह्मस्वरूप मीच आहें. ' कार्य उत्पन्न करून मग त्यांत प्रवेश केला ' हे वाक्यच स्पष्ट सांगतें कीं, ब्रह्म कार्य-विलक्षण आहे, जीवही स्वरूपतः कार्य-विलक्षण आहे, म्हणून तोही आनंदरूपच असला पाहिजे. हें ब्रह्मस्वरूप म्हणजे स्वस्वरूप ज्याला समजतें, त्याला जन्ममरण देणारीं (पुनः जन्म देणारीं) पुण्यपापात्मक कर्मांपासून बाधा होत नाहीं; व त्याला हीं कर्में विहित करण्याचा कोणालाहो अधिकार नाहीं. हा सिद्धांत या ब्रह्मवल्लीमध्यें (आनंदवल्लीमध्यें) विशद करून सांगितला आहे.

शिष्य—म्हणजे ब्रह्मस्वरूप व आत्मस्वरूप एक आहे, जीवात्मैक्य असून तें सर्व दृश्यविलक्षण आहे, कर्माकर्माचा, व जन्ममरणाचा, त्याला संबंध नाहीं व तें आनंदरूप आहे, इतका अर्थ ब्रह्मवल्लींत सांगितला.

सिद्धान्ती—तात्पर्य, ब्रह्मविद्येचें व्याख्यान संपलें. ब्रह्मस्वरूपाविषयीं शास्त्रांचें न्यायानें काहीं होईना, पण श्रुतीला जें काय सांगतां येण्यासारखें होतें, तें तिनें सांगि-

तलें. आतां, या वल्लींत ब्रह्मविद्येचें साधन जें तप (पदार्थांचें स्वरूप समजून घेऊन विचार करणें) त्याचें व्याख्यान करणें इष्ट आहे. पदार्थांचें व्याख्यान झालें, म्हणजे वाक्यार्थ उत्तम समजतो.

पूर्व०—म्हणजे आतां उपासनामार्ग सांगावयाचा.

सिद्धांती—नाहीं, नाहीं. अन्नादि-विषयात्मक उपासना तर मागेंच सांगितल्या; आतां विद्याश्रवण झाल्यानंतर मनननिदिध्यास इत्यादि साधन-संबंधाचें व्याख्यान श्रुति करणार आहे. प्रथम शांतिपाठ आहे.

हरिः ॐ ।

सह नाववतु । सह नौ भुनक्तु । सह वीर्यं करवावहै । तेजस्वि नावधीतमस्तु मा विद्विषावहै ।

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।

(शांतिपाठ मंत्राचा-अर्थ मागें झालाच आहे)

भृगुर्वै वारुणिः । वरुणं पितरमुपससार । अधीहि भगवो ब्रह्मेति । तस्मा एतत्प्रोवाच । अन्नं प्राणं चक्षुः श्रोत्रं मनो वाचमिति । तꣳ होवाच । यतो वा इमानि भूतानि जायन्ते । येन जातानि जीवन्ति । यत्प्रयन्त्यभिसंविशन्ति तद्विजिज्ञासस्व । तद्ब्रह्मेति । स तपोऽतप्यत । स तपस्तप्त्वा ।

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि तृतीये भृगुवल्ल्यध्याये प्रथमोऽनुवाकः ॥ १ ॥

अन्वय व अर्थः—**वारुणिः भृगुः वै वरुणं पितरम् उपससार** (वरुणाचा मुलगा भृगु हा आपल्या पित्याकडे गेला-आणि-) **भगवः ब्रह्म अधीहि इति** (हे भगवन्, मला ब्रह्माचा उपदेश करा, अशी त्यानें वरुणाची प्रार्थना केली, वरुणाला प्रार्थनापूर्वक विनंति केली) **तस्मै एतत्**

प्रोवाच (वरुणानें त्याला हें सांगितलें) **अन्नं, प्राणं, चक्षु, श्रोत्रं मनः वाचम् इति** (' अन्न, प्राण, नेत्र, कर्ण, मन आणि वाणी—हीं ब्रह्मोपलब्धीचीं साधनें आहेत. असें वरुणानें प्रथम सांगितलें) **तं ह उवाच** (पुढें वरुणानें भृगूला सांगितलें) **इमानि भूतानि यतः वै जायन्ते** (जेथून हीं सर्व भूतें उत्पत्ति पावतात) **येन जातानि जीवन्ति** (ज्याच्या सत्तेनें हीं उत्पन्न झालेलीं भूतें स्थित होतात, जगतात) **यत् प्रयन्ति, अभिसंविशंति** (शेवटीं जिकडे जातात व प्रवेश करून एकस्वरूप होतात, तादात्म्य पावतात) **तत् विजिज्ञासस्व** (तें जाणून घे) **तत् ब्रह्म, इति** (तेंच ब्रह्म आहे; हा उपदेश भृगूला वरुणानें केला) **सः तपः अतप्यत** (त्या वारुणीनें तपश्चर्या केली) **सः तपः तप्त्वा** (त्यानें तपश्चर्या केल्यानंतर त्याला पुढें कळलें)

आख्यायिका विद्यास्तुतये, प्रियाय पुत्राय पित्रोक्तेति—भृगुर्वै वारुणिः । वैशब्दः प्रसिद्धानुस्मारको भृगुरित्येवंनामा प्रसिद्धोऽनुस्मर्यते । वारुणिर्वरुणस्यापत्यं वारुणिर्वरुणं पितरं ब्रह्म विजिज्ञासुरुपससारोपगतवान् । अधीहि भगवो ब्रह्मेत्यनेन मन्त्रेण । स च पिता विधिवदुपसन्नाय तस्मै पुत्रायैतद्वचनं प्रोवाच । अन्नं प्राणं चक्षुः श्रोत्रं मनो वाचमिति । अन्नं शरीरं तदभ्यन्तरं च प्राणमत्तारमुपलब्धिसाधनानि चक्षुः श्रोत्रं मनो वाचमित्येतानि ब्रह्मोपलब्धौ द्वाराण्युक्तवान् । उक्त्वा च द्वारभूतान्येतान्यन्नादीनि तं भृगुं होवाच ब्रह्मणो लक्षणम् । किं तत् यतो यस्माद्वा इमानि ब्रह्मादीनि स्तम्बपर्यन्तानि भूतानि जायन्ते । येन जातानि जीवन्ति प्राणान्धारयन्ति वर्धन्ते । विनाशकाले च यत्प्रयन्ति यद्ब्रह्म प्रतिगच्छन्ति, अभिसंविशन्ति तादात्म्यमेव प्रतिपद्यन्ते । उत्पत्तिस्थितिलयकालेषु यदात्मतां न जहति भूतानि तदेतद्ब्रह्मणो लक्षणम् । तद्ब्रह्म विजिज्ञासस्व विशेषेण ज्ञातुमिच्छस्व । यदेवंलक्षणं ब्रह्म तदन्नादिद्वारेण प्रतिपद्यस्वेत्यर्थः । श्रुत्यन्तरं च—" प्राणस्य प्राणमुत चक्षुषश्चक्षुरुत श्रोत्रस्य श्रोत्रमन्नस्यान्नं मनसो ये मनो विदुस्ते निचिक्युर्ब्रह्म पुराणमग्र्यम् " इति ब्रह्मोपलब्धौ द्वाराण्येतानीति दर्शयति ।

स भृगुर्ब्रह्मोपलब्धिद्वाराणि ब्रह्मलक्षणं श्रुत्वा पितुस्तपो ब्रह्मोपलब्धिसाधनत्वेनाप्तप्यत तप्तवान् । कुतः पुनरनुपदिष्टस्यैव तपसः साधनत्वप्रतिपत्तिर्भृगोः सावशेषोक्तेरन्नादिब्रह्मणः प्रतिपत्तौ द्वारं लक्षणं च यतो वा इमानीत्याद्युक्तवान् । सावशेषं हि तत्साक्षाद्ब्रह्मणोऽनिर्देशात् । अन्यथा हि स्वरूपेणैव ब्रह्म निर्देष्टव्यं जिज्ञासवे पुत्रायेदमित्थंरूपं ब्रह्मेति । न चैवं निरदिशत्किं तार्हि सावशेषमेवोक्तवान् । अतोऽवगम्यते नूनं साधनान्तरमप्यपेक्षते पिता ब्रह्मविज्ञानं प्रतीति । तपोविशेषप्रतिपत्तिस्तु सर्वसाधकतमत्वात्, सर्वेषां हि नियतसाध्यविषयाणां तप एव साधकतमं साधनमिति हि प्रसिद्धं लोके । तस्मात्पित्राऽनुपदिष्टमपि ब्रह्मविज्ञानसाधनत्वेन तपः प्रतिपेदे भृगुः । तच्च तपो बाह्यान्तःकरणसमाधानं तद्द्वारकत्वाद्ब्रह्मप्रतिपत्तेः ।

"मनसश्चेन्द्रियाणां च ह्यैकाग्र्यं परमं तपः ।
तज्ज्यायः सवधर्मेभ्यः स धर्मः पर उच्यते" इति स्मृतेः ।
स च तपस्तप्त्वा ।

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यगोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यश्रीमच्छंकरभगवतः कृतौ तैत्तिरीयोपनिषदि तृतीयभृगुवल्ल्यध्यायभाष्ये प्रथमोऽनुवाकः ॥ १ ॥

सिद्धांती—प्रथमतः विद्येची स्तुति करण्यासाठीं व आपल्यास जें सांगावयाचें आहे, त्याचा प्रवेश सौकर्यानें करण्यासाठीं श्रुतीनें भृगुवारुणीची गोष्ट सांगितली आहे.

शिष्य—वे म्हणजे सर्वप्रसिद्ध गोष्ट. ही गोष्ट म्हणजे पित्यानें आपल्या प्रिय अपत्याला उपदिष्ट केलेलें ब्रह्मरूपकथन! पण या गोष्टीचें रहस्य काय ?

सिद्धान्ती—ज्ञानी पिता आपल्या प्रियपुत्राला सांगणार, तें त्याच्या कल्याणाचेंच सांगणार. तेव्हां त्यानें केलेल्या उपदेशाप्रमाणें कोणताही अधिकारी जीव चालला तर त्याचेंही कल्याण होईल, असें सहज सांगून या विषयाकडे साधकांचें पूर्ण लक्ष वळावें, एतदर्थ ही आख्यायिका सांगितली. असो; वरुणाचा पुत्र वारुणि भृगु होता, हें तर सर्वप्रसिद्धच आहे.

शिष्य—मंत्रांत 'वै' पदाची योजना प्रसिद्ध्यर्थक आहे. वेदप्रसिद्ध जो भृगुऋषि त्याचेंच या 'वै' नें स्मरण होतें.

सिद्धान्ती—एकदा हा भृगु वरूणपित्याकडे गेला. कशाला? त्याला ब्रह्मवस्तु काय आहे, हें समजून घेण्याची उत्कट इच्छा झाली, म्हणून तो आपल्या विद्वान् पित्याजवळ ब्रह्मजिज्ञासेनें गेला; आणि 'हे भगवन्, मला ब्रह्मस्वरूप अध्यापित करा' असें विधि-मंत्रपूर्वक म्हणाला. अध्यापित करा म्हणजे शिकवा, सांगा, असा अर्थ होतो. आतां 'भगवन्' हा शब्द, हें संबोधन, 'अधीहि' हें समंत्रक पद, इत्यादिवरून असें तात्पर्य निघतें कीं, भृगु हा आपल्या पित्यासन्निध गेला, तो ब्रह्मविद्यार्थानें गुरुसंनिध जाण्याचा जो विधि सांगितला आहे, त्याचें अनुपालन करूनच गेला. असो; यथाविधि प्राप्त झालेला आपला ब्रह्मजिज्ञासु पुत्र पाहून पिता अनुग्रहपूर्वक म्हणालाः-'हे मुमुक्षु पुत्रा, अन्न, प्राण, चक्षु, कर्ण, मन आणि वाणी, यांचें स्वरूप यथास्थित समजून घे.

पूर्व०—अहो, ब्रह्मस्वरूपाच्या गोष्टींत अन्नादिकांचा आगंतुक प्रवेश कशाला?

सिद्धान्ती—ऐका; अन्न म्हणजे शरीर, सर्व जडवस्तू, सर्व उपभोग्य पदार्थ होत. त्या जडाचा अंतर्यामी प्राण असून तोच त्याचा भोक्ता आहे. त्या प्राण्याच्या जवळ नेत्र, कर्ण, मन, वाणी हीं ज्ञानसाधनें आहेत. तेव्हां भोग्य अन्न, भोक्ता प्राण व नेत्रादि ज्ञानसाधनें व कर्मसाधनें या सर्वांचें स्वरूप समजून घेतलें म्हणजे ब्रह्मप्रासादाच्या द्वारांचें ज्ञान होतें, असें झालें.

शिष्य—ज्याला ब्रह्मस्वरूप समजून घ्यावयाचें असेल, त्यानें प्रथम जडस्वरूप, नंतर कर्ता, भोक्ता प्राण व पुढें ज्यांच्या द्वारा ज्ञानाची व कर्मांची उपस्थिति होते, तीं अंतर्बाह्य इंद्रियें, यांचें स्वरूप समजून घेतलें पाहिजे. या मार्गानें जाणें अवश्य आहे, असें श्रुतीला सांगावयाचें आहे.

सिद्धान्ती—हीं द्वारें मात्र आहेत, हें विसरतां कामाचें नाहीं. असो; या अन्नादि द्वारभूत पदार्थांचा उल्लेख करून वरुणानें भृगूला ब्रह्मस्वरूपाचें वर्णन करणारें एक सर्वसामान्य लक्षण सांगितलें. तें हें: ब्रह्मादिस्तंबपर्यंत यच्च यावत् पदार्थ ज्या अधिष्ठानापासून उत्पन्न होतात, ज्याच्या सत्तेनें हे सर्व पदार्थ प्राणधारण, स्वरूपधारण, करितात, व विकसित होतात, क्षीण झाल्यावर ज्या महद्वस्तूकडे आकर्षित होतात; व शेवटीं ज्या स्वकारणांत लीन होऊन तादात्म्य पावतात, तें हा त्वां विचारलेल्या ब्रह्माचें लक्षण आहे. सारांश, उत्पत्त्यादि तिन्ही अवस्थांत भूतांस ज्याचें नियामकत्व सुटत नाहीं, जें या चराचरसृष्टीच्या तिन्ही अवस्थांत आत्मरूपानें विद्यमान असून पुनः स्वतः निर्विकार किंवा अवस्थात्रयविलक्षण असतें, तें ब्रह्मलक्षण होय.

शिष्य—ज्याच्या सत्तेनें पदार्थांस अवस्थात्रय प्राप्त होतें, पण जें स्वतः या [illegible] पलीकडे राहून त्यांचें नियमन करितें, तें ब्रह्म म्हणावयाचें!

[illegible]न्ती—'तें हें ब्रह्म होय' असें विशेषतः समजून घे, हा वरुणाचा उपदेश होता.

पूर्व०—विशेषतः म्हणजे ?

सिद्धान्ती—उत्पत्तिस्थितिलयकारण जें निर्विशेष ब्रह्म आहे, त्याचें ज्ञान अधिकारानुसार करून घ्यावें, अशी इच्छा असेल, तर अन्नप्राणादि विशेषस्वरूपी द्वारांनी क्रमशः सत्स्वरूप-ब्रह्माचें ज्ञानविज्ञान करून घ्यावें, हा इत्यर्थ आहे.

पूर्व०—हा जो क्रममार्ग सांगत आहां, याला कांहीं आधार ?

सिद्धान्ती—' हा प्राणाचा प्राण, नेत्राचा नेत्र, कर्णाचा कर्ण, अन्नाचें अन्न, मनाचें मन आहे ' असें ज्यांस निश्चयानें ज्ञान झालें, त्यांनाच अनादि, अनंत व सर्वश्रेष्ठ ब्रह्माचें ज्ञानविज्ञान होऊन पूर्ण साक्षात्कार होतो ' असें सांगून केनोपनिषन्मंत्रानें स्पष्ट केलें आहे कीं, नेत्रकर्णादि ब्रह्मोपलब्धीचीं द्वारें, (मार्ग) आहेत. असो; याप्रमाणें ब्रह्मोपलब्धीचे मार्ग व ब्रह्माचें लक्षणही स्वपित्याजवळून समजून घेऊन भृगु तपश्चर्या करिता झाला.

पूर्व०—तपश्चर्या! हें कसलें तप ?

सिद्धान्ती—ब्रह्माच्या उपलब्धीचें तप हें साधन आहे.

पूर्व०—पण वरुणानें तपाचा जर मुळीं उल्लेखच केला नाहीं, उपदेशच केला नाहीं, तर भृगूला तरी कसें समजलें कीं, ' तप हें ब्रह्मप्राप्तीचें साधन आहे ' म्हणून ?

सिद्धान्ती—अहो, वरुणाची उक्ति सावशेष होतीना ? म्हणजे वरुणानें ' अन्नादि हीं ब्रह्मोपलब्धीचीं द्वारें आहेत व ' जेथून हीं सर्वभूतें ' इत्यादि सर्व-कारण ब्रह्म आहे', इतकेंच सांगितलें. तें ' ब्रह्म हें ' असा साक्षात् निर्देश केलाच नाहीं. तेव्हां द्वारें समजलीं, लक्षण ठाऊक झालें, तरी ब्रह्मपदार्थ कोणता ? हें ठरविण्याचें काम अवशिष्टच राहिलें. हाच सावशेष उपदेश होय. अर्थात् ब्रह्मरूपाचें ज्ञानविज्ञान साक्षात्कृत करून घेण्यासाठीं भृगूला तपश्चर्या करणें अवश्यच होतें. वास्तविक पाहिलें असतां ब्रह्माचें स्वरूप 'हें असें असें आहे' असा प्रेमळ पित्यानें ब्रह्मजिज्ञासु प्रियपुत्राला उपदेश करावयाचा. असा निःशेष उपदेश झाला असता, तर तपश्चर्येचें कारण नव्हतें. पण उपदेश तर तसा झाला नाहीं, सावशेष झाला, म्हणून तप अवश्य झालें: ब्रह्मविज्ञान करून घेण्याला नुसत्या उपदेशानें कार्य होत नाहीं, इष्टप्राप्ति होत नाहीं; त्याला अन्य साधन हवें असतें, हें पित्याला विदित होतें, म्हणून त्यानें सावशेष उपदेश केला—

शिष्य—स्वतः विशेष साधनाचा आश्रय केल्याखेरीज ब्रह्मप्राप्ति होत नाहीं, हें सर्वश्रुतच आहे. ब्रह्म स्वसंवेद्य आहे. ' तें असें असें आहे ' म्हणून समजावयाचें नाहीं. साखरेचें वर्णन वाटेल तितकें केलें, तरी तिची गोडी स्वतः चाखल्याशिवाय समजतच नाहीं.

सिद्धांती—हें सर्व पित्याला विदित होतें. असो; कोणत्याही निश्चितसाध्य विषयांच्या साधनापेक्षां तप हें अत्यंत श्रेष्ठ साधन आहे. सर्वसाधनश्रेष्ठ आहे, हें जगद्वि-

ख्यात आहे; म्हणून भृगूनें तपाचा आश्रय केला. हेंहीं सुसंगतच आहे. वडिलांनीं 'तप कर' असें सांगितलें नव्हतें, तरी भृगूनें तपोव्रताचा आश्रय केला, हें सुसंगतच होय.

शिष्य—हें तप म्हणजे बाह्य आणि आंतर करणांचें म्हणजे मनासह सर्व इंद्रियांचें समाधान होय.

सिद्धान्ती—हीं शांत झालीं, विषयविरक्तीनें स्नात झालीं, म्हणजे त्या त्या द्वारानें ब्रह्मप्रतिपत्ति होते.

पूर्व०—हें कसें?

सिद्धान्ती—'मनाचें व इंद्रियांचें ऐकाग्र्य होणें, सर्व अंतर्बाह्य इंद्रियें एकनिष्ठ असणें, हेंच परम तप होय. सर्व धर्मांहून हा एकनिष्ठकारी तपोधर्म सर्वश्रेष्ठ आहे, असें विद्वान् लोक म्हणतात.' अशी स्मृति प्रमाण आहे. असो. याप्रमाणें तपश्चर्या करून—इत्यादि वर्तमान पुढील अनुवाकांत सांगतील.

प्रथम अनुवाक संपला.

अथ भृगुवल्ल्यध्याये द्वितीयोऽनुवाकः ।

अन्नं ब्रह्मेति व्यजानात् । अन्नाद्ध्येव खल्विमानि भूतानि जायन्ते । अन्नेन जातानि जीवन्ति । अन्नं प्रयन्त्यभिसंविशन्तीति । तद्विज्ञाय । पुनरेव वरुणं पितरमुपससार । अधीहि भगवो ब्रह्मेति । तꣳ होवाच । तपसा ब्रह्म विजिज्ञासस्व । तपो ब्रह्मेति । स तपोऽतप्यत । स तपस्तप्त्वा ।

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि तृतीये भृगुवल्ल्यध्याये द्वितीयोऽनुवाकः ॥ २ ॥

अन्वय व अर्थ—'अन्नं ब्रह्म' इति व्यजानात् (अन्न हें ब्रह्म आहे, असें ज्ञान त्याला झालें) हि (कारण) अन्नात् एव खलु इमानि भूतानि जायन्ते, अन्नेन जातानि जीवन्ति, अन्नं प्रयन्ति, अभिसंविशन्ति इति (अन्नापासून मात्र सर्व भूतें उत्पन्न होतात, उत्पन्न झाल्या

नंतर अन्नच त्यांचें संरक्षण करितें; आणि क्षय झाल्यानंतर तीं सर्व अन्नाकडेच जाऊन अन्नरूप होतात.) म्हणून अन्न हें ब्रह्म आहे, असें भृगूला समजलें.—**तद्विज्ञाय** (हें विज्ञान झाल्यावर) **पुनः एव वरुणं पितरं उपससार** (पुनः तो वरुण–पित्याजवळ गेला आणि) **भगवः, ब्रह्म अधीहि इति** (मला हे भगवन्! ब्रह्मोपदेश करा, अशी विनंति करिता झाला) **तं ह उवाच** (पुत्राला वरुण म्हणाला) **तपसा ब्रह्म विजिज्ञासस्व** (तपाच्या साधनानें ब्रह्म समजून घेण्याची इच्छा ठेव) **'तपः ब्रह्म' इति** (तप हेंच ब्रह्म होय.–असा उपदेश पित्यानें केला–) **सः तपः अतप्यत** (भृगूनें तपश्चर्या केली) **सः तपः तप्त्वा** (त्यानें तपोव्रत आचरिल्यानंतर–त्याला प्राण हेंच ब्रह्म आहे, असें विज्ञान झालें, इत्यादि विस्तार पुढील अनुवाकांत केला आहे–)

अन्नं ब्रह्मेति व्यजानाद्विज्ञातवान्। तद्धि यथोक्तलक्षणोपेतम्। कथम्। अन्नाद्ध्येव खल्विमानि भूतानि जायन्ते अन्नेन जातानि जीवन्ति। अन्नं प्रयन्त्यभिसंविशन्तीति। तस्माद्युक्तमन्नस्य ब्रह्मत्वमित्यभिप्रायः। स एवं तपस्तप्त्वाऽन्नं ब्रह्मेति विज्ञाय लक्षणेनोपपत्त्या च पुनरेव संशयमापन्नो वरुणं पितरमुपसार। अधीहि भगवो ब्रह्मेति। कः पुनः संशयहेतुरस्येत्युच्यते। अन्नस्योत्पत्तिदर्शनात्। तपसः पुनः पुनरुपदेशः साधनसंपादनार्थः। यावद्ब्रह्मणो लक्षणं निरतिशयं न भवति, यावच्च जिज्ञासा न निवर्तते तावत्तप एव ते साधनम् तपसैव ब्रह्म विजिज्ञासस्वेत्यर्थः। ऋज्वन्यत्॥

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यगोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यश्रीमच्छंकरभगवतः कृतौ तैत्तिरीयोपनिषदि तृतीयभृगुवल्ल्यध्यायभाष्ये द्वितीयोऽनुवाकः॥ २॥

सिद्धांती—तपाचरण केल्यानंतर भृगूला ज्ञानविज्ञान झालें कीं, 'अन्न हेंच ब्रह्म आहे.' कारण वरुणानें जें ब्रह्मलक्षण सांगितलें होतें, तें अन्नाला तंतोतंत लागू पडत होतें, असें त्यानें पाहिलें.

शिष्य—म्हणजे अन्नापासूनच खरोखर हीं सर्व सृष्टिगत भूतें उत्पन्न होतात, अन्नाच्या सत्तेनें मात्र आपआपल्या विशेषस्वरूपांत राहतात; आणि सरतेशेवटीं अन्नाः

कडे जाऊन अन्नांतच लीन होतात, असें भृगूस समजलें. तात्पर्य, ज्याच्या सत्तेनें उत्पत्तिस्थितिलयादि होतात, तें ब्रह्म होय; असें जें लक्षण वरुणानें सांगितलें होतें, तें लक्षण अन्नाच्या ठिकाणीं जुळलें. तेव्हां, अन्न ब्रह्म आहे, असा त्याचा निश्चय झाला. योग्यच होता हा निश्चय; नव्हे?

सिद्धान्ती—होय. श्रुतीचाही तूर्त हाच अभिप्राय आहे. असो; याप्रमाणें विचाररूपी तपश्चर्या करून व लक्षणतः व उपपत्तीच्या वाटेनें त्यानें जाणून घेतलें कीं, अन्न हेंच ब्रह्म आहे. पण—

पूर्व०—आतां कशाला पण? ब्रह्म समजलें, कार्य झालें.

सिद्धान्ती—भृगूचें कार्य होण्यापूर्वीच म्हणजे त्याला पूर्ण समाधान प्राप्त होण्या पूर्वीच एक संशय उत्पन्न झाला; तो पुनः पित्यासंनिध गेला आणि 'भगवन्! मला ब्रह्मोपदेश करा' अशी त्यानें विनंति केली.

पूर्व०—चमत्कारिकच होता भृगु म्हणावयाचा! त्याला संशय होण्याचें कारण?

सिद्धान्ती—ऐकाः अन्न ब्रह्म म्हणावें, तर त्याला स्वतःलाच उत्पत्ति आहे, असें दिसतें; तात्पर्य, अन्नाची उत्पत्ति कशापासून, अन्नालाही उत्पन्न करणारें कारण कोणतें, हा प्रश्न उद्भवतो व ज्ञानाला पूर्णत्व न आल्यामुळें जिज्ञासा जिवंत राहून समाधान होत नाहीं. असो; वरुणानें येथें व पुढें पुनः पुनः उपदेश हाच केला कीं, 'बाबारे! तपश्चर्या कर.' तप हेंच उत्कृष्ट साधन आहे, ब्रह्मजिज्ञासेच्या तृप्तीला.

शिष्य—म्हणजे?

सिद्धांती—जावत्कालपर्यंत ब्रह्मलक्षणाला निरतिशयत्व आलें नाहीं (या पुढें आतां ब्रह्माचें लक्षण करणें शक्य नाहीं, अशी समाधानाची स्थिति जोंवर आली नाहीं, ब्रह्माचें अंतिम लक्षण जोंवर विज्ञात झालें नाहीं) व जोंपर्यंत जिज्ञासावृत्तीची पूर्ण निवृत्ति झाली नाहीं; म्हणजे शंकेला व अज्ञानाला अवकाश राहिला नाहीं, तोंपर्यंत तपाचें, ज्ञानतपश्चर्येचें, विचारविकासाचें, अनुष्ठान करीत रहा; तप हेंच मुख्य साधन आहे, तपानें मात्र (निदिध्यासानें मात्र) ब्रह्म जाणून घेण्याची इच्छा कर; हा भृगूला वरुणपित्याचा उपदेश होता.

शिष्य—सारांश, जें एक कळलें म्हणजे सर्व कळतें, तें कळेपर्यंत तपश्चर्या चालावयाची.

सिद्धान्ती—चित्त हें पूर्णतेनें निःशंक होऊन त्याचेठिकाणीं समाधानवृत्ति बाणली पाहिजे. असो;

पुढील तिसरा, चवथा व पांचवा, हे अनुवाक सोपेच आहेत, असें समजून आचार्यांनीं त्यांवर व्याख्यान केलें नाहीं.

अथ भृगुवल्ल्यध्याये तृतीयोऽनुवाकः।

प्राणो ब्रह्मेति व्यजानात्। प्राणाद्ध्येव खल्विमानि भूतानि जायन्ते। प्राणेन जातानि जीवन्ति। प्राणं प्रयन्त्यभिसंविशन्तीति। तद्विज्ञाय। पुनरेव वरुणं पितरमुपससार। अधीहि भगवो ब्रह्मेति। तꣳ होवाच तपसा ब्रह्म विजिज्ञासस्व। तपो ब्रह्मेति। स तपोऽतप्यत। स तपस्तप्त्वा।

इति कृष्णयेजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि तृतीये भृगुवल्ल्यध्याये तृतीयोऽनुवाकः ॥ ३ ॥

अथ भृगुवल्ल्यध्याये चतुर्थोऽनुवाकः।

मनो ब्रह्मेति व्यजानात्। मनसो ह्येव खल्विमानि भूतानि जायन्ते। मनसा जातानि जीवन्ति। मनः प्रयन्त्यभिसंविशन्तीति। तद्विज्ञाय। पुनरेव वरुणं पितरमुपससार। अधीहि भगवो ब्रह्मेति। तꣳ होवाच। तपसा ब्रह्म विजिज्ञासस्व। तपो ब्रह्मेति। स तपोऽतप्यत। स तपस्तप्त्वा।

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि तृतीये भृगुवल्ल्यध्याये चतुर्थोऽनुवाकः ॥ ४ ॥

अथ भृगुवल्ल्यध्याये पञ्चमोऽनुवाकः।

विज्ञानं ब्रह्मेति व्यजानात्। विज्ञानाद्ध्येव खल्विमानि भूतानि जायन्ते। विज्ञानेन जातानि जीवन्ति। विज्ञानं प्रयन्त्यभिसंविशन्तीति। तद्विज्ञाय। पुनरेव वरुणं पितरमुपससार। अधीहि भ-

गवो ब्रह्मेति । त ५ होचुः । तपसा ब्रह्म विजिज्ञासस्व । तपो ब्रह्मेति । स तपोऽतप्यत । स तपस्तप्त्वा ।

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि तृतीये भृगुवल्ल्यध्याये पञ्चमोऽनुवाकः ॥ ५ ॥

या तीन, चार व पांच अनुवाकांचे अन्वय-अर्थ हीं दुसऱ्या अनुवाकांतील मंत्रा-प्रमाणेंच आहेत. अन्नाचे ठिकाणीं प्राण, मन इत्यादिकांची योजना केली म्हणजे झालें.

सारांश; अन्न, प्राण, मन, विज्ञान हीं ब्रह्मे आहेत, अशी उत्तरोत्तर श्रेष्ठ, श्रेष्ठतर कल्पना करून भृगु आनंदमयांतील आनंदापर्यंत तपःसामर्थ्यानें आला; तेव्हां त्याची शंकानिवृत्ति व जिज्ञासातृप्ति होऊन तो समाधानवृत्ति झाला, त्याचें वर्णन सहाव्या अनुवाकांत आहे.

अथ भृगुवल्ल्यध्याये षष्ठोऽनुवाकः ।

आनन्दो ब्रह्मेति व्यजानात् । आनन्दाद्ध्येव खल्विमानि भूतानि जायन्ते । आनन्देन जातानि जीवन्ति । आनन्दं प्रयन्त्यभिसंविशन्तीति । सैषा भार्गवी वारुणी विद्या । परमे व्योमन्प्रतिष्ठिता । स य एवं वेद प्रतितिष्ठति । अन्नवानन्नादो भवति । महान्भवति । प्रजया पशुभिर्ब्रह्मवर्चसेन । महान्कीर्त्या ॥

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि तृतीये भृगुवल्ल्यध्याये षष्ठोऽनुवाकः ॥ ६ ॥

अन्वय व अर्थ—' आनंदः ब्रह्म ' इति व्यजानात्; हि खलु आनंदात् एव इमानि भूतानि जायंते, जातानि आनंदेन जीवन्ति; आनंदं प्रयन्ति, अभिसंविशन्ति इति (' आनंद हें ब्रह्म आहे ' असें [illegible] झालें. कारण, आनंदापासूनच खरोखर हीं सर्व भूतें निर्माण

होतात, आनंदाच्या सत्तेनें स्थिर होतात, आणि शेवटीं आनंदाकडे जाऊन आनंदस्वरूपांतच लीन होतात. म्हणून आनंद हें ब्रह्म आहे, असें भृगूला समजलें) **सा एषा भार्गवी वारुणी विद्या** (ती ही भृगूनें साक्षात्कृत केलेली वरुणोपदेशित विद्या होय) **परमे व्योमन्-व्योम्नि-प्रतिष्ठिता** (ती ही विद्या-अत्यंत श्रेष्ठ जें दहाराकाश,-त्यांत प्रतिष्ठित झाली आहे) **यः एवं वेद, सः प्रतितिष्ठति** (ज्याला ही आनंदात्मकविद्या समजून उमजली, तोही प्रतिष्ठित होतो) **अन्नवान्, अन्नादः, भवति, प्रजया, पशुभिः, ब्रह्मवर्चसेन महान् भवति** (तो भोगांचा स्वामी व भोक्त्यांचा स्वामी होतो. तसेंच, प्रजा, पशू व ब्रह्मतेज यांच्या निरतिशय बाहुल्यानें तो मोठा होतो) **कीर्त्या महान्** (व तो कीर्तीनेंही मोठा होतो) सारांश, तो इहपरलोकीं श्रेष्ठतम होतो ॥ १ ॥

एवं तपसा विशुद्धात्मा प्राणादिषु साकल्येन ब्रह्मलक्षणमपश्यन्छनैः शनैरन्तरनुप्रविश्यान्तरतममानन्दं ब्रह्म विज्ञातवांस्तपसैव साधनेन भृगुस्तस्माद्ब्रह्म विजिज्ञासुना बाह्यान्तःकरणसमाधानलक्षणं परमं तपःसाधनमनुष्ठेयमिति प्रकरणार्थः ।

अधुनाऽऽख्यायिकातोऽपसृत्य श्रुतिः स्वेन वचनेनाऽऽख्यायिकानिर्वृत्तमर्थमाचष्टे—

सैषा भार्गवी भृगुणा विदिता वरुणेन प्रोक्ता वारुणी विद्या परमे व्योमन्हृदयाकाशगुहायां परम आनन्देऽद्वैते प्रतिष्ठिता परिसमाप्ताऽन्नमयादात्मनोऽधिप्रवृत्ता । य एवमन्योऽपि तपसैव साधनेनानेनैव क्रमेणानुप्रविश्याऽऽनन्दं ब्रह्म वेद स एवं विद्याप्रतिष्ठानात्प्रतितिष्ठत्यानन्दे परमे ब्रह्मणि, ब्रह्मैव भवतीत्यर्थः ।

दृष्टं च फलं तस्योच्यते—

अन्नवान्प्रभूतमन्नमस्य विद्यत इत्यन्नवान् । सत्तामात्रेण तु सर्वो ह्यन्नवानिति विद्याया विशेषो न स्यात् । एवमन्नमत्तीत्यन्नादो दीप्ताग्निर्भवतीत्यर्थः । महान्भवति । केन महत्त्वमित्यत आह—प्रजया

पुत्रादिना पशुभिर्गवाश्वादिभिर्ब्रह्मवर्चसेन शमदमज्ञानादिनिमित्तेन तेजसा । महान्भवति कीर्त्या ख्यात्या शुभप्रचारनिमित्तया ॥

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यगोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यश्रीमच्छंकरभगवतः कृतौ तैत्तिरीयोपनिषदि तृतीयभृगुवल्ल्यध्यायभाष्ये षष्ठोऽनुवाकः ॥ ६ ॥

सिद्धान्ती—मागें सांगितल्याप्रमाणें ज्ञानतपश्चर्येनें भृगु जसजसा शुद्धचित्ती होत गेला, तसतसें त्याला कळून चुकलें कीं, अन्न, प्राण, मन, विज्ञान इत्यादि कोशांमध्यें ब्रह्माचें संपूर्ण लक्षण अन्नप्राणादिकांस लागूं पडत नाहीं. त्यानें अन्नानंतर प्राणाला, त्यानंतर मनाला व शेवटीं विज्ञानाला ब्रह्मलक्षण सामर्थ्यानें लागतें कां, हें पाहिलें. पण व्यर्थ. त्यानें अन्नाचा आत्मा प्राण, त्याचें मन व मनाचें विज्ञान हीं सर्व धुंडाळून पाहिलीं, पण कोठेंही संशयनिवृत्ति व जिज्ञासातृप्ति होईना. तेव्हां विज्ञानाचा आत्मा जो आनंदमय, त्याच्याही अंतर्यामीं जो आनंद तेथपर्यंत ज्ञानदृष्टीनें (विचारतः) भृगूनें अंतःप्रवेश केला. ज्ञानदृष्टि हेंच त्याचें तप, हेंच ब्रह्मप्रतिपत्तीचें साधन होय. असो; आनंदस्वरूप पाहिलें, तेव्हां त्याचे सर्व संशय फिटले, ग्रंथी तुटल्या जिज्ञासेची तृप्ति झाली. अर्थात्, येथेंच वरुणोक्त लक्षण यथास्थित जुळतें, असें त्याला कळून पूर्ण समाधानाची प्राप्ति झाली. तो समाधानरूप झाला. आतां मागेंपुढें कांहीं राहिलें नाहीं, असें पाहून तो स्वतः आनंदरूप, ब्रह्मरूप झाला. तात्पर्य, आनंद हें ब्रह्म होय, असें ज्ञानविज्ञान त्याला झालें. वत्सानो ! श्रुतीनें ही आख्यायिका सांगितली, तिचें तात्पर्य हें आहे कीं, ज्या शुद्ध अशा मुमुक्षूला ब्रह्मजिज्ञासा झाली, त्यानें बाह्य करणें व अंतःकरण यांचें पूर्ण समाधान करून घ्यावें. हीं अंतर्बाह्य करणें विषयविनिवृत्त करून अंतर्मुख करावीं. अंतर्मुख–मनोवृत्तीनें गुरूपदेशाचें मनन (विचार) व त्याचा निदिध्यास करावा. असें केलें म्हणजे तपःसिद्धि होते. तपःप्रवृत्ति, विचारनिष्ठा हें सर्वोत्कृष्ट साधन आहे. पूर्वग्रहांचा, व दुराग्रहांचा त्याग करून सत्यनिष्ठेनें विचार विकसित करीत जाणें, हेंच तपःसाधन होय. सारांश, या साधनाचा प्रत्येक ब्रह्म–जिज्ञासूनें अवलंब करावा, हा उपदेश श्रुतीनें या प्रकरणांत केला आहे.

शिष्य—भगवन् ! अन्न म्हणजे विराट् ब्रह्म- याला उत्पत्ति आहे, म्हणून हें ब्रह्म नव्हे. प्राण म्हणजे हिरण्यगर्भ. हा विराटाचें कारण. पण कर्ता, भोक्ता म्हणजे विकारवान्; तेव्हां तेंही ब्रह्म नव्हे. ब्रह्माला संकल्पादि विशेष नसावयाचे. बरें; मनोविज्ञान शब्दांनीं लक्ष्य जें ईशात्मक तत्त्व, तें ही कार्य म्हणून ब्रह्म नव्हे. पुनः; ईशकारण जें मायातीत विशुद्धानंदच, तें अनुभवानें अजमावून पाहिलें, तेव्हां 'तें ब्रह्म–लक्षणात्मक ब्रह्म व मीही ब्रह्म,' असा भृगूचा निश्चय झाला. असा प्रकरणार्थ समजावयाचा व बोध [illegible]

सिद्धांती—होय. ठीक ठीक समजलास. असो; श्रुतीनें येथें आख्यायिका संपविली; आणि यापुढें स्ववचनानेंच आख्यायिका–तात्पर्य श्रुति सांगत आहे. ऐकाः वरुणानें ही विद्या उपदेशिली, म्हणून हिचें 'दारुणी' हें नांव आहे; व भृगूनें ही ऐकली व प्रकट केली म्हणून हिला भार्गवी म्हणतात. परम व अद्वितीय आनंदाचें स्थान जें दहराकाश, तेथें ही विद्या नित्य राहतें.

शिष्य—भगवन्, ह्या विद्येनें अन्नमय आत्म्यापासून अंतःप्रवेश करण्याला प्रारंभ केला, तो तिचें मार्गक्रमण 'आनंदापर्यंत झालें व येथें तिचा ज्ञानरूपी प्रवास संपला, म्हणजे भृगू अंतःशुद्धि करीत करीत, ज्ञानदृष्टीनें आंत आंत जात असतां त्याची ज्ञातृदृष्टि आनंदाचेठिकाणीं ज्ञानरूप झाली, तेव्हां ब्रह्मरूप होऊन तो मुक्त झाला. हें तात्पर्य?

सिद्धान्ती—होय. असो; याच मार्गाचा अवलंब करून जो ज्ञानरूप तपश्चर्या करील व आनंद–ब्रह्माचें ज्ञानविज्ञान प्राप्त करून घेईल, तोही खरा ब्रह्मज्ञ होईल. याप्रमाणें विद्याप्रतिष्ठित झालेला ब्रह्मज्ञ परम आनंदरूप ब्रह्मस्वरूपांत प्रतिष्ठित होतो; ब्रह्मरूप होतो. हें तर पारमार्थिक फल झालें. आतां येथेंहा दृष्ट फल काय होतें, तें पहाः– आनंदब्रह्माचा ज्ञानी अन्नवान् होतो. त्याच्या जवळ अन्नाचा भारी मोठा संचय असतो.

शिष्य—मंत्रांत 'अन्नवान्' शब्द आहे. प्रभूतत्वाचा उल्लेख नाहीं.

सिद्धान्ती—तें खरें; पण ब्रह्मज्ञाला अन्न मिळतें, इतकाच अर्थ केला, तर फलदृष्टीनें त्याची व श्वानशूकरांची अन्नवंतता सारख्याच किमतीची होते. ब्रह्मविद्येचें फल ब्रह्मज्ञाला विशेष मिळालें नाहीं, असें होतें. म्हणून आचार्यांनीं अन्न–संचयाचा उल्लेख स्पष्ट केला. तसेंच, हा अन्नाद म्हणजे दीप्ताग्नि असतो. ब्रह्मज्ञाची क्षुधा कडकडित असून तोंडाला रुचि असते व भक्षिलेलें अन्न त्याला उत्तम पचतें. तो सर्वतऱ्हेनें मोठा होतो. म्हणजे त्याची पुत्रपौत्रादि संपत्ति, त्याची द्रव्यात्मक (धेनु–अश्वपश्वादि) संपत्ति जशी मोठी असते. तसेंच त्याचें ब्रह्मवर्चस म्हणजे—

शिष्य—उत्कृष्ट शम, उत्तम दम, सर्वश्रेष्ठ ज्ञान इत्यादि, होयना!

सिद्धान्ती—सारांश, त्याची अंतःसंपत्तिजन्य तेजस्विताही वरिष्ठप्रकारची असते. याप्रमाणें दैवी व मानवी–संपत्तीनें अनुग्रहित झालेल्या या ब्रह्मज्ञाचें आचरणही शुद्ध व पुण्यात्मक असतें. म्हणून त्याचा लौकिकही त्रिखंडभर पसरतो. श्रेयस् आणि प्रेयस् साधण्याचें साधन म्हणजे आनंदरूप ब्रह्मविद्या होय.

सहावा अनुवाक संपूर्ण.

अथ भृगुवल्ल्यध्याये सप्तमोऽनुवाकः ।

अन्नं न निन्द्यात् । तद्व्रतम् । प्राणो वा अन्नम् । शरीरमन्नादम् । प्राणे शरीरं प्रतिष्ठितम् । शरीरे प्राणः प्रतिष्ठितः । तदेतदन्नमन्ने प्रतिष्ठितम् । स य एतदन्नमन्ने प्रतिष्ठितं वेद प्रतितिष्ठति । अन्नवान्नादो भवति । महान्भवति प्रजया पशुभिर्ब्रह्मवर्चसेन । महान्कीर्त्या ।

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि तृतीये भृगुवल्ल्यध्याये सप्तमोऽनुवाकः ॥ ७ ॥

अन्वय व अर्थ—**अन्नं न निंद्यात्** (अन्नाची केव्हांही निंदा करूं नये) **तत् व्रतं** (हें मुख्य व्रत आहे) **प्राणः अन्नं वै; शरीरं अन्नादं; शरीरं प्राणे प्रतिष्ठितं; प्राणः शरीरे प्रतिष्ठितः; तत् एतत् अन्नं अन्ने प्रतिष्ठितं** (खरोखर पाहतां प्राण हाही अन्नच आहे; व शरीर भोक्तारूप होय. प्राणामुळें शरीरस्थिति ठीक राहते; व शरीरामुळें प्राणाचें स्वास्थ्य नीट असतें. तात्पर्य प्राणरूपी अन्न शरीररूपी अन्नामुळें किंवा शरीररूपी अन्न प्राणरूपी अन्नामुळें स्वरूपांत असतें) **यः एतत् अन्नं अन्ने प्रतिष्ठितं वेद, सः प्रतितिष्ठति; अन्नवान् अन्नादः भवति; प्रजया, पशुभिः, ब्रह्मवर्चसेन, महान् भवति; कीर्त्या महान् भवति** (अन्नामध्यें अन्नाची प्रतिष्ठा आहे, हें ज्याला समजलें, तो सुस्थित, अन्नस्वामी (कर्ता) अन्नाद (भोक्ता) होतो. प्रजा, पशू, ब्रह्मतेज, यांच्या बहुलत्वानें तो मोठा होतो आणि कीर्तीनेंही तो मोठा होतो) ॥ १ ॥

किंचान्नेन द्वारभूतेन ब्रह्म विज्ञातं यस्मात्तस्माद्बुभिवान्नं न निन्द्यात्तदस्यैवं ब्रह्मविदो व्रतमुपदिश्यते । व्रतोपदेशोऽन्नस्तुतये, स्तुतिभाक्त्वं चान्नस्य ब्रह्मोपलब्ध्युपायत्वात् । प्राणो वा अन्नम् । शरीरान्तर्भावात्प्राणस्य । यद्यस्यान्तः प्रतिष्ठितं भवति तत्तस्यान्नं भवतीति । शरीरे च प्राणः प्रतिष्ठितस्तस्मात्प्राणोऽन्नं शरीरमन्नादम् ।

तथा शरीरमप्यन्नं प्राणोऽन्नादः । कस्मात्प्राणे शरीरं प्रतिष्ठितम् । तन्निमित्तत्वाच्छरीरस्थितेः । तस्मात्तदेतदुभयं शरीरं प्राणश्चान्नमन्नादश्च । येनान्योन्यस्मिन्प्रतिष्ठितं तेनान्नम् । येनान्योन्यस्य प्रतिष्ठा तेनान्नादः । तस्मात्प्राणः शरीरं चोभयमन्नमन्नादं च ।

स य एवमेतदन्नमन्ने प्रतिष्ठितं वेद प्रतितिष्ठत्यन्नान्नादात्मनैव । किंचान्नवानन्नादो भवतीत्यादि पूर्ववत् ।

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यगोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यश्रीमच्छंकरभगवतः कृतौ तैत्तिरीयोपनिषदि तृतीये भृगुवल्ल्यध्यायभाष्ये सप्तमोऽनुवाकः ॥ ७ ॥

सिद्धान्ती—आणखी; ज्यापक्षीं परंपरेनें ब्रह्ममंदिराचें प्रवेशद्वारच असणारें जें अन्न तेंही ब्रह्मविज्ञानाला कांहीं अंशीं प्रथमतः उपकारक होतें, त्यापक्षीं या उपकारक अन्नाची आपण केव्हांही निंदा करूं नये.

शिष्य—ब्रह्मज्ञानाचा व पक्षीं व्यावहारिकज्ञानाचा उपदेश करणाऱ्या आचार्यांची निंदा करूं नये, त्यांस पूज्य मानावें, असें शास्त्र आहे; तद्वत् ब्रह्मज्ञानाचा व व्यावहारिक कर्माचा मार्ग मोकळा करणाऱ्या अन्नाची, म्हणजे भोग्यवस्तूंची आपण निंदा करूं नये, हें नीटच आहे.

सिद्धान्ती—नुसतें नीटच नव्हे. ब्रह्मज्ञानें अन्ननिंदा करावयाची नाहीं, असें व्रत स्वीकृत केलें पाहिजे, अशी श्रुतीची उपदेशपूर्वक आज्ञा आहे.

पूर्व०—वैराग्याचें गोडवें गाणाऱ्यांनीं भोग्यवस्तूंची स्तुति करावी, हें नवलच होय.

सिद्धान्ती—ब्रह्मज्ञान हें जें साध्य त्याच्या सिद्धीमध्यें अन्न हें एक साधन आहे. साध्य नव्हे, हें ध्यानांत ठेवा. भोगाला साध्य ठरवूं नये, एतदर्थ वैराग्य सांगतात. समजलें ? असो; प्रश्नोपनिषदांत सांगितल्याप्रमाणें येथेंही श्रुति म्हणते कीं, प्राण हा शरीराच्या आंत राहतो, म्हणून प्राण हेंही अन्नच होय.

पूर्व०—बासें झालें ! सचेतन प्राणाला अन्न म्हणजे अचेतन केलेंत, हें ठीक.

सिद्धान्ती—एक वस्तु दुसऱ्या वस्तूच्या आंत राहून ठीक व्यवस्थित झाली म्हणजे आंत राहणारी वस्तु आपल्या आश्रयाचें अन्न होतें. शरीराचे ठिकाणीं प्राण राहतो, म्हणून प्राण हें अन्न व शरीर अन्नाद म्हणजे भोक्ता होय. सारांश, प्राणाचा उपभोग शरीर घेतें. वाचप्रमाणें शरीर हें अन्न व प्राण अन्नाद म्हणजे भोक्ता असतो. कारण प्राणामध्यें शरीर प्रतिष्ठित होतें. प्राणाच्या सुस्थिति-दुस्थितीवर शरीराचें बरेंवाईटपण ठरत असतें. प्राणाला आश्रय देऊन शरीर त्याचीं

उपभोग घेतें; म्हणून शरीर कर्तृत्व आणि प्राण भोग्यवस्तु; व शरीराची स्थिति ठेवणारा प्राण हा कर्ता व शरीर कार्य होतें.

शिष्य—तात्पर्य, शरीरच अन्न व अन्नाद आणि प्राणही अन्न व अन्नाद होतात. उभयतांही अन्योन्यांस उपकारक होतात.

सिद्धान्ती—परस्परांचा आश्रय उभयतांही घेतात, म्हणून उभयतांस अन्नत्व किंवा भोग्यत्व येतें व उभयतांही परस्परांस आश्रय देतात, म्हणून उभयतां अन्नाद होतात; म्हणजे त्यांस भोक्तृत्व व कर्तृत्व येतें. म्हणून दोन्ही अन्नस्वरूप व अन्नादस्वरूप होतात. यामप्रमाणें 'अन्नामुळें अन्नादाला प्रतिष्ठा प्राप्त होते (शरीरामुळें प्राणाला व प्राणामुळें शरीराला आश्रय मिळतो)' हें ज्ञान ज्याला होतें, तोही अन्नात्मा व अन्नादात्मा होऊन–भोग्य व भोक्ता होऊन–प्रतिष्ठित होतो. तो अन्नस्वामी, अन्नाद-श्रेष्ठ, अंतर्बाह्यसंपन्न आणि लोकविख्यात होतो, इत्यादि विवेचन मागें झालेंच आहे.

पूर्व०—म्हणजे ब्रह्मज्ञ संसारांत पडतो !

सिद्धान्ती—नाहीं, नाहीं. ब्रह्मज्ञाला तर ब्रह्मप्राप्तिच होते. पण ब्रह्माचें यथार्थ ज्ञानविज्ञान करून घेण्यास असमर्थ पण क्रममुक्तिमार्गानें जाऊं इच्छिणाऱ्या मंदाधिकाऱ्यांनीं अन्न, प्राण, मन इत्यादि द्वारस्थ सगुणब्रह्मांची यथाधिकार उपासना करून अन्नप्राणादिरूप व्हावें, व पुढें आपली प्रगति करून घ्यावी, हें सांगण्यासाठीं ही प्राणादिकांची उपासना श्रुतीनें विहित केली आहे. याकरीं ब्रह्मज्ञ, सर्वसाक्षी, होऊन सर्वथा ब्रह्मरूप ' सत्य, ज्ञान, अनंतरूप ' रूप होतो, हें निर्विवाद आहे. असो ॥ १ ॥

सातवा अनुवाक संपला.

अथ भृगुवल्ल्यध्यायेऽष्टमोऽनुवाकः ।

अन्नं न परिचक्षीत । तद्व्रतम् । आपो वा अन्नम् । ज्योतिरन्नादम् । अप्सु ज्योतिः प्रतिष्ठितम् । ज्योतिष्यापः प्रतिष्ठिताः । तदेतदन्नमन्ने प्रतिष्ठितम् । स य एतदन्नमन्ने प्रतिष्ठितं वेद प्रतितिष्ठति । अन्नवानन्नादो भवति । महान्भवति प्रजया पशुभिर्ब्रह्मवर्चसेन । महान्कीर्त्या ॥

अन्वय व अर्थ—अन्नं न परिचक्षीत (अन्नाचा अपहार कधींही [illegible] तद् व्रतं (हें व्रतांचें व्रत आहे) आपः अन्नं वै; ज्योतिः

अन्नादं; अप्सु ज्योतिः प्रतिष्ठितं; ज्योतिषि आपः प्रतिष्ठिताः; तत् एतत् अन्नं अन्ने प्रतिष्ठितं (जल हें अन्नच आहे खरोखर; तेज हें अन्नाद आहे; जलाचा आश्रय करून तेज राहतें व तेजाचा आश्रय करून जल राहतें. एवंच येथेंही अन्न अन्नाचाच आश्रय करून राहतें) **'एतत् अन्नं अन्ने प्रतिष्ठितं' यः वेद, सः प्रतितिष्ठति; अन्नवान्, अन्नादः भवति; प्रजया, पशुभिः; ब्रह्मवर्चसेन महान् भवति; कीर्त्या महान् भवति** (हें अन्न अन्नाचा आश्रय करून राहतें ' असें ज्ञानविज्ञान झालेला पुरुष प्रतिष्ठित होतो, अन्नसंपन्न, अंतर्बाह्य शुद्ध, द्रव्यधर्मसंपन्न व कीर्तिसंपन्न होतो) ॥ ८ ॥

अन्नं न परिचक्षीत न च परिहरेत् । तद्व्रतं पूर्ववत्स्तुत्यर्थम् । तदेवं शुभाशुभकल्पनयाऽपरिगृह्यमाणं स्तुतं महीकृतमन्नं स्यादेवं यथोक्तमुत्तरेष्वप्यापो वा अन्नमित्यादिषु योजयेत् । अप्सु ज्योतिरित्यब्ज्योतिषोरन्नान्नादगुणत्वेनोपासकस्यान्नस्य बहुकरणं व्रतम् ।

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यगोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यश्रीमच्छंकरभगवतः कृतौ तैत्तिरीयोपनिषदि तृतीये भृगुवल्ल्यध्यायेऽष्टमोऽनुवाकः ॥ ८ ॥

सिद्धान्ती—अन्न ब्रह्ममंदिराचें द्वार आहे; म्हणून त्याचा अपहार व परित्याग करूं नये, किंवा त्याची निंदा करूं नये. प्रागतिक मुमुक्षूनें हें व्रत आचरिलेंच पाहिजे. मागें अन्नस्तुति मंद अधिकाऱ्यासाठीं सांगितली, तशीच येथें ही स्तुति केली आहे. सारांश, शुभ किंवा अशुभ कल्पनांचें विजृंभण करून अन्नाची निंदा करूं नये; व त्याविषयीं उदासीनही राहूं नये. मंदाधिकारी मुमुक्षूनें त्याची यथार्थ स्तुति करावी. असो; शरीर व प्राण यांचा अन्न–अन्नादि–संबंध मागच्या अनुवाकांत दाखवून सिद्ध केला आहे, तसाच परस्पर–संबंध जल व तेज याच्यामध्यें आहे. उभयतांही अन्योन्यांचे सहकारी असून अन्नरूप आहेत; इत्यादि समजून घ्यावें. हें ज्ञान झालें असतां इहपर सौख्यप्राप्ति होऊन ज्ञान्याला चिरंतन कीर्तीचा लाभ होतो.

आठवा अनुवाक संपूर्ण.

अथ भृगुवल्ल्यध्याये नवमोऽनुवाकः ।

अन्नं बहु कुर्वीत । तद्व्रतम् । पृथिवी वा अन्नम् । आकाशोऽन्नादः । पृथिव्यामाकाशः प्रतिष्ठितः । आकाशे पृथिवी प्रतिष्ठिता । तदेतदन्नमन्ने प्रतिष्ठितम् । स य एतदन्नमन्ने प्रतिष्ठितं वेद प्रतितिष्ठति । अन्नवानन्नादो भवति । महान्भवति प्रजया पशुभिर्ब्रह्मवर्चसेन । महान्कीर्त्या ॥

अन्वय व अर्थ—अन्नं बहु कुर्वीत (अन्नाचा संग्रह पुष्कळ करावा) तत् व्रतं (हें मुख्य व्रत आहे) पृथिवी अन्नं वै; आकाशः अन्नादः; पृथिव्याम् आकाशः प्रतिष्ठितः; आकाशे पृथिवी प्रतिष्ठिता; अन्ने तत् एतत् अन्नं प्रतिष्ठितं; अन्ने अन्नं प्रतिष्ठितं यः वेद, सः प्रतितिष्ठति; अन्नवान् अन्नादः भवति; प्रजया, पशुभिः, ब्रह्मवर्चसेन महान् भवति; कीर्त्या महान् भवति (पृथ्वी हें खरोखर अन्न होय व आकाश अन्नाद आहे. पृथ्वीचा आश्रय आकाशाला आहे व आकाशाचा पृथ्वीला आहे. एवंच, येथेंही पुनः अन्नाच्या आश्रयानें अन्न राहतें, असें झालें. याप्रमाणें पृथ्वी अन्न व अन्नाद आणि आकाश ही अन्नाद व अन्न असून परस्पर एकमेकांस आश्रय देतात. असें ज्ञान ज्याला होतें, त्यालाही सुस्थितिरूप ज्ञानफल मिळतें. तो अन्नाचा स्वामी म्हणजे अन्नाद—वरिष्ठ होतो. त्याला बाह्यसंपत्ति व अंतःशुद्धिसंपत्ति मिळते व त्याची कीर्ति दिगंत पसरते) ॥ ९ ॥

सिद्धांती—'जलांमध्यें तेज आहे' याप्रमाणें आपाचें व तेजाचें अन्न-अन्नादित्वमूलक ज्ञान झालेल्या उपासकानें 'अन्नाचा संचय मोठा करावयाचा' हें व्रत धारण करून अन्नदानाचें सत्र स्थापित करावें. पृथ्वी अन्न, आकाश अन्नाद, इत्यादि मूलमंत्राचा अर्थ मागील मंत्रांप्रमाणें करून समजून घ्यावा.

शिष्य—एवंच अन्ननिंदा करूं नये, तद्विषयीं उदासीन राहूं नये, अन्नसंग्रह नित्य करावा, अन्नदान करावें, इत्यादि व्रतें मंदाधिकाऱ्यानें पाळिलीं, भोग्यभोक्तृस्वरूप समजून घेऊन अन्न, पाणी, तेज इत्यादिकांचें यथार्थस्वरूप समजून घेतलें, म्हणजे त्याचीं तापत्रयजनित दुःखें नष्ट होतात; व मोक्षमार्ग सुकर होतो; असें झालें.

नववा अनुवाक संपूर्ण.

अथ मृगुवल्ल्यध्याये दशमोऽनुवाकः ।

न कंचन वसतौ प्रत्याचक्षीत । तद्व्रतम् । तस्माद्यया कया च विधया बह्वन्नं प्राप्नुयात् । अराध्यस्मा अन्नमित्याचक्षते । एतद्वै मुखतोऽन्नꣳ राद्धम् । मुखतोऽस्मा अन्नꣳ राध्यते । एतद्वै मध्यतोऽन्नꣳ राद्धम् । मध्यतोऽस्मा अन्नꣳ राध्यते । एतद्वा अन्ततोऽन्नꣳ राद्धम् । अन्ततोऽस्मा अन्नꣳ राध्यते ॥ १ ॥

अन्वय व अर्थः—**वसतौ कंचन न प्रत्याचक्षीत, तत् व्रतं** (उपासकाच्या घरीं कोणी पांथस्थ वसति करण्यास आला असतां त्याला ' जागा नाहीं ' असें म्हणूं नये, आश्रय देणें हें महाव्रत आहे) **तस्मात् यया कया च विधया बहु अन्नं प्राप्नुयात्** (आश्रयास आलेल्या अतिथीला भोजन घालण्याचें सामर्थ्य असावें—म्हणून याजनाध्यापनादिपैकीं कोणत्यातरी शिष्टाचारी व्यवहारानें स्वगृहांत पुष्कळसा अन्नसंग्रह मुमुक्षूनें करून ठेवावा) **अस्मै ' अन्नम् अराधि ' इति आचक्षते** (' महाराज, अन्न सिद्ध आहे ' असें अतिथीला प्रेमपूर्वक—शिष्ट—सांगतात) **मुखतः राद्धं एतत् अन्नं वै अस्मै मुखतः अन्नं राध्यते** (पूर्ण सात्त्विकतेनें दान केलेली पाकसिद्धि अन्नदात्याला पूर्ण सात्त्विक अन्नाचा, पूर्ण सात्त्विक मुखाचा, लाभ देते) **मध्यतः राद्धम् अन्नं वै अस्मै मध्यतः अन्नं राध्यते; अन्ततः राद्धं अन्नं वै अस्मै अन्ततः अन्नं राध्यते** (त्याचप्रमाणें राजसवृत्तीनें केलेलें अन्नदान राजस म्हणजे राजसी अन्न सुखदुःखात्मक फल देतें व तमोवृत्तींनें केलेलें अन्नदान तामसी म्हणजे तामसी अन्न दुःखात्मक फल देतें) ॥ १ ॥

तथा पृथिव्याकाशोपासकस्य वसतौ वसतिनिमित्तं कंचन कंचिदपि न प्रत्याचक्षीत वसत्यर्थमागतं निवारयेदित्यर्थः । वासे च दत्तेऽवश्यं ह्यशनं दातव्यम् । तस्माद्यया कया च विधया येन केन च प्रकारेण बह्वन्नं प्राप्नुयाद्बह्वन्नं संग्रहं कुर्यादित्यर्थः । यस्मादन्न-

वन्तो विद्वांसोऽभ्यागतायान्नार्थिनेऽराधि संसिद्धमस्मा अन्नमित्याचक्षते न नास्तीति प्रत्याख्यानं कुर्वन्ति तस्माच्च हेतोर्बह्वन्नं प्राप्नुयादिति पूर्वेण संबन्धः । अपि चान्नदानस्य माहात्म्यमुच्यते । यथा यत्काले प्रयच्छत्यन्नं तथा तत्कालमेव प्रत्युपनमते ।

कथमिति तदेतदाह—

एतद्वा अन्नं मुखतो मुख्ये प्रथमे वयासि मुख्यया वा वृत्त्या पूजापुरःसरमभ्यागतायान्नार्थिने राद्धं संसिद्धं प्रयच्छतीति वाक्यशेषः । तस्य किं फलं स्यादित्युच्यते—मुखतः पूर्वे वयसि मुख्यया वा वृत्त्याऽस्मा अन्नदायान्नं राध्यते यथादत्तमुपतिष्ठत इत्यर्थः । एवं मध्यतो मध्यमे वयसि मध्यमेन चोपचारेण । तथाऽन्ततोऽन्ते वयसि जघन्येन चोपचारेण परिभवेन तथैवास्मै राध्यते संसिध्यत्यन्नम् ।

सिद्धान्ती—ब्रह्मप्राप्तीसाठीं ब्रह्म–मार्गानें–पिपीलिकामार्गानें–जात असतां मागच्याच अनुवाकांत उल्लेखिलेल्या पृथिवी–आकाशाची जोउपासना करीत असतो, त्यानें आपल्या घरीं वसतीसाठीं आलेल्या अतिथीचा केव्हांही धिःकार करूं नये. आलेल्या अतिथीला उतरूं द्यावें, हें उत्तम व्रत आहे. याचें अनुपालन नित्य करावें. राहावयाला जागा दिली म्हणजे अर्थातच त्या अतिथीला जेवावयास ही घातलें पाहिजे. त्यासाठीं घरात अन्नाचादाणा–गोट्याचा–पुष्कळसा संग्रह करणें अवश्य झालें. म्हणून उपासक–गृहस्थानें यज्ञ करवून, शिक्षण देऊन किंवा दुसरा कोणताही शिष्टसंमत व्यवहार करून स्वगृहीं अन्नसंग्रह करून ठेवावा. कारण, कोणीही अन्नार्थी अतिथिवा अभ्यागत घरीं चालून आला असतां अन्नसंग्राहक विद्वान् शिष्ट ' महाराज, पाकासीद्धि तयार आहे ' असें विनंतिपूर्वक आश्वासन देतात. हे विद्वान् शिष्ट ' नाहीं, आमच्या येथें कांहीं मिळावयाचें नाहीं ' असें म्हणून अतिथींचा केव्हांहीं तिरस्कार करीत नाहींत. हा शिष्टसंप्रदाय आहे. तेव्हां ' नाहीं ' म्हणण्याची पाळी येऊं नये, म्हणून अन्नसंग्रह सिद्ध करून ठेवावा, असा श्रुतीचा उपदेश आहे. पुनः; या अन्नदानाचें माहात्म्यही फार मोठें आहे व तें श्रुति सांगत आहे, ऐका–ज्या कालीं ज्या मनोवृत्तीनें अन्नदान होतें, त्या कालीं तशाच गुणधर्माचें फल अन्नदात्याला मिळतें.

शिष्य—हें कसें तें स्पष्ट करून सांगावें, भगवन् !

सिद्धान्ती—मुखतः म्हणजे प्रथम वयामध्यें किंवा सात्त्विकृतेच्या उदारवृत्तीचा संग्रह करून ठेवलेल्या प्राप्त झालेल्या अन्नार्थी अभ्यागताचें पूजापुरःसर स्वागत करून त्याला

सिद्ध अन्न (शिजलेलें अन्न) दिलें, तर त्याचे फल असें होतें कीं, त्या पूर्ववयामध्येंच त्या उदारधी पुरुषाला सात्त्विक अन्नाचा लाभ होतो. तात्पर्य, जसें द्यावें, तसें घ्यावें, हा न्याय येथें खास लागूं पडतो. तसेंच मध्यम म्हणजे राजसवर्यांत राजसवृत्तीचें अन्नदान राजसफलात्मक व तामसवर्यांत तामसी वृत्तीनें व उन्मत्तवृत्तीनें केलेलें अन्नदान तामसफलात्मक अथवा मानभंगात्मक होतें, हा तात्पर्यार्थ आहे.

य एवं वेद। क्षेम इति वाचि। योगक्षेम इति प्राणापानयोः। कर्मेति हस्तयोः। गतिरिति पादयोः। विमुक्तिरिति पायौ। इति मानुषीः समाज्ञाः। अथ दैवीः। तृप्तिरिति वृष्टौ। बलमिति विद्युति॥ २॥

अन्वय व अर्थ—यः एवं वेद (याप्रमाणें अन्नाचें व तद्दानाचें माहात्म्य ज्याला समजलें—त्यानें—) **'क्षेम, इति वाचि, 'योगक्षेमः' इति प्राणऽपानयोः, 'कर्म' इति हस्तयो, 'गतिः' इति पादयोः, 'विमुक्तिः' इति पायौ, इति मानुषीः समाज्ञाः** (वाणीमध्यें क्षेमरूपानें, प्राणापानांमध्यें योगक्षेमरूपानें, हस्तांमध्यें कर्मरूपानें, पायांमध्यें गतिरूपानें, वायूमध्यें विसर्जनरूपानें—ब्रह्म वास्तव्य करितें, असें समजून उपासना करावी—ह्या मानुषी म्हणजे अध्यात्मिक आज्ञा झाल्या) **अथ दैवीः** (आतां अधिदैविक आज्ञा सांगतों) **'तृप्तिः' इति वृष्टौ 'बलं' इति विद्युति** (पर्जन्यवृष्टीमध्यें तृप्तिरूपानें व विद्युतेमध्यें बलरूपानें—ब्रह्म राहतें, असें समजून उपासना करावी—)

य एवं वेद य एवमन्नस्य यथोक्तं माहात्म्यं वेद तदानस्य यथोक्तं फलमुपनयेत्।

इदानीं ब्रह्मण उपासनप्रकार उच्यते—

क्षेम इति वाचि। क्षेमो नामोपात्तपरिरक्षणम्। ब्रह्म वाचि क्षेमरूपेण प्रतिष्ठितमित्युपास्यम्। योगक्षेम इति, योगोऽनुपात्तस्योपादानम्। तौ हि योगक्षेमौ प्राणापानयोः सतोर्भवतो यद्यपि तथाऽपि न प्राणापाननिमित्तावेव किं तर्हि ब्रह्मनिमित्तौ। तस्माद्ब्रह्म योगक्षेममात्मना प्राणापानयोः प्रतिष्ठितमित्युपास्यम्। एवमुत्तरेष्वन्येषु तेन तेनाऽऽत्मना ब्रह्मैवोपास्यम्। कर्मणो ब्रह्म निर्वर्त्यत्वा-

द्धस्तयोः कर्मात्मना ब्रह्म प्रतिष्ठितमित्युपास्यः । गतिरिति पादयोः विमुक्तिरिति पायौ । इत्येता मानुषीर्मनुष्येषु भवा मानुष्यः समाज्ञाः आध्यात्मिक्यः समाज्ञा ज्ञानानि विज्ञानान्युपासनानीत्यर्थः ।

अथानन्तरं दैवीर्दैव्यो देवेषु भवाः समाज्ञा उच्यन्ते । तृप्तिरिति वृष्टौ । वृष्टेरन्नादिद्वारेण तृप्तिहेतुत्वाद्ब्रह्मैव तृप्त्यात्मना वृष्टौ व्यवस्थितमित्युपास्यम् । तथाऽन्येषु तेन तेनाऽऽत्मना ब्रह्मैवोपास्यम् । तथा बलरूपेण विद्युति ।

सिद्धांती—आतांपर्यंत अन्नब्रह्माचें व अन्नदानाचें जें माहात्म्य सांगितलें, तें ज्याला समजतें, त्याला मागच्या परिच्छेदांतच जीं जीं फलें सांगितलीं, तीं प्राप्त होतात. आतां, मंदाधिकारी मुमुक्षूंनीं ब्रह्माची उपासना कशी करावी, त्याचे प्रकार सांगण्याला आरंभ करितात. क्षेम म्हणजे प्राप्त झालेल्याचें उत्कृष्ट संरक्षण करणें होय. तेव्हां, ब्रह्म हें वाणीमध्यें 'क्षेमरूपानें' वास्तव्य करीत आहे, अशी भावना ठेवून त्याची उपासना करावी. जें आपल्यास मिळालें नाहीं, तें मिळविण्याचा प्रयत्न करून यशस्वी होणें, हा योग होय. हा योग आणि आतांच सांगितलेला क्षेम मिळून योगक्षेमाचें युग्म होतें. यद्यपि हें युग्म प्राणापान समर्थ असतील तरच ठीक चालतें. तथापि योगक्षेमाचें निमित्त-कारण प्राणापानच नव्हत. प्राणापानापासूनच योगक्षेमाचीं उत्पत्ति होते, असें नाहीं. ही उत्पत्ति ब्रह्मनिमित्तकही आहे, म्हणून योगक्षेमरूपानें ब्रह्म हें प्राणापानांत राहतें, अशी श्रद्धा ठेऊन उपासना करावी.

शिष्य—याप्रमाणेंच पुढील स्थानांत राहणाऱ्या गुणधर्माची ब्रह्मदृष्टीनें उपासना करावयाची आहे, होय ना ?

सिद्धान्ती—होय. ब्रह्माच्या सत्तेनें सर्व कर्मांची उत्पत्ति होते, म्हणून हस्तांचे ठिकाणीं कर्मरूपानें, चरणांचे ठिकाणीं गतिरूपानें, गुदद्वारांत विसर्जनरूपानें ब्रह्म वास्तव्य करितें, असा भाव ठेवून उपासना करावी.

शिष्य—सारांश, जे जे जीवाचे अध्यात्मिक, (शारीरिक,) धर्म आहेत, त्यात्यारूपानें ब्रह्मोपासना करावी, असें दिसतें.

सिद्धान्ती—नव्हे, या मनुष्याला अध्यात्मिकसंबंधानें समाज्ञा (ज्ञानविज्ञानें किंवा उपासना) आहेत. या अवश्य कराव्या, अशी श्रुतीची आज्ञा आहे. आतां दैवी म्हणजे अधिदैविक अथवा देवताजन्य गुण [illegible] रूपाची दृष्टि ठेऊन उपासनाप्रकार सांगतात:-पर्जन्यवृष्टीमध्यें तृप्तिरूपानें ब्रह्म वास्तव्य करितें.

[illegible] म्हणजे ।

सिद्धान्ती—वृष्टि यथास्थित झाली, वेळेवर ठीक पाऊस पडला, म्हणजे पिकें चांगलीं येऊन भोग्यपदार्थांची सृष्टि होते आणि सर्वत्र लहानथोर जीवांचें समाधान होतें. हें समाधान ब्रह्मजन्य आहे. तत्तिरूपानें ब्रह्मच पर्जन्यवृष्टीमध्यें वास्तव्य करितें, असें समजून उपासना करावी. याच न्यायानें जेथें जेथें हितकर गुणधर्म दैवी अनुग्रहानें प्राप्त होतात, तेथें तेथें त्या गुणधर्मस्वरूपानें ब्रह्माची उपासना करावी. उदाहरणार्थ, बीज कडधुडं लागलं, म्हणजे तेथें बलरूपानें ब्रह्म राहत आहे, अशी कल्पना करून उपासना करावी.

यश इति पशुषु । ज्योतिरिति नक्षत्रेषु । प्रजातिरमृतमानन्द इत्युपस्थे । सर्वमित्याकाशे । तत्प्रतिष्ठेत्युपासीत । प्रतिष्ठावान्भवति । तन्मह इत्युपासीत महान्भवति । तन्मन इत्युपासीत । मानवान्भवति ॥ ३ ॥

अन्वय व अर्थ—पशुषु 'यशः' इति, नक्षत्रेषु 'ज्योतिः' इति, उपस्थे 'प्रजापतिः, अमृतं आनंदः' इति, आकाशे 'सर्वं' इति (पशूंमध्यें यशोरूपानें, नक्षत्रांमध्यें तेजोरूपानें, उपस्थामध्यें अविनाशी आनंद देणाऱ्या पुत्रपौत्रादि वंशरूपानें आणि आकाशामध्यें सर्वरूपानें 'ब्रह्म आहे' असें भावून उपासना करावी) 'प्रतिष्ठा' इति तत् उपासीत (सर्वांची प्रतिष्ठा–आश्रय–ब्रह्म आहे, अशी श्रद्धा ठेवून आराधना करावी) प्रतिष्ठावान् भवति (अशी आराधना करणारा प्रतिष्ठित होतो) 'महः' इति तत् उपासीत, महान् भवति ('महत् ब्रह्म आहे' अशी श्रद्धापुरःसर उपासना करणारा बुद्धिवान् होतो व) तत् मनः इति उपासीत, मनवान् भवति) 'मन ब्रह्म आहे' असा श्रद्धापूर्वक उपासक चिंतनसमर्थ होतो) ॥ ३ ॥

यशोरूपेण पशुषु । ज्योतीरूपेण नक्षत्रेषु । प्रजातिरमृतममृतत्वप्राप्तिः पुत्रेण ऋणविमोक्षद्वारेणाऽऽनन्दः सुखमित्येतत्सर्वमुपस्थनिमित्तं ब्रह्मैवानेनाऽऽत्मनोपस्थे प्रतिष्ठितमित्युपास्यम् । सर्वं ह्याकाशे प्रतिष्ठितमतो यत्सर्वमाकाशे तद्ब्रह्मैवेत्युपास्यम् । तच्चाऽऽकाशं ब्रह्मैव । तस्मात्तत्सर्वस्य प्रतिष्ठेत्युपासीत प्रतिष्ठागुणोपासनात्प्रतिष्ठावान्भ-

वति। एवं पूर्वेष्वपि यद्यत्तदधीनं फलं तद्ब्रह्मैव तदुपासनात्तद्वान्भवतीति द्रष्टव्यम्। श्रुत्यन्तराच्च—"तं यथा यथोपासते तदेव भवति" इति।

सिद्धान्ती—पशूमध्यें यशोरूपानें, नक्षत्रामध्यें तेजोरूपानें ब्रह्मोपासना करावी. प्रजननानें (पुत्रप्राप्ति झाली असतां) ऐहिक ऋणांतून मुक्त होऊन पुत्रद्वारा अमरत्व मिळतें व अविनाशी आनंदाचा अधिगम होतो. पण हा सर्व लाभ उपस्थनिमित्त होतो. म्हणून उपस्थामध्यें आनंदरूपानें ब्रह्म प्रतिष्ठित झालें आहे, असें मानून त्याची आनंदरूपानें उपासना करावी. तसेंच, सर्वांचा आश्रय आकाश आहे, म्हणून आकाशामध्यें जें कांहीं आहे, तें ब्रह्मरूप आहे, अशी उपासकाची श्रद्धा असावी. 'सर्वाश्रय आकाश ब्रह्म आहे' अशी श्रुति आहे. म्हणून सर्वांचा आश्रय, सर्वाधिष्ठान ब्रह्म होय; असा श्रद्धापूर्वक निश्चय करावा. असो; सर्वप्रतिष्ठापकब्रह्माची 'प्रतिष्ठारूपानें' उपासना करणारा प्रतिष्ठित होतो. हाच न्याय सर्वत्र उपयोजावा.

शिष्य—ज्या गुणरूपानें आपण ब्रह्मोपासना करितों, त्या गुणांचा लाभ आपल्यास होतो, असा सिद्धांत आहे. म्हणून श्रुतीनें श्रेयस्कामी पुरुषाला या गुणधर्मांच्या उपासना सांगितल्या आहेत ?

सिद्धान्ती—जेथें ज्या फलाचा अधिगम होतो, तेथें तें फल ब्रह्मरूपच असतें. अर्थात त्या त्या वस्तूंची ऐकांतिक आराधना दृढ श्रद्धेनें केली म्हणजे तें इष्ट फल प्राप्त होतें, हें केव्हांही विसरूं नको. ज्या ज्या रूपानें आपण ब्रह्मोपासना करितों, तें तें रूप आपल्यास प्राप्त होतें' अशी दुसरी श्रुतिही येथें प्रमाण आहे. सारांश, 'महत्' नामक, ब्रह्मगुण लक्षांत आणून महद्-रूपानें ब्रह्मोपासना केली किंवा ब्रह्मम्हन् मननशील आहे हें ध्यानांत ठेवून मनोरूपानें ब्रह्म उपासिलें, तर महत्ताचा उपासक महान् होतो, बुद्धिवान् होतो व मनोगुणाचा उपासक मननशील होतो. म्हणून उपासकानें 'महत्गुण' व 'मनोगुण' यांची उपासना करावी.

शिष्य—'महान्' म्हणजे सर्व प्रकारच्या संपत्तीचा स्वामी, असा मार्गे सांगितलेला अर्थ घेतला तर ?

सिद्धांती—कांहीं प्रत्यवाय नाहीं. केवळ संपत्तीतच आपल्यास रहावयाचें नाहीं, हें ध्यानांत ठेव. हाच उपदेश पुढें केला आहे ॥ ३ ॥

तन्मन इत्युपासीत। नम्यन्तेऽस्मै कामाः। तद्ब्रह्मेत्युपासीत। तद्ब्रह्मवान्भवति। तद्ब्रह्मणः परिमर इत्युपासीत। पर्येणं म्रियन्ते द्विषन्तः सपत्नाः।

परि येऽप्रिया भ्रातृव्याः। स यश्चायं पुरुषे। यश्चासावादित्ये। स एकः॥ ४॥

अन्वय व अर्थः—**'नमः' इति तत् उपासीत, अस्मै कामाः नम्यंते; 'ब्रह्म' इति तत् उपासीत, ब्रह्मवान् भवति; 'ब्रह्मणः परिमरः' इति तत् उपासीत, एनं द्विषंतः ये अप्रियाः भ्रातृव्याः सपत्नाः परिम्रियंते** (ब्रह्म सर्ववंद्य आहे, सर्वश्रेष्ठ आहे, अशी श्रेष्ठत्वाची उपासना करणारा सर्व कामांचा व वासनांचा स्वामी होतो, त्यांस वंद्य होतो; ब्रह्म विस्तीर्ण आहे, अशी उपासना करणारा सर्वव्यापी होतो; ब्रह्म शत्रुविनाशक आहे, असें समजून ब्रह्मोपासना करणाऱ्याचा द्वेष करणारे, त्याचे दायाद व त्याचे शत्रु मरतात) **यः अयं च पुरुषे, यः असौ च आदित्ये, सः एकः** (जो हा पुरुषामध्यें आहे व जो त्या आदित्यामध्यें आहे, तो 'हा व तो' एकच आहेत) ॥ ४ ॥

तन्मह इत्युपासीत। महो महत्त्वगुणवत्तदुपासीत। महान्भवति। तन्मन इत्युपासीत। मननं मनः। मानवान्भवति मननसमर्थो भवति। तन्नम इत्युपासीत। नमनं नमो नमनगुणवत्तदुपासीत। नम्यन्ते प्रह्वीभवन्त्यस्मा उपासित्रे कामाः काम्यन्त इति भोग्या विषया इत्यर्थः। तद्ब्रह्मेत्युपासीत। ब्रह्म परिवृढतमामित्युपासीत। ब्रह्मवांस्तद्गुणो भवति। तद्ब्रह्मणः परिमर इत्युपासीत। ब्रह्मणः परिमरः परिम्रियन्तेऽस्मिन्पञ्च देवता विद्युद्वृष्टिश्चन्द्रमा आदित्योऽग्निरित्येताः। अतो वायुः परिमरः श्रुत्यन्तरप्रसिद्धेः। स एष एवायं वायुराकाशेनानन्य इत्याकाशो ब्रह्मणः परिमरस्तमाकाशं वाय्वात्मानं ब्रह्मणः परिमर इत्युपासीत। पर्येनमेवंविदं प्रतिस्पर्धिनो द्विषन्तोऽद्विषन्तोऽपि सपत्ना यतो भवन्त्यतो विशेष्यन्ते द्विषन्तः सपत्ना इति। य एनं द्विषन्तः सपत्नास्ते परिम्रियन्ते प्राणाञ्जहति। किंच ये चाप्रिया अस्य भ्रातृव्या अद्विषन्तोऽपि ते च परिम्रियन्ते।

प्राणो वा अन्नं शरीरमन्नादमित्यारभ्याऽऽकाशान्तस्य कार्यस्यैवान्नान्नादत्वमुक्तम्। उक्तं नाम किं तेन, तेनैतत्सिद्धं भवति, कार्य-

विषय एव भोज्यभोक्तृत्वकृतः संसारो न त्वात्मनीति । आत्मनि तु भ्रान्त्योपचर्यते ।

नन्वात्माऽपि परमात्मनः कार्यं ततो युक्तस्तस्य संसार इति । न । असंसारिण एव प्रवेशश्रुतेः । " तत्सृष्ट्वा तदेवानुप्राविशत् " इत्याकाशादिकारणस्य ह्यसंसारिण एव परमात्मनः कार्येऽनुप्रवेशः श्रूयते । तस्मात्कार्यानुप्रविष्टो जीव आत्मा पर एवासंसारी । सृष्ट्वाऽनुप्राविशदिति समानकर्तृ [क] त्वोपपत्तेश्च । सर्गप्रवेशक्रिययोश्चैकश्चेत्कर्ता ततः क्त्वाप्रत्ययो युक्तः । प्रविष्टस्य तु भावान्तरापत्तिरिति चेत् । न । प्रवेशस्यान्यार्थत्वेन प्रत्याख्यातत्वात् । अनेन जीवेनेति विशेषश्रुतेर्धर्मान्तरेणानुप्रवेश इति चेत् । न । तत्त्वमसीति पुनस्तद्भावोक्तेः । भावान्तरापन्नस्यैव तदपोहार्था संपदिति चेत् । न । तत्सत्यं स आत्मा तत्त्वमसीति सामानाधिकरण्यात् । दृष्टं जीवस्य संसारित्वमिति चेत् । न । उपलब्धुरनुपलभ्यत्वात् । संसारधर्माविशिष्ट आत्मोपलभ्यत इति चेत् । न । धर्माणां धर्मिणोऽव्यतिरेकात्कर्मत्वानुपपत्तेः । उष्णप्रकाशयोर्दाह्यप्रकाश्यत्वानुपपत्तिवत्त्रासादिदर्शनाद् दुःखित्वाद्यनुमीयत इति चेत् । न । त्रासार्देदुःखस्य चोपलभ्यमानत्वान्नोपलब्धृधर्मत्वम् । कापिलकाणादादितर्कशास्त्रविरोध इति चेत् । न । तेषां मूलाभावे वेदविरोधे च भ्रान्तत्वोपपत्तेः । श्रुत्युपपत्तिभ्यां च सिद्धमात्मनोऽसंसारित्वमेकत्वाच्च । स यश्चायं पुरुषे यश्चासावादित्ये स एक इत्येवमादि पूर्ववत्सर्वम् ।

सिद्धान्ती—' नमः ' म्हणजे नमन. नमनगुणवान् परमात्मा आहे, तो सर्ववंद्य व सर्वश्रेष्ठ आहे, अशी उपासना करणारा उपासक सर्ववंद्य होतो. अर्थातच सर्व इष्ट भोग्य विषय व भोगेच्छा हीं उपासकाला शरण जाऊन त्याचे दास होतात. परमात्मा म्हणजे ब्रह्म अत्यंत विस्तीर्ण आहे, तो विराट्स्वरूप आहे, अशी आराधना करणारा विराट्स्वरूप होतो. ' ब्रह्माचें परिमर म्हणजे संहारसाधन ' या रूपानें ब्रह्मोपासकाचे सर्व शत्रु विलयाला जातात.

शिष्य—' परिमर ' हा शब्द नाहीं समजला. चांगलासा.

सिद्धान्ती—ज्याच्यामध्यें इतर वस्तु नष्ट होतात, लीन होतात, तो त्या वस्तूंचा परिमर होय. विद्युत्, वृष्टि, चंद्र, आदित्य, अग्नि, या पांच देवता वायुमध्यें लीन होतात,

नष्ट होतात, म्हणून वायु यांना परिसर अथवा संहारक होय. 'वायु हा संवर्ग (संहारक) आहे' असें दुसरी श्रुतिही सांगते. वायु आणि आकाश एकच. म्हणून आकाशही परिसर म्हणजे सर्वसंहारक होते. तेव्हां वायूशीं तादात्म्यानें असणारें आकाश हें ब्रह्माच्या स्वाधीन असणारें संहारसाधन आहे, हें ठरलें. असो; तेव्हां 'सर्वसंहारक आकाशाची ब्रह्मरूपानें उपासना करणाऱ्या ज्ञानी भक्ताचा द्वेष करणारे सर्व प्रतिस्पर्धी—

शिष्य—भगवन्! प्रतिस्पर्धी आली कीं द्वेष आलाच. मग 'द्वेष्टे' हें विशेषण कशाला?

सिद्धान्ती—अरे! कांहीं प्रतिस्पर्धी उदारमनस्क असतात ना? तेव्हां त्यांचे द्वेष्टे प्रतिस्पर्धी विनष्ट होतात. पण इतकेच नव्हे! तर या उपासकाला अप्रिय असणारे दायाद जरी याचा द्वेष करीत नसले, तरी ते दायाद याला अप्रिय म्हणजे नावडते म्हणून उपास्याच्या संहारकगुणानें नाहींसे होतात. याप्रमाणें ज्या गुणाचा उल्लेख करून आपण ब्रह्मोपासना करितों, तो गुण आपल्यास प्राप्त होतो, हा श्रुतीचा उपदेश आहे.

शिष्य—पण याचा मूळ प्रकरणाशीं संबंध काय?

सिद्धान्ती—ऐकः 'प्राण अन्न व शरीर अन्नाद आहे' असा आरंभ करून 'आकाश अन्न आहे, पृथ्वी अन्नाद आहे' येथपर्यंत प्रत्येक कार्य स्वयमेवतः अन्न व अन्नाद असतें, कार्यजात भोक्ता व भोग्य आहे, कर्तृत्व-भोक्तृत्व कार्यामध्यें मात्र असतें, हा सिद्धांताचें विवेचन केलें.

पूर्व०—हेतें असेल विवेचन श्रुतीनें स्पष्ट सांगून! पण त्यापासून काय सिद्ध होणार?

सिद्धान्ती—सिद्ध हें होतें कीं, या कार्यविषयामध्यें मात्र भोज्यभोक्तृत्वांनीं उत्पन्न झालेला संसार राहतो. संसाराचें वास्तव्य अन्न-अन्नादात्मक कार्यामध्यें आहे. आत्मारामाला त्याचा इवलासाहुद्धां पारमार्थिक संबंध नाहीं. वरील मीमांसेनें हें सिद्ध होतें. समजलां? जीवावर त्याचा जो आरोप होतो, ती केवळ भ्रांति आहे.

पूर्व०—पण एक भागवतपंथ म्हणतो कीं जीव (आत्मा) हाही परमात्म्याचें कार्य आहे. तेव्हां जीवालाही वास्तविक कर्तृत्व-भोक्तृत्वाचा संसार प्राप्त होतो, तुमच्याच न्यायानें!

सिद्धांती—असें कसें? जीव हा कार्य नाहीं. कशावरून म्हणाल, तर कार्यात्मक सृष्टीमध्यें 'अंससारी' प्रविष्ट झाला असें श्रुतिवाक्य आहे. 'तें उत्पन्न करून मग त्यांत आपण जीवासह प्रविष्ट होतो झालो' असा, आकाशादिकांचें कारण असंसारी परमात्मा, अन्नमय कार्यानुप्रवेश मात्र श्रुतीनें वर्णिला आहे. म्हणून कार्यामध्यें अनु-

प्रवेश करणारा जीवात्मा म्हणजे असंसारी परमात्माच होय, हें निश्चित आहे. शिवाय, 'उत्पन्न करून मग प्रविष्ट झाला' हें वाक्यच सांगतें कीं उत्पन्न करणें व प्रवेश करणें ह्या दोन्ही क्रिया एकाच कर्त्यानें केलेल्या आहेत. 'क्त्वा' ('ऊन' प्रत्यय) उपयोजिला आहे, त्याचें रहस्यच आहे कीं सर्ग व प्रवेश या उभयतांचा कर्ता एकच आहे. तात्पर्य, जीव हा संसारी नाहीं, इतकेंच नव्हे, तर जीव व परमात्मा एकस्वरूप आहेत, हें समजावें.

पूर्व०—प्रविष्ट झाल्यानंतर परमात्म्यापासून विभक्त होऊन परिणत झालेल्या जीवाला निराळें स्वरूप आलें असेल!

सिद्धांती—यांवयाचेंच नाहीं. कारण 'प्रवेश म्हणजे उपलब्धि' असा मात्र अर्थ श्रुतीला व युक्तीला मान्य आहे, असें सांगून आम्हीं मागेंच या पक्षाचें खंडन केलें आहे.

पूर्व०—पण 'ह्या जीवानें (हें जीवस्वरूप घेऊन)' ही विशेष श्रुति स्पष्ट बोध करिते कीं परमात्म्यानें स्वभिन्न जीवस्वरूप घेऊन प्रवेश केला.

सिद्धान्ती—कसें सांगेल श्रुति असें? 'तें सत्य,' 'तोच आत्मा' 'तें तूं आहेस' इत्यादि वाक्यें 'परमात्मा व जीवात्मा एक, एकरूप आहेत,' असें सामानाधिकरण्यद्वारा सांगत आहेत, हें कसें विसरतां?

पूर्व०—तुम्ही कांहीं म्हणा, श्रुति वाटेल तें सांगो, जीव संसारी आहे, हा प्रत्यक्ष अनुभव तुमच्या युक्त्या व श्रुती बाधित करण्याला समर्थ आहेत.

सिद्धान्ती—नीट विचार करा. अहो! जीव संसारी आहे, हें पहतो कोण? हें समजतें कोणाला! ज्ञानरूप जीवच जर द्रष्टा आहे, तर तोच दृश्य कसा होईल? डोळ्यानें स्वतःचें रूप व सामर्थ्य पाहिलें, असें तुम्ही तरी म्हणतां काय! जीवात्मा स्वरूपतः संसारी आहे व तसा तो दिसतो, हा अनुभव येतोसा वाटतो. पण ही भ्रांति आहे. तर्काच्या कसोटीला हा अनुभव उतरत नाहीं. सुख-दुःखादि उपलब्ध होतात जीवाला; म्हणून जीव सुखी-दुःखी आहे, त्या सुख-दुःखांचा द्रष्टा सुखी-दुःखी आहे, हें कोण कबूल करील? न्यायाधीश चोरांचा न्याय करितो, म्हणून तोच चोर आहे, असें आम्ही कसें म्हणूं?

पूर्व०—ही शुद्ध शब्दांची लटपट आहे. 'मला सुख होतें' 'मी सुखी आहें' असा साक्षात अनुभव मी घेतों, हें प्रत्यक्षप्रमाणानें जरी सिद्ध करितां आलें नाहीं, तथापि माझें चैतन्य (ज्ञानसामर्थ्य) मला सांगतें त्यावरून मला समजतें कीं मी 'सुखी आहे.'

सिद्धान्ती—तुमच्या तोंडानेंच न्याय झाला, हें उत्तम आहे. तुम्ही सुखी आहांत हें सांगणारें तुमचें चैतन्य सुखी कसें होईल? साखरेची गोडी चाखणारा जो रसज्ञ तोच साखर कसा होईल? सारांश, कर्म करणारा कर्ता आपण स्वतःच कर्म होऊं शकणार नाहीं व पाहणारा पाहण्याची वस्तु होणार नाहीं. सुख-दुःख पाहणारे

तुम्ही धर्मी जर स्वतःच सुखदुःखादिधर्म शालत, तर कर्मच व्हावयाचें नाहीं. कर्ताच कर्म शालां, तर करावयाचें कांहीं नसलेंच पाहिजे. तात्पर्य, मी (द्रष्टा) हाच सुखी सुखविषय आहें, (दृश्य आहें) असें तुम्हांस वाटलें, ही तुमची भ्रांति आहे. धर्मी व धर्म यांचा व्यभिचार होणें शक्य नाहीं. उष्ण आणि त्याचा धर्म दाहकता हे अव्यभिचारी असतात. तसेंच, प्रकाश आणि त्याचें प्रकाशत्व होय. पण दाहक आणि दाह्य व प्रकाश आणि प्रकाश्यकत्व हीं भिन्नच असावयाचीं समजलांत ? तात्पर्य, असंसारी द्रष्टा हा केव्हांही संसारी किंवा दृश्य होऊं शकत नाहीं.

पूर्व०—प्रत्यक्ष प्रमाण राहिलें. पण मला त्रासादि होतात, यावरून माझा आत्मा दुःखी आहे, असें अनुमानानें तरी मला कळतें.

सिद्धांती—पुनः आपलेंच। त्रासादि व दुःखादि धर्म उपलब्ध होतात, तर ते धर्म उपलब्ध्याचे कसे असणार ? ज्याला त्रासादि होतात, तो उपलब्धा नसतो. उपलब्ध्याला त्रासादि धर्म आहेत, हें प्रत्यक्षानें वा अनुमानानें केव्हांही सिद्ध व्हावयाचें नाहीं.

पूर्व०—मग कापिल-सांख्य व काणाद-तर्कशास्त्र इत्यादिकांशीं तुमचा विरोध आहे म्हणावयाचा. नव्हे ?

सिद्धांती—हीं शास्त्रें व्यवहारी सिद्धांत प्रमाणपुरःसर सांगतात; तेव्हां तीं आम्हीं मान्य करितों. पण प्रमाणालाही अगोचर अशा ब्रह्मस्वरूपाविषयीं, सृष्टीच्या उत्पत्ती-विषयीं व तिच्या स्वरूपाविषयीं जेव्हां ते ते आचार्य निर्मूल व वेदविरोधी तर्क उज्जृंभितात, तेव्हां हा सर्व भ्रांतीचा विलास आहे, असें समजून आहीं त्यांची उपेक्षा करितों. ब्रह्माचें स्वरूप श्रुतीला सुद्धां शब्दांनीं सांगतां येत नाहीं. पण ब्रह्मस्वरूपाचें दिग्दर्शन तिला लक्षणतः करितां येतें. श्रुति नित्य आहे, म्हणून आम्ही तिच्या सांगण्यावर विश्वास ठेवितों व तिला अनुकूल असणाऱ्या सर्व शास्त्रांवर व प्रमाणांवर आमची व्यवहारांत श्रद्धा असतेही. पण आपली मर्यादा सोडून जेव्हां हीं शास्त्रें परमार्थाविषयीं कल्पनानिर्मित व श्रुतिविरोधी सिद्धांत सांगतात, तेव्हां ते निराधार, उत्पन्न झालेले व श्रुतिविरोधी, अतएव भ्रांत म्हणून आम्ही त्यांची उपेक्षा करितों. भ्रांतीशीं परमार्थानें विरोध काय करावा ? येथपर्यंत जें विवेचन झालें, त्यावरून तुम्हांसही कळलें असेल कीं, आत्म्याचें असंसारित्व म्हणजे निर्विकारी नित्यत्व श्रुतींच्या व श्रुत्यनुकूल तर्काच्या साह्यानें सिद्ध होतें. तसेंच आत्मवस्तु एक आणि अद्वितीय आहे, म्हणूनही ती वस्तु असंसारी आहे हें ठरतें.

पूर्व०—हें एकत्व कसें ?

शिष्य—पूर्वी याचाही विचार आपण केला आहे, याच उपनिषदाचें व्याख्यान करितांना केला आहे, तो लक्षांत आणा. 'पुरुषामध्यें जो हा आहे व आदित्यामध्यें जो तो आहे, तो तो व तो हा, एकच आहेत' ह्या मंत्राचें स्पष्टीकरण लक्षांत आणा म्हणजे आत्म्याच्या एकत्वाचा उलगडा होईल.

सिद्धान्ती—असो; आत्म्याचें एकत्व व असंसारित्व ज्याला समजलें, त्या जीवन्मुक्तांची मरणोत्तरस्थिति श्रुति सांगते:—

स य एवंवित् । अस्माल्लोकात्प्रेत्य । एतमन्नमयमात्मानमुपसंक्रम्य । एतं प्राणमयमात्मानमुपसंक्रम्य । एतं मनोमयमात्मानमुपसंक्रम्य । एतं विज्ञानमयमात्मानमुपसंक्रम्य । एतमानन्दमयमात्मानमुपसंक्रम्य । इमाल्लोकान्कामान्नी कामरूप्यनुसंचरन् । एतत्साम गायन्नास्ते । हा३वु हा३वु हा३वु ॥ ८ ॥

अन्वय व अर्थ—यः एवंवित् सः (ज्याला हें यथोक्त ज्ञान झालें तो) अस्मात् लोकात् प्रेत्य (ह्या मर्त्यलोकांतून परेत होऊन) एतं अन्नमयं आत्मानं उपसंक्रम्य, एतं प्राणमयं आत्मानं उपसंक्रम्य, एतं मनोमयं आत्मानं उपसंक्रम्य, एतं विज्ञानमयं आत्मानं उपसंक्रम्य, एतं आनंदमयं आत्मानं उपसंक्रम्य,—सः—कामान्नी, कामरूपी, इमान् लोकान् अनुसंचरन् एतत् साम गायन् आस्ते (ह्या अन्नमय आत्म्याचें, प्राणमय आत्म्याचें, मनोमय आत्म्याचें, विज्ञानमय आत्म्याचें व आनंदमय आत्म्याचें उपसंक्रमण करून—तो—कामान्नी व कामरूपी म्हणजे स्वेच्छेनें अन्न प्राप्त करून घेणारा व हवें तें स्वरूप धारण करणारा जीवन्मुक्त ह्या मर्त्यादि लोकांचा अनुभव ज्ञानदृष्टीनें घेत होत्साता, ह्या साममंत्राचें—समपूर्ण एक ब्रह्माचें—गायन करित राहतो) हा३वु, हा३वु, हा३वु, (अहो! काय विस्मयास्पद चमत्कार आहे हा, काय चमत्कार, काय अपूर्व चमत्कार,—असे त्याचे स्वयंसिद्ध उद्गार असतात.

अन्नमयादिक्रमेणाऽऽनन्दमयमात्मानमुपसंक्रम्यैतत्साम गायन्नास्ते । सत्यं ज्ञानमित्यस्या ऋचोऽर्थो व्याख्यातो विस्तरेण तद्विवरणभूतयाऽऽनन्दवल्ल्या सोऽश्नुते सर्वान्कामान्सह ब्रह्मणा विपश्चितेति तस्य फलवचनस्यार्थविस्तारो नोक्तः । के ते किंविषया वा सर्वे कामाः कथं वा ब्रह्मणा सह समश्नुत इत्येतदुक्तमनेनादिमि-

दानीमारभ्यते । तत्र पितापुत्राख्यायिकायां पूर्वविद्याशेषभूतायां तपो ब्रह्मविद्यासाधनमुक्तम् । प्राणादेराकाशान्तस्य च कार्यस्यान्नाऽऽदत्वेन विनियोगश्चोक्तः । ब्रह्मविषयोपासनानि च । ये च सर्वे कामाः प्रतिनियतानेकसाधनसाध्या आकाशादिकार्यभेदविषया एते दर्शिताः एकत्वे पुनः कामकामित्वानुपपत्तेः । भेदजातस्य सर्वस्याऽऽत्मभूतत्वात् । तत्र कथं युगपद्ब्रह्मस्वरूपेण सर्वान्कामानेवं वित्समश्नुत इत्युच्यते । सर्वात्मत्वापत्तेः । कथं सर्वात्मत्वापत्तिरित्याह । पुरुषादित्यस्थात्मैकत्वविज्ञानेनापोह्योत्कर्षापकर्षावन्नमयाद्यात्मनोऽविद्याकल्पितान्क्रमेण संक्रम्याऽऽनन्दमयाऽऽन्तान्सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्मादृश्यादिधर्मकं स्वाभाविकमानन्दमजममृतमभयमैद्वतं फलभूतमापन्न इमाँल्लोकान्भूरादीननुसंचरन्निति व्यवहितेन संबन्धः । कथमनुसंचरन् । कामान्नी कामतोऽन्नमस्येति कामान्नी । तथा कामतो रूपाण्यस्येति कामरूपी । अनुसंचरन्सर्वात्मनेमाँल्लोकानात्मत्वेनानुभवन् । किम्, एतत्साम गायन्नास्ते । समत्वाद्ब्रह्मैव साम सर्वानन्यरूपं गायञ्शब्दयन्नात्मैकत्वं ख्यापयँल्लोकानुग्रहार्थं तद्विज्ञानफलं चातीव कृतार्थत्वं गायन्नास्ते तिष्ठति । हा३वु हा३वु हा३वु । अहो इत्येतस्मिन्नर्थेऽत्यन्तविस्मयख्यापनार्थम् ।

सिद्धांती—आम्ही आतांच अन्वयार्थ केला आहे, त्यावरून तुम्हां सर्वांस समजलेंच आहे कीं, हा ज्ञानी जीवात्मा अन्नमयादिपासून आनंदमयापर्यंतच्या सर्वकोशाकडे ज्ञानरूपी उपसंक्रमण करून सामगायन करित होत्साता विद्यमान असतो.

पूर्व०—ठीक. पण या वल्लीचें प्रयोजनच काय होतें बरें ? आनंदवल्लीच्या प्रवचनानेंही तुमच्या जीवन्मुक्ताच्या गायनाचा तर्क आम्हांस करितां आला असता.

सिद्धांती—ऐका: 'सत्य, ज्ञान, अनंत' हें ब्रह्मस्वरूप सांगणाऱ्या ऋग्वेदमंत्रांतील 'सत्य, ज्ञान, अनंत' प्रतिपादक शब्दांच्या लक्षणापूर्ण अर्थांचें. व्याख्यान करण्यासाठीं मात्र जिचा अवतार झाला आहे, त्या आनंदवल्लीनें (ब्रह्मवल्लीनें) अर्थ तर विशद केला. पण 'ब्रह्मसाह्यानें तो जीवन्मुक्त सर्व कामांचा उपभोग एक कालीं घेतो' हें जें पूर्वोक्त ऋचेंतील फलभूतांचें वचन, त्याचा अर्थविस्तार तेथें झाला नाहीं तें काम (वासना) कोणते, त्यांचे विषय काय, ब्रह्मावरोबर किंवा ब्रह्मसाह्यानें उपभोग कसे घेतां येतात, हें सांगावयाचें अवशिष्ट राहिलें होतें. तें सांगण्यासाठीं ह्या वल्लीचा अवतार झाला आहे. या वल्लींत प्रथमत: ब्रह्मा—भृगूचा (पितापुत्रांची) गोष्ट सांगितली आहे. गोष्टीचा उद्देश हा आहे कीं, ब्रह्मविद्येचें उत्तमोत्तम साधन तप

(ज्ञानप्रपोषक प्रमाणशुद्ध विचार) आहे, हें कळावें. सारांश, अधिवल्लींत जो ब्रह्मज्ञानाचा विस्तार केला, त्यांतील अवशिष्ट राहिलेला जो साधनांचा विचार, तो विस्तारतः पितापुत्रांच्या कथानकाचरून कळावा, हा या वल्लीतील पहिल्या भागाचा उद्देश आहे. नंतर प्राणमयापासून आकाशापर्यंतच्या सर्व वस्तू कार्यात्मक ह्मणून त्या सर्व वस्तू अन्न-अन्नादि आहेत, (भोक्तृ-भोग्यरूप आहेत, कर्तृ-कार्यरूप आहेत) असें सांगून प्राणादि आकाशान्त (प्राणापासून आकाशापर्यंतचे) विषय ब्रह्मप्राप्तीला साधनभूत होतात असें प्रतिपादिलें. नंतर, आकाशादि कार्यभेद हेच आहेत विषय ज्यांचे, असे काम (वासना) विद्यमान असतात, ते कार्यकारणाच्या निश्चित शृंखलेनें बद्ध झालेले असतात, असें सांगितलें.

शिष्य—ह्मणजे आपल्या वासना आपल्या जीवाच्या ताब्यांत नसून आकाशादि भिन्नभिन्न स्वरूपी कार्यांनीं आपल्या मनोबुद्धींची जशी घटना केली असेल तदनुसार व ईश्वरी मायेंत जी कार्यकारणाची रीति दिसते व असते, तिच्या तंत्रानें ह्या वासना निर्माणनिर्वाण—पदवीला (उदयास्ताला) पावत असतात, होयना ? सर्व वासना प्रकृतितंत्र आहेत, जीवतंत्र नाहींत, असें समजावयाचें ?

सिद्धांती—होय. विषयवासना प्रकृतितंत्र आणि मोक्षेच्छा ही स्वतंत्र अथवा ब्रह्मज्ञानतंत्र, असा भेद ध्यानांत धर. असो; या सर्व कामांचेंही दिग्दर्शन येथें केलें आहे. तसेंच, एकत्वाचा ज्ञानपूर्वक निश्चय होऊन साक्षात्कारही झाला म्हणजे तो ब्रह्मज्ञ कामी (विषयांची इच्छा धरणारा) असत नाहीं व त्याला काम कोणतीही बाधा करूं शकत नाहीं, हें सर्व भिन्नभिन्न दिसणारें विश्व स्वरूपतः आपणच आहोंत, आपल्याहून भिन्न असें कांहीं नाहीं, असा पूर्ण निश्चय झालेल्या विद्वानाला वासना होईल कशाची व तो वासनामय होईल तरी कसा ? तात्पर्य, ब्रह्मज्ञ पुरुष सर्वथा निष्काम होऊन आनंदरूप होतो.

पूर्व०—हें जर खरें, तर ' ब्रह्मज्ञानी ब्रह्मस्वरूपानें सर्व कामांचा उपभोग एककाळीं घेतो ' हें श्रुतिवाक्य नाहींसें करा. ब्रह्मज्ञ पुरुष जर कामाचाही आत्मा म्हणजे नियंता झाला, तर तो त्याच कामाचा उपभोग घेईल कसा ? साखरेला स्वतःची गोडी चाखतां येईल काय ? नाहीं. उपभोगच आपण झालों, तर उपभोगाचें सुख उपभोक्त्याला होतें, तसें आपल्यास कसें होईल ? सुखाचा आस्वाद घेण्याला भोक्ता सुखविषयक पदार्थांपासून निराळा असला पाहिजे, हें आतांच तुम्हीं सांगितलें. तेव्हां 'सर्व आत्मरूप नाहीं, ' असें म्हणा किंवा ' ब्रह्मज्ञाला वासनातृप्तीचें आनंदसुख मिळत नाहीं, असें तरी म्हणा. तात्पर्य येथें (तो सर्व भोग एककाळीं उपभोगितो, या श्रुतिवाक्यांत व तो सर्व होतो, या वाक्यांत) स्पष्ट विरोध आहे.

सिद्धांती—सर्वात्मत्वाच्या उपपत्तीनें ह्याचा उलगडा होतो. कसा तो ऐकाः हा उलगडा करण्यासाठींच पुनः ' या पुरुषांत जो आहे, तोच सूर्यांत आहे ' अशा अर्थाच्या

थुलीचा अवतार केला आहे. भीतीत व आदित्यांत अंतर्यामित्वानें राहणारा आत्मा एकच आहे, असें ज्ञानविज्ञान झालें म्हणजे सर्व उच्च-नीच-भावांचा निरास होतो. हा निरास झाल्यावर अज्ञानानें निर्माण केलेले अन्नमय, प्राणमय इत्यादि पंचकोश, हेच आत्मे आहेत असें जें अज्ञान असतें, त्या अज्ञानाचें व अज्ञान-तिमिराचें क्रमशः विदारण प्रस्तुत ब्रह्मज्ञ आपल्या आत्मज्ञानानें करितो. हें अज्ञानविध्वंसन म्हणजे त्याचें उपसंक्रमण होय.

शिष्य—प्रथम अन्नमयकोश हाच आत्मा आहे असें भान असतें. प्राणमयाचें ज्ञान झालें म्हणजे अन्नमय आत्मा अज्ञानकल्पित होता, हें कळतें व प्राणमय कोश हाच आत्मा असें वाटूं लागतें. पुढें ज्ञानाचा विकास होत जातो तसतसे प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय हेही कोश आत्मे नव्हत, त्यांच्यावर केलेला आत्मत्वाचा आरोप भ्रांतिरूप होता, हें क्रमशः कळतें आणि शेवटीं आत्मानुग्रह होऊन 'आत्मा सत्य, ज्ञान अनंत आहे, तो अदृश्य, अनिलयन, इत्यादि स्वरूपाचा आहे. दृश्य-स्पर्शत्वादि जडविलक्षण धर्माचा आहे, आत्मा स्वाभाविक म्हणजे स्वतंत्र व स्वयंभु आहे, आनंदरूप आहे, तो अज, अमृत, अभय, अद्वैत, आहे; आत्मा हाच पुरुषार्थ आहे, असें ज्ञान होतें. होयना!

सिद्धांती—उत्तम! पण, वत्सा! आत्मज्ञान होतें, असें मुद्दा म्हणण्याची सोय नाहीं. ब्रह्मज्ञ ज्ञानरूप होतो. असो; हा ज्ञानरूप ब्रह्मज्ञ (स्वरूपज्ञान झालेला विद्वान्) या दृश्य भूभुंवादि लोकांमध्यें संचार करितो.

पूर्व०—सर्व भोगांचा उपभोग घेतो; याची वाट?

सिद्धांती—ऐका: संचार हाच त्याचा उपभोग होय. हे सर्व लोक आत्मरूप आहेत, असा त्याचा अनुभवपूर्वक निश्चय असतो. ही जीवन्मुक्त स्थिति होय. येथें प्रारब्धकर्मानें प्राप्त झालेल्या देहादिकांचा यत्किंचित् मात्र संबंध असतो. 'मी सर्वांचा आत्मा आहें' असें भान अद्यापि जिवंत असतें. तेव्हां अर्थातच, अणिमा, लघिमा इत्यादि ऐश्वर्यवंत योगी ब्रह्मज्ञ लोकांस जें वाटेल तें अन्न व वाटेल तें रूप संपादण्याचें सामर्थ्य असतें. त्यांचाही आत्मा मीच आहें. असा या जीवन्मुक्ताचा निश्चय असतो. या निश्चयामुळें विश्वांतील सर्व उपभोग्य विषयांच्या प्राप्तीनें होणारे जें सुख तें या सर्वात्मभूत जीवन्मुक्ताला सहज मिळतें. आत्मभावानें तो सर्व सुखांचा भोक्ता होतो. सर्व सुखें त्याच्या चरणीं लीन होतात. जीवन्मुक्ताचा हा उपभोग म्हणजे आत्मज्ञानच होय. यावरून उपभोग आत्मरूप, भोक्ता आत्मरूप आणि भोगही आत्मरूप होतात, हें तुमच्याही प्रत्ययाला येईल. प्रारब्धनिर्मित देह आहे तोंपर्यंत ही स्थिति. कर्मप्रेरक विषयवासनांचा व कर्मफलाच्या तसाच कर्माच्या अभिमानाचा विलाप झाल्यामुळें, संचिताचा व जीवन्मुक्ताचा संबंध तुटतो आणि

क्रियमाण होत नाहीं; म्हणून जीवन्मुक्काला पुनः देहधारण नाहीं. देह संपला कीं ते ज्ञानरूप व आनंदरूप होतो. समजलां ? सारांश, ब्रह्मज्ञाचा उपभोग म्हणजे सर्वात्मत्वाचें निश्चित ज्ञान होय. एवंच, वेथें उपभोक्ता, भोग्यविषय किंवा उपभोग, या प्रकारचें द्वैत नसतें. झाली याप्रमाणें दोन्ही श्रुतींची एकवाक्यता ?

शिष्य—भगवन् ! हा आत्मभावानें आत्मरूप लोकांमध्यें संचार करितो, म्हणजे ?

सिद्धान्ती—हा संचार म्हणजे आत्मज्ञानाचा उपभोग अथवा अनुभव होय. या अनुभवानंदांत तो सामगायन करित राहतो.

पूर्व०—सामदेव तरी जिवंत राहतो, तर मग ?

सिद्धांती—थांबा. साम म्हणजे समत्व, ब्रह्म. सर्व दृश्यांत आत्मरूपानें वास्तव्य करणारा परमात्मा म्हणजे साम. हा परमात्मा सर्वानन्य आहे, सर्वात्मा आहे. तोंच सर्व आहे. असो; या ब्रह्मरूपासंबंधानें तो गायन करितो, ब्रह्मरूप शक्य त्या शब्दानीं वर्णितो. कशाला ? सर्व जीवांस ब्रह्मवस्तु काय आहे, ही कळावी म्हणून. समजलें ? जीवसंतारणार्थ मात्र त्या ब्रह्मज्ञाचे व्यापार असतात. हें त्याचें सहजकर्म आहे. येथें परप्रेरणा म्हणजे परतंत्रता नाहीं किंवा फलाभिषही नाहीं. लोकसंग्रहार्थ मात्र याचा व्यवहार ' सहज बोलणें हितउपदेश । करूनि सायास शिकविती ॥ ' ही उक्ति वरील सिद्धांताचाच अनुवाद करिते. ' ब्रह्मज्ञानविज्ञान झालें असतां उत्कृष्ट प्रकारची कृतकृत्यता प्राप्त होऊन सर्व श्रेष्ठ पुरुषार्थ सिद्ध होतो. ' हें त्याच्या गायनाचें ध्रुपद आहे.

शिष्य—हा ३ वु, हा ३ वु, हा ३ वु म्हणजे ?

सिद्धान्ती—हा ३ वु म्हणजे अहो ! विस्मयाची व पूज्यतापूर्वक आश्चर्याची परमावधि झाली म्हणजे सहज हे आनंदसूचक उद्गारवाची शब्द मुखावाटे बाहेर येतात. श्रुतीनें ' तीन ' हा अंक घालून ' हा ' ची प्लुति दर्शविली आहे. गायनासाठीं ही प्लुति आहे.

पूर्व०—या जीवन्मुक्काला विस्मय कसला ?

सिद्धांती—ऐका या हर्षोत्पादी विस्मयाचें कारणः—

अहमन्नमहमन्नमहमन्नम् । अहमन्नादोऽ३हमन्नादोऽ३हमन्नादः । अहꣳ श्लोककृदहꣳ श्लोककृदहꣳ श्लोककृत् । अहमस्मि प्रथमजा ऋता३स्य । पूर्वं देवेभ्यो अमृतस्य ना३भायि । यो मा ददाति स इदेव मा३ऽऽवाः । अहमन्नमन्नमदन्तमा३द्मि । अहं विश्वं भुवनमभ्यभवा३म् । सुवर्न ज्योतीः । य एवं वेद । इत्युपनिषत् ॥ ६ ॥

अन्वय व अर्थः—**अहं अन्नं, अहं अन्नं, अहं अन्नं; अहं अन्नादः; अहं अन्नादः अहं अन्नादः; अहं श्लोककृत्, अहं श्लोककृत्, अहं श्लोककृत्** (मी अन्न, मी अन्न, मी अन्न आहें; मी अन्नाद, मी अन्नाद, मी अन्नाद आहें; मी श्लोककर्ता, मी श्लोककर्ता, मी श्लोककर्ता आहें) **ऋतस्य प्रथमजाः अहं अस्मि** (सर्व मूर्तामूर्त वस्तूंमध्यें मी प्रथमज आहें) **देवेभ्यः पूर्वं** (मी देवांच्या पूर्वीचा आहें) **अमृतस्य नाभायि** (अमृताचा नाभि म्हणजे मध्य आहें) **यः मा ददाति, सः इत् एव मा** (जो माझें दान करितो, तो माझें संरक्षणच करितो) **अन्नं अदंतं अन्नं अहं आ अद्मि** (अन्न न देतां स्वतः मात्र अन्न खाणारा माझें अन्न होतो व मी त्याला खाऊन टाकतों) **अहं विश्वं भुवनं अभ्यभवाम्** (हें सर्व विश्व व त्यांत राहणारीं भुवनें यांचा मी उपसंहार करितों) **सुवः न ज्योतिः** (माझा प्रकाश सूर्यासारखा आहे) **इति एवं वेद** (ज्याला हें सर्वज्ञानविज्ञान होतें, तो कृतार्थ होतो) **इति उपनिषत्** (याप्रमाणें हें उपनिषद् आहे.)

कः पुनरसौ विस्मय इत्युच्यते—अद्वैत आत्मा निरञ्जनोऽपि-सन्नहमेवान्नमन्नादश्च । किंचाहमेव श्लोककृत् । श्लोको नामान्नान्नादयोः संघातस्तस्य कर्ता चेतनावान् । अन्नस्यैव वा परार्थस्यान्नादार्थस्य सतोऽनेकात्मकस्य पारार्थ्येन हेतुना संघातकृत् । त्रिरुक्तिर्विस्मयत्वख्यापनार्था । अहमस्मि भवामि । प्रथमजाः प्रथमजः प्रथमोत्पन्नः । ऋतस्य सत्यस्य मूर्तामूर्तस्यास्य जगतो देवेभ्यश्च पूर्वममृतस्य नाभिरमृतत्वस्य नाभिर्मध्यं मत्संस्थममृतत्वं प्राणिनामित्यर्थः ।

यः कश्चिन्मा मामन्नमन्नार्थिभ्यो ददाति प्रयच्छत्यन्नात्मना ब्रवीति स इदित्थमेवमविनष्टं यथाभूतमावा अवतीत्यर्थः । यः पुनरन्यो मामदत्त्वाऽर्थिभ्यः काले प्राप्तेऽन्नमत्ति तमन्नमदन्तं भक्षयन्तं पुरुषमहमन्नमेव संप्रत्यद्मि भक्षयामि । अत्राऽऽहैवं तर्हि बिभेमि सर्वात्मत्वप्राप्तेर्मोक्षादस्तु संसार एव । यतो मुक्तोऽप्यहमन्नभूत आद्यः स्यामन्नस्यैवं मा भैषीः संव्यवहारविषयत्वात्सर्वकामाशनस्यातीत्यायं संव्यवहारविषयमन्नान्नादादिलक्षणमविद्याकृतं विद्यया ब्रह्मत्व-

मापन्नो विद्वांस्तस्य नैव द्वितीयं वस्त्वन्तरमास्ति यता बिभेत्यतो न भेतव्यं मोक्षात्। एवं तर्हि किमिदमाह—अहमन्नमहमन्नाद इत्युच्यते। योऽयमन्नान्नादादिलक्षणः संव्यवहारः कार्यभूतः स संव्यवहारमात्रमेव न परमार्थवस्तु। स एवंभूतोऽपि ब्रह्मनिमित्तो ब्रह्मव्यतिरेकेणासन्निति कृत्वा ब्रह्मविद्याकार्यस्य ब्रह्मभावस्य स्तुत्यर्थमुच्यते। अहमन्नमहमन्नमहमन्नम्। अहमन्नादोऽहमन्नादोऽहमन्नाद इत्यादि। अतो भयादिदोषगन्धोऽप्यविद्यानिमित्तोऽविद्योच्छेदाद्ब्रह्मभूतस्य नास्तीत्यहं निर्भयः समस्तं भुवनं भूतैः संभजनीयं ब्रह्मादिभिर्भवन्तीति वाऽस्मिन्भूतानीति भुवनमभ्यभवामभिभवामि परेणेश्वरेण स्वरूपेण।

सुवर्न ज्योतीः सुवरादित्यो नकार उपमार्थे। आदित्य इव सकृद्विभातमस्मदीयं ज्योतिर्ज्योतिः प्रकाश इत्यर्थः। इति वल्लीद्वयावहितोपनिषत्परमात्मज्ञानं तामेतां यथोक्तामुपनिषदं शान्तो दान्त उपरतस्तितिक्षुः समाहितो भूत्वा भृगुवत्तपो महदास्थाय, य एवं वेद तस्येदं फलं यथोक्तमोसीति॥

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यगोविन्दभगवत्पूज्यपादशिष्यश्रीमच्छंकरभगवतः कृतौ तैत्तिरीयोपनिषदि तृतीयभृगुवल्लयध्यायभाष्ये दशमोऽनुवाकः॥ १०॥

सिद्धांती तुम्हाला विस्मयाचें कारण व स्वरूप हवें होतेंना? ऐका: जीवन्मुक्त म्हणतोः काय आश्चर्य आहे कीं मी अद्वितीय आत्मा निरंजन म्हणजे निर्दोष व निर्विकार असतांही मीच स्वतः अन्न (भोग्यविषय) आणि अन्नाद (विषयभोक्ता) आहें! श्लोककर्ता ही मीच आहें. अन्न आणि अन्नाद यांचा जो संघात आहे, त्याचा स्तोता म्हणजे श्लोक कर्ता मीच आहें, हें सत्य होय.

पूर्व०—श्लोक-शब्दाचा हा अर्थ कोठील?

सिद्धान्ती:—श्लोक म्हणजे स्तुति. श्रेष्ठवस्तूची स्तुति होते. जीवन्मुक्ताला सर्वत्र आत्मरूप दिसतें. हें स्तुत्यच आहे. या संघातच भोक्ता व भोग्य यांचा अंतर्भाव होतो. म्हणून ह्या वस्तूंचा संघातही स्तुत्य म्हणजे श्लोक्य होतो. श्लोक शब्दाचा 'संघ' असा अर्थ आहे. पदसमुच्चयाला आपण 'श्लोक' असें नांव देतों. सेनासमुदायालाही श्लोक म्हणतात. असो; अन्न व अन्नाद यांचा संघ किंवा संघात करणारा चैतन्यवानही मीच आहें. सारांश, अन्न ब्रह्म, अन्नाद (भोक्ता) ब्रह्म, आणि हें भोग्य भोक्तृत्व जाणणाराही ब्रह्मच आहे!

शिष्य—येथें तीन तीन वेळ उच्चार आहे, हा विस्मयाचें द्योतन करण्यासाठीं असेल!

सिद्धान्ती—होय. तसेंच, सर्व भोग्य, भोक्ते व ज्ञाते, यांचा संग्रहही या त्रिरावृत्तीनें होतो. जीवन्मुक्त म्हणतो, त्याचें तात्पर्य असें आहेः अन्न हें तर परार्थ असतें, दुसऱ्याकरितां, अन्न भोक्त्याकरितां असतें. तसेंच, अन्नाद म्हणजे भोक्ते देही अनेकात्मक असतात. हेही परार्थ म्हणजे दुसऱ्याकरितां म्हणजे ज्ञात्याकरितां कर्म करितात. एवंच, अन्न व अन्नाद, हे परार्थक आहेत. यांचा संघात मी चेतनवान् करितों तात्पर्य, मी भोग्यभोक्त्यांचा संघात करून पुनः निर्लेप असतों. मी ऋताचा म्हणजे सत्याचा अथवा मूर्तामूर्त जगताचा आदि म्हणजे प्रथम आहें. माझा जन्म प्रथम झाला आहे.

शिष्य—ऋत म्हणजे ब्रह्म व प्रथमज म्हणजे सृष्टीपूर्वी प्रथमतः जन्म पावलेला हिरण्यगर्भ, असे अर्थ घेतले तर!

सिद्धान्ती—ठीक आहेत अर्थ. पुढें; 'मी सर्व देवांच्याही आधींचा आहें. मी अमृताची, व अमृतत्वाची नाभि म्हणजे मध्य आहें. मोक्षाचें जें अमृतत्व आहे, तें माझ्यामध्यें संस्थित झालें आहे. रथचक्राच्या अरांस व नेमीस जशी रथनाभि (तुंबा) त्याप्रमाणें सर्वांच्या मोक्षाचें आश्रयस्थान मी आहें, असो; जो कोणी अन्नरूपी मला अन्नार्थ्यांस देतो, जो अन्नरूपानें ब्रह्माचें दान करितो, तो अन्नयज्ञकर्मास याप्रकारचें ब्रह्मदान करून माझें संरक्षण करितो, माझा विनाश न करितां माझ्या सत्स्वरूपानें माझें दान करितो, तोच माझा संरक्षक होतो.

शिष्य—अथवा ज्ञानरूपी अन्न देऊन जो आचार्य शिष्याचें संरक्षण करितो, शिष्यांस कृतार्थ करितो, तोही ज्ञानरूप ब्रह्माचें यथार्थरूप प्रख्यापितो, असें म्हणावें.

सिद्धान्ती—तात्पर्य एकच आहे. असो; जीवन्मुक्त पुनः म्हणतोः पण योग्य काल प्राप्त झाला असतांही जो अन्नार्थ्यांस माझें व मत्स्वरूपी अन्नदान किंवा विद्यार्थ्यांस विद्यादान करित नाहीं व जो त्या अन्नाचा व विद्येचा स्वतःच उपभोग घेतो, तो अन्नाद किंवा विद्याद स्वतःच अन्नरूप होऊन माझें भक्ष्य होतो. म्हणजे मी त्या धनरूपणाचा व विद्यारूपणाचा नाश करितों.

पूर्व०—पुरे तुमचें हें भीषण आख्यान. या सर्वात्मत्व देणाऱ्या मोक्षाची तर आपल्यास भीतिच वाटूं लागली! आमचा संसारच फार चांगला!

शिष्य—कांहो!

पूर्व०—कारण जीवन्मुक्त झालों, तरी मी अन्नरूप होणार आणि माझें भक्षण दुसराच कोणी करणार.

सिद्धान्ती—अहो! भिऊं नका असे! सर्व कामांचा एककालीं उपभोग आत्मरूपानें घेणाऱ्या जीवन्मुक्ताचा हा संव्यवहारविषय आहे. तो उपभोग कसा घेतो,

याचें विवेचन चाललें आहे. हें विवेचन दृश्यभास्य-विषयीकरण साधनेंच चाललें पाहिजे. इतकाच हा प्रकार आहे. वास्तविक पाहिलें असतां अन्न-अन्नादिलक्षणात्मक सर्व व्यवहारविषयांचें अतिक्रमण करून ज्या विद्वानानें विद्येचें साह्य घेऊन ब्रह्मरूप प्राप्त करून घेतलें, त्या जीवन्मुक्ताच्या ज्ञानकक्षेंत दुसऱ्या वस्तूला, द्वैताला, अवकाशच नसतोना ? मग द्वितीयच नाहीं, तर भीति कसली ? जीवन्मुक्त किंवा मुक्त सर्वथा निर्भय झालेला असतो. मोक्षस्थितींत जाणार कोण कोणाला ? तात्पर्य, मोक्षाला भिण्याचें कांहीं कारण नाहीं.

पूर्व०—मग श्रुति कां म्हणते 'मी (मुक्त) अन्न व अन्नाद आहें' म्हणून ?

सिद्धांती—ऐका: हा अन्न-अन्नादादि लक्षणात्मक व्यवहार कार्य आहे. व्यवहार म्हणजे केवळ दृश्यभास्य, नामरूपात्मक, म्हणजे असत् आहे. ही कांहीं परमार्थ वस्तु नव्हे. समजलां ? परमार्थ वस्तु एकच आहे व ती ही एकरस आणि एकरूप आहे. तेथें भिण्याचें कारण कोठील असणार ? याप्रमाणें तो जीवन्मुक्त ब्रह्मज्ञानानें ब्रह्मरूप झाला असतांही क्षणभर मौजेसाठीं व ब्रह्मीभूत झालेल्या ब्रह्मकार्याची स्तुति करण्यासाठीं मात्र 'आपण ब्रह्मव्यतिरिक्त आहों' 'आपण असत् आहों' अशी कल्पना करितो, व म्हणतो कीं 'मी अन्न आहें, अन्न आहें, अन्न आहे; व अन्नाद आहें, अन्नाद आहें, अन्नाद आहें.'

शिष्य०—जीवन्मुक्ताला आपल्यासह सर्व विश्व ब्रह्मरूपानें दिसतें. त्याला देहेंद्रियादि संघाताची उपाधि आहे, तोंपर्यंत हें विश्व दिसणारच. पण त्याचा निश्चय असतो कीं दिसत आहे, हें सर्व नामरूपात्मक म्हणून मिथ्या आहे; पण या सर्वांच्या अंतर्यामी ब्रह्म आहे, सर्वांचें अधिष्ठान ब्रह्म आहे व ब्रह्मसत्तेनेंच हें सर्व दिसत भासत आहे. सारांश, हें ब्रह्मभूत ब्रह्मकार्य आहे. कार्य आहे, तथापि तें ब्रह्मकार्य आहे. त्याचा असा निर्धार झाला असल्यामुळें तेथें दिसणाऱ्या दृश्यभास्य-चमत्कारांचें वर्णन करून ब्रह्मदृष्टि किती विस्मयास्पद आहे, हें या स्तोत्रानें श्रुति दाखवित आहे. भोग्य भोक्ता व ज्ञाता, ही तिन्हीं स्वरूपें परमार्थतः एकात्मक असतांही जीवांच्या देहादि उपाधींनीं भिन्न भिन्न दिसतात व पुनः हीं स्वरूपें रूपांतर करितात, इत्यादि ब्रह्मदृष्टीचे चमत्कार वर्णून अन्न-अन्नादी जीवाचें, संघातकारी विराटाचें, प्रथमजन्मा हिरण्यगर्भाचें व अमृताधिष्ठान ब्रह्माचें स्वरूप जीवन्मुक्त सांगत आहे. तिन्हीं स्वरूपें मीच, असें ब्रह्मज्ञ म्हणत आहे, मोक्षेच्छु दानशूराचें स्तोत्र गात आहे, स्वार्थी कृपणाच्या दैन्यावस्थेचें वर्णन करीत आहे, व आपण स्वतः अभय, आनंद आहे. होयना ?

सिद्धान्ती—शाबास ! जीते रहो !! फार चांगलें समजलास !!! तात्पर्य, अविद्येनें उत्पन्न होणाऱ्या भयादिकांचा गंधसुद्धां जीवन्मुक्ताला चेत नाहीं. अविद्येचा ज्यानें नाश केला, त्याला अविद्याजन्य विकाराचा लेप कसा होणार ? असो; हा नीतिशून्य

जीवन्मुक्त म्हणतो; ब्रह्मादि-स्तंबपर्यंतच्या जीवांनीं सेविलेलें किंवा सर्व भूतांस आश्रय देणारें सारें विश्व मी ईश्वररूपानें आपल्यामध्यें उपसंहृत करून घेतों. सारांश, सर्व मुचनें आणि भूतें ईश्वररूपी जीवन्मुक्तांत प्रलयकालीं लीन होतात. स्वः म्हणजे स्वर्ग. त्याचा प्रकाशक आदित्य आहे. तेथें व येथें आदित्य (आत्मा) हाच अर्थ आहे. आदित्याचा प्रकाश जसा नित्य व स्वयंभु असतो, तसा जीवन्मुक्ताचा ज्ञान-प्रकाश नित्य व निरपेक्ष असतो.

शिष्य—मंत्रांतील 'न' म्हणजे प्रमाणें, हा वैदिककालीन अर्थ. ज्योतिः हवें. 'ज्योतीः' हें आर्ष होय. नाहीं भगवन्!

सिद्धान्ती—याप्रमाणें 'ब्रह्मपुच्छं प्रतिष्ठा' या मंत्रखंडानें स्पष्ट केलेलें आत्मरूप जो अन्नमयादि-द्वारानें साक्षात् करून घेतो, त्याला मात्र या शेवटच्या मंत्रांत सांगितलेलें फल अवश्य मिळतें, असें श्रुति म्हणत आहे. असो; या वल्लीद्वयांत प्रतिपादिलेलें उपनिषज्ज्ञान हें परमात्मज्ञान होय. हें ज्ञान मिळविण्यासाठीं जो मुमुक्षु भृगूसारखा शांत, दांत, उपरत (विरक्त) तितिक्षु (सहनशील) व समाधानी होत्साता वरुणाचार्यादिकांच्या उपदेशानुसार महत्तप करितो व हें सर्व उपनिषज्ज्ञान विज्ञात करून घेतो, त्याला येथें सांगितलेलें फल म्हणजे मोक्ष मिळतो.

दहावा अनुवाक संपला.

भृगुस्तस्मै यतो विशान्ति तद्विजिज्ञासस्व तपोदशान्नं प्राणो मनो विज्ञानं द्वादश द्वादशाऽऽनन्दो दशान्नं न निन्द्यादन्नं न परिचक्षीतान्नं बहु कुर्वीतैकादशैकादश न कंचनैकषष्टिदेश ॥

सह नाववतु। सह नौ भुनक्तु। सह वीर्यं करवावहै। तेजस्विनावधीतमस्तु। मा विद्विषावहै ॥

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः।

हरिः ॐ ॥

या शांतिपाठाचा अर्थ मागें दिलाच आहे.

तैत्तिरीय उपनिषद् संपलें.

हरिः ॐ.

शांतिः शांतिः शांतिः